अज्ञातशत्रू

रा. सू. गवई (दादासाहेब) स्मृतिग्रंथ

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
विधान भवन, मुंबई

अज्ञातशत्रू



रा. सु. गवई (दादासाहेब) स्मृतिग्रंथ

प्रकाशक व : डॉ. अनंत कळसे,
मुद्रक प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

मुखपृष्ठ, : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मांडणी व चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.
सजावट

मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.

स्वागतमूल्य : रु. ५००

© सर्व हक्क प्रकाशकाधिन

निर्मिती : वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

या ग्रंथातील लेख वा इतरत्र मुद्रित मजकुरातील मते ही त्या-त्या लेखकांची आहेत. त्या सर्वांशी संपादकमंडळ अथवा महाराष्ट्र विधानमंडळ सहमत असेलच असे नाही.

अजातशत्रू

मार्गदर्शक

मा. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.
मा. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

मा. श्री. हरिभाऊ बागडे
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.
मा. श्री. गिरीश बापट
संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

संपादक

डॉ. किशोर फुले
अमरावती.

समन्वय संपादक

श्री. निलेश मदाने
विधानमंडळ, मुंबई.

संपादक मंडळ

श्री. वसंतराव (दादा) देशपांडे, मुंबई.
श्री. ल. त्र्यं. जोशी, नागपूर.
श्री. सुधीर पाठक, नागपूर.
डॉ. राजेंद्र गवई, मुंबई.
श्री. प्रफुल्ल मारपकवार, मुंबई.

एचबी ११८०—अ

अर्पणपत्रिका

वंचित समाजघटकांना
संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून
न्याय प्रदान करता येतो या आश्वासकतेचे मूर्तिमंत प्रतीक
म्हणजे दादासाहेब.
संसद अथवा विधानमंडळाची सभागृहे
ही विचारभिन्नतेच्या प्रकटीकरणाचे संविधानिक व्यासपीठ आहे.
विचारभिन्नता कायम ठेवूनही संवाद आणि
समन्वयाद्वारे व्यापक समाजहिताला प्राधान्य कसे द्यावे,
त्याची प्रेरणा दादासाहेबांच्या जीवनकार्यातून मिळते.
भारतीय राज्यघटनेने आपल्याला दिलेल्या या व्यवस्थेतील
अशा बलस्थानांविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हा स्मृतिग्रंथ सादर समर्पित ...

भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

आमच्या संविधानसभेत

आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी

याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

राष्ट्रपति
भारत गणतंत्र
PRESIDENT
REPUBLIC OF INDIA

MESSAGE

I am happy to learn that the V.S. Page Parliamentary Training Centre, Vidhan Bhavan, Mumbai is bringing out a 'Memorial Volume' on late Shri Dadasaheb Gavai.

Shri Dadasaheb Gavai was a versatile personality, an excellent administrator and a leader who worked throughout his life for the social and political transformation of the people of our country. He served the nation with distinction as a Parliamentarian and as Governor of Bihar, Kerala and Sikkim. He was also Member, Deputy Chairman, Chairman and Leader of Opposition in the Maharashtra Legislative Council besides being an active participant in the Goa Liberation Movement.

A close associate of Dr. B.R. Ambedkar, Shri Gavai rendered immense service as Chairman of the Deekshabhoomi Smarak Samiti in Nagpur. His life based on values of simplicity, tolerance, patriotism and selfless service to the nation will always remain an inspiration for the youth of our country.

On this occasion, I pay homage to this great son of India. I also extend my greetings and felicitations to all those associated with the V.S. Page Parliamentary Training Centre and wish the publication every success.

(Pranab Mukherjee)

New Delhi
September 19, 2016

सत्यमेव जयते

उप-राष्ट्रपति, भारत

VICE-PRESIDENT OF INDIA



MESSAGE

I am happy to know that V.S. Page Parliamentary Training Centre, Vidhan Bhavan, Mumbai is publishing a Memorable Volume in honour of Late Shri R.S. Gavai.

Shri Gavai was a versatile personality and championed the empowerment of poor and downtrodden sections of the society. In his long political innings he held prominent positions in national and regional politics. He was an excellent administrator and political leader and served as the Governor of states of Bihar, Sikkim and Kerala.

I extend my felicitations and best wishes to all the Members of the Maharashtra Legislative Council and Maharashtra Legislative Assembly as well as the V.S. Page Parliamentary Training Centre for publishing a Memorable Volume in honour of Late Shri R.S. Gavai.

(M. HAMID ANSARI)

New Delhi
07th September, 2016

सत्यमेव जयते

अध्यक्ष, लोक सभा
SPEAKER, LOK SABHA

संदेश

यह जानकर प्रसन्नता हुई कि वी.एस. पागे पार्लियामेंट्री ट्रेनिंग सेन्टर, विधान भवन, मुम्बई, द्वारा बिहार और केरल के पूर्व राज्यपाल स्व. श्री आर.एस. गवई की स्मृति में "मेमोरेबल वॉल्यूम (स्मृति ग्रंथ)" का प्रकाशन होने जा रहा है। गवई साहेब महाराष्ट्र के लोकप्रिय जमीनी नेता थे तथा वे महाराष्ट्र विधान परिषद के अध्यक्ष पद पर रहे। प्रस्तुत पुस्तक में उनके जीवन एवं कार्यशैली के बारे में विस्तार से वर्णन है। एक संसदविद के रूप में उन्होंने काफी संवेदनशीलता से कार्य किया। वे गोवा मुक्ति आंदोलन के कार्यकर्ता थे एवं उनमें राजनीतिक कौशल था। उन्होंने अपना सम्पूर्ण जीवन सामाजिक कल्याण एवं सशक्तिकरण के कार्य के लिए लगा दिया।

पुस्तक में उनके द्वारा दिए गए महत्वपूर्ण भाषणों, चयनित लेखों एवं कई स्मरणीय छायाचित्रों का संग्रह है जो संकलन योग्य है। मैं इस 'मेमोरेबल वॉल्यूम (स्मृति ग्रंथ)' के सफल प्रकाशन की कामना करती हूं ।

(सुमित्रा महाजन)

Ch. Vidyasagar Rao
GOVERNOR OF MAHARASHTRA

RAJ BHAVAN
Malabar Hill
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 2660
Fax.: 022-2368 0505

30 August 2016

MESSAGE

The late Shri R.S. alias Dadasaheb Gavai, former Governor of Bihar and Kerala and one of the longest serving members of Maharashtra State Legislature, was truly an institution in himself.

Shri Gavai's association with the State Legislature started in the year 1964, four years after the formation of the State of Maharashtra. He was a member of the State Legislature for nearly four decades during which period, he also served as the Deputy Chairman and Chairman of the Legislative Council. Some of his decisions as Chairman of the Legislative Council became precedents for presiding officers. A warm hearted person, Gavai Ji had friends and admirers cutting across the entire political spectrum. Gavai Ji maintained his contacts with grassroots workers and ordinary people till his end. He knew the pulse of the common man. Gavai Ji was also associated with various social organizations and played an important role in creating, and later managing the affairs of the historic memorial for Bharat Ratna Dr Babasaheb Ambedkar at Deekhshabhoomi in Nagpur. An outstanding Parliamentarian, Gavai Ji strengthened parliamentary democracy in the State and the people of Maharashtra will remain ever so grateful to him for his multifaceted contributions to the State. As Governor of Bihar and Kerala, he elevated the stature of the post with his impartial and dignified conduct.

I congratulate the V S Page Parliamentary Training Centre, Vidhan Bhavan, Mumbai for its thoughtful decision of bringing out a Commemorative Volume on late Shri R S Gavai. I have no doubt in my mind that the Volume will serve an inspiring manual for legislators, people's representatives, aspiring public servants and the people at large.

(Ch. Vidyasagar Rao)

सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

३० ऑगस्ट, २०१६

संदेश

दिवंगत माजी राज्यपाल, महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती, माजी संसद सदस्य तसेच समाजातील वंचित घटकांसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झटणारे नेते श्री. रामकृष्ण सूर्यभानजी तथा दादासाहेब गवई यांच्या समग्र कार्याचा आढावा घेणारा स्मृतिग्रंथ विधानमंडळातील वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित केला जात आहे, ही माझ्या दृष्टीने अतिशय समाधानाची बाब आहे. विधानपरिषदेचे उपसभापतीपद, सभापतीपद दादासाहेबांनी भुषविले त्यावेळी रिपब्लीकन पक्षाचे विशेष संख्याबळ सभागृहात नव्हते. सदस्यसंख्येच्या निकषापलिकडे जाऊन ज्येष्ठांच्या सभागृहाने त्यांची सहमतीने या सर्वोच्च पदासाठी निवड करावी, हे त्यांच्यातील असामान्य कार्यकर्तृत्वाचे श्रेय तर आहेच, परंतु महाराष्ट्रातील परिपक्व आणि अनुकरणीय अशा संसदीय परंपरेचेही ते प्रतीक आहे. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ धुरिण आणि तत्वचिंतक तसेच संवेदनशील पीठासीन अधिकारी, कर्तव्यतत्पर संसद सदस्य, राज्यपाल अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या आणि त्याचवेळी राजकीय विरोधकांसह सर्वांशीच व्यक्तिगत मित्रसंबंधही जोपासले. संसदीय लोकशाहीविषयीचा जिव्हाळा त्यांची जीवननिष्ठाच बनल्याचे यातून प्रतीत होते. त्यांच्या अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाचे यथार्थ दर्शन या स्मृतिग्रंथाद्वारे वाचकांना, कार्यकर्त्यांना, नेत्यांना आणि त्यांच्या असंख्य चाहत्यांना घडेल असा मला विश्वास वाटतो.

दादासाहेबांची विधानमंडळातील आणि संसदेतील महत्वपूर्ण भाषणे तसेच मान्यवरांचे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारे लेख, आठवणी, दुर्मीळ छायाचित्रे आणि त्यांच्या निधनानंतर दोन्ही सभागृहांनी त्यांना अर्पण केलेली भावपूर्ण श्रध्दांजली या स्मृतिग्रंथात समाविष्ट करण्यात आल्याने हा ग्रंथ म्हणजे महाराष्ट्राच्या समृध्द संसदीय परंपरेचे प्रेरणादायी संदर्भसंचित ठरावे. स्मृतिग्रंथ निर्मितीचे उद्दीष्ट सफल होण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद...

(रामराजे नाईक निंबाळकर)

दूरध्वनी : २२०२ ७३ ७३ (का.) / २२०२ ४० ८६ / २३६३ १६ ८२ (नि.) फॅक्स : २२८४ ६६ ५९
विधान भवन, मुंबई ४०० ०३२ / नागपूर ४४० ००१.

हरिभाऊ बागडे

अध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा
विधान भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : 3 SEP 2016

संदेश...

आंबेडकरी चळवळीला अभिप्रेत असणारी, सामाजिक न्यायाची लढाई जोरकसपणे पुढे नेणारे आणि सर्वसमावेशी ठरलेले नेतृत्व म्हणजे मा.श्री. रा.सू. तथा दादासाहेब गवई. विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा या सभागृहांमध्ये सदस्य आणि पीठासीन अधिकारी तसेच राज्यपाल म्हणून त्यांनी दिलेले योगदान सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत ठरावे असे आहे. गुंतागुंतीचे सामाजिक प्रश्न लोकप्रतिनिधी आणि राजकीय नेतृत्वाने सोडविताना संवेदनशीलता आणि दूरदृष्टी कशी ठेवावी याचे अचूक भान दादासाहेबांना होते. या स्मृतिग्रंथामध्ये सभागृहात विविध विषयांवर त्यांनी मांडलेले विचार, सरकारला केलेल्या सूचना आणि मार्गदर्शन, मान्यवरांचे त्यांच्या विविधांगी कार्याची माहिती देणारे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे हा ग्रंथ संदर्भसमृध्द आणि तितकाच वाचनीयही होईल, असा मला विश्वास वाटतो.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष देशात विविध उपक्रमांनी साजरे होत असताना त्यांचे निष्ठावान अनुयायी असलेल्या दादासाहेबांचा स्मृतिग्रंथ याच दरम्यान प्रकाशित व्हावा हा एक वैशिष्ट्यपूर्ण योग आहे, असे मी मानतो. या स्मृतिग्रंथास नामवंत लेखक डॉ. गंगाधर पानतावणे यांची प्रस्तावना लाभली आहे. त्यामुळे हा स्मृतिग्रंथ यथार्थ अलंकृत झाला आहे. संसदीय लोकशाहीमध्ये मतभेद असू शकतात परंतु व्यापक समाजकल्याणाचा समग्र विचार करतांना "मतभेदा" ची जागा "मनभेदा" ने कधीही घेता कामा नये. संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असलेल्या संवादी परंपरेचे सत्व मा.श्री. दादासाहेब गवईच्या समग्र कारकिर्दीमध्ये दिसून येते. भारतीय लोकशाहीची गत ७ दशकांची वाटचाल दादासाहेबांसारख्यांच्या नेतृत्वामुळे योग्य दिशा आणि गती कायम राखून आहे. त्यांचा हा स्मृतिग्रंथ नव्या पिढीतील सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. हा मौलिक स्मृतिग्रंथ साकार होण्यासाठी सहकार्य लाभलेल्या सर्वांचे मन:पूर्वक आभार आणि अभिनंदन.

(हरिभाऊ बागडे)

ऑफिस फोन : ०२२-२२०२ ३१०१ / २२०२ ३५४२, फॅक्स : ०२२-२२०२ ४३२०

मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

Chief Minister
Maharashtra

१ स्पटेंबर २०१६

शुभेच्छा

महाराष्ट्र विधान मंडळाच्या वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई गौरवग्रंथ प्रकाशित करण्याचा उपक्रम हा एका ज्येष्ठ संसदपटू आणि अभ्यासू राजकीय व्यक्तिमत्त्वाचा निश्चितच गौरव करणारा आहे.

राजकारणातील अजातशत्रू नेतृत्व, सामाजिक समतेसाठीच्या चळवळीचे प्रमुख मार्गदर्शक, रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख आधारस्तंभ ठरलेल्या दादासाहेबांचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य प्रेरणादायी आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर अगाध श्रद्धा ठेवून त्यांनी दाखविलेल्या मार्गावरून त्यांनी अखेरपर्यंत वाटचाल केली. बाबासाहेबांचे विचार माझा श्वास आहे, असे म्हणणाऱ्या दादासाहेबांनी तळागळातील जनतेच्या विकासासाठी केलेली धडपड या जनसमुहात परिवर्तन पेरणारी ठरली आहे.

दादासाहेबांनी वंचित-उपेक्षित समुहातील घटकांच्या उद्धारासाठी सुरू केलेल्या संघर्षाला समन्वयाची जोड दिली. मात्र आंबेडकरी विचारांवरील निष्ठेशी त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. सामाजिक समता प्रस्थापित करणे हा जीवनाचा अग्रक्रम मानतानाच विविध रचनात्मक कार्यातून समाजाच्या उत्थानासाठी त्यांचे प्रामाणिक प्रयत्न होते. नागपूर येथे असलेले दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक हे दादासाहेबांनी चिकाटीने केलेल्या धडपडीचे प्रतिक आहे. त्यांच्या समर्पित वृत्तीमुळेच आज दीक्षाभूमी लाखो नागरिकांसाठी एक प्रेरणास्थळ झाले आहे. राज्यात रोजगार हमी योजना सुरु व्हावी म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि विधान परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष वि.स. पागे यांच्या सहकार्याने दादासाहेबांनी पायाभूत काम केले.

राज्यपाल पदासह संसद आणि विधिमंडळाचे सदस्य तसेच विधान परिषदेचे सभापती, उपसभापती म्हणून जवळपास पाच दशके त्यांनी संसदीय राजकारणावर आपला अमिट ठसा उमटविला. ज्येष्ठ संसदपटू, सामाजिक चळवळीचे अध्वर्यू, सामाजिक विषयांचे अभ्यासक, शिक्षण प्रसारक, साहित्य आणि क्रीडाप्रेमी अशा त्यांच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचे पैलू सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यास हा ग्रंथ सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास वाटतो.

वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या सर्व उपक्रमांना मनःपूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)



दूरध्वनी क्र. : २२०२ ३८ ४८ (का.)
२२८२ ५१ ६७
२२०२ ६९ ८७ (नि.)
विधान भवन, मुंबई ४०० ०३२
नागपूर ४४० ००१
क्रमांक :
दिनांक : १२/०४/२०१६

संदेश...

माजी राज्यपाल तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती, ज्येष्ठ रिपब्लिकन नेते दिवंगत श्री. रा.सू. तथा दादासाहेब गवई यांच्या महत्त्वपूर्ण संसदीय कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचावी याहेतूने प्रकाशित करण्यात येत असलेल्या स्मृतिग्रंथाचा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. आपल्या एकूण कारकिर्दीपैकी दादासाहेबांचा सर्वाधिक काळ महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये गेला. सन १९६४ ते १९९४ या कालावधीत ते विधानपरिषदेचे सदस्य होते,यापैकी सन १९६८ ते १९७८ या कालावधीत उप सभापती पद आणि सन १९७८ ते १९८२ या कालावधीत विधानपरिषदेचे सभापती पद त्यांनी भुषविले. महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती हे "विधानपरिषद विनंती अर्ज समिती" चे पदसिध्द अध्यक्ष असतात. दादासाहेबांनी या समितीच्या माध्यमातून जनसामान्यांचे अनेक प्रश्न सोडविण्याचा, वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांची सभागृहातील आणि सभागृहाबाहेरील एक परिवर्तनवादी लोकप्रतिनिधी म्हणून कामगिरी सर्वांनाच प्रेरणादायी ठरणारी आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर अविचल निष्ठा, संघर्ष आणि समन्वयाचे योग्य संतुलन, अहोरात्र व्यापक जनकल्याणाचा ध्यास आणि संसदीय कार्यपध्दतीचा सखोल अभ्यास ही दादासाहेबांच्या जीवनाची चतु:सूत्री होती. शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांना त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने पुढे नेले. पीठासीन अधिकारी म्हणून त्यांनी केलेले कार्य आणि दिलेले निर्णय हे आम्हाला निश्चितच मार्गदर्शन करणारे ठरत आहेत. या स्मृतिग्रंथामुळे असे महत्त्वपूर्ण संदर्भ वाचकांना, जाणकारांना आणि अभ्यासकांना एकत्रित स्वरूपात उपलब्ध होत आहेत, याचा मला विशेष आनंद होत आहे. दादासाहेबांनी दीक्षाभूमी, नागपूर येथे महामानवाचे जे भव्य स्मारक निर्माण केले ती एकप्रकारे दादासाहेबांच्या जीवननिष्ठेचीही अभिव्यक्ती आहे. आज हे स्मारक म्हणजे देशभरातून नव्हे तर जगभरातून येणाऱ्या बांधवांचे एक प्रेरणास्थान बनले आहे. समानतेवर आधारित अखिल मानवजातीच्या कल्याणाचा समग्र विचार पुढे नेणे हीच दादासाहेबांना खरी आदरांजली ठरेल. त्याहेतूने महाराष्ट्र विधानमंडळातील वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित होत असलेला दादासाहेबांचा हा स्मृतिग्रंथ सगळ्यांसाठी अखंड ऊर्जास्त्रोत ठरेल असा मला विश्वास वाटतो. या ग्रंथनिर्मितीसाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवरांचे मी अभिनंदन करतो.

माणिकराव ठाकरे
उप सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद

मंत्री
अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण,
अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : २७.०९.२०१६

...शुभेच्छा...

दिवंगत रा.सू. उपाख्य दादासाहेब गवई यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत सदस्य, उपसभापती, सभापती, विरोधी पक्षनेता अशी विविधांगी पदे भूषविली. आपल्या अभ्यासूवृत्तीने आणि अंगभूत कौशल्याने त्यांनी या सर्व पदांचा सन्मान तर वाढविलाच पण दलित-पिडित-शोषित समाजाचे प्रश्न प्रभावीपणे सभागृहात मांडून त्यांना न्याय प्राप्त करुन दिला. एक निष्णात संसदपटू म्हणून त्यांचा लौकिक होता. दादासाहेब आणि मी एकाच अमरावती जिल्ह्यातील असल्यामुळे त्यांच्याविषयी मला नितांत आदर, जिव्हाळा आणि अभिमानही आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती स्व. वि.स.पागे यांना दिवंगत दादासाहेब गवई संसदीय कार्यपध्दतीच्या क्षेत्रात गुरुस्थांनी मानत. या पार्श्वभूमीवर हा स्मृतिग्रंथ वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रसिध्द होणे याला विशेष महत्त्व आणि औचित्य प्राप्त होते. हा स्मृतिग्रंथ सर्वांगसुंदर आणि संग्राहय होईल याची मला खात्री आहे. दिवंगत दादासाहेबांना आदरांजली अर्पणकरुन या स्मृतिग्रंथास शुभेच्छा देतो.

(गिरीश बापट)

अंतरंग

अ.क्र.	विषय	लेखक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
१	मनोगत	डॉ. अनंत कळसे . .	१
२	संपादकीय	डॉ. किशोर फुले . .	३
		श्री. निलेश मदाने	
३	प्रस्तावना	डॉ. गंगाधर पानतावणे . .	९
४	संक्षिप्त चरित्र : सर्वस्पर्शी जीवन	डॉ. किशोर फुले . .	१५
५	सभापतींची भूमिका	रा. सू. तथा दादासाहेब गवई . .	३४
६	विधिमंडळाचे विशेष हक्क	रा. सू. तथा दादासाहेब गवई . .	४२
	मान्यवरांचे लेख		
७	प्रगल्भ नेतृत्व	श्रीमती प्रतिभा देविसिंह पाटील	४५
८	सर्वांना आपलेसे करणारे अन् आपलेसे वाटणारे दादासाहेब !	श्री. देवेंद्र फडणवीस . .	४८
९	दूरदृष्टीचे दिलदार दादासाहेब	श्री. नितीन गडकरी . .	५०
१०	रिपब्लिकन ऐक्याची तळमळ असलेला नेता	श्री. रामदास आठवले . .	५२
११	ध्येयनिष्ठ ... तत्त्वनिष्ठ ...	श्री. धनंजय मुंडे . .	५४
१२	कर्तबगार, दिलदार ...	श्री. राधाकृष्ण विखे-पाटील . .	५७
१३	संसदीय क्षेत्रातील विक्रमवीर	श्री. शरद पवार . .	६१
१४	कुशल संसदपटू	डॉ. मनोहर जोशी . .	६२
१५	विरोधी पक्षाचे नेते	श्री. सुशीलकुमार शिंदे . .	६४
१६	निळ्या आसमंतातील चकाकता तारा	श्री. अशोक चव्हाण . .	६६
१७	जीवनाचा सकारात्मक दृष्टिकोन	श्री. शिवराज पाटील-चाकुरकर	६८
१८	एक उत्तम सभापती	श्री. दिलीप वळसे-पाटील . .	६९
१९	मानसपुत्र मानणारे दादासाहेब	श्री. प्रवीण पोटे-पाटील . .	७१
२०	बहुआयामी नेतृत्वाचे नाव	श्री. दत्ता मेघे . .	७३

अ.क्र.	विषय	लेखक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
२१	संवैधानिक लोकशाहीचा सजग प्रहरी	श्री. प्रा. जोगेंद्र कवाडे	७५
२२	निःपक्ष आणि कर्तबगार सभापती	श्री. मा. गो. वैद्य	७७
२३	संसदेतील दादा	श्री. सुकृत खांडेकर	८०
२४	संसदपटूंचा मेरूमणी	प्रा. बी. टी. देशमुख	८३
२५	आमचा जिवलग मित्र	श्री. जांबुवंतराव धोटे	९४
२६	विदर्भरत्न दादासाहेब गवई	श्री. रणजीत देशमुख	९९
२७	सुसंस्कृत आणि दिलदार व्यक्तिमत्त्व	श्री. उल्हास पवार	१०२
२८	निरपेक्ष स्नेहबंध	न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी	१०४
२९	दादासाहेबांची राजकीय संस्कृती	डॉ. यशवंत मनोहर	१०७
३०	सख्ख्या भावापेक्षाही अधिक घट्ट नाते	श्री. सदानंद फुलझेले	१११
३१	सकारात्मक दृष्टिकोनाचे नेतृत्व	श्री. अर्जुन डांगळे	११६
३२	अशी गाजवली तीन दशके	श्री. वसंत वासुदेव देशपांडे	१२०
३३	मऊ मेणाहुनी, आम्ही भीमदास ...	श्री. ल. त्र्यं. जोशी	१२४
३४	रसिक राजकारणी	श्री. सुधीर पाठक	१३०
३५	एक सर्वसमावेशक नेता	श्री. दिलीप चावरे	१३७
३६	संसदीय सुसंस्कृती आत्मसात केलेला नेता	श्री. मधु कांबळे	१४०
३७	कर्मयोगी	कॅ. भीमराव कवठेकर	१४२
३८	एक अव्वल राजनीतिज्ञ	श्री. ज. वि. पवार	१४५
	कौटुंबिक जिव्हाळा		
३९	माझे साहेब	डॉ. कमल गवई	१४९
४०	आमचे आधारस्तंभ	पद्मश्री प्रभाकरराव वैद्य	१६५
४१	सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व	डॉ. देविसिंह शेखावत	१६७
४२	आमचा कुष्ठमित्र	डॉ. मोतीलाल राठी	१७०
४३	मुत्सद्दी नेतृत्व	ॲड. अरुण शेळके	१७२
४४	दादा	न्या. भूषण गवई	१७३
४५	माझे खंबीर पाठबळ	डॉ. सुनील देशमुख	१७७

अ.क्र.	विषय	लेखक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
४६	रॉयल रामकृष्णा	डॉ. सुरेश पाध्ये . .	१८१
४७	विरोधक आणि मित्रही	श्री. अनंत गुढे . .	१८३
४८	संस्था व व्यक्तींचे आधारवड	श्री. उल्हास मराठे . .	१८५
४९	रोबस्ट विज्डम	श्री. प्रदीप देशपांडे . .	१८८
५०	आमचे ' शेजारवड '	प्रा. विद्यालक्ष्मी बबनराव मेटकर	१९१
५१	गरिबांसाठी सत्ता राबविणारा नेता	डॉ. राजेन्द्र गवई . .	१९४
५२	कर्तृत्वाचा महामेरू	डॉ. भि. र. वाघमारे . .	१९७
५३	मनमोकळा सहृदय माणूस	श्री. सुरेंद्र भुयार . .	२००
५४	एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व	श्री. एन. आर. सुटे . .	२०१
५५	मानवतावादी जगण्यातून आदर्श घडविणारे दादा	श्रीमती कीर्ती अर्जुन . .	२०५
५६	आधारस्तंभ ढळला	श्री. ज. वि. गायकवाड . .	२०७
	दिवंगत नेत्यांचे मनोगत		
५७	मित्र जमवण्याचा छंद	जयंतराव टिळक . .	२११
५८	माझे कौटुंबिक मित्र	बॅ. ए. आर. अंतुले . .	२१४
५९	अचूक अंदाज	दत्ताजी ताम्हाणे . .	२१८
६०	अडचणीच्या वेळी मदतीला धावणारा मित्र	कॉ. ए. बी. वर्धन . .	२२१
६१	मनाचे औदार्य	ग. प्र. प्रधान . .	२२३
६२	मधुरभाषी	मृणाल गोरे . .	२२५
६३	रसिक व्यक्तिमत्त्व	प्रमोद नवलकर . .	२३०
६४	विधिमंडळातील भाषणे		२३१
६५	लोकसभेतील भाषणे	. .	५१३
६६	राज्यसभेतील भाषणे	. .	५२२
६७	राज्यपाल पदावरील भाषणे	. .	५४१
६८	राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतील भाषणे.	. .	५४७
६९	निरोपाच्या भावूक क्षणी शिष्याचे गुरुवर्यांना अभिवादन	. .	५५८

अ.क्र.	विषय	लेखक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
७०	दादासाहेबांच्या शोकसंवेदना—विविध मान्यवर नेत्यांना वाहिलेली श्रद्धांजली.		. . ५६१
७१	महाराष्ट्र विधिमंडळाची दादासाहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली		. . ५७३
७२	लोकसभेतील दुखवटा		. . ५९१
७३	राज्यसभेतील दुखवटा		. . ५९२
७४	रा. सू. गवई जीवनपट		. . ५९३

अज्ञातशत्रू...

- मनोगत
- संपादकीय : लोकशाही मूल्यांसाठी
- प्रस्तावना
- संक्षिप्त चरित्र : सर्वस्पर्शी जीवन
- दादासाहेबांचा लेख : सभापतींची भूमिका
- विधिमंडळ सदस्यांना संबोधन

मान्यवरांसोबत...

भारतरत्न माजी पंतप्रधान मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी

माजी राष्ट्रपती मा. डॉ. ए. पी. जे. कलाम

माजी राष्ट्रपती मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील व डॉ. देविसिंह शेखावत

माजी राष्ट्रपती मा. के. आर. नारायणन व माजी राज्यपाल मा. पी.सी.अलेक्झांडर

माजी उपराष्ट्रपती मा. श्री. भैरोसिंह शेखावत

माजी पंतप्रधान मा. श्री. व्ही. पी. सिंह

माजी पंतप्रधान मा. श्री. राजीव गांधी

माजी पंतप्रधान मा. श्रीमती इंदिरा गांधी

मनोगत

महाराष्ट्र विधानमंडळातील वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे दिवंगत माजी राज्यपाल, महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती आणि ज्येष्ठ रिपब्लिकन नेते श्री. रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या असामान्य कार्यकर्तृत्वाला शब्दबद्ध करणारा "अजातशत्रू" हा स्मृतिग्रंथ साकार होत आहे. ही माझ्या दृष्टीने अत्यंत आनंददायी आणि कर्तव्यपूर्तीची घटना आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाला राष्ट्रीय पातळीवर मानाचे स्थान लाभले आहे. महाराष्ट्र विधानमंडळाने संमत केलेले अनेक कायदे, विविध विषयांवरील चर्चा आणि विचारमंथन आजही पथदर्शक ठरते. संसदेतील तसेच अन्य राज्य विधानमंडळातील सन्माननीय सदस्य, राज्यशास्त्राचे अभ्यासक आणि ज्येष्ठ पत्रकार हे महाराष्ट्र विधानमंडळातील या वैचारिक परंपरेचा आवर्जून उल्लेख करतात. संसदीय लोकशाहीमध्ये सभागृहातील संख्याबळ महत्त्वाचे ठरते, परंतु त्याहीपेक्षा सामंजस्य-सौहार्दतेला अधिक महत्त्व आहे. विधानपरिषद व विधानसभेमध्ये रिपब्लिकन पक्षाचे विशेष संख्याबळ नसतांनाही दादासाहेब तीन दशके विधानपरिषदेचे सदस्य होते. एकाच सभागृहाशी संबंधित सभापती, उप सभापती आणि विरोधी पक्षनेते अशी तीनही पदे भूषविण्याचा अत्यंत दुर्मीळ बहुमान दादासाहेबांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने प्राप्त केला. भारतातील संसदीय परंपरेचा अभ्यास करताना हा संदर्भ मला महत्त्वाचा वाटतो. त्यांचा भारतीय संविधानाचा तसेच ब्रिटन, अमेरिका इत्यादी देशातील राज्यपद्धतीचा सखोल अभ्यास होता. दादासाहेबांनी पीठासीन अधिकारी म्हणून दिलेले उल्लेखनीय योगदान, भारतीय संविधानाला अभिप्रेत असणारी सामाजिक न्यायाची चळवळ पुढे नेण्यासंदर्भातील त्यांचे महत्त्वाचे कार्य, विधिमंडळ आणि संसदेत त्यांनी व्यक्त केलेले प्रेरक विचार, दुर्मिळ छायाचित्रे आणि त्यांच्या संदर्भातील मान्यवरांनी लिहिलेल्या भावस्पर्शी आठवणी या सर्व बाबींचा समावेश सुयोग्यरीत्या झाल्याने या स्मृतिग्रंथाची वाचनीयता निश्चितच वाढली आहे.

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राने या अगोदर प्रकाशित केलेल्या ग्रंथांप्रमाणेच हा ग्रंथदेखील लोकप्रतिनिधी, अभ्यासक, पत्रकार अशा सर्वांच्या पसंतीस उतरेल यात शंका नाही. मा. विधानपरिषद सभापती, श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, मा. विधानसभा अध्यक्ष, श्री. हरिभाऊ बागडे यांचे मार्गदर्शन आणि पाठबळ ग्रंथ साकार होत असताना अत्यंत उपयुक्त ठरले. वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक, श्री. निलेश मदाने यांनी हा स्मृतिग्रंथ परिपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण व्हावा यादृष्टीने प्रा. डॉ. किशोर फुले, श्री. वसंतराव तथा दादा देशपांडे, श्री. ल. त्र्यं. जोशी, श्री. सुधीर पाठक,

डॉ. राजेंद्र गवई व श्री. प्रफुल्ल मारपकवार यांची ग्रंथसंकलन समिती मा. पीठासीन अधिकारी यांच्या संमतीनुसार नियुक्त केली. अमरावती येथील प्रा. डॉ. किशोर फुले हे दादासाहेब यांचे पारिवारिक स्नेही. ते दादासाहेबांच्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीचे अभ्यासकही असल्याने या स्मृतिग्रंथातील त्यांनी लिहिलेले दादासाहेबांचे संक्षिप्त जीवनचरित्र वाचकांना एका दृष्टिक्षेपात वैशिष्ट्यपूर्ण माहिती देणारे ठरते. तसेच ग्रंथसंकलन समितीवरील इतर सर्व सदस्यांचेही मोलाचे योगदान ग्रंथनिर्मिती प्रक्रियेत लाभले आहे. समितीच्या अनेक बैठका होऊन स्मृतिग्रंथाला परिपूर्ण स्वरूप देण्यात आले. संकलन समितीतील सर्वांचे तसेच डॉ. श्रीमती कमलताई गवई, न्यायमूर्ती भूषण गवई व डॉ. राजेंद्र गवई यांचे मी आभार व्यक्त करतो. यापुढील काळातदेखील अशाचप्रकारे उत्तमोत्तम ग्रंथसंपदा उपलब्ध करून देण्याचा वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा प्रयत्न राहील.

धन्यवाद.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

संपादकीय ...

लोकशाही मूल्यांसाठी ...

' Wox Populi Wox Dei ' लोकवाणी हीच देववाणी असते अशा अर्थाची ही म्हण ग्रीक भाषेत आहे. सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल, प्लेटो, व्हॉल्टेअर, रूसो या महान विचारवंताच्या मूलग्राही विचारांनी लोकांच्या मनात स्वातंत्र्याच्या विचारांचे स्फुल्लिंग चेतविले. जनमताच्या रेट्यामुळे देशोदेशीच्या राजसत्तांच्या तटबंदींना तडे गेले. त्यापूर्वी राजप्रासाद हिऱ्या-माणकांनी चकाकत होते. पण त्यात प्रतिबिंब होते राजेशाहीच्या ऐश्वर्याचे. सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब त्यात दूरवर दिसत नव्हते. याविरुद्ध व हुकूमशाही व्यवस्थांविरुद्ध लोकवाणी हीच देववाणी ठरली. त्या-त्या देशात लोकसत्ता अस्तित्वात आली. संसद, विधिमंडळ सभागृहे ही आधुनिक युगाची मंदिरे लोकसहभागातून उभारली गेली. लोकांकडून निर्वाचित लोकप्रतिनिधी या पवित्र मंदिरातील उपासक ठरले आणि देशाचे संविधान हा धर्मग्रंथ झाला. या उपासकांनी संविधानाला अनुसरून मानवी कल्याणाची उपासना करावी हे अंतिम ध्येय निश्चित झाले. भारताची संसद आणि महाराष्ट्राची विधिमंडळेही त्याला अपवाद राहिली नाहीत.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्र विधिमंडळाला उज्ज्वल परंपरा लाभली आहे. अनेक जनसेवकांनी आणि लोकप्रतिनिधींनी आपापल्या क्षमतेनुसार त्यात भरीव योगदान दिले आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या आणि भारताच्या संसदीय इतिहासात श्री. रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे योगदानही मोलाचे आहे. विशेषतः महाराष्ट्र विधानपरिषदेत १९६४ ते १९९४ अशा प्रदीर्घ तीस वर्षांच्या कालखंडात विधानपरिषद सदस्य, तीनदा उप सभापती, सभापती, दोन वेळा विरोधी पक्षनेता अशा विविधांगी जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे संभाळून त्यात भरीव योगदान दिले.

अमरावती जिल्ह्यातील दारापूरसारख्या लहानशा गावातून दलित-पीडित समाजात जन्मलेल्या श्री. दादासाहेब गवई यांची सामाजिक, राजकीय कारकीर्द अचंबित करणारी आहे. जाती-पातीच्या उतरंडीच्या काळात समाजवास्तवाचे चटके सहन करीत त्यांनी आपले नेतृत्व निर्विवादपणे सिद्ध केले. कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, देशभक्त वीर वामनराव जोशी, दाजीसाहेब पटवर्धन, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झंझावाताने त्यांना प्रभावित केले. १९५६ साली त्यांनी दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यांच्या अंतर्मनातील प्रकाशाला सूर्याचे आवतन मिळाले. दादासाहेब गायकवाडांच्या मार्गदर्शनात

श्री. गवईंचे नेतृत्व आकाराला आले. हे नेतृत्व कधीच संकुचित आणि आक्रस्ताळे झाले नाही. दलित चळवळीत लोकप्रिय ठरलेला भेदक आणि भडक स्वर त्यांनी कधीच आळवला नाही. प्रसंगी त्यासाठी दूषणेही सहन केली.

सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातील सभ्यतेच्या मानमर्यादा श्री. दादासाहेबांनी कधीच ओलांडल्या नाहीत. त्यामुळेच सर्वपक्षीय आणि सर्वसमावेशक समाजजीवनातील आत्मियतेचे पाठबळ त्यांना सदैव प्राप्त झाले. सभागृहात विरोधकांवर टीका करतांनाही त्यांनी हे भान ठेवले आणि त्यांच्या मतांचाही आदर केला. "I May not agree with a word what you say but I will defend untill my death your right to say so." मी तुझ्या मताशी एका अक्षरानेही सहमत नाही पण तुला तसे सांगण्याचा अधिकार आहे हे मी माझ्या कंठात प्राण असेपर्यंत सांगत राहीन हे संसदेच्या प्रवेशाद्वारावर कोरलेले, लोकशाहीचा उद्‌गाता व्हॉल्टेअरचे प्रसिद्ध वचन त्यांनी पूर्णपणे आत्मसात केले होते. त्यामुळेच विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती, लोकसभा, राज्यसभा सदस्य, राज्यपाल म्हणून या पदांना ते न्याय देऊ शकले आणि स्वत:च्या पक्षाचा एकमेव प्रतिनिधी सभागृहात असतांनासुद्धा महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत तब्बल तीस वर्षे स्थिरावू शकले.

श्री. दादासाहेबांच्या राजकीय भूमिकांविषयी मतमतांतरे असू शकतात. खुद्द त्यांच्या रिपब्लिकन परिवारातही ती होती पण भारताचे संविधान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही मूल्यांवर असलेली दादासाहेबांची अढळ श्रद्धा याविषयी कोणी तीळमात्र शंका घेऊ शकत नाही. दादासाहेब राजकीय मुत्सद्दी होते त्यामुळे स्व. वसंतराव नाईक, स्व. शंकरराव चव्हाण, स्व. वसंतदादा पाटील, श्री. शरदराव पवार, स्व. ए. आर. अंतुले, स्व. सुधाकरराव नाईक, स्व. विलासराव देशमुख, श्री. सुशीलकुमार शिंदे, श्री. अशोकराव चव्हाण या सत्तारूढ काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांशी (बॅ. बाबासाहेब भोसले यांचा अपवाद वगळता) श्री. गवईसाहेबांचे जसे मधुर संबंध होते तसेच विरोधी पक्षातील स्व. ग. प्र. प्रधान, स्व. मृणालताई गोरे, स्व. उत्तमराव पाटील, स्व. बापूसाहेब काळदाते, स्व. भाई ए. बी. बर्धन, स्व. सुदामकाका देशमुख, श्री. मनोहर जोशी यांच्याशीही त्यांच्या मैत्रीची वीण घट्ट होती. त्यासाठी अंगभूत शहाणपण आणि वैचारिक प्रगल्भता लागते. श्री. दादासाहेबांची सभापतीपदी झालेली अविरोध निवड आणि स्व. बाबासाहेब भोसलेंच्या काळात काँग्रेसला आव्हान देऊन त्यांनी जिंकलेली विधानपरिषदेची निवडणूक म्हणजे "चातुर्य सिहाणे झाले" या ओवीची शब्दश: प्रचिती आहे.

राजकारणाचे व्याकरण श्री. दादासाहेब कोळून प्याले होते. राज्यशास्त्राचे महान भाष्यकार प्रो. हेरॉल्ड लास्की आपल्या 'Grammar of Politics' या ग्रंथात लिहितात, " When argument seizes to be strength, the strength becomes an argument. " ज्यावेळी युक्तिवादाची सारी साधनं कुंठित होतात त्यावेळी शक्ती हाच सर्वश्रेष्ठ युक्तिवाद ठरतो. आपल्या बिनतोड युक्तिवादाने दलित-पीडित-शोषित समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी सभागृहात सोडविले. पण ज्यावेळी सभागृहातील युक्तिवादाला मर्यादा पडल्या त्यावेळी जनतेच्या दरबारात कैफियत मांडून त्यांनी शक्तिप्रदर्शनही केले. १९६४ साली भूमिहिनांचा काढलेला विशाल मोर्चा असो वा १९७८ साली दिल्लीच्या बोटक्लबवरील नवबौद्धांच्या सवलतींसाठी केलेले उपोषण असो वा दिल्लीच्याच रामलीला मैदानावरील भव्य आंदोलन असो वा आंबेडकरी जनतेने फुलून गेलेले मुंबईचे आझाद मैदान असो, दादासाहेबांनी राजकीय व्याकरण सिद्ध केले. दीक्षाभूमीवर त्यांनी उभारलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक त्यांच्या विधायक कार्याचे प्रतीक आहे.

२५ जुलै, २०१५ ला दादासाहेबांचे दुःखद निधन झाल्यावर या लोकनेत्याचे यथोचित स्मारक व्हावे आणि ते महाराष्ट्र शासनाने करावे या लोकभावनेची कैफियत केंद्रीय मंत्री, श्री. रामदास आठवले यांनी महाराष्ट्र शासनाकडे मांडली. महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री, श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी या लोकभावनेची दखल घेऊन अमरावती येथे त्यांचे भव्य स्मारक उभारणे, दादासाहेब गवई स्मृतिग्रंथ प्रकाशित करणे या कामाला गती दिली. विशेष म्हणजे दिवंगत दादासाहेबांच्या प्रथम स्मृतिदिनाच्या आत या दोन्ही प्रकल्पांना मा. मुख्यमंत्र्यांनी मूर्त रूप दिले. राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार आणि कृती करण्याच्या महाराष्ट्राच्या परंपरेला मा. मुख्यमंत्री, श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी वृद्धिंगत करून नवा आयाम दिला. आंबेडकरी जनता आणि गवई कुटुंबीयांच्या भावना समजून घेतल्या. महाराष्ट्र विधिमंडळाचे पीठासीन अधिकारी, विधानपरिषद सभापती, मा. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष, मा. श्री. हरिभाऊ बागडे यांनी वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत दादासाहेब गवई स्मृतिग्रंथ प्रकाशित करण्यात पुढाकार घेतला. संसदीय कार्यमंत्री मा. श्री. गिरीश बापट यांनी या कार्यात मोलाचे सहकार्य केले. या सर्वांच्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळेच हा स्मृतिग्रंथ आकाराला येऊ शकला. या सर्वांचे आम्ही शतशः ऋणी आहोत. तसेच विधिमंडळातील प्रशासकीय अधिकारी आणि मंत्रालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी हा प्रवास अधिक सुकर केला. त्यामुळेच हे कार्य लवकर होऊ शकले. त्याबद्दल त्यांचे आभार.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याची चर्चा खूप होत असते पण ही बाब आवर्जून सांगितली पाहिजे की, मा. मुख्यमंत्री, दोन्ही सभागृहाचे मा. पीठासीन अधिकारी, मा. संसदीय कार्य मंत्री, विधिमंडळ व

मंत्रालयातील प्रशासकीय अधिकारी यापैकी कोणीही ग्रंथाचे स्वरूप, ग्रंथातील मजकूर याबद्दल तसूभरही हस्तक्षेप केला नाही. संपादक मंडळाला पूर्ण स्वातंत्र्य दिले. ही बाब सहज-साधी वाटली तरी लाख मोलाची आहे. याबद्दल आम्ही सर्वांप्रती कृतज्ञ आहोत.

संपादक मंडळाने या ग्रंथाचे स्वरूप सर्वसमावेशक ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मान्यवरांचे शुभेच्छा संदेश, श्री. दादासाहेबांची विधिमंडळातील, संसदेतील भाषणे, त्यांनी लिहिलेले लेख, आठवणी, त्यांची भाषणे, दादासाहेबांविषयी समकालीन दिवंगत नेत्यांनी व्यक्त केलेले विचार, विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचे व सामाजिक, साहित्य क्षेत्रातील मान्यवरांचे लेख, दादासाहेबांविषयी अंतरीच्या उमाळ्याने लिहिलेल्या कौटुंबिक आठवणी, प्रस्तावना, त्यांची विविध प्रसंगातील छायाचित्रे, त्यांचे संक्षिप्त जीवनचरित्र असे या स्मृतिग्रंथाचे स्वरूप आहे. संपादक मंडळाने त्यासाठी व्यापक दृष्टिकोन ठेवला आहे. या स्मृतिग्रंथासाठी ज्यांनी आपले लेख, आठवणी पाठविल्या ते मान्यवर सार्वजनिक जीवनात व्यस्त असून विविध महत्त्वांच्या पदांवर आहेत. त्यांनी आमच्या विनंतीचा स्वीकार केला याबद्दल या सर्वांचे आम्ही विशेष आभारी आहोत. सुप्रसिद्ध विचारवंत, साहित्यिक प्रा. गंगाधर पानतावणे सरांनी या स्मृतिग्रंथासाठी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्याने ग्रंथाचे साहित्यिक मूल्य वाढले आहे. त्याबद्दल श्री. पानतावणे सरांचे आम्ही आभारी आहोत.

प्रस्तुत ग्रंथात दिवंगत दादासाहेब गवई यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त लिहिलेल्या आठवणी आणि गौरवग्रंथातील निवडक लेखांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यात काही ज्येष्ठ आणि दिवंगत मान्यवरांचे लेख, भाषणे आहेत. त्यामुळे दादासाहेबांच्या हयातीतील काही तत्कालीन संदर्भही आले आहेत; हे संदर्भ विधिमंडळ पुस्तिका, ज. वि. गायकवाड व अरुण हरकारे यांच्या पुस्तकातून घेतलेले आहेत; याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनचे साक्षीदार असलेले आकाशवाणीचे निवृत्त प्रतिनिधी, दैनिक सकाळचे ज्येष्ठ पत्रकार श्री. वसंतराव उपाख्य दादा देशपांडे, दैनिक तरुण भारत, नागपूरचे मुख्य संपादकपद भूषविलेले ज्येष्ठ पत्रकार श्री. लक्ष्मणराव जोशी आणि श्री. सुधीर पाठक यांचे संपादक मंडळातील योगदान मोलाचे आहे. त्यांचा प्रदीर्घ अनुभव व अभ्यास यामुळे अनेक संदर्भ सहज उपलब्ध होऊ शकले. या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. दादासाहेबांचे चिरंजीव व संपादक मंडळाचे सदस्य डॉ. राजेंद्र गवई, टाइम्स ऑफ इंडियाचे प्रतिनिधी श्री. प्रफुल्ल मारपकवार हेही संपादक मंडळात होते. त्यांचेही आम्ही आभारी आहोत. डॉ. कमलताई गवई, न्यायमूर्ती भूषण गवई व गवई कुटुंबाने त्याचप्रमाणे दादासाहेबांचे स्वीय सहायक राहिलेले श्री. ज. वि. गायकवाड, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर समितीचे सचिव, श्री. सदानंद फुलझेले, विधिमंडळ ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. बा. बा. वाघमारे यांनी दुर्मिळ छायाचित्रे, दस्तऐवज उपलब्ध करून दिले त्यामुळेच हा ग्रंथ सिद्ध होऊ शकला. सकाळच्या मृणालिनी नानिवडेकर यांनी काही मुलाखती घेतल्या. महाराष्ट्र विधानमंडळाचे प्रधान सचिव मा. डॉ. अनंत कळसे, सचिव श्री. उत्तमसिंग चव्हाण यांनी वेळोवेळी आवश्यक सूचना करून मौलिक मार्गदर्शन केले. सहसचिव श्री. अशोक मोहिते, सहसचिव श्री. म. मु. काज, मा. विधानसभा अध्यक्षांचे सचिव, श्री. राजकुमार सागर, उप सचिव श्री. ना. रा. थिटे, वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातील विशेष कार्य अधिकारी श्री. राजेंद्र संखे, संगणक कक्षाचे श्री. अजय सर्वणकर, कक्ष अधिकारी, श्रीमती सुनंदा देसाई व इतर कर्मचारी वर्ग यांचेही आभार. विशेष म्हणजे शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. रुपेंद्र मोरे यांचे सकारात्मक सहकार्य या ग्रंथनिर्मितीची जमेची बाजू आहे. त्यांचे सहकारी व कलावंत श्री. महेश मुळे यांनी कल्पकतेने व परिश्रमपूर्वक मुखपृष्ठ तयार केले, सुबक मांडणी केली त्याचप्रमाणे शासकीय मुद्रणालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे बहुमोल सहकार्य या कार्यास प्राप्त झाले. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष या कार्याला सहकार्य करणाऱ्या सर्वांच्या प्रती ऋण व्यक्त करून थांबतो.

▪ निलेश मदाने
समन्वय संपादक,
संचालक, वि. स. पागे संसदीय
प्रशिक्षण केंद्र, विधानभवन, मुंबई.

▪ डॉ. किशोर फुले
संपादक

" राज्याच्या मर्यादेपुरते विधिमंडळ हे सार्वभौम आहे. एका अर्थाने लोकशाहीचे मंदिर आहे. या मंदिरातील देवता ही जनता आहे व या देवतेचे पुजारी जनप्रतिनिधी आहेत आणि या पूजेचे साहित्य म्हणजे संसदीय आयुधे होत; आणि या सर्व प्रक्रियेला आपण संसदीय लोकशाही म्हणून संबोधितो, संसदीय लोकशाहीत जनप्रतिनिधींनी आपण जनतेचे जबाबदार दिवाणजी आहोत अशा दृष्टीने पूजाअर्चा करणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. म्हणून जन-प्रतिनिधींनी वापरलेल्या संसदीय आयुधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

सभागृहाचा सभापती हा सभागृहाचा पालक असतो. सभागृहाची प्रतिष्ठा, सदस्यांना न्याय, सत्तारुढ पक्षाला न्याय, विरोधी पक्षाला न्याय या सर्व चाकोरीतून सभापतींना काम करावे लागते. या संबंधीचे तत्त्व असे की, **"Government has to rule and opposition has to say"** हे तत्त्व सभापती आपल्या कौशल्याने पाळतात."

रा. सू. गवई

प्रस्तावना

संस्कृतीपुरुष डॉ. बाबासाहेब यांच्या महापरिनिर्वाणानंतर तळागाळातील शोषित, वंचित, दलित, उपेक्षित समाजात भरून न येणारी पोकळी निर्माण झाली. परंतु बाबासाहेबांचे चिरंतन मानवकेंद्री तत्त्वज्ञान आणि क्रांतिकारी चळवळी शिरोधार्य मानून हीच पथदर्शक साधने व आयुधे परजत ठेवल्याशिवाय अन्य पर्याय नाही; त्याशिवाय समाजशकट गतिमान होणे असंभव आहे, याचे भान ज्या काही आंबेडकरनिष्ठ नेतृत्वाला आहे, त्या नेतृत्वातील एक तेजस्वी नाव म्हणजे रामकृष्ण सूर्यभान उपाख्य दादासाहेब गवई! राजकारण, समाजकारण, विधायक सेवा आणि प्रशासन अशा बहुविध क्षेत्रांत त्यांनी आपली स्वतंत्र अशी मोहर उमटविली. त्याची ऐतिहासिक नोंद, महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राने 'रा. सू. गवई स्मृतिग्रंथाच्या' रूपाने घेतली, त्याबद्दल मी केंद्राला आणि संयोजकांना मनःपूर्वक धन्यवाद देतो. या निमित्ताने मला दादासाहेब गवई यांच्या स्मृतीस अभिवादन करण्याची संधी प्राप्त झाली, याची मला धन्यता वाटते.

महनीय व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि जीवनकार्याचा समतोल परामर्श घेणे खूपदा अवघड असते. विशेषतः राजकीय क्षेत्रातील व्यक्ती ह्या अनेकदा वादविषय आणि वादळविषय होतात. अशा वेळी त्यांचे विचार आणि कार्य कधी आकलन-सुलभ असतात तर कधी अनाकलनीयही असतात. मात्र दादासाहेब गवई हे व्यक्तिमत्त्व निरपवाद होते. ते आंबेडकरनिष्ठ होते, हे शपथेवर सांगण्याची गरज नाही. उक्ती आणि कृतीचा संयोग म्हणजे दादासाहेब! त्यांचे विविध क्षेत्रातील व्यक्तींशी आत्मीय अनुबंध होते. त्यांच्या स्मृतिग्रंथाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील मान्यवरांनी त्यांच्या अनेकविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे, ही मी औचित्यपूर्ण घटना मानतो.

प्रस्तुत स्मृतिग्रंथाचे स्वरूप त्रिपदरी आहे. **एक.** स्वतः दादासाहेबांनी व्यक्त केलेले विचार. **दोन.** त्यांच्या जीवनकार्यावरील भाष्ये. **तीन.** त्यांच्या निर्वाणानंतर सभागृहातील शोकप्रस्ताव आणि त्यावरील मनोगते.

दादासाहेब गवई यांनी विधानपरिषदेचे दीर्घ काळपर्यंत सदस्य, उप सभापती, सभापती, विरोधी पक्षनेते, लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य म्हणून कार्य केले आहे. असा प्रदीर्घ अनुभव असल्यामुळे, विधानपरिषदेतील कामकाजासंबंधी आणि त्या अनुषंगाने, सभापती म्हणून सभागृहातील स्वतःचे अनुभव, आपले विचार त्यांनी आपल्या लेखात संयतपणे व्यक्त केले आहेत. त्यातून त्यांची विवेकनिष्ठा आणि विचारप्रवणता तर व्यक्त होतेच, शिवाय सदनाची प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी, नीरक्षीर न्यायाचा त्यांनी कसोशीने घेतलेला ध्यासही प्रतीत होतो. सभागृहाचे नेतृत्व करणारा सभापती हा

एचबी ११८०—२

सभागृहाचा पालक असतो अशी त्यांची धारणा आहे. ते म्हणतात की, "सभागृहाची प्रतिष्ठा, सदस्यांना न्याय, सत्तारूढ पक्षाला न्याय, विरोधी पक्षाला न्याय या सर्व चाकोरीतून सभापतींना काम करावे लागते." विधिमंडळ हे लोकशाहीचे मंदिर आहे, असे ते प्रतिपादन करतात. सभागृहाची शुचिता जपण्याचे कार्य जसे सत्ताधाऱ्यांचे आहे, तसेच ते विरोधकांचेही आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

विधानपरिषदेचे सदस्य आणि विरोधी पक्षनेते म्हणूनही दादासाहेबांनी आपली समतोल भूमिका पार पाडली आहे. अनुसूचित जाती आणि जमातीसंबंधाने नेमलेल्या आयुक्तांच्या अहवालावर सभागृहात चर्चेला आरंभ झाला तेव्हा सरकारच्या उदासीनतेवर दादासाहेबांनी कठोरपणे शरसंधान केले. उपेक्षितांचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रश्न मानायला हवा; परंतु, तसा तो मानला जात नाही, उलट सुविधात कपात करून शासनाने विषमतेचे वर्तन केले, अशी खंत व्यक्त करीत त्यांनी शासनावर टीका केली. अनुसूचित जातीजमातीचे प्रश्न कसे संवेदनशील व विदारक आहेत, याकडे त्यांनी शासनाचे व सभागृहाचे लक्ष वेधले.

दादासाहेब गवई यांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकणारे अभ्यासपूर्ण लेख हा या स्मृतिग्रंथाचा उल्लेखनीय विशेष आहे. लेखनकर्त्यात राजकीय नेत्यांचा जसा सहभाग आहे; तसाच मूर्धन्य पत्रकार, साहित्यिक आणि न्याय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचाही समावेश आहे. "दादासाहेबांच्या जीवनात 'संघर्ष आणि रचना' यांचा फार सुंदर समन्वय असल्याचा" प्रत्यय न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांना आला तर, "पद आणि प्रतिष्ठा याची घमेंड नसणारे ते व्यक्तिमत्त्व होते" असा निर्वाळा ज्येष्ठ नेते मनोहर जोशी देतात. ते पुढे असेही म्हणतात की, "आंबेडकर समाजाची धुरा सांभाळतात. संघर्षाबरोबर समन्वयाची भूमिका साकारतात. त्यांनी नेहमीच सामाजिक सलोखा जपला." म्हणूनच डॉ. यशवंत मनोहर म्हणतात ते वास्तव आहे की, दादासाहेब गवई हे जीवनविषयक निश्चित भूमिका आणि तत्त्वज्ञान असलेले नेतृत्व होते. त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान अमोघ होते. अशोकराव चव्हाण यांनी अतिशय नेमकेपणाने व्यक्त केले की, "दादासाहेब म्हणजे निळ्या आसमंतातील चकाकता तारा". ते कुशल संघटक होते, पुरोगामी विचारांचे होते, अशीही प्रशस्ती अशोकरावांनीही जोडली. परंतु पुढे त्यांनी मतप्रदर्शन केले की "आपल्या कारकिर्दीतील काही काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर काम करण्याची संधी त्यांना मिळाली," वस्तुतः १९६२ नंतर दादासाहेब राजकारणात आले. त्यामुळे बाबासाहेबांच्या सहवासाचा प्रश्न उपस्थित होत नाही.

उल्हास मराठे आणि सुधीर पाठक यांनी गवईंच्या व्यक्तिमत्त्वातील काही वेगळ्या पैलूंना स्पर्श केला आहे. राजकारणाव्यतिरिक्त संस्थात्मक कार्य हा त्यांचा पिंड होता. शैक्षणिक, सामाजिक आणि

सांस्कृतिक क्षेत्रांशी त्यांचे जिव्हाळ्याचे अनुबंध होते. पद्मश्री शिवाजीराव पटवर्धनांच्या कुष्ठरोग्यांच्या सेवेला जसे सक्रिय सहकार्य त्यांनी दिले; तसेच अमरावती आणि परिसरातील क्रियाशील संस्थांनाही सहकार्याचा हात दिला, हे उल्हास मराठे यांनी विशेषत्वाने विशद केले आहे. म्हणूनच दादासाहेब, विविध संस्थांचे आधारवड होते असा ते सार्थ गौरव करतात.

दादासाहेब गवई अजातशत्रू होते, त्यांच्या वागण्या-बोलण्यात अभिजातता होती, असे सुधीर पाठक प्रतिपादन करतात. स्वतः शिक्षणसंस्था उभारून त्यांनी त्यांचा विकास केला. तळागाळातील समाजाला साहाय्यभूत झाले. पाठक म्हणतात, "सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्यावरही दलितांसाठी, भीमसैनिकांसाठी आणि सामान्य माणसांसाठी लढण्याची, झुंजण्याची व संघर्षशील राहण्याची ऊर्जा दादासाहेबांनी गमावली नव्हती." ही वस्तुनिष्ठता स्वीकारायलाच हवी. दादासाहेब हे खरे लोकसेवक होते, हे शपथेवर सांगण्याची गरज नाही.

संसदीय आणि विधानपरिषदेतील कामकाजातील सहभाग म्हणजे दादासाहेबांचा गौरवपूर्ण आलेखच. ज्येष्ठ संपादक व पत्रकार लक्ष्मणराव जोशी, वसंत देशपांडे, मा. गो. वैद्य आणि सुकृत खांडेकर ह्यांनी या संदर्भात घेतलेला वेध म्हणजे दादासाहेबांच्या अभ्यस्त वृत्ती, तत्त्वनिष्ठा आणि न्यायासाठी संघर्षरतता ह्यांचे विलोभनीय दर्शनच. त्यांच्या लेखांची शीर्षके बोलकी व अन्वर्थक आहेत. ' रा. सू. गवई यांची विधानपरिषदेतील तीन दशके (वसंत वासुदेव देशपांडे), ' श्री. रा. सू. गवई : विधान परिषदेचे निःपक्ष आणि कर्तबगार सभापती ' (मा. गो. वैद्य), ' संसदेतील दादा ' (सुकृत खांडेकर), ' मऊ मेणाहुनी, आम्ही भीमदास ' (लक्ष्मणराव जोशी), आणि ' संसदपटू रा. सू. गवई,' (मनोहर जोशी) हे ते लेख.

' संसदेतील दादा ' या लेखातील एका वेगळ्या प्रसंगाचा निर्देश करावासा वाटतो. संसद म्हणजे भारतीय मुत्सद्दी, राजकारणी आणि विचारवंतांचे माहेरघरच. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नावर येथे चर्चा घडते. वाद आणि वादंगही होतात. सुकृत खांडेकर विशेष निर्देश करतात तो असा "अभ्यासपूर्ण भाषणे करणाऱ्या मोजक्या खासदारांमध्ये त्यांचे (गवई) नाव घेतले जायचे. त्यांच्या भाषणात जरब असायची, पण आततायीपणा नसायचा... गवईदादा इंग्रजी आणि हिंदीतही अस्खलित बोलत असत."

संसदपटू म्हणून दादासाहेबांची प्रतिमा जशी उजळ होती तसेच समयसूचकता, स्पष्टवक्तेपणा आणि निर्भयता त्यांच्या प्रतिपादनात प्रतीत होत होती. खांडेकर एका घटनेचा उल्लेख करतात तो अतिशय महत्त्वाचा आहे. पत्रकार अरुण शौरी त्या वेळी मंत्री होते. त्यांचे त्या वेळी वादविषय असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील पुस्तक प्रकाशित झाले होते. त्यावर उपरोधगर्भ भाषेत आक्षेप

एचबी ११८०—२अ

नोंदवत दादासाहेब गवई म्हणाले होते, "संसदेच्या सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विरोध करणारे बसले आहेत व त्यांना भाजपने मंत्रिपदे दिली आहेत. डॉ. बाबासाहेब हा खोटा देव आहे व त्यांची पूजा करणारे हे खोटे आहेत असे सांगणारे लोक या सदनात बसले आहेत." यावर सभागृहात उपस्थित असलेले अरुण शौरी ताडकन उभे राहिले आणि ते पुस्तक स्वतः लिहिल्याची कबुली दिली. गोंधळ आरंभ झाला. 'गवईंनी क्षमा मागावी' असा हलकल्लोळ झाला. गवईंनी क्षमा मागण्यास नकार दिला. गोंधळ वाढतच गेला तेव्हा दादासाहेब म्हणाले, "देशातील कोट्यवधी जनतेच्या भावना दुखविणारे, पुस्तक जप्त करणार असेल व शौरी यांचं सदस्यत्व रद्द करण्यात येणार असेल तर आपण माफी मागण्यास तयार आहोत." प्रकरण अधिकच चिघळले. संताप अनावर होऊन दादासाहेबांनी शौरींचे पुस्तक सभागृहातच टराटरा फाडले. सभागृहातील ही अभूतपूर्व घटना होती. गवईंच्या बाणेदारपणाचे भारताला दर्शन झाले.

दादासाहेब गवई यांच्या कार्य-कर्तृत्वाचा निरभ्र वेध घेणाऱ्या काही मान्यवरांच्या लेखांचा निर्देश करणे आवश्यक वाटते. केंद्रीय मंत्री, नितीन गडकरी ह्यांनी दादासाहेब दूरदृष्टीचे नेते कसे होते, तसेच त्यांचा दिलदारपणा कसा पारदर्शी होता यावर भाष्य केले आहे. प्रा. बी. टी. देशमुख हे स्वतः विधानपरिषदेतील अभ्यासू आमदार. त्यांनी आपल्या लेखात गवईंच्या अभ्यासूवृत्तीचा उल्लेख करून त्यांचा 'संसदपटूंचा मेरुमणी' अशी उपाधी देऊन यथोचित गौरव केला आहे. सुसंस्कृत राजकारणी उल्हासदादा पवार ह्यांनी दादासाहेबांच्या लोभस व्यक्तिमत्त्वाचा नेमका नीटस परामर्श घेतला आहे. पत्रकार मधु कांबळे आणि कॅ. भीमराव कवठेकर ह्यांनी त्यांना भावलेले दादासाहेब शब्दांकित केले आहेत.

रा. सू. गवई हे मूलतः आंबेडकरनिष्ठ रिपब्लिकन नेते. त्यामुळे स्वाभाविकच त्यांच्या संपर्कात आणि सहवासात अनेक कार्यकर्ते व नेते होते. एकसंघ रिपब्लिकन पक्ष ते शकलांकित रिपब्लिकन पक्ष असा वेदनांकित इतिहास असला तरी दादासाहेब त्याचे सजग साक्षीदार होते. ही जाणीव ठेवूनच रामदासजी आठवले, प्रा. जोगेन्द्र कवाडे, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार यांनी राजकीय मतभेदांसह, दादासाहेब गवई ह्यांचे ज्येष्ठत्व मान्य केले आहे, हे औचित्यपूर्णच.

या संदर्भात आणखी एका महत्त्वपूर्ण नावाचा उल्लेख केला पाहिजे ते म्हणजे सदानंद फुलझेले. ते दादासाहेबांचे ज्येष्ठ राजकीय सहकारी तर होतेच पण दीक्षाभूमीची धुरा वाहाण्यातही ते दादासाहेबांबरोबर होते. दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर सूत्रे दादासाहेब गवई यांच्याकडे आली तेव्हा सदानंद फुलझेले हे समितीचे सचिव होते.

दीक्षाभूमीचे संवर्धन आणि विकास करण्यासाठी दादासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून फुलझेले यांनी पराकाष्ठा कशी केली हे त्यांच्या लेखातून प्रतीत होते.

समाज, संस्कृती, चळवळी, शिक्षण अशा बहुविध क्षेत्रातील अनेक व्यक्तींशी दादासाहेबांचे कौटुंबिक व आंतरिक नाते होते. असा आंतरिक स्पर्श असलेले काही लेख प्रस्तुत स्मृतिग्रंथात आहेत. माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, डॉ. देविसिंह शेखावत, विदर्भवीर जांबुवंतराव धोटे, श्रीमती विद्यालक्ष्मी मेटकर, डॉ. बी. आर. वाघमारे, प्रभाकरराव वैद्य, डॉ. मोतीलालजी राठी ह्यांची मनोगते जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेली आहेत. दादासाहेबांचे स्वीय सहायक एन. आर. सुटे व ज. वि. गायकवाड यांना तर त्यांचे खूपच सानिध्य लाभले. त्यांची मनोगतेही बोलकी आहेत.

व्यक्ती स्वकर्तृत्वाने मोठी होते हे स्वयंसिद्ध सत्य आहे. परंतु कुटुंब हाही एक अविभाज्य घटक असतो. दादासाहेबांच्या कुटुंबातील व्यक्ती उच्चशिक्षित कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील आहेत हे सर्वज्ञात आहे. धर्मपत्नी कमलताई, कर्तृत्ववान पुत्र न्या. भूषण, डॉ. राजेंद्र, कन्या कीर्ती यांच्या भावस्पर्शी आठवणी अंतर्मुख करतात. दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू मनात रुंजी घालतात.

स्मृतिग्रंथातील दादासाहेबांच्या निर्वाणानंतर सदनात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी मांडलेला शोकप्रस्ताव आणि त्यावरील मान्यवरांची मनोगते हा भागही लक्षणीय आहे. धनंजय मुंडे, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, जयंत पाटील, गणपतराव देशमुख, एकनाथ शिंदे, सय्यद इम्तियाज जलिल, विनोद तावडे व वीरेंद्र जगताप यांनी आपल्या मनोगतात गवईंच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दादासाहेबांशी असलेल्या त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या स्नेहसंबंधाचा उल्लेख केला. अनेक आठवणींना उजाळा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही त्यांची ऊर्जाभूमी होती असा औचित्यपूर्ण निर्देश केला.

राजकारणात जीवनमूल्ये आणि नैतिकता सांभाळावी लागतात त्याचे पुरते भान दादासाहेब गवईंना होते. त्यामुळेच अनेक पक्षातील राजकीय नेत्यांशी त्यांचे स्नेहबंध होते. या राजकीय नेत्यात प्राधान्याने मा. शरदचंद्र पवार, सुशीलकुमार शिंदे, शिवराज पाटील चाकूरकर, दिलीप वळसे-पाटील यांचा अंतर्भाव करता येईल. ए. बी. बर्धन, जयंतराव टिळक, प्रा. ग. प्र. प्रधान, बॅ. ए. आर. अंतुले, श्रीमती मृणाल गोरे, यासारख्या मान्यवरांनी वेळोवेळी दादासाहेबांविषयीच्या कार्याचा आणि सद्‌भावांचा उल्लेख केला. असे हे दादासाहेबांचे उर्जस्वल व्यक्तित्व ! या ग्रंथाचे संपादक, डॉ. किशोर फुले यांनी ' सर्वस्पर्शी जीवन ' या संक्षिप्त चरित्रातून दादासाहेबांच्या बहुआयामी जीवनाचा घेतलेला मागोवाही उल्लेखनीय आहे.

स्मृतिग्रंथ हा एक ऐतिहासिक दस्तऐवज असतो. रा. सू. तथा दादासाहेब गवई स्मृतिग्रंथ हा असाच एक दस्तऐवज आहेच. परंतु संदर्भग्रंथही आहे. समाज, राजकारण, शिक्षण, सार्वजनिक कार्य आणि विधायक चळवळी यांचा समृद्ध आविष्कार या स्मृतिग्रंथातून तर घडतोच; पण महाराष्ट्रातील दादासाहेब गवई नावाच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे दर्शनही घडते. नव्या पिढीला हा ग्रंथ प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

▪ **डॉ. गंगाधर पानतावणे**
सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत
'श्रावस्ती', औरंगाबाद.

संक्षिप्त चरित्र :

सर्वस्पर्शी जीवन

▪ डॉ. किशोर फुले

भगवान गौतमबुद्ध महानिर्वाणाला निघाले असता त्यांचा प्रिय शिष्य आनंद त्यांच्या पायाशी बसून त्यांची सेवा करीत होता. बुद्धाच्या महानिर्वाणाच्या कल्पनेने दुःखी झालेला आनंद गौतमबुद्धांना म्हणाला, 'महाराज आपण गेल्यावर कोण आम्हाला मार्ग दाखवील, कोण आम्हाला न्याय देईल?' त्यावर गौतमबुद्धांनी 'अत्त दिप भव' तूच तुझा प्रकाश हो, असा संदेश दिला.

भगवान गौतमबुद्धाच्या तत्त्वज्ञानाने, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावळीने महाराष्ट्रात जी पिढी अंतर्बाह्य प्रकाशमान झाली त्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई काळाच्या पडद्याआड गेले. आंबेडकरी चळवळीची, सर्व समाजातील दीन-दलितांची आणि लोकशाहीवर प्रगाढ श्रद्धा असणाऱ्या समूहाची ही फार मोठी हानी आहे.

जन्म-बालपण :

रामकृष्ण सूर्यभान गवई, मुक्काम दारापूर, तालुका दर्यापूर, जिल्हा अमरावती या नावाला 'दादासाहेब' नावाच्या आत्मियतेचे आणि सर्वस्पर्शी आदराचे जे वलय प्राप्त झाले त्यामागे पाऊणशे वर्षाच्या संघर्षाची आणि सखोल अध्ययनाची पार्श्वभूमी आहे. जातीपातीच्या उतरंडीचा तो काळ होता. समाजमनात उच्चनीचतेची जळमटं घट्ट बसली होती. ३० ऑक्टोबर, १९२९ ला लक्ष्मीपूजनचा दिवस होता. संपूर्ण भारत फटाके फोडून, मिठाई वाटून दिवाळीचा आनंद साजरा करीत असताना लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अमरावती जिल्ह्यातील दारापूर या लहानशा खेड्यात दादासाहेबांचा जन्म झाला. एक विचाराची पणती सूर्यभानजींच्या अंगणात उजळली. सूर्यभानजींचे मित्र पन्नालालजी बेथरिया हे गावातील सधन गृहस्थ होते. त्यावेळी त्यांची तीन मजली हवेली होती. आपल्या मित्राला दिवाळीच्या दिवशी पुत्ररत्न प्राप्त झाले या आनंदात पन्नालालजींनी घरच्या बंदुकीतून हवेत तीनदा बार उडविले. यथासमयी बाळाचे नामकरण 'रामकृष्णा' असे करण्यात आले. आदर्श जीवन जगणारा राम आणि धर्मयुद्धात कुशल नेतृत्व करणारा कृष्ण या दोन्ही दैवतांचा संगम त्यांच्या नावात होता.

समाजमनाचे चटके सहन करीत, कर्मयोगी गाडगेबाबांची कीर्तनं ऐकत, राष्ट्रसंत तुकडोजींच्या खंजिरीवरील भजनात रमत आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या शैक्षणिक क्रांतीचा वारा अंगावर घेत 'रामकृष्णा' वाढला. त्यांचे वडील सूर्यभानजी हे गावातील एक प्रतिष्ठित व्यक्ती होते. त्यांच्याकडे शेती होती. ग्रामपंचायतीचे सदस्य होते, शाळा समितीवर होते आणि विशेष म्हणजे रामकृष्णाच्या शिक्षणासाठी जागरूक होते. आई सरूबाई अत्यंत मायाळू आणि लोकसंपर्क ठेवणारी होती. मोठ्या मुलीच्या पाठीवर रामकृष्णा आणि त्यानंतर दोन भाऊ, दोन बहिणी अशी एकूण सहा भावंड होती. घरात सर्वजण रामकृष्णाला 'दादा' म्हणत. सूर्यभानजींचे कुटुंब खूप सधन नसले तरी खाऊन-पिऊन सुखी होते. त्यामुळे रामकृष्णाचे लहानपणी खूप कोडकौतुक झाले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे नाव दारापूरच्या शाळेत घालण्यात आले. दारापूरला चौथीपर्यंत प्राथमिक शाळा होती. या शाळेत गणपतराव पवार नावाचे शिक्षक होते त्यांचं रामकृष्णावर खूप प्रेम होतं. हा मुलगा हुशार आहे, पुढे नाव काढील असं ते सूर्यभानजींना सांगत.

शालेय शिक्षण :

पाचवीत रामकृष्णाला जवळच्या खोलापूरच्या शाळेत घालण्यात आलं. खोलापूरला शाळेत जाण्यासाठी पूर्णा नदी पार करावी लागत असे. त्यामुळे सहाजिकच आपल्या संवंगड्यांसोबत नदीत पोहण्याचा मोह रामकृष्णाला होई. भर पावसाळ्यात पूर्णा नदी दुथडी भरून वाहू लागल्यावर या पोहण्याच्या कार्यक्रमाला विशेष भरते येई. या पूर्णा नदीचे रामकृष्णाला खूप आकर्षण होते. पूर्णेच्या काठावर रामकृष्णाचे बालपण गेल्याने ही पूर्णामाय रामकृष्णाच्या मनात आयुष्यभर घर करून राहिली. पुढे मुंबईला वरळीला सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण केल्यावर या गृहनिर्माण सर्व इमारतींना नद्यांची नावे देण्यात आली. स्वत:च्या राहत्या इमारतीला त्यांनी 'पूर्णा' हे नाव दिले. खोलापूरच्या शाळेत रामकृष्णाला वामनराव पटवारी गुरुजी आणि पुंजालालजी वल्ली गुरुजी शिकवायला होते. वामनराव पटवारी ब्राह्मण तर पुंजालालजी वल्ली गुजराथी समाजाचे होते. परंतु दोघेही जातिभेद न मानणारे आणि प्रागतिक विचाराचे होते. हुशार विद्यार्थ्यांना मनापासून प्रोत्साहन देणारे हाडाचे शिक्षक होते. रामकृष्णाची हुशारी आणि सक्रियता पाहून त्यांनी रामकृष्णाला विशेष मार्गदर्शन केले. शाळेच्या अभ्यासासोबतच वक्तृत्व कला, वाद-विवाद, नाट्यकला यातही मार्गदर्शन केले. त्यामुळे शालेय जीवनापासून रामकृष्णा एक हुशार व हरहुन्नरी विद्यार्थी म्हणून ओळखला जाऊ लागला. शालेय जीवनातच वक्तृत्व आणि वाद-विवाद स्पर्धांमध्ये रामकृष्णाने अनेक पारितोषिके पटकावली होती. आपल्या मुलाचे हे कौतुक पाहून सूर्यभानजींची छातीही अभिमानाने भरून यायची. शिक्षकांची कौतुकाची थाप रामकृष्णाला उभारी देऊन जायची. शालेय जीवनापासून रामकृष्णाला टापटीप राहायची सवय होती. त्यावेळीसुद्धा त्यांच्या वडिलांनी त्यांना कोट-पँट, टोपी असा पोषाख शाळेसाठी शिवून दिला होता. तेव्हापासून नीटनेटके आणि रुबाबदार राहण्याची सवय रामकृष्णाला लागली.

खोलापूरला सातवीपर्यंत शाळा होती. त्यामुळे सातवीची परीक्षा पास झाल्यावर पुन्हा शिक्षणाची अडचण निर्माण झाली. यावेळी रामकृष्णाचे मामा सुखदेवराव अभ्यंकर मदतीला धावून आले. रामकृष्णाचे व्यक्तिमत्त्व आणि हुशारी पाहून त्यांनी सूर्यभानजींना रामकृष्णाला शिक्षणासाठी आपल्या घरी ठेवण्याची विनंती केली. त्याप्रमाणे अंजनगाव तालुक्यातील विहीगाव येथे मामाच्या घरी रामकृष्णाची रवानगी करण्यात आली. अंजनगाव सुर्जी येथील संगई विद्यालयात आठवीत रामकृष्णाचे नाव घालण्यात आले. विहीगावपासून ही शाळा पाच किलोमीटर दूर होती. जाण्या-येण्याचे अंतर जास्त होते. त्यामुळे सूर्यभानजींचे मामेभाऊ डोमाजी वानखेडे यांच्या अंजनगावच्या घरी राहून रामकृष्णा शिक्षण घेऊ लागला. हे डोमाजी वानखेडे सामाजिक कार्यकर्ते होते आणि त्याकाळात अंजनगाव नगरपालिकेचे सदस्य होते. पुढे महाराष्ट्र शासनाने त्यांना 'दलितमित्र' हा पुरस्कार देऊन गौरविले. डोमाजी वानखेडेच्या सार्वजनिक कार्याचे बाळकडूही अंजनगावच्या मुक्कामात रामकृष्णाला मिळाले. त्याचप्रमाणे अंजनगावच्या शाळेत अनंतवार गुरुजींचे मार्गदर्शनही प्राप्त झाले. आपल्या सर्व शिक्षकांचे ऋण रामकृष्णाने आयुष्यभर जाणले. पुढे मोठ-मोठ्या पदावर जाऊनसुद्धा रामकृष्णा आपल्या शिक्षकांना विसरला नाही. गावात आल्यावर ते त्या शिक्षकांना भेटत असत आणि अडीअडचणींच्या प्रसंगी मदतही करीत असत.

रामकृष्णाला शिक्षणासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी म्हणजे अमरावतीला ठेवले पाहिजे असे सूर्यभानजींना मनापासून वाटे. म्हणून नवव्या वर्गापासून रामकृष्णाची रवानगी अमरावतीला करण्यात आली. दारापूर, खोलापूर, अंजनगाव असा शालेय शिक्षणाचा प्रवास करीत नवव्या वर्गात रामकृष्णा पुढील शिक्षणासाठी अमरावतीत ॲकेडेमिक हायस्कूलमध्ये दाखल झाला. आदर्श वसतिगृहात राहण्याची सोय झाली. या ठिकाणी जेवणाची व्यवस्था बरोबर नव्हती. त्यामुळे अनेकदा रामकृष्णाची प्रकृती बरी राहत नसे. शिवाय रामकृष्णाला व्यायामाचाही छंद लागला. अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या व्यायाम पथकात दाखल

होऊन स्व. अंबादासपंत वैद्यांच्या कडक तालमीत रामकृष्णा तयार झाला. स्व. वसंतराव नाईक अध्यक्ष असतांना पुढे अनेक वर्षे साधारणतः १९७१-७२ च्या काळात दादासाहेबांनी या संस्थेचे उपाध्यक्षपदही भूषविले. गव्हर्नमेंट ॲकेडेमिक हायस्कूलच्या होस्टेलमध्ये रामकृष्णाचे स्थलांतर झाले. आपल्या शालेय जीवनातच वक्तृत्वाचे आणि नेतृत्वाचे गुण रामकृष्णाच्या अंगात भिनले होते. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक रामकृष्णा करीत असे. याच काळात शालेय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झाला. रामकृष्णाने तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेऊन हा प्रश्न सोडविला. त्यामुळे रामकृष्णाच्या खोलीवर अनेक विद्यार्थी शालेय जीवनातच प्रश्न घेऊन जात. उपजत बुद्धिमत्ता, उत्तम शरीरयष्टी, सामाजिक शिक्षणाची घरून मिळालेली शिदोरी आणि चळवळ्या स्वभाव यामुळे एक हुशार व चुणचुणीत विद्यार्थी म्हणून लवकरच रामकृष्णाने आपला लौकिक कायम केला. वर्गमित्रांच्या जत्थ्यात तालीम करून शाळा-महाविद्यालयातील वक्तृत्व स्पर्धांमध्ये अनेक पारितोषिके त्यांनी तेव्हा पटकावली होती.

महाविद्यालयीन शिक्षण व नेतृत्वगुणांचा उदय :

१९५२ साली रामकृष्णाने मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली आणि पुढे इंटर सायन्ससाठी विदर्भ महाविद्यालयात प्रवेश घेतला. आपला मुलगा डॉक्टर व्हावा असे सूर्यभानजींना वाटे. त्यामुळे इंटरला विज्ञान शाखेत जीवशास्त्र हा विषय रामकृष्णाने घेतला. रामकृष्णाला सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे आणि नेतृत्वाचे गुण अंगभूत असल्याने विविध सामाजिक प्रश्न आणि उपक्रम यामध्ये त्यांचा वेळ जाई. त्यामुळे अभ्यासाला पुरेसा वेळ देता येत नसे. परिणामतः इंटर सायन्सला रामकृष्णा नापास झाला. ही बाब विचारात घेऊन आणि आपल्यातील अंगभूत गुण ओळखून रामकृष्णाने नंतर कला शाखेत विदर्भ महाविद्यालयातच प्रवेश घेतला. त्या काळात सुप्रसिद्ध साहित्यिक, प्राचार्य राम शेवाळकर, कविश्रेष्ठ सुरेश भट, अभंगकार मधुकर केचे ही साहित्य क्षेत्रात पुढे नावारूपाला आलेली मंडळी, विदर्भवीर जांबुवंतराव धोटे, माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक, तपोवनचे अध्यक्ष डॉ. मोतीलाल राठी, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्व. यशवंतराव खापर्डे, स्व. प्राचार्य अण्णासाहेब वैद्य, अमरावतीचे प्रथम महापौर डॉ. देविसिंह शेखावत, चित्रपट निर्माते, प्राचार्य डॅडी देशमुख, प्राचार्य डॉ. सुरेश पाध्ये, स्व. अरविंद पाटील ढवळे, माजी मंत्री यशवंतराव शेरेकर, श्री. बाबुराव भेंडे अशी सार्वजनिक जीवनात पुढे नावारूपाला आलेली मंडळी विदर्भ महाविद्यालयात होती. त्यामुळे रामकृष्णाच्या नेतृत्व गुणांना आणि कर्तृत्वाला विशेष उजाळा प्राप्त झाला. या काळात महाविद्यालयीन निवडणुका अतिशय प्रतिष्ठेच्या व्हायच्या. त्या निवडणुकीत रामकृष्णाचे पॅनल राहायचे. त्या काळात प्राचार्य डॅडी देशमुख विरुद्ध बाबुराव भेंडे ही अटीतटीची निवडणूक गाजली. या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत रामकृष्णाचा उमेदवार असलेले बाबुराव भेंडे विजयी झाले. रामकृष्णातील नेतृत्वगुणांची अशी पायाभरणी शालेय व महाविद्यालयीन जीवनातच झाली होती.

कॉलेजच्या कट्ट्यात हास्य-विनोद, टिंगल टवाळी करणे आणि मैफिल जमविणे हा रामकृष्णाचा खास छंद होता. महाविद्यालयीन जीवनात खापर्डे बगीच्यात अरविंद ढवळेच्या बंगल्याजवळ त्यानंतर रुक्मिणी नगर येथे खोली करून रामकृष्णा राहायचा. रामकृष्णाची ही खोली म्हणजे एक हॉस्टेलच होते. कोणीही अडला-नडला येथे मुक्कामाला आणि मदतीला येई. या खोलीवर दादा इंगळे, प्रभाकर मोहोड, सरदारभाऊ, मामा गजभे हे त्यांचे रूम पार्टनर होते. स्वयंपाक करणे, रूम झाडणे, कपडे धुणे अशी कामे सर्वांनी आळी-पाळीने वाटून घेतली होती.

डॉ. बाबासाहेबांवर रामकृष्णाची खूप श्रद्धा होती. त्यांच्याविरुद्ध कोणी बोललेले त्यांना सहन होत नसे. याचे एक उदाहरण म्हणजे अमरावतीचे सुप्रसिद्ध धन्वंतरी, डॉ. गोगटे हे रशियाचा दौरा करून आले होते. त्यांचे भाषण रामकृष्णाने विदर्भ महाविद्यालयात ठेवले. डॉ. गोगटे हे डाव्या व प्रागतिक विचाराचे होते. डॉ. गोगटेंच्या भाषणात

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख आला. या उल्लेखाचा संदर्भ देऊन सवर्ण समाजातील एक विद्यार्थी कुत्सितपणे म्हणाला 'या आंबेडकराला रशियात कोणी ओळखतं का हो?' डॉ. बाबासाहेबांविषयी काढलेले हे उद्‌गार रामकृष्णाला लागले. कार्यक्रम संपल्यावर सभागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ उभे राहून आणि तो शहाणा विद्यार्थी बाहेर आल्यावर त्याला अडवून रामकृष्णाने त्याच्या कानशिलात वाजविले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रशियात कोणी ओळखत नाही तर मग काय तुला ओळखतं?' असे बजावून सांगितले. त्यानंतर तो विद्यार्थी डॉ. बाबासाहेबांच्या आणि रामकृष्णाच्याही वाट्याला कधी गेला नाही.

विदर्भ महाविद्यालयात रामकृष्णाला तेलंग नावाचे प्राध्यापक इतिहास शिकवायचे. रामकृष्णा त्यांच्या वर्गाला उशिरा जायचा आणि हळूच जाऊन वर्गात बसायचा. एक दिवस रामकृष्णाला उशिरा येताना आणि बसताना तेलंग सरांनी पाहिले. "तुम्ही उशिरा येता आणि मला न विचारता वर्गात येऊन बसता?" असे विचारले. रामकृष्णा उठून सरांजवळ गेला आणि 'मे आय कम इन सर?' असे जोरात विचारले. सरांनी दचकून पाहिले आणि सर्व मुले हसायला लागली. तेलंग सर चिडून म्हणाले की, "तू कितीही वर्षे कॉलेजमध्ये राहिला तरीही पास होणार नाही. तुझी जात काय?" तेलंग सरांनी प्रश्न केला. रामकृष्णा म्हणाला 'ब्राह्मण'. त्यानंतर काही दिवसांनी गवईंची खरी जात सरांना कळली आणि खोटं बोलल्याबद्दल रामकृष्णाला वर्गात जाब विचारला. गवई म्हणाले "सर पीरियड सुरू होता हिस्ट्रीचा. हिस्ट्रीचा आणि जातीचा काय संबंध? विचारायचेच असेल तर हिस्ट्रीविषयी विचारा!" सर ओशाळले आणि चूप बसले. बी. ए. चा निकाल लागल्यावर सर्वात जास्त मार्क्स रामकृष्णाला हिस्ट्रीत मिळाले आणि ती मार्कलिस्ट घेऊन तेलंग सरांकडे गेले. सर काय बोलणार? पुढे काही वर्षांनी याच तेलंग सरांची आर्थिक स्थिती बरोबर नसताना दादासाहेबांनी त्यांच्या विनंतीवरून त्यांना एका कॉलेजचे प्राचार्य केले. असा मनाचा मोठेपणा दादासाहेबांमध्ये होता.

१९५६ साली रामकृष्णा बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाला आणि पुढे शिवाजी महाविद्यालयात एल. एल. बी ला प्रवेश घेतला. सामाजिक चळवळीतील व्यस्ततेमुळे रामकृष्णाला ही पदवी पूर्ण करता आली नाही. रामकृष्णाचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार आणि स्वभाव सर्वांना आपलेसे करणारा होता. त्यामुळे त्यांच्या मित्रांचा गोतावळा सर्व जाती-धर्मात समान होता. आपल्या अंगभूत कलागुणांनी आणि सामाजिक कार्याने सर्व मित्रांच्या अंतःकरणात रामकृष्णाने आदराचे स्थान प्राप्त करून भावंडांचे दादा समाजाचे 'दादासाहेब' झाले.

गाडगेबाबा, राष्ट्रसंत व महनीय व्यक्तींचा प्रभाव :

कर्मयोगी गाडगेबाबांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कीर्तनांचा दादावर खूप प्रभाव होता. सातव्या वर्गात असताना ऋणमोचनच्या यात्रेत दादांची गाडगेबाबांशी भेट झाली. हा चुणचुणीत मुलगा त्यांच्या डोळ्यात भरला. बाबा रामकृष्णाला सोबत घेत अन्न, वस्त्र वाटायचे काम देत आणि मुख्य म्हणजे आपल्या कीर्तनाच्या अगोदर 'आता रामकृष्ण बोलेल' असं सांगून भाषण करायला लावत. 'हिंसा करू नका' या विषयावर तेव्हा दादा बोलत आणि प्रसंगी बाबांच्या पात्रावर जेवत. दारापूरजवळच्या पूर्णा काठावरील उपराईच्या शाहदावल बुवांच्या जत्रेत नवस फेडण्यासाठी अंधश्रद्धेपोटी हजारो बकरे, कोंबडे कापले जात. पूर्णेचे पाणी रक्ताने लालभडक होई. या जत्रेतील अंधश्रद्धेपोटी होणारी पशू-पक्ष्यांची हिंसा बंद व्हावी म्हणून गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून त्यांनी तरुण वयातच संघटन उभारले. गाडगेबाबांचे कीर्तन ठेवले. हजारो लोक त्या कीर्तनाला उपस्थित होते. प्रारंभी दादांचे प्रभावी भाषण झाले. गाडगेबाबांनी खूप कौतुक केले. त्यानंतर पशुहत्येला बऱ्याच प्रमाणात आळा बसला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या खंजरी भजनाने आणि ग्रामगीतेने समाजमन ढवळून काढले होते. त्यांच्या कार्याचाही दादांवर खूप प्रभाव होता. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यसेनानी वीर वामनराव जोशी, महान कुष्ठसेवक पद्मश्री शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या त्यागमयी जीवनाचा आणि शिक्षणमहर्षी

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा प्रभावही दादांवर पडला होता. अमरावतीच्या सार्वजनिक जीवनातील या महनीय व्यक्ती आणि सुदामकाका देशमुखांसारखा निस्पृह राजकीय कार्यकर्ता त्यांचे आदर्श होते. दादासाहेबांच्या संयमी, प्रसन्न आणि परिपक्व व्यक्तिमत्त्वाच्या मुळाशी ही संस्कार बीजे आहेत.

सामाजिक चळवळींना प्रारंभ :

याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी खेड्यापाड्यातील दलित समाजाच्या उत्थानासाठी चळवळ सुरू केली. खेड्यापाड्यात जाऊन दलितांमध्ये शिक्षणाविषयी आणि त्यांच्या सामाजिक स्थितीविषयी जागृती करण्याचे कार्य ते करीत. त्यासाठी सायकलने फिरून गावोगावी सभा घेत. मेलेली जनावरे ओढू नका, त्यांचे मांस खाऊ नका, मुला-बाळांना शिक्षण द्या, व्यसनांचा त्याग करा आणि प्रस्थापित समाजाच्या शारीरिक, मानसिक गुलामगिरीतून मुक्त व्हा असा संदेश ते गावोगावी देऊ लागले. हळूहळू त्यांच्या सभांना प्रचंड गर्दी होऊ लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ते समाजाला पटवून देत असत. सभेपूर्वी गावातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो ठेवून मिरवणूक काढली जायची. त्या मिरवणुकीत 'आंबेडकर कौन है?' असा नारा दादा द्यायचे आणि उपस्थित लोक 'दलितोंका राजा है' असा प्रतिसाद द्यायचे. सभेला गर्दी जमावी म्हणून अगोदर कलापथकाचा गायनाचा कार्यक्रम ठेवला जाई. त्यात दादा इंगळे जायचे आणि विशेष म्हणजे बुलबुल तरंग हे वाद्य वाजवायचे. बुलबुल तरंगवर दादा इंगळेच्या पहाडी आवाजातील बाबासाहेबांची गाणी ऐकून सभेला प्रचंड गर्दी व्हायची. या सभांमध्ये फुलाजी चक्रे आबाजी यांचेही वऱ्हाडी शैलीत खास विनोदी भाषण व्हायचे. त्यानंतर सर्वात शेवटी दादासाहेबांचे विचारप्रवर्तक भाषण व्हायचे. हा कार्यक्रम मध्यरात्रीपर्यंत आणि कधी कधी पहाटेपर्यंत चालत असे. १९५४-५५ आणि १९५६ या काळात दादासाहेबांनी संपूर्ण वऱ्हाडात हजारो सभा घेतल्या. या सभांमुळे विरोधकांचा आणि प्रस्थापित समाजाचा रोषही त्यांना ओढवून घ्यावा लागला. अनेकदा त्यांच्यावर प्राणघातक हल्लेही झाले. अनेक सभाही उधळल्या गेल्या परंतु दादासाहेब आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत.

केवळ दलित समाजासाठीच जनजागृतीचे कार्य दादासाहेबांनी केले नाही. तर इतरही समाजातील सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. उपराई येथे शाहदावल बुवाच्या यात्रेत अंधश्रद्धेपोटी ओल्या अंगाने अनेक महिला बाबाच्या दर्शनासाठी जात. त्या ठिकाणी महिलांच्या असहाय्यतेचा व अंधश्रद्धांचा फायदा घेऊन अनेक मुल्ला-मौलवी त्यांना दर्ग्याच्या पायऱ्यांवर ताटकळत ठेवत आणि आशीर्वाद देण्याच्या बहाण्याने त्यांच्या अंगावरून हात फिरवत. 'जबतक पीर रजा नही देता ठहराना पडेगा' असे म्हणून अंगारे-धुपारे देऊन त्यांचे शोषण करीत. हा अत्यंत वाईट प्रकार होता. दादासाहेबांना हे समजल्यावर त्यांनी चंडिकापूरचे सामाजिक कार्यकर्ते श्री. रामसुचीत कुर्मी यांच्या नेतृत्वात या वाईट प्रथेविरुद्ध लढा पुकारला आणि स्त्रियांना न्याय मिळवून दिला. त्यासाठी तुरुंगवासही पत्करला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावळीत :

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या झंझावाताने संपूर्ण समाजमन ढवळून काढले. प्रस्थापित चौकटींना त्यांनी मोडून टाकले. प्रभू रामचंद्राचा उंबरठा हलवला आणि महाडच्या चवदार तळ्याचे पाणी 'शुद्ध' केले. या झंझावातापासून दादासाहेब दूर राहणे शक्यच नव्हते. त्यांच्या अंतर्मनातील प्रकाशाला सूर्याचे आवतन मिळाले. १९५६ साली डॉ. बाबासाहेबांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपल्या हजारो कार्यकर्त्यांसह त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यापूर्वी डॉ. बाबासाहेबांच्या जाज्वल्य विचाराने प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेबांच्या पक्षाचे ते खंदे शिलेदार झाले होतेच. डॉ. बाबासाहेबांचा प्रत्यक्ष सहवासही त्यांना लाभला. वंचितांना बळ देण्याच्या राजकीय, सामाजिक लढाईत डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाडांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी होते. कर्मवीर

दादासाहेबांना ते गुरुस्थानी मानीत. अखेरपर्यंत कर्मवीरांची दादासाहेब गवईंनी पुत्रवत सेवा केली. १९५६ साली ते दादासाहेबांच्या संपर्कात आले.

विदर्भ रिपब्लिकन पक्षाचे सेक्रेटरी :

६ डिसेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षात कुरबुरी सुरू झाल्या. हेवेदावे वाढले. १९५७ साली बडनेराला रिपब्लिकन पक्षाची सभा श्री. के. बी. श्रृंगारे यांनी आयोजित केली होती. त्यावेळी श्री. आवळेबाबू हे रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्यांपैकी एक होते. त्यांचे आणि दादासाहेब गवईंचे मतभेद झाले. त्यामुळे विदर्भातील आवळेबाबूंच्या अनुयायांना पक्षात स्थान राहिले नाही कारण विदर्भात गवई रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख पुढारी होते. बडनेऱ्याच्या सभेला दादासाहेब गायकवाड, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, ॲड. दत्ता कट्टी, श्री. माने. श्री. हरिहरराव सोनुले यांनी येऊ नये असा आग्रह श्री. आवळेबाबूंनी धरला कारण ही सभा यशस्वी झाल्यास दादासाहेब गवईंचे वर्चस्व वाढेल असे त्यांना वाटत होते परंतु दादासाहेब गायकवाड सर्व पुढाऱ्यांसह सभेला उपस्थित राहिले. या सभेत चिडून आवळेबाबूंनी गवईंवर प्रखर टीका केली. परंतु दादासाहेब गायकवाडांनी गवईंची खूप प्रशंसा केली. पुढे अकोल्याच्या सभेत गवई-श्रृंगारे यांनी येऊ नये म्हणून आवळेबाबूंच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर लाठी हल्ला केला. या घटनेची पक्षाच्या सभेत गंभीर चर्चा झाली आणि दादासाहेब गवई यांना विदर्भ रिपब्लिकन पक्षाचे सेक्रेटरी करायचे असे निश्चित झाले. त्याला आवळेबाबूंचा विरोध होता. पण दादासाहेब गायकवाडांच्या सल्ल्यावरून बॅ. खोब्रागडे यांनी गवईंची सेक्रेटरी म्हणून निवड केली आणि गवईंनीच सुचविलेले वाशिमचे ॲड. एस. एच. अवचार हे अध्यक्ष झाले. यानंतर दादासाहेब गवईंचा रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय नेत्यांशी जवळचा संबंध आला. १९५९ मध्ये मुंबई येथे झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सभेत दादासाहेब गायकवाडांच्या सांगण्यावरून आर.पी.आय. चे अध्यक्ष एन. शिवराज यांनी दादासाहेब गवईंना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत घेतले. त्यावेळी त्यांचे वय केवळ तीस वर्षाचे होते व ते सर्वात तरुण सदस्य होते. गवईंच्या रिपब्लिकन पक्षाच्या कामाला त्यानंतर गती प्राप्त झाली. याच काळात श्री. वा. को. गाणार, श्री. सदानंद फुलझेले, श्री. के. बी. श्रृंगारे, श्री. दे. झा. वाकपांजर, प्रा. भाऊ ढंगारे असे अनेक बिनीचे पदाधिकारी व कार्यकर्ते दादासाहेबांनी जोडले. त्यांचा स्वतःचा असा एक चाहता वर्ग निर्माण झाला.

भूमिहिनांसाठी चळवळ व कुळकायदा :

१९५७ सालापासूनच दादासाहेबांनी सर्व जातिधर्माच्या भूमिहिनांना जमीन मिळाली पाहिजे यासाठी चळवळ सुरू केली. 'कसेल त्याची भूमि' हा नारा त्यांनी दिला. आजूबाजूची सरकारी पडीक जमीन उत्पादनाखाली आली पाहिजे, राष्ट्रीय उत्पन्न वाढले पाहिजे आणि भूमिहिनांना जमीनही मिळाली पाहिजे हा त्यांचा उद्देश होता. हे आंदोलन हळूहळू अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, चंद्रपूर, भंडारा या जिल्ह्यात पोहचले. हजारो लोकांनी आसपासच्या पडीक जमिनीवर पिके उभी केली. ते अतिक्रमण ठरविण्यात आले. अतिक्रमणाचा आरोप झाल्याने त्यांच्यावर फौजदारी खटलेही दाखल करण्यात आले. त्यावेळी दादासाहेब गवई रिपब्लिकन पक्षाचे फक्त कार्यकर्ते होते. परंतु या आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी केले आणि तत्कालीन मध्यप्रदेश शासनाच्या महसूल मंत्र्यांना, मुख्यमंत्र्यांना भेटून ही पिके नियमित केली. १९५५-१९६२ या कालखंडात फार मोठ्या पडीक जमिनीवर अतिक्रमण करून पिके घेण्यात आली आणि जुन्या मध्य प्रदेश प्रांताचे तत्कालीन महसूल उपमंत्री, श्री. वसंतराव नाईक यांची नागपूर मुक्कामी भेट घेऊन स्वतःचे हाताने लिहिलेले हजारो जिल्हानिहाय अर्ज गवईंनी त्यांना नेऊन दिले आणि अतिक्रामकांना नियमित करण्याचा आग्रह धरला. दादासाहेब गवई यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत वसंतराव नाईक यांनी मध्यप्रदेश शासनाचा आदेश काढून ही पिके कायम ठेवली. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर

दादासाहेबांनी पुन्हा यासाठी शासन दरबारी प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्रात देखील श्री. वसंतराव नाईक हेच महसूलमंत्री होते. त्यांना दादासाहेबांच्या चळवळीची कल्पना होती. त्यांनी विविध जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून या जमिनी नियमित करण्याचे आदेश दिले. हजारो एकर जमीन भूमिहिनांसाठी नियमित करण्यात आली. यामध्ये सर्व जातिधर्माचे लोक होते. त्यानंतर दादासाहेबांनी वसंतराव नाईक यांना एक 'पायलट स्किम' सादर केली. या योजनेनुसार सातत्याने तीन वर्षे ज्याने जमीन वाहिली त्याला भूमिधारक समजण्यात यावे अशी ही योजना होती. ती योजनासुद्धा झाली. सत्तेचे कोणतेही पद नसतांना हजारो भूमिहिनांना 'भूमिधारक' करण्याचे महनीय कार्य दादासाहेबांनी त्या काळात केले.

वऱ्हाडात त्यावेळी मोठे मोठे जमीनदार होते. त्यांच्याकडे हजारो एकर शेती होती. ही शेती ते स्वतः न करता त्यांच्या कुळांना वाहितीसाठी देत. त्यावेळी मध्यप्रदेश शासन होते. मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल, पं. द्वारकाप्रसाद मिश्रा आणि श्री. पी. के उपाख्य अण्णासाहेब देशमुख हे प्रभावी मंत्री होते. त्यावेळी भूमिहिनांसाठी दादासाहेबांनी शासनाकडे पाठपुरावा करून व आंदोलन उभारून कुळकायदा तयार करण्यास शासनास बाध्य केले आणि या कायद्याची अंमलबजावणीही करून घेतली. गाव कुसातील जमिनी महारांना देऊन त्यांची गुलामगिरी संपवावी असे विधेयक स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईच्या वरिष्ठ सभागृहात आणले होते; परंतु ते पारित होऊ शकले नाही. पुढे श्री. यशवंतराव चव्हाणांनी या संबंधीचा कायदा केला आणि महारांची गुलामगिरी संपविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात काही पळवाटा राहिल्या. त्याचा फायदा घेऊन महारांना वतने दिली जात नसत. पुढे यासंदर्भात दादासाहेब गवईंनी श्री. शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना शासनातर्फे आदेश काढून महार वतनाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार हे कलेक्टरच्या किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्यामार्फत झाले नसतील तर ते अनधिकृत समजावे असा आदेश काढला. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात पंचवीस ते तीस हजार एकर जमीन महार वतनांना परत मिळाली. याशिवाय केंद्र शासनाच्या लँड रिफॉर्म समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य करून शासनाला एक अभ्यासपूर्ण टिप्पणी दिली होती. अशा रीतीने विदर्भात व उर्वरित महाराष्ट्रातही दादासाहेबांनी त्या काळात भूमिहिनांसाठी लढा दिला.

भूमिहिनांसाठी लढा व कर्मवीरांच्या सहवासात :

१९६४ साली कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी भूमिहिनांसाठी आंदोलन सुरू केले. त्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी खेडी पिंजून काढायला सांगितली. विदर्भाची जबाबदारी गवईसाहेबांवर दिली. गवईसाहेबांचा झंझावात सुरू झाला. विदर्भातील प्रत्येक गाव त्यांनी पालथे घातले. कर्मवीर हे पाहत होते. दादासाहेब गवईंच्या नेतृत्वशक्तीवर आणि क्षमतेवर त्यांचा विश्वास होता. या आंदोलनाची सांगता त्यांनी अमरावतीला करायचे ठरवले. गवईसाहेबांनी कंबर कसली. नि कर्मवीर दादासाहेबांच्या उपस्थितीत विराट सभेने अमरावतीत या आंदोलनाची सांगता झाली. या सभेची यशस्विता पाहून अनेक वक्त्यांनी दादासाहेब गवईंचा उल्लेख 'विदर्भ केसरी' असा केला. कर्मवीर दादासाहेबांनी गवईंसाहेबांची आपल्या भाषणात मुक्तकंठाने प्रशंसा करून त्यांना या क्षेत्रातले 'महाराष्ट्र केसरी' असे संबोधले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. 'गवई आगे बढ़ो' चे नारे लागले आणि नेतृत्व सिद्ध झाले.

१९६२ साली राज्यसभेच्या निवडणुका आल्या. या निवडणुकीत दादासाहेब गायकवाड यांनी उभे राहावे असा आग्रह दादासाहेब गवईंनी त्यांना केला. परंतु १९५८ साली रिपब्लिकन पक्षात फूट पडल्यामुळे आपण निवडून येणार नाही असे दादासाहेबांना वाटत होते. श्री. यशवंतराव चव्हाण तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या आग्रहावरून काँग्रेस पक्षाने बी. सी. कांबळे यांना उमेदवारी दिली होती. त्यांच्या विरुद्ध निवडून येणे कठीण आहे असे दादासाहेब गायकवाडांना वाटत होते. परंतु

गवईंचा आग्रह कायम होता. त्यांनी दादासाहेब गायकवाडांना उभे राहण्याची गळ घातली आणि सर्व पक्ष कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून दादासाहेब गायकवाड निवडणुकीत उभे राहिले. दादासाहेब गवईंनी या निवडणुकीची उत्कृष्ट व्यूहरचना केली. प्र. सो. पा. पक्षाचे नेते श्री. राहांदळे यांची व इतरही पक्षातील नेत्यांची त्यांनी भेट घेऊन पाठिंबा प्राप्त केला. याशिवाय प्राधान्यक्रम मतगणना पद्धतीचा अभ्यास करून दुसऱ्या पसंतीची मते दादासाहेब गायकवाडांकडे वळविण्यात त्यांनी यश मिळविले. निकालाच्या दिवशी आपण निवडून येणार नाही याची खात्री असल्याने दादासाहेब गायकवाड दिल्लीला सामान आणण्यासाठी पंजाब मेल गाडीत बसले. श्री. दादासाहेब गवईंनी या निवडणुकीच्या व्यूहरचनेपासून तर मत मोजणीपर्यंत सखोल अभ्यास करून मतगणनेवर लक्ष ठेवले. श्री. गवई, दादासाहेब गायकवाडांचे मतमोजणी प्रतिनिधी होते. मतगणनेतील बारकाव्यांचा आणि प्राधान्यक्रम मत पद्धतीचा सखोल अभ्यास केल्यामुळे मतमोजणीच्या वेळी दादासाहेबांना विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण झाल्यावर निवडणूक अधिकाऱ्यांना दादासाहेब गायकवाडांना विजयी घोषित करण्याचा त्यांनी आग्रह धरला. त्यावेळी थोडा वादही झाला आणि ही बाब श्री. दादासाहेब गवईंनी मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना सांगून त्यांच्याशी चर्चा केली. नियमाप्रमाणे मतमोजणी होईल असे श्री. यशवंतरावजींनी सांगितले आणि त्याप्रमाणे दादासाहेब गायकवाड अतिशय कमी फरकाने निवडून आले. श्री. गवईंनी प्रवासातच दादासाहेब गायकवाडांना तार करून आणि भुसावळच्या स्टेशनमास्तरला कळवून दादासाहेब गायकवाडांना माघारी बोलावले. दादासाहेब परत आले आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. या निवडणुकीतील गवईसाहेबांचा अभ्यास आणि व्यूहरचना बघून दादासाहेब खूप खूश झाले आणि त्यांच्याकडील नेतृत्व गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

गोवा मुक्ती संग्राम व संयुक्त महाराष्ट्र चळवळ :

दादासाहेबांनी गोवा मुक्ती संग्रामात प्रत्यक्ष गोव्याच्या सीमेवर आपल्या कार्यकर्त्यांसह जाऊन सत्याग्रह केला होता. आणि त्यासाठी तुरुंगवासही पत्करला होता. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेते, श्री. एस. एम. जोशी, कॉ. डांगे, आचार्य अत्रे, श्री. नानासाहेब गोरे, शाहीर अमर शेख यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जनजागृती केली. अमरावतीही त्याला अपवाद नव्हती. अमरावतीचे इतिहासकार आणि समाजवादी नेते, श्री. बापूसाहेब कारंजकर हे अमरावतीच्या समितीचे सदस्य होते. वीर वामनराव जोशी, श्री. अण्णासाहेब सोमण, श्री. पी. के. देशमुख, श्री. बाळासाहेब मराठे, श्री. यशवंतराव खापर्डे, प्राचार्य अण्णासाहेब वैद्य, ॲड. यशवंतराव शेरेकर, कविश्रेष्ठ सुरेश भट, विद्यार्थीदशेतील प्रा. बी. टी. देशमुख ही मंडळी या आंदोलनात सक्रिय होती. दादासाहेब गवईसुद्धा या आंदोलनातील बिनीचे शिलेदार होते आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलन समितीचे विदर्भ विभागीय सचिव होते. त्यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला, या काळात महाराष्ट्रातील इतर पक्षांच्या नेत्यांशी त्यांचा जवळून संबंध आला.

श्रीमती कमलताईंशी विवाह :

वादळाशी आयुष्याच्या नीरगाठी बांधणे सोपे नसते. मूर्तिजापूरचे सामाजिक कार्यकर्ते सुदामजी इंगळे यांच्या 'कमल' नावाच्या पोरसवदा वयाच्या मुलीने हे धारिष्ट्य दाखविले आणि ती या रामकृष्णाची सीता व राधा दोन्हीही झाली. दादासाहेबांचा संपूर्ण वऱ्हाडात सतत खेडोपाडी दौरा असे. मूर्तिजापूरला सुदामजी इंगळे हे त्यांचे कार्यकर्ते होते. त्यांच्या घरी कामानिमित्त त्यांचे सतत जाणे-येणे असे. यावेळी सुदामजींची मुलगी कमल त्यांच्या चहापाण्याची व्यवस्था करीत असे. दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आणि कार्याविषयी कमलच्या मनात कमालीचा आदर होता. दादासाहेबांचे एखाद्या सभेत हार घालून स्वागत करावे अशी कमलची मनोमन इच्छा असे पण प्रत्यक्षात ते जुळले

नाही. एकदा भल्या पहाटे पाच-साडेपाच वाजता श्री. श्रृंगारेसोबत दादासाहेब सुदामजींच्या घरी गेले. कमलचे नुकतेच सडासंमार्जन झाले होते. सुदामजींना कमलला पाहुण्यांसाठी चहा-फराळ आणावयास सांगितले. बाहेरच्या अंगणात चहा-फराळ झाला. एवढ्यात दादासाहेबांच्या पॅन्टवर चिमणीने घाण केली. त्यामुळे सुदामजींचे धोतर नेसायला देऊन कमलने ती पॅन्ट धुतली आणि इस्त्रीही करून दिली. हे होत असतांना श्री. श्रृंगारे यांनी सुदामजींची कमल नुकतीच मॅट्रिक पास झाली आहे, तिचे लग्न करायचे आहे, तुम्हाला मुलगी कशी वाटते? असा प्रश्न दादासाहेबांना केला. दादासाहेबांनी कमलच्या पुढील शिक्षणाविषयी चौकशी केली आणि लग्न पक्के केले. २९ नोव्हेंबर १९५९ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष हाजी अबूल हसन यांच्या अध्यक्षतेखाली अमरावतीच्या घंटीघड्याळ्याच्या मैदानात (जोग चौक) दादासाहेबांचा विवाह झाला. आपल्या शिदोऱ्या घेऊन हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. दादासाहेबांची धर्मपत्नी झाल्यावर सौ. कमलताई गवईंनी दादासाहेबांच्या सामाजिक व राजकीय कार्यात स्वतःला झोकून दिले. पुढे त्यांनी डी. एड., बी. एड., राज्यशास्त्रात एम. ए. आणि पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली. त्यासाठी दादासाहेबांनी प्रोत्साहन दिले. संसाराला हातभार लागावा म्हणून शिक्षिकेची आणि पुढे प्राध्यापिकेची नोकरी केली. प्रारंभीच्या काळात शिवणकलेचेही काम केले. त्यावेळी दादासाहेबांच्या जवळ त्यांचे लहान भाऊ श्री. वसंतराव आणि श्री. विश्वासराव व बहीण सोनूताई शिकायला होती. दादासाहेबांचे वडील सूर्यभानजी व आई सरूबाई अधूनमधून येत असत. याशिवाय दादासाहेबांचा सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांचा गोतावळा घरी जेवायला नित्याचाच असे. परंतु कोणतीही कुरबुर न करता अखेरपर्यंत घरातील आतिथ्य श्रीमती कमलताईंनी कमी होऊ दिले नाही. सामाजिक संस्काराची शिदोरी आणि आतिथ्यशील स्वभाव यामुळे दादासाहेबांच्या आयुष्यात कमळ फुलले. दादासाहेबांनी समाज सांभाळला आणि कमलताईंनी संसार तोलून धरला. त्यामुळेच न्या. भूषण, डॉ. राजेंद्र आणि सौ. कीर्ती कीर्तीमान झाले. न्या. भूषण मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती असून त्या क्षेत्रात त्यांनी लौकिक प्राप्त केला आहे. डॉ. राजेंद्र एम. बी. बी. एस. असून दादासाहेबांचा राजकीय व सामाजिक वारसा चालवित आहेत तर मुलगी सौ. कीर्ती या उच्च विद्याविभूषित असून स्वतःचा व्यवसाय आणि दादासाहेबांच्या शिक्षण संस्थांचा कारभार बघतात.

१९६२ ची लोकसभा निवडणूक :

दादासाहेबांच्या राजकीय कारकिर्दीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला तो १९६२ च्या लोकसभा निवडणुकीपासून. या निवडणुकीत शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे काँग्रेसचे उमेदवार होते; आणि रिपब्लिकन पक्षाने उभे केले दादासाहेब गवईंना. डॉ. भाऊसाहेबांसारख्या ऋषितुल्य व्यक्तीशी निवडणुकीत लढत देणे अतिशय कठीण होते. डॉ. भाऊसाहेबांविरुद्ध निवडणूक लढविणे मला शक्य नाही असे गवईंनी पक्षाला सांगितले. परंतु डॉ. भाऊसाहेबांविषयी आदर ठेवून ही निवडणूक तुम्ही लढा म्हणजे विधानसभा निवडणुकीत त्याचा आपल्या पक्षाला फायदा होईल असा आदेश दादासाहेब गायकवाडांनी दिला. त्यामुळे राजकीय अपरिहार्यता म्हणून गवईसाहेब निवडणूक लढविण्यास तयार झाले. डॉ. भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि आदराला तसूभरही तडा जाऊ न देता गवईसाहेबांनी ही निवडणूक लढविली. निवडणुकीत त्यांचा साठ हजार मतांनी पराभव झाला. पण नेतृत्व उजळून निघाले. दर्यापूर आणि मेळघाट या विधानसभा क्षेत्रात ते आघाडीवर होते. प्रत्यक्ष डॉ. भाऊसाहेबांनी गवईसाहेबांच्या नेतृत्वक्षमतेची मुक्तकंठाने प्रशंसा केली. महापुरुष नभांगणातील ताऱ्यांसारखेच असतात, हेच खरे.

महाराष्ट्र विधानपरिषदेत प्रवेश :

गुरुस्थानी असलेले कर्मवीर दादासाहेब गायकवाड आणि ज्येष्ठ बंधुवत प्रेम करणारे महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक गवईसाहेबांचे कार्य जवळून पाहत होते. उण्यापुऱ्या दोन तपाच्या परिश्रमाला १९६४

साली मूर्त रुप आले. १९६४ साली विधानपरिषदेच्या निवडणुका आल्या. या निवडणुकीच्या चर्चेसाठी नागपूरचे रिपब्लिकन पक्षाचे नेते श्री. सदानंद फुलझेले यांच्या घरी दादासाहेब गायकवाड, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष एन. शिवराज यांची बैठक झाली आणि त्यांनी गवईंना उमेदवारी दिली. त्याचप्रमाणे रिपब्लिकन पक्षाचे दोन उमेदवार निवडून आले पाहिजे म्हणून बॅ. खोब्रागडेंनाही उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत दादासाहेब गवई विजयी झाले आणि थोड्या मतांनी बॅ. खोब्रागडे पराजित झाले. महाराष्ट्र विधानपरिषदेत १९६४ साली श्री. दादासाहेब गवई यांनी प्रवेश मिळविला. १९६४ साली विधानपरिषदेत गेल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या श्रद्धांजलीपर भाषण हे विधानपरिषदेतील दादासाहेब गवईंचे पहिले भाषण होय. हे भाषण उत्तम झाले. विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती श्री. वि. स. पागे यांनी या तरुण कार्यकर्त्यांचे अभिनंदन केलं. त्यानंतर विविध निवडणुकांमध्ये श्री. दादासाहेब गवई यांनी अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडून रिपब्लिकन पक्षाचे उमेद्वार निवडून आणले. १९६७ साली विदर्भातून रिपब्लिकन पक्षाचे आमदार निवडून आणण्यासाठी त्यांनी परिश्रम घेतले. त्यानंतर १९६८ साली बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना राज्यसभेवर त्याचप्रमाणे शांताबाई दाणी यांना विधानपरिषदेवर निवडून आणण्यात गवईंनी मोलाचे सहकार्य केले. अशारीतीने विधिमंडळात आणि राजकारणात गवईंचे नेतृत्व सिद्ध होत गेले. त्यानंतर त्यांच्या कर्तृत्वाची कमान चढतीच राहिली.

कर्मवीरांचे दुःखद निधन व रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष :

१९७१ साली दादासाहेब गायकवाड आजारी पडले. मुंबईच्या सेंट जॉर्ज रुग्णालयात ते भरती होते. याच कालखंडात बॅ. राजाभाऊ खोब्रागडे आणि ॲड. डी. ए. कट्टी यांनी गवईंना दिल्लीला बोलाविले. दादासाहेब आजारी असल्याने बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना अध्यक्ष आणि श्री. डी. ए. कट्टी यांना जनरल सेक्रेटरी करावे असा प्रस्ताव खोब्रागडेंनी गवईंसमोर ठेवला. दादासाहेब गायकवाड रुग्ण शय्येवर आहेत अशा वेळी आपण हा निर्णय घेणे योग्य नाही. दादासाहेब गायकवाडांनी रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष म्हणूनच निळ्या झेंड्यात शेवटचा श्वास घ्यावा अशी भूमिका गवईंनी घेतली आणि त्या प्रस्तावाला विरोध केला. गवईंचे हे म्हणणे बॅ. खोब्रागडेंना रुचले नाही आणि रिपब्लिकन पक्षात फूट पडली. रिपब्लिकन पार्टीचा खोब्रागडे गट तयार झाला. इकडे दादासाहेब गायकवाड अध्यक्ष, बी. पी. मौर्य कार्याध्यक्ष आणि एन. एच. कुंभारे जनरल सेक्रेटरी असा दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्ष होता. गवईंनी कुठलेच पद घेतले नाही. देशातील व महाराष्ट्रातील बहुसंख्य पदाधिकारी हे दादासाहेब गायकवाड यांच्या बाजूने होते. पुढे बी. पी. मौर्य काँग्रेसमध्ये गेले तेव्हा रा. सू. गवई यांची कार्याध्यक्षपदी निवड झाली.

१९७१ ला दादासाहेब गायकवाड यांचे दिल्लीत दुःखद निधन झाले. अखेरपर्यंत रा. सू. गवईंनी दादासाहेब गायकवाडांची पुत्रवत सेवा केली. त्यांना औषधोपचार व सर्वसुविधा उपलब्ध करून दिल्यात. दिल्लीला निधन झाल्यावर संरक्षण खात्याच्या विमानाने दादासाहेब गवई यांनी दादासाहेब गायकवाडांचे पार्थिव अंतिम संस्कारासाठी नाशिकला आणले. अंत्ययात्रेचे नियोजन श्रीमती शांताबाई दाणी यांना करण्यास सांगितले. यासाठी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईकांचे सहकार्य त्यांनी घेतले. दादासाहेबांची नाशिक शहरातून भव्य अंत्ययात्रा निघाली. या अंत्ययात्रेला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक आणि पक्षांचे लाखो कार्यकर्ते उपस्थित होते. दादासाहेब गायकवाडानंतर त्यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपद कार्याध्यक्ष रा. सू. गवई यांच्याकडे आले आणि श्री. गवईंच्या नेतृत्वात पुढील वाटचाल सुरू झाली.

उप सभापती :

१९६८ साली रिपब्लिकन पक्ष आणि काँग्रेसची युती झाली. त्यासाठी नाशिकला मेळावा घेण्यात आला. पक्षाचे ज्येष्ठ नेते एन. शिवराज, दादासाहेब गायकवाड, बॅ. खोब्रागडे आणि काँग्रेसचे नेते यशवंतराव चव्हाण यांच्यात युती झाली. याच काळात पीठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेत विधानपरिषदेचे उप सभापतीपद हे विरोधी पक्षाला द्यावे असा निर्णय झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री त्यावेळी श्री. वसंतराव नाईक होते. त्यांच्या मनात ही संधी विदर्भातील श्री. रा. सू. गवई यांना द्यावी असे होते परंतु, श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मनात दादासाहेब रूपवते यांचे नाव होते. श्री. वसंतराव नाईक यांनी मुंबई प्रदेश काँग्रेसचे स. का. पाटील यांची मदत घेऊन यशवंतरावजींचे मन वळविले आणि उप सभापतीपद रिपब्लिकन पक्षाचे रा. सू. गवई यांना द्यावे असे ठरविले. परंतु उप सभापतीपद घेतले तर आपल्याला विधानपरिषदेत सर्वसामान्य जनतेचा आवाज उठविता येणार नाही अशी भीती रा. सू. गवई यांना होती. त्यामुळे प्रारंभी ते हे पद घेण्यास तयार नव्हते. शेवटी दादासाहेब गायकवाड यांनी यासाठी गवईंना आदेश दिला आणि राज्यपालांचे अभिभाषण, अर्थसंकल्पावरील चर्चा, स्थगन प्रस्ताव यासारख्या आणि सामाजिक विषयावर मी भाषण करीन ही अट घालून गवईंनी उमेदवारी अर्ज भरला आणि ते अविरोध निवडून आले.

१९७० ला पुन्हा विधानपरिषदेच्या निवडणुका आल्या यावेळी पुन्हा उमेदवारी देण्याविषयी वाद झाला. बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी माजी खासदार हरिहरराव सोनुले यांचे नाव सुचविले. दादासाहेब गायकवाडांच्या मनात श्री. गवई साहेबांचे नाव होते. गवई साहेबांच्या १९६४ ते १९७० या कालखंडातील कामाचा आढावा बघता श्री. सोनुले यांनीही पत्र देऊन आपली उमेदवारी मागे घेतली आणि गवईंनाच ही उमेदवारी द्यावी अशी शिफारस केली. त्यामुळे वाद टळला आणि श्री. रा. सू. गवई हेच उमेदवार ठरले. काँग्रेस आणि रिपब्लिकन पक्षाची युती होतीच त्यामुळे यावेळीसुद्धा गवई निवडून आले. श्री. वसंतराव नाईक यांच्या मनात गवईंविषयी जिव्हाळा असल्याने आणि गवई साहेबांची कार्य करण्याची पद्धती पाहून त्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन पुन्हा विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून गवईंचीच निवड केली. गवई साहेब दुसऱ्यांदा उप सभापती झाले. याच काळात श्री. ना. ह. कुंभारे यांना राज्यसभेवर पाठविण्यात गवई यशस्वी झाले. त्यासाठी श्री. वसंतराव नाईक आणि तत्कालीन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील यांचे सहकार्य प्राप्त झाले.

१९७६ ला पुन्हा विधानपरिषदेच्या निवडणुका आल्या. यावेळी स्वतः श्री. गवई साहेब हे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष असल्याने उमेदवारी मिळण्याचा प्रश्नच नव्हता. पक्षाने त्यांची उमेदवारी घोषित केली. श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते. श्री. शंकरराव चव्हाण आणि श्री. वसंतराव नाईक यांच्यात मतभेद असूनही श्री. गवई साहेबांविषयी दोघांच्याही मनात आपलुकी होती. त्यावेळी स्वतंत्र आमदार आणि विरोधी पक्षाचा श्री. गवई साहेबांना पाठिंबा होता. याशिवाय श्री. शंकरराव चव्हाण यांच्यामुळे सत्तारूढ पक्षाची सात मते त्यांना प्राप्त झाली. काही मते स्वतःच्या व्यक्तिगत संबंधावर गवई साहेबांनी जुळविली आणि सर्वाधिक मतांनी श्री. दादासाहेब गवई निवडून आले. श्री. शंकररराव चव्हाणांनी दादासाहेबांना बोलावून 'आपण माझे उप सभापतीपदाचे उमेदवार आहात' असे सांगितले आणि श्री. दादासाहेब गवई तिसऱ्यांदा उप सभापतीपदी निवडून आले. हा एक विक्रमच म्हटला पाहिजे.

नवबौद्धांच्या सवलतींसाठी दिल्लीतील उपोषण :

१९७८ साली केंद्रात जनता पक्षाचे सरकार होते. श्री. मोरारजी देसाई देशाचे पंतप्रधान होते. डॉ. बाबासाहेबांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेणाऱ्या नवबौद्धांच्या सवलतीचा प्रश्न निर्माण झाला. शासनाने त्या नाकारल्या. श्री. दादासाहेब त्यावेळी

एचबी ११८०—३

विधानपरिषदेचे उप सभापती होते. या अन्यायाच्या विरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकले. दिल्लीच्या बोट क्लबवर श्री. आरुमुगम व श्री. कुंभारे यांचेसह स्वतः आमरण उपोषण सुरू केले. अनेक राष्ट्रीय नेते यांच्या भेटीसाठी आले. माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी उपोषण मंडपाला भेट देऊन दादासाहेबांच्या उपोषणाला पाठिंबा दिला. १४ दिवस हे उपोषण चालले. दादासाहेबांची प्रकृती खालावली. त्यांना दवाखान्यात भरती करण्यात आले. कार्यकर्ते खवळले आणि त्यांनी दिल्लीत तीव्र आंदोलन उभारले. सरकारने या आंदोलनाची दखल घेतली. श्री. मोरारजी देसाई चर्चेसाठी तयार झाले. पुढे ते शासन गेले. त्यानंतर पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी हा प्रश्न दादासाहेबांच्या मध्यस्थीने मार्गी लावून सोडविला. नवबौद्धांना सवलती प्राप्त झाल्या त्याचे श्रेय श्री. दादासाहेब गवई यांना द्यावे लागेल.

सभापतीपद :

१९७८ साली गवईसाहेबांची विधानपरिषदेच्या सभापतीपदी झालेली निवड म्हणजे तर 'चातुर्य सिहाणे झाले' या उक्तीची प्रचिती होय. तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील अनुकूल नसतानाही त्यांनी प्राप्त केलेले सभापतीपद म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकीय चातुर्य, मुत्सद्देगिरी आणि विधिनियमांची सखोल जाण याचा मूर्तिमंत वस्तुपाठच म्हटला पाहिजे.

१९७८ साली विधानपरिषदेचे सभापती, श्री. वि. स. पागे यांची मुदत संपली. त्यामुळे श्री. गवई विधान परिषदेचे कार्यकारी सभापती होते. याच काळात काँग्रेस पक्षातही फूट पडली होती. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेस आणि आर. काँग्रेस हे परस्पर विरोधी लढले होते. निवडणुकीनंतर या पक्षांची युती झाली. त्यामुळे विधानपरिषदेचे सभापतीपद आणि विधानसभेचे अध्यक्षपद दोन पक्षात विभागले गेले. विधानसभेचे अध्यक्षपद आर. काँग्रेसच्या वाट्याला गेले तर विधानपरिषदेचे सभापतीपद इंदिरा काँग्रेसच्या वाट्याला आले. श्री. रा. सू. गवई उप सभापती होते. इंदिरा काँग्रेसने सभापती पदासाठी नागपूरचे टी. जी. देशमुख यांना उभे करायचे ठरविले होते. मात्र त्यावेळी ते नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडणूक लढवीत होते. खरे म्हणजे या पदासाठी श्री. दादासाहेब गवई यांच्या नावाचा विचार व्हायला हवा होता तशी दादासाहेबांची अपेक्षा होती. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील, उप मुख्यमंत्री श्री. नाशिकराव तिरपुडे, श्री. रामराव आदिक या नेत्यांनी या संदर्भात आपल्याशी चर्चा करायला हवी होती अशी गवई साहेबांची अपेक्षा होती. विधिमंडळाच्या बारीक-सारीक नियमांचा आणि कार्यप्रणालीचा गवई साहेबांचा दांडगा अभ्यास होता. त्यांनी या अभ्यासाचा आणि मुत्सद्देगिरीचा फायदा घेऊन निवडणुकीची तारीख निश्चित केली आणि ती फाईल मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठविली. त्यावर मुख्यमंत्री, श्री. वसंतदादा पाटील यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर हा निवडणुकीचा कार्यक्रम मा. राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला. मा. सादिक अली तेव्हा महाराष्ट्राचे राज्यपाल होते. राज्यपालांची मान्यता मिळाल्यावर विधानपरिषदेचे कार्यकारी सभापती म्हणून श्री. गवई साहेबांनी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला. हा कार्यक्रम घोषित झाल्यावर काँग्रेसचे डोळे उघडले. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. निवडणुकीचा कार्यक्रम घोषित होऊन श्री. रामजीवन चौधरी यांनी सभापतीपदासाठी अर्जही भरला होता. या संदर्भात मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील आणि मा. राज्यपाल, श्री. सादिक अली यांची चर्चाही झाली. मा. राज्यपालांनी श्री. गवई साहेबांनाही चर्चेसाठी बोलाविले व या चर्चेत श्री. गवई साहेबांनी राज्यपालांना घटनात्मक बाबींची माहिती दिली. त्यामुळे सभापतीच्या निवडणुकीचा घोषित कार्यक्रम आता बदलता येणार नाही असा निर्णय मा. राज्यपालांनी दिला. या पार्श्वभूमीवर श्री. गवई साहेबांनी आपल्या उप सभापतीपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे

खळबळ उडाली. श्री. वसंतदादांनी गवईंना चर्चेसाठी बोलाविले. 'गेल्या काही दिवसातील घटनांनी माझा मानभंग झाला आहे आणि नवीन सभापतीच्या आधिपत्याखाली दहा वर्षे उप सभापतीपदी राहिल्यानंतर मला काम करणे शक्य नाही' असे श्री. गवई साहेबांनी सांगितले. या सर्व घटनाक्रमाचे राजकीय पडसाद चांगले उमटणार नाहीत हे ओळखून श्री. वसंतदादा पाटील, श्री. नाशिकराव तिरपुडे आणि श्री. रामराव आदिक यांनी चर्चा करून श्री. गवई साहेबांनाच सभापतीपदी अर्ज भरण्याची विनंती केली. प्रारंभी थोडे आढेवेढे घेऊन श्री. वसंतराव नाईक यांच्या मध्यस्थीनंतर श्री. गवई साहेबांनी उमेदवारी अर्ज भरला. श्री. रामजीवन चौधरी यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आणि श्री. दादासाहेब गवई सभापतीपदी अविरोध निवडून आले. 'चातुर्य सिहाणे झाले'. संसदीय कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास, सर्वच राजकीय पक्षाशी असलेले मधुर संबंध, राजकीय मुत्सद्देगिरी या गुणांमुळेच हे घडू शकले.

प्रतिष्ठेची निवडणूक :

बॅ. अंतुले यांच्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी बॅ. बाबासाहेब भोसले विराजमान झाले. श्री. गवई साहेब सभापती असतांना त्यांचे आणि मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब भोसले यांचे मतभेद झाले होते. १९८२ साली पुन्हा विधानपरिषदेच्या निवडणुका आल्या. यावेळी विधानपरिषदेत काँग्रेसचा पाठिंबा मिळणे कठीण होते. श्री. बाबासाहेब भोसले यांनी यावेळी श्री. गवई साहेबांना निवडून येऊ द्यायचे नाही असे बोलून दाखविले. श्री. गवई साहेबांच्या पक्षाचा एकही सदस्य सभागृहात नव्हता. असे असतांना त्यांनी प्रस्थापित काँग्रेसला आवाहन दिले. वृत्तपत्रात आव्हाने-प्रतिआव्हाने छापून येत होती. श्री. गवई साहेबांनी आपला अर्ज मागे घ्यावा म्हणून दिल्लीवरून स्वतः श्रीमती इंदिरा गांधींनी निरोप पाठविला. परंतु, उमेदवारी अर्ज भरल्यावर तो मागे घेणे आता योग्य नाही अशी भूमिका श्री. गवई साहेबांनी घेतली. दिल्लीहून श्री. नारायणदत्त तिवारी आणि श्री. व्ही. पी. सिंग हे निरीक्षक म्हणून आले. श्री. शरद पवार यांनीही मध्यस्थी केली पण गवई साहेबांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली. सत्तारूढ पक्षासह सर्व पक्षात असलेले जिव्हाळ्याचे संबंध कामात आले आणि श्री. गवई साहेब निवडून आले. त्यांनी चवथ्यांदा जिंकलेली विधानपरिषदेची ही निवडणूक म्हणजे प्राधान्यक्रमानुसार मतदानाचा अचूक अंदाज, सत्ताधारी पक्षासह सर्वच पक्षात असणारे मधुर संबंध आणि दुर्दम्य आत्मविश्वास याचे प्रतीकच होय. विधानपरिषदेचे सभापतीपदसुद्धा पुन्हा गवई साहेब राजकीय डावपेचाने पटकावतील म्हणून बाबासाहेब भोसलेंच्या नेतृत्वाखालील सत्तारूढ सरकारने सभापतीपदाची गुप्त मतदान पद्धत बदलून हात वर करून गणना पद्धत सुरू केली. इतकी धास्ती श्री. गवई साहेबांच्या राजकीय मुत्सद्देगिरीची घेतली होती. श्री. गवई साहेबांना आदरणीय असणारे जयंतराव टिळक त्यावेळी सभापती झाले.

विधानपरिषद विरोधी पक्षनेता :

१९८६ ते १९८८ विधानपरिषदेत ते विरोधी पक्षनेता होते आणि १९८८-९४ या काळात पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आले. या निवडणुकीत प्रत्यक्ष राजीव गांधींनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांना सांगून दादासाहेबांना मदत करायला लावली होती. १९९० साली विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेता म्हणून त्यांची फेरनिवड झाली. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी सरकारच्या चुकीच्या धोरणावर प्रखर टीका केली. स्वतःच्या पक्षाची सदस्य संख्या नसताना १९६४ ते १९९४ अशा सलग तीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात विधानपरिषदेचे सदस्य, तीनदा उपसभापती, सभापती व विरोधी पक्षनेतेपद राजकीय मुत्सद्देगिरीने, अभ्यासूवृत्तीने आणि अंगभूत गुणांनी प्राप्त करणाऱ्या श्री. गवई साहेबांच्या कर्तृत्वाची नोंद विधिमंडळाच्या इतिहासात सदैव नोंदविली जाईल.

एचबी ११८०—३अ

विधानपरिषद सदस्य म्हणून संसदीय आयुधांचा उपयोग करून त्यांनी मांडलेले भूमिहिनांचे प्रस्ताव, दीन-दलितांच्या मूलभूत प्रश्नांची त्यांनी केलेली सोडवणूक, रोजगार हमी योजना सुरू करण्यात दिलेले योगदान, नवबौद्धांना सवलती मिळाव्या म्हणून १९७८ साली दिल्लीत केलेले उपोषण, कष्टकरी-कामकऱ्यांचे प्रश्न, कापूस एकाधिकार योजनेसाठी सहकारी काँग्रेस पक्षाची काढलेली खरडपट्टी, डॉ. भाऊसाहेबांचे स्वप्न असलेल्या अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीतील भूमिका, कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी करावयाच्या कायद्यातील दुरुस्त्या, महाराष्ट्रातील दुष्काळाची भीषणता आणि त्यावर सुचविलेल्या उपाययोजना, राज्यपालांच्या अभिभाषणावर केलेली अभ्यासपूर्ण चर्चा, पक्षीय विरोध बाजूला सारून विरोधी पक्षातील सदस्यांचाही गुण गौरव करण्याची वृत्ती, अभ्यासपूर्ण पद्धतीने प्रश्न मांडण्यांची हातोटी, उप सभापती, सभापती म्हणून बाक्या प्रसंगातही अत्यंत जबाबदारीने आणि अभ्यासूवृत्तीने चालविलेले विधिमंडळाचे न्यायोचित कामकाज, विरोधी पक्षनेता म्हणून सरकारी धोरणांची केलेली चिरफाड, विधिमंडळात अशा विविधांगी भूमिका तोलून धरण्याची ताकद श्री. गवई साहेबांमध्ये होती.

रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सामाजिक परिवर्तनासाठी राजकीय परिवर्तन हवे होते. सत्तेच्या पाठबळाशिवाय समाजरथ पुढे जाऊ शकत नाही हे त्यांना माहिती होते. म्हणून त्यांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. पण रिपब्लिकन नेत्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकाक्षांमुळे रिपब्लिकन पक्षात १९५८ आणि १९७१ साली महत्त्वाची फूट पडली. १९५८ ला श्री. बी. सी. कांबळे वेगळे झाले तर १९७१ ला बॅ. रामभाऊ खोब्रागडेंच्या नेतृत्वात नवा गट स्थापन झाला. त्यानंतर अनेकदा हा पक्ष विभाजित झाला. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य व्हावे ही दादासाहेब गवईंची तीव्र इच्छा होती. 'ऐक्याच्या आड माझे पद येत असेल तर मी राजीनामा देतो' असे सांगून त्यांनी रिपब्लिकन नेते, श्री. आरुमुगम यांच्याकडे आपल्या उप सभापती आणि पदाचा आणि विधानपरिषद सदस्यत्वाचाही राजीनामा दिला होता. १९७४ मध्ये मुंबईत झालेल्या हिंदू-बौद्ध दंगलीच्या पार्श्वभूमीवर २६ जानेवारी, १९७४ रोजी जाहीर सभा घेऊन रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. श्री. भैय्यासाहेब आंबेडकर सभेच्या अध्यक्षस्थानी होते. श्री. बी. सी. कांबळे, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे आणि श्री. रा. सू. गवई यांनी आपापसातील मतभेद बाजूला सारून हे ऐक्य जाहीर केले, रिपब्लिकन पक्षाचा वनवास संपला असे दादासाहेब गवई त्यावेळी म्हणाले होते. त्यात त्यांचा पुढाकार होता. पण हे ऐक्य पुढे टिकले नाही.

१९९५ साली दादासाहेब गवईंनी पुन्हा रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासाठी पुढाकार घेतला. गवई-आंबेडकर-आठवले आणि सर्व लहान मोठे गट एकत्र आले. श्री. दादासाहेब गवई ज्येष्ठ या नात्याने एकीकृत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. या ऐक्याचा परिणाम म्हणून रिपब्लिकन पक्षाचे चार खासदार १९९८ ला निवडून आले. पण हे ऐक्यही त्यानंतर टिकले नाही. दादासाहेबांवर रिपब्लिकन फुटीचा परिणाम झाला आणि ते निराश झाले. आजारी पडले. ही खंत त्यांना अखेरपर्यंत होती.

लोकसभा सदस्य :

तीस वर्षांचा विधिमंडळाचा प्रदीर्घ अनुभव घेऊन १९९६ साली ते लोकसभेच्या आखाड्यात उतरले. शिवसेनेचे श्री. अनंत गुढे हे तरुण उमेदवार त्यांचे प्रतिस्पर्धी होते. या निवडणुकीत दादासाहेबांचा पराभव झाला. अकरावी लोकसभा अल्पजीवी ठरली आणि १९९८ साली पुन्हा बाराव्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या. पुन्हा श्री. अनंत गुढेच त्यांचे प्रतिस्पर्धी होते. पण, या निवडणुकीत श्री. दादासाहेबांचा विजय झाला. दुर्दैवाने या लोकसभेचा कार्यकाळ तेरा महिन्यांचाच राहिला. या अल्पकाळात

तत्कालीन लोकसभाध्यक्ष, श्री बालयोगींच्या अभिनंदन ठरावावर त्यांनी केलेले सर्वस्पर्शी भाषण 'मेडन स्पीच' ठरले. या अल्पकाळातसुद्धा त्यांनी त्यांना प्राप्त झालेल्या वेळेनुसार विविध चर्चा उपस्थित करून जनसामान्यांचे प्रश्न लोकसभेत मांडले. १९९९ ला पुन्हा तेराव्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या. या निवडणुकीत मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. शिवसेनेचे श्री. अनंत गुढे पुन्हा विजयी झाले.

राज्यसभा सदस्य :

२००० साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सहकार्याने ते राज्यसभेवर अविरोध निर्वाचित झाले. राज्यसभा सदस्य म्हणूनही त्यांनी आपली छाप सभागृहावर उमटविली. विशेषतः संविधान समीक्षेच्या ठरावावर त्यांनी केलेले निषेधाचे भाषण अद्वितीय ठरले. वाजपेयी सरकारमधील मंत्री श्री. अरुण शौरी यांनी "Worshiping False God" हे पुस्तक लिहिले. श्री. अरुण शौरींच्या "Worshiping False God" या पुस्तकात डॉ. बाबासाहेबांबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दादासाहेबांचे दैवत होते. या दैवताशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. या आक्षेपार्ह पुस्तकातील मजकूर त्यांनी सभागृहात सप्रमाण खोडून काढला आणि श्री. शौरींच्या राजीनाम्याची मागणी केली. सभागृहात गोंधळ उडाला. श्री. अरुण शौरी यांच्या या कृतीचा निषेध म्हणून दादासाहेबांनी या पुस्तकाची प्रत भर राज्यसभेत फाडून निषेधाचा परमोच्च कळस गाठला. शासकीय उद्योगांचे खाजगीकरण, खाजगी उद्योगातील आरक्षण, गुजरात दंगलीवरील गंभीर चर्चा अशा विविध चर्चांमध्ये दादासाहेबांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले. संविधान संशोधन समितीला विरोध करून त्यासाठी देशभर दौरा केला आणि २७ जानेवारी २०११ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर त्यांनी केलेले विशाल सभेचे आयोजन लक्षणीय ठरले.

बिहार व केरळचे राज्यपाल :

श्री. दादासाहेबांचा संसदीय प्रश्नांचा असलेला सखोल अभ्यास, लोकसभा व राज्यसभेतील लक्षणीय कामगिरी, महाराष्ट्र विधिमंडळातील तीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आणि सत्तास्थानाशी असलेले मधुर संबंध यामुळे २२ जून २००६ रोजी बिहारचे राज्यपाल म्हणून भारताचे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी श्री. दादासाहेबांची नियुक्ती केली. या कार्यकाळात त्यांनी बिहारच्या विधिमंडळ सभागृहाला संसदीय शिस्तीची चौकट लावण्यासाठी मार्गदर्शन केले. याशिवाय नालंदा विद्यापीठांच्या सुधारणांसाठी प्रयत्न केले. याच कार्यकाळात सिक्कीमचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी पदभार सांभाळला. १० जुलै २००८ रोजी केरळचे राज्यपाल म्हणून श्री. दादासाहेबांची नियुक्ती झाली. केरळच्या कार्यकाळातसुद्धा घटनेच्या चौकटीत राहून राज्याचा घटनात्मक प्रमुख म्हणून त्यांनी यशस्वीपणे आपला कार्यकाळ पूर्ण केला. याच कालखंडात अमरावतीच्या स्नुषा श्रीमती प्रतिभाताई पाटील भारताच्या राष्ट्रपती झाल्या. श्री. दादासाहेबांचा घटनात्मक तरतुदींचा अभ्यास, विधिमंडळ व संसदेतील प्रदीर्घ अनुभव व कठीण प्रसंगातही समस्यांची सोडवणूक करण्याची हातोटी त्या जाणून होत्या. त्यांच्या राज्यपाल पदाच्या कार्यकाळात कोणताही घटनात्मक वाद-विवाद किंवा कटुप्रसंग बिहार व केरळ या दोन्ही राज्यात उद्‌भवला नाही यावरून त्यांच्या निःपक्षपातीपणाची कल्पना येते.

दिलखुलास व्यक्तिमत्त्व :

भारताच्या राजकारणावर व संसदीय सभागृहांवर जवळपास अर्धशतक आपली छाप उमटवणाऱ्या श्री. दादासाहेबांसारखे व्यक्तिमत्त्व विरळेच म्हटले पाहिजे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो त्यांनी राजकीय अस्पृश्यता पाळली नाही आणि कटुताही येऊ दिली नाही. मात्र हे करीत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रेरणास्रोताच्या

छबीला धक्काही त्यांनी सहन केला नाही आणि 'कॉज' वर तडजोडही स्वीकारली नाही. दादासाहेब राजकारण कोळून प्याले होते. आक्रमकता, आक्रस्ताळेपणा आणि विरोधासाठी विरोध हे तंत्र दादासाहेबांनी राजकारणात कधीच वापरले नाही. तो त्यांचा पिंडच नव्हता. सरकारसोबत राहून आणि प्रसंगी सरकारची कानउघाडणी करून त्यांनी दीन-दलितांची आणि सर्वच जातिधर्मातील अडल्यानडल्यांचे प्रश्न सोडविले.

दादासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचे सार त्यांच्या प्रसन्न, दिलखुलास आणि दिलदार व्यक्तिमत्त्वात होते. त्यांचा पिंडच तसा घडला होता. सर्व जातिधर्माचे लोकांचे त्यांच्यावर आणि त्यांचेही सर्वांवर प्रेम होते. कोणत्याही भिंती आपल्या मनात त्यांनी कधी पडू दिल्या नाहीत. त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने आणि मिस्किल स्वभावाने ते कोणालाही आपलेसे करीत. दादासाहेबांच्या पानपुड्याचा प्रसाद घेतला नाही असा राजकारणी, समाजकारणी विरळाच. गप्पांची मैफील रंगवण्यात दादासाहेबांचा हातखंडा, मग 'संपत्याच्या मायचा' किस्सा असो वा सुदामकाका देशमुखांच्या 'मेळघाटातील बुढीचा' किस्सा असो दादासाहेब मैफील जागती ठेवत.

बिहारच्या एक अभ्यासू खासदार एक दिवस थोड्या लंगडत येताना संसद भवनात दादासाहेबांना दिसल्या. त्या स्थूल शरीरयष्टीच्या होत्या. 'क्या हुआ बहनजी?' दादासाहेबांनी विचारले. त्यावर त्यांनी 'वहा पैर फिसलकर गिर गई।' असे म्हणून ती जागा दाखवायला त्यांनी दादासाहेबांना नेले. ती जागा पाहून दादासाहेब म्हणाले, 'हाँ यही आप गिरी होगी। तभी तो इस फरस को क्रॅक गई है ना।' बाईही हसल्या, दु:ख विसरून गेल्या. एक खासदार नेहमी गंभीर चेहऱ्याने राहत. विनोद केला तरी त्यांच्या चेहऱ्यावरील सुरकुती सरकत नसे. दादासाहेब गमतीने म्हणायाचे 'हा मागच्या जन्मात कोमात मेला असावा'.

पारितोषिके :

श्री. दादासाहेबांना त्यांच्या आयुष्यात अनेक पुरस्कार प्राप्त झाले. पण त्यांना सर्वांत महत्त्वाचा वाटणारा पुरस्कार म्हणजे 'कुष्ठमित्र पुरस्कार' होय. तपोवनचे संस्थापक, पद्मश्री दाजीसाहेब पटवर्धन यांच्या विषयी दादासाहेबांना खूप आदर होता. त्यांचा त्याग, देशभक्ती, समाजसेवेने ते प्रभावित होते. १९८० साली महाराष्ट्र शासनाद्वारा त्यांनी कुष्ठरुग्णांच्या व कुष्ठ समस्या जाणून घेण्यासाठी एका समितीचे गठन केले. त्या समितीचे ते स्वत: अध्यक्ष होते. पद्मश्री दाजीसाहेब पटवर्धन व पद्मभूषण बाबा आमटे या तपस्वी व्यक्ती त्या समितीत होत्या. महाराष्ट्रातील प्रत्येक कुष्ठधामाला भेटी देऊन या समितीने अतिशय अभ्यासपूर्ण अहवाल शासनाला दिला. त्यामुळे कुष्ठरुग्णांच्या व कुष्ठ धामांच्या सोयी-सवलती, अनुदानात वाढ झाली. तपोवनला वेळोवेळी ते दाजीसाहेबांचा आशीर्वाद घ्यायला जात असत. या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार त्यांना मोलाचा वाटत असे.

याशिवाय सामाजिक सेवा व अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रियदर्शनी पुरस्कार, नॅशनल प्रेस ऑफ इंडियाचा भारत सारथी सन्मान, जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मत्तेसाठी अबुल कलाम आझाद पुरस्कार, दीक्षाभूमीच्या कार्यासाठी ईश्वरीदेवी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

वक्तृत्व व लेखन :

श्री. दादासाहेबांनी बालपणापासून केलेली वक्तृत्व कलेची उपासना त्यांना आयुष्यभर उपयोगात पडली. दादासाहेबांचे वक्तृत्व प्रभावी होते. त्या वक्तृत्वाला चिंतनाची आणि अभ्यासाची जोड होती. आपल्या भाषणात ते अनेक कोटेशन्स आणि संदर्भ देत. त्यामुळे त्यांचे भाषण प्रभावी होत असे. प्रतिस्पर्ध्यांवर हल्ला करतांना ते भाषणात विनोदाचाही मिश्कीलपणे वापर करून विरोधकांना चिमटे काढीत. अनेक

लोककथा सांगून ते भाषण आकर्षकही करीत असत. सभागृहात त्यांचे भाषण सर्व सदस्य कान देऊन ऐकत. विधिमंडळात त्यांनी केलेली अनेक भाषणे गाजली आहेत.

त्या-त्या वेळेच्या सामाजिक, राजकीय प्रश्नांवर दादासाहेबांनी लेखनही केले आहे. विविध वृत्तपत्रात लेख लिहिले. याशिवाय ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी पुस्तके लिहिली. त्यात फाईव्ह इअर प्लॅन रिलेशन टू दी शेड्यूल्ड कास्ट अँड ट्राईब, शेड्यूल्ड कास्ट अँड शेड्यूल्ड ट्राईब्स अँड देअर सर्व्हिस प्रिव्हीलेजेस, दी कास्ट वॉर ओव्हर रिझर्वेशन केस बिफोर द पिपल्स बार, फॅसिलिटीज टू बुद्धिस्ट कनर्व्हटेड फ्रॉम शेड्यूल्ड कास्ट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर डिझर्व्हड दी थँक्स ऑफ दी नेशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी पिटीशन बिफोर दि पिपल्स ऑफ मराठवाडा, एन्रॉन-दाभोल-रिम्ह ही त्यांनी इंग्रजीत लिहिलेली विविध समस्यांवरील पुस्तके खूप गाजली. या ग्रंथांमधून त्यांनी संपूर्ण देशासमोर मागासवर्गीय समाजाचे प्रश्न वस्तुनिष्ठपणे मांडले आहेत.

दीक्षाभूमीवरील कार्य :

१९५६ साली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत भगवान गौतम बुद्धाचा धम्म त्यांनी स्वीकारला होता. त्यामुळे ज्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:बौद्धधर्म स्वीकारून लाखो अनुयायांना दीक्षा दिली. ती दीक्षाभूमी त्यांच्यासाठी तीर्थस्थळ होती. कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्या निर्वाणानंतर दीक्षाभूमीच्या कामाची जबाबदारी श्री. दादासाहेबांवर आली. ते या समितीचे अखेरपर्यंत अध्यक्ष होते. या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक करण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. अनेकांकडे देणग्या मागितल्या. शासनाकडे यासाठी अनेक वर्षे पाठपुरावा केला. त्यासाठी श्री. सदानंद फुलझेले, वा. को. गाणार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. महाराष्ट्राचे जवळपास सर्वच मुख्यमंत्री त्यांनी दीक्षाभूमीवर आणले. केंद्रीय मंत्र्यांना आणले. केंद्र शासन आणि राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपयाचा निधी या स्मारकासाठी त्यांनी उभारला. दादासाहेबांच्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या अखंड परिश्रमातून नागपूरच्या दीक्षाभूमीवर उभे झालेले भव्य स्मारक म्हणजे आपल्या प्रेरणास्रोताला त्यांनी वाहिलेली खरी आदरांजली ठरते. जागतिक बौद्ध महासभेचे पाच वेळा उपाध्यक्षपदही दादासाहेबांनी भुषविले होते. देशपातळीवर तत्कालीन पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी समितीचे सदस्य होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यावरील ग्रंथांचे प्रकाशन आणि संपूर्ण देशभर त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कार्यक्रम राबविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. भारत सरकारच्या जमीन सुधारणा समितीचे सदस्य म्हणून त्यांनी केलेले कार्यही मोलाचे आहे.

विदेश दौरे :

श्री. दादासाहेब राष्ट्रकुल संसदीय संघटनेच्या महाराष्ट्र शाखेचे १९७०-७८ या काळात कोषाध्यक्ष व १९७८ पासून अध्यक्ष होते. त्यामुळे देश-विदेशातील संसदीय शिष्टमंडळ प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. बहामा संसदेच्या २५० व्या वर्धापनादिनानिमित्त, १९७४ साली श्रीलंकेतील राष्ट्रकुल संसदीय परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. १९८० साली लुसाका, नैरोबी येथील राष्ट्रकुल संसदीय परिषदेतील त्यांचा सहभाग आणि भाषण महत्त्वाचे ठरले. १९८० साली मास्कोच्या राष्ट्रीय परिषदेला महाराष्ट्र विधिमंडळाचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित होते. मास्कोच्या ग्रंथालयाला त्यांनी भेट दिली असता त्यातील एका ग्रंथात श्री. दादासाहेबानी भूमिहिनांसाठी दिलेल्या लढ्यावर दहा पृष्ठे लिहिली असल्याचे आढळले. दादासाहेबांनी बीजिंगला भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. या परिषदेत त्यांचे भाषण खूप गाजले. १९८८ साली

ते अमेरिकेत लॉस एंजील्स येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदेला गेले होते व तिथे त्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडही झाली. त्या अगोदर १९८० साली अमेरिकन अध्यक्षीय प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी गेलेल्या अभ्यासगटाचे ते अध्यक्ष होते. लाओस येथे झालेल्या जागतिक शांतता परिषदेत. 'आंतरराष्ट्रीय तणाव त्यावरील उपाययोजना' हे त्यांचे भाषण प्रभावी ठरले.

विविध भारतीय शिष्टमंडळाचे प्रतिनिधी, राष्ट्रकुल संसदीय समितीचे प्रतिनिधी म्हणून अमेरिका, इंग्लंड, रशिया, श्रीलंका, चीन, थायलंड, इटली, फ्रान्स, जपान, जर्मनी इत्यादी विविध देशांना त्यांनी दिलेल्या भेटी आणि त्यासाठी केलेले प्रतिनिधित्व त्यांच्या प्रगल्भ व अभ्यासू व्यक्तिमत्त्वाचेच द्योतक आहे.

त्यांच्या वॉशिंग्टन येथील भेटीत भारताचे माजी पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी हे होते. त्यावेळी श्री. दादासाहेब महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती होते. त्यामुळे त्यांच्या निवासाची स्वतंत्र ब्लॉकमध्ये व्यवस्था करण्यात आली होती. श्री. अटलजी त्यावेळी फक्त खासदार होते. त्यामुळे त्यांना इतर खासदारांप्रमाणे राहण्याची व्यवस्था होती. ती व्यवस्था पाहून श्री. अटलजी नाराज झाले. त्यांनी श्री. दादासाहेबांना त्याबद्दल नाराजी कळविली. श्री. दादासाहेबांनी गाडी पाठवून श्री. अटलजींना आपल्या बंगल्यावर राहायला बोलाविले. अटलजींना या प्रवासादरम्यान थंडीचा त्रास होत होता. त्यावेळी दादासाहेबांनी आपली शाल त्यांना दिली. श्री. अटलजी देशाचे पंतप्रधान झाल्यावरही त्यांनी या शालीची उब स्मरणात ठेवली. श्री. दादासाहेबांचे आणि श्री. अटलजींचे अखेरपर्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. असेच संबंध श्रीलंका भेटी दरम्यान श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष, श्री. प्रेमदासा आणि पंतप्रधान श्री. जयवर्धने यांच्याशी दादासाहेबांचे आले होते आणि ते शेवटपर्यंत कायम होते. माणसे जोडणारा, ती आपलीशी करणारा हा माणूस होता. बुद्धाची करुणा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अभ्यासूवृत्ती त्यांच्या व्यक्तित्वात सामावली होती.

अखेरचे दिवस :

२०११ साली दादासाहेबांना प्रकृतीचा त्रास सुरू झाला. पाठीचे दुखणे वाढले आणि वयोमानानुसार इतरही आजारांचा त्रास व्हायला लागला. आता यानंतर कोणतेही सार्वजनिक पद स्वीकारायचे नाही असा निर्णय त्यांनी घेतला आणि ते अमरावतीला मुक्कामी आले. डॉक्टरांचे उपचार सुरू झाले. त्रास वाढत गेला. नागपूरच्या डॉक्टरांचे उपचार सुरू झाले. त्यामुळे पुढील मुक्कामासाठी ते ज्येष्ठ पुत्र न्या. भूषण यांच्याकडे गेले. त्या ठिकाणी त्यांच्यावर सर्व तऱ्हेचे आधुनिक उपचार करण्यात आले. या काळातही त्यांचे वाचन, येणाऱ्या मित्रांशी चर्चा आणि प्रसंगी लेखन सुरूच होते. न्या. भूषण यांनी आपल्या पित्याची खूप सेवा केली. परंतु प्रकृती पुढे पुढे ढासळत गेली. त्यांना नागपूरच्या श्रीकृष्ण रुग्णालयात दाखल करण्यात आले. रोज शेकडो कार्यकर्त्यांची भेटीसाठी रीघ लागे. शेवटी शेवटी डॉक्टरांनी भेटणाऱ्यांना मनाई केली. शेवटी नियतीच श्रेष्ठ असते. २५ जुलै २०१५ रोजी दुपारी १-३० वाजता नियतीने आपला डाव साधला आणि दादासाहेबांचे प्राणोत्क्रमण झाले. एक प्रसन्न, दिलखुलास, अभ्यासू, सर्वांना सोबत घेऊन चालणारे आणि सर्वांची सोबत करणारे दिलदार नेतृत्व आणि व्यक्तित्व काळाच्या पडद्याआड गेले. अंत्यदर्शनासाठी त्यांचे पार्थिव दीक्षाभूमीवर नेण्यात आले. त्यानंतर अमरावतीला काँग्रेसनगरमधील निवासस्थानी आणण्यात आले. हजारो अनुयायांनी आणि चाहत्यांनी अंत्यदर्शनासाठी गर्दी केली. २६ जुलै रोजी त्यांच्या जन्मगावी दारापूरला त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारोंचा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता. अनेकांच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना सलामी देण्यात आली.

जन्मत:च बंदुकीची सलामी घेतलेल्या दादासाहेबांना आपल्या कर्तृत्वाने तिरंग्यात तोफेची सलामी प्राप्त व्हावी हा दुर्मीळ योग आहे. काळाच्या उदरात काय दडले असते कोणास ठाऊक. काळाच्या पडद्याआड अनंताचा शोध घ्यायला दादा गेले असतील. या उमद्या व्यक्तिमत्त्वास विनम्र अभिवादन.

-संपादक, 'अजातशत्रू'

❑❑

याद रहेगा गवई का कार्यकाल

पटना : बिहार के राज्यपाल के रूप में आर. एस. गवई का कार्यकाल लंबे समय तक याद रखा जायेगा, करीब दो वर्षों के कार्यकाल में राजभवन और राज्य सरकार के बीच रिश्ते न केवल मधुर हुए, बल्कि विश्वविद्यालयों की स्थिति में भी सुधार हुआ. गवई ने बिहार के राज्यपाल के रूप में २२ जून, २००६ को योगदान दिया था। श्री. गवई ने विश्वविद्यालयों के कुलाधिपति के रूप में उच्च शिक्षा व्यवस्था को पटरी पर लाने के लिए जो ' कवायद ' की, वह सबसे ज्यादा चर्चा में रही, उन्होंने अपने अंदाज में विश्वविद्यालयों को सुधारने का प्रयास किया, यह प्रयास कभी कॉलेजों व विश्वविद्यालयों में छापेमारी, तो कभी कुलपतियों को हड़काने के रूप में दिखा. विश्वविद्यालयों की स्थिति सुधारने के लिए खास तौर पर विशेष कार्य पदाधिकारी कृष्ण कुमार की प्रतिनियुक्ति उन्होंने की थी। यह दीगर है कि श्री. कुमार के कई फैसले विवादों में घिरे रहे। विश्वविद्यालयों में शैक्षणिक कैलेंडर पहली बार राज्य में लागू हुआ। परीक्षा और लेटलतीफों के लिए बदनाम रहे मगध विश्वविद्यालय के कई अफसरों के खिलाफ मुकदमे तक दर्ज कराये गये, उन्होंने वित्तीय अनियमितताओं को भी दूर करने का प्रयास किया था। राजभवन की कडाई का ही यह असर था कि कॉलेजों में शिक्षक नजर आने लगे थे। शिक्षको के लिए यह तय किया गया कि वे वर्षे में उन्हें कितनी कक्षाए लेनी है। विश्वविद्यालयों में छात्र संघ के गठन का उनका प्रयास पूरा नही हो पाय.

श्री. गवई का कार्यकाल राजभवन और सरकार के बीच मधुर रिश्ते के रूप में भी याद किया जायेगा. अब तक केंद्र की विरोधी सरकार द्वारा भेजे गये राज्यपाल और राज्य सरकार के बीच खटपट आम बात रही है. श्री. गवई खुले तौर पर सरकार के काम-काज की प्रशंसा करने से नहीं हिचक्ते थे. दूसरी तरफ, राज्य सरकार ने भी अपनी तरफ से राजभवन को कभी निशाने पर नहीं लिया. महाराष्ट्र में विहारियों के खिलाफ जब महाराष्ट्र शिव सेना ने अभियान चलाया, तो गवई ने सार्वजनिक तौर पर न केवल इसकी आलोचना की, बल्कि महाराष्ट्र सरकार से इस बारे में बातचीत भी की थी जब इस तरह की घटनाओं की प्रतिक्रिया में पटना में कुछ लोगों ने उनका पुतला फूंका, तो उन्होंने इसे स्वाभाविक प्रतिक्रिया माना और विरोधियों की, बोलती बंद हो गयी।

(दै. प्रभात, बिहार)

सभापतींची भूमिका

▪ रा. सू. गवई

'विधानपरिषदेच्या सभापतींनी वादग्रस्त प्रश्नात पडू नये असा संकेत आहे. तो आजवर बहुतांशी पाळला गेला आहे. मात्र वादग्रस्त नसलेल्या प्रश्नात सभापतींनी मध्यस्थी करणे, शासनाला सल्ला देणे आवश्यक आहे.'

आपल्या देशामध्ये लोकशाही पद्धत आपण स्वीकारलेली आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात व अन्य देशात प्रत्यक्ष लोकशाही अंमलात येऊ शकत नाही आणि म्हणूनच आपण "Delegated Democracy" अथवा प्रातिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. प्रातिनिधिक लोकशाहीत जनतेचे प्रतिनिधी म्हणून आपल्या भावना ज्या संस्थेमध्ये साकार करतात अशा संस्थांना आपण सार्वभौम संस्था असे म्हटले आहे. आपल्या देशात संसद आहे. ती देशातील सर्वात सार्वभौम संस्था आहे.

राज्याच्या मर्यादेपुरते विधिमंडळ हे सार्वभौम आहे एका अर्थाने विधिमंडळ हे लोकशाहीचे मंदिर आहे. या मंदिरातील देवता ही ५ कोटी जनता आहे व या देवतेचे पुजारी जनप्रतिनिधी आहेत आणि या पूजेचे साहित्य म्हणजे संसदीय आयुधे होत; आणि या सर्व प्रक्रियेला आपण संसदीय लोकशाही म्हणून संबोधितो. संसदीय लोकशाहीत जनप्रतिनिधींनी आपण जनतेचे जबाबदार दिवाणजी आहोत अशा दृष्टीने पूजाअर्चा करणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. म्हणून जन-प्रतिनिधींनी वापरलेल्या संसदीय आयुधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अशा काही संसदीय आयुधांचा वापर कसा करावा यासंबंधीचा उल्लेख पुढे मी केलेला आहे. सभागृहाचा सभापती हा सभागृहाचा पालक असतो. सभागृहाची प्रतिष्ठा, सदस्यांना न्याय, सत्तारूढ पक्षाला न्याय, विरोधी पक्षाला न्याय या सर्व चाकोरीतून सभापतींना काम करावे लागते. या संबंधीचे तत्त्व असे आहे की, "Government has to rule and opposition has to say" हे तत्त्व सभापती आपल्या कौशल्याने पाळतात. कधी कधी यासंबंधी सभापतींना सभागृहाचा कौलदेखील व्यक्त करावा लागतो अशा वेळी सभापती कार्यकारिणीच्या पलीकडे काम करतात असा गैरसमज कधी कधी निर्माण होतो. परंतु सभापतींच्या अशा वागण्याचे उद्दिष्ट हे जनतेच्या प्रश्नाच्या सोडवणुकीचे असते. यासंबंधीच्या माझ्या काही अनुभवांचा उल्लेखही मी या लेखात केलेला आहे. विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह असावे की नसावे यासंबंधी माझे प्रामाणिक विचार मी येथे मांडलेले आहेत.

विधिमंडळाच्या रचनेचा विचार करताना असे मंडळ एकगृही असावे की द्विगृही असावे याबाबतचा बराच वाद चालत असला तरी जगातील प्रमुख राष्ट्रांनी द्विगृही विधिमंडळाचीच योजना स्वीकारली आहे. विधिनियम तयार करण्याची प्रक्रिया एका गृहाच्या हाती केंद्रीत केली तर विधिनियम हे न्याय दृष्टीने केले जातील याची शाश्वती नसते. एकच गृह असल्यास विधि नियम घाईघाईने किंवा भावनेच्या आहारी जाऊन मंजूर होण्याची शक्यता असते. देशातील अल्पसंख्याकांच्या हिताकडे योग्य प्रकारे लक्ष देण्याची आवश्यकता असते व अशांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने द्वितीय गृहाची उपयुक्तता असते. द्विगृही विधिमंडळ

असल्यास एका सभागृहाने संमत केलेले विधेयक दुसऱ्या सभागृहाकडून तपासले जाते व कित्येक दोष टाळण्यास मदतच होते. कल्याणकारी राज्यव्यवस्था स्वीकारल्यानंतर शासनाच्या कारभाराचा वाढता व्याप लक्षात घेता वरिष्ठ सभागृहाची निकड अधिकच भासते. कारण या सभागृहातील प्रतिनिधित्व लक्षात घेता विधिनियमांची तपासणी तज्ज्ञ व अनुभवी सदस्यांकडून होण्यास मदतच होते.

अधिकारावर मर्यादा

ज्या देशात द्विगृही पद्धती स्वीकारली गेली आहे, अशा ठिकाणी वरिष्ठ सभागृहाला वित्तीय बाबींसंबंधीचा निर्णय घेण्याबाबतच्या अधिकारावर काही मर्यादा घातल्या गेल्या आहेत. धन विधेयक (मनी बिल) वरिष्ठ सभागृहात मांडता येत नाही. संविधानाच्या तरतुदीनुसार धन विधेयक विधानसभेने मंजूर केल्यानंतर ते विधानपरिषदेकडे शिफारशींकरिता पाठविण्यात येते. असे विधेयक विधानपरिषदेत पोहोचल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या शिफारशींसह विधानसभेकडे पाठविण्याचे बंधन घालण्यात आले आहे. १४ दिवसांच्या आत असे विधेयक शिफारस न करता पाठविले तर विधानसभेने ते ज्या स्वरूपात मंजूर केले असेल त्याच स्वरूपात ते दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे असे समजले जाते. असे जरी असले तरी वरिष्ठ सभागृहाला वित्तीय बाबीसंबंधी काहीच अधिकार नाहीत असे म्हणणे योग्य होणार नाही. वित्तीय विधेयकाबाबत (फायनान्शियल बिल) वरिष्ठ सभागृहाला इतर विधेयकांप्रमाणे सुधारणा करण्याचा अथवा त्यातील काही तरतुदी नामंजूर करण्याचा अधिकार आहे. तसेच संविधानाच्या तरतुदीप्रमाणे शासनाला वार्षिक आर्थिक विवरण (अर्थसंकल्प) दोन्ही सभागृहांना सादर करावे लागते. वरिष्ठ सभागृहावरील वित्तीय बाबींची बंधने सोडल्यास दोन्ही सभागृहातील कामकाज करण्याच्या बाबतीत काही विशेष फरक नाही.

विधानमंडळाची कामे विविध स्वरूपाची असतात. ती सर्वसाधारणपणे तीन प्रकारात मोडतात, वैधानिक, आर्थिक व टीकात्मक. विधिनियमांची निर्मिती व आर्थिक व्यवहारास मंजुरी ही जरी प्रमुख कामे मानली गेली तरी विधानमंडळ आपला पुष्कळसा वेळ टीकात्मक कामासाठी खर्च करीत असते. विधानमंडळात राज्यकारभाराचे धोरण ठरल्यानंतर त्या धोरणानुसार राज्यकारभार चालला आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवण्याचे काम विधानमंडळास करावे लागते. याचा अर्थ असा की, राज्य शासन आपल्या केलेल्या कामाबद्दल सभागृहाला जबाबदार असते. राज्य कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक संसदीय आयुधे सदस्यांना उपलब्ध आहेत. त्यांचा वापर कसा करावयाचा हे सदस्यांच्या कुशलतेवर अवलंबून आहे.

प्रश्नोत्तरांचा तास

प्रेक्षक गॅलरीमध्ये बसून सभागृहाचे कामकाज पाहताना ते नीरस व गुंतागुंतीचे वाटण्याचा संभव आहे. सर्वसाधारणपणे एकूण कामकाज रुक्ष असले तरी प्रश्नोत्तराच्या तासाला मात्र जिवंतपणा पहावयास मिळतो. प्रश्नोत्तरांचा तास म्हणजे सदस्यांसाठी, श्रोत्यांसाठी व एकंदर जनतेसाठी मोठी पर्वणीच असते. या तासात काही प्रश्न अतिशय रंगतात, उप प्रश्नाच्या वेळी अनेक चकमकी झडताना दिसतात, हास्याचे फवारे उडतात आणि प्रतिपक्षाला टोले मारण्याची आतषबाजी दृष्टीस पडते. या तासाच्या वेळी सभागृहात बहुसंख्येने सदस्य उपस्थित असतात व प्रेक्षक गॅलऱ्या फुलून गेलेल्या असतात. सदस्यांच्या दृष्टीने प्रश्नोत्तराच्या तासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे हे सांगण्याची गरज नाही. शासनाच्या कारभारावरच्या अनेक बाबींवर प्रकाशझोत प्रश्नरुपाने टाकता येतो. निरनिराळ्या संसदीय आयुधांमध्ये 'प्रश्न' हे सदस्यांच्या हाती अमोघ असे शस्त्र दिले आहे. प्रश्न विचारण्यामागे सदस्याचे अनेक हेतू असतात. काही वेळा शासनाने घोषित केलेल्या धोरणांचा तपशील जाणून घेण्याची इच्छा असते. बहुधा मतदारसंघातील गाऱ्हाणी प्रश्नरूपाने उपस्थित करून शासनाकडून ती सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. शासकीय यंत्रणेतील निष्काळजीपणा, चूक अगर भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला

जातो. प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी वेगवेगळ्या खात्याच्या मंत्र्यांना खात्यांची दिरंगाई, दोष वगैरे बाबतीत समाधानकारक खुलासा करावा लागतो. तसेच जनतेची गाऱ्हाणी शासकीय यंत्रणेमार्फत कशी हाताळली जात आहेत ते जनप्रतिनिधींच्या मार्फत मंत्रिमंडळाला समजू शकते. त्यामुळे मंत्र्यांना अनेक प्रसंगी खात्यातील दोष दूर करता येतात.

जनतेचे प्रश्न सभागृहासमोर आल्यानंतर शासनातर्फे दिली जाणारी उत्तरे तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहेत किंवा नाहीत यापेक्षा लोकांना न्याय मिळवून देण्याकरिता काय केले पाहिजे व प्रश्नाची सोडवणूक सभागृहात कशी होईल असा प्रयत्न मी करीत असे. काही प्रसंगी चाकोरीबाहेर जाऊनही न्याय मिळवून देण्यासाठी आमदार, मंत्रिमहोदय व शासनाच्या अधिकाऱ्यांबरोबर दालनात चर्चा केल्या व त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. सिद्धार्थनगरमध्ये असलेले टोपलीचे संडास बंद करावेत यासाठी सभागृहात हा विषय प्रश्न व इतर मार्गाने उपस्थित केला जात होता. शासनातर्फे ते बंद करण्याबाबत आश्वासन दिले जात होते. परंतु आश्वासनाची पूर्ती करण्यामध्ये दिरंगाई व अडचणी निर्माण होत होत्या. या समस्येची सोडवणूक करण्याकरिता, आमदारांची, मंत्र्यांची व शासकीय अधिकाऱ्यांची बैठक बोलावून चर्चा करून या प्रकरणी दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

तसेच मराठवाड्यातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी-बाबतचा प्रश्न वेळोवेळी उपस्थित केला जात असे. त्यांची मागणी मार्गी लावण्याकरिता वर उल्लेख केलेल्या तंत्राचा अवलंब केला, त्यामुळे शिक्षक सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

तसेच अभ्युदय नगरातील गाळे मालकीहक्काने मिळवून देण्यासाठी निरनिराळ्या स्तरांवर चर्चा करून मार्ग काढण्यात मी यशस्वी होऊ शकलो.

सभागृहात जनतेचे जे प्रश्न मांडले गेले त्यावेळी ती कोणीही प्रतिष्ठेची बाब करणार नाही याची जाणीव ठेवून व लोकांना न्याय मिळवून देण्याकरिता उपप्रश्न विचारण्याची जास्तीत जास्त संधी देऊन वर उल्लेखिलेल्या तंत्राचा उपयोग करून दिलासा देऊ शकलो. हे करीत असताना सभागृहाची शान कशी वाढेल असा मी जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

विनंती-अर्ज

संसदेत विनंती-अर्ज दाखल करण्याची पद्धती इंग्लंडमध्ये फार दिवसांपासून रूढ आहे. कोणत्याही नागरिकाला आपले गाऱ्हाणे विनंती रूपाने मांडण्याचा हक्क आहे असे मानले गेले आहे. समस्या सोडविण्याच्या दृष्टीने विधानमंडळ हे सर्वोच्च मानले गेले असल्यामुळे अशा विधिमंडळाच्या सभागृहापुढे आपले गाऱ्हाणे मांडून न्याय मिळविण्यासठी विनंती-अर्ज सादर करण्याची संसदीय प्रथा मान्य केली गेली आहे. सभागृहात मांडण्यात आलेले विधेयक, सभागृहासमोर अनिर्णित असलेली कामकाजासंबंधी कोणतीही बाब किंवा सर्वसाधारण लोकहिताच्या बाबीसंबंधी विनंती-अर्ज सादर करता येतो. परिषदेच्या नियमातील तरतुदीचा तपशिलाने अभ्यास करता असे दिसून येईल की, ज्या बाबीसंबंधी कोर्टात जाऊन न्याय मिळवून घेता येईल अशा बाबी सोडल्या तर सार्वजनिक लोकहिताच्या बाबीकरिता सभागृहात विनंती-अर्ज सादर करता येतो. प्रत्येक वर्षी पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीस विनंती-अर्ज समितीची संरचना करण्यात येते. सभापतीच्या संमतीने सभागृहास सादर केलेल्या अर्जाची तपासणी व त्यावर उपाय सुचविण्यासाठी हे विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात येतात. या समितीचे प्रमुख उप सभापती असतात.

पूर्वी अर्जाच्याद्वारे सभागृहाला सादर केलेली प्रकरणे नगण्य होती असे विधान केले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. त्यामुळे विनंती-अर्ज समिती दरवर्षी गठित करून तिच्याकडे कोणतेही काम सोपवले जात नव्हते. १९६८ मध्ये मी उप सभापती म्हणून निवडून आल्यानंतर जून, १९६९ मध्ये ठाणे-बेलापूर हद्दीत वसलेल्या गावांमधील रहिवासी व जमीनधारकांच्या गाऱ्हाण्यासंबंधीचा विनंती-अर्ज सादर करण्यात आला. त्या अर्जाचा विचार करून

काही शिफारशी केल्या. त्याच वर्षी जुलै महिन्यात उल्हासनगर नगरपालिकेच्या हद्दीतील कारखान्याच्या जागेचा काही भाग वगळण्याकरिता विनंती-अर्ज सादर करण्यात आला. त्यावर समितीने विचार करून शिफारशी केल्या ह्याचा परिणाम असा झाला की, प्रशासकीय कार्यवाहीमुळे होणाऱ्या अन्यायाची दाद मागण्यासाठी एक नवीन दालन उपलब्ध झाले. सभागृहातील शिक्षक सदस्यांनी याचा पुरेपूर फायदा घेण्याच्या उद्देशाने शिक्षणक्षेत्रातील गाऱ्हाण्याबाबत विनंती-अर्ज दाखल करण्यास सुरुवात केली. विनंती-अर्ज समितीने सादर केलेल्या अहवालाचे परिशीलन करता असे दिसून येईल की, सादर केलेल्या अहवालात शिक्षक व त्यांच्या मागण्यांसंबंधीचे अर्ध्याहून अधिक अहवाल आहेत. शिक्षक सदस्यांनी या आयुधाचा वापर योग्य कारणास्तव केला. विनंती-अर्ज विधानमंडळाला सादर करता येतो व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व सार्वजनिक हिताचे प्रश्न सोडविण्यासाठी याचा वापर करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मी उप सभापती या नात्याने पद्धतशीर प्रयत्न केले.

विनंती-अर्जासंबंधी या बाबतीत जनतेचे प्रश्न सुटू शकले. अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील.

वित्तविषयक बाबी

वर उल्लेख केल्याप्रमाणे द्विगृही पद्धती ज्या देशामध्ये स्वीकारली गेली आहे तेथे वरिष्ठ सभागृहावर वित्तीय बाबीसंबंधी निर्णय घेण्याच्या अधिकारावर काही मर्यादा घातल्या गेल्या आहेत. त्या संविधानात नमूद केल्या आहेत. असे जरी असले तरी संविधानाच्या तरतुदीप्रमाणे अर्थसंकल्प (वार्षिक आर्थिक विवरण) दोन्ही सभागृहांत शासनाला सादर करावा लागतो. नियमातील तरतुदीप्रमाणे हे विवरण सादर केल्यानंतर सभापती सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करून अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या तत्त्वाच्या कोणत्याही प्रश्नाची सर्वसाधारण चर्चा करण्यासाठी दिवस नेमून देतात. परंतु या सभागृहात प्रत्येक मागणीवर चर्चा किंवा मतदान करता येत नाही. अर्थसंकल्पावरील चर्चा संपल्यानंतर खालच्या सभागृहात मागण्यांवर चर्चा व मतदान होत असते. या कालावधीत शासकीय कामकाज किंवा इतर काही कामकाज नसेल तर वरच्या सभागृहाला सुट्टी देण्याचा प्रघात आहे. संविधानाच्या तरतुदीनुसार मागण्यावर चर्चा व मतदान करण्याचा अधिकार खालच्या सभागृहाला असला तरी, काही राज्यांत वरच्या सभागृहात काही मागण्यात अंतर्भूत असलेल्या धोरणावर चर्चा करण्याची प्रथा सुरू करण्यात आली आहे. १९७० सालापासून राज्यसभेत दरवर्षी काही खात्याच्या कामकाजावर चर्चा करण्याची प्रथा सुरू केली आहे. दरवर्षी दोन तीन खात्यासंबंधी चर्चा करण्यात येते. या चर्चेमध्ये खात्याच्या कारभारासंबंधी टीका-टिपणी करण्यात येते व सभागृहासमोर खात्याच्या कारभारातील उणिवा, गलथानपणा या गोष्टी मांडल्या जातात. तसेच जुन्या तामिळनाडू विधानपरिषदेत 'धोरणविषयक निवेदनावर' चर्चा करण्याची प्रथा १९६४ पासून होती व त्याकरिता १९७२ मध्ये नियमात सुधारणा करण्यात आली होती. तेथील प्रथेप्रमाणे प्रत्येक मागणीमागचे धोरण एका निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात येत असे. निवेदन छापून सभागृहात ठेवले जात असे. या धोरणाविषयक निवेदनासंबंधी मंत्री महोदय प्रस्ताव मांडत असत व तद्नंतर त्यावर चर्चा होत असे व मंत्री महोदयाच्या उत्तरादाखल केलेल्या भाषणानंतर 'चर्चा केली' असे समजले जात असे. वरील दोन्ही प्रकारांमध्ये फक्त चर्चा केली जाते व मतदान घेतले जात नाही, हे महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारची चर्चा आपल्या वरिष्ठ सभागृहातही सुरू करावी अशी मागणी वेळोवेळी करण्यात आली. याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. विधानपरिषदेला सुट्टी देण्यापेक्षा दरवर्षी काही खात्यांसंबंधी प्रदीर्घ व सखोल चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून दिल्यास अनेक वर्षे न सुटलेले प्रश्न मार्गी लागतील असे मला वाटते.

अशा प्रकारची चर्चा घडवून आणण्यासंबंधी जी मी सूचना केली आहे त्याचे कारण असे आहे की, वरच्या सभागृहाला खर्चाचे पुरवणीपत्रकही (सप्लिमेंटरी डिमांडस्) सादर केले जाते. अशा पुरवणीपत्रकातील मागण्यावर चर्चा करण्याची संधी विधानपरिषदेतील नियमातील तरतुदीनुसार वरिष्ठ सभागृहाला देण्यात आली आहे. ही चर्चा एक-दोन

दिवस चालते. ज्या बाबींविषयी पुरवणी अनुदान मागितले असेल त्याच बाबींवर फक्त चर्चा होऊ शकते. याचाच अर्थ असा की वरिष्ठ सभागृहाला यावर चर्चा करता येते, मग अर्थसंकल्पात केलेल्या मागण्यांविषयीच्या धोरणावर तरी चर्चा का करता येऊ नये? कारण या दोन्ही बाबतीत एकच तत्त्व आहे, असे माझे मत स्पष्ट आहे. या मागण्यांवर मतदान होत नाही. खर्चाच्या पुरवणी पत्रकातील विभागवार मागण्यांवर चर्चा करण्याचे तत्त्व जर आपण स्वीकारले आहे, तर आर्थिक विवरणपत्रकातील मागण्यांवर चर्चा न करण्याचे बंधन का असावे? तेव्हा वर सुचविल्याप्रमाणे दरवर्षी दोन तीन खात्यासंबंधी चर्चा करण्यास कोणतीच हरकत नसावी. पुरवणी अनुदानावर संपूर्ण व समुचित (अर्थपूर्ण) चर्चा व्हावी यासाठी जे सदस्य चर्चेत भाग घेणार असतील त्यांनी ते या चर्चेत कोणते मुद्दे उपस्थित करणार आहेत त्याविषयी आगाऊ सूचना द्यावी अशी तरतूद नियमात आहे. या तरतुदीचे कटाक्षाने पालन केल्यास शासनही या मुद्द्याबाबत योग्य तो खुलासा करू शकेल व चर्चा अर्थपूर्ण होण्यास मदत होईल.

सभागृहाची व सदस्यांची प्रतिष्ठा

विधानपरिषदेतील एक सन्माननीय सदस्य भाई सावंत यांना डिसेंबर, १९८१ रोजी सायंकाळी ६-३० वा. अटक करून दुसऱ्या दिवशी १२ वाजेपर्यंत मॅजिस्ट्रेटसमोर हजर करीपर्यंत सावंतवाडी येथील पोलीस लॉकअपमध्ये रात्रभर साध्या बाकावर बसवून अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे सदस्यांचा हक्कभंग झाला आहे व ही बाब हक्कभंग समितीकडे सुपूर्द करावी अशी सूचना देण्यात आली होती. नेहमीच्या प्रथेप्रमाणे सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी हक्कभंग झाल्याची तक्रार केल्यानंतर सभागृहात त्याविषयी निर्णय देण्यापूर्वी ज्या सदस्याचा हक्कभंग झाला आहे अशा सदस्यांचे त्याबाबत काय म्हणणे आहे, हे जाणून घेण्यासाठी त्या सदस्यांकडून अगोदर खुलासा मागविण्यात येतो. परंतु या प्रसंगी अपवाद म्हणून श्री. भाई सावंत यांचा खुलासा मी प्रथम मागितला नाही व या प्रकरणाची अगोदर दखल घेतली आणि सभागृहात आल्यानंतर श्री. सावंत यांना खुलासा करण्यास सांगितले. त्यावर इतर सदस्यांनी आपले मत व्यक्त केले. नंतर याप्रकरणी आणखी काही मुद्द्यावर माहिती घेण्याचा प्रयत्न केला. मिळालेल्या माहितीवरून असे दिसून आले की, श्री. सावंत यांना कलम १०७ अन्वये चॅप्टर केसखाली अटक करण्यात आली. त्यांना अटक केल्यानंतर त्यांची झोपण्याची व्यवस्था पोलीस कस्टडीमध्ये करणे आवश्यक होते, तसे न करता त्यांना सर्वकाळ बसवून ठेवण्यात आलेले होते. सर्वसामान्य नागरिकाला जो हक्क मिळू शकतो तो आमदाराला मिळू शकला नाही. याप्रकरणी जी वृत्ती पोलीस अधिकाऱ्यांनी दाखविली व सदस्यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली त्याकरिता शासनाने त्याच्याविरुद्ध कारवाई करण्याचे सुचविले.

सभागृहाचा सदस्य कोणत्याही पक्षाचा असला तरी जेव्हा सदस्यांच्या हक्कासंबंधी प्रश्न उपस्थित केले जात, त्यावेळी ते प्रश्न व्यक्तिगत न मानता, सभागृहाची प्रतिष्ठा राखण्यासाठी तसेच ती वाढविण्याच्या दृष्टीने त्या प्रश्नांकडे मी पाहिले व त्याप्रमाणे त्या प्रश्नाची तड लावली.

सभागृहाचा नेता

या संदर्भात पागे समितीने आपल्या अहवालात सभागृहाच्या नेत्यांचे काम आणि कर्तव्य या संबंधी जे विचार मांडले आहेत ते उद्‌बोधक आहेत.

"प्रश्नोत्तराचा तास व तद्‌नंतर नेहमीचे कामकाज सुरू होईपर्यंतच्या काळात सभागृहाचा नेता सभागृहाला हजर राहणे इष्ट आहे. सभागृहाच्या कामकाजात पीठासीन अधिकाऱ्यांना मदत करणे हे त्यांचे पहिले कर्तव्य आहे. सभागृहात बराच काळ तो उपस्थित राहिला म्हणजे चर्चेत वेळप्रसंगी हस्तक्षेप करून, विरोधी पक्षाला चर्चेसाठी अपुरा वेळ अगर संधी मिळत असेल तर त्या पक्षाचे समाधान होईल असा मार्ग काढण्यासाठी त्याने प्रयत्न केले पाहिजेत. निरनिराळ्या विषयांवर चर्चा करण्याच्या दृष्टीने दिवस व

वेळ ठरविण्याकरिता पीठासीन अधिकाऱ्यांना त्याने सहाय्य तसेच सभागृहात काही प्रसंगी जे तणाव निर्माण होतात, ते निवळण्यासाठी त्याने प्रयत्न करणे अगत्याचे असते. सभागृहात उपस्थित होणाऱ्या कामकाजाविषयक प्रश्नासंबंधी निर्णय घेण्यासाठीही पीठासीन अधिकाऱ्यांना त्याने मदत करावी. सभागृहाचा नेता काही अपरिहार्य कारणामुळे सभागृहात उपस्थित राहू शकत नसेल तर, उप-नेता नेमण्याची व्यवस्था करावी म्हणजे त्याच्या गैरहजेरीत त्यांच्यातर्फे अपेक्षित कर्तव्य तो उप-नेता बजावू शकेल. याचाच अर्थ असा की, सभागृहाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सभागृहात नेता अथवा उप-नेता उपस्थित असणे आवश्यक आहे."

मुंबईमधील विविध कोर्टात खोळंबून पडलेले खटले व जनतेच्या होणाऱ्या गैरसोयींना वाचा फोडण्यासाठी मुख्य मंत्र्यांना दिलेले निवेदन या विषयावर नागपूर अधिवेशनात (१९८१) लक्षवेधीद्वारे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. त्यावर शासनातर्फे निवेदन केल्यानंतर काही प्रश्नोत्तरे झाली. प्रश्नोत्तराच्या वेळी वातावरण प्रक्षुब्ध झाले. त्यावेळी न्यायाधीशांच्या इंपिचमेंटसंबंधी कायदा मंत्री व इतर सदस्यांनी भाष्य केले. त्याबाबत अर्थमंत्र्यांनी संविधानातील तरतुदी वाचून दाखवून न्यायाधीशांच्या इंपिचमेंटचा ठराव या सभागृहात आणता येणार नाही असे दाखवून दिले. कार्यकारी मंडळ (Executive) विधानमंडळ (Legislature) व न्यायमंडळ (Judiciary) आपापल्या क्षेत्रात आपली कर्तव्ये करीत असतात, त्यामध्ये एकमेकांच्या क्षेत्रांत हस्तक्षेप वा आरोपप्रत्यारोप करणे योग्य नव्हे. अशावेळी विधान-मंडळाने आपली प्रतिष्ठा स्वत:हून राखून ठेवणे जरुरीचे असते. विधानमंडळाच्या प्रतिष्ठेला साजेशी भूमिका घेणे आवश्यक असते. म्हणूनच कायदे मंत्री आपले विधान मागे घेण्याच्या तयारीत न दिसल्यामुळे सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाध येईल आणि सभापतींनाही नियमांची आणि सभागृहाची प्रतिष्ठा राखता येणार नाही, असे वृत्तपत्रांतून जनतेला दिसता कामा नये म्हणून कर्तव्य कठोर होऊन मी चर्चेमध्ये न्यायाधीशांच्या इंपिचमेंटचा जो उल्लेख होता व त्यासंबंधी जी दीर्घ चर्चा झाली होती ती संपूर्ण वगळण्याचा निर्णय घेतला व तसा निर्णय सभागृहात घोषित केला.

यावरून हे स्पष्ट होईल की, सभागृहाच्या कामकाजाविषयी सभागृहाच्या नेत्याला चांगली माहिती असणे अत्यावश्यक तर आहेच. परंतु सभागृहात होणाऱ्या चर्चेला योग्य ते वळण लावण्याची क्षमताही त्याच्याजवळ असली पाहिजे व त्यासाठी सभागृहाच्या कार्यपद्धतीचे ज्ञानही त्याला असले पाहिजे.

विधानपरिषदेच्या काही नियमांमुळे राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा कोणत्या दिवशी घ्यावयाची, अल्पकालीन चर्चा कोणत्या दिवशी ठेवावी, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा कोणत्या दिवशी घ्यावी, सार्वजनिक महत्त्वाच्या प्रस्तावावर कोणत्या दिवशी चर्चा घ्यावयाची वगैरे गोष्टीकरिता तसेच शासकीय कामकाजाबाबत सभापतींना सभागृहाच्या नेत्याशी सल्लामसलत करावी लागते. त्याचप्रमाणे सभागृहातही कामकाजाविषयी सभागृहाच्या नेत्याशी चर्चा करण्याचे प्रसंग येतात. मुख्यमंत्री खालच्या सभागृहाचे सदस्य असले तरी साधारणत: मुख्यमंत्री हे वरिष्ठ सभागृहाचे नेते समजले जातात. सभागृहाच्या नेत्यावर सभागृहातील कामकाजाची जबाबदारी असल्यामुळे त्यांची उपस्थिती सभागृहात अपेक्षित असते. प्रत्यक्षात असे दिसून येते की, मुख्यमंत्री वरच्या सभागृहासाठी फारच कमी वेळ देऊ शकतात व ते बराच काळ खालच्या सभागृहात असतात. कोणीही मुख्यमंत्री असले तरी त्यांना विधान-परिषदेला अधिक वेळ देता येत नाही, ही वस्तुस्थिती डोळ्याआड करून चालणार नाही. विधानसभेत कोरमची किंवा मतदानासाठी घंटी वाजली तर ते वरच्या सभागृहात असले तर त्यांना खालच्या सभागृहात जावे लागते व ते क्रमप्राप्तच असते. सभागृहातील कामकाज सुरळीत चालावे म्हणून राज्यसभेत जशी व्यवस्था आहे तशा प्रकारची व्यवस्था या ठिकाणी केली तर ती अधिक उपयुक्त होईल असे वाटते. प्रधानमंत्री लोकसभेचे सदस्य असल्यास,

मंत्रिमंडळातील राज्यसभेचा सदस्य असलेल्या एका मंत्र्याला राज्यसभेच्या सभागृहाचा नेता म्हणून नियुक्त करण्यात येते. श्री. वसंतदादा पाटील हे काही काळ वरिष्ठ सभागृहाचे नेते होते. संसदीय कामकाजाच्यादृष्टीने सभागृहात नेता असणे आवश्यक आहे. तेव्हा मंत्रिमंडळातील परिषद सदस्याला सभागृहाचा नेता नेमण्याची प्रथा पाडण्याची अत्यंत गरज आहे.

कामकाज सल्लागार समिती

दरवर्षी प्रथम अधिवेशनात सभागृहाचे कामकाज ठरविण्यासाठी नियमाच्या तरतुदीनुसार कामकाज सल्लागार समिती गटीत करण्यात येते. या समितीमध्ये एकूण ९ सदस्य असतात, या समितीचे प्रमुख सभापती असतात व त्यांच्या व्यतिरिक्त, उपसभापती, मुख्यमंत्री, विधानकार्य मंत्री, विरोधी पक्षनेते व इतर सदस्य असतात. सदस्यांची नेमणूक करताना सभागृहात ज्या प्रमाणात पक्ष सदस्यांची संख्या असते त्या प्रमाणात त्यांना प्रतिनिधित्व देण्यात येते. मध्यंतरीच्या काळात उप सभापती विरोधी पक्षातील असल्याकारणाने त्यांच्या नावाची सूचना कोणत्याही पक्षाने केली नाही. याचा परिणाम असा झाला की, त्यांना समितीच्या बैठकींना निमंत्रित म्हणून बोलावण्यात येत असे. ही समिती सभागृहाच्या कामकाजाच्या बाबी ठरवीत असल्यामुळे एखाद्या बैठकीच्या वेळी समिती-प्रमुखांच्या अनुपस्थितीत समितीप्रमुख म्हणून कोणी काम करावे, असा प्रश्न उपस्थित होतो. उप सभापती जर या समितीचे सदस्य असतील तर ते समितीप्रमुख म्हणून त्या दिवसाच्या बैठकीचे कामकाज पाहू शकतील. तेव्हा या समितीवर उप सभापतींनाही नामनिर्देशित करण्यात यावे अथवा सभापती व उप सभापतीच्या जागा सोडून इतर जागा पक्षाच्या बलाप्रमाणे विभागण्यात याव्यात

समिती सदस्यांच्या संख्येवरील निर्बंधामुळे, सर्व पक्षांच्या सदस्यांना प्रतिनिधित्व देता येत नाही. त्यामुळे ज्या पक्षाच्या सदस्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले नाही अशा पक्षांना कामकाज घेण्यासंबंधी सूचना वा दृष्टिकोन मांडण्याची संधी मिळत नाही. काही वेळा कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहात सादर केल्यानंतर अशा पक्षाचे सदस्य समितीने ठरविलेल्या कामकाजाबद्दल आक्षेप घेऊ लागतात. अशा पक्षांच्या सदस्यांना कामकाज सल्लागार समितीच्या बैठकींना निमंत्रित म्हणून हजर राहण्याची प्रथा मी सुरू केली होती. त्यामुळे समितीत सभागृहातील सर्व पक्षांना सामावून घेता येते. या प्रथेची पुनश्च सुरुवात करावी असे मला वाटते.

शासन हे शासनच आहे आणि शासन हे शक्तिमान आहे. शासनाच्या प्रतिनिधीनी आणि मंत्र्यांनी सभागृहात असहाय्यतेची भूमिका स्वीकारू नये असे माझे प्रामाणिक मत आहे. असे अनेक प्रसंग सभापती म्हणून असताना माझ्या निदर्शनास आले आणि त्यासंबंधी मी सभागृहाचा कौल माझ्या माध्यमातून सभागृहाला कळविला. एका प्रसंगी शिक्षण मंडळाच्या भ्रष्टाचारासंबंधी, शिक्षण मंडळ ही स्वायत्त संस्था असल्यामुळे शासन हस्तक्षेप करू शकत नाही. अशा प्रकारच्या शिक्षण मंत्र्यांच्या उत्तराला मी आक्षेप घेतला. माझा हा विचार कार्यकारिणीच्या पलीकडचा आहे. असे विधान शिक्षण मंत्र्यांनी केल्यावर कार्यकारिणी ही विधिमंडळाला जबाबदार आहे, अशी जाणीवही मी त्या प्रसंगी शिक्षण मंत्र्यांना करून दिली. राज्यातील महागाईच्या प्रश्नावर अशीच असहाय्यतेची उत्तरे शासनाच्या मंत्र्यांकडून आली त्या संबंधी देखील मी वेळोवेळी हस्तक्षेप करून सरकार शक्तिमान आहे आणि शासनाने असहाय्यतेची भूमिका स्वीकारू नये असे माझे मत मी सभागृहात वेळोवेळी व्यक्त केले.

सभापतींची भूमिका

सभापतींनी वादग्रस्त प्रश्नात पडू नये असा संकेत आहे. अर्थात हा संकेत पाळला गेला पाहिजे आणि बव्हंशाने आजपर्यंत तो पाळला गेला आहे. परंतु जे प्रश्न वादग्रस्त नाहीत उलट जनकल्याणाच्या दृष्टीने भरीव स्वरूपाचे आहेत अशा प्रश्नात सभापतींनी लक्ष घालणे, मध्यस्थी करणे,

शासनास सल्ला देणे, सर्व राजकीय पक्षांनी सल्लामसलत करणे, मला वाटते जनहिताच्या दृष्टीने ही बाब योग्यच आहे. महाराष्ट्र राज्यात सुरू असलेल्या रोजगार हमी योजनेसंबंधी त्या वेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, सभापती वि. स. पागे, उप सभापती म्हणून मी स्वतः असताना रोजगार हमीच्या प्रश्नाबाबत मुख्यमंत्र्यांशी वेळोवेळी चर्चा केल्या, अनेक मंत्र्यांशी चर्चा केल्या, सर्व राजकीय प्रमुखांशी चर्चा केल्या आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे देशात कोठेही नाही असा रोजगार हमी योजनेचा कायदा आपण एकमताने या राज्यात करू शकलो. ही योजना आज महाराष्ट्रातील लक्षावधी शेतमजुरांना वरदान ठरलेली आहे.

कुटुंब नियोजन हा आपल्या देशासमोरील एक राष्ट्रीय प्रश्न आहे. या प्रश्नात सभापती म्हणून मी लक्ष घातले आणि विधिमंडळातील सर्व राजकीय पक्षांना त्यात सहभागी करून घेऊन त्यासंबंधी परिषदा आयोजित केल्या, अशा परिषदांशी व केंद्रीयस्तरावर लोकसभेच्या सहकार्याने अस्तित्वात असणाऱ्या परिषदांशी सहकार्य केले व संबंध प्रस्थापित केले. अशा अनेक प्रश्नासंबंधी मध्यस्थी करून अंतिम न्याय जनतेला देणे हे उद्दिष्ट समोर ठेवून जे प्रश्न वादग्रस्त असू शकत नाहीत असे अनेक प्रश्न हाताळण्याची संधी मी मिळवू शकलो.

❑❑

(साभार–विधानपरिषद सुवर्ण महोत्सव पुस्तिका)

रा. सू. गवई यांची एक आठवण

रा. सू. गवई यांना आम्ही दादासाहेब किंवा गवईसाहेब म्हणून संबोधित असू.

दादासाहेबांचा लोकसंग्रह मोठा होता. त्यामध्ये अटलबिहारी वाजपेयी, चंद्रशेखर यांच्यासह महाराष्ट्रातील आघाडीचे नेते शरद पवार आणि इतरही सर्व नेत्यांबरोबर त्यांचे किती निकटचे व अनौपचारिक संबंध होते हे समजून येत असे. अटलबिहारी वाजपेयी यांच्याबरोबर त्यांना परदेश प्रवासाची संधी मिळाली होती आणि त्यावेळी त्यांची आणि अटलजींची मैत्री कशी जुळली याचे वर्णन करतांना ते वाजपेयीना दिलेल्या शालीचा उल्लेख नेहमी करीत.

दादांच्या आणि आमच्या वयात मोठे अंतर होते. परंतु आम्हा तरुणांबरोबर देखील ते तरुण होत असत आणि आमच्या इतकाच खोडकरपणा करण्यात ते आघाडीवर असत. राज्यसभेतलाच एक प्रसंग. अरुण शौरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर एक पुस्तक लिहून अत्यंत विपरीत असे वर्णन त्यात केलेले होते. दादासाहेब त्यामुळे खूप अस्वस्थ आणि संतप्तही झाले होते. आमच्यासारख्या तरुण पत्रकारांजवळ त्यांनी एकदा ही अस्वस्थता व्यक्त केली आणि शौरींचा निषेध करण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली. त्यावेळी सहजपणे त्यांना सांगितले की तुम्ही राज्यसभेत त्या पुस्तकांची एक प्रत घेऊन जा आणि शून्यकाळात तो विषय उपस्थित करतांना ते पुस्तक सभागृहात फाडा ! दादांनी ती कल्पना विलक्षण आवडली, ते म्हणाले खरोखर हा चांगला मार्ग आहे. दादासाहेबांनी खरोखरच त्यानंतर सभागृहात तो मुद्दा उपस्थित करतांना आणि समोर शौरी हजर असतांना त्यांचे ते पुस्तक फाडून निषेध नोंदविला.

हे करून आल्यानंतर ते आम्हाला भेटले आणि म्हणाले या प्रकाराने माझी अस्वस्थता नाहीशी झाली ! त्यानंतर स्वतः दादासाहेबच हा किस्सा अनेकांना सांगत आणि त्यानंतर आम्ही जेव्हा-जेव्हा भेटत असू तेव्हा ही आठवण हमखास निघत असे.

-अनंत बागाईतकर
पत्रकार, दिल्ली.

एचबी ११८०—४

विधिमंडळाचे विशेष हक्क

सन्माननीय विधिमंडळ सदस्यांना दादासाहेबांनी केलेले संबोधन

ज्यांना विशेष हक्क दिला आहे त्यांनी आणि विशेष हक्क दिला त्याच्याविरुद्ध जे बोलतात त्यांनी बारकाईने विचार केला तर गैरसमजाला कुठेही सुतराम जागा राहणार नाही अशी माझी प्रामाणिक अपेक्षा आहे. मी माननीय सभापती तसेच श्री. दीक्षित साहेबांना विचारले की अजून आपण आपल्या संविधानामध्ये अशी दुरुस्ती केली आहे काय की, मूलभूत हक्कांबरोबरच कर्तव्यही इन्कॉर्पोरेट करावे. अशी मूव्ह बऱ्याच देशातून सुरू आहे. पण आपल्या भारतीय संविधानामध्ये नागरिकांचे कर्तव्य हे संविधानाचा भाग म्हणून घडलेले नाही. बऱ्याच प्रमुख देशांच्या संविधानामध्ये नागरिकांच्या हक्कांबरोबरच नागरिकांच्या कर्तव्यांचाही समावेश केलेला आहे. मी हे का सांगितले तर या ठिकाणी संसदीय विशेष हक्क म्हटलेले आहे, इतर संज्ञांमध्ये राईटस् ॲन्ड ड्यूटीज म्हणतो, म्हणजे हक्क आणि कर्तव्ये म्हणतो, त्या संदर्भात कॉलेजमध्ये नागरिकशास्त्राचा विद्यार्थी असताना मी शिकायचो की हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणजे हक्क कर्तव्यापासून विलग करता येत नाही आणि कर्तव्य हक्कापासून विलग करता येत नाहीत. ते इनसेपरेबल आहेत. ज्यांच्या ज्यांच्यामध्ये विशेष हक्कासंबंधी थोडे गैरसमज निर्माण झाले ते गैरसमज आताच्या दोन-तीन महिन्यांच्या कालखंडामध्ये वर्तमानपत्रातून प्रकाशित होत आहेत. अशा वेळी या विषयावरचा परिसंवाद नागरिकांना, पत्रकारांना तसेच विधिमंडळातील सदस्यांना सर्वांनाच उद्‌बोधक ठरेल असे जे मत सन्माननीय विलासरावजी देशमुख यांनी व्यक्त केले, त्याच्याशी मी सहमत आहे.

प्रथम आपण हक्क आणि कर्तव्ये समजून घेतली पाहिजेत. मोटर चालविण्याचा आणि मोटर चालविता येते हे समजल्यानंतर मोटर चालविण्याचा परवाना घेण्याचा नागरिकांचा हक्क आहे आणि तो बिनदिक्कत आर. टी.ओ. ने दिला पाहिजे. पण मोटार चालविताना जर म्हटले की मी डावीकडून चालविणार नाही, मी उजवीकडून चालविणार, तर मग त्या ठिकाणी तो आपले कर्तव्य विसरला असे म्हणता येईल. जर ड्रायव्हरने म्हटले की, मला मोटार चालविण्याचा परवाना आहे पण मी ती ब्रेकवाचून चालवीन, तर कसे चालेल? हक्क मिळाल्यानंतर तो सर्वसामान्य जनतेचा सामूहिक प्रश्न बनतो.

भारतीय संविधानाच्या एका परिच्छेदाने संसदेला विशेष हक्क दिले आणि भारतीय संविधानाच्या १९४ या परिच्छेदाने विधिमंडळाला हे अधिकार दिले. संविधान मसुदा समितीत या संबंधी फार चर्चा झाली. तेव्हा त्या समितीचे अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे उत्तर दिले ते दोन्ही अर्थाचे आहे. श्री. पालखीवाला यांनी अलीकडे जो मुद्दा उपस्थित केला त्यालाही यामुळे उत्तर मिळू शकेल. त्यांनी सांगितले की, संसदेत, विधिमंडळात जनप्रतिनिधी हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहेत. संसदेमध्ये एखादे विधेयक संमत करावयाचे असल्यास सत्तर कोटी जनतेला बोलावून निर्णय घेणे कसे काय शक्य आहे? एखादा निर्णय घ्यावयाचा आहे आणि चर्चा करावयाची आहे तेव्हा महाराष्ट्रातील सात कोटी जनतेला बोलावून चर्चा करणे शक्य आहे काय? म्हणून याला आम्ही प्रातिनिधिक लोकशाही असे म्हणतो.

जनता आणि आमदार या दोघांमध्ये कृत्रिम भेदभाव निर्माण करून, जणू काही सर्वसामान्य जनतेपेक्षा आमदार हा वेगळा असे भासविण्याचा प्रयत्न होतो तो चूक आहे. प्रातिनिधिक लोकशाही असल्याने विधानसभेमध्ये असणारे २८९ सदस्य आणि विधानपरिषदेत असणारे ७८ सदस्य असे एकूण ३६७ सदस्य ७ कोटी लोकांचे दिवाणजी आहेत. पालखीवाला यांचे म्हणणे असे की, असा अधिकार आमदारांना आणि खासदारांनाच का? जनतेला का नाही? परंतु संसदीय पद्धतीचा आत्माच प्रातिनिधिक लोकशाही हा आहे. प्रातिनिधिक लोकशाही आल्यानंतर ७ कोटी लोक महाराष्ट्राच्या विधिमंडळात बसू शकत नाहीत. तर ७ कोटी लोकांचे प्रतिनिधित्व करणारे, त्यांचे दिवाणजी म्हणून २८९ आणि ७८ असे जनप्रतिनिधी तेथे बसतात. जनतेच्या वतीने बोलण्याचा अधिकार या लोकप्रतिनिधींना आहे असे म्हटले तर त्यात सर्वसामान्य नागरिकांचा उपमर्द होत नाही. नागरिकत्वात, नागरिकात-नागरिकात आम्ही फरक मानला नाही. आमदारांना विशेष हक्क देऊन आमदारांचा जणू काही स्वतंत्र दर्जा केला, असा भास निर्माण केला जातो, त्याला उत्तर 'नाही' असे आहे. जनतेने पाठविलेले जनप्रतिनिधी तेथे असतात. त्यांचे ते व्यक्तिगत अधिकार नाहीत. आमदारांचे व्यक्तिगत अधिकार फार कमी आहेत. ज्यांना कलेक्टिव्ह, सामूहिक अधिकार म्हणतात ते पूर्ण सभागृहाचे अधिकार आहेत.

सात कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य एकदा विधिमंडळामध्ये बसले की, विधिमंडळ सार्वभौम आहे, असे म्हणावे लागेल. सर्वभौम विधिमंडळाच्या हक्कासंबंधी आक्षेप घेणे म्हणजे लोकशाहीवर आक्षेप घेणे आहे. या विधिमंडळावर आक्षेप घेणे म्हणजे जनतेवर आक्षेप घेणे आहे. तुम्हीच निवडून पाठविले आणि असे सभागृह कॉन्स्टिट्यूट झाले तर न्यायालयाच्या मर्जीने, इतरांच्या मर्जीने या सार्वभौम विधिमंडळाची प्रतिमा जनमानसात कमी होता कामा नये, त्याला बिलो डिग्निटी करता कामा नये, कंडेम करता कामा नये. आणि म्हणून सार्वभौम जनतेच्या हिताकरिता प्रातिनिधिक स्वरूपात असणारे पार्लमेंट सार्वभौम राहावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितले.

मी सभापती असताना माझा राजकीय संबंध इंदिरा काँग्रेसशी होता. शरद पवार मुख्यमंत्री होते. शरद पवार यांच्याविरुद्ध मी नागपूरला जाहीर सभेत भाषण केले. श्री. मा. गो. वैद्य हे माझ्याच सभागृहाचे एक सदस्य होते. त्यांनी त्या भाषणासंबंधी माझ्यावर एक अग्रलेख तरुण भारत वर्तमानपत्रात लिहिला. "रा. सू. गवई सभागृहातील आणि सभागृहाबाहेरील" असा तो अग्रलेख होता. जवळजवळ पूर्ण अग्रलेख माझी स्तुती करण्यामध्ये गेला होता आणि सांगण्यात आले होते की, सभागृहात अतिशय न्याय भूमिकेतून वागतात. परंतु सभागृहाबाहेर गेल्यानंतर सभापतींच्या मर्यादा ओलांडतात. त्या संबंधीचा हक्कभंगाचा प्रस्ताव माझ्याकडे आला, मी असे रूलींग दिले की, सभापती शक्तिशाली पाहिजे. तो मुका, आंधळा आणि बहिरा नको. दुसरी गोष्ट म्हणजे तो ताकदवान असला पाहिजे. म्हणून मी माझे समर्थन केले आणि सांगितले की, साऱ्या अग्रलेखात माझी स्तुती आहे. दोन-तीन ओळी फेअर कॉमेंटस्च्या आहेत. म्हणून मी हक्कभंग नाकारला आहे. संसदीय आयुधे सभागृहात एखाद्या सदस्याने वापरल्यानंतर कोणत्याही प्रकारची, कोणतीही टीका सदस्यांवर झाली तर तो हक्कभंग होऊ शकतो. याचा अर्थ सभागृहातील सदस्याला भीतीशिवाय आणि दडपणाशिवाय काम करता आले पाहिजे. कोणालाही फेवर करण्याकरिता नाही किंवा कोणाची भीती बाळगण्याकरिता नाही.

मी सदस्य असताना माझासुद्धा हक्कभंग प्रस्ताव होता. तो मी तसाच ठेवला आहे. मी प्रत्येक अधिवेशनामध्ये सभापतींना सांगतो की, तो पुढच्या अधिवेशनामध्ये पाहू. काय घडले? ठाणे जिल्ह्यातील एक अन्यायाचे प्रकरण सभागृहामध्ये आणले. अन्याय झाल्याचे उघडकीला आले.

एचबी ११८०—४अ

परंतु मी ज्या पोलीस उपायुक्ताविरुद्ध बोललो त्याने संबंधित माणसाला दम दिला, "तू गवई साहेबांकडे गेलास काय? मी असे छप्पन गवई साहेब पाहिलेत." त्यावर मी हक्कभंग प्रस्ताव आणला होता. आता तो दररोज माझ्या पाया पडावयाला येतो आणि सांगतो की, साहेब तो प्रस्ताव काढून घ्या. हा हक्कभंग प्रस्ताव दोन-तीन वर्षांपासून तसाच चालू आहे. मी तो काढून घेणारच आहे. परंतु त्याच्याही डोक्यावर टांगती तलवार असावयालाच पाहिजे. म्हणजे तेवढा वेळ तो त्रास देणार नाही. हक्कभंगाच्या प्रस्तावाचा उद्देश असा असतो की, त्यामुळे आपल्याला न्याय देता आला पाहिजे. कोणी अन्याय केला तर त्याला देखील न्याय शिकविला पाहिजे.

अंतर्गत हक्कभंगाचे चांगले उदाहरण द्यायचे असेल तर श्री. जांबुवंतराव धोटे यांचे देता येईल. आता श्री. जांबुवंतराव धोटे यांना हक्क दिला म्हणजे दगड फेकून मारण्याकरिता दिला नाही. विधिमंडळाच्या सभागृहातील टेबलवर जे पेपरवेट असतात ते सभापतींना त्यांनी मारले. यात सामूहिक हक्क महत्त्वाचे आहेत. या वागणुकीने जांबुवंतराव बदनाम होतील पण आमदार असे वागतात अशी आमचीही बदनामी होईल. तेव्हा या संबंधीच्या हक्कांना आम्ही सामूहिक हक्क म्हणतो. आणि मग शेवटी एका प्रस्तावान्वये जांबुवंतराव धोटे यांचे सदस्यत्व रद्द करावे लागले.

मी सभापती असताना बॅ. बाबासाहेब भोसले हे कायदा मंत्री होते आणि बॅ. अंतुले हे मुख्यमंत्री होते. आता जे घडले ते मी सांगतो. श्री. मनोहर जोशी यांनी प्रश्न विचारला की, उच्च न्यायालयात खटले पडून आहेत. ते कसे पडून राहतात? तेव्हा बॅ. बाबासाहेब भोसले यांनी असे सांगितले, उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना वेळ मिळत नाही. ते दारू पितात, अँटी चेंबरमध्ये बसतात, अमुक करतात, तमुक करतात. आणि मग सर्व सदस्य म्हणायला लागले, 'मला बोलायचे आहे, मला बोलायचे आहे. सगळे सदस्य बोलले, पाऊण तास चर्चा चालली. मी विचार केला कायदा मंत्रिपद धोक्यात आहे. कारण आम्ही न्यायमूर्तींच्या वर्तनावर चर्चा करू शकत नाही. जर माझ्या मनात बेईमानी आली असती तर? पण वर्तमानपत्रे विचारतील की, सभापतींनी अशी परवानगी कशी दिली? शेवटी मी पाऊण तासाचे कामकाज वगळले. बॅरिस्टर भोसले यांनी मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांच्याकडे जाऊन तक्रार केली की, सभापतींनी सारी चर्चा वगळली. बॅ. अंतुले यांनी सांगितले, तुम्ही कायदा मंत्री असलात तरी सभापतींची माफी मागा. अशा प्रकारे मी त्यांना वाचवले.

❑❑

सहनशील नेता

सहनशीलता उनका स्वभावधर्म है, शारीरिक और मानसिक भी। उनको कितनी भी शारीरिक पीडा हो उनके चेहरे पर क्लेष का नामोनिशान भी नहीं दिखेगा। उनका हमेशा के तरह प्रसन्न चेहरा देखकर कोई यह अंदाज भी नहीं लगा सकेगा की उन्हे कोई शारीरिक कष्ट है। यही बात मानसिक दृष्टी से। चाहे कितनी भी विपरीत परिस्थिती हो, किसी व्यक्ती ने अनचाहा काम किया हो या कोई कारणवश उन्हे टेंशन आया हो, वे कभी भी अपने मनकी शांती और चेहरे का हास्य नहीं खोते। उनके मन को विचलित करने वाली कोई भी गलती यदी किसी ने किया तो वे कभी भी उसे सबके सामने गुस्से से गलत शब्दों का प्रयोग कर के अपमानित नहीं करते। बल्की अकेले में उसे प्यार से समझाकर उसने किए हुए गलती की उसे अहसास दिलाते है। मेरे खयाल से सहनशीलता एक कुशल नेता के लिए अतिआवश्यक गुण है, जो श्री. गवईसाहब ने हासील किया है।

शिवराम मोघा,
गुलबर्गा



अज्ञातशत्रू...

□ मान्यवरांचे लेख

आपल्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक कारकिर्दीत दादासाहेबांनी विविध क्षेत्रातील माणसे जोडली. या सर्व व्यक्तींना दादासाहेब कसे दिसले, कसे जाणवले, राजकीय दृष्टीने आणि राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांनी ते कसे शब्दबद्ध केले हे मान्यवरांच्या विविध लेखातून आपल्याला जाणवेल. दादासाहेब असतांनाच्या काही आठवणी देखील यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे काही तत्कालीन संदर्भ लेखनात दिसतील. दादासाहेबांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे हे दर्शन.

चळवळींचे दिवस...

प्रगल्भ नेतृत्व

▪ श्रीमती प्रतिभा देविसिंह पाटील

दादासाहेब गवईचे आणि आमचे कौटुंबिक संबंध. त्यांचा विषय निघाला की असंख्य आठवणी डोळ्यांसमोर तरळतात. एखाद्या व्यक्तिमत्त्वातच असे काही विलक्षण पैलू असतात की त्याची दखल आपल्याला घ्यावीच लागते. दादासाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे असे विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. सर्वांना आपलेसे करणारे.

१९६२ साली मला काँग्रेस पक्षाने आमदारकीचे तिकीट दिले. त्या वेळी काँग्रेस पक्ष आणि रिपब्लिकन पक्षाची युती होती. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष तर दिवंगत स्व. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्ष होता. राज्यात आमचा प्रचार सुरू झाला. माझे वडील, स्व. ॲड. नानासाहेब पाटील हे निष्णात वकील होते आणि प्रागतिक विचाराचे होते. मुलगी म्हणून ते माझ्या पाठीशी भरभक्कमपणे असायचे. या प्रचारकार्यात दादासाहेब गायकवाडांसोबत ध्येयवादी तरुण दादासाहेब गवई असायचे. १९६२ साली त्यांचा आणि माझा पहिल्यांदा परिचय झाला त्याला आता चौपन्न वर्षे झाली आहेत. त्यानंतर हा परिचय वाढत गेला आणि कौटुंबिक परिचय सान्निध्य आले.

दादासाहेब गायकवाडांनंतर रिपाईचे नेतृत्व गवईसाहेबांकडे आले. १९६४ साली ते विधानपरिषद सदस्य झाले. माझे वडील विधिमंडळ अधिवेशनाचे वेळी माझे कामकाज बघायला मुंबईत यायचे. त्या वेळी त्यांचाही गवईसाहेबांशी जवळचा संबंध आला. त्यानंतर तो इतका वृद्धिंगत झाला की, नानासाहेब श्रीमती कमलाताईंना आपली मुलगी मानायचे आणि दादासाहेबांना जावई. जळगावी आलेत की श्रीमती कमलाताईंना दरवेळी साडीचोळी करायचे. तो जिव्हाळा आजही कायम आहे. डॉ. देविसिंहजी शेखावत गवईसाहेबांचे मित्र व माझ्या वडिलांनी या स्थळाची चौकशी गवईसाहेबांकडे केली होती.

मी उपमंत्री, मंत्री होते त्या वेळी दादासाहेब विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती झाले. सभागृहात अनेक अटीतटीच्या प्रसंगी मी नवीन असल्यामुळे त्यांची सहानुभूती असे. परंतु मीही चांगली तयारी करीत असे. दादासाहेब प्रारंभापासूनच मला आदराने 'ताईसाहेब' म्हणायचे. माझे वडील नेहमी " ताईसाहेबांचे कसे सुरू आहे?" अशी गवईसाहेबांकडे विचारपूस करायचे. दादासाहेब हे विचाराने परिपक्व आणि मनाने व्यापक होते. त्यात संकुचितपणा नव्हता. मी अमरावती जिल्ह्याची संपर्कमंत्री होते. अमरावतीच्या इर्विन चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा आम्ही बसविला. तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक या पुतळ्याच्या अनावरणासाठी येणार होते. ऐनवेळी स्व. नाईकसाहेबांचा दौरा रद्द झाला. आता काय करायचं, हा आमच्यासमोर प्रश्न होता. दादासाहेब म्हणाले "ताईसाहेब आता तुमच्याच शुभहस्ते बाबासाहेबांच्या पुतळ्याचे अनावरण करू." मी होकार दिला. आदल्या दिवशी संध्याकाळी दादासाहेबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यावरील पाच-सहा जाडजूड पुस्तके माझ्याकडे अभ्यासासाठी पाठविली, मी त्यातले संदर्भ वाचले. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे कार्यक्रम झाला. मी बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वावर अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यात उदाहरण देताना मी म्हणाले "भगवान श्रीकृष्णाच्या वधासाठी एकच कंसमामा होता. बाबासाहेबांच्या अवती-भवती परिस्थितीचे इतके कंस होते. ते त्यांच्याशी कसे लढले असतील नि कसे जगले असतील? आमचा भगवद्गीतेवर विश्वास आहे, प्रत्येक मनुष्यात ईश्वराचा अंश आहे असे गीता सांगते, ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. आपण परस्पर सौहार्द समाजात ठेवणं आवश्यक आहे. आपल्याला चुकीची शिकवण मिळाली. आपण धर्माचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे." माझ्या भाषणानंतर गवई साहेबांचे भाषण झाले.

ते म्हणाले "आज या समारंभाला मा. मुख्यमंत्री येणार होते. पण ते आले नाही याची उणीव भासली नाही. ताई साहेबांचे भाषण त्याच दर्जाचे, अतिशय उत्तम झाले आहे." केवढा हा मनाचा मोठेपणा.

गवई साहेबांच्या नेतृत्वात सर्वसमावेशकता होती. समन्वयवादी दृष्टिकोन हा त्यांचा विशेष गुण होता. प्रत्येक पक्षातील लोकांना ते आपलेच वाटायचे. त्यांच्या रिपब्लिकन पक्षातील आपसातील भांडणे, वाद तर ते कौशल्याने मिटवायचेच; पण आमच्या काँग्रेस पक्षातील स्थानिक वादसुद्धा त्यांच्याकडे जायचे. डॉ. शेखावत साहेबांना काँग्रेसने पहिल्यांदा तिकीट दिले, त्या वेळी पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने काहीतरी खोचक प्रश्न विचारला. डॉ. शेखावत साहेब त्यावर कदाचित रागावणार असे वाटल्यामुळे मिश्कीलपणे गवई साहेबांनी त्या प्रश्नाचे उत्तर देऊन टाकले. दादासाहेबांच्या खासदारकीच्या निवडणुकीत मी स्वतः, कमलताई गवई, सौ. पुष्पाताई बोंडे आणि पक्षाच्या इतरही भगिनींनी प्रचारकार्यात सक्रिय भाग घेतला. गवई साहेब निवडून आले.

दादासाहेबांनी संसदीय लोकशाहीला बळ देण्याचे काम अखेरपर्यंत केले. लोकशाही प्रणालीवर त्यांची प्रगाढ श्रद्धा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना ही त्यांची श्रद्धास्थानं होती. या तत्त्वांशी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. विधानपरिषदेचे सदस्य, उप सभापती, विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी केलेली भाषणे आणि सभापती म्हणून सभागृहाच्या कामकाजाचे संचालन, दिलेले निर्णय मुळातून वाचण्यासारखे आहेत. सभागृहाच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव, शासकीय नियम कार्यपद्धतीचा प्रचंड अभ्यास आणि समन्यायी बुद्धी यामुळे त्यांची कारकीर्द यशस्वी ठरली. पुढे लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य आणि बिहार, केरळचे राज्यपाल म्हणून कार्य करताना त्यांना या प्रदीर्घ अनुभवाचा खूप फायदा झाला.

राजकारणाला कशी कलाटणी मिळेल हे सांगता येत नाही. मधल्या काळात निवडणुकीच्या वेळी इंदिराजींनी 'गरिबी हटाव'चा कार्यक्रम घोषित केला. दादासाहेब गवई त्यांच्यासोबत राहिले. पत्रकारांनी प्रश्न विचारला, 'तुमच्या पक्षाला निवडणुकीत किती सीट्स मिळणार?' गवई साहेबांनी उत्तर दिले. Seat or no seat, there is no question. We are with Congress. देशाची स्थिरता महत्त्वाची आहे. इंदिराजी गरिबांचे प्रश्न सोडवीत आहे. आमचे काम करीत आहेत. आम्ही त्यांच्यासोबत आहोत. अशी त्यांची commitment असायची. त्यांचा दृष्टिकोन नेहमी राष्ट्रीय दृष्टिकोन असायचा. तात्कालिक नसायचा.

मी राजस्थानची व नंतर दादासाहेब बिहारचे राज्यपाल झाले. दादासाहेब गंमतीने म्हणायचे "ताई साहेब आपल्या काँग्रेस नगरला दोन-दोन गव्हर्नर लाभले आहेत." देशाच्या राष्ट्रपतिपदी माझी निवड झाली. गवई साहेब तेव्हा केरळचे राज्यपाल होते. मी त्यांच्या आग्रहावरून केरळचा दौरा केला, त्या वेळी होणाऱ्या सभांमधून, त्यांच्या राज्यातील कार्यपद्धतीवरून त्यांचे कार्य वाखाणण्यासारखेच असायचे. राज्यपाल म्हणून त्यांची कारकीर्द उत्तम राहिली.

दादासाहेबांनी दीक्षाभूमीचे केलेले कार्य अतिशय मोठे आहे. संपूर्ण जगात ते आदराचे आणि प्रेक्षणीय स्थान झाले आहे. आक्रस्ताळेपण, अकारण आक्रमकपणाचा त्यांनी कधीच अवलंब केला नाही. सकारात्मक राजकारण केले. त्यांच्या अनुयायांनी किंवा इतर लोकांनी त्यांच्यासारखे प्रगल्भ नेतृत्व घडविण्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत.

गवई साहेबांच्या नेतृत्वाला आणि व्यक्तिमत्त्वाला खरी साथ लाभली ती श्रीमती कमलताईची. त्यांचा मनमिळाऊ व आतिथ्यशील स्वभाव माणसे जोडणारा आहे. दादासाहेबांच्या कार्यकर्त्यांना, घराला, मुलांना, संसाराला आणि दादासाहेबांनाही त्यांनी यशस्वीपणे सांभाळले. आजही त्या तेच कार्य करीत आहेत. त्यांचे ज्येष्ठ पुत्र न्यायमूर्ती

श्री. भूषण गवई हे तर खरंच न्यायदानाचे तसेच समाजासाठी भूषणावह काम करीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे व धाकटे पुत्र राजेंद्र हे राजकारणात क्रियाशील आहेत. कन्या कीर्ती ही देखील कर्तृत्ववान आहे. माझ्या या निमित्ताने सर्व परिवाराला शुभेच्छा!

खरे म्हणजे कमलताईंचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. पण त्यांनी आपले व्यक्तिमत्त्व दादासाहेबांमध्ये विलीन करून टाकले. कोणाच्याही सुख-दुःखात धावून जाण्याची त्यांची वृत्ती व निगर्वी स्वभाव मोलाचा आहे. आपापल्या कौटुंबिक सुख-दुःखाच्या प्रसंगी एकमेकांची खूप मदत झाली. गवई दाम्पत्याने जपलेला जिव्हाळा खूप मोलाचा वाटतो. दादासाहेब आज नाहीत. त्यांच्या अभ्यासू, प्रगल्भ व उमद्या व्यक्तिमत्त्वाची उणीव आज जाणवते. ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. त्यांच्या स्मृतीस अभिवादन!

-माजी राष्ट्रपती, भारत सरकार.

❑❑

लोकप्रतिनिधींसाठी सहकारी गृहनिर्माण संस्था

आजी-माजी आमदार व खासदार ह्यांच्यासाठी मुंबईत निवासस्थान असावे, अशी गृहनिर्माण संस्था असावी असे अनेक प्रयत्न झाले. मुख्य अडचण जागेची होती. या संस्थेसाठी वरळी येथील जागा प्राप्त करण्याचे श्रेय तत्कालीन मुख्यमंत्री श्री. ए. आर. अंतुलेसाहेब यांना आहे. श्री. दादासाहेब व त्यांचे संबंध अत्यंत स्नेहाचे होते. त्यातूनच ही जागा प्राप्त झाली व संस्थेची निर्मितीची संकल्पना पुढे आली. श्री. अंतुलेसाहेब व श्री. दादासाहेब ह्यांच्या पुढाकारानेच १९८० च्या दरम्यान आजी-माजी आमदार, खासदारांकरिता स्नेहवर्धिनी गृहनिर्माण संस्था निर्माण करण्यात आली व त्याची धुरा श्री. दादासाहेबांना सोपविण्यात आली. प्रत्यक्षात या वरळी येथील भूखंडाचे वाटप श्री. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असतानाच झाले. पुरेसे भूखंड उपलब्ध न झाल्याने १९८३ साली आजी-माजी आमदार, खासदार ह्यांची वरळी सागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित (भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था) ही संस्था दिनांक ११ जुलै, १९८३ रोजी नोंदणी क्रमांक बीओएम/एचएसजी/जीएस/६५४५/१९८३ द्वारे नोंदणीकृत करून निर्माण करण्यात आली.

वरळी सागरच्या परिपूर्ण झालेल्या सहा इमारतींना काय नाव द्यावे त्यासाठी बरेच प्रस्ताव आले. थोडासा वादविवादही झाला. शेवटी निर्णय श्री. दादासाहेबांवर सोपविण्यात आला. त्यांनी पूर्णा, वैनगंगा, गोदावरी, कृष्णा, भीमा ह्या महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांची नावे सुचवली. सर्वांनाच ती एकमताने मान्य झाली. तीच नावं देण्यात आली आणि हा वाद मिटला.

-रवींद्र शासने
व्यवस्थापक, वरळी सागर सहकारी गृहनिर्माण संस्था.

स्मृतिग्रंथ

सर्वांना आपलेसे करणारे अन् आपलेसे वाटणारे दादासाहेब !

▪ देवेंद्र फडणवीस

एखाद्या व्यक्तीचे निधन झाले की, बोलताना आपण बोलून जातो की, त्याच्या निधनाने कधीही भरून न येणारी एक पोकळी निर्माण झाली आहे. सर्वांच्याच बाबतीत ते प्रतिपादन सत्य असते असे नाही. पण समाजातील अतिशय मोजकी अशी माणसे असतात, ज्यांना हे शब्दश: लागू होते. त्याच महनीयांपैकी एक म्हणजे दादासाहेब गवई ! आता दादासाहेबांच्या महापरिनिर्वाणाला एक वर्षापेक्षा अधिक काळ लोटून गेला आहे. तेव्हा तर ही पोकळी जास्त जाणवत आहे. आज महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात एक वेगळी घुसमट जाणवत आहे. समाज मनाची दखल घेत शासन आपले प्रयत्न करीत आहेच. पण समाजातील काही धुरीणही त्यांच्या परीने कार्यरत आहेत. प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. अशावेळेला सहज वाटून जाते आज दादासाहेब गवई असते तर ...

दादासाहेब असे राजकारणी होते, ज्यांनी नेहमीच राजकारणापेक्षा कायम समाजकारण आणि देशहिताला प्राधान्य दिले. त्यांचे हृदय समाजातील दलित, वंचित यांच्यासाठी कळवळून येत असे. त्यामुळेच समाजाला वेगळे वळण लागू शकतील अशी प्रकरणे त्यांनी अतिशय संयमाने प्रसंगी दोन पावले मागे घेत परिणामकारकरीत्या हाताळलीत. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर हा त्यातील एक प्रश्न होता. त्या विद्यापीठाला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा प्रस्ताव होता. नंतर समाजातील संघर्ष-पर्व संपल्यावर त्यांनी तडजोडीचे सूत्र स्वीकारून त्या विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे करण्याला मान्यता दिली. समाजातील तणाव साधला. समाजाला व राजकारणालाही दादासाहेबांसारख्या नेत्याची गरज असते हे खरे.

वास्तविक दादासाहेबांच्या वार्षिक स्मृतिदिनी मी अमरावतीला जाऊन श्रद्धांजली अर्पण करणार होतो. पण तो योग नव्हता. मुंबईहून विमानाने निघालो. पण वाईट हवामानामुळे अमरावती व नागपूरला न उतरता आम्हाला परत यावे लागले. त्यावेळी ज्या भावना व्यक्त करता आल्या नाहीत, त्या आदराच्या भावना आज या लेखानिमित्त पुन्हा मनात दाटून येत आहेत.

दादासाहेबांचे राजकारण जेव्हा जवळ-जवळ तीन दशके महाराष्ट्रात रुळून देशपातळीवर गेले, त्यावेळी मी महाराष्ट्राच्या राजकारणात आलो. त्यामुळे प्रत्यक्ष त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली नाही. पण माझे वडील गंगाधरराव यांनी त्यांच्या समवेत विधानपरिषदेत काम केले आहे. त्यामुळेच आम्हा दोघांच्या कुटुंबातही एक आगळावेगळा स्नेह होता. तो त्यांच्या मृत्यूपावेतो कायम होता व आता पुढील पिढ्यांतही ते स्नेहबंध कायम आहेत. त्यांच्या राजकारणाचे व कर्तृत्त्वाचे अनेक किस्से आम्ही सर्व जण ऐकून होतो. दादासाहेबांच्या परिवाराशी आमचा जसा स्नेहबंध होता, तसा महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांशी त्यांचा स्नेहबंध होता. राजकीयदृष्ट्या आमच्या दोघांचेही परिवार तसे भिन्न गटात होते. पण दादासाहेबांचे वैशिष्ट्य होते की, जनसंघ, भाजपा, कम्युनिस्ट, शिवसेना, काँग्रेसमधील विविध गट आणि रिपब्लिकन पक्षातही त्यांचे खूप खोलवर जवळचे अन् जिव्हाळ्याचे संबंध होते. त्याच राजकीय मनांचा तणाव कधी आला नाही. राजकारणात मतभेद असू शकतात. पण मनभेद मात्र नसावा यावर त्यांची श्रद्धा होती.

दादासाहेब १९६४ साली महाराष्ट्र विधानपरिषदेत आले आणि अवघ्या चार वर्षांत त्यांच्यावर उप सभापतीपदाची

जबाबदारी आली. उप सभापतीपद सांभाळतानाही ते आमदार म्हणून सक्रिय होते. प्रश्न विचारीत, लक्षवेधी असत अन् विविध विषयांवर भाषणेही देत असत. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती, श्री. वि. स. पागे व गवई यांचे गुरू-शिष्याचे नाते होते. पागे म्हटले की, दादासाहेब गवई आठवतातच. त्या दोघांच्या चिंतनातून महाराष्ट्राला रोजगार हमी योजना मिळाली. आता वेगळ्या स्वरूपात ती राष्ट्रीय पातळीवरही स्वीकारली गेली आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेत उप सभापती, सभापतीपद सांभाळल्यावर ते मधल्या काही कालखंडात विरोधी पक्षनेतेही होते. पुढे लोकसभा सदस्य आणि राज्यसभा सदस्यही झाले होते. सिक्किम, बिहार आणि केरळ या राज्यांचे राज्यपालपद त्यांनी भूषविले होते. संसदीय कार्याच्या क्षेत्रात रोहयो म्हणून जसे दादासाहेबांचे नाव घेतले जाते तसेच राजकारणात नवबौद्धांनाही सर्व सवलती शेड्युल कास्ट प्रमाणे मिळाव्यात यासाठी त्यांनी दिलेली लढाई आगळीवेगळी आहे.

नागपूरला दीक्षाभूमी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी असणारा स्तूप निर्माण करणे, दीक्षाभूमी वेगळ्या शैलीने विकसित करणे हेही त्यांचे मोठे योगदान होते. दादासाहेबांनी पुढाकार घेतल्यामुळेच ते काम पूर्णत्वाला गेले. ते काम पैशासाठी कधीही त्यांनी बंद पडू दिले नाही. त्यासाठी खूप पैसा समाजातून उभा केला. जनतेच्या पैशातून उभे झालेले दीक्षाभूमीवरील स्मारक खरोखर नागपूर, महाराष्ट्र व देशाचेही भूषण ठरले आहे.

दादासाहेब गवई यांचे वैशिष्ट्य होते की, ते विधानपरिषद सदस्य झाले. त्यानंतर उप सभापती झाले आणि त्यांनी विनंती अर्ज समितीला नवीन अर्थ प्राप्त करून दिला. गवई यांच्या आधीही विनंती अर्ज समिती होती. उप सभापती त्याचे अध्यक्षही राहत. पण या समितीला फारसे कामच नसे. मात्र दादासाहेबांनी या समितीला व जनतेलाही या समितीचे महत्त्व समजावून दिले. त्यानंतर भरपूर अर्ज या समितीला येत असत. विशेषत: शिक्षकांनी आपल्या प्रश्नाची फार मोठ्या प्रमाणावर सोडवणूक करून घेतली. या समितीला त्यांच्या उप सभापतिपद काळात चांगले महत्त्व प्राप्त झाले.

सभापतीपदानंतर ते काही काळ फक्त विधान परिषद सदस्य होते आणि नंतर विरोधी पक्षनेते झाले. त्यांनी त्या पदावर असताना त्याही भूमिकेला न्याय दिला. मात्र त्यात आक्रस्ताळेपणा कधीच येऊ दिला नाही. एकदा जी व्यक्ती सभापती होते ती कायम सभापती राहणे या विचारसरणीवर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे तर ते कधी हौदात उतरले नाहीत आणि ना कधी चित्रविचित्र पोशाख रंगवून परिषदेत आपल्याकडे लक्ष वेधले. तरी त्यांची आक्रमकता तत्कालीन सरकारवर वचक ठेवणारी होती. त्यांच्या या संयमाला फक्त एकच अपवाद आहे तो राज्यसभेतील. त्यावेळी एका ख्यातनाम पत्रकाराने डॉ. आंबेडकरांवर एक पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकाला स्वत: दादासाहेब गवई यांचाही विरोध होता. त्यांनी राज्यसभेत त्या पत्रकार राजकारण्याला दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितले. तो राजकारणी पत्रकार आपल्या प्रतिपादनावर ठाम होता. त्यावेळी गवई यांचा संताप टिपेला पोचला. त्यांनी आपल्या बॅगेतून ते पुस्तक काढले व ते फाडून त्याचे तुकडे तुकडे केले व ते सभागृहात भिरकावून दिले. आपल्या आराध्य दैवताची कुणी अप्रतिष्ठा केली तर संतापलेले गवई कसे असतात, याचा अनुभव राज्यसभेने त्या दिवशी घेतला. पण इतिहासाला एरवी ज्ञात आहेत ते शांत, संयमी व हसतमुख दादासाहेब गवई ! अशा लोकोत्तर, लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाला श्रद्धांजली, आदरांजली.

-मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

❑❑

दूरदृष्टीचे दिलदार दादासाहेब

▪ नितीन गडकरी

सगळ्या राजकीय प्रवाहांशी सौहार्दाचे संबंध ठेवून सामाजिक प्रगतीला पोषक वातावरण करीत राहणे, ही दादासाहेब गवई यांची खासियत होती. आयुष्यभर त्यांनी अनेक सामाजिक कामे केलीच, पण नागपुरातील दीक्षाभूमीवरील स्मारक हे दादासाहेबांची आठवण कायम जागवत राहील...

रा. सू. गवई म्हणजे माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांसाठी असणारे दादासाहेब. भारतातल्या विविध राजकीय प्रवाहांशी अत्यंत सौहार्दपूर्ण संबंध असणारे गवईसाहेब अनेक अर्थांनी सामाजिक प्रगतीला पोषक ठरणारे वातावरण निर्माण करायचे. लोकशाही व्यवस्थेत संवादाला जे सार्वभौम महत्त्व द्यावे लागते, त्यानुसार वर्तन असलेले जे मोजके उमदे नेते मी पाहिले त्यातले एक महत्त्वाचे नाव म्हणजे दादासाहेब गवई.

पूर्वीचा काळ फारसा संपन्नतेचा नव्हता. आम्ही सगळेच सामान्य परिस्थिती असलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेलो. दादासाहेबांचा काळ तर त्या तुलनेत कितीतरी आधीचा. स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा जाती-पोटजातीचे उप पदर तसेच स्पृश्यास्पृश्यता हे दुर्दैवाने समाजजीवनाचा भाग होते. त्या वेळी दादासाहेबांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदचिन्हाचा मागोवा घेत अनेक दलित तरुण वाटचाल करत राहिले. त्यातलेच ते एक. हे तरुण शिकत राहिले. संघटित झाले. जे सोसले त्याची कुठेही कटुता न बाळगता ज्या नेत्यांनी समाजाच्या उभारणीत योगदान दिले, त्यातले दादासाहेब हे एक ठळक लक्षात राहणारे नाव. दादासाहेबांच्या निमित्त त्यांचे स्मरण करताना खरेतर ते आपल्यात नाहीत हे सत्य कटू असले तरी स्वीकारावे लागते आहे. त्यांच्या जिंदादिल स्वभावाच्या आठवणी इतक्या ताज्या आहेत की ते आपल्यात नाहीत, याचाही विसर होतो. वाईट प्रथा आणि त्याज्य रूढींचा पगडा असलेल्या काळात दलित समाजातून जे तरुण वर आले त्यांनी नंतरच्या काळात भारताच्या उभारणीत फार मोठे कार्य केले. दलित आणि दलितेतर समाजाला एकत्वाच्या धाग्याने भारतीयतेने बांधणाऱ्यातले नाव म्हणून मी कायमच दादासाहेबांचे स्मरण करेन. दादासाहेब गवई आणि माझे क्षेत्र एक. विदर्भात कौटुंबिक संबंध ठेवून परस्परांशी घनिष्ठ, दाट मैत्री ठेवण्याचा प्रघात. त्यामुळेच वयाच्या, पक्षाच्या मर्यादा ओलांडून आमचे मैत्र जुळत गेले. ते इतके घट्ट होते की मृत्यूपूर्वी केवळ काही दिवस अगोदर त्यांनी भारताची परिस्थिती, त्यांचे जीवन, त्यांनी साध्य केलेली कामगिरी पण अजूनही त्यांना हाकारणारी ध्येये याबद्दल तब्बल एक तास मनमोकळ्या गप्पा मारल्या होत्या. आता केवळ आठवणी शिल्लक राहिल्या आहेत...

सभागृहात कोणतीही कटुता निर्माण होऊ न देता कार्यपत्रिका पूर्ण करण्याची हातोटी त्यांच्याकडेच होती. काहीसा तणाव निर्माण झाला की नर्मविनोदाचा शिडकावा करणारे एखादे विधान ते करत आणि परिस्थिती शांत होई. प्रारंभी उप सभापती आणि नंतरच्या काळात सभापती या भूमिकेतून त्यांनी चालवलेले महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचे कामकाज अत्यंत सभ्य, संयत असे. स्वपक्षाचा एकही आमदार नसताना गवईंची निवड सभापती पदी एकमताने होणे हे त्यांच्या बहुपक्षीय मैत्रीची ओळख देणारे होते. या काळात त्यांच्यावरील आत्यंतिक विश्वासाने सर्वपक्षीयांनी त्यांना मदत केली आणि कामकाज उत्तम चालले. विरोधी पक्षनेते या नात्यानेही त्यांनी सत्ताधारी पक्षावर योग्य तेथे अंकुश ठेवला, तर आवश्यक तेथे सहकार्यही केले. हे करताना सभागृहात कामकाज योग्य प्रकारे चालेल याची काळजी घेतली. राज्यसभेत नेमणूक झाल्यावरही त्यांनी

प्रगतीचे, समाजाच्या एकत्वाचे प्रश्न पुढाकार घेऊन मांडले. ते सोडवण्यासाठी मैत्रीचा हात पुढे केला. विदर्भाच्या प्रगतीत कुठलाही अवरोध निर्माण होऊ नये, यासाठी त्यांनी राज्यसभेत केलेले भाषण एकेकाळी फार गाजले होते. प्रगतीतला अडसर म्हणजे अनुशेष. तो दूर झाल्याशिवाय गत्यंतर नाही, याबद्दल त्यांचे मत स्पष्ट होते. विकासाची पावले विदर्भाकडे वळावीत यासाठी त्यांनी सातत्याने भरीव योगदान दिले.

राजकीय कारकीर्दीच्या अखेरीस दादासाहेब गवई यांच्याकडे बिहारच्या राज्यपालपदाचा कार्यभार सोपवला गेला. उज्ज्वल इतिहास असलेल्या या राज्याचा तत्कालीन वर्तमान अत्यंत खेदकारक होता. प्रगतीच्या वाटा खुंटल्या होत्या. अवरुद्ध झालेली विकासाची गंगा मोकळी करण्यासाठी राज्यपाल या नात्याने त्यांनी केलेले प्रयत्न अजोड होते. या घटनात्मक पदाचा कुठेही दुरुपयोग न करता बिहारमध्ये आमूलाग्र बदल व्हावेत, यासाठी ते झटले. तेही कुठेही प्रकाशात न येता... अर्थात, संसदीय तसेच इतर राजकीय कामगिरीबरोबर महाराष्ट्रात तसेच भारतात त्यांनी जोडलेल्या मित्रांनी लक्षात घ्यावी अशी त्यांची कामगिरी आहे, ती नागपुरात उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची. दादासाहेबांनी आयुष्यभर आपला वारसा बुद्धाचा आहे तसेच, बाबासाहेब आंबेडकरांचा आहे, हे ध्यानात ठेवले. दलित आणि दलितेतरांत मैत्र जुळवून आणताना दीक्षेचा समारंभ हा ऐतिहासिक आहे, असे ते सांगत असत. नागपुरात दीक्षेचा समारंभ झाला त्या ठिकाणावर साजेसे स्मारक उभे रहायला हवे, हे स्वप्न दादासाहेबांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने पाहिले. ते साकार केले. या स्मारकाच्या उभारणीत त्यांना वेळोवेळी आलेले अडथळे, निधीसाठी करावी लागणारी वणवण. नोकरशाहीने दाखवलेली अनास्था. या साऱ्यामुळे कुठेही खचून न जाता भव्य वास्तू उभारण्याचे बीज त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनातही रुजवले. आज ही वास्तू ऐतिहासिक वारसा जपताना भविष्यातील अनेक पिढ्यांना महामानवाच्या कर्तृत्वाचा वारसा सांगत राहणार, हे निश्चित आहे. दीक्षाभूमीची उभारणी करताना स्मारकाची भव्यता, त्यातले सौंदर्य आणि धम्मपरिवर्तनाचे क्षण त्यातून प्रतीत व्हावेत, यासाठी वास्तुरचनेपासून तर प्रत्यक्ष वास्तू उभारण्यापर्यंत त्यांनी दिलेले लक्ष हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. अमरावतीतील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ तसेच आज दीक्षाभूमीच्या सावलीत उभे असलेले आंबेडकर महाविद्यालय या दोन संस्था म्हणजे दादासाहेबांचा ध्यास होता. माझ्या लोकसभा मतदारसंघातले आंबेडकर महाविद्यालय आज ज्या शैक्षणिक गुणवत्तेचे प्रतीक झाले आहे, ते बाबासाहेबांना निश्चित सुखावणारे आहे. मैत्रिपूर्ण विश्वासाची, दिलदारपणाची, परस्पर साहचर्याची आणि राष्ट्र उभारणीत सर्व जातीपंथधर्मांनी एकत्र काम करण्याची रा. सू. गवई यांनी सतत दिलेली जाणीव कायम जागी ठेवणे, हीच आपण त्यांना अर्पण करावयाची खरीखुरी श्रद्धांजली असेल!

-भूपृष्ठ वाहतूक मंत्री, भारत सरकार
माजी राष्ट्रीय अध्यक्ष,
भारतीय जनता पार्टी.

शब्दांकन : मृणालिनी नानिवडेकर.

❑❑

स्मृतिग्रंथ

रिपब्लिकन ऐक्याची तळमळ असलेला नेता

▪ रामदास आठवले

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संकल्पित केलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे समर्पितपणे नेतृत्व केलेले आणि आंबेडकरी चळवळीसाठी आपले आयुष्य वाहिलेले ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेते दिवंगत रा. सू. तथा दादासाहेब गवई यांच्या स्मृती रिपब्लिकन चळवळीला प्रेरणादायी आहेत. समग्र रिपब्लिकन चळवळीसाठी त्यांचे नेतृत्व, व्यक्तित्व, कर्तृत्व आदरणीय ठरले आहे. राजकीय पटलावरील रिपब्लिकन चळवळीचा मार्गदर्शक तेजस्वी तारा दिवंगत रा. सू. गवई ठरले आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा, परिवर्तनाचा रथ पुढे घेऊन जाण्यासाठी दिवंगत रा. सू. गवई आयुष्यभर झटले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संकल्पना असलेल्या रिपब्लिकन पक्ष आणि निळ्या झेंड्याशी एकनिष्ठ राहून त्यांनी युतीचे यशस्वी राजकारण केले.

दिवंगत रा. सू. गवई यांचे व्यक्तिमत्त्व राजस लोभस होते. शिस्तप्रिय, अभ्यासू आणि प्रदीर्घ अनुभव संपन्न असे प्रभावी व्यक्तित्त्व होते. इंग्रजी, हिंदी, मराठी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचे वक्तृत्व विद्वत्तापूर्ण होते. राजकीय वाटचालीत त्यांना दीर्घकाळ सत्तेत राहून समाजाची सेवा करता आली. दिवंगत रा. सू. गवई अनेक वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती होते. नंतर सभापती झालेत अमरावती मतदार संघातून ते लोकसभेवर निवडून गेले. तसेच बिहार, केरळ आणि सिक्किमचे ते राज्यपाल होते. अनेक वर्षे ते सत्तेच्या मोठ्या पदांवर राहिले मात्र सत्तेची धुंदी कधीही त्यांनी स्वत:वर येऊ दिली नाही. ते प्रेमळ होते मात्र तेवढेच ते शिस्त अनुशासन पाळणारे होते. शासन प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना होता. राजबिंड्या व्यक्तित्वाचे सुस्वभावी नेते म्हणून ते लोकप्रिय होते.

ज्येष्ठ नेते दिवंगत रा. सू. गवई तथा दादासाहेब गवईंशी माझे संबंध खूप जवळचे, आपुलकीचे व स्नेहाचे होते. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते म्हणून मी त्यांचा मनापासून आदर करीत असायचो. अनेकदा आम्ही राजकीय घडामोडीमध्ये भेटलो आहोत. माझ्यासाठी ते वरिष्ठ ज्येष्ठ नेते होते. त्यांना भेटताना मला कधी परकेपणा आणि अंतर वाटले नाही. त्यांनी मला खूप प्रेमाने आपुलकीने जवळचे मानले. रिपब्लिकन चळवळीचा, निळ्या झेंड्याचा संघर्षशील, तरुण कार्यकर्ता म्हणून ते माझ्यावर प्रेम करीत होते. पँथर नंतरच्या रिपब्लिकन ऐक्याच्या काळात त्यांच्याशी माझ्या नेहमी भेटी झाल्या. रिपब्लिकन चळवळीचा चांगला लढाऊ कार्यकर्ता म्हणून ते मला आदराने आपुलकीने भेटत असत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील व्यापक रिपब्लिकन पक्ष साकारला जावा त्यासाठी विविध रिपब्लिकन गटांचे ऐक्य होणे गरजेचे आहे. ते ओळखून १९९० च्या रिपब्लिकन ऐक्यात मी माझे सोन्यासारखे संघटन भारतीय दलित पँथर ही आक्रमक लढाऊ संघटना रिपब्लिकन ऐक्यासाठी बरखास्त केली. रिपब्लिकन ऐक्य साकारले. मात्र नंतरच्या काळात ऐक्य फुटले. मी मात्र पुन्हा रिपब्लिकन ऐक्य व्हावे यासाठी प्रयत्नशील राहिलो. आजही रिपब्लिकन ऐक्यासाठी मी प्रयत्नशील आहे. हे येथे सांगण्याचे कारण म्हणजे दिवंगत रा. सू. गवई हे स्वत: रिपब्लिकन ऐक्यासाठी आग्रही होते. आम्ही जेव्हा जेव्हा भेटलो तेव्हा ते रिपब्लिकन ऐक्याबाबत बोलत होते. महामानव डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांच्या संकल्पनेतील व्यापक रिपब्लिकन पक्ष साकारला जावा त्यासाठी रिपब्लिकन ऐक्य व्हावे ही दिवंगत रा. सू. गवईंची तळमळ होती. रिपब्लिकन ऐक्याबाबत आमचे मतैक्य होते. १९९८ मध्ये रिपब्लिकन पक्षाचे ४ खासदार लोकसभेत निवडून गेले. तेव्हा लोकसभेत आम्ही एकत्र काम केले. रिपब्लिकन ऐक्य व्हावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील व्यापक रिपब्लिकन पक्ष साकारला जावा ही दिवंगत रा. सू. गवईंची तीव्र इच्छा होती. सर्व गटांचा मिळून एकच रिपब्लिकन पक्ष साकारला जावा हे त्यांचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. आपण सर्वांनी मिळून त्यासाठी प्रयत्न करूया.

-राज्यमंत्री,
सामाजिक न्याय खाते,
भारत सरकार.

❑❑

समाजकारणी !

श्री. दादासाहेबांचे राजकीय जीवन म्हणजे राजकारण कमी व समाजकारणच जास्त ! यावेळी काळाची गरज लक्षात घेऊन त्यांनी आमच्या म्हणजे काँग्रेस पक्षाशी केलेली युती म्हणजे त्यांच्या राजकीय परिपक्वतेचे प्रत्यक्ष उदाहरणच म्हणावे लागेल. त्याचेच फळ म्हणजे गेल्या पन्नास वर्षात जे घडले नाही ते यावेळी त्यांचे चार खासदार निवडून येऊन घडले आणि आमच्याही पक्षाला भरघोस यश मिळाले ! सर्वांना समान वागणूक देऊन न्यायाने दिलेल्या निर्णयामुळेच ते आपल्या सभापतीच्या प्रतिष्ठेच्या कारकीर्दीत निष्कलंक ठरले आहेत.

श्री. दादासाहेबांनी समाजसेवेची प्रेरणा आ. डॉ. बाबासाहेबांच्याकडून घेतलेली आहे यात दुमत नाही. पण प्रेरणेला फलद्रूप करण्यासाठी लागणारी शक्ती बनल्या आहेत सौ. वहिनी. श्री. दादासाहेबांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील यशस्वितेत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. एक मजेदार प्रसंग देतो, श्री. दादासाहेबांचे लोकसभेत पहिले भाषण होते. ते अभ्यासपूर्वक, मुद्देसूद भाषण देतात यात वाद नाही. पण या पहिल्या भाषणाच्या वेळी ते मधून मधून समोर गॅलरीकडे बघत होते. ते असे का करताहेत हे मला कळेना तेव्हा मुद्दामच मी तिकडे बघितले आणि माझा अंदाज खरा ठरला. तिथे सौ. वहिनी बसलेल्या होत्या. सौ. वहिनी खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी आणि अर्धांगिनी सिद्ध झालेल्या आहेत, हे नमूद केल्याशिवाय राहवत नाही.

-नरेश पुगलिया.
माजी खासदार

ध्येयनिष्ठ... तत्त्वनिष्ठ...

▪ धनंजय मुंडे

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक जडणघडणीत, महाराष्ट्र विधानमंडळाच्या गौरवशाली परंपरेत ज्या महनीय व्यक्तींनी महत्त्वपूर्ण योगदान दिलं, कार्याचा स्वतंत्र अमिट ठसा उमटवला अशा व्यक्तींमध्ये दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते, बिहार, केरळचे माजी राज्यपाल, विधानमंडळाचे माजी सन्माननीय सदस्य दिवंगत श्री. रा. सू. गवई ऊर्फ दादासाहेब गवई साहेबांचं नाव अग्रक्रमानं घ्यावं लागेल.

दिवंगत दादासाहेबांचे संपूर्ण जीवन भारतीय राज्यघटना व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना वाहिलेलं होतं. दलित बांधवांना संघटित करून न्याय्य हक्क मिळवून देत असताना या प्रक्रियेत सर्व समाजघटकांना सामावून घेण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. जात, धर्म, प्रांत व पक्षभेदांच्या पलीकडे जाऊन त्यांनी काम केलं. महाराष्ट्राच्या भूमीत प्रगतशील पुरोगामी विचारांची रुजवण करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. अशा या महान व्यक्तिमत्त्वाचा, महाराष्ट्राच्या थोर सुपुत्राच्या कार्याचा आढावा घेणारा गौरवग्रंथ महाराष्ट्र विधानमंडळाच्या 'वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रा' तर्फे प्रकाशित होत आहे, ही आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.

या गौरवग्रंथाच्या माध्यमातून सन्माननीय दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक ज्ञात-अज्ञात पैलू लोकांसमोर येतील. त्यांचे कार्य व विचार अधिकाअधिक लोकांपर्यंत पोहोचतील व देशातील लोकशाही बळकट होण्यास मदत होईल. आदरणीय दादासाहेबांचा सहवास मला फारसा लाभला नाही, परंतु विधिमंडळातील त्यांची भाषणे, त्यांचे लेखन, विधिमंडळातील सहकाऱ्यांचे, पत्रकार मित्रांचे दादासाहेबांबद्दलचे अनुभव मी ऐकले आहेत. त्यातून दादासाहेबांना समजून घेण्याचा मी प्रयत्न केला. मला दादासाहेब जे काही अल्प-स्वल्प समजले त्यावरून ते अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे नेते होते, याची खात्री पटली.

दादासाहेब रिपब्लिकन पक्षाच्या गवई गटाचे संस्थापक होते. विधानमंडळ व संसद सदस्य म्हणून प्रदीर्घ काळ काम करताना अनेकदा संघर्षाचे प्रसंग आले. परंतु हा संघर्ष केवळ विचारधारेपुरता मर्यादित राहिला. व्यक्तिगत संबंधांवर त्यांनी कधी त्याचा परिणाम होऊ दिला नाही. राजकीय, सामाजिक जीवनात मतभेद असले तरी मनभेद होणार नाहीत, याची काळजी त्यांनी सातत्याने घेतली. महाराष्ट्राचं राजकारण व्यक्तिगत कटुता, हिंसाचारापासून मुक्त असण्याचं बरंचसं श्रेय दादासाहेबांना जातं. ते अजातशत्रू होते. त्यांचा स्वभाव दिलखुलास व मनमिळावू होता. सर्वच राजकीय पक्षांत त्यांचे मित्र होते, परंतु ही मैत्री वैचारिक निष्ठेच्या आड येणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली.

दादासाहेबांचे नेतृत्व हे तावून-सुलाखून काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेलं नेतृत्व होतं. विद्यार्थी चळवळीच्या माध्यमातून त्यांनी समाजकारण, राजकारणात प्रवेश केला. महाराष्ट्र विधानपरिषदेचा आज मी विरोधी पक्षनेता आहे, कधीकाळी दादासाहेबांनी या पदाची जबाबदारी सांभाळली आहे, याची जाणीव नेहमी माझ्या मनात असते. त्यामुळे आपल्या हातून चुकूनही गैर घडू नये याबाबत दक्ष राहण्याचा माझा प्रयत्न असतो.

दादासाहेबांनी सलग ३० वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून काम केले. विधानपरिषदेचे सभापती, उप सभापती, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र संसदीय राष्ट्रकुल मंडळाचे

संयुक्त उपाध्यक्ष, लोकसभा, राज्यसभेचे सदस्य अशा विविध घटनात्मक पदांवर त्यांनी संस्मरणीय काम केलं. विधानपरिषदेचे सभापती, उप सभापती म्हणून काम करताना सभागृहाचे वातावरण खेळीमेळीचं ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. यामुळे अनेक मुद्यांवर अभ्यासपूर्ण चर्चा घडवून आणणं त्यांना शक्य झालं. त्यातूनच राज्याच्या विकासप्रक्रियेला गती व दिशा मिळण्यास मदत झाली.

दादासाहेबांना अनेक थोर व्यक्तिमत्त्वांचा सहवास लाभला, कर्मवीर दादासाहेब गायकवाड साहेबांच्या सहवासात त्यांची आंबेडकरी विचारांची बैठक पक्की झाली. राज्यात रोजगार हमी योजना सुरू व्हावी म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय वसंतराव नाईकसाहेब, विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती सन्माननीय वि. स. पागे यांच्या सोबत त्यांनी पायाभूत काम केले. अनुसूचित जाती-जमातींच्या सवलती नवबौद्धांना मिळवून देण्यासाठी त्यांनी यशस्वी लढा दिला होता. दिल्लीच्या बोटक्लबवर त्यांनी केलेलं चौदा दिवसांचं उपोषण व तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी तिथं दिलेली भेट, सामाजिक न्यायाच्या चळवळीतील एक महत्त्वाचा अध्याय म्हणून कायम स्मरणात राहील.

राजकीय-सामाजिक क्षेत्रात काम करत असताना शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातही दादासाहेबांचा वावर कायम होता. अमरावतीतल्या १९८९ च्या बासष्टाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं स्वागताध्यक्षपद स्वीकारून त्यांनी ते संमेलन यशस्वी करून दाखवलं. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या मुद्यावर त्यांची आग्रही तरीही संयमी भूमिका महत्त्वाची ठरली होती. नागपूरच्या दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचं काम पूर्णत्वाला नेण्यात स्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी बजावलेली कामगिरी कुणालाही विसरता येणार नाही.

दादासाहेबांचं नेतृत्व हे दलित चळवळीच्या कक्षा ओलांडून बाहेर पडलेलं सर्वमान्य नेतृत्व होतं. मुंबईसह राज्यात उसळलेल्या दंगलीनंतर राज्यात सामंजस्य व सद्‌भाव निर्माण करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्य शांतता समितीत तत्कालीन राज्यपाल महोदयांनी त्यांना आग्रहपूर्वक निमंत्रित केलं होतं. यावरून जनमानसातील त्यांची प्रतिमा व लोकप्रियतेची खात्री पटते. १९९८ मध्ये खुल्या मतदारसंघातून लोकसभेवर निवडून जाण्याची किमया त्यांनी केली होती. विधिमंडळ व संसद सदस्यांनी परंपरा व शिष्टाचाराचे पालन केलेच पाहिजे यावर दादासाहेबांचा कटाक्ष असे. त्यासाठी ते कमालीचे आग्रही राहत, परंतु ज्या वेळी केंद्रातील भाजप नेतृत्वाखालील सरकारने राज्यघटना बदलण्याचा डाव रचला, त्या वेळी लोकशाहीच्या रक्षणासाठी तत्त्वांना मुरड घालून त्यांनी लोकसभा अध्यक्षांच्या आसनासमोरच्या जागेत जाऊन आपला निषेध व्यक्त केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह लेखन करणाऱ्या लेखकाबद्दलचा संताप त्यांनी राज्यसभेत तितक्याच तीव्र शब्दांत मांडला होता. डॉ. बाबासाहेबांविरोधातील लेखनाचा "मी माझ्या सर्व सामर्थ्यानिशी विरोध करतो" हे त्यांचे राज्यसभेतील शब्द होते. त्यांच्या संदर्भातील या अनुभवातून माझ्यासारख्या विधिमंडळ सदस्यांना खूप काही शिकण्यासारखं आहे, असं मला वाटतं.

विधिमंडळ व संसद सदस्य म्हणून दादासाहेबांचं जीवन आदर्श होतं. हा आदर्शपणा त्यांच्या राहणीमानातही होता. त्यांचं व्यक्तिमत्त्व रुबाबदार होतं. स्वच्छ, टापटीप, नेटकी राहणी, उंची अत्तराचा वापर यामुळे त्यांचं व्यक्तिमत्त्व अधिकच खुलत असे. त्यांच्यासोबत असलेला पानाचा डबा हा देखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनला होता. अस्सल जर्दा टाकलेलं पान व लवंग, विलायची, केशर असलेला त्यांचा पानाचा डबा सभागृहात, सभागृहाबाहेर, पत्रकारमित्रांमध्ये सतत फिरता असायचा. या डब्यानं अनेक संवाद घडवले व वाद मिटवले, हे वेगळं सांगायला नको.

बिहार व केरळच्या राज्यपालपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. राज्यपालपद हे शोभेचं पद नाही,

हेदेखील त्यांनी सप्रमाण सिद्ध केलं. बिहारचे राज्यपाल म्हणून काम करताना त्यांनी तेथील शिक्षणव्यवस्थेला शिस्त लावण्याचा व शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल घडवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचा कायापालट करणाऱ्या डॉ. आर. कृष्णकुमार यांना आपले विशेष अधिकारी म्हणून खास महाराष्ट्रातून बिहारमध्ये बोलावलं. राज्यपाल म्हणून दादासाहेबांनी घेतलेल्या निर्णयामुळे बिहारच्या महाविद्यालयांना शिस्त आली. प्राध्यापक नियमितपणे व वेळेवर वर्गात जाऊ लागले. अभ्यासक्रम व शैक्षणिक सत्र नियमित झाले. विद्यार्थ्यांना याचा खूप मोठा फायदा झाला. दादासाहेबांनी बिहारमधील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी जाणीवपूर्वक पावलं उचलली. जैन व बौद्ध धर्माच्या तीर्थस्थळांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला व स्वतःच्या देखरेखीखाली तीर्थक्षेत्र विकासाची सर्व कामे पूर्ण करून घेतली. दादासाहेबांच्या या कृतीनं लोकांच्या मनातील राज्यपालपदाची उंची वाढवण्याचं काम केलं आहे.

दादासाहेब आज देहानं आपल्यात नाहीत, परंतु त्यांचं कार्य व विचार सदैव मार्गदर्शक म्हणून आपल्यासोबत असणार आहेत. समाजातल्या दुर्बल, वंचित, उपेक्षित, शोषित, घटकांच्या लढ्याचं प्रतिनिधित्व, नेतृत्व दादासाहेबांनी प्रदीर्घ काळ केलं. अनेक आव्हानं, प्रलोभनं आली, परंतु ते ढळले नाहीत. कडवा संघर्ष करावा लागला, पण मागे हटले नाहीत. भारतीय राज्यघटना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर अढळ श्रद्धा ठेवून ते आपलं संपूर्ण जीवन जगले. त्यांच्या कार्यास व पवित्र स्मृतींना माझे विनम्र अभिवादन !

-विरोधी पक्षनेता,
महाराष्ट्र विधानपरिषद.

❑❑

आपलेपणाच्या सहकार्याचे व्रत

श्री. दादासाहेबांच्या सहकार्याच्या स्वभावाचा, आत्मीयतेचा अनुभव मी एकदा स्वतः अनुभवलेला आहे. माझा भाऊ किडनीच्या विकाराने आजारी होता. दुखणे वाढले त्यामुळे त्याला मुंबईला पुढील औषधोपचारासाठी मी आगगाडीने घेऊन जात होते. त्याच गाडीत माझ्या सुदैवाने दादासाहेबही होते. त्यावेळी ते विधानपरिषदेचे सभापती होते. प्रवासातच माझ्या भावाची तब्येत अधिकच बिघडली. मी अतिशय घाबरून गेले. अस्वस्थ झाले. मी गाडीतच त्यांना भेटले आणि परिस्थितीची जाणीव दिली. त्यावर ते म्हणाले, 'ताई काळजी करू नका. मी तुमच्यासाठी मुंबईच्या स्टेशनवरच गाडीची व्यवस्था करतो, तुम्ही सरळ हॉस्पिटलला जा. मी हॉस्पिटलमध्येही तुम्हाला सर्वतोपरी त्वरित सहाय्य मिळेल हे स्वतः बघतो.' आणि खरोखरच त्यांची गाडी स्टेशनजवळ हजर होती. त्यांच्या गाडीनेच आम्ही हॉस्पिटलला गेलो व तिथे आम्हाला सहाय्यही मिळाले. दुर्दैवाने तिथेच भाऊचे निधन झाले. त्यानंतर ते स्वतः मला भेटायला आले. माझे सांत्वन केले. माझा भाऊ तर मला सोडून गेला. मी त्याला वाचवू शकले नाही. पण माझ्या ऐन अडचणीच्या वेळी दादासाहेबांनी जी मला मदत केली, मला धीर दिला, तो प्रसंग मी आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही.

-सौ. सुमतीबाई सुकळीकर
नागपूर.

कर्तबगार, दिलदार...

▪ राधाकृष्ण विखे-पाटील

दादासाहेब उपाख्य रा. सू. गवई आणि माझे वडील बाळासाहेब विखे अतिशय जवळचे मित्र होते. दोघांचा नियमित संवादही होत असे. तुलनेत मला गवई साहेबांचा सहवास प्रदीर्घ काळासाठी लाभू शकला नाही. त्यांना भेटण्याचा, त्यांच्याशी बोलण्याचा योग मला अनेकदा आला. त्या भेटी अल्पकाळाच्या आणि काही कामानिमित्त असायच्या. पण त्या भेटींमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, कर्तृत्वाची आणि सामान्य नागरिकांप्रती त्यांच्या संवेदनशीलतेची उमटलेली छाप मात्र माझ्या मनावर कायमसाठी कोरली गेली. त्यांच्याप्रती असलेली माझी आस्था, माझा आदर प्रत्येक भेटीनंतर सतत वाढतच गेला. मोठ्या माणसांचं वैशिष्ट्यच हे असतं की, भलेही त्यांना भेटण्याचा योग फार कमी वेळा येत असेल, पण त्या मोजक्या भेटींमध्येही त्यांचा ठसा उमटल्याशिवाय राहत नाही. दादासाहेब याच पठडीतील फार मोठे व्यक्तिमत्त्व होते.

बाळासाहेब विखे पाटील आणि अण्णासाहेब म्हस्के यांच्या निवडणूक प्रचाराला ते अनेकदा नगर जिल्ह्यात आले. बाळासाहेब विखे पाटील निवडणुकीला उभे झाले की दादासाहेबांना 'प्रचाराला या' असे सांगण्याची गरज भासत नसे. त्यांचा व्यक्तिगत स्नेह इतका होता की, दादासाहेब आवर्जून प्रचारासाठी यायचे. निवडणुकीच्या धामधुमीत त्यांच्याशी बोलणेही अगदी कामापुरते व्हायचे. पण त्यांची भाषणे ऐकताना त्यांच्या मोठेपणाची आणि विद्वत्तेची प्रचिती यायची. भारदस्त व्यक्तिमत्त्व आणि वक्तृत्व कौशल्यामुळे श्रोते अगदी पहिल्याच मिनिटात प्रभावित व्हायचे. भाषण पुढे रंगत गेले की त्यांची व्यापक विचार करण्याची अफलातून क्षमता, जनतेशी जुळलेली नाळ, सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यासदेखील प्रकर्षाने जाणवायचा. कदाचित याच अंगभूत गुणांमुळे दादासाहेब उपाख्य रा. सू. गवई यांनी हजारो-लाखो चाहत्यांचा संच उभा केला होता.

मी अमरावती जिल्ह्याचा पालकमंत्री असताना अनेकदा त्यांची भेट झाली. मला दादासाहेब खऱ्या अर्थाने अनुभवायला मिळाले ते याच काळात. अमरावती किंवा मुंबईत त्यांची भेट झाली की कधीही आमची वैयक्तिक विषयांवर चर्चा होत नसे. फार-फार तर ते माझ्या वडिलांविषयी आणि कुटुंबाविषयी ख्याली-खुशाली विचारायचे. त्यानंतर मात्र बोलणे असायचे ते साधारणतः लोकांच्या प्रश्नांवरच. विविध विषयांवरील त्यांचा गाढा अभ्यास आणि अगदी अलीकडच्या काळातील अद्ययावत माहिती बघून कधी-कधी आश्चर्य वाटायचे. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी या विषयांवर तर ते अत्यंत पोटतिडकीने बोलायचे. लोकांच्या प्रश्नांवर काय केले पाहिजे, काय उपाययोजना आखल्या पाहिजेत, याबाबत त्यांचे बोलणे आग्रही असायचे.

दादासाहेबांनी तब्बल पाच दशके राजकारण आणि समाजकारण केले. ते भलेही रिपब्लिकन पक्षाचे नेते होते, पण लोकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी कधीही पक्षभेद पाळला नाही. आलेला माणूस कोणत्या राजकीय विचारसरणीचा आहे, याचा ते कधीही विचार करीत नसत. त्यांच्या नेतृत्वाला कायद्याचा गाढा अभ्यास आणि इंग्रजीवरील प्रभुत्वाची जोड होती. घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाचे काम करणारे दाजीसाहेब पटवर्धन, महात्मा जोतिबा फुले आदी महामानवांचा-त्यांच्या विचारसरणीचा मोठा प्रभाव होता.

एचबी ११८०—५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह ज्या दिवशी बौद्ध धर्माचा स्वीकार केला, त्याच दिवशी दादासाहेबांनीही बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांच्यावर बौद्ध धर्माच्या विचारसरणीचाही मोठा प्रभाव होता. बौद्ध धर्माचे अनुयायी झाले. त्यांनी आयुष्यभर धर्मनिरपेक्षतेची कास सोडली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच दलित समाजासाठी मोठे काम करणारे दादासाहेब गायकवाड यांना रा. सू. गवईंनी आपले राजकीय गुरू मानले होते. दादासाहेब गायकवाडांच्या कार्याची धुरा दादासाहेब गवईंनी पुढे समर्थपणे सांभाळली. नागपूरची दीक्षाभूमी आंबेडकरी समाजाचा मानबिंदू आहे. दादासाहेब गायकवाड यांच्या निधनानंतर १९६९ मध्ये रा. सू. गवई यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्षपद आले. तेव्हापासून दीक्षाभूमीवर स्मारकाच्या निर्माण कार्याला सुरुवात झाली. त्यांच्यामुळे दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक दर्जाचे स्मारक उभे राहिले. दीक्षाभूमीला आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त करून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. दीक्षाभूमीच्या विकासामध्ये गवई साहेबांची कामगिरी उल्लेखनीय अशीच म्हणावी लागेल.

रा. सू. गवईंची कारकीर्द त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच चौफेर होती. राजकीय, सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. पण त्यांच्या या कामाची सुरुवात अतिशय प्रतिकूल परिस्थितीत झाली होती. त्यांना मिळालेला मोठेपणा सहज मिळालेला नव्हता. त्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. कठीण परिस्थितीशी कडवी झुंज दिली. त्यामुळेच त्यांच्या मोठेपणाला एक वेगळीच किनार लाभलेली होती.

त्यांनी अमरावतीतून सुरू केलेला प्रवास भल्या-भल्यांना थक्क करणारा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाशी ते आयुष्यभर एकनिष्ठ राहिले. १९५९ मध्ये ते विदर्भ रिपब्लिकन पक्षाचे सचिव होते. १९६४ मध्ये ते विधानपरिषदेचे सदस्य झाले. त्यानंतर सलग २९ वर्षे त्यांनी विधानपरिषदेत सदस्य, विरोधी पक्षनेता, विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती अशी विविध पदे भूषविली. आपल्या अभ्यासू भाषणांनी त्यांनी अनेकदा सभागृह गाजवले. विविध प्रश्नांची त्यांना असलेली जाण, मुद्देसूद व अभ्यासपूर्ण मांडणीची प्रचिती विधानपरिषदेने सलग तीन दशके अनुभवली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा ठराव त्यांच्याच कारकिर्दीतच मंजूर झाला. राज्यात रोजगार हमी योजना सुरू व्हावी, यासाठी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि विधानपरिषदेचे तत्कालीन अध्यक्ष वि. स. पागे यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले.

२००० मध्ये रा. सू. गवई यांची राज्यसभेवर निवड झाली. राज्यसभेत त्यांनी मांडलेल्या पहिल्याच मुद्याने सभागृहाला हलवून सोडले. अरुण शौरी यांनी लिहिलेल्या 'वर्शिपिंग फॉल्स गॉड' या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप ठेवून त्यांनी या पुस्तकाची पाने फाडून सभागृहात भिरकावली. विधिमंडळ आणि संसदेतील कारकिर्दीत त्यांनी पुरोगामी विचार व तळागाळातील जनतेचे प्रश्न हिरिरीने मांडले. अखंड महाराष्ट्रासाठी गवई यांनी नाईकांच्या खांद्याला खांदा लावून काम केले होते. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य असो वा महाराष्ट्राच्या विकासाचा प्रश्न, त्यांनी नेहमी सर्व प्रकारचे अभिनिवेश बाजूला ठेवून काम केले. त्यांनी नेहमीच परिवर्तनाचा विचार पुढे नेला.

आंबेडकरी समाज आणि कार्यकर्त्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे विखुरलेल्या रिपब्लिकन गटाचे ऐक्य. या ऐक्यासाठी दादासाहेब उपाख्य रा. सू. गवई यांनी नेहमीच प्रयत्न केले. १९७४ मध्ये ऐक्याचा प्रयत्न झाला, त्या वेळी त्यांनी रिपब्लिकन चळवळीतील तत्कालीन नेत्यांसोबत पुढाकार घेतला. तेव्हा गवई साहेब विधानपरिषदेचे उप

सभापती होते. ऐक्याच्या प्रक्रियेत आपले पद आड येत असेल तर त्याचाही राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शविली होती. अनेकांच्या प्रयत्नांतून त्या वेळी ऐक्य झाले पण ते टिकले नाही. १९९८ मध्ये त्यांनी पुन्हा ऐक्यासाठी प्रयत्न केले. त्या वेळी एकी झाली आणि आठवले, आंबेडकर, कवाडे आणि गवई गट एकत्र आले. लोकसभा निवडणुकीत दादासाहेब गवई, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले आणि प्रा. जोगेंद्र कवाडे हे रिपब्लिकन पक्षाच्या चारही प्रमुख गटांचे नेते निवडून आले.

शैक्षणिक क्षेत्रातही रा. सू. गवई यांनी भरीव कार्य केले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा विकास तर होतोच, पण सोबतच समाजाचा आणि पर्यायाने देशाचाही विकास होतो, ही बाब ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन करून दलित समाजाला शिक्षणाची दारे उघडून दिली. रा. सू. गवई यांनी त्यांच्या शिक्षण संस्थांमधून तळागाळातील लोकांना तर प्रवेश दिलाच, सोबतच बहुजन समाजातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांच्याही शिक्षणाची सोय करून दिली. त्यांनी जात-पात न मानता गरजू, अभ्यासू विद्यार्थ्यांना नेहमीच मदतीचा हात पुढे केला. आपल्या शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांनी विविध विषयांवर विचारमंथनाला वाव दिला. त्यांच्या संस्थेमध्ये अनेक अभिनव कार्यक्रम राबवले जातात. अमरावती विद्यापीठाची निर्मिती करण्यातही दादासाहेब गवई यांचे मोठे योगदान राहिले आहे.

दादासाहेबांनी जात-धर्म-पक्षाच्या पलीकडे जनहिताची कामे केली. प्रत्येक शोषिताला मदतीचा हात दिला. शिक्षणाबद्दल असलेली त्यांची तळमळ राज्यपालपदावर असतानाही कायम होती. राज्यपालांचे पद फक्त औपचारिकता निभावण्यासाठी नसते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. बिहारचे राज्यपाल असताना त्यांनी तेथील शिक्षणव्यवस्था रुळावर आणण्यासाठी भरीव प्रयत्न केले. त्या काळात त्यांनी उचललेल्या पावलांचा आजही तिथे सन्मानाने उल्लेख केला जातो. बिहारमधील शिक्षणव्यवस्थेत त्यांनी दूरदृष्टीने नवे नियोजन केले. नागपुरातील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचा संपूर्णपणे कायापालट करणारे डॉ. कृष्णकुमार यांना त्यांनी विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्त केले. कठोर उपाययोजना करून त्यांनी बिहारमधील शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडवून आणले. महाविद्यालयात न दिसणारा प्राध्यापकवर्ग नियमितपणे वर्गावर येऊ लागला. जे प्राध्यापक अनुपस्थित राहतील, त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशाराच त्यांनी दिला होता. अभ्यासक्रम व सत्रदेखील नियमित करण्याचे निर्देश रा. सू. गवई यांनी विद्यापीठांना जारी केले होते. बिहारमधील जैन व बौद्ध धर्माच्या तीर्थस्थळांच्या विकासासाठी मौलिक पुढाकार घेतला. त्यांनी केरळचे राज्यपाल असताना माजी ऊर्जामंत्री पी. विजयन यांच्याविरुद्ध सीबीआय चौकशी करण्याची परवानगी देऊन रोखठोक भूमिका बजावली.

दलितांनी आपले हक्क संसदीय मार्गाने संघर्ष करून मिळवावेत, या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदेशाची गवई यांनी प्रत्यक्षात अंमलबजावणी केली. दलितांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अखेरपर्यंत प्रयत्न केले. १९६४-६५ साली झालेल्या भूमिहिनांच्या आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. नुसता भागच घेतला नाही, तर अमरावतीत झालेल्या या आंदोलनात त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोकांनी अटक करून घेतली होती.

दादासाहेब उपाख्य रा. सू. गवई यांचे सर्वच पक्षांतील नेत्यांबरोबर मित्रत्वाचे नाते होते. त्यांनी सर्व समाजाचे हित जोपासले. कोणाचाही मत्सर केला नाही. दीनदुबळे, गरजू अशा सर्वांचे अश्रू पुसण्याचे काम त्यांनी केले. कार्यकर्त्यांना ते अतिशय ममत्वाने वागवत. निवडणुकीत पराभव झाला तेव्हा दादासाहेबांचे अनेक कार्यकर्ते धाय मोकलून रडल्याची उदाहरणे मी अमरावतीत अनेकदा

एचबी ११८०—५अ

ऐकली आहेत. संसदपटू, उत्तम संघटक आणि कुशल नेतृत्व क्षमतेचा अजातशत्रू असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचे योगदान दिले. राजकारणात त्यांनी अनेक मोठ-मोठी पदे भूषविली. पण कधीही त्या पदांचा अहंपणा मिरवला नाही. त्या पदांचा वैयक्तिक स्वार्थासाठी उपयोग केला नाही. बिहार-केरळचे राज्यपाल असताना महाराष्ट्रातील मंडळी त्यांना भेटायला जात, तेव्हा ते प्रत्येकाचे अगत्याने स्वागत करायचे. पाहुण्यांना काय हवे, काय नको याची कमलताई आवर्जून चौकशी करायच्या. अशा या दिलदार आणि कर्तबगार व्यक्तिमत्त्वाची आठवण प्रत्येकाच्याच मनात कायम राहील. दादासाहेबांच्या एकंदर महान जीवनकार्याला प्रख्यात कवी बा. भ. बोरकरांच्या शब्दांत व्यक्त करायचे झाले तर असेच म्हणता येईल की,

जीवन त्यांना कळले हो ...
'मी' पण ज्यांचे ...
पक्वफळापरी ...
सहजपणाने गळले हो ...

-विरोधी पक्षनेता, विधानसभा.

❑❑

बडे दिल वाले दादासाहेब

लगभग तीस वर्षों से नॉर्थ एवेन्यू नई दिल्ली में रहते हुए सांसदों से मेरा परिचय होता ही रहता है, क्योंकि मैं इस क्षेत्र में रहने वाले सांसदों के कपडे धोने और प्रेस करने का कार्य अपना जीवन यापन के लिये करता हूँ। फ्लॅट १५१-१५३ में रिपब्लिकन पार्टी ऑफ इण्डिया के राष्ट्रीय अध्यक्ष और राज्यसभा सांसद दादासाहेब जी की महानता का प्रभाव मुझ पर ही नहीं अपितु नार्थ ऐवेन्यू के दूसरे कर्मचारियों पर भी पड़ा।

अधिकांश सांसद थोडी सी देरी से कपडे पहुँचने पर ही आसमान सर उठा लेते है, उलटा-सुलटा बोलने लगते है, परन्तु दादासाहेब ने मुझे कभी भी नहीं डाटा। उलटा भरपूर प्यार ही दिया। यहाँ तक की एक बार तेज आँधी आने पर धो कर सुखाने डाले हुए कपडे कहीं उडकर चले गये और खो गये। बहुत ढूँढने पर जब वे नहीं मिले, तब मैंने दादासाहेब जी को जाकर डरते-डरते उनके कपडे खो जाने के बारे मे बताया। दादासाहेबाजी ने पूरी बात सुनकर कहां तेरा क्या दोष है, आँधी में खो गये, कोई बात नहीं। उनकी यह बात सुनकर उन की महानता का मुझ पर ऐसा असर हुआ कि मैं ही नहीं मेरा पूरा परिवार आज भी उन्हें याद करता है। ईद पर दिवाली पर और अप्रैल में दादासाहेब मुझे बुलाकर ईनाम दिया करते थे और कहते थे कि अपने बच्चों को खुब पढना और उन्हें बडा आदमी बनाना। मैं परवरदिगार से दुआ करता हुँ कि खुदा उन्हें जन्नत बक्शे। लोग उन्हें हमेशा याद करते रहे।

-पप्पू खान

नॉर्थ एवेन्यू, नई दिल्ली.

संसदीय क्षेत्रातील विक्रमवीर

आपल्या प्रदीर्घ आणि अविस्मरणीय कामगिरीनंतर श्री. रा. सू. गवई २७ जुलै १९९४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त झाले. त्यांना सभागृहातील सर्वपक्षीय सदस्यांनी भावपूर्ण निरोप दिला. या हृद्यप्रसंगी तत्कालीन मुख्यमंत्री, माजी केंद्रीय कृषी, संरक्षण मंत्री आणि ज्येष्ठ नेते मा. श्री. शरद पवार यांनी केलेला दादासाहेबांचा हा शब्दगौरव ...

▪ शरद पवार

सन्माननीय सदस्य श्री. रा. सू. गवई साहेबांना निरोप द्यावयाचा म्हणजे काय बोलावयाचे हे मला कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री. रा. सू. गवई या सदनामध्ये नाहीत, ही कल्पनाच दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना न रुचणारी आहे. मला असे वाटते की, त्यांनी सातत्याच्या संदर्भात आणि वर्षाच्या संदर्भात या महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये विक्रमच केला असेल. आपल्या पक्षाची संख्या किती आहे हा प्रश्न त्यांच्यापुढे आला नाही. याचे श्रेय सर्व बाजूला आहे, इकडेही आहे आणि तिकडेही आहे आणि म्हणून कुठे देशामध्ये अशाप्रकारे कोणी विक्रम केला असेल का याची माहिती नाही. सर्व बाबतीत खऱ्या अर्थाने त्यांनी विक्रम केलेला होता. उप सभापती आणि सभापती म्हणूनही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी या सदनामध्ये सांभाळलेली आहे. संसदीय कामकाजाच्या पद्धतीच्या संदर्भात सदनाला आणि सन्माननीय सदस्यांना मार्गदर्शन करण्याच्या संबंधीची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली होती. महाराष्ट्रात जे महत्त्वाचे निकाल-मग ते आर्थिक क्षेत्रामध्ये असोत, परिवर्तनाच्या क्षेत्रामध्ये असोत, सर्व ठिकाणी सामंजस्य आणि निर्णय निश्चितपणे झाला पाहिजे अशी अतिशय आग्रही आणि आक्रमकतेची भूमिका त्यांनी अखंडपणे घेतली. महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेच्या संदर्भामध्ये जो निर्णय घेतला त्याकडे देशामध्ये आणि देशाबाहेरही आज वेगळ्या पद्धतीने पाहिले जात आहे आणि समाधान व्यक्त केले जात आहे.

सर्वसामान्य माणसाला खऱ्या अर्थाने शक्ती देणारी, विश्वास निर्माण करणारी आणि त्या निमित्ताने ग्रामीण भागात विकासाच्या कामात प्रोत्साहन देणारी अशी ही योजना या देशामध्ये पहिल्यांदा आपल्या राज्याने मान्य केली आणि तिच्या अंमलबजावणीमध्ये जे जे प्रश्न येत असे किंवा कमतरता दिसत असे त्याबाबत दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने पक्षीय अभिनिवेश न ठेवता सामान्य माणसांसाठी, मजुरांसाठी ही योजना राबवावयाची आहे ही गोष्ट लक्षात घेऊन त्यासाठी समरस भूमिका घेतली गेली. तसेच शिक्षण क्षेत्रामध्ये, नामविस्ताराच्या बाबतीत, गावामध्ये जर दलित आणि दलितेतर प्रश्न निर्माण झाले तर जो उपेक्षित माणूस आहे, त्याला न्याय मिळाला पाहिजे तसेच कायम स्वरूपाची कटुता यात न राहता सामंजस्य त्या ठिकाणी कसे निर्माण होईल, माणसा-माणसांतील दरी कशी कमी होईल, लोकांमध्ये विश्वास कसा निर्माण होईल या दृष्टीने त्यांनी अखंड प्रयत्न केलेले आहेत आणि हे करीत असतांना जी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृष्टी त्यांना मिळाली ती आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम करण्याची असल्यामुळे संधी मिळाली, त्यामुळे हे सर्व घडले आहे. अध्यक्ष महाराज, इतरही सन्माननीय सदस्यांबद्दल घरोब्याचे, व्यक्तिगत प्रेमाचे संबंध कसे ठेवावयाचे याचा आदर्श त्यांनी सगळ्यांसमोर ठेवलेला आहे. ते संसदेमध्ये जाण्याचा प्रयत्न करीत आहेत असे मी ऐकतो आहे, काही हरकत नाही. या ठिकाणी त्यांनी अनुभव घेतलेलाच आहे. आणि मला स्वत:ला खात्री आहे की, ते कोणत्याही क्षेत्रामध्ये गेले तरी तेथे ते समंजसपणे काम करू शकतील असा आवाका, प्रतिष्ठा आणि अनुभव त्यांच्या जमेत आहे.

-माजी केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री.

❑❑

कुशल संसदपटू

▪ डॉ. मनोहर जोशी

विधिमंडळातील माझे वरिष्ठ सहकारी व मार्गदर्शक, रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते दिवंगत रामकृष्ण सूर्यभान उपाख्य दादासाहेब गवई यांच्या महानिर्वाणाला एक वर्ष उलटून गेले. रामाचा आदर्श, कृष्णाचा व्यवहारीपणा आणि सूर्याचे तेज असलेले तसेच मोठ्या भावाप्रमाणे (दादा) असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजेच रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई. कालप्रवाहात खरे म्हणजे सगळेच वाहून जात असले तरी आयुष्यातील चित्तथरारक, रोमहर्षक प्रसंग लक्षात राहणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा यांच्या खुणा पुसायला काळसुद्धा असमर्थ असतो.

महाराष्ट्र विधिमंडळातील ज्येष्ठांच्या सभागृहात सदस्य, उप सभापती, सभापती, विरोधी पक्षनेते, म्हणून सुमारे तीस वर्षे गवई साहेब कार्यरत होते. सन १९७२ मध्ये स्व. शिवसेनाप्रमुख यांच्या आशीर्वादाने मी प्रथमच महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य म्हणून निवडून गेलो तेव्हा अतिशय उमदे आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले गवई साहेब हे विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून कार्यरत होते. संसदीय प्रथा आणि परंपरेचे निष्ठेने पालन करण्याबाबत ते नेहमीच आग्रही होते. माझ्या विधान परिषद सदस्यत्वाच्या पहिल्या दिवसापासून १९८९ पर्यंत ते माझे ज्येष्ठ मार्गदर्शक होते. त्यांच्या संयमी परंतु, आग्रही व्यक्तिमत्त्वाच्या संस्कारामुळे माझीही संसदीय कारकीर्द आकाराला आली हे कृतज्ञतापूर्वक कबूल करण्यात मला अजिबात संकोच वाटत नाही.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी तळागाळातील जनतेच्या विकासाकरिता आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. १९६४ साली भूमिहिनांच्या सत्याग्रहात सहभाग घेऊन त्यांनी तुरुंगवास भोगला. ते जनसामान्यांच्या, पददलितांच्या सेवेमध्ये रमलेले होते. वंचित वर्गात शिक्षणाच्या प्रसारासाठी अमरावती येथे दादासाहेबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या भूमीवर धम्मचक्र प्रवर्तनाचा ऐतिहासिक निर्णय घेतला त्या ठिकाणचे माहात्म्य लक्षात घेऊन दादासाहेबांनी नेत्रदीपक अशी दीक्षाभूमी स्मारकाची उभारणी केली. या दीक्षाभूमीच्या दर्शनाने डॉ. बाबासाहेब व दादासाहेब यांच्या आठवणींनी ऊर भरून आल्याशिवाय राहत नाही.

राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या महाराष्ट्राच्या नेत्यांपैकी ते एक होते. पद आणि प्रतिष्ठा यांची घमेंड नसणारे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या या विलक्षण लोककार्याची, समाजसेवेची दखल घेऊन सन्माननीय राष्ट्रपतींनी त्यांची बिहार आणि केरळ राज्याच्या राज्यपालपदी नेमणूक केली होती. राजकीय कारकिर्दीत त्यांनी नेहमीच चढत्या श्रेणीने पदे भूषविली आणि त्या पदांचा सन्मान वृद्धिंगत झाला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. मी राज्यसभेचा सदस्य होण्यापूर्वीच ते राज्यसभेतून निवृत्त झाल्यामुळे राज्यसभेत त्यांच्या सहवासाला मी मुकलो.

राजकारणाव्यतिरिक्त सामाजिक कार्याबद्दलदेखील त्यांना असंख्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले. कुष्ठरुग्णांच्या सेवेबद्दल कुष्ठमित्र पुरस्कार, अस्पृश्यता निर्मूलनाच्या प्रशंसनीय कार्यासाठी प्रियदर्शनी पुरस्कार, दीक्षाभूमी स्मारकासाठी ईश्वरीदेवी पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत करण्यात आले. अशा या बाह्य पुरस्कारांसोबतच दीन-दुबळ्या, पददलित समाजबांधवांच्या हृदयात मिळालेले अढळपद हे पद त्यांच्या कार्याची महानता पटविणारे आहे, असे मी मानतो.

आंबेडकरी चळवळीची धुरा सांभाळताना संघर्षासोबत समन्वयाची भूमिका साकारताना त्यांनी नेहमीच सामाजिक सलोखा जपला. राज्यघटनेचे पावित्र्य जपण्याबाबत ते सदैव दक्ष होते. रिपब्लिकन पक्षाच्या गवई गटाचे ते अध्यक्ष होते. गटातटात विखुरलेल्या रिपब्लिकन नेत्यांनी एकत्र यावे अशी त्यांची कायम तळमळ होती.

दादासाहेबांच्या रक्तदाब आणि मधुमेहाच्या विकाराने उचल खाल्ली आणि त्याचा किडनी व मेंदूत उपसर्ग झाला. आजार दुर्धर होता तरी ईश्वरी कृपेने आणि अगणित सर्वसामान्य जनतेच्या सदिच्छांनी दादासाहेब या जीवघेण्या व्याधीवर मात करतील अशी आशा वाटत होती. परंतु नियती ही कठोर असते. तिला भावना नसतात; याचा पुनःप्रत्यय आला. २५ जुलै २०१५ रोजी माध्यान्ही सूर्यपुत्राचे तेज निमाले. साधे, सरळ, निष्कपट व निष्कलंक व्यक्तिमत्त्व राजकारणाच्या सारीपाटावरून अंतर्धान पावले. त्यांच्या पवित्र स्मृतीस माझी विनम्र आदरांजली.

-माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष.

❑❑

आपलेपणाचे दुसरे नाव दादासाहेब

माझ्या दृष्टिकोनातून श्री. दादासाहेब म्हणजे एक अत्यंत विश्वासार्ह माणूस, मला आठवते १९६३-६४ च्या आसपासची ती घटना आहे. छोटूला म्हणजे त्यांच्या मुलाला डिप्थेरीया झाला होता. त्या वेळेचे राज्यमंत्री श्री. एन. यु. देशमुख माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, अहो गवईंचा मुलगा इर्वीन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. जरा त्याला बघता का ? मी लगेचच त्याला तपासले. ट्रीटमेंट दिली. लवकरच तो बरा झाला. विधिलिखित काही अलग असते म्हणतात. माझ्या या भेटीचे रूपांतर त्यांच्या फॅमिली डॉक्टर होण्यात झाले आणि लवकरच ते त्यांचा फॅमिली मेंबर होण्यातच नव्हे तर नात्यात बदलले, कारण सौ. ताई मला राखी बांधतात. त्यावेळेपासून आमचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध आहेत. आमची एवढी जवळीक आहे की, आमच्या कौटुंबिक अडचणीदेखील आम्ही एकमेकांना सांगतो आणि कुठल्याही अडचणीच्या वा संकटकाळी आम्ही एकमेकांच्या मदतीला धावत जाऊ हा आम्हा दोघांनाही एकमेकांविषयी विश्वास आहे. आम्ही दोघेही एकमेकांच्या सुखदुःखाशी नेहमीच समरस होत आलो आहोत. माझ्या मुलीच्या शिक्षणाच्या व लग्नाच्या वेळी त्यांनी घेतलेला पुढाकार हा माझ्याविषयी त्यांच्या मनात असलेल्या प्रेमाचे मी प्रतीक समजतो.

श्री. दादासाहेबांच्या अंगी मला प्रकर्षाने जाणवणारा गुण म्हणजे त्यांचा आपलेपणा ! त्यांच्याकडे आलेल्या व्यक्तीशी आपलेपणाने बोलून, आपुलकीची वागणूक देऊन त्याला आपलेसे तर करून घेतातच पण त्याचबरोबर त्यांचा हा आपलेपणा एकमार्गी देखील नाही.

-डॉ. वा. पु. राऊत

अमरावती.

विरोधी पक्षाचे नेते

श्री. रा. सू. गवई यांची विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेतेपदी दुसऱ्यांदा २० डिसेंबर, १९९० रोजी निवड झाली. त्यावेळी सभागृहात श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी केलेले भाषण ...

▪ सुशीलकुमार शिंदे

सन्माननीय सदस्य श्री. रा. सू. गवई यांची विरोधी पक्षाच्या नेतेपदी निवड झाल्यामुळे मी प्रथम त्यांचे मनापासून महाराष्ट्र शासन, काँग्रेस पक्ष व सत्तारूढ यांच्या वतीने स्वागत करतो. दोन वर्षांपूर्वी ते याच सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे नेते होते. त्यानंतर पुन्हा एकदा ते विरोधी पक्षाचे नेते झाले आहेत. ते आधी विरोधी पक्षाचे नेते झाले होते त्यावेळी त्यांचे अभिनंदन करणारी जी भाषणे झाली ती भाषणे ऐकण्याकरिता मी उपस्थित होतो. आज त्यांच्या निवडीबद्दल भाषण करण्याची संधी मला मिळालेली आहे.

सन्माननीय गवई साहेबांनी या सभागृहामध्ये अनेक भाषणे केली आहेत आणि समाजातील कठीण व जटिल प्रश्न या सभागृहामध्ये मांडले आहेत. त्यांनी समाजजीवन सुधारण्यासाठी अनेक गोष्टी या ठिकाणी मांडल्या आहेत. सर्वंकष समाज कसा उभा राहील, सर्वांच्या मनातील महाराष्ट्र कसा उभा राहील आणि त्यातून संपूर्ण भारत कसा उभा राहील या विचाराने ते सातत्याने व्यथित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या मार्गाने पुढे जाणारे आहेत. ते दलितांमधील असून त्यांना खऱ्या अर्थाने दलित म्हणता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांनी असे सांगितले आहे की, आपले दलितपण विसरले पाहिजे आणि सर्व समाजजीवनामध्ये सामील झाले पाहिजे. जो दलितपणा मागे टाकतो तो खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पाईक असू शकतो, तोच खरा शाहू महाराजांचा पाईक असू शकतो, सुधारक आणि अभ्यासक असू शकतो. श्री. गवई साहेब दलितांमध्ये जन्मले असतील परंतु त्यांनी दलितांची चिठ्ठी केली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांनी असे सांगितले की, सर्व समाजाकरिता झोकून देऊन काम केले पाहिजे. मला मनापासून आनंद वाटतो तो, सर्वसामान्यांचे प्रश्न, कमकुवत घटकाचे प्रश्न, दलितांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे-शेतमजुरांचे प्रश्न, मध्यम वर्गाचे प्रश्न, शिक्षकाचा पेशा स्वीकारणाऱ्यांचे प्रश्न वेशीवर टांगण्याचे आणि शासनाला जागे करण्याचे काम श्री. गवई यांनी केलेले आहे. त्याकडे मी दुर्लक्ष करू इच्छित नाही. श्री. गवई यांचे नावदेखील सुंदर आहे. त्यांचे नाव रामकृष्ण असे असून त्यामध्ये रामाचा प्रामाणिकपणा आणि सत्यता आहे. तसेच कृष्णाचा मिस्किलपणा व खोडकरपणा आहे. समाजाचे सर्व प्रश्न गवयाच्या रूपाने गातील आणि गाणे मधूर करण्याकरिता सामाजिक समतेचा आवाज ते उठवतील याची मला खात्री आहे. धर्माच्या आणि जातीच्या बंधनाने समाजाला पिडलेले आहे. तेव्हा या भिंती तोडण्याचे काम विरोधी पक्षनेते श्री. गवई करतील अशी मी आशा बाळगतो.

अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये त्यांची आणि माझी अनेक वेळा जुगलबंदी झालेली आहे. भारतीय घटना किंवा आय.पी.सी. या बाबतीत ही जुगलबंदी झालेली आहे. १५-२० मिनिटांपूर्वी ते माझ्याशी आय.पी.सी च्या संदर्भात बोलत होते. अध्यक्ष महाराज, आय.पी.सी.च्या संदर्भात विचारणारा हा विधितज्ज्ञ असला पाहिजे. श्री. गवई साहेब हे मनापासून सगळ्या गोष्टींचा अभ्यास करीत असतात.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मला एक घटना आठवते. त्या घटनेचा उल्लेख करीत असतांना मी माननीय मुख्यमंत्र्यांचे

नाव घेऊ इच्छित नाही. त्यांनी बजेटमध्ये अशाच प्रकारची तरतूद केली होती. त्या संदर्भात श्री. गवई यांनी मिष्किलपणाने प्रश्न विचारले आणि मला खालच्या सभागृहातील प्रश्न सोडून वरच्या सभागृहामध्ये यावे लागले.

श्री. गवई यांच्यामध्ये अशा प्रकारचा मिष्किलपणा आणि खोडकरपणा आहे. दलितांचे जे प्रश्न आहेत त्या संदर्भात शासनाने योग्य ती तरतूद केली पाहिजे, या भूमिकेतूनच त्यांनी त्यावेळी तो प्रश्न मांडला होता. नियोजनाची कास धरणारा, सामाजिक समतेच्या मागे लागणारा आणि केवळ सामाजिक समतेच्या मागे लागणाराच नाही तर सत्ता असो अथवा नसो, विरोधी पक्षनेता असो अथवा नसो, सभापती किंवा उप सभापती असो किंवा नसो, ज्याच्याकरिता म्हणून कमिटमेंट आहे त्याचा आधार घेऊन महाराष्ट्रातील सर्वंकष समाजाची उन्नती करणारा नेता आज विरोधी पक्षाचा नेता म्हणून लाभलेला आहे. म्हणून शासनाला, या ट्रेझरी बेंचला आनंद होत आहे. त्यांचे अनेक मित्र ट्रेझरी बेंचवर आहेत. परंतु त्यांचे मित्र या ठिकाणी असताना सुद्धा समाजाच्या प्रश्नाकरता त्यांनी मैत्रीचा कधीही आसरा घेतला नाही. समाजाच्या प्रश्नाकरता त्यांनी कधीही तडजोड स्वीकारलेली नाही. अशा प्रकारे गरिबांसाठी आणि दलितांसाठी भांडणारा, समाजाकरिता आपले जीवन वेचणारा विरोधी पक्षनेता म्हणून श्री. गवईसाहेब लाभले आहेत आणि ते सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी आणि महात्मा फुले स्मृतिशताब्दी वर्षात लाभले हा दैवयोग आहे. हे खरे आहे की, विदर्भाची मातीच तशी आहे. अमरावती असो, यवतमाळ असो या मातीतून डॉ. पंजाबराव देशमुख, स्व. कन्नमवार, वसंतराव नाईक अशी एकापेक्षा एक वरचढ अशी रत्ने होऊन गेली. त्याच मातीतील अमरावतीचे हे आणखी एक रत्न आहे.

अध्यक्ष महाराज, रत्न हा शब्द मी खऱ्या अर्थाने येथे वापरला आहे. कारण शेवटी रत्न म्हणून गणले जाण्यासाठीसुद्धा त्याला पैलू असावे लागतात. ही काही साधी, सोपी गोष्ट नाही. आपल्या पक्षाचा एकही सदस्य या सभागृहात नसताना व पुन्हा या सभागृहात निवडून येणे ही कला काही साधी सोपी नव्हे. म्हणूनच हे जे पैलू त्यांच्यामध्ये आहेत ते सगळ्यातच येणार नाहीत. त्यासाठी मुळात कला असावी लागते आणि त्याबरोबरच ध्येयाने प्रेरित असावे लागते. त्याशिवाय दुसरा कोठलाही माणूस त्यांचे समर्थन करू शकणार नाहीत.

आता सगळ्या पक्षाच्या माध्यमातून या महाराष्ट्राला अभिमानास्पद वाटणारी गोष्ट आज येथे घडत आहे. माननीय श्री. गवई साहेब त्यांच्यावर असलेली श्रद्धा, विश्वास आणि महाराष्ट्राची परंपरा जी शाहू महाराज, शिवाजी महाराज यांची आहे त्या परंपरेचा, समतेचा वारसा घेऊन पुढे निघालेल्या सर्वांना बरोबर घेऊनच पुढे जातील असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महाराज, सत्तारूढ पक्षाच्या वतीने मी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देऊ इच्छितो आणि त्यांची विरोधी पक्षनेतेपदाची कारकीर्द चांगल्या प्रकारे पार पडो अशी इच्छा व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

-माजी मुख्यमंत्री, राज्यपाल व केंद्रीय मंत्री.

❑❑

स्मृतिग्रंथ

निळ्या आसमंतातील चकाकता तारा

■ **अशोक चव्हाण**

राष्ट्रीय राजकारणात प्रभावी ठसा उमटविणारे, चाणाक्ष बुद्धीचे आणि संवेदनशील हृदयाचे विशाल व्यक्तिमत्त्व म्हणजे रामकृष्ण सूर्यभान ऊर्फ दादासाहेब गवई केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर संपूर्ण देशभरात असलेल्या त्यांच्या चाहत्यांच्या वर्गावरून त्यांच्या माणुसकीची उंची अधोरेखित होते. उत्तम संसदपटू, दूरदृष्टीचा प्रशासक, उत्कृष्ट सामाजिक जाणकार आणि कुशल राजकीय अभ्यासक असे विविध पैलू असलेले नेतृत्व दादासाहेबांच्या रूपाने महाराष्ट्राला लाभले. त्यांचा जन्म ३० ऑक्टोबर, १९२९ रोजी अमरावती जिल्ह्यातील दारापूर येथे झाला. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच त्यांचा राजकारणात सक्रिय सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती, रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी आणि दलितांच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय असे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यापासून स्फूर्ती घेत, दादासाहेबांनी बालपणापासूनच दलितोद्धाराच्या कामात स्वतःला झोकून दिले. सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा, त्यांचा राजकीय तसेच सामाजिक विकास व्हावा, यासाठी दादासाहेबांनी अविरत परिश्रम घेतले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) चे अध्यक्ष या नात्याने दलितांच्या उद्धारासाठी त्यांनी नवी ताकद उभी केली. दादर येथील इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाकरिता मिळवण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद आहेत. या संदर्भात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री या नात्याने आमचा आणि दादासाहेबांचा अनेक वेळा संपर्क झाला. इंदू मिलची साडेबारा एकरची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी हस्तांतरित करेपर्यंत दादासाहेब स्वस्थ बसले नाहीत. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि आरपीआय आघाडीच्या सन २००९ च्या निवडणूक जाहीरनाम्यात इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी देण्याचे वचन समाविष्ट करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांची मागणी आम्ही पूर्ण केली. याकामी त्यांचे उत्तम सहकार्य लाभले. आज दादासाहेबांचे हे स्वप्न पूर्ण झाले आहे. असे असताना त्यांची आठवण मात्र आमच्या सदैव स्मरणात राहिली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला सर्वात जुना पक्ष आहे. या पक्षाची काँग्रेससोबत नेहमीच आघाडी राहिली आहे. दलितोद्धाराला वाहिलेल्या या पक्षाने, स्थापनेपासूनच काँग्रेसला साथ दिली आहे. दादासाहेब गवई यांनी सलग ३० वर्षे विधानपरिषदेचे सदस्य म्हणून दलितांचे प्रतिनिधित्व केले. दलित व वंचितांच्या विकासाच्या अनेक टप्प्यांचे साक्षीदार होण्याचे भाग्य त्यांना मिळाले. रोजगार हमी योजना अंमलात आणण्यासाठी त्यांनी विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती वि. स. पागे यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. हीच रोजगार हमी योजना आज देशभरात 'मनरेगा' च्या रूपात राबविली जात आहे. मात्र, आज मोदी सरकारने ज्या पद्धतीने या योजनेच्या तरतुदींवर नियंत्रण आणले आहे; ते पाहता दादासाहेब जर आज हयात असते, तर त्यांना निश्चितच त्याचे दुःख झाले असते.

रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई हे १९५४ मध्ये नागपूर विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते सन १९५९ साली विदर्भ रिपब्लिकन पक्षाचे सेक्रेटरी झाले. आपल्या कारकिर्दीतील काही काळ डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या बरोबर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. सन १९७२ मध्ये ते रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष झाले. सन १९६८ मध्ये विधानपरिषदेच्या उपाध्यक्षपदाची तर १९७८ मध्ये विधानपरिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दादासाहेबांनी अत्यंत समर्थपणे पेलली. पुढे सन १९८६ ते १९८८ या काळात विधानपरिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी त्यांनी प्रभावीपणे काम केले. सन १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत ते अमरावती लोकसभा मतदारसंघातून बहुसंख्येने विजयी झाले. एप्रिल, २००० मध्ये त्यांची राज्यसभेवर निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अमरावतीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद भूषविण्याचा बहुमान त्यांना मिळाला. जबाबदारीची विविध पदे भूषवीत असताना त्यांनी वंचितांच्या उत्कर्षासाठी अहोरात्र काम केले. त्यांचे कार्य सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी राहील असे आहे.

कुशल संघटक, अभ्यासू आणि पुरोगामी विचारांचा नेता म्हणून दादासाहेबांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. ते राजकारणासह, दलित चळवळीत कायम सक्रिय होते. देशपातळीवर तसेच महाराष्ट्रात दलित चळवळ वाढविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. तर मुरब्बी राजकारणी म्हणून संपूर्ण देशात त्यांची ख्याती होती. सन १९८८ मध्ये राज्यातून पाच दलित खासदार खुल्या जागेवरून लोकसभेवर निवडून गेले होते. त्यात दादासाहेब गवई यांचा देखील समावेश होता. दलित चळवळीत भाग घेतल्यानंतर १९५६ पासून रा. सू. गवई यांचा संपर्क दादासाहेब गायकवाड यांच्याशी आला. दादासाहेब गायकवाड यांना त्यांनी गुरुस्थानी मानले होते.

'आंबेडकर चळवळीतील एक संघर्ष पर्व' हे पुस्तक रा. सू. गवई *ऊर्फ* दादासाहेब गवई यांनी लिहिले. कुष्ठरोग्यांसाठी केलेल्या मदतीबद्दल त्यांना 'कुष्ठमित्र' आणि 'कुष्ठरोग्यांचा मित्र' ॲवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी दलितोद्धारासाठी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल मुंबईच्या प्रियदर्शनी ग्रुपने 'प्रियदर्शनी ॲवार्ड' तर नॅशनल प्रेस इंडिया, नवी दिल्ली यांच्यातर्फे 'नॅशनल प्रेस ॲवार्ड' ने सन्मानित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मध्यवर्ती स्मारकाच्या निर्मितीसाठी दादासाहेब गवई यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल १९९९ मध्ये त्यांना हैदराबाद येथे 'ईश्वरी देवी ॲवार्ड'ने गौरविण्यात आले.

आपल्या राजकीय कारकिर्दीच्या अखेरच्या पर्वात बिहार, केरळ आणि सिक्कीम राज्यांचे राज्यपाल होण्याची संधी रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई यांना मिळाली. बिहारचे राज्यपाल असताना त्यांनी जैन आणि बौद्ध धर्माच्या तीर्थस्थळांच्या विकासासाठी पुढाकार घेतला. तीर्थस्थळांच्या ठिकाणी दळणवळण व्यवस्था आणि विश्रामगृह यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. तेथील पर्यटनाच्या विकासासाठी त्यांनी रुपये १३०० कोटीची योजना तयार करून अंमलात आणली. त्यांच्या कारकिर्दीत अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास झाला.

२५ जुलै, २०१५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी नागपूर येथे त्यांचे निधन झाले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून रा. सू. *ऊर्फ* दादासाहेबांनी केलेले राजकीय क्षेत्रातील कार्य देदीप्यमान असे होते. महाराष्ट्रात दलित चळवळ वाढविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या जाण्यामुळे आंबेडकरी चळवळीचे फार मोठे नुकसान झाले आहे. समाजातील वंचितांसाठी त्यांनी केलेले कार्य आपल्याला सतत प्रेरणा देत राहणार आहे.

रा. सू. *ऊर्फ* दादासाहेब गवई हे डॉ. आंबेडकरांचे अनुयायी होते. त्यांचे जीवन म्हणजे कृतार्थ जीवन होय. खंदे आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आज पाहिले जाते. त्यांच्या कर्तृत्वाने त्यांना मोठमोठ्या संधी प्राप्त झाल्या. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेने आकाशाला गवसणी घालणारे कार्य केले. निळ्या आसमंतात चकाकणाऱ्या ताऱ्याप्रमाणे त्यांचे कार्य होते. त्यांचे विचार आणि कार्याला आमचे विनम्र अभिवादन.

-माजी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र
प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष.

❑❑

जीवनाचा सकारात्मक दृष्टिकोन

▪ शिवराज पाटील-चाकुरकर

जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणारे आणि संपर्कात येणाऱ्या व्यक्तीमधील उणिवांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यातील चांगल्या गुणांना आत्मसात करणारे एका खिलाडू व्यक्तिमत्त्वाचे माझ्या मते नाव श्री. रा. सू. गवई आहे! अत्यंत मनमिळाऊ स्वभाव, राजकारणातच नव्हे तर आर्थिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच वैयक्तिक जीवनातही विचारांची व्यापकता असलेल्या श्री. गवईंशी माझी १९७२ मध्ये प्रथम ओळख झाली. त्या वेळी ते विधानपरिषदेत उपसभापती होते आणि मी विधानसभेत! मी मंत्रिमंडळात व सभापती असतानाही त्यांच्याशी 'संबंध' येत होताच. आम्ही राहतही होतो, एकाच सारंग बिल्डिंगमध्ये! मी दुसऱ्या माळ्यावर आणि ते सातव्या! तेव्हा शेजारधर्मही होताच. या सर्व पार्श्वभूमीवर परिचय वाढीस लागला आणि आज आम्ही घनिष्ठ मित्र आहोत. आम्ही एकमेकांच्या सुखदु:खात, अडचणीत एकमेकांना साहाय्य केलेले आहे आणि भविष्यातही आमच्या या जिव्हाळ्याच्या संबंधात काही बाधा येईल असे मला तरी वाटत नाही. एकदा आम्ही परदेशातही एकत्र प्रवास केला आहे. आम्ही बहामात गेलो होतो. तिथेही त्यांना अवगत असलेल्या एका कलेचा मला प्रत्यय आला. मला पोहण्याची फार गोडी! आम्ही समुद्रावर पोहायला गेलो. तोवर माझी अशी कल्पना होती की, मीच समुद्रात जास्त पोहू शकतो; पण प्रत्यक्षात श्री. गवईच जास्त पोहतात. कोणत्याही चांगल्या कामात अडथळे निर्माण न करता सर्वांनाच मदत करण्याचा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. दलितांना, गरिबांना, उपेक्षितांना आणि समाजातील कमजोर घटकांना श्री. गवईंनी सढळ हाताने मदत करून त्यांच्या समस्या सोडविण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मैत्रीच्या कक्षेत सर्वच समाविष्ट आहेत. विरोधकांना देखील त्यांनी कधी अलग मानले नाही. पक्षभेदामुळे वैचारिक भिन्नता असू शकते; पण पक्षद्वेष करून त्यांनी शत्रुत्व कधीच केले नाही आणि त्यामुळेच विरोधकांनाही ते तितकेच प्रिय आहेत जितके स्वपक्षीयांना आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी तर ते पूर्णपणे एकरूप झालेले आहेतच; पण त्याचबरोबर देशातील व जगातीलही महान नेत्यांच्या विचारांचा पगडा त्यांच्या आचारविचारांतून नेहमीच जाणवतो.

श्री. गवईंनी विधानपरिषदेचे सभापती या नात्याने चिरस्मरणीय कामगिरी बजावलेली आहे. आता ते लोकसभेचीही गरिमा राखतील याची मला पूर्ण खात्री आहे. श्री. गवई ग्रामीण जीवनात वाढलेले आहेत. ग्रामीणांच्या सुखःदुखाशी ते समरस झालेले असल्याने त्यांच्या समस्यांची त्यांना पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे ग्रामीणांच्या गरिबीला ते नव्या प्रकाशाने संसदेत वाचा फोडतील व जगाचा प्रवास केलेला असल्याने त्यांच्या स्वभावानुसार ते सर्व देशातील चांगुलपणा संसदेत आणण्याचा प्रयत्न करतीलच ह्याचीही मला पूर्ण खात्री आहे. केवळ राजकीय दृष्टीनेच नव्हे, तर लोकशाही यशस्वी करण्यासाठी सामाजिक, आर्थिक व धार्मिक दृष्टीने त्यांच्या परिपक्व विचारांची आज देशाला नितांत आवश्यकता आहे. त्यांच्या अनुभवांची साथ निरंतर मिळेल असा मला विश्वास आहे.

-माजी केंद्रीय मंत्री, राज्यपाल व
माजी लोकसभाध्यक्ष.

(साभार : दादासाहेब -एक अलौकिक व्यक्तिमत्त्व)

❑❑

एक उत्तम सभापती

▪ दिलीप वळसे-पाटील

रा. सू. गवई ऊर्फ दादासाहेब गवई यांच्याशी माझा जेव्हा जेव्हा संपर्क आला तेव्हा कोणत्याही विषयाच्या, राजकीय पक्षाच्या आणि सामाजिक विचारसरणीच्या भिंतीचा पडदा मध्ये न येता मनमोकळेपणाने आणि तितक्याच गांभीर्याने अनेक विषयांवर चर्चा करण्याचा मला योग आला. त्यांच्याशी बोलताना वयाचेही अंतर अलगदपणे गळून पडत असे. मी विधानसभा अध्यक्ष या नात्याने पीठासीन अधिकारी पदाची जबाबदारी २००९-२०१४ पर्यंत सांभाळली, त्या काळात रा. सू. गवई यांचा आदर्श माझ्या डोळ्यांसमोर होता. सभागृहातील सदस्यांच्या टोकांच्या भूमिकांमध्येही समन्वय निर्माण करून सभागृहाचे कामकाज सौहार्दतेने पुढे कसे न्यायचे याबाबतीत त्यांची हातोटी मला माहीत असल्यामुळेच अध्यक्षपदाच्या जबाबदारीचे निर्वहन करताना मला सोपे गेले, इतकेच नव्हे-तर दादासाहेबांचे कार्य आणि त्यांनी घेतलेले निर्णय मला खूपच मार्गदर्शक ठरले.

एक उमदे, हरहुन्नरी, अजातशत्रू व्यक्तिमत्त्व या रूपात मी त्यांना ऐकत आणि पाहात आलो होतो. लोकशाही राज्यप्रणालीतील मताधिक्याने सत्तेच्या समीप जाता येते हे तत्त्व आदरणीय रा. सू. गवई यांनी खोटे ठरविले आणि स्वत:च्या पक्षाचा एकही आमदार विधानसभेत नसतानाही सतत ५ वेळा विधानपरिषदेवर निवडून येण्याची किमया त्यांनी केली. स्वकर्तृत्वावर १९६८ ते १९७८ पर्यंत सलग १० वर्षे विधानपरिषदेचे उप सभापती आणि १९७८ ते १९८२ अशी ४ वर्षे त्यांनी विधानपरिषदेचे सभापती म्हणून कीर्ती मिळविली. १९८६ ते १९८८ अशी दोन वर्षे विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते या भूमिकेतून शासनाला धारेवर धरण्याचे कार्यही चोखपणे बजावले. उप सभापती आणि सभापती असताना त्यांनी सभागृहाला अत्युच्च उंचीवर नेले. सभागृहाचे वातावरण कितीही तापले तरी ते शांत करण्याची त्यांची हातोटी निश्चितच वाखाणण्यासारखी होती. सभागृहावर नियंत्रण ठेवताना शासनाला सांभाळून घेण्याची भूमिका आणि विरोधी पक्षाला न्याय देण्याची त्यांची भूमिका अद्वितीय अशीच होती. त्यासाठी संसदीय कार्यप्रणालीचा आणि भारतीय राज्यघटनेचा सखोल अभ्यास असणे अत्यावश्यक असते आणि या दोन्ही गोष्टी त्यांच्याकडे पुरेपूर होत्या. त्यामुळे सभागृहाचे वातावरण हसते-खेळते ठेवण्याचे कार्य त्यांना सहजपणे करता आले. त्यांच्या कार्यकाळात ज्या विधानपरिषद सदस्यांनी त्यांना पाहिले, अनुभवले ते त्यांना कधीच विसरू शकणार नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा त्यांच्यावर असलेला पगडा आणि भारतीय राज्यघटनेचा सखोल अभ्यास यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले आणि त्या व्यक्तिमत्त्वाचा महाराष्ट्राच्या राजकारणाला आणि समाजकारणाला भरीव फायदा झाला.

अमरावती खुल्या लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविणे आणि जिंकून येणे लोकांना अशक्यप्राय वाटत होते, पण ती किमयाही रा. सू. गवई यांनी करून दाखविली. २००० ते २००६ या कालावधीमध्ये त्यांनी राज्यसभेतही प्रतिनिधित्व केले. २००६ ते २००८ या काळात त्यांनी बिहारचे राज्यपालपद भूषविले. यावरून रा. सू. गवई ही कुणी एकटी-दुकटी व्यक्ती नव्हती, तर ती एक चळवळ

होती हे आपल्या सहज लक्षात येईल. दीक्षाभूमीच्या उभारणीचे मोलाचे कार्यही त्यांनी केले. त्यांच्या या समर्पित वृत्तीमुळेच जागतिक स्तरावर वाखाणलेली दीक्षाभूमीची वास्तू दिमाखाने उभी राहिली. आज ती वास्तू कोट्यवधी नागरिकांचे प्रेरणास्थान बनून राहिली आहे.

आदरणीय रा. सू. गवई यांचे विधानपरिषद सदस्य, विधानपरिषदेचे उप सभापती आणि विधानपरिषदेचे सभापती म्हणून केलेले कार्य महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना आणि राज्यकर्त्यांना निरंतर मार्गदर्शक ठरणारे आहे.

-माजी विधानसभा अध्यक्ष.

❑❑

A job half done
Gavai worked hard to boost higher education in State

▪ **Arun Kumar**
Patna, June 27

During his two-year stint, Governor-cum-Chancellor changed the way people looked at higher education. He initiated some tough measures, which were unheard of earlier. Though he could not revamp higher education the way in his brief stay he did manage to bring it into sharp focus.

One of his revolutionary initiatives was the concept of ' Inspection of colleges'.

Soon after taking over, Gavai brought in Dr. R. Krishna Kumar as his Special Officer to do away with gross absentecism in colleges. The Inspections took higher education by storm, as initially teachers took it as an affront.

However, there was no looking back for Gavai. He came out in full support of inspections and even asked the Vice Chancellors to start visiting colleges. He made it clear that the VCs must stay at the headquarters and the teachers must be present in their respective institutions for at least five hours.

मानसपुत्र मानणारे दादासाहेब

▪ प्रवीण पोटे-पाटील

दिवंगत माजी राज्यपाल रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांनी मला त्यांचा मानसपुत्र म्हणून स्वीकार केला होता. ते मला माझ्या वडिलांच्या जागी होते. त्यांचा जन्म ३० ऑक्टोबर, १९२९ रोजी खेडेगावात दारापूर, ता. दर्यापूर, जिल्हा अमरावती येथे झाला. त्यांचे संपूर्ण शिक्षण अमरावती जिल्ह्यातच झाले होते. सन १९५२ साली त्यांची मागासवर्गीय संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. समाजातील दलितांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी कित्येकदा कारावास भोगला होता. याच चळवळीच्या काळात ते विद्यार्थीजगात 'किंगमेकर' म्हणून ओळखले गेले.

सन १९५५ पासून ते कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या प्रत्यक्ष सहवासात आले. त्यांनी रिपब्लिकन पक्षामध्ये सक्रिय भाग घेऊन समाजहितासाठी वर्षातून ३६० सभा आयोजित केल्या. विदर्भातील समाजामध्ये बौद्धधम्मांची दीक्षा घेण्याबाबत प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच समाज प्रबोधन करण्यासाठी त्यांनी जनजागृतीही केली होती. अमरावती येथे त्यांनी जनजागृतीसाठी जाहीर सभेचे आयोजनही केले होते. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या सहवासात आल्यानंतर त्यांनी त्याच वर्षी डॉ. आंबेडकरांची जयंती धूमधडाक्याने साजरी केल्यामुळे त्याचे श्रेय त्यांना मिळाले. त्यानंतर लोकांसमोर पब्लिक स्पीकर म्हणून ते उदयास आले.

सन १९५७ मध्ये अन्याय व अत्याचार विरोधी त्यांनी केलेल्या प्रक्षोभक भाषणांमुळे त्यांना हद्दपार व क्षेत्रबंधनही करण्यात आले होते. भूमिहिनांची चळवळ तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. देशव्यापी सत्याग्रहात भाग घेऊन नाशिक जेलमध्ये त्यांना कारावासही झाला होता. सन १९५९ मध्ये त्यांची विदर्भ रिपब्लिकन सचिव म्हणून निवड करण्यात आली होती. सन १९६२ मध्ये विदर्भातील आठही जिल्ह्यांतून निवडून आलेल्या वीस आमदारांचे नेतृत्वही केले होते. त्यांची सन १९६४ साली महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती.

विदर्भाच्या चारही जिल्ह्यांतून कामदाऱ्या सोडणे, मेलेल्या ढोरांचे मास खाणे आदी घाणेरड्या प्रवृत्ती बंद करण्यात त्यांना मोठे यश मिळाले होते. मागासवर्गीय समाजातल्या अनिष्ट रूढींना प्रतिबंध करण्याचे श्रेय त्यांना देण्यात येते. अशा प्रकारे त्यांनी त्यांचे सर्व आयुष्य दलित चळवळीसाठी व्यतित केले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्थेची त्यांनी सन १९६६ मध्ये स्थापना केली होती. सन १९६८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून त्यांची निवड करण्यात आली होती. सन १९७० साली समाजकल्याण खात्याच्या हायपॉवर कमिटीचे ते सदस्य होते. त्यांनी सन १९७२ साली अमरावतीला आंबेडकर महाविद्यालयाची स्थापना केली.

माझे आणि माननीय दादासाहेबांचे अतिशय जवळचे स्नेहपूर्ण संबंध होते. मला ते त्याचा मानसपुत्र मानत होते. माझे त्यांच्याशी कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्यांच्या निधनाच्या वेळी मी त्यांचा एक मुलगा म्हणून त्यांच्या पार्थिवदेहाला खांदा देऊन मुलाचे कर्तव्य बजावले.

आज अमरावती जिल्ह्यात त्यांनी केलेल्या कार्याची आठवण सतत लोकांच्या मनात ठासून भरलेली आहे. ते सर्वांचेच दादासाहेब होते. समाजकारण, राजकारण आणि

संसदीय कार्यप्रणालीमध्ये त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. दादासाहेब हे एक चतुरस्र व्यक्तिमत्त्व होते. बिहार, सिक्कीम आणि केरळ या राज्यांचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी उत्तमरीत्या जबाबदारी पार पाडली होती. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य, सभापती, उप सभापती व विरोधी पक्षनेता अशा विविध भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. एक उत्कृष्ट संसदपटू, कुशल प्रशासक, सामाजिक प्रश्नांची सखोल जाण असणारे एक संवेदनशील व अभ्यासू राजकीय नेतृत्व म्हणून त्यांची ख्याती होती. विधिमंडळ, लोकसभा, राज्यसभा सदस्य व राज्यपाल या पदावर असताना त्यांनी केलेल्या गाजलेल्या भाषणांचे संकलन आजही लोकांच्या मनात घर करून बसले आहे. हा युवा पिढीसाठी एक आदर्श आहे.

अमरावती जिल्ह्यात दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे स्मारक होण्यासाठी मी सतत पाठपुरावा केला आणि माझ्या प्रयत्नांना यश मिळाले. जुलै महिन्यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे दिवंगत माजी राज्यपाल माननीय श्री. रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे भूमिपूजन करण्याचा मान अमरावतीचा पालकमंत्री या नात्याने मला मिळाला हे मी माझे परमभाग्य समजतो.

मला त्यांनी आपला मानसपुत्र मानले हे माझे भाग्यच आहे, असे मी समजतो. अशा थोर व्यक्तीचा मला सहवास लाभला ही माझी पुण्याई समजतो. आजही त्यांनी केलेल्या समाजाच्या कार्याचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून त्यांच्या-सारखेच जनहितासाठी, समाजासाठी व लोकहितासाठी कार्य करण्याची माझी परिपूर्ण इच्छा आहे. हीच माझी त्यांना खरी श्रद्धांजली आहे.

-पालकमंत्री, अमरावती जिल्हा.

❑❑

दलितांचे कैवारी

दादासाहेबांच्या यशस्वितेबरोबरच आपले चारित्र्य आणि नैतिकता त्यांनी प्रकर्षाने जोपासली आहे. कुठल्याही भानगडीच्या किंवा भ्रष्टाचाराच्या प्रकरणात त्यांचे नाव गोवले गेलेले मी आजपर्यंत कधी ऐकलेले नाही.

श्री. गवईंनी समाजाने उपेक्षित केलेल्या, मानवी हक्कांपासून वंचित असलेल्या आणि शासनानेही थोड्या प्रमाणात का होईना पण दुर्लक्षित केलेल्या आपल्या दलित बांधवांच्या कल्याणासाठी व त्यांना मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी फार मोलाचे कार्य केले आहे. खऱ्या अर्थाने ते दलितांचे कैवारी आहेत. पण त्याचबरोबर त्यांनी फक्त दलितांसाठीच कार्य केले असे म्हणणेही चुकीचे आहे, कारण संपूर्ण समाजाचे हित दृष्टीसमोर ठेवून त्यांनी अनेक योजना आखल्या आहेत आणि त्या कार्यान्वित केलेल्या आहेत. त्यामुळेच जातीयवादी असे त्यांना संबोधणे म्हणजे त्यांनी केलेल्या समाजसेवेचा अपमान करणे आहे, असेच मी समजतो.

-मुरली देवरा
माजी केंद्रीय मंत्री

बहुआयामी नेतृत्वाचे नाव

▪ दत्ता मेघे

मा. गवई साहेब म्हणजे संसदीय लोकशाही पद्धतीचे एक चालते-बोलते विद्यापीठच होते. अत्यंत व्यासंगी आणि अभ्यासू असलेले गवई साहेब, उत्तम वक्ते आणि जाणते नेते होते. त्यांच्या सोबत अनेक वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली. साधारणतः १२ वर्षे महाष्ट्राच्या विधिमंडळात आणि ६ वर्षे राज्यसभेत आम्ही सोबत काम केले. मी विधानपरिषदेत विरोधी पक्षनेता असताना मा. गवई परिषदेचे सभापती होते. या संपूर्ण काळात आमचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि निकटचे होत गेले. इतक्या वर्षाच्या त्यांच्या सहवासात आणि घडलेल्या प्रसंगांच्या आठवणी आजही माझ्या मनात ताज्या आहेत.

या जगात जी माणसं स्वकर्तृत्त्वावर मोठी झाली, त्यांचा जीवन प्रवास खडतर होता. संघर्षाच्या आणि संकटाच्या मालिका त्यांच्या स्वागतासाठी उभ्या होत्या. नियती त्यांची सत्व परीक्षा घेत होती. तरीही मोडून न पडता ही माणसं संकटांवर स्वार झाली. जीवनाबद्दलची निष्ठा, प्रचंड ध्येयवाद, दुर्दम्य इच्छाशक्ती, अथक परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर त्यांनी मोठी झेप घेतली. म्हणूनच त्यांचा जीवन ग्रंथ संपन्न आणि समृद्ध झाला. इतरांसाठी तो प्रेरणादायी ठरला. विदर्भाचे लाडके सुपुत्र स्व. श्री. रा. सू. गवई यांचा जीवनपट हा असाच बहुआयामी आणि प्रेरणादायी राहिला आहे. स्वकर्तृत्वाने त्यांनी राष्ट्रीय आणि आंततराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविला. त्यांची स्मृती नव्या कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरेल हे निश्चित.

मा. गवई साहेबांचे व्यक्तिमत्व आणि त्यांची कार्यप्रणाली निश्चितच अनुकरणीय राहील. त्यांच्याकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे. एक सामान्य कार्यकर्ता ते राज्यपाल हा संपूर्ण प्रवास म्हणजे एक प्रेरणादायी अध्यायच म्हणावा लागेल. म्हणून त्यांना मी माझे मार्गदर्शक मित्र म्हणत होतो. एक उत्कृष्ट संसदपटू, कुशल प्रशासक, सामाजिक प्रश्नांची सखोल जाण असणारे, संवेदनशील आणि अभ्यासू राजकीय नेतृत्व म्हणून त्यांचा नावलौकिक होता. राजकारणापलीकडे मैत्री जपणारे एक व्यक्तिमत्त्व आणि संसदीय कामकाजाचे प्रगाढ ज्ञान असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे दादासाहेब गवई होत. तळागाळातील लोकांच्या प्रश्नांसाठी आयुष्य वेचणारे एक सामाजिक कार्यकर्ता ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय आणि सामाजिक चळवळीला अधिक सुदृढ करणारे नेते अशा विविधांगी भूमिकांमध्ये मी त्यांना पाहिले आहे.

मा. दादासाहेबांचा जन्म ३० ऑक्टोबर १९२९ रोजी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील गवई कुटुंबात झाला. बालपणापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या नेतृत्वाचा आणि सामाजिक चळवळीचा प्रभाव त्यांच्या मनावर सखोल कोरला गेला. हीच प्रेरणा त्यांच्या पुढील आयुष्याला आणि कार्यकर्तृत्वाला आकार देणारी ठरली. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असतांनाच हळूहळू ते राजकीय क्षेत्रात आपले स्थान बळकट करत गेले. आपल्या राजकारणाचा आणि राजकीय पदाचा उपयोग तळागाळातील आणि दीनदलित लोकांना व्हावा याकडे त्यांचा कल रहायचा. १९६४ पासून आयुष्याच्या शेवटपर्यंत ते कुठल्या ना कुठल्या राजकीय पदावर राहिले. १९६४ ते १९९४ या काळात ते विधानपरिषदेचे सदस्य राहिले. याच दरम्यान १९६८ ते १९७८ ते विधानपरिषदेचे उप सभापती राहिले आणि १९७८ ते १९८२ ते सभापती पदावर राहिले. १९८६ ते १९८८ या काळात त्यांनी विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते म्हणून भूमिका बजावली. १९९८ मध्ये ते अमरावती लोकसभा

एचबी ११८०—६

क्षेत्रातून खासदार म्हणून निवडून गेले तर २००० ते २००६ या काळात राज्यसभेचे सदस्य राहिले. इतकेच नव्हे तर २००६ मध्ये ते बिहार राज्याचे राज्यपाल झाले. या काळात सिक्कीम राज्याचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी काही काळ अतिरिक्त कार्यभार सांभाळला. १० जुलै २००८ रोजी त्यांनी केरळ राज्याचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. हा प्रदीर्घ काळ त्यांचे संसदीय कामकाजाचे प्रगाढ ज्ञान दर्शविणारा आणि त्यांना उत्तम संसदपटू म्हणून नावलौकिक मिळवून देणारा ठरला.

मा. दादासाहेब गवई यांनी शिक्षण क्षेत्रातही भरीव कामगिरी केली आहे. त्यांनी अमरावती येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. या संस्थेतर्फे अमरावती आणि नागपूर येथे उत्तम दर्जाचे महाविद्यालय सुरू केली. त्याच्या सामाजिक आणि राष्ट्रीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना कुष्ठमित्र ॲवार्ड, नॅशनल इंटिग्रेशन ॲवार्ड फॉर पिस अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. स्व. दादासाहेबांचे नाव इतिहासात नोंद राहील असे कार्य म्हणजे त्यांनी स्थापन केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती नागपूरच्या वतीने करण्यात आलेले कार्य होय. नागपूरच्या ऐतिहासिक आणि पावन दीक्षाभूमीवर त्यांच्या नेतृत्वात उभे झालेले स्तूप मा. दादासाहेबांच्या कार्याची कायमस्वरूपी आठवण देत राहणारे ठरले आहे.

मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर प्रगाढ निष्ठा आणि डॉ. आंबेडकरांचे जीवन हीच प्रेरणा घेऊन गवई साहेबांनी आपला जीवन प्रवास सुरू केला. आपल्या ध्येय्याप्रती आणि आपल्या कार्यावर निष्ठा ठेवून जिद्दीने जीवन प्रवास सुरू केला की माणूस यशाची आणि नेतृत्वाची अनेक शिखरे पादाक्रांत करतो. आयुष्यात यशस्वी ठरतो आणि नेतृत्व स्वत:कडे खेचून आणतो. गवई साहेबांनीही असेच स्व:कर्तृत्वाने नेतृत्व मिळविले होते. त्यांच्या राजकारणाला खऱ्या अर्थाने सामाजिक झालर आहे. राजकारण हे समाजासाठी कसे करावे हे त्यांच्या कार्यावरून आपण शिकू शकतो. राजकारणाला समाजकारणाची जोड दिली की सामाजिक उन्नती निश्चित होते हे वेगळे सांगण्याची गरज नाही. याच सामाजिक उन्नतीसाठी मा. गवई साहेबांनी आपले आयुष्य वेचले. यात त्यांच्या तळमळीतून नागपूरच्या दीक्षाभूमीवर उभे झालेले स्तुप आज आंतरराष्ट्रीय श्रध्देचे स्थान झालेले आहे. हे स्तुप मा. दादासाहेबांची आठवण सतत तेवत ठेवणारेही ठरले आहे.

-माजी मंत्री तथा माजी खासदार.

❑❑

डॉ. आंबेडकर चरित्रखंड प्रकाशन

डॉ. बाबासाहेब आंबडकरांचे मौलिक विचारधन लोकांपर्यंत नेता यावे यासाठी मा. दादासाहेब गवईंचे प्रयत्न फार मोठे आहेत. त्यांच्याच कल्पकतेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने समिती निर्माण झाली. त्यातून आतापर्यंत १८ खंड प्रकाशित झाले. ग्रंथनिर्मितीच्या कामाकडे त्यांचे पूर्ण लक्ष आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मौलिक विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीने या समितीला स्थायी स्वरूप देण्याचा त्यांनी संकल्प केला आहे.

-प्रा. डॉ. म. ल. कासारे
वर्धा.

एचबी ११८०—६अ

संवैधानिक लोकशाहीचा सजग प्रहरी !

▪ प्रा. जोगेन्द्र कवाडे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूलभूत मानवी मुल्यांवर अढळ निष्ठा असलेले दादासाहेब गवई हे चतुरस्र व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. मुत्सद्दी, चतुर राजकारणी, सर्वसमावेशकता या गुणांनी संपृक्त असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचे नेते, मित्र पक्ष असोत की विरोधक यांच्यामुळे त्यांच्या मैत्रीच्या कक्षा सतत विस्तारित होत गेल्यात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर त्यांची अक्षुण्ण निष्ठा होती. संघर्षातून सत्तेकडे आणि सत्तेचा सढळ हस्ते वापर समाजसेवा व समाजोत्थानासाठी त्यांनी केल्याचे पदोपदी जाणवते. मुळातच सामाजिक पिंड असलेल्या दादासाहेबांनी राजकीय सत्तास्थानांचा वापर सामाजिक परिवर्तनाचे हत्यार म्हणूनच केला.

रिपब्लिकन चळवळीचा नेता व त्याचा पक्ष म्हणजे विशिष्ट जातीचा असा असलेला गैरसमज दादासाहेबांनी त्यांच्या कौशल्यपूर्ण राजकीय मुत्सद्देगिरीने खोटा ठरविला. बौद्ध, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, बहुजन आदींना रिपब्लिकन पक्षात मानाची पदे देऊन निवडणुकीत, प्रतिनिधित्व देऊन रिपब्लिकन पक्षाची सर्वसमावेशकता त्यांनी सिद्ध केली. समताभाव, मैत्रीपूर्ण व्यवहार व सर्व समाजसमुहांप्रतीची आत्मीयता त्यांच्या दिलदार व्यक्तिमत्त्वाची ग्वाही देतील.

धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव, विविधतेत एकता ही अशी नवनिर्माणाची नवीन संस्कृती संविधानाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून देशाची एकात्मता व अखंडतेला शाश्वत आधार दिला. याच तत्त्वज्ञानावर आधारित राजकारण समाजकारण करीत असतांना दादासाहेबांनी सातत्याने पुरोगामी तत्त्वनिष्ठा जपली. राजकीय जीवनात साधनशुचिता व चारित्र्य याची जपणूक अपरिहार्य असते. राजकीय, सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाक्षेत्र आदि क्षेत्रातील त्यांचा वावर म्हणूनच विश्वसनीय ठरला.

बहुजनांचे नेते भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख, संत शिरोमणी वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कुष्ठरोग आश्रमाचे श्री. शिवाजीराव पटवर्धन आदि मान्यवरांचा सहवास दादासाहेबांना लाभला. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वात देशव्यापी भूमिहिनांच्या सत्याग्रहात दादासाहेब गवईंच्या नेतृत्वात अमरावती येथे ऐतिहासिक सत्याग्रह व जेल भरो आंदोलन झाले. त्यातूनच त्यांच्या धाडसी व आक्रमक नेतृत्वास लोकमान्यता मिळाली.

बहुश्रृत व बहुआयामी व्यक्तित्व असलेल्या दादासाहेबांना वाचनाचा व लिखाणाचा देखील छंद होता. आरक्षण, बौद्धांच्या सवलती, पदोन्नतीमध्ये आरक्षण, ओबीसी समाजाचे मंडल आरक्षण, संविधानाचे विवेचन अशा विविध विषयांवरील लिखाणाद्वारे त्यांनी केलेली वैचारिक मांडणी महत्त्वपूर्ण अशी आहे.

संसदीय लोकशाहीवर त्यांची अढळ निष्ठा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला प्रदान केलेली राज्यघटना म्हणजे भारताला जगाची महानशक्ती बनविणारी अनमोल देणगी अशी दादासाहेबांची धारणा होती. संविधानाशी इमान राखून प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्यात सरकार असमर्थ ठरले तर देशाची अखंडता व एकात्मता धोक्यात येण्याची भीती आहे. म्हणूनच संविधानाची समीक्षा असो की संविधान हटविण्याचे कट-कारस्थान असो, दादासाहेब अशा प्रवृत्तीवर तुटून पडायचे.

जातीयद्वेष्ट्या अरुण शौरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बदनामी करणारे व देशाच्या संविधानाचा अपमान करून देशाच्या एकात्मतेला आव्हान देणारे 'वर्शिपींग फॉल्स गॉड' हे पुस्तक लिहिले तेव्हा संतप्त झालेल्या दादासाहेबांनी भर राज्यसभेत अरुण शौरीच्या या राष्ट्रद्रोही पुस्तकाचे तुकडे करून चिरफाड केली.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या पश्चात नागपूर स्थित पवित्र दीक्षाभूमीचा कार्यभार गवई साहेबांकडे आला. तेव्हा परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे कार्याध्यक्ष ॲड. ना. ह. कुंभारे व इतर सहका-यांसोबत दीक्षाभूमीचा अप्रतिम विकास त्यांनी घडवून आणला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या न भूतो न भविष्यती अशा धम्मक्रांतीचे केंद्र 'पवित्र दीक्षाभूमी' जागतिक तीर्थ झाले आहे. आंतरराष्ट्रीय बौद्ध जगतामध्ये दादासाहेबांनी विशेष स्थान निर्माण केले. विश्व बौद्ध परिषदेच्या उपाध्यक्ष पदाने त्यांना गौरविण्यात आले. विश्व स्तरावर हा सन्मान प्रथमच दादासाहेबांच्या रूपाने भारतीय बौद्धास प्राप्त झाला.

विधानपरिषदेचे सदस्य, उप सभापती, विरोधी पक्षनेते, सभापती, बिहार व केरळचे राज्यपाल अशी त्यांची कारकीर्द अनेक अर्थाने गाजली. हजरजबाबीपणा, विनम्रता सभागृहातील तणावपूर्ण वातावरण आपल्या मिश्कील स्वभावाने हसतखेळत ठेवण्याचे त्यांचे कौशल्य त्यांच्या अनुभवी राजकीय चातुर्याची प्रचिती देते. विधान परिषदेचा त्यांचा कार्यकाळ अत्यंत यशस्वी व संस्मरणीय असाच होता. विरोधक व टिकाकार आज देखील त्यांच्या या कार्याचा दाखला देत असतात.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ऐक्य झाले आणि सन १९९८ मध्ये दादासाहेबांच्या नेतृत्वात लोकसभेचे चार खासदार निवडून आले. मा. रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, खुद्द दादासाहेब व चिमूर लोकसभा क्षेत्रातून मी निवडून आलो. आम्ही खासदार झालो. रस्त्यावरील आंदोलने, चळवळी, लाठीहल्ला, जेलयात्रा अशा आंदोलनातील आक्रमक भीमसैनिक असलेल्या माझ्यासारख्या नवख्या खासदाराला संसदीय कामकाज शिकण्याची संधी त्यांच्याकडूनच मिळाली.

एक गोष्ट मला आवर्जून नमूद करावीशी वाटते, ती ही की, दादासाहेब गवईंच्या यशस्वी व नेत्रदीपक वाटचालीत त्यांची पत्नी सौ. कमलताई यांचा मोलाचा वाटा आहे. दादासाहेबांची सावली बनून त्यांच्या खांद्याला खांदा लावून सौ. कमलताईंचा चळवळीतील सक्रिय सहभाग महिला वर्गाला प्रेरणा देणारा ठरेल.

अजातशत्रू असलेले दादासाहेब राजकारणापलीकडे मैत्री जपणारे होते. संसदीय कामकाजाचे प्रगाढ ज्ञान व समृद्ध अनुभव असलेले संसदपटू, उपेक्षित, वंचित, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, अल्पसंख्याक समाज, भटके-विमुक्त आदिवासी कष्टकरी कामगार अशा समाज समुहासाठी आयुष्य वेचणारे लोकनेते अशी त्यांची प्रतिमा होती.

फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वैचारिक वारसा घेऊन सामाजिक, राजकीय शैक्षणिक व धम्म चळवळीला समर्पित असलेले दादासाहेब आम्ही पाहिले-अनुभवले आहेत. 'मी प्रथम व अंतिमतः देखील भारतीय आहे.' अशा प्रखर राष्ट्रवादाचे उद्‌गाते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श जोपासून जातीविहीन समाजव्यवस्थेद्वारे देशाच्या नवनिर्माणासाठी दादासाहेब रा. सू. गवई यांनी अविरत पराकाष्ठा केली. त्यांच्या अविस्मरणीय स्मृतीस विनम्र अभिवादन.

-सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद.

❑❑

निःपक्ष आणि कर्तबगार सभापती

▪ मा. गो. वैद्य

मी १९७८ साली महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य बनलो. त्यावेळी रा. सू. गवई हे विधानपरिषदेचे सभापती होते. माझी वि. प. वर नियुक्ती राज्यपालांकडून झाली होती. मी अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथे एका कार्यक्रमासाठी आलो असताना, मोर्शीच्या पोलीस अधिकाऱ्याने मला शपथविधीची तारीख कळविली. त्या दिवशी मी शपथविधीला जाऊ शकलो नव्हतो. कारण नागपूरलाही मी काही कार्यक्रमांसाठी वचनबद्ध होतो. मी नंतर माझ्या सोयीची तारीख गवई साहेबांना कळविली अणि त्यांनी त्या दिवशी केवळ एकट्याला मलाच शपथ दिली. पण त्यासाठी त्यांनी दूरदर्शनची खास व्यवस्था केली होती. या कृपेने मी खरेच भारावून गेलो होतो.

आमदारांचे गट

दर रविवारी आम्ही नागपूरकर आमदार मंडळी मुंबईला अधिवेशनासाठी जात असू आणि शुक्रवारी सायंकाळी मुंबईवरून नागपूरला परत येत असू. त्यावेळी आजच्यासारखी ए. सी. ची व्यवस्था गाडीत नव्हती. आम्ही प्रथम श्रेणीच्या डब्यातून प्रवास करीत असू. साधारणतः आमदारांचेही तीन गट पडून जात. उत्तेजक पेयाची आवड असणाऱ्यांचा एक गट असे. दुसरा पत्त्यांचा खेळ खेळणाऱ्यांचा आणि तिसरा नाना विषयांवरील गप्पाष्टकांमध्ये रमणाऱ्यांचा. हा गट साधारणतः मी ज्या डब्यात बसलेला असे, तेथे एकत्र होई. राजुऱ्याचे शंकरराव देशमुख आणि डॉ. श्रीकांत जिचकार हे आवर्जून तेथे येत. गवई साहेब सामान्यतः बडनेऱ्यावरून गाडीत बसत असत; त्यांचा मुक्काम अमरावतीला असे. या गप्पाष्टकातील त्यांच्या सहभागासंबंधी आता माझ्या स्मरणात विशेष काही नाही.

मी आणि शेती

परंतु एकदा ते नागपूरवरून आमच्या बरोबर प्रवास करीत असल्याचे स्मरते. सिंदी स्थानकावर गाडी आली असताना मी गवई साहेबांना म्हणालो की, आम्ही या स्थानकावर किंवा त्याच्या पुढच्या तुळजापूर स्थानकावर उतरून बैलगाडीने आपल्या तरोडा या गावी जात असतो. त्यावरून शेतीसंबंधी चर्चा सुरू झाली. आम्ही म्हणजे मी आणि मी आणि माझे कनिष्ठ बंधू हे केवळ शेती बघणारे नव्हतो. तिच्या व्यवस्थापनात आमचा सक्रिय सहभाग असे. मला बैलांचीही पारख होती. बैलाचे दात बघून मी त्याचे वय सांगू शकत असे. मी गावात असताना कुणी बैल खरेदी करणारे असले, तर मला आवर्जून तो बैल अगोदर दाखवायचे. माझ्या प्रयत्नांमुळे, नागपूरची बँक इंडियाची शाखा (बँकेची तेव्हा वर्धेला शाखा नव्हती-) आपल्या अधिकाऱ्याला आमच्या गावी पाठवीत असे. आमच्या घरी बँक भरे. त्याही काळात २० लाख रुपयांपर्यंत कर्जवाटप होत असे. गवई साहेबांना याचे नवल वाटायचे. १७ वर्षे प्राध्यापकी केलेल्या व नंतर वृत्तपत्र व्यवसायात संपादकीय विभागात कार्यरत असलेल्या माझ्यासारख्या 'बुद्धिजीवी' व्यक्तीला शेतीचे बी- बियाण्यांपासून खतापर्यंतच्या तपशिलाची एवढे बारीक माहिती असल्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटे.

विधानपरिषदेत

विधानपरिषदेच्या कामात मी फार सक्रिय नव्हतो. माझे प्रश्नही शेती व शिक्षण या दोन खात्यांच्या संबंधात असत. मी सहा वर्षांमध्ये फक्त एक ग्राहक संरक्षणासंबंधी विधेयक मांडले होते व सरकारतर्फे कायदा करण्याचे आश्वासन

मिळाल्यामुळे मी ते परत घेतले होते. तथापि, माझी उपस्थिती मात्र नियमित असे.

गवई साहेब सभापती असतानाच्या काळात काही काळ श्री. शरद पवार हे मुख्यमंत्री होते. भारतीय जनसंघ त्यांच्याबरोबर होता. एकदा श्री. गवई साहेब वि. प. चे सभापती असताना, त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सरकारच्या विरोधात मोर्चा काढला होता. मला ही गोष्ट आवडली नव्हती. विधानपरिषदेचा सभापती असो की विधानसभेचा अध्यक्ष असो, त्याचे वर्तन आणि व्यवहार निःपक्ष असले पाहिजेत, यावर माझा कटाक्ष असे. गवई साहेब वि. प. चे सभापती असताना, त्यांनी मोर्चा काढावा, हे मला आवडले नाही.

जुनी परंपरा

कारण मला जुनी परंपरा माहीत होती. १९५० साली आपले नवे संविधान अंमलात आले. त्यानुसार १९५२ साली निवडणुका होऊन प्रथम लोकसभा अस्तित्वात आली. त्या लोकसभेचे पहिले सभापती होते श्री. मावळणकर. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. काँग्रेसच्या तिकिटावरच निवडणूक लढून लोकसभेत आले होते. पण लोकसभेच्या सभापतीपदी निवड होताच त्यांनी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. इंग्लंडमध्ये तर फारच चांगली प्रथा आहे. मुख्य राजकीय पक्ष - आपण समजू एक काँझर्वेटिव्ह पक्ष आहे व दुसरा लेबर पक्ष आहे- प्रथम एकत्र बसतात आणि सभापतीपदाचा उमेदवार निर्विरोध निवडून यावा अशी व्यवस्था करतात. म्हणजे तो उमेदवार कोणत्याही पक्षाच्या शिस्तीशी किंवा धोरणाशी बांधील राहणार नाही, हे सत्य पक्ष अधोरेखित करीत असतात. आपल्याकडे अशी प्रथा नाही. त्यामुळे विशिष्ट पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेली व्यक्तीच सभापती बनते. ती त्या पदाचा महिमा राखण्यासाठी शक्यतोवर निःपक्ष व्यवहार करीत असते, तरी तिची सहानुभूती लपून राहत नाही. याला एक अपवादही अलीकडे घडलेला आहे. तो सोमनाथ चॅटर्जी यांचा. ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तिकिटावर लोकसभेत निवडून आले होते. त्यावेळी काँग्रेस व डावे कम्युनिस्ट यांचे सख्य होते. त्या सख्याच्या अटीनुसार सभापतीचे पद डाव्या कम्युनिस्ट पक्षाकडे गेले व सोमनाथ चॅटर्जी सभापती बनले. पण चॅटर्जी साहेबांनी आपल्या पक्षाचा राजीनामा दिला नव्हता. अपवाद फक्त मावळणकरांचाच असावा. पुढे काँग्रेस आणि डावा कम्युनिस्ट पक्ष यांचे फाटले. त्यांनी काँग्रेसला दिलेला पाठिंबा काढून घेतला आणि प्रधानमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव लोकसभेत मांडला. सोमनाथ चॅटर्जीनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला नसल्यामुळे, त्यांना पक्षाने आदेश दिला की त्यांनी सभापतीपदाचा राजीनामा देऊन अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान करावे. पण चॅटर्जीनी तो आदेश मानला नाही. ते म्हणाले की, मी आता सभापती असल्यामुळे मला पक्ष आदेश देऊ शकत नाही. नंतर पक्षाने त्यांना पक्षातून काढून टाकले हा भाग निराळा. त्यांच्यावर आरोपही झाला की अधिकारपदासाठी त्यांनी पक्षद्रोह केला.

अध्यक्ष निःपक्षपाती

मला येथे हे अधोरेखित करावयाचे आहे की, सभापती असो की अध्यक्ष, त्याची कोणत्या ना कोणत्या पक्षाशी बांधिलकी राहील, पण त्या व्यक्तीने त्या बांधिलकीच्या वर उठले पाहिजे. श्री. रा. सू. गवई सभापतीपदाची जबाबदारी निःपक्षपातीपणे पार पाडीत होतेच. पण त्यांनीच तत्कालीन सरकारच्या विरोधात एका मोर्चाचे आयोजन केले होते. हे मला आवडले नाही. म्हणून मी तरुण भारतात एक अग्रलेख लिहिला. त्याचे शीर्षक, माझ्या स्मरणाप्रमाणे 'श्री गवई : सभागृहातले आणि सभागृहाबाहेरचे' असे होते. या अग्रलेखात. सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात मी गवई साहेबांची प्रशंसाच केली होती. पण प्रश्नही उपस्थित केला

होता की, असे दुहेरी व्यक्तिमत्त्व असू शकते काय? आणि त्यांनी काढलेल्या मोर्चाबद्दल मी त्यांच्यावर टीका केली होती.

हक्कभंगाचा ठराव

त्या अग्रलेखावरून, मुख्य संपादक या नात्याने काँग्रेस पक्षीय सदस्यांनी माझ्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल केला. त्यात त्यांनी मी सभापतीची निंदा केल्याचा आरोप माझ्यावर ठेवला. त्यावर गवई साहेबांनी जो निर्णय दिला तो खरेच अभूतपूर्व मानावा लागेल. श्री. गवई म्हणाले, "परिषदेचा सभापती म्हणून अग्रलेखात माझी प्रशंसाच आहे. माझ्या राजकीय व्यवहाराबद्दल संपादकांना टीका करण्याचा अधिकार आहे." हा निर्णय देऊन त्यांनी हक्कभंग प्रस्ताव निरस्त केला.

विधान मंडळाचे अधिवेशन नागपूरला असताना हे सर्व घडले होते. काही कामास्तव मी त्या दिवशी सभागृहात उपस्थित नव्हतो. माझ्या अनुपस्थितीत गवई साहेबांनी मला न्याय दिला, माझ्यावरील हक्कभंगाचा ठराव अमान्य केला, याचे मला खूप अप्रूप वाटले; आणि मी मनोमन गवई साहेबांची प्रशंसा करून त्यांना धन्यवाद दिले. त्यानंतर ते रिपब्लिकन पक्षाच्या एका गटाचे प्रमुख राहिले तरी त्यांनी प्रत्यक्ष आंदोलनात भाग घेतला नाही. माझे त्यांचे संबंध पूर्वीसारखेच जवळिकीचे व जिव्हाळ्याचे राहिले.

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, गवई साहेबांचा गौरवग्रंथ प्रकाशित करीत आहे, ही अत्यंत औचित्यपूर्ण गोष्ट आहे. या निमित्ताने गवई साहेबांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो.

-माजी विधानपरिषद सदस्य
व ज्येष्ठ विचारवंत,
नागपूर.

❑❑

Gavai transfer takes JD-U by surprise

The sudden transfer of Governor R. S. Gavai from Bihar before completion of his tenure has surprised everyone. The move is being perceived as a violation of the recomendeations of the Sarkaria Commission, which clearly states, "The Governor's tenure of five years in a state should not be disturbed expect very rearely and that too, for some extremely compelling reasons."

In case of Gavai, who was appointed exactly two years ago, the Centre's decision is in contravention of the Commission's recommendations, "What was the compelling reason for the removal of the Governor? There seems to be no plausible explantion to it," said JD (U) national spokesperson, Shivanand Tiwary.

"It appears to be a purely political move by the UPA to pin down the NDA regime in Bihar, which had set an ideal example of governor government relationship. The RJD leaders are to be blamed for it. It also reflects the intolerance in Congress culture," said BJP national spokesperson, Rajiv Pratap Rudy.

▪ **Vijay Swaroop**
Patna.

संसदेतील दादा

▪ सुकृत खांडेकर

रिपब्लिकन पक्षाचे (गवई गट) संस्थापक रा. सू. गवई हे एक व्यक्तिमत्त्व, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. राज्य विधिमंडळात आमदार, विरोधी पक्षनेता, उप सभापती, सभापती नंतर लोकसभा व राज्यसभेत खासदार अशा प्रत्येक भूमिकेतून त्यांनी आपल्या संसदीय कामाचा ठसा उमटवला. स्वत:च्या पक्षाचा विधानपरिषदेत दुसरा आमदार नसतानाही सर्वांचा विश्वास प्राप्त करून ते उप सभापती आणि सभापती झाले. हे यश त्यांचे अलौकिक म्हणावे लागेल. लोकसभेवर ते १९९८ मध्ये अमरावती मतदारसंघातून निवडून गेले व २००० मध्ये ते राज्यसभेवर, खासदार झाले. मुंबई आणि दिल्लीत काम करताना एक पत्रकार म्हणून राज्य विधिमंडळातील व संसदेतील त्यांची कामगिरी जवळून पाहण्याची मला संधी मिळाली. त्यांच्या संसदीय वाटचालीचा मी एक साक्षीदार आहे.

गवई हे राजकारणातील रुबाबदार आणि राजबिंडे व्यक्तिमत्त्व होते. बंद गळ्याचा जोधपुरी सूट त्यांचा आवडता होता. राजशिष्टाचार व परंपरा यांचे पालन करण्यात त्यांचा कटाक्ष असायचा. एक उत्तम संसदपटू अशी त्यांची ख्याती होती. संसदीय कामकाजाचे नियम, परंपरा, घटनेतील तरतुदी, संसदीय भाषा व संसदीय आयुधांचा वापर यावर त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यामुळेच त्यांचे भाषण नेहमीच अभ्यासपूर्ण, रोखठोक व मुद्देसूद होत असे. त्यांच्या भाषेत आक्रमकपणा असायचा, पण कधी आक्रस्ताळेपणा नसायचा. संसदेत गोंधळ गदारोळाचे प्रसंग वारंवार घडतात. विरोधी पक्षाचे सदस्य आपल्या जागा सोडून अध्यक्षांच्या आसनाकडे धावतात, घोषणा देतात, कामकाज बंद पाडण्याचा प्रयत्न करतात. पण गवईंनी कधी असे आचरट प्रकार कधी केले नाहीत. विरोधी पक्षात राहूनही जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी आपली भूमिका कायम बजावली. विरोधी पक्षाचे खासदार म्हणून सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम त्यांनी केले. संसदेत मांडलेल्या प्रश्नांना सरकारला उत्तर देण्यास त्यांनी नेहमीच भाग पाडले. जनतेच्या प्रश्नांवर ते सरकारशी संघर्ष करीत पण त्यात कधी नाटकीपणा नव्हता. राज्य विधानपरिषदेत ते सभापती होते आणि राज्यसभेतही अध्यक्षांच्या तालिकेचे सदस्य होते. सभापतींच्या आसनावर बसून दोन्ही बाजूला न्याय देण्याचे ते काम करीत असत. विरोधी पक्षात असताना कोणता प्रश्न किती ताणायचा व कुठे थांबायचे हे त्यांना चांगले समजत असे. महाराष्ट्राच्या राजकारणात गवई हे दादा म्हणून परिचित होते व दिल्लीत खासदार झाल्यावरही सर्व पक्षातून लोक त्यांना दादाजी म्हणूनच ओळखू लागले. संसदेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर अभ्यासपूर्ण भाषणे करणाऱ्या मोजक्या खासदारांमध्ये त्यांचे नाव घेतले जायचे. त्यांच्या भाषणात जरब असायची पण आततायीपणा नसायचा. आपले आसन सोडून पुढे धावण्याची त्यांना कधी गरज भासली नाही. त्यांची वाक्याची फेक व शब्दांचा वापर यांत फार मोठी ताकद असायची. त्यांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते त्याचा त्यांना संसदेत मोठा फायदा झाला. महाराष्ट्राचे खासदार इंग्रजीत कमी पडतात व हिंदी मातृभाषा नसल्याने ते सराईत हिंदी भाषिकांप्रमाणे बोलू शकत नाहीत; पण गवईदादा इंग्रजी व हिंदीतही अस्खलित बोलत असत.

चर्चेत भाग घेण्यापूर्वी ते उत्तम गृहपाठ करायचे. संसदेच्या ग्रंथालयात जाऊन ग्रंथपाल शशिकांत बहिरट यांना भेटायचे व त्या विषयावरील पूर्वी झालेली चर्चा किंवा संदर्भ मागवून घ्यायचे (शशिकांत आता निवृतीनंतर नागपूर येथे स्थायिक झाले आहेत.) ग्रंथालय असो की संसदेचे सचिवालय सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांशी दादांचे चांगले संबंध असायचे.

कुटुंब प्रमुखाच्या भूमिकेतून ते संसदेतील कर्मचारी वर्गाची विचारपूस करायचे. राज्यसभेतील भाषणांनी त्यांनी अनेकांची मने जिंकली. डॉ. मनमोहन सिंग, प्रणव मुखर्जी, अर्जुन सिंग अशा अनेक दिग्गजांनी त्यांचे कौतुक केले होते.

गवईंची पत्नी कमलताई, मुलगा भूषण (न्यायमूर्ती) आणि डॉ. राजेंद्र त्याचा परिवार हा जनतेसाठीच होता आजही कार्यरत आहे. कार्यकर्ते असोत की सर्वसामान्य लोक घरी दादांना भेटायला येणाऱ्याचे आदरातिथ्य कधीही चुकले नाही. गवईंचे सचिव म्हणून शेवटपर्यंत काम करणारे ज. वि. गायकवाड यांनी गवईंना निष्ठेने साथ दिली. दादांच्या या एव्हरग्रीन सचिवांचा आम्ही पत्रकार मित्र नेहमीच देवानंद म्हणून उल्लेख करायचो. नंतर दादाही पुढे त्यांना प्रेमाने देवानंद म्हणून हाका मारू लागले.

गवईंचा सहवास म्हणजे निखळ आनंद असायचा. संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये गवई आले की त्यांच्याभोवती नेहमी गराडा दिसायचा. वेगवेगळ्या पक्षांचे खासदार आणि पत्रकार यांच्याबरोबर गवईंच्या गप्पा मनमुराद चालायच्या. रिपब्लिकन पक्षाचे गट अनेक; पण रामदास आठवले असोत की प्रकाश आंबेडकर हे गवईंसमोर दिसले की आपल्या दिशा विसरून त्यांची चौकशी करून पुढे जाणार, हे दृश्य अनेकदा बघायला मिळाले. बाराव्या लोकसभेत गवई निवडून आले व त्या लोकसभेच्या अध्यक्षपदी तेलुगु देसमचे जी. एम. सी. बालयोगी यांची निवड झाली. अटल बिहारी वाजपेयी, सोनिया गांधींपासून सर्वच पक्षाच्या नेत्यांनी बालयोगींचा दलित नेत्यांचा सन्मान असा उल्लेख केला. पण गवई म्हणाले, बालयोगी हे काही दलित आहेत म्हणून लोकसभेचे सभापती झालेले नाहीत. तर ते कार्यक्षम आहेत, उत्तम प्रशासक आहेत म्हणून त्याची पावती त्यांना सदनाने दिली आहे.

लोकसभेत विविध राज्यात पडलेल्या दुष्काळी परिस्थितीवर चर्चा चालू होती. त्यासंबंधी पंतप्रधानांनी निवेदन करून सभागृहाला माहिती दिली. त्या माहितीने गवईंचे मुळीच समाधान झाले नाही. ते म्हणाले, पंतप्रधानांनी दिलेली माहिती अपुरी आहे. आपल्याला नोकरशहांनी जी माहिती पुरवली ती वस्तुस्थितीला धरून नाही. राज्यांकडून पुन्हा माहिती मागवून निवेदन करावे. गवईंचा मुद्दा पंतप्रधानांना पटला व त्यांनी त्यांची विनंती मान्य केली. त्याचा फायदा दुष्काळग्रस्त राज्यांनाही झाला.

सन २००० मध्ये गवईंचा राज्यसभेत प्रवेश झाला. भाजपचे रामदास आगरवाल यांनी भारतीय घटनेचा आढावा घेण्यात यावा, असा अशासकीय प्रस्ताव मांडला, चर्चेत भाग घेताना गवई म्हणाले, मी या ठरावाला माझ्या दातांनी नखांनी विरोध करतो. त्यांच्या पहिल्याच वाक्याने सदनात अनेकांचे डोळे विस्फारले. संसदेच्या सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विरोध करणारे बसले आहेत व त्यांना भाजपने मंत्रिपदे दिली आहेत. डॉ. बाबासाहेब हा खोटा देव आहे व पूजा करणारे खोटे आहेत, असे सांगणारे या लोक सदनात बसले आहेत, असे गवई यांनी म्हणताच भाजपचे नेते व केंद्रीय मंत्री अरुण शौरी ताडकन उभे राहिले. पिशवीतून मांजर जसे बाहेर यावे तसे त्यांची अवस्था झाली होती. शौरी म्हणाले, होय, मीच ते पुस्तक लिहिले आहे. गवईंना आयते कोलितच मिळाले. सदनात गोंधळ झाला. गवईंनी माफी मागावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षातून सुरू झाली. गवईंनी माफी मागण्यास नकार दिल्याने आणखी गोंधळ वाढला. पीठासीन अधिकारी (नंतर झालेले राज्यपाल) टी. एन. चतुर्वेदी यांना सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले. पण नंतरही गवईंनी आपले भाषण संपलेले नाही असे सांगून तोच मुद्दा मांडला. ते म्हणाले, शौरींचे नाव न घेता मी बोललो, पण मला त्याबद्दल मुळीच पश्चाताप नाही. देशातील कोट्यवधी जनतेच्या भावना दुखवणारे पुस्तक सरकार जप्त करणार असेल व शौरी यांचे सदस्यत्व रद्द करण्यात येणार असेल तरच आपण माफी मागण्यास तयार आहोत. त्यानंतरच्या गोंधळाने आणखी प्रकरण चिघळले. गवईंनी आपला संताप व्यक्त

करण्यासाठी शौरींचे पुस्तकच सभागृहात टराटरा फाडून टाकले. ज्या पुस्तकाने कोट्यवधी जनतेच्या हृदयावर घाव घातले, त्या पुस्तकाचे लेखक इथे राज्यसभेत मंत्री म्हणून बसणार असतील तर लोकांच्या भावना व्यक्त करण्यात मला मुळीच चूक वाटत नाही. असे गवईंनी स्पष्ट केले.

संसदेत खासदार म्हणून प्रभावी काम करीत असताना आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन त्यांनी दिल्लीच्या रामलीला मैदानावर भरून दाखवले. या अधिवेशनाला देशभरातून ५० हजार जण हजर होते.

दलितांचे नेतृत्व करताना कधीही जातीयवादी किंवा संकुचित भूमिका गवईंनी घेतली नाही. वडीलकीच्या नात्याने सर्व समाजातील तरुणांशी संवाद व सलोखा नेहमीच साधला. शिवराळपणा किंवा असभ्यपणा हे शब्द त्यांच्या मनाला कधीच शिवलेही नाहीत. गवई म्हणजे उमद्या मनाचा सुसंस्कृत नेता होता. जय भीम म्हणून दिलखुलास स्वागत करणारा नेता काळाच्या आड गेल्याने आंबेडकरी जनतेचे मोठे नुकसान झाले आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असतानाची घटना आहे. शिवशक्ती व भीमशक्ती यांनी एकत्र यावे असे बाळासाहेबांनी आवाहन केले होते व त्याला प्रतिसाद म्हणून रिपब्लिकन पक्षाचे काही जण त्यांना भेटायला गेले. त्यात पक्षाचे सरचिटणीस अविनाश महातेकर हेही होते. त्यावेळी गप्पांच्या ओघात मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नावर बाळासाहेब म्हणाले, माझा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला कधीच विरोध नव्हता तर मराठवाडा शब्द विद्यापीठाच्या नावातून काढून टाकायला विरोध होता. याच संदर्भात रा. सू. गवई त्या धगधगत्या काळात मातोश्रीवर बाळासाहेबांना भेटायला गेले होते. त्यावेळी चर्चेच्या ओघात शिवसेनाप्रमुख म्हणाले- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर होणार असेल तर माझा विरोध नाही. त्यावर गवईंनी त्यांना विचारले, हा तुमचा अंतिम विचार आहे ना... तसे असेल तर मी शरद पवारांना (तत्कालीन मुख्यमंत्री) कळवतो व नामांतर करण्यास सरकारला प्रवृत्त करतो. शिवसेनाप्रमुखांनी होकार देताच, गवईंनी त्याच रात्री पवारांशी संपर्क साधला व त्यानंतर नामांतराची घोषणा झाली. पवारांनी नामांतराची घोषणा केल्यावर राज्यात कुठे विरोधाचा सूर उमटला नाही. विशेष म्हणजे शिवसेनाप्रमुखांनी गवईंची साक्ष काढून ही गोष्ट भेटायला आलेल्या अनेकांना सांगितली, असे महातेकरांनीच म्हटले आहे.

टिळक आणि गवई

विधानपरिषदेचे दिवंगत माजी सभापती जयंतराव टिळक हे रा. सू. गवई हे विधिमंडळात जवळचे मित्र बनले होते. जयंतराव टिळक हेही विधिमंडळात दादा म्हणून परिचित होते. दुपारी त्यांच्या कार्यालयात गवई व टिळक यांच्या गप्पांची मैफील नेहमी रंगायची. तेव्हा दोन दादांची मैफील चालू आहे, अशी आमदारांत चर्चा ऐकायला मिळायची. गवईंची सभापतीपदाची मुदत संपली आणि काँग्रेसने जयंतराव टिळकांना सभापतीपद देण्याचे ठरवले. तेव्हा गवई यांनी पुन्हा सभापतीपदीपदाची निवडणूक लढवावी, असे काहींनी त्यांना सुचवले. तशी तयारीही गवईंनी सुरू केली होती. पण टिळकांचे नाव येताच त्यांनी आपली जिद्द गुंडाळून ठेवली आणि टिळकांशी कोणताही संपर्क न साधताच माघार घेतल्याचे जाहीर केले. केवळ टिळकांवरील प्रेमापोटीच गवईंनी असा निर्णय घेतला. त्यानंतर टिळक व गवई निकटचे मित्र बनले. जयंतरावांची सभापतीपदी अविरोध निवड झाल्यानंतर गवई एक भला मोठा गुच्छ घेऊन त्यांना भेटले, अभिनंदन केले व मिठी मारली. टिळक व गवईंनी परस्परांना प्रेमाने मारलेल्या मिठीचा फोटो सर्वच वृत्तपत्रांनी पहिल्या पानावर ठळकपणे प्रसिद्ध केला होता.

-ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.

❑❑

संसदपटूंचा मेरुमणी

▪ प्रा. बी. टी. देशमुख

श्री. दादासाहेब गवई यांच्या सभागृहाबाहेरील कामकाजाविषयी व कर्तृत्वाविषयी अनेकजण लिहितात, तसे त्याविषयी भरपूर लिहिता येईल. मात्र सभापती, उप सभापती, विरोधी पक्षनेता व सभासद या नात्याने विधानपरिषदेत त्यांनी केलेल्या सर्वच भूमिकांना प्रत्यक्ष जवळून पाहणाऱ्या व्यक्तींची संख्या स्वाभाविकपणे मर्यादित असणार अशा व्यक्तींपैकी या सर्व भूमिकांमध्ये त्यांना जवळून पाहण्याची संधी मिळालेली एक व्यक्ती या नात्याने मी त्यांच्या सभागृहातील या विविध कामाबद्दलच्या काही आठवणी नमूद करण्याचे ठरविले आहे.

सभापती या नात्याने ते किती नि:पक्षपातीपणे काम करीत असत याचे एक उदाहरण नमूद करण्यासारखे आहे. कापूस व शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर दिनांक २५ नोव्हेंबर १९८१ रोजी अमरावतीपासून जवळच असलेल्या नागझरी येथे पोलिसांनी गोळीबार केला. या गोळीबारामध्ये अनेक शेतकरी गंभीररीत्या जखमी झाले. दिनांक ३० नोव्हेंबर १९८१ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन नागपूर येथे सुरू झाले. पहिल्याच दिवशी या विषयावर अनेक सदस्यांनी नियम ९३ च्या सूचना दिलेल्या होत्या. अशा सूचना देणाऱ्यांमध्ये श्री. ग. प्र. प्रधान, गं. भा. कानिटकर, दत्ता मेघे, एन. डी. पाटील, डी. के. देशमुख व प्रा. बी. टी. देशमुख यांचा समावेश होता. नियम ९३ ची सूचना ही नुकत्याच घडून गेलेल्या महत्त्वपूर्ण अशा सार्वजनिक प्रश्नाविषयी देता येते. तातडीचा विषय असणे, नुकतीच घडून गेलेली घटना असणे व तो विषय सार्वजनिक महत्त्वाचा असणे ह्या अशा त्याच्या प्रमुख कसोट्या असतात. अशी ९३ ची सूचना मा. सभापती सभागृहामध्ये वाचून दाखवितात व हा नियम ९३ चा विषय होत नाही म्हणून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे असे बहुसंख्य सूचनांच्या बाबत निर्णय दिले जातात. मात्र अनेक सूचनांच्या बाबतीत हा नियम ९३ च्या सूचनेचा विषय नसल्यामुळे मी अनुमती नाकारीत आहे, मात्र यावर शासनाने निवेदन करावे असाही आदेश मा. सभापतींकडून दिला जातो. खरोखरच विषय नुकताच घडून गेलेला, तातडीचा, सार्वजनिक महत्त्वाचा असेल तर मा. सभापती चर्चेला मान्यता सुद्धा देतात. अर्थात अशा सूचनांची संख्या मोजकीच असते आणि बहुधा अशी चर्चा देत असताना ती चर्चा देण्याबाबत व ती चर्चा केव्हा घ्यावी या बाबतीत मा. सभापती विरोधी पक्षनेत्यांशी व सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करून निर्णय जाहीर करतात.

दिनांक ३० नोव्हेंबर, १९८१ रोजी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम ९३ ची ही सूचना मा. विरोधी पक्षनेते श्री. ग. प्र. प्रधान यांनी मांडली व या विषयावर सभागृहामध्ये चर्चा व्हायला पाहिजे अशी मागणी केली. त्यानंतर ही सूचना मांडणाऱ्या आम्ही सर्व सदस्यांनी तशाच प्रकारचे प्रतिपादन केले आणि तशीच मागणी केली. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दादासाहेब गवई यांनी सभापती या नात्याने आपला निर्णय पुढीलप्रमाणे जाहीर केला :–

" **सभापती** : मी आपल्याला त्या संदर्भात नियम वाचून दाखवतो. नियमात असे म्हटले आहे की, "If the Chairman is satisfied, after calling for such information from the member

who has given notice and from the Minister, as he may consider necessary, that the matter is urgent and is of sufficient importance that it should be raised in the council the same day or one or two days next following, he shall grant permission for the discussion which shall commence at such time and on such day as he fix." नियमातील तरतुदीप्रमाणे यासंबंधी मी सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे आणि त्याबद्दल माझे समाधान झाले आहे. तसेच नियमातील तरतुदीप्रमाणे I could have sought the clarification from the Hon'ble Minister but I have not done so. ही गोष्ट आपण लक्षात घ्यावी. या विषयावरील चर्चा उद्या घेण्यात येईल.

मा. सभापतींचा हा निर्णय जाहीर झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी चर्चा आजच झाली पाहिजे असा जोरदार आग्रह धरला. "विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन मी चर्चा मान्य केली आहे. मंत्र्यांकडून त्यांची बाजू ऐकून न घेता मी उद्या चर्चा होईल असा निर्णय दिलेला आहे." असे मा. सभापतींनी पुन्हा पुन्हा सांगितले पण हा निर्णय मान्य न करता सर्वच विरोधी पक्षाचे नेते चर्चा आजच झाली पाहिजे अशी मागणी करू लागले व शेवटी ती मागणी मान्य होत नाही म्हणून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी बहिर्गमन केले.

मी स्वतः व श्री. दत्ता मेघे आम्हा दोघांचे असे मत होते की, हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे या विषयावर चर्चा झाली पाहिजे. ती शक्यतो आज झाली पाहिजे. आज होणार नसेल तर ती निदान उद्या तरी झाली पाहिजे असे आमचे म्हणणे होते. चर्चेचा निर्णय आपल्याकडून घेतला आणि विरोधी पक्षांनी सभात्याग केला यामुळे दादासाहेबांमधील सभापती जागा झाला व त्यांनी सभापती या नात्याने मी दिलेल्या निर्णयावर विरोधकांनी सभात्याग केला त्यामुळे या विषयावर उद्या चर्चा ठेवण्याची जबाबदारी माझी नाही असे सभागृहात घोषित केले. श्री. दत्ता मेघे व मी स्वतः आम्ही सभागृहातच थांबलेलो होतो. आम्ही सभागृहातच थांबलेलो आहोत, सबब उद्या चर्चा झाली पाहिजे असा मुद्दा आमच्यातर्फे मांडण्यात आला. त्यावर दादासाहेबांनी ताबडतोब आपला मूळ निर्णय दुरुस्त केला व श्री. दत्ता मेघे व प्रा. बी. टी. देशमुख भाग घेणार असतील तर उद्या चर्चा होईल अशी आपल्या निर्णयामध्ये दुरुस्ती केली. सभागृहाच्या कामकाजाच्या अधिकृत प्रतिवेदनाचा तो भाग पुढीलप्रमाणे :–

"THE CHAIRMAN : मी दिलेल्या रुलिंगवर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी वॉक आऊट केल्यामुळे I have now a doubt whether they want a discussion on the subject tomorrow आता या विषयावर उद्या चर्चा ठेवण्याची जबाबदारी माझ्यावर नाही.

श्री. दत्ता मेघे : अध्यक्ष महाराज, या विषयावर उद्या चर्चा होईल अशा प्रकारचे आपण रुलिंग दिलेले आहे आणि मी येथे थांबलेलो आहे तेव्हा यावर चर्चा झाली पाहिजे.

सभापती : ठीक आहे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दत्ता मेघे व बी. टी. देशमुख हे भाग घेणार असतील तर उद्या चर्चा होईल. वॉक आऊट करावयाचे आणि या विषयावर चर्चा होऊ द्या असे म्हणावयाचे अशा दोन्हीही गोष्टी मान्य करता येत नाहीत. अतिशय लिबरल वागल्यानंतर आणि विरोधी सदस्यांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर वॉक आऊट करणे म्हणजे त्या निर्णयाचा निषेध होय. I have been very fair to the opposition members."

सभापती या नात्याने काम करणाऱ्या व्यक्तीला फार मोठी कार्यालयीन मदतही उपलब्ध असते व सभापती या नात्याने त्यांनी केलेल्या कामाचा काही भाग हा रचित (Formulated) असतो व त्याची योजना ही कार्यालयाने

करून दिलेली असते. पण प्रत्यक्ष सभागृहाचे संचालन करताना बराचसा भाग हा पूर्णपणे स्वयंस्फूर्त व उत्स्फूर्त (Spontaneous and unformulated) असा असतो व असे कामकाज प्रत्यक्ष करीत असताना त्या पदावरून काम करणाऱ्या व्यक्तीची खरी कसोटी लागत असते.

(१) सत्ताधारी पक्षांशी किंवा मंत्र्यांशी सल्लामसलत न करता चर्चा मान्य करणे व ती उद्या होईल असे घोषित करणे.

(२) आपण सत्ताधारी पक्षाशी चर्चा न करता विरोधी पक्षाला न्याय देणारा असा निर्णय दिल्यावरही सभागृहातून विरोधी पक्ष सदस्यांनी सभात्याग केला म्हणून आता उद्या या विषयाची चर्चा ठेवण्याची माझी जबाबदारी नाही असा निर्णय जाहीर करणे.

(३) काही सदस्यांनी आपण सभात्याग केला नाही हे लक्षात आणून दिल्यानंतर तुम्ही भाग घेत आहात तेव्हा मग उद्या चर्चा होईल असा निर्णय लगोलगच तिथल्या तिथे जाहीर करणे.

हे त्यांनी घेतलेले निर्णय स्वयंस्फूर्तीने आणि वेळेवर घेतलेले निर्णय होते, हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की, सभापती या नात्याने त्यांच्या नि:पक्षपाती व कणखर वृत्तीचे प्रतिनिधित्व करणारे होते.

खरे म्हणजे अनेक सदस्यांनी सूचना दिलेली असली तरी असा प्रस्ताव मांडण्याचा विशेषाधिकार हा विरोधी पक्ष नेत्यांचा असतो. पण हा ठराव श्री. दत्ता मेघे किंवा बी. टी. देशमुख मांडतील अशी भूमिका मा. सभापतींनी घेतली. त्याच दिवशी सायंकाळी नागपूरच्या आमदार निवासात विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी माझी भेट घेऊन "हा प्रस्ताव उद्याच्या विधानपरिषदेच्या दिवसाच्या कामकाजामध्ये विरोधी पक्षनेत्यांच्या नावेच दाखविण्यात यावा." अशी सभापतींना विनंती करणारे पत्र मी लिहून द्यावे असा मला आग्रह केला. माझे याबाबतीत म्हणणे असे होते की, "प्रधानसर हा प्रस्ताव मांडत असतील तर माझ्यासाठी तो निश्चित आनंदाचा विषय असेल. माझी त्याला काहीही हरकत नाही. असे आपण मा. सभापतींना सांगा. मात्र तसे लेखी पत्र लिहून दिल्यामुळे त्या प्रस्तावावर चर्चाच होणार नाही अशी वेळ येणार असेल तर ते मात्र योग्य होणार नाही."

दुसऱ्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर, १९८१ रोजी त्यावर सभागृहात चर्चा झाली. पण विरोधी पक्षनेत्यांच्या नावाने प्रस्ताव कामकाज पत्रिकेवर दाखविण्याच्या सर्व विनंत्या सभापतींनी फेटाळून लावल्या व तो प्रस्ताव प्रा. बी. टी. देशमुख व श्री. दत्ता मेघे यांच्या नावाने दाखविण्यात आला. मी प्रस्ताव मांडला आणि विरोधी पक्षाच्या सर्वच नेत्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. त्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेला ठराव हा पुढीलप्रमाणे होता :-

नागझरी (जि. अमरावती) येथे पोलिसांनी केलेला गोळीबार याबाबत सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख व श्री. दत्ता मेघे यांनी नियम ९३ अन्वये दिलेला निकडीचा सार्वजनिक बाबीसंबंधी प्रस्ताव.

श्री. बी. टी. देशमुख (विदर्भ पदवीधर) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम ९३ अन्वये पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या आणि निकडीच्या बाबीसंबंधी प्रस्ताव मांडतो.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यामध्ये कापूस व शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर दिनांक २५ नोव्हेंबरला अमरावती जिल्ह्यातील नागझरी येथे पोलिसांनी निर्घृण व अनावश्यक गोळीबार केला आणि ज्याअर्थी या गोळीबारात तीन निरपराध शेतकऱ्यांना अत्यंत गंभीर जखमा झाल्या आणि ज्याअर्थी गोळीबारातून शेतकऱ्यांचे न्याय्य आंदोलन लाठी, गोळीबाराच्या जोरावर चिरडून टाकण्याचे शासनाने केलेले प्रयत्न आणि ज्याअर्थी शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, त्याअर्थी यामधून निर्माण झालेल्या प्रक्षोभक परिस्थितीबद्दल हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.

खुद्द तत्कालीन विरोधी पक्षनेते श्री. ग. प्र. प्रधान यांनी सभापती या नात्याने काम करण्याच्या श्री. दादासाहेब गवई यांच्या निर्भयी न्यायबुद्धीविषयी जो आदरभाव व्यक्त केला आहे तो प्रधान सरांच्याच शब्दामध्ये मी नमूद करू इच्छितो–ते म्हणाले, "पुष्कळदा असे व्हायचे की, मंत्री किंवा मुख्यमंत्री इतका आक्रमक पवित्रा घ्यायचे नियमाची चाकोरी उल्लंघन करून आपला दबदबा निर्माण करायचे की, काही सभापतीदेखील विरुद्ध निर्णय घ्यायला बिचकायचे, पण श्री. गवई मात्र कधीच घाबरले नाहीत. आपल्या पदाचे काय होईल? असा स्वार्थी विचार न करता आपल्या न्यायबुद्धीचा आधार घेऊन आणि कायद्याचे कोटेकोरपणे पालन करूनच त्यांनी निर्भयपणे निर्णय दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर आक्रमक भूमिका घेणाऱ्यांना स्पष्टपणे समज देऊन आक्रमकता सोडण्यास आणि नियमाच्या चाकोरीतून वागण्या-बोलण्यास लावले आहे."[४]

कितीही नाही म्हटले तरी सभापती हे सत्ताधारी पक्षाचे असले तर क्वचित प्रसंगी मुख्यमंत्र्यांना काय वाटेल, अशी भावना सभापतींच्या मनामध्ये येणे अशक्य नसते. मुळात दादासाहेब यांचा पक्ष वेगळा हे एक व कोणत्याही दबावात न येता निःपक्षपातीपणे सभापती म्हणून काम करण्याच्या त्यांच्या कणखर वृत्तीमुळे त्यांच्यावर मुख्यमंत्र्यांचा दबाव येण्याऐवजी मुख्यमंत्रीच त्यांना वचकून राहत असत. तत्कालीन मुख्यमंत्री मा. बॅ. ए. आर. अंतुले यांनी त्यांच्याबाबत अशाच एका प्रसंगी मुख्यमंत्री असतांना आलेला अनुभव शब्दबद्ध केलेला आहे, तो पुढीलप्रमाणे :–

"पण आपल्याच अमरावतीला हा प्रकार घडावा ही बाब श्री. गवईंना मात्र आवडली नाही. त्यांनी ही गोष्ट मनाला इतकी लावून घेतली की, त्याची परिणती म्हणजे बी. ए. सी. च्या मीटिंगमध्ये त्यांनी माझ्याशी बोलणे कटाक्षाने टाळले आणि नंतर आम्ही बरोबर असतानासुद्धा एक शब्दही ते माझ्याशी बोलले नाहीत. नेहमी मनसोक्त गप्पा मारण्याची सवय असल्याने ती गोष्ट मला चांगलीच खटकली."[५]

सभागृह चालवितांना त्यांच्या या गुणवैशिष्ट्यांचे तद्नंतरचे मा. सभापती श्री. जयंतराव टिळक यांनी पुढील शब्दात वर्णन केलेले आहे :–

"श्री. गवईंच्या अंगी असलेल्या प्रामुख्याने त्यांची न्यायबुद्धी, निःस्वार्थीपणा, निर्भीडपणा, सर्वांना सांभाळून घेण्याचे कौशल्य, कटाक्षाने कटुता टाळण्याचे कसब, समयसूचकता, तत्त्वांच्या किंवा मूल्यांच्या आहारी न जाता मैत्रीपूर्ण व्यवहार ह्या नात्याने त्यांचा कार्यकाल निष्कलंक ठरला आहे. एकही अपघात न करता गाडी चालविण्याबद्दल इंजिन ड्रायव्हरला जसे रेल्वेकडून निवृत्तीनंतर पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येते तसा नियम जर का विधानपरिषदेतील सभापतीपदाबद्दल असता तर ते सन्मानपूर्वक मिळणारे पारितोषिक श्री. गवईंना नक्कीच मिळाले असते."[६]

विधानपरिषदेचे सभापती, विधानपरिषदेचे उप सभापती या पदावरून कार्य करीत असतांना लोकांचे व लोकहिताचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना प्रश्नोत्तरे किंवा लक्षवेधी सूचना यासारख्या किंवा तत्सम आयुधांचा वापर करता येत नसे व त्यावेळी बहुधा पत्रव्यवहाराच्या माध्यमातून ते त्या प्रश्नांची तड लावीत असत. उपरोक्त कार्यकाळ संपला आणि विधानपरिषदेचे सदस्य या नात्याने वेगवेगळ्या आयुधांचा वापर करण्याचा त्यांनी सपाटाच लावला होता असे दिसून येते.

मोठमोठ्या पदावरूनचा कार्यकाळ संपलेल्या बहुसंख्य व्यक्तींच्या विषयी असे आढळून येते की, फक्त सदस्य म्हणून रहायचे म्हणून ते राहतात पण मग त्या कामात त्यांचे मन लागत नाही किंवा त्यामध्ये ते रस घेऊ शकत नाहीत. दादासाहेबांची परिस्थिती याबाबतीत अगदी वेगळी होती असे दिसून येते. सभापती, उप सभापती, विरोधी पक्षनेते यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या प्रशस्त कार्यालयीन दालनातून त्यांनी आपला मुक्काम आकाशवाणी जवळच्या आमदार निवासात हलविला व आमदार निवासातील त्या

दोन खोल्यांमध्ये त्यांनी आपले कार्यालय थाटले. खेड्यापाड्यातील गरीबांना, दलितांना, मागासवर्गीयांना गवई यांचे सदस्यत्व हे आपली दुखणी वेशीवर टांगण्याचे हक्काचे स्थान वाटत असे व त्यामुळेच अशा लोकांचे थवेच्या थवे आमदार निवासातील त्यांच्या या कार्यालयासमोर आपापली गाऱ्हाणी घेऊन उभे असत. त्यांच्या या गाऱ्हाण्यांपैकी नियमांची बिनचूक माहिती असल्यामुळे शक्य तेवढी गाऱ्हाणी संसदीय आयुधांचा वापर करून सभागृहामार्फत तडीस लावण्याचा ते प्रयत्न करीत असत. अशी कितीतरी उदाहरणे त्यांच्या सदस्य म्हणून कार्यकाळातील काढून दाखविता येतील. ही गाऱ्हाणी तरी किती स्वरूपाची असत व त्यातील लहानातल्या लहान गाऱ्हाणाला सुद्धा न्याय देण्यासाठी ते किती धडपड करीत असत याचे एक उदाहरण नमूद करणे मला आवश्यक वाटते.

कोकणमधील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण हे तालुक्याचे एक ठिकाण. मालवण या तालुक्याच्या ठिकाणापासून तारकर्ली हे एक पर्यटन स्थळ ११.७ कि. मी. दूर व त्या तारकर्लीहून पुढे चार-पाच किलोमीटरवर देवबाग या नावाचे चार ते साडेचार हजार लोकसंख्येचे व बारमाही रस्त्यांनी न जोडले गेलेले एक गाव. त्या गावातील काही लोकांचा असाच एक थवा आमदार निवासातील त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांना येऊन भेटला. दादासाहेबांनी त्या मंडळींना मदत करण्याचे ठरविले व सार्वजनिक महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे "सार्वजनिक हिताच्या विषयावर चर्चा अशासकीय ठराव" या आयुधाची निवड केली व देवबाग-तारकर्ली हा बारमाही रस्ता ताबडतोब करणे या ठरावाची नोटीस दिली. हा ठराव प्रत्यक्ष सभागृहामध्ये दिनांक १७ जुलै, १९८७ रोजीच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आला होता.

वापरावयाच्या संसदीय आयुधाची शब्दरचना किती बिनचूक व काटेकोर असावी याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या ठरावाकडे पाहता येईल. मुद्दाम या ठरावाचा मसुदा नमूद करत आहे. तो पुढीलप्रमाणे :–

"देवबाग (तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग) या गावाची लोकसंख्या सुमारे ४,५०० हून अधिक असून व मागील सुमारे २५ वर्षांपासून तेथील जनतेने सातत्याने शासनाचे विविध स्तरावर बारमाही रस्त्याची मागणी केली असतांना आणि किमान गरजा कार्यक्रमाखाली रस्ते विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर जी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात आली आहेत त्यानुसार १,५०० व त्यावरील लोकसंख्येची सर्व गावे सातव्या पंचवार्षिक योजनेअखेरपर्यंत बारमाही रस्त्याने जोडण्याचे उद्दिष्ट असतानाही शासनाकडून केवळ आकसाने आवश्यक ती कोणतीही उपाययोजना न झाल्यामुळे तेथील ग्रामीण जनतेस नाहक अनेक गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत असून त्यांच्या विकासावरही विपरित परिणाम होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने देवबाग-तारकर्ली हा सुमारे साडेपाच कि.मी. चा बारमाही रस्ता सत्वर तयार करण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम राबवून सदरहू रस्त्याचे काम दिनांक ३१ मार्च, १९८८ पूर्वी पूर्ण करावे अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे."[८]

या ठरावामध्ये मांडण्यात आलेल्या प्रत्येक मुद्याची मजबूत तयारी करून दादासाहेब त्या दिवशी सभागृहात आले होते. सुरुवातीलाच त्या लहानशा गावाविषयीची निसर्गरम्यतेची बाजू त्यांनी आपल्या शब्दात मांडली. ती पुढीलप्रमाणे :–

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण जवळ असलेल्या या देवबाग गावाकडे गेल्या २५ वर्षांपासून शासनाचे दुर्लक्ष होत आलेले आहे. या गावाची गेली २५ वर्षे अवहेलना चाललेली आहे. त्या संबंधी हा अशासकीय ठराव मी या ठिकाणी मांडलेला आहे. अध्यक्ष महाराज, स्वित्झर्लंड आणि काश्मीरला लाजवेल असे हे निसर्गरम्य गाव आहे. मा. मंत्री महोदयांना नकाशावरून कल्पना येईलच की, एका बाजूने अरबी समुद्र, दुसऱ्या बाजूने खाडी आणि संपूर्ण निसर्गरम्य परिसर या गावाने व्यापलेला आहे."

यापूर्वी निरनिराळ्या मार्गांनी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला. मात्र त्यात यश आले नाही. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना आपण स्वतः पत्र लिहिले होते असे त्यांनी पुढील शब्दात नमूद केले :—

"दिनांक ९ जून, १९८७ ला मी स्वतः श्री. विलासराव देशमुख यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्राचे उत्तरही त्यांच्याकडून आले आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, कोकण भागातील देवबाग-तारकर्ली या सुमारे ५.१/२ कि.मी. रस्त्याचे काम सत्वर हाती घेऊन देवबाग हे गाव बारमाही रस्त्याने जोडणाच्या दृष्टीने योग्य त्या आदेशाबाबतचे आपले दिनांक ९ जून, १९८७ चे पत्र मला मिळाले. सदरहू प्रकरण योग्य त्या कार्यवाहीकरिता उप सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांचेकडे पाठविले असून त्यात मी लक्ष पुरवीत आहे."[१०]

किमान गरजा कार्यक्रमाखाली राष्ट्रीय पातळीवर जी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात आलेली आहे त्यानुसार सुद्धा या गावाला न्याय मिळाला नाही असे त्यांनी नमूद केले. ते पुढील शब्दात :—

"अध्यक्ष महाराज, किमान गरजा कार्यक्रमाखाली रस्ते विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर जी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात आली आहेत, त्यानुसार १,५०० व त्यावरील लोकसंख्येची सर्व गावे बारमाही रस्त्याने मार्च, १९९० अखेर जोडण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. देवबाग या गावाची लोकसंख्या तर सुमारे साडेचार हजाराहून अधिक आहे. मी आपल्याला असेही सांगू इच्छितो की, किमान गरजा कार्यक्रमाखाली १,५०० हून अधिक आणि २,००० पर्यंत लोकवस्ती असलेली गावे बारमाही रस्त्यांना जोडण्यासंबंधीचे सरकारचे धोरण अनेक वेळा अर्थसंकल्पीय भाषणामध्ये व्यक्त केले गेले आहे."[११]

राज्य वार्षिक योजनेमध्ये धोरणात्मक निर्णय असून सुद्धा या गावाला बारमाही रस्ता मिळालेला नाही याबाबतचा तपशीलवार उल्लेख त्यांनी सभागृहामध्ये केला. किमान गरजा कार्यक्रमामध्ये राज्य कार्यक्रम अंदाजपत्रकात त्याचा समावेश असून सुद्धा या गावाला न्याय मिळालेला नाही याचेही तपशीलवार प्रतिपादन केले. ते पुढील शब्दात :–

"त्यानंतर आपल्या राज्याची जी वार्षिक योजना आहे तिच्यामध्येही किमान गरजा कार्यक्रमाखाली रस्ते विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर जी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात आली आहेत त्यानुसार त्यानंतर १,५०० लोकवस्तीच्यावरील गावे बारमाही रस्त्यांना जोडण्याचा सरकारचा उद्देश आहे. परफॉर्मन्स बजेटमध्ये देखील किमान गरजा कार्यक्रमाच्या संदर्भात असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, **Minimum Needs Programme-**Under this programme, the villages having a population of 1,000 and above are being connected by all-weather roads. It is proposed to connect the villages having 1,500 and above population and villages having population of 1,000 to 1,200 by fair-weather roads."[१२]

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन मंत्री शासनामध्ये आहेत, तेव्हा त्यांनी किमान गरजा कार्यक्रमाखाली हा रस्ता घेण्यात येईल असे पहावे असे प्रतिपादन केले, ते पुढील शब्दात :—

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन प्रभावी मंत्री श्री. वि. गो. प्रभुगावकर आणि श्री. भाई सावंत हे शासनामध्ये आहेत. त्यांच्याच भागातील हा रस्ता आहे. त्यामुळे डी.पी.डी.सी. मध्ये तरतूद करता येईल. तरी किमान गरजा कार्यक्रमाखाली हा रस्ता त्वरित घेण्यात यावा."[१३]

अनेकदा मागणी करणारे लोक अनेक कागदपत्रे, प्रचारपत्रके, भित्तिपत्रके व निवेदने प्रकाशित करीत असतात. अशा प्रकाशनांचा मारा विधानमंडळ सदस्यांवर मोठ्या प्रमाणात केला जातो. तो इतका की, अनेकदा सदस्यांना त्यातले काय घ्यावे आणि काय सोडावे हे सुद्धा लक्षात

येईनासे होते. गावातील लोकांना बारमाही रस्ता नसल्यामुळे कोणकोणत्या प्रकारचे त्रास होतात याबाबत गावकऱ्यांनी काढलेल्या एका भित्तिपत्रकातील २० सूत्री कार्यक्रमच दादासाहेबांनी सभागृहामध्ये वाचून दाखविला. तो पुढील शब्दांत :–

"अध्यक्ष महाराज, या गावासाठी रस्ता व्हावा म्हणून गावकऱ्यांनी केवळ आंदोलनच केले नाही तर भित्तिपत्रके काढली आहेत. जाहिराती काढल्या आहेत. त्यांनी भित्तिपत्रकात २० सूत्री कार्यक्रम दिला आहे तो पुढीलप्रमाणे आहे :–

(१) गावात डॉक्टर येऊ शकत नाही.

(२) अडलेली बाळंतीण मरते.

(३) धनुर्वाताचा पेशंट मरतो.

(४) ब्लड प्रेशरचा पेशंट मरतो.

(५) डॉक्टरांची शिबिरे या गावात होत नाहीत.

(६) हल्लीच दिनांक २४ जून, १९८५ रोजी शाळेवर माड पडून झालेल्या अपघातातील १२ मुलांना वैद्यकीय उपचारासाठी पूर आलेल्या खाडीतून होडीने दुसऱ्या गावी न्यावे लागले, हॉस्पिटलला पोहोचण्यास दोन तास लागले.

(७) सरकारी अंमलदार चालत येण्यास कंटाळतात.

(८) प्रसंगी पोलीस मदत मिळू शकत नाही.

(९) लाखो रुपये किंमतीची मासळी कचऱ्याच्या मोलाने विकावी लागते.

(१०) मासळीसाठी लागणारा बर्फ १० किलोमीटर अंतरावरून डोक्यावरून आणावा लागतो.

(११) अल्पबचत योजना, कुटुंब नियोजन या योजना या गावी राबविता येत नाही.

(१२) पावसाळ्यात या गावाचा साऱ्या जगाशी संबंध तुटतो.

(१३) गावात ताजे वृत्तपत्र मिळत नाही.

(१४) मेलेल्या माणसाच्या दहनास लाकडे मिळत नाही.

(१५) घासलेट, डिझेल या गावात मिळत नाही.

(१६) तातडीने शहराशी संपर्क साधता येत नाही.

(१७) मुलांना उच्च शिक्षण घेता येत नाही.

(१८) बाहेरगावाचा शिक्षक वर्ग या गावी येण्यास उत्सुक नाही.

(१९) देवबागला बँक येऊ शकत नाही.

(२०) दुसऱ्या गावचे लोक एस.टी. गाडीत देवबागच्या लोकांना आरक्षण देत नाहीत."[१२]

व शेवटी हा रस्ता तत्परतेने पूर्ण करावा अशी मागणी करून त्यांनी आपले भाषण संपविले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्र्यांनी ठरावावर उत्तर देतांना दादासाहेबांनी मांडलेले सर्वच मुद्दे जवळ जवळ मान्य केले. कोणताही मुद्दा खोडून काढला नाही. त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात पुढीलप्रमाणे आश्वासने दिली :–

"या कामासाठी १९८८ च्या अर्थसंकल्पामध्ये प्राधान्याने तरतूद करण्याचा प्रयत्न करू.."..... "तेव्हा निधीच्या उपलब्धतेप्रमाणे करू असे म्हणण्यापेक्षा भरपूर निधी उपलब्ध करून देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न आपण जरूर या संदर्भात करू एवढे आश्वासन मी या संदर्भात देतो."[१४]

या चर्चेच्या वेळी त्या भागातील मंत्री श्री. प्रभुगावकर हे स्वतः सभागृहामध्ये येऊन बसले होते आणि उत्तर देणार असलेल्या राज्यमंत्र्यांना प्रत्यक्ष प्रकल्प स्थळावरची काही माहिती त्यांनी स्वतः सभागृहातच दिली होती. या गोष्टीचा उल्लेख सुद्धा राज्यमंत्र्यांच्या भाषणामध्ये आला, तो पुढील शब्दात :

"या रस्त्याला लागणारी जमीन जोपर्यंत देत नाही तोपर्यंत अशा प्रकारची अडचण होती परंतु येथे येण्यापूर्वी आताच मला श्री. प्रभुगावकर यांनी सांगितले की त्या गावातील

एचबी ११८०—७

मंडळी जमीन देण्यास तयार आहेत तेव्हा जमीन मिळण्यामध्ये काही अडचण येणार नाही. अध्यक्ष महाराज, जमीन मिळण्यामध्ये अडचण नसेल तर त्वरित काम हाती घेण्यास आमच्याकडून काही अडचण नाही."[१५]

सभागृहात ही चर्चा उपस्थित करतांना सुरुवातीला दादासाहेबांनी काढलेले "अध्यक्ष महाराज, स्वित्झर्लंड आणि काश्मीरला लाजवेल असे हे निसर्गरम्य गाव आहे. मा. मंत्री महोदयांना नकाशावरून कल्पना येईलच की, एका बाजूने अरबी समुद्र, दुसऱ्या बाजूने खाडी आणि संपूर्ण निसर्गरम्य परिसर या गावाने व्यापलेला आहे." हे उद्‌गार माझ्या मनामध्ये एवढे घर करून बसलेले होते की, त्यांनी सभागृहामध्ये मिळविलेल्या त्या आश्वासनाचा पाठपुरावा करण्यासाठी पुढे आश्वासन समितीचा समिती प्रमुख/सदस्य म्हणून समितीसह मी प्रत्यक्ष जेव्हा देवबागला भेट दिली तेव्हा खरोखरच ते उद्‌गार किती यथार्थ होते याची खात्री पटल्याने समितीच्या आम्हा सर्व सदस्यांना मनापासून आनंद झाला होता.

अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा प्रकल्पातून पाणीपुरवठा या प्रश्नावर मी सभागृहात "अर्धा तास चर्चा" उपस्थित केली होती. नियमाप्रमाणे अर्ध्या तासात अशा दोन चर्चा उपस्थित केल्या जातात. एका चर्चेला १५ मिनिटांचा वेळ मिळतो. त्या १५ मिनिटांमध्ये पहिल्या ५ मिनिटात सदस्यांनी आपले म्हणणे मांडायचे, त्यानंतर ५ मिनिटात मंत्री किंवा राज्यमंत्री उत्तर देतात व शेवटच्या ५ मिनिटात एखादे दुसरे स्पष्टीकरण मिळविण्यासाठी प्रश्न, उपप्रश्न विचारता येतात व त्या १५ मिनिटानंतर दुसरी अर्धा तास चर्चा सुरू होते. साधारणपणे सभागृहाच्या त्या दिवसाच्या कामकाजात अर्धातास चर्चा ही कामकाज पत्रिकेवर शेवटच्या क्रमावर असते. बहुधा सभागृहात ५-७ सदस्यच उपस्थित असतात. सभापतीस्थानी एक व्यक्ती, चर्चा उपस्थित करणारी एक व शासनातर्फे उत्तर देणारी एक व्यक्ती याशिवाय २-४ सदस्य उपस्थित असतात. घटनेप्रमाणे किमान १० सदस्य गणसंख्या म्हणून उपस्थित असणे आवश्यक असते पण प्रथा अशी पडली आहे की गणसंख्येचा प्रश्न कोणी उपस्थित करीत नाही. कामकाज सुरू राहते.

मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट, १९८६ रोजीच्या कामकाज पत्रिकेवर अर्धा तास चर्चेचा हा विषय ठेवण्यात आला. त्या दिवशीच्या दोन चर्चेमध्ये पहिली चर्चा "मुंबईतील गारोडिया नगर, घाटकोपर (पूर्व) येथील झोपडपट्टी तोडणे" या विषयावरील श्री. रा. सू. गवई यांनी उपस्थित करावयाची होती. ती चर्चा उपस्थित करीत असतांना त्यानंतर होणाऱ्या चर्चेचे सुतोवाच श्री. गवई यांनी अगोदरच करून ठेवले होते. ते म्हणाले, "माझ्या या चर्चेपेक्षा सुद्धा अत्यंत महत्त्वाची अशी अर्धा तास चर्चा यानंतर या ठिकाणी व्हावयाची आहे त्यामुळे मी जास्त वेळ घेणार नाही."[१६]

१५ मिनिटांमध्ये ही पहिली चर्चा आटोपली आणि रात्री ९ वाजता "अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा प्रकल्पातून पाणीपुरवठ्याची योजना" याबाबत तारांकित प्रश्न क्रमांक ५३१५ ला दिनांक १९ जून, १९८६ रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात विधानपरिषद सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी उपस्थित करावयाची अर्धा तास चर्चा सुरू झाली. ९ वाजता सुरू झालेली ही चर्चा जवळजवळ रात्री ९-३५ वाजेपर्यंत सुरू होती.

या आयुधामध्ये चर्चा उपस्थित करणारा सदस्यच भाषण करू शकतो. मंत्री किंवा राज्यमंत्री उत्तराचे भाषण करतो. त्या चर्चेत इतरांना भाषण करता येत नाही. मात्र एखाद दुसरे स्पष्टीकरण मागण्यासाठी चर्चेत हस्तक्षेप करता येतो. राज्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण संपल्यानंतर झालेल्या अनुपूरक चर्चेमध्ये नियमांची पक्की माहिती असलेल्या दादासाहेब गवई यांनी चार शब्दांचा एक लहानसा हस्तक्षेप करून एक आश्वासन मिळविले व चार वाक्यांच्या दुसऱ्या हस्तक्षेपात

एक दुसरे आश्वासन मिळविले. सांसदीय आयुधांच्या वापरामध्ये हातखंडा असलेला एखादा मुरब्बी सभासद किती सफाईने चर्चेतील लहानशा सहभागातूनसुद्धा किती महत्त्वपूर्ण आश्वासने पदरी पाडून घेऊ शकतो याचे हे उदाहरण पहायचे असेल तर वाचकांना ती चर्चा मुळातून वाचावी लागेल. माझा तो विधानपरिषदेतील पहिला कालखंड होता. रात्री नऊ-साडेनऊ वाजेपर्यंत सभागृहात उपस्थिती दोन आकड्यातसुद्धा नसतांना श्री. दादासाहेब गवई व विरोधी पक्षनेते श्री. दे. मा. कराळे हे दोन ज्येष्ठ सदस्य आपण उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेच्या शेवटपर्यंत उपस्थित राहतात हीच गोष्ट त्यावेळी मला आनंद व समाधान देणारी होती. त्यातच दादासाहेबांनी लहानशा दोन हस्तक्षेपात मिळविलेल्या दोन भरीव आश्वासनांनी त्या संघर्षाचा मार्ग सुकर झाला व त्यामुळे आम्हा सर्वांनाच मनापासून आनंद वाटला.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच ते अनेक सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर होते. विदर्भ प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या विदर्भ विभागाचे सचिव होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचे विदर्भ विभागीय सचिव होते. त्या नात्याने अमरावतीच्या दैनिक 'हिंदुस्थान' या वृत्तपत्राशी व त्याचे संपादक श्री. बाळासाहेब मराठे यांच्याशी त्यांचा निकट संबंध होता. त्याचवेळी मी माझ्या विद्यालयीन जीवनापासून दैनिक 'हिंदुस्थान' मध्ये पत्रकार म्हणून कार्यरत होतो व त्यामुळे त्यावेळेपासूनच त्यांच्या कामांशी मी जवळून परिचित होतो. दैनिक 'मराठा' चा वार्ताहर म्हणून काम करण्यासाठी मी अर्ज केला होता. त्यावेळी आचार्य अत्रे यांना श्री. दादासाहेब गवई यांनी स्वहस्ताक्षरात एक पत्र दिले होते. ते शब्दशः पुढीलप्रमाणे :—**"प्रिय आचार्य साहेब,** सप्रेम जय भीम, श्री. भा. तु. देशमुख ह्यांनी दैनिक मराठ्याचे प्रतिनिधी होण्याकरिता आपणाकडे अर्ज केला आहे. मी त्यांना बरेच दिवसापासून ओळखतो. संयुक्त महाराष्ट्राचे चळवळीत विशेषतः विद्यार्थी वर्गात त्यांनी बरेच कार्य केले आहे आणि करीत आहेत. गेल्या दोनतीन वर्षांपासून अमरावतीवरून निघणाऱ्या 'हिंदुस्थान' दैनिकाच्या संपादकीय विभागातही काम करतात. त्या दृष्टीने आपल्या पत्राचे धोरण लक्षात घेता अमरावतीकरिता आणि अमरावती जिल्ह्याकरिता त्यांना प्रतिनिधी म्हणून नेमण्यात यावे असा माझा आग्रह आहे. विश्वसनीय प्रतिनिधी म्हणून ते खात्रीने काम करतील आ. न. - **रा. सू. गवई"** आपल्या एका ज्येष्ठ हितचिंतकाने आपल्याला विपत्काळी दिलेले हे शिफारसपत्र मी आजही जपून ठेवले आहे.

श्री. दादासाहेब व मी आम्ही दोघेही अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाचे विद्यार्थी. महाविद्यालयीन शिक्षण संपवून ते त्या महाविद्यालयातून बाहेर पडले व त्यानंतर माझे त्या महाविद्यालयातील विद्यार्थी जीवन सुरू झाले. विदर्भ महाविद्यालयाच्या विद्यार्थी संघाचा अध्यक्ष म्हणून मी निवडून आलो होतो. फ्रेजरपुऱ्यातून गेलेल्या निरोपामुळे विदर्भ महाविद्यालयातील दलित विद्यार्थ्यांचा गट ठामपणे माझ्या सोबत होता. भगत, कांबळे, मेश्राम, वाकपैजन हे माझे विद्यार्थी सहकारी मला आजही नावानिशी आठवतात. पुढे ते मोठमोठ्या पदावरून सेवानिवृत्त झालेत. विद्यार्थी संघाच्या कामानिमित्त आमच्या ज्या बैठकी होत त्यामध्ये पूर्वीच्या दोन-तीन वर्षातील घडामोडींच्या ज्या कथा महाविद्यालयाच्या परिसरात सांगितल्या जात होत्या त्यातील दादासाहेबांशी संबंधित एक कथा सांगण्याचा मोह आवरत नाही.

अमरावती शहरामधील एक सुप्रसिद्ध धन्वंतरी डॉ. गोगटे हे भारत-रशिया मैत्री संघाचे पदाधिकारी होते व ते त्या नात्याने रशियाला जाऊन आले होते. रशिया भेटीवरून परत आल्यानंतर विदर्भ महाविद्यालयामध्ये रशियामधील जीवनपद्धती या विषयावर त्यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यावेळी दादासाहेब गवई हे डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्याविषयी व त्यांच्या विचाराविषयी सतत बोलत असत.

एचबी ११८०—७अ

आदरभाव व्यक्त करीत असत. तेव्हा गवईंना चिडविण्याच्या हेतूने एका मुलाने डॉ. गोगटे यांना भाषणानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एकेरी उल्लेख करून असा प्रश्न विचारला की, "ह्या आंबेडकराला रशियात कोणी ओळखतं का हो?" भाषण संपल्यानंतर सभागृहाच्या बाहेर त्या मुलाला गाठून गवई यांनी "बाबासाहेबांना रशियात कोणी ओळखत नाही, तर मग काय तुला ओळखतं काय?" असे म्हणून त्या मुलाच्या कानफडाखाली खाडकन आवाज काढला. अशी एक कथा आमच्या बैठकीत रंगवून सांगितली जात असे.

पुढे विधानपरिषदेत अनेक वर्षे त्यांच्या सोबत काम केल्यावर त्यांच्यातील मुरब्बी संसदपटू समोर दिसला की ते कोणाच्या कानफडात मारण्याची कल्पनासुद्धा मनाला पटत नसे. एक दिवस आम्ही दोन चार मित्र त्यांच्याच निवासस्थानी बसलो असतांना भोजनोत्तर अनौपचारिक गप्पागोष्टीत मी त्यांना विदर्भ महाविद्यालयातील कानफडात मारण्याची ही कथा सांगितली व एकदा आपली जिज्ञासा पुरी करूनच घ्यावी म्हणून मी त्यांना विचारले, "का हो दादासाहेब! तुम्ही खरच 'फिजिकली' त्या पोराच्या कानफडाखाली आवाज काढला होता काय?" एक मिनिट दादासाहेब स्तब्ध झाले. ओतप्रोत कृतज्ञतेची भावना त्यांच्या डोळ्यामध्ये तरळून गेली. "होय बी. टी.! तुम्ही म्हणता ते 'फिजिकली' खरं आहे." "परमपूज्य बाबासाहेबांविषयी कोणी काही वाईट बोलले की मला सहनच होत नसे." खरं म्हणजे तशी ही कानफडाखाली आवाज काढण्याची गोष्ट कथाच राहिली असती, पण खुद्द दादासाहेबांनीच कालांतराने स्वत: लिहिलेल्या एका लेखामध्ये या प्रसंगाचे मोठे तपशीलवार वर्णन लिहून ठेवले आहे.[१७]

सामाजिक व राजकीय जीवनामध्ये लहानमोठ्या अनेक व्यावहारिक तडजोडी कराव्या लागतात. त्या जरूर कराव्यात. मात्र मुख्य उद्दिष्टाशी तडजोड कधीही करता कामा नये ही त्यांच्या वैचारिक जीवनाची आधारभूत कोनशिला होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे मुख्य उद्दिष्ट समोर ठेवून त्या विचारांचा झेंडा अखेरपर्यंत त्यांनी आपल्या खांद्यावरून कधीही व थोडासाही ढळू दिला नाही. या त्यांच्या उद्दिष्ट निष्ठेतूनच देशाच्या सार्वभौम संसदेच्या सभागृहात पोहोचल्यानंतर अरुण शौरी यांच्या विचारांचा प्रतिवाद करतांना कानफडाखाली आवाज काढण्याची संसदीय आवृत्ती सुद्धा जन्माला घालण्याचे भाग्य त्यांना लाभले. नियमांच्या आवरणाखाली आपल्याला बोलू दिले जाणार नाही हे लक्षात येताच दात आणि नखांचा दाखला देऊन त्यांनी वापरलेल्या एका वाक्याच्या भाषणाने साऱ्या देशात जी वैचारिक लहर उठली ती लक्षात घेता त्यांना संसदपटू असे संबोधण्यापेक्षा 'संसदपटूंचा मेरूमणी' म्हणून संबोधणे हे जास्त शोभून दिसेल.

****

संदर्भ एक : "महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन"

संदर्भ दोन : "दादासाहेब एक अलौकिक व्यक्तिमत्त्व"

संदर्भ तीन : 'नगर' या नियकालिकाचा "श्री. रा. सू. गवई गौरव विशेषांक"

****

(१) संदर्भ एक : खंड ६३, क्रमांक १, पृष्ठ ७४

(२) संदर्भ एक : खंड ६३, क्रमांक १, पृष्ठ ७५

(३) संदर्भ एक : खंड ६३, क्रमांक २, पृष्ठ १२२

(४) संदर्भ दोन : पृष्ठ ८७

(५) संदर्भ दोन : पृष्ठ १७

(६) संदर्भ दोन : पृष्ठ ७४

(७) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४०

(८) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४०

(९) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४०

(१०) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४१

(११) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४१

(१२) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४१

(१३) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४१

(१४) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४३

(१५) संदर्भ एक : खंड ८०, क्रमांक १५, पृष्ठ ४३

(१६) संदर्भ एक : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ ११८

(१७) संदर्भ एक : पृष्ठ ५

-माजी विधानपरिषद सदस्य,
अमरावती.

❑❑

High hopes from Governor

Patna : Suddan departure of governor-*cum*-chancellor R. S. Gavai from Bihar is likely to retard the pace of ongoing academic reforms, feel academics.

Following frequent inspection of colleges in different parts of the state by a Raj Bhawan team headed by OSD R. Krishna Kumar, a sort of redalert was sounded in all institutions and teachers as well as non-teaching staff were made to sit in their respective departments at least for five hours every day. Raj Bhawan introduced the modern concept of virtual class-room in the universities of Bhihar.

It also coined the idea of training NCC cadets for SSB interviews and giving incentives of 10 additional marks to students who join NCC. Efforts were made to set up a central instrumentation centre in Patna University for the benefit of research scholars. Inter-university sports and cultural festivals under the banners of Eklavya and Tarang respectively were held at his initiative.

Besides, an inter-university research festival was on the cards and a centre, called Aryabhatta Centre of Creative Learning in science, was also launched for motivating Science students to undertake practical works.

B. K. Mishra
Bihar.

आमचा जिवलग मित्र

■ **जांबुवंतराव धोटे**

सूर्यभानपुत्र रामकृष्णाने नागपूरच्या धंतोली येथील श्रीकृष्ण इस्पितळात शेवटचा राम म्हटला. प्रदीर्घ काळ मृत्यूशी निकराची झुंज देत शेवटी तो पडलाच. मृत्यू जिंकला आणि रामकृष्ण हरला. बरेच दिवस तो व्हेन्टिलेटरवर झुंज देत होता. त्याच्या झुंजेत व्हेन्टिलेटर त्याला मदत करत होते. शेवटी व्हेन्टिलेटर बाजूला झाले. तो मुक्त झाला. स्वतंत्रपणे तो श्वास घ्यायला लागला. आम्हाला आश्चर्य वाटले. ती कमालच होती. मृत्यू हरताना दिसला. त्याच्या आप्तेष्टात, आमच्या सकट खुशीची लहर आली. पण ती खुशीची लहर थोडे दिवसच उरली. रामकृष्णाने शेवटचा श्वास घेतला आणि मृत्यूला कवटाळले. या झुंजेचा शेवटी जो निकाल लागायचा होता तो लागलाच. शेवटी त्याचा पार्थिव देह उरला. आमच्या वहिनी कमलाताई गवईंनी हंबरडा फोडला. चिरंजीव न्या. भूषण, डॉ. राजेंद्र आणि भगिनी कीर्ती ओक्साबोक्सी रडायला लागले. कनिष्ठ बंधू डॉ. विश्वास गवई आणि कुटुंब हादरून गेले. पोरके झाले. कोण कोणाचे सांत्वन करणार !

रामकृष्ण सूर्यभान गवईचे पार्थिव श्रीकृष्ण इस्पितळातून अंतिम यात्रेला मोठ्या मिरवणुकीने निघाले. नागपूर, अमरावती रोडने अमरावतीला पोहोचले. काही वेळ त्याच्या पार्थिवाने, त्यानेच घडविलेल्या प्रासादात मुक्काम केला. नंतर मजल दर मजल करत ते पार्थिव त्यांच्या जन्मगावी, दारापूरला, दादासाहेब गवई शैक्षणिक संकुलात पोहोचले. नागपूरपासून तो थेट दारापूर संकुलापर्यंत जागोजागी पार्थिव देहावर पुष्पवृष्टी होत होती. 'दादासाहेब गवई अमर रहे' च्या घोषणा दुमदुमत होत्या. अश्रुधारा वाहत होत्या. जागोजागीचे सारे जनसमूह हादरून गेले होते. आम्हीही अंतिम यात्रेत होतो. आमचा सोबती, डॉक्टर मोतीलाल राठी, डॉ. आळशी आमच्या सोबत हाते. माजी आमदार ॲड. विजया धोटेही होत्या. संकुलात एका मोठ्या ओट्यावर सरण रचले जात होते. प्रचंड जनसमूह हेलावून गेला होता. चिता रचली गेली. शाही इतमामाने पार्थिव चितेवर चढविले. श्रद्धांजलीपर भाषणे सुरू झाली. गवई आम्हाला सिनियर डॉ. मोतीलाल राठी, यशवंत शेरेकर, मधुकर केचे, सुरेश भट, यशवंत खापर्डे, व्ही. डब्ल्यू. देशमुख, बी. एस. *ऊर्फ* डॅडी देशमुख, देविसिंह शेखावत, बाबूराव भेंडे, अरविंद ढवळे, बबन मेटकर, बाबा सोमवंशी वगैरे; आम्हाला सिनियर, रजवा मिश्रा, प्रल्हाद सपकाळ, शरद सरनाईक, नंदू राठी, नावंदर, सद्दद्दिन ममदानी, अब्दुल धमाणी, एफ. एम. *ऊर्फ* छोटू खान, देशपांडे, देशमुख, अब्रार अहमद खान, अतावर खान वगैरे; आम्ही ऐका बॅचचे, कॉ. अण्णा वैद्य आणि कॉ. बापू वैद्य आपले शिक्षण पूर्ण करून कॉलेजचे बाहेर गेले होते. आमची त्यावेळेची टीम मोठीच बहादूर आणि हिमतीची, सचोटीची, बुद्धिवादी आणि क्रांतीकारी होती. मधुकर केचे, रा. सू. गवई हे प्रस्थापितांच्या सोबत असायचे. आम्ही मंडळी प्रस्थापितांचे विरोधक म्हणून गाजत होतो. लढत होतो. आंदोलन करीत होतो. पोलिसांशी मुठभेड होत होती. आमचेवर पोलिस केसेस होत होत्या. कॉलेजच्या बाहेर पडत होतो. कॉलेज बंद करत होतो. कॉलेजमध्ये सोशल गॅदरिंग होत होते. त्यावेळची कॉलेजची निवडणूक फारच गाजली. कॉलेजबाहेरच्या पुढाऱ्यांनी त्यात भाग घेतला. कॉलेज निवडणुकीसाठी आमच्यातर्फे बी. एस. *ऊर्फ* डॅडी देशमुख आणि प्रस्थापितांतर्फे बाबुराव भेंडे निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे होते. निवडणूक फारच गाजली. खर्चही खूपच झाला. गाड्यांचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. सत्यार्थाने पैसा उधळलाच. बापूराव भेंडेचे मुख्य प्रचारक होते मधुकर केचे आणि रा. सू. गवई.

आम्ही हरलो. आमचा कँडिडेट डॅडी देशमुख पडला. केचे आणि गवईचा कँडिडेट बाबूराव भेंडे निवडून आला. आम्ही पराभूत झालो होतो. पैसा जिंकला होता.

रा. सू. गवई शिकत असताना कॉलेजमध्ये, मधेमधे मुक्काम करीत होता. अठराविश्वे दारिद्र्यातही त्याची शिकण्याची जबर जिद्द, शेवटी त्याने शिक्षण पूर्ण केलेच.

तेथून काही वर्षांनी रिपब्लिकन पार्टीने भूमिहिनांचे आंदोलन छेडले. त्यात आर. एस. गवई जास्तच ॲक्टिव्ह झाले होते. आम्ही आमचा फॉरवर्ड ब्लॉक पक्ष, भाई सुदाम देशमुख आणि त्याचा कम्युनिस्ट पक्ष या आंदोलनात पूर्णत्वाने सहभागी झालो होतो. त्यातही हजारो सत्याग्रही जेलमध्ये कोंबण्यात आले. आम्ही आर. एस. गवई आणि भाई सुदाम देशमुख नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात जेलबंद होतो.

आर. एस. गवई इस्पितळात मृत्यूशी युद्ध करीत असताना त्यांच्या शुश्रुषेत कमला वहिनींनी स्वतःला झोकून दिले. त्या इस्पितळातच मुक्कामी राहिल्या. राजेंद्र, भूषण, विश्वास, कन्या कीर्तीही ठिय्या मारून असायचे. वडील इस्पितळात आजारी असतानाही भूषण हायकोर्टात न्यायाधीशाच्या खुर्चीत बसून न्यायनिवाडा करीत होता. कमाल आहे त्याची आणि त्याच्या कर्तव्य दक्षतेची. गीतेत सांगितल्याप्रमाणे तो आम्हाला कर्मयोगी वाटायचा. स्थितप्रज्ञ असाच असू शकतो. आम्ही विचार करीत होतो. आम्हीही इस्पितळात असायचो. कलकत्याचा दौरा आम्ही त्याकरिता सोडून दिला. कमला वहिनीचा त्याग एक आदर्श आहे. त्यांचेकडे पाहून आम्हाला सती सावित्री याद यायची. त्या आम्हाला आदरणीय आहेत. आम्ही त्यांना नमन करीत आलो. आम्ही मुंबईच्या सेंट जॉर्जेस इस्पितळात भरती असतांना, तेथला अधिकारी रा. सू. चा धाकटा बंधू डॉ. विश्वास गवईच्या पत्नी आम्हाला रोज सकाळी न्याहारीसाठी डबा आणून देत होत्या. त्या प्राध्यापक जोगेंद्र कवाडेंच्या भगिनी आहेत. दोघीही आम्हाला मातेसमान आत्मिय आहेत.

१९६२ साली यवतमाळ विधानसभा मतदारसंघातून तेथील शूर मतदारांनी आम्हाला काँग्रेसच्या विरोधात निवडून आणले. विधानसभेवर सदस्य म्हणून पाठविले. रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेचे सभापती पद भूषविले. राज्यपाल वगैरे झाले. ते जसजसे मोठे होत गेले. तसतशी त्यांचेवर त्यांच्याच मंडळीची टीका व्हायला लागली. त्यांना संधिसाधू म्हणून संबोधण्यात आले. वास्तविक पाहता त्याचा तो मुत्सद्दीपणा होता. राजकीय धोरण होते. डॉ. आंबेडकरांना काँग्रेसचे विश्वस्त महात्मा गांधीचे सहाय्य होते. त्यांनीच त्यांना घटना समितीवर घ्यायला लावले. मंत्रिमंडळात सामावून घेतले. कॉंस्टिस्ट्यूशनच्या ड्राफ्टिंग कमिटीचे चेअरमन केले. नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आझाद वगैरेंचा याला विरोध असताना गवईंनी बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला. त्या अगोदर इंदिरा गांधीच्या सल्ल्याप्रमाणे आम्ही अंतुले सरकार उभे केले. बॅरिस्टर अंतुले आमचे सोबती होते. अंतुलेच्या माध्यमातून वरळी को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीचे गवईंना आम्ही चेअरमन केले.

त्यावेळेस गवईंना, गवई साहेब म्हणून संबोधले जात होते. साहेब आम्हाला मुळातच आवडत नाही, आम्ही त्याला म्हणालो, त्यावर तो म्हणाला, मला दादा, दादासाहेब संबोधन आवडते. आमचा त्या दिवसापासून तो दादा झाला. दादासाहेब झाला. गवई साहेबांचा दादासाहेब झाला. दादासाहेब गायकवाड नंतर दादासाहेब गवई, दादासाहेब मोठे किमयागार होते. चतुर होते, मुत्सद्दी होते. डिप्लोमॅट होते. विशेष म्हणजे प्रॅक्टिकल होते. एकाच वेळेस ते जांबुवंत धोटेचे जीवलग सोबती आणि वसंतराव नाईकांचे निकटचे मित्र होते. वसंतदादांशी त्यांची जवळीक होती आणि वसंत दादांशी दगाबाजी करणाऱ्या शरद पवारांच्याही विश्वासातील ते होते. बॅ. रामराव आदिक, जवाहरलालजी दर्डा आणि आर. एस. गवई हे त्रिकुट त्यावेळी बहुत प्रसिद्ध होते.

थोडक्यात सांगायचे झाल्यास ते अजात शत्रू होते. 'राखावी बहुतांची अंतरे भाग्य येते तदनंतरे ' या उक्तीप्रमाणे ते जीवन जगले, भाग्यवान ठरले. रामकृष्ण सूर्यभान गवई यांचे पूर्ण नाव आमच्या बापांच्या वडिलांचे नावही सूर्यभान हे साम्य यौगिक आहे. मध्ये त्याची तबियत खराब असल्याचे आम्हाला कळले. त्याला भेटायला गेलो. आमचे सोबत चार्टर्ड अकाऊंटन्ट सुनील चोखारे होता. दादासाहेबांचे चिरंजीव हायकोर्ट जज, भूषण यांच्या बंगल्यात ते राहत होते. अंत्ययात्रेसाठी चिता रचली गेली. शाही इतमामाने पार्थिव चितेवर चढविले. श्रद्धांजलीपर भाषणे सुरू झाली. त्यात औपचारिकताच जास्त होती. कळ कुणाच्याच भाषणात नव्हती. श्रद्धांजलीला आमचे नाव पुकारण्यात आले. आम्ही भाषणाच्या मन:स्थितीत नव्हतोच, आम्ही नकार दिला. असहायता व्यक्त केली. शेवटचा क्षण आला. चितेला अग्नी द्यायची वेळी आली. चिरंजीव भूषण आणि राजेंद्रचे नाव पुकारण्यात आले. आमच्या समोरच आमच्या कमला वहिनी बसल्या होत्या, आपल्या आई बहिणीच्या सोबत विषण्ण मन:स्थितीत चिरंजीव राजेंद्र रूदन करत बसला होता. आपल्या वडिलांच्या चितेला अग्नी द्यायची त्याची मन:स्थिती नव्हती, त्याने रडतच नकार दिला. पण शेवटी रिवाजाप्रमाणे जवळच्यांनी त्याला बळजबरी करीत उठवलेच. शाही इतमामाची बंदूकधारी पोलिसांची सलामी झाली. खांद्यावरच्या बंदुका आकाशाकडे उंचावून सरकारी नियमाप्रमाणे फैरी झडल्या. सरकारी सलामी झाली. बौद्ध धर्मिय पद्धतीच्या प्रार्थना झाल्या मंत्रोपचार सुरू होते. चिरंजीव भूषण आणि राजेंद्रने चितेला भडाग्नी दिला. चिता पेटली. ज्वाला उसळत होत्या. अग्निज्वाळा पार्थिव देहाचा स्वाहा म्हणून ग्रास घेत होत्या. प्रेमळ आणि हसतमुख चेहरा, सुंदर ओठांवर सदासर्वकाळ झळकणारे मधुर स्मित, गालावर किंचितशी खळी, सुंदर व्यक्तिमत्त्वाचे सुंदर पण कर्तव्यकठोर शिल्प, अग्नीने स्वाहा केले. प्रचंड जनसमूह दु:खाश्रू सांडत होता. दु:खाची लहर आली होती. जनसमूह परतायला लागला.

रामकृष्ण सूर्यभान गवई गरिबीत, फकिरीत जन्मला, वाढला अन् शेवटी अमिरीत गेला. गरीब म्हणून उगवला आणि कुबेर म्हणून अस्तास गेला.

आम्ही सहाध्यायी, अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजमध्ये आम्ही शिकलो. रा. सूं. ची शिकण्याची जबर जिद्द, शेवटी त्याने शिक्षण पूर्ण केलेच. तो संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा काळ होता. चळवळीचे वारे वाहत होते. विदर्भात तसे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने बाळसे धरले नव्हते. अमरावती आणि यवतमाळ आम्ही चळवळीने पेटवून टाकले होते. चळवळीत आम्ही सर्व सोबत होतो. रा. सू. गवईच्या मेंदूत रिपब्लिकन पार्टी होती. आमच्या डोक्यात कम्युनिस्ट, फॉरवर्ड ब्लॉक पार्टी होती, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे आंदोलन सुरू होते. आंदोलनात कम्युनिस्ट पार्टी, फॉरवर्ड ब्लॉक पार्टी, त्या वेळेसचा जनसंघ, हिंदुमहासभा, मुस्लिम लीग, शेतकरी कामगार पक्ष, लाल निशाण गट, रिपब्लिकन पार्टी, बोल्शेविक पार्टी, काँग्रेस पार्टी डॉ. नरवणे ग्रुप, अपक्ष मंडळी वगैरे सहभागी होते. यवतमाळ आमची जन्मभूमी आणि अमरावती आमची कर्मभूमी. त्यावेळेस नागपूर राजधानीसह विदर्भाच्या चळवळीचा जोर होता. यवतमाळ, अमरावतीत आम्ही विदर्भाची चळवळ मोडून काढली. अमरावतीत आमचे नेते होते भाई सुदाम देशमुख, कॉ. अण्णा वैद्य, कॉ. बापू वैद्य आणि निळकंठ आखाड्याचे आमचे उस्ताद मधूकर भेंडकर, भीमराव कारंजकर, बार्लिंगे वगैरे आमचे नेते होते. यवतमाळ येथील आमचे वडील बंधू मधुकरराव धोटे, शेतकरी कामगार पक्षाचे हरिभाऊ जामनकर, ॲड. मधुकर मानकर, बाबा मानकर, बाबाराव कापशे टेलर, रामू भावे वगैरे. आमच्यावर बऱ्याच पोलीस केसेस झाल्या. स्टेशनमध्ये अनेकदा बंद झालो. जेलमधल्या यात्रा झाल्या. आम्ही अनेकदा जखमी झालो. पोलिसांनाही जखमी केले.

आम्हा मंडळीचे कॉलेज सुटले. चळवळीने मात्र जोर पकडला. सर्वच स्तरात आमच्या चळवळी चालू होत्या.

रा. सू. गवई रिपब्लिकन पार्टीत तर आम्ही फॉरवर्ड ब्लॉक पार्टीत सक्रिय झालो. आम्ही यवतमाळ जिल्ह्यात केलेले भूमिहिनाचे आंदोलन फारच गाजले. तो त्यावेळेस देशाचा इश्यू ठरला. कसेल त्याची जमीन, भूमिहिनांना भूमिवान करा. अश्रुधूर झाले. लाठीचार्ज झाले. पोलिसांचे दंडूके बरसत होते. आम्हीही प्रतिकार करीत होतो. जखमी होत होतो. जखमी करीत होतो. ते त्यावेळेस एक प्रकारचे युद्धच होते. हजारो लोक जेलमध्ये डांबले जात होते. विदर्भातील जेल तुडूंब भरले होते. जेलमध्ये जागा उरल्या नव्हत्या. शेवटी सत्याग्रहींना पोलीस लॉऱ्यांमध्ये बसवून दूर जंगलात सोडून देत होते. यवतमाळच्या मतदारांनी आम्हाला विधानसभेवर सदस्य म्हणून पाठविले. त्यानंतर रा. सू. गवई विधानपरिषदेवर निवडून गेले. त्यात आमचा सिंहाचा वाटा आहे. नंतर त्यांची वाढती कमान राहिली. आम्ही एकत्रित राहिलो. एकत्रित लढलो. आम्ही काँग्रेसला शत्रू नंबर एक मानत होतो. पुढे शेवटी कावेबाज यशवंतराव चव्हाणांनी डाव टाकला. रिपब्लिकन पार्टीचे अध्वर्यू चंद्रपूर नागपूरचे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे आणि भाऊराव ऊर्फ दादासाहेब गायकवाड, नाशिक यांना कवेत घेतले. काँग्रेस रिपब्लिकन पार्टीची युती झाली. आम्हाला ती आवडली नाही. ती आत्मघाती वाटली. आम्ही त्याचा जाहीर निषेध केला. आमच्या वक्तव्यातील वाक्य होते 'अत्तराची कुपी नर्क कुंडात टाकली तर नर्क कुंडाला सुगंध तर येणार नाही. उलट अत्तराची कुपी दुर्गंधी होईल.' अत्तराची कुपी त्यावेळेस खूपच गाजली. आमच्या विरोधात त्याच संदर्भात रिपब्लिकन आणि काँग्रेसने अभियान राबवले. खास यवतमाळात येऊन आझाद मैदानात आमची ऐशीतैशी केली. काँग्रेसचे यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांचे हे कारस्थान होते. त्यांच्या पैशातच आमची निंदा करणारी यवतमाळची जाहीर सभा आली. काँग्रेसचा पैसा होता. भा. रि. प. च्या पुढाऱ्यांची तोंड होती. आमचा गुन्हा हाच की आम्ही युतीला विरोध केला. आम्ही गुन्हेगार ठरलो. शेवटी यातूनच फुटीचे बीज पेरले गेले. रिपब्लिकन पार्टीत फूट पडली. पार्टी विभाजित झाली, पार्टीची शक्ती कुंठीत झाली. बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, दादासाहेब गायकवाड राज्यसभेत गेले. राजभोज, ॲ. बाबू हरिदासजी आवळे, बी. सी. कांबळे, दादासाहेब रूपवते वेगळे झाले. आजही त्या फुटीचे फळ रिपब्लिकन जनतेला चाखावे लागते. ती आतून तुटून गेली. या मुळेच काशीरामने डोके वर काढले. बहुजन समाज पार्टी वाढली आणि नावलौकिकास आली. आम्ही मात्र टिकेचे टार्गेट झालो.

नागपूर येथील दीक्षाभूमीचा प्रपंच उभा करण्यात गवईचा सिंहाचा वाटा आहे. काँग्रेस रिपब्लिकन युतीनंतर रा. सू. सातत्याने सत्ताधारी काँग्रेससोबत राहिले. त्यामुळे सत्तेचे पाठबळ त्यांच्या पाठीशी होते. सत्ताधारी काँग्रेसने रा. सू. गवई, वा. कों. गाणार यांना दारूचा कारखाना दिला. तो नागपूर येथे उभा राहिला. आम्ही प्रत्यक्षपणे आमच्या या दोन्ही मित्रांजवळ आमचा विरोध प्रकट केला. त्यावर ते हसले. ते म्हणाले, भाऊ आम्ही काही संन्यासी नाही आपल्या सारखे. त्याने शैक्षणिक साम्राज्य उभे केले.

परवा त्याला आम्ही अंतिम निरोप दिला. आमचा सखा दादासाहेब गवई गेला. तो आता कधीच परतून येणार नाही. येथे कायमच्या मुक्कामाला कोण आलेला आहे? आम्ही धरतीवरचे हंगामी मुसाफिर आहोत. मुसाफिरी संपली की गाशा गुंडाळून निघून जाणार, कायमचे. मृत्यूबद्दलची फिलॉसॉफी काहीही सांगो, पाश्चात्त्य फिलॉसॉफी आणि पौर्वात्य फिलॉसॉफी मिळती जुळतीच आहे. तिकडे सॉक्रिटिस आणि इकडे भगवान कृष्ण, मृत्यूबद्दल काहीही उदात्त सांगत असले तरी मृत्यू ही भयंकर हानी आहे. कधीही भरून न निघणारी हानी आहे. मृत्यूची फिलॉसाफी, इज दी फिलॉसाफी ऑफ कन्सोलेशन, थिअरी ऑफ कन्सोलेशन.

जे काय असेल ते असो, रामकृष्ण सूर्यभान गवई गरीब म्हणून जन्माला आला आणि श्रीमंत होऊन गेला. गरिबाचा तो कुबेर झाला. गरिबी फकिरीत जन्म घेऊन कुबेरीत गेला. कुबेर होऊन गेला. मात्र सारे सारे सोडून गेला. त्याने पराक्रमाने उभे केलेले साम्राज्य मागेच राहिले. भगवद्गीतेबद्दल जगात खूप काही लिहिले गेले. सर्वभाषेत गीता जन्माला आली. मंडालेच्या अत्यंत खडतर कारागृहात 'गीता रहस्य ' हा महान ग्रंथ लोकमान्य टिळकांनी रचला आम्हीही एक अभ्यासू विद्यार्थी आहोत. आमचे मते गीतेचे सार आहे–'सोचो साथ क्या ले जावोगे.'

काय नेले दादासाहेबांनी आपल्या सोबत ? सारे सारे येथेच राहिले. त्याने उभे केलेले साम्राज्य येथेच राहिले. उरल्या फक्त त्याच्या स्मृती आणि उरले त्याचे कर्तबगार चिरंजीव हायकोर्ट जज न्या. भूषण, डॉ. राजेंद्र, बहीण कीर्ती, जिची कीर्ती त्या काळात अमरावती सुंदरी म्हणून होती. ती वास्तवातच अंतरबाह्य सुंदर आहे. उरला त्याचा धाकटा भाऊ, डॉ. विश्वास गवई आणि आमच्या प्रिय कमला वहिनी.

-ज्येष्ठ विदर्भवादी नेते
माजी आमदार-खासदार.

❑❑

एक्टिविस्ट गवई की बिदाई

आम तौर पर राज्यपाल की किसी प्रदेश कुलाधिपति पद पर पदेन होते है। यांनी कुलाधिपति का पद एक तरह से राज्यपालों पर थोपा या जोड़ा गया होता है। निवर्तमान राज्यपाल आर. एस. गवई इस प्रचलित धारणा से बिलकुल अलग तल पर खड़े रहे। उन्होंने अपने को सक्षम कुलाधिपति सिद्ध करने के लिए कार्यकाल के दो साल में जितनी लंबी लकीर खींचे है, उसे यह प्रदेश एक जाते हुए महामहिम का तोहफा मान कर याद करेगा और इसे वह पैमाना भी माना जायेगा, जिसके आधार पर अगले कुलाधिपतियों (सह-राज्यपालों) के काम की माप-तौल होगी। गवई ने बिहार के एक संक्रमण काल में, राजभवन का काम संभाला था। व्यवस्था की बाहें अपने ढंग से मरोड़ते हुए जो लोंग बहुदलीय लोकतंत्र के भीतर १५ साल का लंबा एकक्षेत्र शासन मैनेज कर आत्ममुग्ध थे, उनकी विदाई हो चुकी थी। उच्चशिक्षा समेत अनेक क्षेत्रों में गुणवत्ता के खंडहर बिखरे पड़े थे। विश्वविद्यालयों में शैक्षिक सत्र सालों पीछे चल रहे थे। विश्वविद्यालय अनुदान आयोग (यूजीसी) से अनुदान मिलना मुश्किल हो गया था। कुलपतियों की नियुक्ति उनकी शैक्षिक-प्रशासनिक क्षमता से नहीं, बल्कि बिरादरी से लेकर सत्तारूढ दल के प्रति निष्ठा जैसे अनुचित मानको पर तय हो रही थी। इसके विपरित गवई ने कुलपतियों की नियुक्ति में बायोडाटा व साक्षात्कार को आधार बनाने की परंपरा शुरू की। शैक्षिक सत्र पटरी पर आने लगे।

बिना पढ़ाने वेतन लेने वाले कालेज और विश्वविद्यालय शिक्षकों पर शिकजा कसा जाने लगा। कालेजों का औचक निरीक्षण शुरू किया गया। कुलाधिपति गवई की पहल पर आये यूजीसी और नैक के वरिष्ठ अधिकारियों ने यहां राज्य के कुलपतियों तथा प्राचार्यों की बैठक में बताया कि आयोग से अधिकतम अनुदान पाने के लिए किन नियमों का पालन किया जाना चाहिए। इससे पहले कभी ऐसा संवाद स्थापित करने का प्रयास नहीं हुआ था।

-दैनिक जागरण,
बिहार.

विदर्भरत्न दादासाहेब गवई

▪ रणजीत देशमुख

दादासाहेब गवई म्हणजे विदर्भाला लाभलेले रत्नच होते. पण त्यांचे कर्तृत्व विदर्भापुरते सीमित नव्हते. त्यांचे कार्य देशस्तरावर होते मग भलेही महाराष्ट्राच्या विधिमंडळात त्यांनी प्रदीर्घ काळ आपला सहभाग नोंदवला असेल. पण रिपब्लिकन पक्षाचा झेंडा घेऊन त्यांनी देशव्यापी कार्य केले. कोणताही राजकीय वारसा, वाडवडिलांची पुण्याई नसतांना त्यांनी राजकीय, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन केले.

गौतमबुद्ध व डॉ. आंबेडकरांचे ते निस्सीम भक्त/उपासक होते. बुद्धाची करुणा, बाबासाहेबांचा निर्धार, शाहू महाराजांची समता व महात्मा फुल्यांचा सामाजिक विचार इत्यादी गुणसंपदा या थोर नेत्यांकडून त्यांनी घेतली होती.

अतिशय कर्तव्य कठोर, तेवढेच मृदू. आपल्या कडक शिस्तीची झळ इतर क्षेत्रातील व्यक्ती व मित्रांना कधी लागू दिली नाही. त्यांचे सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. हा जिव्हाळा त्यांनी आयुष्यभर जोपासला.

प्रत्येक कार्यकर्त्याला नावाने ओळखणारे ते नेते होते. शरद पवार आणि दादासाहेब या दोघांची ही खासियत. यासाठीच ते प्रसिद्ध होते. समाजात, राजकारणात त्यांची अजून एक वेगळी ओळख होती. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय, सामाजिक जीवनातील घडामोडींचा चालता बोलता कोष म्हणून दादासाहेब प्रसिद्ध होते.

दादासाहेब गायकवाड यांना अशीच प्रसिद्धी लाभली ती दादासाहेब गवई यांच्या मदतीनेच. बाबू जगजीवन राम किंवा काही काळ त्यांची मुलगी मीरा कुमार यांचा अपवाद वगळता कोणाही नेत्याला एवढे यश लाभले नसेल. सतत ३० वर्षे दादासाहेब विधानपरिषदेत उप सभापती, सभापती होते. तेही त्यांच्या पक्षाचा एकही आमदार नसताना. नंतर ते खासदार बनले. शिक्षण, रोजगार हमी योजना, वैद्यकीय उपचार उपलब्धता आदी प्रत्येक विषयात त्यांनी भरीव कामगिरी केली.

याच काळातील एक प्रसंग मला आठवतो, मी नुकताच मंत्री झालो होतो. सभागृहात मी एका प्रश्नाला उत्तर देत असताना मध्येच दादासाहेब म्हणाले, 'मंत्रीमहोदय नवीन आहेत, मला चार प्रश्न विचारायचे आहेत' त्यांनी चार प्रश्न विचारले, त्यावर उत्तर देताना मी म्हणालो, १ व ३ या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे आणि २ व ४ या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. यामुळे सभागृहात हशा पिकला.

दरम्यान दादासाहेब, आपण कोणते प्रश्न विचारले, हे विसरले, त्यावर ते म्हणाले मी कोणते प्रश्न केले?

या संदर्भात मी काहीच करू शकत नव्हतो. यामुळे सभागृहात चांगलीच खसखस पिकली.

त्यांच्या स्वभावातील मोकळेपणा, खास वऱ्हाडी आदरातिथ्य, दिलदारपणा आणि आपणहून मदतीचा हात पुढे करण्याची प्रवृत्ती अनोखी होती याचा अनेकांना अनुभव आला आहे. त्यांच्या या वागण्याने अनेकजण बुजून जात. याचा त्यांना अहंकार नसे. त्यांच्या बोलण्यात याचा ते जराही स्पर्श उमटू देत नसत. एवढा त्यांचा संयम होता. एकूण विचारप्रक्रियेवर त्यांचे कमालीचे नियंत्रण होते.

परिस्थितीचा दांडगा अभ्यास, उत्तम क्षमता, अचूक डावपेच, मुत्सद्दीपणा ही दादासाहेबांची वैशिष्ट्ये. सर्व शोषित पीडित, वंचितांच्या समस्यांविषयी त्यांच्या अंतकरणात खोल रुजलेली कळकळच त्यांना हे अभूतपूर्व यश देऊन गेली, असे म्हणता येईल. सार्वजनिक सद्‌गुणांखेरीज

व्यक्तिगत आयुष्यातील कोणालाही आपलासा करून घेण्याचा गुण, दिलदारपणा व निखळ मोकळेपणा हे गुणही त्यांच्या राजकीय यशास सहाय्यकारी ठरले हे नक्की.

म्हणूनच देश विदेशातील अनेकांशी ते जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करू शकले. त्यांना यामुळेच की काय जगन्मित्र म्हणून संबोधले जायचे. ते अजातशत्रू होते. अटलबिहारी वाजपेयी, शरद पवार, फारुख अब्दुल्ला, एन. डी. पाटील, भाई ए. बी. वर्धन, दत्ता ताम्हणे, नरूभाऊ लिमये, केशवराव धोंडगे, प्रमोद नवलकर, मुस्लिम लीग, विश्व हिंदु परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आदी सर्वांशी त्यांची आत्मीयता होती. हे संबंध त्यांनी आयुष्यभर जोपासले.

विधानपरिषदेतील त्यांची कारकीर्द लक्षणीय मानली पाहिजे. लोकशाही संकेत, सभागृहाची प्रतिष्ठा राखूनही माननीय सदस्य आमदार व मंत्र्यांना योग्य न्याय देण्यात ते यशस्वी ठरले. प्रसंगी चुचकारून, त्यांना अधिकारवाणीने फटकारून, दादासाहेबांनी सभागृहाचे कामकाज यशस्वीपणाने चालवले.

एखाद्या मुद्यावरून सदस्यांच्या भावना अनावर झाल्या तर बरेचदा अनावस्था प्रसंग निर्माण व्हायचा. अशा वेळी ते आधीच सभागृह स्थागित करीत. संबंधितांना बोलवून चर्चा करीत. मंत्री आमदार, मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते यांच्याशी चर्चा करून समझोता घडवीत आणि पुन्हा खेळीमेळीच्या वातावरणात सभागृह सुरू होई.

राजकारणात आज ते वातावरण राहिलेले नाही. राजकारणच गढूळ झाले आहे. आज कोणत्याही थराला जाण्याची वृत्ती बळावली आहे. राजकारणातील परस्परांचा मान, शब्द राखण्याची वृत्ती वगैरे सर्व काही जुन्या पिढीसोबत संपले की काय, अशी आजची स्थिती आहे. जनमानसात राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा डागाळण्याचे हेही एक कारण आहे.

दादासाहेब यापासून अलिप्त होते. राजकारणात राहून त्यांचे राजकीय जीवन निष्कलंक होते.

विधिमंडळात दादासाहेब गवई व नानासाहेब (शंकरराव) चव्हाण हे दोघे पट्टीचे पान खाणारे. पानपुडा किंवा चंची ही या दोघांची खासियत. एक वऱ्हाडी, दुसरे मराठवाड्यातले पण दोघांचाही शौक सारखाच. या माध्यमातून ते कदाचित लोकांना आपलासा करून टाकीत असत. नानासाहेब तर स्वतः पानाची एक न् एक शीर हळुवार काढीत बढीया पान बनवून खायला देत असत. यात त्यांना खूपच रूची होती. दादासाहेबही त्यातलेच. ते पटकन पानपुडा समोर करणार. एखादा कुणी रागात असला तर पानासारखा विरघळून जायचा.

शेवटी ते विदर्भवादी बनले

दादासाहेब मुळात संयुक्त महाराष्ट्रवादी. पण शेवटी शेवटी ते विदर्भाचे समर्थक बनले, याचा मला मोठा आनंद झाला होता. आमचा याच विषयावर वाद होत असे. त्यांच्या या भूमिकेतील बदल म्हणजे एखाद्या संधिसाधू राजकारण्याची खेळी नव्हती. ती एक प्रामाणिक व्यथा होती. आजवर विदर्भाच्या विकासाची केवळ आश्वासनेच दिली गेली होती, विदर्भ विकासापासून वंचितच राहिला, त्यामुळेच आज कधीही नव्हती एवढी विदर्भ वेगळा होण्याची गरज त्यांना वाटू लागली. त्यांचे हे विचार अनेकांना आपल्या संयुक्त महाराष्ट्रवादी भूमिकेचा पुनर्विचार करायला भाग पाडतात.

दादासाहेब गवई हुशार राजकारणी होते, तसेच ते दूरदर्शी होते. १९९० मध्ये निवडणूक युती करण्याची बोलणी फिसकटली होती. नंतरच्या निवडणुकीत मात्र ते यासाठी तयार झाले. मी त्यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष होतो. शरद पवार, रामराव आदिक आणि मी आर्दीनी गवई साहेबांचे यासाठी मन वळवले. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस-रिपब्लिकन युती झाली, त्याचा चांगलाच फायदा झाला.

त्यात गवईंच्या पक्षाने चार जागा जिंकल्या, त्यांच्या जागांसह एकूण ३७ जागांवर काँग्रेस रिपब्लिकन युतीने बाजी मारली होती.

दीक्षाभूमी एक दीपस्तंभ

आयुष्यभर दीनदलितांसाठी लढलेला हा सच्चा आंबेडकरी नेता. त्यांनी या लढ्यासाठी आयुष्य खर्ची घातले.

दीक्षाभूमीवरील आपल्या सतत प्रयत्नामुळे भव्यस्तूप-वास्तुच्या रुपाने त्यांनी आंबेडकरांना वाहिलेली ही श्रद्धांजली तर आहेच पण त्याचबरोबर आंबेडकरी समाजाला पुढील अनेक पिढ्या मार्गदर्शन करणारा हा दीपस्तंभ उभा करण्याचे महान कार्य त्यांनी केले.

-माजी मंत्री व माजी प्रदेश काँग्रेस अध्यक्ष.

❑❑

Crusader who raised hopes of revival

The two-year stint of outgoing Bihar Governor R. S. Gavai will be known for his pro-active role in the field of higher education in the capacity of a Chancellor.

When Raj bhawan was in the midst of controversy over his direct interference in university matters, removal of former PU V-C Dr. Y. C. Simbadri and a series of raids in colleges by his Special Officer Dr. R. Krishna Kumar, the Government came to his rescue.

Gavai also supported the Government during the devastating floods last year when the Chief Minister was in Mauritius, In the face of vicious Opposition onslaught, Gavai handled the situation like a seasoned campaigner that he is. He cut short his visit to his native State and returned to Bihar to monitor the situation in the absence of the Chief Minister. During Bihar-bashing in Maharashtra by Bal Thackeray and Raj Thackeray, Gavai declared himself a ' Bihari ' to calm down frayed tempers in the State.

He may not have fully succedded in his mission to revamp higher education, but nobody could fault his commitment. Aware of State's poor track record in availing UGC grants, he invited top brass of the apex body and NAAC at his initiative.

-Arun Kumar
Patna.

सुसंस्कृत आणि दिलदार व्यक्तिमत्त्व

▪ उल्हास पवार

महाराष्ट्रातल्या राजकारणात सुसंस्कृत, मनमिळाऊ, साहित्य, कला, संस्कृती, समाजकारण आणि राजकारण यांचा उत्तम संगम ज्या मोजक्या व्यक्तिमत्त्वांमध्ये असलेला स्मरणात राहील त्यामधील उत्तम व्यक्तिमत्व म्हणजे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई. आंबेडकरी विचारांशी एकनिष्ठ राहून त्यांनी अखेरपर्यंत राजकारण आणि समाजकारण केले हे जरी सत्य असले तरी त्यांच्या बोलण्यातून संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा उल्लेख, त्यांच्या आठवणी अनेक वेळा ऐकायला मिळत असत. माझ्याशी बोलताना त्यांच्या लहानपणी त्यांच्या वडिलांच्या बरोबर या दोन्हीही संताना केवळ जवळून पाहिले असे नाही, विशेषत: तुकडोजी महाराज यांनी त्यांना मांडीवर बसवून खेळवल्याचे देखील आपल्या आठवणीद्वारे ते सांगत. आधुनिक काळातील समानतेचा आणि मानवतेचा संदेश आणि विचार आचरणात आणणाऱ्या या दोन्हीही संतांचा सहवास लाभणे हे माझे भाग्यच मी मानतो असेही ते म्हणत. 'सर्वांभूती समदृष्टी' हे संतवचन आयुष्यभर त्यांनी जपले.

चेहऱ्यावरचे स्मितहास्य, बोलण्यातला गोडवा, वागण्यातले साधेपण याचा अनुभव माझ्यासारख्या अनेकांनी त्यांच्या सान्निध्यामध्ये राहून घेतला. अतिशय मनमिळाऊ असलेल्या या नेत्याने महाराष्ट्र आणि देशात सर्व राजकीय पक्षांमध्ये आणि समाजघटकांमध्ये असंख्य मनमिळाऊ मित्र जोडले. एकदा त्यांच्याशी झालेली मैत्री ही कधीच तुटली नाही. वैचारिक मतभिन्नता टोकाची असूनही अनेकांशी प्रेमभाव जोडण्याचे कौशल्य आणि त्यामुळेच स्व. यशवंतराव चव्हाणांपासून वसंतराव नाईकांपर्यंत, बॅ. अंतुलेंपासून त्यावेळच्या जनसंघाच्या उत्तमराव पाटलांपर्यंत अत्यंत जिवाभावाचे त्यांचे संबंध त्यांनी अखेरपर्यंत जपले. अगदी आपली घरगुती किंवा कौटुंबिक कामे विश्वासाने गवई साहेबांना अनेकांनी सांगितल्याचे मी पाहिले आहे कारण ते काम नक्की करतील असा विश्वास सर्वांना वाटायचा. साधे परंतु अत्यंत व्यवस्थित नीटनेटके राहणे, उत्तम पोषाख, सभागृहात नेहमी जोधपुरी किंवा जाकीट घालणे असा सभापतीपदासाठी एक भारदस्तपणा त्यांनी त्यांच्या राहण्यातून जपला.

मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांवरचे त्यांचे प्रभुत्व, समारंभाचे औचित्य आणि समयसूचकताही अनेक ठिकाणी त्यांनी सिद्ध करून दाखवली. सभागृहात अनेक तणावाचे प्रसंग निर्माण होत असतात. त्यांनी मोठ्या कौशल्याने ते हाताळले आणि त्यांच्या सर्व पक्षातील सदस्यांबरोबरच्या जिव्हाळ्याच्या संबंधामुळे त्याचा उपयोग त्यांना सभागृह चालविताना झाला. एखाद्या विषयाच्या मूळ गाभ्याला धक्का न लागू देता उद्देश सफल करणे हे त्यांच्या कार्यप्रणालीमधून अनेक वेळा अनुभवायला मिळाले. त्याची नोंद आजही विधिमंडळाच्या कामकाजामध्ये अनेकांना घ्यावी लागते. ३० वर्षांच्या विधानपरिषद सदस्यत्वाच्या कार्यकाळात त्यांनी सभापती, उप सभापती, विरोधी पक्षनेता अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. त्यांची भाषणे उत्तम होत, तात्त्विक विचार, शब्दसौंदर्य होतेच परंतु वक्तृत्वाला विनोदाची झालर असल्यामुळे ती संस्मरणीय होत. राज्यसभा आणि लोकसभा या ठिकाणी इंग्रजी, हिंदी माध्यमातून प्रभावी भाषणातून विचारांचा ठसा त्यांनी सर्वोच्च सभागृहात उमटविला, त्यामुळे उत्तम संसदपटू म्हणून त्यांनी आपली कारकीर्द गाजवली. अनेकांना मदत करणारा एक उत्तम माणूस, अनेक पदे भूषवूनही जमिनीवर असणारा

आणि सत्ता असो किंवा नसो सर्वांचे हसतमुखाने स्वागत करणारा, प्रसंगी स्वत: आर्थिक झीज सोसून सहकार्य करणारा अशा अनेक अर्थाने दादासाहेब गवईंचे व्यक्तिमत्व कायम स्मरणात राहील.

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अनेक वेळा सर्व आमदारांना भोजनाची व सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी असायची, त्यावेळी स्वागतासाठी त्यांच्या सुविद्य पत्नी कमलताई आवर्जून उपस्थित असायच्या. त्यांची परंपरा त्यांचे सुपुत्र भूषण व राजेंद्र पुढे चालवतील असा मला विश्वास वाटतो.

-माजी विधानपरिषद सदस्य, पुणे.

❑❑

सामाजिक कार्याचे बाळकडू

गाडगे महाराजांच्या संदेशातून भुकेलेल्यांना अन्न, गोरगरीब मुलांना शिक्षण, निराधार मुलामुलींचे लग्न, तहानलेल्यांना पाणी देण्यासाठी दारापूर येथे मातंग मोहोल्यात पिण्याच्या पाण्याचा फार अभाव होता. आर्थिक परिस्थितीने रंजला गांजलेला मातंग समाज पाणी भरण्यासाठी मातीच्या घागरी, मातीची भांडी वापरीत. पावसाळ्यात पूर्णा नदीवरून दोन कि.मी. अंतरावरून पिण्यासाठी पाणी आणताना चिखलात पाय घसरून पाणी आणणारी बाई पडली तर तिची सर्व भांडी फुटून जात असल्यामुळे अनेक प्रकारच्या समस्येला तोंड घ्यावे लागत असे व पिण्याचे पाणी या लोकांना मिळत नसे. हे लक्षात घेऊन गावात विकास समिती स्थापन करून डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट बोर्डाकडून अनुदान मिळवून या मोहल्यात विहीर बांधून दिली. या विहिरीवर श्रमदान करत असताना गवई साहेब ६० फुटांवरून खाली विहिरीत पडले. एवढ्या अंतरावर पडल्यामुळे त्यांचे संपूर्ण शरीर खरचटले गेले. ही बातमी सर्व गावात वाऱ्यासारखी पसरली, गवई साहेब विहिरीत पडले. एवढ्या मोठ्या खोल विहिरीत गवई साहेब पडल्यामुळे त्यांची वाचण्याची शक्यता लोकांना वाटत नव्हती. चिंतेचे वातावरण होते. देव तारी त्याला कोण मारी अशाप्रकारे गवई साहेबांचा एक सामाजिक काम करीत असताना हा पुनर्जन्म झाला. गावातील सर्व आबालवृद्धांनी ईश्वराचे आभार मानले. गवई साहेबांच्या अंगाला हळद लावल्यावर गवई साहेब सामाजिक कार्याचे नवरदेव शोभून दिसत होते. परंतु त्यांना झालेल्या जखमा पाहून मनाला अतिशय वाईट वाटत होते. हे विहिरीचे काम जिद्दीने त्यांनी पूर्ण केले. त्यामुळे एका दलित समाजातील वस्तीतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. म्हणजेच तहानलेल्यांना पाणी देण्याचे महान कार्य त्यांनी केले.

-के. एल. आकोडे
अकोला.

निरपेक्ष स्नेहबंध

▪ न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

मी, रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई यांच्या बाबत फार संकोचाने लिहीत आहे. कारण आमचे स्नेहसंबंध असले तरी कार्यक्षेत्रे अगदी वेगळी होती. निरपेक्ष स्नेहसंबंध हे दादासाहेबांच्या जीवन प्रणालीचे अधिष्ठान होते. दादासाहेबांशी माझी ओळख झाली ती मी वकील या नात्याने निवडणुकी-बाबतचे खटले प्रकर्षाने चालवीत असे त्यामुळे. त्यादरम्यान माझ्या हे ध्यानात आले की, दादासाहेब गवई निवडणूक लढत नसत, तर ती 'खेळत' असत. अशी खेळाडू वृत्ती हे त्यांचे अनोखे वैशिष्ट्य होते. अशा वृत्तीमुळेच ते कदाचित वेस्टर्न इंडिया फूटबॉल असोसिएशनचे अध्यक्षपद भूषवू शकले असावे. यासंदर्भात एका प्रसंगाची मला प्रकर्षाने आठवण येते. भूदान चळवळीच्या संदर्भात आचार्य विनोबाजी नागपूरला आले होते. त्यांचे आगमन नागपूर येथे पहाटे चार वाजता होणार होते. आणि ते ही नागपूरच्या इंदोरा ह्या भागातून. त्या भागात दलितांची वस्ती प्रामुख्याने होती. त्यामुळे गांधी-विनोबांच्या वैचारिक तत्त्वांशी ज्यांची बांधिलकी होती. त्या राजकीय पक्षाच्या व विचारांच्या कार्यकर्त्यांना वाटत होते की, इंदोऱ्याकडून नागपूर नगरीत प्रवेश करणाऱ्या विनोबाजींच्या पदयात्रेचे उचित स्वागत होणार नाही. मी विनोबाजींच्या पदयात्रे संबंधातील कार्यक्रमाचा संयोजक होतो. मी ही शंका दादासाहेब व त्यांचे सोबती यांच्यासमोर मांडली व त्यांनी विनोबाजींच्या अभूतपूर्व स्वागताची आखणी केली. त्यामुळे पहाटे चार वाजता सुद्धा नागपुरात इन्दोरा येथे हजारो नागरिक आचार्यांच्या स्वागतासाठी हजर होते. याचे कारणही विनोबाजींनी त्यावेळी जे भाषण केले होते. त्यात अधिक स्पष्ट झाले. नागपूर नगरीत पटवर्धन मैदानावर जी भव्य सभा झाली तीत नागपूर नगरीचे वर्णन करताना विनोबाजींनी पुढील उद्‌गार काढले, ही नगरी भारताच्या केंद्रस्थानी आहे. ही महाराष्ट्राची उप राजधानी आहे. पण ती भारताला जोडणारी सबंध भारताची संस्कारधानी होऊ शकते. भारताला जोडण्याचे भाग्य या नगरीचे आहे, असे भविष्याच्या गर्भामध्ये निहित आहे, असे मला वाटते. असा या नगरीचा महिमा आहे. मी आज सकाळी या शहरात आलो, तेव्हा मला एक फार मोठे दर्शन झाले. त्यात मला महाराष्ट्राची बुद्धिमत्ता दिसली. आज मी येथे दोन पुतळे पाहिले. त्यातला एक पुतळा शिवाजीचा होता. सफल झालेल्या कर्तृत्वाचा आणि दुसरा झाशीच्या राणीचा, असफल झालेल्या कर्तृत्वाचा. तुम्ही दोन्हींचा गौरव करता, हा तुमचा स्वभाव पाहून मला फार धन्यता वाटली. मला तेवढे पुरेसे आहे. खऱ्या अर्थाने हाच विदर्भाचा इतिहास आहे व हीच विदर्भाची संस्कृती आहे. आजही नागपूर येथे 'अजब बंगला' (म्युझियम) जवळ भारताचे केंद्रस्थान दर्शविणारा स्तंभ उभा आहे. अखिल भारतीय भावनेचा तोल भारताचे केंद्रस्थान असलेल्या नागपूरला सांभाळावा लागेल व ही शक्ती वैदर्भीय संस्कृतीत आहे. त्याचमुळे डॉ. आंबेडकरांसारखा माणूससुद्धा नेहमी म्हणत असे की, "माझी जन्मभूमी मुंबईकडची, पण कर्मभूमी मात्र नागपूर आहे."

हे खरे आहे, की विदर्भात रेखीव व आखलेले काहीच नव्हते. परंतु अंतरंग मात्र संत्र्यासारखे गोड व लोभस होते. त्याला एक आगळेवेगळे वैदर्भीय वळण होते. नगरीकरण व उपनगरीकरण फारसे बोकाळले नव्हते. त्यामुळे नगराची व उपनगराची तथाकथित संस्कृती फारशी आढळत नव्हती. माणसांमध्ये एकमेकांविषयी आपुलकी व आस्था होती. अनौपचारिक पारस्परिकता होती. राहण्याची जागा एक, कामाची जागा दुसरी, करमणुकीची तिसरी, तर व्यापाराची चौथी, असे कप्पे नव्हते. बहुतेक लोक शहरातच एका मोठ्या व विशाल संयुक्त कुटुंबाप्रमाणे राहत असत.

एचबी ११८०—८

वागण्यात दिखाऊपणा व तथाकथित फॅशनेबल शिष्टाचार नव्हता. माणसे फार मोकळी व दिलखुलास होती, संस्था होत्या, वेगवेगळे राजकीय पक्ष होते, मतभेद होते, गटभेद होते. पक्षभेदही होते, पण 'मनभेद' नव्हते, त्यामुळे स्नेहसंबंधात व सहचार्यात अंतराय उत्पन्न होत नसे, संस्था व संघटनांच्या मर्यादा ओलांडून माणसांची हृदये एकमेकांशी जुळली जात. सारे कसे मैदानी खुलेपणा होते. मैत्रीच्या आड मतभेद, पक्षभेद, भाषाभेद, येत नसत. सौहार्दाच्या भावनेत सगळे भेद विरघळून जात होते. यालाच तर खेळाडू वृत्ती म्हणतात. खेळात मॅच असते, सामना असतो, वॉर किंवा युद्ध नसते. हारजीत शब्दाला वेगळा अर्थ असतो. हरणाऱ्यासाठीही 'थ्री चीअर्स' म्हणजे विजयी घोष असतो. उत्साह वाढविण्यासाठी. कुणीच नामोहरम होत नाही, हरणारा पुढचा सामना जिंकण्याच्या उमेदीने खेळतो व त्याच भावनेने हस्तांदोलन करतो. यात दिखाऊपणा नसतो. दादासाहेब निवडणुकाही याच खेळाडूवृत्तीने खेळत असत.

या साऱ्यामागे विदर्भाचे आंतरप्रांतीय, आंतरभाषिक वळणही काही अंशी जबाबदार आहे. सण, पुढारी जातवार, प्रांतवार, भाषावर, धर्म व संप्रदाय यांच्या भेदामुळे वाटले गेले नाहीत. सर्वच सर्वांचे होते. प्रादेशिकता अखिल भारतीयत्वावर हावी, अगर वरचढ होऊ नये, ही वृत्ती होती. आणि अशीच दादासाहेबांची वृत्ती होती. म्हणूनच बिहार किंवा केरळचे राज्यपालपद भूषविताना त्यांना अडचण आली नाही. एवढेच नव्हे तर नागपुरांत त्यांनी स्थापित केलेल्या शिक्षणसंस्था मग ते आंबेडकर कॉलेज असो की अन्य संस्था असोत, त्यांतही धर्म, जाती, पंथ निरपेक्ष वृत्ती प्रकर्षाने जाणवते. कुठून तरी आलेले 'कृष्णकुमार' त्या कॉलेजचे प्राचार्यपद भूषवू शकले. एवढेच नव्हे माझे कॉलेजांतील मित्र सदानंद फुलझेले, हे आजही त्याच भावनेने दीक्षाभूमी व शिक्षण संस्थाचे व्यवस्थापन चालवीत आहे. संघटन अगर संस्था फक्त दलितांपुरती सीमित न राहता सर्वसमावेशक असावी असे दादासाहेबांचे, डॉ. आंबेडकरासारखे मत होते. ही वरकरणी साधी वाटणारी भूमिका भारतीय संविधानास अभिप्रेत असलेली धर्मनिरपेक्ष वृत्ती, अगर सर्वधर्ममैत्री कशाप्रकारे जोपासता येते, याची शिकवण देणाऱ्या तत्त्वांचे प्रतीक म्हणून या संस्था उदयास आल्यात. अशाच धर्मनिरपेक्ष वृत्तीमुळे दादासाहेब बिहारचे राज्यपाल असताना बिहारमधील जैन धर्माच्या तीर्थस्थळांच्या विकासासाठी पुढाकार घेऊ शकले. दादासाहेबांनी ही वृत्ती आयुष्यभर जोपासली. काही झाडे अशी असतात की वादळ येवो, तुफान येवो, दुष्काळ पडो, झाडाची पाने झडतात, फांद्या तुटतात, पण मुळापासून झाड उखडून पडत नाही. काही 'बीज' असे असतात की जे हाडामांसात, रक्तात रुतून बसतात. जमिनीत लुप्तही होतात पण मरत नाहीत. पाऊस पडला, हवामान बदलले, की पुन्हा जीवित होऊन उगवतात, असे काहीसे राष्ट्रीय भावना व एकराष्ट्रीयत्वाची कल्पना जोपासणारे दादासाहेबांचे व्यक्तिमत्त्व होते.

आज आपण संक्रमणकालातून जात आहोत. जुनी मूल्ये ढासळत आहेत. नवीन प्रस्थापित झालेली नाहीत. राजकीय दलांच्या दलदलीत माणूसपण रुतले आहे. उपनगरे वाढलीत, आदर्शाअभावी सुलभता, आराम व बेदरकारी हाच स्वभाव होऊ पाहत आहे. अपार्टमेंट संस्कृती आली, ढाबे व हॉटेल्स वाढली. रविवारी घरची चूल बंद असते. ढाबा संस्कृती बोकाळते आहे. घरोघरी फ्रिज आल्याने, विरजण मागायलाही शेजारी जावे लागत नाही. शेजार, शेजारधर्म व सोबत रेफ्रिजरेटरमध्ये गोठली आहेत. दुहेरी जीवनामुळे पारस्परिकता नष्ट होत आहे. परंतु संस्कृतीचा खरा अर्थ आहे, स्वतःच्या जीवनात इतरांना सामील करून घेणे. एकमेकांच्या सुख-दुःखात सामील होणे. ही सामीलकी म्हणजेच संस्कृती. माणसात जगावे, माणसासाठी जगावे. माणसाचा अव्हेर करू नये हाच खरा नवीन मानवयोग आहे. हेच सांस्कृतिक मूल्य आहे. यालाच वेगळ्या भाषेत सांद्रता, संवादित्व, सामंजस्य व एकरसता म्हणतात. जी दादासाहेबांच्या स्वभावात ओतप्रोत होती. या भावना जोपासणारा तो 'आधारवड' होता.

एचबी ११८०—८

दादासाहेब नेहमी हसतमुख राहणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे संघटन कौशल्य अप्रतिम होते. पण त्यांत ही इतरांवर विश्वास टाकून इतरांकडून कामे करवून घेण्याची त्यांची हातोटी आगळी-वेगळी होती, त्यांचा विश्वास टीम-वर्कवर होता. त्यांत त्यांची विनयबुद्धी व सौजन्य, प्रकर्षाने जाणवत असे. समोरच्याला न दुखावता काम करण्याचे व करवून घेण्याचे त्यांचे कौशल्य ही वेगळेच होते. एवढेच नव्हे तर स्वीकारलेल्या कामाबाबत सतत पाठपुरावा करण्याची त्यांची वृत्ती ही तर अनुकरणीय होती. त्यांना माणसांची फार चांगली पारख होती. त्यामुळेच आज आहे त्या रूपात दीक्षाभूमी उभी राहू शकली. दीक्षाभूमी हे केवळ स्मारक नाही किंवा पर्यटन स्थळही नाही. तर त्यामागची भूमिका विशद करणारी ती वैचारिक भूमीही आहे. त्या विचारांचे ते प्रक्षेपण केंद्र आहे. त्याचे स्वरूप इतके भव्य दिव्य आहे की त्याच्या बाजूने जातानाही आमच्या सारख्यांना, ज्यांनी दीक्षाभूमीवरील धर्मप्रवर्तनाचा सोहळा याची देहि आणि याचि डोळा पाहिला आहे त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दादासाहेब गवई यांची आठवण आल्याखेरीज राहत नाही.

दादासाहेबांच्या जीवनात 'संघर्ष' व 'रचना' यांचा फार सुंदर समन्वय दिसून येतो. अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचा त्यालाच अधिकार असतो, जो संघर्षानंतर सामाजिक रचनेत परिवर्तन घडवून आणू शकतो. तसे व्यक्तिमत्त्व दादासाहेबांचे होते. म्हणूनच ते वेगवेगळ्या क्षेत्रात पदे भुषवू शकले. एवढेच नव्हे तर अमरावतीच्या 'तपोवन' या कुष्ठरोग निवारणाच्या कार्यातील त्यांच्या सामीलकीमुळेच त्यांना 'कुष्ठमित्र' ॲवार्ड प्रदान करण्यात आला. माझेही त्या कार्याशी व संस्थेशी जिव्हाळ्याचे संबंध होते. सर्वार्थाने ते बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. दादासाहेबांची राहणी नीटनेटकी व रुबाबदार होती. जोधपुरी सूट त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभून दिसत असे. ते राज्यपाल झालेत, विधानपरिषदचे सभापती होते, खासदार होते, विरोधी पक्षनेते होते. तरी त्यांचे पाय नेहमी जमिनीवरच राहिले. ते दोस्तीचे पक्के होते. त्यामुळेच सर्व स्तरावर सर्व क्षेत्रात व राजकीय पक्षात यांचे जीवाभावाचे मित्र होते. अशा सर्व व्यापी वृत्तीमुळेच ते सर्वांसाठी खुल्या असलेल्या जागेवर लोकसभेत निवडून येऊ शकले आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील पद भूषवू शकले.

अर्थात याचे बरेचसे श्रेय त्यांच्या पत्नी कमलताई यांना द्यावे लागेल. दादासाहेब राज्यपाल झाले तरी कमलताई 'मॅडम' झाल्या नाहीत. तशा कधी वागल्या नाहीत. त्या सर्वांच्या 'ताईच' राहिल्या. सर्व प्रकारच्या मोहापासून दूर राहिल्या. खऱ्या अर्थाने दादासाहेबांच्या सहधर्मचारिणी म्हणूनच जगल्या आणि जगत आहेत. त्याचेही श्रेय दादा साहेबांच्या स्वभावाला व जीवनाच्या अनोखेपणाला जाते व अशा 'अष्टपैलू' व सर्वसमावेशक दिलदार व्यक्तिमत्त्व व बहुआयामी व्यक्तिमत्त्वाबद्दल शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते. May his tribe increase.

-मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त ज्येष्ठ न्यायमूर्ती.

❑❑

दादासाहेबांच्या जीवनात ' संघर्ष ' व ' रचना ' यांचा फार सुंदर समन्वय दिसून येतो. अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचा त्यालाच अधिकार असतो, जो संघर्षानंतर सामाजिक रचनेत परिवर्तन घडवून आणू शकतो. तसे व्यक्तिमत्त्व दादासाहेबांचे होते.

दादासाहेबांची राजकीय संस्कृती

▪ डॉ. यशवंत मनोहर

भारताच्या आणि महाराष्ट्राच्याही राजकारणात दादासाहेब गवई नावाने एक राजकीय संस्कृती कमीअधिक अर्धशतकभर तरी वावरली. या राजकीय संस्कृतीचे झपाटलेले तरुणपण जसे लोकांनी बघितले त्याप्रमाणेच या संस्कृतीचे प्रौढ आणि परिणत वैभवही लोकांनी बघितले. संपूर्ण आयुष्यालाच राजकारणमय करणे ही बाब सोपी नाही पण दादासाहेबांनी हे केले. त्यांच्या भक्कम जीवननिष्ठेने आणखी एक अवघड गोष्ट केली. त्यांनी आंबेडकर नावाच्या उच्च संस्कृतीचे राजकारण केले आणि राजकारणाची सुंदर संस्कृती महाराष्ट्राला बघायला मिळाली.

दादासाहेब गवईंच्या या राजकीय संस्कृतीचा जन्म एका युद्धशील चळवळीतून झाला. ही राजकीय चळवळ क्रांतिकारी होती. सर्वच उपेक्षितांच्या सन्मानाची प्रस्थापना, हे बाबासाहेबांच्या चळवळीचे ब्रीद होते. संपूर्ण नवा माणूस, संपूर्ण नवा आणि आधुनिक भारत, संपूर्ण क्रांतिकारी संविधान भारत निर्माण करणे हे बाबासाहेबांच्या चळवळीचे ध्येय होते. Secular आणि Socialist democracy चा क्रांतिकारी आदर्श (Vol-17, Part : P. 370) असलेली संविधानसंस्कृती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होती. शोषणमुक्त भारत, जातीमुक्त भारत, सेक्युलर आणि विज्ञाननिष्ठ भारत हे बाबासाहेबांच्या राजकीय संस्कृतीचे ध्येय होते. या महान राजकीय संस्कृतीच्या पोटी दादासाहेबांच्या राजकीय संस्कृतीचा जन्म झाला.

संघर्ष ही माणसाला मोठे आणि अन्वर्थक करणारी विद्याच आहे. जी आयुष्ये संघर्षात उड्या घेत नाहीत ती आयुष्ये अस्ताला जातात आणि उगवत कधीच नाहीत. दादासाहेब गवईंनी आपल्या आयुष्याला संघर्ष हे सुंदर शीर्षक दिले. त्यांना त्यामुळे आव्हाने समजली. प्रश्नांची मनोगते त्यांना वाचता आली. आव्हाने समजावून घेणारे आणि आव्हानांशी मुकाबला करणारे मन माणसाजवळ नसले तर आव्हाने कुठेच नसतात. आव्हानांना संधी मानणारे मन केवळच जीवनाने निर्माण केलेल्या आव्हानांना भिडत नाही तर स्वतःही सतत आव्हाने निर्माण करते आणि स्वतःला नवनव्या परीक्षांना बसायला लावते.

दादासाहेब गवई हे जीवनविषयक निश्चित भूमिका आणि तत्त्वज्ञान असलेले नेतृत्व होते. तत्त्वज्ञानातूनच उगवलेले अत्यंत विधायक राजकीय तत्त्वज्ञानही या नेतृत्वाजवळ होते. एक सुस्पष्ट वैचारिक संरचना असेच त्यांच्या राजकीय संस्कृतीचे वर्णन करावे लागेल.

दादासाहेब गवईंची राजकीय संस्कृती आपल्याला प्राधान्याने एक गोष्ट सांगते ती ही की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या केवळ शब्दात नव्हते तर त्यांच्या संपूर्ण राजकीय, सामाजिक आणि धम्मीय वर्तनातून ते पिसारत होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महान राजकीय संस्कृतीचा आदर्श त्यांच्या सतत वाचनात होता आणि चिंतनातही होता. म्हणून त्यांच्या राजकीय संस्कृतीने सेक्युलॅरिझम, समाजवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता, भगिनीता या महान मूल्यांकडे कधीही पाठ फिरविली नाही.

ज्या काळात ते महाराष्ट्राच्या राजकारणात एखाद्या ओजस्वी नायकासारखे वावरत होते त्या काळातही ते संस्कृतीशून्य राजकारणाची उदाहरणे बघत होते. मूल्यशून्य राजकारण किंवा भारतीय संविधानसंस्कृतीकडे पाठ फिरविणारे राजकारण केवळ आजच होत आहे असे नाही तर ते दादासाहेब गवईंच्या काळातही होतेच. हे सर्व राजकीय संस्कृतीमधील चढउतार दादासाहेब गवई बघतच होते पण

एचबी ११८०—८अ

राजकारणाचे तोंड संविधानसंस्कृतीकडे वळवण्याचा आटोकाट प्रयत्नही ते करीत होते. घुसमट त्यांचीही होतच होती पण त्यांच्या राजकीय संस्कृतीचे बोट त्यांनी कधीही सोडले नाही.

या संस्कृतीच्या झटापटीला आता ज्वालांचे नवनवे धुमारे यावेत. या विद्रोहाला आता नवनव्या फांद्या फुटाव्यात. धोरणाचा भाग म्हणून दादासाहेबांना काही वेळा माघार घ्यावी लागली असेल पण अशा माघारीला पराभव हे नाव देता येत नाही. राजकारणातील डावपेचांना अशा कोणत्या वर्णनात टाकता येत नसते. विरोधकांना पेचात टाकण्यासाठी योजिलेले ते डाव असतात. विजयासाठी आखलेली रणनीती असे या डावपेचांचे रूप असते. हे लक्षात घेतले तर डावपेचांच्या पायऱ्यांवरून धावत गेलेली संघर्षकथा असेच दादासाहेबांच्या राजकीय चारित्र्याचे वर्णन करावे लागेल.

ही संघर्षकथा अनंतविध घटनांनी तुडुंब भरलेली आहे. समाजकारण, शिक्षणकारण, धम्मकारण, अर्थकारण आणि राजकारण असे या कथेचे पैलू आहेत. या सर्वच संदर्भक्षेत्रांमध्ये ही कथा पसरलेली आहे. यापुढे या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेल्या उलाढालींचे अर्थ लावले जातील. या उलाढालींचे वाचन आणि पुनर्वाचन केले जाईल. त्यांचे मूल्यमापन केले जाईल. जीवनातील परिवर्तनाला बळ देणाऱ्या, जिद्द आणि स्वप्ने देणाऱ्या उजेडाची फेरमांडणी केली जाईल.

दारापूर ते दिल्ली या प्रवासाने दादासाहेबांच्या मुत्सद्देगिरीचा कस पाहिला. या सर्व गोष्टी संघर्षाच्या आगीतच फुलल्या. असे काही लोक असतात ज्यांच्या आयुष्यात वरून आयते काहीच पडत नसते. त्यांच्या आयुष्यात उगवलेली एकेक पहाट एकेका संग्रामाचा निष्कर्ष असते. दादासाहेबांच्या आयुष्यातील काही संग्राम असे आहेत की ज्यांचे वाचन परिवर्तनाच्या चळवळीतील लोकांना सतत ऊर्जा देत राहील.

दादासाहेबांची बंडखोरी त्यांच्या आयुष्यात अनेक वेळा उफाळून आलेली आहे. या सर्वच बंडखोर कृतींनी त्यांना बंडखोरीचे तत्त्वज्ञान दिलेले आहे. त्यांच्या आयुष्यातील बंडखोरीच्या शिखरस्थानी ठेवता येईल अशी घटना म्हणजे अरुण शौरींच्या पुस्तकाच्या राज्यसभेत त्यांनी केलेल्या चिंध्या ही होय. Worshiping false God या शौरींच्या पुस्तकातील पूर्वग्रहदुषितता आणि खोटेपणा मी सिद्ध करून दाखवितो हे दादासाहेबांनी राज्यसभेत जाहीर केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरसंबंधी शौरींनी द्वेषमूलक लेखन केले होते. दादासाहेबांमधील आंबेडकरनिष्ठा उफाळून आली होती परंतु या पुस्तकाचा खोटेपणा सिद्ध करण्याची अनुमती त्यांना मिळाली नाही आणि मग त्यांनी आपला संताप, आपला जळजळता निषेध व्यक्त केला. त्यांनी अरुण शौरींचे पुस्तक फाडले आणि सभागृहात त्याच्या चिंध्या भिरकावल्या. राज्यसभा सुन्न झाली होती. दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील या बंडखोरीचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. हे युगाला जाब विचारण्याचे बळ आणि युगाने बनवाबनवी केली तर त्याला फाडण्याचे हे बळ कुठून आले? हे बळ त्यांना आंबेडकरनिष्ठेने दिले यात वाद नाही.

राजकारणात अनेक तह, पुनर्तह करावे लागतात. ते त्यांनीही केले. पण संविधानातील सामाजिक ध्येयाला इजा होईल आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वपुनर्रचनेच्या सिद्धान्ताला धक्का लागेल असा तह त्यांनी केला नाही. अलीकडच्या काळात हे दिसते की लोकांना संविधानाचे राजकारण करायचेही नसते आणि ते त्यांना जमतही नाही. लोकांना आता फक्त स्वार्थकारण जमते. ते केवळ सत्तेसाठी सत्ताकारण असते. हा स्वार्थ व्यक्तिस्वार्थ असेल, वर्गस्वार्थ असेल वा जातस्वार्थ असेल पण तो असतो स्वार्थच. आपापले वा आपापल्या गटाचे उखळ पांढरे करणे वा आपापल्या जातीचा वा धर्माचा तळीराम गार करणे एवढेच ध्येय आता स्वार्थकारण्यांपुढे उरलेले आहे. अशा काळात विचार, नैतिकता वा निष्ठा या गोष्टींवरच मग अतोनात अत्याचार होतात. स्वार्थांधतेच्या वा धर्मांधतेच्या पुरात

संविधाननिष्ठा वाहूनच गेलेल्या असतात. असा काळ समरसतेच्या विजयाचा आणि तिच्या समर्थकांना कृतार्थता वाटण्याचा अतार्किक काळ असतो. अशा उन्मादाच्या सर्व काळात दादासाहेबांनी काँग्रेसच्या सहकार्याने आरपीआयचे राजकारणच करण्याचा प्रयत्न केला.

दादासाहेबांनी राजकारणात आखायचे असतात ते सर्व डावपेच आखले. पण जातीयवाद्यांच्या आणि धर्मांधांच्या कँपमध्ये जाण्याचे त्यांनी मनातही आणले नाही, त्यांनी जातीचे वा धर्मांचे राजकारण केले नाही. त्यांनी बाबासाहेबांच्या संविधानाचे सेक्युलर राजकारण केले.

भूमिहिनांचा प्रश्न, बेरोजगारांचा प्रश्न, आरक्षणाचा प्रश्न, पँथर्सवरील खटले काढण्याचा प्रश्न, मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न, दुर्बल घटकांवरील अत्याचाराचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांच्या संदर्भात दादासाहेबांची भूमिका नायकाचीच राहिली आहे. दीक्षाभूमीवरचे विराट सौंदर्य त्यांच्या नेतृत्वातून उगवलेले आहे. आता दीक्षाभूमीवर दीक्षाभूमीऐवजी लोकांना बाबासाहेबच दिसतात. विराट स्तुपाऐवजी दीक्षाभूमीवर लोकांना बुद्धच दिसतात. दीक्षाभूमीची ही नवलाची रचना जगाला दादासाहेबांनी दिली आहे. बाबासाहेबांच्या चळवळीने हाक मारली तेव्हा वऱ्हाडातल्या एका तरुणाची चळवळीच्या वादळात उडी गेली आणि तो तरुण दादासाहेब होऊनच उगवला. तोच पुढे विदर्भाचा वाघ म्हणून ओळखला गेला. बाबासाहेबांची बदनामी करणारे पुस्तक राज्यसभेत फाडणारा तो जगातला पहिला माणूसही ठरला. वेगवेगळ्या गटांना एकत्र गुंफू पाहणारा संघटकही ठरला. दादासाहेबांची ही राजकीय संस्कृती पुढील पिढ्यांसोबत राहणारी आणि परिवर्तनाच्या चळवळींची सोबत करणारी राजकीय संस्कृती आहे. बंडखोर माणूस देहाने काळाच्या पडद्याआड जातो पण त्याची बंडखोरी कधीही पडद्याआड जात नाही. जीवनमंचावरचा तिचा प्रयोग थांबत नाही. मला खात्री आहे दादासाहेबांची ही बंडखोरी डोक्यात घेणे नव्या पिढ्यांना निश्चितच गौरवाचे वाटेल.

१९८८ साली 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धधम्म' या माझ्या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते नागपुरात झाले. दीक्षाभूमीवर काही अपप्रवृत्तींचा शिरकाव या काळात व्हायला लागला होता. मी त्या अपप्रवृत्तींवर प्रखर टीका केली होती. दादासाहेबांनी ही टीका मोठ्या मनाने समजावून घेतली. याप्रकारे दादासाहेब हे एक प्रगल्भ, बहुश्रुत आणि अभ्यासू नेतृत्व होते. त्यांनी लिहिलेली त्या त्या काळातील जळत्या प्रश्नांवरची पुस्तके आणि त्यांची त्या त्या प्रश्नांवरची भाषणे आपल्याला त्यांच्या बौद्धिक क्षमतेचा परिचय घडवतात. आपल्या घनगंभीर आणि अभ्यासू वक्तव्याने त्यांनी भारताची संसदही गाजवली आहे आणि महाराष्ट्राचे वरिष्ठ सभागृहही थरारून सोडले आहे. त्या त्या वेळी अनेक नव्या आमदारांनी सभागृहात कसे 'लक्षवेधी' ठरायचे त्याचे प्रशिक्षण त्यांच्याकडून घेतले. या अर्थाने दादासाहेब नावाचे एक मुक्त विद्यापीठच महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक वर्षे वावरले असे म्हणता येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ प्रकाशन समितीत त्यांच्यासोबत अनेक वर्षे काम करण्याची संधी मला लाभली. त्यांचा दरारा मोठा. मुख्यमंत्र्यांना, शिक्षणमंत्र्यांना फटाफट त्यांचे फोन जात आणि अडलेली वा अडवलेली कामे तातडीने मार्गी लागत. त्या काळात खूप कामे झाली. खूप खंड प्रकाशित झाले. त्यामागे दादासाहेबांचा दरारा उभा होता.

डिप्रेशनमध्ये वा टेन्शनमध्ये गेलेल्या प्रसंगाच्या मुखावर हसू फुलवण्याची कलाही दादासाहेबांना चांगलीच अवगत होती. प्रसंगाचे तोंड वा माणसांचे कल विधायक कामाकडे वळवण्याची विद्याही त्यांना छान अवगत होती. मी आरपीआयच्या नेत्यांच्या एकीकरणासाठी काही प्रयत्न करतो आहे ही बाब त्यांच्या कानावर गेली होती. मंत्रालयातच झालेल्या ग्रंथप्रकाशन समितीच्या बैठकीनंतर मला थांबवून या संदर्भात ते बोलले. 'मी सोबत आहेच तुमच्या' असेही

ते म्हणाले, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होता. यशवंतराव चव्हाण, दादासाहेब रुपवते, सुशीलकुमार शिंदे यांच्याप्रमाणेच ते महाराष्ट्राच्या वाङ्मयीन संस्कृतीतही वावरले, वाङ्मयाची ताकद त्यांना माहीत होती. म्हणून फुले-शाहू-आंबेडकरवादी साहित्य चळवळीला त्यांनी मनापासून सहकार्य केले. ही सुंदर वाङ्मयीन संस्कृती आता राजकारणातून ओहोटून चाललेली आहे असे दिसते.

मी त्यांच्या वागण्या-बोलण्यात असंख्य वेळा दुर्मीळ बंडखोरी बघितली. उदंड सभ्यपणा बघितला. राजकीय प्रगल्भता, सामाजिक उत्कटता आणि धम्मनिष्ठा पातळ होण्याच्या काळात, राजकारणातून लेखन आणि अभ्यास दुर्मीळ होण्याच्या काळात प्रत्येकच जाणत्या माणसाला दादासाहेबांची, त्यांच्या प्रगल्भतेची, सुसभ्यतेची आणि त्यांच्या बंडखोरीची आठवण येत राहील, त्यांच्या या सर्वच वैशिष्ट्यांना पुढल्या काळात लोक दादासाहेब गवई म्हणतील.

-ख्यातनाम साहित्यिक व विचारवंत.

❑❑

कणखर नेतृत्वाचा दीपस्तंभ

शब्दानं शस्त्र व्हावं, गवताला भाले फुटावेत तर पाण्यानेही सम्यक विचारांसाठी पेटून उठावं असा नेता आयुष्यभर आपल्या ओंजळीने समाजाला देण्याचेच ज्यांनी काम केले, त्यांनी अंत:करणात शाहू, फुले, आंबेडकर जतन केले तर परिवर्तनाने दलित समाज ताठ उभा राहिला पाहिजे असे स्वप्न पाहिले. म्हणूनच चळवळीत वाढलेल्या कार्यकर्त्याला दादासाहेबांचे नेतृत्व दीपस्तंभासारखे वाटले.

वयाची पंचाहत्तरी ओलांडल्यानंतर जीवनाच्या संध्याकाळी देखील तांबडं फुटलेलं कर्तृत्व घडविणारे दादासाहेब, लांब घोळदार पायजमा, गुडघ्यापर्यंत शर्ट आणि त्यावर बंद गळयाचा जॅकेट घातलेले दादासाहेब वैदर्भीय पानाचा विडा तोंडात ठेवून हातातला पाऊच किंवा चांदीचा डबा खास परिवारात पुढे केला की ७५ व्या वर्षानंतरही त्यांच्या तारुण्याचा त्यांच्या मुलांनादेखील हेवा करावा असेच हिरवेपण निसर्गाशी नाते सांगू लागते, याचा अर्थ 'पान पिकलं तरी देठ हिरवा' आहे या तारुण्याची कबुली देत राहते. सत्ता, संपत्ती, वैभव, दलित परिवार हे सारे वैभव रामकृष्णाच्यासमोर हात जोडून उभे होते. पण दादासाहेब वैभवाने वाकले नाहीत किंवा खुर्चीसाठी कोणासमोर लाचारही झालेले नाहीत.

-प्रा. लक्ष्मण ढोबळे.
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य.

सख्ख्या भावापेक्षाही अधिक घट्ट नाते

▪ सदानंद फुलझेले

रा. सू. गवई व माझे नाते फार वेगळे होते. आम्ही दोघांनीही एकामेकांवर सख्ख्या भावापेक्षा अधिक प्रेम केले. तो स्नेहबंध वेगळा होता. १९६४ ला आमदार झाल्यावर जेव्हा जेव्हा गवईसाहेब नागपूरला असत त्या त्या वेळी त्यांचा मुक्काम माझ्याच घरी रहात असे. आज ६० वर्षे झालीत वा होत आलीत पण मला आजही त्यांची झालेली पहिली भेट आठवते.

१९५६ साली महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरला दीक्षाभूमीवर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्या वेळी माझ्यावर काही जबाबदारी होती. तो समारंभ खूप छान पार पडला. पण नंतर अवघ्या दोन महिन्यात बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेच्या वेळी व्यासपीठावरील एका नेत्याने गवई यांच्याकडे बोट दाखविले व सांगितले. "हा अमरावतीचा बंडखोर विद्यार्थी नेता आहे." ती आमची पहिली भेट होती.

१९५८ साली या रिपब्लिकन पक्षात फूट पडली. आवळेबाबू यांचा गट वेगळा निघाला व त्यांनी वेगळा पक्ष स्थापन केला. त्या वेळी नागपूरचे आम्ही तरुण कार्यकर्ते एकत्र आलो. त्यात मी-सदानंद फुलझेले होतो. वा. को. गाणार होते आणि ॲड. आर. जे. कांबळे होते. आम्ही अमरावतीच्या त्या बंडखोर नेत्याला बोलावले. रा. सू. गवई नागपूरला आलेत व तेव्हापासून आमची जवळीक सुरू झाली. आवळेबाबू जोवर पक्षात होते, तोवर त्यांनी दादासाहेब गवई यांना पक्षाची पायरी चढू दिली नाही. पुढे आवळेबाबूंची पक्षातून हकालपट्टी झाल्यावर विदर्भाचा गट एकत्रपणे उभा राहिला. त्यात आम्ही गवई-फुलझेले एकत्र आलोत. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वात पक्षाची वाटचाल सुरू झाली. दादासाहेबांच्या व माझ्या तेव्हा वारंवार भेटीगाठी सुरू झाल्यात. भेटी झाल्यात आणि स्नेह वाढीला लागला. १९५९ साली रिपब्लिकन पक्षाचे औरंगाबादला अधिवेशन झाले. त्या अधिवेशनातही आम्ही बरोबर होतो. त्या वेळी मी पहिल्यांदा दादांना लग्नाविषयी छेडले. काही गोष्टींचा उलगडा झाला. त्यांच्या मनात ज्या मुलीविषयी कोमल भावना होत्या, त्या मुलीशी त्यांनी लग्न करू नये असे मला वाटत होते. तसे मी त्यांना स्पष्ट सांगितले. त्या मुलीचे नाव आता सांगणे बरोबर होणार नाही. ती बिचारी असेल तिथे सुखी असेल. पण ते लग्न झाले नाही. त्यानंतर अमरावतीला आल्यावर त्यांनी आमदार शृंगारे यांच्या साळीला मागणी घातली. कमलताईचे वडील मूर्तिजापूरला होस्टेलचे अध्यक्ष होते. या लग्नाचा म्हणजे मुलीला पाहण्याचा कार्यक्रम पहाटे पार पडला आणि मुलीला याची कल्पनाच नव्हती की पाहुणे आपल्याला बघायला आले आहेत. त्यामुळे तिच्यावर कुठलाही व कसलाही तणाव नव्हता. पाहुणे निघताना मुलीला या भेटीची कल्पना आली.

त्यांचे व कमलताईचे लग्न अमरावतीला पार पडले. रिपब्लिकन पक्षाची ती एक जाहीर सभाच होती. आशीर्वाद द्यायला कर्मवीर दादासाहेब गायकवाड अमरावतीला आले होते. या लग्नाची पत्रिका 'प्रत्येक गावात एक' अशी देण्यात आली होती व गावागावांतून, खेड्याखेड्यांतून या लग्नासाठी वऱ्हाडी आपापल्या शिदोऱ्या घेऊन आले होते. वर-वधू व्यासपीठावर दादासाहेबांजवळ उभे राहिलेत आणि त्यांनी परस्परांच्या गळ्यात फुलांचे हार घातले व त्या माळा घालून ते व्यासपीठावर उभे होते. असा विवाह

क्वचितच एखादा पार पडला असेल. कर्मवीरांचे आशीर्वाद उभयतांना लाभलेत. विवाह झाल्यावर विदर्भाच्या राजकारणातही गवई यांचा चांगला जम बसू लागला. ते आरपीआयचे विदर्भ सचिव होते. त्याच सुमारास १९६२ ला निवडणुका लागल्यात. काँग्रेसमधील असंतुष्ट नेत्यांना दादासाहेबांनी जवळ केले. त्यांना रिपब्लिकन पक्षाचे 'हत्ती' हे चिन्ह दिले. संपूर्ण विदर्भातून असे २२ उमेदवार पक्षाने उभे केले होते. दादासाहेब गवई यांच्या या कर्तृत्वाचा काँग्रेसने धसका घेतला आणि रिपब्लिकन-काँग्रेस युती झाली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना राज्यसभा दुसऱ्यांदा देण्यात आली व गवई यांना विधानपरिषदेत घेण्यात आले. पुढे राज्यसभा निवडणुकीत दादासाहेब गायकवाड यांच्या विरोधात काँग्रेसने बी. सी. कांबळे यांना उभे केले. त्या निवडणुकीत रा. सू. गवई साहेब हे दादासाहेब गायकवाड यांचे निवडणूक एजंट होते. राज्यसभेसाठी होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेचा गवई साहेबांचा गाढा अभ्यास होता. अगदी परिपूर्ण अभ्यास होता. ती निवडणूक खूप अटीतटीची होती. मतदान पूर्ण झाले. मतमोजणी सुरू झाली. मतमोजणी पूर्ण होताच निकाल घोषित होणार होता. तेवढ्यात त्यावर हरकत घेतली गेली व फेरमतमोजणी सुरू झाली. तोवर दादासाहेब गायकवाड त्या ठिकाणी होते. त्यांना असे वाटले की, आपण पराभूत झालो आहोत. विजय मिळालेला नाही. त्यामुळे ते सरळ स्टेशनवर गेलेत आणि दिल्लीचे आपले सामान आणायचे, बंगला सोडायचा म्हणून दिल्लीकडे रवाना झालेत. आक्षेपपूर्ती व मतमोजणी झाल्यावर दादासाहेब गायकवाड विजयी झाल्याची घोषणा करण्यात आली पण दादासाहेब गायकवाड मात्र दिल्लीच्या मार्गाला लागले होते.

निकाल घोषित होताच दादासाहेब गवईंना सर्व समजले. त्यांनी तिथूनच स्टेशन मास्तरला फोन केला आणि सांगितले, दादासाहेब गायकवाड या गाडीने दिल्लीला निघाले आहेत. त्यांची गाडी जिथे असेल त्या स्टेशनवर संदेश द्या आणि त्यांना गाडीतून उतरवून घ्या आणि लागलीच मुंबईला रवाना करा. त्या फोनवर काम झाले आणि रेल्वे यंत्रणेतून संदेश पुढे गेला. दादासाहेब गायकवाड यांची गाडी तोवर मनमाडला पोहोचली होती. मनमाडला स्टेशन मास्तरने त्यांना विजयाची बातमी देत गाडीतून उतरवून घेतले आणि मुंबईकडे जाणाऱ्या पुढच्या गाडीने मुंबईला पाठविले. दादासाहेब गवई यांची ही धावपळ श्री. यशवंतराव चव्हाण बघत होते. त्यांनी विचारणा केली की, हा कोण मुलगा आहे. हा अमरावतीचा आरपीआय कार्यकर्ता आहे. सध्या विधानपरिषद सदस्य आहे. या घटनेनंतर रा. सू. गवई सर्वांना माहीत झालेत.

नंतर दादासाहेब गायकवाड व यशवंतराव चव्हाण यांच्यात एक समझोता झाला. भीमशक्ती व शिवशक्ती महाराष्ट्राच्या राजकारणात एकत्र आली. याच कराराप्रमाणे १९६४ साली आमदार झालेल्या रा. सू. गवई यांना विधानपरिषदेचे उप सभापतीपद देण्यात आले. उप सभापती झाल्यावर ज्या ज्या वेळी गवईसाहेब नागपूरला येत तेव्हा त्यांचा मुक्काम माझ्या घरीच राहत असे. यातून आमची जवळीक इतकी वाढली की, जणू दोघेही एकमेकांचे सख्खे भाऊ झालोत. स्वतःच्या भावापेक्षाही त्यांचा माझ्यावर जास्त विश्वास होता. या विश्वासामुळेच दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्यदिव्य स्मारक उभे होऊ शकले. १९६३ मध्ये दीक्षाभूमी स्मारक समितीची व्याप्ती वाढविण्यात आली. त्यात कर्मवीर दादासाहेब गायकवाड, भय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर, रा. सू. गवई व भंडाऱ्याचे बिडी कामगारांचे नेते ॲड. एस. एम. रामटेके यांचा समावेश झाला. त्या वेळी दादासाहेबांनी अट टाकली होती की, जर फुलझेले या समितीचे सरचिटणीस होणार असतील तरच मी ही जबाबदारी स्वीकारतो. त्यानुसार समितीचे सरचिटणीस पद माझ्याकडे आले. दादासाहेब गायकवाड हे अध्यक्ष झालेत. या समितीत कार्याध्यक्षपद कामठीचे ना. ह. कुंभारे यांच्याकडे देण्यात आले

१९६४ ला आम्ही दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाची स्थापना केली. त्या महाविद्यालयाच्या

उद्घाटनाला दादासाहेब गवई हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना घेऊन आलेत व तेव्हापासून दीक्षाभूमीवर प्रत्येक कार्यक्रमाला गवईसाहेब कोणाला तरी घेऊन येत व त्यांचे सहकार्य आम्हाला मिळत असे. कॉलेजची स्थापना झाली पण आंबेडकरी जनता खूश नव्हती. त्यांना दीक्षाभूमीवर फक्त महाविद्यालय नको होते, तर डॉ. बाबासाहेबांचे भव्यदिव्य स्मारक व्हायला हवे होते. पण स्मारक समितीची आर्थिक स्थिती मजबूत नव्हती.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे अखेरचे आजारपण सुरू झाले होते. जवळ जवळ दोन महिने ते दिल्लीला इस्पितळात भरती होते. यात काही मंडळींनी खूप वेगवेगळा प्रचार केला. गैरसमज वाढविले जात होते. त्यातच बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी वेगळा रिपब्लिकन पक्ष काढला. १९७१ च्या डिसेंबरला कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे मृत्यू पावले त्यामुळे पुन्हा स्मारक समितीची फेररचना करण्यात आली. दादासाहेबांच्या निधनानंतर वास्तविक बघता कार्याध्यक्ष ना. ह. कुंभारे हेच अध्यक्ष व्हायला पाहिजे होते. पण ते मुळातून अतिशय नरम स्वभावाचे होते. कठोरपणाने काही निर्णय घेणे व राबविणे त्यांना जमत नव्हते म्हणून १९७२ मध्ये श्री. रा. सू. गवई यांना स्मारक समितीचे अध्यक्ष करण्यात आले. त्या वेळी भदंत आनंद कौसल्यायन हे दीक्षाभूमीवर राहत होते. त्यांना काही नेत्यांनी भडकविले. त्यांनी स्मारक समिती विरोधात आंबेडकरी जनतेला भडकाविणे सुरू केले. त्यांनी स्मारक समिती विरुद्ध मोर्चाही आयोजित केला होता. दादासाहेब गवई यांनी पोलिसांच्या मदतीने हा मोर्चा येऊ दिला नाही. मोर्चा आयोजितही होऊ शकला नाही.

वास्तविक दीक्षाभूमी संबंधात ते एक कटू पर्व आहे. भदंत आनंद कौसल्यायन हे श्रीलंकेत एका विद्यापीठात हिंदीचे प्राध्यापक होते. श्रीलंकेत कशीबशी ५-२५ मुले हिंदी शिकत. त्यामुळे त्यांनी नागपूरला येण्याची इच्छा व्यक्त केली. धर्माचे काम करू, असेही त्यांनी सांगितले. नागपूरला आल्यावर त्यांच्यासाठी आलिशान भिख्खु निवास बांधण्यात आले. याच काळात माझ्यासोबतच त्यांनी जपान व काही देशांचा दौराही केला होता. पण त्यांना खुर्चीची खूप आवड व ओढ होती. खुर्चीसाठी त्यांनी विविध गटात भरपूर भांडणे लावली होती. त्यांनी काही गटांना हाताशी धरून भांडणासाठी त्यांना फूस लावली. त्या वेळच्या राजकारणात खोब्रागडे व आवळे गटाशी त्यांची जास्त जवळीक होती. दीक्षाभूमीवर त्यांची कुटी हा गुंडांचा अड्डा झाला होता. त्यांनी दीक्षाभूमीवर विविध मोर्चेही आणायचा प्रयास केला. शेवटी स्मारक समितीने त्यांच्या विरोधात न्यायालयात कारवाई सुरू केली. इंजंक्शनचा दावा आम्ही टाकला. गवईसाहेब मुंबईत व्यस्त राहत म्हणून व समितीचा सरचिटणीस म्हणून मीच कारवाई सुरू केली. खालच्या कोर्टात आम्ही जिंकलो. त्यांनी ती जागा खाली करून द्यावी असा आदेश न्यायालयाने दिला. त्याविरुद्ध हायकोर्टात अपील झाले. ॲड. व्ही. आर. मनोहर यांनी भंतेजींची बाजू मांडली. त्यांना त्या कुटीत राहण्यासाठी एक कक्ष द्यावा असा आदेश उच्च न्यायालयाने दिला. बाकी कुटी स्मारक समितीच्या ताब्यात आली.

पुढे कुंभारे यांच्या मदतीने त्यांना कामठी रोडवर एका पारशी गृहस्थांची ८ एकर जागा मिळाली. त्यांनी एका कक्षात राहण्याऐवजी कामठी रोडवरील त्या परिसरात राहायचा निर्णय घेतला.

१९७२ साली दादासाहेब गवई अध्यक्ष झाल्यावर त्यांनी दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक करण्याची योजना आखली. नागपूरचे ख्यातनाम आर्किटेक्ट शिवदानमल यांच्याकडे या स्मारकाचा आराखडा करण्याचे काम सोपविण्यात आले. त्यांनी जवळ जवळ २ वर्षे पावेतो बुद्धिस्ट आर्किटेक्टचा अभ्यास केला व आम्हाला स्मारकाचे ४ मॉडेल्स तयार करून दिलेत. गवईसाहेबांच्या नेतृत्वात समितीने सर्वात छान व महागडे मॉडेल स्मारकासाठी म्हणून स्वीकारले. त्याचा खर्च त्या

वेळी फक्त १० लाख रुपये येणार होता. पण स्मारकाला वेळ होऊ लागला. त्यातील स्पेसिफिकेशन्स बदलली जाऊ लागली. आराखडाही बदलत गेला. मार्बल, ग्रेनाईट याचाही वापर करण्याचे ठरले. जो डोम राहणार होता तो पूर्वी साधा राहणार होता पण नंतर त्यावर सिरॅमिक टाईल्स लावण्याचे ठरले. खर्च वाढत होता.

दादासाहेब गवई प्रत्येक मुख्यमंत्र्याना भेटून पैशांची व्यवस्था करीत होते व मी सचिव म्हणून पैसा खर्च करीत होतो. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांनी शासनातर्फे १ लाख रुपये अनुदान स्मारक समितीला स्मारकासाठी दिलेत. त्यानंतर शरद पवारांनी दीड लाख रुपये अनुदान रूपात दिले. १९८१ साली धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा रौप्यमहोत्सव होता. त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. ए. आर अंतुले होते. ते दादासाहेब गवई यांचे मित्र होते. त्यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केले होते. त्या वेळी पुन्हा या स्मारकाच्या खर्चाचा आढावा घेण्यात आला, तोवर खर्च १ कोटी रुपयांवर गेला होता. त्या समारंभात बोलताना गवई साहेब म्हणाले, या स्मारकाचा खर्च पूर्वी जो १० लाख होता तो आता १ कोटी रुपये झाला आहे. या एक कोटी रुपयांपैकी २५ टक्के रक्कम महाराष्ट्र शासनाने आम्हाला अनुदान रूपाने द्यावी, उर्वरित ७५ टक्के रक्कम आम्ही उभारू. त्या प्रसंगी अतिथी म्हणून बोलताना बॅ. अंतुले यांनी अशी भूमिका घेतली की, सरकारने २५ टक्के रक्कमच का वहन करावी? ते म्हणाले, २५ टक्के रक्कम या स्मारक समितीने उभी करावी. ७५ टक्के रकमेची जबाबदारी स्वीकारणे हे शासनाचे कर्तव्य आहे असे मी मानतो. त्यांनी ७५ लाख रुपये देण्याची घोषणा केली व अंतुले प्रथेप्रमाणे १५ लाख रुपयांचा धनादेश लागलीच समितीला मिळाला. कामाला प्रारंभही झाला. स्मारकाचे स्ट्रक्चर तयार झाले पण बाकी स्पेसिफिकेशन्स यात बदल होत गेला आणि स्मारकाची किंमत- खर्च वाढत गेला. काही दिवसांनी बॅ. अंतुले यांच्या विरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात खटला चालला आणि त्यांना पायउतार व्हावे लागले. त्यानंतर महाराष्ट्रात जे मुख्यमंत्री आलेत त्यांनी या स्मारकाच्या कामाकडे व शासनाचे पैसे देण्याबाबत कानाडोळा केला.

भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी नागपूरला भाजपा अधिवेशनासाठी आले होते. त्यांनी दीक्षाभूमीला भेट दिली. त्यांना गवई साहेबांनी सांगितले की, हे स्मारक पूर्णत्वाला जाण्यासाठी अजून १ कोटी रुपयांची गरज आहे. वाजपेयींनी १ कोटी रुपये मंजूर केले आणि समाज कल्याण खात्यामार्फत १ कोटी रुपये लगेच पाठविले.

त्यानंतर विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी २ कोटी रुपये शासनामार्फत दिलेत. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झालेत. शंकरराव हे अनुदान वगैरे देण्याबाबत अतिशय कठोर होते. सहजी ते अनुदान वा मदत घोषित करीत नसत. पण त्या वेळी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या मदतीने आम्ही प्रयत्न केलेत आणि शंकररावांनी १० लाख रुपये या स्मारकासाठी मंजूर करून लागलीच दिलेत. त्यांच्यानंतर शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झालेत. तोवर अंतुले साहेबांनी घोषित केलेल्या रकमेपैकी उरलेली रक्कम तर दिलीच शिवाय २५ लाख रुपये अतिरिक्त अनुदान दिले. सुशीलकुमार शिंदे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आलेत. त्यांनी २ कोटी रुपये स्मारकाला दिले. या सर्व मदतीतून आजचे भव्यदिव्य स्मारक उभे झाले आहे.

गवई साहेबांचा राजकीय प्रवास आमदार, उप सभापती, सभापती नंतर विरोधी पक्षनेते असा झाला. हा प्रवास तब्बल तीस वर्षांचा होता. त्यानंतर ते राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात गेलेत. अमरावती लोकसभा मतदारसंघातून ते लोकसभेवर निर्वाचित झालेत. पुढे राज्यसभेतही काम करण्याची संधी त्यांना मिळाली. ते महाराष्ट्रातून राज्यसभेवर निर्वाचित झाले होते. त्यानंतर त्यांना बिहार, सिक्कीम आणि केरळ या राज्याचे राज्यपाल म्हणून काम करण्याची

संधी मिळाली. पण या सगळ्या कालखंडात देशात कुठेही असले तरी त्यांचे लक्ष स्मारक समिती व दीक्षाभूमीवरील स्मारकाकडे राहात असे.

अगदी खरे सांगायचे तर दादासाहेब गवई नसते तर हे स्मारकच होणे कठीण होते. केवळ दादासाहेब म्हणूनच ते पैसे आणत गेले आणि विश्वासाने आम्हाला खर्च करण्यासाठी देत गेले. त्यांनी पैसे आणले आणि मी ते स्मारकावर खर्च करणे असेच गणित त्या काळात होते. दादासाहेब गवई यांनीच पुढाकार घेतल्यामुळे आंबेडकर महाविद्यालयाने कात टाकली. त्यांनी कृष्णकुमार यांच्या हाती प्राचार्यपद सोपविले व आमचे महाविद्यालय नागपुरातील पहिल्या-दुसऱ्या क्रमांकाचे महाविद्यालय झाले.

केरळच्या राज्यपालपदावरून निवृत्त झाल्यावर दादासाहेबांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेतली. तसे राज्यपाल झाल्यापासून ते अलिप्त झाले होते. निवृत्तीनंतर ते अमरावतीत परत आलेत. पण त्यांची प्रकृती बिघडली. सतत आजारी पडू लागलेत. त्यानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांनी त्यांना नागपूरला आणले. त्यांच्या बंगल्यावरच दादासाहेब राहात व उपचार घेत होते. पुन्हा प्रकृतीने गंभीर वळण घेतल्यावर त्यांना नागपूरला धंतोलीमधील श्रीकृष्ण हॉस्पिटलला आणले. सतत दोन महिने ते दवाखान्यातच होते. त्या दवाखान्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. माझ्या सख्ख्या भावापेक्षाही जवळचा एक नातेवाईक मी गमावला.

-सरचिटणीस,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,
दीक्षाभूमी, नागपूर.

❑❑

अजातशत्रू-दादासाहेब गवई

एक विलक्षण घटना अशी घडली की, पाकिस्तानची एक मुस्लीम अभिनेत्री-जिचे नाव झेबा होते- मुंबईत आली होती. वरळी येथे आमदारांच्या सागर गृहनिर्माण संस्थेमधील एका फ्लॅटमध्ये ती थांबली होती. १९९३ साली मुंबईत जेव्हा बाँम्बस्फोटानंतर भीषण दंगल उसळली त्यावेळचा हा काळ आहे. रस्त्यावर जातीय वणवा भडकला होता. वरळीच्या त्या भागात काही लोकांना ही गोष्ट कळली की वरळी सागर सोसायटीमध्ये पाकिस्तानची एक अभिनेत्री राहते आहे. दंगेखोरांनी या इमारतीवर मोर्चा वळविला आणि बघता-बघता परिस्थिती गंभीर बनली. दादासाहेब गवई यांना ही गोष्ट कुणीतरी सांगितली की, झेबा ही अभिनेत्री पाकिस्तानमधून आली असून तिला मदतीची गरज आहे. परिस्थिती गंभीर होत आहे. दादासाहेबांनी प्रसंगावधान राखून त्या पाकिस्तानी अभिनेत्रीला आपल्या घरी आणले तिला पूर्ण संरक्षण दिले. तिला सांगितले की, तू माझ्या मुलीसारखी आहेस. तिच्या डोळ्यांतून अश्रूंची धार लागली. त्या भयभीत मुलीने एकही शब्द न बोलता, तिच्या डोळ्यातून ओघळणाऱ्या अश्रूंनी दादासाहेबांनी किती मोठे काम केले आहे याची प्रचिती दिली. दंगल आटोक्यात आल्यानंतर दादासाहेबांनी त्या मुस्लिम अभिनेत्रीला त्यांच्याच परिचयाच्या एका मुस्लीम मित्राकडे सुखरूप पाठविले आणि त्यानंतर तिची पाकिस्तानला सुखरूप रवानगी झाली.

-विजय दर्डा
माजी खासदार तथा संपादक, दै. लोकमत.

सकारात्मक दृष्टिकोनाचे नेतृत्व

▪ अर्जुन डांगळे

रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई यांचे नाव घेतल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू डोळ्यासमोर उभे राहतात. खरं म्हणजे त्यांचे व्यक्तिमत्त्व हे शब्दात पकडणे सोपे नाही. बहुढंगी, बहुआयामी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. अभ्यासू, व्यासंगीपणा त्यांच्या ठायी होताच पण त्यांचा आयुष्य जगण्याचा ढंग काही न्याराच होता. ते राजकारणी नक्कीच होते. पण मैफिलीत जगणारा आणि मैफिली जागविणारा त्यांचा स्वभाव होता. मी राजकारणातील अनेक माणसे पाहिली आहेत. पण गवई साहेबांसारखा नितळ आणि पारदर्शी स्वभाव असलेला राजकारणी दुर्मिळच म्हणावा लागेल. आयुष्यात त्यांना आलेले अनुभव आणि त्यांनी केलेल्या भल्याबुऱ्या गोष्टी आडपडदा न ठेवता ते बिनधास्त सांगत. नामदेव ढसाळ त्यांचा ' छोटे नवाब ' असा उल्लेख करायचा.

तसं पाहिलं तर मी त्यांचा त्याकाळी राजकीय विरोधक होतो. दलित पँथरमध्ये सक्रिय असताना त्यानंतर प्रकाश आंबेडकरांबरोबर भारतीय रिपब्लिकन पक्षामध्ये काम करीत असताना गवई साहेबांची काँग्रेसची दोस्ती आम्हाला मान्य नव्हती. अनेकदा आम्ही त्यांच्यावर वाट्टेल त्या भाषेत टीका करायचो पण त्यांनी कधी आमच्यावर डूख धरला नाही. उलट कुठे भेटीगाठीत ते त्यांच्या कृतीचे संयमित आणि मुद्देसूदपणे समर्थन करायचे. पुढे रिपब्लिकन ऐक्य, रिडल्सचा लढा, तिसरी आघाडी, बौद्धांच्या सवलतीचा प्रश्न या निमित्ताने खूपदा एकत्र आलो, खूपदा विभक्त झालो, पण त्यांच्या आठवणी मनात घर करून आहेत.

पक्षाचा एकही आमदार नसताना गवई साहेब विधानपरिषदेत इतकी वर्षे आमदार, नंतर सभापती पदापर्यंत कसे राहिले याचे अनेकांना आश्चर्य वाटते. मी त्यांना तसे एकदा विचारलेही. त्यांनी मला उलट विचारले, 'तुला काय वाटते. मी म्हणालो त्यांना म्हणजे काँग्रेसला निवडणुकीत आपल्या मतांची आवश्यकता वाटते.' त्यावर त्यांनी मार्मिक उत्तर दिले. 'हे खरे आहे, संपूर्ण सभागृहाला माझी आवश्यकता वाटते' आणि याची अनेक उदाहरणे आहेत. त्यांचा राजकीय मुत्सद्दीपणा, संसदीय प्रणालीचा अभ्यास आणि सर्व पक्षातील नेत्यांशी असलेले सौहार्द हे त्यांच्या सभागृहातील वाढत्या आलेखाचे गमक होते.

महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेबांच्या लिखाणाचे, भाषणांचे खंड प्रकाशित केले आहेत. त्यातील चवथ्या खंडातील 'रिडल्स ऑफ हिंदूइझम' या लेखावर प्रचंड वादळ उठले. शंकरराव चव्हाण त्यावेळी मुख्यमंत्री होते. माधवराव गडकरींनी 'लोकसत्ते' तील त्यांच्या 'चौफेर' या सदरात सरकारवर हल्ला चढविला. मराठा महासंघाने त्या खंडाची होळी केली. दरम्यान विलेपार्ले मतदारसंघात विधानसभेच्या पोटनिवडणुकीत शिवसेनेने आपला उमेदवार उभा केला होता. दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या चाणाक्ष राजकारण्याने एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन 'हिंदू अस्मितेचा' मुद्दा घेऊन आंदोलन केले. आंबेडकरी चळवळीतील ह्या पक्ष संघटनांनी माझ्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या 'फुले-आंबेडकर विचार संवर्धक समिती' नेही प्रत्युत्तर दिले. शिवसेनेने पोटनिवडणूक जिंकली आणि मग तडजोडीची भाषा सुरू झाली.

मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या 'वर्षा' बंगल्यावर तोडग्यासाठी बैठक होती. शिवसेनेच्या वतीने बाळासाहेब ठाकरे, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, सुधीर जोशी आणि छगन भुजबळ उपस्थित होते. समितीच्या वतीने मी, रा. सू. गवई, प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, नामदेव ढसाळ, अविनाश महातेकर, अरुण कांबळे उपस्थित होतो. चौथ्या खंडातून 'रिडल्सचा लेख' वगळावा ही मागणी अर्थातच आम्हाला मान्य नव्हती. राजा ढालेंनी ठरल्याप्रमाणे

सूचना केली. ह्या लेखाच्या खाली 'फूट नोट' टाकावी की, 'शासन या लेखातील मजकुराशी सहमत नाही' त्यावर गवई साहेबांनी दुरुस्ती केली ती अशी होती. 'या लेखात व्यक्त झालेल्या मताशी शासन सहमत असेलच असे नाही.' ह्या शब्दक्रमावर चर्चा चालू असताना तो मजकूर लिहून काढावा अशी सूचना आली. गवई साहेब, मी आणि अविनाश त्यासाठी उठलो व बाजूच्या रूममध्ये गेलो. रात्रीचा दीड वाजून गेला होता. सगळ्यांना घाई होती. आम्ही तिघेही खुर्च्या ओढून बसण्याच्या तयारीत होतो. अविनाशने चुकून अनवधानाने गवई साहेब बसत असलेली खुर्ची ओढली आणि गवई साहेब पडता पडता मी त्यांना सावरले. त्यांनी आम्हा दोघांकडे शांतपणे पाहिले. आम्ही क्षमा मागितली. पुढे त्यांनी कधीच हा विषय कुणाकडेही काढला नाही. आम्हा दोघांत अपराधीपणाची भावना पुढे बरेच दिवस होती.

सभागृहाला गवई साहेबांची आवश्यकता होती याचे प्रत्यंतर आम्हाला म्हणजे प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील भारतीय रिपब्लिकन पक्षाला १९८४ साली आली. औरंगाबादला मला वाटते पहिल्यांदा महानगरपालिकेचा दर्जा मिळाला होता. त्या निवडणुकीत भारतीय रिपब्लिकन पक्षाला तीन जागा मिळाल्या होत्या. आमची तीन मते निर्णायक होती. काँग्रेस आणि शिवसेना यांच्यात टक्कर होती. काँग्रेसच्या वतीने डॉ. रफिक झकेरिया बोलणी करीत होते. आम्ही तीन मते काँग्रेसला द्यायची त्याबदल्यात त्यांनी प्रकाश आंबेडकरांना विधानपरिषदेत आमदारकी द्यायची असे ठरले. विलासराव देशमुखांवर आमदारकीची जबाबदारी दिली गेली. काँग्रेसचे कल्याणराव पाटील महापौर झाले. दरम्यानच्या काळात शंकररावांच्या ऐवजी शरद पवार मुख्यमंत्री झाले. विधानपरिषदेच्या निवडणुका लागल्या. मी, डॉ. निलम गोऱ्हे, अविनाश महातेकर, जयदेव गायकवाड, मुरलीधर जाधव पवार साहेबांच्या पेडर रोडवरील रामालयात गेलो. आमची शिष्टाई करायला विलासराव होते. अरुण मेहताही होते. पवार साहेबांनी आमदारकी देण्याचे मान्य केले, पण राज्यपालांच्या कोट्यातून. आम्ही आमदारातून निवडलेल्या जागेसाठी आग्रह धरला. पण पवार साहेब ठामपणे म्हणाले ती जागा गवईंना देतोय. 'I want Mr. Gavai on the floor now' असे त्यांनी चक्क इंग्रजीत सांगितले. शेवटी आम्ही राज्यपाल कोट्यातील आमदारकी नाकारून निघालो. प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील भारतीय रिपब्लिकन पक्षाला याकाळी प्रचंड जनाधार होता. असे असताना शरदरावांनी गवईंना का पसंती दिली हे आमच्यासाठी कोडेच होते. या चर्चेच्या ओघात मुरलीधर जाधवांनी मजेशीर प्रतिक्रिया दिली. तो म्हणाला, 'गवईंच्या पानाच्या डब्यातून शरदराव नेहमीच पान खातात. त्या डब्यातूनच काही जडीबुटी गवई त्यांना खिलवत असतील.'

गवई साहेबांनी अनेक छंद जोपासले. पान खाण्याचा छंद अगदी जिव्हाळ्याने जोपासला. सतत तोंडात पान असायचे. त्यांचं गोरपान रूप, पान चघळताना केलेले स्मितहास्य लोभसवाणं वाटायच. त्यांचा पानाचा डबा सभागृहात आणि मैफिलीत सर्वत्र फिरत असायचा.

गवई साहेबांनी त्यांच्या औकातीप्रमाणे आणि समाजातील बदलत्या वास्तवाला सामोरे जाऊन राजकारण केले. काँग्रेसबरोबर सातत्याने ते राहिले पण त्यांनी हे सर्व स्वतःचा आब राखून केले. फार मोठी जन आंदोलने किंवा चळवळी त्यांनी केल्या नाहीत. किंबहुना त्यांचा जनाधारही मर्यादित राहिला पण महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी त्यांचा प्रभाव ठेवला, हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होय. शिवाय रिपब्लिकन किंवा आंबेडकरी चळवळीला वैचारिक स्वरूपाचा बट्टा लागेल असेही कृत्य त्यांनी त्यांच्या हातून होऊ दिले नाही. 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हे पक्षाचे मूळ नाव त्यांनी त्यांच्याकडेच ठेवले. त्याचा त्यांना अभिमान होता. 'पक्षाचा सातबाराचा उतारा माझ्या नावावर आहे' असे ते नेहमी म्हणायचे. संविधान, संसदीय राजकारण, संघटनात्मक पक्षीय बांधणीतील तांत्रिक बारकावे या विषयी त्यांचा अभ्यास होता. रिपब्लिकन चळवळीच्या ऐक्याच्या प्रक्रियेत हा अनुभव आम्हाला बऱ्याचदा आला. राजकारणातली दोस्ती त्यांनी तात्विक व्यवहारात आणली

नाही. म्हणूनच शरदरावांनी जेव्हा श्रीमती सोनिया गांधींचा विदेशी वंशाचा उल्लेख करून राष्ट्रवादीची स्थापना केली त्यावेळी गवई साहेबांनी विदेशी वंशाचा मुद्दा असंवैधानिक आहे असे सांगून त्याला विरोध केला. पंतप्रधान व्ही. पी. सिंगांनी जेव्हा बौद्धांच्या सवलतीचा प्रश्न सोडविला, संसद भवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावले, मंडल आयोग लागू केला तेव्हा काँग्रेसशी मैत्री तोडून प्रकाश आंबेडकरांसोबत तिसऱ्या आघाडीबरोबर ते राहिले.

गवई साहेबांच्या अनेक आठवणी आहेत. मला ते नेहमी म्हणायचे, 'अर्जुन, तू माझी दोस्ती अजमावून बघ' आणि ती वेळ आली. म्हणजे भारतीय रिपब्लिकन पक्षातून बाहेर पडल्यानंतर काही काळानंतर महाराष्ट्रात व्यापक आणि सर्वसमावेशक चळवळीची व संघटनेची गरज भासू लागली होती म्हणून मी प्रयत्न केला. पहिल्यांदा गवई साहेबांना भेटलो आणि त्यांच्या पक्षात काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांनी या प्रस्तावाचे स्वागत केले. पण त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि वारसदारांनी हा प्रस्ताव नाकारला. मला साधारणतः हे अपेक्षित होते. त्यांच्या ह्या कृत्याबद्दल त्यांनी काही महिन्यांनी माझ्यासमोर ह्या सर्वांना झापले होते.

गवई साहेबांनी पक्षाचे कामकाज पद्धतशीर केले. त्यांच्या पक्ष कार्यालयात नियमितपणे काम करणारे पगारी कार्यकर्ते-कर्मचारी होते. ते सांगत, 'आलेल्या प्रत्येक पत्राला, अर्जाला उत्तर गेले पाहिजे.' हे मी काटेकोरपणे पाळतो. रिपब्लिकन पक्षाच्या इतर गटातील कार्यालयीन कामकाजापेक्षा त्यांचे कार्यालयीन कामकाज पद्धतशीर होते. एकदा मी त्यांना त्याबद्दल विचारले तेव्हा त्यांनी सांगितले, "माझी काही रक्कम 'रोलिंग' मध्ये गुंतवलेली आहे. त्याच्या व्याजातले एक लाख रुपये मी दर महिन्याला कार्यालयावर खर्च करतो." त्यांना आपण एखादी गोष्ट विश्वासाने विचारली तर काही आडपडदा न ठेवता खुले आम सांगत. अगदी त्यांच्या खाजगी गोष्टीबद्दल देखील तरुणपणी कॉलेजात असताना आपल्यात गुंड प्रवृत्ती कशी होती इथपासून ते अमरावतीत एका मोर्चाच्या वेळी पोलीस इन्स्पेक्टरशी झालेली झटापट तसेच महाराष्ट्रातील राजकारणाच्या आणि राजकारण्यांच्या सुरस आणि रंजक गोष्टी सांगताना त्यांच्यातील वऱ्हाडीपणा जाणवायचा. पण हेही खरे होते की, राजकीय क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेबद्दलचे किंवा रणनीतीबद्दलचे पत्ते ते सहजासहजी उघड करीत नसत. एकूण परिस्थितीचा रागरंग बघून ते सावध राजकीय भूमिका घेत. विशेषतः रिपब्लिकन ऐक्याच्या प्रक्रियेत हा अनुभव आला.

तरुणपणात एक झपाटलेला कार्यकर्ता म्हणून ते विदर्भाला परिचित होते. पण रिपब्लिकन पक्षाने भूमिहिनांचा जो विराट देशव्यापी सत्याग्रह केला त्यात गवई साहेबांनी केलेल्या कार्याबद्दल अमरावतीच्या जाहीर मेळाव्यात त्यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी 'विदर्भ केसरी' ही पदवी देऊन बहुमान केला. पुढे जीवनात त्यांनी सन्मान, सत्ता, प्रतिष्ठा, संपत्ती मिळवली पण त्यांनी त्यांच्या राजकीय सामाजिक जीवनातील सुसंस्कृतपणा कधीच सोडला नाही. सामाजिक बांधिलकीची जाण त्यांना होती. त्यांच्याकडे एखाद्या कामासाठी गेलेला सनदी अधिकारी असो वा शेतमजूर असो तो प्रश्न त्यांच्या चौकटीत कसा सोडवला जाईल त्याबाबत ते प्रामाणिक होते. शेवटी शेवटी तर त्यांचा जनाधार घटत गेला. पण जे कार्यकर्ते त्यांच्याशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहिले त्यांना सन्मानाने जगता येईल अशा पद्धतीने त्यांना संसाधने उपलब्ध करून दिली. बिहार, नंतर केरळचे राज्यपाल म्हणून निवृत्त झाल्यावर त्यांनी सक्रिय राजकारणातूनदेखील निवृत्ती घेतली. त्यांचा हा निर्णय राजकीय पोक्तपणाचा होता.

अमरावतीत गवई साहेबांनी राहण्याचे ठरविले. त्यामुळे त्यांच्याशी भेट शक्य नव्हती पण तीन साडेतीन वर्षांपूर्वी मी आणि अविनाश महातेकर अमरावतीला एका कार्यक्रमाला अमरावतीला गेलो होतो. गवई साहेबांना भेटायचे ठरले. भेटीची वेळ ठरली. शाल आणि गुच्छ घेऊन आम्ही गेलो. सोबत माजी आमदार अनिल गोंडाणे आणि मयूर बोरकर

होते. आम्ही गुच्छ आणि शाल दिली. वयपरत्वे शरीर थकलेले दिसत होते. बोलण्यात थकवा जाणवत होता पण चेहऱ्यावर समाधान होते. या भेटीत आम्हाला गवई साहेबांच्या शुद्धतेचे आणि सुसंस्कृतपणाचे दर्शन घडले. कमलताईंनी आम्हाला खुर्चीवर बसवून ओवाळले. वंदना घेतली आणि गवई साहेबांनी व कमलताईंनी आमचा शाल देऊन सत्कार केला. रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीतील एका धुरिणाने, ज्येष्ठ नेत्याने केलेल्या स्वागताबद्दल आम्ही भारावून गेलो. गवई साहेबांची ही शेवटची भेट.

गवई साहेबांनी जे राजकारण, समाजकारण केले त्याबद्दल अनेक समज-गैरसमज असू शकतात. त्यांच्या भूमिकेबद्दल मतभेद असू शकतात नव्हे आहेतच. त्यांचे राजकीय, सामाजिक कर्तृत्व अनेक अंगाने आपण तपासू शकतो. एवढे असूनदेखील त्यांच्या एका कर्तृत्वाबद्दल उभ्या महाराष्ट्राने त्यांच्या स्मृतीला सन्मानपूर्वक अभिवादन करायला हवे आणि ते म्हणजे ज्या नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्रप्रवर्तन केले त्या ऐतिहासिक भूमीवर जे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभे करण्यात त्यांनी जे योगदान दिले आहे त्याबद्दल रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीतील व्यापक, सर्वसमावेशक भूमिका घेणारा नेता, आमदार, सभापती, खासदार, राज्यपाल अशा भूमिका निभावत गवई साहेब पन्नास वर्षांहून अधिक काळ राजकारणात, समाजकारणात सक्रिय राहिले. संस्था उभ्या केल्या, माणसे उभी केली. कुटुंबप्रमुखाची भूमिका यशस्वी पार पाडली. थोडक्यात गवई साहेबांनी जीवनात जो सकारात्मक दृष्टिकोन जोपासला त्यामुळेच त्याचे नेतृत्व आणि कर्तृत्व बहरले.

-रिपब्लिकन नेते, मुंबई.

❑❑

साध्यालाच साधन मानणारे व्यक्तिमत्त्व

माझ्या दृष्टिकोनातून श्री. दादासाहेब गवई म्हणजे साध्याला साधन मानणारे एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे. श्री. दादासाहेबांच्या सामाजिक कळकळीविषयी व त्या अनुषंगाने त्यांच्या समाजसेवेविषयी मी बरेच ऐकलेले होते पण प्रत्यक्षात आमचा परिचय झाला तो १९७५ च्या आसपास. त्यावेळीस सौ. कमलाताईंची पण माझी ओळख झाली. पण आम्हा दोघीत एक साम्य आहे. लग्नाच्या वेळी आम्ही मॅट्रिकच होतो व पुढचे शिक्षण लग्नानंतरच घेतलेले आहे. मला वाटते आम्हा दोघींची मैत्री टिकविण्याचे प्रमुख कारण हेच असावे.

श्री. दादासाहेबांच्या अंगी असलेला आणि मी प्रथमच प्रकर्षाने अनुभवलेला गुण म्हणजे त्यांची सहकारिता १९७९ मध्ये जिल्हा परिषदेच्या झालेल्या निवडणुकीमध्ये जनमताचा कौल घेऊन जिल्हा परिषदेची पहिली महिला सदस्य म्हणून मी निवडून आले. माझ्या यशामागे श्री. दादासाहेबांचे सहकार्य तर मला लाभलेच पण पुढे उपाध्यक्षपदासाठी माझे नाव सुचवून त्यांना माझ्याविषयी वाटणाऱ्या आत्मीयतेचा प्रत्ययही मी घेतला. मी उपाध्यक्ष व्हावे अशी त्यांची फार इच्छा होती. काही कारणास्तव मी उपाध्यक्ष होऊ शकले नाही. पण त्यांनी माझ्यासाठी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचे विस्मरण मला कधीच होणार नाही, तसेच दिलदारपणा हा त्यांचा आणखी एक स्वभाव विशेष आहे.

श्रीमती वसुधा देशमुख
माजी राज्यमंत्री.

अशी गाजवली तीन दशके

▪ वसंत वासुदेव देशपांडे

महाराष्ट्र विधानपरिषदेवर सलग पाच वेळा निवडून येण्याची नोंद रा. सू. गवई, नितीन गडकरी आणि बी. टी. देशमुख या तिघांच्या नावावर आहे. त्यांच्यापैकी गवई यांनाच विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती आणि विरोधी पक्षनेते ही सभागृहातील तिन्ही अधिकार पदे भूषविण्याचे भाग्य लाभले. त्यातही विशेष म्हणजे गडकरी आणि बी. टी. देशमुख हे अनुक्रमे नागपूर आणि अमरावती पदवीधर मतदारसंघातून निवडून येत होते. तर गवई हे विधानसभेतील सदस्यांच्या मतदारसंघातून निवडून येत होते. गवई हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते. विधानसभेत त्या पक्षाचे सदस्य हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे. तरीही विधानसभा मतदारसंघातून लागोपाठ पाच वेळा विधानपरिषदेवर निवडून येण्याची अजोड कामगिरी गवई यांनी करून दाखविली, ती सर्वांशी मैत्री या त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्याच्या बळावर. विधानपरिषदेतील तीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीनंतर लोकसभा आणि राज्यसभेवरील निवड, तसेच बिहार आणि केरळ या राज्यांच्या राज्यपाल पदावरील नियुक्ती म्हणजे त्यांनी संपादन केलेल्या सर्वपक्षीय विश्वासावर सुवर्ण मोहोरच.

गवई हे आम्हा पत्रकारांचे जिव्हाळ्याचे सुहृद. पत्रकाराबरोबर काव्य शास्त्र विनोदाच्या सायंकालीन बैठका आयोजित करण्यात त्यांना आनंद वाटे. मुंबईतील सध्याच्या विधान भवनाची उभारणी होत असताना त्या वास्तूमध्ये पत्रकारांना सोयीचे दालन उपलब्ध व्हावे म्हणून गवई यांनी खुल्या दिलाने सहकार्य दिले. १९६४ ते १९९४ या तीस वर्षांच्या विधानपरिषद कारकिर्दीत सदस्य म्हणूनही त्यांनी केलेली कामगिरी तेवढीच उल्लेखनीय आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व एकसुरी नव्हते. जीवनातील आनंद घेण्याची त्यांची वृत्ती होती. समाजातील सर्व थरांतील लोकांशी ते समरस होत असत.

विधानपरिषदेवर निवडून आल्यानंतर चार वर्षांतच त्यांना उप सभापती होण्याची संधी मिळाली त्यावेळी वि. स. पागे सभापती होते. सभापती आणि उप सभापती म्हणून दहा वर्षे उभयतांनी समन्वयाने विधानपरिषदेच्या कामकाजाचे नियमन केले. रोजगार हमी कायद्यासारखा क्रांतीकारक कायदा अंमलात यावा म्हणून वि. स. पागे यांना त्यांनी जी साथ दिली ती अत्यंत मोलाची होती. यासंबंधात उभयतांनी मुख्यमंत्री आणि इतर मंत्री यांच्याशी वेळोवेळी चर्चा केली होती. जनतेचे प्रश्न सभागृहासमोर आल्यानंतर सरकारतर्फे दिली जाणारी उत्तरे तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहेत की नाहीत हे पाहण्यापेक्षा जनतेचे प्रश्न विधिमंडळाच्या माध्यमातून सुटतील आणि लोकांना न्याय मिळेल याकडे गवई यांनी लक्ष दिले. काही प्रसंगी चाकोरीबाहेर जाऊनही न्याय मिळवून देण्यासाठी आमदार, मंत्री, शासकीय अधिकारी यांच्या बरोबर आपल्या दालनात बैठका आयोजित केल्या. मुंबईच्या गोरेगाव उपनगरातील टोपलीचे संडास बंद करण्यासाठी सरकारतर्फे आश्वासन दिले जात होते. परंतु आश्वासनाची पूर्ती करण्यात दिरंगाई व अडचणी निर्माण होत होत्या. ही समस्या सोडविण्यासाठी त्यांनी पीठासीन अधिकारी या नात्याने आमदार, मंत्री आणि शासकीय अधिकाऱ्यांची बैठक बोलावून दिलासा देण्यात पुढाकार घेतला. मुंबईच्या अभ्युदय नगरातील गाळे रहिवाशांना मालकी हक्काने मिळवून देणे, मराठवाड्यातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणीचा लाभ प्राप्त करून देणे या आणि अन्य बाबींमध्येही या मार्गाचा त्यांनी यशस्वी अवलंब केला.

विनंती-अर्ज समितीच्या माध्यमातून नागरिकांना आपली गाऱ्हाणी मांडण्याचे वैधानिक आयुध जनतेसाठी उपलब्ध आहे. नागरिकांनी विनंती-अर्जाद्वारे गाऱ्हाणे सादर केल्यानंतर उप सभापतींच्या नेतृत्वाखाली सभासदांची समिती त्या विनंती, अर्जाचा विचार करून शिफारशी करते आणि संबंधितांना न्याय मिळवून देते. गवई १९६८ मध्ये उप सभापती झाल्यानंतर त्यांनी या समितीच्या कामकाजात चैतन्य आणले. शिक्षकांनी या माध्यमाचा वापर करण्यात विशेष लक्ष घालून आपले प्रश्न सुटावेत म्हणून क्रियाशीलता दाखविली. ठाणे-बेलापूर पट्ट्यातील जमीनधारकांची गाऱ्हाणी तसेच उल्हासनगरमधील कारखाने आणि अनुषंगिक प्रश्न सुटण्यास विनंती-अर्ज समितीच्या शिफारशी उपयुक्त ठरल्या.

सभागृहाची आणि सदस्यांची प्रतिष्ठा यासंबंधात गवई अत्यंत दक्ष आणि सक्रिय होते. डिसेंबर १९८१ मध्ये कोकणातील एक सदस्य भाई सावंत यांना एका प्रकरणी सायंकाळी अटक केल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजता मॅजिस्ट्रेटसमोर हजर करीपर्यंत सावंतवाडी येथील पोलीस लॉकअपमध्ये रात्रभर साध्या बाकावर बसवून अपमानास्पद वागणूक देण्यात आली. या प्रकारामुळे हक्कभंग झाला आहे म्हणून विशेष हक्क समितीकडे ही बाब सोपविण्यात यावी अशी सूचना मांडण्यात आली. सभापती गवई यांनी भाई सावंत यांना यासंबंधात त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली त्यांच्यानंतर इतर सदस्यानीही आपले मत व्यक्त केले. भाई सावंत यांना अटक केल्यानंतर त्यांची झोपण्याची व्यवस्था पोलीस कस्टडीमध्ये करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता सर्वकाळ त्यांना बसवून ठेवण्यात आले. सर्वसामान्य नागरिकाला जो हक्क मिळू शकतो तोही आमदाराला मिळाला नाही. सभापती या नात्याने गवई यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. पोलीस अधिकाऱ्यांनी दाखविलेल्या वृत्तीचा धिक्कार करतानाच लोकप्रतिनिधींना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले.

न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका (सरकार) या तीन वैधानिक संस्थांवर लोकशाहीचा डोलारा उभा आहे. या तिघांचे हक्क जबाबदाऱ्या संविधानात नमूद करण्यात आल्या आहेत. विधिमंडळात न्यायपालिकांची अप्रतिष्ठा होऊ नये याकडे पीठासीन अधिकाऱ्यांचे लक्ष असते. १९८१ मध्ये कायदेमंत्री बाबासाहेब भोसले यांनी नागपूर अधिवेशनात प्रलंबित खटल्यासंबंधीत उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वर्तनावर केलेल्या विधानातून चर्चा भरकटत चालली. तेव्हा सभापती गवई यांनी सभागृहात न्यायमूर्तीच्या वर्तनावर चर्चा करता येत नाही असे स्पष्ट करून पाऊण तासाचे कामकाजच सभागृहात इतिवृत्तातून वगळले. मनोहर जोशी यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर निवेदन करताना बाबासाहेब भोसले यांनी उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वर्तनावर बोट ठेवून केलेल्या विधानानंतर काही सदस्यांनी न्यायाधीशावर अभियोग दाखल करण्याची मागणी केली. त्यावर अर्थमंत्री रामराव आदिक या सभागृहात अभियोगाचा ठराव आणता येणार नाही असे संविधानातील तरतुदींच्या आधारे स्पष्ट केले. सभागृहातील पाऊण तासांचे संपूर्ण कामकाजच इतिवृत्तातून वगळण्याचा सभापतींच्या आदेशानंतर बाबासाहेबांनी मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांच्याकडे तक्रार केली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी बाबासाहेबांना सांगितले की, तुम्ही कायदेमंत्री असला तरी झालेल्या प्रमादाबद्दल सभापतीकडे दिलगिरी व्यक्त करा.

सभापती गवई यांच्याकडून कोणतीही गैरभूमिका घेतली जाणार नाही असा विश्वास सत्ताधारी आणि विरोधी पक्ष सदस्यांना होता. अंतुले यांनी मुख्यमंत्री असताना इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठानसाठी जमा केलेल्या देणग्यांमुळे ते विरोधकांच्या टीकेचे लक्ष्य झाले होते. राज्यपालांनी अंतुले यांना मुख्यमंत्री पदावरून दूर करावे म्हणून विरोधी आमदारांचे शिष्टमंडळ ४ सप्टेंबर १९८१ रोजी राज्यपालांना भेटले होते. तर त्याआधी १ सप्टेंबर रोजी विधिमंडळ काँग्रेस पक्षाने अंतुले यांच्यावर विश्वास व्यक्त करणारा ठराव

एचबी ११८०—९

मंजूर केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर ९ सप्टेंबरला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत प्रतिभा प्रतिष्ठानच्या निधी संकलनावर वादळी चर्चा झाली. अंतुले यांनी त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप फेटाळले. विधानपरिषदेतील चर्चेला उत्तर देताना आपल्यावरील आरोपांची सभापती गवई यांनी चौकशी करावी, त्यांचा निर्णय आपणास मान्य राहील असे सांगितले. पुढे हे प्रकरण न्यायालयात गेले आणि उच्च न्यायालयाच्या निकालानंतर अंतुले यांनी १२ जानेवारी १९८२ रोजी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१८ जुलै १९७८ रोजी पुलोद सरकार सत्तेवर आले. गवई सभापती असतानाच विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी २७ जुलै १९७८ रोजी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याबद्दलचा ठराव एकमताने मंजूर केला. परंतु ठरावाच्या विरोधात मराठवाड्यात उसळलेले आंदोलन आणि अशांत वातावरण यामुळे या नामांतर ठरावाची अंमलबजावणी लांबणीवर पडली. नामांतर ठरावाची अंमलबजावणी न झाल्यामुळे अनेक दलित संघटनांचे नेते नाराज झाले. त्यांनी या सर्व राजकीय पक्षांची भूमिका ढोंगीपणाची आहे असा आरोप केला. विधिमंडळात पुन्हा ठराव मांडण्याचे आव्हान त्यांनी दिले. त्यावर विधानपरिषदेतील ज्येष्ठ विरोधी सदस्य, ग. प्र. प्रधान यांनी नामांतराबद्दलचे अशासकीय विधेयक मांडण्याचे मान्य केले. तथापि मतदानात विधेयक नामंजूर झाले तर या प्रश्नाचे नुकसान होईल हे सुद्धा स्पष्ट केले. त्यावर दलित नेत्यांनी "विधेयक तुम्ही मागे घेऊ नका" असे निक्षून सांगितले. अशासकीय विधेयक चर्चेसाठी आले; तेव्हा सर्वांचीच नामांतराला अनुकूल भाषणे झाली. परंतु योग्यवेळीच ते करता येईल असा सूर सत्ताधारी पक्षातून उमटले. सत्ताधारी पक्षसदस्यांच्या भाषणानंतर रा. सू. गवई बोलले. त्यांनी नामांतराचे जोरदार समर्थन केले. परंतु विधेयक असंमत होऊन चालणार नाही म्हणून प्रधान यांनी ते मागे घ्यावे असे त्यांनी सुचविले. प्रधान यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी गवई यांनी प्रधान यांच्या आसनाशेजारी बैठक मारली. त्यांच्या या बैठ्या सत्याग्रहामुळे सभागृहात खळबळ उडाली. तथापि प्रधान यांनी विधेयक मागे घेण्यास नकार दिला. त्यावर गवई ताडकन उभे राहून म्हणाले की, प्रधान यांनी सभागृहातील सदस्यांच्या मताला मान द्यावा. बाहेरच्या चळवळीचा येथे संबंध नाही. परंतु विधेयक मागे घेण्याचे प्रधान यांनी नाकारले. तेव्हा विधेयकावर मतदान होऊन ते फेटाळले गेले. त्यावर गवई यांनी कपाळाला हात लावला आणि "प्रधान, तू हे करायला नको होते" असे उद्‌गार हताश भावनेने काढले. प्रधान यांचे अशासकीय विधेयक तेव्हा नामंजूर झाले. तथापि, नामांतर प्रस्तावाचा वनवास शरद पवार पुन्हा मुख्यमंत्री असतानाच जानेवारी १९९४ मध्ये संपला आणि प्रस्तावाच्या अंमलबजावणीचा अध्यादेश जारी झाला. तथापि त्यासाठी समेटाचा मार्ग म्हणून नांदेड येथे आणखी एक विद्यापीठ स्थापन करून त्याला स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव देण्याची सूचना स्वीकारण्यात आली तसेच नामांतराऐवजी नामविस्ताराचा पर्याय मंजूर करण्यात आला.

गवई यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे दलित समाजाच्या समस्यांचे निराकरण करून घेण्यावरच न थांबता दलित आणि दलितेतर समाजाचा स्तर उंचावून सर्वांचीच प्रगती होऊन कल्याणकारी राज्याचे स्वप्न साकार व्हावे, यासाठी ते प्रयत्नशील राहिले. कुटुंबनियोजन हा राष्ट्रीय प्रश्न आहे. सभापती म्हणून या प्रश्नी लक्ष घालून त्यांनी विधिमंडळातील सर्व राजकीय पक्षांना सहभागी केले आणि कुटुंब नियोजनावर लोकसभेच्या सहकार्याने राष्ट्रीय परिषदा आयोजित केल्या. कुष्ठरोग निवारणाच्या कार्याबद्दल त्यांना कुष्ठमित्र पुरस्कार मिळाला. अमरावती येथे जानेवारी १९८९ मध्ये झालेल्या ६२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. नागपूर येथील पाली भाषा प्रचार समिती, त्याचप्रमाणे धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक मंडळाची उप समिती यांचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी मोलाचे योगदान

दिले. १९८२ मध्ये विधानपरिषदेच्या सभापतीपदावरून निवृत्त झाल्यानंतर पुढील १२ वर्षे ते विधानपरिषदेचे सदस्य राहिले. या कालावधीत १२ डिसेंबर १९८६ ते २० डिसेंबर १९८८ पर्यंत दोन वर्षे आणि त्यानंतर २० डिसेंबर १९९० पासून सहा महिने त्यांनी विरोधी पक्षनेते पद भूषविले. जागरूक विरोधी सदस्य आणि विरोधी पक्षनेता या भूमिकेतून सभागृहावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा त्यांनी उमटविला.

गवई यांची सभापतीपदी फेरनिवड होण्याचा मार्ग काँग्रेस पक्षाने १७ सप्टेंबर १९८२ रोजी सभापती आणि उप सभापती निवडणुकीसाठी खुल्या मतदानाची शिफारस करणारा नियम समितीचा अहवाल सादर करून बंद केला. त्याआधी मतपेटीत मतपत्रिका टाकून सभापती, उप सभापती निवडण्याची पद्धती होती. खुल्या मतदान पद्धतीत गवई यांची अपक्ष उमेदवार म्हणून सभापतीपदी फेरनिवड होणे अवघड होते. नियम समितीचा अहवाल सभागृहाने स्वीकारल्यानंतर २३ सप्टेंबर १९८२ रोजी नव्या पद्धतीनुसार सभापतीची निवडणूक होऊन काँग्रेसचे जयंतराव टिळक यांची सभापती म्हणून बिनविरोध निवड झाली.

मंडल आयोगाच्या अहवालावर ७ डिसेंबर १९८३ रोजी विधानपरिषदेत झालेल्या चर्चेत हा संपूर्ण अहवाल सरकारने स्वीकारावा म्हणून रा. सू. गवई यांनी उप सूचना मांडली होती. तथापि, समाजकल्याण मंत्री प्रतिभाताई पाटील यांच्या आश्वासनानंतर त्यांनी ती मागे घेतली. अहवालावर अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सभासदांनी व्यक्त केलेली मते सरकार विचारात घेईल असे हे आश्वासन होते. उप सूचना मताला टाकण्यासाठी आपण आग्रही नव्हतो. सभागृहाने अहवालाचा गांभीर्याने विचार करावा हा हेतू उप सूचना मांडण्यामागे होता असे गवई यांनी स्पष्ट केले. पुढे पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांनी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचा निर्णय घेतल्यानंतर देशात झालेले परिवर्तन सर्वपरिचित आहे.

-ज्येष्ठ पत्रकार.

❑❑

माझा एक लाल पृथ्वीचं मोल

दादांचा जन्म झाला तो दिवस लक्ष्मीपूजनाचा होता. सूर्यभानजी गवई यांचे घरी एक रत्नाचा जन्म झाला. या खुशीत गवई कुटुंबाचे त्या वेळेचे स्नेही बेथारीया यांनी बंदुकीचे बार हवेत उडवून आपला आनंद व्यक्त केला. पुढे रामकृष्णाचे प्राथमिक शिक्षण खोलापूर येथे झाले. पूर्णा नदीचे पात्र ओलांडून जाणे येणे करावे लागत असे. तासन्‌तास नदीच्या काठावर उभे राहून सूर्यभानजी रामकृष्ण शाळेतून परत येण्याची वाट पाहत. रामकृष्णाने खूप शिकावं, खूप मोठ व्हावं. याकरिता सूर्यभानजी नेहमी धडपडत. एक दिवस छोट्या रामकृष्णाला घेऊन ते मूर्तिजापूरला गेले. उद्देश हा की गाडगेबाबांचा आशीर्वाद मुलाला लाभावा. छोट्या रामकृष्णाला त्यांनी गाडगेबाबांच्या पुढ्यात ठेवले. बाबांनी सुद्धा रामकृष्णाची विचारपूस केली. डोक्यावर हात ठेवला व काही काळाकरिता स्वतःजवळ ठेवून घेतले. दरम्यान शिष्यांनी आणलेले अन्न स्वतःच्या पात्रावर रामकृष्णास बसवून जेवू घातले. बाबांनी कांदा फोडून अर्धा रामकृष्णाला दिला व नंतर स्वतःचे गाडग्यातील पाणी रामकृष्णाला प्यायला दिले. सूर्यभानजी दुरून हे सर्व पाहत होते. गाडगे महाराजांचा आशीर्वाद घेऊन वडील दारापूरला परत आले.

-सौ. सुभद्रा तायडे
अमरावती.

एचबी ११८०—९अ

मऊ मेणाहुनी, आम्ही भीमदास...

▪ ल. त्र्यं. जोशी

पाहता पाहता दादासाहेब गवई यांच्या महानिर्वाणाला एक वर्ष होऊन गेलं. एक वर्षापूर्वीचा तो दिवस आजही आठवतो. त्यावेळी दादासाहेबांना नागपुरातील श्रीकृष्ण रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. कमलताई त्यांच्या उशाशीच चिंताग्रस्त चेहऱ्याने बसल्या होत्या. न्या. भूषण गवई दादासाहेबांच्या कक्षासमोरच उभे राहून जमलेल्या कार्यकर्त्यांना धीर देत होते. मी कक्षात गेलो. जीवनरक्षक उपकरणे लावलेल्या दादासाहेबांकडे पाहिले. कमलताईंना म्हणालो, दादासाहेब यातून लवकरच बाहेर पडतील. काळजी करू नका. कमलताईंनीही मानेने होकार देऊन आपला आत्मविश्वास प्रकट केला. रुग्णालयाच्या बाहेर दादासाहेबांची सावली असलेले सुटे साहेब भेटले. तेही कार्यकर्त्यांना समजावत होते. दादासाहेब अशा अवस्थेतून जाण्याची ही काही पहिलीच वेळ नव्हती. पण पूर्वीच्या प्रत्येक वेळी काळाला शिताफीने चुकांडी देऊन ते आप्तेष्टांमध्ये परत येत होते. पण दुर्दैव असे की, यावेळी तो शिवाशिवीचा खेळ संपणार होता. दादासाहेब आपल्या कोट्यवधी चाहत्यांना दु:खसागरात बुडवून निजधामाला निघाले होते. नियतीनेही त्यांच्या महाप्रयाणाला जणू काही हिरवी झेंडी दाखविली होती आणि ती काळवार्ता आली. दादासाहेब गवई यांचे महानिर्वाण. नागपूरहून निघालेले त्यांचे पार्थिव अमरावती या कर्मभूमीमार्गे दारापूर या जन्मभूमीकडे गेले. अक्षरश: लाखो चाहत्यांनी त्यांना अश्रुपूर्ण निरोप दिला. नियतीला दादासाहेबांचे पार्थिव नेता आले पण त्यांच्या स्मृती सोबत नेणे तिच्यासाठीही अशक्य होते. कारण त्या स्मृतींचा कायम मुक्काम दादासाहेबांच्या चाहत्यांच्या अंत:करणात होता. त्या पुसून टाकणे कुणालाही शक्य नव्हते आणि पुढेही शक्य होणार नाही.

दादासाहेबांच्या व्यक्तित्वाचे यथार्थ वर्णन करायचे झाल्यास संत तुकोबांच्या एका अभंग ओळीचा आधार घेता येईल. त्यात फक्त एक शब्द बदलावा लागेल.

मऊ मेणाहुनी आम्ही भीमदास
कठिण वज्रास भेदू ऐसे

एवढे म्हटले की, कुणाचाही मन:चक्षुसमोर दादासाहेब गवई वनपीस उभे राहतील. त्यांचं व्यक्तिमत्त्व तसं होतं. सार्वजनिक जीवनात वावरतांना त्यांचा हसतमुख चेहरा कुणीही विसरू शकत नाही. कार्यकर्ता मग तो कोणत्याही पक्षाचा आणि विचाराचा असला तरी दादासाहेब त्याची हसतमुखानेच वास्तपुस्त करीत असत. त्याचं काम समजावून घेत असत. आणि त्याला दिलासा द्यायला विसरत नसत. पण ही काही औपचारिकता नव्हती. तो त्यांचा स्वभावच होता. त्या कामाचे स्वरूप समजावून घेऊन ते कुठे होऊ शकते, त्यात कोणत्या अडचणी येऊ शकतात. त्यांचं निराकरण कसं करायचं, याचा रोडमॅप ते तयार करीत आणि ते काम तर्कसंगत शेवटाला जाईल याची काळजी घेत. सर्वच कामे होत नव्हती. त्यातील काही अशक्य होती. पण आपल्या कामासाठी दादासाहेबांनी कसोशीने प्रयत्न केले याबद्दल संबंधितांच्या मनात यत्किंचितही शंका निर्माण होत नव्हती. दादासाहेबांच्या या वृत्तीमुळे त्यांनी अक्षरश: असंख्य माणसे जोडली. 'जोडोनिया धन उत्तम वेवहारे' या अभंगपंक्तीत 'धन' ऐवजी 'माणसे' असा शब्द टाकला की, त्याचे जे उत्तर येईल ते 'दादासाहेबच' असे हमखास येत असे.

दादासाहेबांशी माझा संबंध कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या महानिर्वाणानंतरच आला. त्यावेळी मी हंसराज गजभिये यांच्या मैत्रीमुळे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्याकडे झुकलो होतो. त्याचे कारणही तसेच होते. एक तर बॅरिस्टरसाहेब हे दिलदार व्यक्तित्व होते. राजा माणूस म्हणून त्यांचे वर्णन केले, तर ती अतिशयोक्ती ठरू नये. शिवाय दादासाहेब

गायकवाड यांच्यानंतर पक्षाचे नेतृत्व त्यांच्याकडे स्वाभाविकपणे यायला हवे असे मला वाटत असे. कारण राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून आणि पक्षाचे सरचिटणीस म्हणून राष्ट्रीय राजकारणाचा त्यांना दीर्घ अनुभव होता. त्यांच्या तुलनेत दादासाहेब ज्युनिअर आहेत असे मला वाटत असे. पण पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीचे आणि त्यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून जेव्हा त्यांचा संबंध आला तेव्हा दादासाहेबांच्या अंगी असलेल्या नेतृत्वगुणांचा मला प्रत्यय आला. बॅ. खोब्रागडे यांच्या करड्या नेतृत्वाप्रमाणेच दादासाहेब गवई यांच्या लोभस व्यक्तिमत्त्वामुळे मी प्रभावित झालो आणि त्यांच्याशी त्या काळात जुळलेला संबंध अखेरपर्यंत कायम राहिला.

दादासाहेब स्वभावाने गोड असले तरी त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या धोरणाबाबत कधीच तडजोड केली नाही. या पक्षाचे ध्येयधोरण अगदी स्पष्ट होते. दलितांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठीच पक्षाची स्थापना झाल्याने पक्षाच्या ध्येयधोरणावर वेगळी चर्चा करण्याची गरज पडली नाही. फक्त समस्यांचा अभ्यास करण्यासाठी व त्या सरकारच्या गळी उतरविण्यासाठी प्रयत्न करणे तेवढे बाकी होते. ते काम दादासाहेबांनी प्रारंभापासूनच केले. दादासाहेब गायकवाड अध्यक्ष असताना त्यांनी भूमिहिनांच्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. दलितांना कसण्यासाठी जमिनी मिळाल्या पाहिजेत हे त्या आंदोलनाचे सूत्र होते आणि त्यासाठी विदर्भात करावयाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी गवई साहेबांकडे सोपविले होते. त्यावेळी गवई साहेबांनी विदर्भभर झंझावती दौरे करून लाखो दलितांना सत्याग्रहात उतरविले होते. एकदा त्यावेळी नेतृत्वाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर दादासाहेबांनी कधी मागे वळून पाहिलेच नाही.

दलितांना मिळणाऱ्या सवलतींबाबत समाजात अनेक गैरसमज आहेत. त्याबाबत तर्कशुद्ध युक्तिवाद करावा तो दादासाहेबांनीच. मी एकदा त्यांना विचारले की, दलित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणात प्रवेश मिळविण्यासाठी कमी टक्केवारी चालते. हा इतर विद्यार्थ्यांवर अन्याय नाही काय? त्यावेळी दादासाहेबांनी शांतपणे दिलेले उत्तर मी आता तसा प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना देत असतो. दादासाहेब म्हणाले, 'दलित विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी टक्केवारीत सवलत असेलही पण इतर विद्यार्थ्यांसाठी उत्तीर्ण होण्यासाठी जे निकष आहेत त्याच निकषांमधून दलित विद्यार्थ्यांनाही जावेच लागते ना? तिथे त्यांना कोणतीही सवलत नाही. त्यामुळे कुणावर अन्याय होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.' दादासाहेब या पद्धतीने तर्काच्या आधारावर आपला मुद्दा पटवून देत असत.

विधानपरिषदेचे उप सभापतीपद, सभापतीपद, विरोधी पक्षनेतेपद, राज्यसभा आणि लोकसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहांचे खासदारपद आणि राज्यपालपद या सर्व भूमिका पार पाडणारे दादासाहेब एकमेव राजकीय नेते आहेत. त्यातही वेगळेपण असे की, विधानसभेत त्यांच्या पक्षाचा एकही आमदार नसताना ते विधानसभेतून परिषदेवर निवडून जात असत. यातूनच त्यांचे अजातशत्रुत्व सिद्ध होते. दादासाहेब उप सभापती असताना त्यावेळचे मंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांचे वडखळ नाका प्रकरण उद्‌भवले होते. बॅ. अंतुले हे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन मतदारसंघातून निवडून येत असले तरी त्यांना तो जिल्हा बालेकिल्ला असलेल्या शेतकरी कामगार पक्षाशी जबर संघर्ष करावा लागत असे. फौजदारी वकिलीत निष्णात असलेले दत्ता पाटील यांच्याशी त्यांचा सामना होता. विरोधक वडखळ प्रकरणाचा संबंध स्मगलिंगशी जोडून अंतुले यांना स्मगलरांच्या वर्गात घुसवण्याचा प्रयत्न करीत असताना विधानपरिषदेने दादासाहेबांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. त्या समितीचे नेतृत्व दादासाहेबांकडे होते. त्या चौकशीचा निष्कर्ष काय होता हा प्रश्न वेगळा पण सर्व पक्षांचा दादासाहेबांवर किती विश्वास होता हे यावरून स्पष्ट होते. त्यांच्या अहवालाबाबत कुणीही नाराजी व्यक्त करू शकले नाही. दादासाहेबांमधील त्या नीरक्षीरन्यायाचा वसा आज त्यांचे सुपुत्र न्या. भूषणजी गवई चालवित आहेत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

रिपब्लिकन अनुयायांमध्ये दादासाहेब हे लोकनेते नाहीत, अशी भावना होती. त्याचे कारणही तसेच होते. कारण नागपूर व पूर्व विदर्भ हा बॅ. खोब्रागडे यांचा बालेकिल्ला मानला जात असे. तेथे ही भावना असली, तर ती स्वाभाविकच होती. पण वऱ्हाडच्या चार जिल्ह्यात मात्र दादासाहेबच लोकनेते होते. कारण त्यांचा त्या भागातील तळागाळातील कार्यकर्त्यांशी संबंध होता. मूर्तिजापूर येथे कमलताईंशी त्यांचा विवाह झाला त्यावेळी संपूर्ण वऱ्हाडातून हजारो कार्यकर्ते आपली शिदोरी घेऊन त्यांच्या लग्नाला उपस्थित होते. ते लग्न नव्हे तर रिपब्लिकन पक्षाचे जणू अधिवेशनच होते, हे कमलताईंनी आपल्या विवाह समारंभाचे केलेले वर्णन म्हणूनच यथार्थ वाटते. सामान्यत: कोणत्याही पक्षाशी युती झाली तर रिपब्लिकन नेत्यांना राखीव मतदारसंघातून लढण्यास सांगितले जात असे. पण दादासाहेब गवई हे असे रिपब्लिकन नेते होते ज्यांनी १९८९ मधील लोकसभा निवडणूक अमरावती या खुल्या मतदारसंघातून लढविली आणि जिंकलीही.

जातिभेद आणि अस्पृश्यता यांचे दाहक चटके बसल्यामुळे दादासाहेबांच्या त्या संदर्भातील भावना अतिशय तीव्र होत्या. जातिभेद निर्मूलन झालेच पाहिजे असे त्यांनी म्हणणे त्या पार्श्वभूमीवर अतिशय स्वाभाविक होते. म्हणूनच ते त्यावर जालीम उपाय सुचवायला मागेपुढे पाहत नसत. त्यांचा स्पष्ट विचार होता की, जोपर्यंत आपण सजातीय विवाह अवैध ठरवणार नाही तोपर्यंत जातिभेदांचे निर्मूलन होणे शक्य नाही. आपले हे म्हणणे फार थोड्या लोकांना पटेल हे त्यांना ठाऊक होते पण समस्या जेवढी तीव्र तेवढीच तिच्यावरील उपाययोजनाही तीव्र असायला पाहिजे या ठाम मताचे ते होते.

विधानपरिषदेचे सदस्य या नात्याने दादासाहेब त्या सभागृहासमोर येणाऱ्या कामकाजात अहमहमिकेने सहभागी होत असतच. विरोधी पक्षनेते असतांना तर कर्तव्य म्हणूनच त्यांना विविध चर्चांमध्ये सहभागी व्हावे लागत होते. पण विधानपरिषदेचे उप सभापती असतांनाही अर्थसंकल्पांवरील चर्चेपासून तर नियम ९३ नुसार होणाऱ्या चर्चेतही ते मनापासून सहभागी होत असत आणि त्या चर्चांवर आपला प्रभावही पाडत असत. कारण विषय मांडण्यासाठी व्यापक जनसंपर्कातून विविध प्रकारची माहिती त्यांच्याजवळ गोळा झालेली असे. अशा माहितीचा ते आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी वापर करीत असत. लोकसभा व राज्यसभेतही सभागृहांचे अध्यक्ष त्यांच्या मुद्यांची गंभीरपणे दखल घेत असत. सांसदीय कामाचा जेवढा अनुभव दादासाहेबांजवळ होता तेवढा तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्माननीय अपवाद वगळता इतर कोणत्याही दलित नेत्याजवळ नसेल, एवढे त्यांचे सांसदीय कर्तृत्व महान होते.

शासकीय सेवेतील दलित कर्मचारी व अधिकारी यांना दादासाहेबांचा फार मोठा आधार होता. दलितांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण असले तरी त्यांना ते मिळू नये यासाठी नोकरशाहीत झारीतले अनेक शुक्राचार्य टपूनच होते. त्यांचा सरकारी नोकरीत प्रवेश होणार नाही. झाला तरी तो सहजासहजी होणार नाही, बढतींच्या संधी तर विविध नियमांवर बोट ठेवून नाकारायच्या यासाठी ही शुक्राचार्य मंडळी प्रयत्नशील होती. तिच्या अडथळ्यांमुळे त्रस्त होणारे कर्मचारी स्वाभाविकपणेच दादासाहेबांकडे धाव घेत. दादासाहेबांनी त्यांना कधीही निराश केले नाही. पक्षकार्यासाठी दादासाहेब जेव्हा दौऱ्यावर जात तेव्हा ते सर्व कर्मचारी दादासाहेबांना आवर्जून भेटत व आपली कृतज्ञता प्रकट करीत असत.

अनुसूचित जाती जमातीच्या तरुणांना शासकीय सेवेत आरक्षण असले तरी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली झालेल्या धम्मचक्र प्रवर्तनानंतर त्या आरक्षणापासून नवबौद्धांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न झाला होता. धर्मांतरित नवबौद्ध आता हिंदू धर्मात राहिलेले नसल्यामुळे त्यांना त्या सवलती लागू होऊ शकत नाहीत, असा युक्तिवाद त्यासाठी केला जात असे. पण दादासाहेबांनी या विषयाचा सखोल अभ्यास करून नवबौद्ध हे पूर्वीप्रमाणेच या सवलतींसाठी पात्र आहेत, हे अतिशय

प्रभावीपणे सिद्ध केले. नवबौद्धांनी धर्मांतर केले असले तरी त्यांच्या सामाजिक स्तरात कोणतेही परिवर्तन आले नाही. आजही त्यांची सामाजिक उपेक्षाच होत आहे. आर्थिक परिस्थितीचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही, हे त्यांनी परिश्रमपूर्वक एखाद्या कायदेतज्ज्ञाला साजेल अशा पद्धतीने सरकारच्या गळी उतरविले व तशी कायदेशीर व्यवस्था निर्माण झाल्यानंतरच स्वस्थ बसले. नवबौद्ध बांधवांवर दादासाहेबांचे हे फार मोठे उपकार असले तरी दादासाहेबांनी या विषयाकडे उपकाराच्या भावनेने नव्हे तर कर्तव्यपूर्तीच्या भावनेनेच पाहिले.

रोजगार हमी योजना आणि एकाधिकार कापूस योजना हे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासातील दोन महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यात दादासाहेबांचे योगदान नसणे शक्यच नव्हते. रोजगार हमी योजना हे तर दादासाहेबांचे संसदीय कारकिर्दीतील गुरू स्व. वि. स. पागे यांचे अपत्य. पागे योजना म्हणून प्रारंभी ती त्यांच्याच नावाने ओळखली जायची. दादासाहेबांनी तिचा सखोल अभ्यास केला आणि ती संपूर्ण महाराष्ट्राला लागू व्हावी म्हणून पुढाकार घेतला. सामान्यतः कोणत्याही नव्या विकासयोजनेचे श्रेय अपरिहार्यपणे सरकारकडे जाते. पण रोजगार हमी योजना ही अशी योजना आहे की, दादासाहेबांच्या पुढाकारामुळे ती संपूर्ण महाराष्ट्राची सर्वमान्य योजना बनली. त्या योजनेच्या धर्तीवरच संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारला ती देशपातळीवर लागू करण्याची बुद्धी व्हावी आणि तिला महात्मा गांधींचे नाव देण्याची प्रेरणा व्हावी ही दादासाहेबांची दूरदृष्टी आणि गरिबांप्रती तळमळ यांचे प्रतीक ठरली आहे.

एकाधिकार कापूस खरेदी योजना हे खरे तर स्व. यशवंतराव मोहिते यांचे अपत्य. त्या योजनेचे महत्त्व सांगण्यासाठी यशवंतरावांनी विधानसभेच्या नागपूर अधिवेशनात ३२ तासांच्या भाषणाचा विक्रम केला होता. कापूस ते कापड असे त्या योजनेचे स्वरूप होते आणि आजही ती योजना कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या विस्मरणात गेली नाही. कापूस उत्पादक प्रदेशातील नेते या नात्याने दादासाहेबांनीही त्या योजनेला आकार देतांना व नंतर अंमलबजावणी काळात तिचा पाठपुरावा केला. ती यशस्वी कशी होईल यासाठी प्रयत्न केले होते. कारण तिचा तेवढा सखोल अभ्यास त्यांनी केला होता. ती योजना विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या गळी उतरविण्यातही दादासाहेबांचे योगदान अतिशय मोलाचे होते. आजही विधानपरिषदेच्या भाषणांच्या रेकॉर्डमध्ये त्याचे पुरावे सापडू शकतील. रोजगार हमी योजना, दुष्काळनिवारण, सिंचन व्यवस्था, कापूस योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसह अन्य शैक्षणिक समस्या आणि दलित कर्मचाऱ्यांचे नियुक्तीपासून तर बढतीपर्यंतचे प्रश्न यावर दादासाहेब सभागृहात कधी बोलले नाहीत, असे घडलेच नाही. त्यातून त्यांचा सामान्यांच्या समस्यांचा सखोल अभ्यास तर दिसतच होता पण त्यापेक्षा अधिक सामान्य आणि उपेक्षित माणसांविषयीची कळकळ प्रकर्षाने जाणवत होती.

दादासाहेबांच्या महानिर्वाणानंतर आता त्यांच्या स्मारकाचा विषय कदाचित समोर येईल. पण त्यांनी उपेक्षित माणसांच्या अंतःकरणात असे स्थान निर्माण केले आहे की, त्यांचा कुणालाही विसर पडूच शकत नाही. तरीही त्यांच्या स्मारकाचा जेव्हा विचार होईल तेव्हा नागपूरच्या दीक्षाभूमीवर उभे केलेले भव्य शिक्षण संकुल आणि जागतिक कीर्तीचा विशाल स्तूप हेच त्यांचे स्मारक होय असा विचार मांडला जाईल व अन्य प्रकाराने त्यांचे स्मारक उभारण्याचा विचार होईल. दीक्षाभूमीचा आज जो विकास दिसतो त्याचे शिल्पकार दादासाहेबच आहेत. बौद्ध धर्मावर त्यांची विलक्षण श्रद्धा होती. ती डोळस श्रद्धा होती नव्हे क्रियाशील श्रद्धा होती. त्यांनी स्वतः डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्याकडून श्रामणेरपदाची दीक्षा घेतली होती व तिचे पुरेपूर पालनही ते करीत असत. दीक्षाभूमीवर विशाल स्तूप उभारणे हे सोपे काम नव्हते. एक तर त्याचे डिझाईन तयार करणे हे एक आव्हान होते. दादासाहेबांनी त्यासाठी नागपूरचे सुप्रसिद्ध आर्किटेक्ट शिवदानमल यांची मदत घेतली. डिझाईन तयार करणे हे जसे आव्हान होते, त्यापेक्षा मोठे आव्हान होते

निधीची जुळवाजुळव. त्यासाठी दादासाहेबांनी केलेल्या प्रयत्नांना तर तोडच नाही. दीक्षाभूमीवर दरवर्षी अशोक विजया दशमीला होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहोळ्यासाठी ते अशा महनीय व्यक्तीला निमंत्रित करीत की, स्तूप पाहिल्यानंतर त्याला त्या कार्यात आपले योगदान असावे असे अपरिहार्यपणे वाटत असे व दादासाहेबांनी न मागताही देणगीचा मोठा आकडा त्याच्या मुखातून बाहेर पडत असे. अर्थातच दादासाहेबांना त्या देणगीचे जेवढे महत्त्व होते तेवढेच बाबासाहेबांच्या लेकरांच्या अल्पस्वल्प देणगीचेही तेवढेच महत्त्व होते. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहाळ्यात सहभागी होणारे लाखो बौद्ध बांधव दादासाहेबांची झोळी भरून टाकत असत. दादासाहेबांचे भाग्य असे की, त्यांचे नियोजन साकार करणारे सदानंद फुलझेले आणि वासुदेवराव गाणार यांच्यासारखे अक्षरश: जिवाला जीव देणारे सहकारी त्यांना मिळाले. दीक्षाभूमी विकास योजनेच्या पायातील दगड म्हणून त्या दोघांचा उल्लेख केला तर ते अतिशय समर्पक ठरेल. त्या दोघांचे भाग्य असे की, दादासाहेबांसारखे मार्गदर्शक त्यांना मिळाले.

दीक्षाभूमीचा विषय आलाच आहे म्हणून एका अनुभवाची आठवण आली. दीक्षाभूमीवर धर्मप्रचाराची व्यवस्था असावी या उद्देशानेच डॉ. आंबेडकर स्मारक समितीने सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षु डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांना निमंत्रित केले होते. त्यांनी तेथे धम्मसाधना करावी. भाविकांना बौद्धधर्माचे महत्त्व पटवून द्यावे अशी अपेक्षा होती. प्रारंभीच्या काळात त्यांनी ती पूर्णही केली. पण कालांतराने ते दादासाहेबांच्या राजकीय विरोधकांच्या दिशाभुलीस बळी पडले. त्यांनी स्मारक समितीच्या कार्यात ढवळाढवळ तर सुरू केलीच शिवाय पदाधिकाऱ्यांची निंदानालस्ती करण्यातही धन्यता मानली. त्यांना तेथून कसे हुसकून लावावे, ही मोठीच समस्या बनली होती. कारण त्यांच्यावर श्रद्धा ठेवणारीही बरीच मंडळी होती. यावेळी दादासाहेबांचे दोन खंदे समर्थक सदानंद फुलझेले व वासुदेवराव गाणार पुढे आले आणि त्यांनी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांची समस्या अशा पद्धतीने मिटविली की, त्यामुळे दादासाहेबांच्या डोक्यावरील चिंतेचे ओझे अलगद उतरून गेले.

दादासाहेब गवई यांना आपल्या राजकीय व प्रशासकीय कारकिर्दीमध्ये तीन राज्यांच्या राज्यपालपदाची जबाबदारी सांभाळावी लागली व ती त्यांनी त्यांच्या पदास आणि नि:स्पृह बाण्यास साजेल अशा रीतीनेच पार पाडली. जून २००६ मध्ये त्यांची बिहारचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. त्याबरोबरच काही काळपर्यंत त्यांना सिक्कीमचे कार्यवाहक राज्यपाल म्हणूनही जबाबदारी पार पाडावी लागली. १० जुलै २००८ रोजी त्यांच्याकडे केरळचे राज्यपाल म्हणून दायित्व आले. आपल्या घटनेत राज्याचा कारभार राज्यपालांच्या नावाने चालत असला तरी त्यांना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच कारभार सांभाळावा लागतो. फक्त राज्यपाल हे राज्यातील विद्यापीठांचे पदसिद्ध कुलपती असल्याने त्यांना विद्यापीठांच्या कारभारावर बऱ्यापैकी नियंत्रण ठेवता येते. केरळचे राज्यपाल म्हणून जबाबदारी पार पाडतांना दादासाहेब विविध विद्यापीठांच्या समारंभांना उपस्थित राहून मार्गदर्शन करीत असत. पण त्यांची केरळच्या राज्यपालपदाची कारकीर्द एका वेगळ्याच प्रकरणाने गाजली व त्यात दादासाहेबांचा निष्पक्षपणा पुन्हा एकदा तावून सुलाखून निघाला. त्याचे असे झाले की, त्यांच्या राज्यपालपदाच्या कारकिर्दीवेळी केरळात डाव्या आघाडीचे सरकार होते व ज्येष्ठ माकपा नेते व्ही. एस. अच्युतनंदन हे मुख्यमंत्री होते. योगायोग असा की, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दोन नेत्यातील संघर्षात दादासाहेबांना निवाडा करावा लागला व तो त्यांनी त्यांच्या कीर्तीस साजेशा पद्धतीने केला.

त्याचे असे झाले की, अच्युतानंदन यांच्या मंत्रिमंडळात माकपाचे राज्य सरचिटणीस पी. विजयन हे ऊर्जामंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात एसएनजी लवलीन प्रकरण नावाचे भ्रष्टाचाराचे एक प्रकरण गाजले. विजयन यांच्यावर असा आरोप होता की, त्यांनी कॅनडामधील एका कंपनीला सुमारे ४०० कोटी रुपयांचे साहित्य खरेदीचे कंत्राट दिले व त्यात त्यांनी भ्रष्टाचार केला. स्वाभाविकपणे त्याच्या सी.बी.आय. चौकशीची मागणी समोर आली.

गंमत अशी की, माकपातील अंतर्गत गटबाजीमुळे मुख्यमंत्री सी.बी.आय. चौकशीस तयार होते. पण कॅबिनेटमधील माकपा मंत्र्यांना सी.बी.आय. चौकशी नको होती. प्रकरण प्रथम राज्याचे ॲडव्होकेट जनरल सुधाकर प्रसाद यांच्याकडे शिफारसीसाठी गेले. प्रसाद यांनी सी.बी.आय. चौकशीची गरज नसल्याचा अभिप्राय व्यक्त केला. पण सी.बी.आय.ने मात्र ॲडव्होकेट जनरलांनी शिफारसीचा पुनर्विचार करावा असे सुचविले. प्रकरणात आपल्याजवळ पुरेसे पुरावे आहेत असा उल्लेखही आपल्या निवेदनात केला. साहजिकच हा विषय राज्यपाल या नात्याने दादासाहेबांकडे गेला. त्यावेळी चौकशीची गरज नाही या ॲडव्होकेट जनरलच्या शिफारसीच्या विरोधात जाऊन दादासाहेबांनी सी.बी.आय. चौकशीला परवानगी दिली. सामान्यतः राज्यपाल ॲडव्होकेट जनरलच्या सल्ल्याच्या विरोधात जात नाहीत. पण दादासाहेबांनी मात्र ते धाडस केले. कारण त्यांना भ्रष्टाचारमुक्त प्रशासन हवे होते.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या चळवळीतील दादासाहेबांच्या योगदानाचा कुणालाही विसर पडू शकणार नाही. हे आंदोलन दोन आघाड्यांवर सुरू होते. एक आघाडी रस्त्यावर उतरून प्रत्यक्ष कृती करण्याची म्हणजे धरणे, मोर्चे, लॉंगमार्चसारखे कार्यक्रम तर दुसरी होती मुत्सद्देगिरीची, दादासाहेब दोन्ही आघाड्यांवर सक्रिय होतेच पण त्यांनी त्यापैकी मुत्सद्देगिरीची आघाडी अतिशय समर्थपणे सांभाळली. महाराष्ट्र विधानसभेत नामांतराचा पहिला ठराव एकमुखाने संमत झाल्यानंतर मराठवाड्यात दलित वस्त्यांवर अक्षरशः आक्रमणच झाले होते. हाणामारी, जाळपोळ यामुळे दलित बांधवांची स्थिती अतिशय दयनीय झाली होती. लाखो लोक बेघर झाले होते. त्यांना निवारा तर गमावावा लागलाच शिवाय त्यांची रोजगाराची साधनेही हिरावली गेली होती. अनेकांवर निर्वासिताचे जीणे जगण्याची पाळी आली होती. सामाजिक बहिष्काराला तोंड देण्याचा प्रसंग आला. अशा वेळी दादासाहेबच त्यांच्या हाकेची वाट न पाहता मराठवाड्यात पोचले. योगायोग असा की, त्याच वेळी मीही तरुण भारतचा वार्ताहर या नात्याने मराठवाड्यातील घटनांचे वृत्तसंकलन करण्यासाठी पोचलो होतो. त्यावेळी मला दादासाहेबांसमवेत अत्याचारग्रस्त बांधवांच्या स्थितीची माहिती मिळविता आली. दादासाहेबांचा ताफा त्यावेळी सकाळीच औरंगाबादवरून बाहेर पडत असे. तिकडे लोक त्यांची वाट पाहत असत. दलित वस्तीत किंवा आपत्तीनिवारण शिबिरात पोचताच ते लोकांच्या गराड्यात घेरले जात. एकेक जण त्यांना आपबिती सांगत असे त्याबरोबरच नामांतराचा निर्धारही प्रकट करीत असे. दादासाहेब प्रत्येकाचे म्हणणे शांतपणे एकूण घेत. काही वेळा तर अत्याचाराच्या कहाण्या ऐकून त्यांचे डोळेही पाणावत असत. पण त्यांनी संयम कधी सोडला नाही. त्यावेळी त्यांच्याजवळ लोकांना धीर देण्याशिवाय काहीही नव्हते. पण दादासाहेबांच्या शब्दात एवढे सामर्थ्य होते की, लोक त्यांची संयमाची भाषा समजून घेत असत. दादासाहेबांकडे दुहेरी जबाबदारी होती. एक म्हणजे आपदग्रस्तांना धीर देणे दुसरीकडे त्यांना सामाजिक अभिसरणाला धक्काही लावायचा नव्हता. एकप्रकारे ती तारेवरची कसरतच होती. अशी तारेवरची करसत दादासाहेबांनी आयुष्यभर केली. त्यासाठी त्यांनी टीकेचे घावही सोसले आणि प्रेमाचा वर्षावही नम्रपणे स्वीकारला. दादासाहेबांना जे भाग्य लाभले ते त्यांनी बहुतांची अंतरे राखली म्हणूनच, त्यामुळेच तर त्यांना अजातशत्रू उपाधी प्राप्त झाली ना? त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

-ज्येष्ठ पत्रकार.

❑❑

रसिक राजकारणी

▪ सुधीर पाठक

रा. सू. गवई यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. खासदार झाल्यामुळे भारतीय राजकारणाच्या पटलावरही काम करण्याची संधी त्यांना मिळाली. लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांत त्यांना वावरता आले. रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणानिमित्तही त्यांची प्रतिमा अखिल भारतीय स्वरूपाची झाली होती. बौद्ध महासभेच्या निमित्ताने जागतिक प्रतिमेचे ते धनी झालेत. काही गणितं जर बरोबर जुळून येती, तर दादासाहेब राज्यसभेचे अध्यक्ष म्हणजे देशाचे उप राष्ट्रपतीही झालेले बघायला मिळाले असते; पण तसा योग थोडक्यात हुकला. राजकारणात आपल्या जातीचा, दलितपणाचा उपयोग करून न घेणारा हा नेता तसा विलक्षण होता, विरळाच होता. कुणालाही हेवा वाटावा अशी देखणी रूपसंपदा त्यांना लाभली होती. तामिळ अभिनेता शिवाजी गणेशन यांच्यासारखे त्यांचे व्यक्तिमत्त्व देखणे होते. अभिजात रसिकता त्यांच्या अंगी होती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मिठ्ठास वाणी त्यांना लाभली होती. हिंदी, इंग्रजी या भाषांवर प्रभुत्व होते आणि मराठी ही तर त्यांची मातृभाषाच होती. त्यातही प्रावीण्य होते. या सर्वांच्या जोडीला एक आगळीवेगळी विलक्षण राजकीय जाण त्यांना होती.

एका अर्थाने बघायला गेले, तर दादासाहेब हे समन्वयाचे राजकारण करणारे आदर्श होते. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत ते त्यांच्या पक्षाचे एकमेव आमदार होते; पण तरीही उप सभापतीपद, सभापतीपद आणि २ वर्ष विरोधी पक्षनेतेपदही त्यांना सांभाळता आले. जवळ जवळ तीस वर्षे ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य होते. विधानपरिषद सदस्यांचा काळ ६ वर्षांचा राहतो. तो लक्षात घेता ते ५ वेळा विधानपरिषदेवर निर्वाचित झालेत. गंमत म्हणजे एकदाही ते राज्यपालांचे नामनियुक्त प्रतिनिधी नव्हते. यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते मनोहर जोशीं यापावेतोच्या सर्व मुख्यमंत्र्यांशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. (अपवाद फक्त एक) वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते त्या वेळी ३० जुलै १९६८ला ते विधानपरिषदेचे उप सभापती झालेत. ते तब्बल दहा वर्षे १९७८ पावेतो त्या पदावर होते. १५ जून १९७८ ते २२ सप्टेंबर १९८२ पावेतो ते विधानपरिषदेचे सभापती होते. त्यानंतर काही काळ ते फक्त आमदार होते. १२ डिसेंबर १९८६ ते २० डिसेंबर १९८८ पावेतो आणि नंतर २० डिसेंबर १९९० ते १७ जुलै १९९१ पावेतो ते विरोधी पक्षनेते होते आणि या सगळ्या कालावधीत ते त्यांच्या पक्षाचे एकमेव आमदार होते.

दादासाहेब जेव्हा सक्रिय राजकारणात आले, त्या वेळी भारतीय राजकारणात दलित चळवळीत नवनवीन तरुण येत होते आणि त्यांना असे वाटत होते की, आक्रमकताच नव्हे तर आग्यावेताळी वर्तन करणे, समाजाची मने दुखावतील अशी भाषा जाहीरपणाने वापरणे म्हणजेच समोरच्याला प्रखर उत्तर ! दादासाहेब मात्र कायम अशी भाषा वापरण्याच्या विरोधात होते. त्यांचे धोरण समन्वयवादी, सगळ्यांना घेऊन चालण्याचे होते. मात्र याचा अर्थ ते दलित हिताशी तडजोड करीत असत, असा मुळीच नव्हता. उलट आग्यावेताळी भाषा करणाऱ्या मंडळींपेक्षा ते जास्त कडवे होते. समाजातील कटुता वाढू देऊ नये यासाठी ते आग्रही असत. त्यामुळे दलित चळवळीत त्यांच्यावर टीकाही होत असे, पण त्याची पर्वा दादासाहेबांनी कधीच केली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. पण एका क्षणी या पक्षाने दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वात काँग्रेसधार्जिणेपण स्वीकारले.

त्यावरून दलितांच्या राजकारणात रिपब्लिकन पक्षाचे दोन भाग झालेत. ते पुढे खोरिप, गारिप या नावाने ओळखले जाऊ लागलेत. खोरिप गटाचे नेतृत्व बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्याकडे होते, तर गारिपचे नेतृत्व दादासाहेब गवई करीत असत. काँग्रेसशी जवळीक ठेवून बॅ. राजाभाऊ खोब्रागडे हे राज्यसभा सदस्य व उपाध्यक्ष झालेत. नंतर मात्र खोरिपचे राजकारण विरोधी पक्षांच्या अंगाने फुलत गेले. दादासाहेब गवई यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्षाच्या गवई गटाने मात्र कायम काँग्रेसशी आपले संधान कायम ठेवले. त्याच वेळी विरोधी पक्षातही आपल्या बद्दलचे आदराचे स्थान कायम ठेवले. विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून त्यांनी केलेले काम अतिशय लक्षणीय व प्रभावी होते. अर्जविनंती समिती मार्फत अनेक प्रश्नांची त्यांनी दाद लावून घेतली. दादासाहेब विधानपरिषदेचे सभापती असताना महाराष्ट्रात पहिल्यांदा सत्तांतर झाले. पुलोद शासन शरद पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात स्थापन झाले. अवघ्या ५ मंत्र्यांसह महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनाला शरद पवार सामोरे गेलेत.

पुलोद सरकारच्या काळात नागपूरला हिवाळी अधिवेशन झाले. या अधिवेशनात कॉमनवेल्थ पार्लमेन्टरी असोसिएशनच्या अंतर्गत महाविद्यालयांतील राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग होतो. त्या वर्गाचे उद्घाटन रा. सू. गवई यांच्या हस्ते झाले होते. त्याच दिवशी की आदल्या दिवशी विरोधी पक्षांचा विधानभवनावर मोर्चा होता. त्या मोर्चातील नेत्यांपैकी एक नेते दादासाहेब होते. पण अभ्यासवर्गाचे उद्घाटन करताना दादासाहेबांनी घेतलेली भूमिका वेगळी होती. ती भूमिका सरकारानुकूल सभापतीची होती. त्या भाषणानंतरच त्या वेळी आमदार असणारे तरुण भारतचे मुख्य संपादक मा. गो. वैद्य यांनी अग्रलेख लिहिला होता. त्यात 'कोणते गवई खरे' असा सवाल उपस्थित केला होता. तो लेख त्या वेळी खूप गाजला होता. पुढे त्या लेखावरून कुणातरी आमदारांनी श्री. वैद्यांच्या विरोधात हक्कभंगाची सूचना दिली होती. हा विषय जेव्हा सभागृहासमोर आला, तेव्हा सभापतीपदी दादासाहेब गवईच होते. सामान्यतः स्वत:संबंधी विषय येतो, त्या वेळी संबंधित व्यक्ती पदावर राहात नाही. पण दादासाहेबांनी तो प्रोटोकॉल बाजूला ठेवला. त्या विषयावर भरपूर चर्चा झाली. त्यानंतर जेव्हा निर्णय द्यायची वेळ आली, त्या वेळी दादासाहेब निर्णय देते झालेत- "हा विषय आपण खूप कायदेशीर अंगाने बघितला, तर हक्कभंग समितीकडे जाऊही शकतो. पण मला स्वत:ला असे वाटते की, आपल्या वर्तनावर, त्यातील विसंगतीवर (जर वाटत असतील तर) टीका करण्याचा अधिकार वृत्तपत्रांना व संपादकांना आहे. तो मी स्वत: मान्य करतो. त्यामुळे हा विषय इथेच संपवितो."

या घटनेनंतर पत्रकारांशी बोलताना दादासाहेब म्हणाले होते, "मी प्रोटोकॉल बाजूला सारून मुद्दाम पदावर- पीठावर कायम राहिलो, कारण मला पत्रकारांनी माझ्यावर टीका करणे मान्य होते. दुसरा कुणी सभापतीपदी असता, तर त्याने कदाचित हा विषय पक्षीय अंगाने बघून हक्कभंग समितीकडे पाठविलाही असता. मला तसे होऊ द्यायचे नव्हते, म्हणूनच मी सभागृहाचे कामकाज सांभाळीत होतो."

दादासाहेबांच्या वागण्यात, बोलण्यात, चालण्यात एक आगळीवेळी ग्रेस होती. अभिजात रसिकता होती. सदैव पान तोंडात ठेवूनच त्यांचा व्यवहार चालत असे. त्यामुळे सभागृहात येण्यापूर्वी त्यांचा पानाचा डबा तयार होत असे. छान बारीक कातरलेली सुपारी, भरपूर लवंगा, विलायची, मऊसूत चुना, छान पुसलेली एका आकारात लावलेली पाने त्यात राहत. याशिवाय थंडाईलाही जागा मिळत असे. दादासाहेबांचा हा डबा ते सभागृहाचे कामकाज सांभाळीत असतानाही विरोधी बाकांवर, (नागपूरच्या जुन्या विधानपरिषदेत पत्रकार दालनही अगदी सभागृहाचा भाग वाटावा इतका जवळ होता, त्यामुळे पत्रकारांमार्फत) सरकारी बाकांवरही फिरत असे. सर्वजण त्याचा आस्वाद घेत. अनेकदा हा डबा रिकामा होऊनच दादासाहेबांच्या जागेवर पोहोचत असे. तो डबा ते मागे आपल्या दालनात पाठवीत व पुन्हा भरून येत असे. दादासाहेबांचा हा पानाचा डबा

कितीदा भरला जात असे व रिकामा होत असे याची गणतीच राहत नसे. हा विड्याचा पानाचा डबा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभिन्न भाग होता.

पुलोद शासनाच्या काळात मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा निर्णय झाला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा ठराव झाला आणि संपूर्ण मराठवाडा पेटून उठला. भयंकर जातीय दंगलीत मराठवाड्यातील दलित व अन्य लोकही पोळून निघालेत. काँग्रेससह संपूर्ण राजकीय पक्षांत फूट पडली होती. साम्यवादी असणारे व्ही. डी. देशपांडे, समाजवादी विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर, गोविंदभाई श्रॉफ हे सगळे नामांतर विरोधात होते; तर भाजपाचे प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे हे नामांतरवादी होते. मुंडे-महाजन यांनी घेतलेल्या भूमिकेचे दादासाहेबांना अप्रूप होते. नामांतरानंतर मराठवाड्यात दंगली उसळल्या. त्यात दंगलखोरांवर पोलिसांनी लाठ्याकाठ्या चालविण्यावर त्यांची हरकत नव्हती. त्या वेळी सरकारला उद्देशून दादासाहेब म्हणाले होते, "जरूर मारा दंगलखोरांना, पण दंगलखोरांत महिलाही आहेत, हे विसरू नका. त्या महिलेच्या काखेत तिचं लहानगं बाळ आहे, त्याला लाठ्या लागणार नाहीत किंवा ते बाळ खालीही पडणार नाही वा पायदळी तुडविले जाणार नाही, याची दक्षता घेणे जरूर आहे." या दंगलीनंतर हा विषय जणू संपल्यासारखा झाला होता. एक ज्वालाग्राही विषय म्हणून कुणीही त्याला स्पर्शही करायला तयार नव्हते. ही दंगल शांत झाल्यावर जवळ-जवळ ५-६ वर्षांनी विरोधी पक्षनेते ग. प्र. प्रधान यांनी या संदर्भातील एक ठराव विधानपरिषदेत मांडला होता. त्या चर्चेत दादासाहेबांनी एक बाब अधोरेखित केली की, त्या दंगल उसळली होती, त्याला काही नेत्यांची आक्रस्ताळी भाषणे व त्याच बरोबर दलित विरोधी कायदा (ॲट्रासिटिज ॲक्ट) याचा अवाजवी वापरही कारण होता. ते असेही म्हणाले की अनेकदा तक्रार नसतानाही पोलीसच या कायद्याखाली गुन्हा नोंदवित. ही कबुली देणे खूप कठीण होते. हा ठराव मतदानाला घेतला जाण्यापूर्वी तो मागे घेऊन त्यांनी आपल्या मुत्सद्देगिरीची चमक दाखविली. त्या वेळी ते म्हणाले होते, "हा ठराव नामंजूर होऊ देऊन नामांतरावर गंडांतर आणण्याचा मूर्खपणा मी करणार नाही." या प्रश्नावर त्यांनी प्रधान मास्तरांसमोर धरणेही दिले पण मास्तर इरेला पेटले व प्रस्ताव नामंजूर झाला. पुढे वातावरण शांत झाल्यावर ९२-९३ मध्ये पुन्हा शरद पवारच मुख्यमंत्रिपदी होते, त्या वेळी नामांतर झाले. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठ असे झाले व नव्याने नांदेडला स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ स्थापन झाले.

दादासाहेब विरोधी बाकावर असताना आक्रमक जरूर असत; पण संसदीय प्रथा, परंपरा यांच्या बाबत तेवढेच जागरूक होते. ते स्वतः कधीही हौदात आले नाहीत वा त्यांनी इतरांना हौदात जायला प्रोत्साहित केले नाही. सभापती हा पीठासीन अधिकारी यांच्या आदेशाचे कधीही उल्लंघन केले नाही. ते सदैव म्हणत- Once a Chairman, always a Chairman. त्यांचे हे वर्तन फक्त विधानपरिषदेतच नाही, तर नंतर लोकसभा व राज्यसभा यातही कायम राहिले. सवंग लोकप्रियतेसाठी नियम धाब्यावर बसविणे व दंगा करणे त्यांना मान्य नव्हते. विरोधी बाकावर असताना ते सत्ताधारी पक्षाला आपल्या तिखट प्रतिवादाने घायाळ करून सोडायचे. देशात केंद्रीय पातळीवर सत्तापरिवर्तन झाले. एन. डी. ए. चे सरकार अटलजींच्या नेतृत्वात सत्तेवर आले. त्या सरकारने कालबाह्य कायदे मोडीत काढण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. आप्पासाहेब घटाटे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. रालोआच्या या खेळीला राजकीय उत्तर देणे जरूरी होते, म्हणून दादासाहेबांनी एक मत व्यक्त केले की, हे सरकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली घटना बदलायला निघाले आहे. ती चळवळ इतकी जोरदार व जोमदार झाली की रालोआ सरकारला बचावात्मक पवित्र्यात येऊन सांगावे लागले की आम्ही घटना बदलणार नाही, तर फक्त कायदे (जे कालबाह्य झाले आहेत) ते बदलणार आहोत. अखेर या आघाडीवर अटलजींच्या सरकारला

फारसे काही करता आले नाही. मात्र असे असले तरी दादासाहेब व भाजपाचे अटलजी यांच्या संदर्भात कटुता आली नाही. त्या संबंधांतील माधुर्य कायम राहिले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवडणुकीच्या काळात काँग्रेसने त्यांना एक नव्हे, तर दोन मतदार संघांतून वेगवेगळ्या वेळी पराभूत केले होते. पहिल्यांदा बाबासाहेब मुंबईमधून विजयी होऊ शकले नाहीत. त्यानंतर त्यांनी भंडारा मतदार संघांतून निवडणूक लढविली.. तिथे काँग्रेसचे भाऊराव बोरकर त्यांच्या विरोधात उमेदवार होते. पण त्या काळात भारतीय मजदूर संघाचे संस्थापक दत्तोपंत ठेंगडी बाबासाहेबांच्या जवळ होते. दत्तोपंत हे संघ प्रचारक होते, पण त्यांना बाबासाहेबांनी आपले प्रचारप्रमुख नेमले. पंतांनीही भरपूर परिश्रम करून बाबासाहेबांना विजयी करण्याचा प्रयास केला. पंतांशी त्यामुळे एक वेगळाच स्नेहबंध निर्माण झाला होता. पुढे दत्तोपंतांचा षष्ठ्यब्दिपूर्ती समारोह भारतीय मजदूर संघाने नागपूरला आयोजित केला होता. धनवटे रंगमंदिरात आयोजित या सोहोळ्याला रा. सू. गवई हे प्रमुख अतिथी होते.

पुढे काही वर्षांनी तामिळनाडूत मदुराईजवळ मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाले. समुद्रावर काम करणारे- मासेमारी करणारे जे कोळी बांधव होते, त्यांनी मुसलमान धर्म स्वीकारला होता. त्या सामूहिक धर्मांतराने देशात खूप खळबळ माजली होती. त्या प्रकरणावर दादासाहेबांना आपली भूमिका जाहीरपणाने स्पष्ट करावयाची होती. त्यांनी काही मंडळींना असे सुचविले की रा. स्व. संघाने त्यांना एखाद्या कार्यक्रमाला आमंत्रित करावे. तसे आमंत्रण गेले आणि तृतीय सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांच्या उपस्थितीत ते कार्यक्रमाला उपस्थित राहिले आणि त्या वेळी दादासाहेबांनी हे स्पष्ट केले की बाबासाहेबांना हिंदू धर्मातील अस्पृश्यता वगैरे चालीरीती मान्य नव्हत्या, त्यामुळे त्यांनी धर्मांतर केले, पण त्यासाठी त्यांनी या मातीची धर्म असणाऱ्या बौद्ध धर्माची निवड केली. त्यांना मुस्लिम धर्म स्वीकारणे मान्य नव्हते. एक इतिहास त्या वेळी दादासाहेबांनी अतिशय स्पष्ट शब्दांत मांडला होता.

रिपब्लिकन पक्षाच्या खोरिप-गारिप वादात भलेही दलित समाजाचा कौल खोरिपच्या बाजूला असला, तरी कायदेशीर बाबीत व कागदपत्रांबाबत दादासाहेब पक्के होते. त्यामुळे ज्या ज्या वेळी दोन्ही गट वा अन्य सगळे गट एकत्र होण्याचा प्रसंग आला; त्या वेळी दादासाहेबांकडे त्याचे मुख्यपद, अध्यक्षपद येतच गेले. रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचा पहिला प्रयोग नागपूरला आमदार निवासात झाला. त्यात दत्ता कट्टी, जे. ईश्वरीबाई वगैरे खोरिपचे नेते सहभागी झाले होते. याच सभेत काही ताणतणाव झालेत व दत्ता कट्टी यांची प्रकृती बिघडल्यामुळे ते कुठेतरी निघून गेले. दुपारी ४-०० वाजताच्या सुमारास दादासाहेबांनी पत्रपरिषद घेतली व ॲड. दत्ता कट्टी यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करीत आम्ही पोलिसांची मदत घेऊनही त्यांना शोधू शकलो नाही, असे पत्रकारांना सांगितले. सर्व वृत्तपत्रांनी ॲड. दत्ता कट्टी हरविले आहेत. त्यांची प्रकृती ठीक नाही वगैरे बातम्या चालविल्या, पण नागपूरच्या तरुण भारतने मात्र ॲड. कट्टी यांना शोधून काढण्याचे ठरविले. त्या वेळी कम्युनिस्ट पक्षात नेते असणाऱ्या मूळच्या खोरिप नेत्याशी गप्पा मारताना त्यांनी असे सांगितले की ॲड. दत्ता कट्टी यांचे एक नातेवाईक हवामान खात्यात उच्च पदस्थ अधिकारी आहेत. त्यावरून मी व 'युगधर्म' चे शिव साहू विमानतळावरील हवामान खात्याच्या कॉलनीत गेलो. आम्ही त्या ठिकाणी दत्ता कट्टी यांना भेटलो. त्यांचा फोटो व मुलाखतीसह बातमी तरुण भारतात पहिल्या पानावर लागली. त्या दिवशी सकाळच्या सत्रात दादासाहेब गवई हे दोन्ही एकत्रित गटाचे अध्यक्ष घोषित होणार होते, पण त्या बातमीमुळे राजकीय गोंधळ निर्माण झाला होता. दादासाहेबांचा आमच्या संपादकांना फोन आला- "अरे, ही बातमी लागल्यामुळे गोंधळच झाला. मला ही ॲड. कट्टी कुठे आहेत हे माहिती होते, पण

आम्हाला त्यांचा शोध घ्यायचा नव्हता." या बातमीचा परिणाम असा झाला की सकाळच्या सत्रात होणारी ही घोषणा संध्याकाळपावेतो लांबणीवर पडली आणि आंध्र प्रदेशच्या जे. ईश्वरीबाई अध्यक्ष झाल्यात, मात्र सगळी पत्रव्यवहाराची, निवडणूक आयोगाकडे नोंदणीची व अन्य सूत्रे दादासाहेबांकडेच राहिलीत.

१९७८-७९ साली अनुसूचित जाती-जमातीचे सर्व अधिकार नवबौद्धांना मिळावेत यासाठी दादासाहेबांच्या नेतृत्वात दिल्लीत आंदोलन झाले. दादासाहेबांनी या प्रश्नावर प्रकृती ठीक नसताना देखील नवी दिल्लीत १४ दिवस उपोषण केले. त्यामुळे या सवलती नवबौद्धांना मिळण्याच्या प्रश्नाला चालना मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र प्रकाशन समिती स्थापना करण्यामागील प्रेरणा दादासाहेबांचीच होती. डॉ. आंबेडकर यांच्या अप्रकाशित साहित्याचे सुरुवातीचे वीस खंड शासनाने प्रकाशित केले. त्यात दादासाहेबांचा सिंहाचा वाटा होता. लोकसभेत असतानाही ते समितीच्या बैठकीला उपस्थित राहून कार्याला गती देत असत.

१९९८-९९ च्या बाराव्या लोकसभेत ते अमरावतीचे खासदार झालेत. पुढे एप्रिल, २००० मध्ये ते राज्यसभेवर सदस्य झालेत. त्यानंतर २००६ ते २००८ या काळात ते बिहारचे राज्यपाल, नंतर ७ सप्टेंबर २०११ पावेतो ते केरळ राज्याचे राज्यपाल होते.

दादासाहेबांच्या कामाला आणखी एक पैलू होता, तो कुष्ठ रुग्णांसाठी त्यांनी केलेल्या कामाचा. अमरावती जवळच्या तपोवनमधील जगदंब कुष्ठधामाशी त्यांचा खूप घनिष्ठ संबंध होता. थोर स्वातंत्र्यसैनिक डॉ. शिवाजीराव पटवर्धन व त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांनी स्वातंत्र्योतर काळात स्वत:ला या कामात झोकून दिले होते. शिवाजीरावांची कामाची शैली खूप वेगळी होती. राजकारण, लपवाछपवी त्यांना जमत नसे. दादासाहेबांनी त्यांना वेळोवेळी खूप मदत केली. तपोवनच्या उभारणीत त्यांचे योगदान मोठे होते. वसंतरावदादा पाटील मुख्यमंत्री असताना शिवाजीरावांचा व त्यांचा वाद झाला होता. दादासाहेबांनी या दोघांमधील संघर्ष टिपेला पोचणार नाही याची खूप काळजी घेतली, पण एका क्षणी दोघेही समोरासमोर आलेत व सरकारी शैलीत कुष्ठधाम चालविणे शिवाजीरावांनी अमान्य केले आणि ते तपोवन परिसर सोडून चालते झाले. शिवाजीरावांचा सन्मान आपण सांभाळू शकलो नाही, याची खंत दादासाहेबांना अखेर पावेतो वाटत होती. शिवाजीराव-त्यांना दाजीसाहेबही म्हणत, दाजीसाहेब तपोवन सोडून गेल्यावरही तपोवनाला दादासाहेबांचा आधार होता. त्यांच्या या कार्यामुळेच दादासाहेब गवई यांना कुष्ठमित्र पुरस्कार व कुष्ठ रुग्णांचे मित्र हा पुरस्कार मिळाला होता.

१९७२ साली दादासाहेब हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष झालेत. त्यांनी मग आपल्या शैलीने दीक्षाभूमीवर डॉ. आंबेडकरांचे स्मारक उभारले. त्या परिसरात असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयालाही त्यांनी नवसंजीवनी दिली. सुरुवातीला हे महाविद्यालय नागपुरातील नामवंत महाविद्यालयात गणल्या जात नव्हते. साधारणपणे नापास होणारे, सरकारी शिष्यवृत्तीवर शिक्षण घेणारे विद्यार्थी त्यात येत. एका राजकीय विचारसरणीमुळे हे आपलेच महाविद्यालय आहे असे काही गटांना वाटू लागले व त्यातून कसेही वर्तन महाविद्यालयात होणे हा प्रकार सुरू झाला. त्याला आळा बसावा म्हणून दादासाहेबांनी डॉ. कृष्णकुमार यांना प्राचार्यपदाची सूत्रे सोपविली. त्यांना महाविद्यालय संचालनाचे पूर्ण अधिकार दिलेत. त्यानंतर कृष्णकुमारांनी महाविद्यालयातील कुप्रवृत्तींचा निपटारा केला. आज ते महाविद्यालय नागपुरातील सर्वोत्तम महाविद्यालयांतील एक आहे. व्यवसाय व्यवस्थापन, लॉ. विज्ञान, कला, वाणिज्य, पाली-प्राकृत यात या महाविद्यालयातून शिक्षण दिले जाते. या महाविद्यालयाला नागपूर विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून दिल्यावर

कृष्णकुमार हे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्या आधी दादासाहेब राज्यपाल असताना ते ओ.एस.डी. होते.

या महाविद्यालयात वा दीक्षाभूमीवर दादासाहेबांनी कसलीही राजकीय अस्पृश्यता पाळली नाही. उलट राजकारण करणाऱ्यांना बाजूला सारले. रा. स्व. संघाचे सरसंघचालक झाल्यावर कुप. सी. सुदर्शन यांनी दुसऱ्याच दिवशी दीक्षाभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्याचा निर्णय घेतला. त्यांना तशी अनुमती मिळावी म्हणून दीक्षाभूमीला निरोप गेला. दादासाहेब त्या वेळी नागपुरात नव्हते. त्यांनी या परिवर्तनाचे स्वागत केले व दुसऱ्या दिवशी सरसंघचालकांचे स्वागत करायला सदानंद फुलझेले उपस्थित होते. समाजजीवनातील एक वर्तुळ पूर्ण झाले होते. पुढे नागपुरातील काही विचारवंतांनी हा पुतळा अपवित्र झाला असे मानून पुतळा धुण्याचा वगैरे उपक्रम केला. त्यामुळे दादासाहेब कुठेतरी नक्कीच दुखावले होते. पुढे नितीन गडकरी महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री झाले. ते नागपूरचे पालकमंत्रीही होते. त्यांना दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन कार्यक्रमाला दादासाहेबांनी आमंत्रित केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री-शिवसेनेचे मनोहर जोशी हे देखील एका कार्यक्रमाला मुख्य अतिथी होते. राजकारणात असलेली स्पृश्यास्पृश्यता त्यांनी दीक्षाभूमीला स्पर्शू दिली नाही.

याच दीक्षाभूमीवर पूर्वी माता कचेरीच्या बाजूला भिख्खू निवास होता. त्या कुटीत भदंत कौसल्यायन राहत असत. पुढे दादासाहेबांच्या लक्षात आले की, हे निवास राजकारणाचा अड्डा होत आहे. रिपब्लिकन पक्षाचे विविध गट या ठिकाणी येऊन राजकारण करतात हे लक्षात आल्यामुळे भिख्खू निवास तेथून हटविण्याचा अतिशय कठीण निर्णय दादासाहेबांनी घेतला व त्याची अतिशय कठीण अंमलबजावणी सदानंद फुलझेले व वा. को. गाणार यांनी केली. आज त्यामुळे सगळा दीक्षाभूमी परिसर समितीच्या ताब्यात आला आहे व त्यावर अप्रतिम असे स्मारक उभे झाले आहे. त्यासाठी सर्व राज्य शासनाकडून व केंद्राकडून आर्थिक मदत मिळविण्याचे काम दादासाहेबांनी केले. त्यासाठी त्यांनी नागपूरचे ख्यातनाम वास्तुशास्त्रज्ञ शिवदानमल यांची मदत घेतली व त्यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकता. त्यामुळेच एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक नागपूरला उभे झाले. आजही नागपूर शहरात काय काय बघण्यासारखे आहे असे नागपूरबाहेरचे लोक विचारतात तेव्हा जी यादी सांगितली जाते, त्यात दीक्षाभूमीचा समावेश असतो.

याच दीक्षाभूमीवरून कुण्यातरी कार्यकर्त्याने दादासाहेबांना सांगितले की, मनपा डायरीत दीक्षाभूमीचा उल्लेख नाही. दादासाहेबांनी सरळ आयुक्तांकडे—ब. न. झामरे यांच्याकडे तक्रार केली. झामरे यांनी डायरी तयार करणारे मनपाचे पी. आर. ओ. वसंतराव पापडे यांना सांगितले. त्यांनी आरोप नाकारला. डायरीत चार ठिकाणी दीक्षाभूमीचा अतिशय गौरवपूर्ण उल्लेख होता. शिवाय मलपृष्ठावर दीक्षाभूमीचा पूर्ण पानभर फोटो होता. दादासाहेबांच्या हातात डायरी पडल्यावर त्यांनी आयुक्तांकडे समाधान व्यक्त केले व संबंधित कार्यकर्त्याची चांगली खरडपट्टी काढली.

बौद्ध धर्माचे कार्यकर्तृत्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही नेण्यात दादासाहेबांचा अतिशय मोठा वाटा होता. १९८० ते १९९८ या १८ वर्षांच्या काळात ते सेंट्रल जनरल कौन्सिल ऑफ जागतिक बौद्ध फेलोशिपचे उपाध्यक्ष होते. या कामासाठी त्यांनी रशिया, अमेरिका, ब्रिटन, इराक, जपान, जर्मनी, हाँगकाँग, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, कॅनडा, मॉरिशस, दक्षिण व उत्तर कोरिया, श्रीलंका, मंगोलिया, नेपाळ, तायवान या देशांचा दौरा केला.

राजकारणातील सर्व पक्षांच्या नेत्यांशी त्यांचा घरापावेतोचा संबंध होता. त्या सर्वांच्या सुखदुःखात दादासाहेब सहभागी होत असत. एका परदेश दौऱ्यात अटलजींसमवेत ते होते. अटलजींना थंडी वाजू लागली, तर आपल्या अंगावरील

शाल त्यांनी अटलजींच्या अंगावर घातली. आपण अटलजींना शाल देऊ शकलो याचा आनंद ते अनेकदा खाजगी बोलण्यात व्यक्त करीत असत. त्यांच्या पत्नी कमलताई या राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या. रा. सुं. ना राजकारणात उच्च पदे भूषविण्याची संधी मिळत असतानाही त्यांनी त्या काळात स्लीपर क्लासने प्रवास करण्यात कधीही कमीपणा मानला नाही. या प्रवासातच जी रुमाल वगैरे विकणारी मुले दिसत असत, त्यांच्याकडून त्या आवर्जून रुमाल वगैरे घेत असत आणि सहजपणाने सहप्रवाशांना सांगतही की, इथे स्वस्त पडतात. मोठ्या दुकानात विनाकारण या रुमालांसाठी जास्ती पैसे मोजावे लागतात. दादासाहेबांचे एक पुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायमूर्ती आहेत, तर डॉक्टर झालेले त्यांचे पुत्र डॉ. राजेंद्र हे ख्यातनाम डॉक्टर असूनही राजकारणात रमणे त्यांना जास्ती आवडते. ते राजकारणात दादासाहेबांचे उत्तराधिकारी आहेत. कमलताई यांनाही राजकारण वर्ज्य नाही. त्या विरोधी पक्षांतर्फे अमरावती लोकसभेसाठी उभ्या होत्या. पण त्यांना राजकारणापेक्षा समाजकारण, शिक्षण या क्षेत्रात जास्ती रुची आहे. दादासाहेबांना सांभाळणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे याला त्यांनी आपल्या जीवनात अग्रक्रम दिला.

आमदारांसाठी वरळीत भूखंड घेऊन घर उभारण्यात त्यांचा मोठा वाटा होता. अनेक वर्षे दादासाहेबच या वरळी-सागर सोसायटीचे अध्यक्ष होते.

सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्यावरही दलितांसाठी, भीम सैनिकांसाठी आणि सामान्य माणसासाठी लढण्याची, झुंजण्याची व संघर्षशील राहण्याची ऊर्जा दादासाहेबांनी गमविली नव्हती. पुरोगामी विचाराचे नेतृत्व करत असतानाही त्यांनी विनाकारण कुणावर टीका केली नाही की कुणाच्या श्रद्धांना दुखावले नाही.

-ज्येष्ठ पत्रकार.

❑❑

माझे आधारस्तंभ

श्री. दादा माझा मोठा भाऊच नाही, तर माझ्या जीवनाचा एक आधारस्तंभ आहे. माता, पिता आणि गुरू ह्यांचा त्रिवेणी संगमच मला माझे दादा आहेत. कारण मातेची ममता, पित्याचे प्रेम आणि गुरूकडून मिळणारे शिक्षण व संस्कार मला दादांकडूनच मिळालेले आहेत. लहानपणी मी, माझी बहीण व दादा फ्रेजरपुऱ्यात एका लहानग्या घरात राहत होतो. तेव्हा आमची आर्थिक परिस्थिती जेमतेमच होती. तशाही परिस्थितीत त्यांनी आम्हाला शिक्षणात वा वैयक्तिक गरजांमध्ये कधी कमी पडू दिले नाही आणि त्याबरोबरच परिस्थितीवर मात करून धैर्याने त्याला सामोरे जाण्याचे प्रशिक्षण त्यांनी मला अप्रत्यक्षपणे दिले. माझे शिक्षण पूर्ण होणे आणि आज जो मी स्वावलंबी बनलो आहे हे दादांचेच आशीर्वाद आहेत.

-वसंत गवई
अमरावती.

एक सर्वसमावेशक नेता

▪ दिलीप चावरे

रा. सू. गवई १९६४ मध्ये प्रथम विधानपरिषदेवर निवडून आले. ते चार वर्षांनंतर विधानपरिषदेचे उप सभापती बनले. त्यांना गॉडफादर असा कुणी नव्हता. दादासाहेब गायकवाड त्यांचे गुरू. गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भूमिहिनांच्या सत्याग्रहातून गवई यांचे नेतृत्व उदयास आले. त्यांच्याकडे वक्तृत्व होतेच. त्याला कर्तृत्व आणि नेतृत्व यांची जोड देऊन त्यांनी आपले स्थान सिद्ध केले. राजकारणात त्यांनी खूप तडजोडी केल्या असा आरोप त्यांच्यावर होतो. पण संघर्षाचे राजकारण करायचे की बाबासाहेबांच्या विचारांशी प्रामाणिक राहून आपल्या समाजाचे कल्याण करायचे, वादविवाद करायचे की मतैक्य घडवून आपल्याला हवे ते साध्य करायचे, असा प्रश्न त्यांना कधीच पडला नाही. ज्या ज्या वेळी बाबासाहेबांच्या विचारांशी बांधिलकीचा मुद्दा आला तेव्हा गवई यांनी आपली निष्ठा दाखवून दिली. तसेच दीक्षाभूमी सारखा महाप्रकल्प सुद्धा त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखवला

गवई राज्यसभेचे सदस्य असताना घटनेची समीक्षा करण्याचा प्रस्ताव भाजपाचे सदस्य रामदास अग्रवाल यांनी आणला होता. सभागृहात याला कडाडून विरोध करणारे गवई पाहून नेहमी स्मित हास्य करणारे गवई हेच का, अशा अचंबा अनेक सदस्यांनी व्यक्त केला. याच सुमारास अरुण शौरी यांचे 'वर्शिपिंग फाल्स गॉडस' हे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. या पुस्तकाचा धिक्कार करताना त्यांनी हे पुस्तक टराटरा फाडले होते.

खासगी बैठकीत गवई यांच्यासारखा दिलखुलास दोस्त असला की त्या रंगायच्या. पण त्यांचे सार्वजनिक रूप अगदी वेगळे असे. बॅ. अब्दुल रहमान अंतुले आणि त्यांची मैत्री जगजाहीर होती. पण इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठानचा वाद सुरू झाला आणि विधानपरिषदेत सभापती असलेले गवई यांनी या विषयावर चर्चा करण्याची मागणी करणारा प्रस्ताव स्वीकृत केला. सुमारे दोन तास चाललेली ही वादळी चर्चा त्यांनी अत्यंत कुशलतेने हाताळली. गवई यांचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी होते की आपोआप दरारा निर्माण होत असे, सभागृहातील वातावरण सहसा हाताबाहेर जात नसे.

विधिमंडळात वृत्त संकलन करणारे वार्ताहर आणि गवई यांचे संबंध विशेष प्रेमाचे होते. प्रत्येक अधिवेशनात गवई एक तरी प्रीतिभोजन आमच्यासाठी आयोजित करत आणि ते रात्री उशिरापर्यंत रंगत जात असे. कधी इतर सदस्यसुद्धा अचानक सहभागी होत आणि बहार येत असे. नागपूर अधिवेशनातील अनेक रात्री यादगार झाल्या त्या गवई यांच्यामुळे.

नागपूर आणि गवई यांचा एक खास ऋणानुबंध होता. नागपूरची दीक्षाभूमी म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचे स्मारक म्हणता येईल. बौद्ध धर्मियांचे एक जागतिक पवित्र स्थळ म्हणून दीक्षाभूमीला हजारो-लाखो लोक भेट देतात. दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर गवई यांनी या स्मारक समितीची धुरा स्वीकारली. सरकारकडून जमीन आणि निधी आणून स्मारकाच्या कामाला गती देण्याचे श्रेय त्यांचे आहे. आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी कामगिरी म्हणून गवई दीक्षाभूमीचा उल्लेख करत. ते सतत विरोधाचे राजकारण करत राहिले असते तर हे साध्य करणे त्यांना शक्य झाले असते का, याचा विचार त्यांचे विरोधक कधीच मांडत नाहीत. संसदीय लोकशाही गवई यांच्या अंगात भिनली होती. त्या आधारावर ते सक्रिय राजकारणात अर्धा शतक टिकले, मानाने वावरले.

एचबी ११८०—१०

गवई यांचे राजकारण समजुतीचे होत, अहंकाराचे नव्हते. म्हणूनच ते आपल्या पक्षाचा एकही सदस्य विधानसभेत नसूनही परिषदेत निवडून गेले होते. राजकारण आणि व्यक्तिगत संबंध त्यांनी अलग केले होते. त्यात त्यांनी पक्ष पाहिला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक दत्तोपंत ठेगडी यांच्या अमृतमहोत्सवास याच भावनेतून ते हजर राहिले. ए. बी. बर्धन, नानासाहेब पाटील, सुदामकाका देशमुख, विठ्ठलराव हांडे, सूर्यभान वहाडणे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असे सगळ्याच पक्षात त्यांचे मित्र होते.

गवई यांनी आपले राजकीय गुरू दादासाहेब गायकवाड यांना राज्यसभेच्या निवडणुकीत कसे विजयी केले याचा इतिहास मोठा रंगतदार आहे. हे दोघे नेते १९६२ मध्ये लोकसभेची निवडणूक हरले असले तरी गवई यांनी विधानसभेवर २२ सदस्य निवडून आणले होते. त्या आमदारांचे नेते रामदयाल गुप्ता होते. गवई यांनी राज्यसभेच्या निवडणुकीला उभे राहण्याचा आग्रह गुप्ता यांनी केला. परंतु ही जागा दादासाहेब गायकवाड यांची आहे, अशी भूमिका गवई यांनी घेतली. एवढेच नव्हे तर गायकवाडांची भेट गवई यांनी घेतली आणि "दादासाहेब, आपण निवडणुकीला उभे रहा. आपण निवडून याल याची मला खात्री वाटते," अशी हमी दिली.

त्यावेळी यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यांचे उमेदवार बी. सी. कांबळे. १९५८ साली रिपब्लिकन पक्षात पहिली फूट पडली होती तेव्हापासून गायकवाड यांच्या विरोधात होते. यशवंतरावांनी या दुहीचा फायदा घेण्यासाठी कांबळे यांना राज्यसभेच्या निवडणुकीत उभे केले. गायकवाड आणि गवई यांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्यात योगदान दिले असूनही संयुक्त महाराष्ट्र समितीने स्वत:चा वेगळा उमेदवार उभा केला होता. हे दोन उमेदवार असताना आपण निवडून येणार नाही हे गायकवाड यांना समजत होते, पण गवई यांना ते नकार देऊ शकले नाहीत. गवई यांनी निवडणुकीची तयारी सुरू केली.

त्या काळात विदर्भातल्या भंडारा जिल्ह्यातले पूरणलाल राहांदळे प्रजा समाजवादी पक्षाचे एक नेते होते. उत्तम इंग्रजी आणि मराठी बोलत ते विधानसभा दणाणून सोडायचे. त्यांचे १५ आमदार होते तर गवई यांच्याकडे २२ आमदार होते. राहांदळे आणि आपण एकत्रपणे आपले उमेदवार निश्चित निवडून आणू ही गवई यांना खात्री होती. राहांदळे आणि गवई या दोघांनी तसा करार केला.

राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणूक प्रक्रियेचा गवई यांनी सूक्ष्म अभ्यास केला होता. मुंबईत निवडणूक प्रक्रिया सुरू झाली. गायकवाड यांच्या निवडणुकीचे प्रतिनिधी म्हणून गवई विधान भवनात गेले. गायकवाड अजिबात आशावादी नव्हते. गवई यांच्या नावे एक पत्र गायकवाड यांनी ठेवले. त्याचा आशय असा होता, "मी पंजाब मेलने दिल्लीला जात आहे. यदा कदाचित माझा पराभव झाला तर माझे सामान घेऊन येणे."

गायकवाड पंजाब मेलने रवानाही झाले. तेव्हा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झालेली होती. पहिल्या फेरीत त्यांना ३६ मते मिळाली. त्यावेळी कांबळे यांना फक्त १० मते मिळाली होती. दुसऱ्या पसंतीची मतमोजणी सुरू झाली. या फेरीत कांबळे यांची मते वेगाने वाढू लागली. गायकवाड यांची मते हळूहळू वाढत होती. एक विशिष्ट वेळ अशी आली की गायकवाड यांनी कोटा पूर्ण केला. गवई यांनी विधिमंडळाच्या सचिवांकडे निवडणुकीची प्रक्रिया बंद करण्याची मागणी केली. दादासाहेब गायकवाड यांनी कोटा पूर्ण केला असून त्यांना विजयी घोषित करा, असा त्यांचा आग्रह होता. पुढची फेरी झाली असती तर कांबळे निवडून आले असते, याची गवईंना कल्पना होती. सचिवांची आता पंचाईत झाली, कारण कांबळे हे यशवंतराव चव्हाण यांचे उमेदवार होते. दोघे सचिव बाहेर गेले. ते यशवंतरावांना परिस्थितीची कल्पना देणार हे गवईंना समजत होते. ते दोघे यशवंतरावांच्या केबिनमधून बाहेर येताच गवई यांनी आत जाऊन यशवंतरावांना परिस्थिती समजावून सांगितली. अखेर अधिकाऱ्यांनी गायकवाड निवडून आल्याचे जाहीर केले.

ही बातमी सांगायला गवई घाईने आमदार निवासात गेले, तर तिथे त्यांचे पत्र होते. गवई यांनी लगेच "दादासाहेब उपाख्य बी. के. गायकवाड-द्वारा स्टेशन मास्तर. आपण निवडून आलात आपले अभिनंदन." अशी तार केली. पंजाब मेल मनमाड स्टेशनवर पोहोचताच स्टेशन मास्तरने दादासाहेबांच्या हातात तार ठेवली. दादासाहेब मनमाडला उतरले आणि मुंबईला पोहोचले. ते आमदार निवासात पोहोचले तेव्हा गवई झोपले होते. त्यांनी गवई यांना उठवून सांगितले, हे श्रेय तुमचे आहे. गवईंनी गुरूंना दिलेली ती अभूतपूर्व दक्षिणा होती.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यास विरोध करणारे स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव आदी नेत्यांची संमती घेण्याची कामगिरी त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांच्यावर सोपवली होती. ही कामगिरी पार पाडून चौधरी परत आल्यानंतर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होऊन नामांतरास मान्यता देण्यात आली. या बैठकीस शरद पवारही उपस्थित होते. त्यानंतर वसंतदादांचे सरकार पडले आणि शरद पवार पुलोद सरकारचे मुख्यमंत्री बनले. विरोधी पक्षात असलेले मधुकरराव चौधरी यांनी दादांच्या मंत्रिमंडळात चर्चा झाल्याप्रमाणे नामांतराचा अशासकीय ठराव मांडला. म्हणजेच विधानसभेत काँग्रेसने सर्वप्रथम नामांतराचा अशासकीय ठराव आणला.

विधानसभेच्या कामकाजात जशी काँग्रेसने सर्वप्रथम ठराव मांडल्याची नोंद झाली, तशीच विधानपरिषदेतही झाली असल्याची माहिती गवई केरळचे राज्यपाल असतानाचे त्यांचे जनसंपर्क अधिकारी सुहास सोनवणे यांनी दिली. या माहितीनुसार २१ जुलै १९७८ रोजी विधानपरिषदेत काँग्रेसचे नासिकराव तिरपुडे यांनी नामांतराचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर (पुलोदचे) मंत्री निहाल अहमद यांनी "विचार करतो" असे मोघम उत्तर दिले. मात्र सभापती गवई यांनी हस्तक्षेप करून "आधीच्या मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय या सरकारला मान्य आहे का" असा प्रश्न विचारून काँग्रेसचा हा निर्णय कामकाजाच्या नोंदीत आणला. त्यावेळी सभागृहात आलेले मुख्यमंत्री शरद पवार यांनी पुढील आठवड्यात शासकीय ठराव मांडण्याचे आश्वासन दिले आणि एक ऐतिहासिक घटनाक्रम सुरू झाला.

गवई यांच्या पक्षाचा एकही आमदार विधानसभेत नसताना त्यांनी विधानपरिषदेतील मानाची पदे भूषवली. त्यांची सर्वांशी असलेली मैत्री हे या मागील रहस्य होते. वसंतराव नाईक आणि गवई यांची मैत्री तर खास होती. त्यामुळेच अखंड महाराष्ट्रासाठी त्यांनी काँग्रेसबरोबर काम केले. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य असो अथवा स्वतःचे भवितव्य, महाराष्ट्राचा विचार त्यांनी नेहमी पुढे नेला.

या त्यांच्या या गुणावर मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस लुब्ध झाले असावेत. कारण त्यांच्या मते गवई हे राजकारणातील सर्वसमावेशक नेतृत्व होते. बाबासाहेबांनी समाजातील अस्पृश्यता घालवली तर गवईनी राजकारणातील अस्पृश्यता दूर करण्याचे काम केले, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. ते अगदी वास्तव आहे.

-ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.

❑❑

एचबी ११८०—१०अ

संसदीय सुसंस्कृती आत्मसात केलेला नेता

▪ मधु कांबळे

महाराष्ट्राच्या साठोत्तर राजकीय इतिहासात ज्यांची ठळकपणे नोंद केली जाईल, त्यात रिपब्लिकन पक्षाचे मुत्सद्दी नेतृत्व म्हणून रामकृष्ण सूर्यभान ऊर्फ रा. सू. गवई यांच्या नावाचा अपरिहार्यपणे समावेश असणारच. सबंध देशच राजकीयदृष्ट्या आडाणी असताना आणि त्यातील पुन्हा अस्पृश्यासारख्या गुलामाचेच जिणे करणाऱ्या एका मोठ्या वर्गाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थेट मानवी अधिकाराबरोबर राजकीय हक्काच्या लढाईत उतरवले. सामाजिक-राजकीय परिवर्तनाच्या लढ्यातील ती अभूतपूर्व घटना होती. बाबासाहेबांच्या नंतर त्यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे किती गट झाले, किती तट पडले, किती तुकडे झाले, तरी महाराष्ट्राच्या राजकारणातील रिपब्लिकन राजकारण हा एक स्वतंत्र प्रवाह आहे. तो दखलपात्र आहे, कारण त्यामागे लढाऊ बाणा, बंडखोरी आणि स्वाभिमान, ही आंबेडकरी विचारधारा आहे. अशा आंबेडकरी राजकारणाचे ज्यांनी प्रदीर्घ काळ नेतृत्व केले ते रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते रा. सू. गवई काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीतील जुने-नवे नेतृत्व आणि कार्यकर्ते यांना जोडणारा दुवा संपला. आंबेडकरी विचारधारेच्या राजकारणाचे समर्थ नेतृत्व करण्याऐवजी रिपब्लिकन पक्षाच्या एका गटाचे चालक होण्यात व त्याआधारे आयुष्यभर सत्तापदे उपभोगण्यात गवई यांनी आपले राजकीय कसब पणाला लावले किंवा कामी आणले, अशी त्यांच्यावर सातत्याने टीका होत राहिली. खरे म्हणजे ती टीका वैयक्तिक नव्हती, तर त्यांच्यातील नेतृत्वगुणाला आव्हान देणारी होती. त्यांनी ते आव्हान खरे म्हणजे स्वीकारले की नाही, याचे स्वतंत्रपणे विश्लेषण करता येईल; परंतु बाबासाहेबांच्या नंतर, त्या काळातल्या दिग्गज नेत्यांच्या तालमीत तयार झालेल्या व युवा नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या गवई यांनी रिपब्लिकन पक्षाच्या नावाने आंबेडकरी राजकारण त्यांच्या कुवतीप्रमाणे, इच्छेप्रमाणे आणि स्वकीयांतीलच गटबाजीचे अडथळे पार करत जिवंत ठेवण्याचा व पुढे नेण्याचा प्रयत्न केला हे कुणाला नाकारता येणार नाही.

खरे तर आंबेडकरी विचाराला अनुसरलेल्या समाजाला सत्तापदांपेक्षा एकसंध व सशक्त चळवळीचे अधिक आकर्षण आहे. त्यांना मंत्री, खासदार, आमदारकीपेक्षा अन्यायमूलक समाजव्यवस्थेत जरब व धाक निर्माण करणाऱ्या भक्कम चळवळीची आस आहे. बाबासाहेबांच्या नंतर, त्यावेळच्या नेतृत्वाने तसा काही काळ प्रयत्न केला; परंतु नेतृत्वाच्या संघर्षातून रिपब्लिकन राजकारण खचत केले. त्याच वेळी १९६० नंतर रा. सू. गवई यांच्या रूपाने रिपब्लिकन राजकारणात तरुण नेतृत्व पुढे आले. बाबासाहेब आंबेडकर बंडखोर होते, लढाऊ होते. आक्रमक होते परंतु त्याचबरोबर ते संसदीय लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. संसदीय राजकारणाची म्हणून एक संस्कृती असते, ती आपल्याकडे फार कमी राजकीय पक्षांनी व नेतृत्वाने आत्मसात केलेली आहे. संसदीय संस्कृती म्हणजे संसदीय सभ्यता, गवई यांच्याकडे ती होती. त्यावर त्यांचा अटळ विश्वास होता, राजकारण हा डावपेचाचा खेळ आहे; परंतु त्यात सभ्यता वाहून जाणार नाही, याची काळजी घ्यायची असते, तो खरा मुत्सद्दी नेता. गवई त्या मालिकेतील नेते होते. त्यांचे काँग्रेस तसेच डाव्या-उजव्या अशा सर्वच पक्षांतील

नेत्यांशी-कार्यकर्त्यांशी उत्तम संबंध होते. म्हणूनच सत्ताधाऱ्यांशी सौहार्दाचे संबंध ठेवूनही ते विरोधी पक्षनेतेही बनले, ही राजकीय किमया फक्त गवई हेच करू शकले. १९६४ मध्ये विधानपरिषदेचे सदस्य म्हणून खऱ्या अर्थाने त्यांची संसदीय राजकारणाची सुरुवात झाली. पुढे विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती, विरोधी पक्षनेते, खासदार, बिहार व केरळचे राज्यपाल अशी अनेक मानाची व उच्चपदे त्यांनी भूषविली. मुख्य राजकीय प्रवाहातील यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, अ. र. अंतुले, विलासराव देशमुख अशा दिग्गज नेत्यांशी त्यांचा संबंध आला होता. विद्यार्थीदशेपासूनच आंबेडकरी चळवळीत ओढल्या गेलेल्या गवई यांचा भूमिहिनांच्या सत्याग्रहातील सहभाग महत्त्वाचा होता. रस्त्यावर नामांतराची लढाई सुरू असताना आणि त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण व समाजकारण ढवळून निघाले असताना, रा. सू. गवई विधिमंडळात नामांतरवाद्यांची बाजू भक्कमपणे मांडत होते. रिडल्सच्या आंदोलनात इतर तरुण नेत्यांच्या बरोबरीने ते अग्रभागी राहिले. रिपब्लिकन ऐक्याचे अनेकदा प्रयोग झाले, त्यातही गवई यांनी कधी आढेवेढे घेतले नाही. परंतु ऐक्याचे प्रयोग सातत्याने फसत गेले हा भाग वेगळा. गवई रिपब्लिकन राजकारणातील एक राजबिंडे व्यक्तिमत्त्व होते. संसदीय संस्कृती आत्मसात केलेला एक सभ्य, सुसंस्कृत व मुत्सद्दी नेता म्हणून महाराष्ट्राचा राजकीय इतिहास त्यांची ठळकपणे नोंद घेईल, यात शंका नाही.

-ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.

❑❑

प्रेमळ भाऊ

माझे पती श्री. तेजसिंगरावजी भोसले यांच्या निधनानंतरच मी सक्रियपणे राजकारणात आले. ते हयात असताना माझा कुठलाच संबंध राजकारणाशी नव्हता. माझ्या राजकीय प्रवेशाच्या वेळी ज्या व्यक्ती मला आत्मीयतेने मदत करतील ह्याची मनात मी अटकळ बांधली होती. त्यात श्री. दादासाहेब हे प्रमुख होते आणि त्यांचा अनुभव नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या व रामटेक येथील विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या वेळी आला. मागच्या निवडणुकीत रामटेकची जागा आमच्या हातून निसटली होती. ती परत मिळवणे म्हणजे आमच्यासाठी एक प्रतिष्ठेचाच मुद्दा होता. मी त्याविषयी श्री. दादासाहेबांशी बोलले, लागलीच त्यांनी त्यांची तब्येत चांगली नसतानासुद्धा खाजगी चिटणीस हजर नसल्यामुळे उठून स्वहस्ते एक पत्र, रामटेकच्या मला मदत करू शकेल अशा व्यक्तीच्या नावाने लिहून मला दिले. त्या पत्राचा मला फार उपयोग झाला आणि रामटेकात मी विजयी झाले. मी खासदार म्हणून निवडून येण्यात श्री. दादासाहेबांची एक बहीण या नात्याने त्यांनी दिलेले आशीर्वादच आहेत असे प्रांजळपणे मला नमूद करावेसे वाटते.

-श्रीमती चित्रलेखा भोसले
माजी खासदार, नागपूर.

कर्मयोगी

▪ कॅप्टन भीमराव कवठेकर

दिवंगत रा. सू. उर्फ दादासाहेब गवई म्हणजे अजातशत्रू कर्मयोगी. माणूस आणि माणुसकी या दोहोंचा सुरेख संगम त्यांच्या ठायी होता. सामाजिक बांधिलकी त्यांनी सदैव जपली. केवळ आपल्या दलित बांधवांच्या हक्कासाठी व त्यांच्या उध्दारासाठीच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यासाठी त्यांनी खस्ता खाल्या. जीवनभर चारित्र्य आणि नीतिमत्ता जोपासली. व्यक्तिगत जीवन असो वा राजकारण असो त्यांनी त्याला कधीही तडा जाऊ दिला नाही. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, उप सभापती व सभापती म्हणून त्यांची कारकीर्द अविस्मरणीय आहे. विरोधी पक्षनेते, लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य अशी त्यांची राजकीय वाटचाल संस्मरणीय अशीच आहे. बिहार, केरळचे राज्यपाल पद भूषविण्याचा मानही त्यांना मिळाला. संसदीय आयुधांचा समर्पक उपयोग करून या वाटचालीच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी आपला अमीट ठसा उमटविला. सतत ३० वर्षे विधानपरिषदेत राहणे, विविध पदे भुषविणे तेही त्यांच्या पक्षाचा एकही सदस्य विधानसभेत नसताना हा एक जागतिक विक्रमच आहे. याचे एकमेव कारण सर्व पक्षांच्या नेत्यांशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे, मैत्रीचे संबंध.

कै. दादासाहेबांचा जन्म ३० ऑक्टोबर १९२९ रोजी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील दारापूर या खेड्यात झाला. प्राथमिक शिक्षण जन्मगावी घेतले व पुढील शिक्षणासाठी ते अमरावतीला आले. विदर्भ महाविद्यालयातून त्यांनी पदवी संपादन केली. विद्यार्थीदशेतच त्यांनी समाजसेवा सुरू केली. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी व दलितांचे शोषण थांबावे यासाठी त्यांनी लढा दिला. गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, कुष्ठरोग्यांच्या सेवेला वाहून घेतलेले डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्यामुळे ते भारावून गेले. त्यांच्या कार्याचा ठसा त्यांच्या मनावर उमटला.

१९५९ मध्ये दादासाहेब विदर्भ प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या सचिव पदावर आरूढ झाले. सर्व पक्षीय संयुक्त महाराष्ट्र समितीच्या विदर्भ प्रदेशाचे सेक्रेटरी म्हणून त्यांची निवड झाली. या लढ्याच्या वेळी कर्मवीर दादासाहेब गायकवाड, एस. एम. जोशी, क्रांतीसिंह नाना पाटील, काँ. डांगे, आचार्य अत्रे यांच्या संपर्कात ते आले. कर्मवीर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली १९५९ व १९६४ च्या देशव्यापी सत्याग्रहाचे नेतृत्व करून रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले.

दादासाहेबांचे प्रेरणेचे, आदराचे भक्तिस्थान म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध. बुद्धांची करुणा, बाबासाहेबांचा निर्धार या गुणांचा वारसा त्यांनी सदैव जोपासला. नागपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. त्या ठिकाणी दीक्षाभूमीची भव्य वास्तू व्हावी हे बाबासाहेबांचे स्वप्न दादासाहेबांनी प्रत्यक्षात साकारले. त्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. पैसा उभारला, नागपूरची दीक्षाभूमी म्हणजे दादासाहेबांच्या नेतृत्वाची, कर्तृत्वाची व विधायक दृष्टीची जिवंत साक्ष आहे. या जागतिक कीर्तीच्या स्मारकामुळे दादासाहेबांचे नाव अजरामर झाले आहे.

दादासाहेबांनी आपल्या जीवनात जे सत्याग्रह केले त्यात भूमिहिनांचा सत्याग्रह, १९७८ मध्ये दिल्लीतील बोट क्लबमध्ये उपोषणाद्वारे केलेला सत्याग्रह यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. भूमिहिनांचा प्रश्न सुटावा, योग्य ती पडीक जमीन दलित बांधवांना मिळावी यासाठी केलेला सत्याग्रह ऐतिहासिक असाच आहे. विदर्भातून या सत्याग्रहासाठी तीन लाख सत्याग्रही त्यांच्या एका हाकेवर आले होते. अनुसूचित जाती/जमातींना मिळणाऱ्या सवलती नवबौद्धांनाही मिळाव्यात यासाठी स्वतः दादासाहेब उपोषणास

बसले होते. तब्बल १४ दिवस हे उपोषण चालले. श्रीमती इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण यांनी दादासाहेबांची प्रत्यक्ष भेट घेऊन उपोषण सोडण्याची त्यांना विनंती केली. पण त्यांनी ती मान्य केली नाही. शेवटी कृती समिती बोलावली गेली व तीत सर्वानुमते उपोषण सोडण्याचे ठरले व उपोषणाची सांगता झाली. पुढे व्ही. पी. सिंग पंतप्रधान झाल्यावर त्यांनी नवबौद्धांना सवलतीचे दालन खुले केले.

विधानपरिषदेतील आपल्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये दादासाहेबांच्या असंख्य विषयांवरील, समस्यांवरील, दलितांवर होणाऱ्या अन्यायासंदर्भात, राष्ट्रीय प्रश्नांबाबत झालेल्या भाषणांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या भाषणातून त्यांची समाजाबद्दलची कळकळ, दलित, गोरगरीब, महिला, शेतमजूर यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल त्यांनी शासनाविरुद्ध केलेली टीका, सुचविलेले उपाय, मार्गदर्शन, सूचना आजही तितक्याच मोलाच्या आहेत. भिवंडी, पुणे, कल्याण, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबईमध्ये झालेल्या राजकीय दंगलीच्या अनुषंगाने त्यांनी विधानपरिषदेत जी भाषणे केली ती फारच प्रभावी झाली. त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले की आपल्या देशात विविध जाती, धर्म, पंथाचे लोक राहतात. त्यांची भाषा, संस्कृती, धर्मग्रंथ विभिन्न आहेत. गीता, रामायण, ग्रंथसाहेब, कुराण या सर्व ग्रंथांचा सारेजण आदर करतात. पण आपल्या या देशामध्ये विविधतेतून एकता निर्माण करणारा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केला. तो म्हणजे भारतीय घटना. तमाम भारतीय जनतेने या ग्रंथाचा आदर केला पाहिजे. त्याची बूज राखून समता, बंधुभाव, एकात्मता या त्रिसूत्रीचा अंगिकार केला पाहिजे. भारत देश हा सर्व धर्माचा, सर्व पंथांचा, संघटनांचा सर्व जातींच्या लोकांचा देश आहे. तेव्हा सर्वधर्मसमभाव ठेवून सर्वांनीच राष्ट्रीय प्रवाहात सामील होऊन विविधतेतून एकता निर्माण करणे हाच एकमेव पर्याय आहे.

राज्यातील शेती व्यवस्था, टंचाई परिस्थिती, शेतमालाचा भाव, पाण्याचा प्रश्न, शेतमजुरांचे प्रश्न या प्रश्नांबाबत त्यांनी विधानपरिषदेत केलेली भाषणे म्हणजे त्यांना या प्रश्नांविषयी असलेली सखोल जाण. त्या प्रश्नांबाबत त्यांनी ३० वर्षांपूर्वी केलेले मार्गदर्शन, सूचना आजही तितक्याच मोलाच्या व अनुकरणीय आहेत.

विदर्भाकरिता स्वायत्त विकास मंडळ व नागपूर कराराची अंमलबजावणी व्हावी हे प्रश्न त्यांनी विधानपरिषदेत मोठ्या हिरिरीने मांडले व नागपूर शहराला उप-राजधानीचा दर्जा द्यावा ही मागणी त्यांनी तितक्याच तीव्रतेने मांडली. विदर्भातील नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य प्रकारे उपयोग करून अनेक व्यवसाय उभे करता येतील. त्यासाठी काम करावयास हवे याबाबत त्यांनी अनेक उपयुक्त व मोलाच्या सूचना केल्या. पण त्याप्रमाणे आजवर फारसे काही झाले नाही ही दुर्दैवाची बाब होय.

राजकीय व सामाजिक जीवनात कसे वागावयाचे याचा वस्तुपाठ कै. गवई यांनी घालून दिला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. ते अतिशय चतुर धोरणी होते. दूरदृष्टी हा त्यांचा आणखी एक स्वभाव विशेष. समोरच्या माणसाला आपलेसे करून घेण्याचे कसब त्यांच्या ठिकाणी होते व यामुळेच ते राजकीय जीवनात यशस्वी झाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मौलिक विचारधन सर्वसामान्य जनतेपर्यंत नेता यावे यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले त्याला सीमा नाही. त्यांच्याच कल्पनेतून डॉ. बाबासाहेब चरित्रसाधने समिती निर्माण झाली व त्यातून २० खंडांची निर्मिती झाली.

विधानभवनाच्या प्रांगणात महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा उभारण्याचे खरे शिल्पकार दादासाहेब गवईच होते, त्यांचे आणखी एक सामाजिक कार्य म्हणजे वरळी येथे आजी-माजी आमदार, खासदार व मंत्री यांच्यासाठी वरळी सागर को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी स्थापून बांधण्यात आलेल्या भव्य बहुमजली इमारती.

कै. दादासाहेबांनी अनेक देशांना भेट देऊन महाराष्ट्राची शान व मान उंचावली. १९७४ मध्ये कोलंबो येथे २०व्या राष्ट्रकुल परिषदेसाठी ते भारताचे प्रतिनिधी म्हणून गेले. परिषदेनिमित्ताने त्यांच्या श्रीलंकेच्या नेत्याशी घनिष्ठ संबंध आला, हा संबंध लक्षात घेऊन श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांच्यावर भारत-श्रीलंका संबंध सुदृढ करण्याची जबाबदारी सोपविली व दादासाहेबांनी ती यशस्वीरीत्या पार पाडली. १९८४ मध्ये काठमांडू (नेपाळ) आणि १९८८ मध्ये लॉसएंजिल्सच्या जागतिक बौद्ध परिषदेत ते सहभागी झाले. लाओस येथे झालेल्या वर्ल्ड पिस कॉन्फरन्सला विशेष आमंत्रित म्हणून उपस्थित राहण्याचा मान त्यांना मिळाला. भारतीय व्यक्तीला जागतिक पातळीवरील बौद्ध परिषदेच्या अध्यक्ष पदावर विराजमान होण्याचे भाग्य त्यांना लाभले. विविध क्षेत्रांतील सामाजिक कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार लाभले. त्यामध्ये कुष्ठमित्र पुरस्कार, प्रियदर्शनी पुरस्कार, अब्दुल कलाम आझाद पुरस्कार, ईश्वरी देवी पुरस्कार यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

फिफ्थ फाईव्ह इयर प्लॅन इन रिलेशन टू शेड्यूल कास्ट ॲन्ड शेड्यूल ट्राईब, सर्व्हिस प्रिव्हीलेजेस टू शेड्यूल कास्ट, बौद्धांच्या सवलती संपूर्ण कैफियत, कास्ट वॉर ओव्हर रिझर्व्हेशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर डिझर्व्ह थँक्स ऑफ दी कंट्री इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली.

कुठल्याही व्यक्तीचा मोठेपणा, लोकप्रियता तिच्या जन्मावरून ठरत नसते तर त्या व्यक्तीचे संस्कार, आचार विचार, तिची सामाजिक निष्ठा यावरून ठरत असते. याचे एकमेव उदाहरण म्हणजे दादासाहेब गवई. त्यांची विनम्रता, विनयशीलता, अभ्यासूवृत्ती, गोरगरीबांप्रती असलेली त्यांची कणव, तळमळ, वक्तृत्त्व शैली, आदरातिथ्य, शांतपणा व निर्भयता, स्नेहशीलवृत्ती सलोख्याने व सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची वृत्ती, सामाजिक बांधिलकी, संयमी व सामंजस्याची भूमिका यामुळे ते अजातशत्रू कर्मयोगी ठरले.

पुरुषांच्या यशस्वितेत स्त्रीचा मोठा वाटा असतो असे म्हणतात. पुरुषांच्या मागे त्यांची पत्नी सावलीप्रमाणे मागे असते. दादासाहेबांच्या सहधर्मचारिणी श्रीमती कमलाताई यांचा त्यांच्या महानतेत, लोकप्रियतेत, यशस्वी जीवनात सिंहाचा वाटा आहे हे नमूद केले नाही तर त्यांच्यावर ते अन्याय केल्यासारखे होईल. दादासाहेब हे कुटुंबवत्सल होते. आपल्या कामाच्या रगाड्यात, त्यांनी कुटुंबातील सदस्यांकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. कमलाताईंची दादासाहेबांना त्यांच्या समाजसेवेमध्ये तितकीच मोलाची साथ लाभली. त्यांचे एक पुत्र श्री. भूषण, नागपूरला मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती आहेत आणि दुसरे पुत्र, डॉ. राजेंद्र, सामाजिक सेवेत कार्यरत आहेत. त्यांची मुलगी कीर्ती व त्यांचे जावई, श्री. राजेश, उच्च शिक्षित असून सामाजिक व शैक्षणिक कार्यात त्यांचा मोलाचा सहभाग आहे. त्यांची नातवंडे देश-विदेशात उच्च शिक्षण घेत आहेत.

दादासाहेबांबद्दल जितके लिहावे, त्यांच्या समाजसेवेचा व्यक्तिगुणांचा गौरव करावा तेवढा थोडाच ठरेल. २५ जुलै २०१५ रोजी दादासाहेबांचे निधन झाले व देश एका थोर समाजसुधारकास दलित, गोरगरीबांच्या तारणहारास मुकला.

-कवठेकर प्रतिष्ठान,
बांद्रा रेक्लेमेशन, मुंबई.

❑❑

एक अव्वल राजनीतीज्ञ

▪ **ज. वि. पवार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मी आणि राजा ढाले नागपूरला दुसऱ्या वर्गातील अनारक्षित डब्यातून जात असताना मी अर्धवट झोपेत होतो. तेवढ्यात कोणत्यातरी स्टेशनवर झालेला गोंगाट ऐकून मी गाडीच्या दरवाज्याजवळ येऊन उभा असताना शंभर एक लोकांच्या अग्रणी असलेले एक गृहस्थ दिसले. मुडपलेल्या हातावर एक भला मोठा पुष्पहार होता आणि ती व्यक्ती संथपणे परंतु दिमाखदारपणे चालत होती. झिंदाबाद, विजय असो अशा घोषणामुळे माझ्या लक्षात आले की, ही व्यक्ती म्हणजेच रिपब्लिकन पक्षाचे नेते रा. सू. गवई आहेत. ते रेल्वे स्टेशन होते बडनेरा आणि त्या स्टेशनवरून अमरावतीकडे जाणार होते. रा. सू. गवई हे नाव त्या आधी मी अनेकदा ऐकले होते. दलित पँथरच्या स्टेजवरून त्यांच्यावर टीका टिप्पणी सुद्धा अनेकदा केली होती. परंतु त्यांना प्रत्यक्ष पाहत होतो, तो कार्यकर्त्यांच्या गराड्यात, त्यांची ती दमदार पावले एखाद्या राजहंसाच्या ऐटीत पडत होती. हा राजहंस आता शरीराने नष्ट झाला आहे. अत्यंत चाणाक्ष आणि गावठी राजकारणात तरबेज असलेला हा मेट्रोपॉलिटन नेता आता कायमचा नष्ट झाला आहे. परंतु, त्यांचे जय नावाचे राजकारण कित्येक पिढ्यांना मार्गदर्शन ठरले, यात मुळीच शंका नाही.

रा. सू. गवई म्हणजे एका वेळी राम आणि कृष्ण यांचा झालेला हा अनाकालनीय मिलाफ, सूर्यभान गवई या मर्यादित राजकारण्याने आपल्या मुलाचे नाव राम आणि कृष्ण या दोन्ही संकल्पना साकार करणारा ठरावा, या उद्देशाने ठेवले. परंतु आपल्या या पिल्लाची इच्छा वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी पूर्ण केली आणि तीही दादासाहेब गायकवाड या साठ वर्षीय लोकनेत्याला १९६२ मध्ये राज्यसभेचा दरवाजा उघडून. या निवडणुकीत दादासाहेब व बी. सी. कांबळे हे दोन तगडे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते, आश्चर्याची बाब म्हणजे तत्कालीन महाराष्ट्राचे 'साहेब' यशवंतराव चव्हाण यांचे कांबळे यांना समर्थन होते. काँग्रेस पक्षाची मते कांबळे यांना मिळणार असल्यामुळे कांबळे यांचा विजय निश्चित मानला जात होता. याचाच अर्थ काँग्रेस पक्षाची दारे उघडण्याचा पहिला प्रयत्न कांबळे यांनी केला. या निवडणुकीची सर्व सूत्रे रा. सू. गवई यांच्याकडे होती. त्या निवडणुकीतील गवई यांच्या डावपेचामुळे अल्पमताने दादासाहेब निवडून आले. आपला निभाव लागणार नाही, हे दादासाहेबांना माहीत असल्यामुळे त्यांनी निवडणुकीच्या दिवशी मुंबई सोडली. दादासाहेब केवळ ०.३१ मताने निवडून आल्यावर ती बातमी रेल्वे प्रशासनामार्फत कळविल्यानंतर नंतर दादासाहेब मुंबईत परतले. या निवडणूक विजयानंतर गवई साहेबांचे पक्षात प्राबल्य वाढले.

गवई साहेब ३० वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेत सदस्य होते. या काळात ते सभागृहाचे सदस्य, उप सभापती, सभापती आणि विरोधी पक्षनेते म्हणून काम करू शकले. यात महत्त्वाची बाब म्हणजे ही सगळी पदे गवई साहेबांनी उपभोगली ती स्वकर्तृत्वाने. सभागृहात त्यांच्या पक्षाचे सदस्य नसताना ही पदे मिळणे ही बाब तोंडात बोटे घालणारी आहे. काँग्रेस पक्षावर त्यांची एवढी छाप होती की, त्यामुळे उप सभापतिपद विरोधी पक्षाला देण्याचा निर्णय झाला तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी हे पद गवई यांना देण्याचा निर्णय घेतला. विरोधी पक्षीय भलेभले आमदार सभागृहात असताना नाईक यांनी उप सभापती पदाची माळ गवई यांच्या गळ्यात घातली. गवई हे रिपब्लिकन पक्षाचे असले तरी काँग्रेस पक्षाबरोबर त्यांची नैसर्गिक मैत्री होती. 'एकमेका करू सहाय्य' ही नीती गवई यांनी अंगिकारली

म्हणून तर 'वडखळ नाका' प्रकरणी गवई समितीने बॅ. अंतुले यांना तस्करीप्रकरणी निर्दोष ठरविले, त्यामुळे नाईक सरकार सुद्धा वाचले होते.

काँग्रेसबरोबर गवई यांचा असलेला घरोबा लक्षात घेऊन त्यांच्यावर सतत आरोप होत होता आणि तो म्हणजे गवई मागच्या दरवाज्यानेच सभागृहात प्रवेश करणार. खरे तर त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीच्या पहाटे अमरावती लोकसभा मतदार संघात विदर्भातील पंजाबराव देशमुखसारख्या असामीबरोबर झुंज घेतली होती. पंजाबरावांसमोर निवडणुकीला उभे राहणेच हेच मुळी धारिष्ट्यांचे होते. पक्षशिस्त म्हणून गवई साहेब पंजाबरावांशी टक्कर घ्यायला तयार झाले. या निवडणुकीत गवईसाहेबांना एक लाख वीस हजार मते मिळाली, तर पंजाबराव देशमुखांना एक लाख ऐंशी हजार मते मिळवून ते यशस्वी झाले. गवई यांना मिळालेल्या या प्रचंड मतांमुळे त्यांच्या पराभवाचे रूपांतर राजकीय विजयात झाले. सतत विधानपरिषदेतील सदस्य या आरोपाला उत्तर देण्यासाठी १९९६ च्या लोकसभा निवडणुकीला अमरावती मतदार संघात सामोरे गेले आणि त्या निवडणुकीत त्यांनी १५,००४१ म्हणजे २१.०२... मते मिळाली. ही निवडणूक त्यांनी रिपब्लिकन पक्ष डावी लोकशाही आघाडी (मुलायमसिंग यादव) यांच्यामार्फत लढविली. त्यांचा नजिकचा प्रतिस्पर्धी काँग्रेस पक्षाचा होता. या निवडणुकी आधी रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले होते. रिपब्लिकन पक्षाने एकूण अकरा उमेदवार उभे केले होते. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एकूण १३,९४,०५५ म्हणजेच ४.९५ टक्के मते मिळाल्यामुळे रिपब्लिकन पक्षाला २५ वर्षानंतर राज्यस्तरीय मान्यता मिळाली. गवई साहेब पराभूत झाले असले तरी पक्षाला राज्यमान्यता मिळवून देण्यासाठी त्यांनी अपार कष्ट उपसले. या राज्यमान्यता पक्षाला १९९८ साली पुन्हा एकदा निवडणुकीला सामोरे जावे लागले. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने चार उमेदवार उभे केले आणि जगातले आश्चर्य म्हणजे १०० टक्के उमेदवार निवडून आले. प्रकाश आंबेडकर, रा. सू. गवई, रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे हे ते चार उमेदवार होते. या निवडणुकीत गवईसाहेबांना अमरावती लोकसभा मतदार संघात ३,०४,७४६ मते मिळाली. मागील दारानेच निवडून येणारे गवई हे आता समोरच्या दाराने लोकसभेत प्रवेश करते झाले. विरोधकांना त्यांनी चोख उत्तर दिले. काँग्रेसने त्यांना दोन राज्यांचे राज्यपाल बनविले.

गवई साहेब हे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष होते. हा पक्ष म्हणजेच एन. शिवराज, दादासाहेब गायकवाड यांचा पक्ष. रिप. पक्षात फूट निर्माण झाल्यानंतर अनेक नेत्यांनी आपापले पक्ष निवडणूक आयोगाकडे रजिस्टर केले. गवईंना तसा रजिस्ट्रेशनचा प्रश्नच नव्हता. कारण याच नावाने पक्ष नोंदणीकृत होता. त्यामुळे १९९८ च्या निवडणुकीत ए. बी. फॉर्म्स गवई साहेबांच्या सहीनेच वितरित करण्यात आले. म्हणजेच त्यांच्या सहीवरील प्रथमतःच १०० टक्के निकाल मिळाला. १९५७ नंतर लोकसभेत चार खासदारांना प्रवेश मिळाला. हा विजय काँग्रेसच्या युतीमुळे झाला असेलही. परंतु त्या निकालाने रिपब्लिकन पक्षाच्या मुकुटात विजयाचे मोरपीस खोवले.

रिपब्लिकन पक्षाच्या मुकुटात विजयी मोरपिसे खोवण्याचे अनेक प्रकार झाले आणि त्यात गवई साहेब आघाडीवर होते. उदा. रिडल्सचा लढा, नामविस्ताराचा लढा, बौद्धांच्या सवलतीचा लढा. गवई साहेब हे चाणाक्ष नेते होते, समाजाची नाडी ओळखणारे होते. त्यामुळे १९७४ साली त्यांनी फसवे का होईना ऐक्य केले. १९७४ नंतरच्या आंबेडकरी चळवळीत गवई साहेबांबरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. मी त्यांच्या पक्षाचा सदस्य नव्हतो. भय्यासाहेब ते बाळासाहेब आंबेडकर असा माझा प्रवास असताना सुद्धा गवई साहेबांचा माझ्यावर प्रचंड विश्वास होता. या संदर्भातील एक आठवण सांगण्याचा मोह मला आवरता येत नाही. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले होते. अनेक बैठकानंतर रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षीय मंडळ करण्याचे ठरले. एकूण ९ सदस्यांचे हे

मंडळ असावे, असा निर्णय झाला. या सभागृहात मी आणि ढाले सम्यक क्रांती या सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी होतो. आता प्रश्न होता तो नऊ लोकांची नावे जाहीर करण्याचा. जे अध्यक्षीय मंडळात जातील ते समाजाचे मान्यवर नेते ठरतील म्हणून प्रत्येकाला उत्सुकता होती. माझ्या ध्यानीमनी नसताना गवई साहेब उठले आणि म्हणाले ही नावे जाहीर करण्याची जबाबदारी ज. वि. पवार यांनी पार पाडावी, तेच न्याय देतील. बैठकीच्या ठिकाणी ४०-४५ प्रतिनिधी होते. यामधून नऊ नावे जाहीर करणे ही तारेवरची कसरत होती. गवई साहेबांनी माझ्यावर विश्वास टाकल्यामुळे मी ज्या क्रमाने नावे जाहीर केली, त्यांचा क्रम असा होता. प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, रा. सू. गवई, बापूसाहेब कांबळे, घनःश्याम तळवटकर, राजा ढाले, प्रा. जोगेंद्र कवाडे, नामदेव ढसाळ, टी. एम. कांबळे, छातीवर मणामणाचे ओझे देऊन ही नावे जाहीर करीत असताना समाजातले पाठबळ, पक्षातील अनुभव, १ जानेवारी, १९५७ चे पहिले अध्यक्षीय मंडळ या सगळ्यांचा मी विचार केला होता. त्यामुळे या समितीत समावेश केला नाही म्हणून माझ्या अंगावर प्रा. अरुण कांबळे धावून आले. डी. पी. कांबळे, गंगाधर गाडे, वा. को. गाणार वगैरेंनी नाराजी व्यक्त केली. दहावे नाव मोघा यांचे होते. ते पुण्याच्या सभेत जाहीर करण्यात आले. माझ्यावर विश्वास टाकण्याचा आणखी एक प्रसंग. दादरला प्रीतम या हॉटेलमध्ये आम्हा प्रमुखांची बैठक होती. जेवणे आटोपल्यानंतर आठवले हे बी. सी. कांबळे ज्या ट्युनिंगमध्ये बोलतात, तसे बोलले आणि मग बापूसाहेबांचा एकाकी पारा चढला. त्यांचा रक्तदाब वाढला. परिस्थिती आणीबाणीची होती. एवढ्यात गवईसाहेब म्हणाले, ज. वि. ने बापूसाहेबांना घरी न्यावे. अनेकांच्या गाड्या होत्या. परंतु मी गवई यांच्या सुचनेनुसार बापूसाहेबांना टॅक्सीने घरी नेले. बरोबर त्यांची मुलगी होती. मोबाईल नावाचा प्रकार नव्हता. तास-दीड तासाने सगळे नेते त्यांच्या घरी आले. बापूसाहेबांचे आणि माझे संबंध लक्षात घेऊन ती सूचना करण्यात आली.

गवई साहेबांनी मला अनेकदा घरी बोलविले. मी नकारच देत राहिलो. अखेर एके दिवशी मान्यता दिली. गवई साहेब तेव्हा 'पूर्णा' वर होते. मी दिलेली वेळ टळून गेली. माझ्या बरोबर करुणा आकरे होते. आम्ही तेथे गेल्यावर कळले की 'आता ते भेटू शकणार नाहीत.' मी निरोप्याला सांगितले की, माझे फक्त नाव सांगा त्यांनी होय म्हटले तर भेटेन. गवई साहेबांनी होकार दिला. आमची दीड तास मनसोक्त चर्चा झाली.

काही दिवसांपूर्वी मी पक्षीय कामासाठी अमरावतीला गेलो. तेथे गेल्यावर गवईसाहेब आजारी असल्याचे कळले. मी त्यांना भेटण्याचा निरोप पाठविला. अभ्यंकरांनी मला होकार कळविला. परंतु त्यांची प्रकृती बिघडली व त्यांना नागपूरला डॉक्टरांकडे न्यावे लागले, माझी भेटही झाली नाही. हुरहुर राहिली. एका राजहंसाला भेटू शकलो नाही. आंबेडकरी समाज एका अव्वल राजनीतीज्ञाला मुकला हेच खरे !

-आंबेडकरी चळवळीतील विचारवंत.

(साभार दैनिक महानायक).

❑❑

रोजगार हमी योजनेची जन्मकथा

रोजगार हमी योजनेला जन्म देत असताना कै. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री होते. पागे सभापती आणि मी त्यांच्या हाताखाली उप सभापती म्हणून होतो. आमच्या तिघांच्या मिळून कितीतरी डझन बैठका झाल्या असतील. ते सभापती आणि मी उप सभापती असलो तरी उप सभापती म्हणून काम न करता त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून मी काम करीत असे. त्यांनी डिक्टेशन द्यावयाचे व त्याचा ड्राफ्ट करून त्यांना द्यावयाचा व मग ते दुरुस्त करून पुन्हा ड्राफ्ट करून द्यायचे. याच्यातून या रोजगार हमी योजनेचा जन्म झाला असून पागे साहेबांनी मोठ्या कल्पकतेने ही योजना तयार केली आणि मग या योजनेचा मसुदा नागपूर अधिवेशनात एकमताने पास झाला.

-रा. सू. गवई



अज्ञातशत्रू...

□ कौटुंबिक जिव्हाळा

राजकारणाच्या धकाधकीतही दादासाहेबांनी कौटुंबिक जिव्हाळा जपला. पुत्र, पती, पिता, बंधू, मित्र अशी विविधांगी कौटुंबिक नाती जपतांना त्यातील वैविध्य दादासाहेबांनी कसे राखले ते या लेखांतून आपल्याला जाणवेल. अंतरीच्या उमाळ्यातून त्यांच्या सुहृदांनी लिहिलेले हे लेख आहेत. यातही काही तत्कालीन संदर्भ आहेत.

निवडक क्षण...

माजी मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक, मा. वसंतदादा पाटील

माजी सभापती मा. जयंतराव टिळक व मा. सूर्यभानजी वहाडणे

माजी मुख्यमंत्री मा. श्री. शरद पवार व माजी उपाध्यक्ष मा. श्री. ढाकणे

श्रीमती कमलताई सोबत शुभमंगल

माजी विधानपरिषद सभापती व गुरुवर्य वि. स. पागे

कौटुंबिक आनंदाचा क्षण

माझे साहेब

ओळख माझी झाली, तुमच्यामुळे जगाला।
जसा फुलांसवे येतो, सुगंध मातीला।।

▪ डॉ. कमल रा. गवई

अगदी हेच माझ्या जीवनात साहेबांमुळे घडलेले आहे. माझ्या जीवनात घडलेले प्रत्येक स्थित्यंतर ह्यांच्याच मुळे झाले आहे. मला घडविणारे माझे साहेब आज नाहीत ही कल्पनाच सहन होत नाही. ही जरी वास्तविकता असली तरीही मन मानायला तयार होत नाही. असं वाटतं हे मी स्वप्न पहात आहे. वाटतं, आता साहेब येतील आणि मला नेहमीप्रमाणे विचारतील 'झोपली होतीस का? जेवलीस की नाही? की तशीच झोपली?' आणि मग काही तरी विनोदाचं बोलून आपल्या उशिरा येण्याच्या चुकीवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतील. खरं सांगायचं तर त्यांच्या दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमांमुळे असं होणारच हे मला पटलेले होते आणि मी कोणत्याही कारणास्तव त्यांच्यावर कधीही रागावले नाही. हे सर्व माझ्या मनातल्या मनातच चालत होतं आणि दुसऱ्याच क्षणी मग सत्य परिस्थितीची जाणीव होत होती. ज्यांच्या प्रेमळ छत्राखाली मी आजपर्यंत सुखी, समाधानी, आनंदमय जीवन जगले ते छत्र आता काळाने हिरावून नेले आहे ह्या जाणिवेने त्यांच्या विरहाचा दाह मनाला व शरीराला असह्य वेदना देतो. अशा विषण्ण परिस्थितीतही मी आता स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थात हे घडत आहे तेसुद्धा साहेबांच्या शिकवणीमुळेच! माझे साहेब मला नेहमी म्हणायचे-आपलं दु:ख कधीच उगाळत बसू नये. जितकं उगाळलं तितकं ते क्लेशदायक होतं. त्यापेक्षा ज्यांच्यामुळे आपण दु:खी होतो, त्यांचे विस्मरण होऊ न देता, त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्णत्वास नेण्यास प्रयत्न केला तर दु:खाची दाहकता तर थोडीफार का होईना कमी होतेच, पण त्याचबरोबर एक मानसिक समाधानही आपल्याला मिळते. ते नेहमी एक उदाहरण द्यायचे. म्हणायचे-हे बघ, माझे श्रद्धास्थान असलेले डॉ. बाबासाहेब, माझे गुरू असलेले दादासाहेब गायकवाड मला सोडून गेले. त्या वेळी माझे दु:ख अनावर झाले होते, मनाने मी खचलो होतो, पण तरीही मी स्वत:ला सावरले आणि त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य माझ्या परीने पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे थोडाफार का होईना पण दु:खाचा दाह कमी होतोय आणि समाधानही मिळतेय. मला वाटते हीच खरी दिवंगत आत्म्याला श्रद्धांजली ठरावी. त्यांचे बोल मला अजूनही आठवतात. त्यामुळेच मी स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करतेय आणि त्यांच्याच प्रमाणे समाजोन्नतीच्या कार्यास स्वत:ला वाहून घेत आहे. कधी-कधी असं वाटतं की, भविष्यात माझ्यावर अशी वेळ येणार आहे आणि मला हे समजावयाला आपण नसू ह्याची पूर्वकल्पना तर त्यांना नव्हती ना? असेही असू शकते, कारण भविष्याचा अचूक वेध घेण्याची क्षमता साहेबांमध्ये पूर्णपणे होती.

साहेबांमुळे माझ्या जीवनात झालेल्या स्थित्यंतराची सुरुवात आमच्या लग्नापासूनच झाली. मूर्तिजापूरच्या श्री. सुदामदेव व मालनबाई इंगळे यांची मी मुलगी! मला एक मोठा भाऊ व दोन बहिणी! माझे वडील जीनात कामावर जायचे. मला लहानपणापासूनच घरकामाची व त्याचबरोबर शाळेतील

विविध कार्यक्रमांत भाग घेण्याची खूप आवड होती. माझी दिनचर्या सकाळी ४-४.३० वाजल्यापासूनच सुरू व्हायची. सकाळी उठल्याबरोबर विहिरीचे पाणी भरणे, सडा-सारवण, घरातील स्वच्छता, भांडी घासणे, कपडे धुणे, आईला स्वयंपाकात मदत करणे, बाबांचा व घरातील सर्वांचा चहा, नाश्ता व आलेल्या पाहुण्यांची सरबराई, नंतर शाळा. शाळेतून आल्यावरही नित्याची कामे असायचीच आणि नंतरच मला अभ्यासाला वेळ मिळायचा. एकदा अगदी पहाटेसच म्हणजे ५-५.३० वाजताच साहेब शृंगारे साहेबांचे बरोबर घरी आले. मी नुकतीच घराबाहेर सडा टाकून घरात आले होते. बाबांनी मला पाहुण्यांसाठी चहा-फराळाचे करायला सांगितले. मी त्याप्रमाणे केले. चहा-फराळानंतर ते तिघेही बाहेर गप्पा मारीत बसले आणि मी घरात कामाला लागले. मला त्या वेळी साहेबांच्या आमच्याकडे येण्याने खूप आनंद झाला होता. ते मला अगदी मनापासून आवडायचे. त्यांच्याशी आपली ओळख व्हावी, त्यांच्याशी चर्चा करावी असे खूपदा वाटायचे. एखाद्या तरी कार्यक्रमात त्यांचे मी त्यांना हार घालून स्वागत करावे ही माझी इच्छा तर, मी एकदा माझ्या आईलाही बोलून दाखवली होती आणि आता तेच प्रत्यक्ष घरी आल्याने आनंद होणे स्वाभाविकच होते. थोड्या वेळाने मला माझ्या बाबांनी बाहेर बोलावले, शृंगारे साहेबांनी मला खुर्चीत बसायला सांगितले. अवघडतच मी खुर्चीत बसले. शृंगारे साहेबांनी व त्यांनीही मला बरेच प्रश्न विचारले. त्या वेळी आमच्या समाजात मी पहिलीच मूर्तिजापुरातून मॅट्रिक पास झालेली असल्याने माझे खूप कौतुक होत होते. माझा एकदा सत्कारही झाला होता. त्यातलाच हा प्रकार असावा व प्रश्न विचारणारे प्रत्यक्ष गवई साहेब त्यामुळे मी जरा जास्तच हुरळून गेले होते व त्या आनंदाच्या भरातच मी विचारल्या गेलेल्या प्रश्नांना बिनधास्तपणे उत्तरे देत होती. बोलण्याच्या भरात मला शिक्षणाची खूप आवड आहे पण इथे मॅट्रिकनंतर शिक्षणाची सोय नाही आणि बाहेरगावी वसतिगृहात पाठविण्याची माझ्या बाबांची इच्छा नाही व तशी आर्थिक परिस्थितीही नाही हे सांगायला मी विसरले नाही. बोलत असतानाच साहेबांच्या पँटवर चिमणीने घाण केली आहे हे माझ्या लक्षात आले. मी लगेचच बाबांचे धोतर त्यांना नेसायला देऊन, पँट साफ करून, त्यावर इस्त्री करून त्यांना नेसायला दिले. काही वेळाने दोघेही परत जायला निघाले. बाबा त्यांना स्टँडवर पोचवायला गेले. बाबा जेव्हा परत आले तेव्हा त्यांचा चेहरा अत्यानंदाने ओथंबून दिसत होता. आल्या आल्याच त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. 'नशीब काढलंय पोरी' म्हणाले व आईला सांगितले "अग आपल्या कमलला गवई साहेबांनी पसंत केले आहे. त्यांनी तिला लग्नाची मागणी घातली आहे. गवई साहेब माझे जावई होणार आहेत." हे सर्व बोलत असतांना त्यांचा गळा अत्यानंदाने दाटून आला होता. मी सहजच बाबांच्या चेहऱ्याकडे बघितले. त्यांच्या डोळ्यांतून निघत असलेले आनंदाश्रू आता त्यांच्या गालावरून ओघळत होते. मला तर हे खरेच वाटेना. माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना. पहिली गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे माझा त्या वेळचा अवतार! सकाळी उठल्यावर तोंड धुताना सहजच फिरला गेलेला पाण्याचा हात, केसांमधून कंगवा न फिरवल्याने विस्कटलेले केस, सडा सारवण करताना साडीच्या काठांना लागलेले मातीचे डाग! कसे काय पसंत केले मला साहेबांनी? मला काही केल्या खरे वाटेना. शेवटी आईला एकटे गाठून मी विचारलेच, "आई, खरंच मला साहेबांनी पसंत केलं?" उत्तरादाखल तिने माझ्याकडे प्रेमाने पाहिले आणि मला घट्ट मिठीत घेऊन कुरवाळलं आणि त्याबरोबर साहेबांनी माझ्या जीवनातील पहिलं स्थित्यंतर घडवलं!

त्यानंतर लवकरच आमचे साक्षगंध झाले. ते देखील अगदी साध्या समारंभात! माझ्या शिक्षणाच्या आवडीची नोंद साहेबांनी गंभीरपणे घेतलेली होती. साक्षगंधानंतर लगेचच त्यांनी मला कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला व माझ्या

निवासाची व खाण्यापिण्याची सोय, महिला वसतिगृहात करून दिली. अर्थात माझा हा शैक्षणिक खर्च तेच भागवीत होते. प्रथम मी, प्री-युनिवर्सिटी नंतर बी. ए. पार्ट वन, नंतर डी. एड., बी. ए. व राज्यशास्त्र या विषयातून एम.ए. केले.

२९ नोव्हेंबर १९५९ रोजी आमचा बौद्ध विवाह पद्धतीने विवाह झाला. विवाह समारंभ म्हणजे एक महासभाच होती. हुंडा, मानपान, दागिने ह्या प्रचलित प्रथांना फाटा देण्यात आला होता. आर्थिक परिस्थितीमुळे सर्वांना पाठवू शकू, इतक्या पत्रिका छापणेही शक्य नसल्याने काही प्रतिष्ठित व्यक्तींना व 'गावाला एक' या हिशोबानेच पत्रिकांचे वाटप करण्यात आले होते. अहेर, प्रेझेन्ट स्वीकारले जाणार नाही तेव्हा कृपया कुणी काही आणू नये, ही सूचना- वजा विनंती आधीच सर्वांना कळविण्यात आली होती. आपण कुणाला काही देऊ शकत नाही, तेव्हा त्यांच्याकडून घेण्याचा काय अधिकार? हीच त्यामागची भावना होती. सभोवतालच्या गावातीलच नव्हे, तर ज्यांना साहेबांच्या लग्नाविषयी कळले ते सर्व लोक मिळेल त्या साधनांनी व साधन न मिळाल्यास पायीच आपआपल्या शिदोऱ्या घेऊन लग्नसोहळ्यात उपस्थित होते. लग्नाला जाताना आपल्या शिदोऱ्या बरोबर घेऊन जाण्याचा हा प्रकार, मला वाटते इतिहासातीलही पहिलाच असावा. गवई साहेब म्हणजे दलित चळवळीतील आमचे 'हिरो' होते. त्यांना एखाद्या समारंभात कार्यक्रमात हार एक घालता आला पाहिजे ही मनातील इच्छा होती. हे मनीचे गुज मी कधीतरी आईला सांगितले होते. मी लग्नासाठी हार हातात घेऊन उभी होती. आईला नेमके ते या क्षणी आठवलं. आई म्हणाली, "तुला दादासाहेबांना हार घालायचा होता आता घालून घे". आईचे वाक्य पूर्ण होताच सर्वत्र हास्याचा कल्लोळ झाला व मी मग लाजेने चूरचूर झाली.

लग्न समारंभ पार पाडून आईवडिलांचा आशीर्वाद, कुटुंबातील सर्वांचा प्रेमळ निरोप व सर्व उपस्थितांच्या शुभेच्छा घेऊन आम्ही गृहप्रवेश केला. घरात वसंतराव व विश्वासराव हे दोघे दीर, सोनूताई ही नणंद होती. माझे सासू-सासरे दारापूरला राहायचे. मधून-मधून ते यायचे पण कालांतराने तेही आमच्याबरोबर इथे म्हणजे अमरावतीतच रहायला आले. फ्रेजरपुऱ्यातील एका लहानशा पण स्वत:च्या घरात आमचा सुखी संसार सुरू झाला.

माझ्या सासरची आर्थिक परिस्थिती जेमतेमच होती. सर्व कामे घरच्यांनीच करायची. घरगडी किंवा मोलकरणी हे ऐकीव शब्द होते. माहेरीच सर्व कामांची मला सवय असल्याने सासरी मला कुठलीच अडचण भासली नाही. घरातही नेहमी आनंदी वातावरण असायचे. राग-लोभ, हेवा-दावा ह्या आपसात फूट पाडणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींना माझ्या घरात थारा नव्हता. 'मोठी वहिनी' म्हणून माझे दीर, नणंदा माझी गंमत करायचे, मला चिडवायचे-पण मला मात्र त्याचा कधीच राग आला नाही. उलट प्रसंग साधून त्यांचीही गंमत करून माझ्याशी केलेल्या गमतीची परतफेड करायची. माझे सासू-सासरेही माझ्याशी आपली सून नव्हे, तर मुलगीच समजून प्रेमाने वागायचे. मी देखील त्यांना माझ्या आई-बाबांप्रमाणेच मान द्यायची. घरातील अशा या प्रेमळ वातावरणामुळे माहेर-सासर असा भेद मला कधीच जाणवला नाही. आमच्या घरात पाहुणा आला नाही, असा दिवस तर सोडाच पण सांजही कधी गेली नाही. कधी-कधी तर साहेब रात्री कार्यक्रम, सभा संपवून घरी येताना कुणाला तरी बरोबर घेऊनच यायचे! 'चला घरी जाऊ, जेवून जा' हे वाक्य त्यांच्या मित्रांना, कार्यकर्त्यांना परिचयाचेच झाले होते. मग रात्री पाहुण्यांसाठी परत स्वयंपाक करावा लागायचा. परिस्थितीनुरूप पाहुणचार करावा लागायचा. यासाठी मला घरातील सर्वच घटक मदत करायचे. हे सर्व नेहमीचंच होतं, त्यामुळे अंगवळणी पडलं होतं. आमच्या घराचं वैशिष्ट्य होतं 'आमच्याकडे पाहुणा उपाशी यायचा पण उपाशी गेला मात्र कधीच नाही' ही प्रथा आजतागायत चालू आहे. पक्षाची, समाजाची उन्नती करण्याचे काम दिवसरात्र करीत असताना त्यांनी आपल्या कुटुंबाकडे मात्र

कधीच दुर्लक्ष केले नाही. वसंतराव, विश्वासराव ह्यांना फक्त शालेय शिक्षणापर्यंत मर्यादित न ठेवता उच्च शिक्षित करून त्यांना त्यांचा स्वतःचा संसार व आपले उज्ज्वल भविष्य घडविण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण केली. त्या वेळची एक घटना मला आठवते. विश्वासरावांना डॉक्टर व्हायचे होते. काही टेक्निकल अडचणींमुळे त्यांना मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नव्हता. आपल्या भावावर झालेला अन्याय त्यांना सहन झाला नाही. त्यांनी हायकोर्टात रीट अर्ज दाखल केला व तिथेच पायऱ्यांवर उपोषणाला बसले. गवई साहेबांची मागणी रास्त आहे, असे कॉलेज मॅनेजमेंटच्या लक्षात आले व त्यांना मेडिकलमध्ये प्रवेश मिळाला. भावांप्रमाणेच साहेबांनी आपल्या बहिणींनाही सुशिक्षित केले. त्यांना योग्य वर निवडून दिला. बहीण-भावांना सुशिक्षित करून त्यांची लग्नं लावून देऊन, त्यांना स्वावलंबी करून, त्यांचा संसार थाटून देईपर्यंतचे सर्व कार्य साहेबांनीच केले. पण हे सर्व काही करीत असताना केवळ आपण आपले कर्तव्य पूर्ण करीत आहोत ही संकुचित भावना नव्हती, तर आपल्या बहीण-भावंडांवर त्यांचे अमाप, निःस्वार्थ प्रेम होते. त्यापोटीच त्यांनी हे सर्व काही केले. आपल्या आई-वडिलांवर त्यांची अपार श्रद्धा होती. रात्री घरी आल्यावर प्रथम ते आई-बाबांना भेटत असत. ते झोपलेले असतील, तर पानावर बसल्यावर पहिला घास घेण्यापूर्वी 'आई-बाबा जेवलेत का?' त्यांच्या तब्येतीची चौकशी केल्याशिवाय ते कधीच जेवले नाहीत. आई आजारी असल्याचे कळताच साहेब हातातले काम सोडून मुंबईहून अमरावतीला आले होते. आईवर योग्य औषधोपचार चालू आहेत ह्याची खात्री करून घेतली. स्वतः तिथे थांबून आईची सेवा केली व त्यांना बरे वाटल्यावरच साहेब मुंबईला परतले. वसंतरावांच्या लग्नात आपल्या बाबांच्या आठवणीने ते गहिवरले होते. आयुष्यभर त्यांनी आई-बाबांचे विस्मरण कधीच होऊ दिले नाही. जेव्हा-जेव्हा त्यांना आठवण यायची तेव्हा-तेव्हा त्यांचे डोळे पाणावलेले मी बघितले आहेत.

बहीण-भावंडाची शिक्षणाची, लग्नाची व सर्व जबाबदारी पूर्ण करतानाच माझ्या शिक्षणाच्या आवडींकडे त्यांनी दुर्लक्ष होऊ दिले नाही. माझ्या शिक्षणाची सुरुवात तर आमचे साक्षगंध झाल्याबरोबरच मला प्री-युनिवर्सिटीमध्ये प्रवेश मिळवून देऊन वसतिगृहात माझी राहण्याची खाण्या-पिण्याची फी पासून शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यापर्यंत सर्व त्यांनीच केली होती. मी प्री-युनिवर्सिटी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले, त्या वेळी साहेबांनी माझे अभिनंदन केले व मला म्हणाले, "ही तुझ्या शिक्षणाची सुरुवात आहे. अजून तुला खूप शिकायचे आहे." त्यांचे हे म्हणणे त्यांनी खरे करून दाखवले. त्यानंतर मी बी.ए. पार्ट वन, डी.एड., बी.ए., बी.एड. झाले. नंतर मी राज्यशास्त्र विषय घेऊन एम.ए. झाले तेव्हा त्यांनी माझे खूप कौतुक केले. मला म्हणाले, "तुझ्या यशाबद्दल मला तुझा अभिमान वाटतो. माझी अजून एक इच्छा आहे, ती तू पूर्ण करावीस असे मला वाटते." आता आणखी काय? ह्या आश्चर्यात मी ह्यांना काय इच्छा आहे हे विचारले. त्यावर ते म्हणाले, "तुझ्या आवडीचा विषय निवड. त्यावर संशोधनात्मक अभ्यास कर व प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळव." हे सर्व मला कसं जमेल ह्या चिंतेतच मी त्यांना होकार दिला. त्यानंतर मी खूप विचार करून, मी माझे आवडते कार्य-जे मी अखंड करीत आहे ते म्हणजे 'विपश्यना' हा विषय निवडला. 'राजकारण आणि प्रशासनामध्ये विपश्यनेचे महत्त्व-एक चिकित्सक अध्ययन' ह्या विषयावर मी सखोल अभ्यास केला. अनेक पुस्तके वाचली, अनेकांची मते जाणून घेतली, त्यावर चिंतन मनन केले आणि प्रबंध लिहायला सुरुवात केली. थोडा कालावधी लागला, पण मनासारखा तो पूर्ण झाल्यावर माझ्या सर्व मार्गदर्शकांना दाखवून तो अमरावती विद्यापीठात सादर केला. माझ्या भाग्याने माझ्या मेहनतीला उत्तम फळ मिळाले. परीक्षकांच्या पसंतीला उतरून माझा प्रबंध स्वीकारण्यात आला व विद्यापीठाकडून मला डॉक्टरेट ही सन्माननीय पदवी बहाल

करण्यात आली. मला खूप आनंद झाला. डॉक्टरेट मिळवण्याच्या आनंदापेक्षा मला, मी माझ्या साहेबांची इच्छा पूर्ण केली ह्याचा आनंद शतगुणित होता. त्यांनाही खूप आनंद झाला. त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाबरोबरच माझ्यावर असलेला विश्वास स्पष्टपणे मला जाणवला. हीच माझ्या वरील त्यांच्या विश्वासाची, यशाची, माझ्यासाठी खरी पावती होती आणि ती पावती सर्वांकडून माझ्यावर झालेल्या अभिनंदनाच्या वर्षावापेक्षा सर्वात श्रेष्ठ होती. एक सत्य मात्र इथे प्रामाणिकपणे मी नमूद करते की, माझी शिक्षणाची इच्छा साहेबांनीच पूर्ण केली. शिक्षणासाठी मी घेतलेले श्रम हे केवळ निमित्त मात्र होते, त्याचे खरे श्रेय साहेबांकडूनच मला मिळालेल्या प्रेरणेला, त्यांच्या मार्गदर्शनाला, माझ्या वरील विश्वासाला आणि त्यांच्या सक्रिय मदतीलाच आहे.

बहीणभावांच्या व माझ्या शिक्षणाबरोबरच आपल्या मुलांच्या बाबतीतही ते सदैव जागरूक होते. आम्हाला तीन मुले. मोठा भूषण, मधला राजेंद्र व धाकटी कीर्ती. मुलांना फक्त सुशिक्षितच नव्हे, तर त्यांना सुसंस्कृत व स्वावलंबी बनविण्याकडेही त्यांचा ओढा होता. त्या वेळच्या आर्थिक परिस्थितीमुळे आमच्या मुलांचे खूप लाड आम्ही करू शकलो नाही. कधी-कधी वाटतं की एका दृष्टीने ते बरेच झाले. त्यामुळेच फाजील लाडामुळे आमची मुले इतरांप्रमाणे बिघडली नाहीत, उलट परिस्थितीची जाणीव व त्यानुरूप वागण्याची सवय त्यांना बालपणापासूनच आली. पण तरीही त्यांचे वयानुरूप बालहट्टही आम्ही पूर्ण करू शकत नाही, त्याचे खूप वाईट वाटायचे. त्यांना त्यांच्या मागणीला 'नाही' म्हणताना आपण आपल्या मुलांप्रती कठोर होत आहोत असे वाटायचे, पण इलाज नव्हता. आमची मुले अमरावतीला असताना नगरपालिकेच्या शाळेत शिकली हे आज कुणाला सांगूनही खरे वाटणार नाही. आम्ही मुंबईला गेल्यावरच त्यांना इंग्रजी माध्यम व चांगल्या शाळेचे दर्शन घडले. मुलांना स्वावलंबनाचे, शिस्तीचे धडे आम्ही त्यांना बालपणापासूनच दिले. ह्यांच्या कामाच्या व्यस्ततेमुळे मुलांकरिता त्यांना द्यावासा वाटावा तितका वेळ देता येत नव्हता, पण तरीही जेव्हा केव्हा वेळ मिळेल तेव्हा तेव्हा मुलांना एकत्र बोलावून त्यांच्याशी गप्पा मारायचे. त्यांना बोलतं करून त्यांच्या अडचणी, मागण्या जाणून घ्यायचे. त्यात मी बऱ्याच वेळा त्यांच्या मागण्यांना नकार देत असल्याने माझ्या विषयी तक्रारीही असायच्या! त्या वेळी हे माझ्यावर खोटे-खोटेच रागवायचे पण नंतर हळूच मी का रागावले, असे मी का नाही म्हटले हे त्यांना पटवून द्यायचे. हे सर्व मुलांना अशा पद्धतीने समजवायचे की ते सर्वांना पटायचे आणि काही वेळेपुरते का होईना मुलांचे माझ्या बाबतीत हृदयपरिवर्तन व्हायचे! मुलांना असाच वेळ देऊन त्यांच्याशी गप्पा मारतांना पाहून मला खूप आनंद व्हायचा. वाटायचं असाच वेळ ह्यांनी सदैव द्यावा. असंच कौटुंबिक वातावरणात रममाण व्हावे. पण संपूर्ण समाजालाच आपलं कुटुंब मानून त्यांच्या सुखसोईसाठी व उन्नती करण्याचे कांकण बांधलेल्या साहेबांना केवळ आपल्या कुटुंबापुरतेच मर्यादित राहणे शक्य होणार नाही व असा स्वार्थी विचार कधीही त्यांच्या मनाला शिवणार देखील नाही ह्याची मला खात्री असल्याने जे पदरात पडेल तेवढ्यावरच मी समाधान मानायची! आज भूषण हायकोर्टाचा न्यायमूर्ती ह्या सन्माननीय पदावर आहे. राजेंद्र डॉक्टर झाला आहे. पण डॉक्टरकी न करता, ह्यांनी हाडाची काडं आणि रक्ताचे पाणी करून वाढवलेल्या, जोपासलेल्या त्यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची धुरा सांभाळतो आहे. कीर्ती उच्चशिक्षित असून ती स्वतःची प्लेसमेंटची कंपनी सांभाळते आहे. हे सर्व जे घडलेले आहे, ते सर्व साहेबांमुळेच, असे म्हणणे म्हणजे मुलांच्या स्वकर्तृत्वाला डावलण्यासारखे होईल, पण एवढे मात्र खरे की हे सर्व आमच्या मनासारखे घडविण्यात साहेबांचा सिंहाचा वाटा आहे. एका गोष्टीचा आम्हाला अभिमान वाटतो की सर्वांनीच स्वप्रयत्नानेच यश मिळवलेले आहे. त्याकरिता त्यांनी आपल्या दादांच्या पदाचा व प्रतिष्ठेचा आधार घेतला नाही.

एचबी ११८०—११

ह्यांनी आपल्या पदप्रतिष्ठेने मुलांना पुढे आणले, हा ठपका साहेबांवर पडू दिला नाही. साहेब आपल्या कुटुंबाच्या बाबतीत अतिशय भावुक होते. भावांकडील बहिर्णींकडील, स्वत:च्या कुटुंबातील सदस्यांच्या अडचणीच्या वेळी साहेब धावून गेले आणि मदत केली. नुसते स्वत:च्या कुटुंबातील सदस्यांपुरतेच न राहता पक्षाच्या कार्यकर्त्यांपैकी कोणत्याही कार्यकर्त्यांच्या अडचणीच्या वेळी त्यांनी सढळ हाताने मदत केली. केवळ आपल्या कार्यकर्त्यांपुरते मर्यादित न राहता कोणत्याही व्यक्तीला मदतीची आवश्यकता भासल्यास, तो कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या जातीचा याचा विचार न करता त्यांनी मदत केली. त्यांनी भेदभाव कधीच केला नाही. सर्व कार्यकर्त्यांना हे आपल्या कुटुंबाचेच सदस्य मानायचे. त्यामुळे आमचे कुटुंब मर्यादित नव्हते, तर 'वसुधैव कुटुंबकम्' च होते.

साहेबांची खाण्यापिण्याचीही आवड अगदी सामान्य होती. ह्यांना जेवणात सर्वच पदार्थ आवडायचे व ते सर्व पदार्थ चवीने खायचे. तसे भाजीमध्ये कारले, भेंडी, पालेभाजी, सुके बेसन, वांगे बटाट्याची भाजी व वांग्याचे भरीत, मेथीची भाजी हे त्यातल्या त्यात प्रिय होते. नॉन वेज देखील ते आवडीने खायचे. जेवढा त्यांच्या खाण्याच्या बाबतीत साधेपणा तेवढाच पोशाखाचाही होता. भपकेबाज पोषाख त्यांना आवडत नव्हता. पोशाख नेहमी स्वच्छ धुतलेला व वळ्या पडलेला नसावा, एवढीच त्यांची अपेक्षा होती. त्यांचा स्वभावही अगदी साधाभोळा होता. रागीट नव्हता. कधी-कधी एखाद्या व्यक्तीने अक्षम्य चूक केली तर ह्यांनाही राग यायचा, एखाद वेळी रागावायचेही ! ह्यांची राग व्यक्त करण्याची पद्धतही आगळीवेगळी होती. एक तर त्या व्यक्तीशी ते बोलतच नव्हते. हे बाहेरच्याच बाबतीत नव्हते तर घरातही होते. त्यांनी अबोला धरला की समजून जावे की त्यांच्या मनाविरुद्ध काहीतरी घटना घडलेली आहे आणि त्यांना राग आला आहे. पण तो राग जास्ती काळ मात्र टिकत नव्हता. लवकरच हे शांत व्हायचे. मग ज्या व्यक्तीची चूक झाली आणि हे ज्याच्यावर रागावले त्या व्यक्तीला ते परत बोलवायचे व त्याला समजावयाचे- अरे, असे वागत-बोलत जाऊ नका की ज्यामुळे समोरच्या व्यक्तीला राग येईल. पुन्हा असे होऊ देऊ नका. बस एवढेच बोलायचे ! एवढेच सांगायचे. मग एकदम शांत म्हणजे ऑल राइट. आम्ही सर्व त्यांच्या रागापेक्षा त्यांच्या अबोल्यालाच घाबरत असू ! कपड्याच्या स्वच्छतेबरोबरच शरीराच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणारेही त्यांना अजिबात आवडत नव्हते. रोज दाढी, आंघोळ न करणे, तोंडाचा घाणेरडा वास, विस्कटलेले केस अशी व्यक्ती जर त्यांना भेटायला आली, तर हे त्यांचेशी तुटकपणेच बोलायचे. हे नेहमीच म्हणायचे, प्रत्येकाने आपले मन व शरीर स्वच्छ ठेवावे म्हणजे अर्धे दुखणे दूर होते.

साहेबांचा स्वभाव अत्यंत मिस्कील होता. मिस्कीलपणे म्हणजे विनोदाने बोलून रागात असलेल्या व्यक्तीचा राग शांत करण्याचे एक अजब सामर्थ्य त्यांच्या स्वभावात होते. त्याच युक्तीच्या साहाय्याने हे समोरच्या व्यक्तीच्या पोटात दडलेले सत्य बाहेर काढून घ्यायचे. ह्यांच्या या स्वभावाचा पहिला अनुभव मी आमच्या लग्नाआधीच घेतला. कुठलीही पूर्वसूचना न देता अगदी सकाळी माझ्या माहेरी येऊन मला समोर बसवून अनेक प्रश्न विचारून मला बोलते करून माझी घेतलेली वधूपरीक्षा ही त्यांनी मला आपल्या मिस्कील स्वभावाची करून दिलेली तोंड-ओळखच होती. आमच्या लग्नानंतर बऱ्याच कालावधीनंतर मी त्यांना 'तुम्ही असे का केले होते' हे विचारले, तेव्हा त्यांनी एकाच वाक्यात उत्तर दिले. हे म्हणाले, 'सकाळी उठल्याबरोबर स्वत:ला आवरण्यापूर्वी तू कशी दिसतेस, हे मला पहायचे होते' ह्यावर काय बोलायचे हे न कळल्याने मी नुसतीच ह्यांचेकडे पाहत राहिले.

साहेबांच्या या मिस्कील स्वभावामुळेच आमच्या घरी काही शब्द रूढ झालेले होते. पहिला शब्द म्हणजे 'मुरमुऱ्याचे पोते' त्यांच्या एका मित्राची मुलगी खूप लठ्ठ होती, तिला

साहेब मुरमुऱ्याचे पोते म्हणायचे. तेव्हापासून आमच्या घरी कोणतीही लठ्ठ व्यक्ती आली की त्याला ह्याच नावाने संबोधले जायचे.

दुसरा शब्द म्हणजे 'झांजीबार' ! झांजीबार म्हणजे मूर्ख लोकांचे निवासस्थान ! एखादी मूर्खासारखे बोलणारी व्यक्ती घरी आली की हे म्हणायचे, तो झांजीबारहून आलेला आहे. तसेच मूर्खासारखे काम घेऊन कुणी आला की, साहेब त्याला असा सल्ला द्यायचे की त्याच्या ते कल्पनाशक्तीच्या बाहेरचे असेल. त्या वेळी हे 'त्याला मी झांजीबारला पाठवले आहे' असे सांगायचे. ह्यांच्या स्वभावाची पूर्ण कल्पना असतानाही मी एकदा चुकलेच. मी ह्यांना म्हणाले की, तुम्ही सर्वांना झांजीबारला पाठवू शकता, पण मला पाठवू शकणार नाही. त्यावर साहेब लागलीच म्हणाले, "मी तुलाही तिथे पाठवीनच. लावली शर्यत," आणि मी त्यांच्याशी शर्यत लावली. त्यानंतर १५-२० दिवस गेले पण काहीच घडले नाही. मला वाटलं कामाच्या व्यापामुळे हे विसरले असतील. पण हे विसरले नव्हते. कर्नाटक-महाराष्ट्र सीमा लढ्याचे ते दिवस होते. आंदोलनाचा एक भाग म्हणून मुंबईला एक भव्य मोर्चा निघाला होता. त्या मोर्चात साहेबांनीही भाग घेतला होता. संध्याकाळी साडे सहा-सातच्या दरम्यान मला त्यांचा फोन आला. हे म्हणाले की, हे बघ आम्ही मोर्चात होतो त्यामुळे पोलिसांनी मला अटक केली आहे आणि मी आत्ता पोलीस स्टेशनमधूनच बोलतो आहे. तू काळजी करू नकोस, मी लवकरच घरी पोचतो. मी फारसे गांभीर्याने घेतले नाही. पण रात्री ११ वाजले तरी हे घरी आले नाही म्हणून मी काळजीत पडले. कुठे फोन करावा हेही समजत नव्हते. वेळ वाढत होता तसतशी काळजी वाढत गेली. शेवटी न राहवून मी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक ह्यांनाच फोन केला व साहेबांविषयी सर्व सांगितले. त्यांनाही आश्चर्य वाटले कारण असे काही घडल्याचे त्यांनाही माहीत नव्हते. त्यांनीही प्रयत्न केला पण यश आले नाही म्हणून त्यांनी तत्कालीन गृहमंत्री श्री. शरद पवार यांना फोन करून साहेबांविषयी सर्व सांगितले. त्यांनाही आश्चर्य वाटले, कारण अशी कुठलीच माहिती पवारसाहेबांना देण्यात आली नव्हती. त्यांनी लगेचच मुंबईच्या सर्व पोलीस स्टेशनला वायरलेस पाठवून 'साहेब तिथे आहेत का' याची माहिती पाठविण्याबद्दल आदेश दिले. सर्वच पोलीस स्टेशनवरून साहेब तिथे नसल्याचे व कोणालाही मोर्चात अटक झाली नसल्याचे रिप्लाय, मेसेज आले. सर्व पोलीस यंत्रणाच साहेबांना शोधत होती, पण साहेबांचा काही पत्ता लागेना. मोर्चात कोणालाही अटक झाली नाही हे कळल्यावरून पवार साहेबांच्या मनात काही तरी आले. त्यांनी लगेचच साहेबांबरोबर कोण-कोण होते ह्याची माहिती काढली. सर्व चिंतित असण्याचं आणखी एक कारण होतं. दुसऱ्याच दिवशीपासून विधानसभेचे अधिवेशन सुरू होणार होते. साहेब त्या वेळी विधानपरिषदेचे उप सभापती होते, उप सभापतींना अटक झालेली आहे आणि त्यांना कुठे ठेवण्यात आले हे मुख्यमंत्र्यांना व गृहमंत्र्यांना माहीत नाही हे कळल्यावर विरोधकांच्या हातात आयतंच कोलीत सापडणार होतं व सरकारची नाचक्की होणार होती. त्याच वेळी साहेबांबरोबर श्री. उत्तमराव पाटील व श्री. बापूसाहेब काळदाते होते ही माहिती पवार साहेबांना मिळाली. काय घडले असावे ह्याचा श्री. पवार साहेबांनी एक अंदाज बांधला. ते तितक्या रात्री आमच्या घरी आले. त्यांनी मला बरोबर चलण्याची विनंती केली. मी लगेचच निघाले. काही विपरीत तर घडले नाही नां या भीतीने मला धडधडायला लागले. भीतभीतच मी पवार साहेबांना आपण कुठे जात आहोत हे विचारले तेव्हा, ते लवकरच कळेल. तुम्ही काळजी करू नका, असे म्हणाले. मी, पवार साहेब, पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी व बरोबर पोलिसांची व्हॅन असा सर्व ताफा पवार साहेबांच्या आदेशाप्रमाणे श्री. उत्तमराव पाटील ह्यांच्या घरी पोचला. पवार साहेबांचा अंदाज खरा ठरला. साहेब, उत्तमराव व बापूसाहेब हे तिघेही हॉलमध्ये गरमगरम भजे खात मस्त

एचबी ११८०—११अ

गप्पांत रंगलेले होते. मला ह्या सर्वांच्या बरोबर पाहून क्षणातच त्यांनी काय घडले असावे ह्याचा अंदाज बांधला व माझ्याकडे पाहून हसून म्हणाले, "काय पाठवले न तुला झांजीबारला?" ह्यांचे हे बोलणे कुणालाच कळले नाही. मग ह्यांनीच सर्व खुलासा केला. झांजीबार म्हणजे काय व मी लावलेल्या शर्यतीबद्दल सर्व ह्यांनी पवार साहेबांना समजावून सांगितले. पवार साहेबांनी हसतच डोक्याला हात लावला. त्यांनी लगेचच काळजी करत असलेल्या नाईक साहेबांना सर्व घडलेला प्रकार तिथूनच फोन करून सांगितला. साहेब नाईक साहेबांशी बोलले. नाईकसाहेब ह्यांना म्हणाले, "अहो तुम्ही वहिनी साहेबांच्या बरोबरच आम्हालाही झांजीबारला पाठवले त्याचे काय?" एवढे मात्र खरे की साहेब दिसल्यानंतर मला तर आनंद झालाच; पण त्याच बरोबरच पवार साहेब, नाईक साहेबांबरोबरच मुंबईच्या अख्ख्या पोलीस विभागाने सुटकेचा श्वास घेतला. दुसऱ्या दिवशी संपूर्ण विधानभवन व मंत्रालयात हाच चर्चेचा विषय होता. त्यानंतर मी मात्र कधीच त्यांच्याशी शर्यत लावली नाही. त्या वेळी मला एका गोष्टीचा मात्र आनंद होत होता तो म्हणजे, झांजीबारला मी एकटीच गेले नव्हते, तर माझ्याबरोबर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहमंत्रीही होते.

त्यानंतरचा शब्द म्हणजे संपत्याची माय! एकदा आम्ही मोर्शीला एका कार्यक्रमाला गेलो होतो. कार्यक्रम संपवून अमरावतीला परतताना रात्र झाली होती. मधे एकाएकीच आमची गाडी बंद पडली. ड्रायव्हरने बराच प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही. मध्येच बंद पडल्याने परत मोर्शीलाही जाता येत नव्हते. शेवटी गाडी तिथेच शेतात लावून, काही अंतरावर उजेड दिसत होता तिकडे पायीच निघालो. रात्रीची वेळ आणि किर्र जंगल त्यामुळे मला भीती वाटायला लागली पण त्यांनी मला समजावले. तिथे पोचल्यावर लक्षात आले की ते छोटेसे खेडे आहे. तिथे गेल्यावर जी पहिलीच झोपडी दिसली, तिथेच आम्ही गेलो. झोपडीत मिणमिणता प्रकाश होता व एक म्हातारी बाई बसलेली होती. तिने आमच्याकडे बघितले व त्यांना लागलीच ओळखले. गवई साहेब व बाईसाहेब आपल्या घरी आल्याचा तिला खूप आनंद झाला होता. तिने लगेच सतरंजी टाकली, हात धुवायला व प्यायला पाणी दिले व आम्हाला जेवणाचा आग्रह केला. खूप भूक लागली होती म्हणून लगेच आम्ही होकार दिला. त्या बाईने इतक्या रात्री चूल पेटवली व जेवण तयार केले. स्वयंपाक करता करताच ती आमच्याशी बोलत होती. तिने साहेबांना विचारले, साहेब, मले वळखलं नाही काय? मी संपत्याची माय व्हय! दर पाच-सहा वाक्यांच्या सुरुवातीला किंवा शेवटी 'मी संपत्याची माय व्हय!' चा पाढा मात्र चालत होता. जेवण तयार झाले. बेत अगदी साधा होता. भाकरी आणि मिरचीची चटणी, जेवण साधे पण चविष्ट होते. चुलीवरची गरम भाकरी तिने वाढली. भूक लागली होती त्यामुळे आम्ही पोटभर जेवलो. ताटात भाकरी पडल्यावर आमच्या एक गोष्ट लक्षात आली होती की, भाकरीचे वजन वाजवीपेक्षा जास्त आहे. त्या वेळी भाकरीच्या वजनापेक्षा चव जास्त प्रिय होती. ह्यांनी तिला विचारले, संपत्या कुठे दिसत नाही. ती म्हणाली- "थो बाहेरगावी गेला हाय. अथी मी एकटीच हावो." तिथे येण्याचे प्रयोजन आम्ही तिला आधीच सांगितले होते. तिथे टाकलेल्या सतरंजीवरच आम्ही झोपलो. सकाळी परत जाताना ह्यांनी देऊ केलेले पैसे तिने घेतले नाही. आम्ही वाकून तिला नमस्कार केला. 'सुखी रावा' चा तिने आशीर्वाद दिला. तेव्हापासून आमच्या घरी जेव्हा भाकरी किंवा पोळी जाड व्हायची, तेव्हा-तेव्हा हे विचारायचे 'आज संपत्याची माय आली होती का?' त्यानंतरचा शब्द म्हणजे शपथविधी! घरातील, कार्यकर्त्यांपैकी किंवा स्टाफपैकी कुणी जर काही चूक केली, नियमांविरुद्ध वागले वा ह्यांना न पटणाऱ्या न आवडणाऱ्या गोष्टी घडल्या, तर संबंधित व्यक्तीला साहेब आपल्या खोलीत एकट्यालाच बोलावून घ्यायचे व आपल्या पद्धतीने त्याची कानउघाडणी करायचे. त्या कार्यक्रमालाच 'शपथविधी' म्हणण्यात येत असे. हा

कार्यक्रम बंद खोलीत व्हायचा. त्यामुळे कोणत्या पदाकरिता झाला म्हणजे कोणत्या कारणास्तव झाला हे त्याचे त्यालाच कळायचे. शपथविधी करून बाहेर आलेल्या व्यक्तीच्या फक्त चेहऱ्यावरूनच अंदाज बांधता येत होता. एवढे मात्र खरे की त्यानंतर ती व्यक्ती पुन्हा तशी चूक घडू देत नव्हती. एकदा साहेब दिल्लीला असताना मी त्यांच्या सचिवांना फोन केला. मी त्यांना आधी फोन एवढ्यासाठी करायची की ते माझ्या विश्वासातले होते आणि त्यांच्याकडून साहेबांच्या तब्येतीविषयी खरी बातमी मला कळायची. साहेबांना विचारले तर 'तब्येत उत्तम आहे' हे पेटेंट उत्तर देऊन हे मोकळे व्हायचे. दोन-तीनदाही सचिवांनी फोन उचलला नाही, मोबाइलही उचलला नाही, का उचलला नाही ह्याचा विचार करीत असतानाच थोड्याच वेळात त्यांचाच फोन आला. मी 'फोन का उचलला नाही' हे विचारले असता ते म्हणाले 'वहिनी साहेब तुमचा फोन आला तेव्हा माझा शपथविधी चालू होता आणि तुम्हाला कल्पना आहेच की हा कार्यक्रम चालू असताना बाहेर येता येत नाही. त्यांच्या बोलण्याचे मला हसू आले आणि हसतच विचारले- कोणत्या पदाकरिता झाला आहे? त्यावर ते म्हणाले की, 'मलाच अजून पदाविषयीची नीटशी' कल्पना आलेली नाही. साहेबांकडून ह्याबाबत रीतसर घोषणा झाली की आपणास कळवितो. त्यानंतर २-३ दिवसांनी त्यांचा फोन आला म्हणाले. " वहिनी साहेब, साहेबांनी पद घोषित केले. त्याचे असे झाले होते की २-३ दिवसांपूर्वी साहेबांनी मला झांजीबारला पाठवले होते. मी इतक्या लवकर झांजीबारला का गेलो? म्हणजे कोणीही तुम्हाला तिथे पाठवू शकतो तेव्हा जागरूक रहात जा! यावरचा तो कार्यक्रम होता." मी विचार केला की ह्यांनीच त्यांना झांजीबारला पाठवले आणि ह्यांनीच त्यांचा याच कारणास्तव शपथविधी घेतला. मी ह्यांना याबद्दल विचारले तेव्हा हे म्हणाले, "अग, त्याचे असे झाले की बरेच दिवसांत कुणाला तिकडे पाठवले नव्हते व कुणाचा शपथविधी घेतला नव्हता त्यामुळे मला चुकल्या चुकल्यासारखे वाटायचे म्हणून असे केले." ह्यावर मी काय बोलणार? साहेबांच्या सवयीविषयी सांगायचे झाल्यास ह्यांची लक्षात येण्यासारखी सवय म्हणजे उशिरा उठणे. रात्री कितीही वेळ जागून हे त्यांची महत्त्वाची कामे हातावेगळी करतील, पण सकाळी लवकर उठणे मात्र त्यांना शक्य होत नसे. सकाळी एखाद्या महत्त्वाच्या मीटिंगला किंवा बाहेरगावी त्यांना जायचे असल्यास, त्यांच्यासमोर दोन पर्याय असायचे. एक तर घरातील सर्वांनाच सकाळी लवकर उठवण्याविषयी सांगून झोपायचे. सर्वांना एवढ्यासाठी की एकालाच सांगितले आणि तो विसरला तर अडचण आणि सर्वांनाच एवढ्यासाठी की कोणाला तरी आठवण राहीलच. दुसरा पर्याय म्हणजे रात्रभर जागरण करणे. सकाळी जाणे किती महत्त्वाचे आहे, यावरून या दोन्ही पर्यायांपैकी एकाची निवड व्हायची. त्यांची ही सवय जवळ-जवळ सर्वांनाच माहीत झाली होती त्यामुळे ह्यांना भेटायला येणारे दुपारीच यायचे. त्यांच्या या सवयींविषयी हे स्वतःही खूप जागरूक असायचे. त्यामुळेच बिहार, सिक्कीम व केरळचे राज्यपाल असतांना पहिल्याच दिवशी 'व्हिजिटर्सना वेळ दुपारी दोन नंतरची देण्याविषयी, निक्षून सांगून ठेवले होते.'

दुसरी सवय म्हणजे विमानाने जायचे असेल तर विमानतळावर व आगगाडीने जायचे असेल तर स्टेशनवर हे अगदी सुटण्याच्या वेळेस पोहोचत आणि कारने जायचे असेल तर एक-दोन तास मागेपुढे म्हणजे पुढेच व्हायचे. एक तर वेळेपर्यंत त्यांचे कामच संपत नव्हते आणि जायला निघाले की कुणीतरी कार्यकर्ता आपले निवेदन द्यायला यायचा. प्रत्येकालाच हे म्हणायचे एक मिनिटात तुमचे म्हणणे सांगा. असा एक-एक मिनिट देता देताच वेळ जायचा व मग प्रचंड धावपळ! त्यामुळेच विमान किंवा आगगाडी चुकल्याचे ऐकले तर मला आश्चर्य वाटत नव्हते आणि मिळाल्याचे कळले तर, बहुतेक लेट असावे अशी मी माझ्या मनाची समजूत करून घेत होते. ह्यांनी धावत जाऊन

इतके वेळा आगगाडी पकडली आहे, ह्यांचे ते धावण्याचे अंतर जर का मोजले तर अमरावतीपासून मुंबईपर्यंत धावत जाण्याचा एक विक्रमच ह्यांनी प्रस्थापित केला आहे.

तिसरी सवय म्हणजे पान खाण्याची! त्यांना ही सवय केव्हा लागली हे मला माहीत नाही पण आमच्या लग्नापासूनच हे पान खायचे. हे व्यसन अनेकदा सुटले होते व अनेकदा धरले गेले होते. मुंबईत असताना आम्हाला दाखवण्यासाठी ते बंद असायचे पण परत दिल्लीत गेल्यावर ते सुरू! तसं ह्यांचं पान खाणं म्हणजे ह्यांचं टेंशन मोजण्याचं एक यंत्रच होतं. पान खाण्यामधले अंतर जितके जास्त तितके टेन्शन कमी व अंतर जितके कमी, तितके टेन्शन जास्त, असे ते व्यस्त प्रमाण असायचे. एक पान संपत नाही तर दुसरे असे व्हायला लागले की त्यांना कसलंतरी खास टेन्शन आहे असे समजायचे. कधी-कधी दिल्लीवरून येताना विमानतळावर किंवा स्टेशनवर शेवटचे असे पान खायचे आणि कुणाला (म्हणजे मला) समजू नये म्हणून अगदी लहान मुलांप्रमाणे तोंड धुवून यायचे, पण शर्टावरचे ताजे डाग मला सत्य सांगून जायचे. इतरांना असलेल्या घाणेरड्या सवयींपेक्षा ही सवय काही वाईट नाही, असे मनाचे समाधान करून घेऊन 'पान खाणे' या विषयावर मौनच पाळले.

साहेबांना आपले ऑफीस अगदी व्यवस्थित लागायचे. विषयानुरूप फाईलिंग, संदर्भ ग्रंथ, आलेले पत्र, त्यांना पाठवलेले उत्तर, मंत्रालयाशी केलेला पत्रव्यवहार, त्यांचेकडून झालेला पत्रव्यवहार हे सर्व अगदी व्यवस्थितपणे फाईल केलेले असायचे. आलेल्या पत्राला उत्तर गेलेच पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. तसेच कायद्याला डावलून ते कोणतेही काम करीत नव्हते. कुणासाठी शिफारस करताना किंवा शिफारशीचे पत्र देताना 'कायद्याच्या चौकटीत राहूनच पत्रधारकांना मदत करावी' असेच लिहिलेले असायचे.

'शेती' हा साहेबांचा एक वीक पॉईंट होता. ते नेहमी म्हणायचे मी मूळचा व हाडाचा शेतकरी आहे. माझा जन्मही शेतकरी कुटुंबात झाला आणि वाढलोही शेतकरी कुटुंबातच. शेती हेच आमच्या उपजीविकेचे साधन होते. ह्यांना शेतीचेही खूप ज्ञान होते. डवरण, वखरण, पेरणी, कापणीपासून, कोणते कोणत्या वेळी खत द्यायचे इथपर्यंत ह्यांना सर्व माहिती होती. शेतावर चक्कर मारण्याची खूप आवड होती. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानेच आज आमच्या शेतीचे रूपच पालटले आहे. शेतीतून आता आम्ही सर्व प्रकारची धान्ये, कडधान्ये व खरीप पिकेही घेतो. ओलितामुळे दोन वेळा पीक घेणे शक्य होते. सुबाभुळ, सागवान, निलगिरी, बास इत्यादी लागवडीने वनशेती निर्माण केली आहे. तसेच आंबे, सीताफळे, संत्री, मोसंबी, आवळे या फळांची फळबाग, लावलेली आहे. परसबाग आहे. त्यात घरच्यासाठी फळे, ऋतुमानाप्रमाणे भाजीपाला मिळतो. मला फुलांची खूप आवड असल्याने फुलबाग लावलेली आहे. आज शेतीकडे पाहून समाधान वाटते. साहेब शेतकऱ्यांच्या मेळाव्यात नेहमी आपल्या भाषणात म्हणायचे की, केवळ पारंपरिक पद्धतीने शेती करून भागणार नाही. त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. नवनवीन प्रयोग करण्याची गरज आहे. नवीन तंत्रज्ञान वापरून त्यावर मेहनत केली तर शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते आणि पर्यायाने शेतकरी सुखी होऊ शकतो. त्यांच्या शेतीविषयी असलेल्या प्रेमाचा आणखी एक फायदा मी घेतला आहे, तो म्हणजे साहेब काही कारणास्तव मूडमध्ये नसले, तर शेतीचा विषय काढणे. आज पाऊस पडलेला आहे. पिकं चांगली आहेत असे सांगायची. साहेब लगेचच त्या विषयावर बोलायला लागायचे व गेलेला मूड परत यायचा.

साहेबांनी आपल्या महाराष्ट्रासाठी एक भरीव कामगिरी केली आहे. बेरोजगारांना, जे अशिक्षित व आर्थिकदृष्ट्या कमजोर आहेत त्यांना रोजगार देण्याची हमी देणारी 'रोजगार हमी योजना' त्यांनीच प्रस्तावित केली. या योजनेचे प्रवर्तक व जनक साहेबच आहेत. या योजनेनुसार शासकीय, निमशासकीय व खाजगी कंत्राटदाराकडून जी बांधकामे,

रस्तेनिर्मिती, विहिरी खोदणे, तळ्यांचे नूतनीकरण वगैरे कामे केली जातात, त्या सर्व कामांवर या योजनेअंतर्गत पंजीकृत असलेल्या बेरोजगारांना कामावर ठेवणे अनिवार्य व बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसा कायदाच करण्यात आलेला आहे. या योजनेमुळे बेरोजगारांना काम मिळण्याची हमी मिळाली आहे. ही योजना पूर्णपणे यशस्वी झालेली आहे. ही इतकी लोकप्रिय झाली, इतकी जनमान्य झाली की इतर राज्यांनीही ह्याचे अनुकरण केलेले आहे.

अमरावतीला पाण्याची भीषण टंचाई असायची. नगर-परिषदेकडून होणारा पाणीपुरवठा कुचकामी ठरला होता. अमरावतीकर पाण्यासाठी हैराण होते. वाढती लोकसंख्याही त्यासाठी कारणीभूत होती. पाण्याची ही गरज कशी भागवावी याचा साहेबांनी खूप विचार केला. त्यासाठी तज्ज्ञांचा सल्लाही घेतला. बऱ्याच इष्ट मित्रांशी चर्चा केली व अमरावतीकरांची ही अडचण दूर करण्याचा संकल्पच सोडला. या संकल्पाचेच फलित म्हणजे साहेबांनी आखलेली नळ योजना आहे. त्या वेळी साहेब विधानपरिषदेचे उप सभापती होते आणि साहेबांचेच घनिष्ठ मित्र श्री. रामराव आदिक हे नगरविकास मंत्री होते. नगरपरिषदेला असणाऱ्या आर्थिक अडचर्णीमुळे नगरपरिषद ही योजना कार्यान्वित करू शकणार नाही ह्याची पूर्ण कल्पना साहेबांना होती. त्यातूनही त्यांनी मार्ग काढला. योजनेचा पूर्णपणे आराखडा तयार करून ही योजना नगरपरिषदेची आर्थिक क्षमता नसल्याने, शासकीय खर्चानेच राबविण्यात यावी व अमरावतीकरांची अडचण शासनाने दूर करावी असा प्रस्ताव नगर परिषदेकडूनच मुंबईला नगरविकास मंत्रालयाकडे पाठवून दिला. त्यानंतर ते आदिकसाहेबांना भेटले. त्यांना सर्व अडचर्णींची व परिस्थितीची माहिती त्यांनी दिली व कृपा करून आपण जातीने लक्ष देऊन ही योजना मंजूर करावी ही विनंती केली. प्रस्तावात अनेक अडचणी, चुका होत्या. त्यांचे निराकरणही साहेबांनीच केले. गवई साहेब काही मागतील ते स्वार्थ साधण्यासाठी नाही, तर लोककल्याणासाठी असेल याची पूर्ण खात्री असल्यानेच आदिक साहेबांनी ही योजना मंजूर केली. पण त्यात एक अट होती. त्या अटीप्रमाणे योजनेच्या खर्चाचा दहा टक्के भाग नगरपरिषदेने द्यावा असे म्हटले होते. हे दहा टक्के खर्चण्याची क्षमताही नगर-परिषदेजवळ नव्हती. परत साहेबांनी आदिक साहेबांकडे ती दहा टक्क्यांची अट मागे घेण्यासाठी मनधरणी केली. या योजनेप्रती साहेबांची असलेली तगमग आदिक साहेबांना जाणवली आणि त्यांनी सर्व योजना शासकीय खर्चानेच पूर्ण करावी असा आदेशच काढला. मला वाटते संपूर्ण शासकीय खर्चाने राबविण्यात आलेली ही पहिलीच योजना आहे. या योजनेप्रमाणे अमरावती शहरात नळाद्वारे पाणी वितरित करणे शक्य झाले. आज जो नियमित पाणीपुरवठा होत आहे, त्याचे श्रेय साहेबांनाच आहे.

अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेतही साहेबांचा सिंहाचा वाटा आहे. नागपूर विद्यापीठावर कॉलेजेसच्या वाढीमुळे पडणारा भार, त्यामुळे निर्माण होत असलेली कामकाजातील दिरंगाई, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी नागपूर पर्यंत माराव्या लागणाऱ्या चकरा, ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता, एक नवीन विद्यापीठाची स्थापना करणे अनिवार्य असल्याची जाणीव साहेबांना झाली. शासनालाही याबद्दल माहिती दिली. त्यामुळे नवीन विद्यापीठ-निर्मितीची गरज शासनाच्याही लक्षात आली. साहेबांच्या मागणीला शासनाने मान्यता दिली. पण कुठे असावे हा प्रश्न होताच. तेव्हा भौगोलिक परिस्थिती व इतर सर्व सोई पाहता हे विद्यापीठ अमरावतीलाच असणे कसे योग्य आहे, हे संबंधितांना पटवून दिले. बऱ्याच बाहेरच्या लोकांनी आपआपल्या भागात हे वळवण्याचा प्रयत्न केला, पण साहेबांचेच पारडे वरचढ झाले व इथे अमरावतीलाच श्री गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. इथे प्रामाणिकपणे नमूद करते की, इतर अनेक मान्यवर व्यक्तींचे बहुमोल सहकार्यही या कामी लाभले, तरी पण अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीत साहेबांचा सिंहाचा वाटा आहे.

डॉ. बाबासाहेब हे साहेबांचे श्रद्धास्थान होते. जन्मभर ह्यांनी आपल्या श्रद्धेला तडा जाऊ दिला नाही. डॉ. बाबासाहेबांनी दाखविलेल्या मार्गानेच हे जन्मभर चालले. त्यांच्या विचारांना जपले. आपल्या श्रद्धास्थानाचे एक भव्य स्मारक असावे ह्या हेतूनेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची स्थापना केली. त्या कामी त्यांचे समविचारी मित्र श्री. फुलझेले साहेब, श्री. गाणार साहेब, श्री. कुंभारे साहेब यांचे सक्रिय सहकार्य लाभले. या समितीच्याच माध्यमातून पहिले पाऊल म्हणून ज्या ठिकाणी नागपूरला डॉ. बाबासाहेबांनी आपल्या अनेक अनुयायांसोबत बौद्ध धर्म स्वीकारला, बौद्ध धर्माची दीक्षा घेतली, त्या जागेला 'दीक्षाभूमी' ह्या नावाने संबोधित केले आणि ती जागा सर्व प्रयत्नांनी शासनाकडे पाठपुरावा करून समितीच्या नावे आवंटित करून घेतली. त्यानंतर आपल्या मित्रांच्या द्वारे स्मारकासाठी देणग्या घेतल्या. ते अपुरे पडत होते, तेव्हा अनेक मान्यवर नेत्यांना, मंत्र्यांना दीक्षाभूमीवर आमंत्रित करून फंड उभा केला. शासकीय अनुदान मिळवले व आज आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉ. बाबासाहेबांचे स्मारक बनले आहे. हे सर्व जादूची कांडी फिरवल्यागत झाले नाही तर त्या मागे साहेबांचे योजनाबद्ध असे अविरत श्रम आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजचा जीर्णोद्धारही साहेबांनीच घडवून आणलेला आहे. कुठेच प्रवेश मिळत नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजमध्ये नाईलाजाने प्रवेश घेणारे विद्यार्थी त्या वेळी होते, पण आता हे कॉलेज विद्यार्थ्यांची प्रथम पसंती ठरलेले आहे. कॉलेजला ए प्लस हा दर्जा मिळाला आहे. दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेबांचे स्मारक म्हणजे साहेबांनी आपल्या श्रद्धास्थानाला वाहिलेली मानवंदनाच आहे.

साहेबांनी आपल्या समाजाच्या उन्नतीकरिता, समाजाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी, सुशिक्षित करण्यासाठी, समाजाला सुस्थितीत आणण्यासाठी आपले सारे जीवनच समर्पित केले होते. त्यासाठी दिवसरात्र झगडत होते. समाजाला मान मिळावा, प्रतिष्ठा मिळावी यासाठी सदैव प्रयत्नशील होते. केवळ विनंती करून हे मिळणार नाही, याची साहेबांना पूर्ण कल्पना होती. आपल्या कायदेशीर हक्कांसाठी, सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी, साहेबांनी मोर्चा, आंदोलन, सत्याग्रह, उपोषण ह्या मार्गांचाही अवलंब केला. यातूनच भूमिहिनांच्या सत्याग्रहाचा जन्म झाला. सत्याग्रह करून स्वत:ला अटक करवून घेऊन जेलमध्ये जाण्याचा निर्धारच कार्यकर्त्यांनी केला होता. एक प्रकारे ते जेलभरो आंदोलनच होते. साहेबही स्वत:ला अटक करवून घेऊन जेलमध्येच होते. आंदोलकांना जेवण आम्हीच घरी स्वयंपाक करून घेऊन जात होतो. त्या वेळी कीर्ती सहा दिवसांची होती. तिला पाठीशी बांधून मी भाकरी व मिरचीची चटणी करीत होते व त्यांना विदाई देण्यासाठी सायंस्कोअरच्या मैदानावर जात असे. सत्याग्रहाचे फलित म्हणजे शासनाने भूमिहिनांना सरकारी जमीन देण्यास मान्यता दिली. धर्मांतर करून बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या नवबौद्धांना कुठलीच शासकीय सवलत देण्यात येणार नाही अशी घोषणा तत्कालीन प्रधानमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी केली. हा नवबौद्धांवर अन्यायच होता. त्याविरुद्ध अनेक आंदोलने झाली, पण सरकार जागचे हलले नाही. शेवटी दिल्लीच्या बोट क्लबवर श्री. आरमुगम व श्री. कुंभारे यांच्यासह आमरण उपोषणाला बसले. नवबौद्धांवर अन्याय झालेला आहे, त्यामुळे उपोषण योग्य असल्याने पाठिंबा देण्यासाठी स्वत: इंदिरा गांधी उपोषण मंडपात आल्या होत्या. उपोषणाला चौदा दिवस झाले तरी तत्कालीन सरकारने दखल घेतली नाही. चौदाव्या दिवशी साहेबांची तब्येत एकाएकी खालावली. त्यांना जबरदस्तीने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. साहेबांची तब्येत बिघडल्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी चहुबाजूंनी हल्लाबोल केला. त्यांनी तोडफोड़ केली. त्यांना आवरणे कठीण झाले. ही परिस्थिती बघता नाईलाजाने साहेबांनी उपोषण सोडले. त्याबद्दल साहेबांना किती तरी दिवस वाईट वाटत होते. पण साहेबांनी केलेले उपोषण रास्त व खरे आहे ह्याची दखल प्रधानमंत्री

व्ही.पी. सिंग यांनी घेतली व नवबौद्धांना पूर्वीप्रमाणेच सवलती मिळतील हे अध्यादेशाद्वारे जाहीर केले. त्या वेळी साहेबांनी झालेला अत्यानंद मी आनंदाश्रूंनी बघत होते.

गवई साहेबांनी फक्त आपल्या समाजासाठीच सर्व काही केले. ते जातीवादी होते असा आरोप साहेबांवर काही हितचिंतक करतात. पण मी विचारू इच्छिते की, आपल्याच धर्मातील एका जातीला दुर्लक्षित करण्यात आले, केवळ विशिष्ट जातीचे म्हणून त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले, अनेक निर्बंध त्यांच्यावर लादण्यात आले, हा जातीयवाद नाही काय? हा कुणी निर्माण केला? खालच्या जातीचा, वरच्या जातीचा हे ठरविण्याचा अधिकार स्वत:ला उच्चवर्णीय समजणाऱ्यांना कुणी दिला? ज्या मनुस्मृतीचा दाखला देण्यात येतो ती मनुस्मृती कुणी लिहिली? मला तरी असं वाटतं की केवळ आपल्या स्वार्थासाठी पूर्वजांनी केलेली ही विभागणी आहे. या वादात मला पडायचे नाही. पण एकमात्र खरे की, साहेब जातीयवादी कधीच नव्हते. जनहित लक्षात घेऊन वर निर्दिष्ट त्यांनी केलेल्या सुधारणा फक्त एका जातिधर्मापुरत्या मर्यादित नव्हत्या, तर आम जनतेसाठी होत्या. त्यात जातिभेद वा धर्मभेद नव्हता. साहेबांची आपल्या बौद्ध धर्मावर प्रचंड निष्ठा होती, पण त्याचबरोबर त्यांनी इतर धर्मांचीही प्रतिष्ठा राखली. आपल्या धर्माचा अभिमान होता, पण इतर धर्मांचा अपमान कधीच केला नाही. दिल्लीत महाराष्ट्र सदनात राहात असताना तिथल्या गणेशोत्सवात त्यांनी श्री गणपतीची पूजा केली, आरती केली. ज्या धार्मिक भावनेने त्यांनी श्रीगणेशाच्या मूर्तीला फुलमाला घातली त्याच धार्मिक भावनेने त्यांनी अजमेरच्या दर्ग्याला शाल चढवली, ज्या भावूकतेने त्यांनी जैनमंदिरात जाऊन तिथला प्रसाद घेतला, त्याच भावूकतेने त्यांनी अमृतसरच्या गुरुद्वारात माथा टेकला. ख्रिश्चन मित्रांना ख्रिसमसच्या व पारशी मित्रांना गुडफ्रायडेच्या शुभेच्छा द्यायला हे कधीच विसरले नाहीत. त्यांच्या घनिष्ठ मित्रमंडळीत सर्व जातीचे, धर्माचे व पंथाचे लोक होते. हे सर्व पाहता त्यांच्यावरील हा आरोप केवळ खोडसाळपणाचा व त्यांची प्रतिमा मलिन करण्याचाच प्रयत्न होता असेच म्हणावे लागेल, हं! साहेब जातीयवादी नव्हते, पण मानवतावादी नक्कीच होते.

साहेबांनी आपल्या जीवनात सर्व कार्य सिद्धीस नेले, पण एक कार्य मात्र खूप प्रयत्न करूनही सिद्धीस नेऊ शकले नाहीत. त्याचं त्यांना नेहमीच दु:ख असायचे. ते म्हणजे पक्षाचे ऐक्य! डॉ. बाबासाहेबांनी स्थापित केलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अनेक भागांत विभाजन झाले. त्यामुळे साहजिकच पक्ष कमजोर झाला. हे सत्य सर्व घटक पक्षांना कळत असूनही वळत मात्र नव्हते. साहेबांनी अनेकदा तसा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी अपयशच पदरी पडले. ऐक्यासाठी कुठलाही त्याग करण्याची साहेबांची तयारी होती. तसे त्यांनी बोलूनही दाखवले. साहेब विधानपरिषदेचे उप सभापती असताना 'ऐक्याआड जर माझे पद येत असेल तर मी माझ्या उप सभापती पदाचा राजीनामा देतो,' असेही आश्वासन त्यांनी घटक पक्षांना दिले होते. पण ह्यावर रिपाईचे ज्येष्ठ नेते श्री. आरमुगम साहेब यांचा विश्वास बसला नाही. तेव्हा साहेबांनी आपल्या उप सभापती पदाबरोबरच विधान-परिषदेचाही राजीनामा लिहून आरमुगम साहेबांच्या स्वाधीन केला. आरमुगम साहेबांनी नंतर सर्व चौकशी केली असता साहेबांची काहीच चूक नाही हे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी अविश्वास दाखविल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्यानंतर मात्र असा प्रसंग घडला नाही. शेवटपर्यंत आरमुगम साहेबांच्या दृष्टिकोनातून गवई साहेब म्हणजे एक विश्वासू मित्र व नेता होते. सर्व घटक पक्षांचे ध्येय एकच होते पण विचारसरणी मात्र भिन्न होती. कुटुंबातील भावाभावांचे मतभेद व्हावेत, त्यांच्या वाटण्या व्हाव्या, प्रत्येकाने आपल्या अलग चुली मांडाव्या, पण सर्वांचे आडनाव मात्र एकच असावे तशातलाच हा प्रकार आहे. यामागे नक्की कारण काय असावे हे सांगणे कठीण आहे. कदाचित सर्वांचीच आपणच

पक्षप्रमुख व्हावे ही इच्छा असावी. साहेबांनी तर मला अध्यक्ष करू नका, एवढेच नव्हे तर, कुठलेही पद देऊ नका, एक सदस्य म्हणूनच मी कार्य करीन, असे सर्वांनाच आवाहन केले होते, पण त्याचाही काही परिणाम झाला नाही. वास्तविक पाहता १९९८ मध्ये अल्पकाळासाठी का होईना, झालेल्या ऐक्याचा फायदा सर्वांनाच मिळाला होता. आर.पी.आय.चे चारही उमेदवार लोकसभेवर निवडून आले होते. झालेल्या फायद्याचा अनुभव लक्षात घेऊन तरी ऐक्य टिकवावयास हवे होते, पण निवडणुकीनंतर लवकरच ते तुटले. काळाच्या गरजेकडे सर्वच घटक पक्षांनी दुर्लक्ष केले. 'दैवदुर्विलास' हाच शब्द त्यासाठी योग्य आहे. एवढे मात्र खरे की, जर ऐक्य झाले असते तर आजचे चित्र काही अलगच असते. साहेबांना मात्र ऐक्य घडवून आणण्यात आपण अयशस्वी ठरलो या दु:खातच जावे लागले.

साहेबांनी आपल्या आयुष्यात अनेक सन्माननीय पदे भूषविली. १९६२ साली साहेबांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विरोधात लोकसभेची निवडणूक लढवली. डॉ. पंजाबरावांच्या विरोधात निवडणूक लढवणे हे एक हिमतीचेच काम होते. दुर्दैवाने ही निवडणूक साहेब हरले. पण 'खूप काट्याची टक्कर दिलीस बेटा' ही कौतुकाची थाप त्यांनी घेतली. 'अपयशच यशाची पहिली पायरी असते' ह्या म्हणीप्रमाणे हे अपयशच त्यांच्या पुढील आयुष्याच्या यशाची पायरी ठरले. निवडणूक हरले तरी ह्यांच्या मागे उभ्या असलेल्या प्रचंड जनसमुदायाची नोंद मुंबईच्या व दिल्लीच्याही काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी घेतली आणि त्याचा परिणाम म्हणजे १९६४ साली काँग्रेसचा उमेदवार म्हणून हे विधानपरिषदेत निर्वाचित झाले. साहेब आमदार झाले आणि १९६४ ते १९९४ पर्यंत सतत ३० वर्षे विधानपरिषदेचे सदस्य होणे हा एक साहेबांनी प्रस्थापित केलेला विक्रमच होता. तसेच याच काळात आपल्या पक्षाचा म्हणजे आर.पी.आय.चा एकमेव सदस्य असताना देखील हे विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती व काही काळासाठी विरोधी पक्षनेते झाले. ही त्यांच्या कार्यकुशलतेची व एक उत्कृष्ट राजकारणी असल्याची सर्व विधानपरिषदेच्या सदस्यांकडून मिळालेली पावतीच होती. १९९४ ला मात्र त्यांनी सदस्यत्व नाकारले. त्यानंतर १९९८ पर्यंत म्हणजे ४ वर्षांपर्यंत हे कुठल्याच पदावर नव्हते. तरी पण ह्यांना भेटीला येणाऱ्या कार्यकर्त्यांची रीघ कमी नव्हती. १९९८ मध्येच ह्यांनी अमरावतीची लोकसभेची निवडणूक लढवली आणि ती जिंकली. साहेब लोकसभेचे खासदार झाले. दुर्दैवाने लोकसभा १३ महिन्यांतच भंग पावली. परत निवडणूक झाली आणि हे ती निवडणूक हरले. गवई साहेबांसारख्या लोकप्रिय नेत्याला कुठल्याही पदाशिवाय ठेवणे हे काँग्रेस पक्षश्रेष्ठींना अवघडल्यासारखे झाले आणि सर्वांनी एकमुखाने निर्णय घेऊन लवकरच होणाऱ्या राज्यसभेच्या निवडणुकीसाठी युतीचा उमेदवार म्हणून त्यांना घोषित करण्यात आले. ही निवडणूक झालीच नाही. प्रतिस्पर्ध्याने माघार घेतल्याने हे अविरोध निवडून आले आणि साहेब राज्यसभेचे खासदार झाले. राज्यसभा ही खऱ्या अर्थाने गाजवली. विषयाचा सखोल अभ्यास करून मुद्देसूद असलेले त्यांचे भाषण ऐकण्यासाठी सदनात शांतता असायची. त्याच काळात साहेबांचे श्रद्धास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेबांबद्दल श्री. अरुण शौरी लिखित आक्षेपार्ह लिखाण 'वर्शिपिंग फॉल्स गॉड' ह्या पुस्तकाला भर सदनात फाडून त्यांनी निषेध व्यक्त केला. आपण काँग्रेसच्याच सहकार्याने राज्यसभेचे सदस्य झालो ह्याची त्यांनी तमा न बाळगता आपल्या श्रद्धास्थानाच्या अपमानाशी तडजोड केली नाही. २००६ मध्ये ह्यांची राज्यसभेची टर्म संपली. साहेबांनी आजवर केलेल्या कामाचा गौरव म्हणून काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी एकमुखाने ह्यांची बिहारचे राज्यपाल या सन्माननीय पदावर नियुक्ती केली आणि साहेब बिहारचे व त्यानंतर केरळचे राज्यपाल झाले. राज्यपाल पदाच्या पाच वर्षांच्या काळातच त्यांच्यावर काही काळाकरिता सिक्कीमची जबाबदारी सोपविण्यात आली. राज्यपाल असताना त्यांनी

निर्भीडपणे निर्णय घेऊन सुधारणा घडवून आणल्या. साहेबांनी सर्व सन्माननीय पदे भूषविताना प्रत्येक पदाची गरिमा राखली. पदाला सन्मानच दिला.

२०११ मध्ये साहेबांचा राज्यपाल पदाचा कार्यकाळ संपला. तब्येतीमुळे आपण कोणत्याही पदाला न्याय देऊ शकणार नाही म्हणून यापुढे कोणतेही पद स्वीकारणार नाही, हे त्यांनी जाहीर केले आणि आम्ही अमरावतीला परत आलो. त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावतच गेली. वारंवार त्यांना नागपूरला ट्रीटमेंटसाठी जावे लागत होते. पुढे डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे आम्ही नागपूरलाच गेलो. भूषणकडेच थांबलो. २-३ वेळा हॉस्पिटलमध्ये भरती करावे लागले. कधी सुधारणा तर कधी बिघडणे असेच सतत चालू होते. एक दिवस तब्येत खूपच बिघडली. हे बेशुद्ध होऊन पडले. तातडीने हॉस्पिटलमध्ये भरती केले. डॉक्टरांच्या निदानात त्यांना ब्रेन हॅमरेज झाल्याचे कळले. हे ऐकताच भूषण ढसढसा रडला. जवळपास सव्वा महिना आम्ही हॉस्पिटलमध्ये होतो. सर्वांनाच कळल्यामुळे ह्यांना पाहण्यासाठी अलोट गर्दी व्हायची. हॉस्पिटलच्या मॅनेजमेंटला त्रास व्हायला लागला. शेवटी सर्वांना प्रवेश बंद करण्यात आला. श्री. नितीन गडकरी, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांनी हॉस्पिटलमध्ये हजेरी लावली. साहेब कोमातच होते. त्यांची तब्येत सुधारेल असे सारखे वाटत होते. एक दिवस अचानक काही क्षणांसाठी त्यांनी डोळे उघडले, पण लगेचच मिटले. अशा निराशेच्या वातावरणातच दिवस जात होते. शेवटी जे घडू नये तेच घडले. २५ जुलै २०१५ रोजी साहेबांनी अखेरचा श्वास घेतला. आम्हा सर्वांना ते दुःखाच्या सागरात लोटून कुणाशी काहीही न बोलता निघून गेले. त्या वेळी माझ्या अवस्थेचे वर्णन मी शब्दांत करू शकत नाही. त्यांचे पार्थिव अमरावतीला आणण्यात आले. अंत्यदर्शनासाठी अलोट गर्दी जमली होती. दुसरे दिवशी ह्यांच्या जन्मगावी दारापूरला अंत्यसंस्कार करण्यात आला. त्या वेळी दुःख वियोगाने बेभान झालेल्या कार्यकर्त्यांना आवरणे कठीण झाले होते.

त्यावेळी मला लग्नानंतरचा एक प्रसंग आठवला. काही लोकांच्या मनात मी साहेबांना समाजापासून दूर करीन अशी शंका होती. मला हे ऐकून अतिशय वाईट वाटले होते. त्यामुळेच आमच्या लग्नानंतर झालेल्या आमच्या सत्कार समारंभावेळी मी दिलेल्या भाषणात म्हणाले होते की "मी तुम्हा सर्वांना आज वचन देते की मी साहेबांना समाजापासून कधीही दूर करणार नाही उलट ह्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्या कार्याला मदत करेन." हे वचन मी आजपावेतो पाळले. वचनाचा दुसरा भाग म्हणून हे जरी आपल्यात नसले, तरी हे कार्य मी जन्मभर पुढे चालूच ठेवीन.

माझी भगिनीवत मैत्रीण सौ. उषा गायकवाड हिने आमच्या लग्नाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त माझ्या जीवनाचे सार असलेले काव्य केलेले आहे. ती लिहिते –

साऱ्या दुनियेचे दादा, पण मला राजहंस।
माझे पती म्हणजे, जसे मानवतेचे परमहंस।।
त्यांच्या सवे चालताना, नाही पहिली दिस रात।
झाली पन्नास वर्षे, आमचा हातामध्ये हात।।
नाही कुठला माणूस, त्यांना कधीही पारखा।
त्यांचा प्रत्येक शब्द, म्हणजे अमृतासारखा।।
माझ्या डोईचा पदर, झाली त्याचीच सावली।
सात जन्म चालणार, मी त्यांच्याच पाऊली।।
जरी ह्यांच्या मुळे खेळे, आकाश अंगणी।
त्यांच्या नेत्रांचा प्रकाश, मला पुरे ग साजणी।।
माझी ओळख झाली, ह्यांच्यामुळे जगाला।
जसा फुलासवे येतो, सुगंध मातीला।।
सार्थक झाले जीवन माझे, त्याची देते ती पावती।
त्यांना ओवाळण्या होते, चंद्र सूर्याची आरती।।

हे काव्य साहेब हयात असतानाचे आहे आज हे 'येतो मी' असं न म्हणता 'जातो मी' म्हणून कधीच परत न येण्यासाठी निघून गेले आहेत. आता उरल्या आहेत ह्यांच्या अनेक आठवणी आणि जीवघेणा विरह. माझ्या कामाच्या व्यस्ततेतही मनातलं हे चक्र सदैव चालूच असतं. ह्या अवस्थेतही शेवटी एकच म्हणते –

वर्षच झाले जाऊन तुम्हा, परी वाटे युगेयुगे लोटली।
क्षणैक न विसरल्या आठवणींची, वाहते तुम्हा श्रद्धांजली।
कोमेजली ती फुले, जी तुमच्या प्रतिमेला अर्पियली।
विरह दु:खाश्रूंना फुलासदे ओंजळीत घेऊनी।
वाहते तुम्हा कमलांजली।।

-दादासाहेबांच्या धर्मपत्नी तथा
सामाजिक कार्यकर्त्या.

❑❑

कर्मयोगी-रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई

१९७३ फेब्रुवारीमधील होळीच्या दिवशी आम्ही एकत्र जेवायला होतो. त्याच वेळी डॉ. मोहोकर यांची महाराष्ट्र लोकसभा आयोगाची मुदत संपणार होती. दादासाहेबांनी मला विचारलं की, या आयोगावर जाण्याची आपली इच्छा आहे का ? खरं म्हणजे त्यावेळी या आयोगाची मला काहीच कल्पना नव्हती. मी त्यांना सौ. कमलताईंना याबद्दल विचारा म्हटले. त्यांनी त्यांची मूकसंमती मिळवली. त्यावेळी मी विश्वेश्वरैय्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रोफेसर म्हणून कार्यरत होतो. अचानकपणे १४ एप्रिल १९७३ ला मुख्यमंत्री श्री. वसंतरावजी नाईक यांनी अमरावतीला भेटीला बोलाविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण त्या दिवशी त्यांचे हस्ते होते. मुख्यमंत्र्यांनी आयोगावर येण्याची इच्छा आहे का ? हा प्रश्न विचारला. आयोगावर येण्याची पार्श्वभूमी दादासाहेबांनी तयार केलेली होती. मला नाही म्हणता आले नाही. डॉ. म. ना. वानखेडे हे अध्यक्ष होते. माझ्या दहा वर्षाचे कालखंडात (प्रथम सदस्य व नंतर अध्यक्ष) दादासाहेबांनी कुठल्याही उमेदवाराची शिफारस केली नाही. उमेदवारांना ते सांगायचे की, मागासवर्गातील उमेदवारांना निश्चित न्याय मिळेल. १९७६ मध्ये "आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या" व "मागासवर्गीय" उमेदवारांकरिता ८०% आरक्षण होते. ते करण्यामागे दादासाहेबांचा मोठा वाटा होता. त्याचवेळी आयोग ग्रामीण भागातील मुलांना ९०% जास्त गुण लेखी परीक्षेत देत असे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी व मागासवर्गीय विद्यार्थी फार मोठ्या प्रमाणात शासकीय सेवेत आलेत.

-डॉ. का. गो. देशमुख.
माजी अध्यक्ष,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

आमचे आधारस्तंभ

▪ पद्मश्री प्रभाकरराव वैद्य

दादासाहेब गवई यांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न आणि शरीर पीळदार होते. विद्यार्थीदशेपासूनच त्यांचा हनुमान व्यायाम शाळेशी संबंध आला. व्यायामशाळेची विविध पथकं होती. दादासाहेब आणि मी बजरंग पथकात होतो. लाठी-काठी शिकत होतो. माझे वडील आणि हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे संस्थापक स्व. अंबादासपंत वैद्य आम्हाला लाठी-काठीचे धडे द्यायचे. पंतांची शिस्त कडक पण सर्वच जाती-धर्माच्या मुलांविषयी त्यांचा जिव्हाळा मात्र अपार होता. दादासाहेबांवरही त्यांच्या संस्काराचा प्रभाव होता. माझी आणि दादांची मैत्री तेव्हापासूनची. मला ते मोठ्या भावासारखे होते. व्यायामशाळेच्या ट्रीपला आम्ही सोबत जायचो. दादासाहेब पुढे समाजकारणात, राजकारणात सक्रिय झाले. ते म्हणाले 'प्रभाकर तू व्यायामशाळा सांभाळ. मी राजकारण सांभाळतो. पण व्यायामशाळेशी जिव्हाळा ठेवून राहीन' त्यांनी हा शब्द अखेरपर्यंत पाळला.

दादासाहेब पुढे दीन-दलितांच्या प्रश्नांसाठी राजकारणात सक्रिय झाले. पुढारी झाले. विधानपरिषदेचे सभापती, राज्यपाल झाले पण व्यायामशाळेशी त्यांचे संबंध कायम राहिले. अमरावतीला आल्यावर आवर्जून फोन करायचे आणि व्यायामशाळेची, सर्वांची ख्याली-खुशाली विचारायचे. मोठ-मोठी पदं आल्यावर लोक जुने संबंध विसरतात पण दादासाहेबांचे तसे नव्हते. त्यांच्याकडे नेहमी राजकारणातल्या मोठ-मोठ्या लोकांची गर्दी असे. कार्यकर्त्यांची झुंबड राहत असे पण व्यायामशाळेच्या किंवा अन्य सामाजिक प्रश्नांसाठी आम्ही त्यांना भेटायला गेल्यावर ते इतक्याही गर्दीत मला पहिले बोलवायचे. 'प्रभाकर, लोकांच्या उपयोगी पडत जा, गरिबांना मदत करत जा' असा नेहमी सल्ला द्यायचे. समाजकार्यात व्यायामशाळा सक्रिय झाली त्यामागे दादासाहेबांची प्रेरणा होती.

मोवाडला पूर आला. व्यायामशाळेचे कार्यकर्ते धावून गेले. लोकांचे प्राण वाचविले. अमरावतीत जातीय दंगा झाला. व्यायामशाळेच्या लोकांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र आणून सलोखा निर्माण केला. यामागे दादासाहेबांची प्रेरणा असायची. कारण दादासाहेब गवईंचे व्यक्तिमत्त्व हे एखाद्या जातीपुरते, पक्षापुरते मर्यादित नव्हते; तर त्यांना सर्वच जाती-धर्माविषयी आणि माणसांविषयी जिव्हाळा होता. त्यांच्या या सद्‌गुणांमुळेच त्यांना सर्व जाती-धर्मातील लोकांचे प्रेम मिळाले, साथ मिळाली आणि ते एवढ्या उच्चपदावर जाऊ शकले. हनुमान व्यायामशाळा आणि अनेक सामाजिक संस्थांना त्यांनी मदत केली. व्यायामशाळेचे ते आधारस्तंभ होते.

१९७१-७२ साली महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक हनुमान व्यायामशाळेचे अध्यक्ष झाले ते दादासाहेब गवईमुळे. दादासाहेब तेव्हा संस्थेचे उपाध्यक्ष होते. स्व. नाईक साहेब आणि दादासाहेबांची खूप मैत्री होती. या दोन्ही नेत्यांनी व्यायामशाळेच्या विकासात मोलाचे योगदान दिले. महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजना दादासाहेबांमुळे संस्थेला प्राप्त होऊ शकल्या. त्यामुळे मोठ-मोठी कामे, इमारती संस्थेत होऊ शकल्या. संस्थेचा विकास झाला. राजकीय स्तरावर संस्थेविषयी काही गैरसमज निर्माण झाले तर दादासाहेब ते दूर करीत आणि 'ती माझी संस्था आहे' असे सर्वांना सांगत. इतका त्यांचा जिव्हाळा होता, कळकळ होती.

एखादी व्यक्ती राजकारणात, समाजकारणात सक्रिय असली की त्या व्यक्तीचा प्रभाव त्यांच्याशी संबंधित संस्थांवर पडतो. पण ही गोष्ट विशेषत्वाने सांगितली पाहिजे की, स्व. नाईक साहेब, दादासाहेब राजकारणात सक्रिय असूनही

त्या राजकारणाचा प्रभाव त्यांनी संस्थेवर पडू दिला नाही. संस्थेत कधीच राजकारण आणले नाही. त्यात हस्तक्षेप, ढवळाढवळ केली नाही. गवई साहेबांनी अमरावतीला खासदारकीची निवडणूक लढविली पण त्यासाठी त्यांनी व्यायामशाळेचा कधीच वापर केला नाही. उलट त्यापासून व्यायामशाळेला दूरच ठेवले. निवडून आल्यावर मात्र प्रत्येक वेळी व्यायामशाळेला मदत केली. केवढा हा मनाचा मोठेपणा। हा मनाचा दिलदारपणा दादासाहेबांजवळ होता.

अमरावतीच्या स्नुषा श्रीमती प्रतिभाताई पाटील भारताच्या महामहीम राष्ट्रपती झाल्या. त्यांचा भव्य सत्कार समारंभ हनुमान व्यायाम शाळेच्या मैदानावर झाला. सुमारे दीड लाख लोक या सत्कार समारंभाला उपस्थित होते. दादासाहेब गवई स्वागताध्यक्ष होते. राष्ट्रपतींचा समारंभ सुरक्षिततेच्या कारणास्तव खुल्या मैदानात होत नाही. पण दादासाहेबांमुळे ते शक्य झाले. सर्व पक्षांचे, जाती-धर्माचे लोक त्यात सहभागी झाले. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचा हा सत्कार सोहळा अद्वितीय ठरला.

विदर्भात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांमध्ये नैराश्य आले. त्यांचा कोणी वाली राहिला नाही. दादासाहेब म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहा. त्यांना आधार द्या.' आम्ही पैलवान लोक. शेतीशी तसा आमचा संबंध नव्हता. हे काम शासनाचे होते. पण शेतकऱ्यांना मरू देणे, वाऱ्यावर सोडणे माणुसकीच्या विरुद्ध होते. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने 'शेतकरी अभियान' सुरू केले. शेतकऱ्यांना स्वत:च्या खर्चाने आणणे, त्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन देणे, त्यांच्या खाण्या-पिण्याची, राहण्याची व्यवस्था करणे, त्यांना हिंमत देणे ही कामे आम्ही केली; ती दादासाहेबांच्या प्रेरणेमुळे. जवळपास दीड लाख शेतकऱ्यांना शिवाजी शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयाचे सहकार्य घेऊन आम्ही प्रशिक्षित केले. इतकेच नव्हे, तर त्यांच्या मुला-बाळांच्या शिक्षणाला, मुलींच्या लग्नाला मदत केली आणि करीत आहोत.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना पॅकेज जाहीर करण्यासाठी आम्ही भारताचे तत्कालीन पंतप्रधान मा. मनमोहनसिंग यांना भेटायला दिल्लीत गेलो. त्यांना परिस्थिती समजावून सांगितली. पंतप्रधान अमरावती जिल्ह्यात आले. त्यामध्ये स्व. निर्मलाताई देशपांडे, दादासाहेब गवई, प्रा. बी. टी. देशमुख यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना मदत मिळाली.

समाजातील दीन-दुबळ्या लोकांविषयी गवई साहेबांच्या अंत:करणात खूप तळमळ होती. ते नेहमी गरिबांना मदत करीत. आम्ही समाजातील अत्याचारपीडित लोकांसाठी 'हेल्पलाईन' सुरू केली. विशेषत: महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी. हिंदू-मुस्लिम समाजातील सर्व लोकांना सोबत घेतले. जातीय तणाव, दंगे आणि समाजातील अनेक समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला त्यामागे दादासाहेबांचे आशीर्वाद आहेत.

दादासाहेब बिहारचे राज्यपाल झाले. त्यांनी हनुमान व्यायाम शाळेच्या पथकाला प्रात्यक्षिके सादर करण्यासाठी बिहारला निमंत्रित केले. सर्वांची उत्तम व्यवस्था करण्यास सांगितले. स्वत: कार्यक्रमास हजर राहिले. व्यायामशाळेच्या शताब्दी समारंभानिमित्त आम्ही जानेवारी, २०१३ ला 'ग्लोबल कॉन्फरन्स' घेतली. २८ देशांचे प्रतिनिधी त्याला उपस्थित होते. त्यासाठी दादासाहेबांनी आम्हाला खूप मदत केली. दादासाहेबांचा आणि व्यायामशाळेचा जिव्हाळा अखेरपर्यंत कायम होता. श्रीमती कमलताई गवई यांनीही तो कायम ठेवला. समाजकारणात, राजकारणात गवई साहेब स्वाभिमानाने आणि प्रतिष्ठेने जगले. हा मर्द माणूस होता. दिलेला शब्द पाळणारा. हनुमान व्यायाम शाळेचे ते आधारस्तंभ होते. त्यांच्या जाण्याने आम्ही आमचा आधारस्तंभ गमावला आहे. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

-प्रधान सचिव,
हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती.

❑❑

सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व

■ डॉ. देविसिंह शेखावत

माणसे सहज मोठी होत नसतात. त्यांनी जीवनात जपलेले ध्येय, चिरंतन केलेली धडपड, कष्ट उपसण्याची तयारी, ठायी असलेली सहनशीलता व प्रामाणिकता अशा विविध दुर्मीळ गुणांची परिणिती भविष्यात त्यांना समृद्धी प्रदान करीत असते. स्व. दादासाहेब गवई यांच्या व्यक्तिमत्त्वात वरील सर्व गुणांचा समुच्चय झालेला होता. म्हणूनच अत्यंत खडतर प्रवास करीत ते त्यांच्या आयुष्यात यशोशिखरावर पोहोचू शकले.

गवई साहेबांचे आणि माझे गाव जवळजवळ, अगदी शीव एक असल्यासारखे. ते दारापूरचे आणि मी चंद्रपूर-खल्लारचा, अमरावतीलाही आम्ही एकाच काँग्रेसनगरमध्ये राहायचो, एकत्र काम करायचो. ही घनिष्टता, मैत्री शेवटपर्यंत कायम होती. मी खामगावला इंटर सायन्स करून पुढील शिक्षणासाठी अमरावतीला विदर्भ महाविद्यालयात प्रवेश घेतला. हे विदर्भातील अतिशय नावाजलेले शासकीय महाविद्यालय आहे. मी सायन्सचा विद्यार्थी, गवई साहेब, सुधाकरराव नाईक (माजी मुख्यमंत्री), सुरेश भट (सुप्रसिद्ध कवी), मधुकर केचे (स्तंभ लेखक), जांबुवंतराव धोटे (प्रसिद्ध विदर्भवादी नेते), प्रा. सुरेश पाध्ये, यशवंतराव शेरेकर (माजी आमदार), बबनराव मेटकर (माजी आमदार), प्रभाकर भेंडे (माजी जि. प. अध्यक्ष) ही मंडळी आर्ट्सला होती. कॉलेजमध्ये मुलींची संख्याही लक्षणीय होती. शहरातील सर्व मुलं-मुली त्याकाळी मथुरादास बस सर्व्हिसने विदर्भ महाविद्यालयात जायचे, कारण शहरापासून कॉलेज बरेच लांब होते. मी विदर्भ महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये राहयचो, जांबुवंतराव धोटे माझे रूम पार्टनर होते. त्यामुळे माझे इतर कोणतेही मित्र, आमच्या रूमकडे फिरकत नसायचे. कारण जांबुवंतराव यांची धिप्पाड पहिलवानवजा शरीरयष्टी आणि प्रचंड भीती. विदर्भ महाविद्यालयाच्या निवडणुका त्याकाळी खूप गाजत असत, दादासाहेब गवई त्यात नेहमी सक्रिय असायचे. त्यांचा प्रभाव गट होता. आम्ही विरुद्ध गटात होतो. गवई साहेबांच्या गटाचा उमेदवार आमच्या उमेदवारापेक्षा वक्तृत्व कलेत सरस ठरला. तेव्हा निवडणुकीपूर्वी वक्तृत्व स्पर्धा व्हायची. प्रत्येक उमेदवाराला आपली बाजू मांडायला सांगितली जायची. या निवडणुकीत आमचा उमेदवार आपली बाजू मांडण्यासाठी व्यासपीठावर गेला आणि, 'मला कशासाठी निवडून द्यायचे?' हेच वाक्य तीन वेळा उच्चारून स्टेजवरून खाली आला. प्रचंड हास्यकल्लोळ झाला. गवई साहेबांनी त्यांच्या उमेदवाराची चांगली तयारी करून घेतली होती. अर्थात आमचे पॅनेल पडले. गवईसाहेबांचे पॅनेल निवडून आले. कॉलेजचे स्नेहसंमेलनही जोरात व्हायचे. वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा व्हायच्या, नाटकं बसविली जायची. डॉ. सुरेश पाध्ये यांचा 'फिशपाँड' कार्यक्रम फार बहारदार व्हायचा. स्नेहसंमेलन कधी यशस्वी व्हायचे. तर कधी विरोधी गट गोंधळ करून उधळून देखील लावायचे. गवई साहेब सर्व उपक्रमांत नेहमी सक्रिय असायचे. तेव्हापासून चळवळ उभारायचे. त्यांच्यात नेतृत्वाची बीजे त्यांच्या महाविद्यालयीन जीवनापासूनच रुजली होती. मग ते शिष्यवृत्तीसाठीचे आंदोलन असोत वा दलित समाजाचे प्रश्न असो गवई साहेब जनजागृती करीत असत. विद्यार्थिदशेपासूनच गवई साहेबांना सामाजिक उत्तरदायित्वाची चांगली जाण होती. दलित, पीडित, शोषित वर्गासाठी ते सदैव तत्पर असायचे.

गवई साहेबांचा स्वभावच चळवळ्या होता. अनेक चळवळी उभारून त्यांनी दलित, मागास समाजाला त्या काळात एकत्र केले. इतकेच नव्हे, तर संयुक्त महाराष्ट्राची

चळवळ, गोवामुक्ती संग्राम यातही ते सहभागी झाले. कृषी विद्यापीठाच्या आंदोलनालाही त्यांचा पाठिंबा होता. गवई साहेब पुढे राजकारणात सक्रिय झाले आणि मी शिवाजी शिक्षण संस्थेत रसायनशास्त्र विषयाचा प्राध्यापक झालो. मैत्री मात्र कायम होती.

माझे व सौ. प्रतिभाताईचे लग्न जमले त्यामध्ये आबासाहेब खेडकर, राज्याचे तत्कालीन ग्रामीण विकास मंत्री आणि दादासाहेब गवई यांचा मोलाचा वाटा होता. सौ. प्रतिभाताईंचे वडील ॲड. नानासाहेब पाटील व आबासाहेब खेडकर जुने जाणते, निकट परिचित होते. सौ. प्रतिभाताईंच्या वडिलांनी, आबासाहेब खेडकर यांना आमच्या लग्नसंबंधाबद्दल सांगितले. मग खेडकर साहेबांना मला पहावयाचे होते म्हणून त्यांनी मला अमरावती येथील डाक बंगल्यावर बोलवून घेतले. गवई साहेबांनी आमदार निवासात प्रतिभाताईंची भेट घेतली व सुरेश पाध्ये यांना तिथपर्यंत बरोबर नेले व सुरेश पाध्ये यांनी डोकावून खोलीत पाहिले व दोघांनी संमती दिली. आमचे लग्न जमले तेव्हा श्रीमती प्रतिभाताई आमदार होत्या. त्यामुळे लग्नाला मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदार अशी प्रतिष्ठित मंडळी त्यांच्याकडून उपस्थित राहणार होती. मला सौ. प्रतिभाताईंचे भाऊ आबासाहेब पाटील यांनी विचारले "तुमच्याकडून कोण-कोण प्रतिष्ठित व्यक्ती येणार?" मी गवई साहेब, जांबुवंतराव धोटे, सुरेश पाध्ये, सुरेश भट इत्यादी मित्रांची नावे सांगितली. ही माझी सर्व मित्र मंडळी विदर्भातील, आक्रमक चळवळी उभारणारी होती त्यामुळे माझ्या सासरकडची मंडळी लग्न सुरळीत पार पडेल का, या विचाराने चिंतेत होती. कारण माझ्या या मित्रांमध्ये जांबुवंतराव म्हणजे आगच होते. लग्नाच्या काही दिवस अगोदर धामणगाव येथील आंदोलनात जांबुवंतरावांना आणि बडनेरा येथील एका आंदोलनात गवई साहेबांना अटक झाली. माझे दोघेही जिवलग मित्र सरकारी पाहुणे झाले व लग्नाला उपस्थित राहू शकले नाहीत. १९६५ मध्ये जळगावच्या राणाप्रताप सभागृहात आमचे लग्न शांततेत पार पडले.

श्रीमती प्रतिभाताई मंत्री आणि गवई साहेब उप सभापती होते, त्यामुळे विविध सामाजिक, राजकीय विषयांवर वारंवार चर्चा व्हायच्या. घरी जाणे-येणे असायचे. १९६८ साली मी हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये रिसर्चसाठी मुंबईला गेलो. त्या वेळी महाराष्ट्राच्या राजकारणातील गवई साहेबांचे कार्य मला जवळून बघता आले. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी, सर्व प्रश्नांची सखोल जाण असणारा नेता म्हणून त्यांनी आपला वेगळा ठसा सभागृहात निर्माण केला होता. उप सभापती असले तरी ते हाऊसच्या डिबेटमध्ये सहभागी व्हायचे.

गवई साहेबांचे नेतृत्व दलित समाजातून निर्माण झाले असले तरी ते दलित समाजापुरते मर्यादित नव्हते. कोणत्याही समाजाची, पक्षाची व्यक्ती त्यांच्याकडे कामासाठी गेल्यावर त्याचे काम ते शंभर टक्के करायचे. त्यामुळे त्यांच्याकडे कार्यकर्त्यांची गर्दी असे. अमरावती जिल्ह्याच्या प्रश्नांवर ते जिल्ह्यातील सर्व पक्षाच्या आमदारांना एकत्र करायचे. त्यांचा समन्वय साधायचे. कोणी कोणता प्रश्न मांडावा हे ठरवून घ्यायचे. त्यामुळे एकोपा व राजकारणविरहित जिव्हाळा कायम होता. अमरावती शहराच्या पाणीपुरवठा प्रश्नावर स्वातंत्र्य सैनिक स्व. बाळासाहेब मराठे, मी स्वतः सत्ताधारी पक्षाचा आमदार असूनदेखील उपोषणाला बसलो. त्या वेळी जिल्ह्यातील सर्व आमदार-जसे की गवई साहेब, सुदाम काका देशमुख, प्रा. बी. टी. देशमुख, ॲड. यशवंतराव शेरेकर, इत्यादींनी मला उपोषणात सहभागी न होण्याचा आग्रह धरला, मात्र मी उपोषणात सामील झालो. त्यामुळे काही मंडळी नाराजही झाली. स्वतः मा. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना माझे उपोषणास बसणे आवडले नाही, पण मी माझ्या भूमिकेवर ठाम होतो. शेवटी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र आणण्याचे कार्य गवई साहेबांनी केले. पुढे मी, बी. टी. देशमुख आणि सुदाम काका देशमुखांनी

हा प्रश्न विधिमंडळात लावून धरला व गवई साहेबांनी त्यांचे राजकीय वजन वापरून हा प्रश्न मार्गी लावला. अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीचा ठरावही सर्वप्रथम गवईसाहेबांनी सभागृहात मांडला.

अमरावती जिल्ह्याच्या राजकारणाची घडी गवईसाहेबांनी बसविली होती. वडीलकीच्या नात्याने ते सर्वांना एकत्र आणायचे आणि सर्वच पक्षांचे लोक त्यांना मान द्यायचे. के. जी. देशमुख व पी. के. देशमुख यांच्या पिढी नंतर गवई साहेबांनी आपल्या रूपाने जिल्ह्याला परिपक्व नेतृत्व दिले. त्यांच्या नेतृत्वाला प्रगल्भ विचारांचा, जिव्हाळ्याचा सुगंध होता. मोठ्या पदावर जाऊनही ते कधी आपल्या जुन्या मित्रांना व जीवनातील बिकट कालखंडाला विसरले नाहीत. ते अमरावतीत आल्यावर जुन्या मित्रांना गप्पांसाठी मुद्दाम बोलवायचे. त्यांनी कधीच कटुता येऊ दिली नाही. गवई साहेबांच्या आठवणींनी मन भरून येते. आमच्या वहिनी आदरणीय श्रीमती कमलाताईंनी त्यांना उत्तम साथ दिली. आमचे आजही तसेच कौटुंबिक नाते आहे, दादासाहेबांनंतर राजकारणात व समाजकारणात एक मोठी न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. अशा वेळी त्यांची व त्यांच्या कार्याची प्रकर्षाने आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

-प्रथम महापौर, अमरावती.

❑❑

विधान भवन प्रांगणातील महात्मा फुले पुतळ्याचे प्रमुख शिल्पकार

३१ मे १९६९ रोजी पुणे नगरपालिकेच्या प्रांगणात महात्मा फुल्यांचा पूर्णाकृती पुतळा बसला. त्यातूनच महात्मा फुले स्मारक समिती स्थापन झाली आणि विधान भवनाच्या प्रांगणात त्यांचा पुतळा उभारण्याचा संकल्प केला गेला. दिवगंत व्यापारी मुकुंद ठकोजी भुजबळ व त्यांचे सहकारी त्यासाठी खूप मेहनत घेत होते. या कामाला जेव्हा दादासाहेब गवई यांच्या चातुर्यबुद्धीची व राजकीय इच्छाशक्तीची जोड मिळाली तेव्हाच ते काम पूर्णत्वास जाऊ शकले. दादासाहेबांनी वसंतदादा पाटील, अ. र. अंतुले, बॅ. बाबासाहेब भोसले, शरदराव पवार या मुख्यमंत्र्यांच्या कार्यकाळात या कामी समन्वय घडवून आणण्याचे आणि त्यांच्याकरवी या कामाला गती देण्याचे कळीचे काम केले. महात्मा फुले यांचा हा पुतळा म्हणजे दादासाहेब गवई यांच्या ध्येयनिष्ठ राजकीय सत्तेतील सहभागाचा उत्तम नमुना मानता येईल. पडद्यामागे दादासाहेबांनी त्यासाठी अपार कष्ट घेतले. तत्कालीन उप राष्ट्रपती एम. हिदायतुल्ला यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण झाले. दादासाहेबांनी आपले सारे राजकीय चातुर्य पणाला लावून रातोरात विधान भवनावरचा तिरंगा ध्वज फुले पुतळ्यामागे आणून उभा केला.

-हरी नरके
सुप्रसिद्ध साहित्यिक.

एचबी ११८०—१२

आमचा कुष्ठमित्र

▪ डॉ. मोतीलाल राठी

अमरावती जिल्ह्याला सामाजिक, राजकीय नेतृत्वाची एक परंपरा आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या पातळीवर या जिल्ह्यातील नेतृत्वाने आपला ठसा उमटविला आहे. नेतृत्वाच्या या परंपरेत आमचे मित्र रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे नेतृत्व लक्षणीय होते. कारण अत्यंत गरिबीतून, दलित समाजातून त्यांनी स्वतःचे नेतृत्व निर्माण केले. त्यासाठी खूप परिश्रम घेतले. गावोगावी दौरे केले, संघटना बांधल्या आणि पक्ष मोठा केला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला वऱ्हाडच्या जनमानसात पोहोचविले. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांच्यात हे नेतृत्वगुण होते.

गवईंचे राजकीय नेतृत्व फुलले ते सामाजिक चळवळीतून. त्यामुळे सामाजिक कार्याविषयी त्यांच्या मनात प्रचंड आस्था होती. स्वातंत्र्यसेनानी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी १९५२ साली अमरावतीला 'जगदंब कुष्ठधाम तपोवनची' स्थापना केली. घरचे सगे-सोयरेही 'महारोगी' म्हणून त्या पेशंटला टाकून द्यायचे असा तो काळ होता. त्या काळात डॉक्टरही कुष्ठरुग्णाला हात लावायला कचरत असत. आम्ही, डॉ. आळशी आणि मी तेव्हा तरुण डॉक्टर होतो. दाजीसाहेबांच्या या महान कार्यात डॉक्टर म्हणून सहकार्य करू लागलो. या कार्यात अनेक सामाजिक व शासकीय अडचणी यायच्या. या अडचणी दूर करण्यासाठी दादासाहेब गवईंची तपोवनला व दाजीसाहेबांना खूप मदत व्हायची.

महाराष्ट्र शासनाने १९८० साली महाराष्ट्रातील कुष्ठरुग्णांच्या आणि कुष्ठधामांच्या समस्या जाणून घेण्यासाठी राज्यस्तरावर एक समिती गठित केली होती. दादासाहेब गवई हे त्या समितीचे अध्यक्ष होते आणि स्वातंत्र्यसेनानी पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन, पद्मभूषण डॉ. बाबा आमटे, वैद्यकीय सामाजिक क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती आणि मी स्वतः देखील त्या समितीचा सदस्य होतो. राज्याचे आरोग्य विभागाचे (कुष्ठरोग) उप संचालक डॉ. येल्लापूरकर हे त्या समितीचे सचिव होते. या समितीने महाराष्ट्रातील कुष्ठरुग्णांच्या समस्यांचे आणि कुष्ठधामांना येणाऱ्या अडचणींचे सखोल अध्ययन केले. महाराष्ट्रातील सर्वच कुष्ठधामांना स्वतः गवई साहेबांनी व समितीने भेटी दिल्या. त्यानंतर त्याचा अभ्यासपूर्ण अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात आला. कुष्ठतज्ज्ञ डॉ. आँटीया यांनी हा अहवाल तयार करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. या अहवालामुळे कुष्ठरुग्णांची आणि कुष्ठधामांची स्थिती सुधारण्यास, त्यांना अनुदान देण्यात सुधारणा झाली. या सर्व कामात गवई साहेबांचे योगदान मोठे होते. याशिवाय ते नेहमीच तपोवनला व कुष्ठसेवेच्या कामास मदत करावयाचे. त्यामुळे त्यांना 'कुष्ठमित्र पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

मागासवस्त्यांमध्ये उत्तम आरोग्य सुविधा पोहोचल्या पाहिजेत ही दादासाहेबांची कळकळ होती. त्यासाठी आम्ही त्यांच्याच अध्यक्षतेखाली 'आरोग्य साधना' मंडळ अमरावतीला सुरू केले. मागासवस्त्यांमध्ये मोफत औषधोपचार व उत्तम डॉक्टरांच्या निःशुल्क सेवा आम्ही उपलब्ध करून दिल्या. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक व आरोग्यमंत्री मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना दादासाहेबांनी आणले. मुख्यमंत्री निधीतून दहा हजार रुपयांचे अनुदान मा. मुख्यमंत्र्यांनी संस्थेला दिले. आमचा उत्साह वाढला. आम्ही मागासवस्त्यांमध्ये आणखी दवाखाने उघडले. अमरावतीला आल्यावर प्रत्येक वेळी गवईसाहेब या दवाखान्यांना भेट द्यायचे. लहान-सहान प्रश्नांकडेही ते आस्थेने पाहायचे. प्रश्न समजून घ्यायचे.

१९५० साली विदर्भ महाविद्यालयात विज्ञानशाखेत मी आणि गवई साहेब सोबत होतो. परंतु विज्ञानशाखेच्या अभ्यासात सामाजिक चळवळींना वेळ मिळत नाही आणि चळवळी करून अभ्यास करता येत नाही म्हणून त्यांनी कलाशाखेत प्रवेश घेतला. मी वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईला गेलो. आपल्या कर्तृत्वाने आमच्या मित्राने यशाचे शिखर गाठले. १९८० साली त्यांचा पन्नासावा वाढदिवस अमरावतीकरांनी धुमधडाक्यात साजरा केला. तत्कालीन नगराध्यक्ष स्व. हरीभाऊ कलोती या गौरव समितीचे अध्यक्ष होते. त्यांचे अचानक दु:खद निधन झाले. त्यानंतर त्या समितीचे अध्यक्षपद स्वातंत्र्य सेनानी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी स्वीकारले. ते गवईंच्या प्रेमापोटीच. दाजीसाहेबांचे आणि गवई साहेबांचे हे स्नेहसंबंध अखेरपर्यंत कायम होते. ते कायम आमचे मित्र आणि कुष्ठमित्रही होते. सामाजिक प्रश्नांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. आमच्या वहिनी, श्रीमती कमलताईंनी संसार सांभाळण्यासाठी आमच्या माहेश्वरी विद्यालयात शिक्षिकेची नोकरी केली. गवई साहेबांनी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. पुढे त्या प्राचार्या झाल्या. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून त्या अनेक सामाजिक कामे करीत आहेत. गवई साहेबांच्या कार्याचा हा प्रभाव आहे.

-अध्यक्ष, विदर्भ महारोगी सेवामंडळ, तपोवन.

❑❑

जीवन हसण्यासाठी व हसविण्यासाठी

रा. सू. गवई म्हणजे हास्याचा नायगारा, जीवन हे हसण्यासाठी व हसविण्यासाठी आहे, असाच त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन आहे. बंद गळ्याचा कोट तर, कधी इंग्लिश सूट, तर कधी शर्ट, चेहऱ्यावर सदोदित हास्य, तोंडात पान व हातात पानाचा डबा घेऊनच मी त्यांना पाहिलेले आहे. कोणतीही बाब कितीही गंभीर असली तरी विनोदानेच त्यातून मार्ग काढण्याची त्यांची हातोटी आहे.

कोणाला कशाचा शौक असतो तर कोणाला कशाचा शौक असतो. गवईंना पानदानाचा शौक आहे. ते आपल्या पानाच्या डब्यातून अडकित्ता काढून आम्हाला सुपारी द्यायचे. त्याचा प्रचलित अर्थ घेऊ नका. ते आम्हाला प्रेमाने द्यायचे.

उत्तम राजकारणपटुत्व आणि कार्यकुशलता हे त्यांचे गुण प्रकर्षाने जाणवतात आणि म्हणूनच सभागृहात जय म्हणणारे तेच व जयजयकार करणारे तेच एकमेव असताना देखील सभापती तेच होऊ शकले. आपली कारकीर्द सभागृहाची गरिमा राखून त्यांनी न्यायबुद्धीने पार पाडली. निर्णय देताना त्यांनी भेदभाव केलेला मी तरी पाहिलेला नाही. मुख्यमंत्री मनोहर जोशी विधानपरिषदेत सदस्य असताना एकदा म्हणाले होते की, गवई हे एक एकमेव द्वितीय संस्थान आहे. कारण त्यांच्या पक्षात ते एकटेच सदस्य तेच अध्यक्ष तेच जनता आणि तरीही अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधी म्हणून सभागृहात तब्बल तीस वर्षे राहिले.

दत्ताजी नलावडे,
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.
(ज. वि. गायकवाड यांच्या पुस्तकातून)

एचबी ११८०—१२अ

मुत्सद्दी नेतृत्व

▪ ॲड. अरुण शेळके

आमचा अमरावती जिल्हा हा संतपुरुषांचा आणि महापुरुषांचा आहे. कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अशी थोर माणसे या जिल्ह्यात झाली. दादासाहेब आणि मी एकाच दर्यापूर तालुक्यातले. ते दारापूरचे आणि माझे गाव रामतीर्थ. दादासाहेब तेव्हा मागासजातीतील लोकांचा सामाजिक स्तर सुधारावा म्हणून कार्य करीत होते. त्यासाठी ते गावोगाव दौरे करायचे. आमच्याही गावात ते यायचे. माझे वडील भीमरावजी जनपदचे सदस्य होते. त्यांना भेटायला गवई साहेब आमच्या घरी आल्याचे मला आठवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार खेड्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी दादासाहेबांनी त्या काळात खूप कष्ट घेतले. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांनी त्यावेळी ग्रामीण भागात खूप जनजागृती केली होती. विशेष म्हणजे अमरावतीचे अंबादेवी मंदिर अस्पृश्य समाजासाठी खुले झाले पाहिजे, त्यात त्यांना प्रवेश मिळाला पाहिजे यासाठी डॉ. भाऊसाहेबांनी आंदोलन उभारले. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली परिषद आयोजित केली. डॉ. भाऊसाहेबांच्या प्रयत्नांमुळे १९२७ साली अंबादेवीचे मंदिर सर्व जातींसाठी खुले झाले. त्यानंतरच्या काळात गवई साहेबांवर या गोष्टींचा प्रभाव पडला असला पाहिजे. कारण गवई साहेब डॉ. भाऊसाहेबांना श्रद्धास्थानी मानत.

१९६२ साली अटीतटीचा प्रसंग आला. डॉ. पंजाबराव देशमुख लोकसभेसाठी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून उभे होते. रिपब्लिकन पक्षाने गवई साहेबांना उभे केले. वास्तविक डॉ. भाऊसाहेबांसारख्या महान व्यक्तीच्या विरुद्ध निवडणूक लढविण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण राजकीय अपरिहार्यता म्हणून त्यांनी निवडणूक लढविली. या निवडणुकीत प्रचार करताना डॉ. भाऊसाहेबांच्या महानतेला तडा जाणार नाही याची काळजी दादासाहेबांनी घेतली. एकही वाक्य ते डॉ. भाऊसाहेबांविरुद्ध बोलले नाही. ही राजकीय परिपक्वता व मुत्सद्दीपणा त्यांच्याकडे होता. डॉ. भाऊसाहेब निवडून आले.

अमरावती जिल्ह्याच्या राजकारणात दादासाहेबांनी स्वत:चे असे स्थान निर्माण केले होते. त्यामुळे कोणत्याही निवडणुकीत त्यांच्या सहभागाशिवाय कार्य पूर्ण होत नसे. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेला त्यांचे सहकार्य लाभत असे. दादासाहेबांनीही स्वत:ची शिक्षण संस्था काढली. त्या संस्थेमार्फत शाळा, महाविद्यालये चालविली जातात. आता अभियांत्रिकी महाविद्यालय त्यांच्या जन्मगावी दारापूरला सुरू करण्यात आले आहे. विधानपरिषदेच्या सदस्यापासून तो राज्यपाल पदापर्यंत अनेक पदे दादासाहेबांनी भूषविली. त्यामुळे त्यांना राजकारणाचा व प्रशासनाचा खूप अनुभव होता. सर्वच लोकांशी राजकीय संबंध ठेवल्याने त्यांची राजकीय कारकीर्द यशस्वी ठरली.

वास्तविक पाहता महाराष्ट्र विधान मंडळात त्यांच्या पक्षाचे बहुमत नव्हते. परंतु सतत तीस वर्षे विधानपरिषदेत ते निवडून आले. उप सभापती, सभापती आणि विरोधी पक्षनेता झाले. त्यानंतर बिहार आणि केरळ राज्याचे राज्यपालपद त्यांनी भूषविले. हा सर्व यशस्वी राजकीय प्रवास गवई साहेबांच्या मुत्सद्देगिरीमुळे शक्य झाला आहे. राजकारणात कोणत्या वेळी कोणती भूमिका घ्यावी हे त्यांना अवगत होते. दलित समाजासाठी तर त्यांनी कार्य केलेच पण सर्वच समाजाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे ते यशस्वी झाले.

-अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.

❑❑

दादा

▪ न्या. भूषण गवई

आपण सर्वसामान्य मध्यमवर्गीय चाकोरीतून जीवन जगत असतो. त्यामुळे आपल्या कुटुंबाला, मुलांना एका चाकोरीबद्ध सुरक्षित जीवनाची सवय लागते. परंतु चाकोरीच्या बाहेर समाजकारणात, राजकारणात, चळवळीत संघर्ष करीत जी व्यक्ती जगते अशा व्यक्तीचा मुलगा म्हणून त्या कुटुंबात वाढणे आणि जीवन जगणे काही औरच असते. सार्वजनिक जीवनातील संघर्षातून आपल्याला वास्तविक जीवन शिकविणारे हे कुटुंब म्हणजे एक पाठशाळाच असते. दादासाहेब गवई यांच्या अशा पाठशाळेत मी वाढलो आणि खूप काही शिकून गेलो. त्यांचा ज्येष्ठ पुत्र म्हणून मला त्यांचे जीवन जवळून बघता आले आणि सहवासही भरपूर लाभला. दादासाहेब बाहेर राजकारणी असले तरी घरी एक कर्तव्यदक्ष कुटुंबप्रमुख होते. सजग पालक म्हणून त्यांच्या मायेचा ओलावा आम्हाला-मला, डॉ. राजेंद्र, सौ. कीर्ती आणि माझ्या आईला, कमलताईला सतत जाणवायचा.

मी दहावीची परीक्षा मुंबईला देत होतो. आपल्याला माहीतच आहे की दहावीची परीक्षा ही आयुष्यातली प्रथम महत्त्वाची परीक्षा असते व त्याचे महत्त्व वेगळेच असते. इतर मुलांचे पालक त्यांना पेपरला सोडायला सेंटरवर यायचे. मी मात्र रोज बसने पेपरला जायचो. कारण दादांचे व्यस्त सार्वजनिक जीवन. माझी काही तक्रारही नव्हती. मला असे वाटते की त्यांच्यात समोरच्याचे मन जाणण्याची उपजत कला असावी. माझ्या शेवटच्या पेपरच्या दिवशी मला आश्चर्याचा धक्काच बसला. पेपरला जाताना मी जेव्हा त्यांचे आशीर्वाद घ्यायला गेलो तेव्हा ते म्हणाले, 'मी तुला सोडून देतो' आणि लाल दिव्याच्या गाडीत मला सेंटरला सोडून ते कौन्सिल हॉलला गेले. मला खूप आनंद झाला. मला निघताना दहा रुपये दिले आणि म्हणाले 'आज टॅक्सी करून घरी ये!' ही छोटीशीच घटना, परंतु मनात कायम कोरलेली.

मी अकरावी-बारावीत अमरावतीला असताना तापाने खूप आजारी होतो. स्व. डॉ. वा. पु. राऊत उपचार करीत होते. पण ताप काही केल्या कमी होत नव्हता. दादा अतिशय काळजीत राहायचे. शेवटी त्यांनी मेडिकल कॉलेज नागपूरचे डीन डॉ. चौबेंना फोन केला. त्यांनी औषधोपचार केला आणि मी बरा झालो. आपल्या अत्यंत व्यस्त जीवनात त्यांनी एक वडील म्हणून जी भूमिका वठविली ती आयुष्यभर न विसरण्यासारखी आहे.

दादा जरी व्यस्त असले तरी आई आम्हाला त्यांची उणीव भासू द्यायची नाही. आमचे खूप मोठे एकत्रित कुटुंब, सतत येणारे कार्यकर्ते, ह्या सगळ्यांना सांभाळून आई आम्हालाही सांभाळायची. आमचे शिक्षण, आमच्या गरजा याकडे तिचे पूर्ण लक्ष असायचे. माझ्या लहानपणी मी आईला घरच्या कामातही मदत करीत असे. मला असे वाटते की कष्टाळूपण आणि डिग्नीटी ऑफ लेबर ह्या गोष्टी मी आईपासून शिकलो.

अन्यायाच्याविरुद्ध संघर्ष केला पाहिजे ही शिकवण त्यांनीच आम्हाला दिली. मी बी.कॉम.ला असताना एका प्राध्यापकाने त्यांच्याशी वाद झाला म्हणून मुद्दाम मला कमी मार्कस् दिले. दादा म्हणाले "विद्यापीठात तक्रार कर, प्रसंगी कोर्टात जा. तुझे म्हणणे खरे असेल तर तुला घाबरण्याची गरज नाही." मी वकील झाल्यावर उच्च न्यायालयातील एक न्यायमूर्ती माझ्याशी पूर्वग्रहदूषित पद्धतीने वागत. माझ्याशी

दुजाभाव ठेवत. मी त्या न्यायालयात जाणे सोडून दिले व त्याचे कारणही सांगितले. शेवटी त्या न्यायमूर्तींना त्यांची चूक उमगली व त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. अन्यायाविरुद्ध लढण्याची व कोणावरही आपण अन्याय न करण्याची दादाची शिकवण मी आजही आचरणात आणत आहे.

शिक्षणाविषयी दादांना प्रचंड आस्था होती. आपली मुले उच्चविद्याविभूषित असावी असे त्यांना वाटे. मी बारावीत असताना आम्ही कौटुंबिक सहलीसाठी नागझिऱ्याला गेलो होतो. माजी मुख्यमंत्री बॅ. अंतुलेंची फॅमिलीही आमच्या सोबत होती. लंडन येथील दादांचे व बॅ. अंतुलेंचे एक गर्भश्रीमंत मित्र व त्याचा परिवारही आमच्या सोबत होता. त्यांचे खूप मोठे उद्योग होते. ते मला म्हणाले, "तू माझ्यासोबत उद्योगात जॉईन हो", त्यांनी मला ऑफर दिली. त्यांची प्रचंड श्रीमंती पाहून मीही मोहात पडलो. पण दादांनी विरोध केला. ते म्हणाले, "आधी खूप शिक आणि मग काहीही कर. शिक्षण घेणे महत्त्वाचे, पैसा नंतर मिळेलच." त्या वयात सर्वसामान्यांना जेवढी समज असते, तेवढीच माझी समज होती. त्यांनी परवानगी नाकारल्यामुळे मी जरा नाराज झालो. आज चाळीस वर्षांनंतर लक्षात येते की त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक किती दूरगामी व योग्य होता. शिक्षणाविषयी आणि जीवनाविषयी दादांचा दृष्टिकोन व्यापक होता. मला बारावी झाल्यावर आर्किटेक्ट व्हावे असे वाटत होते. पण मी वकील व्हावे अशी दादांची इच्छा होती. कारण त्यांना स्वत:ला वकील व्हायचे होते. राजकीय, सामाजिक चळवळीत पडल्याने त्यांची ती इच्छा अपूर्ण राहिली होती. वकिली केल्याने समाजातील दलित, शोषित वर्गाच्या न्यायासाठी झगडता येते, त्यांना न्याय मिळवून देता येतो, सामाजिक चळवळीत सक्रिय होता येते हा त्यांचा व्यापक दृष्टिकोन होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण ते मला द्यायचे.

दादा जरी वकील नव्हते तरी त्यांचे कायद्याचे ज्ञान वकिलापेक्षा कमी नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे प्रेरणास्थान आणि बाबासाहेब ज्या घटनेचे मुख्य शिल्पकार ती भारतीय राज्यघटना ही त्यांच्यासाठी दिशादर्शक होती. त्यांची विधिमंडळातील भाषणे अतिशय अभ्यासपूर्ण असत. रात्र-रात्र जागून ते भाषणाची तयारी करीत असत. मी आणि त्यांच्यासोबत चाळीस वर्षे राहिलेले त्यांचे स्वीय सचिव श्री. एन. आर. सुटे आम्ही दोघेही रात्री जागत असू. मी संदर्भ काढण्यात मदत करीत असे तर सुटेसाहेब डिक्टेशन घेत असत. भारतीय राज्यघटनेवर त्यांचे जे प्रभुत्व होते ते एखाद्या निष्णात वकिलालाही लाजवेल असेच होते. मी त्या वेळेला बी.कॉम. पदवीचा अभ्यास करत होतो. मला वाटते त्यावेळी त्यांना मदत करताना जो भारतीय राज्यघटनेशी माझा संबंध आला तो पुढे माझ्या वकिलीत, न्यायदानात व घटनात्मक कार्यात जे मी काम केले त्याचा पाया आहे.

दादांचे समाजकारण, राजकारण मी जवळून बघत होतो. अनेकदा त्यांच्यासोबत दौऱ्यावर जायचो. दक्षिणेकडील रिपब्लिकन पक्षाचे पुढारी महाराष्ट्रात यायचे. जाहीर सभांमध्ये ते इंग्रजीत भाषण करायचे. दादा मला त्या भाषणांचा भरसभेत मराठी अनुवाद करायला सांगायचे. मी अनेकदा हे काम केले आहे. त्यामुळे समाजकारण, जाहीर सभा, राजकारण याचा मला अनुभव घेता आला. दादांच्या निवडणुकांच्या कामातही मी त्यावेळी सक्रिय असे. वकिलीचा व्यवसाय करीत असतानाच सक्रिय राजकारणात उतरावयाचा एवढेच नव्हे तर विधानसभेची १९९० ची निवडणूक लढविण्याचा निर्णयही मी घेतला होता. परंतु, त्याच दरम्यान रिपब्लिकन ऐक्याच्या वेळी रिपब्लिकन नेत्यांची एकमेकांवरील कुरघोडी, आरोप-प्रत्यारोप ज्यावेळी मी जवळून अनुभवले त्याचा दादांना जो मानसिक त्रास झाला त्यामुळे मी राजकारणात न जाण्याचा निर्णय पक्का केला. पूर्ण लक्ष माझ्या वकिलीवर केंद्रित केले.

१९८५ साली मी मुंबईला वकिली सुरू केली, १९९० ला नागपूरला शिफ्ट झालो. २००० साली मुख्य सरकारी वकील आणि त्यानंतर २००३ साली मुंबई उच्च न्यायालयात

न्यायमूर्ती झालो. उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून मी तेरा वर्षांपासून कार्य करीत आहे. वंचितांना न्याय देण्याचा माझ्या दृष्टिकोनाला डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा आणि दादांची शिकवण मला सदैव साथ करते.

दादांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते राजकारणात राहूनही त्यांनी माझ्या न्यायदानाच्या क्षेत्रात कधीही ढवळा-ढवळ केली नाही. कायद्याच्या चौकटीत आणि सदसद्‌विवेकबुद्धीने न्याय निवाडा केला पाहिजे हे तत्त्व त्यांनीही पाळले आणि मीही ते पाळत आहे. आपण उच्च पदावर काम करतो. आपले अनेक सहकारी, कर्मचारी, ड्रायव्हर आपल्यासोबत काम करतात. त्यांच्या खाण्यापिण्याची किंवा इतर सर्व व्यवस्था आपण पाहिली पाहिजे, त्यांची आस्थेने चौकशी केली पाहिजे असा दादांचा कटाक्ष असे. मी न्यायमूर्ती झाल्यावर त्यांनी मला हे बजावून सांगितले आणि मीही ते पाळतो. पदांचा अहंभाव ठेवला की समाजापासून आपण दूर जातो. त्यामुळे पदांचा अहंभाव न ठेवता गरीब-श्रीमंत या सर्वात सारखे मिसळावे हे ते नेहमी सांगत.

दलित पुढाऱ्यांमध्ये असणारा आक्रस्ताळेपणा दादांच्या व्यक्तिमत्त्वात कधीच नव्हता. अन्यायाच्या विरुद्ध ते आक्रमक होत पण संयम राखून. आपल्या भाषणांमधूनही ते कधी चिथावणीखोर भाषा वापरत नसत. कधीही द्वेषभावनेतून वागत नसत. रिपब्लिकन पक्षाच्या विभाजनानंतर, विभाजनापूर्वी त्यांचे जवळचे मित्र असलेले एक रिपब्लिकन नेते त्यांच्यावर नेहमी शिवराळभाषेत टीका करीत पण दादांनी त्यांना कधीही शिव्या दिल्या नाही. उलट ते आजारी पडल्यावर त्यांना नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी घेऊन गेले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले. बरे झाल्यावर त्यांना दादा म्हणाले 'मी मदत केली म्हणून तुमचे शिव्या देण्याचे काम सोडू नका. मी माझे काम करीत राहीन. तुम्ही तुमचे काम सुरू ठेवा. माझ्यावर तशीच टीका करीत जा!' शत्रूचेदेखील त्यांनी कधी नुकसान केले नाही. कुठलाही माणूस बिनकामाचा नसतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील पॉझिटिव्ह गोष्टीच आपण लक्षात ठेवाव्यात व निगेटिव्ह गोष्टींकडे दुर्लक्ष करावे अशीच त्यांची विचारधारा होती.

दादांच्या उदारमतवादी स्वभावामुळे आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांचे सत्ताधारी पक्षासह सर्वच पक्षात चांगले मित्र होते. श्री. शरद पवार, स्व. उत्तमराव पाटील, स्व. बापूसाहेब काळदाते व दादासाहेब हे चार पक्षाचे चार लोक, वेगळ्या विचारसरणीचे. पण या चौघांचीही दाट मैत्री होती. राजकारणातले, सभागृहातले दिवसभराचे विसरून हे चौघे तासनतास उशिरापर्यंत मनमोकळ्या गप्पा मारत असत. त्यांना अटेंड करण्याची जबाबदारी माझ्यावर असे. एक श्रोता म्हणून मला त्यांच्या गप्पांमधून बरेच शिकायला मिळाले.

राजकारणातून निवृत्त झाल्यावर दादा अमरावतीला आल्यावर लोकमतमध्ये त्यांची एक मोठी मुलाखत छापून आली. त्यात त्यांनी एका घटनेचा उल्लेख केला. ती त्यांच्याच शब्दात सांगणे योग्य होईल. दादा म्हणाले, "वैयक्तिक आयुष्यात सर्वोच्च आनंदाचा क्षण म्हणाल, तर भूषणचं हायकोर्टाचा न्यायाधीश होणं. न्यायाधीश म्हणून निवड झाल्यानंतर तो काहीसा संभ्रमात होता. मी त्याला एवढंच म्हटलं, 'सुप्रीम कोर्टात वकिली करून महिन्याला लाखो रुपये कमावशील. पण येथे समाजातील उपेक्षित गरिबांना न्याय देऊन तू खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचं काम करशील. त्याने माझा सल्ला मानला,' दादांचा चेहरा त्यावेळी भूषणबद्दल अभिमानाने फुलला होता."

त्यांचे हे शब्द माझ्यासाठी सदैव प्रेरणादायी राहिलेले आहेत. त्यांनी म्हटल्याप्रमाणे माझ्या नेमणुकीत जो उशीर झाला, त्यामुळे मी न्यायमूर्ती पद स्वीकारावे की नाही या द्विधा मनःस्थितीत होतो. परंतु आज मला वाटते की नेहमीप्रमाणे त्यांचाच निर्णय योग्य होता.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, शोषित समाजासाठी लढा उभारला. सामाजिक न्यायाची ती लढाई होती. पुढे भारतीय घटना समितीत कार्य करून या देशाला डॉ. बाबासाहेबांनी एक सर्वसमावेशक घटना दिली. भारतीय संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे. डॉ. बाबासाहेबांचा घटनात्मक दृष्टिकोन, त्यांनी सांगितलेले मूलभूत अधिकार, घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे आणि सामाजिक व आर्थिक न्यायाचे तत्त्व आपल्याला शोषितांना न्याय देतांना कसे उपयोगात आणता येईल या दृष्टीने वाटचाल करण्याचा माझा प्रयत्न आहे. यामागे दादांनी मला जी शिकवण प्रत्यक्ष आपल्या आचरणातून दिली ती मोलाची राहिली.

माझी १२ वर्षांची न्यायालयीन कारकीर्द त्यांना प्रत्यक्ष बघता आली. माझ्या न्यायालयीन निवाड्याबद्दल ज्या वर्तमानपत्रात बातम्या येत ते त्या कुतूहलाने वाचत असत. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून सामाजिक व आर्थिक न्यायाच्या बाबतीत माझ्या निर्णयाचे त्यांना कौतुक होते. मी न्यायमूर्ती पद स्वीकारतांना त्यांच्या ज्या अपेक्षा होत्या त्याच मार्गावर मी चालत असल्याचे त्यांना समाधान होते.

आजारपणाच्या शेवटच्या दीड वर्षात ते नागपूरला माझ्या सोबतच होते. त्या काळात त्यांचा अखंड सहवास आम्हाला लाभला याचे मला खूप समाधान वाटते. या आजारातही त्यांचे सतत वाचन, अभ्यास सुरूच असे. भेटीला आलेल्या मित्रांशी ते तशाच गप्पा मारीत. त्यांना त्यांचा त्रासही व्हायचा. पण अखेरपर्यंत ते कार्यप्रवण होते. शेवटी कोमात गेल्यावरच हे कार्य बंद पडले. दादा जाऊन आता वर्ष उलटून गेले. पण त्यांचा सहवास, अस्तित्व आपल्या अवती-भवतीच आहे हे जाणवत राहते. त्यांच्या संस्कारात आणि शिकवणुकीत तयार झाल्याचा आणि त्यांचा पुत्र असल्याचा मला अभिमान वाटतो. माझे करियर त्यांनीच निवडलेलं. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्या पदाचा देशाच्या व समाजाच्या कामासाठी, भल्यासाठी उपयोग करता आला याचा मला आनंद आहे. त्यांच्याच प्रेरणेने, त्यांच्याच अपेक्षेप्रमाणे माझी पुढची वाटचाल राहील हीच त्यांना माझी विनम्र श्रद्धांजली. दादांच्या स्मृतीस भावपूर्ण अभिवादन !

-न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय,
नागपूर खंडपीठ, नागपूर.

❑❑

आमचे दादा

आईच्या म्हणण्यानुसार दादा त्यावेळेस १४ ते १५ वर्षांचे असतील. दादा मामांबरोबर दारापूर या आमच्या गावी हॉटेलमध्ये चहा घ्यावयास गेले. त्यावेळेस महारांना फुटक्या कपबशीत चहा देत होते. दादा व मामांना त्या हॉटेलमध्ये फुटक्या कपबशीत चहा दिला. दादांना ही गोष्ट अपमानास्पद वाटली. त्यांनी मामांना विनंती केली की तुम्ही हॉटेलमध्येच थांबा. दादा धावतच खोलापूरच्या पोलीस स्टेशनला गेले व तेथील पोलिसांना घेऊन आले व त्या हॉटेलच्या मालकाला अस्पृश्यता नियमाखाली अटक केली.

-डॉ. विश्वास गवई.
मुंबई.

माझे खंबीर पाठबळ

▪ डॉ. सुनील देशमुख

राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या स्वकर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविणारे रा. सू. गवई ऊर्फ दादासाहेब आज या जगात नाहीत. त्यांनी ३० ऑक्टोबर रोजी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले होते. गुरुतुल्य आणि पितृतुल्य दादासाहेबांचा व माझा परिचय तसा अगदी माझ्या बालपणापासूनचा! दादासाहेब आणि माझे वडील हे घनिष्ट स्नेही! माझ्या आजोबांनाही त्यांचे कौतुक होते. ते नेहमी म्हणत की, दादासाहेब म्हणजे तत्कालीन दलित नेत्यांमध्ये अत्यंत समजूतदार, परिपक्व, उमदे आणि मोठ्या मनाचे नेते आहेत. त्या काळात नामांतर व इतर दलित चळवळी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सुरू होत्या. त्या चळवळीत अनेक दलित नेते अत्यंत टोकाची व आक्रस्ताळी भूमिका घेत असत. त्यामुळे वातावरण तणावग्रस्त होई. परंतु दादासाहेबांची भूमिका त्यांच्यामध्ये अतिशय संयमी आणि कुठलाही विद्वेश न पसरवता सामोपचाराने कुठलाही प्रश्न सोडवण्याची असायची. दादासाहेबांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे आमच्या घरातही त्यांच्याबद्दल नेहमी आदराने बोलले जाई!

असा आमचा दादासाहेबांशी असलेला तीन पिढ्यांचा संबंध होय. माझे तर असे निरीक्षण आहे की, दादासाहेबांचा तीन पिढ्यांचा संबंध केवळ माझ्याच घरापुरता मर्यादित नाही तर महाराष्ट्रातील कित्येक घरात त्यांनी पिढ्यान् पिढ्यांचे संबंध जोपासले आहेत. आज आपल्याला ठायी विस्कटलेली नातीच अधिक दिसतात आणि अशी जपलेली, जोपासलेली नाती क्वचित दिसतात. पण असा दुर्मीळ व दुग्धशर्करा योग दादासाहेबांच्या जीवनात सातत्याने येत असलेला मला दिसतो. मी विद्यार्थीदशेत असताना १९८१ साली नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी निवडून आलो. तेव्हा डॉ. श्रीकांत जिचकारांबरोबर अनेकदा विधान मंडळात जाण्याचा योग आला. तेव्हा अनेकदा राजकीय नेत्यांच्या संपर्कातही मी होतो. त्या दरम्यान दादासाहेबांचा विधानपरिषदेतील वावर व वचक मला अगदी जवळून न्याहाळता आला. रिपब्लिकन पक्षाखेरीज अन्य पक्षांचे जबाबदार नेते पक्षभेद विसरून दादासाहेबांशी अत्यंत संयमाने व आदराने वागत असत ते बघून मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अधिकच कुतूहल वाटत असे.

त्यानंतर मी माझ्या मेडिकलच्या अभ्यासात गुंतलो आणि त्या कालावधीत दादासाहेबांशी फारसा संपर्क आला नाही. १९९३ साली माझ्या पत्नीच्या डॉ. सोनालीच्या दवाखान्याच्या उद्घाटनाची पत्रिका मी स्वतः जाऊन त्यांना द्यावी असे वडिलांनी सुचविले. तेव्हा त्यांना आमंत्रण देण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. माझी ओळख दिली व येण्याचे कारण सांगितलं. तेव्हा त्यांनी लगेच माझ्या वडिलांची ओळख काढत मला बसवून घेतलं. आपल्या पी. ए. ला बोलावून संध्याकाळचा कार्यक्रम मागविला. त्यांना रात्रीच्या गाडीने मुंबईला जायचे होते. परंतु त्यांनी त्यांचे तिकीट रद्द करावयास लावले व शेजारीच बसलेल्या सौ. कमलाताईंना म्हणाले की, 'आपल्या सुनेच्या दवाखान्याचे उद्घाटन आहे. आपल्याला जायलाच हवे.' त्यांनी इतक्या तातडीने तो बदल केला की मी बघतच राहिलो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते वेळेवर उद्घाटनाला तर आलेच पण तब्बल चार तास एखाद्या वडीलधाऱ्या माणसाच्या भूमिकेत तेथे वावरले. येणाऱ्या जाणाऱ्यांची चौकशी करत ते तिथे थांबले. राजकीय क्षेत्रातील अन्य मान्यवरांनी तिथे आपली उपस्थिती लावली. दादासाहेबांची माझ्या कुटुंबाप्रती असलेली आत्मीयता पाहून मी अगदी भारावून गेलो.

१९९६ साली दादासाहेब लोकसभेच्या निवडणुकीला उभे राहिले. तेव्हा त्यांना अमरावती मतदार संघात द्वितीय क्रमांकाची मते मिळाली होती. इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराला मात्र तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. अमरावती जिल्ह्यातील धर्मनिरपेक्ष विचारांचा मोठा मतदार तसेच फक्त दलितच नव्हे तर इतर बहुजन समाज दादासाहेबांच्या पाठीशी असल्याचे यावरून सिद्ध झाले. १९९८ साली लोकसभा निवडणुकांच्या वेळी काँग्रेस व रिपाई पक्षाची युती झाली आणि अमरावती लोकसभा मतदार संघाची जागा काँग्रेस पक्षाने युतीचे उमेदवार असलेल्या दादासाहेबांना बहाल केली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर संपन्न झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये अमरावती मतदार संघात काँग्रेस पक्षाचा उमेदवार नसण्याची ही पहिलीच घटना होती.

त्यावेळी काँग्रेस पक्षातील प्रस्थापितांची अस्वस्थता आम्ही जवळून पाहात होतो. दादासाहेब जरी काँग्रेस रिपाईचे उमेदवार असले तरीही एक प्रगल्भ, अभ्यासू, उमदे आणि खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष नेतृत्व या निमित्ताने मिळाल्याबद्दल आम्हा सर्व युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये एक नवीन चेतना निर्माण झाली होती. या निवडणुकीत मोठ्या हिरिरीने व सारी शक्ती पणाला लावून आम्ही दादासाहेबांच्या निवडणूक प्रचारामध्ये सामील होऊन त्यांच्या प्रचारात मोठी आघाडी उभी केली. त्यामुळे तत्कालीन प्रस्थापित काही काँग्रेस नेते विचलित व नाराजसुद्धा झाले. दादासाहेबांनी भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवाराचा पराभव केला. अमरावती जिल्ह्यातील राजकीय क्षेत्राच्या इतिहासात ही एक अभूतपूर्व घटना म्हणून नोंदविता येईल. मला ही बाब अतिशय प्रमाणिकपणे कबूल करावयास हवी की त्यावेळी मरगळलेल्या काँग्रेस पक्षाला या घटनेने एक नवसंजीवनी मिळाली.

या निवडणुकीने राज्याच्या राजकीय व निवडणुकीच्या क्षेत्रात नवीन समीकरणे अस्तित्वात आली. धर्मनिरपेक्ष पक्षाची भक्कम आघाडी संबंध राज्यात उभी झाली व या विचारांवर निष्ठा होऊन विविध पक्षात कार्यरत असणारे कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले गेले. विशेषत: काँग्रेस पक्षामध्ये उमेदीची अनेक वर्षे कार्य करणाऱ्या माझ्यासारख्या तरुण कार्यकर्त्यांना मोठे पाठबळ मिळाले आणि नव्या आत्मविश्वासाने माझ्या सारख्यांची युवा पिढी राजकारणात पुढे सरसावली.

१९९८ सालचा मला प्रसंग आठवतोय. त्यावेळी लोकसभेत महाराष्ट्रातील ४८ पैकी ३८ जागा काँग्रेस पक्षाने जिंकल्या होत्या. शरद पवारांच्या नेतृत्वाने त्यांची राजकीय खेळी यशस्वी ठरली होती व त्यांचा बोलबाला दिल्ली दरबारापर्यंत निर्माण झाला होता. त्याच दरम्यान शरद पवार अमरावतीला यावयाचे होते. त्यावेळचे सर्व प्रस्थापित काँग्रेस राजकीय नेते त्यांना आपापल्या घरी बोलावण्यास उत्सुक होते. मी दादासाहेबांना सहजपणे फोन करून विचारले की, "पवार साहेब माझ्या घरी येतील का?" तेव्हा दादासाहेब मला म्हणाले, " सुनील, पवार साहेब अमरावतीला आल्या-आल्या व सर्वात पहिले तुझ्याच घरी येतील." दादासाहेबांच्या सांगण्यावरून आम्ही सर्व तरुण कार्यकर्ते त्यांच्या स्वागताची तयारी करू लागलो पण तरीही मनातून त्यांच्या येण्याची शाश्वती वाटत नव्हती. पवारसाहेब अमरावतीत आल्या आल्या माझ्या घरी येत असल्याची सूचना मिळताच माझ्या आनंदाला पारावर राहिला नाही. आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. दादासाहेबांनी मला दिलेला शब्द तंतोतंत पाळला होता. दादासाहेबांनी पवार साहेबांना माझ्या घरी आणून राजकारणातील एका उमलत्या कार्यकर्त्यावर विश्वास टाकून नवा पायंडा पाडला.

दादासाहेब रिपब्लिकन पक्षाचे भारताचे अध्यक्ष होते. त्यांचे वास्तव्य जरी दिल्लीत होते तरी त्यांचे जिल्ह्याच्या राजकारणावरही पूर्ण लक्ष होते. त्याच वेळी काँग्रेस पक्षामध्ये विभाजन झाले आणि राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती झाली. आम्ही सर्व तरुण कार्यकर्त्यांनी ताबडतोब पुढाकार घेऊन

राजापेठ चौकात एक सभा आयोजित केली व इंदिरा काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. सभा घेतल्याच्या १० व्या मिनिटाला दादासाहेबांचा मला फोन आला व आम्हा सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले. तुम्ही घेतलेली भूमिका निश्चितच कौतुकास्पद आहे आणि तुम्ही याच भूमिकेशी एकनिष्ठ रहा असा सल्ला दिला. त्या प्रसंगी त्यांचा फोनसुद्धा अनपेक्षित होता. पण त्यामुळे मला निश्चितच दिलासा मिळाला. आपल्या पाठीशी कुठेतरी जबरदस्त आधार आहे याची जाणीवही झाली.

१९९९ साली अमरावती जिल्ह्याच्या विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकांच्या वेळी दादासाहेबांच्या मदतीचा व प्रेमाचा पुन्हा प्रत्यय आला. आमदारकीचे तिकीट मिळावे म्हणून मी देखील एक उत्सुक उमेदवार होतो. माझे काँग्रेस संघटनेतील काम व माझा स्वभाव दादासाहेबांना चांगलाच परिचित होता. दादासाहेब व मी वेगवेगळ्या पक्षाचे असल्याने त्यांना मला मदत करण्यास थोड्या मर्यादा होत्या. तरीही माझ्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. तिकीट मिळण्याच्या आदल्या रात्री त्यांनी मला फोनवर कळविले की, "सुनील, तुझं तिकीट नक्की" आणि ते दिल्लीहून नागपूरला विमानाने यावयास निघाले. ही संधी घेत काँग्रेसची मंडळी काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनियाजींना भेटली व शेवटच्या क्षणी माझे तिकीट कापण्यात जवळ जवळ यशस्वी झाली होती. तेव्हा दादासाहेब दिल्ली-नागपूरच्या प्रवासात होते. त्यांना दिल्लीत चाललेल्या या घडामोडीची अजिबात कल्पना नव्हती. मी त्यांना विमातळावर घ्यावयास गेलो तर त्यांनी माझे तिकीट मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. परंतु मी दिल्लीतील घडामोडींची कल्पना त्यांना दिली तर ते अतिशय उद्विग्न झाले. विमानतळाहून घराकडे निघताना मला स्वत:च्या गाडीत बसवून घेतले व मोबाईलहून दिल्लीतल्या तत्कालीन काँग्रेसच्या अत्यंत वजनदार नेत्याशी संपर्क साधला. माधवराव सिंधीयांना ते म्हणाले, " महाराज, आपल्या पक्षाने तिकीट देण्याबाबत जो या क्षणी निर्णय घेतला आहे तो अगदी चुकीचा आहे. कारण मी ज्या मतदार संघात निवडून आलोय त्या मतदार संघाची मला पूर्ण कल्पना आहे. चांगले व निवडून येणाऱ्या उमेदवारांची यादी मी आपणास दिली होती व त्यात बदल न करण्याची कळकळीची विनंतीही केली होती. आपण मला आश्वासित केले होते आणि आता जर माझी पाठ फिरताच असे बदल होत असतील तर ते मला कदापिही मान्य होणार नाही. हा बदल तुमच्या पक्षांतर्गतचा आहे व तो तुम्हाला अनिवार्य वाटत असेल तर मलाही निवडणूक लढवायची अथवा नाही हे ठरवावे लागेल. तसेच मला काँग्रेस पक्षाच्या रिपब्लिकन पक्षाच्या युतीचाही विचार करावा लागेल." अगदी निर्वाणीच्या भाषेत ते माझ्या समक्ष त्यांच्याशी बोलले. हेच वक्तव्य त्यांनी सोनियाजींचे स्वीय सचिव व्ही. जॉर्ज यांच्याशी केले. त्यांच्या खंबीर व निर्वाणीच्या संभाषणानंतर ताबडतोब परिस्थिती बदलली. काँग्रेस पक्षाचे तिकीट माझ्या पदरात पडले. पुन्हा त्यांच्या खंबीर पाठबळाचा मी अनुभव घेतला. त्या क्षणी माझे मन कृतार्थतेने ओथंबून निघाले.

दादासाहेबांच्या खंबीर व स्नेहाळ पाठिंब्यामुळेच मी आज आमदार म्हणून उभा आहे. आज आमदार म्हणून कार्यरत असतानाही त्यांचे मार्गदर्शन मला सातत्याने लाभत आहे. ११४.४७ कोटी रुपयांची एकात्मिक रस्ते विकास योजना शासन दरबारात मंजूर करून घेण्यापासून तर त्याची सर्व कामे सुरू होण्यापर्यंतच्या कार्यात दादासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. या कामाच्या प्रत्येक सभेला ते जातीने उपस्थित होते. महाराष्ट्रातील अमरावतीसारख्या शहराच्या विकासासाठी पैसा खेचून आणून विकासाचे कार्य सुरू करण्यासाठी त्यांची मोठी प्रेरणा माझ्या पाठीशी होती. अमरावती शहराच्या विकासाच्या संबंधित मुंबईतील प्रत्येक सभेला ते हजर असतात. त्यांची अमरावतीच्या विकासासंबंधीच्या प्रत्येक घडामोडीबाबतची दूरदृष्टी व जिद्द खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

जागतिक बौद्ध महापरिषदांच्या निमित्ताने त्यांचा सुरू असलेला जगभर प्रवास, विविध समित्यांचे अध्यक्ष व सदस्य म्हणून बजावत असलेले कुशल प्रतिनिधित्व, महाराष्ट्र शासनाला विविध विषयांवर वेळोवेळी सादर केलेले अहवाल, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांची उभारणी, धर्मनिरपेक्षपणे अहोरात्र वाहिलेली राष्ट्राच्या उर्जिताची वंचना ह्या साऱ्या दादासाहेबांच्या गुणसंपदेकडे बघून 'दिव्यत्वाची येथे प्रचीती,' असे म्हणत कुणीही त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे, असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आता काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांचा स्मृतीला विनम्र अभिवादन.

-माजी अर्थ राज्यमंत्री व सदस्य,
महाराष्ट्र राज्य विधानसभा.

❑❑

विरोधकांनाही आदरणीय

वर्तमानकाळात, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर भारतीय बौद्ध समाजातील आणि रिपब्लिकन पक्षातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणजे रा. सू. गवई होय.

त्यांच्या यशस्वी संसदीय, राजकीय कार्याचा प्रारंभ १९६४ पासूनच सुरू झाला. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य, विधानपरिषद सभापती, तसेच विधानसभेतील विरोधी पक्षनेता अशा भूमिकांतून त्यांचे गाजलेले कर्तृत्व सर्वश्रुत आहे.

त्यांचा वर्ष १९९८ मध्ये बाराव्या लोकसभेत सांसद म्हणून प्रवेश झाला. एप्रिल २००० पासून ते राज्यसभेचे सदस्य होते.

उपरोक्त क्षेत्रात त्यांचे कर्तृत्व सर्वमान्य झाले. ते एका पक्षाचेच नेते म्हणून राहिले नाहीत तर पक्षभेदांच्या भिंतींना ओलांडून रा. सू. गवई यांनी देशातील बहुतेक राजकीय पक्षांच्या धुरिणांच्या हृदयात सन्मानाचे स्थान मिळविले.

अर्थात याला कारणीभूत झाले ते रा. सू. गवई यांचे प्रफुल्ल कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्व होय. त्यांची अंगभूत गुणवत्ताच इतकी प्रभावशाली ठरली की सहसा त्यांच्या विरोधकांनाही त्यांच्याविषयी अनादराची भूमिका घेता आली नाही.

तीव्र बुद्धिमत्ता, अभ्यासू प्रवृत्ती आणि पूर्वग्रह न ठेवता कोणत्याही समस्येला सामोरे जाण्याची त्यांची सिद्धता यामुळे वादग्रस्त प्रश्नासंबंधीही त्यांची भूमिका समजावून घेण्यास सर्वजण उत्सुक असत.

-विक्रम सावरकर
अध्यक्ष, हिंदूमहासभा.

रॉयल रामकृष्णा

▪ डॉ. सुरेश पाध्ये

रामकृष्ण सूर्यभान गवई. आमचा दोस्त. लोकांसाठी दादासाहेब ! आमच्यासाठी रामकृष्णा. कधी-कधी 'आर.एस.' अत्यंत गरिबीतून पुढे आला. दारापूरसारख्या खेड्यातून शिकायला अमरावतीला आला पण व्हीएमव्हीतल्या शहरी मुलांचाही नेता झाला. त्याच्या राजकारणाविषयी लोकांचे मतभेद असू शकतात पण एक गोष्ट मात्र खरी की " He was an absolute gem". कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना रामकृष्णाने जी मजल मारली ती मानली पाहिजे. उपजत बुद्धिमत्ता आणि नेतृत्व कौशल्य असल्याशिवाय हे शक्य होत नाही. त्याचा अभ्यास दांडगा होता. वाचन भरपूर होते. त्यामुळे तो सभागृहात आपली छाप पाडू शकला. प्रस्थापितांच्या राजकारणात चाळीस वर्षे टिकला.

१९५३ साली आमची विदर्भ महाविद्यालयात मैत्री झाली. मी फर्स्ट ईयरला आणि आर. एस. थर्ड ईयरला होता. डॉ. नैरूला प्रिन्सिपॉल होते. कॉलेजच्या निवडणुका अत्यंत गाजायच्या. आर.एस. त्यात आघाडीवर असायचा. प्रभाकर भेंडे आमचा कँडिडेट होता. दलित विद्यार्थ्यांची मते आणायची जबाबदारी आर.एस. वर होती. त्यासाठी एक कार त्याच्या ताब्यात दिली होती. मुस्लीम मते आणायची जबाबदारी सुरेश भटवर होती. अटीतटीच्या निवडणुकीत आमचा उमेदवार निवडून आला. आर. एस.च्या राजकीय चळवळीचा प्रारंभ हा असा विदर्भ महाविद्यालयातून झाला.

आमच्या खापर्डे बगीचाजवळ गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह होते. आम्ही त्याला भूतबंगला म्हणायचो. वसतिगृहाचे अध्यक्ष अत्यंत कडक शिस्तीचे हेडमास्तर दादासाहेब राजवाडे होते. रात्री नऊनंतर वसतिगृहात जेवण आणि प्रवेश दोन्ही बंद. रामकृष्णाचा स्वभाव चळवळ्या. शिवाय कॉलेजचे राजकारण. त्यामुळे बाहेरच रात्र व्हायची. तेव्हा आजच्यासारखे गल्लोगल्ली हॉटेल्स नव्हते आणि पैसाही नव्हता. एक जुनी सायकल हीच रामकृष्णाची इस्टेट होती. अशावेळी रामकृष्णा आमच्याकडे जेवायला व मुक्कामाला असायचा. माझी आई ताराबाई पाध्ये समाजसेविका होती. शारदा उद्योग मंदिर तिने समाजातील पीडित, महिलांसाठी सुरू केले होते. त्यामुळे जात-पात, सोवळे-ओवळे हा विषयच आमच्याकडे नव्हता. रामकृष्णा श्रीमती कमलताईंना नेहमी सांगायचा 'हा सुरेश तुझा दीर आहे. याच्या आज्याने दादासाहेब खापर्डे यांनी डॉ. भाऊसाहेबांच्या विनंतीवरून अंबादेवीचे मंदिर दलितांना खुले करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे सामाजिक सलोखा कायम राहिला. कॉलेजच्या जमान्यात याच्या घरी मी अनेकदा जेवलो. आता आपल्या घरी बोलवत जाऊ. हा आल्यावर याचे काम झालेच पाहिजे.' रामकृष्णाने हा शब्द पाळला. कोणतेही काम सांगितल्यावर कधीच नाही म्हटले नाही. मोठ-मोठ्या पदावर जाऊनही जुन्या मित्रांना विसरला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि सर्व दलितांना दिली. रामकृष्णाही त्यात होता. रिपब्लिकन पार्टीचे काम करायला व डॉ. आंबेडकरांचा विचार गावोगावी पोहोचवायला तो सतत खेड्या-पाड्यात दौरे करीत असे. दादासाहेब गायकवाडांच्या तो संपर्कात आला आणि पुढे रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष झाला. महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यात दलितांची मेजॉरिटी नसली तरी चांगली मते होती. महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक हे मुत्सद्दी होते. दलितांची ही मते काँग्रेसकडे वळविण्यासाठी त्यांनी रिपब्लिकन पक्षाशी

जवळीक केली. त्यांनी 'आर.एस.' ला जवळ केले. विधानपरिषदेत घेतले आणि पुढे स्वकर्तृत्वाने आमच्या मित्राने एक-एक पद मिळविले. सत्ता आल्याशिवाय दलित समाजाची कामे करता येणार नाही हा वास्तविक विचार करून आर.एस. गवईने काँग्रेसशी सोबत केली. त्या माध्यमातून त्यांचे अनेक प्रश्न सोडविले.

वरळीच्या सी-फेसवर सहकारी गृहनिर्माण संस्था उभी करण्यात रामकृष्णाचा मोठा वाटा आहे. राजकारण नको म्हणून सर्व इमारतींना त्याने कल्पकतेने नद्यांची नावे दिली. त्यामुळे अनेक आमदार-खासदारांचे फ्लॅट मुंबईला झाले. आर.एस.च्या फ्लॅटवर वऱ्हाडी जेवणाचा आस्वाद आम्ही घेतला आहे. कारण खाणे-खिलवणे, गप्पांची मैफील रंगवणे हा त्याचा खास शौक होता. आमच्या वहिनी श्रीमती कमलाताईही अतिशय आतिथ्य करणाऱ्या! बिहार आणि केरळचे राज्यपाल म्हणून गवईंची निवड झाली. ते काम त्याने चोखपणे बजावले. पण मित्रमंडळीतला, अमरावतीचा कोणी गेला की राजभवनचा पाहुणचार दिल्याशिवाय तो परत पाठवत नसे. माझा मुलगा केरळला गेला तेव्हा राजभवनावर गेला. आर. एस. ने सारी वस्तुस्थिती विचारली. त्याने आदरातिथ्य केले आणि तेथून फोनवर संभाषण करून सर्व मित्रांची ख्याली-खुशाली विचारली.

डॉ. देविसिंह शेखावत आमचे मित्र. श्रीमती प्रतिभाताईंशी त्यांचा विवाहसंबंध आला. तेव्हा आमदार निवासात मुलगी बघायला आर.एस. सोबत मी गेलो होतो. मी स्वतः रूममध्ये न जाता मोठ्या खुबीने ताईंना पाहिले आणि त्याचा वृत्तांत आमच्या मित्राला, डॉ. शेखावतला सांगितला.

आर.एस.चा संपर्क खूप दांडगा होता. सर्वच क्षेत्रात त्याची मैत्री होती. विशेषतः परदेशातही त्याचे चाहते होते. मी, माझी पत्नी, डॉ. शेखावत, डॉ. वडोदकरांना बँकॉकला जायचे होते. आर.एस. म्हणाला "काही काळजी करू नका. माझी माणसे तुमची सर्व व्यवस्था करतील." बँकॉकला आमची सर्व व्यवस्था झाली. गवई हा संबंध जपणारा माणूस होता. एकदा त्याच्याशी मैत्री झाली की आपण त्याचे झालेच म्हणून समजा. इतक्या मोठ्या पदावर जाऊनही जुने मित्र, सगे-सोयरे, गावचे लोक यांना तो विसरला नाही. अनेक लोकांना त्याने रोजगार दिला, नोकरीला लावले. त्याचा स्वभाव रॉयल होता. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून, वागण्या-बोलण्यातून हे झळकत असे. आता आमचा रॉयल मित्र रामकृष्णा राहिला नाही. आम्हा मित्रांची मैफील सुनी सुनी झाली आहे.

-निवृत्त प्राचार्य,
विदर्भ महाविद्यालय, अमरावती.

❑❑

विरोधक आणि मित्रही

■ अनंत गुढे

रामकृष्ण सूर्यभानजी गवई ऊर्फ दादासाहेब गवई यांच्या विषयी मी काही लिहावे किंवा सांगावे म्हणजे "सूर्याला दिवा दाखविण्यासारखे" होईल. स्वतःच्या पक्षाची सदस्य संख्या नसताना आपल्या स्वकर्तृत्वाने ते सतत ३० वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, जवळपास ११ वर्षे त्याच वरिष्ठ सभागृहाचे सभापती, खासदार, राज्यपाल अशी राजकीय क्षेत्रातील विविध उच्चपदे त्यांनी भूषविली.

अमरावती जिल्ह्यातील दारापूरसारख्या छोट्याश्या गावात दादासाहेबांचा जन्म झाला. वडील सूर्यभानजी आई सरूबाई यांनी त्यांना शिक्षणासाठी अमरावतीला पाठविले. उपजत बुद्धिमत्ता, उत्तम शरीरयष्टी यामुळे आपोआपच त्यांच्यात नेतृत्वाचे गुण फुलले.

दादासाहेबांचा आणि माझा परिचय साधारणतः १९८५ पासून, मी जिल्ह्यात "शिवसेनेचे" नेतृत्व सांभाळत होतो, तर दादासाहेब रिपब्लिकन पक्षाचे नेते होते. दादासाहेबांच्या राजकीय कारकिर्दीला १९६२ पासून सुरुवात झाली. १९६४ साली ते विधानपरिषदेचे पहिल्यांदा सदस्य झाले.

१९९६ साली मी पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक लढवीत होतो. अमरावती लोकसभा मतदार संघातून "शिवसेनेने" मला उमेदवारी दिली होती. माझ्यासाठी पहिली सार्वत्रिक निवडणूक होती. अनुभव पहिलाच. याच वेळी रा. सू. गवई यांनी माझ्या विरुद्ध निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. काँग्रेस पक्षातर्फे श्री. उ. मो. भेले हे उमेदवार होते. मी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर रात्री दादासाहेबांशी फोनवर बोललो, दादासाहेब मला म्हणाले, "तू प्रथमच निवडणूक लढवीत आहेस. माझा आशीर्वाद आहे. तू विजयी होशील." मी निवडून आलो. पण केंद्रातील सरकार पडले. १७ महिन्यात देवेगौडा, आय. के. गुजराल असे दोन प्रधानमंत्री झाले. आणि १९९८ च्या डिसेंबर मध्ये पुन्हा लोकसभेची मध्यावधी निवडणूक झाली.

पुन्हा "शिवसेनेने" मला उमेदवारी दिली. सर्व पक्षांची एकजूट बांधून रा. सू. गवई हे एकच उमेदवार माझ्या विरोधात उभे केले गेले. पुन्हा मी आणि दादासाहेब एकमेकांविरुद्ध. मी दादासाहेबांना भेटलो, ते म्हणाले "आता सर्वांचा उमेदवार आहे मी. मीच निवडून येणार" आणि दादासाहेब विजयी झाले. माझा पराभव झाला.

परंतु राजकीय सारीपाटावर आमची लढाई संपत नव्हती. मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार १३ महिने चालले आणि पुन्हा लोकसभेची मध्यावधी निवडणूक लागली. दोन लोकसभेच्या निवडणुका आम्ही लढविल्या होत्या. मी १८ महिने तर दादासाहेब १३ महिने खासदार म्हणून राहिलो. पुन्हा मतदारांसमोर जायचे होते. पाच वर्षात एक निवडणूक होणे आवश्यक असताना, आम्ही दोघेही पाच वर्षातील तिसऱ्या निवडणुकीसाठी सज्ज होत होतो.

तिसऱ्यांदा लोकसभा निवडणुकीत आम्ही पुन्हा आमने सामने. दादासाहेब आणि माझ्यात एक दुवा समान होता. दादासाहेब श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष होते. मी अनेक वर्षांपासून एच. व्ही. पी. एम. चा नियमित व्यायामपटू होतो. वीर वामनराव जोशी, डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या त्यागमय जीवनाचा त्यांच्यावर प्रभाव होता. तसा तो माझ्यावरही होता. अमरावती शहरातील पहिली शिवसेना शाखा डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या हस्ते स्थापन झाली होती. त्यांचा बुधवाऱ्याशी जुना स्नेहसंबंध होता. मी तर बुधवाऱ्यातच राहत होतो. माझा जन्म बुधवाऱ्यातील.

आता तिसऱ्यांदा काय निकाल लागणार या विचारात असताना मला एक कार्यकर्ता म्हणाला, भाऊ तुम्ही लोकसभेत जा, दादासाहेब राज्यसभा सदस्य होतील दोघेही दिल्लीला, संसदेत जा. झालेही तसेच मी लोकसभा निवडणुकीत विजयी झालो, दादासाहेब गवई ६ महिन्यानंतर राज्यसभा सदस्य झाले. जिल्ह्याला पहिल्यांदाच दोन खासदार मिळाले, ते रा. सू. गवईमुळे. नंतर दादासाहेब बिहार, केरळचे राज्यपाल झाले. लोकसभेच्या चवथ्या निवडणुकीत मी पुन्हा विजयी झालो. भारताच्या राजकारणावर व संसदीय सभागृहावर जवळपास अर्धशतक छाप पाडणारे दादासाहेबांसारखे व्यक्तिमत्त्व निराळे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो त्यांनी राजकीय अस्पृश्यता पाळलीच नाही.

१९५६ झाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात हजारो दलित कार्यकर्त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली ती नागपूरच्या दीक्षाभूमीवर. त्या दीक्षा भूमीच्या विकासाचा ध्यास दादासाहेब गवईंनी घेतला. हिंदुस्थानातील सर्व पक्षांची नेते मंडळी त्यांनी दीक्षाभूमीवर आणली. दीक्षाभूमीवर पंतप्रधान, राष्ट्रपती, अनेक मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री यांना आणण्याची किमया दादासाहेबांनी केली. त्यांच्या या कार्यकर्तृत्वाला साजेशी अशी साथ सौ. कमलताईंनी दिली. त्यांच्या मृत्यूनंतर सुद्धा त्या दादासाहेबांच्या कार्यप्रणालीत रमून गेल्या आहेत.

दादासाहेबांसारख्या राजकीय दृष्टीने परिपक्व व्यक्तीशी निवडणुकीत लढत देणे म्हणजे 'पोरसने' अलेक्झांडरशी मुकाबला करण्यासारखे होते. "परंतु दादासाहेबांच्या व्यक्तित्त्वाला आणि आदराला तडा न जाऊ देता मी ३ वेळा त्यांच्या विरोधात निवडणुका लढविल्या. दादासाहेबांनी सुद्धा कधीही जाहीर सभा असो की, पत्रकार परिषदा त्यांनी माझ्यावर किंवा माझ्या पक्षावर आसूड ओढले नाहीत. शिवसेनाप्रमुख मा. श्री. बाळासाहेब ठाकरे यांचेशी त्यांचे स्नेहाचे, आदराचे संबंध होते. राजकारणामुळेच मला दादासाहेब गवई समजू शकले. राजकारणाच्या पलीकडे जाऊन संबंध जपणारे ते मित्र, मार्गदर्शक होते.

रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई यांचे आझाद हिंद मंडळ, नीळकंठ मंडळ यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. आझाद हिंद मंडळाच्या आयोजित "नागरिक वादविवाद स्पर्धेचे" त्यांनी अनेक वेळा अध्यक्षपद भूषविले. मी सुद्धा हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा खेळाडू होतो. माझा जन्म बुधवाऱ्यातील. आझाद हिंद मंडळ "नागरिक वादविवादात" मी अनेक वेळा भाग घेतला. १९९६ साली मी आणि दादासाहेबांनी लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक लढविली. त्यांचे आणि माझे अखेरपर्यंत स्नेहाचे संबंध होते.

-माजी खासदार, अमरावती.

❑❑

संस्था व व्यक्तींचे आधारवड

■ उल्हास मराठे

संघर्षाशिवाय आयुष्यात इच्छित लक्ष्य साधता येत नाही. संघर्षातून दलित, शोषित, मागासवर्गीयांसोबत, शेतमजुरांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणारे रा. सू. गवई लोकनेते झाले ते त्यांच्या विशिष्ट कार्यपध्दतीने. नावातील राम आणि कृष्णा यांच्या कार्याचा सुरेख मेळ त्यांनी आपल्या आयुष्यात वापरला. रामाप्रमाणे दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी दादा नेहमीच प्रयत्न करीत तर कृष्णाप्रमाणे राजकारणात कूटनीतीचा त्यांनी उपयोग केला. अर्थातच शब्दप्रमाणे वागणारे म्हणून त्यांची राजकीय क्षेत्रात वाटचाल सुरू झाली. सर्वांचे दादा हा त्यांनी बहुमान मिळविला तो केवळ राजकीय क्षेत्रातील कार्याने नव्हे तर सर्व सामान्यांची त्यांनी केलेली कामे त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर घेऊन गेलीत.

वसंतराव नाईक यांनी दादांचे वेगळेपण ओळखले अन् त्यांना आपलेसे केले. दादांनी डॉ. भाऊसाहेब ऊर्फ पंजाबराव देशमुख यांचा आदर्श जोपासला तसा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केलेत, शेतमजूरांच्या प्रश्नांसाठी लढणारा लढवय्या म्हणून त्यांनी उमेदीचे काळात कीर्ती मिळविली म्हणूनच त्यांच्या मोर्चाचा उच्चांक आजपर्यंत कोणीही ओलांडू शकला नाही. लाखो शेतकऱ्यांचा शांततेत मोर्चा काढण्याचे श्रेय दादांना जाते.

दादा म्हणजे आपले रा. सू. गवई यांचे सुरुवातीचे जीवन कष्टमय गेले. घरी गरीबी, शिक्षणाचा अभाव असूनही दारापूरच्या दादांनी अख्ख्या महाराष्ट्रात आपली लोकप्रियता निर्माण केली. ती केवळ आपल्या राजकीय कौशल्याने. दादांनी सत्तेसाठी राजकारण केले नाही तर कुशल राजकारणी असल्याने त्यांचेकडे सत्ता आपसूकपणे चालत येत असे. कारण दादांनी राजकारणाच्या लक्ष्मण रेषा कधीच ओलांडल्या नाहीत.

दादा व दै. हिंदुस्थानचे संस्थापक, संपादक थोर स्वतंत्रता सेनानी बा. वि. ऊर्फ बाळासाहेब मराठे यांचे जणू गुरू शिष्याचे संबंध. दादा नेहमी दै. हिंदुस्थानाच्या कार्यालयात येऊन बाळासाहेबांकडून मार्गदर्शन घेत. याच ठिकाणी त्यांची कुष्ठमहर्षी पद्मश्री शिवाजीराव पटवर्धन, बी. टी. ऊर्फ भाऊराव देशमुख अशा नेत्यांसोबत ओळख झाली. पद्मश्री शिवाजीराव पटवर्धन यांच्या कुष्ठसेवेने दादा भारावून गेले होते. म्हणून सत्तेचा उपयोग तपोवनास मदत म्हणून ते आपला खारीचा वाटा उचलीत असत. त्याचमुळे विदर्भ महारोगी सेवा मंडळातर्फे देण्यात येणारा कुष्ठमित्र सन्मान दादांना मिळाला.

केवळ अमरावती जिल्ह्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक संस्थांना दादांनी मदत केली. अमरावतीच्या विदर्भ महारोगी संस्थेप्रमाणे जगप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, धन्वंतरी रुग्णालय, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय अशा शेकडो नामवंत संस्थांचे दादा आधारवड होते. महाराष्ट्राचे सेवानिवृत्त पोलीस महासंचालक कै. सूर्यकांत जोग यांनी चिखलदरा येथे निवासी विद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. शाळेला परवानगी मिळाली, शाळा सुरू करण्याची तारीख जवळ आली. तरीही शाळेला अपेक्षित जागा मिळत नव्हती. रा. सू. गवई यांचे कानी ही गोष्ट गेली. त्यांनी तातडीने जोग यांना माझ्या मित्राचा बंगला रिकामा आहे. किल्ल्या पाठविल्या आहेत म्हणून निरोप पाठविला. आजही शाळा विदर्भात नाव कमावीत आहे. दादांनी मदत केली नसती तर ही शाळा सुरू झाली असती कां ? असा प्रश्न नेहमी पडतो.

एचबी ११८०—१३

दादांचे आयुष्यच मुळी चळवळीसाठी होते. विद्यार्थी-दशेपासून दादांनी विद्यार्थी चळवळीचे नेतृत्व केले. रिपाई पक्षाच्या भूमिहिनांचा मोर्चा अमरावती शहरात काढला. खुद्द दादासाहेब गायकवाड या मोर्चात सहभागी झाले होते. जवळपास बारा लाखाचा मोर्चा पूर्वी कधीच निघाला नाही असा अमरावतीच्या इतिहासात आजपर्यंत निघाला नाही. दादांचा मेळघाटमधील आदिवासी जनतेवर फार लोभ होता. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत दादा मेळघाटचा दौरा करीत. तत्कालीन आमदार मामराजजी खंडेलवाल, दयाराम पटेल, सुदामकाका देशमुख, कोकीळाबाई गावंडे, अण्णासाहेब ऊर्फ पी. के. देशमुख, काकासाहेब नवाथे, के जी. देशमुख, भाई मंगळे, उमरलालजी केडिया, अण्णा वैद्य, बाबासाहेब सोमवंशी अशा नेत्यांसोबत दादांचे घरगुती संबंध होते.

दै. हिंदुस्थानचे संस्थापक संपादक कै. बा. वि. मराठे यांचेसोबत दादांचे जणू पितापुत्राचे नाते होते. दै. हिंदुस्थानला शासकीय जाहिराती मिळवून देण्यामध्ये दादांचा फार मोठा वाटा होता. महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या जाहिरात पॅनेलवर, एमएसईबीच्या पॅनेलवर दै. हिंदुस्थानचा अंक घेण्यासाठी खुद: दादांनी शब्द टाकला होता. दादांचे ऑफिस सध्याच्या पोलीस महासंचालकांचे कार्यालयात तेव्हा होते. दादांना आम्ही भेटण्यास गेलो तेव्हा एक विदेशी शिष्टमंडळ दादांना भेटण्यास आले होते. त्यांच्या सचिवांनी आम्हाला बसण्यास सांगितले अन् दादांना बाळासाहेब आल्याचे सांगितले. दादा एक मिनिटासाठी बाहेर आले. आम्हाला आतमधील चेंबरमध्ये बसण्यास सांगितले अन् पुन्हा विदेशी मंडळींसोबत चर्चेत सहभागी झाले. आपल्या माणसांचा मान कसा ठेवावा हे दादांकडून शिकण्यासारखे होते अशी अनेक आपुलकीची नाती दादांनी राज्यातील नेत्यांसोबत जोडली होती.

१९५२ साली दादासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. दादासाहेबांना डॉक्टर होण्याची इच्छा होती. ती इच्छा दादासाहेबांनी त्यांचे वडील सूर्यभानजींना सांगितल्यानंतर विदर्भ महाविद्यालयात जीवशास्त्र हा विषय घेतला पण दादासाहेबांना कॉलेज जीवनाच्या सुरुवातीपासून समाजसेवेची आवड असल्याने अभ्यासाकडे थोडे दुर्लक्ष झाल्याने इंटरची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाही. दादासाहेबांनी आर्टस्चे विषय घेऊन आपला महाविद्यालयीन अभ्यासक्रम पूर्ण केला.

दादासाहेबांवर संत गाडगे महाराज व संत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा प्रभाव होता. गाडगे महाराज सुद्धा कीर्तन सुरू करण्याआधी दादासाहेबांना बोलण्याची संधी देत. जीवनामध्ये समाजसेवेचे काम करताना समाजातील अंधश्रद्धेची त्यांना चीड होती. दादासाहेबांचे समाजकार्य दिवसेंदिवस वाढतच होते. समाजकार्य करताना दादासाहेबांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा सहवास लाभला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार सर्वसामान्य बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे काम दादासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनात केले. कॉलेज जीवनात दादासाहेब खापर्डे बगिचा, बेलपुरा, रूखमिणी नगर या भागात भाड्याने राहिले. दादासाहेबांच्या मित्रमंडळींचा वावर भाड्याच्या खोलीमध्ये नेहमी असे. महाविद्यालयीन निवडणुकांमध्ये दादासाहेब हिरिरीने भाग घेत. दादासाहेबांच्या भाषण कलेने अनेकांना भुरळ पडत असे व आपले विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात दादासाहेब नेहमीच यशस्वी झालेत.

दादासाहेबांनी दलित, शोषित समाजमनामध्ये क्रांती निर्माण करण्याचे काम केले. आपल्या ओजस्वी भाषणांमधून दादासाहेबांनी समाजात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. एल. एल. बी.चे शिक्षण दादासाहेबांनी समाजसेवेला वाहून घेतल्यामुळे अपूर्ण राहिले. दादासाहेबांनी रिपब्लिकन चळवळीला वाहून घेतले. कसेल त्याची जमीन हा नारा देऊन पडीक असलेल्या जमिनीवर पीक घेण्याची संकल्पना त्यांनी मांडली व ती यशस्वी सुद्धा झाली. त्याकरिता दादासाहेबांना अनेकदा शासनासोबत भांडण करावे लागले.

दरम्यानच्या काळात डॉ. शिवाजीराव पटवर्धन ऊर्फ दाजीसाहेब यांच्याशी दादासाहेबांचा संबंध आला तो दै. हिंदुस्थानचे संस्थापक, संपादक कै. बा. वि. ऊर्फ बाळासाहेब मराठे यांचेकडे. सिटी कोतवालीजवळ असलेल्या दै. हिंदुस्थानच्या कार्यालयामध्ये दाजीसाहेब व दादासाहेब यांची समोरासमोर पहिल्यांदा भेट झाली. दाजीसाहेबांना भेटल्यामुळे दादासाहेबांनी कुष्ठरोग्यांची सेवा करण्यास प्रारंभ केला त्यामुळे दाजीसाहेब व दादासाहेबांचा संबंध घनिष्ठ झाला.भूमिहिनांच्या चळवळीकरिता १९६४ साली दादासाहेबांनी जो अभूतपूर्व सत्याग्रह केला तो सत्याग्रह अमरावती जिल्ह्याच्याच नव्हे तर देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदविण्यात आला. त्या सत्याग्रहाची सांगता डॉ. दाजीसाहेब पटवर्धन यांच्या हस्ते एन. शिवराज, दादासाहेब गायकवाड, बॅरिस्टर खोब्रागडे, श्री. कुंभारे यांच्या उपस्थितीत झाली. श्री. अंतुले मुख्यमंत्री असताना दादासाहेबांच्या अध्यक्षतेखाली कुष्ठरोगाचे निर्मूलन कसे करता येईल याकरिता समिती स्थापन केली.

दादासाहेबांच्या जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दादासाहेब गायकवाड, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे संस्थापक अंबादासपंत वैद्य, सुदामकाका देशमुख यांचे भरीव योगदान होते. १९६२ साली दादासाहेबांनी केवळ पक्षाचा आदेश म्हणून त्यांचे आदर्श असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचेविरुद्ध लोकसभा निवडणूक लढविली व दर्यापूर व मेळघाट या दोन्ही मतदार संघात दादासाहेबांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचेपेक्षा जास्त मते मिळविली.

अमरावतीच्या औद्योगिक, शैक्षणिक, आरोग्य इतकेच नव्हे तर अनेक सामाजिक कार्यात दादांचा सिंहाचा वाटा आहे. पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचे कुष्ठकार्यात त्यांनी केलेले सहकार्य विसरणे शक्य नाही. अमरावती येथील धन्वन्तरी सहकारी रुग्णालय असो की अन्य खाजगी संस्थांमार्फत मोफत आरोग्य सेवा देणाऱ्या संस्था दादांचा सहकार्याचा हात नेहमी पाठीशी असायचा.

अमरावती शहराला वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करावी यासाठी स्व. बाळासाहेब मराठे यांनी सुरू केलेल्या आंदोलनाच्या यशात दादांचा सिंहाचा वाटा होता. चिघळणारा हा प्रश्न केवळ दादांच्या मध्यस्थीने कोणतीही कटूता न येता सोडविला गेला. "इन्सान जन्म से नहीं कर्म से महान होता" हे त्यांच्याच कार्याने खरे ठरले आहे म्हणून दादा महान होते हे कधीच विसरणे शक्य नाही.

-संपादक,
दै. हिंदुस्तान, अमरावती.

❑❑

एचबी ११८०—१३अ

रोबस्ट विज्डम

▪ प्रदीप देशपांडे

रोबस्ट विज्डम हा दादासाहेब गवईंचा अतिशय आवडता शब्द होता. त्याचा डिक्शनरीतील अर्थ पाहिल्यास धट्टाकट्टा चतुरपणा, शहाणपणा असा दिसेल. मात्र, दादासाहेबांना तो अर्थ अभिप्रेत नव्हता. त्यांच्या मते 'रोबस्ट विज्डम' म्हणजे 'उपजत शहाणपण' सत्तेच्या राजकारणात वावरताना असे उपजत शहाणपण असणे फारच आवश्यक असते. त्याशिवाय कोणत्याही सामाजिक समस्येची किंवा राजकीय गुंत्यांची सोडवणूक होऊ शकत नाही, यावर ते ठाम होते. असे उपजत राजकीय शहाणपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अगदी ठासून भरले होते. त्यामुळेच ते एका विशिष्ट राजकीय पक्षाचे नेते म्हणून वावरत असले तरी त्यांचे संबंध सर्वच पक्षातील मोठ्या नेत्यांशी आणि कार्यकर्त्यांशी सुद्धा अत्यंत सौहार्दाचे होते. जुन्या जनसंघाचे नेते कै. उत्तमराव पाटील असोत वा भाजपचे आजचे तरुण नेते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी असोत, काँग्रेसचे कै. यशवंतराव चव्हाण, कै. वसंतदादा पाटील किंवा शरद पवार, स्व. इंदिरा गांधी असोत वा सोनिया गांधी, कम्युनिस्ट पक्षाचे कै. भाई बर्धन असोत वा अमरावतीचे कै. भाई सुदाम देशमुख, बिहारचे लालूप्रसाद असोत वा उत्तरप्रदेशाचे मुलायम सिंग, दादासाहेब गवई यांचा सर्वत्र मुक्त संचार होता. कोणत्याही पक्षाभिनिवेशाच्या अथवा विचारांच्या भिंती त्याच्या या संचाराला आडकाठी घालू शकल्या नाहीत. कारण, त्यांनी आपल्या आयुष्याची सारी कवाडे सर्वांसाठी सदैव उघडून ठेवली होती. कोण कोठल्या जाती-धर्माचा किंवा पक्ष अथवा गटाचा हा विचार त्यांच्या मनाला कधीच शिवला नाही. कोणीही, केव्हाही येऊन आपले गाऱ्हाणे मांडावे. आपल्यावरील अन्यायाची करुण कहाणी सांगावी आणि दादासाहेबांनी शक्य ते संपूर्ण सहकार्य करून त्याला हसतमुखाने परत पाठवावे, हा त्यांच्या स्वभावाचा शिरस्ताच होता.

अनेकदा विधी-पालिका आणि न्यायपालिका यामध्ये संघर्षाचे मोठे प्रश्न निर्माण झाले. बिहार प्रेस बिलच्या प्रश्नावरून पत्रकारांनी देशभरात आंदोलन छेडले तेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही प्रश्न निर्माण झाला. आंध्रातील एन. टी. रामारावांचे सरकार बरखास्त केल्यानंतर त्यांनी समर्थक आमदारांची परेडच दिल्लीत राष्ट्रपती भवनात उभी करून राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या निर्णयाला आव्हान दिले. लालकृष्ण अडवाणी यांची रथयात्रा बिहारमध्ये अडविल्यानंतर असा संवैधानिक पेच निर्माण झाला. गेल्या चार-पाच दशकांतील अशा कितीतरी आणीबाणीच्या प्रसंगांचे दादासाहेब साक्षीदार होते. त्यानिमित्ताने त्या-त्या काळात त्यांच्या प्रतिक्रियाही व्यक्त झाल्या. पण, कोणत्याही प्रतिक्रियेत अजिबात आक्रस्ताळेपणा किंवा व्यापक सामाजिक सद्‌भावाला अथवा संसदीय लोकशाही मूल्यांना तडा जाईल असे त्यांचे भाष्य नव्हते. विधी-पालिका, न्यायपालिका, कार्यपालिका आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. त्यांचे प्रत्येकाचे स्वतंत्र व स्वायत्त अस्तित्व असले तरी त्यांनी परस्परांवर कुरघोडी करू नये. एक-दुसऱ्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करू नये हेही लोकशाहीला अभिप्रेत आहे. राज्यात किंवा देशात अशा समस्या जेव्हा-केव्हा उपस्थित झाल्यात तेव्हा दादासाहेब त्याच निष्पक्ष व पक्षातीत पद्धतीने आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत असत. मग, अशा वेळी न्यायदान व्यवस्थेचा अगोचरपणा स्पष्टपणे सांगावा लागला तरी ते माघार घेत नव्हते. वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या नावाखाली पत्रकारांनी कसाही धुडगूस घालावा हे मान्य होणारे नसल्याचे सांगतानाही

ते कचरत नसत. कारण, लोकशाहीच्या या साऱ्याच अंगाचा त्यांचा दांडगा अभ्यास होता व विचारांची दिशा स्पष्ट होती. त्यांच्यातील 'रोबस्ट विज्डम' त्यांना कधीच एकांगी किंवा एकतर्फी भूमिका घेऊ देत नसे.

राजकारणात एवढे स्पष्टपणे बोलणारा आणि व्यापक सामाजिक हिताला बाधा पोहोचविणाऱ्याला तेवढ्याच स्वच्छपणे त्याची चूक निदर्शनास आणून देणारा असा माणूस सापडणे केवळ अशक्यच म्हणावे लागेल. दादासाहेब स्पष्टवक्ते जरूर होते पण ते फटकळ नव्हते. कोणाचाही अपमान वा पाणउतारा करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांच्या स्पष्टवक्तेपणाला सौजन्याची, सामंजस्याची आणि अगदी सहजपणे तो व्यक्त करण्याची एक खास लकब होती. अत्यंत लाघवी व सौम्य शब्दांत ते अतिशय मुद्याचे अन् तेवढेच महत्त्वाचे प्रतिपादन समोरच्या व्यक्तीच्या गळी उतरवत होते. अमरावती जिल्ह्यातील सांगळूद गावात सुमारे तीन-साडेतीन दशकांपूर्वी मोठी दंगल झाली होती. समाजातील दोन गटात झालेल्या सशस्त्र संघर्षात अनेक बाया-बापड्यांसह किमान पाच-पन्नास जण जबर जखमी झाले होते. दुसऱ्याच दिवशी दादासाहेब गवई आणि तत्कालीन खासदार कै. उषाताई चौधरी सांगळूद गावात पोहोचले. दर्यापूरच्या विश्रामगृहात त्यांनी पोलीस व महसूल अधिकाऱ्यांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेतली. सांगळूद गावात अतिशय तणाव असून जाळपोळ आणि सशस्त्र हल्ले यामुळे वातावरण संतप्त आहे. आपण या गावात जाऊ नये. त्यामुळे परिस्थिती चिघळेल असा अधिकाऱ्यांचा आग्रह होता. पण, दादासाहेबांनी तो अमान्य केला आणि त्याच सांगळूद गावात दोन्ही समाजाच्या लोकांची संयुक्त सभा घेण्याचे फर्मान सोडले.

दुपारच्या तळतळत्या उन्हात झालेल्या सभेला संपूर्ण गाव लोटले होते. दादासाहेब म्हणाले, अरे हेच ते सांगळूद गाव काय, जिथे कै. बाबासाहेब सांगळूदकर पाटील नावाचा राजा माणूस होऊन गेला! या गावात दोन्ही समाजात एकाच आडनावाची माणसे आहेत. त्याचे कारण तुम्ही कधी जाणून घेतले काय? ज्या गावाने रोटी-बेटी व्यवहारासाठी सुद्धा कधी जात-पात, धर्म-पंथ पाहिला नाही, ज्या गावात कधी वेगळा पोळा किंवा दिवाळी साजरी झाली नाही. ज्या सांगळूदकर पाटलाचे फक्त नाव सांगून सारे आपसी मतभेद, वादावादी कायमची संपून जात असे, त्याच सांगळूद गावात आज तुम्ही असे एकमेकांचे गळे कापण्यास का उभे झालात? दादासाहेबांच्या या भाषणात सारा पूर्वेतिहास होता आणि कोण, कोणाचे, कसे संबंधित आहात याबद्दलची अचूक माहिती होती. त्या सभेनंतर सांगळूद गाव एकदम शांत झाले. जाळपोळ झालेल्या घरांची दोन्ही समाजाच्या लोकांनी उभारणी केली व जखमींच्या शुश्रूषेसाठी सुद्धा सारे गाव एकत्र झाले. सांगळूद गावात त्यानंतरच्या तीस-पस्तीस वर्षांत एकही जातीय तणाव किंवा दंगल झालेली नाही. कारण, दादासाहेबांनी त्याच सभेत समस्त गावकऱ्यांकडून तसे वचनच घेतले होते. वानगीदाखल दिलेल्या सांगळूदच्या या घटनेसारख्या कितीतरी घटना सांगता येतील. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर प्रश्नावरही ते असेच आग्रही होते. पण, प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी काढलेला 'लाँग मार्च' त्यांना मान्य नव्हता. आपण अशा प्रकारे बाहेरून तात्पुरते बळ औरंगाबादला उभे करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे मराठवाड्यात सामाजिक दुफळी माजेल. लोकांमध्ये वैरभाव उफाळून येईल आणि 'लाँग मार्च' संपल्यानंतर बदल्याच्या भावनेने मराठवाड्यात दंगली पेटतील. असे त्यांचे भाकीत होते. मराठवाड्यातील तत्कालीन नेते कै. गोविंदभाई श्रॉफ, 'मराठवाडा' दैनिकाचे संपादक अनंतराव भालेराव आदी सर्वांशीच त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. शरद पवारांचे सरकार, नामांतर आंदोलनाचे समर्थक व विरोधक या सर्वांमध्ये सुयोग्य समन्वय साधण्याचा व सामंजस्याने तोडगा शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यात बाधा निर्माण होईल, विनाकारण

उभय समाजात जातीय तेढ निर्माण होईल असे प्रयत्न कोणीही करू नयेत यासाठी ते दक्ष होते. त्यामुळेच आंबेडकरी विचारांचे समर्थक म्हणविणाऱ्या प्रा. कवाडेंच्या 'लाँग मार्च'ला सुद्धा विरोध करण्याचे धाडस त्यांच्यात होते. पण, राजकारणातील दबावतंत्र तसेच रिपब्लिकन पक्षातच माजलेल्या दुफळीमुळे त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. मात्र, 'लाँग मार्च' नंतर पेटलेले मराठवाडा आणि झालेली भीषण दंगल लक्षात घेतल्यास हा माणूस कसा 'रोबस्ट विज्डम'चा होता, ते लक्षात येते.

नागपूरची दीक्षा भूमी, त्यासाठी दादासाहेब गवई आणि सदानंद फुलझेले यांनी स्वत:ला वाहून घेणे, दादर चैत्यभूमीचे आंबेडकर स्मारक, आरक्षणाच्या प्रश्नावरून वेळोवेळी निर्माण झालेले अटीतटीचे प्रसंग, क्षुल्लक कारणांवरून ठिकठिकाणी निर्माण होणारे जातीय संघर्ष, बेबनाव, खैरलांजी हत्याकांड, अशा सर्वच बाबतीत दादासाहेबांच्या पक्षातीत व न्याय्य भूमिकेने अत्यंत मोलाची कामगिरी बजावली आहे. रा. स्व. संघाच्या संघ शिक्षा वर्गाच्या समारोप सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचे आणि सामाजिक न्याय व समन्वयाची आपली भूमिका मांडण्याचे धाडस फक्त दादासाहेबांमध्येच होते. त्यांची अढळ निष्ठा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर होती पण त्यांनी कधीच त्याचे भांडवल केले नाही. आरक्षणाच्या प्रश्नासाठी व ते कायम राहण्यासाठी त्यांनी सातत्याने लक्ष घातले. पण, स्वत: अथवा आपल्या कुटुंबीयांसाठी कधीही आरक्षणाचा लाभ घेतला नाही. त्यांनी निवडणुकाही लढविल्या त्या खुल्या मतदार संघातूनच! अमरावती लोकसभा मतदार संघ मागासजातीसाठी आरक्षित झाला तेव्हा त्यांनी अत्यंत नम्रपणे या मतदार संघातून निवडणूक लढण्यास नकार दिला. म्हणायलाच फक्त दलित किंवा गोरगरिबांचा नेता- प्रत्यक्षात संपूर्ण समाजाचा आणि गोरगरीबच नव्हे, तर मध्यमवर्गीय असो वा श्रीमंत धनवान, त्यांच्याही प्रश्नांसाठी सर्वस्व झोकून देणारा हा अजातशत्रू नेता होता. विधान परिषदेत ते स्वत: फक्त एकटेच त्यांच्या पक्षाचे आमदार असताना त्यांची सलग १० वर्षे उप सभापती, चार वर्षे सभापती म्हणून व नंतर विरोधी पक्ष नेता म्हणून निवड होणे काय किंवा लोकसभा आणि राज्यसभेत त्यांची निवड होणे काय, त्यांच्या पक्षातीत राजकीय सौहार्दाच्या संबंधाचे ठळक उदाहरण आहे. बिहारचे ते राज्यपाल असताना बौद्धगयेत झालेल्या अतिरेक्यांच्या उत्पातापश्चात शांतता प्रस्थापिणे किंवा नालंदा विद्यापीठाला पुन्हा एकदा गौरवास्पद स्थान मिळवून देणे हे त्यांच्यातील समंजस, सुसंस्कृत आणि सभ्य व्यक्तित्वामुळेच शक्य झाले. त्यांच्या निधनाने राजकीय व सामाजिक जीवनातील 'रोबस्ट विज्डम' आपण कायमचे गमावले आहे. एक जिंदादिल व हरहुन्नरी नेता आपल्यातून कायमचा निघून गेला आहे. त्यांना विनम्र श्रद्धांजली!

-संपादक, दै. जनमाध्यम, अमरावती.

❑❑

आमचे 'शेजारवड'

▪ प्रा. विद्यालक्ष्मी बबनराव मेटकर

महाराष्ट्र विधान मंडळ, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, मुंबई येथून मला आलेले पत्र वाचले. दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या गौरव अंकासाठी लेखस्वरूपात आठवणी मागवल्या. दादासाहेब गवईच्या आठवणी अमर्याद आहेत. तरी पण त्यांच्या काही आठवणींना उजाळा देण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न आहे. पत्र वाचताच पन्नास वर्षापूर्वीच्या भूतकाळात मन वेगाने जाऊन थडकले.

पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट, दादासाहेब गवई यांच्या जुन्या निवासस्थानी यशवंतराव चव्हाण येणार होते. आम्हालाही आमंत्रण मिळाले. त्यावेळी मी पहिल्यांदा गवई साहेबांना जवळून पाहिले. त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू त्यावेळी जाणवले. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत, त्यांचे आतिथ्य, कार्यकर्त्यांशी वागण्याची पद्धत, सर्वांशी जुळवून घेण्याचे कसब या गुणांची प्रचिती आली. राजकीय नेतृत्वासाठी लागणारी गुणसंपदा त्यांच्या ठायी होती. त्यांचे राजकीय आणि सामाजिक कार्य सर्वश्रुत आहे. मात्र मी इथे ज्या आठवणी मांडत आहे त्या एक शेजारी म्हणून...

रा. सू. गवई आणि बबनराव मेटकर हे विद्यार्थिदशेपासूनचे मित्र, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात सोबत वावरले. शिक्षण क्षेत्रात अनेक चळवळी राबविल्या. पुढे रा. सू. गवई हे नाव अमरावतीपुरतेच किंवा महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहिले नाही तर ते एक जागतिक स्तरावरील लोकमान्य, गणमान्य नाव झाले. अशी जागतिक कीर्तीची व्यक्ती कालांतराने आमचे शेजारी झाले हे आमचे अहोभाग्य होय.

शेजारी झाल्यानंतर तर त्यांच्याकडील प्रत्येक कार्यक्रमात, मग तो राजकीय असो, सामाजिक असो किंवा कौटुंबिक असो, आमची हजेरी असेच. दादासाहेबांचा प्रत्येक वाढदिवस फार मोठ्या गोतावळ्यात साजरा होत असे. खेड्या-पाड्यातील दीनदलित व दुबळ्या घटकांपासून तर शहरातील प्रतिष्ठित लोकांपर्यंत सर्वच स्तरातील लोक त्यांना शुभेच्छा देऊन जात. सर्वांशी ते संवाद साधून आपुलकीने विचारपूस करीत, फराळपाणी घेतल्याशिवाय कुणीही जात नसे, गव्हर्नर असतांना घरी आले तर पाच-पन्नास गाड्या त्यांच्या मागेपुढे असत. घरात येईपर्यंत लोकांचा गराडा त्यांच्याभोवती असे. लोकांच्या घोळक्यात असून देखील त्यांच्या स्वागतासाठी उत्सुकतेने आपुलकीनं स्वत:च्याच गेटमध्ये उभे असलेल्या आम्हा मेटकर कुटुंबीयांकडे त्यांची नजर न चुकता वळे. "कसे काय बबनराव? काय ताई?" म्हणून चौकशी करत, एखाद्या दिवशी निवांतपणा असला की गडीमाणसाकरवी घरी निरोप पाठवीत, "जा बबनरावांना जेवायला बोलावून आण". जेवायला दोघेच असत. त्या दिवशी यांच्या आवडीचा बेसन-भाकरीचा बेत असे. त्यांना थोडी सवड असली की आमचे ६-७ वर्षांचे नातवंड जयजीत, यशराज दोघांना निरोप देऊन बोलवून घेत. त्यांच्याशी लहान होऊन मनसोक्त गप्पा मारत.

दादासाहेबांप्रमाणेच त्यांच्या पुढच्या पिढीने देखील तीच आपुलकी कायम ठेवली. त्यांची तीनही अपत्ये, भूषण, कीर्ती, आणि राजेंद्र उच्च विद्याविभूषित व उच्चपदस्थ असून देखील गाडीतून उतरताच आमच्या घराकडे नजर टाकतात. आमच्यापैकी जे कुणी बाहेर असेल त्यांच्याशी बोलून सर्वांबद्दल विचारपूस करतात.

प्रत्येक सुखदु:खात हा आमचा शेजार आमच्या पाठीशी नव्हे तर सोबतच खंबीरपणे उभा राहिला. सन २००२ मधे मेटकर साहेबांना हार्ट अटॅक आला. बाँबे हॉस्पिटलमध्ये बायपास झाली. त्यावेळी गवई साहेबांनी एवढ्या व्यस्ततेत वेळ काढून जातीने लक्ष घालून डॉक्टरांकडून सर्व उत्तमोत्तम उपचार करवून घेतले. दवाखान्यातील आमच्या ४० दिवसांच्या

मुक्कामा दरम्यान दादासाहेबांनी वरचेवर दवाखान्यात भेटी दिल्यात. तसेच कमलताई व डॉ. राजेंद्र सुद्धा नियमितपणे भेटायला येऊन चौकशी करीत. त्यांच्या भेटींमुळे मला फार मोठा दिलासा मिळे.

असाच एक ३५ वर्षापूर्वीचा प्रसंग.... माझी मोठी मुलगी १७ वर्षाची असतांना अचानक तिला अपेंडिक्सच्या ऑपरेशनसाठी दवाखान्यात भरती करावे लागले, तेव्हा कमलताई पापणीही न लवता संपूर्ण रात्रभर तिच्या उशाशी जागत बसल्या होत्या. अगदी मागल्या वर्षीचीच गोष्ट.... की पस्तीस वर्षांपूर्वीच्या अनुभवाची पुनरावृत्ती झाली. २०१५ मध्ये गवई साहेबांची तब्येत खूपच खालावली होती. अचानक तातडीने डॉक्टरांची गरज भासत असल्यामुळे गवई साहेबांची डोळ्यात तेल घालून शुश्रूषा करणाऱ्या कमलताईंचा मुक्काम नागपूरला न्यायमूर्ती भूषणकडे होता. त्याच दरम्यान माझा मुलगा ॲड. यदूराजला व्होकार्ट हॉस्पिटलमध्ये हार्ट ऑपरेशनसाठी ॲडमिट करावे लागते. तेव्हा कमलताईंची द्विधा मनस्थिती झाली. अशा परिस्थितीतही कमलताई यदुराज जवळ पोहोचल्याच व ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतरच त्यांनी दवाखाना सोडला.

माझ्या मुली माहेरी आल्यावर कित्येकदा माझ्याआधी गवई कुटुंबाकडूनच त्यांचे माहेरपण, कोडकौतुक, साडीचोळी केली जाते. अगदी सध्या सुद्धा पुण्यात होस्टेलमधे असलेल्या माझ्या नातवासाठी कमलताई आवर्जून खाऊ पाठवतात. असा हा आपुलकीचा बंध आमच्या या दोन्ही परिवारातील तिन्ही पिढ्यांमध्ये अजूनच घट्ट झाला.

माझं माहेर अमरावतीतच, त्यामुळे निवांतपणे माहेरी मुक्काम करण्याचा कधी योग आलाच नाही. माहेरपणाच्या अनुभवाला मी मुकलेच होते. दादासाहेब केरळचे राज्यपाल असतांना ताईंनी आम्हाला केरळला आवर्जून बोलवले. त्याप्रमाणे आम्ही गेलो. राजभवनातील आठ दिवसांच्या त्या मुक्कामा दरम्यान संध्याकाळी दादासाहेब फिरायला निघाले की आम्हालापण बागेत फिरायला बोलवून घेत. फिरणे झाल्यावर लॉनवर बसून दोन मित्रांच्या जिवाभावाच्या गप्पा रंगत. खळखळून हास्यविनोदात त्यांच्या कॉलेजच्या दिवसांना उजाळा मिळत असे. आमचे आठ दिवस कसे निघून गेले कळलेच नाही. निघताना मला साडी, यांना सुंदर शेला, सोबत शिदोरी देऊन मोठ्या बहिणीने लहान बहिणीची पाठवणी करावी तशी त्यांनी आमची प्रेमाने यथासांग पाठवणी केली. मोठ्या मनाने दिलेली ही शिदोरी एवढी मोठी होती की रेल्वे कम्पार्टमेंटमधल्या आमच्या ६-७ सहप्रवाशांना दोन्ही सांज पुरली. ही शिदोरी राजभवनातील आहे हे कळल्यावर तर त्यांना अतिशयच आनंद झाला. आणि स्वतःला ते धन्य समजले. अवघ्या आयुष्यात मी ज्या माहेरपणाला मुकले होते, ते मला म्हातारपणात मनसोक्त अनुभवायला मिळाले.

दादासाहेब गवईच्या राज्यपाल कारकिर्दी दरम्यानच अमरावतीकर मंडळींनी २० फेब्रुवारी २००९ रोजी बबनराव मेटकर यांचा नागरी सत्कार करण्याचे योजिले. गवई दांपत्याला सत्कार समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण केले होते. त्यांच्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून दोघेही व सोबत न्यायमूर्ती भूषण देखील कार्यक्रमाला संपूर्ण वेळ उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांची औपचारिकता बाजूला ठेवून तिघांनीही स्वतःच कार्यक्रम आयोजित केल्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीत जातीने लक्ष घातले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला कौटुंबिक स्वरूप आले होते.

रात्रीनंतर दिवस व दिवसामागे रात्र या नियमाप्रमाणेच बिकट प्रसंगही आलेतच. १ एप्रिल २०१३ ला मेटकर साहेबांना सिव्हियर हार्ट अटॅक आला व त्यांना तातडीने डॉ. डफळेंच्या हॉस्पिटलमधे भरती करण्यात आले. त्यावेळी गवई साहेबांची पण प्रकृती अतिशय नाजूक होती. त्यांना चालता देखील येत नव्हते. तरी पण गाडीत व्हीलचेअरवरून ते यांना भेटायला आले. दोघेही पेशंट, मात्र दोघांच्याही चेहऱ्यांवर भेटीचा आनंद ओसंडून वाहत होता. बोलतांना श्वास भरून येत होता तरी चक्क दवाखान्यातच त्यांच्या गप्पा रंगल्या, तीच भेट दोघांची शेवटची भेट ठरली. नियतीपुढे कुणाचे काही चालत नाही. अखेर ६ एप्रिल २०१३ चा काळा दिवस उजाडला. यांची तब्येत जास्तच खालावलेली

दिसत होती. कमलताई बाहेरगावी जाण्यासाठी गाडीत बसणार तोच गजाननने (माझा भाचा) त्यांना यांच्या तब्येतीची कल्पना देताच त्यांची गाडी दवाखान्याकडे वळली. त्या रूममधे आल्या आणि त्यांच्या समोरच सकाळी ११.०० वाजता यांनी अखेरचा श्वास घेतला. सर्व संपलं.

दवाखान्यातील फॉर्म्यालिटीज डॉक्टरांनी अगदी लवकर आटोपल्या. शांत झालेल्या यांना घेऊन आम्ही घरी पोहोचलो, तर घरासमोर आधीच या टोकापासून त्या टोकापर्यंत मंडप टाकलेला, लगेच होऊ घातलेल्या गर्दीचा अंदाज घेऊन खुर्च्या सुद्धा लावलेल्या, ट्रॅफिक कंट्रोलसाठी रस्त्यावर बॅरिकेट्स लावलेले, आणि पोलीस देखील तैनात झालेले होते. आम्हाला थांगपत्ताही न लागू देता कमलताईंनी अतिशय कमी वेळात ही सर्व व्यवस्था लावलेली होती. ताई पूर्ण वेळ आमच्याजवळ बसून होत्या. नेण्याच्या वेळी गवई साहेब बाहेर अगदी खचलेल्या चेहऱ्याने व्हीलचेअरवर बसून होते. "सच्चा मित्र गेला", एवढेच शब्द कसेबसे त्यांच्या गहिवरल्या आवाजात बाहेर पडले. मेटकरसाहेब आयुष्यभर जसे सदैव माणसांच्या घोळक्यात जगलेत तसेच ते गेल्यानंतर सुद्धा घर नातेवाईक व मित्रपरिवाराने गजबजलेलेच होते. मात्र एवढ्या मोठ्या गोतावळ्यासाठी रात्रीचा संपूर्ण स्वयंपाक गवईच्या स्वयंपाकघरातून आला व ताई त्या दरम्यान बरेचदा वेळ काढून आमच्यासोबत जेवल्या.

दोघाही पती-पत्नीने आमच्या संपूर्ण कुटुंबावर जे भरभरून प्रेम केले, त्या प्रेमाला तोड नाही.

मित्राच्या पाठोपाठ दोन वर्षांनी दादासाहेबांनी सुद्धा या जगाचा निरोप घेतला. त्यावेळी त्यांच्या निवासस्थानी जनसागर लोटला. साश्रू नयनांनी सर्वांनी आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

दोघेही मित्र गेलेत तरी ताईंचे आमच्यावरील प्रेम मात्र अबाधित आहे. आताही त्या येतात, चौकशी करतात. आम्हा दोघींनाही विरंगुळा मिळतो. असे हे शेजारप्रेम आहे. ताईसाहेबांसारखी खंबीर व्यक्ती दादासाहेबांच्या पाठीशी असल्यामुळे त्यांची राजकीय व सामाजिक कारकीर्द यशस्वीरीत्या पार पडली. आठवणी तर अमर्याद आहेत पण तरीही इथेच शब्दांना विराम देते.

-गवई कुटुंबाच्या स्नेही व शेजारी.

❑❑

कार्यकर्त्यांचा देव

श्री. दादासाहेबांची शांतताप्रियता वाखाणण्याजोगी आहे. त्यांचा अनुभव मी आमच्या वरळी सागर हौसिंग सोसायटीच्या मीटिंगमध्ये घेतलेला आहे. काही असंतुष्ट सभासद बिनबुडाचे आरोप लावून तावातावाने बोलतात, प्रसंगी अवमानकारक शब्दांचा प्रयोग पण करतात. जितकी आरडाओरड करून सभासद बोलतात तितक्याच शांततेने श्री. दादासाहेब त्यांचे म्हणणे अध्यक्ष या नात्याने ऐकतात आणि जसे ते नेहमी बोलतात तितक्याच सहजतेने समोरच्या व्यक्तींची चूक त्यांच्या लक्षात आणून देऊन त्याला शांत होण्यास बाध्य करतात. खरेच त्यांच्या ह्या स्वभावाचे आश्चर्य वाटते ! दुसरी एखादी व्यक्ती असती तर तोल जाऊन तिनेही प्रत्यारोप केले असते. पण असे श्री. दादासाहेबांच्या बाबतीत मात्र कधीच घडत नाही. इतकेच नाही तर लगेचच खेळीमेळीचे वातावरण निर्माण करतात. त्यांच्यावर अपमानकारक आरोप करणाऱ्या व्यक्तींविषयीही कुठलाच राग मनात न धरता आपल्या अंगी असलेल्या क्षमाशीलतेचा परिचयपण करून देतात. त्यांच्या मनाचा मोठेपणा आणि औदार्य त्या व्यक्तीच्याही प्रत्ययास आल्याशिवाय राहत नाही.

-जयवंतीबेन मेहता
माजी खासदार, मुंबई.

गरिबांसाठी सत्ता राबविणारा नेता

▪ डॉ. राजेन्द्र गवई

राजकीय सत्ता ही दीन-दलितांचे प्रश्न सोडविण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे ते केवळ सत्ता प्राप्तीचे साधन नाही असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. डॉ. बाबासाहेबांच्या या विचारांच्या प्रभावात स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्रात जी पिढी घडली त्यात दादासाहेब गवई हे महत्त्वाचे नाव ठरते. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांचा विचार महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचविला. कर्मवीर दादासाहेबांनंतर रिपब्लिकन पक्षाची धुरा दादासाहेबांकडे आली आणि त्यांनी पूर्ण क्षमतेने या पदाला न्याय दिला.

दादासाहेबांचा मुलगा म्हणून त्यांची संपूर्ण वाटचाल पाहण्याचे आणि त्यांच्या सहवासात राहण्याचे भाग्य मला लाभले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मी स्वतः आणि माझी बहीण सौ. कीर्ती आम्हा सर्व भावंडांच्या आयुष्याला दादासाहेबांनी आणि माझ्या आईने, श्रीमती कमलताईंनी घडविले. त्यांची आम्ही मुले आहोत याचा आम्हाला अभिमान वाटतो. कारण आमच्या आईवडिलांनी फार मोठा विचार आणि संस्कार आम्हाला दिला. राजकारण्यांकडे खूप पैसा असतो. त्यांची मुले बिघडतात असा सर्व साधारण लोकांचा समज असतो पण दादासाहेबांनी इतक्याही व्यस्त जीवनात आमचे अतिशय उत्तम प्रकारे पालनपोषण केले. आमच्या आईने, श्रीमती कमलताईंनी अतिशय अडचणीच्या काळातही आम्हा मुलांचे पालनपोषण तर केलेच पण आमचे काका, आमच्या आत्या, व इतरही गरीब लोकांना आपल्या घरात वाढविले. अतिशय कष्टात, नोकरी करून तिने संसार सांभाळला.

दादा आणि आईच्या संस्कारातून भूषण न्यायमूर्ती झाले, मी डॉक्टर होऊ शकलो आणि सौ. कीर्ती व्यवस्थापनशास्त्रात उच्चविद्याविभुषित झाली. ज्यावेळी दादासाहेबांचे सभापती पद गेले तेव्हा आमच्याकडे बंगला नव्हता. भूषण त्यावेळी वकिलीचे शिक्षण घेत होता. अशा परिस्थितीत न्या. भूषण यांनी व्हरांड्यात वकिलीचा अभ्यास केला. या संस्कारांमुळे आम्ही वाईट सवर्यींपासून दूर राहिलो. मी पैसा महत्त्वाचा मानत नाही. मी केवळ पैशाच्या मागे लागलो तर माझी मुले वाईट मार्गाला लागतील असे दादासाहेब म्हणत. त्यांनी सदैव विचाराला महत्त्व दिले. सत्ता ही गरिबांसाठी राबवायची, त्यांचे प्रश्न सोडवायचे हाच विचार त्यांनी आम्हाला दिला आणि त्याच विचारांवर माझीही वाटचाल सुरू आहे.

राजकीय क्षेत्रात सक्रिय होण्याचा विचार जेव्हा मी दादासाहेबांजवळ व्यक्त केला तेव्हा ते म्हणाले, तुला ज्या पक्षात कार्य करण्याची इच्छा असेल त्या पक्षात तू कार्य कर. पण रिपब्लिकन पक्षात कार्य करणे वेगळे आहे. दीनदलित लोकांचा हा पक्ष असल्याने या शोषित वर्गासाठी आपल्याला इथे खूप काही करता येते. त्यांचा हा विचार मला योग्य वाटला. मी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यात भाग घ्यायला सुरुवात केली. स्वतःचा मुलगा म्हणून दादासाहेबांनी मला कोणतेही पद एकदम दिले नाही. प्रथम कार्यकर्ता म्हणून कार्य करायला सांगितले व त्याप्रमाणे मी एक कार्यकर्ता म्हणून कार्य करीत होतो. त्यानंतर युवा रिपब्लिकन पक्षात पंधरा वर्षे सरचिटणीस म्हणून कार्य केले आणि त्यानंतर त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र कार्यकारिणीत सरचिटणीस व त्यानंतर देशाच्या कार्यकारिणीत सरचिटणीस

म्हणून मला घेतले. केवळ वारसा म्हणून हे पद त्यांनी मला दिले नाही.

दादासाहेबांचे संपूर्ण जीवन संघर्षमय आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना संघर्षातून १९६४ साली ते विधान-परिषदेचे सदस्य झाले. त्यानंतर संसदीय पद्धतीचा सखोल अभ्यास आणि व्यक्तिगत संबंध यामुळे विधानपरिषदेचे उप सभापती, सभापती, विरोधी पक्षनेते असे तीस वर्षं ते सभागृहात होते. सर्व पक्षात त्यांचे मित्र होते. परस्पर विरोधी विचारांच्या नेत्यांनाही एकत्र आणण्याचे कसब त्यांना अवगत होते. ते अजातशत्रू होते. सर्वच पक्षाचे लोक त्यांना मान द्यायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळी त्यांनी मा. शरदराव पवार आणि मा. बाळासाहेब ठाकरे यांना एकत्र आणले आणि नामांतर घडवून आणले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' हे नाव दादांनी सूचविले होते.

दादासाहेबांनी सत्तेची चिंता कधीच केली नाही. १९७८ साली नवबौद्धांना आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी ते दिल्लीत उपोषणाला बसले. मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता सरकारने ही मागणी पूर्ण केली नाही. पण मा. व्ही. पी. सिंग पंतप्रधान झाल्यावर दादांनी त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली आणि त्यांनी नवबौद्धांना आरक्षण दिले. मा. व्ही. पी. सिंग यांनी नवबौद्धांची मागणी पूर्ण केल्यामुळे दादांनी १९९० च्या पुढील निवडणुकीत व्ही. पी. सिंगाच्या पक्षासोबत युती केली. काँग्रेसची इतक्या वर्षांची सोबत तत्त्व म्हणून त्यांनी सोडली. त्याचा परिणाम म्हणून १९९४ च्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी दिली नाही. पण त्याची पर्वा त्यांनी केली नाही.

मा. शरद पवार साहेबांची आणि दादांची मैत्री खूप जुनी व घट्ट होती. परंतु जेव्हा पवार साहेबांनी सोनिया गांधींच्या विदेशी नागरिकत्वाचा मुद्दा काढला त्यावेळी हा मुद्दा संविधानाच्या विरुद्ध आहे म्हणून त्यांनी पवार साहेबांशी विरोध घेऊन काँग्रेसला साथ दिली. त्यांनी नेहमी तत्त्वाचे राजकारण केले. सत्ता गेली म्हणून ते कधीच निराश झाले नाहीत. मनुष्य पडला ते महत्त्वाचे नसते पडल्यावर नव्या उमेदीने उभे राहणे महत्त्वाचे असते हीच शिकवण त्यांनी मला दिली. त्यामुळे एखादा पहेलवान कुस्तीत पडला तर हरत नाही तर तो उठला नाही तर हरतो असेच मीही मानतो.

दीक्षाभूमी हे बौद्धांचे व संपूर्ण देशाचे तीर्थस्थान आहे. या दीक्षाभूमीच्या विकासाचा ध्यास दादांनी घेतला आणि ते कार्य पूर्णत्वाला नेले. त्या काळात पैसा जमविणे हे फार कष्टाचे व कठीण कार्य होते. आता कोटी रुपये आणणे सोपे, त्यावेळी हजार आणणे कठीण. पण दादासाहेबांनी हे कार्य केले. अनेक मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्री त्यांनी दीक्षाभूमीवर आणले. त्यांच्याकडून आग्रहाने आर्थिक मदत मिळविली आणि भारतात डॉ. बाबासाहेबांचे सुंदर स्मारक निर्माण केले. दादा सभापती झाले पण राहायला घर नव्हते. अशीच स्थिती अनेकांची होती. त्यांनी सर्व पक्षाच्या लोकांना एकत्र करून वरळीला सहकारी गृहनिर्माण संस्था उभारली. त्यामुळे मुंबईत अनेकांची घरे झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे तैलचित्र संसदेच्या सभागृहात लावण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

दादासाहेबांचा संसदीय प्रणालीचा अभ्यास, त्यांचे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व, सर्व पक्षातील संबंध यामुळे पदे त्यांच्याकडे चालत आली. लोकसभेची निवडणूक ते सर्वसाधारण मतदार संघातून निवडून आले. राज्यसभा सदस्य, बिहार व केरळ राज्याचे राज्यपालपद त्यांनी भूषविले. यासर्व पदांची गरिमा त्यांनी आपल्या कार्याने वाढविली. अखेरपर्यंत ते गरिबांच्या कल्याणासाठी झटत होते. त्यांचे

कार्य ह्याच त्यांच्या जिवंत स्मृती आहेत. राज्यपालपद स्वीकारल्यावर नियमाप्रमाणे त्यांना पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यावेळी कर्नाटकचे श्री. राजेन धीरन आणि मी स्वत: पक्षाचे सरचिटणीस होतो. दादांनी त्यावेळी मुलाला अध्यक्षपद देण्याचा मोह टाळला आणि श्री. राजेन धीरन यांना अध्यक्ष केले. मी सुद्धा त्यांच्या या व्यापक दृष्टिकोनाला पाठिंबा दिला. वडील म्हणून त्यांचा सहवास मला लाभला हे मी माझे भाग्य समजतो आणि त्याचा मला अभिमान आहे. रिपब्लिकन पक्षाची वाटचाल त्यांच्याच तत्त्वाने, विचाराने मी पुढे चालू ठेवणार आहे. त्यांचे आशीर्वाद माझ्यासाठी मोलाचे आहेत. रिपब्लिकन जनतेच्या वतीने दादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

-सरचिटणीस,
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया.

❑❑

चेष्टा पण कुचेष्टा नाही

श्री. गवईंच्याकडे मी प्रकर्षाने आकर्षित झालो ते त्यांच्या अंगी असलेल्या एका खास स्वभाव वैशिष्ट्यांमुळे त्याला स्वभाव म्हणण्यापेक्षा त्यांनी चर्चित केलेली एक सिद्धहस्त कला असे म्हणणेच जास्त संयुक्तिक होईल. आणि ती म्हणजे आपले म्हणणे आपल्या मताशी स्थिर राहून समोरच्या व्यक्तीला पटवून देण्याची त्यांची हातोटी. तशा आपले म्हणणे पटवून देण्याच्या अनेक पद्धती आहेत. काही लोक आकांडतांडव करून जोरजोराने बोलून आपले म्हणणे सांगण्याचा प्रयत्न करतात, तर काही लोक अनाकलनीय शब्दांचा वापर करून भाषेत उगीचच भारदस्तपणा आणतात. काही लोक धर्माची आड घेऊन व प्रतिस्पर्धी व्यक्तींच्या शारीरिक गुणदोषावर व त्यांच्या नावा-आडनावाची चिरफाड करून शाब्दिक विनोद निर्माण करतात. अर्थात हा प्रकार अतिशय निंदनीय आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत या प्रकाराचा अवलंब केलेल्यांची काय दुर्दशा महाराष्ट्रात झाली ते सर्वश्रुतच आहे. पण श्री. गवई मात्र असल्या कुठल्याही पद्धतीचा वापर करीत नाहीत. छोटी छोटी वाक्यरचना करून क्लिष्ट शब्दांचा वापर न करता चपखल शब्दांचा आधार घेऊन अगदी शांततेने ते आपले म्हणणे पटवून देतात. त्यांच्याजवळ शब्दसंग्रह भरपूर आहे. कधी कधी तर संपूर्ण शब्दकोषच त्यांच्या जिभेवर नाचतोय की काय असा भास होतो.

-हुसेन दलवाई
माजी मंत्री,
महाराष्ट्र राज्य.

कर्तृत्वाचा महामेरू

▪ डॉ. भि. र. वाघमारे

" उजळाया आलो वाटा, खराखोटा निवाडा "

या संत वचनाप्रमाणे प्रयत्नाधीन गोष्टींना जेव्हा समाजात मान असतो तेव्हा सर्वसामान्य लोकांना काहीतरी करून दाखविण्याचा उत्साह वाटतो. सामान्यातील सामान्य असलेला आणि स्वकर्तृत्वाने समाज आणि राजकारणात अभूतपूर्व, असामान्य कर्तृत्व प्राप्त करणे, असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणजे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई. नैसर्गिक जीवन जगण्याचे हक्क हिरावलेल्या उपेक्षितांना त्यांचे न्याय हक्काची सनद प्राप्त करून देण्यासाठी व केवळ समाजाच्या कल्याणासाठी व उत्थानासाठी ज्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे ध्यास घेतला, अशाच कर्तृत्वानांमध्ये रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे नाव अग्रक्रमानेच घ्यावे लागते. अंगी असलेली जिद्द, निष्ठा, मुत्सद्दीपणामुळे अनेक लोकाभिमुख योजना कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी जी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, त्या प्रयत्नांमुळेच सर्व समाज प्रभावित झाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक अधिष्ठान लाभलेल्या चळवळींमध्ये दादासाहेबांनी स्वत:ला झोकून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने व विचाराने प्रभावित झालेल्या दादासाहेबांनी सामर्थ्याने लोकाभिमुख संघर्ष केला, त्याला तोड नाही. त्यांचा संघर्ष केवळ विशिष्ट जाती-धर्मातील, विशिष्ट माणसांकरिता मर्यादित नव्हता तर संबंध देशातील माणसांच्या कल्याणाचाच होता.

"अनुभवे आले अंगा, ते जगा देतसे"

पश्चिम विदर्भातील दलित चळवळीतून देशाच्या पातळीवर उदयास आलेल्या रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या नेतृत्व गुणांचा विकास महाविद्यालयीन जीवनामधूनच झाला. विद्यार्थी चळवळीत कार्य करतांना त्यांनी समाजाच्या आत्मसन्मानाच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिले. ग्रामीण भागात दलितांवर होणारे अत्याचार, दलितांसाठी सार्वजनिक पाणवठे, विहिरी खुल्या करण्यासाठीचा त्यांनी विद्यार्थिदशेतच सुरू केलेला संघर्ष आंबेडकरी चळवळीला गतिमान करणारा ठरला आहे. सभा-परिषदांची आयोजने केलीत. गावकामदारकी सोडण्यासाठी संघर्ष केला. विदर्भात धम्मदीक्षा सोहळे आयोजित करण्यासाठीचा उपक्रम हाती घेऊन अन्याय व अत्याचाराविरुद्ध अग्रेसर राहून ग्रामीण भागात जनजागृती करणे, पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, जिल्हा कचेरीवर आपल्या सहकाऱ्यांसह रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई सत्याग्रह घडवून आणत असत. त्या काळात त्यांनी तुरुंगवासही भोगला. दलित चळवळीचे नेतृत्व करतांना आलेल्या अनुभवातून तावून सुलाखून निघालेले दादासाहेब गवई म्हणूनच वैदर्भीय दलितांचे अग्रणी पुढारी झाले.

त्यांच्या पुढाकाराने जानेवारी, १९५७ मध्ये बडनेरा (रेल्वे) येथे, मंगरूळपीर, जि. अकोला येथे दिनांक १८ जानेवारी १९५७ रोजी, पोहरापूर्णा, ता. खामगाव येथे दिनांक २६ एप्रिल १९५९ रोजी, मांजरखेडा, ता. चांदुर रेल्वे येथे नोव्हेंबर, १९५७ रोजी बौद्धधर्म दीक्षा घेण्यासाठी सभा-सम्मेलने आयोजित करण्यात आलेली होती. स्वयंकर्तृत्वाने उजळून निघालेल्या दादासाहेबांनी समाजाला दिशा देण्याच्या कार्यात झोकून दिले. हिऱ्याच्या अंगी जसे स्वयं तेज असते, तसे दादासाहेबांचे व्यक्तित्व दीप्तीमान होते.

भूमिहिनांच्या सत्याग्रहामध्ये संपूर्ण विदर्भात जनजागृती करण्यासाठी त्यांनी संपूर्ण विदर्भ पिंजून काढला. अमरावती नगरासह, तालुका स्तरावर सत्याग्रहींची नोंदणी केंद्रे स्थापन करण्यास मोठा सहभाग होता. यवतमाळ, पुसद, वणी, वाशिम, घाटंजी, बाळापूर, अकोट, बुलढाणा इत्यादी

ठिकाणच्या सभांना मोठा प्रतिसाद रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांना मिळाला. वेळप्रसंगी त्यांना सरकारने अटकपण केली होती. त्यांच्या या प्रयत्नांमुळे मिळालेले यश पाहून लाखो माणसांच्या सभेत दादासाहेब गायकवाड यांनी कौतुक करून त्यांना "महाराष्ट्र केसरी" हा किताब बहाल केला.

"जे जे जेथे पावे, ते ते समर्पावे सेवे"

हा वसा घेऊनच दादासाहेबांनी समाजसेवेचे कंकण बांधून अविरत आंबेडकरी चळवळ पुढे नेण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. लोकाभिमुख जे उपक्रम असतील त्या उपक्रमामध्ये रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांनी सहभाग घेतला व तो पूर्णत्वास नेण्यासाठी केलेला संघर्ष इतिहासात नोंदविला गेला आहे.

मध्यप्रांतामध्ये नागपूर येथे विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर अमरावती येथे वऱ्हाड प्रांतासाठी सुद्धा एक विद्यापीठ असले पाहिजे, याचा पाठपुरावा करण्यासाठी विधानमंडळामध्ये सर्वप्रथम दिनांक ७ ऑगस्ट, १९६४ रोजी रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांनी अमरावती येथे विद्यापीठ स्थापन व्हावे, म्हणून अशासकीय प्रस्ताव चर्चेसाठी आणला, तो प्रस्ताव पुढीलप्रमाणे होता.

" A Government Agreed in principle to the establishment of more universities in the state, this council recommends to Government :—

(i) To include in the Fourth Five Year Plan a scheme for the establishment of a new university having jurisdiction over the District of Amravati, Yeotmal, Akola and Buldhana, and:

(ii) To set up a committee collecting and consolidating of the requisite data for the purpose."

सदर प्रस्ताव अमरावती येथे विद्यापीठ स्थापनेकरिता विधान मंडळात केलेला हा पहिला प्रयत्न होता. यानंतरही रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांनी विधान मंडळात कधी स्वत: तर कधी विभागातील मित्र आमदारांमार्फत तर कधी सामाजिक संघटनांमार्फत यासाठी प्रयत्न केलेत. त्याचा परिणाम म्हणून अंतिमत: १ मे, १९८३ ला अमरावती विद्यापीठाची अमरावती येथे स्थापना झाली. आज सदर विद्यापीठ हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या नावाने उभे आहे. विद्येविना मती गेलेल्यांसाठी हे विद्यापीठ त्यांच्या प्रयत्नांमुळे आकाराला आहे.

महाराष्ट्राच्या समाजजीवनामध्ये जेंव्हा जेंव्हा भिन्न जाती-जाती व धर्म-धर्माच्या माणसांमध्ये कलहाचे, विद्वेषाचे व असूयेचे वातावरण निर्माण झाले, त्या-त्या वेळी दादासाहेबांनी जी भूमिका मांडली व कृतिशिलता दाखविली. तेव्हाच महाराष्ट्राच्या समाजजीवनात शांतता व सामंजस्य नांदले. याची अनेक उदाहरणे देता येतील. 'रिडल्स ऑफ हिंदूइझम' असो किंवा जातीय दंगलीतून विभिन्न समाज व धर्मांमधील माणसांमध्ये निर्माण झालेली दरी असो, त्यातून माणसांची मने जोडण्याची त्यांची कृती व वृत्ती ही देश व समाज जोडण्याची कृती म्हणून अनेकदा सिद्ध झाली. कुठल्याही फळाची आस न धरता दादासाहेबांनी समाजाची सेवा केली. **"सत्यवादी करी संसार सकळ, अलिप्त कमळ, जळी जैसे"** हा भाव त्यांनी आयुष्यभर जपला.

देशपातळीवर बौद्धांच्या सवलतीच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेले उपोषण व त्यांचे सरकारी नोकऱ्यांमध्ये बढतीसाठी सुद्धा आरक्षण लागू करण्यासाठीचे प्रयत्न सामाजिक समतेची चळवळ अधिक व्यापक करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

१४ ऑक्टोबर, १९५६ रोजी ज्या पवित्र भूमीवर लाखों अनुयायांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा दिली. त्या भूमीचा विस्तार व विकास हे दादासाहेबांच्या आयुष्यातील सुंदर स्वप्न होते. त्यामुळे दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी प्रथम भूमीविस्तारासाठी सरकारच्या दरबारी त्यांच्या स्वप्नातील शिल्पे उभी करण्याचा प्रयत्न केला. सदर कार्य सोपे नव्हते. कोट्यवधींच्या खर्चाची रक्कम बाबासाहेबांची जनता केव्हा उभी करणार. आर्थिकदृष्ट्या बाबासाहेबांचा समाज अद्यापही स्थिर नाही. हे शाश्वत सत्य त्यांना माहिती होते. तरीही हिंमत न हारता कोट्यवधीच्या खर्चाची रक्कम मा. दादासाहेबांनी त्यांचे कौशल्य पणास लावून उभी केली. त्यात पैशाचा अपहार होऊ नये. म्हणून दरवर्षीच खर्चाच्या हिशेबाचे अंकेक्षण करून घेण्याची कठोर भूमिका पार पाडली. त्यांच्या आयुष्यातील विहार शिल्पाचे स्वप्न साकारत गेले. आज दीक्षाभूमीवरील विहार भारताच्या मध्यभागातील एक शिल्पालंकार म्हणून ओळखल्या जातो. या स्वप्नसिद्धीसाठी दादासाहेबांनी जे कष्ट उपसले. त्या कष्टाला सलाम केला पाहिजे. **"खोल खोली पडे ते पीक उत्तम, उथळांचा श्रम वाया जाय"** दादासाहेबांनी अंतिम श्वासापर्यंत केवळ समाजाचाच विचार केला. जेवढ्या खोलात बी रुजेल तेंव्हाच पीक उत्तम येते. वर वर बी पेरल्याने केलेले श्रम वाया जाते. दादासाहेबांचे कार्य कर्तृत्व हे उत्तम समाज पुरुषांचे उदाहारण म्हणून सांगता येईल. त्यांनी समाजासाठी केलेले श्रम, त्या श्रमातून उन्नत केलेला समाज त्यांचे ऋण कदापीही विसरणार नाही.

-परीक्षा नियंत्रक (सेवानिवृत्त),
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

❑❑

तीन पिढ्यांची समरसता

श्री. दादासाहेब हे माझ्या कुटुंबातील तीन पिढ्यांचे सन्माननीय व्यक्ती आहेत. माझे माहेर औरंगाबादचे ! माझे वडील ॲडव्होकेट नारायणराव पाटील नांगदकर हे आमदार होते. माझ्या वडिलांशी श्री. दादासाहेबांची चांगलीच मैत्री होती. ते आमच्याकडे यायचे तेव्हा ओझरते मी त्यांना बघितले होते. पण पोरीबाळींनी समोर कसे यायचे या संकोचापोटी त्यांच्याशी बोलण्याचे धाडस मात्र कधी झाले नाही. लग्न झाल्यावर मी सासरी आले. माझे श्वशूर श्री. नानासाहेब हे देखील खासदार होते आणि मजेदार योगायोग असा की ते देखील श्री. दादासाहेबंचे मित्र होते आणि माझी नणंद सौ. ताईची मैत्रीण होती. तेव्हा या कौटुंबिक पार्श्वभूमीवरच श्री. दादासाहेबांशी माझा परिचय झाला. माझे वडील श्वशुरांची पहिली पिढी, दुसरी आम्हा उभयतांची आणि तिसरी माझ्या २८ वर्षीय मुलाची पिढी. या तिन्ही पिढ्यांमध्ये श्री. दादासाहेब समरस झालेले आहेत. वयाचं बंधन न पाळता सर्वांशीच त्यांची आत्मीयतेचीच वागणूक आहे आणि आपल्या खुमासदार विनोदी स्वभावाने ते प्रसन्न वातावरण निर्मिती करीत आलेले आहेत.

सौ. पुष्पा बोंडे
सामाजिक कार्यकर्त्या, अमरावती.

मनमोकळा सहृदय माणूस

▪ सुरेंद्र भुयार

सर्वधर्मसमभावाप्रमाणेच राजकारणात जगण्यानेच प्रत्ययास येणारे सर्वपक्षीय समभाव जोपासणारे एक आगळेच सदाबहार व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे श्री. दादासाहेब गवई ! पंचतारांकित हॉटेलवर अनेक रंगीबेरंगी झेंडे लावलेले असतात तसेच त्यांच्या घरावर जर का सर्व पक्षांचे झेंडे दिसले तर मला मुळीच आश्चर्य वाटणार नाही, कारण त्यांचा तो स्थायीभाव आहे. त्यांच्या ह्या स्वभाव वैशिष्ट्यामुळेच त्यांनी परपक्षातीलच नव्हे तर समाजातील सर्व स्तरातील लोकांशी मैत्री जोडलेली आहे. सहकार्याच्या भावनेने ती जगवली आहे आणि त्यातूनच त्यांनी आपले कृतार्थ वैयक्तिक जीवन आणि यशस्वी राजकारण साधलेले आहे. एक मनमोकळा सहृदय माणूस हीच ख्याती त्यांनी अर्जित केलेली आहे. त्याबरोबरच मधुरभाषी, चांगला वक्ता आणि समाजोपयोगी कामात सदैव सहभाग या त्यांच्या गुणांमुळे ते अमरावतीचेच नव्हे तर महाराष्ट्राचे भूषण ठरलेले आहेत.

साधारणतः १९७२-७३ पासूनच मी त्यांना ओळखतो. त्यावेळी मी फॉरवर्ड ब्लॉकचा पुढारी होतो. पण आमच्या पक्षभेदातील अडचण वैयक्तिक मैत्रीत कधीच उद्‌भवली नाही. उलट परिचय वाढीस लागून त्यांच्या आपलेपणामुळे आज आमच्यात कौटुंबिक संबंध निर्माण झालेले आहेत. त्यामुळे वेगळेपण कधी जाणवतच नाही. जो स्वभाव श्री. दादासाहेबांचा तोच सौ. कमल वहिनींचा. त्यांनीही आपल्या पतीप्रमाणेच समाजसेवेचे कंकण बांधलेले आहे. त्यांच्या कुटुंबातील प्रकर्षाने अनुभवास येणारे अगत्य त्यांनी या भयंकर महागाईच्या काळातही सांभाळले आहे. सौ. कमल वहिनी आपल्या कर्तबगारीमुळे व कार्यतत्परतेमुळे श्री. दादासाहेबांची अनुपस्थिती कधी भासू देत नाहीत. पत्नी कशी असावी ह्या प्रश्नाचे त्या उत्तर आहेत. तसेच त्यांच्या संसारवृक्षावरील टवटवीत फुले म्हणजे यशस्वी न्यायमूर्ती भूषण, प्रथितयश डॉ. छोटू व कर्तबगार सुगृहिणी सौ. कीर्ती ! सर्वांना सन्मानपूर्वक आपुलकीने वागणूक देण्याचा त्यांच्या स्वभावाचा मोठेपणा त्यांना मला वाटते श्री. दादासाहेबांच्याकडून वारसा हक्काने मिळालेला आहे. त्यांच्या तोंडून मला काका म्हणवून घेण्यात मला स्वतःचा अभिमान वाटतो.

एक सरळ राजकारणी हीच माझ्या मते श्री. दादासाहेबांच्या राजकीय जीवनाची व्याख्या. दुसऱ्यावर चिखलफेक करून वा दुसऱ्यांची कुचेष्टा करून त्यांनी आपली प्रतिष्ठा कधीच वाढवली नाही. त्यांची रिपब्लिकन पार्टी म्हटली की एक विशिष्ट जातीची पार्टी असेच बोलले जाते. पण या संकुचित वर्तुळाला पार करून जातीच्या वर असणारा नेता असेच त्यांच्याविषयीचे विधान जास्त संयुक्तिक ठरेल. सर्व स्तरातील नेतृत्वाची क्षमता त्यांच्यात आहे. सर्वपक्षीय सहानुभूतीतूनच त्यांनी यश संपादन केले आहे आणि सर्वांना सांभाळून घेण्याच्या त्यांच्या नैसर्गिक व्यवहारी स्वभावामुळेच ते त्यांनी टिकवले आहे. त्यांच्या सभापतीपदाच्या कार्यकालाचे जर का एकाच वाक्यात वर्णन करायचे झाले तर ते आहे 'आजपावेतो न झालेला विधानपरिषदेतील सर्वाधिक आमदारप्रिय सभापती.' लोकसभेत अभ्यास करून प्रभावशाली पद्धतीने विदर्भाच्या समस्यांना वाचा फोडून समतोल वृत्तीने आपले विचार मांडून आजचे विदर्भाचे ज्वलंत प्रश्न सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

-माजी राज्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

❑❑

एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

▪ एन. आर. सुटे

दिवंगत मा. श्री. रा. सू. गवई साहेब सन १९६४ पासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाततर्फे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य होते. दिवंगत मा. श्री. दादासाहेब गायकवाड यांनी काँग्रेस पक्षासोबत रिपब्लिकन पक्षाची युती केल्यामुळे मित्रपक्ष म्हणून मा. श्री. रा. सू. गवई साहेबांची त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री दिवंगत मा. श्री. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन १९६८ मध्ये उप सभापती निवड केली.

मा. श्री. रा. सू. गवई साहेब हे नागपूर येथील परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष होते. तसेच नागपूर हे आंबेडकर चळवळीचे मुख्य ठिकाण आहे. रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन म्हणा किंवा केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठका ह्या जास्तीत जास्त नागपुरात व्हायच्या. या निमित्ताने आणि स्मारक समितीच्या बैठकीसाठी तसेच महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनासाठी मा. श्री. रा. सू. गवई साहेबांचे नागपूरला सारखे येणे जाणे असायचे, त्यावेळी मी दीक्षाभूमीवरील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होतो.

नागपूर प्रदेश रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून श्री. वा. कों. गाणार साहेब होते तर सेक्रेटरी म्हणून श्री. सदानंदजी फुलझेले साहेब होते. त्यावेळी मी श्री. गाणार साहेबांचा स्वीय सहायक म्हणून काम करीत होतो. जेव्हा जेव्हा मा. श्री. रा. सू. गवईसाहेब नागपूरला अथवा नागपूर प्रदेशातील जिल्ह्यांत दौऱ्यावर यायचे तेव्हा तेव्हा श्री. गाणार साहेबांसोबत मला जावे लागे व त्यामुळे मा. श्री. गवई साहेबांसोबत माझा परिचय वाढला. इतकेच नव्हे तर त्यांचे स्वीय सहाय्यक श्री. ए. बी. गायकवाड आणि दुसरे स्वीय सहाय्यक दिवंगत श्री. एस. व्ही. बेडसूर यांचेशी माझे चांगले मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले. जेव्हा श्री. र. गो. जाधव यांचे स्वीय सहायकाचे पद रिक्त झाले तेव्हा श्री. गायकवाड आणि श्री. बेडसूर यांनी माझ्या नांवाची शिफारस गवई साहेबांना केली. गवई साहेबांनी होकार दिला व मला त्यांचे खाजगी स्वीय सहायक म्हणून दिनांक १८ सप्टेंबर १९७६ पासून सेवा करण्याची संधी प्राप्त झाली. १९७६ ते १९८२ जुलैपर्यंत मी माझ्या काकांकडे विक्रोळीला राहायला होतो. परंतु मा. गवई साहेबांची महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत २२ जुलै १९८२ रोजी संपल्यानंतर त्यांनी मला त्यांच्या १० सारंगमध्ये वास्तव्याला बोलावून घेतले व तेव्हापासून मी त्यांच्या समवेत राहत होतो.

श्री. गवई साहेब यांचा विद्यार्थिदशेपासूनच सामाजिक व राजकीय कार्यात सहभाग होता. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमी, नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा आपल्या लाखो अनुयायांना दिली. त्याच वेळी गवई साहेबांनी सुद्धा बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे पालन करण्यासाठी त्यांनी विदर्भातील चारही जिल्ह्यात दौरा करून मागासवर्गीय गोरगरीब जनतेला जागृत करण्याचे तसेच डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या प्रतिज्ञांचे पालन करण्याचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य त्यांनी केले.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी सन १९६२ ला भूमिहिनांना जमीन मिळण्यासाठी सत्याग्रह करण्याचे आदेश दिले. त्यानुसार गवई साहेबांनी अमरावती येथे जो सत्याग्रह केला तो अद्‌भूत ठरला. अमरावती जेल सत्याग्रहींनी पूर्ण भरला होता. याची नोंद कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी घेतली व त्यांना विदर्भकेसरी असा किताब बहाल केला. याची फलश्रुती म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी त्यांना १९६४ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर सदस्य म्हणून पाठविले.

एचबी ११८०—१४

श्री. गवई साहेबाचे त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतरावजी नाईक यांच्याशी अगदी जवळचे संबंध होते. तसेच मा. गवई साहेबांचे सर्व पक्षाच्या नेत्यांसोबत मित्रत्वाचे संबंध होते. तेव्हा सर्वपक्षातील नेते म्हणा किंवा पदाधिकारी यांचे काम मा. मुख्यमंत्र्यांकडून करून घ्यावयाचे असल्यास श्री. गवईसाहेब मा. मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना भेटतांना प्रथम शेतीसंबंधी व पाऊस व्यवस्थित झाला किंवा नाही यासंबंधी चर्चेला सुरुवात करायचे व नंतर हळूच ज्या कामासाठी गेले त्या कामासंबंधी बोलायचे. म्हणजे ते काम नक्कीच व्हायचे.

श्री. गवई साहेब जेव्हा जेव्हा पुसदच्या दौऱ्यावर जायचे तेव्हा तेव्हा मा. श्री. वसंतराव नाईक साहेब त्यांना त्यांच्या घरी जेवायला बोलवायचे. इतके त्याचे घनिष्ठ संबंध होते.

सन १९६८ ते १९७८ पर्यत श्री. गवई साहेब उप सभापती जरी होते तरी ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे जेव्हा जेव्हा विधानसभेवर मोर्चे यायचे तेव्हा तेव्हा ते मोर्चाचे नेतृत्व करायचे व मोर्चाच्या ज्या मागण्या असायच्या त्यासंबंधी सभागृहात भाषणे करायचे. सभागृहात त्यांनी फक्त मागासवर्गीयांचेच प्रश्न किंवा समस्या मांडल्या नाहीत तर इतर सर्व जाती जमातीचे प्रश्न देखील ते मांडत असत.

सन १९७७ मध्ये केंद्रात जनता पक्षाचे सरकार होते. त्यावेळी दिवंगत मा. श्री. मोरारजीभाई देसाई हे पंतप्रधान होते. सप्टेंबर १९७७ मध्ये बौद्धांना सवलती मंजूर कराव्यात या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या एका शिष्टमंडळाद्वारे दिवंगत गवई साहेबांनी भेट घेतली. या शिष्टमंडळात दिवंगत सी. एम. आरूमुगम, दिवंगत ना. ह. कुंभारे (त्यावेळचे राज्यसभेचे खासदार) दिवंगत श्रीमती शांताबाई दाणी, दिवंगत ॲड. बी. सी. कांबळे इत्यादी नेते मंडळी होती. मला सुद्धा त्यांच्या समवेत जाण्याची संधी प्राप्त झाली.

शिष्टमंडळ मा. पंतप्रधानाच्या दालनात गेले. खुर्चीवर स्थानापन्न झाल्यानंतर दादासाहेबांनी नवबौद्धांना केंद्र सरकारच्या शैक्षणिक व नोकरीत सवलती का आवश्यक आहेत यासंबंधीची कैफियत मांडली. मा. पंतप्रधानांनी हे ऐकून असे विधान केले "कोणी सांगितले तुम्हाला बौद्ध धर्म स्वीकारायला."

हे शब्द श्री. गवई साहेबांनी ऐकताच ताडकन खुर्चीतून उठले व मा. पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांना म्हणाले की "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला बौद्ध धम्माची दीक्षा दिली", आपण कोण होता विचारणारे? डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "बौद्धांच्या सवलती ह्या माझ्या कोटाच्या खिशात आहेत" तेंव्हा त्या आम्ही मिळवूच असे बोलून शिष्टमंडळासह ते मा. पंतप्रधानांच्या दालनातून बाहेर पडले.

श्री. गवई साहेब, सी. एम. आरूमुगम, ना. ह. कुंभारे असे तिघेही नेते नवबौद्धांना सवलती मिळाव्यात म्हणून नोव्हेंबर १९७७ मध्ये नवी दिल्ली येथील संसद भवनाच्यासमोर बोट क्लबवर आमरण उपोषणाला बसले होते. उपोषण मंडपाला त्यावेळी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील, त्यावेळचे उप पंतप्रधान श्री. यशवंतराव चव्हाण व बऱ्याच महाराष्ट्राच्या आणि केंद्रातील सर्वपक्षीय नेत्यांनी उपोषण मंडपाला भेटी देऊन आपला पाठिंबा जाहीर केला होता. हे उपोषण बारा दिवस चालले.

माजी पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई मुंबईतील सचिवालय जिमखाना येथे एका स्वागत समारंभाला आले होते. जेव्हा ते बाहेर आले तेव्हा ते घरी परत जाण्यासाठी टॅक्सी बघत होते. तेवढ्यात दादासाहेब व मी त्याच स्वागत समारंभासाठी पोहोचलो असता गेटवरच त्यांची भेट झाली. दादासाहेबांनी नमस्कार करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली व नंतर त्यांना आपल्या गाडीतून त्यांच्या घरी पोहोचवून दिले. त्यांना आधाराशिवाय चालता येत नसल्याचे समजल्यावर मी व दादासाहेबांनी त्यांना आधार देऊन त्यांना त्यांच्या रूमपर्यंत पोहोचवून दिले. पंतप्रधानपदावर आरूढ

असताना मा. श्री. दादासाहेबांना व शिष्टमंडळाशी अपमानास्पद बोलणाऱ्या माजी पंतप्रधानांना घरापर्यंत पोहोचवून देण्याचे काम मा. श्री. दादासाहेबांनी केले यांतच त्यांची माणुसकी दिसून येते.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा प्रस्ताव दिनांक २७ जुलै १९७८ रोजी मा. मुख्यमंत्री श्री. शरद पवारांनी दोन्ही सभागृहात मांडला. त्यावेळी विधानपरिषदेमध्ये सभापती म्हणून मा. श्री. रा. सू. गवई खुर्चीवर स्थानापन्न होते. चर्चेअंती दोन्ही सभागृहात हा प्रस्ताव पारित झाला. मुंबईत हा प्रस्ताव पारित झाल्याची घोषणा झाली. तिकडे मराठवाड्यात जाळपोळ, दंगल, मारामारी, लुटमार, दलितांची घरे जाळणे अशा प्रकारचे सवर्णांकडून अन्याय अत्याचाराची बातमी मा. दादासाहेबांना रात्री समजताच लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजताच्या विमानाने औरंगाबादला रवाना झाले. त्या जळत्या दंगलीत मा. दादासाहेबांनी जीवाची पर्वा न करता ८ ते १० दिवस संपूर्ण मराठवाड्यात दौरा करून दलित बौद्ध जनतेला तसेच सवर्ण हिंदूंना देखील समजविण्याचा व शांतता प्रस्थापित करण्याची कामगिरी त्यावेळी त्यांनी केली. नामांतराचा प्रश्न बरेच वर्ष सुटला नाही. शेवटी १९९४ मध्ये या प्रश्नावर मा. श्री. दादासाहेबांनी तोडगा सुचविला व तो मा. श्री. शरद पवारांनी मान्य करून "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ" असे नामांतर झाल्याची घोषणा केली.

१९८० ला बॅरि. ए. आर. अंतुले साहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, मा. श्री. रा. सू. गवई हे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती होते. १९८१ ला नवीन विधान भवनाचे उद्घाटन झाले. उद्घाटन कार्यक्रमाला त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. उद्घाटन समारंभात प्रास्ताविक भाषण करते वेळी श्री. रा. सू. गवई म्हणाले की, हे विधानसभा लोकशाहीचे मंदिर आहे. आणि या दोन्ही सभागृहाचे आमदार हे या मंदिराचे पुजारी आहोत. सांविधानिक नियमानुसार या सभागृहातील कामकाज व्हायला पाहिजे. ज्या दिवशी नियमांचा भंग होईल त्या दिवशी हे लोकशाहीचे मंदिर कोसळल्याशिवाय राहणार नाही. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा त्यांनी लोकप्रतिनिधींना इशारा दिला होता.

१९९४ ते १९९८ पर्यंत कुठल्याही पदावर नसतांना देखील त्यांचे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रात व इतर राज्यात दौरे सुरू होते. या दौऱ्यात जमा झालेले लोकांचे अर्ज ते स्वतःचे पत्रासोबत संबंधित मंत्री अथवा अधिकाऱ्यांना पाठवीत असत. त्यांचा पत्रव्यवहार कधीच बंद झाला नाही. ते सतत जनतेच्या संपर्कात असत.

१९९८ ला लोकसभेची निवडणूक झाली. यापूर्वी १९९६ मध्ये रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले होते व रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून मा. श्री. रा. सू. गवई साहेबांनी अमरावती लोकसभा मतदार संघामधून, मा. श्री. बाळासाहेब आंबेडकर साहेब यांनी अकोला लोकसभा मतदार संघामधून, मा. श्री. रामदासजी आठवले साहेब यांनी पंढरपूर लोकसभा मतदार संघामधून तर मा. प्रा. जोगेंद्रजी कवाडे साहेब यांनी चिमूर लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविली होती व चारही नेते त्यावेळी लोकसभेवर निवडून आले होते.

त्यानंतर २००० मध्ये मात्र मार्च महिन्यात महाराष्ट्र विधानसभेमधून राज्यसभेवर सदस्य म्हणून पाठवायच्या जागेवर काँग्रेसच्या अध्यक्षा मा. श्रीमती सोनियाजी गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या कोट्यातून तिकीट दिले. काँग्रेसला दोन जागा मिळाल्या होत्या. दुसऱ्या जागेवर मा. श्री. दिलीपकुमार यांना तिकीट देण्यात आले होते. अशा प्रकारे त्यावेळी मा. श्री. रा. सू. गवई साहेब व मा. श्री. दिलीपकुमार हे राज्यसभा सदस्य म्हणून अविरोध निवडून आले. त्यांचा कालावधी एप्रिल २००६ ला संपला.

एचबी ११८०—१४अ

रिपब्लिकन पक्ष काँग्रेससोबत असल्यामुळे काँग्रेसच्या अध्यक्षा मा. श्रीमती सोनियाजी गांधी यांनी मा. श्री. रा. सू. गवई यांची लगेच बिहारचे राज्यपाल पदासाठी शिफारस केली. महामहीम राष्ट्रपती यांच्या आदेशानुसार त्यांची राज्यपाल पदावर नियुक्ती झाली. मा. श्री. गवई साहेबांनी बिहारचे राज्यपाल म्हणून दिनांक २२ जून २००६ रोजी पाटणा येथील राजभवनाच्या हिरवळीवर शपथ घेतली. यावेळी महाराष्ट्रातील व इतर राज्यातील रिपब्लिकन पक्षाचे नेते. पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच कुटुंबातील मंडळी मोठ्या संख्येनी हजर होते. त्यांचा बिहारचा राज्यपाल म्हणून कार्यकाळ २२ जून २००६ ते ९ जुलै २००८ पर्यंत राहिला. जुलै ऑगस्ट २००६ मध्ये त्यांना सिक्कीम राज्याचा एक महिन्यासाठी अतिरिक्त कार्यभार सांभाळावा लागला.

त्यानंतर मा. श्री. रा. सू. गवई साहेबांना बिहारमधून केरळचे राज्यपाल म्हणून पाठविण्यात आले. थिरूवंनतपूरम (केरळ) येथील राजभवनात त्यांचा दिनांक १० जुलै २००८ रोजी शपथविधी पार पडला.

२००४ मध्ये लूंबिनी नेपाळ येथे चार दिवस संपन्न झालेल्या इंटरनॅशनल बुद्धिस्ट कॉन्फरन्समध्ये मा. श्री. रा. सू. गवई साहेबांना भारतातून आमंत्रित करण्यात आले होते.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मध्यवर्ती स्मारक" हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे दीक्षाभूमीवर केवळ मा. रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्यामुळेच पूर्णत्वास आले आणि म्हणून त्यांना "स्मारकाचे शिल्पकार" असे संबोधण्यात येते. या आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे उद्घाटन भारताचे त्यावेळचे माननीय राष्ट्रपती श्री. के. आर. नारायणन यांचे शुभहस्ते दिनांक १८ डिसेंबर २००१ रोजी संपन्न झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी स्मारकात कायमस्वरूपी स्थापन करण्याचा कार्यक्रम "अश्विन पौर्णिमा दिनांक २ ऑक्टोबर २००१" रोजी पार पडला व तेव्हापासून अस्थी मध्यवर्ती स्मारकात भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आल्या.

वरील सर्व बाबी लक्षात घेतल्या तर मा श्री. रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे व्यक्तिमत्व एक अष्टपैलू असल्याचे दिसून येते. अशा महान व्यक्तीसोबत काम करण्याची तसेच त्यांच्या सोबत वास्तव्य करण्याचा सहवास लाभला हे मी माझे भाग्य समजतो. त्यांनी व आईसाहेब डॉ. श्रीमती कमलताई गवई यांनी मला मुलासारखे प्रेम दिले. माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या सुखदुःखात नेहमीच आस्थेने मदत केली. इतकेच नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती मा. श्री. भूषण गवई साहेब, डॉ. राजेंद्र गवई आणि सौ. कीर्ती राजेश अर्जुन यांनी भावासारखे प्रेम दिले तसेच त्यांच्या इतर कुटुंबियांनी सुद्धा मला आपल्या कुटुंबातील समजले. मी या सर्वांचा ऋणी व कृतज्ञ आहे.

-दादासाहेबांचे माजी खाजगी सचिव,
नागपूर.

❑❑

मानवतावादी जगण्यातून आदर्श घडविणारे दादा

▪ कीर्ती अर्जुन

आज दादांच्या विषयी माझे विचार व्यक्त करताना सहजपणे माझे मन माझ्या बालपणापासून विचार करायला लागले. आम्ही तिघं भावंड आणि मी सगळ्यात धाकटी. खरे सांगायचे म्हणजे माझ्या आजीच्या मुखातून दादांच्या विषयी गोष्टी ऐकतच मी मोठी झाली. त्यामुळे साहजिकच माझ्यावर माझ्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि विचारांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडत गेला. आम्ही लहान असताना आम्हा भावा-बहिर्णींमध्ये बालसुलभ खोड्या काढण्याचे प्रकार व्हायचेत, तेव्हा आमची आई चिंता करायची परंतु दादा नेहमी म्हणायचे की, कीर्ती जरी सडपातळ दिसत असली तरी सर्वांना पुरून उरेल. तेव्हापासून दादांनी माझ्यामध्ये एक नवा उत्साह, जोम निर्माण केला. बालपणापासूनच दादांच्या प्रेरणेमुळे मी निरंतर स्वावलंबी आणि सक्षम व्हायला लागली. दादा नेहमीच उत्साह वाढवायचे ज्याचा परिणाम नवीन कार्य करण्यासाठी प्रेरक ठरायचा. परमपूज्य बाबासाहेब, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची प्रेरणा घेऊनच दादासाहेबांनी आपले संपूर्ण जीवन घालविले. बाबासाहेबांनी दिलेला धम्म दादासाहेबांनी आपल्या प्रत्यक्ष कर्तृत्वातून आणि आचरणातून आमच्या समोर मांडला. उदाहरणादाखल मला आजही तो दिवस आठवतो. एकदा एक भिकारी आपल्या लहान मुलासह झोपलेला आम्हाला दिसला. तो भिकारी आजारी होता. दादा त्यांच्याकडे गेले. त्यांची आस्थेने चौकशी केली व लगेच मदतही दिली. यावरून दादांच्या अंगी असलेले मैत्री आणि करुणा या गुणांचा प्रत्यय आला. आपल्या कार्यकर्तृत्वातून दादांनी आम्हाला धम्माची शिकवण दिली.

अमरावतीला दाजीसाहेब पटवर्धन यांनी कुष्ठ बांधवासाठी सुरू केलेल्या तपोवनमध्ये सुद्धा दादा आम्हाला अनेकदा घेऊन जायचे. दादा नेहमी तपोवनमधील कुष्ठ बांधवांना मदत करायचे त्यामुळेच ते कुष्ठमित्र म्हणून सुद्धा ओळखले जाऊ लागले. हे पाहत असताना आम्ही शिकलो की, समाजामध्ये कोणीही मदतीपासून वंचित राहू नये आणि सामाजिक बांधिलकी ठेवून आपण मदत करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे.

दादांचा दृष्टिकोन व्यक्ती परीक्षणामध्ये पूर्वग्रहविरहित असाच होता. त्यांनी कधीच आपपर असा भेद केला नाही. याबाबत मला एक प्रसंग आठवतो की, दादांकडे एका विरोधी गटाचे नेते कुठलेसे काम घेऊन आले. दादांनी त्यांचे काम केले. काही कार्यकर्त्यांनी दादांना प्रश्न केला की, ती व्यक्ती विरोधी गटाची असून सुद्धा आपण मदत केली. त्यावर दादा उत्तरले, माझ्याकडे मदत मागण्याकरिता आलेली व्यक्ती कुठल्या गटाचा किंवा पक्षाचा आहे याचा मी विचार करीत नाही. फक्त शक्य ती मदत करणे कर्तव्य समजतो. यामध्ये दादांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. इतरांचे दु:ख हलके करणे, स्वत: जातीने उपस्थित राहता जरी आले नाही तरी आजारपण आणि दु:खाच्या प्रसंगी लोकांना धीर आणि मदत देण्याचे कार्य दादांनी आयुष्यभर केले.

स्त्री सक्षमीकरण हे दादांच्या जीवनाचे अविभाज्य अंग होते. माझ्या आईला उच्च शिक्षित करून समाजोपयोगी कार्य करण्याची प्रेरणा दादांनीच दिली. एवढेच नाही स्त्रियांनी खूप शिकावे, मागे न राहता पुढे-पुढे जावे असे दादा नेहमी म्हणायचे. स्वत:च्या घरातल्याच स्त्रियांनीच शिकून पुढे जावे इतका सीमित विचार न करता सर्व स्त्रियांनीच शिकून सक्षम व्हावे असे दादांना नेहमी वाटायचे. आज मला माझ्या शालेय जीवनातील प्रसंग आठवतो की, माझ्या सोबतच बाहेरील तीन ते चार मुली एकाच वेळी एकाच ठिकाणी राहून शिक्षण घ्यायचो. मला तेव्हा माझ्या खोलीत इतर अनोळखी मुर्लींसोबत राहणे रुचत नव्हते. परंतु आज जेव्हा मी विचार करते तेव्हा माझ्या वडिलांच्या उदार अंत:करणाचे महत्त्व पटायला लागते. मला सक्षम करण्यामध्ये दादा आणि आईचाच फार मोठा वाटा आहे. सक्षमीकरणाचे बीजारोपणच त्यांनी केले.

दादांच्या निरंतर प्रेरणेतून माझा आत्मविश्वास वाढत गेला आणि मी शिक्षण पूर्ण केल्यानंतर मुंबईला यशस्वी उद्योजक बनले. दादांना माझा मोठा अभिमान वाटायचा. आणि ते माझ्याविषयी इतरांना सांगताना मला प्रकर्षाने जाणवायचे. एकदा एका मोठ्या नेत्याने दादांना सुचविले की, तुम्ही माझ्याच प्रमाणे तुमच्याही मुलीला सामाजिक कार्यामध्ये आईसोबत कार्य करायला सांगा. जेणेकरून तिला मोठी जबाबदारी सांभाळण्याची क्षमता प्राप्त होईल. तेव्हा दादांनी हसून उत्तर दिले की, आजच ती एक यशस्वी उद्योजक आहे आणि वेळप्रसंगी जेव्हा ती स्वत: एखादी मोठी जबाबदारी स्वीकारण्याचा विचार करेल तेव्हा ती अतिशय समर्पकपणे आणि समर्थपणे जबाबदारी पार पाडेल. याविषयी माझ्या मनात शंका नाही. दादांचे ते शब्द आजही माझ्या जीवनामध्ये पदोपदी प्रेरणा देतात. दादा एक आदर्श पिता व तितकेच आदर्श आणि प्रेमळ आजोबा होते. नातवंडांमध्ये दादा हरपून जायचे. त्यांनाही मोठी स्वप्न पाहावयास सांगायचे. दादा म्हणायचे, मोठे स्वप्न म्हणजे उच्च विद्याविभूषित होऊन फक्त भौतिक सुखांच्या मागे न लागता काहीतरी सामाजिक व सर्व समावेशक परिवर्तन घडवून आणणारे असावे.

कर्मयोगी संत गाडगेबाबांचा सहवास दादांना लाभला आणि परिणामत: गाडगेबाबांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव दादांवर पडला. त्याचा प्रत्यय दादा बिहारचे राज्यपाल असताना दिसून आला. दादा आणि आई यांनी मिळून राजभवनाचा परिसर इतर सर्व सहकाऱ्यांसोबत स्वत: हातात झाडू व टोपले घेऊन स्वच्छ केला. गाडगेबाबांचा स्वच्छतेचा मंत्र स्वत:च्या कृतीतून दादांनी दाखविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धम्मदीक्षा ज्या नागपूरच्या भूमीवर देण्यात आली, त्या जागेवर ऐतिहासिक दीक्षाभूमीची वास्तू उभारण्याकरिता अथांग प्रयत्न करून दीक्षाभूमीला जागतिक कीर्ती मिळवून देणारे दादासाहेब गवई हे दीक्षाभूमीचे शिल्पकार बनले. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी दीक्षा दिली ती भूमी दादांच्या हृदयात होती आणि बाबासाहेब त्यांच्या नसानसात भिनलेले होते. त्यांच्यामुळे आमच्याही रोमारोमात बाबासाहेब आहेत. भावनिकदृष्ट्या अतिशय कणखर दिसणारे दादा बाबासाहेबांच्या जाण्याने तुटून गेले होते. त्यांनी स्वत:ला अक्षरश: कोंडून घेतले होते. अश्रूंना वाट मोकळी करून दिली. माझी आजी नेहमीच दादांच्या आठवणी सांगायची. वयाच्या १४ व्या वर्षापासून दादा चळवळीत उतरले. आजोबांनी कष्ट घेऊन शिकविण्यासाठी पूरक नसलेल्या लहानशा खेडेगावात दादांना शिक्षण दिले. बुद्धिस्ट सेमिनरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण करण्याकरिता दादा आणि आई सातत्याने प्रयत्नशील होते. सर्वांकरिता शिक्षण उपलब्ध करून देण्याचे दादांचे स्वप्न होते. म्हणूनच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे उच्च शिक्षण मिळावे याकरिता आई आणि आम्ही प्रयत्नरत आहोत. दादांचा मानवतावाद, दया, करुणा, प्रसंगी कणखरता, निडरता, वक्तृत्व, राजबिंड व्यक्तिमत्त्व, उच्च विचारसरणी आणि धम्ममयी आचरण मला नेहमीच प्रेरणा देत राहील. मला माझ्या प्रत्येक कार्यामध्ये दादांचे अस्तित्व जाणवते.

प्रसिद्ध कवी मेरी एलिझाबेथ फ्राय च्या शब्दात सांगायचे तर.....

Do not stand at my grave and weep
I am not there. I do not sleep.
I am a thousand winds that blow.
I am the diamond glints on snow.
I am the sunlight on ripened grain.
I am the gentle autumn rain.
When you awaken in the mornings Hush.
I am the swift uplifting rush.
Of quiet birds in circled flight.
I am the soft stars that shine at night.
Do not stand at my grave and cry ;
I am not there, I did not die.

-दादासाहेबांची कन्या,
वरळी, मुंबई.

❑❑

आधारस्तंभ ढळला

▪ ज. वि. गायकवाड

दादासाहेबांचा व माझा परिचय १९५५ पासूनचा ते आणि मी विदर्भ महाविद्यालयात एकत्रच शिकत होतो तेव्हांपासूनच! पण त्यांच्या अंगी असलेल्या विविध अलौकिक गुणांचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला तो १९९८ मध्ये जेव्हा ते लोकसभेचे खासदार असताना त्यांचा खाजगी सचिव या नात्याने सहयोगी झालो तेव्हापासून! सहयोगी होतो पण अनुभव मात्र काहीच नव्हता. पण त्यांनीच मला धीर दिला. 'शून्यातून विश्व निर्माण करण्याच्या' त्यांच्या सामर्थ्यातून व प्रेमळ वागणुकीनेच मी बरेच काही शिकलो व इथपर्यंत पोहोचलो.

दादासाहेबांच्या अंगी असलेल्या अलौकिक गुणाविषयी सांगायचे झाले तर ते सद्‌गुणांची खाणच होते. त्यांची सहृदयता, प्रत्येकाला जाणवणारा आपलेपणा, प्रेमळ स्वभाव, परोपकारी वृत्ती, जातिभेद व पक्षभेद विसरून केवळ आपल्या कार्यकर्त्यांशीच नव्हे तर सर्व जाती, धर्म व पक्षीयांशी त्यांची आदरपूर्वक वागणूक, मनाचा मोठेपणा, समोरच्या व्यक्तीच्या भावना न दुखवता, त्यांनी केलेली चूक त्याच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याची त्यांची हातोटी, निगर्वी स्वभाव, आपल्या विचारांशी न जुळणाऱ्या व्यक्तींचेही विचार जाणून घेण्याची मानसिकता, निस्पृह वृत्ती, विपरीत परिस्थितीतही चेहऱ्यावरील हास्य मावळू न देण्याची क्षमता, स्वार्थांचा विचार न करता परमार्थ साधण्याची त्यांची भावूकता, कोणतेही काम पूर्णत्वास नेण्याची जिद्द, त्यांनी जपलेला बंधूभाव, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याची त्यांची मनोवृत्ती, हे मी जरा जास्त प्रमाणात अनुभवले आहे सर्वांनीच अनुभवले आहे. स्वभाव विनोदी होता. त्यांच्या मित्रमंडळीत हास्याचे फवारे उडविण्याचे काम दादासाहेबच करीत असत. त्यांचा हजरजबाबीपणा सर्वांनाच ज्ञात होता. मराठीच नव्हे तर इंग्रजी व हिंदी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व व जोडीला त्यांचे अभ्यासपूर्ण व मुद्देसूद भाषणानेच सदनात शांतता प्रस्थापित होत होती. सर्वजण त्यांचे भाषण लक्ष देऊन ऐकत असत. ते राजकारणात होते पण 'राजकारणी' मात्र कधीच नव्हते.

दिल्लीच्या मुक्कामातील त्यांच्या काही आठवणी सांगायच्या झाल्यास दादासाहेब एकदा संसद भवनातील सेंट्रल हॉलमध्ये चंद्रपूरचे खासदार श्री. नरेशजी पुगलिया, ज्येष्ठ पत्रकार श्री. सुकृत खांडेकर, पत्रकार बागाईतकर, व श्री. प्रकाशजी आंबेडकर यांच्याशी गप्पा मारीत बसले होते. दादासाहेबांची एका महत्त्वाच्या पत्रावर सही घ्यायची असल्याने मीही तिथे पोहोचलो. नियमाप्रमाणे सचिवांना सेंट्रल हॉलमध्ये येण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे मला पाहताच आंबेडकर साहेब माझ्याकडे पाहून म्हणाले, 'गायकवाड तुम्ही इथेही येऊ शकता का?' त्यावर नरेशजी म्हणाले 'गायकवाड म्हणजे दादासाहेबांचा नारदमुनी आहे.' ते कुठेही भ्रमण करू शकतात. फक्त दोघांमधला फरक एवढाच आहे की ते नारदमुनी कळ लावायचे हे लावत नाहीत. तेवढ्यातच श्री. आंबेडकरांना काय लहर आली कुणास ठाऊक? ते म्हणाले 'आपण लस्सी पिऊ या पण बिल मात्र मी देईन.' दादासाहेबांची बिल देण्याची इच्छा होती. पण आंबेडकर साहेब ऐकेनात तेव्हा दादासाहेब म्हणाले ठीक आहे. तुम्हीच लस्सी बोलवा आणि तुम्हीच बिल द्या. आणि मला म्हणाले, तुम्हीही थांबा आणि लस्सी पिऊन जा. नंतर लस्सी आली. आम्ही सर्वांनी लस्सी घेतली. थोड्या वेळाने वेटर रिकामे ग्लास व बिल घ्यायला आला. आंबेडकर साहेबांनी वेटरला शंभरची नोट काढून दिली. सहा लस्सींचे पाच रुपये प्रमाणे तीस रुपये होत

होते. लगेचच वेटर उरलेले सत्तर रुपये घेऊन आला. त्याला पैसे परत करताना पाहताच दादासाहेबांनी वेटरला हातानेच पैसे परत घेऊन जा अशी खूण केली. म्हणजे सत्तर रुपये वेटरची टीप होती. तीस रुपयांच्या लस्सीला सत्तर रुपये टीप. आंबेडकर साहेब आश्चर्यानेच दादासाहेबांकडे पाहत होते पण ते मात्र मिश्कीलपणे हसत होते आणि 'मला बिल देऊ दिले नाही मग घ्या आता' असा भाव दादासाहेबांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. अगदी लगेचच आंबेडकर साहेब घाईघाईने निघून गेले. आंबेडकर साहेब एवढ्या घाईने कुठे गेले असे खांडेकरांनी विचारले असता त्यावर दादासाहेब म्हणाले 'ते आता कँटीनमध्ये टीपचे सत्तर रुपये परत घ्यायला गेले आहेत.' 'दादासाहेबांच्या ह्या उत्तराने सर्वच जण खळखळून हसले. दुसऱ्या दिवशी दैनिक लोकसत्ता व दैनिक सकाळमध्ये 'आंबेडकरांच्या लस्सीला गवईची टीप' या मथळ्याखाली बातमी छापून आली. कारण या दोन्ही वर्तमानपत्राचे बातमीदार ह्या प्रसंगी उपस्थित होते.

तसाच एक हृदयस्पर्शी प्रसंग मला आठवतो. दादासाहेबांचा राज्यसभेचा कार्यकाल संपलेला होता. कुठल्याही परिस्थितीत नियमाप्रमाणे तीस दिवसांच्या आत राज्यसभेकडून देण्यात आलेला हा फ्लॅट आपण सोडायचाच. कुठलीच मुदतवाढ मागायची नाही हे दादासाहेबांनी निक्षून मला सांगितले होते व मी हो म्हटले. त्यावेळी दादासाहेबांनी मला विचारले 'गायकवाड इथल्या आपल्या सामानाचे काय करायचे? तुम्ही काय ठरविले आहे ? मी त्यावर, जशी तुमची इच्छा व आज्ञा असेल त्या प्रमाणे करतो असे म्हणालो. आपण म्हणाल तर कुरियरने अमरावतीला पाठवून देतो. त्यावर दादासाहेबांनी क्षणभर माझ्याकडे पाहिले व मला म्हणाले 'आपण इथून काहीच बरोबर घेऊन जायचे नाही.' इथले सर्व सामान स्टाफमध्ये वाटून द्या. एक चमचादेखील इथून न्यायचा नाही.' मी स्तंभित होऊनच हे ऐकत होते. दादासाहेबांच्या आदेशाप्रमाणे तिथले सर्व सामान ज्यात त्यांनी स्वखर्चाने घेतलेले काही फर्निचर, महागड्या जेवणाच्या प्लेटस् व बाऊल्स, स्वयंपाक घरातील सर्व भांडी, प्रेझेंट मिळालेल्या वस्तू, इतर काही साहित्य, दादासाहेबांचे चार पाच सूट हे सर्व वाटून दिले. दादासाहेब दिल्लीच्या वास्तव्यात वापरत असलेली कार त्यानी प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या रामलखन ड्रायव्हरला भेट म्हणून दिली. एवढेच नाही तर मालकीहक्क ट्रान्सफर करण्याच्या आर.टी.ओ. च्या रामलखनच्या नावे ट्रान्सफर करण्याच्या फॉर्मवर सही करायला ते विसरले नाहीत. फ्लॅट सोडून दादासाहेब जायला निघाले तेव्हा स्टाफमधील सर्व आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित होते. प्रत्येकाचेच डोळे अतीव दुःखाने पाणावले होते. काही त्यांच्या पायावर डोके ठेवून ढसढसा रडत होते. स्वतः दादासाहेबही भावूक झाले होते. सर्वांच्याच डोक्यावर हात ठेवून सुखी राहण्याचा आशीर्वाद देत होते. शेवटी सर्वांना उद्देशून दादासाहेब म्हणाले 'तुम्हा सर्वांचे माझ्यावरील प्रेम मी जाणतो. मी फक्त दिल्ली सोडून जातो आहे, तुम्हाला सोडून नाही. कोणालाही माझी कसलीही मदत लागली तर मला हाक मारा. मी तुमच्या हाकेला ओ देऊन तुमच्या मदतीला धावत येईन व तुम्हाला मदत करीन' साश्रूनयनांनीच सर्वांनी दादासाहेबांना निरोप दिला. तत्पूर्वी पार्लमेंटमधील त्यांचे सहयोगी मित्र, त्यांना वेळोवेळी मदत कराणारे कर्मचारी, अगदी सिक्युरिटी गार्डपासून तर अधिकारी वर्गापर्यंत, मीडियाच्या मित्रांकडूनही त्यांना हृद्य निरोप दिला गेला. प्रत्येकाची भावना एकच होती. 'असा परोपकारी, सहृदय, मैत्री जपणारा, प्रत्येक अडचणीत मदत करणारा खासदार पुन्हा होणे नाही.' क्वचितच एखाद्या खासदाराला इतका भावपूर्ण निरोप पार्लमेंटच्या इतिहासात मिळाला असेल. आज दादासाहेब

हयात नाही पण प्रत्येकाच्या हृदयात त्यांच्या विषयीच्या प्रेमादराचे स्थान मात्र अढळ आहे.

दादासाहेबांना माझ्याविषयी अत्यंत जिव्हाळा होता. एकदा एका खासदार साहेबांनी त्यांना विचारले की, 'हा गायकवाड तुमचा कोण आहे?' त्यावर ते पटकन म्हणाले की 'तो होल ॲन्ड सोल आहे.' माझ्या अत्यंत विश्वासू असा माझ्या कुटुंबातील एक सदस्य आहे. वहिनीसाहेबही दिल्लीत आल्या की म्हणायच्या 'गायकवाड भाऊजी तुम्ही इथे आहात न, त्यामुळे मला आमच्या साहेबांची चिंता नाही' या उभयतांचा माझ्यावरील विश्वास हीच माझ्या उर्वरित आयुष्याची पूंजी आहे. आज माझी ओळख दादासाहेबांच्यामुळेच आहे.

अशा या माझ्या कर्तृत्ववान, प्रेमळ व अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या आदरणीय दादासाहेबांना अश्रूपूर्ण नेत्रांनी, विनम्र श्रद्धांजली.

-दादासाहेबांचे पूर्व खाजगी सचिव.

❑❑

दूरदृष्टीचे गवई

श्री. गवई कुठलेही कार्य करीत असताना केवळ आपल्या दलित बांधवाच्याच कल्याणाचा विचार करीत नाहीत तर संपूर्ण समाजाच्या हितासाठीच ते झटतात याचा मला आलेला प्रत्यक्ष अनुभव मी तुम्हाला सांगतो. १९८२ मध्ये मी अर्थमंत्री असतानाची ही घटना. त्यावेळी अमरावतीमध्ये पाण्याची अतिशय टंचाई होती. ती दूर करण्यासाठी एक योजना आखण्यात आलेली होती. अर्थमंत्री या नात्याने या योजनेला मंजुरी देणे माझ्या कक्षेत होते आणि फाईलचे अवलोकन केल्यानंतर माझ्या लक्षात आले की या योजनेला मंजुरी देण्यासाठी आवश्यक असलेला वीस प्रतिशत लोकांचा हिस्सा (Public share) भरण्याची क्षमता अमरावती नगरपालिकेत नव्हती. त्यामुळे मंजुरी देणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीतच श्री. गवई माझ्याकडे आले. त्यांनी अमरावतीतील जनतेचे पाण्याच्या टंचाईमुळे होत असलेले हाल मला सांगितले. त्यासाठी ही योजना मंजूर होणे किती आवश्यक आहे हेही मला समजावले आणि त्याचबरोबरच नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता या वीस प्रतिशत हिस्स्यात सूट देण्यात यावी अशी आग्रहाची विनंती पण केली. मी माझी कायदेशीर अडचण त्यांना सांगितली. त्यावर श्री. गवई मला म्हणाले की, कुठलाही मार्ग काढा पण ही योजना मंजूर होणे फार अगत्याचे आहे. श्री. गवई माझ्याशी इतक्या पोटतिडकेने बोलत होते, इतकी सामाजिक बांधिलकीची तळमळ मला त्यांच्या बोलण्यातून जाणवली की त्यांच्याविषयी असलेल्या प्रेमापोटी त्यांच्या मागणीला नकार देणे मला अशक्य झाले आणि थोडे नियमबाह्य होऊन मी (Public share) ची सूट देऊन त्या योजनेला मंजुरी दिली. ती योजना पुढे यशस्वी झाली आणि अमरावतीकरांचे पाण्याचे दुर्भिक्ष दूर झाले. हे साध्य झाले ते केवळ श्री. गवईच्या अविरत प्रयत्नांमुळेच.

-रामराव आदिक
माजी उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

तत्कालीन आठवणी...

नाईक आणि गवई : एक एकरूप घराणे

श्री. दादासाहेबांना माझ्याविषयी एक विशेष आत्मीयता आहे. एक प्रसंग मला आठवतो. माझे काका मुख्यमंत्री असतानाच मी राज्यमंत्री झालो. नंतर मला मंत्रीपद मिळाले आणि माझ्याकडे गृहनिर्माण खाते देण्यात आलेले होते. त्यावेळी श्री. दादासाहेब विधानपरिषदेचे सभापती होते. गृहनिर्माण खाते म्हणजे आधीच अतिशय संवेदनशील आणि त्यातच ह्या खात्याचा मंत्री या नात्याने मला विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तरे देण्याचा माझा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे मी जरा अस्वस्थच होतो. सभागृहातही बराच गोंधळ माजलेला असल्याने त्यात आणखी भरच पडत होती. मला वाटते श्री. दादासाहेबांनी माझी मनःस्थिती ओळखली असावी कारण लागलीच त्यांनी सर्व सभासदांना उद्देशून म्हटले, तुम्हांला एक चांगले उत्तर ऐकायचे आहे ना ? मग शांत रहा, त्यांच्या शब्दांनी सभागृह तर शांत झालेच पण त्याचबरोबर माझ्यात मनोधैर्यही निर्माण झाले. सर्वांना आपलेसे करुन प्रोत्साहित करण्याचे त्यांचे कसब खरोखरच अंगीकारण्यासारखंच आहे.

-सुधाकरराव नाईक.
माजी मुख्यमंत्री.

नाही शब्द माहीत नसणारा माणूस

विधिमंडळ कामकाजातून सक्रिय राजकारणात यशस्वीपणे पदार्पण केलेले श्री. रा. सू. गवई खऱ्या अर्थाने अजातशत्रू आहेत. पत्रकार म्हणून गेली तीस वर्षे दिल्लीत वास्तव्य असूनही मला त्यांच्या या स्वभाव वैशिष्ट्यांचा अनुभव वेळोवेळी आला आहे. कलाप्रेमी, कोणत्याही विषयावर अधिकारवाणीने बोलण्याची कला आणि वयात अंतर असूनही गप्पागोष्टीत सर्वांना आपलेसे करून घेणारे व्यक्तिमत्त्व सर्वांच्या लक्षात राहण्यासारखे आहे.

' जयभीम ' म्हणून स्वागत करणारे ' दादा ' चर्चेच्या काही क्षणातच सर्वांना आपलेसे करून टाकतात. ' नाही ' हा शब्द दादां च्या शब्दसंग्रहात नसावाच, निदान समोरासमोर ते हा शब्द वापरताना मी कधीही पाहिलेले, ऐकलेले नाही. कदाचित नाहीच. नाहीच जमले तर नंतरच्या पहिल्याच भेटीत ' अरे ', थांब रे, काळजी करू नकोस.....' सांगून ते समोरच्या व्यक्तिला अक्षरशः काबीज करून टाकतात.

' आपले म्हणजे आपलेच, फक्त आपलेच हो ' ' या थाटात ' दादांनी घोषित नियम शासकीय विश्रामगृहात मोडल्याचा साक्षीदार मी आहे. पण हे सुद्धा फक्त दिलखुलास दादा करू शकतात.

-मधुसूदन साठ्ये



अजातशत्रू...

□ दिवंगत नेत्यांचे मनोगत

दादासाहेब गवई यांचे व्यक्तिमत्त्व अजातशत्रू होते. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. दादासाहेबांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे लेख विविध नेत्यांनी त्यांच्या गौरव ग्रंथासाठी त्यावेळी लिहिले होते. हे सर्व लेख संग्रहणीय असून त्यातील निवडक लेख या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत.

सत्कार, गौरव...

महाराष्ट्र आणि देशाच्या सार्वजनिक जीवनात
गेल्या पाच दशकांपासून ध्येयवादाने प्रेरित होऊन
श्रध्दा-निष्ठापूर्वक कार्य करणाऱ्या
अमरावतीच्या सुपुत्राचा अमरावती नगरीत
सत्कार होतो आहे.
महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ते बिहारचे राज्यपाल
हा आदरणीयं दादासाहेब गवई यांचा प्रवास
त्यांच्या अलौकिक व्यक्तीमत्वाचा साक्षात्कार
घडविणारा प्रवास आहे.
विहारातून बिहारकडे जाताना त्यांनी आपल्या
संकल्पशक्तीचेही दर्शन घडविले आहे.
अमरावतीच्या या सुपुत्राने
पाटलीपुत्रच्या तख्तावर विराजमान होऊन
अमरावतीकरांना आणखी एक
अभिमानाचा क्षण मिळवून दिला आहे.
त्यांचा जाहीर नागरी सत्कार म्हणजे
त्यांच्या अविरत कार्याला
अमरावतीकरांचा सलाम आहे.

मित्र जमवण्याचा छंद

▪ जयंतराव टिळक

श्री. रा. सू. गवईंची आणि माझी मैत्री फार पुरातन हा शब्द मी मुद्दाम वापरलेला आहे. कारण पुरातन म्हटले की निश्चित असा कालखंड पुरातत्त्वज्ञांना आणि इतिहासकारांनाही सांगता येत नाही. तसेच आमच्या मैत्रीची निश्चितपणे सुरुवात केव्हा झाली हे सांगणे कठीण आहे. त्यांच्याविषयी माझ्या मनात जो प्रेमाचा ओलावा आहे त्यामागे थोडे कौटुंबिक कारण पण आहे. प्रत्येकालाच मला वाटते हा अनुभव असेल की आपले बालपण ज्या ठिकाणी म्हणजे गावी जाते त्या गावाबद्दल एक विशेष आकर्षण जन्मभरच आपल्या मनात असते. तसेच आईवडिलांवर जरी आपण प्रेम करीत असलो तरी आईवरील प्रेमाचे माप जरा झुकतेच असते. म्हणूनही कदाचित आपण नमनाची सुरुवात आईवरील मातृदेवो भव पासूनच करतो. आपल्याकडे एक म्हणही आहे की काका, आत्यापेक्षा मामा, मावशी अधिक जवळचे वाटतात. हे सर्व सांगण्यामागचे कारण म्हणजे माझ्याही बाबतीत असेच काहीसे घडलेले आहे. लहानपणी वडील वारल्यानंतर माझी आई आम्हा भावंडांना घेऊन अमरावतीला आपल्या बहिणीकडे म्हणजे माझ्या मावशीकडे गेली होती. माझी मावशी म्हणजे कै. मोरोपंत जोशींच्या सूनबाई! अमरावतीला मी एक वर्ष होतो. शाळेत न जाता घरीच मी अभ्यास करीत असे. पुढे दोन वर्षे मी अकोल्याच्या नॉर्मल स्कूलमध्ये शिकलो आणि नंतर पुण्याला आलो. पण अमरावतीबद्दल एक विशेष आत्मीयता, कदाचित मावशीवरील प्रेमामुळेही असेल, पण होती आणि आजही आहे. आणि नेमके श्री. गवई हे अमरावतीचेच! त्यामुळे दुधात साखर पडल्यालगत आमच्या मैत्रीत एक प्रकारचा गोडवा निर्माण झाला आणि आमचे मधुर संबंध आजतागायत टिकून आहेत आणि पुढेही ते तसेच राहतील. माझी बहीण पण वर्ध्याचीच. त्यामुळे या ना त्या कारणास्तव त्या भागात जाण्याचे प्रसंग मला बरेचदा आले. जेव्हा केव्हा मी तिकडे जात असे, तेव्हा श्री. गवईंना मात्र मी अवश्य भेटत असे. एरवी कुणाकडे जाताना, आपल्याला बोलावले आहे की नाही हे प्रथम पाहतो. त्यातही देण्यात आलेले निमंत्रण मनापासून आहे की निमित्त टाळण्यासाठी त्याचा विचार करतो आणि नंतरच जायचे की जाऊ नये, याचा निर्णय आपण घेतो. पण श्री. गवईंनी आपल्याला आमंत्रण द्यावे व मग मी त्यांच्याकडे जावे असे कधी वाटलेच नाही. या मनाच्या मोकळ्या असलेल्या मित्राकडे जाण्यात एक विशेष आनंदाची अनुभूती होत असे. मी आल्याचे कळताच श्री. गवई मला घ्यायला यायचे आणि त्यानंतर खास वऱ्हाडी पाहुणचाराचा भरपूर आस्वाद मी घेत असे. त्यांच्या आदरातिथ्याची पद्धत तर चिरकाल स्मरणात राहण्यासारखी आहे.

श्री. गवईंचे मित्रमंडळ फार विशाल आहे. कुणाला कशाचा छंद असतो तर आणखी कुणाला कशाचा, तसा आमच्या गवईंना मित्र जमविण्याचा छंद आहे. श्री. गवईंच्या भाषेत इतके माधुर्य साठवलेले आहे की त्यांच्या बोलण्यानेच समोरचा माणूस त्यांच्या मित्रत्वाच्या कक्षेत येतो, मित्र बनतो. याच संदर्भात श्री. गवईंची एक अफलातून आवड मला नेहमीच आठवते आणि कधी कधी तर एकांतात मला हसायलाही होते. ती म्हणजे श्री. गवई सभापती असतानासुद्धा आपल्या बरोबर येताना एक मोठा थर्मास चहाने भरून आणीत असत आणि त्यांचा पानाचा डब्बा तर त्यांच्याबरोबर नेहमीच असायचा. त्यांच्याकडे आल्या गेलेल्यांना ते आग्रहाने चहा पाजीत असत व आपल्या डब्यातून पान देत असत. त्यांच्या थर्मासमधील चहा पिऊन, डब्यातील पान खाऊन त्यांच्याशी मनसोक्त गप्पा मारण्याची

लज्जतच काही और होती! त्यांनी आपल्या या चहापानातून मित्र तर जोडलेच पण त्याचबरोबर एकाच दग़डात दोन पक्षी मारल्यागत एखाद्याच्या मनात जर त्याच्याविरुद्ध निर्णय गेल्यामुळे कटुतेचे जळमट आलेले असेल तर तेही ते दूर करीत असत व त्याच्याशी पूर्ववत संबंध प्रस्थापित करीत असत. बरं, त्यांचं हे मित्रमंडळ भारतापुरतच मर्यादित नाही, तर परदेशातही आहे. बौद्ध धर्माच्या प्रसाराच्या अधिवेशनाला, तर कधी भारताचे प्रतिनिधी म्हणून, तर कधी अमेरिकेतील निवडणूक पद्धतीचे अवलोकन करण्यासाठी अशा या ना त्या कारणास्तव ते अनेकदा परदेशात जाऊन आलेले आहेत. त्या प्रत्येक वेळी त्यांनी त्या त्या देशातील सामाजिक परिस्थितीचा आणि चालीरीतींचा तर अभ्यास केलाच पण तिथेही ते आपले अनेक मित्र जमवून परतले आहेत. आणखी त्यांच्या मैत्रीविषयक सवयीचे वैशिष्ट्य म्हणजे ते मित्र जमवून नुसतेच शोकेसमध्ये ठेवल्यागत ठेवत नाहीत, तर आपण जसे शोकेसमधल्या वस्तू मधून मधून काढून, त्यांची साफसफाई करून परत ठेवतो; तसे श्री. गवई त्यांच्या फावल्या वेळात आपल्या जुन्या मित्रांना भेटून न पेक्षा त्यांना फोन करून ते आपल्या मैत्रीला उजाळा देत असतात. खरोखरच श्री. गवई म्हणजे एक लोकविलक्षण माणूस आहे.

श्री. गवईंचे आपले सलग असे व्यक्तिमत्त्व असूनही ते आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराशी एकरूप झालेले आहेत. आपल्या दलित बांधवांच्या उद्धारासाठी अंग मोडून कार्य करून डॉ. बाबासाहेबांचे उर्वरित कार्य श्री. गवईंनी पूर्णत्वास नेलेले आहे. डॉ. बाबासाहेब नेहमीच म्हणायचे की, आपल्या तळाशी असलेल्या समाजाला जर वर काढायचे असेल तर राजकारणाची सूत्रे आपल्या हाती असणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात जे जुळून आले नाही, ते श्री. गवईंनी पूर्ण केले आहे. आपल्या दलित बांधवांना एकत्र आणून त्यांच्यात अन्यायाविरुद्ध लढण्याचे मनोधैर्य निर्माण करण्याचे फार मोलाचे कार्य श्री. गवईंनी केलेले आहे. त्यांच्या अंगी असलेल्या नेतृत्वगुणाचाच हा आविष्कार आहे असे मी मानतो. श्री. गवईंना काही विकृत मनोवृत्तीचे लोक जातीयवादाची शाल पांघरतात. काहींनी मला तसे विचारल्याचेही स्मरते. पण त्यांना मी लागलीच म्हणालो होतो की, जर जातीयवादी असते तर माझ्याशी मैत्री केली असती का? मी कोणत्या जातीचा आणि धर्माचा आहे, हे तुम्हाला माहीत आहे ना? माझे एक सोडा पण इतरही अनेक उदाहरणे देऊ शकतो की समाजातील सर्व जाती, धर्म वा पंथाचे लोक श्री. गवईंचे मित्र आहेत. ते त्यांना चाहतात. त्यांचा आदर करतात. त्यांच्यावर प्रेम करतात. मग हे कसे घडेल! आणि दुसरे असे की, श्री. गवईंनी ज्या सामाजिक सुधारणा घडवून आणल्या, ज्या सवलती जनतेला मिळवून दिल्या, उदाहरणार्थ रोजगार हमी योजना, शेतकऱ्यांना मिळवून दिलेल्या सवलती, शैक्षणिक सवलती, शिक्षकांची पगारवाढ इत्यादींचा जर विचार केला तर आपल्या दलित बांधवांचेच कल्याण करण्याची त्यांची कूपमंडूकवृत्ती कुठेच आढळून येत नाही तर संपूर्ण समाजाचे हित साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो. तेव्हा त्यांना जातीयवादी म्हणणे म्हणजे आधारहीन विधान आहे असे मी समजतो. माझ्या या उत्तराने प्रश्नकर्त्यांचे समाधान झाले की नाही हे सांगणे जरा धाडसाचे होईल. पण एवढे मात्र खरे की पुन्हा हा प्रश्न किंवा असले विचार माझ्यासमोर तर कुणी उपस्थित केले नाहीत.

श्री. गवईंकडून मी सभापती पदाची सूत्रे हाती घेतली. पण त्या मागचा घटनाक्रम मला चिरस्मरणात राहील. श्री. गवईंच्या दिलदारपणाचा, मनाच्या मोठेपणाचा आणि माझ्याप्रति असलेल्या त्यांच्या आदराचा आणि प्रेमाचा एक अविस्मरणीय अनुभव असेच वर्णन त्या घटनाक्रमाचे करावे लागेल. आमच्यातीलच काही असंतुष्ट लोकांनी श्री. गवईना डिवचले होते आणि परत सभापती पदाची

निवडणूक लढवून सभापती होण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण करविली होती आणि श्री. गवईंनी त्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केलेली होती. पण त्याचवेळी सभापती पदाकरिता माझे नाव समोर आले. मी सभापती पदाचा उमेदवार आहे असे कळताच श्री. गवईंनी आपल्या जिद्दीला तिलांजली देऊन, माझ्याशी कुठलाही संपर्क न साधता केवळ माझ्या प्रेमापोटी माघार घेतली. मला ही बातमी जेव्हा कळली तेव्हा त्यांच्याविषयीचे माझे प्रेम तर शतगुणित झालेच पण त्याचबरोबर माझ्याप्रति असलेला त्यांचा प्रेमादर अनुभवून मी गहिवरलो! मी सभापती म्हणून अविरोध निवडून आल्यावरच ते माझ्याकडे आले. पुष्पगुच्छांनी माझे अभिनंदन केले. आम्ही प्रेमाने एकमेकांना मारलेल्या मिठीचे छायाचित्र दुसऱ्या दिवशी सर्व प्रमुख वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर झळकले होते. मित्र कसा असावा हे श्री. गवईंनी आपल्या कृतीने सर्वांना दाखवून दिले आहे. सभापती म्हणून काम करीत असताना श्री. गवईंचे नेहमीच सहकार्य लाभले. कुठलीही अडचण आली की मी त्यांना सल्ला विचारत असे आणि तेही तत्परतेने माझ्या मदतीला धावून येत असत. त्यांनी घेतलेले त्यांच्या कार्यकालातील निर्णय जेव्हा मी संदर्भादाखल बघतो त्या वेळी श्री. गवईंच्या तीव्र बुद्धिमत्तेचा मला नेहमीच प्रत्यय येतो.

श्री. गवई हे एक उत्तम वक्ते आहेत. मराठी तर मातृभाषा आहेच, पण त्याचबरोबर त्यांचे हिन्दी व इंग्रजीवर प्रभुत्व आहे. आपले म्हणणे त्यांच्या या वक्तृत्व कौशल्यामुळे व भाषेवरील प्रभुत्वामुळे ते फार चांगल्या प्रकाराने पटवून देऊ शकतात.

श्री. गवई शेतकरी कुटुंबातून आलेले आहेत, नव्हे ते मूळ शेतकरीच आहेत. तेव्हा शेतीविषयी तर त्यांना आकर्षण आहेच; पण त्याचबरोबर आधुनिक तंत्राचे पण त्यांना सखोल ज्ञान आहे.

श्री. गवईंच्या अंगी असलेल्या प्रामुख्याने त्यांची न्यायबुद्धी, निःस्वार्थीपणा, निर्भीडपणा, सर्वांना सांभाळून घेण्याचे कौशल्य, कटाक्षाने कटुता टाळण्याचे कसब, समयसूचकता, तत्त्वांच्या किंवा मूल्यांच्या आहारी न जाता मैत्रीपूर्ण व्यवहार ह्या नात्याने त्यांचा कार्यकाल निष्कलंक ठरला आहे. एकही अपघात न करता गाडी चालवण्याबद्दल इंजिन ड्रायव्हरला जसे रेल्वेकडून निवृत्तीनंतर पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येते तसा नियम जर का विधानपरिषदेतील सभापती पदाबद्दल असता तर ते सन्मानपूर्वक मिळणारे पारितोषिक श्री. गवईंना नक्कीच मिळाले असते. श्री. गवईंची व्याख्या एकाच शब्दात करायची झाली तर तो शब्द आहे हरहुन्नरी नेता.

श्री. गवईंना मी नेहमीच म्हणत असे की, आपल्यामध्ये फार कर्तृत्वशक्ती आहे, कार्यक्षमता आहे आणि त्या जोडीलाच संघटन कौशल्यपण आहे. त्यामुळे आपल्या कार्याला महाराष्ट्राच्या सीमा फार अपुऱ्या पडतात. तुम्ही राज्यसभेवर किंवा लोकसभेवर निवडून जा. तिथल्या विस्तृत कार्यक्षेत्रातच तुमच्या अंगी असलेल्या गुणांना न्याय मिळणार आहे आणि तुमच्या कार्याचे खऱ्या अर्थाने मूल्यांकन होऊन ते महान ठरणार आहे. पण ते गवईंनी मनावर घेतले नाही की योगच नव्हता हे सांगणे कठीण आहे, पण या वर्षी मात्र माझ्या इच्छेप्रमाणे योग जुळून आला आहे. श्री. गवई लोकसभेवर आणि तेही अमरावती निर्वाचन क्षेत्रातून निवडून आल्याचे कळताच मला अतिशय आनंद झाला. स्वप्नपूर्तीचा होतो तसा. मी त्यांचे या यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करतो. अठरा वर्षांचे वय झाल्यावर जसा मतदानाचा अधिकार मिळतो तसा त्यांना आशीर्वाद देण्याचा हक्क मला प्राप्त झाला आहे. तेव्हा महाराष्ट्रात त्यांना मिळालेले यश हा केवळ पाया ठरो आणि या पायाच्या आधारावर, दिल्लीत आपल्या कर्तृत्वाचे भव्य मंदिर उभारून त्यावर देदीप्यमान यशाचा कळस ते चढवोत हाच त्यांना माझा शुभाशीर्वाद!

-माजी सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

❑❑

माझे कौटुंबिक मित्र

■ **ए. आर. अंतुले**

रा. सू. गवईंचा आणि माझा प्रथम परिचय केव्हा झाला हे जरी मला आता नीटसे आठवत नसले तरी एक मात्र खरे की, ते माझे फार प्राचीन मित्र आहेत. आमची मैत्री राजकारणापुरती किंवा कुठलेही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कधीच नव्हती आणि राहणारही नाही. त्यांना मित्र म्हणण्यापेक्षा माझ्या कुटुंबातील एक सदस्य म्हणणेच जास्त उचित होईल. कुठल्याही प्रसंगी त्यांना माझी गरज भासली तर धावत जाऊन मी त्यांना मदत करणार आणि मला भासली तर ते पळत येऊन मला मदत करणार इतकी आम्हाला एकमेकांविषयी खात्री आहे. आमच्यामधील हा जिव्हाळा जन्मभर अबाधितच राहणार हे सांगायला कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही. कारण मैत्री तुटते किंवा वितुष्ट येते ते एकतर राजकारणात न पेक्षा एखाद्या स्वार्थापोटी! पण या दोन्ही बाबींना पार करून आमचा स्नेह आहे. आमच्या स्नेहाचे आणखीही एक कारण देता येईल. आमच्या दोघांचेही श्रद्धास्थान एकच आहे आणि ते म्हणजे आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

श्री. गवईंच्या राजकीय जीवनाविषयी सांगायचे झाले तर त्यांच्या अंगी असलेल्या दोन प्रमुख गुणांमध्येच सांगता येईल आणि ते म्हणजे ते अतिशय धूर्त आणि गोड बोलणारे आहेत! या दोन्ही शब्दांचा समाजात प्रचलित असलेला भावार्थ मात्र घेऊ नका! कारण धूर्त हा शब्द उच्चारला की लगेच कोल्ह्यासारखी लबाडी आणि स्वार्थीपणा आठवतो. पण ह्याअर्थी हा शब्द मी वापरलेला नाही. मी धूर्त या शब्दाचा खरा अर्थ शहाणपणा असाच करतो आणि माझ्या मते शहाणपणाची व्याख्या आहे काळाची पावले ओळखून समयसूचकतेने योग्य निर्णय घेणे. ही क्षमताही श्री. गवईंच्या मध्ये पूर्णत्वाने आहे. त्यांनी केलेले अंदाज आणि घेतलेले निर्णय सहसा चुकीचे ठरत नाहीत. दुसरा शब्द मी वापरला आहे गोड बोलणारे! त्याचाही अर्थ गोड बोलून फसवणारे असा होत नाही. श्री. गवई कुठल्याही बाबींवर इतके आत्मीयतेने बोलतात की, साहजिकच त्यांच्या भाषेत एक प्रकारचा गोडवा निर्माण होतो आणि त्यांच्या बोलण्यात मी केव्हा विरघळलो हेही माझे मला कळत नव्हते आणि अशा मनःस्थितीत त्यांच्या म्हणण्याला नाही म्हणणे जरा जडच जायचे! ह्यांना 'नाही' न म्हणण्यामागेही एक कारण असते आणि ते म्हणजे ज्या विषयावर ते बोलताहेत किंवा जी मागणी ते करताहेत त्यामागे त्यांचा वैयक्तिक स्वार्थ कधीच नसतो. उद्देश असतो तो समाजाचे भले करण्याचा, सुधारणा करण्याचा आणि त्यामुळेही त्यांना नकार देणे शक्य होत नाही. त्यांच्या ह्या बोलण्यातूनच त्यांना अपेक्षित असलेले ते साध्य करून घेऊ शकतात. मला वाटते राजकारणात हे दोन्ही गुण अंगी असणे अत्यंत आवश्यक आहे आणि श्री. गवईंनी या दोन्ही गुणांचा योग्य समन्वय साधलेला आहे. त्यांच्या राजकीय यशाचे रहस्य त्यांच्या अंगी असलेल्या गुणांमध्येच साठवलेले आहे. त्यांच्या यशाबद्दल आणखीही काही सांगता येईल. ते म्हणजे श्री. गवई राजकारणात मुरब्बी असले तरी ते कुटिल कारस्थानी नाहीत! आपला राजकीय उद्देश साधण्यासाठी वाममार्गाचा अवलंब त्यांनी कधीच केला नाही. स्पष्टवक्तेपणा हाही त्यांचा एक गुणविशेष आहे. पण या गुणाचा उपयोग ते समोरच्या माणसाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत ह्याची काळजी घेऊनच करतात. आणखी प्रकर्षाने जाणवणारा त्यांच्या अंगी असलेला एक सद्‌गुण म्हणजे त्यांची कृतज्ञशीलता! आपले काम झाले की समोरच्या माणसाला विसरून जायचे किंवा प्रचलित म्हणीप्रमाणे 'कामापुरता मामा' अशी वृत्ती त्यांची नाही. एक प्रसंग मला

आठवतो- मी १९९५ मध्ये केंद्रीय स्वास्थ्यमंत्री असताना श्री. गवई एकदा माझ्याकडे आले. वास्तविक पाहता त्या आधी बराच काळ त्यांची माझी भेट झाली नव्हती. आमच्या मैत्रीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे बघा. आमची मैत्री आहे म्हणून आम्ही एकमेकांना रोज भेटतो किंवा फोन करतो अशातला भाग नाही. कित्येक दिवस, महिने/वर्ष जातात की, त्यांची माझी भेट झालेली नसते. पण प्रत्यक्षात जेव्हा भेटतो तेव्हा जणू काही कालच भेटलो होतो असा भास होतो. मला वाटते हे देखील आमच्या दोघांमध्ये असलेल्या प्रेमाचे प्रतीकच आहे.

श्री. गवई माझ्याकडे आले होते ते ह्याविषयी मला जाणीव द्यायला की, महाराष्ट्रातील कुठल्यातरी भागात, निश्चित भाग मला आता नीटसा आठवत नाही, मलेरियाची साथ जोरात सुरू आहे आणि बरेच लोक मृत्युमुखी पडताहेत आणि शासनाकडून कुठलीही मदत तिथे पोहोचलेली नाही. मला ह्याविषयीची कुठलीच माहिती माझ्या किंवा राज्य शासनाच्या अधिकाऱ्याच्या मार्फत तोपर्यंत मिळालेली नव्हती. त्यामुळे मलाही जरा आश्चर्यच वाटले; पण त्याच बरोबर श्री. गवई केवळ त्यांनी ऐकले आहे ह्यावरून नसून, प्रत्यक्षात त्या भागात ते जाऊन आलेले असतील आणि प्रत्यक्ष परिस्थिती पाहूनच ही माहिती आपणास देत असतील, ते चुकीची माहिती कधीच देणार नाहीत हा पूर्ण विश्वास मला असल्यामुळे मी श्री. गवईंना माझ्या केबिनमध्ये बसायला सांगितले आणि लागलीच संबंधित अधिकाऱ्यांना माझ्या केबिनमध्ये बोलावले आणि मला गवई साहेबांनी दिलेल्या माहितीवरून त्यांचा खुलासा विचारला. माझ्या अपेक्षेप्रमाणेच श्री. गवईंनी दिलेली माहिती खरी होती. मला अंधारात ठेवल्याबद्दल मी अधिकाऱ्यांना चांगलेच झापले आणि श्री. गवईंच्या समक्ष त्यांना आदेश दिला की, आताच्या आता श्री. गवई साहेबांच्याबरोबर जा आणि त्या भागात आवश्यक ती वैद्यकीय व इतर मदत त्वरित रवाना करा. ह्याबाबतीत कुठलीच हयगय होता कामा नये आणि ह्याबाबतीत काय व्यवस्था केली आहे ह्याचा रिपोर्ट मला परवा सकाळपर्यंत मिळाला पाहिजे, त्यानंतर त्या भागात सर्व मदत पोहोचली, साथीचे निर्मूलनही झाले आणि कामाच्या व्यापात तो प्रसंग मी विसरूनही गेलो. पण श्री. गवई मात्र मी त्वरित उचललेली पावले विसरले नाहीत. त्यांनी त्यानंतर पत्रकार परिषद बोलावली आणि ही घटना सर्वांना सांगितली.

श्री. गवई फार सहनशील आहेत! त्यांना कुणावर रागावलेले किंवा अपशब्दांचा वापर करून कुणाला अपमानीत केल्याचे मी पाहिले किंवा ऐकलेही नाही. पण त्याबरोबरच ते मनाविरुद्ध झालेली गोष्ट खपवूनही घेत नाहीत, मग ती मित्राकडून झालेली असली तरीही! असाच एक प्रसंग माझ्यावरही ओढवलेला आहे! खरे सांगायचे तर हा प्रसंग म्हणजे पांढऱ्या शुभ्र कपड्यावर एक बारकासा का होईना पण काळा डाग असावा व तिकडेच लक्ष वेधले जावे व ते खटकत रहावे तसे आमच्या जीवाभावाच्या मैत्रीतला एक कटू अनुभवच आहे. १९८० सालातील, मी मुख्यमंत्री असतानाची ही घटना! हिवाळी अधिवेशन नागपूरला सुरू होते. त्या वेळी जळगाववरून शेतकऱ्यांची एक दिंडी नागपूरला येत आहे असे मला अधिकाऱ्यांकडून व वर्तमानपत्रांतून कळले. शेतकऱ्यांची मागण्यासाठी दिंडी हे ऐकून मला जरा आश्चर्य वाटले. कारण दोनच महिन्यांपूर्वी शेतकऱ्यांची कुठलीही मागणी नसताना सुद्धा पिढ्यानपिढ्या कर्जाच्या जाळयातच अडकून पडलेल्या व व्याज आणि त्यावरील चक्रवाढ व्याजाच्या भाराने दबून गेलेल्या व मेहनत करूनही दारिद्र्यरेषेखाली गेलेल्या या असहाय शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, नवजीवन जगण्याची त्यांना संधी मिळावी, या उद्देशाने मी कर्जाच्या दलदलीतून त्यांना बाहेर काढले होते. त्यांचे सर्व कर्ज मी माफ केलेले होते. त्याकरिता सुमारे ६० कोटीची तरतूद करून मी को-ऑपरेटिव्ह बँकेत भरली देखील होती. कर्जमाफीची अंमलबजावणी देखील संपली होती आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना मी कर्जमुक्त केलेले होते. शेतकऱ्यांनी काहीच

न मागता मी त्यांना दिलेले होते. असे असताना सुद्धा ही शेतकऱ्यांची दिंडी आणखी कोणत्या कारणासाठी निघाली हेच मला कळेना. का कुणास ठाऊक पण यात काहीतरी काळेबरे असावे अशी मला शंका आली आणि म्हणून मी अधिकाऱ्यांना सत्य परिस्थिती काय आहे, हे जाणून घेण्यासाठी आदेश दिला. तद्वतच माझ्या काही मित्रांना आणि माझ्या काही बैठकीतल्या घनिष्ट व्यक्तींना त्यामागे काय हेतू आहे हे जाणून घेऊन मला त्वरित माहिती पुरविण्याविषयी सुचविले. सर्वच जण आपआपल्या पद्धतीने कामाला लागले आणि अधिकारी, मित्र व संबंधितांनी पुरविलेल्या माहितीच्या अवलोकनाच्या प्रकाशात जे चित्र दिसले ते धक्कादायक होते. प्रत्यक्षात ही शेतकऱ्यांची दिंडी नव्हतीच! एकही गरीब शेतकरी या दिंडीत नव्हता. जे लोक होते ते म्हणजे विरोधी पक्षाचे नेते आणि माझे हितशत्रू! आता त्यांचा उद्देश माझ्या पुरेपूर लक्षात आला होता. कसेही करून शेतकऱ्यांच्या नावाखाली दिंडी हे धार्मिक नाव समोर ठेवून, नागपूरला सुरू असलेल्या अधिवेशनाच्या कामकाजात व्यत्यय निर्माण करायचा, गोंधळ माजवायचा, स्वतःला अटक करून घ्यायची, पोलिसांना लाठीमार, अश्रुधूर व प्रसंगी गोळीबार करण्यास पाडायचे आणि मला या घटनेतून जास्तीतजास्त बदनाम करायचे! किंबहुना महाराष्ट्र ए. आर. अंतुले यांना मुख्यमंत्री म्हणून खपवून घेऊ शकत नाही असे कृत्रिम चित्र तयार करण्यासाठी हा सारा खटाटोप, खरे म्हणजे साऱ्या राज्यातील अखंड गरीब जनता माझ्यावर अमाप प्रेम करत असताना, मूठभर राजकारणी लोकांना ए. आर. अंतुले हा माणूस मुख्यमंत्र्यांच्या आसनावर नको होता. मला जास्तीतजास्त बदनाम करून अराजक माजवून पदच्युत करण्याचाच त्यांचा राजकीय डाव होता आणि त्याकरताच त्यांनी हे घृणास्पद कुटिल कारस्थान माझ्याविरुद्ध रचले होते. पण वेळीच मी सावध झालो. खरे म्हणजे या प्रकारांनी मी स्तंभितच झालो होतो. पण तरीही मी अगदी शांतचित्ताने परिस्थितीकडे पाहत होतो. पण लगेचच मला पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्फत दिंडी अमरावतीला आलेली आहे आणि कायदा, सुव्यवस्था आणि शांततेच्या दृष्टीने विचार करून ती अमरावतीलाच रोखण्यात आल्याचे आणि श्री. यशवंतराव चव्हाण व इतर काही राजकीय नेत्यांना अटक करण्यात आल्याचे कळले. दिंडीचे लोक-जे शेतकरी -प्रामुख्याने गरीब गरजू, शेतकरी व शेतमजूर नव्हतेच त्यांनी पळ काढला. दिंडीच्या नेत्यांनी महाराष्ट्र बंद पुकारला. परंतु पानपट्टीचे दुकान सुद्धा बंद नव्हते. साऱ्या राज्यामध्ये कुठेही एक तासासाठीही बंद झाला नव्हता. कारण गरीब शेतकरी माझे बाजूने होते व त्यांची सहानुभूती दिंडीच्या बाजूने नसून कर्ज-मुक्तीमुळे ती माझ्या बाजूने वाहत होती. अशाप्रकारे मला एक प्रकारे दिंडीच्या धक्क्यांनी आसनावरून हटवण्याचे प्रयत्न फोल ठरले. कारण परिस्थितीचे भविष्यात निर्माण होऊ शकणारे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी घेतलेल्या रास्त निर्णयाच्या आड यायचे नाही असे मी ठरवले. माझी बदनामी होईल किंवा माझे मुख्यमंत्रीपद जाईल या भीतीने नव्हे, कारण ही भीती मनाला शिवलीसुद्धा नाही व कुठल्याही दबावाखाली काम करायचे नाही हा माझा स्वभाव असल्यामुळे असल्या कोणत्याही परिस्थितीत राजीनामा देण्याची माझी मानसिक तयारी होती, पण अशा प्रसंगी निरपराधच लोक निष्कारण मारले जातात ह्या सत्य परिस्थितीच्या जाणिवेनेच मी या प्रकरणात गप्प बसलो. पण आपल्याच अमरावतीला हा प्रकार घडावा ही बाब श्री. गवईंना मात्र आवडली नाही. त्यांनी ही गोष्ट मनाला इतकी लावून घेतली की, त्याची परिणती म्हणजे बी.ए.सी. च्या मीटिंगमध्ये त्यांनी माझ्याशी बोलणे कटाक्षाने टाळले आणि नंतर आम्ही बरोबर असतानासुद्धा एक शब्दही ते माझ्याशी बोलले नाहीत. नेहमी मनसोक्त गप्पा मारण्याची सवय असल्याने ती गोष्ट मला चांगलीच खटकली. त्या वेळी ते काहीच बोलले नाहीत त्यामुळे मी पण गप्पच राहिलो. पण त्यानंतर मी त्यांना स्वतःहून त्यांच्या चेंबरमध्ये भेटलो व त्यांना त्या वेळी निर्माण झालेल्या सत्य परिस्थितीची माहिती,

माझ्याजवळ असलेले रिपोर्ट्स व पुराव्याच्या आधारे पटवून दिली. त्यांनाही वस्तुस्थिती कळल्यावर माझे म्हणणे पटले. वास्तविक पाहता आमच्या दोघांमध्ये गैरसमज असा नव्हताच, होता तो दोघांचाही आपआपला समज. परत आमचे संबंध पूर्वीप्रमाणेच स्नेहाचे झाले. पण या प्रसंगातून सहनशीलता असूनही मनाविरुद्ध घडलेली कुठलीही गोष्ट केवळ भावनेच्या आहारी जाऊन ते खपवून घेऊ शकत नाहीत या त्यांच्या गुणविशेषाचा परिचय झाला.

श्री. गवईंना राजकारणातील काही स्वार्थी, कुचेष्टित लोक आपल्या स्वार्थापोटी जातीयवादी म्हणतात. त्यांचे हे म्हणणे अगदीच बिनबुडाचे आहे. उलट मी तर असे म्हणतो की, त्यांच्या समाजाचा म्हणजे दलितांचा इतका छळ आपण केलेला आहे आणि त्यांच्या उद्धारासाठी जितक्या तळमळीने श्री. गवई आपले आयुष्य खर्ची घालताहेत की ते पाहून तर श्री. गवई जातीयवादी असायलाच हवे होते. ते का नाहीत ह्याचेच मला आश्चर्य वाटते. त्यांनी जर हे कार्य केले नसते तर मग कुणी केले असते. तुम्ही की मी? खरं म्हणजे श्री. गवईंनी केलेले कार्य लक्षात घेता आपण त्यांना सहकार्यच करायला हवे. ते न करता त्यांना केवळ स्वार्थ साधण्यासाठी जातीयवादी म्हणणे हे म्हणणाऱ्यालाच लांच्छन आहे असे मी समजतो.

आणखी एक प्रसंग मला सांगावासा वाटतो, मी मुख्यमंत्री असताना दिल्लीतील पक्षश्रेष्ठींच्या भाटांनी मला एक प्रश्न विचारला होता. तो म्हणजे आपले संपूर्ण बहुमत असताना, ज्या पक्षाचा एकही सदस्य सभागृहात नाही, त्या पक्षाचे श्री. गवई हे सभापती कसे? त्यावेळी मी जे उत्तर दिले ते सांगतो. मी म्हणालो, जोपर्यंत कार्यक्षमतेचा प्रश्न आहे तेथे श्री. गवई कुठेही उणे पडलेले नाहीत. सभागृहाच्या नीतिनियमांचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला आहे आणि नियमांच्या चाकोरीतूनच ते न्याय देतात. सर्वांनाच ते सांभाळून घेतात आणि त्यांच्याविषयी कुणाचीच तक्रार नाही. तेव्हा कार्यक्षमतेचा मुद्दा अवाजवी आहे. दुसरे असे की, सभापती म्हणून निवडून देण्यात आपण जी त्यांना मदत केली ती म्हणजे त्यांच्यावर काही उपकार केले अशातला भाग नाही. उलट वर्षानुवर्षे आणि पिढ्यान् पिढ्या त्यांच्या दलित समाजावर आपण जे अन्याय, अत्याचार केले, यातना दिल्या त्या पापाचे परिमार्जन थोडेसे का होईना पण करण्यासाठी त्यांना प्रतिष्ठेचे स्थान देणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे आणि ह्या कर्तव्यात जर आपण चुकलो तर दुसऱ्याचे तर सोडाच पण आपणही स्वतःला क्षमा करू शकणार नाही. माझ्या उत्तराने भाटांचे समाधान झाले किंवा नाही हे सांगणे जरा धाडसाचे होईल पण हे मात्र खरं की हा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला नाही. ते आपल्या जागेवरच राहिले.

श्री. गवईंच्या अंगी असलेल्या ह्या सर्व गुणांमुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक व लोभस बनलेले आहे. त्यांची उप सभापती व नंतर सभापती ह्या नात्याने यशस्वी कारकीर्द ही त्यांच्या ह्या व्यक्तिमत्त्वाचाच परिपाक आहे.

श्री. गवई नुकतेच खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो आणि समाजसेवेचे त्यांनी बांधलेले कंकण अखंड राहण्यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्य योग्य लाभो व आपल्या गुणविशेषांनी ते लोकसभेतही यशस्वी होवोत ह्याच माझ्या शुभेच्छा।

-माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

❑❑

एचबी ११८०—१५

अचूक अंदाज

▪ दत्ताजी ताम्हाणे

श्री. रा. सू. गवईंशी साधारणतः १९६४ मध्ये झालेल्या परिचयातून मैत्री आणि घनिष्टता यातूनच त्यांचे माझे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झालेले आहेत. कधीच न दुभंगणारे असे हे आमचे संबंध जन्मभर टिकणारे आहेत. त्यांच्याविषयी एकाच वाक्यात बोलायचे झाले तर एक हसतमुख प्रसन्न व्यक्तिमत्त्व असेच म्हणता येईल. गंभीरपणे बोलताना मी त्यांना कधीच बघितले नाही. कितीही मानसिक ताणाचा दबाव जरी त्यांच्यावर पडलेला असेल तरीही त्याची कुठलीच खूणही त्यांच्या चेहऱ्यावर कधी उमटत नाही. विनोदाने गप्पा मारण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्याजवळ चुटकुल्यांचा भरपूर साठा आहे. आजीबाईंच्या बटव्यातून निघाल्यागत एक एक चुटकुला बाहेर काढून सर्वांना हसत ठेवण्याची कला त्यांना चांगलीच अवगत आहे. स्वतः हसत राहून इतरांनाही हसत ठेवण्याचे त्यांचे कसब खरोखर अविस्मरणीय आहे. कधी कधी ते थोडे चावटही बोलत पण त्यात कधी विकृत अश्लीलता मात्र भासली नाही. दुपारचा चहा त्यांच्याबरोबर घेऊन त्यांच्याशी गप्पा मारणे म्हणजे कामाच्या ताणामुळे आलेला मानसिक थकवा दूर करण्याचे एक औषध आहे असाच माझा अनुभव होता. तसेच आपल्या मताशी स्थिर राहून समोरच्या व्यक्तीच्या भावना न दुखवता आपले मत त्याला पटवून देण्याची किमया पण त्यांना चांगली अवगत आहे. मला वाटते त्यांच्या यशस्वितेचे रहस्यही त्यांच्या या गुणातच दडलेले आहे. कुठल्याही व्यक्तिभेदाचे किंवा पक्षभेदाचे बंधन न पाळता सदैव सर्वांना सहकार्य आणि मदत करण्याची सवय असलेल्या माझ्या या मित्राला अजातशत्रू म्हणणे वावगे ठरणार नाही.

श्री. गवईंच्या अंगी असलेली सूक्ष्म अवलोकनाची क्षमता, अभ्यासूवृत्ती आणि न्यायप्रियतेमुळे सत्याच्या अगदी मुळाशी जाण्यासाठी श्रम करण्याची मनाची तयारी या त्यांच्या गुणांचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. कारण ते मला प्रकर्षाने जाणवले आहेत आणि त्याचा अनुभवही मी घेतलेला आहे. त्यासाठी त्यांच्या उप सभापती व सभापती असतानाच्या काळाचा मी थोडक्यात आढावा घेतो. श्री. गवईंनी सभागृहाच्या कार्यपद्धतीचा आणि नीतिनियमांचा इतका सूक्ष्मपणे अभ्यास केलेला होता. इतके ते त्यात पारंगत झालेले होते की कोणत्याही सदस्याने हरकतीचा मुद्दा जर उपस्थित केला आणि तो मुद्दा कितीही क्लिष्ट असला तरीही त्यावर निर्णय घेताना त्यांना सचिवाच्या साहाय्याची कधी गरज भासली नाही. त्यांच्या निर्णयाला आव्हान देणे शक्य होत नसे. हरकतीच्या मुद्यावर त्यांनी दिलेले निर्णय पुढील पिढ्यांतील अध्यक्षांना न्यायप्रविष्टेमुळे मार्गदर्शक ठरणारेच आहेत. त्यांची न्यायप्रियता किती असीमित होती त्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे त्यांच्या कार्यकाळात त्यांनी निर्माण केलेली एक सत्यशोधन समिती. एक चौकशी समिती असेच या समितीचे एक रूप होते. आणि या समिती स्थापनेमधील मूळ कल्पना अशी होती की सभागृहात आपण जो कुठल्याही घटनेबाबत निर्णय घेतो वा न्याय देतो ते सर्व सरकारने दिलेल्या माहितीवरच अवलंबून असते. सरकारने पुरविलेली माहिती हाच आपला आधार असतो आणि तेच आपण सत्य मानतो म्हणजे अप्रत्यक्षपणे सरकारच्या मताशीच आपण संलग्न असतो. खरी परिस्थिती काय आहे हे आपल्याला कधीच कळतच नाही. त्यापेक्षा जर का आपण आपल्या पातळीवरून चौकशी करून निर्णय घेतला तर तो न्यायाच्या दृष्टीने अधिक प्रभावी होईल.

त्यासाठी श्री. गवईंनी सत्तारूढ व विरोधी पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. त्यांना आपली ही कल्पना समजावून दिली. त्यांची ही कल्पना इतकी योग्य होती की ती आम्हां सर्वांनाच पसंत पडली आणि त्यानुसार एक समिती स्थापन झाली. त्यात समाजवादी पक्षातर्फे मी, काँग्रेसचे श्री. नरूभाऊ लिमये, शे.का.प. चे श्री. केशवराव धोंडगे व श्री. प्रमोद नवलकर आणखी एक-दोन सदस्य होते आणि त्याचे अध्यक्ष होते स्वत: गवई. अर्थात या समितीला कुठलीही शासनाची मान्यता जरी नव्हती तरी सभागृहातील सर्व सदस्यांची मात्र मान्यता होती. आमच्या ह्या समितीने जे प्रमुख निर्णय घेतले होते त्यापैकी काही घटनांचा उल्लेख करतो. त्यातील एक घटना म्हणजे कै. दत्ता सामंतांनी विक्रोळी भागात कामगारांच्या मागण्यांसाठी जी चळवळ सुरू केली होती त्यात एका पोलीस इन्स्पेक्टरचा मृत्यू झालेला होता. त्यावर शासनाने सारवासारव करून जी माहिती सभागृहाला दिली त्यावरून निष्कर्ष काढणे कठीण होते. तेव्हा आम्ही सर्व सदस्यांनी घटनास्थळाला प्रत्यक्ष भेट दिली आणि चौकशीअंती आम्हाला असे आढळून आले की, डॉ. दत्ता सामंतांची कार्यपद्धतीच या मृत्यूला कारणीभूत होती. दुसरी घटना म्हणजे श्री. अंतुलेंच्या बाबतीत, त्यांच्या गाडीत स्मगलिंगचा माल असेल ह्या कल्पनेने वडखळ नाक्यावर कस्टम अधिकाऱ्यांनी त्यांची गाडी अडवली होती. त्यावर श्री. अंतुलेंनी आपण निर्दोष असल्याचे स्पष्टीकरणही सभागृहाला दिलेले होते. पण विरोधी पक्षांचे समाधान न झाल्याने त्यांनी सभागृहात बराच गोंधळ माजवला. तेव्हा आमच्या या समितीद्वारा चौकशी करण्याचे आम्ही ठरवले, पण त्याआधी मी व श्री. गवईंनी, श्री. अंतुलेंना त्यावेळचे मुख्यमंत्री कै. श्री. वसंतराव नाईक ह्यांच्या समक्ष उभे केले आणि आम्ही चौकशीअंती जो निर्णय घेऊ तो श्री. अंतुलेंना मान्य होईल का याची खात्री करून घेतली. त्यावेळी "जर मी दोषी ठरलो तर मंत्रिपदाचा राजीनामा देईन." असे श्री. अंतुलेंनी कबूल केले. मी व श्री. गवईंनी ह्या प्रकरणाचा खूप पाठपुरावा केला. घटना कुठे आणि कशी घडली ह्यापासून तर श्री. अंतुलेंच्या वैयक्तिक जीवनातील माहिती पण आम्ही गोळा केली. त्याकरिता आम्ही कित्येक ठिकाणी गेलो आणि अनेकांना भेटलो. सर्व बाजूंनी चौकशी केल्यानंतर आमच्या हे निदर्शनास आले की, श्री. अंतुले हे निर्दोष आहेत. ह्या घटनेशी त्यांचा सुतराम संबंध नाही. आमचा हा निर्णय आम्ही सभागृहास दिला. अर्थात काहींना तो आवडला नाही पण खरी परिस्थितीच आम्ही सांगितली होती. तिसरी घटना म्हणजे सातारा जिल्ह्यात शे.का.प. च्या सभास्थानी पोलिसांना करावा लागलेला गोळीबार. शासनाने गोळीबाराचे समर्थन केलेले होते. आम्ही जी चौकशी केली त्यातून त्या सभेत इतकी प्रक्षोभक भाषणे झाली की पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला नसता तर परिस्थिती आवाक्याबाहेर गेली असती व अप्रिय घटना घडल्या असत्या. त्यामुळे पोलिसांनी गोळीबाराचा घेतलेला निर्णय रास्तच होता. पण आमचा हा निर्णय शासनाला देणे अडचणीचेच होते. पण त्याच वेळी शासनानेच न्यायालयीन चौकशीची घोषणा केली आणि आमच्या अडचणीतून आमची सुटका झाली. श्री. गवईंच्या न्यायप्रियतेमुळे आणि कुठलाही आपपरभाव न ठेवता सर्वांना सांभाळून घेण्याच्या त्यांच्या गुणामुळे त्यांची कारकीर्द निष्कलंक झाली आहे.

श्री. गवई आपल्या दलित बांधवांच्या उद्धारासाठी व त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी अहोरात्र झटले आहेत. डॉ. बाबासाहेबांनी जे बीज रोवले होते त्याला मूर्त स्वरूप देऊन त्याचे एका विशाल वृक्षात रूपांतर करण्याची फार मोठी कामगिरी श्री. गवईंनी केली असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. आज या वृक्षाच्या छायेतच त्यांचे दलित बांधव मानवी हक्क मिळाल्याचे समाधान अनुभवीत आहेत.

श्री. गवईंच्या मध्ये नैतिकतेबरोबरच सामाजिक बांधलकीची जाणीवदेखील प्रकर्षाने जाणवते. अचूक निदान करण्याची त्यांची क्षमता वाखाणण्याजोगी आहे. केवळ

एचबी ११८०—१५अ

राजकीय जीवनातच नव्हे, तर इतर प्रसंगीही ते किती अचूक निदान करतात ह्याचे एक मजेदार उदाहरण देतो. एकदा आमचे एक शिष्टमंडळ-ज्यात मी, श्री. गवई, श्री. प्रमोद नवलकर, श्री. कृष्णराव धुळप व एक समाजवादी खासदार होते; दिल्लीला कै. श्रीमती इंदिरा गांधींना भेटावयास गेलो होतो. खासदारांची व्यवस्था ते खासदार असल्याने अलग झालेली होती आणि आम्ही महाराष्ट्र सदनात उतरलो होतो. खासदार साहेबांचा फोन आला की, भेटीची वेळ ४ वाजताची ठरली आहे तेव्हा तुम्ही सर्वजण माझ्याकडे या. चहा घेऊन निघायचे. मी हा निरोप श्री. गवईंना सांगितला. त्या वेळी तर ते काही बोलले नाहीत पण जेव्हा आम्ही जायला निघालो तेव्हा श्री. गवई म्हणाले की, "आपण असे करू की, एखाद्या हॉटेलमध्ये प्रथम चहा घेऊ व नंतर खासदार साहेबांकडे जाऊ." मी त्यावर गवईंना म्हणालो की, अहो ते चहाबद्दल बोलले आहेत तिथेच घेऊ. श्री. गवई लगेच म्हणाले, "अहो चहा घेऊन हे खासदार साहेबांसाठी आहे आणि आपल्याला फक्त निघायचे आहे." माझा विश्वास बसेना. श्री. गवईंच्या इच्छेप्रमाणे आम्ही एका हॉटेलात चहा घेतला आणि त्यांच्याकडे गेलो. ते आतल्या खोलीत होते आणि आम्ही बाहेरच्या खोलीत बसलो होतो. थोड्या वेळाने आम्हाला कपबशांचा आवाज ऐकायला आला. आता चहा येणार या अपेक्षेने मी मुद्दाम श्री. गवईंच्याकडे सहेतुक पाहिले. त्यावर त्यांनी हातानेच मला चूप बसण्याची खूण केली. थोड्या वेळातच ते बाहेर आले आणि आल्याआल्याच म्हणाले की, हं निघायचं. आम्ही निमूटपणे त्यांच्याबरोबर निघालो. श्री. गवईंचा अंदाज अचूक होता. श्री. खासदार साहेब आतून चहा घेऊन आलेले होते आणि आम्हाला फक्त निघायचे होते. श्री. गवईंनी त्यावेळी हळूच माझ्या हाताला चिमटा घेतला.

श्री. गवईंनी खासदार होऊन लोकसभेत जावे अशी फार पूर्वीपासून माझी इच्छा होती. त्यांच्या कार्याला विशाल क्षेत्र मिळावे व त्यांच्या अंगी असलेल्या अष्टपैलू गुणांना वाव मिळावा हीच त्यामागची भावना होती. पण इतक्या वर्षांची इच्छा या वर्षी फलद्रूप झाली. ते निवडून आल्याचे कळताच मला मनस्वी आनंद झाला. त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

-माजी ज्येष्ठ विधानपरिषद सदस्य व माजी ज्येष्ठ समाजवादी नेते.

❑❑

खंबीर भूमिका

दादासाहेब गवईंचा माझा परिचय झाला तो दादासाहेब गायकवाडांचे पट्टशिष्य आणि बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या लढ्यातील बिनीचे शिलेदार म्हणून परंतु मला एक जाणवले की गवई साहेबांचा लढा केवळ उपेक्षित समाजापुरता मर्यादित राहिला नाही. गोवा-मुक्ती संग्रामात कारावास भोगणाऱ्यांपैकी ते एक होते, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात ते सक्रिय होते. आपल्या गुरूंच्या पश्चात विधिमंडळ सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. नामांतराची चळवळ, नवबौद्धांवरील अन्याय्य धोरणांचा निषेध, वटलेल्या पुनर्मूल्यांकनाच्या विरोधातील आंदोलन या प्रसंगात श्री. दादासाहेब गवई ठाम भूमिका घेऊन उभे राहिलेत. जनजागरण मोर्चे, उपोषण, सत्याग्रह असे मार्ग त्यांनी प्रभावीपणे चोखाळले. प्रसंगी काही खंबीर भूमिका घेण्यास एखादे पद आडवे येत असेल तर, अगदी विधानपरिषदेचे उपाध्यक्षपद सोडण्याचीही तयारी त्यांनी दर्शविली. स्वतःमधील कार्यकर्ता त्यांनी सतत जागृत ठेवला.

-मधुकरराव चौधरी
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

अडचणीच्या वेळी मदतीला धावणारा मित्र

▪ कॉ. ए. बी. बर्धन

"A friend in need is a friend indeed" या इंग्रजीतल्या म्हणीला प्रत्यक्ष कृतीत उतरवणारे प्रगतिशील व धर्मनिरपेक्ष विचारांचे श्री. रा. सू. गवई माझे परममित्र आहेत. गेल्या चाळीस वर्षांपासूनची आमची ओळख आहे आणि जेव्हापासून आमची ओळख झाली तेव्हापासून आजपर्यंत ती अबाधितच आहे. ते, मी, श्री. सुदाम देशमुख व श्री. राजाभाऊ खोब्रागडे त्या काळात काँग्रेस विरोधी पक्षाचे नेतृत्व करीत होतो. श्री. गवईंनी त्याकाळी वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांत अक्षरशः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रज्वलित केले आहेत. गावोगावी जाऊन आणि जवळजवळ रात्रभर सभा घेऊन त्यांनी रिपब्लिकन पक्षाचा पाया घातला. मला आठवते की, त्याच काळात भूमिहीन शेतमजुरांना जमीन वाटण्याचा प्रमुख मुद्दा घेऊन आम्ही एकदा पदयात्रा काढली होती आणि अचलपूरपासून नागपूरपर्यंत हजारो पदयात्रींचे नेतृत्व करून श्री. गवई व श्री. सुदाम देशमुख निळा आणि लाल बावटा घेऊन नागपुरात पोहोचले. तिथेही हजारो माणसांचा सहभाग त्यात झाला आणि एक प्रचंड निदर्शन आर.पी.आय. आणि सी.पी.आय. पक्षातर्फे त्यांनी घडवून आणले. त्यांच्यातील संघटन आणि नेतृत्व कौशल्याची प्रचिती मला त्याचवेळी झाली. डॉ. बाबासाहेबांच्या उपस्थितीत धम्मचक्र प्रवर्तनाचा कार्यक्रम नागपुरात दीक्षाभूमीवर झाल्यानंतर बौद्ध धर्माचा प्रचार आणि धर्मांतराचा कार्यक्रम श्री. गवई व त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सहकाऱ्यांनी सांभाळला. साहजिकच नंतर ते दीक्षाभूमी समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. नागपुरात दीक्षाभूमीवर जी एक प्रचंड व भव्य स्मारकाची निर्मिती झालेली आहे त्याचे श्रेय श्री. गवईंना द्यावे लागेल. प्रत्येक चांगल्या कामात अडथळे नेहमीच येतात. ह्या कामातदेखील अनेक आरोप करण्यात आले होते, पण आपले मनोधैर्य खचू न देता उलट ते वाढवून श्री. गवईंनी हे काम पूर्ण केले. त्यासाठी खरोखरच मी मनापासून त्यांचे अभिनंदन करतो.

राजकारणात चढउतार अनेक झाले. सी.पी.आय. व आर.पी.आय. या दोन पक्षांच्या संबंधात अनेक स्थित्यंतरे आली. परंतु श्री. गवईंची व माझी राजकीय मैत्री आणि वैयक्तिक स्नेह कधीच कमी झाला नाही. श्री. सुदाम काका जेव्हा लोकसभेत निवडून आले तेव्हा त्यांचा प्रचार आणि आर्थिक मदत या दोन्ही कार्यात श्री. गवईंचा सिंहाचा वाटा आहे. दुसऱ्यांदा जेव्हा श्री. सुदाम काका उभे राहिले त्यावेळी सुद्धा श्री. गवईंनी या दोनही बाजूंचा बोजा सांभाळला होता. पण दुर्दैवाने दुसऱ्यांदा श्री. सुदाम काकांना यश आले नाही. डाव्या पक्षाबद्दल देखील श्री. गवईंना फार आदर आहे. पण आर.पी.आय. आणि डाव्या पक्षाचा सहयोग अथवा मोर्चा निर्माण करण्याच्या कार्यात फक्त त्यांचाच विचार प्रभावी नसतो. त्यांच्या पक्षातील अन्य नेत्यांचेही त्यांना ऐकून घ्यावे लागते. त्यामुळे अनेक प्रसंग असेही आले जेव्हा आम्ही जवळ असूनसुद्धा निवडणुकीत किंवा चळवळीत एकमेकांबरोबर मोर्चा बांधून काम करू शकलो नाही. १९९६ मध्ये श्री. गवई पहिल्यांदा अमरावतीहून मोर्चातर्फे लोकसभेत उमेदवार म्हणून उभे होते. त्यांच्या आग्रहास्तव त्यांच्या प्रचार मोहिमेचा शुभारंभ व समापन ही दोन्ही कार्ये प्रचंड जनसंख्येत मलाच करावी लागली. आमच्या मैत्रीचे हे एक द्योतकच आहे.

श्री. गवई अनेक वर्षे विधानपरिषदेचे पीठासीन अधिकारी म्हणून कार्य करीत होते. त्या काळात त्याचे निःपक्षपाती आचरण आणि संसदीय ज्ञान ह्यामुळे सर्व पक्षांवर त्यांचा प्रभाव राहिला. ते या वेळी संसदेत निवडून आलेले आहेत.

आणि माझा विश्वास आहे की, एक संसदपटू या नात्याने ते चांगलेच काम करतील. श्री. गवई शिक्षणाच्या क्षेत्रात सुद्धा सतत सक्रिय राहिलेले आहेत. नागपूर व अमरावती या दोन्ही ठिकाणी कॉलेज व शाळांशी त्यांचे निकटचे संबंध आहेत. असा हा सर्वपैलू आणि गुणी अध्यक्ष आर.पी.आय. ला लाभल्यामुळेच दलित समाज आणि शोषित समाज ह्यांना पूर्णपणे लाभ होणार यात मला शंका नाही. निळा आणि लाल बावटा यांनी एकमेकांच्या साह्याने पुढे वाटचाल केली पाहिजे आणि श्री. गवईचा हातभार लागल्याने ते होणार याचा मला ठाम विश्वास आहे.

-माजी सरचिटणीस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष.

❑❑

मी जवळून पाहिलेले दादा

महीमापूर येथे एक अष्टमुखी ऐतिहासिक विहीर आहे. त्या विहिरीला अथांग पाणी असते. पाण्याची तीव्र टंचाई भासत असूनही त्या विहिरीचे पाणी भरण्यास आम्हा अस्पृशांना मज्जाव होता. या विहिरीचे पाणी आम्हालाही मिळू देण्यासाठी श्री. दादासाहेबांनी सत्याग्रह केला. त्यांच्या सत्याग्रहानेच ती विहीर आम्हा सर्वांसाठी खुली झाली. भामोद येथे श्री. नानासाहेब देशमुखांनी बांध टाकून नदीचे पाणी अडविले होते. त्यामुळे गावात पाण्याची अतिशय टंचाई निर्माण झाली होती. आणि हाहाःकार माजला होता. त्यावेळी श्री. दादासाहेबांनी स्वतः त्या नदीवर जाऊन तो बांध तोडला आणि गावातील लोकांची पाण्याची अडचण दूर केली. याप्रसंगी मी पण हजर होतो. शहीद यावली मावली येथे दंगल झाली. त्या दंगलीत आमच्या समाजाचा काय दोष होता हे तर सर्वच जाणतात. त्यामुळे त्याचा ऊहापोह मी इथे करीत नाही. पण या दंगलीत आमच्या समाजातील बऱ्याच लोकांना अटक करण्यात आली होती. त्यावेळी श्री. दादासाहेब टायफाईडने आजारी होते. पण डॉक्टरांनी मनाई केली असतानासुद्धा आपल्या तब्येतीची पर्वा न करता अटक झालेल्यांना जमानतीवर सोडण्यासाठी हिरिरीने प्रयत्न केले आणि त्यांना सोडविले. आमच्या समाजाच्या कल्याणासाठी कार्य करीत असतानाच गोवा मुक्ती आंदोलन आणि त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय भाग घेऊन अखेरपर्यंत जिवाची पर्वा न करता लढत देऊन त्यासाठी प्रसंगी पोलिसांचा अत्याचारही सहन करून कार्यसिद्धी होईपर्यंत ते स्वस्थ बसले नाहीत.

-दे. झा. वाकपांजर
दादासाहेबांचे सहकारी,
अमरावती.

मनाचे औदार्य

▪ ग. प्र. प्रधान

श्री. रा. सू. गवई म्हणजे उदार अंत:करणाचे एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व. १९६६ मध्ये पदवीधर मतदारसंघातून मी विधानपरिषदेत सदस्य म्हणून निवडून आलो. त्यावेळी विधानपरिषदेचे सदस्य असलेले माझे समाजवादी मित्र श्री. बा. ना. राजहंस आणि श्री. गवई मित्र होते. त्यांच्यामुळेच श्री. गवईंचा आणि माझा परिचय झाला. आणि पुढे हाच परिचय वाढीस लागून त्यांच्या मुलांच्या लग्नकार्यात उपस्थित राहण्यापर्यंत आमच्यात घरोबा निर्माण झाला. आज मी उतारवयात वार्धक्यावस्थेत आहे. पण आमची मैत्री मात्र आजही चिरतरुणच आहे. या प्रचंड कालखंडात मला त्यांच्यात कंजूषपणा किंवा मनाचा क्षुद्रपणा कधीच आढळला नाही. जाणवले ते औदार्यच. कित्येक गरीब विद्यार्थ्यांना आणि गरीब कार्यकर्त्यांना त्यांनी सढळ हाताने मदत केलेली आहे. मी स्वत: तीन विद्यार्थ्यांना मदतीच्या अपेक्षेने त्यांच्याकडे पाठविले होते. ते सुद्धा त्यांच्याकडून रिक्तहस्ताने परत आले नाहीत, आले ते मदत घेऊनच. आपल्याजवळ जे काही आहे ते समाजाकडूनच आपल्याला मिळाले आहे आणि ते आपल्याला समाजालाच परत करावयाचे आहे हीच त्यांची भावना असावी.

१९६६ ते १९८४ पर्यंत मी विधानपरिषदेचा सदस्य होतो. त्याच कालखंडात श्री. गवईदेखील विधानपरिषदेत होते. १९६८ मध्ये ते उप सभापती व १९७८ मध्ये ते सभापती झाले. १८ वर्षे आम्ही दोघेही विधानपरिषदेत एकत्र होतो. त्यांच्या उप सभापती आणि सभापतीपदाच्या कार्यकालात मला त्यांच्या अंगी असलेल्या निर्भयता, चातुर्य, चाणाक्षपणा, प्रसंगावधान, कार्यकौशल्य, न्यायप्रियता आणि अभ्यासूवृत्तीमुळे मिळवलेले सभागृहांच्या नियमांचे म्हणजे प्रोसिजरचे आणि कायद्याचे सखोल ज्ञान या विविध गुणांचा परिचय झाला. पुष्कळदा असे व्हायचे की, मंत्री किंवा मुख्यमंत्री इतका आक्रमक पवित्रा घ्यायचे, नियमाची चाकोरी उल्लंघन करून आपला दबदबा निर्माण करायचे की, काही सभापतीदेखील विरुद्ध निर्णय घ्यायला बिचकायचे. पण श्री. गवई मात्र कधीच घाबरले नाहीत. आपल्या पदाचे काय होईल, असा स्वार्थी विचार न करता आपल्या न्यायबुद्धीचा आधार घेऊन आणि कायद्यांचे काटेकोरपणे पालन करूनच त्यांनी निर्भयपणे निर्णय दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर आक्रमक भूमिका घेणाऱ्यांना स्पष्टपणे समज देऊन आक्रमकता सोडण्यास आणि नियमाच्या चाकोरीतून वागण्या-बोलण्यास लावले आहे. कायद्यांचे सूक्ष्म ज्ञान असल्यानेच विशेषत: विधेयकांच्या चर्चेच्या वेळी त्यातील बारकावे लागलीच श्री. गवई यांच्या लक्षात येत असत. कित्येकदा सभागृहात पेचप्रसंग निर्माण व्हायचे. अशा वेळी प्रसंगावधानाने ते त्यातून मार्ग काढायचे. श्री. तिडके, मी व श्री. गवई एकत्र बसून अशा वेळी मार्ग काढण्यासाठी चर्चा करावयाचो, मार्ग तर निघायचा पण श्री. गवईंचे चातुर्यही लक्षात यायचे.

श्री. गवईंची जनतेविषयीची कळकळ खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. या कळकळीपोटीच पिटीशन कमिटीमध्ये त्यांनी उपेक्षितांच्या बाजूचा जोरदार पाठपुरावा केला. दुष्काळामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, गरिबांचा प्रश्न, रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार किंवा अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालुक्यातील आदिवासी यावर चर्चा असेल तर ते सरळ आपले आसन सोडून विरोधी पक्षांच्या बाजूकडील जागेवर बसून पोटतिडकीने आणि कणखरपणे आपली बाजू मांडावयाचे आणि अन्यायाला व भ्रष्टाचाराला वाचा फोडायचे. अशा वेळी त्यांनी कुणाचीच गय केलेली

नाही. आपले पद ते विसरून जायचे आणि नेहमी म्हणायचे की, मी या सभागृहाचा एक सदस्य या नात्याने मला बोलण्याचा आणि आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे आणि तो हक्क कदापि गमविणार नाही. आपली बाजू मांडून मगच ते आपल्या आसनावर बसावयाचे. त्यांच्या आवेशपूर्ण भाषणातून त्यांच्या जनतेविषयीच्या कळकळीबरोबरच त्यांचा वक्तृत्वगुणही दृष्टोत्पत्तीस येत असे. वरील सर्व गुणांच्या जोडीलाच सदनाला कसे हाताळावे याचे त्यांना साध्य झालेले कौशल्य व सर्वांना एकत्र घेऊन चालण्याच्या वृत्तीमुळेच त्यांचा कार्यकाल यशस्वी ठरलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या शिकवणुकीचे पालन करीत काम करावयाचे ही श्री. गवई यांची भूमिका आहे. नागपूर अधिवेशनाच्या वेळी डॉ. बाबासाहेबांच्या आणि महात्मा फुलेंच्या जयंतीच्या कार्यक्रमाला श्री. गवई आम्हाला बोलवावयाचे. त्या वेळी त्यांचा लोकसंग्रह किती मोठा आहे हे माझ्या प्रत्ययास यावयाचे. श्री. गवई हे फार वास्तववादी आहेत. मी नेहमी त्यांना म्हणायचो की, तुम्ही तीव्र विरोधकांची भूमिका का घेत नाही, त्यावर ते म्हणायचे तीव्र विरोध करण्यासाठी जन-आंदोलनही तीव्र करणे आवश्यक आहे. पण आम्ही ते करू शकत नाही. तेव्हा गावाकडच्या गरीब मनुष्याला संरक्षण देण्यासाठी अधिकारारूढ पक्षांशी एका मर्यादेपलीकडे वैर करणे सध्या तरी आम्हाला परवडण्यासारखे नाही. त्यांचे हे म्हणणे कटू असले तरी सत्य होते. दोन गोष्टी मात्र मला निक्षून सांगाव्याशा वाटतात. त्या म्हणजे आजपर्यंत जो श्री. गवईशी माझा संबंध आला त्यातून ते जातिभेद करताना मला कधीच दिसले नाहीत. माझ्या दृष्टिकोनातून ते जातीयवादी तर नाहीतच पण समानतावादी जरूर आहेत. आणि दुसरी म्हणजे त्यांच्या सर्वांगीण यशात अर्धांगिनी या नात्याने सौ. कमलताईंचा सिंहाचा वाटा आहे. श्री. गवई खासदार झाल्याचे कळताच मला खरोखरीच खूप आनंद झाला. आपला एक मित्र वरच्या पदावर गेल्याचा कोणत्या मित्राला आनंद होणार नाही?

-माजी विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद.
ज्येष्ठ समाजवादी नेते.

❑❑

दादासाहेब गवई–एक स्वावलंबी यशस्वी राजकीय प्रवास

एक तप उलटून गेले. दादासाहेब राष्ट्र पातळीवरील मान्यवर नेते झाले आणि अगदी अलीकडे नागपूरहून दिल्लीला जाणाऱ्या विमानात त्यांनी मला पाहिले. दादासाहेबांनी मला शेजारी बसवून घेतले. शेतकरी संघटनेच्या कामाविषयी दादासाहेबांनी इतक्या बारकाईने विचारपूस केली की जणू मध्ये बारा वर्षांचा काळ उलटून गेलाच नव्हता. चंद्रपूरच्या अधिवेशनापासून शेतकरी संघटनेने स्वतंत्र विदर्भाच्या प्रश्नात रस घ्यायला सुरुवात केली आहे. दादासाहेब म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व राजकीय, सामाजिक घडामोडींचा चालता-बोलता ज्ञानकोषच आहे. शिक्षण व्यवस्था असो, रोजगार हमी योजना असो की वैद्यकीय उपचारांची उपलब्धता असो, प्रत्येक विषयात दादासाहेबांनी प्रचंड भरीव कामगिरी केलेली आहे.

-शरद जोशी

मधुरभाषी

▪ मृणाल गोरे

श्री. रा. सू. गवईंचा आणि माझा प्रथम परिचय १९७२ मध्ये मी जेव्हा विधानसभेवर निवडून आले तेव्हा विधानभवनातच झाला. त्यावेळी श्री. गवई हे विधानपरिषदेचे उप सभापती होते. कोणत्याही व्यक्तीशी आपला जेव्हा प्रथम परिचय होतो तेव्हा अजाणतेपणेच आपण त्या व्यक्तीचे मूल्यांकन करीत असतो. त्या व्यक्तीच्या बरे-वाईट होण्याचा कौल आपले अंतर्मन देत असते आणि त्यातूनच त्या व्यक्तीविषयी आपले मत बनत असते. माझ्या मनाने श्री. गवईंच्या बाबतीत जो निर्णय दिला तो म्हणजे एक चांगला माणूस! आज २६ वर्षानंतर त्यांच्या विषयी लिहिताना या प्रदीर्घ कालखंडात त्यांच्या स्वभावविशेषाचे अनुभव लक्षात घेता माझ्या मनाने त्या वेळी दिलेला निर्णय योग्यच होता हे नमूद करावेसे वाटते. श्री. गवई हे खरोखरच एक चांगले गृहस्थ आहेत. माझ्या चांगले या शब्दाच्या व्याप्तीत बुद्धिमत्ता, चातुर्य, सभ्यता आणि औदार्य हे गुणविशेषही मोडतात. या सर्व गुणविशेषांचा अंतर्भाव असलेली व्यक्तीच माझ्या मते एक चांगली व्यक्ती ठरते. त्याबरोबरच श्री. गवई हे फार मधुरभाषी आहेत. त्यामुळेच ते मैत्री जुळवतातही आणि टिकवतातही. त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांच्याशी बोलताना विषयाचे बंधन नाही कारण ते कोणत्याही विषयावर बोलू शकतात. हा माझाच नाही, सर्वांचाच अनुभव आहे.

श्री. गवईंच्या विषयीचे माझे अनुभव सांगण्याची सुरुवात मी एका अत्यंत कटू घटनेपासून करते. त्या घटनेची परिणती श्री. गवईंवर अतिशय संतापण्यात झाली होती आणि घटनेचे मूळ होते श्री. अंतुले साहेब. वडखळ नाक्यावर कस्टमच्या अधिकाऱ्यांनी श्री. अंतुलेंच्या गाडीतून स्मगलिंगचा माल पकडला आहे, ही बातमी मला कळली. कोणतीही गोष्ट मला कळल्यानंतर तिच्या खरेखोटेपणाची शहानिशा केल्याशिवाय मला चैन पडत नाही. कुणीही मला सांगावे, ते मी खरे मानावे आणि त्यावर भाष्य करावे हे मला आवडत नाही. मला खोटेपणाची अतिशय चीड आहे. सत्य जाणून घेण्यासाठी मी त्या घटनेच्या अगदी मुळापर्यंत जाते. या माझ्या स्वभावामुळेच मी स्वत: वडखळ नाक्यावर गेले, घटना कुठे घडली, कशी घडली, केव्हा घडली, कस्टमचे अधिकारी कोण होते, कोणत्या प्रकारचा माल सापडला, गाडीचा नंबर काय होता ही सर्व माहिती काढून मी टिपून घेतली. ह्या घटनेच्या सत्यतेची खात्री पटल्यानंतरच मी सभागृहात या प्रकरणाला वाचा फोडली. सर्वांना धक्कादायक अशीच ही घटना होती. श्री. अंतुलेंनी त्यावर आपले स्पष्टीकरण दिले, नव्हे-ते त्यांच्यावर आलेल्या आमच्या दबावामुळे त्यांना द्यावे लागले. तरी पण माझे समाधान होईना. मी लगेच दिल्लीला फोनवर श्री. मधू लिमयेंशी संपर्क साधला आणि ह्या घटनेची सविस्तर माहिती त्यांना दिली. श्री. मधू लिमयेंनी वेळ न दवडता ध्यानाकर्षण प्रश्नाच्या माध्यमातून लोकसभेत या प्रकरणाची चर्चा घडवून आणली आणि श्री. इंदिरा गांधींना त्यावर स्पष्टीकरण द्यावे लागले. त्यातही फार मोठी गंमत झाली. श्री. अंतुलेनी विधानसभेत दिलेले स्पष्टीकरण आणि इंदिरा गांधींनी लोकसभेत दिलेले स्पष्टीकरण यात प्रचंड तफावत होती. दोन्ही स्पष्टीकरणांत घटनाक्रमात तर सोडाच, गाड्यांच्या नंबर्समध्ये सुद्धा फरक होता. दोन्ही स्पष्टीकरणे मी वाचली, त्यातील विरोधाभास सभागृहाच्या नजरेस आणून दिला. त्याबरोबरच सभागृहात प्रचंड गदारोळ उठला. सभापतींना कित्येकदा काम तहकूब करावे लागले आणि शेवटी मार्ग निघाला की, या प्रकरणासाठी चौकशी समिती नेमण्यात

आली. त्या समितीत आमच्या बाजूने श्री. दत्ता ताम्हणे होते आणि अध्यक्ष होते श्री. गवई! काही दिवसानंतर मला ह्या समितीचा रिपोर्ट वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळाला आणि मी थक्कच झाले. तक्रारकर्ती या नात्याने आणि घटनेची संपूर्ण माहिती मला असताना सुद्धा मला समितीसमोर न बोलावता श्री. गवईंनी रिपोर्ट दिलाच कसा ह्याचे मला अतिशय आश्चर्य वाटले आणि तितकाच मला संताप पण आला. न्यायालयात समन्स मिळूनही जर वादी किंवा प्रतिवादी बरेचदा उपस्थित राहिला नाही तर न्यायाधीश एकतर्फी निर्णय देतात. इथे मला कुठलाही समन्स न देता आणि माझी अनुपस्थिती गृहित धरूनच हा एकतर्फी निर्णय घेण्यात आला होता. रागाच्या भरातच मी श्री. गवईंना भेटले, आपण मला न बोलावता रिपोर्ट दिलात याचाच अर्थ आपण नीट चौकशी केली नाही आणि श्री. अंतुलेंना वाचविण्यासाठी आपण इतक्या घाईघाईने रिपोर्ट सादर केला आहे. आपणाकडून ही अपेक्षा नव्हती, असा स्पष्ट आरोप त्यांच्यावर करून मी त्यांना चांगलेच झापले. रागाच्या भरात मी त्यांना काय काय बोलले हे नीटसे आठवत नाही. मी इतकी चिडले होते पण श्री. गवई मात्र अगदी शांतपणे माझे रागावणे ऐकून घेत होते. माझे बोलणे संपल्यानंतर ते तितक्याच शांतपणे मला म्हणाले की, ताई तुमच्या भावना मी जाणतोय. तुमचा खरा रोष तुम्हाला न बोलावण्यावर आहे. वास्तविक पाहता तुमच्याच पक्षाचे श्री. ताम्हणे या समितीत होते. त्यांनी हा मुद्दा मांडायला हवा होता पण ते काहीच बोलले नाहीत. तेव्हा माझी काय चूक आहे? माझ्या पद्धतीने चौकशी करून हा रिपोर्ट दिलेला आहे. तो चुकीचा असूच शकत नाही असे मी म्हणत नाही, पण ताई, तुम्हाला मी विनंती करतो की कृपा करून आपण हे प्रकरण आणखी ताणून धरू नका. त्यांच्या या शांतपणे बोलण्याने माझा पारा खाली आला. खरे म्हणजे हा मुद्दा श्री. ताम्हणेंनी मांडावयास हवा होता. नव्हे-त्यांनी तसा आग्रह धरणे आवश्यक होते. पण श्री. ताम्हणेंनी तसे केले नाही. पुढे या प्रकरणाचे काय होणार हा अंदाज मी बांधला आणि तेही माझ्या अपेक्षेप्रमाणेच झालेही. बहुमताच्या दबावाखाली हे प्रकरण संपविण्यात आले आणि श्री. अंतुले दोषी असूनही निर्दोष म्हणून सहीसलामत सुटले. त्यानंतर परत निवडणुका झाल्या. आमच्या जनता पार्टीचे राज्यही आले. तेही संपुष्टात आले. काही काळानंतर श्री. अंतुले मुख्यमंत्री झाले. परत त्यांनी आपल्या स्वभावानुसार सिमेंटचा घोटाळा केला आणि जिथले पाप तिथेच फेडावे लागते, ह्या आपल्या धार्मिक कल्पनेनुसार श्री. अंतुले हे या प्रकरणात वाचले नाहीत आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. काळाच्या ओघात हे सर्व वाहून गेले पण श्री. गवई यांनी अध्यक्ष या नात्याने मला बोलवावयास हवे होते हे मनाच्या कप्प्यात कुठे तरी दडलेले शल्य कधीतरी बोचतेय. श्री. गवईऐवजी जर दुसरी एखादी व्यक्ती असती तर मी केलेल्या आरोपामुळे आणि संतापून बोलण्यामुळे त्या व्यक्तीच्या मनात माझ्याविषयी नेहमीसाठी अढी निर्माण झाली असती. पण श्री. गवईंनी अढी तर दूरच साधे मनालासुद्धा लावून घेतले नाही. त्यानंतर जेव्हा केव्हा आम्ही भेटत असू तेव्हा मला 'ताई' म्हणून नेहमीप्रमाणेच हास्यविनोदाने ते माझ्याशी बोलत असत आणि त्यानंतर आलेल्या त्यांच्या विविध अनुभवांतूनही त्यांच्या मनात माझ्याविषयी काही किल्मिष आहे, हे मला जाणवले नाही.

गवईंचे अनेक महत्त्वाच्या प्रसंगी फार मोठे योगदान मिळाले आहे. त्यापैकी दोन प्रमुख प्रसंग मला इथे नमूद करावेसे वाटतात. त्यापैकी एक म्हणजे १९८८ साली श्री. ग. वा. बेहरेंनी आदरणीय महात्मा जोतिबा फुले ह्यांच्या बाबतीत काढलेल्या अत्यंत अनुचित, आक्षेपार्ह आणि निंद्य उद्‌गाराविरुद्ध आम्ही काढलेला मोर्चा. श्री. बेहरेंनी इतक्या खालच्या पातळीवर जाऊन महात्मा फुलेंवर भाष्य केले होते की ते ऐकून आमचा सर्वांचा राग इतका अनावर झाला की त्याविरुद्ध मोर्चा काढून श्री. बेहरेंना चांगली समज देण्याचे आम्ही ठरवले. श्री. गवईही आपल्या पक्ष

कार्यकर्त्यांसह या मोर्चात सामील होणारच असे आम्हाला वाटत होते तेव्हा श्री. गवईंशी आम्ही संपर्क साधला आणि या मोर्चाची माहिती देऊन त्यांची ह्या बाबतीत आम्हाला हवी असलेली मदत मागितली, माझ्या अपेक्षेप्रमाणे लागलीच त्यांनी आम्हाला अपेक्षित असलेले सहकार्य देण्याचे कबूल केले आणि स्वत: ते मोर्चात सामील झालेच पण त्याबरोबरच आपल्या सहका-यांना सामील करून घेऊन या मोर्चास एक भव्य रूप आणले. मोर्चा सफल झाला आणि श्री. बेहरेंना जाहीर माफी मागावी लागली. पण या यशस्वितेमागील श्री. गवईंचे योगदान मात्र विसरता येणार नाही. दुसरा प्रसंग म्हणजे डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या पुस्तकातून Riddles of Ram हा भाग काढून टाकण्यासाठी, विधानसभेत सत्तारूढ पक्षांनी दिलेल्या मंजुरीविरुद्ध आम्ही काढलेला मोर्चा. विरोधी पक्षातील एका दलाने सभागृहात माजवलेल्या गोंधळाच्या दबावाखाली शासनाने हा भाग वगळण्याचे जे मान्य केले होते त्याच्या समर्थनार्थ तथाकथित रामभक्तांनी एक मोठा मोर्चा काढला होता. ह्या मोर्चाच्या विरुद्ध एक भव्य प्रतिमोर्चा काढून या भक्तांनी निर्माण केलेल्या दंभाचाराला सणसणीत उत्तर द्यावे असे आम्ही ठरविले. डॉ. बाबासाहेबांचा प्रश्न असल्यामुळे रिपब्लिकन पार्टीचे सहकार्य आम्हाला अपेक्षित होते. त्याप्रमाणे आम्ही पार्टी कार्यालयाशी संपर्क साधला. पार्टीचे एक नेते आम्हाला भेटावयास आले. आमच्या व्यतिरिक्त कोणाला आपण बोलावणार नसाल तरच आम्ही ह्या कामी तुम्हाला सहकार्य देण्यास तयार आहोत, असे आम्हाला सांगितले. त्यांची ही अट ऐकून मी अचंब्यातच पडले. त्यांच्या पार्टीत दोन गट आहेत हे मला माहीत होते व आलेले गृहस्थ हे श्री. गवईंच्या विरुद्ध असलेल्या गटाचे नेते होते!

डॉ. बाबासाहेबांच्या मानापमानाचा प्रश्न समोर असताना ते गृहस्थ आपल्या पक्षांतर्गत असलेल्या हेव्यादाव्यांचेच राजकारण खेळताहेत आणि त्यातूनच आपला राजकीय स्वार्थ साधू पाहत आहेत ह्याची जाणीव होताच मी त्या गृहस्थास जरा जोरातच ठणकावले. मी म्हणाले, हे बघा श्री. गवईही फार जुने कार्यकर्ते आहेत. तुमच्या समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी महान कार्य केले आहे. तुमचे पक्ष संघटित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे आणि त्यातही डॉ. बाबासाहेबांवर त्यांची अथांग श्रद्धा आहे. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत मी श्री. गवईंना व बाकी लोकांना डावलणार नाही. तुमची अट मला सर्वस्वी अमान्य आहे. यावर तुमचा निर्णय तुम्ही घ्या. पण मी श्री. गवईंना व सर्वांना बोलावणारच! माझ्या या उत्तराने आलेले नेते नाराज झाले; पण जे समजायचे ते समजले. आम्ही लागलीच श्री. गवईंशी संपर्क साधला. त्यांना भेटलो आणि मोर्चाविषयी त्यांना सांगितले. ज्या कारणास्तव आम्ही मोर्चा काढण्याचे ठरवले होते ते ऐकून त्यांना मनस्वी आनंद झाला. ते म्हणाले, ताई फार चांगल्या कामासाठी आपण मोर्चा काढताहात. ह्या कामासाठी आपल्याला मला सहकार्य मागण्याची गरजच नाही. इथे प्रश्न माझ्या आदराचे आणि भक्तीचे स्थान असलेल्या डॉ. बाबासाहेबांची इभ्रत आहे. तेव्हा हे काम यशस्वी करणे माझे नैतिक कर्तव्य आहे आणि कुणाला बोलावायचे आणि कुणाला बोलावयाचे नाही हा प्रश्नच उद्‌भवत नाही. तुम्ही सर्वांना बोलवा. ज्यांना डॉ. बाबासाहेबांविषयी श्रद्धा असेल ते बोलावताच काय, न बोलावताही येतील! आणि खरोखरच श्री. गवईंनी ह्या मोर्चासाठी इतके श्रम घेतले की हा मोर्चा इतका प्रचंड निघाला, इतका सफल झाला की राजकारणासाठी रामाची भक्ती करणा-यांना झणझणीत उत्तर मिळेल.

एका स्वप्नपूर्तीचा अनुभव मला या मोर्चाच्या रूपाने मिळाला. त्याबरोबर श्री. गवईंच्या सहकार्याशिवाय हे यश केवळ अशक्य होते हे मी प्रामाणिकपणे कबूल करते. ह्या मोर्चाच्या संबंधात आणखी एक गोष्ट मला नमूद करावीशी वाटते आणि ती म्हणजे श्री. गवईंचे भाकित खरे ठरले होते. प्रथम मला जे नेते भेटावयास आले होते ते आणि

त्यांच्या चमच्यांचे वर्तुळ वगळता डॉ. बाबासाहेबांच्या श्रद्धेपोटी त्यांच्या गटातील सर्वच लोक या मोर्चात सामील झाले होते.

श्री. गवईंच्या मनाच्या मोठेपणाचा जो जन्मभर माझ्या स्मरणात राहील तो अनुभव सांगते. १९८९ मध्ये माझ्या जनता दलाने श्री. व्ही. पी. सिंग ह्यांची जाहीर सभा अमरावतीला आयोजित केलेली होती. सभेसाठी मी अमरावतीला पोचताच मला अति विश्वासू व्यक्तीकडून कळले की काही समाजकंटक, स्थानिक राजकीय नेत्यांच्या इच्छेनुसार, त्यांच्या सक्रिय दबावाखाली आमच्या सभेत गोंधळ निर्माण करणार आहेत, आमची सभा उधळून लावणार आहेत. त्यांचा मूळ उद्देश श्री. व्ही. पी. सिंग ह्यांना अपमानित करण्याचा आहे. माझ्या पक्षाचे कार्यकर्तेही त्यामुळे चिंतेत पडलेले होते आणि संभाव्य संकटाने मी गांगरले होते. काही अप्रिय घटना घडते की काय अशी भीती पण वाटत होती. अशा या कठीण प्रसंगी श्री. गवईच माझ्या मदतीला धावून आले. असे काही घडण्याची शक्यता आहे हे श्री. गवईंना आधीच कुणाकडून तरी कळले होते. ते स्वत: मला भेटायला आले आणि आल्या आल्याच मला म्हणाले की, ताई, तुम्ही माझ्या अमरावतीत आलेल्या आहात. इथे मी असताना तुमच्या केसालाही धक्का लावण्याची कुणी हिम्मत करणार नाही. तुमची इच्छा आहे ना की तुमची सभा निर्विघ्नपणे पार पडावी आणि श्री. व्ही. पी. सिंग साहेब अपमानित व्हायला नकोत. तुमच्या इच्छेप्रमाणेच होईल. तुम्ही अजिबात काळजी करू नका आणि त्यानंतर त्यांनी उच्चारलेले वाक्य तर मी जन्मभर विसरणार नाही. ते म्हणाले होते, ताई, तुमची इज्जत तीच माझी इज्जत आहे. त्यांचं हे वाक्य म्हणजे एका भावानं आपल्या बहिणीला दिलेला दिलासा होता. म्हणूनच ती चिरस्मरणीय राहील. श्री. गवईंनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सभा निर्विघ्नपणे पार पडली आणि कुठलीही अपमानास्पद परिस्थिती निर्माण झाली नाही. पक्षभेद असावा, पण पक्षद्वेष नसावा हे लोकशाहीचे ब्रीदवाक्य श्री. गवईंनी आपल्या मनाच्या मोठेपणासह प्रत्यक्ष कृतीनीच सिद्ध करून दिले.

श्री. गवई फार आतिथ्यशील आहेत. एक प्रसंग मला आठवतो. एकदा मी माझ्या काही भगिनींसह माधानला जात होते. माधानला जायचं म्हणजे बडनेऱ्याला उतरून व्हाया अमरावती जावे लागते. मी बडनेरच्या प्लॅटफॉर्मवर उतरले आणि पाहते तर श्री. गवई समोर उभे. ते त्याच गाडीने आले होते. त्यांना घ्यायला काही कार्यकर्ते आणि कार पण आली होती. मला पाहताच ते माझ्याजवळ आले आणि म्हणाले, ताई, तुम्ही इथे कशा! माझ्याबरोबर असलेल्या भगिनींकडे निर्देश करून मी त्यांना सांगितले की ह्यांना बरोबर घेऊन मी माधानला जात आहे. माझे वाक्य पूर्ण होण्याआधीच ते म्हणाले की, ताई, तुम्ही माझ्या गावी आल्या आहात. तुम्हाला असे वाटलेच कसे की मी सरळ तुम्हाला माधानला जाऊ देईन. ते काही नाही, तुम्ही सर्वांना घेऊन पहिले माझ्या घरी चला. प्रवासाने थकल्या आहात, फ्रेश व्हा. फराळ करून घ्या. थोडा आराम करा, मगच मी तुम्हाला माधानला जाऊ देईन. त्यांच्या या मन:पूर्वक केलेल्या आग्रहाला नकार देणे शक्यच झाले नाही आणि आम्ही त्यांच्याबरोबरच त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या घरी आदरातिथ्याचा एक मिठ्ठास अनुभव मी घेतला. त्यांच्या पत्नीचा म्हणजे आमच्या सौ. वहिनींचा स्वभावपण फार मोकळा आणि सात्त्विक आहे. गवईंच्या जोडीला जोडच त्या वाटल्या. आम्ही फ्रेश झालो. त्यांच्या वऱ्हाडी पाहुणचाराचा आस्वाद घेतला. थोड्या गप्पा झाल्या. नंतर त्यांनी आम्हाला माधानला जाण्याची परवानगी दिली. श्री. गवईंच्या घरी पोहोचल्यापासून त्यांचा निरोप घेईपर्यंत मला औपचारिकता कुठेच जाणवली नाही. प्रत्यय आला तो अगत्याचा! हिवाळी अधिवेशनासाठी जेव्हा मुंबईहून आम्ही नागपूरला जायचो तेव्हा हमखास श्री. गवई आमच्याबरोबर असायचे आणि मलाच नाही तर सर्वांना सांगायचे, हे बघा, बडनेऱ्याला मी तुम्हा सर्वांना चहा

पाजणार आहे. कुणीही चहा पिल्याशिवाय जाऊ नका. पैसे द्यायचे नाहीत आणि पुढे विनोदाने म्हणायचे की, घाबरू नका तो माझ्या नातेवाईकाचाच टी स्टॉल आहे. बडनेरला ते सर्वांनाच चहा, नाश्ता करायचे. असे अनेकदा घडते. मला तर बडनेरा स्टेशनला गवई टी हॉल्ट असे नाव द्यावेसे वाटायला लागले होते.

श्री. गवईंच्या उप सभापती आणि सभापती या नात्याने झालेल्या कार्यकालाला एक यशस्वी कार्यकाल असेच म्हणावे लागेल. सत्तारूढ आणि विरोधी पक्षालाही समतोलपणे सांभाळून घेऊन, न्यायबुद्धीने निर्णय देऊन, कटुता निर्माण होऊ न देता आपल्या ओजस्वी वक्तृत्वाने आणि सक्षम कार्यक्षमतेने त्यांनी सभागृहाचे काम उत्कृष्टपणे सांभाळले. त्यांनी नेहमीच सभागृहात खेळीमेळीचे वातावरण ठेवले.

श्री. गवईंना जातीयवादी म्हणणे मला तरी स्वानुभवावरून योग्य वाटत नाही. त्यांनी आपल्या दलित बांधवांच्या उद्धारासाठी अमौलिक कार्य केले याबद्दल वादच नाही. त्याबाबतीत तर ते डॉ. बाबासाहेबांचे खऱ्या अर्थाने अनुयायी ठरतात पण म्हणून ते जातीयवादी ठरू शकत नाहीत. मी त्यासाठी एक उदाहरण देते, आपण आपल्या आईवडिलांवर प्रेम करतो. पण आईकडे मात्र प्रेमाचे थोडे झुकते माप असते. याचा अर्थ आपण वडिलांवर प्रेम करत नाही असा होत नाही. तसलाच प्रकार श्री. गवईंच्या जातीयवादाचा आहे. आपल्या दलित बांधवांच्या कल्याणासाठी त्यांचे जरा झुकते माप होते.

श्री. गवई कुठल्याही परिस्थितीत आपल्या मनाचा तोल जाऊ देत नाहीत. याचे उदाहरण म्हणजे नागपूरच्या दीक्षाभूमीसंबंधी त्यांच्याच समाजातील काही असंतुष्ट लोक आमच्याकडे तक्रारी करायचेय याचा ऊहापोह व्हायचा आणि ते श्री. गवईंच्या कानांवरही जायचे. पण अपमानित करणारी बाब असूनही चिडून जाऊन श्री. गवईंनी आपल्या मनाचा तोल कधी जाऊ दिला नाही.

श्री. गवई आपल्या वैयक्तिक जीवनात स्पष्टवक्ते आहेत. हाच त्यांचा स्पष्टवक्तेपणा त्यांच्या राजकीय जीवनातही आढळून येतो. त्याचे एक ताजे उदाहरण मी देते. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी श्री. गवई व श्री. रामदास आठवले आमच्याकडे आले आणि अगदी स्पष्टपणे मला सांगितले की, ताई, ह्या वेळी आम्ही तुमच्या बाजूने म्हणजे संयुक्त आघाडीत नाही. आम्ही काँग्रेसशी युती करीत आहोत. त्यांचा स्पष्टवक्तेपणा आम्हाला आवडला. त्यांनी समाजवादी पार्टीसारखे शेवटपर्यंत अंधारात ठेवून आम्हाला धोका दिला नाही. श्री. गवईंशी असलेल्या वैयक्तिक संबंधापेक्षाही दलित समाजातून जास्तीतजास्त प्रतिनिधी लोकसभेत जावेत या भावनेतूनच आम्ही संयुक्त आघाडी तोडून मुंबई, अमरावती व चिमूरला आमचा पाठिंबा त्यांना जाहीर केला. त्यांच्याविरुद्ध आमचे उमेदवार उभे न करण्यामागे त्यांना मिळणाऱ्या मतांचे विभाजन टाळण्याचाच उद्देश होता.

-माजी विरोधी पक्षनेत्या, महाराष्ट्र विधानसभा.
ज्येष्ठ समाजवादी नेत्या.

❑❑

रसिक व्यक्तिमत्त्व

▪ प्रमोद नवलकर

अध्यक्ष महोदय, गेल्या महिन्यामध्ये या सभागृहामध्ये मला निरोप देण्यात आला आणि या महिन्यामध्ये माझ्या सहकाऱ्यांना निरोप देण्यासाठी मी या ठिकाणी उभा राहिलेलो आहे. या सभागृहाचे एक वैशिष्ट्य मानावे लागेल. खो-खो खेळ चालावा त्याप्रमाणे आपण एकामागून एक सदस्यांना निरोप देत असतो. एक दाराने ते गमन करीत असतात आणि काही काळाने दुसऱ्या दाराने सदस्याचे आगमन होत असते. या सदनामधुन जे ११ सदस्य निवृत्त होत आहेत त्यांच्यापैकी कोणीही येथे परत येणार नाही असे म्हणण्याचे धाडस मी करणार नाही. माननीय सदस्य श्री. गवई साहेबांच्या बाबतीत तर करूच शकणार नाही. कारण गवई हा असा एक माणूस आहे की, ते सर्वांना नेहमी हवेहवेसे वाटत असतात. त्यांच्याविषयी बोलावयाचे झाले तर खूप बोलता येईल. मला एका गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांची आपल्यापैकी बऱ्याच लोकांना सदैव आठवण राहील असे त्यांचे एक कार्य म्हणजे वरळी सागर सोसायटी जी त्यांनी उभी करताना गवई साहेबांनी केलेले काम मी जवळून पाहिलेले आहे. तसेच या संदर्भात त्यांच्यावर झालेले हल्ले आणि निंदानालस्ती ही सुद्धा मी जवळून पाहिलेली आहे. परंतु ते बिलकुल विचलित झाले नाहीत. आपल्यापैकी बरेचसे असे सदस्य आहेत की, त्यांचे राहणीमान सुधारले पाहिजे, ते सन्मानाने राहिले पाहिजे, त्यांच्या जीवनातील विवंचना दूर झाल्या पाहिजेत या एकमेव भावनेने श्री. गवई यांनी हे काम करून ठेवलेले आहे. त्याचा उल्लेख मला या ठिकाणी मुद्दाम करावयास हवा.

गवई साहेबांचे वर्णन शब्दांनी करणे अतिशय अवघड आहे. ते स्वतः खरोखरच गवई आहेत. सभागृहातील जणू काही संगीत आहेत असे म्हणावे लागेल. हे संगीताचे सूर आपल्याला उद्यापासून ऐकायला मिळणार नाहीत. मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी या सभागृहामध्ये ज्या ज्या जागा भूषविल्या आहे त्या सर्व एकमताने भूषविल्या याचीही इतिहासाने नोंद घेतली पाहिजे. हे एकमत सदैव गवई साहेबांचे राहिलेले आहे. दुसरी मते ते कुठून मिळवत होते हे ईश्वरालाच माहिती. हा संशोधनाचा विषय आहे. त्यांना रसिकही म्हणता येणार नाही. रंगेलही म्हणता येणार नाही. या दोघामधील सुवर्णमध्य त्यांनी आपल्या जीवनामध्ये सतत काढला होता. अध्यक्ष महाराज, ज्या दिवशी मी या सभागृहामध्ये आलो. पहिल्या दिवशी मी त्यांना जसे पाहिले त्यावेळी ते जसे दिसत होते अगदी तसेच्या तसे ते आज देखील दिसतात. हा दुसरा संशोधनाचा विषय आहे. आपल्या कल्ल्यांना ते कदाचित पांढरा रंग लावीत असतील म्हणून त्यांच्यामध्ये आज आपल्याला थोडाफार फरक जाणवतो. पण सदैव उत्साही, हसतमुख, आनंदी असे व्यक्तिमत्त्व आहे.

त्यांच्या जीवनातील संघर्ष फार मोठा आहे. त्यांच्या विषयी मी आजच बरेच काही वाचले. हा माणूस फार मोठ्या संघर्षामधून उभा राहिलेला आहे. समोर दिसते हे त्यांचे जे चित्र आहे ते खरे नाही. मला त्यांच्याकडे पाहिले की, आंब्याच्या झाडांची आठवण येते. आंब्याचा देठ कडू जहर असतो. त्या देठातील रस देखील कडू जहर असतो. त्या देठातील कडवट रसाचे शोषण करून गोड आंबे तयार होतात. आंब्याचे झाड आपल्या उदरामध्ये हा कडू रस साठवून ठेवून आपल्याला गोड, मधुर, फळ जगाला अनंत हस्ते वाटत असते. तसाच मा. श्री. गवई यांचा स्वभाव आहे. त्यांनी आमच्याकडे कधी तक्रार केली नाही, आपल्या वेदना, आपले दुःख कधी कोणाला सांगितले नाही. हा माणूस सर्वांना सतत हवाहवासा वाटत राहिलेला आहे.

-माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

❑❑



अज्ञातशत्रू...

□ विधिमंडळातील भाषणे

महाराष्ट्र विधानपरिषदेत १९६४ ते १९९४ या प्रदीर्घ काळात दादासाहेब गवई यांनी विधानपरिषद सदस्य, उप सभापती, सभापती, विरोधी पक्षनेता अशी सर्वच पदे भूषविली. या प्रदीर्घ काळात समाजातील विविध प्रश्न त्यांनी सभागृहात मांडले. संसदीय आयुधांचा वापर करून एक लोकप्रतिनिधी जनसामान्यांच्या समस्या कशा सोडवू शकतो हे त्यांच्या विधिमंडळातील विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण भाषणातून आपल्याला जाणवते.

मा. सभापती...



अभिनंदन - वि. स. पागे यांचे

(२६ एप्रिल, १९६६)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या संसदीय इतिहासात वि. स. पागे व रा. सू. गवई हे आगळे वेगळे द्वैत आहे. पागे म्हटले की, गवई आठवतात आणि गवई म्हटले की, त्यांच्या काळी सभापती असणारे वि. स. पागे आठवतात. हे मैत्र कसे जुळले, कशाने जुळले याचा शोध घेतला तर त्याची मुळे लोकशाहीवर उभयतांच्या प्रेमामध्येच आढळून येते. बघूया वि. स. पागे यांची सभापती म्हणून विधानपरिषदेने अविरोध निवड केल्याबद्दल रा. सू. गवई यांनी त्यांचे कसे अभिनंदन केले ते.

अध्यक्ष महाराज, ह्या सभागृहाच्या अध्यक्षपदी पुन्हा आपली निवड एकमताने झाली याबद्दल सर्वप्रथम मी आपले अभिनंदन करतो. ह्या सभागृहाचा सभासद ह्या नात्याने गेली दोन वर्षे मला जो अनुभव आला आहे त्यावरून मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे की इतर काही राज्यातील विधानमंडळामध्ये संसदीय लोकशाहीला गालबोट लावणाऱ्या ज्या घटना झाल्या आहेत तसा कोणताही प्रकार ह्या सभागृहात न होता उलट विचारस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य ह्या महत्त्वाच्या गोष्टींना आपण भरपूर वाव दिलेला आहे. एरव्ही खासगी सभातून ज्या गोष्टी बोलता येत नाहीत त्या बोलून दाखवून जनतेच्या भावना व्यक्त करण्याचे हे स्थान आहे आणि संसदीय लोकशाहीची जी इतर अनेक लक्षणे आहेत त्यापैकी हे एक प्रमुख लक्षण आहे. ॲडजर्नमेंट मोशन किंवा कॉलिंग अटेन्शन नोटीस असली किंवा इतर चर्चा असली तरी त्या त्या विषयाचे महत्त्व ओळखून आपण त्या चर्चेला वाव दिलेला आहे. संसदीय लोकशाहीला पोषक होईल असेच धोरण आपण आजपर्यंत ठेवीत आला आहात. चार पाच वेळा प्रश्नोत्तराच्या वेळी नामदार मंत्र्याकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्यामुळे आपण त्यांना दुरुस्त उत्तरे सभागृहापुढे ठेवण्यास सांगितले. तेव्हा संसदीय लोकशाही टिकून राहावी यासाठी आपण जे काम केले त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. ह्या दृष्टीने आपली ह्या पदावर झालेली निवड अत्यंत उचित आणि योग्य आहे आणि आपल्या पुढच्या कारकिर्दीत लोकशाही विकासाप्रत जाईल अशी आशा व्यक्त करून मी रजा घेतो.

जनभावना व्यक्त होण्याचे स्थान म्हणजे विधिमंडळ त्यात स्थगन प्रस्ताव वा लक्षवेधी सूचना यांना खास महत्त्व आहे. ते लक्षात घेऊन चर्चेला महत्त्व देणारे सभापती म्हणून गवई यांनी त्यांचा गौरव केला.

❑❑❑

जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार सरकारने ताब्यात घ्यावा

(६ सप्टेंबर, १९६६)

१९६६ साली महाराष्ट्रात अन्नधान्याचा मोठा तुटवडा निर्माण झाला होता. अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाली होती. सरकारने अन्नधान्याच्या किंमती वाढू नये म्हणून "सरकार प्रयत्न करीत आहे" असे सांगितले. त्यावर त्या व्यापाऱ्यांची मने वळविणारी जादूची कांडी कुणाही जवळ नाही असे रा. सू. गवई यांनी ठामपणाने सांगितले. या विषयावर ६ सप्टेंबर, १९६६ रोजी झालेले गवई साहेबांचे भाषण सामान्य ग्राहकांबद्दल चिंता व्यक्त करणारे आहे.

अध्यक्ष महाराज, ह्या प्रस्तावावर बोलताना ह्या सभागृहातील विरोधी पक्षाचे नेते श्री. उत्तमराव पाटील आणि इतर वक्त्यांनी गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांची पुनरुक्ती न करता आपल्या ह्या राज्यात अन्नधान्याच्या किंमतीत जी भरमसाठ वाढ झालेली आहे ती आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने ज्या काही मूलभूत सूचना मला करावयाच्या आहेत त्या मी करणार आहे.

अध्यक्ष महाराज, ह्या राज्यातील अन्नधान्याची आणि भाववाढीची परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी शासनाकडून वारंवार ज्या घोषणा करण्यात आल्या आहेत त्या क्रमाक्रमाने मी सांगणार आहे. पहिली गोष्ट अशी की, परदेशातून धान्याची आयात करून ते धान्य जनतेला वाटणे. दुसरी गोष्ट अशी की, जे धान्य ह्या देशात उत्पन्न होते ते आणि परदेशातून आणलेले धान्य स्वस्त धान्याच्या दुकानात लोकांना वाटणे. आपल्याकडे एकंदर २० हजार फेअर प्राइस दुकाने आहेत. त्याचप्रमाणे एकाधिकार पद्धतीने धान्याची वसुली सरकारने करणे हा एक मार्ग अवलंबिण्यास सुरुवात झालेली आहे. त्याचप्रमाणे कंट्रोल ऑन मार्जिन ऑफ प्रॉफिट ऑर्डर काढण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक दुकानदाराने आपल्या दुकानात दर्शनी भागात धान्याच्या किंमती लावल्या पाहिजेत असे कायद्याने त्यांच्यावर बंधन घालण्यात आले आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या राज्यातील महागाई आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने ह्या सर्व मार्गांचा अवलंब केला जात आहे. परंतु हे सर्व मार्गही परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी अपुरे आहेत असे मला सांगावयाचे आहे. मला वेळ कमी आहे, परंतु तेवढ्याच वेळात मी काही मूलभूत सूचना करणार आहे. ह्या ठिकाणी मी एका गोष्टीचा उल्लेख करतो. ज्वारी, बाजरी आणि नागली ही धान्ये शेतकऱ्यांकडून एकाधिकार पद्धतीने वसूल करण्याचा उपक्रम सरकारने सुरू केला आहे. याशिवाय दुसरा असा एक प्रयत्न केला जात आहे की, व्यापाऱ्यांनी भाववाढ करू नये म्हणून त्यांची मने वळविण्याचा प्रयत्नही सरकार करून राहिले आहे. पण मला नाही वाटत की, व्यापाऱ्यांची मने वळवू शकेल अशी एखादी जादूची कांडी ह्या जगात कोठे

असेल. व्यापाऱ्यांचे हृदय परिवर्तन होणे ही मोठी कठीण गोष्ट आहे अशाप्रकारे हृदय परिवर्तनाचा प्रयोग सरकारने केला आणि तो फसला आहे असेच म्हणावे लागते. मी आता ज्या सूचना करणार आहे त्यांचा अवलंब सरकारने केला तर जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत मोडणाऱ्या वस्तूंचे भाव आटोक्यात आणणे सरकारला शक्य होऊ शकेल. जीवनावश्यक वस्तूंचे दोन प्रकार आहेत. जमिनीत बी पेरून जो माल तयार होतो, उदाहरणार्थ अन्नधान्ये व कडधान्ये हा एक प्रकार. आणि कच्चा मालाचे पक्क्या मालात रूपांतर झाल्यानंतर निर्माण होणारा माल हा दुसरा प्रकार. तेव्हा ह्या जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार जर सरकारने आपल्या ताब्यात घेतला तर भाववाढीचे हे दुष्टचक्र किमान प्रमाणात तरी आटोक्यात येण्याची शक्यता आहे. जी ज्वारी किंवा बाजरी सरकार एकाधिकार पद्धतीने स्वतः खरेदी करते तीच ज्वारी स्वस्त धान्याच्या दुकानात विक्रीला आली की गिऱ्हाईकाला ६७ पैशांना मिळते. ह्यामुळे शेतकऱ्याला त्यांच्या मालाच्या भावाबद्दल निश्चिती मिळेल आणि गिऱ्हाईकालाही अमुक किंमतीत आपल्याला ज्वारी किंवा बाजरी मिळू शकते ही खात्री मिळेल. पण आज इतर वस्तूंच्या बाबतीत अशी खात्री गिऱ्हाईकाला मिळत नाही. गोडेतेल हे रोजच्या खाद्य पदार्थात आवश्यक वस्तू म्हणून मानली जाते, पण ही वस्तू सरकारच्या नियंत्रणाच्या बाहेरची असल्यामुळे गोड्यातेलाचे भाव भरमसाट वाढून बसले आहेत. आपल्या देशात काही ठिकाणी उत्तम प्रकारचा कापूस पैदा होतो. टेक्स्टाईल धंद्याला कापूस ही एक आवश्यक बाब आहे. अशा ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्या टप्प्याटप्याने सरकारने एकाधिकार पद्धतीने आपल्या ताब्यात का घेऊ नये? आपल्या राज्यात जवस आणि भुईमुगाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. ह्या कच्च्या मालापासून तयार होणाऱ्या गोड्यातेलाचा घाऊक भाव आणि गिऱ्हाईकाला दुकानात द्याव्या लागणाऱ्या भावात जमीन अस्मानाचे अंतर आहे. एरव्ही इतर बाबतीत महाराष्ट्र राज्य इतर राज्यांच्या मानाने पुरोगामी राज्य आहे असे म्हटले जात असताना अन्नधान्याच्या प्रश्नाबाबतच आम्ही मागे का राहावे? दरवर्षी नवीन वस्तूंचा समावेश एकाधिकार पद्धतीत करून त्या वस्तूंचा व्यापार सरकारने आपल्या ताब्यात घेतला तरच ह्या परिस्थितीला तोंड देता येणे शक्य आहे. ह्या मार्गाचा जोपर्यंत अवलंब केला जात नाही, तोपर्यंत दुकानदारांनी आपल्या दुकानात मालाच्या किंमती स्पष्टपणे लावल्या पाहिजेत. ह्या किंमती रेडिओवर सांगणे यांना काही अर्थ राहणार नाही. एक विधायक मार्ग ह्या दृष्टीने सरकारने एकाधिकार पद्धतीने जी धान्य वसुली सुरू केली आहे त्यांत सरकारला थोड्याफार प्रमाणात यश आलेले आहे हे मान्य केले पाहिजे. पण सध्या ह्या पद्धतीत जो फक्त ज्वारी, बाजरी, नागली यांचाच समावेश आहे त्याशिवाय इतर जीवनावश्यक वस्तू टप्प्याटप्याने एकाधिकार पद्धतीने सरकारने खरेदी करण्याचा उपक्रम सुरू केला पाहिजे. ह्या मार्गाचा अवलंब केला तर मला खात्री आहे की, गिऱ्हाईकाला वस्तूंच्या किंमतीबद्दल एक प्रकारची शाश्वती मिळू शकेल. ज्वारीचा व्यापार सरकारने घेतला आणि सरप्लस ज्वारी ताब्यात घेतली. ही ज्वारी पुरविण्याची जबाबदारी सरकारची आहे. सरकारने राज्यात पैदा होणाऱ्या जीवनावश्यक वस्तू ताब्यात घेऊन त्यांचे दर ठरवून दिले तर जनतेला ते सोयीचे होईल. मी इतर वस्तूंमध्ये शिरत नाही. परंतु ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत आणि ज्यांच्या वाढलेल्या किंमती देण्याची जनतेची कुवत नाही

एचबी ११८०—१६

त्या वस्तू सरकारने आपल्या पोलादी हातांने ताब्यात घेतल्या पाहिजेत. हे जोपर्यंत सरकार करीत नाही तोपर्यंत या वस्तू जनतेला नीट रीतीने मिळतील असे वाटत नाही. सरकारने अधिकृत अशा ज्या किमती मान्य केल्या आहेत त्या मी आपल्याला ब्युरो ऑफ इकॉनॉमिक्स मधून वाचून दाखवितो.

१९६२ साली आपल्या राज्यात आणीबाणी सुरू झाली तेव्हाच्या सरकारने मंजूर केलेले हे आकडे आहेत:–

ट्रेन्ड इन प्राईस ऑफ राईस १९६२	..	किलोमागे ६५ पैसे
ट्रेन्ड इन प्राईस ऑफ राईस १९६५	..	किलोमागे ८५ पैसे
ट्रेन्ड इन प्राईस ऑफ राईस १९६६	..	किलोमागे २५ ते ३० पैसे
ट्रेन्ड इन प्राईस ऑफ व्हीट १९६२	..	किलोमागे ६० पैसे
ट्रेन्ड इन प्राईस ऑफ व्हीट १९६६	..	किलोमागे ४५ पैसे

सुदैवाने ज्वारीच्या बाबतीत १९६२ आणि १९६६ मध्ये या किंमतीत फार मोठा फरक दिसणार नाही. या सर्व किंमतींच्या तपशिलात जाऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु हे निश्चित की या किंमतीत जी वाढ झाली आहे ती वाढ उपेक्षून चालणार नाही. लोकशाहीचा एक अनुयायी म्हणून मला असे सांगणे आवश्यक आहे की, महागाईचा हा ज्वालामुखी पाहून हिमालयातील साधूदेखील उद्विग्न होईल. महाराष्ट्रात महागाईच्या प्रश्नावरून सरकारी कर्मचाऱ्यांचा लाक्षणिक संप झाला. सकृद्दर्शनी त्यांचा लढा पगारवाढीचा असला तरी त्यांच्या पगारात वाढ व्हावी हा त्यांचा मुद्दा नाही. त्यांच्या ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्या कमी दराने पुरविण्याची जबाबदारी सरकारने घेतली तर मला असे वाटते की त्यांना जे मिळते ते अपुरे आहे असे म्हणण्याचे धाडस कोणीही करणार नाही. आमच्या विदर्भात अशी म्हण होती की 'ज्याच्या घरात भाकरी आणि डाळ आहे त्याला आयुष्याची काळजी नाही.' परंतु आता जेवणाकरिता तेल, मीठ, मिरची अशा अनेक गोष्टी या जीवनावश्यक गोष्टी झाल्या आहेत. या सर्व वस्तू सरकारने स्वस्त दराने मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्याचा प्रयोग एका राज्याने केलाही आहे, आणि तो यशस्वी झाला आहे. तेव्हा या सरकारनेही दरवर्षी दोन दोन, तीन तीन वस्तू ताब्यात घेऊन त्यांचा व्यापार करावा अशी माझी सूचना आहे.

मी किंमतीसंबंधी बोललो आहे. परंतु किंमती वाढल्या यापेक्षाही जी एक गंभीर बाब आहे ती म्हणजे जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तू आम्हाला कोठेही शुद्ध स्वरूपात मिळत नाहीत. एक कोंबडीचे अंडे सोडले तर इतर प्रत्येक वस्तूत भेसळ नाही असे दिसणार नाही. आपण चहा घ्या, औषधे घ्या, कोणतीही वस्तू घ्या, ती महाग तर आहेच, परंतु महाग किंमत देऊन शुद्ध स्वरूपातही मिळत नाही. पेनिसिलीनमध्ये खडू मिसळल्याचे प्रकरण आपल्याला माहीतच आहे. या सगळ्या गोष्टी बंद करण्याकरिता सरकारने पोलादी मनगटाने उपाययोजना केली पाहिजे. निदान ज्या वस्तू आपल्या राज्यात उत्पादन करू शकतो त्यांच्या बाबतीत तरी सरकारने त्या ताब्यात घेऊन ग्राहकांना स्वस्त दरात आणि शुद्ध स्वरूपात द्याव्या.

❑❑❑

एस. टी. महामंडळ : राष्ट्रीयीकरणात विदर्भ माघारला

(१६ मार्च, १९६७)

राष्ट्रीयीकरणासाठी रस्ते वाहतूक महामंडळ स्थापन करण्यात आले पण या राष्ट्रीयीकरणात विदर्भ माघारला आहे अशी खंत रा. सू. गवई यांनी १६ मार्च, १९६७ रोजी झालेल्या चर्चेत व्यक्त केली. या संदर्भातील विविध विभागातील अभ्यासपूर्ण आकडेवारीसह त्यांनी वस्तुनिष्ठ स्थिती स्पष्ट केली.

अध्यक्ष महाराज, ह्या १९६४-६५ सालच्या एस.टी. च्या अहवालात ज्या सुधारणांचा उल्लेख केला आहे. त्यासंबंधी समाधान व्यक्त करावयास काही हरकत नाही. पण त्याचबरोबर विदर्भाचा एक प्रतिनिधी म्हणूनच केवळ नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातील माझ्या अनेक सन्माननीय मित्रांनी आपली ही भावना बोलून दाखविली आहे की, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्या तुलनेत विदर्भामध्ये हा राष्ट्रीयीकरणाचा प्रयोग प्रगतिपथावर नाही. ह्या अहवालामध्ये निरनिराळ्या विभागात राष्ट्रीयीकरणाची टक्केवारी दिली आहे. १९६४-६५ साली पश्चिम महाराष्ट्रात ९०.०५ टक्के, मराठवाड्यात ८८.२५ टक्के आणि विदर्भात ४८.८० टक्के राष्ट्रीयीकरण झाले आहे. याचा अर्थ असा की, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या मानाने विदर्भ निम्म्याहून जास्त पिछाडीला आहे. यानंतर दररोज किती किलोमीटर वाहतूक होते या संबंधीची आकडेवारी येथे दिली आहे. पश्चिम महाराष्ट्रात ९९.२६ कि.मी., मराठवाड्यात ९३.५१ कि.मी. आणि विदर्भात ४५.६४ कि.मी. इतकी वाहतूक दररोज होते. यावरून विदर्भात ह्या बाबतीतही पुष्कळच मागासलेपणा आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. तेव्हा अशा परिस्थितीत आतापर्यंत वाहतुकीच्या राष्ट्रीयीकरणाच्या बाबतीत जी प्रगती झालेली आहे. तिच्याबद्दल संपूर्ण समाधान व्यक्त करूनही विदर्भ मात्र पिछाडीस आहे असे म्हटले तर त्याबद्दल कोणी राग मानू नये. ही परिस्थिती लक्षात घेऊनच शासनाने विदर्भाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे अशी नुकतीच सन्माननीय सभासद श्री. अंजीकर यांनी सूचना केली; ती युक्त अशीच आहे असे कोणीही म्हणेल. ह्या बाबतीत एक अडचण ह्या अहवालाच्या पान १० वर सांगितली आहे. त्यात असे म्हटले आहे की, खासगी वाहतूक करणाऱ्यांच्या परवान्यांची मुदत संपल्यानंतरच त्यांच्याकडील मार्ग ताब्यात घेण्याचे ठरविण्यात आले होते आणि त्याप्रमाणे मोटार वाहन कायद्याच्या प्रकरण ४ खाली, मोटार वाहन कायद्याच्या प्रकरण ४-अ अनुसार तयार केलेल्या मूळ योजनेतील ३६ मार्ग ताब्यात घेण्यासाठी कॉर्पोरेशनने अर्ज केले. नागपूरच्या प्रादेशिक वाहन अधिकाऱ्यांच्या ९-१० ऑक्टोबर १९६४ रोजी भरलेल्या बैठकीत या अर्जाचा विचार करण्यात येऊन खासगी वाहतूक करणाऱ्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण करण्याऐवजी १ नोव्हेंबर, १९६४ पासून सर्व ३६ मार्गावरील वाहतुकीसाठी कॉर्पोरेशनला परवाने देण्याचे ठरविण्यात आले. ह्या ३६ मार्गावरील वाहतुकीशी संबंधित असलेल्या एक सोडून सर्व ३-४ खासगी वाहतूकदारांनी हायकोर्टात अर्ज करून मनाई हुकूम मिळविला. प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांचा हुकूम संविधानाप्रमाणे कायदेशीरपणे अस्तित्वात आलेला नाही या मुद्यावर हायकोर्टाने रद्द ठरविला.

यामुळे ज्या मार्गाबाबत रिट अर्ज केला नव्हता त्या मार्गाखेरीज इतर मार्गावर अहवाल वर्षी वाहतूक सुरू झाली नाही. वास्तविक सरकारने ह्या निर्णयाविरुद्ध सुप्रीम

एचबी ११८०—१६अ

कोर्टाकडे जावयास पाहिजे होते किंवा नमते तरी घ्यावयास पाहिजे होते. पण ह्या दोन्हीपैकी एकही मार्ग न पत्करता सरकारने खासगी वाहतूकदारांशी समझोता केला आणि काही रस्ते आम्ही घेतो आणि काही रस्ते तुम्ही घ्यावेत असे ठरविले. ही गोष्ट शासनाच्या दृष्टीने बरी आहे असे मला वाटत नाही. तेव्हा ही जी एक तांत्रिक अडचण विदर्भात कमी रस्ते घेण्याच्या बाबतीत सांगितली आहे ती संयुक्तिक आणि समाधानकारक आहे असे मला वाटत नाही.

रस्ते घेण्याच्या बाबतीत एवढे बोलल्यानंतर ज्या रस्त्यावर एस. टी. च्या गाड्या आहेत त्यांच्याबाबतीतही प्रवाशांसाठी ज्या सुखसोयी आणि सवलती देण्यात येतात त्याच्या बाबतीत विचार केला तरी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात ज्या सुखसोयी आहेत त्यांच्या मानाने विदर्भात फारच दुर्लक्ष झालेले आहे असे दिसून येते. ज्या ठिकाणी एस.टी. ची गाडी थांबते त्या ठिकाणी पाण्याची सोय, संडासाची सोय किंवा एस.टी. डेपो अशा सोयी विदर्भात तालुक्याच्या ठिकाणी मुळीच नाहीत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. जिल्हा स्तरावर पाहिले तर नागपूर, अमरावती किंवा यवतमाळ हे जिल्हे सोडले तर बुलढाण्यात अशा सोयी नाहीत. पश्चिम महाराष्ट्रात लहान लहान गावात ज्या सोयी आहेत त्या विदर्भात तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणीही नाहीत ही गोष्ट मला मोठ्या खेदाने येथे नमूद करावी लागत आहे.

यानंतर खालच्या सभागृहात रेटच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता आणि मीही ह्या सभागृहात हा प्रश्न उपस्थित केला होता. खासगी मालक एस.टी.पेक्षा ७-८ पैशांनी जास्त दर चार्ज करीत असल्यामुळे जनतेकडून लाखो रुपये जास्त घेत आहेत याकडे शासनाचे लक्ष वेधूनही शासनाने त्या बाबतीत काही केले नाही. दरामध्ये ही जी डिस्पॅरिटी आहे ती नाहीशी करण्याचा शासन प्रयत्न करील असे आश्वासन देण्यात आले असूनही अजूनपर्यंत त्याबाबत काहीही करण्यात आलेले नाही.

यानंतर पान ४ वर कॉर्पोरेशन आणि समित्या असे एक प्रकरण आहे. ह्या ज्या कॉर्पोरेशनच्या समित्या आहेत त्यांचे एकंदर काम पाहिले म्हणजे आपण संस्थाने आणि वतने कायद्याने नष्ट केली आणि ह्या समित्यांच्या रूपाने ही नवीन संस्थाने निर्माण केली आहेत किंवा काय असे वाटू लागते. ह्या समितीचे सदस्य जेव्हा एस.टी.च्या गाड्यातून जातात तेव्हा ते एस.टी. च्या कामासाठी जातात की, आपल्या बायकांना घेऊन दवाखान्यात जातात याचा तपास केला पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते. ह्या बाबतीत कोणाकडे तक्रार करावी हे सुद्धा कळत नाही. म्हणून पक्षीय दृष्टिकोनातून ह्या प्रश्नाकडे न पाहता निःपक्षपाती-पणाने ह्या समित्यांवर लोक घेतले पाहिजेत व शक्य तो एकजिनसीपणा कसा येईल ह्या दृष्टीने ह्या समित्या नेमल्या पाहिजेत.

माझ्या आधी ह्या वाहतुकीविरुद्ध जनतेच्या ज्या निरनिराळ्या तक्रारी असतात त्या अनेक सन्माननीय सभासदांनी मांडलेल्या असल्यामुळे मी त्यांची पुनरावृत्ती करू इच्छित नाही. पण एक मुख्य अडचण मी सभागृहासमोर मांडू इच्छितो. बस स्टँण्डवर ज्या निरनिराळ्या ठिकाणासाठी सुटणाऱ्या गाड्या असतात त्या ठिकाणी कोणती गाडी कोठे जाणारी आहे हे उतारूंना कळत नाही. प्रवास करणारे सर्वच लोक काही सुशिक्षित नसतात. प्रवाशांनी रिझर्व्हेशन करताना सर्व पैसे आधीच भरलेले असल्यामुळे त्यांना जर गाडी कोठे जात आहे हे कळले नाही व ते मागे राहिले तर त्यांचे पैसे बुडतात व अशा कारणामुळे एस.टी.ला ५०० ते ६०० रुपये मिळतात. परतावा मागण्यासाठी वेळ फार ठेवलेला नसल्यामुळे शेवटी प्रवाशांना हे तिकिटाचे पैसे गमवावे लागतात. तेव्हा उतारूंना आपला नंबर कोठे आहे, गाडी कोठे जाणारी आहे व ती कोठे उभी राहील याबाबत

स्पष्ट मार्गदर्शन करण्याची व्यवस्था ताबडतोब होण्याची आवश्यकता आहे. आणि गिऱ्हाईक चुकले तरी त्यांना ३-४ रुपये गमवावयाचे काय? तेव्हा त्यांच्याकडून पैसे वसूल करणे हे बरोबर नाही अशी मी सूचना करू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, विदर्भातील मोटार व्यवसायासंबंधी येथे सांगण्यात आले. अमरावती सिटी बस सुरू करण्याचे ठरविले त्याप्रमाणे ती सुरू करण्यात आली. परंतु विदर्भामध्ये नवे रस्ते घेण्याची तरतूद नाही. त्या ठिकाणी सिटी बस सुरू केली तरी पिक-अप सेंटर्स नाहीत. अमरावतीसारख्या शहरात कॉलेजमध्ये जाणारी मुले आहेत, मुली आहेत. तसेच इतर स्त्रियाही या गाडीमधून प्रवास करतात पण ठिकठिकाणी त्यांना उभे राहण्यासाठी पिक-अप सेंटर्स नाहीत ही गोष्ट बरोबर नाही. मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्र येथे जशा सोयी आहेत तशा आमच्याकडे झाल्या पाहिजेत तेव्हा त्या दृष्टीने ह्या सूचनांचा विचार करणे आवश्यक आहे.

शेवटची सूचना मागसलेल्या वर्गाबद्दल करावयाची आहे. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या दर्जाच्या नोकरांच्या बाबतीत पाहिले तर तिसऱ्या वर्गाची ११ टक्क्यांपैकी एक टक्का आणि दुसऱ्या वर्गाची २ टक्क्यापर्यंत वर्गवारी आलेली आहे. तेव्हा जो उद्देश आहे तो पूर्ण करावा अशी सर्वसाधारण सूचना करतो व माझे भाषण संपवितो.

❑❑❑

राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

(१३ मार्च, १९६७)

शेती हा उद्योगधंदा मानून त्या उद्योगाला सवलती मिळाव्या अशी मागणी राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना श्री. रा. सू. गवई यांनी १३ मार्च, १९६७ रोजी विधानपरिषदेत केली.

अध्यक्ष महाराज, राज्यपालांच्या भाषणासंबंधी आमची अशी अपेक्षा होती की, हे भाषण धोरणाला धरून असेल. पण ती फोल ठरली आहे. एखादा व्यापारी दिवाळीच्या वेळी आपल्या जमाखर्चाचा आढावा काढतो. लक्ष्मीपूजनाच्या वेळी खातेवही तयार करतो त्याप्रमाणे हे राज्यपालांचे भाषण म्हणजे एका मोठ्या व्यापाऱ्याने गेल्या वर्षाच्या कार्याचा एक आढावा घेतलेले आहे, ही एक खातेवही आहे असेच मोठ्या दुःखाने म्हणावे लागते. असे म्हणण्याचे कारण असे की, धोरणासंबंधाने आम्ही ज्या अपेक्षा केल्या होत्या त्यांच्या बाबतीत स्पष्ट असा खुलासा ह्या भाषणात एकाही शीर्षकाखाली दिसून येत नाही. ह्या भाषणाच्या ३ ऱ्या प्याऱ्यात असे म्हटले आहे की, आपला देश कृषिप्रधान असल्यामुळे आणि विशेषत: महाराष्ट्र राज्य हे अन्नधान्याच्या दृष्टीने तुटीचे असल्यामुळे शेती उत्पादनासाठी निरनिराळ्या सवलती देण्याचे सरकारने ठरविले आहे. पण शेती हा एक धंदा ह्या दृष्टीने धोरणात्मक असा खुलासा ह्या भाषणात कोठेही दिसून येत नाही. सखोल शेती आणि विस्ताराची शेती ह्याविषयीही ह्या भाषणात काही उल्लेख नाही. ह्या भाषणात फक्त विस्ताराच्या ज्या योजना आहेत त्यांचा केवळ नावापुरता उल्लेख करण्यात आला आहे. वास्तविक, आपल्या राज्यात, ठराविक मर्यादेच्या पलीकडे पाणी उपलब्ध होण्याची शक्यता नसल्यामुळे अधिक जमीन पाण्याखाली

येण्याची शक्यता नाही असे अनेक तंत्रज्ञांनी मत व्यक्त केले आहे. परंतु ह्या गोष्टीचा उल्लेख ह्या भाषणात टाळण्यात आला आहे. शेती धंद्याच्या दृष्टीने आपल्या राज्यात रब्बीची योजना लोकप्रिय झाल्याचा उल्लेख केला आहे. येथे असे म्हटले आहे की, कृषी उत्पादन वाढविण्यासाठी १९६५-६६ सालच्या रब्बी हंगामात मोफत पाणीपुरवठ्याची सवलत देण्यात आली होती व ती इतकी लोकप्रिय झाली की, रब्बीच्या लागवडीखालील क्षेत्रात २.२५ लक्ष एकरांपासून ४.७२ लक्ष एकरांपर्यंत म्हणजे ११० टक्क्यापर्यंत वाढ झाली. ह्या बाबतीत नामदार मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणांत असे जाहीर केले होते की, रब्बीच्या लागवडीसाठी सरकार डिझेल ऑईल पम्प, इंजिन्स, कुपर इंजिन्स महाग करण्यात व्यापाऱ्यांना सहकार्य देणार नाही.

(सभापती : माझ्या माहितीप्रमाणे नामदार मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात डिझेल ऑईलचा उल्लेख केला होता. सन्माननीय सभासदांनी बाकीच्या गोष्टी मुख्यमंत्र्यांच्या तोंडात घालू नयेत.)

मला असे म्हणावयाचे आहे की, पम्पापासून तो पाईप्स, विहिरी खोदणे ह्या बाबतीत शेतकऱ्यांना अडचणी आल्यामुळे ह्या लोकप्रिय योजनेचा फायदा शेतकऱ्यांना घेता आला नाही. ह्या कारणामुळे ह्या भाषणाबद्दल अपेक्षेप्रमाणे समाधान व्यक्त करता येत नाही. थोडक्यात सांगावयाचे तर ह्या राज्यात शेती धंद्याला पाहिजे तशी सरकारची मदत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्याला हमी वाटत नाही. पिकांचा विमा राज्य सरकारतर्फे उतरविला जात नाही, त्यामुळे अधिक उत्पादन काढण्यासाठी शेतकऱ्याला उत्साह वाटत नाही. ह्या गोष्टींचाही ह्या भाषणात कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. शेती धंद्याला आवश्यक अशा बी-बियाणे, खते आणि पाणी ह्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत, पण खताच्या बाबतीत सरकार जो व्यवहार करते तो निरनिराळ्या एजन्सीच्या मार्फत करीत असल्यामुळे हे एजंटस् खतांचा काळाबाजार करीत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना खते मिळत नाहीत. त्याचप्रमाणे बी-बियाणेही वेळेवर मिळत नाही.

अध्यक्ष महाराज, दुय्यम अन्न ज्याला म्हणता येईल अशा दुधाच्या पुरवठ्याचा ह्या भाषणात उल्लेख आहे. दुधाचा पुरवठा काही प्रमाणात सरकारमार्फत केला जात आहे. याबद्दल जरी थोडेसे समाधान वाटत असले तरी आज किती तरी विभागांत दूध मिळत नाही. ज्या ज्या ठिकाणी दुधाचा पुरवठा होतो त्या त्या ठिकाणी असे दिसून येते की, दूध वितरण केंद्रे सुखवस्तू लोक ज्या ठिकाणी राहतात तेथे आहेत. हे लोक बाहेरून दूध मागवू शकतात पण ज्या भागात स्वस्त दूध मिळण्याची आवश्कता आहे तेथे हे दूध मिळत नाही. या गोष्टीकडे सरकारचे अद्याप लक्ष गेले नाही. ही खेदाची गोष्ट आहे.

(सभापती : नागपूरमध्ये जेथे गरीब वस्ती आहे तेथे दुधाचे केंद्र नाही असे आपण सांगू शकाल काय?)

मी अमरावती येथे राहतो आणि तेथे दुधाची स्कीम आहे. त्या ठिकाणी गरिबांच्या वस्तीत दूध केंद्र नाही. ही गोष्ट खोटी असेल तर ...

(सभापती : मी एवढ्याकरिता विचारले की, त्यांची जर काही तक्रार असेल तर ती दूर व्हावी.)

धान्याचा दुय्यम पुरवठा म्हणून दुधाचा पुरवठा होत नसेल तर ह्या लोकांनी काय करावे? अमरावतीत गरिबांच्या वस्तीत दूध पुरवठ्याची सोय नाही. अध्यक्ष महाराज, ह्या ठिकाणी राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख आहे की, दुष्काळाच्या निमित्ताने जो खर्च करावयाचा आहे त्यासाठी १४ कोटी रुपयांची तरतूद सरकारने केली आहे आणि मदत मिळावी म्हणून हा कार्यक्रम केंद्र सरकारकडे पाठविला आहे. सन्माननीय सभासद श्री. ओगले यांनी ह्या बाबतीत जो आक्षेप घेतला त्याची पुनरुक्ती न करता मी एवढेच सांगू इच्छितो की, ही जी रक्कम ठेवली आहे ती

जास्त आहे पण त्याचे जे डिस्ट्रीब्युशन बी-बियाणे, खते वगैरेसाठी केले आहे ते बरोबर नाही. गरीब शेतकऱ्यांना तकावी देताना त्यांची कुवत लक्षात घेतली जाते. तकावी देण्यासाठी जमानत लागते आणि ज्यांना खरोखरी तकावीची जरूरी आहे त्यांना ती मिळत नाही. युद्धपातळीवर जर आपल्याला अन्नधान्याचा प्रश्न हाताळावयाचा असेल तर गरीब शेतकऱ्यांना जमानत नसली तरी तकावी मिळाली पाहिजे. तेव्हा तकावीचे वाटप सर्वांना सारख्या प्रमाणात झाले तरच हा अन्नधान्याचा प्रश्न सुटू शकेल एरवी तो सुटू शकणार नाही.

अध्यक्ष महाराज, ह्या ठिकाणी वस्तूंच्या भावाचा उल्लेख करून ग्राहक सहकारी भांडार काढून वस्तूंच्या किमती खाली आणण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे असे राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात म्हटले आहे. अर्थात त्या भांडारामध्ये किती वस्तूंचा समावेश केला आहे हा वादाचा प्रश्न असला तरी ही गोष्ट स्वागतार्ह आहे असे मी म्हणेन, परंतु मूळ रोग आहे तो नुसती मलमपट्टी लावून बरा होणार नाही. अशी सहकारी भांडारे शहरामध्ये काढली तरी आवश्यक वस्तूंचे भाव उतरतील ही भ्रामक कल्पना आहे. तेव्हा एका गोष्टींचा उल्लेख करून भाव उतरवण्याचा प्रयत्न केला असे म्हणणे हे प्रतिष्ठेचे लक्षण नव्हे. जीवनावश्यक वस्तू आहेत त्यामध्ये भुईमुगाचे तेल, जवसाचे तेल, डाळी, कडधान्ये वगैरे गोष्टी येतात. मला असे म्हणावयाचे आहे की जो जिन्नस कच्च्या मालाच्या स्वरूपात आपल्या येथे आहे त्याचा पक्का माल तयार करण्याचा व्यापार किंवा धंदा सरकारने आपल्या ताब्यात का घेऊ नये? एकाधिकार पद्धतीने ज्वारीची खरेदी करण्याचे सरकारने ठरविले आणि ही खरेदी यशस्वीपणे होत आहे, हे कबूल केले पाहिजे. हा जो प्रयोग आहे तो इतर जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत आम्ही सुरू केला आहे किंवा कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात करण्याचे आम्ही ठरविले आहे, ही गोष्ट राज्यपालांच्या भाषणात आली असती तर ती स्वागतार्ह ठरली असती. सहकारी ग्राहक भांडारामुळे वस्तूंचे भाव उतरतील हे म्हणणे वास्तवतेला धरून आहे असे मला वाटत नाही.

दुसरी गोष्ट मला शेतमजुरासंबंधी सांगावयाची आहे. चित्रपटगृहातील नोकरांसाठी किमान वेतन लावले आहे असे येथे सांगितले आहे. राज्यामध्ये किती लोक सिनेमाच्या धंद्यात काम करीत आहेत? तेव्हा सिनेमातील नोकरांकरिता किमान वेतन लावले आहे असे म्हणणे हा अजब प्रकार आहे. आज जे मजदूर शेतीवर काम करतात त्यांची संख्या किती तरी जास्त आहे.

(सभापती : तो प्रयत्न झाला आहे. शेतमजुरांना किमान वेतन कायदा लावण्याचा प्रयत्न झाला आहे पण तो यशस्वी झाला नाही.)

प्रयत्न झाला असला तरी फलनिष्पत्ती काय? त्याला काय फायदा झाला यावरून फलनिष्पत्ती योजावयाची असते. आज शेतीच्या धंद्यामध्ये जे मजूर काम करतात त्यांना वाऱ्यावर सोडून द्यावयाचे काय? ४८ टक्के शेतमजूर आहेत त्यांच्या वेतनाचा प्रश्न सरकारने हाती घेतलेला नाही.

(सभापती : एकूण ४५ लक्ष १० हजार शेतमजूर महाराष्ट्रात आहेत.)

विदर्भामध्ये ५२ टक्के शेतमजूर आहेत आणि महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण कमीजास्त असू शकेल. परंतु संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शेतमजुरांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उभा आहे परंतु दुर्दैवाने शेतमजुरांच्या प्रश्नाला जेवढे महत्त्व द्यावयास पाहिजे तेवढे दिलेले नाही.

सभापती : किमान वेतन कसे लागू करावयाचे ते सांगावे. सगळीकडील शेतमजुरांना ते कसे लागू करावयाचे?

The real question is how to control the agricultural labour, which is scattered, unlike in a factory or industry. Rather than mention the problem you should contribute to the solution of the problem.

श्री. रा. सू. गवई : अध्यक्ष महाराज, यासंबंधी या वेळी सूचना न करता सभागृहाचा वेगळा वेळ घेऊन मी जरूर सूचना करीन.

दुसरी गोष्ट अशी की, आपल्या राज्यात कमालीची दप्तरदिरंगाई आहे. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे आणि इतर राज्यापेक्षा या राज्यात भ्रष्टाचार आणि दप्तरदिरंगाई कमी असली तरी ही दप्तर दिरंगाई आणि भ्रष्टाचार दूर करण्यासंबंधी काय योजना केली आहे याचा राज्यपालांच्या भाषणात काही उल्लेख दिसलेला नाही.

दुसरी एक गोष्ट प्रकर्षाने मला जाणवली ती ही की, ह्या अभिभाषणामध्ये समाजकल्याणाच्या दृष्टीने शेड्युल्ड कास्ट, शेड्युल्ड ट्राईब्ज आणि इतर मागासलेले लोक यांच्यासंबंधी एकही शब्द घातलेला नाही.

अध्यक्ष महाराज, मी ज्या उप सूचना मांडलेल्या आहेत त्याला धरून भाषण केले आहे तेव्हा ह्या सूचनांचा योग्य विचार होईल अशी आशा करून मी माझे भाषण पुरे करतो.

❑❑❑

वीज कामगारांचा संप

(३० मार्च, १९६७)

महाराष्ट्रातील वीज कामगारांच्या संपावर विधानपरिषदेत ३० मार्च १९६७ रोजी चर्चा झाली. ही चर्चा संपण्यापूर्वीच संप मागे घेतल्याची घोषणा झाली. त्यावेळी हा विषय दादासाहेबांनी अतिशय कौशल्याने संपकरी वीज कामगारांवर आकसाने कारवाई होऊ नये असा वळविला. एक मुत्सद्दी अनुभवी राजकारणीच आपल्या भाषणाची दिशा अशी वळवू शकतो.

अध्यक्ष महाराज, वीज कामगारांचा जो संप चालू होता तो आता तडजोड होऊन संपला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. यामुळे चर्चेकरिता आता एकप्रकारे मोकळे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे या चर्चेत ज्या ज्या सन्माननीय सभासदांनी भाग घेतला त्यांच्या भाषणाचा मतितार्थ जर आपण लक्षात घेतला तर आपल्याला असे दिसून येईल की, त्यांच्यापैकी कोणीही या संपाचे समर्थन केलेले नाही. आताच सन्माननीय सभासद श्री. बाळबुधे जे बोलले त्यांच्या एका मताशी मी सुद्धा सहमत आहे. अध्यक्ष महाराज, ह्या संपाच्या बाबतीत ज्या घटना घडल्या त्यांचा विचार केला तर असे दिसून येईल की, ज्या संघटनांचा ह्या संपाशी संबंध होता अशाच राजकीय पक्षाच्या लोकांनी निवडणुकीमध्ये भाग घेतला होता असे नाही तर ज्यांचा ह्या घटनांशी संबंध नव्हता अशाही पक्षांच्या लोकांनी निवडणुकीत भाग घेतलेला

होता. तेव्हा निवडणुकीत आपल्याला अनुकूल परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून हा संप घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला असा जो एक आभास निर्माण करण्यात आला आहे त्या विचारसरणीशी मी सहमत नाही. तेव्हा सुक्याबरोबर ओलेही जळते असे होणे योग्य नाही. निवडणुका जिंकण्यासाठी राजकीय हानी व्हावी, जनतेचे हाल व्हावेत, राष्ट्रीय उत्पादनात खंड पडावा अशा विचारसरणीच्या आहारी राजकीय पक्ष गेलेले नाहीत. असा विचार जर कोणी केला असेल तर तो स्तुत्य आहे असे म्हणता येणार नाही. तेव्हा जे विरोधी राजकीय पक्ष आहेत त्यांना ह्या संपाचे निवडणुकांसाठी भांडवल केले असे म्हणणे योग्य होणार नाही. निवडणुकांच्या आधी हा संप मिटावा, विशेषत: जनतेचे आणि शेतकऱ्यांचे जे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले त्यात अधिक भर पडू नये, घातपाती प्रकार बंद पडावे यासाठी राज्यकर्त्या पक्षाने वाटाघाटी केल्या आणि सर्व प्रकारचे प्रयत्न केले ह्या बाबतीत मी खोलात जात नाही. त्याचप्रमाणे कोणत्या पक्षाच्या संघटनांनी हा संप घडवून आणला ह्याही प्रश्नात मी शिरू इच्छित नाही. पण ह्या संपामुळे शेतकऱ्यांचे, लहान-लहान उद्योगधंद्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले ह्याबद्दल कोणत्याही माणसाला दु:खच झाले असेल यात शंका नाही. अशा प्रकारे कोणत्या उद्योगधंद्याच्या आणि कामगारांच्या मध्ये जर काही वाद निर्माण झाला तर मध्यस्थी करण्याचा पायंडा आहे तोही प्रयत्न झाल्यानंतर कालेलकर ॲवार्ड झाला तो तरी अंमलात आणावयास हवा होता असे माझे प्रामाणिक मत आहे. एकदा हा संप मिटल्यानंतर कामगारांच्या बाबतीत कोणत्याही बाबतीत सूडबुद्धी दाखविली जाऊ नये एवढेच मला वाटते. संप झाले तरी त्यामुळे जनतेचे आणि देशाचे नुकसान होणार नाही याची प्रत्येक नागरिकाने दक्षता घेतली पाहिजे. ह्या बाबतीत मी सुवर्णमध्य भूमिका अशासाठी घेत आहे की, आतापर्यंत जे काही नुकसान झाले असेल ते झाले, पण आता यापुढे तरी कोणत्याही मजुरांच्या बाबतीत सूडबुद्धीने व्हिक्टीमायझेशन केले जाणार नाही अशी उदार बुद्धी अधिकारी वर्गाने दाखविली पाहिजे. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन काही समाजकंटक जर आपल्यासाठी फायदा करून घेत असतील तर अशा प्रवृत्तीचा शोध केला पाहिजे. तेव्हा अध्यक्ष महाराज सभागृहाचा अधिक वेळ न घेता मला शेवटी एवढेच सांगावयाचे आहे की, ज्यांनी ह्या संपात भाग घेतला त्यांना व्हिक्टिमाईझ केले जाणार नाही अशी खात्री वाटेल असे उदार धोरण स्वीकारण्यात यावे.

❑❑❑

महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद

(९ नोव्हेंबर, १९६७)

सौजन्य हा रा. सू. गवई यांच्या जीवनाचा व राजकारणाचाही स्थायीभाव होता. विरोधकांसमवेत राहत असताना ते सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे चांगले संबंध राखून असत. त्यामुळेच त्यांच्या बोलण्यातून वा वागण्यातूनही कधीही आक्रस्ताळी आक्रमता दिसत नसे. पण सत्ताधाऱ्यांनाही अधिकारवाणीने सुनावणारा नेता म्हणून त्यांचा विरोधकांनाही आधार वाटत असे. मात्र सीमा प्रश्नावर सरकारच्या धोरणाला विरोध करताना त्यांनी जे भाषण केले, त्यातही आक्रमकता झळकत होती. आपल्या भाषणातून त्यांनी महाराष्ट्र सरकारने या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एक आयोग नेमायला पुढाकार घेणे, त्यानंतर एक सदस्यीय आयोग स्वीकारणे व त्या आयोगाच्या कार्यकक्षा नीट न तपासणे, यासाठी महाराष्ट्र सरकारला दोष दिला.

म्हैसूर राज्याने आयोग कधीही मागितला नव्हता. उलट आपण तो मागितला होता आणि त्या आयोगाचा अहवाल आपल्या विरोधात गेला, याकडे लक्ष वेधत असताना त्यांनी महाराष्ट्रातून मध्यप्रदेशात गेलेल्या बैतूल, छिंदवाडा, भैसदेही या भागाच्या व्यथाही ९ नोव्हेंबर, १९६७ रोजी आवर्जून मांडल्या.

अध्यक्ष महाराज, महाजन कमिशनचा जो अहवाल प्रसिद्ध झालेला आहे त्याचा दुसरा भाग अद्याप प्रसिद्ध व्हावयाचा आहे. ह्या पहिल्या भागामध्ये मराठी भाषिक लोकांवर अन्याय झाला याची सारी माहिती आणि ह्या अहवालाचा सूर लक्षात आला असता, त्यामध्ये न शिरता मी माझ्या भाषणाचे तीन भाग पाडणार आहे. एक गोष्ट अशी की, महाराष्ट्र सरकारला ज्या चुका टाळता आल्या असत्या अशा अक्षम्य चुका त्यांनी टाळलेल्या नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, हा अहवाल प्रसिद्ध झाला त्यामध्ये सीमा भागावर आणि महाराष्ट्र सरकारवर अन्याय झालेला आहे तेव्हा त्यासंबंधी करावी लागणारी कारवाई आणि उपाय ही होय. तिसरी गोष्ट अशी की, खालच्या आणि वरच्या सभागृहामध्ये ५ एप्रिल १९६७ रोजी आपण एकमताने ठराव पास केला त्यामध्ये काँग्रेस पक्षाचाही समावेश होता. त्यावेळी महाराष्ट्रातील सर्व पक्षातील लोकांना आणि जनतेला सरकारने विश्वासात घेतले होते परंतु त्यानंतरची जी कृती आहे त्यासंबंधी जनतेमध्ये गैरविश्वास असून त्यांनी तो प्रगट केला आहे असे म्हणावे लागेल. एक माणसाचे कमिशन असावे की नसावे या संबंधी चर्चा झाल्यानंतर या धोरणामुळे हा प्रश्न सुटेल की नाही याची शहानिशा न करता महाजन कमिशनची

नियुक्ती ह्या सरकारने स्वीकृत करून घेतली. दुसरी गोष्ट अशी की, एका माणसाच्या हाती ह्या प्रश्नाचे भवितव्य द्यावे किंवा दोन माणसाचे अगर तीन माणसाचे कमिशन असावे ह्या संबंधी जनतेला विश्वासात न घेता किंवा निरनिराळ्या पक्षाना विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आला. ह्या बाबतीत त्यांना विश्वासात घेणे आवश्यक होते. वृत्तपत्रातून आणि चर्चेतून जे वृत्त ऐकले जाते त्यावरून महाजन कमिशनने सीमा भागातील जनतेला न्याय दिलेला नाही असे दिसते. महाराष्ट्राला न्याय दिलेला नाही तेव्हा ह्या प्रश्नासंबंधी आयोग पूर्वग्रहदूषित असावा किंवा केंद्राकडून त्यांच्यावर दडपण आले असावे असे दिसून येते. ही गोष्ट लक्षात घेतली तर एका माणसावर भरवसा ठेवावयाचा की तीन माणसांवर भरवसा ठेवावयाचा हा प्रश्न लोकांना विश्वासात घेऊन सोडविता आला असता. ह्या रिपोर्टाच्या बाबतीत पहिली गोष्ट अशी आहे की, अशाप्रकारचे कमिशन नेमण्यास पहिल्या प्रथम म्हैसूर सरकारची तयारी नव्हती उलटपक्षी कमिशनची नेमणूक करावी आणि हा प्रश्न मिटवावा असा आपला आग्रह होता. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर सीमा भागाची परिस्थिती अधिकच कठीण होणार हे सांगण्यास कोणा ज्योतिषाची जरूरी नाही. तो अहवाल आपल्या विरुद्ध जाणार. उलटपक्षी म्हैसूरची परिस्थिती अशी आहे की, त्यांना कमिशन नको होते तेव्हा त्या दृष्टीने बोलण्यास आपल्याला चांगली संधी आहे असे मला वाटत नाही.

दुसरी गोष्ट अशी की, हा अहवाल आता प्रसिद्ध झाला आहे. तेव्हा ह्या अहवालामधील ज्या चुका असतील त्यांचा उल्लेख करून हा प्रश्न मिटविता यावयाचा नाही. हिंदीमध्ये अशी म्हण आहे की, "कहूं तो बाप कुत्ता खाय ना कहू तो मा मरी जाय." सांगितले तर बाप मारील आणि नाही तर आई मरून जाईल अशी आमच्या सरकारची परिस्थिती झाली आहे. एक तर हा अहवाल सपशेल नामंजूर करावयास पाहिजे, पण कमिशनबद्दल आग्रह आपण धरला आहे आणि दुसरी गोष्ट अशी की, हा अहवाल प्रसिद्ध झाला आहे तो स्टॅट्यूट केला तर महाराष्ट्र सरकार तोट्यात जाणार आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने निकाल लावला नाही आणि महाजन कमिशनच्या अहवालातील शिफारशी नामंजूर केल्या नाहीत तर आहे ह्या परिस्थितीत आमचा तोटा आहे, असे माझे मत आहे.

दुसरी गोष्ट मला अशी सांगावयाची आहे की हा अहवाल प्रसिद्ध झाला त्या वेळी आमची कारवाई काय असावी या संबंधीचा प्रश्न चर्चिला गेलेला नाही आणि आपले बरेचसे प्रश्न आपण आपल्या सौजन्याने गमाविले आहेत. आम्ही अधिक सौजन्य दाखविले म्हणून आमच्या पदरात तोटा आला आहे. सौजन्य वाईट आहे, असे शहाणा मनुष्य म्हणत नाही. परंतु सौजन्याच्या गोंडस नावाखाली अन्याय होत असेल तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे. माझ्या मताप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक समस्या सोडविण्याबाबत आपले सौजन्य आड आलेले आहे. ह्या बाबतीत देशातील अनेक प्रांताचा उल्लेख केला तर तो अस्थानी होणार नाही. हिंदी ही राष्ट्रभाषा असावी असे म्हटल्यानंतर काही प्रांतात दंगल होते आणि आमचे सुब्रमण्यम राजीनामा देतात. ज्या संघटनेचा राजकीय पक्ष आहे तेथील लोक मध्यस्थी करतात. तेव्हा जेथे महाराष्ट्र आणि म्हैसूरचा प्रश्न आहे तेथे श्री. हनुमंतप्पा आजसुद्धा डरकावण्या देऊन असे सांगत आहेत की, म्हैसूरवर मी अन्याय होऊ देणार नाही. आपणसुद्धा त्याच पद्धतीने जावे असे मी म्हणत नाही. परंतु हा प्रश्न सौजन्याने सुटणार नाही एवढेच मला म्हणावयाचे आहे. नामदार उप मुख्यमंत्री आता येथे उपस्थित आहेत. तेव्हा त्यांच्याकडून एक गोष्ट आम्हाला समजली पाहिजे व ती अशी की, या अहवालाचा जो निर्णय आहे तो आपल्यावर बंधनकारक आहे की काय? त्या विरुद्ध आपल्याला अपील करता येण्यासारखे आहे काय? हा अहवाल आपल्यावर बंधनकारक राहील अशी काही बोलणी झाली आहे की काय? आता हा अहवाल आल्यामुळे हा

प्रश्न कायमचा निकालात निघाला आहे की काय, यासंबंधीचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. आता केंद्राच्याच मनात हा प्रश्न सोडविण्याचे असते तर त्यासाठी कमिशन नेमण्याची काही गरज नव्हती. हा प्रश्न लांबणीवर टाकण्यासाठीच या कमिशनची नेमणूक करण्यात आली असे माझे तरी स्पष्ट मत आहे. तेव्हा हा प्रश्न लोकसभेत गेला तरी तेथे आम्हाला न्याय मिळेल अशी शाश्वती आम्हाला वाटत नाही. परंतु लोकसभेत हा प्रश्न सुटावा असे जर आपल्याला वाटत असेल तर लोकसभेवर जनमनाचे दडपण येईल असे आपण पाहिले पाहिजे, या बाबतीत नामदार मुख्यमंत्री उद्या एक ठराव मांडणार आहेत. परंतु ५ एप्रिलच्या ठरावाची जी गत साली तीच या ठरावाची होईल. नामदार मुख्यमंत्री जो ठराव उद्या या सभागृहासमोर मांडणार आहेत तो जरी पास झाला तरी त्यामुळे आपल्याला न्याय मिळेल असे जनतेला आता वाटत नाही. तेव्हा हा प्रश्न सोडविण्यासाठी लोकसभेवर जनतेच्या मताचे दडपण आणले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. ते आणण्यासाठी सत्तेवरच्या लोकांनी सर्व लोकांना विश्वासात घेतले पाहिजे, दिनांक ५ एप्रिलचा ठराव करताना त्यांनी सर्व पक्षांना विश्वासात घेतले होते. परंतु महाजन कमिशनच्या नेमणुकीला संमती देताना नामदार मुख्यमंत्र्यांनी सर्वांना विश्वासात घेतले नाही. या कमिशनच्या टर्म्स ऑफ रेफरन्स ठरविण्याच्या बाबतीत सर्वांना त्यांनी विश्वासात घेतले नाही. या प्रश्नाच्या बाबतीत सर्वच पक्षाचे एकमत आहे. कोणाचेही दुमत नाही. काँग्रेस पक्षाचासुद्धा यात समावेश आहे. सीमा भागातील मराठी भाषिक लोकांना न्याय मिळाला पाहिजे असे सर्वांना वाटते. आता याबाबतीत काय कारवाई करावी याबाबतीत दुमत होऊ शकेल परंतु काँग्रेस पक्ष धरून सर्व पक्षांचे असे एकमत आहे की, महाजन कमिशनच्या अहवालाने महाराष्ट्रावर अन्याय झालेला आहे. तेव्हा सर्व पक्षांना सरकारने विश्वासात घेतले पाहिजे. परंतु जोपर्यंत सर्व पक्षांना विश्वासात घेतले जात नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत हे केले जात नाही तोपर्यंत लोकसभेतसुद्धा हा प्रश्न सुटणार नाही कारण महाराष्ट्राच्या बाबतीत केंद्राची आणि अन्य प्रांतियांची भूमिका ही पक्षपातीपणाची आहे हे कटू सत्य आहे. त्याची कारणे काय आहेत ते मला माहीत नाही. परंतु महाराष्ट्राच्या बाबतीत केंद्राचा दृष्टिकोन हा पूर्वग्रहदुषित आहे हे निश्चित व त्याची किती तरी उदाहरणे देता येतील. परंतु ती उदाहरणे देऊन मी या सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, सीमा भागातील लोकांना जर न्याय द्यावयाचा असेल तर या बाबतीत आपण केंद्रावर जनमताचे दडपण आणले पाहिजे. तो प्रश्न केवळ सौजन्याने सुटणार नाही.

(अध्यक्षांनी वेळ संपल्याची घंटा वाजविली)

माझा वेळ संपला असल्यामुळे मी माझे भाषण आता आटोपते घेतो परंतु ते संपविण्यापूर्वी मला एकच गोष्ट सांगावयाची आहे व ती विदर्भातील प्रदेशाबद्दल आहे. मी विदर्भाचा प्रतिनिधी असल्यामुळे मला ती सांगितली पाहिजे असे मला वाटते. या प्रश्नाची विल्हेवाट लावताना सरकारने एक काही तरी ठाम धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. हे ठाम धोरण म्हणजे एकभाषी विभाग एक ठिकाणी आणला पाहिजे असे असले पाहिजे व या तत्त्वाप्रमाणे बैतुल वगैरेसारखा जो मराठी भाषिक विभाग आता मध्य प्रदेशामध्ये गेला आहे. तोसुद्धा आपल्या राज्यात आणण्याबद्दल सरकारने प्रयत्न केला पाहिजे एवढेच माझे म्हणणे आहे. तेथील मराठी भाषिक लोकांच्या इच्छेची दखल या सरकारने घेतली पाहिजे. ही दखल सरकारने घ्यावी अशी विनंती करीत मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

खंडित वीज पुरवठ्यामुळे होणारे नुकसान

(१६ नोव्हेंबर, १९६७)

विदर्भात १९६७-६८ च्या काळात होणाऱ्या अनियमित व खंडित वीज पुरवठ्यामुळे शेतकरी व उद्योजक यांचे खूप नुकसान झाले. त्यासंदर्भात विधानपरिषदेत अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने मागासलेल्या विभागांच्या व्यथा रा. सु. गवई यांनी १६ नोव्हेंबर १९६७ रोजी सभागृहात मांडल्या, त्या दिवशीचे ते सर्वोत्कृष्ट असेच भाषण होते.

अध्यक्ष महाराज, ह्या सत्रामध्ये विशेषत: ज्या ज्या प्रश्नांची चर्चा झालेली आहे आणि त्यानंतर चर्चा व्हावयाची आहे त्या सर्व चर्चेमध्ये विदर्भाच्या दृष्टीने मला असे वाटते की, अत्यंत महत्त्वाचे असे प्रश्न आहेत. वृत्तपत्रामध्ये विदर्भातील प्रामुख्याने ज्या काही प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या आणि जनमताचा कानोसा व्यक्त झाला याचा विचार करून ह्या राज्याची राजधानी मुंबईत असली तरी अधून मधून नागपूरला होणारे जे सत्र आहे त्या सत्राच्यावेळी विदर्भाचे प्रश्न चर्चिले गेले आणि त्या बाबतीत ताबडतोबीने निकाल लागला तर ह्या ठिकाणी हे सत्र भरविणे आणि त्या निमिताने विदर्भातील प्रश्न सोडविणे हा योगायोग शासनाला साधता येईल. उलटपक्षी विदर्भातील समस्या ह्या सत्रामध्ये उपेक्षिल्या गेल्या तर आशेचा अंकुर त्यांना राहाणार नाही. म्हणून विदर्भातील समस्या ह्या सत्रामध्ये सोडविणे आवश्यक आहे. तेव्हा मला असे वाटते की, विदर्भातील समस्यांपैकी आजची ही अत्यंत महत्त्वाची समस्या आहे. एक सर्वसामान्य नागरिक म्हणून मी असे सांगतो की, येथे वीज पुरवठ्यासंबंधी मोठी तक्रार आहे आणि ती दूर करण्याऐवजी जास्त वाढत आहे. लोकांमध्ये यामुळे गोंधळ निर्माण झालेला आहे. तेव्हा त्याबाबतीत खुलासा केला तर बरे होईल. मला असे वाटते की, पारस वीज केन्द्रासंबंधी सरकारकडून दिरंगाई आणि अक्षम्य चुका घडल्या असे जनमताच्या पुढे आले आहे. एक तर जनरेटर बसविताना ज्या प्रिकॉशन्स घ्यावयास पाहिजे होत्या त्या घेतल्या गेल्या नाहीत. तेव्हा त्याबाबतीत खुलासा झाला पाहिजे. वृत्तपत्रामध्ये असे आले आहे की, पारस केंद्रामध्ये जो जनरेटर बसविला त्यातील एका पंख्याची ब्लेड तुटली होती आणि ज्या बेसवर तो बसविला होता त्या भिंतीला तडा गेला होता. वृत्तपत्रामध्ये असेही आले आहे की, हा जनरेटर बसविताना तेथील सॉईल लक्षात घेतली गेली नाही आणि ती संपूर्ण वजन झेपू शकत नाही अशी परिस्थिती आहे. मी काही टेक्निकल मनुष्य नाही. तेव्हा ज्या प्रक्रिया वृत्तपत्रामध्ये व्यक्त झाल्या त्या मांडणे मला भाग आहे. तेव्हा नामदार मंत्र्यानी ह्या बाबतीत खुलासा केला तर गैरसमज दूर होतील. ह्यासंबंधी योग्य खुलासा झाला तर ज्यांनी ह्या चुका केल्या त्यांना धारेवर धरता येईल.

दुर्दैवाने विदर्भातील भूमी ओलित योजनेसाठी पश्चिम महाराष्ट्रासारखी नाही. टक्केवारीने ती महाराष्ट्रापेक्षा मागे आहे. आपल्या राज्याकडून ओलित योजनेबद्दल गोष्टी केल्या जातात. आमच्याकडे नद्या कमी आहेत. ह्या ठिकाणी अकोट, मोर्शी हा सुपीक भाग आहे आणि त्या ठिकाणी लोकांनी पुढाकार घेऊन ओलिताची योजना सुरू केली आहे. त्या

ओलिताच्या बाबतीत प्रमुख अडचण कोणती असेल तर विजेच्या पुरवठ्याची आहे. अन्नधान्य आणि फळफळावळ ह्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत आणि त्या निकडीच्या वस्तू आहेत. ज्या लोकांनी स्वयंस्फूर्तीने ह्या बाबतीत पुढाकार घेतला त्यांना त्यासाठी लागणारी वीज मिळू नये ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ह्या बाबतीत सरकारी प्रयत्न अपुरे पडल्यामुळे गेल्या १६ महिन्यांत विजेचा अपुरा पुरवठा झालेला आहे आणि ७ ते ८ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. मोर्शी तालुक्यातील संत्र्यांच्या बागा वाळलेल्या आहेत. राष्ट्रीय उत्पन्नाची आणि व्यक्तिगत उत्पन्नाची हानी झालेली आहे आणि ७ ते ८ कोटींचे नुकसान झालेले आहे. ह्याशिवाय औद्योगिक धंद्यामध्ये विजेवर चालणाऱ्या कापड गिरण्या आहेत. त्या विजेवर चालणाऱ्या असल्यामुळे व त्यांना वीजपुरवठा बरोबर न झाल्यामुळे नुकसान झाले आहे. ही राष्ट्रीय उत्पन्नासंबंधाची बाब आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मूळ प्रश्न आहे तो जनरेटरचा आहे आणि त्याबाबतीत जी प्रिकॉशनरी मेजर्स घ्यावयास पाहिजे होती ती घेतली गेली नाहीत. त्यामुळे संपूर्ण उद्योगधंद्यातील नुकसान आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान विचारात घेतले तर त्यांची बेरीज १४-१५ कोटी रुपये होईल. एवढे राष्ट्रीय नुकसान झाले आहे. जर कॉर्पोरेशनने योग्य वेळी जनरेटरमध्ये झालेला बिघाड दुरुस्त केला असता तर एक किंवा दोन कोटीमध्ये जनरेटर दुरुस्त केला असता आणि तसे करता येत नव्हते तर दुसरी योजना हाती घ्यावयास पाहिजे होती. शासनाकडून ह्या बाबतीत अक्षम्य दिरंगाई झालेली आहे आणि दुरुस्तीसाठी ज्या स्टेप्स घ्यावयास पाहिजे होत्या त्या घेतल्या गेल्या नाहीत.

दुसरी गोष्ट अशी की आतापर्यंत झालेल्या नुकसानी बाबत मी सांगितले आहे. परंतु भविष्यातही नुकसान होणार आहे. त्याची माहिती नामदार मंत्र्यांना असेल तर त्यांनी द्यावी. विदर्भ विभाग कापूस पिकविणारा भाग आहे तसेच भुईमूग पिकवणाराही भाग आहे. आता बाजारामध्ये कापसाची आवक सुरू झाली आहे तेव्हा ह्या गाड्या मार्केटमध्ये आल्यानंतर हा संपूर्ण कापूस गिरणीत जातो आणि जिनिंग आणि प्रेसिंगसाठी ज्या गिरण्या आहेत त्यातील एक दोन गिरण्या सोडल्यास बाकीच्या सर्व गिरण्या इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या आहेत. त्या गिरण्यांसाठी लागणाऱ्या विजेत कपात झाली तर शेतकऱ्याला आपला माल पडलेल्या किमतीला व्यापाऱ्याला विकावा लागेल. ही टांगती तलवार लोकांच्या डोक्यावर आहे. तसेच भुईमुगाच्या बाबतीत विजेच्या अभावी तेल गाळता आले नाही तर व्यापाऱ्यांना पडलेल्या भावात शेतकऱ्याना शेंगा विकाव्या लागतील. असा संभाव्य धोका विदर्भाच्या दृष्टीने निर्माण झालेला आहे.

खालच्या सदनामध्ये एका गोष्टीचा नामदार मंत्र्यांनी उल्लेख केला होता. त्याबद्दल समाधान व्यक्त करण्यास हरकत नाही. ज्या लोकांनी स्वतःच्या निष्ठेने विहीर बांधण्यास सुरुवात केली त्यांना असे सांगण्यात आले होते की, त्यावर पंप बसवावयाचा असेल तर ३ हजार रुपये भरले पाहिजेत. पण खालच्या सभागृहात असा खुलासा करण्यात आला की ही गोष्ट खरी नाही. आपण एक हजार रुपयांची मर्यादा ठेवली आहे. वास्तविक गरीब शेतकरी स्वतःजवळ असलेले किडुकमिडूक विकून पैसे आणतात तेव्हा ही मर्यादा जास्त न ठेवता खाली आणली हे योग्यच आहे. विदर्भ विभाग ओलिताच्या बाबतीत मागासलेला आहे आणि शेतकऱ्यांनी ह्या बाबतीत घेतलेला पुढाकार लक्षात घेतला तर विजेचे कनेक्शन देताना आणि पंप बसविताना एकही पैशाची अट आणू नये असे माझे मत आहे.

दुसरे मला जनरेटरच्या तपशिलासंबधी बोलावयाचे आहे. पंख्याची ब्लेडस् मोडलेली आहेत आणि भिंतीला भेगा आहेत तेव्हा जमीन खराब होती म्हणून ह्या भेगा गेल्या की काय याचा नामदार मंत्र्यांनी खुलासा करावा. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात आलेल्या एका बातमीकडे मी नामदार मंत्र्यांचे

लक्ष वेधू इच्छितो. बोर्डाच्या एका सदस्याने अगदी अधिकृतपणे वर्तमानपत्रात असे निवेदन केले आहे की, आम्ही सप्टेंबरमध्ये वीज देऊ. त्याचप्रमाणे पारसचे विद्युत केंद्र बंद पडल्यामुळे विदर्भाला अपुरा वीजपुरवठा होत आहे असे सांगितले जाते, परंतु पारसचे विद्युत केंद्र सुरू झाले तरी विदर्भातील लोड शेडिंग काढून टाकता येणार नाही, ते काही दिवस चालू ठेवावे लागेल असे उत्तर नामदार मंत्र्यांनी येथे दिले आहे. तेव्हा नामदार मंत्र्यांच्या उत्तरात किती विसंगती आहे हे मी दाखवून देऊ इच्छितो. यामुळे लोकांच्या मनात गोंधळ निर्माण होतो आणि ते निराश होतात हे नामदार मंत्र्यांनी लक्षात घेतले पाहिजे. तेव्हा नामदार मंत्र्यांनी आता निदान असे तरी स्पष्ट निवेदन केले पाहिजे की, हा प्रश्न आमच्या आटोक्याबाहेरचा आहे. जोपर्यंत पारसचे विद्युत केंद्र दुरुस्त होत नाही तोपर्यंत विदर्भातील शेतकऱ्यांना आणि कापड गिरण्याना वीज मिळण्याची काही आशा दिसत नाही. पारस केंद्रातील यंत्रात जो बिघाड झाला आहे त्याची कारणीमीमांसा जाणून घेऊन ते केंद्र निश्चितपणे केव्हा सुरू होणार आहे, याचे स्पष्ट निवेदन नामदार मंत्र्यांनी करण्याची आता वेळ आली आहे. परंतु येथे परिस्थिती मात्र निराळी दिसत आहे. उदाहरणार्थ, आम्ही आता असे ऐकले आहे की, महाराष्ट्रातील २०० किलोवॅट वीज गोव्याला देण्यात येणार आहे. मध्य प्रदेशाला सुद्धा आपल्या येथून आणि विशेषतः विदर्भाची वीज देण्यात येत होती. परंतु आता तिच्यात कपात करण्यात आली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. तेव्हा जर गोव्याला आपण वीज देणार असाल तर आमची या शासनाला अशी कळकळीची विनंती आहे की, विदर्भाची गरज भागवून उरलेली वीज गोव्याला देण्यात यावी. गोव्याला वीज देऊ नका असे आमचे म्हणणे नाही. परंतु आपल्या राज्यातील एक भाग उपेक्षित ठेवू नका एवढेच आमचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे कोयनेची जी वीज मिळते ती आणि दुसरीकडून मिळणारी वीज एकत्र करून सगळीकडे समान वाटपाचे तत्त्व आपण अंमलात आणले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. आम्हाला जसा वीज कपातीचा फटका बसला आहे तसा तो महाराष्ट्राच्या इतर भागालासुद्धा बसू द्या. सगळीकडे समान वाटप झाले आणि मग विदर्भाला कमी वीज मिळाली तरी त्यात विदर्भाला दुःख होणार नाही. परंतु आज विदर्भाला तेवढा फटका बसत असल्यामुळे काही लोकांच्या मनात विदर्भ उपेक्षित भाग आहे अशी शंका निर्माण होत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या मनात ज्या शंका येतात त्या मी येथे सांगत आहे. राज्याच्या सर्व भागात दिवाळी आणि आमच्या भागात मात्र होळी असा प्रकार घडू लागला की, जेथे होळी आहे तेथील लोकांच्या मनात अशी भावना निर्माण होणे नैसर्गिक आहे. परंतु त्या लोकांची समस्या खरी आहे असे समजून ती सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हा कोयनेची वीज जी महाराष्ट्राला देण्यात येत आहे, तिच्या महाराष्ट्रातील कोट्यामध्ये काही कपात करून ती विदर्भाला देण्यात यावी अशी आमची विनंती आहे. आता असे म्हटले जाते की हा एक विवाद्य मुद्दा आहे. या बाबतीत माननीय मंत्र्यांनी मला एक पत्र पाठविले असून ते आजच मला मिळाले आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, हा प्रश्न सोडविण्यासाठी दिनांक २१ ला एक बैठक बोलाविली आहे. या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, या प्रश्नांची कायमची सोडवणूक होईल असे काही तरी करा. मला अशी माहिती मिळाली आहे की, मुंबईला एक बैठक बोलाविली होती आणि तेथे काही लोकांनी सरकारला अशी सूचना केली तुम्ही तुमच्या तंत्रज्ञांवर विसंबून राहू नका व पारसाचे केंद्र आणि त्यातील जनरेटर दुरुस्त करण्याचे काम आमच्यावर सोपवा म्हणजे आम्ही तो तुम्हाला त्वरित दुरुस्त करून देऊ. तेव्हा त्यांची मदत घेण्याच्या बाबतीत सरकारने काय विचार केला आहे. याचा खुलासा नामदार मंत्र्यांनी केला तर बरे होईल. स्वयंस्फूर्तीने हे केंद्र दुरुस्त करण्याचे काम आपल्या शिरावर घेण्यास जर काही लोक तयार असतील तर त्यांचा फायदा सरकारने जरूर घ्यावा.

❑❑❑

अनुसूचित जाती, जमाती आयुक्तांच्या अहवालाची उपेक्षा

(२१ मार्च, १९६८)

अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या प्रलंबित अहवालावर दिनांक २१ मार्च, १९६८ रोजी श्री. गवई साहेबांनी विविध दाखले देत महाराष्ट्र शासन अनुसूचित जाती-जमातीच्या प्रश्नावर कसे उदासीन आहे हे शासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यात हा अहवाल सभागृहात मांडण्यास शासनाने कसा विलंब लावला इथपासून तो अस्पृश्यता निर्मूलन, अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणारी तुटपुंजी शिष्यवृत्ती, मागासवर्गीयांसाठी घरबांधणी, उद्योग उभारणी यात येणाऱ्या वस्तुनिष्ठ अडचणींचे निवेदन करून याबाबत शासनाने किती संवेदनशील असावे याचे विवेचन केले आहे.

अध्यक्ष महाराज, अनुसूचित जाती व जमातीसाठी नेमलेल्या आयुक्ताचे १९६३-६४ व १९६४-६५ असे दोन वर्षांचे अहवाल या सभागृहापुढे चर्चेला आहेत. १९६३-६४ सालचा अहवाल या सभागृहापुढे १९ मार्च १९६६ ला ठेवण्यात आला होता. म्हणजे हा अहवाल सभागृहापुढे ठेवल्यानंतर जवळ-जवळ दोन वर्षांनी या सभागृहात चर्चिला जात आहे. माझी पहिली तक्रार अशी आहे की, सामाजिक आणि क्रांतिकारक बदल होण्याच्या दृष्टीने नेमण्यात आलेल्या या आयुक्तांच्या अहवालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष असावयास पाहिजे होते. परंतु या अहवालाकडे उपेक्षेने बघितले जाते. १९६६ साली ठेवलेला अहवाल प्रत्यक्ष चर्चेसाठी १९६८ मध्ये आणला जात आहे यावरून ही उपेक्षा दिसून येईल. त्याचप्रमाणे १९६४-६५ चा अहवालही १९६३-६४ च्या अहवालाबरोबर आपण चर्चेला घेतला आहे. १९६३-६४ च्या अहवालाच्या निमित्ताने ज्या शिफारशी केल्या होत्या त्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईची सूची सुदैवाने यामध्ये उपलब्ध आहे. परंतु १९६४-६५ सालच्या अहवालात ज्या रेकमेंडेशन्स आहेत त्यावर सरकारने काय कारवाई केली याबद्दलची सूची आज आमच्याकडे उपलब्ध नाही. अहवालावरील चर्चेच्या वेळी अशी सूची उपलब्ध असती तर या अहवालासंबंधी सरकारने कितपत कारवाई केली याचे चित्र देणारा आरसा आम्हांला मिळाला असता. या सूची आरसा म्हणून वापरल्या जातात. परंतु त्या सूची नसल्यामुळे आरशाशिवाय आम्हाला आमचे तोंड यामध्ये बघावे लागणार आहे. शेवटी हा एका उपेक्षित प्रश्नाचाच अहवाल समजला जातो आणि त्यादृष्टीने तो उशिरा सभागृहापुढे येत आहे हे त्या प्रश्नाबद्दलच्या अनास्थेला धरूनच आहे असे म्हणावे लागेल. या प्रश्नाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सुधारणा होणे आवश्यक आहे हे सांगण्यासाठी मी हा उल्लेख केला.

पहिली गोष्ट अशी की समाजकल्याण खात्यासाठी या राज्य सरकारतर्फे ज्या रकमा मंजूर झाल्या त्या मंजूर रकमात राज्याचे निरनिराळे विभाग आहेत त्यांचा विचार केला तर या रकमेत भरपूर कपात झाली आहे असे मला म्हणावयाचे आहे. या सामाजिक गोष्टीकडे शासन राजकीय दृष्टिकोनातून पाहत आहे. आपल्या देशात विविध क्षेत्रात सामाजिक विषमता आहे आणि त्यामुळे काही समाज हा उपेक्षित राहिला आहे. या उपेक्षितांचा प्रश्न हा एक राष्ट्रीय प्रश्न समजला गेला

पाहिजे. परंतु गेल्या तीन-चार वर्षांत या खात्यावर मंजूर केलेल्या रकमात जी कपात करण्यात आली ती पाहिल्यानंतर शासनाला हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो की नाही अशी शंका वाटू लागली आहे. दुसरी गोष्ट अशी की, गेल्या चार-पाच वर्षांत ज्या रकमा मंजूर केल्या त्याबाबतचे आकडे पाहिले तर जेवढ्या रकमा मंजूर केल्या तेवढ्या देखील खर्च केल्या नाहीत असे आपल्याला दिसून येईल. तेव्हा प्रथमत: मी या दोन गोष्टींकडे लक्ष वेधले आहे. पहिली गोष्ट अशी की मंजूर केलेल्या रकमात कपात केली आणि दुसरी गोष्ट अशी की ज्या रकमा मंजूर केल्या. त्यांचा पूर्ण विनियोग आमच्या शासनातर्फे होऊ शकला नाही. हे सखेद नमूद केले पाहिजे. या ठिकाणी या अहवालात जी विविध कलमे आहेत त्यात अस्पृश्यतेसंबंधी काही लिहिले आहे. भारतीय संविधानात नमूद केल्याप्रमाणे १९५५ मध्ये रिमूव्हल ऑफ अनटचेबिलिटी ॲक्ट केला. त्यानुसार सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळली तर तो क्रिमिनल ऑफेन्स ठरविला गेला आहे. परंतु माझ्याकडे अशी उदाहरणे आहेत. या कायद्याच्या विरुद्ध वर्तन अनेक ठिकाणी होत असल्याच्या पुष्कळ तक्रारी माझ्याकडे आहेत. आजच वर्तमानपत्रात गंभीर अशी घटना वाचली. आंध्रमध्ये एका अस्पृश्य विद्यार्थ्याला उभे जाळण्यात आले. हा एक सामाजिक प्रश्न आहे. आपले राज्य हे पुरोगामी राज्य मानले जाते तेव्हा या राज्याने अशाप्रकाराची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. या सभागृहात अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरू दिले नाही म्हणून त्या गुन्ह्याची दखल देण्यासाठी एखादा माणूस फौजदाराकडे गेला तर तुला दुसरा धंदा नाही काय असे विचारले जाते. त्यामुळे अशाप्रकारचे गुन्हे पुष्कळ वेळा रजिस्टर होत नाहीत. तो स्थानिक अधिकाऱ्याच्या लहरीचा प्रश्न असतो. एखादी दुसरी केस कोर्टात जाते. आपल्या राज्यात दारूबंदीचा कायदा आहे. दारूबंदीने इतके इतके गुन्हे पकडले तर ते पकडणाऱ्या अधिकाऱ्याला प्रमोशन मिळते, चोरीचे इतके गुन्हे पकडले तर त्याला प्रमोशन मिळते. मला असे म्हणावयाचे आहे की दारू प्यायली जाऊ नये त्याचप्रमाणे अस्पृश्यता पाळली जाऊ नये हे तत्त्व सत्तारूढ काँग्रेस पक्षाने मान्य केले आहे. तेव्हा आपण गृहखात्याला अशी सूचना का देत नाही की पोलीस अधिकाऱ्यांनी अस्पृश्यता निवारणाच्याबाबतीत अमुक गुन्हे पकडून दिले तर त्याला प्रमोशन देऊ. आपण दारूबंदीला जितके महत्त्व देता तितकेच या प्रश्नाला द्यावयास पाहिजे. तेव्हा शासनाने या सूचनेचा विचार करावा अशी माझी विनंती आहे.

दुसरे असे की अनुसूचित जाती व जमातीच्याबाबतीत त्यांना कायदेशीर मदत देण्याची सवलत आपल्या शासनातर्फे होते. परंतु या सवलतीचा प्रसार किती झाला आहे आणि या सवलतींचा फायदा किती लोकांनी घेतला आहे याची माहिती माननीय मंत्र्यांनी दिली तर ती मोठी मनोरंजक ठरेल असे मला वाटते. या लोकांना कायदेशीर मदत मिळाली पाहिजे आणि या सवलती शासनातर्फे प्रकाशित करण्यात आल्या पाहिजेत. अध्यक्ष महाराज, सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की जे लोक उपेक्षित आहेत त्यांचा स्तर उंचावयाचा असेल तर त्यांची शैक्षणिक कुवत वाढविली पाहिजे आणि म्हणून उपेक्षित समाजाचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले होते की उपेक्षित समाजाचा स्तर उंचविण्यासाठी त्यांच्यात शैक्षणिक प्रसार होणे आवश्यक आहे. भारत सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने कृषी विद्यापीठात प्रवेश करणाऱ्या मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याचा प्रयत्न केला आहे आणि अशा शिष्यवृत्त्या मागासलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांना मिळतात, परंतु समाजकल्याण मंत्र्यांच्या मी हे निदर्शनास आणू इच्छितो की, मंजूर झालेल्या ह्या शिष्यवृत्त्या कॉलेजमध्ये प्रवेश झाल्याबरोबर मिळाल्या तर विद्यार्थ्यांना निरनिराळ्या विषयाची पुस्तके खरेदी करता येईल आणि तो विद्यार्थी परीक्षेला बसू शकेल. परंतु वर्ष अखेरपर्यंत त्यांना ह्या शिष्यवृत्त्या मिळत

एचबी ११८०—१७

नाहीत. आजच मला असे पत्र आले आहे की येथे जे अनुसूचित जाती-जमातीचे विद्यार्थी आहेत त्यांना आतापर्यंत स्कॉलरशिप मिळालेली नाही. जी स्कॉलरशिप मिळावयाची ती वेळेवर दिली नाही आणि परीक्षा झाल्यानंतर दिली तर वाईट कामासाठी खर्च होतो आणि चांगल्या कामासाठी त्याचा उपयोग होत नाही. जुलै-ऑगस्टमध्ये ह्या स्कॉलरशिप्स मिळाल्या नाहीत तर त्याचा ते काय उपयोग करणार? आजपर्यंत अशाप्रकारे संपूर्ण राज्यात पूर्णपणे ह्या शिष्यवृत्तीचे वितरण झालेले नाही. ह्या शिष्यवृत्त्या देण्याचा दृष्टिकोन एवढाच आहे की विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे आणि त्या बाबतीत राज्याचा सहानुभूतीचा दृष्टिकोन आहे व त्याबाबतीत मला काही म्हणावयाचे नाही. पण प्रश्न आहे तो अंमलबजावणीचा आहे आणि अधिकारी याकडे सहानुभूतीने बघत नाहीत हा आहे. मुख्यमंत्र्यांनी चांगल्या अधिकाऱ्याचे गुण सांगितले आहे. परंतु प्रॅक्टिकल आस्पेक्ट लक्षात घेतला तरी मला असे म्हणावयाचे आहे की शासनामध्ये ह्या लोकांच्या प्रश्नाकडे सहानुभूतीने बघतात असे अधिकारी दुर्दैवाने लाभलेले नाही. स्कॉलरशिपचे वितरण करणारे जे पुण्यातील अधिकारी आहेत त्यांची नावे सांगणे इष्ट नाही पण त्यांच्यामध्ये माणुसकीची वागणूक बघितली तर ती दिसत नाही. ह्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची स्कॉलरशिप मिळते आणि त्यांच्याकडे ती वाटण्याची नुसती एजन्सी आहे. पण ही रक्कम पुण्यातल्या पुण्यात आपल्या खात्यात कशी डांबून ठेवता येईल असा प्रयत्न त्यांच्याकडून झालेला आहे. आज १,२०० रुपयांच्या आतल्या उत्पन्नाच्या १३० विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मी ह्या बाबतीत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली आणि त्यांना ती गंभीर वाटल्यामुळे त्यांनी त्याची दखल घेतली. जी भारत सरकार स्कॉलरशिप देते ती वाटण्याचे एजंट म्हणून कार्य करतो तेव्हा विद्यार्थ्यांच्या पदरात ती पडली पाहिजे, नाही तर तिचा उपयोग होणार नाही म्हणून काही शिष्यवृत्त्या वाटल्या गेल्या, परंतु पूर्ण राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळालेली नाही तेव्हा त्यासंबंधीची दखल समाजकल्याण मंत्र्यांनी घ्यावी.

ह्या ठिकाणी अशी शिफारस आहे की वाढती महागाई आणि जीवनमान लक्षात घेतले तर ह्या विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून मिळणारी शिष्यवृत्ती अपुरी आहे. म्हणून त्यामध्ये वाढ व्हावी. त्यासंबंधी शासनाचा काय खुलासा आहे तो समाजकल्याणमंत्री करतील काय असे मला त्यांना विचारावयाचे आहे. अध्यक्ष महाराज, मी मुद्दाम आपले लक्ष मागास समाजाचा उद्धार व्हावयाचा असेल तर एका गोष्टीकडे करू इच्छितो आणि खेदाने असे सांगू इच्छितो की राज्यातील समाजकल्याण म्हणजे वेल्फेअरसाठी करेक्टिव्ह मेजरसाठी जो खर्च होतो तो यापेक्षा जास्त होतो. तेव्हा त्यादृष्टीने ह्यामध्ये दुरुस्ती व्हावयास पाहिजे. मी समाजकल्याणमंत्र्यांच्या असे निदर्शनास आणू इच्छितो की ज्या मुलाला उपजत बुद्धी आहे त्या शिक्षणासाठी म्हणून आपण २० रुपये अनुदान देता पण मद्रास, पंजाबमधून आपल्या येथे आलेले जे भिकारी आहेत त्यांच्यासाठी मात्र १०० रुपये खर्च करता. येथे ते भिकारी आले तर त्यांना कोठे न्यावयाचे, त्यांना कोठे बसवावयाचे आणि त्यांना कसे अंगिकृत करून घ्यावयाचे यासाठी एवढे पैसे खर्च होतात आणि जी मुले ९ वी मध्ये शिकतात त्यांना मात्र २० रुपये देण्यास सरकार कां कू करते. बेगर होम्समध्ये जे लोक येतात ते आमच्या राज्यातील नाहीत पण आम्ही त्यांच्यासाठी खर्च करतो. एखाद्या माणसाने तांब्या चोरला तर ज्युव्हेनाईल ऑफेंडर म्हणून त्यावर ७५ रुपये खर्च करतो पण मुलाला शिष्यवृत्ती देताना मात्र २० रुपये देतो अशी एकंदर परिस्थिती आहे. आपण विचार करा की ज्याला उपजत बुद्धी आहे, शिक्षणाची आवड आहे अशा मुलांवर जास्त खर्च करावयाचा की जे गुन्हेगार आहेत त्यांच्यावर जास्त खर्च करावयाचा ? ह्या ठिकाणी समाजकल्याणमंत्र्यांना मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ज्युव्हेनाईल ऑफेंडर्स आहेत त्यांच्यावर अनाठायी

खर्च वाढविला तर राज्याच्या एकूण खर्चावर ताण पडणार आहे. तेव्हा उपेक्षित समाजातील तरुणांना शिष्यवृत्त्या कशा मिळतील? तेव्हा त्यांना जास्त स्कॉलरशिप्स कशा मिळतील यावर लक्ष दिले तर ते आपल्या सर्वांच्या दृष्टीने कल्याणकारी आणि लाभदायक ठरेल. त्यामुळे उपेक्षित समाजाचे कल्याण होईल असे मला वाटते. त्यादृष्टीने विचार झाला तर चांगले होईल. ह्या दृष्टीने सहानुभूतीने विचार केला तर विद्यार्थ्यांना चांगला फायदा मिळू शकेल आणि त्यांना समाधान लाभू शकेल. राज्यातील करेक्टिव्ह विंग्जवर पैसे खर्च होतात ते कमी करून शिक्षणावर जास्त खर्च कसा केला जाईल या दृष्टीने विचार व्हावा असे मला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, ह्यासंबंधी एक उच्चपदस्थ समिती शासनाने निर्माण केली आणि या कमिटीने हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न केला आणि २० रुपये शिष्यवृत्ती होती ती २५ रुपये केली. नामदार मंत्र्यांना मी अशी विनंती करतो की करेक्टिव्ह विंग वाढविली तरी २५ रुपयांची शिष्यवृत्ती आपण ३० रुपये करू शकतो. सर्वसाधारण जीवनमान बघितले तर त्यांना २० रुपये द्यावे असे म्हणणे बरोबर होऊ शकणार नाही. भिकाऱ्याकरिता आपण ७५ रुपये खर्च करू शकतो आणि शाळेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र २० रुपये मंजूर करतो. तेव्हा करेक्टिव्ह विंग्जचे पैसे वाचविले आणि ज्यांना भवितव्य आहे अशा मुलांवर खर्च केले तर या मुलांना मार्गास लावल्याचे पुण्य पदरात पडेल. ह्या दृष्टीने मला ह्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

ह्या रिपोर्टमध्ये अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचा उल्लेख आहे त्या दृष्टीने मजुरांची केस मी सभागृहापुढे मांडू इच्छितो. यामध्ये योजना अशी आहे की घरे बांधताना अनुसूचित जाती-जमाती यांना सहकार्य मिळावे. मी असे विचारू इच्छितो की, या मागासलेल्या वर्गाच्या लोकांच्या किती सहकारी घरबांधणी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत आणि त्यांच्यापैकी किती संस्थांना कर्ज देण्यात आलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे काही मागासलेल्या लोकांनी आपली सहकारी घरबांधणी संस्था स्थापन केली होती परंतु सरकारकडून त्यांना जमीन मिळाली नाही आणि म्हणून त्यांना घर बांधता आले नाही. हा एक सामाजिक प्रश्न आहे आणि काही समस्या आपण ज्याप्रमाणे युद्धपातळीवर सोडवितो त्याचप्रमाणे हा प्रश्न युद्धपातळीवर सोडविला पाहिजे. परंतु घरबांधणीसाठी म्हणा किंवा विहीर बांधण्यासाठी म्हणा या लोकांना सरकारी कर्ज पाहिजे असेल तर त्यांनी काही अटींचे पालन केले पाहिजे, असे एक सर्क्युलर आहे. परंतु या अटी अव्यवहार्य आहेत असे मला म्हणावयाचे आहे. उदाहरणार्थ, घर बांधण्यासाठी त्यांना कर्ज मिळवावयाचे असेल तर पहिल्या प्रथम त्यांनी १,००० रुपये भांडवल जमा केले पाहिजे अशी अट आहे. मग त्यांना १,००० रुपये सबसिडी आणि २,००० रुपये कर्ज दिले जाते. आता मागासलेल्या लोकांमध्येसुद्धा काही लोकांची परिस्थिती अगदीच हलाखीची आहे आणि म्हणून ते १,००० रुपये भांडवल जमा करू शकत नाहीत व काही लोकांची परिस्थिती त्यातल्या त्यात बरी आहे. तेव्हा ज्यांची परिस्थिती बरी आहे त्याच लोकांना याचा फायदा मिळतो आणि त्यामुळे मागासलेल्या वर्गातील गरीब लोकांवर अन्याय होत आहे. त्याचप्रमाणे गावामध्ये स्पृश्य लोक आपल्या विहिरींवर त्यांना पाणी भरू देत नाहीत. म्हणून त्यांनी विहीर खोदावयाची असे ठरविले व त्यासाठी त्यांनी सरकारी कर्ज मिळवावयाचे असेल तर ती विहीर खोदण्यासाठी जो खर्च येणार असेल त्याच्या एक-चतुर्थांश रक्कम त्यांनी जमा केली पाहिजे अशी अट आहे. परंतु या लोकांवर अशा अटी घालून या लोकांचे प्रश्न सुटणार नाहीत. या अटींमुळे गरीब लोकांना फायदा मिळत नाही. त्याचप्रमाणे सरकारने अनेक ठिकाणी आता इंडस्ट्रिअल इस्टेट स्थापन केल्या आहेत. परंतु अशा

एचबी ११८०—१७अ

औद्योगिक वसाहतीमध्ये किती कुंभार किंवा लोहार गेले आणि तेथे ते कारखानदार झाले आहेत? स्मॉल स्केल इंडस्ट्रिज काढणाऱ्या लोकांना तेथे सवलती द्यावयाच्या असे ठरविले आहे. परंतु जे लोक उद्योगधंद्यामध्ये लाखो रुपये गुंतवू शकतात ते तेथे जातात, तेथे पहिल्या प्रथम काही तरी स्मॉल स्केल इंडस्ट्री काढतात आणि मग काही काळाने ते बडे कारखानदार बनतात असा आमचा अनुभव आहे. परंतु जे विकर सेक्शन्स आहेत त्यांना याचा फायदा मिळालेला नाही. या लोकांवर जर अशा अव्यवहार्य अटी घातल्या तर विकर सेक्शन्सचे लोक कधीच पुढे येऊ शकणार नाहीत. मागासलेल्या वर्गाच्या दृष्टीने काही चांगल्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. परंतु या सर्व योजना कागदावरच राहतात. त्यांची अंमलबजावणी होत नाही. तेव्हा याकडे नामदार समाजकल्याणमंत्र्यांनी लक्ष द्यावे अशी मला त्यांना विनंती करावयाची आहे.

त्यानंतर पडीत जमिनींच्या वितरणासंबंधी मला थोडेसे बोलावयाचे आहे. शासनाने जमिनीचे वर्गीकरण करण्यासाठी आणि त्याप्रमाणे पडीक जमिनी किती आणि कोठे आहेत हे ठरविण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने असे ठरविले की, जर एखाद्या ठिकाणी फॉरेस्ट जमीन असेल तर तिचे कन्व्हर्शन रेव्हिन्यू लँडमध्ये केले पाहिजे आणि ते केल्यानंतर ज्या पडीक जमिनी असतील त्या मागासलेल्या वर्गांना देण्यात याव्यात. परंतु ही योजनासुद्धा कागदावरच राहिलेली आहे असे दिसते. तिची अंमलबजावणी होऊन मागासलेल्या वर्गांना पडीक जमीन दिलेली आहे असे काही दिसत नाही. अर्थात मागसलेल्या वर्गांना सवलती मिळाव्यात असा सरकारचा हेतू आहे. मागासलेल्या वर्गाच्याबाबतीत सरकारचा दृष्टिकोन सहानुभूतीने पाहण्याचा आहे हे मी कबूल करतो. परंतु अशा चांगल्या योजनांची अंमलबजावणी नीट होत नाही आणि म्हणून तिकडे नामदार समाजकल्याण-मंत्र्यांनी लक्ष द्यावे अशी मी विनंती केली आहे.

त्यानंतर रिझर्व्हेशनसंबंधी मला थोडेसे बोलावयाचे आहे. ही रिझर्व्हेशन्स ठेवावी की ठेवू नयेत हा वादग्रस्त प्रश्न आहे. काही लोक असे म्हणू लागले आहेत की, आता मागासलेल्या वर्गासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा राखून ठेवण्याची आवश्यकता राहिलेली नाही. परंतु काही लोक असे म्हणतात की, या लोकांसाठी तेथे जागा राखून ठेवल्या पाहिजेत. या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, आपल्या समाजातील इतर लोक हे १०० मैल पुढे गेले आहेत आणि आता कोठे मागासलेल्या वर्गातील लोकांनी हालचाल करावयास सुरुवात केली आहे. तेव्हा पुढे गेलेल्या लोकांना जर तेथेच थांबून ठेवले नाही तर त्यांच्याबरोबर स्पर्धेमध्ये मागासलेल्या वर्गाचे लोक कधीच टिकाव धरू शकणार नाहीत. मी विशेषत: विकर सेक्शन्सबद्दल बोलत आहे. या लोकांसाठी राखीव जागा ठेवल्याच पाहिजेत. परंतु माझे म्हणणे आणखी पुढे असे आहे की, या जागांवर या वर्गातील लोक प्रत्यक्ष नेमले जातील असे काटेकोरपणे पाहिले पाहिजे. परंतु आज अवस्था अशी दिसते की, डायरेक्टर ऑफ सोशल वेल्फेअर यांच्या खात्यामध्येसुद्धा मागासलेल्या वर्गाच्या लोकांसाठी जितक्या जागा राखून ठेवलेल्या आहेत त्या सर्व जागांवर मागासलेल्या वर्गातील लोकांनीच भरलेल्या नाहीत. वस्तुत: डायरेक्टर ऑफ सोशल वेल्फेअर हे आमचे रखवालदार आहेत. परंतु त्यांच्याच खात्यात या जागा भरलेल्या नाहीत. तेव्हा मागासलेल्या वर्गातील लोकांसाठी ज्या जागा राखून ठेवलेल्या आहेत त्या या वर्गातील लोकांच्याच नेमणुका करून भरण्याची खबरदारी नामदार समाजकल्याणमंत्र्यांनी घ्यावी अशी मला त्यांना विनंती करावयाची आहे.

या अहवालातील शिफारशी वाचून न दाखविता या बाबतीत सरकारने काय केले आहे याचा खुलासा करावा अशी नामदार मंत्र्यांना विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

कृषी विद्यापीठ आंदोलन : दुसरी बाजू

(२१ नोव्हेंबर, १९६८)

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याच्या संदर्भात या बाबतच्या समितीने काही जागांची पाहणी केली. त्यात बोरगाव मंजू परिसराचाही समावेश होता. वैदर्भीय जनतेला असे वाटत होते की, अकोला येथेच कृषी विद्यापीठ स्थापन होणार आहे. पण प्रत्यक्षात निर्णय घोषित झाला. त्यावेळी कृषी विद्यापीठ अहमदनगर जिल्ह्यातील राहूरी येथे स्थापन झाले आणि विदर्भामध्ये सर्वत्र क्षेत्राचा आगडोंब उसळला. गावोगावी जाळपोळ, निदर्शने सुरू झाली. हे आंदोलनही बघता बघता हिंसक झाले. पोलिसांना अश्रुधूर आणि गोळीबाराचा वापर करून आंदोलकांना शांत करावे लागले. या पोलिसी गोळीबारात अमरावती परिसरातील काही मुलांचाही मृत्यू झाला. विधानपरिषदेच्या सभागृहात हा विषय चर्चेला आला. विरोधकांनी या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी लावून धरली होती. त्यावेळी रा. सू. गवई हे विधानपरिषदेचे उप सभापती होते. या मागणी बरोबरच यांनी या आंदोलनातील दुसरी बाजूही समोर मांडली. जणू काही सरकारची पाठराखण केली. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण हा राजकीय मुत्सद्देगिरीचा उत्तम नमुना आहे. त्यात आंदोलकांची कानउघाडणी करत त्यांनी पोलिसी गोळीबाराचे समर्थन केले. जर पोलिसांनी योग्य वेळी कडक कारवाई केली नसती तर आम्हीच सवाल केला असता की, हे पोलीस काय करीत होते. फक्त बघ्याची भूमिका ते घेत होते की काय ? यासाठी त्यांनी विरोधी पक्ष नेते श्री. उत्तमराव पाटील यांचीही साक्ष काढली.

या आंदोलनाच्या धगीमुळे एका ऐवजी चार कृषी विद्यापीठे महाराष्ट्रात स्थापन झाली. पण २१ नोव्हेंबर, १९६८ ला गवई साहेबांनी केलेले भाषण कुठल्याही आंदोलनाच्या नेत्याला विचार करायला लावणारे होते.

अध्यक्ष महोदय, आज सभागृहात ज्या विषयाबाबत चर्चा चालू आहे तिच्यावर मी माझे अनुभव सांगणार आहे. अकोल्याला जे काही प्रकार झाले ते कोणत्या परिस्थितीत झाले आणि कसे झाले याची माहिती मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन करून घेतलेली आहे. अमरावतीला इतवारी भागात जी गडबड झाली त्याच्या दुसऱ्या दिवशी मी प्रत्यक्ष तेथे जाऊन माहिती करून घेतली आहे. वरुडला जे काही प्रकार घडले तेथेही मी जाऊन आलो आहे. त्या ठिकाणी

झालेल्या गोळीबारात जी मुले गोळ्यांच्या भक्ष्यस्थानी पडली त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या आईबापांचे सांत्वन करण्याचा मी प्रयत्न केला आहे. जे कोणी जखमी झाले होते त्यांची हॉस्पिटलमध्ये मुलाखत घेऊन त्यांची बरोबर देखभाल होत आहे किंवा नाही याबाबत विचारपूस केली आहे. हे संपूर्ण प्रकार प्रत्यक्ष पाहिल्यानंतर ह्या निमित्ताने मी माझे मत मांडणार आहे. मी जे मत देणार आहे ते कोणाच्या समाधानासाठी किंवा कोणाला विरोध करण्यासाठी देणार नाही. मी जे बघितले ते सांगितल्यानंतर सभागृहांतील सदस्यांनी आणि विरोधी पक्षाचे नेते श्री. उत्तमराव पाटील यांनी आपले मत बनवावे अशी मी त्यांना विनंती करीन. पोलीस खाते वगळले तर इतर अनेक जाचक बाबी लोकशाहीतही असू शकतील, पण अखेरीला आपले राज्य हे लोकशाही राज्य आहे, वेल्फेअर राज्य आहे. तसे पाहिले तर हे तत्त्व काही नवीन नाही. ह्या ठिकाणी जे प्रकार घडले त्यांच्या तपशिलात मी जाणार नाही. वेल्फेअर स्टेटचे हेच लक्षण आहे की, आपल्याला जर चांगल्या गोष्टी घडाव्यात असे वाटत असेल तर अशा प्रकारांची पार्श्वभूमी सर्व पक्षांनी समजावून घेतली पाहिजे. मी एवढेच सांगेन की, ह्या गोळीबाराच्या भक्ष्यस्थानी काही मुले पडली ही अत्यंत दु:खद गोष्ट आहे. प्रश्न आहे तो ह्या ज्या घटना घडल्या त्या सर्वांनी समजावून घेतल्या पाहिजेत. अमरावती येथे इतवारा बाजारात जे प्रकार घडले त्यांची चौकशी करण्यासाठी दुसरे दिवशी तेथे गेलो. त्या दिवशी आजूबाजूला हजार दीड हजार माणसे जमली होती. मला विनम्रपणे सांगावयाचे आहे की, तेथे पोलिसांनी हस्तक्षेप केला नसता तर याच्या उलट प्रतिध्वनी या सभागृहात उठला असता. अमरावती शहरात गोळीबारात लोक बळी पडले. परंतु ही घटना घडली नसती तर कदाचित मलाच या सभागृहात उलट चर्चा उपस्थित करावी लागली असती. त्या ठिकाणी नजिकच्या अंतरावरून इकडून पाच हजार, समोरून पाच हजार याप्रमाणे लोक जमा झाले होते. काही सज्जन माणसांकडून मी कानोसा घेतला. परंतु हे प्रकार घडले नसते तर ज्याला अमरावतीचे हार्ट म्हणतात तो भाग संपूर्णपणे जळाला असता. मग मी आणि उत्तमरावांनी विचारले असते की, पोलीस काय करीत होते? मी रेल्वेची घटना सांगतो. ते अतिशय करुण दृश्य होते. रेल्वे अडविली. त्या ठिकाणी गाडीच्या खाली पूल होता. रेल्वेने प्रवास करणाऱ्यांमध्ये तरुण बाया आणि मुली होत्या. त्या ठिकाणी पूलाच्या खालच्या बाजूने पेटते टेंभे घेतलेले लोक होते. आजूबाजुला शेकडो लोक जमा झाले होते. मला असे म्हणावयाचे आहे की, पोलिसांच्या अत्याचारांच्या गोष्टी सांगताना या प्रवाशांचीही करुण कहाणी काय होती ते ऐकून घ्या. त्या ठिकाणी पोलिसांनी गोळीबार केला. त्याची चौकशी मुख्यमंत्र्यांनी करावी. या मागणीबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु गोळीबाराची घटना घडली नसती तर त्या गाडीतील तरुण मुली आणि बाया समाजविघातक शक्तींच्या भक्ष्यस्थानी पडल्या असत्या. मी दोन्ही बाजूने काय झाले ते सांगत आहे. या घटनांमध्ये ज्या लोकांचे मृत्यू झाले त्यांच्याबद्दल माझ्या मनात सहानुभूती आहे. मलाही भावना आहे. परंतु दुसरेही जे चित्र आहे त्याचाही विचार आपण केला पाहिजे. लोकांना आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्याचा हक्क आहे. परंतु परतवाड्याला जे एक सुंदर प्रोसेसिंग सेंटर होते ते जाळण्याचे काय कारण ? तेथे जी पेट्रोलची टाकी आहे. ती पेटविली. परंतु सुदैवाने ब्लास्ट झाला नाही. तो झाला असता तर काय झाले असते याचा अंदाज मी एका सायन्सच्या प्राध्यापकांकडून घेतला. त्यांनी सांगितले की, तो झाला असता तर पाच मैल परिसरातील संपूर्ण गावे उद्ध्वस्त झाली असती. मी सुरुवातीलाच खुलासा केला की, मी झाल्या गोष्टीचे समर्थन करण्यासाठी उभा नाही आणि विरोधही करण्यासाठी उभा नाही. तथापि, मी वास्तविक परिस्थिती पाहिली आहे म्हणून हे सांगत आहे. हा सामाजिक प्रश्न नाही असे आपण म्हणू शकत नाही. या सर्व प्रकरणांमध्ये पोलिसांकडून काही गैरप्रकार घडला असेल, अधिकाराचा गैरवापर झाला असेल त्याबद्दलच्या काही तक्रारी असतील

तर त्यांची जरूर चौकशी व्हावी, परंतु त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने काही गर्हणीय प्रकार घडले असतील तर त्याचीही आपण दखल घेतली पाहिजे हे प्रकार घडले त्या दिवशी माझी मुलगी मोठ्या मुष्किलीने परत आली. माझ्या पत्नीला दोन तीन माणसे पाठवून सोडविले असे सांगणारे लोक आहेत. यामध्ये एका बाजूनेच गैरप्रकार झाले असे म्हणणे धाडसाचे होईल. मी अकोल्याला त्या दिवशी होतो. मी परत अमरावतीला आलो तेव्हा ९-१० ची वेळ होती. अश्रुधूर आमच्या डोळ्यात येत होता. पोलिसांकडून काय घडले याचा उल्लेख न करता मी एवढेच सांगतो की, त्या दिवशी ९-१० वाजता दिवे गेले, टेलिफोन बंद पडले. मी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु तो साधता आला नाही. रात्रभर लोक भयग्रस्त स्थितीत होते. विजेचे दिवे नव्हते, टेलिफोनचे खांब जाग्यावर नव्हते. माझ्या घरचा टेलिफोन बंद होता. हे जे सर्व झाले ते योग्य होते काय याचा साकल्याने विचार केला पाहिजे. मी धामणगावला गेलो. मला तेथे मुले भेटली. मी त्यांना सांगितले की, तुमचे म्हणणे ठीक आहे. तुमचा राग मी समजू शकतो. परंतु मदन गोपाल अग्रवाल आले होते तेव्हा त्यांना का अडविले? एअर कंडिशनर डब्यावर गोटे मारले आणि आतील तीन माणसे जखमी झाली त्याचा पश्चाताप तुम्हाला होत नाही काय ? मी दोन्ही प्रकार सांगतो, कारण मी दुतर्फा गोष्टी पाहिल्या आहेत. रस्त्याने बस जात असताना दगडफेक केली जाते आणि आत बसलेले निरपराध लोक जखमी होतात या प्रकारच्या पाठीमागे कोणती विचारसरणी आहे हे मी समजू शकत नाही. मुख्यमंत्र्यांवर दगडफेक केली, त्यांच्या गालाला मार बसला. आपल्या मागण्या मांडीत असताना आपण काही चांगले वाईट पाहणार आहोत की नाही? अन्याय झाला असेल तर वेशीवर जरूर टांगा. आपल्याला वेल्फेअर स्टेटकडे जावयाचे आहे आणि त्यासाठी लागणारी पथ्ये दोन्ही बाजूंनी सांभाळत आपल्याला ते करावयाचे आहे हे सांगण्याकरिताच मुख्यत: मी उभा राहिलो होतो.

❑❑❑

शिक्षणावर घडवून आणलेली चर्चा

(२७ नोव्हेंबर, १९६८)

महाराष्ट्र विधानपरिषदेचे प्रदीर्घ काळ उप सभापती राहिलेले श्री. रा. सू. गवई उप सभापतीपदावर असतानाही अनेक विषयांवर आपली मते मांडत असत. शिक्षण हा तर त्यांचा खास अभ्यासाचा विषय होता. समाजातील उपेक्षित वंचित घटकांनाही शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, असे ते आवर्जून सांगत असत. यावेळी शिक्षणाच्या श्वेतपत्रिकेमुळे शिक्षणाच्या विस्ताराला आळा तर बसणार नाही ना, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली. प्रगत शाळा आणि अप्रगत शाळा हा भेदही त्यांना मान्य नव्हता.

अध्यक्ष महाराज, श्वेतपत्रिकेवर गेल्या दोन दिवसांपासून येथे चर्चा चाललेली आहे. त्यातील सर्व मुद्यावर मी आपले विचार आज मांडणार नाही. त्यातील जे दोन तीन प्रमुख आणि वादग्रस्त असे मुद्दे आहेत तेवढ्यापुरतेच मी आपले

भाषण मर्यादित करणार आहे. श्वेतपत्रिकेवर चर्चा करीत असताना सर्वात महत्त्वाचे असे दोन मुद्दे येथे आणि बाहेर देखील चर्चिले गेले ते म्हणजे शिक्षणातील गुणवत्ता आणि शिक्षणाचा विस्तार ह्या दोन बाबीवर मी बोलणार आहे. मी ही शिक्षणाविषयीची श्वेतपत्रिका अत्यंत काळजीपूर्वक वाचली त्याच उपहासाने बोलण्याचा माझा उद्देश नाही व ते माझ्या मनातही नाही. शिक्षणविषयावर श्वेतपत्रिकेत बरेच विचार मांडण्यात आले आहेत. आणि याबद्दल बाहेर आणि येथे देखील अनेक गैरसमज निर्माण झालेले आहेत व महत्त्वाच्या शंका येथे प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. श्वेतपत्रिकेत ह्या संबंधाने जी शब्दरचना करण्यात आली आहे. ती दोषास्पद वाटते आणि येथे जी वाक्ये वापरण्यात आली आहेत त्यावरून स्पष्ट अर्थबोध होत नाही. मी या ठिकाणी रागाने बोलत नाही तर शासनाचा एक मित्र म्हणूनच बोलतो आहे. मी आकसाने देखील बोलत नाही. शासनाचा मित्र ह्याच दृष्टिकोनातून मी आपले विचार आणि सूचना मांडणार आहे. गुणवत्ता आणि विस्तार ह्याबद्दल स्पष्टीकरण होण्याची फार गरज आहे. ज्याप्रमाणे माणसाला अन्न वस्त्र निवारा ह्याची गरज असते, त्याचप्रमाणे त्याला शिक्षणाची देखील गरज असते. राज्यातील गरीब आणि अतिसामान्य जनतेला शिक्षणाचे दरवाजे उघडे करण्याचे कार्य महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आदी लोकांनी महाराष्ट्रात केलेले आहे आणि उपेक्षित समाजातील चार कोटी जनतेला शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध करून दिली, त्यामुळे मागास जनतेला देखील प्रशासनात भाग घेता येऊ लागला. ह्याला जर काही कारण असेल तर शिक्षण क्षेत्रातील गेल्या २०-२५ वर्षातील ह्या लोकांची तपश्चर्या होय. म्हणूनच ह्या श्वेतपत्रिकेच्या निमित्ताने जर शिक्षणाच्या विस्ताराला पायबंद बसणार असेल तर ते योग्य होणार नाही.

उपेक्षित समाजातील लोकांना शिक्षण घेण्याची संधी मिळायला पाहिजे आणि शैक्षणिक गुणवत्ता आणि शिक्षणाचा विस्तार ह्यामध्ये संघर्ष असता कामा नये. गुणवत्तेच्या नावाखाली शिक्षणाचा विस्तार जर थांबत असेल तर ते मान्य होणार नाही. असे जर झाले तर सामान्य समाजावर फार मोठा अन्याय होणार आहे ही जी माझी भूमिका आहे ती मंत्री महोदय समजून घेतील, असा मला विश्वास वाटतो. मी शासनाचा मित्र ह्या नात्याने बोलत आहे. अध्यक्ष महाराज मी शिक्षणाच्या विस्ताराच्या दृष्टीने आपली बाजू मांडणार आहे. श्वेतपत्रिकेत शिक्षणाच्या गुणवत्तेवर विशेष जोर देण्यात आला आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढू नये किंवा ती वाढविण्याची गरज नाही असे कोणीही म्हणणार नाही. परंतु शिक्षणाचा विस्तार आणि गुणवत्ता यात सुसंवाद असला पाहिजे अशा प्रकारे योजनेची आखणी झाली पाहिजे. माझ्या मते ह्या श्वेतपत्रिकेत जे शब्दप्रयोग करण्यात आले आहेत ते सेल्फएक्सप्लनेटरी नाहीत. ज्यांनी ही योजना बनविली त्यांचा कदाचित असा उद्देश नसेल की ह्यामुळे शिक्षणाच्या विस्ताराला पायबंद बसावा. परंतु येथे जी शब्दयोजना करण्यात आली आहे त्यावरून अशा शंकेला वाव राहतो की, ह्यामुळे शिक्षणाच्या विस्ताराला पायबंद तर बसणार नाही ना? आणि त्यामुळे ही श्वेतपत्रिका लोकांच्या रोषाला कारणीभूत झालेली आहे असे मला वाटते. म्हणून आज जो उपेक्षित समाज आहे, जो मागासलेला समाज आहे, त्याची शिक्षणाची तहान भागलेली नाही ती भागली पाहिजे आणि गुणवत्ता आणि विस्तार याचा संघर्ष होता कामा नये याच एका उद्देशाने मी माझे विचार येथे मांडीत आहे. ह्यासंबंधाने समाजात काही गैरसमज देखील निर्माण झालेले आहेत.

(सभापती : यात गैरसमजाला कुठे वाव आहे ?)

श्री. रा. सू. गवई : ह्या श्वेतपत्रिकेत इयत्ता १ ते ७ पर्यंत प्राथमिक शाळा मानण्यात येईल असे सांगितले आहे आणि हे प्राथमिक शिक्षण सर्व राज्यामध्ये एकाच प्रकारचे राहणार आहे आणि त्यानंतर माध्यमिक शिक्षणक्रमात मात्र दोन भाग करण्यात आले आहेत. इयत्ता ८ ते १० ऑर्डिनरी कोर्स व इयत्ता ११-१२ ॲडव्हान्स कोर्स असे आहे.

उच्च माध्यमिकमध्ये ऑर्डनरी व ॲडव्हान्स असे दोन प्रकारचे कोर्स आहेत व पूर्व माध्यमिकचे दोन टप्पे आहेत. त्यामध्येच सामान्य व प्रगत असे दोन प्रकारचे अभ्यासक्रम येतात. म्हणून ह्या गोष्टीचा खुलासा शिक्षण मंत्र्यानी केला तर फार बरे होईल. शाळांमध्ये देखील उच्च माध्यमिक आणि पूर्व माध्यमिक असे दोन प्रकार पडतात. तेव्हा प्रगत आणि ऑर्डनरी अभ्यासक्रम कोणाला देण्यात येणार आहे याचा देखील जर खुलासा केला तर बरे होईल. प्रगत विद्यार्थी म्हणजे बुद्धिमान विद्यार्थी आणि अप्रगत विद्यार्थी म्हणजे मंदबुद्धी विद्यार्थी असा फरक ह्या श्वेतपत्रिकेने केलेला आहे किंवा त्यात तो अभिप्रेत आहे, असे जरी येथे स्पष्ट शब्दात म्हटले नसले तरी प्रगत शाळा आणि अप्रगत शाळा असा उल्लेख या ठिकाणी केलेला असल्यामुळे साहजिकच ह्या शाळांत जाणारे विद्यार्थी असतील यांच्यामध्येही बुध्दिमान विद्यार्थी आणि बुध्दिमंद विद्यार्थी असा फरक राहणार हे उघड आहे. पण हे करीत असताना बुध्दिमंद विद्यार्थी कोणता आणि बुध्दिमान कोणता हे ठरविण्यासाठी ज्या काही टेस्ट्स असतात त्यांचा उल्लेख ह्या श्वेतपत्रिकेत करण्यात आलेला दिसत नाही. तेव्हा ह्याच्या टेस्ट्स शासनाला कोणत्या अभिप्रेत आहेत हे आम्हाला कळले असते तर बरे झाले असते. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचे मापन करणे ही गोष्ट फार कठीण आहे. ज्या मुलांच्या घरी शिक्षणाची परंपरा पहिल्यापासून असते अशा मुलांवर शिक्षणाचे संस्कार झाले असल्यामुळे साहजिकच पहिल्यापासूनच चालना मिळत असते, पण ज्या मुलांचे आईबाप कामावर जात असतात, त्यांच्या मनावर शिक्षणाचे संस्कार झालेले नसतात. अशा परस्पराविरुद्ध परिस्थितीत वाढलेल्या मुलांच्या बुद्धीचे मापन कसे करावयाचे?

सभापती : शाळांवर ज्या कंडिशन्स आहेत त्या जर काही शाळा पुऱ्या करीत नसतील तर ज्या शाळा कंडिशन पुऱ्या करतील अशा शाळा आणि इतर शाळांमध्ये फरक होईल.

Special conditions will be perscribed for teaching the carriculam at (A) level and those schools which satisfy the conditions will be allowed to teach it.

विद्यार्थ्यांनी कोणत्या शाळेत जावे हा चॉईस त्यांना राहील. पण यामुळे अमुक शाळेतील मुले बुद्धिमान आणि अमूक शाळेतील विद्यार्थी बुद्धिमंद असा फरक राहणार नाही.

"as recommended by the Education Commission at the ordinary (O) and advance (A) levels."

विद्यार्थ्यांमध्ये भेद केलेला नाही. शाळामध्ये भेद केलेला असल्यामुळे त्या शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचण होईल एवढेच.

श्री. रा. सू. गवई : पान १९ वरील परिच्छेद १८ २ मध्ये ह्याबाबत जो उल्लेख आहे तो मी आपल्याला वाचून दाखवितो. तो असा आहे. "उपलब्ध साधनसोयी मर्यादित आहे हे लक्षात घेता माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणासाठी प्रवेश देण्याची पद्धती काळजीपूर्वक नियमित करावी लागेल. प्रवेश देताना विद्यार्थ्यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता, त्यांनी त्या आधीच्या शिक्षणामध्ये मिळविलेले प्राविण्य व समाजिक अन्यायाची तत्त्वे या बाबींचा योग्य तो विचार केला जाईल. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात परंतु ज्यांना पूर्ण वेळेचा शिक्षणक्रम घेणे शक्य होणार नाही अशासाठी टपाली शिक्षणक्रमाची व बाहेरून परीक्षेला बसण्याची सोय करण्याची विनंती विद्यापीठांना केली जाईल." बुध्दिमान विद्यार्थी व बुद्धिमंद विद्यार्थी असा जरी फरक केला नसला तरी प्रगत शाळा आणि अप्रगत शाळा असा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. यानंतर प्रस्तावनेच्या पान दोन वरील ३ ऱ्या कलमात असे म्हटले आहे की, "इयत्ता १०वी नंतरच्या शैक्षणिक विकासाचा मेळ मनुष्यबळाच्या गरजांशी किंवा उद्योगधंद्यातील उपलब्ध संधीशी घालण्यात येईल. तसेच त्याची गती ठरविताना उपलब्ध शिक्षक, साधनसोयी व

आर्थिक शक्यता विचारात घेतली जाईल." ह्या सर्व उल्लेखाच्या संदर्भात माझ्या मनात जी शंका आली ती सभागृहापुढे मांडली आहे. कोणत्याही प्रकारच्या आकसाने किंवा टीका करण्याच्या कल्पनेने मी हे बोललो नाही हे मी स्पष्ट करू इच्छितो. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, शेतावर काम करणाऱ्या शेतकऱ्याचा मुलगा आणि ज्याचे आई बाप सुशिक्षित आहेत, शहरामध्ये आहेत अशाचा मुलगा ह्या दोघांच्या बुद्धीचे मापन करणे कठीण आहे. असा जर फरक केला जाणार असेल तर ते बरोबर होणार नाही ह्या बाबतीत श्वेतपत्रिका अस्पष्ट असल्यामुळे मला जो वाटला तो अर्थ मी लावला, असा अर्थ लावून विद्यार्थ्यांच्या बुद्धीचे मापन केले जाणार असेल तर उपेक्षित लोकांच्या दृष्टीने ते अकल्याणकारक ठरणार आहे. आपल्या राज्यात अनेक स्पर्धात्मक परीक्षा घेतल्या जातात. त्याचप्रमाणे व्होकेशनल गायडन्स इन्स्टिट्यूट असतात, त्यांच्याकडून बुद्धीचे मापन करण्याचे काम केले जाते. यासाठी ज्या प्रश्नपत्रिका असतात ज्याना जोडूनच उत्तरपत्रिका असतात त्या तपासल्यानंतर डिपार्टमेंटला पाठविल्या जातात. ह्या संस्थात शिक्षण घेणारे जे शिक्षक असतात त्यांचे ज्ञान गुलदस्त्यात ठेवण्यात आलेले असते, हे जे प्रश्न तयार केले जातात ते कसे तयार केले जातात हे जर राज्यातील लोकांना समजले नाही तर त्यांना मार्गदर्शन कसे मिळणार? तेव्हा अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या बुद्धीचे मापन योग्य प्रकारे कसे होणार अशी माझ्या मनात भीती आहे. नामदार शिक्षण मंत्र्यांनी ह्या बाबतीत खुलासा करावा की, ह्या व्होकेशनल गायडन्स इन्स्टिट्यूटच्या शिक्षकांना जे ज्ञान असते ते दुसऱ्यांना दिले जाऊ नये अशा त्यांना सूचना आहेत किंवा काय? हे ज्ञान जर दुसऱ्यांना दिले गेले नाही तर प्रश्नांचे उत्तर असावे याची कल्पना तरी विद्यार्थ्यांना कशी येणार? विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता ही शेवटी त्याच्या घरातील व आजूबाजूच्या वातावरणावर पुष्कळ अशी अवलंबून असते. अध्यक्ष महाराज, कॉलेजच्या प्रवेशाबाबत पान १२ वर तीन अटी स्पष्टपणे लावल्या आहेत. नैसर्गिक बुद्धी, बारा वर्षाचा अनुभव आणि सामाजिक न्याय या त्या तीन अटी आहेत. सामाजिक न्यायाची अट ही प्रवेश देण्याच्या बाबतीतील समाधानकारक बाब असली तरी दहावीची चाळणी अकरा-बारावीची चाळणी आणि तेरावीची चाळणी या तीन चाळण्यांमधून उपेक्षित वर्गातील मुले वर येऊ शकतील की नाही याबद्दल मला शंका आहे. बारा वर्गात बारा शिक्षक असले आणि त्यांचे वेगवेगळे अनुभव असले की त्या विद्यार्थांचे बारा वाजले असे समजावयास हरकत नाही. या ठिकाणी सामाजिक न्याय मिळविण्यासाठी काही जागा राखून ठेवल्या पाहिजेत तरच मागास वर्गाची प्रगती होऊ शकेल. उपेक्षित वर्ग बुद्धिमान होऊ शकत नाही तोपर्यंत त्याला कॉलेजमधील प्रवेश नाकारला जाईल अशी भीती माझ्या मनात आहे. मला या श्वेतपत्रिकेतील दुसऱ्या विषयाचा परामर्श घ्यावयाचा नाही. मला यावर सामाजिक दृष्टिकोनातून बोलावयाचे आहे. एका वर्गातील एक बुद्धिमान मुलगा घ्यावयाचा आणि दुसऱ्या वर्गातील एक मुलगा घेऊन तो पहिल्या वर्गाच्या तुलनेत बुद्धिमान नाही असे ठरवायचे असे करून चालणार नाही. आपल्याला दोन्ही वर्गातील शिक्षणाची टक्केवारी पाहिली पाहिजे. उपेक्षित वर्गातील शिकलेल्या लोकांची टक्केवारी पाहिली तर ती २०-२५ एवढी भरेल. शिक्षणाची दारे खुली झाल्यानंतर त्यांनी एवढी प्रगती केली आहे. या वर्गातील एक विद्यार्थी घेतला आणि प्रगत समाजातील एक विद्यार्थी घेतला आणि त्यांची तुलना केली तर तो सामाजिक अन्याय होईल. मागासलेल्या समाजाची शिक्षणाची टक्केवारी पाहिली तर ती फारच कमी आहे. प्रगत समाजातील ९० टक्के लोक शिकलेले असतील तर अप्रगत समाजातील १० टक्केच लोक शिकलेले असतील. अशा परिस्थितीत मागासवर्गाला सामाजिक न्याय मिळणार नसेल, त्यांना शिक्षणाची दारे खुली होणार नसतील आणि त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहिले जाणार नसेल तर ही श्वेतपत्रिका समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. तेव्हा मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांना माननीय शिक्षण मंत्र्यांकडून समाधानकारक उत्तर मिळेल अशी अपेक्षा करून मी आपले भाषण संपवितो.

❑❑❑

अनुसूचित जाती जमाती आयुक्तांच्या अहवालावरील भाषण

(२४ डिसेंबर, १९६८)

महाराष्ट्र विधानपरिषदेत अनुसूचित जाती व जमातीच्या आयुक्तांच्या अहवालावर २४ डिसेंबर, १९६८ रोजी चर्चा झाली. या चर्चेत गवई साहेबांनी महत्त्वाच्या सूचना केल्या, नोकर भरती हा त्यातील एक महत्त्वाचा मुद्दा होता. योग्य उमेदवार उपलब्ध असताना व त्यांनी किमान पात्रतेची अट पूर्ण केल्यावरही संपूर्ण नोकर भरती न होणे, यावर त्यांचा तीव्र आक्षेप होता.

अध्यक्ष महाराज मी या अहवालासंबंधी काही सूचना करण्याकरिता उभा आहे. ज्या बाबीकडे सरकारने कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे ती बाब नोकर भरतीसंबंधी आहे. तिचा उल्लेख माझ्यापूर्वी काही सन्माननीय सभासदांनी केला आहे. आपल्या महाराष्ट्रात राज्यातील सरकारी नोकरांच्या जागांवर पब्लिक सर्व्हिस कमिशनमार्फत माणसे नियुक्त केली जातात. हे कमिशन या जागांसाठी किमान पात्रता किती आवश्यक आहे हे बघते आणि ज्यांच्या अंगी ती किमान पात्रता नसेल त्यांना या जागांवर नेमण्यासाठी निवडले जात नाही. मी पब्लिक सर्व्हिस कमिशनचे गेल्या १० वर्षांचे अहवाल चाळले आहेत आणि त्या अहवालावरील चर्चेतसुद्धा मी भाग घेतलेला आहे. तेव्हा त्या कमिशनला या सरकारने अशी सूचना केली पाहिजे की, या जागा भरताना मागासलेल्या वर्गाकरिता ज्या किमान राखीव जागा ठेवलेल्या असतात तेवढ्या तरी भरल्या जातील याची दक्षता त्यांनी घ्यावी.

हल्ली असे होते की, १२ जागा भरावयाच्या असल्या व त्या जागांसाठी ज्यांना मिनिमम क्वॉलिफिकेशन आहे अशा या वर्गातील २० लोकांनी अर्ज केलेले असले तरी त्या जागांपैकी फक्त सहाच जागा भरल्या जातात. उमेदवार उपलब्ध असताना आणि त्यांना मिनिमम क्वॉलिफिकेशन असतानासुद्धा पब्लिक सर्व्हिस कमिशन इतर नियमांचे निकष त्यांना लावून त्या राखीव जागा भरीत नाही. तेव्हा उमेदवार असतील तर या लोकांसाठी ज्या किमान राखीव जागा ठेवलेल्या असतात त्या सर्वच्या सर्व भरल्या पाहिजेत असा आग्रह सरकारने धरला पाहिजे. याबाबतीत सरकारचा एक रिझॉल्यूशन आहे परंतु तो राखीव जागांपुरताच सीमित नाही. त्याचप्रमाणे मला असे म्हणावयाचे आहे की, या वर्गातील एखादा उमेदवार जनरल कॉम्पिटीशनमध्ये वर आला तर त्याला देण्यात आलेली जागा ही राखीव जागेपैकी एक आहे असे समजण्यात येऊ नये. त्याच्या गुणांच्या क्रमांकानुसार त्याला जागा द्यावी आणि त्याशिवाय जितक्या राखीव जागा असतील त्याच्यावर दुसरे लोक नेमले जावेत. पब्लिक सर्व्हिस कमिशनने यांची दखल घ्यावी अशी सूचना सरकारने त्या कमिशनला केली पाहिजे. वस्तुतः सरकारचे धोरणसुद्धा हेच आहे. मी काही नवीन सूचना करीत आहे असे नाही. मी फक्त एवढेच म्हणत आहे की, सरकारच्या या धोरणाची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने करण्यात यावी. त्याचप्रमाणे या राज्यात एवढया पब्लिक अंडरटेकिंग्ज आहेत त्यांच्यामध्येसुद्धा या लोकांसाठी ठराविक प्रमाणात जागा राखून ठेवल्या पाहिजेत आणि त्या जागा भरल्या गेल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे समाजकल्याण खात्याला

मागासलेल्या वर्गाचे केअर टेकर डिपार्टमेंट असे म्हणतात. त्याचप्रमाणे डायरेक्टर ऑफ सोशल वेल्फेअर यांना केअर टेकिंग ऑफिसर असे म्हणतात. परंतु खुद्द समाजकल्याण खात्यामध्ये जितक्या जागा या लोकांकरिता राखून ठेवलेल्या असतात त्या सर्वच्या सर्व जागांवर हे लोक नेमले जात नाहीत. केअर टेकर ऑफिसर, केअर टेकिंग डिपार्टमेंटसुद्धा सर्व राखीव जागा भरीत नाहीत. अशा रीतीने कुंपणच शेत खाऊ लागल्यावर आम्ही न्याय तरी कोणाकडे मागावयाचा असा प्रश्न आमच्यापुढे उत्पन्न होतो आणि म्हणून समाजकल्याण मंत्र्यांनी ह्या गोष्टीचा खुलासा आपल्या भाषणात करावा की समाजकल्याण खात्यामधील तरी राखीव जागा पूर्ण भरण्यात आलेल्या आहेत काय?

दुसरी गोष्ट नोकरीतील राखीव जागा भरण्याबद्दल सरकारने आपल्या खात्यापुरते सर्क्युलर काढलेले आहे. परंतु म्युनिसिपालिट्या किंवा इतर ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्यांच्यात देखील राखीव जागा भरल्या गेल्या पाहिजेत व ठराविक प्रमाणात राखीव जागा निर्माण केल्या गेल्या पाहिजेत. अशा प्रकारचे सर्क्युलर वगैरे काढण्यात आल्याची मला तरी माहिती नाही. ह्या संबंधीचा खुलासा संबंधित मंत्र्यांनी आपल्या भाषणात केला तर बरे होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांना आपण अनुदान देऊन मदत करतो तर सरकारचे जे हे धोरण आहे, त्याप्रमाणे त्या ठिकाणी देखील राखीव जागा ठेवण्यात आल्या पाहिजेत व त्या भरल्या गेल्या पाहिजेत.

त्यानंतर मला आणखी एक मुद्दा असा मांडावयाचा आहे की, खाजगी शाळांना सरकार अनुदान देते त्या ठिकाणी देखील राखीव जागा मागास वर्गासाठी निर्माण केल्या गेल्या पाहिजेत. ह्यासाठी सरकारने पुढाकार घेऊन खाजगी संस्थांना त्यासाठी सक्ती केली पाहिजे आणि अशा प्रकारच्या सूचना जरी देण्यात आल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही असा अनुभव आहे.

दुसरी सूचना अशी की, आज सहकारी तत्त्वावर गृहनिर्माण संस्था काढण्यात येत आहेत. आज शेड्युल्ड कास्टच्या लोकांनी देखील बऱ्याच गृहनिर्माण संस्था काढल्या आहेत. परंतु ह्या कामाला जी गती यायला पाहिजे ती आलेली दिसत नाही. सध्या सहकार खात्याकडे गृहनिर्माणाचे काम आणि योजना आहे. त्याऐवजी शेड्युल्ड कास्टच्या गृहनिर्माणाची योजना जर समाजकल्याण खात्याकडे ट्रान्सफर करण्यात आली तर जास्त बरे होईल. आणि शेड्यूल कास्टसाठी स्वतंत्र गृहनिर्माण संस्था जर स्थापना करण्यात आली तर ह्या लोकांच्या राहण्याचा घरांचा प्रश्न त्वरेने सुटण्यास मदत होणार आहे. आज कित्येक गृहनिर्माण संस्था अशा आहेत की त्यांना अजूनपर्यंत जमीनच मिळालेली नाही. जमीन देण्याचे काम हे महसूल विभागाकडे आहे. ह्या विभागाकडून जागा मिळायला फार त्रास पडतो. त्यामुळे ह्यापैकी कित्येक गृहनिर्माण संस्थांची कामे ही फक्त कागदावरच पडून आहेत. मागास जातीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी सरकार अनेक प्रकारची आर्थिक मदत करते. आणि इतर देखील मदत करण्यात येते. परंतु ह्या गृहनिर्माण संस्थाचे काम पूर्ण न झाल्याने सरकारची दिलेली रक्कम देखील बुडण्याची भीती निर्माण झालेली आहे. सरकारचे दिलेले पैसे देखील आज वसूल होत नाहीत कारण ही घरेच पूर्ण झालेली नाहीत. ह्यासाठी सरकारने जास्त मदत देऊन हे काम लवकर होईल ह्याची दक्षता घेतली पाहिजे आणि प्रयत्न केला पाहिजे म्हणजे सरकारने जो पैसा दिला आहे तो बुडीत न होता त्याची वसुली तरी होऊ शकेल. त्याचप्रमाणे सरकारचे ह्यासाठी मदत देण्याचे जे प्रमाण आहे ते बदलले पाहिजे. त्याचे कारण असे की, आज घरबांधणीचे दर फार वाढले आहेत आणि सरकारने जे आर्थिक सहाय्य देऊ केलेले आहे त्यात घर बांधणे फार कठीण झालेले आहे. म्हणून सरकारने मदतीचे प्रमाण जे ठरविले आहे त्यात वाढ केली पाहिजे.

आज खेडोपाडी पिण्याचा पाण्याचा प्रश्न फार बिकट आहे. खेड्यात ज्या विहिरी आहेत त्यावर अस्पृश्य समाजातील लोकांना सवर्ण हिंदू आज देखील पाणी भरू

देत नाहीत. परंतु गावात अस्पृश्यासाठी स्वतंत्र विहीर असावी ह्या कल्पनेला मात्र माझा विरोध आहे. गावातील जी सार्वजनिक विहीर असेल त्यावरच ह्यांना पाणी भरायला मिळाले पाहिजे आणि खेड्यातून ज्या नवीन विहिरी खोदल्या जातील त्या अस्पृश्य समाजाच्या वस्तीच्या जवळ असल्या पाहिजेत.

स्वातंत्र्य मिळून २० वर्षे झाल्यानंतर देखील पुणे तालुक्यातील मावळ भागातील ज्या २७ शाळा आहेत त्यात आज देखील अस्पृश्य समाजातील मुलांना शाळेच्या बाहेर बसून शिक्षण घ्यावे लागत आहे. त्यांना शाळेच्या इमारतीत प्रवेश दिला जात नाही. ह्या शाळा मंदिरातून भरतात आणि मुले शाळेच्या बाहेर बसतात आणि मास्तर शाळेत बसून त्यांना शिकवीत असतात. ह्या बाबतीत मंत्र्यांनी आपल्या भाषणात खुलासा करावा आणि सदनासमोर सांगावे की, ह्याबाबत काय उपाययोजना करण्यात आलेली आहे.

अस्पृश्यतेचा जो प्रश्न आहे तो केवळ सहभोजने किंवा समारंभ करून सुटणार नाही. हा माणसाच्या मनाचा प्रश्न आहे. आज जे अस्पृश्य समाजातील लोक सरकारी नोकरीत काम करीत आहेत त्यांना त्यांचे कॉन्फिडेन्शियल रेकॉर्ड खराब करून प्रमोशन दिले जात नाही. ज्यांचे कॉन्फिडेन्शियल रेकॉर्ड मागील १० वर्षे चांगले असते आणि प्रमोशनची वेळ आली की, ते खराब केले जाते. त्याला प्रमोशन मिळत नाही. ह्यावरून मागास जमातीसंबंधी इतर लोकांच्या मनात आकसाची भावना आहे असे जर म्हटले तर अयोग्य होणार नाही आणि त्यामुळे या समाजातील ५० टक्के लोकांना सुपरसीड करून दुसऱ्यांना प्रमोशन देण्यात आलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. समाजकल्याण खात्याने या बाबतीत लक्ष दिले पाहिजे. अशा प्रकारचे जर कॉन्फिडेन्शियल रेकॉर्डमुळे त्या माणसाचे नुकसान होणार असेल तर ते रेकॉर्ड ठेवून उपयोग काय ? एखाद्या अधिकाऱ्याचे सर्वच रेकॉर्ड एक्सलंट असतील, एका अधिकाऱ्याच्या बाबतीत तर मला माहीत आहे की, त्याचे रेकॉर्ड चांगले होते आणि ॲबनॉर्मल सिच्युएशनमध्ये हा अधिकारी चांगले काम करू शकतो अशा त्याच्या कॉन्फिडन्शियल रेकॉर्डमध्ये शेरा आहे आणि त्यानंतर एके ठिकाणी नॉर्मल सिच्युएशनमध्ये हा अधिकारी चांगले काम करू शकत नाही असा शेरा मारून त्याला अयोग्य ठरविण्यात आले व त्याचे प्रमोशन रोखण्यात आले आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. अध्यक्ष महाराज, ह्या जमातीच्या लोकांच्या प्रमोशनसंबंधी एक खास रेजोल्युशन आहे. त्यात असे स्पष्ट म्हटले आहे की एखाद्या कर्मचाऱ्याचे कॉन्फिडेन्शियल रेकॉर्ड जरी दोन वेळा खराब असेल तरी त्याला प्रमोशन डिनाय करता कामा नये. जर त्याचे विरुद्ध करप्शन किंवा अशा प्रकारे सिरीयस चार्जेस असतील तरच प्रमोशन डिनाय करता येईल. परंतु नियमाची अंमलबजावणी मात्र होत नाही. क्लास ४ सोडले तर क्लास १ आणि क्लास २ मध्ये ह्या जमातीच्या लोकांची टक्केवारी अजूनपर्यंत पूर्ण करण्यात आलेली नाही. केवळ सोशल वेल्फेअर खात्याच्या मंत्र्यांनी दुसऱ्या खात्याच्या मंत्र्यांना ह्या जागा का भरल्या नाहीत असे विचारून हा प्रश्न सुटण्यासारखा आहे असे मला वाटत नाही. आपल्याला जर खरोखरी काही करावयाचे असेल तर केवळ ह्या कामासाठी खास एक अधिकारी नेमून त्याच्यामार्फत ठरल्याप्रमाणे राखीव जागा भरल्या जातील अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

अस्पृश्यतेचा प्रश्न अजून सुटला नाही याचे परवाच एक उदाहरण वर्तमानपत्रात आले आहे. जायकवाडी येथील आपसातील भांडण विकोपाला जाऊन वयात आलेल्या एक अस्पृश्य जमातीच्या बाईवर तिच्या पतीसमोर रेप करण्यात आला. गुन्हेगारी ह्या नात्याने ह्या प्रश्नाकडे पाहण्याऐवजी केवळ आकसाने ह्या ज्या गोष्टी केल्या जातात त्या दृष्टीने ह्या गोष्टीकडे शासनाने पाहिले पाहिजे. केवळ मतपरिवर्तनाने काही सुधारणा होईल अशी आशा करण्याला आता जागा राहिलेली नाही.

श्री. रा. सू. गवई : अध्यक्ष महाराज, या अहवालासंबंधी दोन दिवसांमागे चर्चा झाली होती आणि त्यावेळी मी काही मुद्दे स्पष्ट केले होते. त्यांची पुनरुक्ती न करता मी इतर मुद्यांकडे वळतो.

या अहवालातील विकेन्द्रीकरणाच्या भागावर जोर देऊन त्याबद्दल जी शिफारस केली आहे त्या शिफारशीशी मी असहमत आहे असे मी पूर्वी सांगितले आहे. त्याच्या समर्थनार्थ मी असे म्हणेन की विकेन्द्रीकरणाच्या कारभाराचा घटक जो जिल्हा परिषद त्याच्याकडे, शिक्षण आणि समाजकल्याण हे दोन्ही विषय असू नयेत. कारण जिल्हा परिषदा ज्यांच्या हातात आहेत ते लोक राजकीय अधिष्ठान समोर ठेवून शिक्षण क्षेत्रात शाळांना मंजुरी देणे, वसतिगृहांना मंजुरी देणे वगैरे गोष्टी करणार असतील तर सामाजिक कार्यकर्त्यांमधील सामाजिक सेवेची प्रवृत्ती त्यामुळे नाहीशी होईल. दुसरे मला असे सांगावयाचे आहे की, १९५५ मध्ये अस्पृश्यतेसंबंधीचा अधिनियम झाला. त्याअन्वये जेथे जेथे अस्पृश्यता पाळण्यात आली तेथे तेथे अशा प्रकारची दखल घेण्यात आली असे म्हटले आहे. मला असे म्हणावयाचे आहे की येथे घडलेल्या गुन्ह्यांचे जे प्रमाण आहे त्यावरून अस्पृश्यतेचे प्रकार तुरळक प्रमाणात घडत असतील असे समजण्यात येऊ नये. मला हे सांगितले पाहिजे की, या कायद्याची अंमलबजावणी ज्या तळमळीने व्हावयास पाहिजे त्या तळमळीने ती दुर्दैवाने होत नाही. आपल्या राज्याची काही नीती ठरली आहे. सामाजिक मूल्ये जतन करताना जे राष्ट्रीय प्रश्न म्हणून मानले जातात त्यामध्ये अस्पृश्यता नाहीशी झाली पाहिजे हा एक प्रश्न आहे. एवढेच नव्हे तर अमुक इतके गुन्हे शोधल्याशिवाय त्या फौजदाराला किंवा त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या माणसांना बढती मिळणार नाही अशा तऱ्हेची अट असणे आवश्यक आहे.

दुसरी गोष्ट अशी की, अमुक एक गावामध्ये जबाबदार मंडळींनी अस्पृश्यता पाळली आहे म्हणून कोणी तक्रार देण्यासाठी अधिकाऱ्याकडे गेले तर त्याची कैफियत अधिकारी घेत नाहीत. सहसा अशी तक्रार करण्यास कोणी धजत नाही आणि मोठ्या मुष्किलीने कोणी कैफियत दिली तर त्याची दखल पोलीस अधिकारी घेत नाहीत. अशा तऱ्हेच्या अडचणी प्रश्नोत्तराच्या वेळीही सभागृहामध्ये दाखवून दिलेल्या आहेत. मागच्या अधिवेशनाच्या वेळी सावनेर ह्या गावी सार्वजनिक विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरू दिले जात नाही म्हणून तक्रार केली होती. अस्पृश्यता निवारण करण्याच्या दृष्टीने कोणी त्याची दखल घेतली नाही पण फौजदाराने कॉंप्रोमाइज केले आणि सवर्ण हिंदूनी सकाळी पाणी भरावयाचे आणि ६ वाजल्यानंतर अस्पृश्यांनी पाणी भरावयाचे असे ठरले. काहीतरी मूल्ये सुचविण्यासारखी ही सामाजिक बाब नाही तर मूळ गोष्टींचा निर्णय झाला पाहिजे. पाणी घेण्याच्या बाबतीत मला अशी सूचना करावयाची आहे की, पंजाब राज्यात ज्या ज्या ठिकाणी सार्वजनिक विहिरी आहेत त्या ठिकाणी एक दगड बसवून असे लिहिले आहे की जात पंथ असा कोठलाही भेद न मानता सगळ्यांना पाणी भरता येईल आणि कोणालाही मज्जाव होणार नाही. त्याप्रमाणे आपल्या येथे ज्या सार्वजनिक विहिरी बांधल्या गेल्या आहेत किंवा येथून पुढे बांधल्या जातील त्यावर सरकारतर्फे जिल्हा, परिषदातर्फे किंवा ग्रामपंचायतीतर्फे जात पंथ कोणताही असला तरी त्यांना मज्जाव होणार नाही अशी पाटी लावली पाहिजे अशी शिफारस सरकारने करावी.

अध्यक्ष महाराज, ह्या अहवालात कायदेशीर मदत करण्यासंबंधी एक सवलत नमूद केलेली आहे पण त्या शिफारशीचे विडंबन पाहावयास मिळते. कायदेशीर मदत म्हणजे एखाद्या माणसास वकील पाहिजे असल्यास तो मिळावा आणि संबंधित माणसाने आपल्या विचाराचा वकील ठेवावा असे म्हटले असले तरी त्याला ती मदत प्राप्त होत नाही. कायदेशीर सवलत ही नुसती पुस्तकात केलेली आहे आणि त्याचे दिग्दर्शन राज्यकर्त्यांनी केलेले आहे. ही सवलत केवळ पुस्तकात राहिलेली आहे, ती लोकांपर्यंत

पोचलेली नाही. अध्यक्ष महाराज, ह्या ठिकाणी अनेक योजनांचा उल्लेख केलेला आहे. मागच्या वेळी मी एका योजनेच्या संदर्भात बोलताना असे दाखवून दिले आहे की, गेल्या दोन चार वर्षात खात्याचा या योजनेवर एक पैसाही खर्च झालेला नाही. एवढेच नव्हे तर फेब्रुवारीच्या २८ तारखेपर्यंत ह्या रकमेच्या एक-चतुर्थांश पैसे खर्च होत नाहीत आणि शेवटी घिसाडघाईने मार्च-एप्रिल महिन्याच्या अखेरीस पैसे दिले जातात मग त्या योजनांचा अभ्यास असो वा नसो अंदाज असो वा नसो एक महिन्याच्या आत ह्या रकमा पास करण्यात येतात. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे की, समाजकल्याणाची बाब आहे त्यासंबंधी सर्वापेक्षा जागृत राहून आपल्याला कोठे खर्च करावयाचा आहे, त्याचा विनियोग कसा करावयाचा आहे. याचा विचार करणे आवश्यक आहे. ह्या समाजकल्याणामध्ये जो महत्त्वाचा विषय शिक्षण आहे त्याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. आपल्याला माहिती असेल की भारत सरकारने अस्पृश्य जमातीतील जे लोक एस.एस.सी. पास झालेले असतील त्यांना शिष्यवृत्त्या देण्याचा प्रघात सुरू केला आहे आणि त्याची एजन्सी आपल्या महाराष्ट्र सरकारकडे आहे. ह्या ज्या शिष्यवृत्त्या आहेत त्या सुरुवातीला न मिळता मुलांच्या परीक्षा जवळ येतात तेव्हा मिळतात. पुस्तके वह्या खरेदी करण्याकरिता ॲडहॉक रक्कम द्यावी म्हणून सरकारकडे लोकांनी अर्ज केले, विधानसभेपुढे ही तक्रार मांडली आणि मंत्र्यांनी त्याला मान्यता दिली, परंतु ॲडहॉक बेसवर ती अमाऊंट मिळालेली नाही. जेव्हा पाट्या, पुस्तके घेण्यासाठी पैशाची जरूरी असते तेव्हा हे पैसे मिळत नाहीत ही गोष्ट प्रकर्षाने मला नामदार मंत्र्यांच्या निदर्शनास आणावयाची आहे. भारत सरकारकडून मिळणारे हे पैसे आहेत आणि सरकार फक्त एजंट आहे तेव्हा त्यांनी हे पैसे वेळेवर दिले जातील याची दक्षता घ्यावी.

दुसरी गोष्ट अशी की, महाराष्ट्र राज्याने अनुसूचित जाती, जमातीच्या ज्या लोकांनी धर्मांतर केले आहे आणि जे बौद्ध झाले आहेत त्यांना सवलती दिलेल्या आहेत. तेव्हा जे बौद्ध विद्यार्थी कॉलेजचे शिक्षण घेतात त्या बौद्ध विद्यार्थ्यांना त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन स्कॉलरशिप्स देणे जरूर आहे. ज्या अर्थी महराष्ट्र सरकारने त्यांना सवलती देण्याची जिम्मेदारी स्वीकारली आहे त्याअर्थी मध्यवर्ती सरकारला त्यांनी तशी शिफारस करणे आवश्यक आहे. त्यांनी असे सांगावयास पाहिजे की, आमच्या राज्यातील बौद्ध विद्यार्थी जे पूर्वी अनुसूचित जाती जमातीचे होते त्यांना स्कॉलरशिप मिळत होती तेव्हा यांनाही मिळाली पाहिजे. माझ्याकडे अशा शेकडो तक्रारी आहेत की, ज्यांनी अर्जावर बौद्ध म्हणून लिहिले आहे त्यांना स्कॉलरशिप मिळालेलीच नाही. नुसत्या सवलती जाहीर करून काही फायदा नाही तर अनुदान मिळाले पाहिजे आणि ते मिळत नसेल तर काही फायदा होणार नाही. या बाबतीत भारत सरकारची योजना अशी आहे की, अस्पृश्य विद्यार्थी, अनुसूचित जाती जमातीचे विद्यार्थी एखाद्या हायस्कूलमध्ये असतील आणि त्यांना ७५ टक्के मार्क असतील तर त्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यासाठी भारत सरकारची ७५ टक्के ग्रँट आहे. ती योजना १९५३ सालापासून आली आहे. १९६३ सालापासून ज्या ज्या हायस्कूल्समध्ये विद्यार्थी शिकत आहेत त्यांचे अर्ज पडलेले आहेत पण रक्कम देण्यात आलेली नाही. मी चौकशी केली तेव्हा असे सांगितले गेले की आम्हाला अर्थखात्याकडून मंजुरी मिळालेली नाही. हे पैसे आपल्या जवळचे जात नाहीत तर ते केंद्र सरकारकडून मिळतात ते समाजकल्याणाच्या दृष्टीने खर्ची घालण्याची कुवत नसावी ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. अशा तऱ्हेने केंद्र सरकारकडून ज्या योजना येतात त्या प्रत्यक्षात येत नाहीत. अशा तऱ्हेची एक केंद्र सरकारची योजना आहे की जे भूमिहीन आहेत त्यांना जमिनी वाटल्या जाव्यात आणि ह्या लोकांना जमिनीची मशागत करता यावी म्हणून महसूल

अधिकाऱ्यांनी जीवापाड मेहनत केली आणि योजना राबविली. परंतु मला असे वाटते की, या बाबतीत समाजकल्याण खाते लगनने काम करीत नाही. तसे त्यांनी केले असते तर लक्षावधी रुपयांची केंद्र सरकारची मदत आहे आणि ह्या सरकारची दिडकी जात नाही असे असताना ते पैसे वाया गेले नसते. तेव्हा ह्या अनुषंगाने मला असे म्हणावयाचे आहे की, ज्यांना लगन आहे, प्रेम आहे अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती समाजकल्याण खात्यामध्ये करणे आवश्यक आहे.

यानंतर अध्यक्ष महाराज, ह्या अहवालात अनुसूचित जाती आणि जमातींना सैनिकी शिक्षणाच्या बाबतीत सवलती मिळाव्यात अशी शिफारस करण्यात आली आहे. मी ह्या शिफारशीचे समर्थन करतो. ह्या बाबतीत संबंधित खाती उचित कारवाई करतील अशी अपेक्षा करतो.

यानंतर ह्या राज्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमाती आणि आदिवासी ह्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी जी वसतिगृहे काढण्यात आली आहेत त्यांचे दोन प्रकार आहेत. काही वसतिगृहे खास ह्या जमातीच्या मुलांसाठी आहेत आणि काही संमिश्र मुलांसाठी काढण्यात आली आहेत. ह्या राज्यातील अस्पृश्यता नष्ट होण्यास मदत व्हावी म्हणून सरकारने असे ठरविले आहे की, ह्या जमातीच्या मुलांसाठी काढलेल्या वसतिगृहांत १० टक्के सवर्ण मुलांनाही प्रवेश देण्यात यावा. नियमाप्रमाणे एका वसतिगृहात १०० विद्यार्थ्यांची सोय असते त्यापैकी १० सवर्ण विद्यार्थी घेतले जातात याचा अर्थ असा होतो की, मूळ १०० विद्यार्थ्यांची जी सोय होत आहे ती कमी होऊन ९० विद्यार्थ्यांची सोय होऊ लागली आहे. यामुळे अनुसूचित जातींना दिलेल्या सवलतीत एक प्रकारची कमतरता निर्माण होते. म्हणून माझी अशी सूचना आहे की, मूळ जी १०० विद्यार्थ्यांची संख्या आहे ती कायम ठेवून त्याखेरीज १० सवर्ण हिंदूंच्या मुलांना प्रवेश द्यावा त्याला माझी हरकत राहणार नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, ज्या वसतिगृहात सर्व अनुसूचित जातींच्या मुलांनाच प्रवेश दिला जातो त्यापैकी काही जमाती अशा आहेत की, त्यांना शिक्षणाची अधिक गोडी लागलेली आहे. तेव्हा अशा विद्यार्थ्यांना जर प्रवेश दिला गेला तर अट मोडली गेली असे समजता कामा नये.

या नंतर पडीक जमिनींचा उल्लेख या अहवालात करण्यात आलेला आहे. हा प्रश्न मी ह्या सभागृहात अनेक वेळा मांडलेला आहे. केवळ भूमिहीन लोकांचाच हा प्रश्न नाही, तर महाराष्ट्र राज्य अन्नधान्याच्या दृष्टीने तुटीचे राज्य असल्यामुळे अधिक धान्य कसे काढता येईल ह्या दृष्टिकोनातून आपण ह्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. ह्यासाठी पडीक जमिनींचे वर्गीकरण करून त्यापैकी कोणकोणत्या जमिनी वाटण्याजोग्या आहेत हे पाहून त्यांची वाटणी तत्परतेने करण्यात आली पाहिजे.

यानंतर, अध्यक्ष महाराज, अनुसूचित जाती जमातीतील लोकांना सरकारी कचेऱ्यात नोकऱ्या देण्याच्याबाबतीत रिझर्व्हेशन ठरवून दिलेले आहे व यासाठी १९६१ साली एक समिती नेमण्यात आली होती. पुढे ही समिती कोठे हरपली हे मला समजत नाही. ह्या समितीचा अहवाल गेल्या वर्षीच सरकारकडे आलेला आहे असे समजते. ह्यासंबंधी मी मागे प्रश्न विचारला होता की, ह्या अहवालात केलेल्या शिफारसी सरकारने मान्य केल्या आहेत की नाही आणि नसल्यास केव्हा करणार आहे. ह्या गोष्टीला आता पाच वर्षे होऊन गेली, पण ह्या जमातीच्या लोकांसाठी सरकारी नोकरीत जे युनिफॉर्म रिझर्व्हेशन ठरवून देण्यात आले आहे ते केवळ पुस्तकांतच राहिलेले आहेत. सरकारी नोकरीत, पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी श्रेणी असते. त्यापैकी चौथ्या श्रेणीतल्या जागांचे प्रमाण भरले गेले आहे. कारण त्या जागा चपराशाच्या असतात, पण पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीच्या जागांच्या बाबतीत हे प्रमाण पाळले जात नाही, बाहेर एक प्रकारची अस्पृश्यता असते, सरकारी नोकरीत ह्या लोकांच्या बाबतीत निराळ्याच

प्रकारची अस्पृश्यता पाळण्यात येते असा अनुभव येतो. ह्या राखीव जागा भरून काढण्यासाठी सरकारने काय प्रयत्न केले आहे याची पाहणी करण्याची आवश्यकता आहे. सरकारकडून ह्या बाबतीत अक्षम्य दिरंगाई झाली आहे. आज सरकारी नोकरीत असलेल्या अस्पृश्य जमातीच्या अधिकाऱ्यांना नोकरशाहीतील अस्पृश्यता फार जाणवते. बाहेर ज्या जमातीच्या लोकांना हॉटेलमध्ये येण्यास मनाई केली जाते, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास मनाई केली जाते, पण सरकारी नोकरीत असलेल्या ह्या जमातीच्या अधिकाऱ्यांच्या वर जे अधिकारी असतात ते ह्या लोकांचे कॉन्फिडेन्शियल रेकॉर्ड खराब करतात. वरच्या अधिकाऱ्यांच्या ह्या धोरणामुळे शेकडो अनुसूचित जमातीच्या लोकांना सुपरसीड करण्यात आलेले आहे. काहींची प्रमोशन्स थांबविण्यात आलेली आहेत. ह्या बाबतीत जी. ए. डी. चा एक ठराव आहे की, मॉरल टर्पिट्यूड सिद्ध झाल्याशिवाय केवळ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह गोष्टीत काही कमी पडले म्हणून कोणाचीही बढती थांबविता कामा नये. समाजकल्याण खात्याच्या नामदार मंत्र्यांनी ह्या गोष्टीत अवश्य लक्ष घातले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, सरकारी नोकरीमध्ये ज्याप्रमाणे ह्या जमातीच्या लोकांना रिझर्व्हेशन आहे त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळण्याच्या बाबतीतही आहे. आता कॉलेज सुरू होण्याची वेळ लवकरच येईल तेव्हा ह्या बाबतीत काटेकोरपणे लक्ष दिले पाहिजे. गेल्या वर्षी असा अनुभव आला की, बौद्धांसाठी ७ जागा रिझर्व्ह होत्या पण दोनच अर्ज आल्यामुळे त्या जागा सवर्ण हिंदूंच्या मुलांना देण्यात आल्या. अध्यक्ष महाराज, मला असे म्हणावयाचे आहे की, हे रिझर्व्हेशन मागासलेल्या जमातीसाठी आहे हे तत्त्व लक्षात घेऊन ह्या जमातीपैकी एखाद्या जमातीच्या मुलांकडून ठरलेल्या जागांइतके अर्ज आले नाहीत तर त्या राहिलेल्या जागा ह्याच मागासलेल्या जमातीपैकी इतर जमातीच्या मुलांना दिल्या पाहिजेत. केवळ आकड्यांवर बोट ठेवता कामा नये. तेव्हा मला अशी सूचना करावयाची आहे की, ह्या जागा मागासलेल्या जमातीपैकी इतर कोणत्याही जमातीमध्ये बदलता आल्या पाहिजेत. यात थोडासा लवचिकपणा ठेवला पाहिजे.

यानंतर घरासंबंधी आणि पुनर्वसनासंबंधी एक शिफारस ह्या अहवालात करण्यात आलेली आहे. झोपडपट्ट्यांचा प्रश्न मुंबई, नागपूरसारख्या शहरात तर भेडसावीतच आहे, पण जिल्हास्तरावर आणि तालुकास्तरावर जी शहरे आहेत तेथेही हा प्रश्न भयंकर स्वरूप धारण करू लागला आहे. ज्यांना राहण्यासाठी जागा नाही अशा लोकांनी अनधिकृतपणे लोकांच्या जागेचा कब्जा घ्यावा, अतिक्रमण करावे असे मी म्हणणार नाही, परंतु हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सरकारने परिणामकारक असे उपाय योजले पाहिजेत. ग्रामीण पातळीवर ह्या राज्याने त्याचप्रमाणे केंद्र सरकारने गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करण्याची योजना हाती घेतली आहे. गलिच्छ वस्त्या नाहीशा करण्यासाठी ज्या झोपडपट्ट्या असतील त्या उठवून त्यांना अधिकृत जागेवर बसवून घरांचा प्रश्न सोडविता येईल. ह्या प्रश्नाचे स्वरूप सीमित समजता कामा नये. अस्पृश्यता निवारण ही एक राष्ट्रीय समस्या आहे असे समजून जर आपण त्याकडे पाहिले तरच आणि ह्या प्रश्नाविषयी एक प्रकारची लगन लावल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. ह्या प्रश्नाबाबत महाराष्ट्र राज्यात पूर्वी जे एक प्रकारचे प्रेम आणि आवड होती ती अलीकडे घसरू लागली आहे, ओसरू लागली आहे. अशा प्रकारचा एक आरोप महाराष्ट्र सरकारवर ह्या अहवालात करण्यात आला आहे. या अहवालाच्या निमित्ताने त्यांनी ज्या शिफारसी केल्या आहेत त्यांचा पुनरुच्चार मी करणार नाही. परंतु या शिफारशी मंजूर करीत असताना शासनाने नुसते "हो" म्हणून चालणार नाही. या सर्व शिफारशींची अंमलबजावणी होईल याची दक्षता माननीय मंत्र्यांनी घ्यावी एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

❑❑❑

एचबी ११८०—१८

मुंबईतील दंगल

(१७ मार्च, १९६९)

मुंबईमध्ये सीमा प्रश्नावरून दंगल उसळली होती त्यावर विधानपरिषदेत चर्चा झाली. नेहमीप्रमाणे पोलिसांनी अतिरेक केल्यापासून ते पोलीस दिसतच नव्हते अशी चर्चा झाली. या चर्चेत विरोधकांनी मा. गृहमंत्री व मा. मुख्यमंत्र्यांचा राजीनामाही मागितला. या चर्चेत रा. सू. गवई यांनी १७ मार्च, १९६९ रोजी केलेल्या भाषणात स्पष्टपणाने सांगितले की, या दंगलीमुळे महाराष्ट्राची जी बदनामी देशभर झाली ती जास्त चिंताजनक आहे. ही बदनामी आपण कृतीतून धुऊन काढली पाहिजे. कुणाचाही राजीनामा घेऊन हा प्रश्न सुटणार नाही ...

अध्यक्ष महाराज गेल्या दोन दिवसापासून ह्या सभागृहात एका फार मोठ्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा चालली आहे. त्याबाबत मी आपले विचार मांडण्यासाठी उभा आहे. शिवसेनेने जी दंगल केली तिचा संबंध सीमा प्रश्नाशी आहे किंवा नाही ही गोष्ट अगदी वेगळी आहे. परंतु ह्या प्रश्नाच्या निमित्ताने आज एक नवीन प्रश्न आपल्यासमोर आलेला आहे आणि आपल्याला त्याचा विचार गंभीरपणे केला पाहिजे. सीमा प्रश्नाच्या निमित्ताने मुंबईमध्ये जी दंगल झाली त्यामुळे महाराष्ट्राची प्रतिमा डागाळली गेली आहे ही गोष्ट कोणीही मान्य करील. हा प्रश्न सभागृहाच्या दृष्टीने, राज्य सरकारच्या दृष्टीने व सर्वच दृष्टीने अतिशय चिंताजनक आहे. सीमावादाच्या प्रश्नाच्या निमित्ताने ही दंगल घडवून आणण्यात आली आहे. त्यामुळेच ह्या गोष्टीची चिंता वाटते सर्वच प्रांतीय लोक आज मुंबईत राहत आहेत व अनेक वर्षांपासून मुंबईचे बहुविध स्वरूप आपल्याला दिसून येते. पण ह्या प्रश्नासंबंधी बोलताना आपल्यात संकुचित प्रांतीयता आलेली दिसते.

मुंबईच्या दंगलीसंबंधाने येथे जी भाषणे झाली त्यात असे दिसून आले की, पोलिसांचा वापर फार मोठ्या प्रमाणात केला गेला येथपासून, तो दंगलीच्या ठिकाणी पोलीसच उपस्थित नव्हते येथपर्यंत चर्चा झाली आणि परस्परविरोधी अशी विधाने येथे करण्यात आली. ती ऐकून मला एक गोष्ट आठवते. एकदा एक म्हातारा आणि त्याचा मुलगा घोड्यावर बसून बाजाराला जायला निघाले. मुलगा लहान होता म्हणून म्हाताऱ्याने त्याला घोड्यावर बसविले व आपण घोड्याचा लगाम धरून पायी चालला होता. ते एका गावापाशी आले तेव्हा तेथील लोक म्हणाले, "काय मुलगा मूर्ख आहे ? आपल्या म्हाताऱ्या बापाला पायी चालवत आहे व आपण मात्र खुशाल घोडयावर बसून चालला आहे." हे ऐकून मुलगा खाली उतरला व त्याने आपल्या म्हाताऱ्या बापाला घोड्यावर बसण्यास सांगितले. त्यानंतर बाप घोड्यावर बसला व मुलगा चालू लागला. काही अंतर गेल्यावर दुसऱ्या गावात आणखी काही लोक भेटले. ते म्हणाले बाप काय मूर्ख आहे ? लहान मुलाला पायी चालवितो आणि स्वत: मात्र घोड्यावर बसला आहे. हे ऐकल्यावर बाप आणि मुलगा दोघांनी घोड्यावर बसायचे ठरविले ते घोड्यावर बसून पुढील मार्ग आक्रमू लागले. पुढे गेल्यावर रस्त्यात आणखी काही लोक भेटले. ते

म्हणाले दोघे दोघे एकाच घोड्यावर बसून चालले आहेत. काय तो बिचारा म्हातारा घोडा त्याच्यावर दोघे दोघे बसले तर तो मरूनच जायचा. शेवटी दोघेही खाली उतरून पायी चालू लागले. त्यावरदेखील लोक म्हणाले काय मूर्ख आहेत. एवढा घोडा बरोबर असताना त्यावर न बसता दोघे पायीच चालले आहेत. ही गोष्ट सांगायचा माझा उद्देश असा होता की लोक सर्वच बाजूने बोलत असतात. काहीही केले तरी लोक नावे ठेवतात. पोलीस जास्त ठेवले तर जास्त का ठेवले, कमी ठेवले तर कमी का ठेवले ? म्हणजे जनता ही दोन्ही बाजूने बोलत असते. त्याबद्दल मला काही फारसे बोलायचे नाही. परंतु मुख्य जो चिंतेचा विषय आहे तो मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आहे.

दुसरे मला असे सांगायचे आहे की, सीमावादाच्या प्रश्नाचा संबंध काँग्रेस पक्ष, सरकार व विरोधी पक्ष या सर्वांशी आहे. तो सोडविण्याचा प्रयत्न सर्वांनीच केला पाहिजे. तो सोडविला जाईल त्याबद्दल मला विशेष चिंता वाटत नाही परंतु आज मुंबईत झालेल्या दंगलीच्या रूपाने महाराष्ट्राची अस्मिता डागाळली जात आहे त्याचे मला दु:ख होते. चीन किंवा पाकिस्तान ह्यांच्याशी जेव्हा आपले युद्ध झाले तेव्हा भारतभूमीच्या रक्षणासाठी आपण सर्व एकदिलाने उभे राहिलो. परंतु आज ह्या दंगलीच्या निमित्ताने महाराष्ट्राची प्रतिमा डागाळण्याचा जो प्रयत्न केला जात आहे, तशी ती डागाळली जाऊ नये हे सांगण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी जी भाषणे झाली त्यावरून मला दुसरी एक वऱ्हाडी गोष्ट आठवली व ती मी सांगणार आहे.

एकदा वानरांची पंगत बसली होती व त्या पंगतीमध्ये भोकरांची चटणी केली होती. जेवताना एका माकडाच्या हातून भोकर दाबल्या गेले आणि भोकरांची बी वर उडाली त्या माकडाला वाटले की, मी तर या बीच्या वर उडू शकतो. तेव्हा तो त्याच्यावर उडाला. त्यानंतर अशा रीतीने प्रत्येक माकडाला आपणही काही कमी नाही असे वाटून उडण्याची चढाओढ लागली. त्याचप्रमाणे आज आपल्या येथेही चढाओढ लागली आहे हे मला मोठ्या खेदाने सांगावे लागते. प्रत्येकाला वाटते की, आपण यापेक्षा मोठा प्रयत्न करू शकतो. आज आपल्याला पिछेहाट सहन करावी लागली आहे, परंतु याअगोदर जसे सांगण्यात येते की, आपली या सीमा प्रश्नाच्या बाबतीत पिछेहाट झालेली आहे ते म्हणणे बरोबर नाही. लढाईमध्ये कित्येक वेळा रिट्रिट घ्यावी लागते. त्यामध्ये मागे येऊन पुन्हा पुढे यशस्वी चढाई करण्याचा उद्देश असतो. त्याचप्रमाणे आपण डावप्रतिडावाने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना ह्या ठिकाणी मुंबई शहरात ही दंगल उभारली जावी हे बरोबर झाले नाही.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, मंत्रिमंडळाने आणि मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा म्हणजे हा प्रश्न सुटेल. मला सांगावयाचे आहे की हा प्रश्न कोणाच्याही राजीनाम्याने सुटणार नाही. ह्या ठिकाणी शिवसेनेने जी दंगल उभारली तिच्या फार खोलात न जाता मला या ठिकाणी इतकेच सांगावयाचे आहे की, या दंगलीमुळे महाराष्ट्राची देशात फार बदनामी झालेली आहे व ही हानी भरून न येण्यासारखी झालेली आहे. यामुळे देशात महाराष्ट्राची प्रतिमा डागाळली आहे. मला शेवटी एकच सांगावयाचे आहे की आपल्या या मुंबई शहरात हा दंगा झाला नसता तर बरे झाले असते. या गोष्टीचा विरोधी पक्षानेही विचार करावा. ही दंगल म्हणजे झाडाच्या फांदीवर बसून त्याच झाडाचा बुंधा तोडण्यासारखे झाले. इतका मूर्खपणा पुढे तरी होऊ नये व आपल्या राज्याची भारतीय पातळीवर जी प्रतिमा डागाळली आहे ती सुधारण्याचा आपण प्रयत्न करावा.

❑❑❑

एचबी ११८०—१८अ

अस्पृश्य व नवबौद्धांवरील अत्याचार

(१९ नोव्हेंबर, १९६९)

अस्पृश्य व नवबौद्ध समाजावर होत असलेल्या अत्याचाराबाबत १९ नोव्हेंबर, १९६९ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेत अल्पकालीन चर्चा झाली. श्रीमती शांताबाई दाणी यांनी ही चर्चा उपस्थित केली होती. त्या चर्चेत रा. सू. गवईही सहभागी झाले होते. हा सामाजिक व राजकीय प्रश्न आहे असे म्हणत त्यांनी स्त्रियांवर झालेल्या अत्याचाराबाबत ज्या गोष्टी घडतात त्याची माहिती सभापतींना द्यावी पण त्याचा तपशिलाने सभागृहात उल्लेख होऊ नये अशी विनंती त्यांनी शांताबाई दाणी यांना केली होती.

अध्यक्ष महाराज, अत्यंत गंभीर अशा विषयावर श्रीमती शांताबाई दाणी यांनी या सभागृहात चर्चा उपस्थित केली आहे. त्यांनी या विषयावर जो स्थगन प्रस्ताव दिला होता त्यातील बाबींचा आपण सहानुभूतीने विचार करून ही चर्चा तातडीने उपस्थित करण्यास अनुमती दिली याबद्दल मी आपले आभार मानतो. या विषयाची निकड आणि गांभीर्य आपण पूर्णपणे ओळखले आहे हे यावरून सिद्ध होते.

या बाबतीत जे जे प्रकार घडले त्यांची संपूर्ण नोंद श्रीमती शांताबाई दाणी यांनी घेतली आहे आणि त्याबद्दल येथे सांगितले आहे. मी या विषयाचे फक्त तात्त्विक विवेचन करणार आहे आणि या सर्व प्रकारामागे जो विचार आहे त्याचे विश्लेषण करणार आहे. ज्या ज्या वेळी अशा प्रकाराबद्दल आम्ही येथे प्रश्न उपस्थित करतो त्या त्या वेळी हा एकुलता एक प्रकार आहे असे उत्तर दिले जाते. आणि यावेळी देखील तसेच उत्तर दिले जाईल अशी माझी अपेक्षा आहे. मला असे सांगावयाचे आहे की हा एकुलता एक प्रकार आहे असे नाही. याच्या पाठीमागे एक विचार आहे. विकेंद्रीकरण होऊन जिल्हा परिषद आल्यानंतर काही प्रकार घडले. बायकांची अब्रू घेण्यात आली. या आणि खालच्या सभागृहात त्याबद्दल चर्चा झाल्या, हे प्रकार एखाद्या वेळच्या आवेशातून किंवा वैयक्तिक बाबींवर पडलेले नाहीत. याच्या पाठीमागे एक प्रकारचा एकजिनसीपणा आहे. शिरसगावामध्ये झाले तसेच यवतमाळ जिल्ह्यातील खेड्यात झाले. श्रीमती दाणी या स्त्री सभासद आहेत, मी पुरुष सभासद असूनही स्त्रियांच्या बाबतीत ज्या गोष्टी घडल्या त्याचा तपशिलाने येथे उल्लेख करणे मला उचित वाटणार नाही म्हणून मला श्रीमती दाणी यांना अशी विनंती करावयाची आहे की, सर्वच गोष्टी सभागृहात बोलणे बरोबर नसल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या प्रकारांची लेखी नोंद सभापतींना द्यावी. अमुक जमातीचा माणूस पुढे येत आहे आणि तो पुढे येता कामा नये यामध्येच या झगड्याची उत्पत्ती आहे. एका गावात बौद्धाने घर बांधण्याचा प्रयत्न केल्याबरोबर अतिक्रमणाची बाब उपस्थित होते. "महार शेफारला, बौद्ध शेफारला" असे वाक्यप्रचार रूढ झाले आहेत. मी संपूर्ण महाराष्ट्रात फिरतो. काही जमिनीवर बौद्ध लोकांकडून अतिक्रमणे घडली असतील. परंतु त्याचा कॉग्निझन्स पोलिसांनी घ्यावा. परंतु तो कॉग्निझन्स पोलीस घेत नाहीत किंवा रेव्हेन्यू डिपार्टमेंटही घेत नाही. वस्तुतः अशा प्रकारची अतिक्रमणे शेकडोंनी होत असतात, परंतु त्यावेळी त्याची दखल कोणी घेत नाही. परंतु बौद्धांकडून अतिक्रमण झाल्याबरोबर रेव्हेन्यू किंवा पोलीस डिपार्टमेंटने त्याची दखल घेतलेली नसताना काही लोकच त्याची दखल घेतात आणि जमिनीतील उभे पीक कापतात किंवा पिकात गुरे

सोडतात. अस्पृश्य आणि बौद्ध लोकांना लहान भाऊ मानून त्यांना वर येण्यासाठी मदत करण्याऐवजी ते खालीच राहावेत, वर येता कामा नयेत या वृत्तीतून हे प्रकार घडतात असे मला म्हणावयाचे आहे. जमिनीची प्रकरणेच काय, परंतु सार्वजनिक निवडणुकीच्या संदर्भातदेखील असे प्रकार घडले आहेत. लोकशाही पद्धतीनुसार एखादा नवबौद्ध सरपंच बनला तर नवबौद्ध सरपंच म्हणून राहता कामा नये या दृष्टिकोनातून कारवाया केल्या जातात. संविधानाच्या तरतुदीनुसार सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांना खुल्या केल्या आहेत. ते दुरून पाणी भरतात तोपर्यंत ठीक असते. परंतु त्यांनी संविधानाने दिलेला आपला हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला की, महार फार शेफारले अशा प्रकारचे उद्‌गार निघतात. या उपेक्षित समाजामध्ये जो अनेक वर्षांपासून न्यूनगंड निर्माण झाला आहे तो दूर सारून कोणी पुढे येण्याचा प्रयत्न करू लागल्याबरोबर त्याचे त्याबद्दल कौतुक करण्याऐवजी त्याला फार शेफारला म्हणून त्रास दिला जातो. या सभागृहात एका विहिरीच्या संदर्भात मी प्रश्न उपस्थित केला असताना मंत्र्यांनी असे उत्तर दिले की, अस्पृश्यांना गावातील लोकांनी पाणी भरण्यास बंदी केली होती, परंतु त्या बाबतीत कॉम्प्रमाईज केले आणि स्पृश्यांनी सकाळी पाणी भरावे व अस्पृश्यांनी संध्याकाळी भरावे असे ठरले. संविधानातील तरतुदीचा अंमल न करता अशा प्रकारे समझोत्याने गोष्टी करू लागलो तर संविधान कशासाठी आहे? मला असे म्हणावयाचे आहे की, हा कायद्याचा प्रश्न आहे. अध्यक्ष महाराज, या बाबतीत श्रीमती दाणी यांना चर्चा उपस्थित करावी लागावी आणि मला बोलू देण्याबद्दल आपल्याला विनंती करावी लागावी हे मी माझे दुर्दैव समजतो. वस्तुतः या प्रश्नाची लगन आणि तळमळ बाळगून मी, श्रीमती दाणी किंवा श्री. रुपवते यांच्या व्यतिरिक्त इतर मंडळींनीच पुढे येऊन या अन्यायाला वाचा फोडावी आणि त्यावर बोलावे अशा क्षणाची मी वाट पाहत आहे.

अध्यक्ष महाराज, मी एकच सांगेन की, हा प्रश्न सामाजिक आणि शासनाचा असा संमिश्र प्रश्न आहे. आपल्या समोर केसेस सांगण्यात आल्या तसे प्रकार बंद व्हावे यासाठी लगन पाहिजे. दारूचे गुन्हे किंवा चोरीचे गुन्हे बंद होण्यासाठी जे प्रयत्न करतात त्यांना आपण प्रमोशन देतो. तेव्हा अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे असे समजून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी जे प्रयत्न करतात त्यांना आपण प्रमोशन दिले आहे काय? अस्पृश्यता निवारण्याची दखल घेऊन लोक पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि या बाबतीत घडलेल्या गुन्ह्यांची नोंद करावी असे सांगितले तर ते सांगतात की आम्हाला एवढेच काम आहे काय आणि दुसऱ्या तक्रारी बंद आहेत काय? तेव्हा या बाबतीत सरकारी नोकरीतील लोकांनी देखील विचार केला पाहिजे. आता महात्मा गांधी आपल्यातून गेले आहेत. विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा फुले, आगरकर यांचे युग संपले आहे आणि ज्यांना ह्या प्रश्नाविषयी लगन आहे, सामाजिक प्रश्नासंबंधी तळमळ आहे असे लोक नसल्यामुळे ह्या प्रश्नाचा आपल्याला गांभीर्याने विचार केला पाहिजे. महात्मा फुल्यांच्या काळात, महात्मा गांधींच्या काळात, आगरकरांच्या काळात काही माणसे होती ते याचा विचार करीत होते; पण आता तो विचार संपलेला आहे. अमेरिकेमध्ये आयसेनहोवर जाऊन केनेडी आले आणि तेथील लोकांच्या मनात नवीन विचार आले. पण आमच्या देशात महात्मा गांधी गेल्यानंतर अस्पृश्यता हा राष्ट्रीय प्रश्न आहे, तो सामाजिक प्रश्न आहे व तो सोडविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे ही लगन दिसून येत नाही. मी केवळ एका जातीसाठी बोलत नाही तर माझा प्रश्न असा आहे की, देशामध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी संविधान आहे; तेव्हा हा प्रश्न राष्ट्रीय प्रश्न म्हणून आपण का समजत नाही? मी आपल्याला सांगेन की ह्या घटनांचा निषेध करण्यासाठी एकही राजकीय पक्ष पुढे आलेला नाही. ह्या प्रश्नाचा विचार करणारी एकही व्यक्ती पुढे आली नाही. महात्मा गांधी, आगरकर, महात्मा

फुले यांनी केलेले कष्ट मला कळतात. दुर्दैवाची गोष्ट अशी की, मी एक तरुण असलो तरी आमच्यातील समाजवाद कायम आहे. हा जो समाजवाद आहे तो वाढणार आहे अशी भीती वाटते म्हणून हा प्रश्न मी मांडला आहे. तेव्हा हा प्रश्न सोडविण्यासाठी समाज, शासन आणि एक्झिक्युटिव्ह यांनी बरोबरीने उभे राहून प्रयत्न केला पाहिजे एवढी विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

भारतीय संविधानाच्या कलम ३६८ वरील चर्चा

(१९ डिसेंबर, १९६९)

भारतीय संविधानाच्या आर्टिकल ३६८ मध्ये संसदेच्या उभय सभागृहाने सुधारणा केल्यावर मान्यतेसाठी तो प्रस्ताव महाराष्ट्र विधिमंडळात आला. त्या चर्चेत सहभागी होताना रा. सू. गवई म्हणाले ...

अध्यक्ष महाराज, भारतीय संविधानाच्या आर्टिकल ३६८ ला संसदेच्या दोन्ही सभागृहांत जी दुरुस्ती पास करण्यात आली तिला देशातील राज्यांच्या सभागृहांनी सहमती द्यावयाची आहे. आपल्या देशातील निम्म्या लोकांच्या हिताचा हा विषय आहे व त्याकरिता आपल्या सभागृहाच्या उपनेत्यांनी हा प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे. सर्वप्रथम या दुरुस्त्या राज्यसभेने पास केलेल्या आहेत आणि अत्यंत तातडीने या सभागृहाच्या उपनेत्यांनी ही दुरुस्ती मान्यतेसाठी आपल्या राज्यातील सभागृहात आणली त्याबद्दल मी त्यांचे अत्यंत आभार मानतो. आपल्या राज्यात निरनिराळ्या जाती-जमाती आहेत आणि त्यांची प्रगती सारखी नाही. त्याकरिता आपल्या देशातील संविधानामध्ये त्यांच्याकरिता, त्यांच्या उन्नतीकरिता खास तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. युनिटी इन डायव्हर्सिटी, विविधतेतून एकता असे जरी आपल्या देशाचे वर्णन करण्यात येत असले तरी या निरनिराळ्या जातीजमातींच्या प्रगतीसंबंधी सर्वांची सारखी प्रगती व्हावी याकरिता, जे मागे असतील त्यांना प्रगतांच्या बरोबर आणण्याकरिता घटनेमध्ये काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. ह्या तरतुदी आपल्या देशाच्या संविधान समितीने प्रामाणिकपणे केल्या आहेत असे माझे प्रामाणिक मत आहे. आपल्या देशाचे संविधान निर्माण करण्याच्या कार्यात सिंहाचा वाटा म्हणजे जवळ जवळ ९९ टक्के वाटा हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आहे व त्यांच्या परिश्रमाने दिनांक २६ जानेवारी १९५० ला आपल्या देशाला प्रजासत्ताकाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. या संविधानामध्ये ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यांमध्ये देशातील समाजाचे कोणतेही अंग अशक्त किंवा अविकसित असता कामा नये असा उद्देश आहे. अध्यक्ष महाराज, माणसाचे शरीर जरी गोंडस दिसत असले आणि त्याचे अंग पॅरलिसिसने लुळे झालेले असेल तर त्या गोंडस शरीराचा त्या माणसाला कोणत्याही प्रकारचा उपयोग नसतो. त्याचप्रमाणे देशात काही समाज प्रगत आणि काही अविकसित असले तर त्या देशाच्या समाजाची निरोगी वाढ होत नाही. म्हणून आपल्या देशात जे वीकर सेक्शन्स होते त्यांच्या विकासाकरिता, त्यांना पुढारलेल्या समाजाबरोबर आणण्याकरिता, खास तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या अशक्त समाजावर पूर्वी परंपरेने काही अन्याय करण्यात आलेले आहेत, समाजाने ते अन्याय केलेले आहेत ही गोष्ट आज सर्वांना मान्य आहे. त्यामुळे प्रगतीच्या बाबतीत आपल्या समाजाचे हे

अंग अशक्त राहिलेले आहे. आज जर त्यांना इतर समाजाच्या बरोबरीने आणावयाचे असेल तर त्यांना मागच्या अन्यायासंबंधी नुकसानभरपाई दिली पाहिजे ही गोष्ट ओघानेच आली. ज्याप्रमाणे कोर्टामध्ये केस चालविताना एखाद्या निरपराध माणसावर काही अन्याय झाला असेल तर त्याला कोर्ट संरक्षण देते आणि कित्येक वेळा त्याच्या विरुद्ध अपराध करणाऱ्या माणसाला शिक्षा करते आणि कित्येक वेळा नुकसानभरपाईही द्यावयास सांगते, त्याचप्रमाणे आज आपल्याला ही गोष्ट मान्य आहे की ह्या विकर सेक्शन्सवर वर्षानुवर्षे अन्याय होत आलेला आहे व आज त्यांना त्याबद्दल नुकसानभरपाई देण्यात येत आहे व ती पुरेशी झालेली नाही; म्हणून पुढेही ही नुकसानभरपाईची मुदत वाढविण्यात येत आहे. ह्या दृष्टीने ह्या तरतुदी मूळ घटनेमध्ये करण्यात आलेल्या होत्या आणि नुकसानभरपाई पुरेशी झालेली नाही म्हणून ह्या तरतुदींची मुदत वाढविण्यात येत आहे.

देशात असलेल्या समाजाची प्रगती होण्याच्या दृष्टीने प्रथम समाजातील सर्व थर एका पातळीवर आले पाहिजेत, म्हणजे मगच सर्व लोकांत आणि सर्व समाजात हेल्दी कॉंपिटीशन आहे असे आपल्याला म्हणता येईल. जर शर्यतीला सुरुवात होण्याच्या ठिकाणी काही समाज असले आणि त्यावेळी काही १०० यार्ड पुढे गेलेले असले व तेथूनच त्यांना पुढे पळावयास परवानगी दिली तर चढाओढ योग्य आहे असे कोणी म्हणणार नाही. सर्वांना प्रथम एका रेषेवर उभे केले पाहिजे आणि नंतर तेथून चढाओढ सुरू केली पाहिजे. तरच समाजाचा सारखा विकास झाला असे म्हणता येईल. असे केले नाही तर मागचा मागेच राहणार आणि पुढचा पुढेच राहणार व सर्व समाजाची पातळी एका रेषेवर येणार नाही. जर आपण काही लोकांना १०० मीटरच्या चढाओढीमध्ये २५ मीटर पुढे उभे केले तर व सर्वांना एका वेळेस पळावयास लावले तर पुढचे नेहमीच २५ मीटर पुढे राहतील या गोष्टीचा विचार केला पाहिजे. हे सांगण्याकरिता कोणा ज्योतिषाची गरज आहे असे मला तरी वाटत नाही. जे पुढे गेले ते पुढेच राहतील आणि जे मागे राहिले ते मागेच राहतील. म्हणूनच मी म्हणतो की जो मागे आहे त्याला प्रथम आपण पुढच्याच्या बरोबर आणा आणि नंतर चढाओढ लावा.

ही गोष्ट मी नम्रपणे सांगू इच्छितो की, ह्या ठिकाणी ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्या मागासवर्गीय समाजाला त्यांच्यावर मागे झालेल्या अन्यायाबद्दल नुकसानभरपाई देण्याकरिता आहेत. त्यांनी जे पुढे गेलेले आहेत त्यांच्याबरोबर जावे याकरिता त्यांना ह्या सवलती देण्यात आलेल्या आहेत. घटनेमध्ये ह्या ज्या तरतुदी आहेत त्या वीस वर्षांकरिता देण्यात आलेल्या होत्या. त्यांची मुदत आता २६ जानेवारी १९७० ला संपते. ती मुदत पुढे वाढवावयाची आहे व त्याकरिता हा प्रस्ताव आपल्या समोर आहे. राज्याच्या विधिमंडळात आणि पार्लमेंटमध्ये राखीव जागा ठेवण्यात आलेल्या होत्या त्या पुढेही दहा वर्षे राहणार आहेत.

अध्यक्ष महाराज, घटनेप्रमाणे अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. कोणी उच्चनीच भेद मानला तर त्याला शिक्षा करण्याकरिता कायदा करण्याचा सरकारला अधिकार देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे सरकारने कायदा केला आहे. यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यावेळी संविधान सादर केले होते, त्यात त्यावेळी त्यांनी जे भाष्य केले होते, त्यांनी सांगितले होते की, जे संविधान मी तयार केले ते फार चांगले झाले असे सांगण्यात येते. मला सांगावयाचे आहे की, याहीपेक्षा मला जास्त चांगले संविधान तयार करता आले असते. दुसऱ्या कोणी जर हे लिहिले असते तर ते चांगले झाले असते की वाईट झाले असते याच्या वादामध्ये मी जात नाही. माझे म्हणणे इतकेच आहे की ह्या गोष्टी संविधानाच्या चांगलेपणावर अवलंबून नाही, तर त्यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्या कशा रीतीने राबविण्यात येतात यावर अवलंबून आहे. हे संविधान अमलात

आणण्याकरिता किती अडथळे येतील यावर ही गोष्ट अवलंबून आहे. आपले संविधान सूर्य, चंद्र व तारे आहेत तोपर्यंत राहावे असे मला वाटते; पण ते त्याप्रमाणे राहील किंवा नाही या कल्पनेने मी भयभीत झालेलो आहे.

अध्यक्ष महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाष्यामध्ये दोन तीन उदाहरणे मोठी समर्पक दिली. मी ती या ठिकाणी उद्धृत केली तर ते अनाठायी होईल असे मला वाटत नाही. त्यांनी पहिले उदाहरण या देशावर दीडशे वर्षे राज्य करून गेलेल्या इंग्रजांचे दिले. त्यांनी सांगितले की, मसाल्याचे व्यापारी म्हणून या देशात इंग्रजांनी पाय ठेवला, परंतु या देशात असलेले जाती-पातींचे प्राबल्य, विविध जातींत असणारी भेदभावाची भावना आणि परिणामत: या देशात असणारा राष्ट्रीय भावनेचा अभाव ही या देशातील लोकांची वैगुण्ये त्यांनी नेमकी हेरली आणि त्या वैगुण्यांचा फायदा घेऊन या देशावर दीडशे वर्षे अप्रतिहत राज्य केले. म्हणून राज्य करणाऱ्या इंग्रजांना दोष देण्यापेक्षा आपल्या लोकांच्या मनोवृत्तीला दोष देणे त्यांनी पसंत केले. दुसरे उदाहरण त्यांनी पृथ्वीराज चौहान आणि जयचंद राठोड या भाऊबंदांचे दिले. एकमेकांचे निकटचे नातेवाईक असणारे हे दोघे भाऊबंदकीच्या रोगाला बळी पडले आणि दोघांच्या भांडणात तिसऱ्याला, ज्याने या देशाची लूट केली त्याला घुसविले. त्या लूट करणाऱ्या तिसऱ्याचे नाव मी मुद्दाम घेत नाही, कारण त्याची येथे आवश्यकता नाही, परंतु डॉ. आंबेडकरांनी लूट करणाऱ्या त्या तिसऱ्याला दोष दिला नाही, त्यांनी भाऊबंदकीच्या मनोवृत्तीला दोषी ठरविले. तोच प्रकार झाशीच्या राणीच्या बाबतीत झाला. १८५७ सालचे स्वातंत्र्य समर सुरू होते. देशात स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले होते, झाशीची राणी या लढ्यात भाग घेत होती, पराक्रम गाजवीत होती, परंतु दुसरीकडे तिचेच देशबांधव ती पराभूत व्हावी यासाठी प्रयत्न करीत होते. ही उदाहरणे देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हेच सांगितले की स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजासत्ताक पद्धती या देशाला नवीन नाही! परंतु प्रजासत्ताकातील सर्व घटकांना योग्य तो न्याय देणारे वातावरण मात्र या देशात अद्याप तयार झालेले नाही आणि ते जोपर्यंत होत नाही तोपर्यंत प्रजासत्ताकाच्या यशाविषयी मी साशंक राहीन. अध्यक्ष महाराज, संविधानातील संबंधित तरतुदी वाचून मी सभागृहाचा वेळ घेत नाही, परंतु अस्पृश्यतापालन हा कायद्याने दंडित असा अपराध ठरविल्यानंतरही या देशात, या राज्यात, सार्वजनिक पाणवठ्यांवर, सार्वजनिक विहिरींवर, अस्पृश्यांना पाणी भरू देण्यास मज्जाव करणे म्हणजे अस्पृश्यता निर्मूलन कायद्याचा भंग करणे होय. परंतु प्रथमत: असा कायदेभंग करणाऱ्याविरुद्ध तक्रार करण्याचे धैर्य या गरीब जमातीत नाही. बरे, त्यांनी धैर्य दाखविलेच तर त्या तक्रारीची दखल पोलीस अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे. प्रथमत: हे लोक सवर्णाविरुद्ध तक्रार करण्याची हिम्मत दाखवितात याचाच त्या पोलीस अधिकाऱ्याला राग येतो. तक्रार घेऊन येणाऱ्याला तो सांगतो की तुमची कामे करण्यास मी तुमचा गुलाम नाही, नोकर नाही. म्हणजे तक्रार नोंदून घेण्यासाठी तो खळखळ करतो. सांगण्याचा हेतू हा की, संविधानात कितीही चांगल्या गोष्टी लिहिल्या तरी आमच्या, प्रत्येक भारतीयाच्या मनात त्या जोपर्यंत बिंबविल्या जात नाहीत तोपर्यंत त्या जागच्या जागीच राहणार. गेल्या एकोणीस वर्षात या तरतुदी पाळल्या गेल्या असत्या तर आज या लोकांनीच पुढे येऊन सांगितले असते की आम्हाला या सवलती आता नकोत, त्यामुळे आमचा स्वाभिमान दुखावला जातो. परंतु गेल्या एकोणीस वर्षांत या तरतुदींचे पालन न झाल्यामुळेच आज त्या पुन्हा एक्स्टेन्ड कराव्या लागत आहेत. अध्यक्ष महाराज, लोकसभेत या विषयावर चर्चा झाली तेव्हा मी संपूर्णत: ऐकली. सर्व राजकीय पक्षांनी एकमताने या तरतुदींना पाठिंबा दर्शविला याचा मला आनंद वाटला. या तरतुदींचे यथाशक्य पालन करण्याच्या दृष्टीने अनुकूल असे वातावरण या देशात निर्माण होऊ लागले आहे असे यावरून दिसते. मात्र हे वातावरण कायम राहिले पाहिजे. अशक्तांना संवर्धित

करण्याकरिता संविधानात असणाऱ्या तरतुदी अंमलात न आल्यामुळे सामाजिक अन्यायाला बळी पडलेले, होरपळलेले, शोषण झालेले लोकप्रातिनिधिक सभागृहातून, लोकसभेतून पाठवावेत आणि त्यांनी या समाजाची गाऱ्हाणी पुढे मांडावी हा रिझर्व्हेशनच्या मागील हेतू आहे. अध्यक्ष महाराज, राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्याच्या दृष्टीने संविधानात ज्या तरतुदी आहेत त्यांचेही काटेकोरपणे पालन झाले असते तर आज राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याकरिता आपल्याला जे खास प्रयत्न करावे लागत आहेत ते करावे लागले नसते. मागे एका परिसंवादात मी सांगितले होते की, "या देशाला असे नेतृत्व हवे आहे जे संविधानाचे पूर्णांशाने स्वतः पालन करील व लोकांना पालन करण्यास प्रवृत्त करील." हिंदूंचा पवित्र धर्मग्रंथ गीता असला तरी संविधान हा त्यांचा परमपवित्र ग्रंथ राहील. बौद्धांना धम्मपदाइतकेच संविधानाचे महत्त्व राहील, ख्रिश्चनांना बायबलइतकेच त्याचे महत्त्व राहील. असे नेतृत्व या देशात निर्माण होईल, तेव्हा या तरतुदींची आवश्यकता राहणार नाही. परंतु तोपर्यंत या तरतुदी राहणे आवश्यक आहे आणि म्हणून यासंबंधीच्या प्रस्तवाचे मी स्वागत करतो व माझे भाषण संपवितो.

❑❑❑

वैयक्तिक मालकीच्या विहिरी ताब्यात घेणे

(४ एप्रिल, १९७०)

महाराष्ट्रात धम्मचक्र प्रवर्तन झाले. पुढारलेल्या महाराष्ट्रात समाजातील जातीय विषमतेची दरी भरून निघण्याची प्रक्रिया गतिमान आहे. तरी मागास जाती-जमातीमधील जनतेचे हाल पूर्णपणे संपलेले नाहीत. या महाराष्ट्रात काही भाग असेही आहेत ज्यात दलितांना विहिरींवर पाणी भरू दिले जात नाही. सार्वजनिक विहिरी कोरड्या पडल्या आहेत. अशावेळी खाजगी विहिरी शासनाने मोबदला देऊन ताब्यात घ्याव्यात आणि त्या वर्गीकृत जाती-जमातींना पाणी भरण्यासाठी उपलब्ध करून द्याव्यात अशी सूचना करणारे ठराव जनसंघाचे वि. घ. देशपांडे यांनी परिषदेत आणला होता. त्यावेळी रा. सू. गवई यांनी दिनांक ४ एप्रिल १९७० रोजी केलेले भाषण.

अध्यक्ष महाराज, राज्यातील ज्या गावात वैयक्तिक मालकीच्या विहिरींवर सर्वसाधारण जनता पाणी भरते परंतु वर्गीकृत जातीजमातीच्या व्यक्तींना मात्र विहिरी मालकाकडून पाणी भरण्यास मनाई करण्यात येते. त्या विहिरी शासनाने आपल्या ताब्यात घेण्यासंबंधी हा ठराव या सभागृहात मांडून माननीय सदस्य श्री. वि. घ. देशपांडे यांनी या ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडली याबद्दल सर्वप्रथम मी त्यांचे आभार मानतो. अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात काही तात्त्विक विवेचन केले. त्या संदर्भात मी एका वाक्यात सांगेन की, "अस्पृश्यतेचा प्रश्न आणि त्याची उकल यासंबंधी अनेक वादग्रस्त विचार या देशात प्रचलित आहेत आणि माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांनी जेव्हा या प्रश्नाला हात घातला तेव्हा त्यांची ती कृतीही तशीच वादग्रस्त ठरली होती." जेथे सारी समाज व्यवस्थाच वादग्रस्त आहे तेथे समाजातील विविध वर्गाचे आपसातील संबंध वादग्रस्त असणे अपरिहार्य ठरते. याला साधे उदाहरण द्यावयाचे म्हणजे किल्ली हरवलेल्या कुलुपाचे देता येईल. ज्या कुलुपाची किल्ली हरवलेली आहे त्या कुलुपाकरिता नवीन किल्ली तयार करून घेण्याकरिता रस्त्यावरील फेरीवाल्याला बोलाविले तर तो म्हणेल की कुलुपाचा आकार आणि आतील वळण कसे आहे हे मला पाहिले पाहिजे. किल्ली कोणत्या आकाराची करावयाची हे कुलुपाच्या आतील वळणावर अवलंबून असते, दोष किल्लीचा नसतो. कुलुपाच्या आतील वळणाचा असतो. याच न्यायाने समाजातील या अवघड प्रश्नाची उकल करावयाची असेल तर त्याच वळणाचा मार्ग शोधून काढावा लागेल यात शंका नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी १९२३ साली महाडमधील तलावावर आपला सत्याग्रह केला. अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी आपल्या अनेक राष्ट्रीय नेत्यांनी विचार मांडले आहेत. डॉ. आंबेडकरांच्या कृतीपुढे आम्ही नतमस्तक आहोत असेही त्यांनी कबूल केले परंतु सुधारणावाद आणि क्रांतीवाद या शब्दामध्ये या प्रश्नाला गुंतविण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे ठाम मत होते की, कोणत्याही दयेच्या अगर अनुकंपेच्या भावनेतून या प्रश्नाची सोडवणूक होता कामा नये, अशी सोडवणूक होणे त्यांना अभिप्रेत नव्हते. त्यांचे असे मत होते की या लोकांचे हे मूलभूत हक्क आहेत आणि ते त्यांनी स्वत:हून मिळविले पाहिजेत, इतरांनी त्यांना ते दिले पाहिजेत. त्यांनी असे घोषवाक्य दिले होते की, जे गुलाम आहेत त्यांना त्यांच्या गुलामीची प्रथम जाणीव करून द्या, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची त्यांना जाणीव करून द्या आणि चमत्कार पहा की, नंतर ते स्वत:च गुलामगिरीविरुद्ध लढा देतील. जर त्यांच्यावर दयेच्या भावनेतून आपण उपकार करू लागलो तर ते आणखीच दबले जातील. त्यामुळे हा प्रश्न सुटणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या लोकांना न्याय मिळावा हेच केवळ अभिप्रेत नव्हते तर जे लोक कळत-नकळत अस्पृश्यतेचे पालन करीत आहेत, सार्वजनिक मालकीच्या विहिरींवर या लोकांना पाणी भरण्यास मनाई करून जे कळत-नकळत हा अन्याय करीत आहेत त्यांनाही आपल्या या चुकीची जाणीव व्हावी ही त्यांची भावना होती.

अध्यक्ष महाराज, या ठरावाची कक्षा सिमित आहे याची मला जाणीव आहे. मला हे सांगितले पाहिजे, एक सामाजिक कार्यकर्ता या नात्याने मला याची जाणीव आहे की, अस्पृश्यता पालनासंबंधीची जी अनेक उदाहरण दाखविता येतील त्यातील ९० टक्के उदाहरणे विहिरीसंबंधीची आहेत आणि दोन जमातीतील भांडणापैकी ९० टक्के भांडणासाठी हा विहिरींचा प्रश्न कारणीभूत होतो व दहा टक्के भांडणे जमिनीचा अनधिकृत ताबा घेतल्यावरून होतात. अध्यक्ष महाराज, जोपर्यंत गावातील बुद्ध लोक सार्वजनिक विहिरीवर दुरून पाणी भरीत असतात तोपर्यंत त्या गावातील हे लोक फार समजदार आहेत अशी प्रसिद्धी केली जाते, परंतु त्या गावात एखादा सामाजिक कार्यकर्ता गेला आणि त्याने या लोकांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून दिली व आपला हक्क बजाविण्यासाठी हे लोक पाणवठ्यावर जाऊन स्वत: पाणी भरू लागले की लगेच हे लोक आता बिघडले असे सांगितले जाऊ लागते. अध्यक्ष महाराज, मी या सभागृहाचा एक सर्वसाधारण सभासद असताना नागपूर जवळच्या सावली गावासंबंधीचा प्रश्न येथे उपस्थित केला होता तेव्हा मला असे उत्तर देण्यात आले होते की, आता त्या गावातील हा तंटा मिटला आहे, तडजोड झाली आहे. कॉम्प्रमाइज झाले आहे आणि सकाळी स्पृश्यांनी व सायंकाळी अस्पृश्यांनी पाणी भरावे असे ठरले आहे.

मी अत्यंत जबाबदारीने हे सांगितले आहे. एवढेच कशाला अध्यक्ष महाराज, स्वत: माननीय मंत्र्यांनाच मी जवळ जवळ बारा तेरा वेळा, खाजगी भेटीत आणि या सभागृहातही प्रश्नाद्वारा अशी माहिती दिली होती की, पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात अद्यापही सार्वजनिक शाळेत अस्पृश्यांना यावयास बंदी केली जाते. परंतु यासंबंधी अद्यापपर्यंत शासनाने दखल घेतली नाही, अधिकृत उत्तर मला अजूनपर्यंत मिळाले नाही. हा प्रश्न कोणत्या तरी

जमातीला न्याय मिळावा म्हणून मी उपस्थित करीत नाही तर आपल्या राज्यावर, आपल्या जिल्ह्यावर, आपल्या गावावर हा डाग आहे तो पुसला जावा ही माझी इच्छा आहे. अध्यक्ष महाराज, समाजकल्याण विभागाच्या क्षेत्रात येणाऱ्या ज्या बाबी आहेत त्यापैकी ही एक बाब आहे. समाजकल्याणाच्या योजना शास्त्रीय दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेल्या आहेत. अस्पृश्यता घालविण्यासाठीही शास्त्रीय दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. या प्रश्नाची शास्त्रीय दृष्टिकोनातून उकल व्हावयास हवी. अध्यक्ष महाराज, मागे यासंबंधी चर्चा करताना खाजगी विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरता येईल की नाही या संदर्भात आपण आपले विचार प्रदर्शित केले. आपल्या संविधानाचे कलम १५(२) मध्ये पुढीलप्रमाणे म्हटले आहे :

"(*2*) No citizen shall, on grounds only of religion, race, caste, sex, place of birth or any of them be subject to any disability, liability, restriction or condition with regard to—

* * * * * *

(*b*) the use of wells, tanks, bathing ghats, roads and places of public resort maintained wholly or partly out of State funds or dedicated to the use of the general public.

आपल्या राज्याच्या अस्पृश्यता निवारण कायद्यात पुढीलप्रमाणे म्हटले आहे :—

"The use of, or access to, any river, stream, spring, well, tank, cistern, water tap or other watering place, or any bathing ghat, burial or cremation ground, any sanitary convenience, any road or passage, or any other place of public resort which the members of the public, or persons professing the same religion or belonging to the same religious domination or any section thereof, as such person have a right to use or have access to ;".

यासंबंधी जे इंटरप्रिटेशन आहे ते माझे मित्र सन्माननीय सभासद श्री. बच्छराजजी व्यास आणि श्री. रा. फा. चौधरी यांनी मागे एकदा या ठिकाणी मांडले होते. त्यासंबंधात आपण अशी सूचना केली की, केवळ सार्वजनिक विहिरीवरच नव्हे तर वैयक्तिक विहिरीवरसुद्धा गावातील लोक पाणी भरत असतील तर केवळ वैयक्तिक मालकीची विहीर आहे या सबबीवर हरिजनांना पाणी भरू दिले नाही तर ती गोष्ट अस्पृश्यता निवारण कायद्याचा भंग करणारी ठरेल.

माननीय अध्यक्ष महाराज, मला हा प्रश्न काढावयाचा नव्हता. माननीय मंत्र्यांच्या लक्षात तो यावा आणि त्यासंबंधी क्लॅरिफिकेशन व्हावे म्हणून तो मी उपस्थित केला. ज्या विहिरीसंबंधी त्यांनी सांगितले ती विहीर चाचुंडी गावातील आहे. अकोले गावापासून दोन मैलांवर हे गाव आहे. त्या प्रकरणाचा रिमूव्हल ऑफ अनटचॅबिलिटी ॲक्टशी काही संबंध नाही. ते संपूर्णपणे वेगळे आहे. त्या गावात जोपर्यंत गावठाण उपलब्ध आहे तोपर्यंत जमीन ॲक्वायर करता येणार नाही असे हायकोर्टाचे रुलिंग आहे. प्रश्न असा आहे की, संविधानाचे जे आर्टिकल १७ आहे त्याच्याखाली अद्याप स्टेट केस झालेली नाही. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की तशी स्टेट केस करणे अत्यावश्यक झाले आहे. माझ्या माहितीप्रमाणे लोकल पोलीस ॲक्ट आहे तो लावीत असताना विहिरीवर पाणी भरण्याच्या केसीसच्या बाबतीत स्थानिक पोलीस या कायद्याचे चुकीचे इंटरप्रिटेशन करतात आणि ज्या तक्रारी असतात त्यांची दखल घेतली जात नाही. माननीय मंत्र्यांच्या मनात एक विवक्षित केस आहे असे दिसते.

चाचुंडी गावातील खाजगी विहिरीसंबंधी ती लीगल पोझिशन आहे. तेव्हा मला असे म्हणावयाचे आहे की, हा प्रश्न त्या

प्रकरणामध्ये अजिबात निर्माण झालेला नाही. त्याचप्रमाणे मला अशी सूचना करावयाची आहे की, अस्पृश्यता निवारणाच्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांचे एक खास पथक नेमण्यात आले पाहिजे. आपल्या राज्यात दारूबंदीचा कायदा अंमलात आणल्यानंतर त्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस फोर्समध्ये एक स्वतंत्र विभाग उघडण्यात आला. वाहतुकीचे प्रश्न हाताळण्यासाठी पोलीस खात्यामध्ये एक स्वतंत्र विभाग आहे. त्याचप्रमाणे अस्पृश्यता निवारण कायद्याचा भंग करण्याचे गुन्हे हे गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत आणि म्हणून त्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांचे एक खास पथक नेमण्यात यावे. हे आपल्याला सहज करता येईल असे मला वाटते. त्याचप्रमाणे दारूबंदी विभागात काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने दारूबंदीसंबंधीचे किती गुन्हे पकडले आहेत हे लक्षात घेऊन त्याला बढती देण्यात येते. त्याचप्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांनी अस्पृश्यता निवारण कायद्यातील तरतुदींचा भंग करण्यासंबंधीचे किती गुन्हे पकडले आहेत यावरून त्यांना बढती देण्यात यावी. असे केले तर हे गुन्हे पकडण्याच्या कार्याला गती मिळेल. त्याचप्रमाणे ज्या विहिरीचा मी उल्लेख केला आहे ती खासगी विहीर असली तर कोणत्याही फॉर्ममध्ये अस्पृश्यता कोणीही पाळता कामा नये हे तत्त्व कायद्यातील कलमानेच घालून दिलेले असल्यामुळे या कलमाखाली त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची स्टेस्ट केस करावी अशी माझी विनंती आहे. या मुद्याच्या बाबतीत कायमचा निकाल लावण्याच्या दृष्टीने अशी स्टेट केस करणे अत्यंत जरूर आहे. त्याचप्रमाणे या लोकांना सामाजिक न्याय मिळावा या दृष्टीने आता निरनिराळ्या सन्माननीय सभासदांनी जे विचार मांडले आहेत त्यांच्याशी मी सहमत आहे.

❑❑❑

राज्यातील दुष्काळी स्थितीविषयी भाषण

(१४ डिसेंबर, १९७०)

१९७०-७१-७२ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ सातत्याने पडला होता. त्यातील भीषणता व त्याची पावले महाराष्ट्रात १९७० मध्येच जाणवू लागली होती. त्या दुष्काळ आगमनाची जाणीव करून देणारा प्रस्ताव एन. डी. पाटील यांनी मांडला होता. त्या प्रस्तावावर राज्यातील स्थितीची जाणीव रा. सू. गवई यांनी सरकारला करून दिली. याच भाषणात त्यांनी दुष्काळी कामे, त्यातून रोहयो आणि त्यात काम करणाऱ्यांना सरकारी धान्य पुरविणे अशा सूचना केल्या पुढे महाराष्ट्रात राबविल्या गेलेला रोजगार हमी योजनांचे मूलभूत चिंतन या भाषणातून दिसते त्यामुळे हे भाषण मुलगामी स्वरूपाचे आहे ...

अध्यक्ष महाराज, या प्रस्तावासंबंधी काही अभ्यासू विवेचन करण्यासाठी मी उभा राहिलेलो नाही. परंतु मी आपल्या राज्यातील काही भागात फिरलो आहे आणि प्रत्यक्षात तेथील परिस्थिती मला कशी दिसली आहे व

व्यावहारिकदृष्ट्या लोकांची अवस्था कशी आहे एवढेच सांगण्यासाठी मी उभा राहिलो आहे. नामदार महसूल मंत्र्यांनी जे निवेदन सादर केले आहे त्यात त्यांनी आपल्या राज्यातील २६ जिल्ह्यांपैकी २१ जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती आहे अशी जवळजवळ कबुली दिली आहे. तांत्रिकदृष्ट्या त्यांना दुष्काळी परिस्थिती हा शब्दप्रयोग वापरता आलेला नाही आणि म्हणून त्यांनी तेथे टंचाईची परिस्थिती आहे असे म्हटले आहे. माझ्या माहितीप्रमाणे ज्या भागातील आणेवारी ४ आण्यांपेक्षा कमी असते तेथे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे असे म्हणतात आणि ज्या भागातील आणेवारी ४ ते ६ आणे आहे तेथे निमदुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे असे म्हणतात. आता या निवेदनातच अशी कबुली दिली आहे की, अनेक गावांमध्ये ४ आण्यांपेक्षा कमी आणेवारी आहे आणि काही गावांमध्ये ४ ते ६ आणेवारी आहे. तेव्हा सर्वसामान्यतः सर्व महाराष्ट्रभर चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे असे म्हणावयास काही हरकत नाही. शेतकरी सुखी तर जग सुखी अशी पूर्वी एक म्हण होती. परंतु आता अनेक भागांतील शेतकऱ्यांवर आकाशातून कुऱ्हाड कोसळलेली आहे. तेव्हा त्यांना काही तरी मदत देण्याच्या दृष्टीने विरोधी पक्षाचे सन्माननीय नेते श्री. एन. डी. पाटील यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत आणि त्यांना सप्लिमेंट करण्याच्या दृष्टीने माझ्या लक्षात ज्या काही आणखी सूचना आल्या आहेत त्या मी करणार आहे. ज्या ठिकाणी ४ आणे आणेवारी घोषित होईल त्या ठिकाणी शेतसारा तहकूब होईल असे तूर्त तरी सरकारला अभिप्रेत आहे असे दिसते. परंतु तेथील लोकांची मागणी शेतसारा माफीची आहे, व ती योग्य आहे असे मला वाटते. या बाबतीत काही तांत्रिक अडचणी निर्माण करून तेथे टंचाई आहे व दुष्काळ नाही असे सरकार गृहीत धरणार असेल तर ते बरोबर होणार नाही. या बाबतीत सरकारने तांत्रिक अडचणी पुढे करता कामा नयेत. या बाबतीत सन्माननीय सभासद श्री. एन. डी. पाटील यांची मागणी तर मोठी आहे. परंतु माझे म्हणणे असे आहे की, जेथे ४ आणे आणेवारी आहे तेथे शेतसारा माफ करण्यात यावा. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या भिन्न भिन्न योजना आहेत, व त्यासाठी भिन्न भिन्न यंत्रणा आहेत. त्यांचासुद्धा सन्माननीय सभासद श्री. पाटील यांनी उल्लेख केला आहे. या शेतकऱ्यांना प्रामुख्याने सहकारी संस्थांकडून कर्ज मिळते. या कर्जाच्या वसुलीचे हप्ते या वर्षी तहकूब ठेवावे अशी नुसती सूचना केली तरी ती भोंगळ स्वरूपाची ठरेल असे मला म्हणावयाचे आहे. शेतकऱ्यांना सहकारी संस्थांकडून कर्ज मिळते परंतु या सहकारी संस्थांना लँड डेव्हलपमेंट बँकेकडून पैसे मिळतात, लँड डेव्हलपमेंट बँकेला राज्य स्तरावर असलेल्या अॅपेक्स बँकेकडून कर्जपुरवठा होतो आणि अॅपेक्स बँकेला रिझर्व्ह बँकेकडून मदत मिळते. अशा तऱ्हेने हे रोटेशन चालू असल्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या स्तरावर काही पावले उचलल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. तेव्हा वरच्या बँकेने खालच्या बँकेला कर्ज दिले नाही तर त्याचा परिणाम सरते शेवटी शेतकऱ्यांवर होणार आहे. येथे शेतकऱ्यांविरुद्ध शेतकरी असे दृश्य आपल्याला दिसेल.

याबाबत माझे असे म्हणणे आहे की, केवळ भोंगळ स्वरूपाच्या सूचना करून भागणार नाही. मला काही स्पेसिफिक अशा सूचना याबाबत करावयाच्या आहेत. आजकाल सहकारी बँकांकडून शेतकऱ्यांना जी कर्जे दिली जातात त्या कर्जांसंबंधी देखील काही तरी निश्चित असे धोरण ठरविले गेले पाहिजे. मध्यवर्ती सहकारी बँकेस किंवा अन्य एजन्सीज मार्फत आज शेतकऱ्यांना जे कर्ज दिले जात आहे ते लांब मुदतीचे केले पाहिजे व यासाठी आवश्यक ती मदत बँकांना देखील दिली गेली पाहिजे ह्याबाबत गॅरेन्टी म्हणून देखील जरूर पडली तर सरकारने राहिले पाहिजे इतकेच नव्हे तर शेवटी ह्या सर्व गोष्टींचा संबंध रिझर्व्ह बँकेशी येतो याबाबत काही तरी व्यवस्था ही करावीच लागणार आहे. सरकारने रिझर्व्ह बँकेशी देखील विचारविनिमय

केला पाहिजे. लॅन्ड डेव्हलपमेंट बँकेकडून देखील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर कर्ज दिले जाते त्याचा देखील विचार करावा लागणार आहे. दुसरी गोष्ट ह्या क्षेत्रात स्टेट बँक देखील नव्याने शिरली आहे. पूर्वी शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज वगैरे मिळत नसे. परंतु आता स्टेट बँकेतर्फे एक मोठी योजना हाती घेण्यात आली असून त्या योजनेद्वारे शेतकऱ्यांना कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आता स्टेट बँकेचे हात अगदी खेड्यांपर्यंत पोहोचले आहेत. आता स्टेट बँकेतर्फे शेतकऱ्यांना कर्जच दिले जाते असे नसून त्याच्या तर्फे शेतकऱ्यांना आवश्यक असे मार्गदर्शन देखील केले जाते. चांगले बी बियाणे व खते देखील शेतकऱ्यांना या माध्यमामार्फत देण्याची व्यवस्था झालेली आहे. आज शेतकऱ्यांना स्टेट बँकेमार्फत अनेक प्रकारचे सहाय्य केले जाते आणि हे सहाय्य शेतकऱ्यांना मिळत राहिले पाहिजे म्हणून स्टेट बँक आणि शेतकरी यांच्यामध्ये सरकारने मध्यस्थाची भूमिका स्वीकारली पाहिजे. मी आतापर्यंत ज्या सूचना केल्या त्या शेतकऱ्यांसंबंधीच्या आहेत.

दुसरा जो प्रश्न आहे तो शेतमजुरांचा आहे. आज शेतमजुरांची स्थिती फार भयानक झालेली आहे. साधारणपणे जेव्हा दुष्काळ पडतो तो हंगाम झाल्यावर पडतो. परंतु ह्या वर्षीची परिस्थिती अशी आहे की ज्वारी आणि कपाशीचा हंगाम असतानाच शेतमजुरांना शेतात मजुरी मिळालेली नाही. नेहमीची पद्धत अशी आहे की, कास्तकाराला जर चार आण्यांपेक्षा कमी पीक आले असेल तर त्या भागांत दुष्काळ आहे. दुष्काळी परिस्थिती आहे असे समजायचे आणि त्यानंतर दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी योजना आखायची. आज परिस्थिती अशी आहे की एकंदर परिस्थिती पाहता आपल्याला दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी आताच तातडीची योजना आखली पाहिजे. आज विदर्भाच्या बऱ्याच भागात अशी परिस्थिती आहे की, शेतात मजुरांना अजिबात कामच मिळालेले नाही. माझ्या मते १६ डिसेंबर पासूनच शेतकऱ्याला काम देण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. यासाठी योजना आखण्यास वेळ लावणे आता आपल्याला शक्य होणार नाही. नेहमीप्रमाणे प्लॅनमध्ये जी कामे आहेत त्यापैकी दुष्काळी कामांसाठी कामे घेण्याची पद्धत आपल्याला अवलंबिता येणार नाही. प्लॅन आऊटमधूनच कामे घेतली पाहिजेत असे आपल्याला यावेळी करता येणार नाही. हा सर्वच प्रश्न आपल्याला वॉर फुटिंगवर सोडवायचा आहे. जे दुष्काळग्रस्त लोक आहेत, शेतमजूर आहेत व इतर लोक आहेत त्यांना तातडीने काम मिळवून देण्याची आवश्यकता आहे. पूर्वीची कामे सुरू करण्याची पद्धत अशी होती की, कोठेतरी दुष्काळी कामे सुरू करावयाची व त्या ठिकाणी काम करण्यासाठी मजुरांनी जावे. परंतु माझी अशी सूचना आहे की, दुष्काळी भागात जे लोक राहतात त्यांना काम देण्याचे दृष्टीने सरकारने असे ठरविले पाहिजे की जेथे मजूर असतील त्यांना तीन मैलांच्या परिसरात काम मिळाले पाहिजे. तीन मैलांपेक्षा कामासाठी त्यांना जास्त दूर जावे लागू नये. तुम्ही असे म्हणाल की, अमुक एक नॉन प्लॅन काम आहे व त्याचा सर्व्हे करावा लागेल व त्यामध्ये जर वेळ जाणार असेल तर मजुरांना तातडीने काम मिळणार नाही. त्यांना आपल्या घरापासून तीन मैलांच्या अंतरातच काम मिळाले पाहिजे.

हा एक-दोन जिल्ह्यांचा प्रश्न नसून आपल्या राज्यातील २६ जिल्ह्यांपैकी २१ जिल्ह्यांचा प्रश्न आहे. आपल्याला साऱ्या कुटुंबाचा विचार करावा लागेल. आणि म्हणूनच माझी अशी सूचना आहे की, ज्याला काम हवे असेल त्याला त्याच्या घरापासून तीन मैलांच्या परिसरात काम मिळाले पाहिजे व याच दृष्टिकोनातून कामाची आखणी केली पाहिजे.

दुसरी अडचण अशी आहे की दुष्काळी कामे ही फक्त एखाद्या विभागापुरतीच मर्यादित राहू शकत नाहीत. त्यासाठी जो पैसा निर्धारित करावा लागतो तो निश्चित करणे कठीण असते. यासाठी एकटे महसूल खाते पुरे पडू शकणार

नाही. ज्या खात्याकडून अधिकाधिक कामे काढली जाऊ शकतील अशा सर्व खात्यांचे आपसात चांगल्या प्रकारचे को-ऑर्डिनेशन असले पाहिजे. महत्त्वाची गोष्ट अशी की, हे को-ऑर्डिनेशन स्थानिक स्तरावर देखील असण्याची फार आवश्यकता आहे. प्लॅन कामामध्ये जर तीन मैलांच्या आत काम काढणे शक्य नसेल तर नॉन प्लॅन्ड कामे देखील हाती घ्यावी लागतील. बिल्डिंग आणि कम्युनिकेशन डिपार्टमेंटमध्ये रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेता येतील व त्या कामात अनेक लोकांना रोजगारी मिळू शकेल. इरिगेशनच्या कामात देखील अनेक लोकांना मजुरी मिळू शकेल. बी. एण्ड सी. डी., इरिगेशन डिपार्टमेंट, रेव्हेन्यू डिपार्टमेंट या सर्वांचे आपसात को-ऑर्डिनेशन असले पाहिजे. तरच आपल्याला मोठ्या प्रमाणावर मजुरांना मजुरी देता येईल व कामावर लावता येईल.

दुसरा प्रश्न अन्नधान्याच्या पुरवठ्याचा आहे. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना अन्नधान्याचा पुरवठा योग्य प्रमाणात आणि वाजवी भावात करण्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे आणि तशी व्यवस्था केली गेली पाहिजे. काही ठिकाणी परप्रांतातून ज्वारी आणण्यासाठी परवाने देखील देण्यात आले आहेत. मला अशी एक सूचना करायची आहे की, जागोजागी सरकारने स्वस्त धान्याची दुकाने उघडली पाहिजेत. कित्येक ठिकाणी पूर्वी जी स्वस्त धान्याची दुकाने होती त्यांची जरूरी न राहिल्याने त्यांना कुलपे लावली गेली आहेत. त्या ठिकाणी पुन्हा ती दुकाने सुरू केली पाहिजेत. त्याशिवाय गरीब शेतमजूर आणि इतर लोकांना खेड्यापाड्यात योग्य भावात धान्य मिळणार नाही. त्यामुळे आपली ज्वारी कोठे खपवावी असा प्रश्न या वर्षी नाही. दोन वर्षांपूर्वी हा प्रश्न होता. स्वस्त धान्याची दुकाने चालू करण्यासंबंधी प्रथम जेव्हा सुरुवात झाली तेव्हा ही दुकाने ग्रामपंचायतींनी चालवावी असे ठरले होते व त्याप्रमाणे ग्रामपंचायतीनी ती दुकाने काही दिवस चालविलीही. यात ग्रामपंचायतीचे पैसे अडकून पडतात आणि लोकोपयोगी कामे करता येत नाहीत असे दिसून आल्याबरोबर ही दुकाने सेवा सरकारी सोसायट्यांनी चालवावी असेही ठरले आणि ज्या ठिकाणी ग्रामपंचायत पुढे येत नसेल व सेवा सरकारी सोसायट्या नसतील तेथे ग्रामपंचायत शिफारस करील अशा माणसाला ही दुकाने देण्यात यावीत असे ठरविण्यात आले होते. या दुकानाकरिता ज्या गावातील माणूस तयार होईल त्याला अनिर्बंध परवानगी दिली पाहिजे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, ग्रामपंचायतींनी आपल्या फंडातून धान्य आणून लोकांना विकू नये असा जो निर्बंध आहे तो या दुष्काळी वर्षात उठविण्यात यावा अशी माझी मागणी आहे. निदान या दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्याकरिता तरी हा नियम उठविण्यात यावा. त्यातही मी पूर्वी जी को-ऑर्डिनेशनकरिता सूचना केली आहे तिचाही योग्य विचार करण्यात आला पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी की, मी नुकताच दुष्काळी भागाचा दौरा करून आलेलो आहे. त्या दौऱ्यात असे दिसून आले की, आपल्या राज्यात काही असे दुर्गम भाग आणि गावे आहेत की येथे पावसाळ्यात अन्नधान्याचा पुरवठा करणे अशक्य होते. अशा ठिकाणी अन्नधान्याचा पुरवठा आताच करून ठेवला पाहिजे. त्याचप्रमाणे त्या केंद्रांना पावसाळ्याच्या चार महिन्यात लागणारा साठाही त्या ठिकाणी आताच करून ठेवला पाहिजे. असे केले नाही तर आपण त्या ठिकाणी पावसाळ्यात धान्य पोहोचवू शकत नाही आणि मग त्या लोकांना पावसाळ्यात उपासमारीला तोंड द्यावे लागते. ज्या ज्या ठिकाणांचा जिल्हाधिकारी दुर्गम केंद्र म्हणून उल्लेख करतील त्या त्या ठिकाणी पावसाळ्यापूर्वी पावसाळ्यात लागणाऱ्या धान्याचा साठा करून ठेवला पाहिजे. असे केले तरच या दुष्काळी परिस्थितीची झळ या दुर्गम केंद्राना जाणवणार नाही.

आपल्या सरकारने थोड्याच दिवसापूर्वी अन्नधान्याच्या ने-आणी वरील जी बंधने होती ती उठविली आहेत. इतर प्रांतातूनही आपल्याला धान्य आणता येते. हा जो निर्णय

शासनाने घेतला आहे तो स्तुत्य आहे. परंतु यात व्यापाऱ्यांना धान्य आयात करण्याची परवानगी दिल्यामुळे हे लोक ग्राहकांची पिळवणूक करतील अशी भीती मला वाटत आहे व त्याप्रमाणे काही ठिकाणी गोष्टी घडूनही आलेल्या आहेत. ज्या ज्या लोकांना परवाने दिलेले आहेत त्यांची जी संख्या आहे ती विकेंद्रित करण्यात आलेली नाही. नागपूर जिल्ह्यात दुष्काळ आहे तेव्हा नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्याने नागपूरच्या व्यापाऱ्यांना धान्य आयात करण्याची परवानगी देऊन टाकली आहे. म्हणजे काटोलला जर धान्य पुरवठा करावयाचा झाला तर नागपूरच्या व्यापाऱ्याने अगोदर धान्य आयात करावे आणि नंतर ते नागपूरवरून काटोलला पाठवावे. जरी मध्य प्रदेशाची सरहद्द काटोलला जवळ असली आणि तेथे थोड्या खर्चात सरळ धान्य आयात करता येत असले तरी ते तसे न होता प्रथम नागपूरचा व्यापारी नागपूरला धान्य आणील आणि नंतर ते काटोलला पाठविण्यात येईल. यामुळे काटोलला येणारी ज्वारी महाग पडेल. म्हणून मला सांगावयाचे आहे की, परवानाधारक व्यक्ती एकाच केंद्रातील न ठेवता त्या जिल्ह्यातील निरनिराळ्या ठिकाणच्या असल्या पाहिजेत. त्या ठिकाणीही को-ऑर्डिनेशनचा प्रश्न येतो व यात को-ऑर्डिनेशन होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात निरनिराळ्या ज्या सरकारी संस्था आहेत त्यांना यासंबंधी सूचना दिल्या पाहिजेत. त्यांना यात प्राधान्य दिले पाहिजे.

त्यांना थोडा तोटा येत असल्यामुळे त्यांनी हा व्यापार करण्याचे सोडून दिले आहे. त्यांना आपण सांगितले पाहिजे की, आपल्याला दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावयाचे आहे तेव्हा आपण वॉर फुटिंगवर काम केले पाहिजे. म्हणून तोटा आला तरी तो सहन केला पाहिजे.

शेवटी मला दूरगामी कोणते मेजर्स घेतले पाहिजेत हे सांगावयाचे आहे. आतापर्यंत मी ताबडतोबीने तात्कालिक कोणती उपाययोजना केली पाहिजे हे सांगितले आहे. "अतिवृष्टीमुळे व पुरामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीतून टंचाई निर्माण होईल ह्याची तर कुणालाच कल्पना नव्हती. उलट यावर्षी विस्तृत व भरपूर प्रमाणात, योग्य वेळी पडलेल्या पावसामुळे पिके फार चांगली येतील अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या पदरी घोर निराशा आली. कारण बऱ्याच ठिकाणी पिकावर पडलेल्या किडीने पिके आतून पोखरून गेली होती. त्यामुळे पुढे उद्‌भवणाऱ्या भीषण टंचाईची जाणकार शेतकऱ्यांनाही जाणीव नव्हती." अध्यक्ष महाराज, ही गोष्ट खरी आहे. यावरून आपल्याला दिसून येईल की, अधिक पावसाचा या दुष्काळी परिस्थितीशी संबंध नाही, असेल तर त्यांचे संशोधन केले पाहिजे. परंतु मी या निमित्ताने काही विचार मांडणार आहे. सुदैवाने कृषी मंत्रीही या ठिकाणी उपस्थित आहेत. जास्त पाऊस पडल्यामुळे असा अंदाज होता की, पिके चांगली येतील. ज्या पिकांवर यावर्षी दुष्काळाची छाया पडली त्यात ज्वारी आणि कापूस यांचाच समावेश होतो. यावर जो परिणाम झालेला आहे तो अतिपावसामुळे झालेला नाही तर त्यावर मिच्फ्लाय नावाची कीड पडलेली आहे. तो रोग कॉंटेजियस आहे असे शास्त्रज्ञांचे मत आहे. ह्या रोगाची कीड कणसांचा फुलोराच खाऊन टाकते व त्यामुळे दाणे भरत नाहीत. या वर्षी हा रोग आलेला आहे. तरी थोडी ज्वारी शेतकऱ्यांच्या पदरात पडेल परंतु पुढच्या वर्षी या रोगाचा प्रादुर्भाव झाला तर सात दिवसात हा रोग सर्व ज्वारी खाऊन टाकील. खरे काय आहे ते आपल्याला सांगता यावयाचे नाही परंतु हा रोग जर संसर्गजन्य असला तर आपल्या राज्यातील ज्वारीचा भागच नष्ट होईल. जादा पाऊस आलेला आहे म्हणून हा दुष्काळ पडलेला आहे असे नाही तर त्याला असा रोगही कारणीभूत आहे त्यांचे संशोधन होऊन त्यावर उपाय सुचविला पाहिजे. त्याचप्रमाणे तो रोग म्हणतात त्याप्रमाणात संसर्गजन्य आहे काय हे सुद्धा पाहिले पाहिजे.

दुसरा पुरोगामी विचार या ठिकाणी मला मांडावयाचा आहे व त्याचा उल्लेख सन्माननीय सभासद श्री. एन. डी. पाटील यांनी आपल्या भाषणात केलेला आहे. त्यात शेतसारा माफ करण्याचा प्रश्न आहे, त्याचा सरकारने जरूर विचार

केला पाहिजे परंतु त्यांनी जो दुसरा उपाय सांगितला आहे की कोणत्याही शेतमजुराला आपल्या गावापासून दोन किंवा तीन मैलांपेक्षा जास्त अंतर कामाकरिता जावे लागू नये हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे ही कामे कायम स्वरूपाची असली पाहिजेत. या वर्षी दुष्काळ आला म्हणून ही कामे करावयाची नंतर करावयाची नाहीत असा दृष्टिकोन ठेवण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे पिकांकरिता विमा योजना घेता आली तर आपण तिचा अवश्य विचार केला पाहिजे. मी या ठिकाणी ज्या दूरगामी सूचना केल्या आहेत त्यांचा शासनाने विचार करावा. इतके बोलून मी आपले भाषण संपवितो.

❑❑❑

अनुसूचित जाती व जमातींच्या आयुक्तांच्या अहवालावर चर्चा

(१६ मार्च, १९७१)

श्री. रा. सू. गवई (उप सभापती) : अध्यक्ष महाराज, या सभागृहात सन १९६६-६७ व १९६७-६८ सालच्या अनुसूचित जाती आणि जमातींकरिता नियुक्त केलेल्या आयुक्तांच्या अहवालावर चर्चा चालू आहे. या अहवालात आपल्या देशामधील सर्व प्रांतांचा समावेश असला तरी मी फक्त महाराष्ट्रातील विभागासंबंधीच बोलण्याचा प्रयत्न करीन व त्यातील सर्वच बाबींचा ऊहापोह करण्याऐवजी मागच्या अनेक वेळा या अहवालावरील चर्चेच्या निमित्ताने उत्तर देताना सरकारमार्फत माननीय मंत्र्यांनी जी जी आश्वासने दिली होती त्यांची कितपत पूर्ती करण्यात आली यावर जोर देण्याचा प्रयत्न करीन. मागच्या दोन वर्षांपूर्वी माननीय मंत्र्यांनी श्री. हॅरिस यांना दिलेल्या आश्वासनाचा मी या ठिकाणी विशेषत्वाने उल्लेख करीन. त्यांनी त्या वेळी माननीय मंत्र्यांच्या हे लक्षात आणून दिले होते की, पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील अनेक शाळांतून अस्पृश्य मुलांना बाहेर बसविण्यात येते. या गोष्टीची चौकशी करण्याचे व त्यावर उपाय योजण्याचे आश्वासन त्या वेळी देण्यात आले होते. परंतु अजूनही त्या बाबतीत काय करण्यात आले याचे उत्तर या सभागृहाला मिळालेले नाही.

मी उल्लेख केलेली गोष्ट कमिशनरसाहेबांच्या अहवालात नमूद करण्यात आली होती व तिचा उल्लेख या सभागृहात माननीय सभासद श्री. हॅरिस यांनी केला होता. त्या अनुषंगाने माननीय मंत्र्यांनी एक-दोन वर्षांच्या काळात तरी उत्तर द्यावयास पाहिजे होते, असे मला वाटते.

अध्यक्ष महाराज, याच सदनामध्ये आपण एक निर्णय दिला होता. त्याची मी आपणास आठवण करून देऊ इच्छितो. या सदनामध्ये माननीय सभासद श्री. देशपांडे यांनी असा प्रस्ताव मांडला होता की, सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांना खुल्या असाव्यात. त्या वेळी अकोल्याच्या विहिरीची विचित्र केस हायकोर्टामध्ये होती. यामुळे त्यावर जास्त बोलता आले नव्हते. परंतु मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, यासंबंधी जमिनीच्या ॲक्विझिशनचा प्रश्न कोर्टामध्ये होता. त्या वेळी घटनेच्या कलम १७ चा हवाला दिला होता त्यावर आपण असे रुलिंग दिले होते की,

"Untouchability is abolished, and its practice in any form is forbidden. The enforcement of any disability arising out of untouchability shall be an offence punishable in accordance with the law."

एचबी ११८०—१९

त्यावेळी माननीय मंत्र्यांना अशी विनंती केली होती की, आपण एक टेस्ट केस करून घ्यावी. या गोष्टीला दीड वर्ष होत आहे. अध्यक्ष महाराज, टेस्ट केस करा म्हणून आपला आदेश असतानाही या बाबतीत सरकारने काय केले हे या सभागृहाला कळले नाही. सार्वजनिक विहिरी मग त्या सरकारी असोत किंवा खाजगी असोत त्यावर अस्पृश्य लोकांना पाणी भरण्याची मनाई होता कामा नये. त्यासंबंधी या ठिकाणी अभिवचन देण्यात आले होते, परंतु त्या गोष्टीची परिपूर्ती झालेली नाही.

अध्यक्ष महाराज, मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच सांगितले होते की माझे भाषण मी पूर्वी दिलेल्या सूचना व शासनाने दिलेली वचने याची पूर्ती किती प्रमाणात झाली यावरच मर्यादित करणार आहे. या सभागृहात सन्माननीय सभासद श्री. एन. डी. पाटील यांनी या लोकांकरिता राखीव जागांच्या तरतुदीसंबंधी उल्लेख केला व त्यासंबंधी काही आकडे दिलेले आहेत. सन १९६७-६८ सालच्या अहवालातील आकडे पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, ज्या प्रमाणात या लोकांना जागा मिळावयास पाहिजे होत्या त्या प्रमाणात मिळाल्या नाहीत, म्हणजे घटनेतील तरतुदींची पूर्ती झालेली नाही. आपल्या राज्यात शेड्यूल्ड कास्ट, शेड्युल्ड ट्राईब्ज, विमुक्त जाती आणि इतर मागासवर्गीय यांच्याकरिता एकूण ३४ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. या जागांचे प्रमाण शेड्युल्ड कास्ट १३ टक्के, शेड्युल्ड ट्राईब्ज ८ टक्के, विमुक्त जाती १० टक्के आणि इतर मागासवर्गीय ४ टक्के असे आहे. ह्या प्रमाणात यांना नोकऱ्या मिळाव्यात अशी अपेक्षा आहे. त्या बाबतीत प्रयत्न करण्यात येईल असे माननीय मंत्र्यांनी सांगितले होते; परंतु, काय केले हे या सभागृहाला सांगितले नाही. मी एक गोष्ट प्रांजळपणे कबूल करतो की यासंबंधी जे प्रयत्न त्यांनी केले असतील त्यांपैकी एक प्रयत्न म्हणजे त्यांनी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. त्या समितीचे मी व माननीय मंत्री सभासद आहोत आणि मुख्यमंत्री अध्यक्ष आहेत. या कमिटीकडून राखीव जागा भरण्याचा प्रयत्न करण्यात येतो. अध्यक्ष महाराज, मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, घटनेच्या कलम १६ च्या चौथ्या भागात यासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे खास प्रयत्न करूनही ह्या जागा भरण्यात आल्या पाहिजेत. परंतु, या बाबतीत सरकार काय करते आहे, काय काय प्रयत्न होत आहेत ह्या गोष्टींचा पत्ता या सभागृहाला लागला पाहिजे, तो लागत नाही. आपल्या राज्यात वर्ग एक, दोन, तीन आणि चारचे लोक किती आहेत आणि त्यांपैकी या कॅटेगरीमध्ये किती लोक आहेत याचा हिशेब घेऊन ते जर ठरलेल्या प्रमाणापेक्षा कमी असतील तर त्यांची संख्या भरून काढण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. ह्यामध्ये असलेला बॅकलॉग भरून काढण्यात आला पाहिजे. ह्या प्रकारचा जो बॅकलॉग आपल्या राज्यात आहे तो भरून काढण्यात येईल असे अभिवचन माननीय मंत्र्यांनी दिले होते...

श्री. वा. म. भारस्कर : याकरिताच आपण समिती नेमली आहे.

श्री. रा. सू. गवई : ते बरोबर आहे; परंतु तो अनेक प्रयत्नांपैकी एक प्रयत्न झाला. परंतु याव्यतिरिक्त सरकार काय काय प्रयत्न करीत आहे याची माहिती या सभागृहाला मिळाली पाहिजे. याकरिता दोन गोष्टी करण्यात आल्या पाहिजेत आणि त्या म्हणजे नवीन जागांवर भरती करताना या निरनिराळ्या चार कॅटेगरीजचे प्रमाण भरून काढले पाहिजे. जोपर्यंत ह्या जागांचे प्रमाण भरून निघत नाही तोपर्यंत रिकाम्या असलेल्या जागा फक्त या वर्गाच्या लोकांनाच देण्यात आल्या पाहिजेत. यासंबंधी काय प्रगती करण्यात आली याचे आकडे माननीय समाजकल्याण मंत्र्यांनी द्यावेत अशी माझी त्यांना विनंती आहे. यासंबंधी दुसरी गोष्ट अशी आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि इतर मागासवर्गीय लोकांतून ज्या प्रमाणात रिझर्वेशन आहे त्या प्रमाणात उमेदवार उपलब्ध होत नाहीत, असे एक कारण पुढे करण्यात येते. त्याचप्रमाणे

जेव्हा प्रमोशनने जागा भरण्यात येते तेव्हा या प्रकारचे रिझर्वेझन ठेवण्याची गरज नाही, असे सांगण्यात येत होते ; परंतु, आता सुप्रीम कोर्टाचा यावर निर्णय आहे. त्याप्रमाणे एक गोष्ट निश्चित ठरविण्यात आली होती की सिनियारिटीच्या यादीमध्ये जे शेड्युल्ड कास्टचे लोक असतील ते सुपरसीड होता कामा नयेत. मॉरल टरपिट्युड्याचा गुन्हा नसेल तर हे लोक सुपरसीड होता कामा नयेत. परंतु, मला मोठ्या खेदाने म्हणावे लागते की, हे लोक सुपरसीड झालेले आहेत. त्याचप्रमाणे कॉन्फिडेन्शियल रेकॉर्डेमध्ये कोणता अधिकारी काय लिहून ठेवेल याचा काही नेम नाही. एका गृहस्थाच्या रेकॉर्डमध्ये त्यांच्या अधिकाऱ्याने लिहून ठेवले होते की, "ही मिक्सेस वुइथ दी पब्लिक" आणि दुसऱ्या अधिकाऱ्याने लिहून ठेवले होते की "ही इज इनडिफरन्ट टू पब्लिक" तेव्हा ह्या गोष्टी टाळण्याकरिता आणि या लोकांच्याकरिता जे प्रमाण ठरविण्यात आले आहे ते भरून काढण्याकरिता खात्याने काय काय उपाययोजना केली हे सांगितलेले नाही. या प्रकारचे अभिवचन माननीय मंत्र्यांनी दिले होते. अध्यक्ष महाराज, सांगण्याचा हेतू हा की राखीव जागांच्याकरिता जे परसेंटेज ठेवण्यात आले आहे त्यासंबंधी घटनेत स्पष्ट तरतूद केलेली आहे. त्या तरतुदीवर या राज्यात अंमलबजावणी करण्याच्या मार्गात कोणतीही अडचण वस्तुतः येऊ नये. कोणत्याही प्रकारचा कायदा न करता सरकारी परिपत्रकान्वये या तरतुदीची अंमलबजावणी करण्याचा मध्यममार्ग या उच्चस्तरीय कमिटीने स्वीकारला; परंतु त्याचीही अंमलबजावणी होत नाही असे मोठ्या खेदाने मला सांगावे लागत आहे. तेव्हा जी अभिवचने दिली जातात त्यांची पूर्ती मात्र केली जात नाही असा जर आरोप मी या ठिकाणी केला तर तो अनाठायी ठरणार नाही असे मला वाटते. अध्यक्ष महाराज, काही काही वेळा घटनेतील तरतुदींच्या चुकीच्या इंटरप्रिटेशनमुळे राखीव जागांची सवलत हा या मागासलेल्या जमातींच्या दृष्टीने दोष ठरतो. मागे यासंबंधी मी काही उदाहरणे या सभागृहात दिली होती. आमचा स्वतःचा आग्रह असा आहे आणि घटनेतील तरतुदीतूनही तोच अर्थ ध्वनित होतो की गुणवत्तेनुसार भरावयाच्या जागांसाठी राखीव जागा हा बार ठरू नये. उदाहरणार्थ एखाद्या वर्गात १०० मुले घ्यावयाची आहेत आणि त्यांच्यापैकी १३ जागा या राखीव ठेवण्यात आल्या आहेत. मग आज अशी पद्धती अवलंबिली जाते की एकदा या १३ जागा मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यामधून भरण्यात आल्या की उरलेल्या ८७ जागा गुणवत्तेनुसार भरताना मागासलेल्या जातीचे विद्यार्थी त्या गुणवत्तेच्या क्रमात बसत असले तरी त्यांना घेतले जात नाही. १३ जागा हा त्यांच्याकरिता बार ठरतो व कितीही गुणवान असला तरी चौदावा विद्यार्थी त्यांचा घेतला जात नाही. रिझर्व्हेशनच्या नावाखाली त्यांच्यापैकी चांगली चांगली गुणवान मुले डावलली जातात. त्या ८७ विद्यार्थ्यांत त्यांचा नंबर लागत नाही व इतरांपैकी त्यांच्यापेक्षा कमी गुणवत्ता असलेली मुलेही घेतली जातात. त्या गुणवान मुलांच्या बाबतीत रिझर्व्हेशन हा शाप ठरतो. अनेक ठिकाणी असे घडलेले आहे.

मला नामदार मंत्र्यांना अडचणीत टाकावयाचे नाही. परंतु अंमलबजावणी होत नसेल तर येथे केवळ वांझोटी चर्चा करून फायदा काय? लोकसेवा आयोगातर्फे भरल्या जाणाऱ्या जागांच्या बाबतीतही नेमका हाच प्रकार होत आहे. रिझर्व्हेशन हा गुणवान उमेदवारांचा बार ठरत आहे. अडथळा ठरत आहे. नामदार मंत्र्यांनी कृपया याचा खुलासा केल्यास बरे होईल.

अध्यक्ष महाराज, घटनेतील ४६ व्या कलमात पुढीलप्रमाणे सांगितले आहे :

"The State shall promote with special care the educational and economic interests of the weaker sections of the people, and, in particular, of the Scheduled Castes and Scheduled Tribes, and shall protect them from social injustice and all forms of exploitation."

एचबी ११८०—१९अ

यात मागासलेल्या जातीच्या आर्थिक उत्थानासंबंधी सांगण्यात आले आहे. त्यांच्यापैकी ज्यांच्याजवळ जमिनी नसतील त्यांना जमिनी दिल्या पाहिजेत. मी अनेक वेळा सांगितले आहे की, भूमिहिनांना जमिनी देताना जो प्राथम्यक्रम निश्चित करावयाचा त्यासाठी घटनेचे स्पिरिट लक्षात घेतले गेले पाहिजे व घटनेत सांगितलेले टाळून जर आपण प्रायॉरिटी फिक्स करू लागला तर आपण घटनेतील उद्देशाच्या विरुद्ध जात आहात असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. मागासलेल्या जातीच्या लोकांना प्राथम्यक्रम देऊन जमीन देण्याच्या बाबतीत या शासनाचे काय म्हणणे आहे याचाही खुलासा झाला पाहिजे.

❑❑❑

विधानभवनावरील मोर्चाच्या पार्श्वभूमीवर आरक्षणाविषयी भाषण

(३० डिसेंबर, १९७०)

पक्षाचा मोर्चा विधानभवनावर आला की, तो विषय त्या त्या पक्षाचे आमदार सभागृहात उपस्थित करण्याचा प्रयत्न करतात. नागपूरच्या विधानसभा अधिवेशन काळात रिपब्लिकन पक्षाचा एक मोर्चा विधानभवनावर आला होता त्यांनी आपल्या मागणीचे निवेदनही सादर केले. तो विषय शांताबाई दाणी यांनी परिषदेत उपस्थित केला. त्यासंबंधात बरीच चर्चा झाली. त्यात रा. सू. गवई हे देखील सहभागी झाले होते. त्या मोर्चाच्यानिमित्त दलित समाजावर होणारे अत्याचार, त्यातून मार्ग कसा काढावा वगैरे विषय समोर आणले गेलेत. चर्चेला मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी उत्तर दिले. या चर्चेत श्री. गवई काय म्हणाले ते बघूया ...

अध्यक्ष महाराज, माननीय सदस्या श्रीमती शांताबाई दाणी यांनी या सभागृहात जी चर्चा उपस्थित केली आहे त्यात भाग घेण्यासाठी व त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मी फार कमी प्रसंगी बोलतो आणि आजही मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. नामदार मुख्यमंत्र्यांना जर या मागण्यासंबंधी होकारार्थी उत्तर द्यावयाचे असेल तर त्यांना उत्तराकरिताही फारसा वेळ लागणार नाही असे मला वाटते. अध्यक्ष महाराज, शेड्युल्ड कास्टस् आणि शेड्युल्ड ट्राईब्ज यांच्या कमिशनरांचे अहवाल या सभागृहात चर्चिले जाण्याची प्रथा आहे परंतु त्यांच्यावर चर्चा होण्याच्या बाबतीत दुर्दैवाने समाज कल्याण खातेही फारसे उत्सुक नसल्यामुळे दोन-तीन वर्षांच्या अहवालावर एकदमच चर्चा करण्याची पाळी पुष्कळदा येते. कमिशनरांच्या अहवालात मागासवर्गीय लोकांच्यासंबंधी जे आस्पेक्ट चर्चिले असतात ते सर्व आस्पेक्टस् या अल्पवेळ चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यात कव्हर होतात असे मला वाटते. तरीही मी तपशीलवार चर्चेत शिरणार नाही. केवळ या प्रश्नाची मूलभूत बाजूच सभागृहापुढे

मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. या अल्पवेळ चर्चेच्या सूचनेत तीन-चार मागण्या नमूद करण्यात आल्या आहेत परंतु मागण्या कोणत्या आहेत हा प्रश्न माझ्या मताने गौण आहे. या मागण्यांच्या पूर्ततेच्या दृष्टीने आमचा जो वैचारिक पाया आहे त्याचा शासकीय दृष्टिकोनातून विचार झाला पाहिजे असे मला वाटते. शेड्यूल्ड कास्टस् आणि शेड्यूल्ड ट्राईब्ज यांना घटनेप्रमाणे जे सेफ गार्डस् दिलेले आहेत त्यांच्या अंमलबजावणीचे चित्र स्पष्ट नाही. आमच्या संविधानात आम्ही जीवनातील हेतू, संकेत या दृष्टीने कोणते तत्त्व स्वीकारले आहे हे पाहिले तर भिन्नतेतून एकता हाच आम्ही आमचा जीवन संकेत मानला आहे. एवढेच नाही तर या सभागृहात निवडून आल्यावर सुरुवातीलाच आम्ही या संविधानाशी एकनिष्ठ राहू, संविधानाचे पालन करू अशी आम्ही शपथ घेतो. म्हणून ह्या मागण्यांचा मूलभूत विचार करताना संविधानात काय तरतुदी आहेत हे मी सांगणार आहे. त्यामुळे चित्र स्पष्ट होईल की ज्या मागण्या आज सभागृहासमोर आहेत त्या पूर्ण करण्यास आपण कटिबद्ध आहोत. ह्या मागण्यांच्या बाबतीत श्रीमती शांताबाई यांनी तपशिलात जाऊन सांगितले आहे पण, संविधानाच्या दृष्टीने आपण कसे कटिबद्ध आहोत हे मी सांगणार आहे. अध्यक्ष महाराज, संविधानामध्ये या बाबतीत ज्या तरतुदी आहेत त्या संबंधीची सर्व आर्टिकल्स वाचून मी सभागृहाचा वेळ घेणे उचित होणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शांताबाई दाणी यांनी आपल्या भाषणात किमान वेतनाबद्दल सांगितले आहे. अध्यक्ष महाराज, आपण स्पष्टीकरण करण्यासाठी त्यांच्याकडून असे वदवून घेतले की आपल्याला किमान वेतन पाहिजे की काम पाहिजे? माझे म्हणणे आहे की, विहिरीमध्ये नसेल तर पोहऱ्यात कोठून येणार? पहिल्याने काम करण्याचा हक्क पाहिजे आणि हा हक्क मी मागतो आणि श्रीमती शांताबाई देखील मागतात. आपल्या संविधानामध्ये 'राईट टू वर्क' हे डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल म्हणून मान्य केले आहे. संविधानाचे जे ४१ कलम आहे त्यात प्रत्येक माणसाला काम करण्याचा अधिकार आहे असे म्हटले आहे. राईट टू वर्क एवढेच म्हटले नाही तर राईट टू वर्क मंजूर केल्यानंतर संविधानाच्या ४३ कलमामध्ये असे म्हटले आहे की,—

> "The State shall endeavour to secure, by suitable legislation or economic organisation or in any other way, to all workers, agricultural, industrial or otherwise, work, a living wage, conditions of work ensuring a decent standard of life and full enjoyment of leisure and social and cultural opportunities and, in particular, the State shall endeavour to promote cottage industries on an individual or co-operative basis in rural areas".

तेव्हा ह्या ज्या मागण्या आहेत त्या काही आम्ही नव्याने करीत नाही. तर त्या संबंधी संविधानामध्ये उल्लेख केलेला आहे. तेव्हा त्या आपण पुऱ्या करता की नाही हा मुद्दा आहे. संविधानाच्या तरतुदीप्रमाणे किंवा त्यातील कलम ४१ व ४३ प्रमाणे लागेल त्याला काम दिले पाहिजे आणि ते देताना जीवन मूल्य लक्षात घेऊन त्याला वेतन दिले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती शांताबाई दाणी यांनी प्रत्येक कामगाराला ५ रुपये किमान वेतन मिळावे अशी मागणी केली आहे. आपण हे वेतन ५ रुपये किंवा ६ रुपये ठरवावे. परंतु ह्या बाबतीत दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत त्या म्हणजे राईट टु वर्क म्हणजे प्रत्येक माणसाला काम दिले पाहिजे आणि त्याचे जीवनवेतन त्याला मिळाले पाहिजे. हे आपण केले पाहिजे. संविधानाच्या तरतुदीप्रमाणे ह्या मागण्या मान्य केलेल्या आहेत तेव्हा नव्याने ही मागणी केलेली आहे असे नाही.

अध्यक्ष महाराज, श्रीमती शांताबाई दाणी यांनी केलेल्या संपूर्ण मागण्यांचा विचार केला तर असे दिसेल की ह्या संपूर्ण मागण्या संविधानाच्या तरतुदींचा भाग आहे. कलम २९, ४१ आणि ४३ मध्ये ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्याचप्रमाणे त्यांनी गरीब माणसाला आवश्यक तो निवारा प्राप्त व्हावा म्हणून घरबांधणी योजना ताबडतोब अंमलात आणावी अशी मागणी केली आहे. त्यानंतर त्यानी अनुसूचित जाती व जमाती यांना पडित जमिनीच्या वितरणाबाबत अग्रहक्क देण्यात यावा असे म्हटले आहे. तसेच सरकारी, निमसरकारी व इतर क्षेत्रात नोकऱ्यामध्ये राखीव जागांचे प्रमाण भरून काढावे असे म्हटले आहे. ह्या ज्या मागण्या आहेत त्या काही नवीन मागण्या नाहीत तर त्या संपूर्ण मागण्या संविधानाचा एक भाग आहे. संविधानाचे आर्टिकल १६ आणि ४६ आपण पाहावे. आर्टिकल १६ मी मुद्दाम वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की,—

> "There shall be equality of opportunity for all citizens in matters relating to employment or appointment to any office under the State".

यानंतर कलम ४६ मध्ये असे म्हटले आहे की,—

> "The State shall promote with special care the educational and economic interests of the weaker sections of the people, and, in particular, of the Scheduled Castes and the Scheduled Tribes and shall protect them from social injustice and all forms of exploitation".

ह्या ठिकाणी विकर सेक्शनला प्रोटेक्शन दिलेले आहे. तेव्हा ही देखील काही नवीन मागणी नाही. जेव्हा मागण्या पुढे येतात तेव्हा नवीन मागण्या अंगावर पडतात काय अशी भीती वाटते म्हणून संविधानामध्ये या संबंधी काय तरतुदी आहेत हे मी सांगितले. आमची मुख्य अडचण अशी आहे की, ह्या ज्या मागण्या आहेत त्यांची अंमलबजावणी होत नाही. संविधानातील ३३० सेक्शन पासून ३३५ पर्यंत सेक्शन्स आहेत त्यांची तरतूद न झाल्यामुळे वेळोवेळी संविधानाला अमेंडमेंट करावी लागली नुकतेच आपण संविधानाच्या दुरुस्तीला रॅक्टिफाय केले आहे. कलम ३३४ मध्ये असे म्हटले आहे की—

> "The reservation of seats for the Scheduled Castes and Scheduled Tribes in the House of the People and in the Legislative Assemblies of the States shall cease to have effect on the expiration of a period of twenty years from the commencement of this Constitution."

पुढे कलम ३३५ मध्ये असे म्हटले आहे की,—

> "The claims of the members of the Scheduled Castes and the Scheduled Tribes shall be taken into consideration consistently with the maintenance of efficiency of administration, in the making of appointments to services and posts in connection with the affairs of the Union or of a State."

तेव्हा ह्या ज्या संपूर्ण मागण्या आहेत त्या संविधानाच्या पार्ट अॅन्ड पार्सल आहेत. ज्याला आम्ही आमच्या जीवनाचे सार म्हणजे वे ऑफ लाईफ मानले आहे त्या संविधानाच्या कलमांची अंमलबजावणी होत नाही हे उघड आहे. ह्या गोष्टी स्वीकारल्यानंतर आपण त्या करीत नाही, एवढेच मला म्हणावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, ह्या तरतुदीसंबंधी दृष्टिकोन काय आहे, हे मी सांगू इच्छितो, संविधान ज्यांनी निर्माण केले त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले नाही की, चंद्र, सूर्य आणि तारे पृथ्वीवर असतील तोपर्यंत आम्हाला

ह्या सवलती मिळाव्यात. २६ जानेवारी १९५० ला संविधान तयार झाले आणि ह्या तरतुदी २६ जानेवारी १९६० पर्यंत राहतील असे म्हटले होते. अर्थात सब्जेक्ट टु कंडिशन्स हे आहे. समाजातील जो विकर सेक्शन आहे त्याला ह्या काळात वर आणता येईल असे त्यांना वाटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली १० वर्षे गेली परंतु ह्या समाजाची परिस्थिती सुधारली नाही. आमच्या समाजाने ही पथ्ये पाळली नाहीत आणि त्याची परिणती २६ जानेवारी १९५० पासून १९६० सालापर्यंत प्रगती न होण्यात झाली. त्यामुळे २६ जानेवारी १९५९ मध्ये कॉंस्टिट्युशन अमेंड करावी लागली. ते डिबेटस् आता माझ्याजवळ नाहीत. परंतु कै. पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्या भाषणातील उतारा मी वाचून दाखविणार आहे. १९६० ते १९७० पर्यंत ज्या अमेंडमेंटस् झाल्या त्याचे लोकसभेचे आणि राज्यसभेचे डिबेटस् मी वाचले आहेत. तेव्हा जी गोष्ट १० वर्षात व्हावयास पाहिजे होती त्याची मर्यादा १० वर्षांवरून २० वर्षांवर गेली आणि आता ती ३० वर्षे झाली आहे. माझ्यासारखा प्रामाणिक माणूस ह्या कलमांच्या अंमलबजावणीची वाट पाहत आहे. आम्हाला कोणाच्या अनुकंपेची, दयेची किंवा याचनांची जरुरी नाही. आम्ही इतर समाजाच्या फुटिंगवर उभे रहावे याची आम्ही वाट पाहात आहोत. हीच गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होती. पार्लमेंटमध्ये, बिल मांडताना १९६० पासून १९७० पर्यंत याची मुदत वाढवावी या संबंधी कै. पंडित गोविंद वल्लभ पंत यांनी असे म्हटले होते की,—

"What I was submitting was that I do want everyone to be able to stand on his own feet and on his own legs. We want everyone in the country to develop a sense of self-respect. It is not only a question of conferring economic benefits of working for educational advancement or the like. There is something more involved in it and to me the main question is as to how to resuscitate and vitalise the suppressed soul of the Scheduled Castes. So, this Bill embodies an appeal to the conscience of this House. We have a provision in our Constitution for the abolition of untouchablility. But, we have to confess that in spite of the attempts made by us, we have not been able to wipe out, to abrogate and to efface this blot and this stain from our community. All evils that are associated with this basic evil will continue. Economic backwardness, social backwardness, educational backwardness are indissolubly and inseparably bound to and tied up with untouchability. I want that stage to be reached when there will be a spirit of self reliance, of self-respect and of that feelings which spurs people on to greater and nobler activity to be generated in the members of the Scheduled Castes."

त्यानंतर पंडित गोविंद वल्लभ पंतांनी अशी कबुली दिली आहे की, गेल्या १० ते २० वर्षात या मागासलेल्या लोकांना इतर लोकांच्या बरोबर आणून त्यांना आपण समान दर्जा देऊ शकलो नाही. परंतु हा काही त्या समाजातील लोकांचा दोष नाही. परंतु आमच्या मागण्यांची पूर्तता झालेली नसल्यामुळे आम्हाला आमच्या त्याच त्याच मागण्या पुन्हा पुन्हा कराव्या लागत आहेत. तेव्हा जे लोक या मागण्या करतात त्यांना याबद्दल दोषी ठरविणे बरोबर होणार नाही. वस्तुतः राखीव जागा ठेवणे वगैरे ज्या निरनिराळ्या सवलती आतापर्यंत ठेवल्या आहेत त्या बंद केल्या पाहिजेत असे माझे स्वतःचे म्हणणे आहे. सवलती मागण्याचा दृष्टिकोन

आमचा नाही. अशा सवलती मागणे म्हणजे दया मागण्यासारखे आहे. परंतु आमचे जे हक्क आहेत ते आम्ही मागीत आहोत. हा समाज अल्पसंख्यांक आहे व तो आर्थिक दृष्ट्या दुबळा आहे. तेव्हा आमची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. आम्हाला पार्लमेंटमध्ये किंवा असेंब्लीमध्ये राखीव जागा ठेवल्या नाहीत तरी चालेल परंतु आमची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे अशी आमची मागणी आहे. या बाबतीत मला काही विधायक सूचना करावयाच्या आहेत. आमच्या सुदैवाने नामदार मुख्यमंत्री आज या सन्माननीय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांचे आमच्या प्रश्नाकडे सदैव लक्ष असते हे आमचे सदभाग्य आहे असे मी समजतो. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मागे Committee on the Welfare of the Scheduled Castes and Scheduled Tribes या नावाची एक कमिटी नेमली होती. त्या कमिटीने ज्या शिफारशी केल्या त्यांच्यावर प्रिसायडिंग ऑफिसर्स कॉन्फरन्समध्ये आपण चर्चासुद्धा केली होती. या शिफारशींपैकी एक शिफारस अशी आहे की, ज्याप्रमाणे एस्टिमेटस् कमिटी किंवा पब्लिक अकौंटस् कमिटी असते त्याप्रमाणे शेड्युल्ड कास्टस् व शेड्युल्ड ट्राईब्सच्या लोकांचे प्रश्न सोडविण्याकरिता एक कमिटी असावी. त्याचप्रमाणे घटनेच्या १६ व्या कलमामध्ये असे म्हटले आहे की :

"16(3) : Nothing in this article shall prevent Parliament from making any law prescribing in regard to a class or classes of employment or appointment to an office (under the Government of or any local or other authority with a State or Union territory, any requirement...

"16(4) : Noting in this article shall prevent the State from making any provision for the reservation of appointments or posts in favour of any backward class of citizens which, in the opinion of the State, is not adequately represented in the services under the State."

"16(5) : Nothing in this article shall affect the operation of any law which provides that the incumbent of an office in connection with the affairs of any religious or denominational institution or any member of the Governing body thereof shall be a person professing a particular religion or belonging to a particular denomination."

तेव्हा घटनेच्या १६ व्या कलमाप्रमाणे राज्य सरकारला या बाबतीत कायदासुद्धा करता येईल अशी तरतूद घटनेतच केली आहे. तेव्हा या बाबतीत आपल्या सरकारने कायदा करावा अशी मागणी आम्ही केली तर ती संविधानातील तरतुदीला धरूनच आहे हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे. सरकारने या बाबतीत काही विशिष्ट धोरण ठरविल्यानंतरसुद्धा प्रत्यक्षात जर ते धोरण अमलात आणले जात नसेल तर सरकारने त्या बाबतीत कायदा केला पाहिजे. संविधानाच्या १६ व्या कलमाप्रमाणे असा कायदा कोणत्याही राज्य सरकारला करता येतो. पडीत जमीन अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना देण्याचा प्रश्न असो किंवा त्यांच्या रिझर्व्हेशन्सचा प्रश्न असो, हे संपूर्ण प्रश्न कव्हर होतील असा कायदा सरकारने केला पाहिजे. या लोकांचे इंटरेस्टस् सेफगार्ड होतील असा कायदा आपण करू शकलो तर ती चांगली गोष्ट होईल. याची तरतूद संविधानातच केली आहे.

त्यानंतर मला असे म्हणावयाचे आहे की, या लोकांकरिता सरकारी नोकऱ्यांमध्ये काही जागा राखून ठेवल्या आहेत हे चांगले आहे. परंतु अशाच तऱ्हेच्या जागा निमसरकारी व इतर क्षेत्रातील सर्व नोकऱ्यांमध्ये राखून ठेवण्यात याव्यात

अशी आमची मागणी आहे. उदाहरणार्थ, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, पब्लिक अंडरटेकिंग्ज् आणि खासगी उद्योगधंदे या सर्व ठिकाणी या लोकांकरिता काही ठराविक प्रमाणात जागा राखून ठेवल्या पाहिजेत अशी या लोकांची मागणी आहे. खासगी उद्योगधंदे काढणाऱ्या लोकांनी आपल्या उद्योगधंद्यामध्ये या लोकांसाठी ठराविक प्रमाणात जागा राखून ठेवल्या पाहिजेत व त्या जागांवर या लोकांना घेतले पाहिजे व तुम्ही तसे केले नाहीत तर आम्ही तुमच्या विजेचे कनेक्शन तोडून टाकू असे सरकारने या खासगी उद्योग धंदेवाल्यांना सांगितले पाहिजे. त्याचप्रमाणे डायरेक्टर ऑफ सोशल वेल्फेअर ही जागा कलेक्टरच्या किंवा डेप्युटी सेक्रेटरीच्या दर्जाची आहे. तेव्हा ही जागा अपग्रेड करून त्यांना सेक्रेटरीचा दर्जा दिला पाहिजे अशी माझी सूचना आहे. म्हणजे ते आपले अधिकार चांगल्या तऱ्हेने बजावू शकतील. त्याचप्रमाणे सोशल वेल्फेअर डिपार्टमेंट शिक्षण खात्याला संलग्न केलेले आहे. त्याऐवजी ते सामान्य प्रशासन विभागाला जोडण्यात यावे म्हणजे ते नामदार मुख्यमंत्र्यांच्या नियंत्रणाखाली येईल. त्याचप्रमाणे या लोकांना नोकऱ्या मिळाव्यात यासाठी एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमधील एक एम्प्लॉयमेंट अधिकारी अनुसूचित जाती व जमातीचा असावा अशी माझी सूचना आहे. तसेच आता सोशल वेल्फेअर मिनिस्टर आहेत. त्यांचे नामाभिधान सोशल वेल्फेअर ॲन्ड रिलेशन्स मिनिस्टर फॉर शेड्यूल्ड कास्टस् ॲन्ड शेडयुल्ड ट्राईब्ज् असे ठेवावे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांचे इंटरेस्ट प्रत्येक खात्यात सेफगार्ड व्हावे या दृष्टीने प्रत्येक खात्यासाठी एक लियाझन ऑफिसर या कामासाठी द्यावा. आता आपल्या राज्यात स्टेट फायनान्शिअल कॉर्पोरेशन आहे. या महामंडळाकडून काही लोकांना कर्ज दिले जाते. परंतु त्यामुळे गरिबांचा किंवा विशेषत: या लोकांचा काय फायदा झाला आहे हे आपण बघितले पाहिजे. अर्थात अनेक लोकांना या महामंडळाकडून मदत झाली असे हे मी कबूल करतो. परंतु सर्वसामान्यपणे अनेक लोकांना मदत झाली असली तरी विशेषत: या लोकांना काय उपयोग झाला आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एखाद्या गावात वीज आली तर सर्वसामान्यत: सर्व गावाचा विकास होतो हे खरे आहे. परंतु प्रत्यक्ष या लोकांच्या घरात वीज आली आहे काय हे आपण पाहिले पाहिजे. त्याचप्रमाणे स्टेट फायनान्शिअल कॉर्पोरेशनने अनेक लोकांना कर्ज दिले असले परंतु कुंभार, लोहार वगैरे लोकांना त्या महामंडळाने कर्ज दिले आहे काय असा माझा प्रश्न आहे. हे लोक काही मोठा कारखाना उभा करू शकत नाहीत. तेव्हा या लोकांना काम दिले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. अर्थात त्यांना काम दिल्यानंतर मग त्यांना कमीत कमी किती वेतन मिळाले पाहिजे याचा आपण नंतर विचार करू. परंतु पहिल्याप्रथम त्यांना काही ना काही तरी काम दिले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. आम्ही जी एक हाऊसिंग स्कीम तयार केली होती ती मुख्यमंत्र्यांनी नीट तास दीड तास खर्च करून समजून घेतली आहे. आज तर आम्ही असे म्हणतो की, मागासवर्गांच्या लोकांना घरे बांधण्यासाठी आपण जी सबसिडी अथवा लोन देता ते देखील आम्हाला नको. परंतु ह्या लोकांच्या घरासाठी जे परमनंट स्वरूपाचे स्ट्रक्चर लागत असेल ते सरकारने स्वत:हून बांधून द्यावे. मग त्या सोसायट्या नकोत, ते प्रमोटर्स नकोत, व सोसायट्यांतून निर्माण होणाऱ्या भानगडी आणि भांडणेही नकोत.

श्रीमती शांताबाई दाणी यांनी पडीक जमिनीचा प्रश्न देखील येथे उपस्थित केला. मला त्याबाबत एवढेच सांगायचे आहे की, आपण ह्या पडीक जमिनी देण्यासाठी ज्या प्रायारिटीज फिक्स केल्या आहेत त्या बरोबर नाहीत. ज्यांना भारतीय घटनेप्रमाणे आपण काही सेफगार्डस् दिलेले आहेत अशा लोकांची प्रायारिटी जमीन देताना आपण प्रथम लावली पाहिजे. एखादा जर हुशार वकील असेल तर तो ह्या मुद्यावर केस जिंकेल व असे दाखवून देईल की आपण ज्या प्रायारिटीज ठरविल्या आहेत त्या घटनेप्रमाणे बरोबर

नाहीत. घटनेप्रमाणे ज्यांना काही सेफगार्डस् दिलेले आहेत त्यांची प्रॉयारिटी पडीक जमिनीचे वाटप करताना प्रथम लावायला हवी. परंतु आज तशी ती लावली जात नाही ही मोठी खेदाची गोष्ट आहे. आज लॅन्ड रेव्हिन्यू कोडप्रमाणे अशी जमीन देताना ज्या प्रॉयारिटीज लावल्या जातात त्या घटनेला धरून नाहीत. ज्यांना घटनेप्रमाणे सेफगार्डस् दिले आहेत त्यांना प्रथम प्रॉयारिटी दिली पाहिजे असे आमचे मत आहे. या जमीन वाटपासंबंधी मुख्यमंत्र्यांनी जी एक पायलट योजना पूर्वी पुढे आणली होती त्याप्रमाणे पुन्हा रिव्ह्यू करून जमिनीचे वितरण करावे अशी आमची मागणी आहे. त्याचबरोबर जंगलासाठी म्हणून जी जमीन आपल्याला ठेवावयाची आहे व त्याबाबत आपले जे धोरण आहे त्याला माझा विरोध नाही. मराठवाड्यात आपल्याला १० टक्के जमीन जंगलासाठी ठेवायची आहे व इतर भागात ४० गुरांसाठी १०० एकर जमीन असे आपले प्रमाण आहे. त्यासंबंधी मला काही म्हणायचे नाही. सर्व देशाच्या मानाने आपल्या राज्यात जंगलांचे प्रमाण कमी आहे आणि ते वाढवावयाला पाहिजे ही गोष्ट देखील मला मान्य आहे. त्यामुळे झाडे तोडून जमिनी द्या असे मी म्हणणार नाही. परंतु जंगलासाठी म्हणून ज्या जमिनी रिझर्व्ह केल्या आहेत त्या ठिकाणी अजिबात जंगलेच नाहीत अशा देखील काही जमिनी आहेत त्याबाबत सरकार काय धोरण स्वीकारणार आहे? आमची मागणी अशी आहे की, घरासंबंधाने मुख्यमंत्र्यांनी जी एक पायलट योजना आखली आहे ती अमलात आणावी, त्याशिवाय मागासवर्गाच्या लोकांच्या राहत्या घरांचा प्रश्न सुटू शकणार नाही मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याचा मुख्यमंत्री सहानुभूतीपूर्वक विचार करतील अशी अपेक्षा करतो.

❑❑❑

महाराष्ट्रातील १९७२ चा दुष्काळ

(२८ नोव्हेंबर, १९७२)

अध्यक्ष महाराज, आपल्या महाराष्ट्र राज्यावर लागोपाठ दोन वर्षे दुष्काळाचे संकट आलेले आहे त्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या विषयावर भाषण करण्यापेक्षा काही सूचना केल्या पाहिजेत असे मला वाटते. आपल्या राज्यात गेल्या वर्षी दुष्काळ पडला आणि याही वर्षी दुष्काळ पडला आहे. त्याला शासनाने विशेषतः या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, महसूल मंत्र्यांनी व सर्व लोकप्रतिनिधींनी मोठ्या नेटाने तोंड देण्याचा प्रयत्न केला आहे. दुष्काळाची झळ किती लोकांना पोहोचली आणि त्याचा किती लोकांवर परिणाम झालेला आहे याची चर्चा फार तपशिलात जाऊन करण्याची आवश्यकता आहे असे मला तरी वाटत नाही. कारण गेल्या वर्षी आपल्या राज्यात १४ लक्ष लोक दुष्काळग्रस्त होते, तर माझ्या माहितीप्रमाणे यावर्षी १८ लक्ष लोक आज दुष्काळी कामावर आहेत आणि अपेक्षित अंदाजे असा आहे की, जुलै-ऑगस्टपर्यंत ही संख्या २५ लक्षापर्यंत जाईल. हा जरी अंदाज असला तरी मला स्वतःला वाटते की, हा आकडा नजिकच्या काळात ३० ते ३५ लक्षापर्यंतही जाण्यास हरकत नाही. इतके मोठे भयानक संकट या राज्यावर आलेले आहे तेव्हा या प्रश्नासंबंधी विरोधी पक्षाचीसुद्धा भूमिका विरोधाची नाही. त्यांचाही विरोधाकरिता विरोध करण्याचा विचार नाही. म्हणून आपल्या राज्यावर जे इतके मोठे संकट आलेले आहे त्याचा समाचार आपण कसा काय घेऊ, याकरिता सर्वांनी बसून विचार केला तर आणि यात सुधारणा करण्यासाठी काय करावे

याचा विचार केला तर फारच मदत होण्यासारखी आहे. ह्या गोष्टीची मला वाटते आज आवश्यकता आहे. या ठिकाणी या संकटाला तोंड देण्याकरिता आपण आपले प्रांजळ मत व्यक्त केले पाहिजे. अध्यक्ष महाराज, आपल्याला जर या दुष्काळाला यशस्वीपणे तोंड द्यावयाचे असेल, मजुरांना काम आणि अन्न द्यावयाचे असेल. जनावरांना वैरण द्यावयाचे असेल तर आपल्याला जवळजवळ ८० कोटी रुपयांची आवश्यकता लागेल असा अंदाज मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला होता. अर्थात हा अंदाज त्यांनी व्यक्त केला त्यापेक्षा जास्त रक्कम लागणार नाही असे नाही कारण हा अंदाज आहे. याकरिता पैसे उपलब्ध करण्याकरिता सरकारला प्रयत्न करावे लागतील. आपल्या राज्यामार्फत केंद्रासमोर दुष्काळी परिस्थितीची बाजू मांडण्यात आलेली आहे. आपल्याला पैसे जरी मिळाले तरी पैशानेच हा प्रश्न सुटणार नाही तर यात फार मोठ्या प्रमाणावर मानवी प्रयत्नांची ही आवश्यकता आहे याची आपणांस जाणीव ठेवावी लागणार आहे. याकरिताच सरकारी यंत्रणा, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय कार्यकर्ते आपले सर्व प्रकारचे मतभेद विसरून या कामाला लागले पाहिजेत तरच हा प्रश्न चांगल्या रीतीने आपण हाताळू शकू. आपला पक्ष, आपली राजकीय मते, याला यावेळी बाजूला ठेवून सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना एकत्र आणून या संकटाचा सामना करण्याची आवश्यकता आहे. तोंड देण्याची आवश्यकता आहे. अध्यक्ष महाराज, मला सांगितले पाहिजे की, मजुरांचे आणि शेतमजुरांचे पोषण करणे ही बाब या राज्यात तरी सातत्याने समजली पाहिजे. पहिला दुष्काळ झाला. दुसरा दुष्काळ झाला आणि आता लागोपाठच्या वर्षी हा तिसरा दुष्काळ आल्यामुळे मजुरांच्या पोषणाच्या बाबतीत शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करण्याची वेळ आज आली आहे. म्हणूनच विरोधी पक्षाच्या नेत्यांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांनी जेव्हा चर्चा केली तेव्हा मी स्पष्टपणे सांगितले होते की, दुष्काळी कामावर मजुरांना काम देण्याच्या दृष्टीने उभारण्यात आलेली यंत्रणा अपुरी आहे. महसूल विभागांचे अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, जिल्ह्या जिल्ह्यातील इमारती व दळणवळण आणि सिंचाई विभागाचे अधिकारी यांच्याकडे त्यांची नेहमीची कामे तर असतातच आणि त्या कामाच्या दुपटीने किंवा तिपटीने जास्त अशी दुष्काळासंबंधीची अनुषंगिक कामे करण्याचा बोजा त्यांच्या शिरावर टाकण्यात आल्यामुळे ५ किलोमीटर्सच्या त्रिज्येत दुष्काळी कामे स्थानिक मजुरांना उपलब्ध करून दिली जावी अशी प्रामाणिक इच्छा असूनही ते करू शकत नाहीत. मागे एकदा सांगितल्याप्रमाणे १६,००० मजुरांना काम देण्याकरिता एका डिव्हिजनची जरूर असते. २५ लक्ष मजुरांना काम द्यावयाचे आहे जसे कल्पिले तर या हिशेबाने किमान १५० डिव्हिजन्स या राज्यात काढण्याची आवश्यकता आहे आणि अर्थातच तेवढी डिव्हिजन्स या राज्यात उघडलेली नाहीत. परिणामतः ५ किलोमीटर्सच्या त्रिज्येत आपण मजुरांना काम देऊ शकत नाही, पुरेशा यंत्रणेच्या अभावी ते शक्य होत नाही. शिवाय आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे. लागोपाठ सतत तीन वर्षे दुष्काळ पडल्यामुळे दुष्काळी कामावर काम करणाऱ्या मजुरांची श्रमशक्ती क्षीण झालेली आहे. त्यांची कार्यक्षमता जवळजवळ संपलेली आहे. या गोष्टीचा परिणाम त्यांना मिळणाऱ्या मजुरीवरही होतो. कारण त्यांनी केलेल्या कामाची क्वान्टिटी आणि त्या कामाची क्वालिटी या दोन्ही गोष्टींचा विचार करून त्यांना रोजी मिळते. गिट्टी फोडण्याचे काम तो करत असेल व त्याने इतकी व इतक्या आकाराची गिट्टी फोडली असेल तरच त्याला अमुक इतका पैसा मिळेल असे प्रमाण ठरलेले असते. सर्वसाधारण परिस्थितीत हे ठीक आहे परंतु लागोपाठ सतत तीन वर्षे दुष्काळ पडल्यामुळे मजुरांची श्रमशक्ती क्षीण झालेली आहे. कार्यक्षमता उणावली आहे व या परिस्थितीत त्यांच्याकडून क्वालिटी व क्वान्टिटीची नेहमीसारखी अपेक्षा करणे चूक ठरेल. अर्थात त्यांना फुकट पैसा द्यावा अशी सूचना कोणीही समजदार मनुष्य करणार

नाही. परंतु, किमान जीवन वेतन त्यांना मिळाले पाहिजे याचा तरी विचार होणे आवश्यक आहे. आपण कामाच्या सोयीच्या दृष्टीने पुरुष व स्त्रिया यांच्या मजुरीत फरक ठेवलेला आहे. एक काम करावयाचे असल्यास ६० पुरुष व ४० स्त्रिया ते काम करू शकतील असे गणित निश्चित केले आहे. पुरुषाला अडीच रुपये व स्त्रीला २ रुपये मजुरी निश्चित केली आहे. एवढी मजुरी त्यांना मिळत असेल तर माझी हरकत नाही परंतु दुर्दैवाने तेवढी मिळत नाही. नामदार महसूल मंत्र्यांनाही या कामाबद्दल आस्था आहे. लगन आहे. दौरा करून त्यांनी पाहणी केली आहे. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नाबद्दल प्रश्न नाही परंतु त्यांच्याही लक्षात आणि असेल की, जिल्ह्या जिल्ह्यातील मस्टर रोल्स व मजुरांना दिलेली मजुरी पाहिली तर ५० टक्के मजुरांना २ रुपये, पावणे दोन रुपये, दीड रुपया, सवाएक रुपया अशी मजुरी रोजी मिळालेली दिसेल. याचे कारण एकच की, कार्यक्षमता कमी झाल्यामुळे त्यांनी केलेले काम क्वालिटी व क्वान्टिटीच्या नेहमीच्या मापात असू शकत नाही. वास्तविक पाहता आता नॉर्मल कंडिशन्स नाहीत तर ॲबनॉर्मल आहेत. नॉर्मल दुष्काळाचे निकष ॲबनॉर्मल परिस्थितीला लावणे चूक आहे. इमारती व दळणवळण, इरिगेशन, सॉइल कॉन्झर्वेशन वगैरे कामांच्या मजुरीचे दर वाढविण्याची किंवा त्यांचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. नामदार मुख्यमंत्री आणि नामदार महसूलमंत्री यांना मी विनंती करीन की, क्वालिटी व क्वान्टिटी यांना महत्त्व जरूर असावे परंतु कोणत्याही परिस्थितीत अडीच रुपये पुरुषाला आणि २ रुपये स्त्रीला मजुरी किमान मिळेल एवढी व्यवस्था झाली पाहिजे व एवढा रोज त्यांच्या पदरात पडतो किंवा नाही याची खात्री करून घेतली पाहिजे. मला अशी माहिती आहे की, किमान ६० ते ७० टक्के लोक बिलो वेजेसवर काम करीत आहेत कारण क्वालिटी व क्वान्टिटीच्या निकषामध्ये त्यांचे काम बसत नाही. त्यांची कार्यक्षमता कमी झालेली आहे. जवळजवळ संपलेली आहे. अर्थात त्याला सरकारचा इलाज नाही, त्यांचाही इलाज नाही, कोणाचाच इलाज नाही. निसर्गाच्या करणीमुळे म्हणा किंवा इतर काही कारणामुळे म्हणा, लागोपाठ दुष्काळ पडल्यामुळे त्यांची कार्यक्षमता संपलेली आहे म्हणून या गोष्टीचा विचार झाला पाहिजे. शेतीवर काम करणाऱ्या लोकांना कामाची सवय असते परंतु ज्यांना कधी कष्टाचे काम करण्याची सवयच नाही. उदाहरणार्थ मातंग समाजाचे लोक, त्यांनी कधीही शेतीवर काम केले नाही, बाजा विणणे, टोपल्या विणणे अशी बुरुड कामे करण्यात त्यांचा जन्म गेलेला त्यांना कष्टाची कामे करणे कठीण जाते. शिवाय आग्रह असा की, दुष्काळी कामासाठी लागणारी आवश्यकता ती अवजारे ज्यांच्याजवळ नसतील त्यांना काम मिळणार नाही. ही अवजारे या लोकांनी आणावयाची कोठून? म्हणूनच सरकारने ज्यांच्याजवळ अवजारे नसतील त्यांना ती देण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. सध्या काही ठिकाणी अवजारे दिली जातात परंतु वीतभर पाते असलेली कुदळ जर त्याला दिली तर त्याच्याकडून अपेक्षित खोदाईचे काम होणार नाही व परिणाम त्याच्या मजुरीवर होईल. समजा गिट्टी फोडावयाची असेल व लहानशी हातोडी त्याला दिली तर गिट्टी फोडण्याचा वेग हातोडीच्या कमी वजनामुळे मंदावेल व पुरेसे माप न भरल्यामुळे त्याला मजुरी कमी मिळेल, म्हणून त्याला जी हत्यारे द्यावयाची ती योग्य त्या प्रकारची असणे जरूर आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कष्टाच्या कामाची सवय नसलेला मनुष्य त्या कामाशी परिचित होण्यास तीन आठवडे लागतात आणि तोपर्यंत त्याला ६ आणे, ७ आणे, ८ आणे मजुरी मिळते. त्यात त्याने आपला निर्वाह कसा करावा? म्हणून मला सरकारला विनंती करावयाची आहे की, सुरुवातीपासूनच त्याला रिझनेबल मजुरी मिळेल असे धोरण सरकारने अवलंबिले पाहिजे. वेळप्रसंगी क्वालिटी व क्वान्टिटीचा आग्रह बाजूला सारूनही त्याला जीवनवेतन मिळेल असे पाहिले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मनुष्याच्या आणि त्याचप्रमाणे जनावरांच्या स्थलांतराचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. मला असे सांगावयाचे आहे की, जोपर्यंत जनावरांमध्ये स्थलांतर करण्याची ताकद आहे. तोपर्यंतच त्यांना स्थलांतर करून दुसरीकडे नेलेले बरे अन्यथा समजा जळगाव, नगर भागातील गुरे अमरावतीच्या धारणी ट्रॅकमध्ये आणावयाची असतील तर उपासमार झालेली गुरे इतके अंतर नंतर चालू शकणार नाहीत. मी ऐकले की, अशा प्रकारचे कॅटल कॅम्प उघडले जाणार आहेत. तेव्हा या गोष्टीचा विचार ते उघडताना केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मला असेही सांगावयाचे आहे की, संपूर्ण मजुरांना काम द्यावयाचे असेल तर विकेन्द्रित स्तरावर गावाच्या घटकात त्याला काम दिले पाहिजे नाहीतर मजूर लोकांच्या कॉलनीच उभारल्या पाहिजेत व मोठी कामे तेथे काढली पाहिजेत. असे केले तरच मजुरांचा प्रश्न सुटू शकेल. मजुरांना विकेंद्रित स्तरावर काम देणे आवश्यक आहे. मला अशी विनंती करावयाची आहे की, हे रेग्युलर फीचर समजून मजुरांना काम देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी. एम्प्लॉयमेंट गॅरंटी कागदावर आहे. ती प्रत्यक्षात घरोघर पोहोचवावयाची असेल तर खालच्या थरापर्यंत पोहचणारी यंत्रणा पाहिजे. राज्याच्या काही भागात पिकांची परिस्थिती बरी असली तरी राज्याच्या कोणत्याही जिल्ह्यात लेबर प्रॉब्लेम हा आहे तसाच कायम आहे. तेव्हा एखाद्या जिल्ह्यात दुष्काळ नाही म्हणून तेथील मजुरांचे प्रश्न समाधानकारक आहेत अशी कल्पना कोणी करून येऊ नये.

त्यानंतर धान्यासंबंधी मी काही सूचना करणार आहे. मध्यंतरी धान्य उपलब्ध व्हावे म्हणून त्यासंबंधीची बंधने कमी केली. त्यामुळे शॉर्ट ड्युरेशनचे हायब्रीडचे पीक चांगले आले. परंतु, दुर्दैवाची गोष्ट अशी नजिकच्या जिल्ह्यात किंवा प्रांतात या हायब्रीड ज्वारीला सरकारी किंमतीपेक्षा जास्त किंमत मिळाल्यामुळे हे पीक शेतकऱ्याकडे राहिले नाही. तथापि, अजूनही एक शक्यता आहे. अजूनही ५०-६० टक्के ज्वारी व्यापाऱ्याकडे आहे. ही ज्वारी फ्रीज केल्याचे घोषित करणे आवश्यक आहे. हे करणे कटु वाटले तरी केले पाहिजे, कारण त्यामुळे अनेक प्रश्न सुटतील. मला ज्या सूचना करावयाच्या होत्या त्या मी केल्या आहेत तेव्हा मी सभागृहाचा अधिक वेळ घेत नाही.

❑❑❑

दलितांवर होणाऱ्या अत्याचाराची भीषणता स्पष्ट करणारे भाषण

(१२ डिसेंबर, १९७२)

अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. उपेक्षित आणि दलित समाजाच्या उत्थानासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात तरतुदी केल्या असल्या आणि महात्मा जोतिराव फुलेंसारख्या समाजसुधारकांनी त्यावर समाजप्रबोधन केले असले तरी, सवर्णांच्या मनातील अस्पृश्यता आणि वर्णश्रेष्ठत्वाचे अहंगंड जोपर्यंत नष्ट होत नाहीत तोपर्यंत अस्पृश्यता नष्ट होणार नाही, दलितांवरील अत्याचार थांबणार नाही असे मर्मग्राही विवेचन दादासाहेबांनी या भाषणातून केले.

अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांनी पूर्वी जे अभिवचन दिले होते त्याची पूर्ती करण्याच्या दृष्टीने विरोध पक्षाचे सन्माननीय नेते श्री. उत्तमराव पाटील यांनी जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याबद्दल प्रथमत: मी त्यांचे अभिनंदन करतो. या विषयावर आपल्याला काय अभिप्रेत आहे याबद्दल दोन्ही पक्षाच्या निरनिराळ्या सदस्यांनी आपापले विचार येथे प्रकट केले परंतु दुर्दैवाने मी दोघांच्याही विचारांशी असहमत आहे. मला चिंता फक्त एकाच बाबीची आहे आणि ती ही की, अस्पृश्यतेचे शास्त्रीय विवेचन किंवा शास्त्रीय संशोधन यापूर्वी कधीही केले गेलेले नाही. हा प्रश्न एका नाण्याच्या दोन बाजूंसारखा आहे. पहिल्या प्रथम ज्या लोकांना आपण उपेक्षित समजतो त्यांच्यामधील न्यूनगंड नष्ट करणे आवश्यक आहे. त्यांच्या मनातील हा न्यूनगंड जोपर्यंत जाणार नाही तोपर्यंत अस्पृश्यता दूर होणार नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा महात्मा ज्योतिबा फुले यांना उद्धृत करीत असताना सन्माननीय सभासद श्री. राम मेघे यांच्या हातून जी चूक घडली ती मी तरी करणार नाही. सुधारक आणि क्रांतिकारक यांच्यामधील फरक महात्मा जोतिबा फुले यांनी फार चांगल्या तऱ्हेने दाखविलेला आहे. त्यांनी असे म्हटले होते की, सुधारणा अनुकंपेच्या किंवा दयेच्या पोटी रुजविता येत नाहीत. त्या रुजविण्यासाठी गुलामांना गुलामगिरीची जाणीव आपण पहिल्या प्रथम करून दिली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा असे म्हटले होते की, गुलामांना तुम्ही गुलाम आहात हे पहिल्या प्रथम सांगा, ज्यांना हृदयच नाही त्यांचे हृदयपरिवर्तन घडवून आणून सुधारणा करण्याची अपेक्षा बाळगली तर ती कधीही सफल होणार नाही. हृदयविहीन लोकांचे हृदयपरिवर्तन होईल आणि त्यांच्या हातून सुधारणा होतील असे जे म्हणतात त्यांना माझा विरोध आहे. अर्थात हा प्रश्न सामाजिक आहे हे मी कबूल करतो परंतु तो केवळ सामाजिक आहे असे म्हणून चालणार नाही. उपेक्षित समाजातील लोकांच्या मनात असलेला न्यूनगंड नष्ट करण्याची प्रक्रिया फार वेगाने सुरू केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. आता आज निरनिराळ्या ठिकाणी या लोकांवर अन्याय व अत्याचार होत आहेत. परंतु त्यांची चिंता मला वाटत नाही कारण त्यांच्याबद्दल आता लगेच ओरड केली जात आहे यावरून हे लोक आता जागे झाले आहेत व त्यांच्या मनातील न्यूनगंड नष्ट होत चालला

आहे याचा हा पुरावा आहे. पुसेगाव आणि लोणगाव येथील या लोकांनी सार्वजनिक विहिरी बाटविल्या असे मला कळले. तेव्हा तेथे जाऊन मी त्या लोकांना विचारले की तुम्ही या विहिरी का बाटविल्या? त्या वेळी नेत्यांनी मला असे उत्तर दिले की, येथील सवर्ण हिंदू लोक आम्हाला दुरून पाणी भरावयास लावीत होते. म्हणून आम्ही विहिरीच बाटविल्या तेव्हा ज्या क्षणी त्याच्या मनात ही भावना निर्माण झाली त्या क्षणी त्यांच्या मनातील न्यूनगंड नष्ट झाला होता हे उघड आहे. त्यांनी मला असे सांगितले की, आमचा हक्क आम्ही ॲसर्ट केला. परंतु ज्या वेळी उपेक्षित लोकांच्या मनातील न्यूनगंड नष्ट होतो आणि आपला हक्क ॲसर्ट करण्यासाठी ते काही तरी करतात त्या वेळी त्यांच्याविरुद्ध असलेल्या लोकांच्या मनातील अहंगंड जागा होतो आणि त्यामुळे संघर्षाचा वणवा पेटतो. पुसेगावला या लोकांनी सार्वजनिक विहिरींवर पुढे येऊन पाणी भरण्यास सुरुवात केल्यानंतर तेथील सवर्ण हिंदूंनी जर त्यांचे स्वागत केले असते तर तेथे संघर्ष निर्माण झाला नसता. परंतु ज्या वेळी उपेक्षित माणसाच्या मनातील न्यूनगंड नाहीसा होतो त्या वेळी इतरांच्या मनातील अहंगंड जागा होतो. गावातील नवबौद्ध लोकांनी विहिरींवर दुरून पाणी घेतलं तर त्या गावातील सवर्ण हिंदू म्हणतात की, आमच्या गावातील नवबौद्ध लोक फार चांगले आहेत; परंतु तेच सार्वजनिक विहिरीवरसुद्धा जर जवळ जाऊन स्वतः पाणी घेऊ लागले तर हेच सवर्ण हिंदू म्हणतात की, आमच्या गावातील नवबौद्ध लोक आजकाल फार शेफारलेले आहेत. कळत न कळत का होईना परंतु त्यांच्या मनातील अहंगंड अशा रीतीने जागा होतो. आणि मग तेथे संघर्ष निर्माण होतो. परंतु आता काळ बदलत आहे. आता या लोकांच्या मनातील न्यूनगंड नाहीसा होऊ लागला आहे आणि आपले हक्क ते ॲसर्ट करू लागले आहेत. या वेळी इतर लोकांनी कसे वागावे आणि शासनाने कसे वागावे हा वेगळा प्रश्न आहे. या बाबतीत आम्ही एक इंचसुद्धा मागे जाणार नाही ही वृत्ती या लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. आता शासनाने काय करावे हे शासनानेच ठरवावे. या लोकांच्या मनातील न्यूनगंड नष्ट होत असल्यामुळे त्यांच्या हातून जी कृत्ये घडत आहेत त्यांना शासनाकडून सुद्धा जर योग्य तो प्रतिसाद मिळाला तर या बाबीतील निर्माण होत असलेला संघर्ष मिटेल. परंतु याच वेळी काही तरुण मुले पुढे येऊन काही भलत्या सलत्या गोष्टी करू लागले आहेत. त्यांच्या मनामध्ये निराशेची भावना निर्माण झालेली आहे आणि म्हणून ते या गोष्टी करीत आहेत. त्यांना समजावण्याचे काम आमच्यासारख्या लोकांना करावे लागते. त्यांची शक्ती योग्य रीतीने चॅनलाईज झाली पाहिजे. आता ज्यांच्या मनात अहंगंड निर्माण होत आहे त्यांचा अहंगंड आपण त्यांच्या हृदयपरिवर्तनाने नष्ट करणार आहात काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एखाद्या हरिजनाने एखाद्या गावात चांगले घर बांधले तरी त्या गावातील लोकांचा अहंगंड जागृत होतो. त्यांना असे वाटते की, या लोकांना चांगले घर बांधण्याचा अधिकार नाही. या लोकांची कॉलेजमध्ये गेलेली मुले सहाजिकच फुलपँट घालून गावात वावरू लागतात; परंतु तेसुद्धा सवर्ण हिंदूंना सहन होत नाही. त्याचप्रमाणे या लोकांच्या मनातील न्यूनगंड आता नष्ट होऊ लागल्याबरोबर इतर लोकांच्या मनात अहंगंड निर्माण होऊ लागल्यामुळे या बाबतीतील संघर्ष आता संपू लागला नाही तर या संघर्षाला आता सुरुवात झाली आहे असे मला म्हणावयाचे आहे. तेव्हा हा संघर्ष टाळावयाचा असेल तर आपण काय केले पाहिजे याचा आपण विचार केला पाहिजे. हा प्रश्न सामाजिक आहे असे म्हणून चालणार नाही. तो सामाजिक असला तरी त्याची उकल राजकीय आणि प्रशासकीय पावले टाकून करावी लागेल. जुन्या जमान्यात ताप आल्यानंतर रोग्याला कडूनिंबाची पाने खावयाला देत असत. कडू औषध प्यायल्याशिवाय रोग बरा होणार नाही असे

त्याला सांगितले जात असे. त्याचप्रमाणे आता कडू कृती करण्याची पाळी आली आहे आणि त्यासाठी सरकारने आयर्न हँड डिलिंग केले पाहिजे. अमेरिकेमध्ये श्री. केनेडी यांनी काळ्या मुलांना कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी कायदा केला, परंतु गोऱ्या लोकांनी त्याला विरोध केला. त्यावेळी श्री. केनेडी यांनी आयर्न हँड डिलिंग करून काळ्या मुलांना योग्य न्याय मिळवून दिला. त्याचप्रमाणे आपल्या येथेसुद्धा सरकारने लोखंडी हाताने कणखरपणे कायदे अंमलात आणले पाहिजेत. पॉलिटिकल विझडम आणि पॉवर या दोन गोष्टींना आपल्या येथे फार महत्त्व आहे. तेव्हा सरकारने आपल्या सत्तेचा वापर व बुद्धिमत्तेचा वापर या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी केला पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासाठी काय केले पाहिजे याचा विचार करण्यासाठी एक समिती नेमण्याचे आश्वासन दिले होते. परंतु कामाच्या व्यापामुळे अजूनपर्यंत त्यांना आपले आश्वासन पाळता आलेले नसेल. आता ते आश्वासन त्यांना पाळावयाचे असेल तर त्यासाठी सरकारची लाईन ऑफ डायरेक्शन काय असली पाहिजे यासंबंधी काही सूचना करून मी माझे भाषण संपविणार आहे.

मला असे वाटते की, आपल्या समाजाचे सामाजिक स्वास्थ्य बिघडता कामा नये. आता तरुण मुले काही भलत्या गोष्टी करू लागली आहेत आणि त्यामुळे हे सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे. परंतु त्यांना समजावण्यासाठी आपण योग्य ती कारवाई केली पाहिजे. ते करावयाचे असेल तर आपण काय करू शकतो याचा आपण विचार केला पाहिजे. रिमूव्हल ऑफ अनटचेबिलिटी हा भारत सरकारचा कायदा आहे. त्याच्या परिक्षेत्रात कायदा बदलावा. तो कसा बदलता येईल याच्या शिफारशी मुख्यमंत्र्यांना करता येतील. तो प्रश्न मध्यवर्ती सरकारचा आहे. दारूबंदीच्या प्रश्नासारखा अस्पृश्यतेचा प्रश्न समजून त्याच्यासाठी टास्क फोर्स, रस्त्यावरच्या पोलिसांसारखी यंत्रणा करण्याचा विचार आहे की नाही? त्याच्या दर्जाचा किमान पातळीचा हा प्रश्न समजून त्याचा विचार आपण करणार आहात की नाही? त्याच्यासाठी टास्क फोर्स, वेगळा सेल करणार की नाही? दारूबंदीचे वेगळे खाते आहे, तसे याबाबतीत काही वेगळे खाते ठेवणार की नाही? मुख्यमंत्र्यांशी मी त्यांच्याशी झालेल्या वैयक्तिक चर्चेत यासंबंधात बोललो. काही सूचना केल्या. हा प्रश्न डील करण्याकरिता सचिवालयात वेगळा सेल, वेगळे खाते का करीत नाही? त्याच्या शाखा जिल्हा पातळीपर्यंत का करीत नाही? अस्पृश्यता निवारण कायद्याखाली घडलेला गुन्हा पोलीस इन्स्पेक्टर रजिस्टर करीत नाहीत, त्याची दखल डीएसपी का घेत नाही? तो दर्जा डीएसपीच्या रॅन्कच्या माणसाला का देत नाही? समरी ट्रायल्सच्या केसेस म्हणून त्या का मानल्या जात नाहीत? अस्पृश्यता अपराध नियमाखाली दोन-दोन वर्षे खटले सुरू राहतात. खटल्यास वेळ लागल्यामुळे टेम्पटेंशन, अभिवचने, दंड्याच्या धाकाने पुरावे फुटतात. तेव्हा अशा गुन्ह्यांच्या बाबतीत समरी ट्रायल्सच्या केसेस का करीत नाही? हरिजनांवरील अन्य अत्याचाराच्या प्रश्नांसंबंधी विविध सूचना होत्या. या अत्याचारासंबंधातील गुन्हे समरी ट्रायल करून निकालात काढता येतील.

अध्यक्ष महाराज, एवढ्यापुरता हा प्रश्न नाही. याचा सर्वस्पर्शी असा विचार करावा लागेल. तो करावयाचा तर शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टीने या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. मी एका समितीत घाईघाईने धावत जाऊन माझ्याजवळील जी. आर. समितीमध्ये नेऊन दाखविला. रिझर्व्हेशन कंडिशनप्रमाणे एखाद्या मुलाला सिक्वेन्सप्रमाणे मार्क मिळाले तर संपूर्ण वर्ग भरला तरी वार नाही. ६०-५९-५८-५७ असे मार्क्स मिळालेल्या विद्यार्थ्यांची गमतीदार उदाहरणे मी दाखविली. शेड्युल्ड कास्टच्या मुलाला ५८ टक्के मार्क्स आहेत त्याला प्रवेश

नाही आणि एका मुलाला ४२ टक्के मार्क्स त्याला मात्र प्रवेश. १०० अर्ज आले तर त्यापैकी १३ निवडून घ्यावयाचे. १८व्याला ६० टक्के मार्क्स असले तरी रिझर्व्हेशनचा उपयोग नाही. जास्त मार्क्स हा या विद्यार्थ्यांच्या बाबतीत शाप ठरला आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, समाज कल्याण खात्यातील अकार्यक्षम अधिकाऱ्यांनी मी केलेल्या माझ्या तळमळीच्या सूचनांचा कवडीचा विचार केला नाही. बारा महिने झाले. त्या मुलांना प्रवेश मिळाला पाहिजे. उन्हाळ्यामध्ये ते संपूर्ण प्रकरण संपले, आता पुढच्या बारा महिन्यात तरी अशा गोष्टी होऊ नयेत. जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना जनरल पुलमध्ये टाकून त्यांना त्यांच्या गुणाप्रमाणे प्रवेश मिळाले पाहिजे. शासनाच्या जी. आर. मध्ये चूक नाही परंतु त्याच्या चुकीच्या इंटरप्रिटेशनमुळे मागासलेल्या हुशार मुलांना प्रवेश मिळत नाही. मी सुचविल्यानंतर देखील त्या जी. आर. च्या इंटरप्रिटेंशनमध्ये दुरुस्ती होऊ नये यापेक्षा केविलवाणी दुसरी कोणती गोष्ट होऊ शकेल?

अध्यक्ष महाराज, मला सांगितले पाहिजे की, राज्यामध्ये राखीव जागा भरण्यासंबंधी अनेक तरतुदी आहेत. परंतु आजपर्यंत क्लास वन व क्लास टू च्या जागांवर कुठेही मागासलेल्या वर्गाचे लोक राखीव जागांच्या प्रमाणात भरलेले नाहीत. याबाबतीत फक्त ठराव केलेले आहेत. फक्त धोरण आखलेले आहे, त्याची अंमलबजावणी कुठेही होत नाही. अमूक एका अधिकाऱ्याने राखीव जागा भरलेल्या नाहीत म्हणून त्याला जबाबदार धरले आहे काय? माननीय सभासद श्री. उत्तमराव पाटील यांनी सांगितले की, संविधानात तरतूद आहे. राज्य सरकारला कायदा करण्याच्या बाबतीत संविधानात तरतूद आहे. राखीव जागा भरल्या गेल्या नाहीत तर तो भरणार नाही त्याला शिक्षा देऊ अशा तऱ्हेचा कायदा आपल्याला करता येईल काय? मुलांच्या प्रवेशासंबंधी राखीव जागासंबंधी असा कायदा आपल्याला करता येईल काय याचा विचार केला पाहिजे. राज्यामधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ९९ टक्के ऑफिसराचे सी. आर. खराब लिहिले आहेत. डोळ्यांनी दिसणारी अस्पृश्यता, बाटाबाटीसारखा प्रश्न हा एक वेगळा प्रश्न आहे. परंतु अनटचॅबिलीटी इन दी कन्सिल्ड फॉर्म-छुपी अस्पृश्यता-ही फार मोठी भयानक आहे. ही एवढी भयानक आहे की, आदिवासी किंवा शेड्युल कास्टचा माणूस प्रमोशनला ड्यू झाला असेल आणि तहसीलदाराचा प्रांत ऑफिसर होण्याची वेळ आली असेल तर त्याच्या वरच्या अधिकाऱ्यांत त्याच्याविषयी आकस निर्माण होतो. हा आकस का निर्माण व्हावा? अस्पृश्यता ही त्याच्या या प्रमोशनच्या आड येता कामा नये. परंतु प्रत्यक्षात अस्पृश्यता आड येते व त्याला प्रमोशन मिळत नाही. जी. आर. मध्ये तरतूद आहे की, मॉरल टर्पिट्युडच्या स्वरूपाचा म्हणजे रेप फोर्जरी, मिमसअॅप्रोप्रिएशनच्या स्वरूपाचा गुन्हा नसेल तर कोणाचेही प्रमोशन बार करता येणार नाही. परंतु संपूर्ण राज्यातील अस्पृश्य अधिकाऱ्याचे सी. आर. खराब केले आहेत. त्याच्या सर्व केसेस दाखवावयास मी तयार आहे. त्या लोकांचा मॉरल टर्पिट्युडच्या स्वरूपाचा कोणताही गुन्हा नाही, परंतु त्यांचे प्रमोशन सुपरसिड झाले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, कन्सल्ड फॉर्ममध्ये वावरणारी अस्पृश्यता प्रशासनात आहे. केवळ रस्त्यावरील विहिरीवर पाणी भरू देत नाहीत. नळावरील पाणी भरू देत नाहीत हा प्रश्न वेगळा. अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी काही खास तरतुदी कराव्यात हा प्रश्न वेगळा. बॅ. वानखेडे हे अर्थमंत्री असताना आणि श्री. मधुकरराव चौधरी हे अर्थमंत्री असतानाही शेड्युल कास्ट व शेड्युल ट्राईबच्या माणसावर पर कॅपिटा किती खर्च येतो ते मी सांगितले होते. त्यांच्यावर पर कॅपिटा तीन आणे खर्च होतो हे मी मागच्या वेळीही सांगितले होते. दोन्ही अधिवेशनात आम्हाला अभिवचने मिळाली की, नवीन अर्थसंकल्पात याचा विचार करून अधिक तरतुदी करू; परंतु त्या झाल्या नाहीत. सर्वसामान्य विकासाच्या कामात

एचबी ११८०—२०

या लोकांना हिस्सा नाही. १०० पंप रबीच्या पिकासाठी देतो म्हटल्यावर जे शेड्युल कास्ट व शेड्युल ट्राईबचे शेतकरी असतील त्यांना तरी कमीत कमी पंप मिळाले पाहिजेत की नाही. शिक्षण संस्था या समाजातील काही लोक जोपासतात, प्रेमाने जोपासतात. याबाबतीत श्री. देशपांडे यांनी जो मुद्दा मांडला त्याच्या बाबतीत माझे दुमत आहे. या समाजाचे लोक कुठे तरी ऑन पार बेसिस वर आले पाहिजेत. पांगुळगाडा मुलांना लागतो तो ते चालू लागेपर्यंत लागतो. एकदा तो चालू लागल्यावर पांगुळगाडा फेकून द्यावा. माझ्यासारख्या माणसाला ही गोष्ट अभिप्रेत आहे की, चंद्र-सूर्य-तारे असेपर्यंत आम्हाला सवलती नकोत. अध्यक्ष महाराज, मी आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, आजदेखील मी या राज्यात बौद्ध म्हणून सवलत घेऊ शकतो. परंतु माझ्या मुलांना मी फ्रीशीप बंद केली आहे. मी कॉन्व्हेन्टमध्ये माझ्या तीन्ही मुलाचे पैसे भरतो. या सवलतीमधील पैसा दुसऱ्या कोणत्या तरी पोरांच्या कामाला येऊ शकतो. ऑन पार बेसिसपर्यंत येईपर्यंत त्यांना सवलतीचा पांगुळगाडा नको आहे. चंद्र-सूर्य-तारे असेपर्यंत या सवलती पाहिजे ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही मंजूर नव्हती आणि त्यांच्या अनुयायांपैकी देखील कोणाला मंजूर नाही. त्या समाजाचे लोक ऑन पार बेसिसवर येईपर्यंत आपण आयर्न हॅन्ड डिलिंगने, स्पीडीली काही करता काय हा आपल्यासमोर प्रश्न आहे. अध्यक्ष महाराज, हरिजनांवरील न्याय अत्याचार, शिक्षण, नोकऱ्या, प्रमोशन, डिमोशन, फॉयनॅशियल मॅटर यासंबंधीतील या समाजाचे प्रश्न एवढे भयानक आहेत की त्याबाबतीत माझ्या सारख्याजवळ काही अधिकार नाहीत. मला रोज जवळजवळ शंभर पत्रे येतात. मी रोज दहा डी. ओ. लेटर्स मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांना लिहितो. माझ्याकडून यापेक्षा अधिक काही होणे-जाणे नाही. पोस्टमनचे काम, इकडून आले की तिकडे पाठवावयाचे. समाज कल्याण खात्याने चार-दोन विहिरी इकडे तिकडे काढून दिल्या की झाले एवढ्यापुरता हा प्रश्न मर्यादित नाही. समाजकल्याण खात्याच्या अधिकारात दुसरे आहे तरी काय? रिझर्व्हेशनच्या बाबतीत त्यांच्यासाठी काही करता येईल काय हे पाहिले पाहिजे. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. यासाठी काही पैसा नको. हा आर्थिक बाबीचा प्रश्न नाही; परंतु त्याही बाबतीत त्यांना न्याय मिळत नाही. त्यांना वाचा नाही, त्यांना कोणी वाली नाही, ही परिस्थितीत आहे, ही अवस्था आहे. रिझर्व्हेशन बेसिसवर त्याच्यासाठी काही करता येईल अशी परिस्थिती निर्माण करा. त्यांच्यावरील रिझर्व्हेशनच्या बाबतीतील प्रकरणे शासनाकडे रेफर केली तर त्याबाबत त्यांना ताबडतोब न्याय मिळाला पाहिजे. या सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली पाहिजे असे श्री. उत्तमराव पाटील यांनी सांगितले. या सर्वव्यापी प्रश्नाचा विचार करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी अभिवचन दिल्याप्रमाणे एक समिती आपण स्थापन करू शकलो पाहिजे आणि तिच्या सूचनांची अंमलबजावणी करू शकू अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. या गोष्टी करण्यासाठी हा हाय टाईम आहे, अपॉरच्युन टाईम आहे. हे केल्याशिवाय जनतेच्या मनात जे ॲसर्शन आले आहे ते थांबणार नाही. ते आपल्याला पुढे प्रॉपरली चॅनलाईज करात येणार नाही. हाच प्रसंग आहे की ज्यावेळी हे आपण आवरले पाहिजे. एवढे बोलून मी रजा घेतो.

❑❑❑

जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व भाववाढ

(१४ ऑगस्ट, १९७३)

जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व सातत्याने होणारी भाववाढ हे नेहमीच गंभीर विषय राहिले आहेत. १९७३ च्या दुष्काळाच्या काळात दादासाहेबांनी हे लक्षात आणून दिले की, जनता भाकरीत तरोटा भाजी मिसळून त्याची भाकरी खात आहेत. अमरावती जिल्ह्यात तरोट्याच्या झाडावर विषारी औषधांची फवारणी केली. तो तरोटा भाकरीत खाऊन काही जणांचा मृत्यू झाला त्या वेदना त्यांनी सभागृहात प्रभावीपणे मांडल्या ...

अध्यक्ष महाराज, या प्रस्तावाची संपूर्ण व्याप्ती लक्षात घेता या प्रस्तावाच्या बाबतीत तात्त्विक विवेचन करण्यास वेळ मिळेल असे मला मुळीच वाटत नाही. म्हणून त्या खोलांत न शिरता आपल्या राज्याने जे धोरण याबाबतीत स्वीकारले आहे, त्यात ज्या उघड चुका केल्या आहेत, त्यांची पुनरुक्ती न करता काही सूचना मी या ठिकाणी करणार आहे. या स्वरूपाच्या सूचना मी १९७२ च्या नागपूर अधिवेशनात केल्या होत्या. आज अन्नधान्ये, खाद्य तेले, वनस्पती तूप, साखर या सर्वांच्या किंमती आकाशाला टेकल्या आहेत. या वस्तू आज मिळेनाशा झाल्या आहेत. या राज्यातील ६० टक्के लोकांची गुजराण भरड धान्यावर होते. अध्यक्ष महाराज, आपण शेतमजुरांचे वेतन ठरविणाऱ्या समितीचे अध्यक्ष आहात. या समितीचा अहवाल सादर झालेला आहे. या शेतमजुरांच्या मिळकतीपैकी जवळ जवळ ६० टक्के हा धान्यवार होतो. आज परिस्थिती फार गंभीर आहे. अमरावती जिल्हा अन्नधान्याच्या दृष्टीने तसा बरा आहे पण त्या जिल्ह्यातदेखील मागे सन्माननीय सभासद श्री. बुचके यांनी म्हटल्याप्रमाणे लोकांना तरोट्याची तीन चतुर्थांश पाने पिठात मिसळवून तयार केलेल्या भाकऱ्यांवर आपल्या गुजराण करण्याची पाळी आली आहे. माझ्या जन्मगावच्या जवळ असलेल्या एका गावी एन्ड्रीनचा फवारा मारण्यात आला आणि शेताच्या आजूबाजूला उगवलेल्या तरोट्याच्या पानावर तो पडला. तो तरोटा लोकांनी घरी आणून, पिठात मिसळवून भाकरी केल्या. त्या भाकरी खाल्ल्यानंतर सहा लोक मृत्युमुखी पडले. अमरावती जिल्ह्यात अशा प्रकारची गंभीर परिस्थिती असताना ती इतर ठिकाणी किती भयानक असेल याची कल्पना येऊ शकेल.

अध्यक्ष महाराज, गतवर्षी म्हणजे १९७२ साली हायब्रीड पेरण्यात आले. या हायब्रीडची पेरणी नियमित वेळी केली तर सप्टेंबर, १५ पर्यंत पीक यावयाला हरकत नाही. पण ही पेरणी नियमित वेळी झाली नाही तर सप्टेंबरच्या शेवटपर्यंत साधारण पीक येते. गत वर्षी सप्टेंबर महिन्यामध्ये येणाऱ्या हायब्रीड ज्वारीच्या पिकाची मोनोपॉली वसुली ही नोव्हेंबरपर्यंत केली नाही. त्याला दोन महिने उशीर झाला. शेतकऱ्यांच्या घरातून ज्वारी बाहेर पडल्यानंतर दोन महिने आपण एक ब्र देखील काढला नाही. दोन महिने ती ज्वारी आपण खरेदी केली नाही. त्याचा परिणाम असा झाला की ७५ ते ८० टक्के ही हायब्रीडची ज्वारी व्यापाऱ्यांना विकण्यात आली

एचबी ११८०—२०अ

आणि ती व्यापाऱ्यांनी साठवून ठेवली. आपण एकाधिकार पद्धतीनुसार ही ज्वारी वसूल केली नाही ही एक चूक झाली. ती चूक दुरुस्त न करता धान्याच्या वाहतुकीला आपण परवानगी दिली. वास्तविक धान्य साठे गोठवून ते राज्याबाहेर जाऊ देणार नाही असा प्रयत्न करावयाला पाहिजे होता. या गोष्टीचा माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये उल्लेख केला होता परंतु त्याप्रमाणे कृती घडलेली नाही. धान्याची फ्री मुव्हमेंट सुरू झाल्यानंतर एकाधिकार पद्धतीने वसूल होणारी ज्वारी कमी झाली. शेतकऱ्यांनाही व्यापाऱ्यांप्रमाणे चटक लागली. गिऱ्हाईक त्यांच्या घरी यावयाला लागले. शेतकऱ्यांचे आणि आमचे संबंध मित्रत्वाचे आहेत परंतु दुःखाने म्हणावे लागते की, शेतकरी देखील आज व्यापारी बनला आहे. मोठमोठे शेतकरी धान्याचे साठे करून बसले आहेत. मोठमोठी गिऱ्हाईक त्यांच्या घरी येत आहेत आणि त्यामुळे आज बाजारामध्ये धान्य नाही. त्याला जर घरबसल्या धान्याचा भाव अधिक मिळत असेल तर तो बाजारात धान्य तरी कशासाठी आणेल? याच्या पुढचा सिक्वेन्स असा आहे की केंद्रीय सरकारने गव्हाची एकाधिकार खरेदी जाहीर केली. एखाद्या माणसाने चोराला सांगावे की अमुक अमुक सावकाराच्या तिजोरीत पैसा ठेवला आहे. तो लूट आणि दुसरीकडे त्या सावकाराला जाऊन सांगावे की आज तुझी तिजोरी फोडून चोरी करण्यात येणार आहे म्हणून तू सावध रहा असलाच हा प्रकार आहे. आम्ही गव्हाची एकाधिकार खरेदी सुरू करणार आहोत अशा प्रकारची दवंडी या शासनाने पिटली आणि साठेबाजांना सावध करून ठेवले. अशा परिस्थितीत धान्य कोठून मिळणार? ही परिस्थिती टाळता आली असती पण तसे घडलेले नाही. अध्यक्ष महाराज, जेव्हा आपण मोनोपोली परचेस म्हणतो तेव्हा ओघानेच मोनोपोली सेल आलाच. जेव्हा ज्वारीची किंवा अन्नधान्याची खरेदी आपण एकाधिकार पद्धतीने करतो तेव्हा या राज्याची नैतिक जबाबदारी आहे की ती लोकांना मिळाली पाहिजे. मी याबाबतीत जाहीर सभातून नेहमी उदाहरण देतो. बायकोसंबंधी एका माणसाने एकाधिकार सांगावा की तू माझी एक आठवड्यापुरती बायको आणि तीन आठवडे दुसऱ्याची असाच हा एकाधिकार खरेदीचा प्रकार आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की मोनोपोली परचेसबरोबरच मोनोपोली सेल देखील हाती घेतला पाहिजे. पण ज्याला आपण एकाधिकार खरेदी म्हणतो त्याचे आज विडंबन चाललेले आहे. प्रत्यक्षात त्याला एकाधिकार खरेदी म्हणताच येणार नाही. हे विडंबन थांबविता आले असते. ज्या वस्तू एकाधिकार पद्धतीने खरेदी करण्यात येतात त्या वस्तू लोकांना पुरविण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. जोपर्यंत असे होणार नाही तोपर्यंत या एकाधिकाराला काही अर्थ राहणार नाही. या राज्यात धान्याच्या फ्री मूव्हमेंटचा जो प्रयोग करण्यात आला त्यामुळे सर्वच घात झाला आहे. माझे असे म्हणणे आहे की मोनोपोली परचेसचे भाव हे १५ सप्टेंबरला जाहीर करा. आता शेतकऱ्यांमध्येसुद्धा व्यापारी प्रवृत्ती निर्माण होऊ लागली आहे. त्यांचा साठा ते सरकारला द्यावयाला आता तयार नसतात. त्यांना या बाबतीत काही एक प्रकारचे जणू काय ट्रेनिंग मिळाले आहे. म्हणून पुढच्या वर्षी दुष्काळ संपला तर परिस्थिती सुधारेल आणि त्याच्याकडून आपल्याला जास्त धान्य वसूल करता येईल असे मला वाटत नाही पुढच्या वर्षीसुद्धा ही परिस्थिती भयंकरच राहील असे माझे मत आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी मी ज्या सूचना केल्या आहेत त्या काही केवळ तात्त्विक भूमिकेवरून केलेल्या नाहीत. मी येथे मुद्दाम उल्लेख करू इच्छितो की, एकट्या अमरावती जिल्ह्यात इतक्या तेलाच्या गिरण्या आहेत की, त्यांच्या मार्फत आपल्या राज्यातील जनतेच्या एकूण तेलाच्या गरजेपैकी अर्धी गरज भागू शकेल. धामणगाव, मलकापूर, यवतमाळ, वणी वगैरे ठिकाणी अशाच गिरण्या आहेत. सन्माननीय सभासद श्री. मेघे यांनी परवाच सांगितल्याप्रमाणे आता करडीचे तेल काढण्याची योजना आहे. या बाबतीत

मला असे सांगावयाचे आहे की, अमरावती येथे मानसिंग इंडस्ट्रिज नावाची एक तेल काढण्याची गिरणी आहे. त्यांनी मार्केटिंग फेडरेशनकडून १९५ रुपये भावाची सरकी तिचे आम्ही तेल काढून ते ४ रुपये किलो या भावाने आपल्याला विकू असा करार करून ११५ रुपये भावाने मिळविली. त्याप्रमाणे त्यांनी तेल तयार केले. परंतु त्यानंतर त्यांनी ते तेल सिव्हिल सप्लाईज डिपार्टमेंटकडून रिजेक्ट करून घेतले. वस्तुतः ते तेल चांगले आहे परंतु ते ४ रुपये किलो या भावाने विकावे लागू नये म्हणून त्यांनी ते रिजेक्ट करून घेतले आणि त्यानंतर त्या तेलाचे काय झाले याचा पत्ताच लागत नाही. ते तेल रिफाईन करण्याकरिता गेले की काय की त्या तेलाचे डबे सिलबंद करून ते आरोग्याला विघातक आहेत असे ठरवून बाजुला ठेवण्यात आलेले आहेत. प्रत्यक्षात हे तेल १० ते ११ रुपये किलो या भावाने त्यांनी लहान लहान दुकानदारांना विकलेले आहे.

सभापती : त्यांचे रिजेक्ट केलेले तेल विकले गेले आहे याबद्दल तुमच्याजवळ काही पुरावा आहे काय?

होय, अध्यक्ष महाराज, मी अमरावती येथील १०० लहान दुकानदार आपल्यापुढे आणून उभे करू शकेन की, जे आपल्याला सांगतील की, त्यांना या इंडस्ट्रिजकडून या भावाने तेल मिळालेले आहे. तेव्हा आपण एक चूक करतो व ती झाकण्यासाठी दुसरी चूक करतो आणि तिच्यावर पांघरूण टाकण्यासाठी तिसरी चूक करीत आहोत. त्यामुळे आज गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. वस्तुतः ही गंभीर परिस्थिती टाळता येण्यासारखी आहे. पूर्वी भरड धान्याबद्दल मी काही सूचना केल्या होत्या. त्या स्वीकारल्या गेल्या असत्या तर आज जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे ती झाली नसती. तेव्हा निदान यापुढे तरी ही गंभीर परिस्थिती टाळण्याच्या दृष्टीने पावले टाकली जातील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

❑❑❑

५वी पंचवार्षिक योजना सामाजिक न्याय देणारी ठरावी

(२१ ऑगस्ट, १९७३)

५ व्या पंचवार्षिक योजनेवर दिनांक २१ ऑगस्ट १९७३ ला महाराष्ट्र विधानपरिषदेत चर्चा झाली. त्या चर्चेत सहभागी होतांना रा. सू. गवई यांनी ही योजना सामाजिक न्याय देणारी ठरावी अशी अपेक्षा व्यक्त केली. गरीब हा या योजनेचा केंद्रबिंदू असावा अशी अपेक्षाही या भाषणातून व्यक्त केली. ते भाषण असे होते ...

अध्यक्ष महाराज, पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा राहिलो आहे. हा आराखडा या सन्माननीय सभागृहाला सादर करताना माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले भाषण मी लक्षपूर्वक ऐकले आहे. त्यांनी या आराखड्याबद्दलची धावती कल्पना आपल्या प्रास्ताविक भाषणात दिली आहे. हा आराखडा चांगला नाही असे म्हणण्याची हिंमत कोणीही सहजासहजी करणार नाही हे खरे असले तरी आमच्या मनाची व्यथा यात दिसत नाही. माझे पुढचे भाषण जास्त स्पष्ट करण्यासाठी मी एक गोष्ट सुरुवातीला सांगू इच्छितो. एका आईने आपल्या

मुलाला जेवू घातले नाही आणि तो बिचारा उपाशी राहिला. सरते शेवटी तो घरातून निघून गेला आणि एका बागेत गेला. तेथे तो एका बाकाखाली बसला होता. त्याच बाकावर एक प्रियकर प्रेयसीचे जोडपे येऊन बसले. गप्पा मारीत असताना त्या प्रेयसीने आपल्या प्रियकराला विचारले की, तुला आता कसे काय वाटत आहे? त्याने उत्तर दिले की, मला स्वर्ग, मृत्यू, पाताळ सर्व काही माझ्याजवळ आहे असे दिसत आहे. तेव्हा त्या मुलाला असे वाटले की, या मनुष्याला सर्व काही दिसत आहे, तेव्हा आपली टोपीसुद्धा त्याला दिसत असली पाहिजे व तो घाबरला. परंतु त्या मनुष्याला या मुलाची टोपी काही दिसली नाही. कारण तो गरीब मुलगा होता. त्याचप्रमाणे या योजनेत सर्व गोष्टी दिसत आहेत. त्यात पाटबंधाऱ्यांच्या योजना आहेत, वीज योजना आहेत, अनेक विहिरींवर पंप बसविण्याच्या योजना आहेत परंतु त्यात गरीब माणूस मात्र दिसत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी नागपूर अधिवेशनात जे निवेदन केले होते त्याची एक प्रत मी आपल्याबरोबर येथे आणली आहे. त्या निवेदनात त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, समाजातील जो दुर्बल घटक आहे व जो गरीब समाज आहे त्याच्यासाठी वेगळी व खास तरतूद पुढच्या पंचवार्षिक योजनेत केली जाईल. हे निवेदन त्यांनी दिनांक २४ सप्टेंबर, १९७२ रोजी केलेले आहे. काँग्रेसने १५ कलमी कार्यक्रम स्वीकारल्यानंतर जे निवेदन त्यांनी केले त्यात त्यांनी गरीब मनुष्य हा आमचा केंद्रबिंदू राहील व त्यांच्यासाठी रोजगार हमी योजना हाती घेतली जाईल असे म्हटले होते. त्यांचा उल्लेख प्रत्यक्षपणे केला जाईल असे नव्हे तर त्यांच्याकरिता खास व वेगळी तरतूद केली जाईल असे त्यांनी सांगितले होते. ज्यांना काम हवे आहे परंतु ज्यांना काम मिळू शकत नाही अशा सर्व लोकांना काम दिले जाईल असे त्यांनी सांगितले होते. परंतु त्याचा या आराखड्यात कोठे उल्लेख दिसत नाही.

सध्या मला असे सांगावयाचे आहे की, गरीब अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांसाठी, आदिवासी लोकांसाठी वेगळी व खास तरतूद करण्यात येईल असे अभिवचन त्यांनी दिले होते हे मी सांगत आहे. परंतु या आराखड्यात या लोकांसाठी अशी खास तरतूद दिसत नाही. त्याचप्रमाणे पाच वर्षांकरिता ही योजना राहणार आहे. तेव्हा यात ॲप्रोच काय आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मला असे आठवते की, पूर्वी ब्रिटिशांच्या राजवटीत एकदा मेकॉले आणि महात्मा फुले यांचा शिक्षणाच्या पद्धतीबद्दल वाद सुरू झाला होता. लॉर्ड मेकॉले यांचे म्हणणे असे होते की, वरच्या शिखरावर पाणी पडले की, ते झिरपत झिरपत खाली जातेच. तेव्हा वरचे श्रीमंत लोक शिकले की, त्याचा फायदा समाजातील गरीब थरातील लोकांनासुद्धा मिळतो आणि म्हणून त्यांच्या शिक्षणासाठी निराळी तरतूद करण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे वरच्या विशिष्ट लोकांसाठी तरतुदी केल्या की त्याचा फायदा गरीब लोकांना आपोआप मिळेल अशी या सरकारची हा आराखडा तयार करताना समजूत झालेली असावी असे दिसते. परंतु मुळातच या ॲप्रोचला माझा विरोध आहे. गरिबांसाठी डायरेक्ट ॲक्शन घेऊन काही तरी करावे असा सिद्धांत सरकारने स्वीकारलेला दिसत नाही. महात्मा फुले यांनी लॉर्ड मेकॉले यांच्या विचारसरणीला याच दृष्टिकोनातून विरोध केला होता. तेव्हा या लोकांसाठी सरळ सरळ व खास आणि वेगळी तरतूद केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. १९५२ साली पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचवार्षिक योजनांच्या सिद्धांतांवर भाषण केले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, आपण ओलिताचे प्रमाण किती वाढविले आहे, किंवा किती विहिरी बांधल्या आहेत हे सर्व प्रश्न माझ्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे नाहीत. परंतु समाजातील शेवटच्या घटकापर्यंत नियोजनाचे फायदे जाणार आहेत की नाहीत व सामान्य माणूस हा नियोजनाचा केंद्र बिंदू झालेला आहे की नाही याला माझ्या दृष्टीने महत्त्व आहे. सामान्य माणसांची प्रतिष्ठा किती वाढली आहे, त्याच्या हातात किती सत्ता आली आहे आणि त्यांना किती सुखसोयी प्राप्त झाल्या

आहेत हे आपण पाहिले पाहिजे. नियोजन करताना सामान्य माणसांना या गोष्टी प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न केला पाहिजे. परंतु हे जर घडले नाही तर आपले नियोजन शून्यवत आहे असे म्हटले पाहिजे. आता सरकारची व्याख्या करताना अशी केली जाते की, Government of the people, for the people and by the people. त्याचप्रमाणे अध्यक्ष महाराज, आपणसुद्धा एकदा लोकशाहीची व्याख्या अशी केली होती की, उपेक्षित लोकांच्या हातात ज्यावेळी सत्ता येईल तीच खरी लोकशाही.

परंतु पुढच्या पाच वर्षांत या अंडर प्रिव्हिलेज्ड लोकांच्या हातात खरी सत्ता येईल असे या आराखड्यावरून दिसून येत नाही असे मला म्हणावयाचे आहे. म्हणजेच ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये लोकशाहीचा जो अर्थ दिलेला आहे त्याप्रमाणे खरी लोकशाही आपल्या राज्यात अजून स्थापन झालेली नाही. अर्थात विकेंद्रित राज्यसत्ता किती असावी, सहकारी क्षेत्राला किती प्राधान्य द्यावे वगैरे गोष्टींच्या तपशिलात मला आता जावयाचे नाही. परंतु मला आपल्याला एवढेच निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, 'गरिबी हटाओ' हे आपले ध्येय असले तरी या आराखड्यामध्ये गरिबी नष्ट करण्यासाठी खास तरतूद केलेली दिसत नाही.

शेड्युल्ड ट्राईब्जसाठी शिक्षण, इकॉनॉमिक अपलिफ्ट व हाऊसिंग या तीन बाबींवर १२ कोटी रुपये ठेवले आहेत. शेड्युल्ड कास्टसाठी ३ कोटी ५९ लाख रुपयांची तरतूद केली आहे. अनुसूचित जाती आणि जमातीच्या जनरल एज्युकेशनवर ७ कोटी रुपये, हाऊसिंगवर ६ कोटी रुपये, लेबर को-ऑपरेटिव्हजवर १ कोटी रुपये प्रत्यक्ष रीतीने खर्च व्हावयाचे होते. अशा प्रकारे २,६०० कोटी रुपयांच्या प्लॅनमध्ये साधारणपणे या मागासवर्गातील लोकांसाठी निरनिराळ्या कामावर फक्त साधारणपणे २५ कोटी रुपये खर्च धरण्यात आलेला आहे. हे प्रमाण १०० रुपयात फक्त ७५ नवे पैसे इतके पडते. ह्याशिवाय एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमसाठी ५० कोटी रुपये वेगळे काढून ठेवण्यात आलेले आहेत. तेव्हा हे २५ कोटी रुपये व एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमचे ५० कोटी रुपये अधिक ८७ कोटी रुपये यांची जर बेरीज केली तर ही रक्कम १५२ कोटी रुपयांपर्यंत जाते. ह्यावरून ह्या राज्याचा जो ८० टक्के उपेक्षित समाज आहे त्याच्यावर एकूण प्लॅनमधील फक्त ४ टक्के खर्च करण्यात येतो. ही जर टक्केवारी आपण पाहिली तर गरिबांचा खरोखरच अपेक्षाभंग झालेला आहे असे दिसून येईल. आता ह्याची टक्केवारी जर आपण काढायचे म्हटले तर शेड्युल्ड ट्राईब्जसाठी चार दशांश, शेड्युल्ड कास्टसाठी एक दशांश व अदर विकर सेक्शनसाठी पंचाहत्तर शतांश असे प्रमाण पडते. यावरून आपल्या नियोजनाची नौका कोणत्या दिशेने चालली आहे याची कल्पना येईल. जशी होकायंत्राच्या सहाय्याने नौकेची दिशा ठरविली जाते तशाच प्रकारे आपल्या नियोजनाची दिशा दाखविणारे हे आकडे आहेत. या नियोजनात गरीब लोकांना थारा नाही. केवळ गरीब लोकांनी जिवंत रहावे, मरू नये इतकीच तरतूद या नियोजनात त्यांच्यासाठी करण्यासाठी आली आहे. मार्क्सचा असा सिद्धान्त आहे की गरीब लोकांत फक्त प्रजननाची शक्ती रहावी म्हणजे आपल्याला कामासाठी सतत मजूर मिळत राहतील. तशाच प्रकारची तरतूद आपण त्यांच्यासाठी या नियोजनात केलेली दिसते. गरीब लोक फक्त कसे तरी जिवंत राहावेत इतकेच आपल्याला वाटते काय? त्यांच्या आजच्या एकंदर परिस्थितीत ह्या नियोजनाने काही फरक पडणार आहे काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्यांना कामाची गरज आहे अशांना जर दुसरीकडे कोठे काम मिळत नसेल व ते जर बेकार राहणार असतील तर त्यांना काम देण्याची जबाबदारी शासनाने आपल्यावर घेतली आहे व त्यासाठी एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमखाली जे ५० कोटी रुपये ठेवले आहेत ते अगदी अपुरे आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमसंबंधी खालील गोष्टी सांगितल्या आहेत :—

"The Employment Guarantee scheme is an outcome of the strategy to provide employment consciously to the poorer strata of the society, for bringing their income and living above the poverty line. For this purpose, it is proposed to step up the outlay for the Employment Guarantee Scheme to Rs. 50 crores in the Fifth Five-Year Plan. On the basis that an amount of Rs. 1200 crores will be made available in the last year of the Fifth Plan, it will be possible to generate employment of about 3 crore man-days annually in rural areas by the end of the Fifth Plan.

The object of the scheme is to promote rural employment by intergration of employment oriented schemes in rural areas. It is porposed to provide an outlay of Rs. 87.50 crores in the Fifth Plan under this scheme for the following purposes :—

(*i*) Canal works under Irrigation projects ;

(*ii*) Integrated area development scheme for small holders and landless agricultural labourers ;

(*iii*) Soil conservation ; and

(*iv*) Afforestation."

एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमखाली कोठे कोठे काम देण्यात येईल यासंबंधी असे सांगण्यात आले आहे की, कॅनॉल वर्क्स ऑन इरिगेशन प्रोजेक्ट, इंटिग्रेटेड एरिया डेव्हलपमेंट स्कीम, यामध्येच पागे योजनेत समाविष्ट असलेल्या कामांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. सॉइल कॉंझरवेशनची कामे व अफॉरेस्ट्रेशन अशा कामांतून लोकांना कामे देण्यात यावयाची आहेत. ८७ कोटी रुपये व एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्किमचे ५० कोटी रुपये असे एकूण १३७ कोटी रुपये व इतकेच रुपये सेंट्रल गव्हर्नमेंटकडून ॲसिस्टन्स मिळेल असे मानण्यात आले आहे. अशा प्रकारे एकूण २७४ कोटी रुपये मागासवर्गीयांच्या विकासावर खर्च करण्याचे तत्त्वत: मान्य करण्यात आलेले आहे. समजा गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने जर आपला हिस्सा दिला नाही तर हे सरकार काय करणार आहे? दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र सरकार आपल्याला मदत करीत होते व त्यांनी तो पैसा देणे बंद केल्यावर आपल्याला आपल्या योजनेत कट करावा लागला. दुष्काळी कामावरील मजुरांची संख्या कमी करावी लागली. त्यांची मजुरी कमी करावी लागली. त्याचप्रमाणे एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीमखाली ठेवलेला पैसा देखील आपल्याला कमी करावा लागेल काय? वास्तविक पाहता २७४ कोटी रुपये खर्च करण्यासाठी हे सरकार कटिबद्ध झालेले आहे. आता या संदर्भात जो प्रश्न उपस्थित होतो तो असा की आपण एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमसाठी फक्त ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आपल्याकडे शेतमजूर व इतर मजूर यांची संख्या ५४ लाख आहे. यामध्ये शेतमजूर व लहान जमीनधारक देखील आहेत. हे जरी आपण सोडून दिले तरी कमीत कमी २० लाख लोक तरी असे आहेत जे पूर्णपणे मोलमजुरीवर अवलंबून आहेत. निदान या लोकांना तरी आपल्याला एम्प्लॉयमेंट गॅरेन्टी स्कीमखाली काम द्यावे लागणार आहे. या ठिकाणी २० लक्ष लोकांना कोपअप करण्याचा प्रश्न आहे. हाच आकडा सरकारने १६ लक्षाचा धरला आहे. ह्या लोकांना आपली उपजीविका करता यावी याकरिताच त्यांना काम देण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला दर वर्षी १२० कोटी रुपयांचा खर्च येईल म्हणजे पाच वर्षांच्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ६०० कोटी रुपयांची गरज

आपल्याला पडेल. मी जरा लिबरल व्ह्यू घेतला असेल परंतु त्यांच्या प्लानमध्ये याकरिता काय प्रोव्हिजन आहे याचा विचार केला तर आपल्याला दिसून येईल की ५० कोटी आणि ८७ कोटी अशी एकूण १३७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. म्हणजे आमच्या हिशेबाप्रमाणे यांत आणखी ३७५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तरीही मी सरळ पाचशे कोटी रुपयांचा आकडा धरतो यातही १०० कोटी रुपये सोडूनच दिले. तेव्हा याकरिता निदान ३७५ कोटी रुपयांची व्यवस्था करावयास पाहिजे असे मला वाटते आणि हे पैसे गरीब लोकांना काम देण्याकरिता व त्यांना दोन वेळचे जेवण मिळावे याची व्यवस्था करण्याकरिता ह्या पैशाची गरज आहे. आपल्याला आपल्या राज्यात भूकबळी होऊ नये असे वाटत असेल आणि गरिबांना उपेक्षितांना दोन वेळ फक्त जेवण मिळाले पाहिजे अशी तरतूद आपल्याला करावयाची असेल तर आणखी ३७५ कोटी रुपयांची आवश्यकता या प्लानमध्ये आहे. आपण जर इतके करू शकला तर आपल्या राज्यातील गरिबांना आपण दोन वेळ जेवण देण्याचे पुण्य पदरात पाडू शकाल. त्यांना इतरांबरोबर आणण्याची यात कल्पना नाही. फक्त दोन वेळा जेवण देण्याकरिता या पैशाची आवश्यकता आहे.

आपण जेव्हा प्लान म्हणतो तेव्हा त्यात निरनिराळ्या खात्याचे प्लान्स असतात. त्याची अंमलबजावणी करण्याकरिता यंत्रणा असते. तेव्हा मला विचारावयाचे आहे की आपल्या प्लानमध्ये यासंबंधी काय तरतूद आहे? या लोकांना योजनेच्या काळात दोन वेळचे जेवण देण्याकरिता आपल्याला ५०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे तेव्हा याशिवाय आपल्या प्लानमध्ये या लोकांना इतर समाजाच्या बरोबर आणण्याकरिता त्यांना त्यांच्या आजच्या परिस्थितीमधून वर आणण्याकरिता आपल्याजवळ प्लानमध्ये काय तरतूद आहे? आपल्या प्लानची आपण प्रशंसा तर इतकी केली आहे की इतर राज्यांनी आपला प्लान हा मॉडेल प्लान म्हणून स्वीकारावा असे आपले मत आहे. तेव्हा इतकी प्रशंसा झालेल्या प्लानमध्ये या लोकांच्याकरिता काय आहे? आमची अपेक्षा जास्त नाही. आम्ही भरमसाठ मागत नाही. अध्यक्ष महाराज, सांगण्यात येईल की आमच्याजवळ आता निधी नाही, तो अत्यंत अपुरा आहे म्हणून याकरिता आपल्याला कोणत्याही प्रकारची व्यवस्था आता करता येत नाही. यात कोणत्या प्रकारच्या कमिटमेंट आहेत आणि मागच्या निरनिराळ्या वेळी त्याचप्रमाणे आपल्या घटनेमध्ये ज्या कमिटमेंट करण्यात आलेल्या आहेत त्या हे सरकार पाळणार आहे की नाही हे आपल्याला पाहावे लागेल. निदान या लोकांच्या खाण्याकरिता म्हणजे त्यांना मजुरी देण्याकरिता निदान ५०० कोटी रुपयांची तरी तरतूद करण्यात यावी. आपला जो प्लान आहे त्यातील १२०० कोटी रुपये सरकारने वाटून टाकले आहेत. अर्थात् हा टेंटेटिव्ह प्लान आहे व वाटपही तात्पुरते आहे परंतु यात आता फक्त ८०० कोटीच उरलेले आहेत, त्यानंतर एम्प्लॉयमेंट गॅरंटीची यांची जी योजना आहे ती फलद्रूप होऊन लोकांच्या पदरात काही पडेल असे मला तरी वाटत नाही. तेव्हा निदान संविधानात आपण जी रोजगाराची हमी दिली आहे ती पूर्ण करण्याची जबाबदारी आपण स्वीकारा आणि त्यांना पाच वर्षे काम देण्याची व्यवस्था करा. त्याकरिता मी ५०० कोटी रुपयांची तरतूद सुचविली आहे. आपण आपल्या प्लानमध्ये एम्प्लायमेंट गॅरंटी स्कीमकरिता काय ठेवले आहे ही गोष्ट मला आपल्याला विचारावयाची आहे. आपल्या राज्यात विकेंद्रीकरणामुळे काय गोंधळ निर्माण झालेला आहे ही गोष्ट बोंगिरवार समितीने आपल्या रिपोर्टमध्ये सांगितली आहे तेव्हा ह्या संस्थांकडून मागासलेल्या लोकांच्याकरिता काही काम होईल असे समजण्याचे कारण नाही. आपल्या प्लानमध्येही गरिबाची पंगत शेवटी आहे आणि त्यांना मग काय मिळेल? सर्वांचे जेवण झाल्यानंतर राहिलेले मिळेल परंतु ते काही उरणारच नाही असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

माझी आपल्याला एकच सूचना आहे की ह्या लोकांना एम्प्लॉयमेंटची गॅरंटी मिळाली पाहिजे आणि त्याचबरोबर त्यांना मिनिमम वेजेस काय द्यावयाचे हेही ठरविले पाहिजे. अध्यक्ष महाराज, आपल्याच कमिटीने यासंबंधी अहवाल सादर केला आहे. तो तरी निदान लवकरात लवकर जाहीर केला पाहिजे व त्यात ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा अंमल झाला पाहिजे अशी माझी पहिली सूचना आहे. किमान वेतन आणि कामाची हमी ह्या गोष्टी तरी निदान या लोकांना आपल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मिळाल्या पाहिजेत. शिवाय माझी आणखी एक सूचना आहे ती अशी की ह्या लोकांना जे वेज देण्यात येईल ते सर्वच पैशांत देण्यात येऊ नये तर काही काइंडमध्ये आणि काही कॉइनमध्ये देण्यात आले पाहिजे. कारण धान्याच्या महागाईचे दुष्टचक्र आपल्याला कमी करता येईल याची मला तरी खात्री वाटत नाही. आपण या बाबतीत जी पार्शल मोनोपलीची पद्धत स्वीकारली आहे ती काम देणार नाही तर आपण सर्वच व्यापार म्हणजे निदान धान्याच्या बाबतीत तरी आपल्या हाती घेतला पाहिजे. सरकारने जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार आपल्या हातीच घेतला पाहिजे नाही तर गरिबांचे फार हाल होतील.

अध्यक्ष महाराज, नियोजन कसे असावे याबद्दल मी दोन पुस्तकांचा अभ्यास केला आहे त्यात सांगण्यात आलेले आहे की जीवनावश्यक वस्तूंचे वितरण सरकारने आपल्या हाती घेतले पाहिजे आणि असे केले तरच नियोजन यशस्वी होण्याची शक्ता आहे. आपण गरिबांना काम देण्याची व्यवस्था आणि धान्य पुरविण्याची व्यवस्था जोपर्यंत करीत नाही तोपर्यंत याला नियोजन म्हणणे धारिष्ठ्याचे होईल. आपण नियोजनाच्या नावाखाली दुसऱ्याच गोष्टी करीत आहेत ही गोष्ट मला सांगावयाची आहे. वऱ्हाडमध्ये असे म्हणतात की उगीच ताकाला जावयाचे आणि भांडे लपवावयाचे, आपण या ठिकाणी सांगा की आमच्या प्रायोरीटीज आहेत त्याप्रमाणे आम्ही वाटप केले आहे. यातून गरिबांच्याकरिता फारसे करता येईल असे आम्हाला वाटत नाही आणि सरकारनेही ही गोष्ट सरळ सरळ मान्य करावी. या पुस्तकात जे सांगितले आहे ते वाचून विशाद वाटतो—

"Special emphasis has been given to the Welfare of Economically Backward Population. The State Plan has accordingly been oriented with this object in view and specific programmes with earmarked funds have been initiated for securing social justice."

सामाजिक न्याय नाही, आर्थिक न्याय नाही, अनुसूचित जाती आणि जमातींकरिता काहीच नाही. प्रश्न नुसता सामाजिक नाही तर आर्थिकही आहे ही गोष्ट मान्य करण्यात आली आहे. तेव्हा आपल्या या योजनेतून जो फायदा लोकांना मिळावयाचा आहे तो श्रीमंतांना मिळून त्यांच्यापर्यंत परकोलेट होत होत केव्हा आणि किती येईल याचा विचार केला पाहिजे. आपण पाहिले तर आपल्याला दिसून येते की सामुदायिक विहिरीही श्रीमंताच्या शेतामध्ये घेण्यात येतात आणि परकोलेशन टँक घ्यावयाचा असेल तर त्याच्याकरिता जमीन ह्या गरिबांची घेण्यात येते. ह्या प्रकारे जर आपले प्लानिंग होणार असेल तर यांच्या झोपडीत दिवा केव्हा लागणार? आपण यांना इतरांच्या ऑन पार आणावयाचे म्हणता त्याकरिता आपण काय योजना केली आहे याचा स्पष्टपणे गोषवारा देण्यास आपण तयार आहात काय? आपण खेड्यांचे विद्युतीकरण कराल. खेड्यात वीज नेण्याची आपण व्यवस्था करणार आहात परंतु ती नेताना प्रथम गरिबांच्या झोपडीत जाईल याची काळजी घेण्यात येणार आहे काय? या विकास योजनांचा फायदा आपण पाहिला तर आपणास दिसून येईल की चार टक्केही फायदा ह्या लोकांच्या पदरात पडलेला नाही. या योजनेवर नामदार मुख्यमंत्र्यांनी सूचना केल्या आहेत, आम्हीही आमच्या सूचना केलेल्या आहेत. आशा आहे की, येणाऱ्या पाच वर्षांत सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने काही भरीव केले जाईल. अशी आशा आहे मी आपले भाषण संपवितो.

❑❑❑

दीक्षाभूमी...

कलश नेतांना दादासाहेब व सदानंद फुलझेले



मा. अटलबिहारी वाजपेयी, मा. लालकृष्ण अडवाणी मा. पांडुरंग फुंडकर

माजी पंतप्रधान मा. श्री. मनमोहनसिंग

मा. पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी, मा. ना. राजनाथसिंग, मा. श्री. अडवाणी

मा. श्रीमती सोनिया गांधी

मा. ना. नितीन गडकरी, दादासाहेब व मान्यवर

माजी मुख्यमंत्री मा. शंकरराव चव्हाण व दादासाहेब

माजी मुख्यमंत्री मा. सुधाकरराव नाईक व दादासाहेब

दीक्षाभूमीवरील जनसागर...

विविध भावमुद्रा...

विजयाचा क्षण...

वरळी बी. डी. डी. चाळीमधील दंगली

(१२ फेब्रुवारी, १९७४)

विधिमंडळात तात्कालिक समस्यांवर नेहमीच अग्रक्रमाने चर्चा होते. लोकप्रतिनिधी त्यावर बोलतात. पण दादासाहेबांचे वैशिष्ट्य असे की, त्या तात्कालिक समस्यांचा ते खोलात जाऊन विचार करीत असतच पण तेथेच न थांबता त्या समस्येचे मूलभूत चिंतन ते करीत. त्यांच्या या चिंतनाचे अपरिहार्यपणे त्यांच्या भाषणात प्रतिबिंब उमटत असे. मुंबईतील बी. डी. डी. चाळींमधील झालेल्या दंगलीची दादासाहेबांनी या शैलीने उकल केली. ते म्हणाले...

अध्यक्ष महाराज, परवाच्या दिवशी वरळी येथे जी घटना घडली तिच्या संदर्भात या सभागृहासमोर स्थगन प्रस्तावाची सूचना आलेली आहे आणि त्यावर या सभागृहात चर्चा होत आहे. वरळीला दंगल घडली याची मला भीती वाटत नाही पण या दंगलीची पुनरावृत्ती होऊ नये या दृष्टीने मला भीती वाटत आहे. कोठल्या तरी विचाराच्या पोटी ही दंगल झालेली आहे आणि त्यामुळे माझे मन व्यथित झालेले आहे. मी स्पष्ट शब्दात सांगू इच्छितो की, बौद्ध विरुद्ध हिंदू असे या दंगलीचे स्वरूप नाही. या गोष्टीचा मला आनंद आहे. ज्या प्रवृत्तीतून ही दंगल घडलेली आहे ती प्रवृत्ती वाईट आहे. जी घटना घडावयाला नको होती ती घडलेली आहे. डॉ. बाबासाहेब यांनी राष्ट्रीय अस्मिता जागृत केली. बॅ. जिनाने जी चूक केली ती डॉ. आंबेडकर यांनी होऊ दिली नाही. खेड्यापाड्यामध्ये समाज जीवनामध्ये जो सोशल कॉशसनेस निर्माण झाला तो डॉ. आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे झाला ही गोष्ट कोणीही नाकारू शकणार नाही. हा प्रवाह दलित पँथर किंवा कोणीही थांबवू शकत नाही, तो थांबविण्याची कोणाचीही छाती नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय अस्मिता जिवंत ठेवली. ती चळवळ नष्ट करण्याचा डाव काही राजकीय पक्ष खेळत आहेत. संसदीय मार्गाने चाललेली ही चळवळ त्यांना नष्ट करावयाची आहे. ही चळवळ नष्ट करीत असताना तरुणांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करावयाचा आहे. ही साधी गोष्ट नाही. दलित पँथरची पोरे ही काय आमची दुष्मन आहेत? कम्युनिस्ट वगैरे पक्ष आमच्यामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. आम्ही एक कसे होऊ हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तो आमचा प्रश्न आहे. तो कसा सोडवावयाचा ते आम्ही पाहून घेऊ पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक अभिसरणाची जी प्रक्रिया या देशामध्ये सुरू केली तिला बांध घालण्याचा प्रयत्न या मंडळीकडून होत आहे. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ नष्ट करण्याचे काम कम्युनिस्ट, सी. पी. आय., युक्रांद आणि समाजवादी पक्षाचे लोक करीत आहेत हे येथे उघड होत आहे. त्यांचा दृष्टिकोन दूरवरचा आहे. ही संसदीय चळवळ नष्ट झाली पाहिजे असे त्यांचे मत असले पाहिजे. तेव्हा निवडणुकीच्या निमित्ताने त्यांनी या दंगली घडवून आणल्या आहेत. अशा प्रकारे या लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर असे सांगितले होते की, मला धर्मच नाही. परंतु, काही लोकांनी रामाचा पुतळा करून तो जाळला तर दुसरीकडे इतर काही लोक लगेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा करून तो जाळतात आणि त्यामुळेच दलितांच्या भावनांचा उद्रेक जास्त

प्रमाणात होतो. दलित पँथर्स बोलू लागले की, कम्युनिस्ट पक्षाचे लोक त्यांना सांगतात की, तुम्ही फारच चांगले बोलत आहात आणि तुमचे बोलणे असेच चालू ठेवा. आता दिनांक २६ जानेवारी, १९७४ ला रिपब्लिकन पक्षाचे जे भाग पडले होते त्यांची युती झालेली आहे. त्यामुळे आता आमची सभा झाली तर पाच पाच लाख लोक त्या सभेला उपस्थित असतात व अशा ५० ते ६० सभा आम्ही घेतलेल्या आहेत. आम्ही दलितांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सतत कसा करीत आहोत हे दलितांनाच माहीत आहे. आम्ही त्यांना आईचे प्रेम देण्याचा प्रयत्न करीत आहोत. आईचे प्रेम आणि दाईचे प्रेम यात काय फरक आहे हे त्यांना आता कळू लागले आहे. परंतु, आमच्यावर गेले अनेक जे अन्याय झाले आहेत त्याचा हा उद्रेक झालेला आहे. शासनाने या लोकांना न्याय देण्याच्या बाबतीत नाकर्तेपणा दाखविला आहे असेही मी म्हणेन. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना तयार होत असताना १० वर्षांत दलितांना इतर समाजाबरोबर आणण्याची जबाबदारी सरकारवर पडेल अशी तरतूद घटनेत करवून घेतली. परंतु, त्यानंतर पुन्हा पुन्हा सरकारला तीन वेळा ही मुदत वाढवून घ्यावी लागली आहे आणि अजूनही सरकारने ही जबाबदारी पार पाडलेली नाही हा सरकारचा नाकर्तेपणा आहे असे मला म्हणावयाचे आहे. त्याची प्रतिक्रिया आता होऊ लागली आहे आणि त्याचे परिणाम लोकांना भोगावे लागत आहेत. रिपब्लिकन पक्षातील भागांचे आता ऐक्य झाल्यामुळे आता आमची ताकद वाढलेली आहे. परंतु, कम्युनिस्ट पक्षाने निवडणुकीच्या निमित्ताने दलित पँथर्सकडून या दंगली घडवून आणल्या आणि अशा दंगली चालूच राहाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. त्यामुळे सगळीकडे गोंधळ माजेल. त्यात दलित पँथर्सही नष्ट होतील आणि या गोंधळाचा आपल्याला फायदा मिळेल या हेतूने त्यांनी हे सर्व केलेले आहे. परंतु, त्यांच्या या प्रयत्नांना आपण बळी पडता कामा नये एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

रोजगार हमी योजनेचा सूत्रपात

(२७ फेब्रुवारी, १९७४)

महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचे जनक म्हणून विधानपरिषदेचे दिवंगत सभापती वि. स. पागे व दादासाहेब गवई यांची नावे एकाच श्वासात घेतली जातात. पण या योजनेचा सूत्रपात रिपब्लिकन पक्षाच्या विधिमंडळावर आलेल्या मोर्चाच्या निमित्ताने दादासाहेबांनी केलेल्या भाषणातून झाला. हे फार थोड्या लोकांना माहीत असेल. या मोर्चाच्या संदर्भात शांताबाई दाणी यांनी आणलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देताना ते म्हणाले...

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या श्रीमती शांताबाई दाणी यांनी ही चर्चा उपस्थित करताना अनुसूचित जाती जमातीच्या सर्वांगीण विकासाच्या संदर्भात ज्या मागण्या केल्या त्याचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे. या मागण्या अर्थातच नवीन नाहीत. जेव्हां जेव्हां मी या मागण्यांबद्दल बोललो आहे तेव्हा तेव्हां तात्त्विक आधार म्हणून मी हे सांगितले आहे की, संविधानातील आर्टिकल १६ (२), १६ (४), ३३५, ३४० यामध्ये समाजातील

दुर्बल घटकांना उन्नत घटकांबरोबर आणण्यासाठी काय केले पाहिजे यासंबंधी खास तरतूद करण्यात आली आहे. सरकारवर संविधानाने ही जबाबदारी टाकलेली आहे. २६ जानेवारी, १९५० पासून २६ जानेवारी, १९६० पर्यंतच्या दहा वर्षाच्या कालखंडात या दुर्बल घटकांना सबल घटकांबरोबर आणले गेले पाहिजे असे संविधानात नमूद असूनही १९५९ साली संविधानात पहिली दुरुस्ती आणताना तेव्हाचे गृहमंत्री स्व. पंडित गोविंदवल्लभ पंत यांनी सखेद सांगितले की, ही जबाबदारी आम्ही पार पाडू शकलो नाही व म्हणून ही मुदत १९७० पर्यंत वाढविली जात आहे. या कालखंडातही काही विशेष होऊ शकले नाही व म्हणून पुन्हा १९६९ साली माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी खेद प्रकट करून अनुसूचित जाती जमातींना इतर सबल घटकांबरोबरीने आणण्याची मुदत १९८० पर्यंत वाढविण्यासाठी संविधानात दुरुस्ती आणली. संविधानाने सरकारवर टाकलेली ही जबाबदारी सरकारने न पार पाडल्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेल्या २५ वर्षांतही हा दुर्बल समाज फारसा सबल होऊ शकला नाही, ही गोष्ट लक्षात येईल. या मागण्यांमागे असणारी तात्त्विक भूमिका अशा प्रकारे विशद केल्यानंतर मी त्यांच्या प्रत्यक्ष मागण्यांकडे वळतो.

अध्यक्ष महाराज, अस्पृश्यता निर्मूलनार्थ उपाययोजना सुचविण्यासंबंधी जी समिती सरकारने नेमली आहे तिचे आपण अध्यक्ष आहात आणि समाज कल्याण समितीचेही अध्यक्ष आहात. मीही त्या समितीचा सदस्य आहे. या कमिटीने आपला जो अंतरिम अहवाल सरकारला सादर केला त्यासंबंधी सरकार काय करणार आहे असे मला विचारावयाचे आहे. या समाजाच्या मागण्यांचा पाठपुरावा गेल्या दहा वर्षांपासून मी करीत आलो आहे व त्यासाठी नामदार मुख्यमंत्री, तसेच समाज कल्याण मंत्री यांच्याबरोबर केलेल्या पत्रव्यवहाराची पूर्ण फाईल माझ्याजवळ मी आणली आहे. या मागण्यांपैकी शेतमजुरांसंबंधीच्या मागणीबद्दल बोलावयाचे झाल्यास सांगता येईल की, शेतमजूर हा या राज्यातील एक अत्यंत दुर्लक्षित व दुर्बल घटक आहे व त्याच्या स्थितीशी जात-पात-धर्माचा काहीही संबंध नाही. या समाजाला रोजगार पुरविण्यासाठी पंचवार्षिक योजनेत २३० कोटी रुपये मागितले होते परंतु आताच्या योजनेप्रमाणे दरवर्षी १० कोटी रुपये अशा प्रकारे पाच वर्षांत फक्त ५० कोटी रुपये या वर्गाला रोजगार देण्यासाठी ठेवण्यात आलेले आहेत. केंद्र सरकारने मॅचिंग ग्रॅन्ट दिली तर ही रक्कम १०० कोटी रुपये होईल. म्हणजे अगोदर मात्र २३० कोटी रुपयांची तरतूद करुन आता मात्र या दुर्बल लोकांच्या उन्नतीसाठी, सवलतींसाठी वर्षाला १० कोटी रुपये आपण देणार आहात. खरोखर प्लॅनिंग करावयाचे असेल तर प्लॅनिंगचा केंद्रबिंदू गरीब माणूस असला पाहिजे. त्याला आपण काम देणार नाही, रोजगार देणार नाही तर मग आपले प्लॅनिंग कोणते? शून्यवत प्लॅनिंग आहे. तेव्हा माझे कटाक्षाने असे म्हणणे आहे की, दुर्बल घटकांमध्ये काम करणारे जे असतील-त्यात अनुसूचित जाती, जमाती, बौद्ध हे सर्व घटक आले-त्यांच्या मागणीचा प्रथम विचार होणे आवश्यक आहे. प्लॅनिंगच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये सारखा पैसा गुंतवून त्या गरीब लोकांना काम नाही असे म्हणण्याचा युक्तिवाद चुकीचा आहे. मी श्री. दांडेकर यांच्याशी चर्चा केली आहे. आपली थिअरी ही परकोलेशनची आहे. असे म्हणतात की, बुटाचे कारखाने निघाले की बूट पॉलिश करणारे निघतात व त्यांना आपोआप काम मिळते. कालवे निघाले की, काम करणारे येतात. कुठे तरी एखाद्या समर्थ समाजाकरिता प्लॅनिंग करावयाचे आणि त्यातून झिरपून गरिबांना काम मिळेल, त्यातून एम्प्लॉयमेंट गाठावयाची ही जी प्लॅनिंगची कल्पना आहे ती अत्यंत चुकीची आहे आणि गरीब लोकांवर निर्घृण अन्याय करणारी, त्यांचा अपमान करणारी आहे. म्हणून माझे पहिले म्हणणे असे आहे की, मजुरांकरिता रोजगार हमी असली पाहिजे. मला तर या योजनेचे नाव बदलावयाचे आहे. मागेल त्याला काम असे नाही. हे नाव चुकीचे आहे. संविधानातील तरतुदींत डायरेक्टिव्ह प्रिंसिपल आहे की "राईट टू वर्क"

प्रत्येक माणसाला कामाचा हक्क आहे. त्यासाठी भीक कोण मागणार? भीकेने काम मागावयाचे? आपल्या योजनेप्रमाणे मागेल त्याला काम, त्याने मागितले नाही तर त्याला काम नाही. त्याला हक्काचे काम दिले पाहिजे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आपल्या योजनेचे नाव आपण बदलावे. अध्यक्ष महाराज, आपण या योजनेला बरोबर नाव दिले होते परंतु शासनाने क्लृप्ती करून नाव बदलले आणि "मागेल त्याला काम" असे नाव ठेवले. हा नारा पुढे चालू ठेवला. मी असे विचारतो की, मागण्याची गरज काय? त्याला कामाचा हक्क आहे. "राईट टू वर्क". त्याला आपण काम दिले पाहिजे. कामाच्या हक्काची योजना असली पाहिजे, रोजगार हमी योजना असे या योजनेचे नाव असले पाहिजे, "मागेल त्याला काम" अशी योजना नसली पाहिजे.

शासनाला या योजनेचे नाव बदलावे लागेल. शासनाची सध्याची घोषणा "मागेल त्याला काम" अशीच आहे. पण हक्काचे काम मिळाले पाहिजे, भीक मागून काम नको, त्याला हक्काचे आपण काम दिले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, किमान वेतन समितीमध्ये आपल्या नेतृत्वाखाली मी काम केले आहे. त्या समितीचा अहवाल सभागृहासमोर सादर झाला आहे. त्या अहवालात केलेल्या कामासाठी पैसा ठेवला आहे पण मुख्य सूत्र त्यात आपण सांगितले आहे ते हे की, वेजेस ही कॅश अँड काईन्डमध्ये दिली पाहिजेत. हे सूत्र केवळ मजुरांकरिताच अनुसरले पाहिजे असे नाही. परवाच्या दिवशी विचारवंत आचार्य विनोबा भावे यांनी असा विचार व्यक्त केला आहे की, आम्हाला लिव्हींग इन्डेक्स ताब्यात आणावयाचा असेल, महागाई कमी करावयाची असेल तर, अन्य बाबींबरोबरच, सर्व क्षेत्रात वेजेस ही कॅश अॅड काइन्डमध्ये दिली पाहिजेत. या समितीने अशी शिफारस केली आहे की, तीन किलो ज्वारी, साडेतीन किलो ज्वारी, ४ किलो ज्वारी शेतमजुरांना रोज द्यावी. यातील एक किलो सक्तीची आणि बाकीच्या ज्वारीचे पैशात रूपांतर. सभापती महोदय, आपण त्या समितीचे अध्यक्ष होता. ही निःपक्षपाती समिती होती, आपल्याला सहकार्य करणारी समिती होती. या वेतनापासून शासन ढळले तर शासनाची नियत गरिबांना मदत करण्याची नाही हे स्पष्ट होईल. मी या अहवालात मागितलेल्या पलीकडे वेतन मागत नाही. मी त्या समितीचा सदस्य आहे आणि म्हणूनच या समितीच्या अहवालावर झालेल्या चर्चेत भाग घेण्याचे मी कटाक्षाने टाळले. परंतु समितीने शिफारस केली आहे. त्यापेक्षा कन्व्हर्टेड वेजेसमध्ये एक पैसाही कमी गरीब लोक सहन करणार नाहीत. ते लोक समजतील की, शासनाचे लक्ष गरिबांकडे नाही आणि पहिला जोर मी या मागणीवर दिला आहे.

अध्यक्ष महाराज, आपल्या अध्यक्षतेखालील दुसऱ्या एका समितीने चार महिन्यांपूर्वी शिफारस केली आहे की, ऑन पार व्हिलेज आणावयाचे. दिवाबत्ती, स्वास्थ आणि विहिरीचे पाणी या किमान गरजांच्या बाबतीत. या बाबतीत अंतरिम अहवाल दिल्यानंतर यासाठी आपण सहा महिन्यांची मुदत दिली. मुख्यमंत्र्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांसंबंधी चर्चा करून आपल्याला विनंती केली की, या प्रश्नांसाठी करोड रुपये पाहिजे असतील तरी मला सांगा, तुम्ही स्वतः हे काम अंगावर घेऊन सूचना करा. आपण महत्त्वाच्या सूचना केल्या. ऑन पार व्हिलेज आणावयाचे म्हणजे ज्या सोई खेड्यामध्ये उपलब्ध असतील त्या सोई गावात झाल्या पाहिजेत. माझे मत असे आहे की, समितीच्या या शिफारशीला आपण स्टिक अप राहिले पाहिजे. या समितीचा अहवाल शासनाकडे तीन महिन्यांपूर्वी गेला आहे. सहा महिन्यांपैकी तीन महिने संपले आहेत. आता माननीय मुख्यमंत्री आणि समाजकल्याण मंत्री यांच्याकडून मला उत्तर पाहिजे की, व्हिलेज हे ज्या चार गोष्टींसाठी ऑन पार आणावयाचे आहे व ज्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिली आहे त्या संबंधातील आजची अवस्था काय आहे? आपण त्या बाबतीत काय प्रगती केली? आणि केली नसेल तर त्यासाठी आपण टाइम बाऊन्ड कार्यक्रम आखला पाहिजे. निदान एवढे तरी सांगा की, अजून सहा महिने मुदतवाढ

मिळण्यासाठी आम्ही समितीची परवानगी मागू. या बाबतीत आपला टाइम बाऊन्ड कार्यक्रम नसेल तर नुसते हवेत बोलण्याने काम होणार नाही, आम्ही कटिबद्ध आहोत, प्रयत्नशील आहोत, फार प्रयत्न केले, ही बोलण्याची भाषा नव्हे. टाइम बाऊन्ड प्रोग्राम आखून या गोष्टी करण्याची शासनाची तयारी आहे काय असा प्रश्न मी शासनाला विचारू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, पाचव्या पंचवार्षिक योजनेत या मागासलेल्या वर्गासाठी तरतुदी इयर मार्क कराव्यात म्हणून मी एक लहानसे पुस्तक लिहिले आहे. हे पुस्तक सर्व सभासदांना वाटले आहे आणि त्या पुस्तकातील तत्त्व आपल्या संमतीने स्वीकारले आहे. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या पुस्तकासंबंधी अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांकडून आणि केंद्र सरकारच्या अनेक मंत्र्यांकडून अभिप्राय आले आहेत. त्यांनी देखील हे इयर मार्कचे तत्त्व स्वीकारले आहे. आता माझा प्रश्न असा आहे की, मुळातच या नियोजनाचा ढाचा अत्यंत तर्कशुद्ध नाही, चुकीचा आहे. इन्फास्ट्रक्चरमध्ये सारा पैसा गुंतविलेला आहे. पैसा उरला आहे कुठे? पैसा इयर मार्क करण्याचे तत्त्व पाळू म्हटले तर डोंगर पोखरून उंदीर काढण्याची पाळी आली आहे. १२-१२ कोटींची तरतूद या मागासलेल्या वर्गासाठी होती ती इयर मार्क करीत आता कुठे आपण ५०-६० कोटींपर्यंत गेलो आहोत. माझे म्हणणे आहे की, प्लॅनिंग बदलविले पाहिजे. इयर मार्क करण्याचे तत्त्व स्वीकारले पाहिजे. आज आपल्याला त्याप्रमाणे खर्च करता आला नाही तर पुढच्या प्लॅनिंगमध्ये करा पण आज १३ कोटींच्या ऐवजी ५०-६० कोटींची रक्कम किमान म्हणून इअर मार्क केली आहे त्या बाबतीत टाइम बाऊन्ड प्रोग्राम करणार की नाही याचे उत्तर आम्हाला पाहिजे आहे. आम्ही हे करणार आहोत असेच उत्तर आम्हाला पाहिजे. दुसरे उत्तर नको. तुम्ही इयर मार्कचे तत्त्व सांगितले आहे, ते आम्ही करणार आहोत आणि अमुक इतक्या वेळात करणार आहोत असे आपण आम्हाला सांगा. कालमर्यादा घाला.

अध्यक्ष महाराज, बेकारांना काम देण्यासंबंधीचा मुद्दा सभागृहात आपण परवा नसताना उपस्थित झाला होता. पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी खुर्चीवरून नियोजन मंत्र्यांना अडविले. पुरवणी मागण्यांवरील पान ३०१ वर केंद्र सरकारच्या सुशिक्षित बेकारांना काम देण्याच्या अत्यंत तातडीच्या कार्यक्रमाचा उल्लेख आहे. या मागण्यांत आठ कोटींची तरतूद आहे. त्यापैकी आपण आतापर्यंत किती कामी लावले, या खोलात मी शिरत नाही. आठ कोटी रुपये या शासनाने खर्च केले नाहीत तर त्यातून सरकारची कार्यक्षमता दिसून येईल. सरकारची हे करण्याची कुवत नही, दैवदुर्विलास कसा आहे याची लोकांना खात्री पटल्याशिवाय राहणार नाही. तो प्रश्न वेगळा आहे. त्यांचे ते पाहून घेतील. आठ कोटी रुपयांच्या तरतुदीत ५० हजार सुशिक्षित-अशिक्षित बेकारांना काम द्यावयाचे असेल तर राज्याच्या धोरणाप्रमाणे १३ टक्के शेड्युल कास्ट, ७ टक्के ट्राईब, ४ टक्के एन. टी. ॲन्ड व्ही. जे. आणि १० टक्के ओ.बी.सी. या प्रमाणात ५० हजार लोकांना आपण काम देणार आहात काय याचे उत्तर मला हवे आहे. आपल्या धोरणाप्रमाणे या ५० हजारांचा ब्रेकअप करून लोकांना आपण काम देणार आहात काय?

त्यानंतर झोपड्यांचा, गलिच्छ वस्ती निर्मूलनाचा प्रश्न असा आहे की झोपडपट्ट्यांचा खर्च, गलिच्छवस्ती निर्मूलनाचा खर्च, घरबांधणीचा खर्च याला शासन उत्पादक खर्च समजत नाही, येथेच शासन चूक करते. मुळातच ही चूक आहे. इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये धरणे, कालवे या उत्पादक बाबी मानल्या आहेत. घराच्या कार्यक्रमाला उत्पादक समजत नाही. अनेक देशात घरबांधणीच्या खर्चाला उत्पादक खर्च म्हटले आहे. तेव्हा तत्त्वाचा फरक आहे. विचारात फरक आहे. घराला उत्पादक खर्च समजले पाहिजे. ज्या ठिकाणी माणसाचा रोजचा व्यवहार होतो, जेथे तो जेवतो, झोपतो, काम करतो त्यासंबंधीच्या खर्चाला शासन उत्पादक समजत नाही. या

सरकारची पीडब्ल्यूआर २१९ ची अत्यंत भोंगळ योजना आहे, तिचे तीनतेरा वाजले आहेत. त्या योजनेसाठी फायनान्स मिळतो, हौसिंग फायनान्स कार्पोरेशनकडून व्याजाची जबाबदारी सरकारची, पैसा इन्शुरन्स कार्पोरेशनचा, अंमलबजावणी गृहनिर्माण मंडळाकडे, कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही आणि मग त्या योजनेचे तीनतेरा वाजले आहेत. गलिच्छवस्त्या, झोपडपट्ट्या यांच्या निर्मूलनाच्या बाबतीत, घरबांधणीच्या बाबतीत किती लक्ष्य ठरविले आहे, या लोकांना यातून आपण किती घरे बांधून देणार आहात, त्यासाठी किती पैशाची तरतूद या वर्षासाठी केली आहे? किती घरे बांधणार त्यांचा आकडा सांगा. नुसते आम्ही गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करतो, घरबांधणी करतो, घरे देऊ असे न सांगता निश्चित आकडा सांगा, एवढी तरतूद केली, एवढी घरे देऊ असे सांगा.

अध्यक्ष महाराज, शेवटचा मुद्दा मला शिक्षण आणि नोकऱ्या यासंबंधी सांगावयाचा आहे. मुख्यमंत्री या ठिकाणी आले असते तर बरे झाले असते. नामदार समाजकल्याण मंत्री त्यांना कळवतील असे मी समजतो. मुख्यमंत्री आणि समाजकल्याण मंत्री यांना दिनांक १६ मे १९७२ रोजी मी क्रमांक डीसी ११७३४९ अन्वये पत्र लिहिले. म्हणजे दोन वर्षे झाली. शेवटी मला मुलांना भडकून सांगावे लागले. माझा हा प्रश्न म्हणजे कॉलेजमधील प्रवेशाच्या रिझर्व्हेशन-संबंधीचा. मी, अध्यक्ष महाराज, आपल्यालाही हा प्रश्न समजावून सांगितलेला आहे. १०० जागांपैकी १३ जागा मागासलेल्या वर्गाच्या मुलांना मिळाल्या पाहिजेत. अस्पृश्यांची जेवढी मुले असतात त्यांना आपण वेगळे काढता. त्यातील १३ घेता. १३ व्या नंबराला ६० टक्के मार्क्स असतील आणि १४ व्या नंबराला ५८ टक्के मार्क्स असतील तरी १४ व्या नंबराला आपण प्रवेश देत नाही आणि जनरल कॅन्डिडेट हा ५० टक्क्याला ॲडमिट होतो. म्हणजे इन मेरिट असताना तो प्रवेशाशिवाय राहतो. ही ॲनॉमली ४-५ वर्षांपासून चालू आहे.घाम न येणारे हे सरकार आहे, मेरिट असणाऱ्या अस्पृश्य मुलांना प्रवेश मिळत नाही. याबाबतीत मराठीतून, इंग्रजीतून १९७२ साली मी आताच सांगितल्याप्रमाणे पत्रे लिहिली आहेत आणि लिगल डिपार्टमेंटकडून याचे चार वर्षांपासून एक्झॅमिनेशन चालू आहे. मेरिटमध्ये येणारी आदिवासी, बौद्ध मुले ७० टक्के गुण असूनही कॉलेजमध्ये ॲडमिट होत नाहीत, जनरल लिस्टवरील ५२ टक्के गुण असलेली मुले ॲडमिट होतात. केवळ मागासलेल्या वर्गाच्या मुलांना जागा राखीव ठेवल्याने हे होत आहे. ६०-५८-५७ अशा क्रमाने गुण असणारी मागासलेल्या वर्गाची १०० मुले जरी कॉलेजमध्ये ॲडमिट होऊ शकत असतील तर त्यात तुमचा काय तोटा आहे? परंतु, आपण यात मेरिट डिस्टर्ब करता. मेरिटमध्ये बसला नाही तर रिझर्व्हेशनचा प्रश्न निर्माण झाला पाहिजे. रिझर्व्हेशन इन प्रमोशन याचा अर्थ लावण्यासाठी राज्य सरकारच्या लिगल डिपार्टमेंटला ६ वर्षांपासून झोप लागली आहे. त्यांना झोप लागत नाही, त्यांनी झोपेच सोंग घेतले आहे. अशा परिस्थितीत "घेराव" घाला असे मला या मुलांना सांगावे लागेल. अध्यक्ष महाराज, याबाबत गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा एक जी. आर. आहे. त्याची मी कॉपी आणलेली आहे. या जी. आर. प्रमाणे ५० टक्के रिझर्व्हेशन प्रमोशनमध्ये आहे. सुप्रीम कोर्टाने देखील याबाबत निर्णय दिला आहे. पण गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या जी. आर. ची किंवा सुप्रीम कोर्टाच्या निकालाची या शासनाकडून दखलच घेतली जात नाही. याबाबत महाराष्ट्र सरकार काहीही करीत नाही. सुप्रीम कोर्टाने जो निकाल दिला तो सिव्हिल केस नंबर ३४१-१९६० ही आहे. सुप्रीम कोर्टाने असा निकाल दिला आहे की, ५० परसेंट रिझर्व्हेशन इन प्रोमोशन आणि रिझर्व्हेशन इन्क्ल्यूड्स मेरिट. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा जी. आर. कोट करून, सुप्रीम कोर्टाचा निकाल कोट करून समाजकल्याण खाते आणि मुख्यमंत्री यांना पत्र पाठविले. या गोष्टीचा विचारच करावयाचा नसेल तर मग त्याचा अर्थ आम्ही काय करावा? या राज्य शासनाशी मी हा पत्रव्यवहार १९७२ पासून सुरू केला. आता १९७४ साल

आहे. या दोन वर्षांच्या काळामध्ये या जी. आर. चे इंटरप्रिटेशन या शासनाच्या लिगल डिपार्टमेंटकडून बरोबर होत नाही.

अध्यक्ष महाराज, मी एक पत्र १ सप्टेंबर, १९७३ ला लिहिले आणि त्याची पावती मला १ ऑक्टोबर, १९७३ ला मिळाली. शेड्यूल्ड कास्ट आणि बौद्ध यांच्या सुपरसेशन केसेससंबंधी हाय पॉवर कमिटीने २६ ऑक्टोबर, १९७२ ला डिसिजन दिले आहे. बॅड सी. आर. मुळे ज्यांना प्रिमेच्युअर रिटायर केले असेल त्यांच्यासंबंधी मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. हे मी अगोदरच सांगितले आहे. ज्यांना प्रिमेच्युअर रिटायर केले त्यांच्या बाबतीत ऑर्डर्स स्टे करा अशी विनंती करण्यात आली होती. पण तसे काहीही करण्यात आले नाही. बॅड सी. आर. मुळे प्रिमेच्युअर रिटायरमेंट करण्यात आले असेल तर त्याबाबत सुप्रीम कोर्टाचे जजमेंट आहे की, यासंबंधी होम मिनिस्टरला नोटीस द्यावी, तसे केले नाही तर ते सुपरसेशन होत नाही. अध्यक्ष महाराज, मुलांच्या प्रवेशाचा प्रश्न सुटला नाही. तुम्ही मुलांच्या जीवनाशी खेळ खेळत आहात. या प्रमोशनच्या बाबतीत एक कॉम्प्रेहेन्सिव्ह जी. आर. करावयाला पाहिजे. शासनाला तसा जी. आर. करता येत नसेल तर मी करावयाला तयार आहे. नाही मी तो स्वतः तयार केला आहे आणि त्याच्या कॉपीज मी मुख्यमंत्र्यांना, समाजकल्याण मंत्र्यांना आणि डायरेक्टर यांना पाठविल्या आहेत. हा जी. आर. स्टॅन्डर्ड वाटत नसेल तर तुम्ही एक कॉम्प्रेहेन्सिव्ह जी. आर. करावा. यासंबंधी राज्यमंत्री श्री. रुपवते यांनी एक मुलाखत दिली आणि सांगितले की, ४० टक्के रिझर्व्हेशन केले आहे. महाराष्ट्र शासनाने याबाबत १५ जानेवारी, १९७४ ला एक जी. आर. काढला. त्यामध्ये असे म्हटले आहे की—

"Government has carefully considered the recommendation of the Backward Class Employment Committee, and is pleased to direct that in order to make up the consistent shortfall in filling up reserved vacancies, henceforth recruitment to 66 per cent general posts, which is on merit, should includes Backward Class candidates, selected on merit, and that in addition, 34 per cent vacancies as specified in paragraph 1 should be reserved for Backward Class candidates..."

३४ टक्के रिझर्व्हेशनसंबंधी हा जी. आर. आहे. पण याचा ब्रेकअप अद्याप दिलेला नाही.

त्यानंतर, अध्यक्ष महाराज, शिक्षणाच्या बाबतीत काही मागण्या करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ, या वर्गाच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी एक मागणी आहे. या वर्गातील लोकांच्या कल्याणाकरिता कोणत्या योजना हाती घेता येतील याबद्दल शिफारशी करण्याकरिता, अध्यक्ष महाराज, आपल्याच अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे व तिला पागे समिती असेच म्हणतात. तेव्हा मला सरकारला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, निदान या पागे समितीच्या शिफारशी तरी आपण संपूर्णपणे स्वीकारणार आहात काय? मागे श्री. यशवंतराव चव्हाण हे या राज्याचे मुख्यमंत्री असताना याच कामाकरिता देशमुख समिती नेमली होती आणि तेव्हापासून हा घोळ चालू आहे. तेव्हा मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या बाबतीत ज्या शिफारशी करण्यात येतील त्या एन्फोर्स करण्याकरिता आपण कोणती यंत्रणा नेमणार आहात? उदाहरणार्थ, काही ठराविक टक्के जागा या लोकांकरिता राखून ठेवाव्यात व या वर्गातील उमेदवारांना नोकऱ्या देऊन त्या भराव्यात असे आपण ठरविले आहे. परंतु एखाद्या अधिकाऱ्याने त्या जागा या वर्गातील लोकांना नेमून भरल्या नाहीत तर त्याला आपण काय शिक्षा करणार आहात व अधिकाऱ्याकडून या जागा

एचबी ११८०—२१

या प्रमाणात भरल्या जात आहेत की नाहीत हे पाहून त्यांच्याकडून कुचराई होत असल्यास त्यांना शिक्षा करण्यासाठी आपण काय यंत्रणा उभी केली आहे? दोन वर्षांपूर्वीच या संबंधीची शिफारस केली होती. परंतु, अशी यंत्रणा अजून उभी करण्यात आलेली नाही. आपण नुसते आदेश काढून उपयोगी नाही तर ते फॉलो होत आहेत की नाहीत हे पाहिले पाहिजे. संविधानात्मक तरतुदींचीसुद्धा अंमलबजावणी झाली नाही तर तुम्ही काय करणार आहात? डॉ. आंबेडकर नेहमी म्हणत असत की, आमच्यासाठी नेहमीकरिता राखीव जागा ठेवण्याची तरतूद आम्हाला नको, आम्हाला नेहमीच सवलती दिल्या तर त्यामुळे समाजातील इतर लोकामध्ये असंतोष निर्माण होईल. त्यांचा संसदीय लोकशाहीवर भरपूर विश्वास होता. त्यांनी राज्यसभेत या बाबतीत एकदा जे सांगितले होते ते मी येथे वाचून दाखवितो त्यांनी असे म्हटले होते की :—

"we must begin by acknowledging the fact that there is complete absence of two things in Indian Society. One of these is equality. On the social plane, we have in India a society based on the principle of graded inequality which means elevation for same and degradation for others. On the economic plane, we have a society in which there are some who have immense wealth as against many who live in abject poverty. On the 26th of January 1950, we are going to enter into a life of contradictions. In politics we will have equality and in social and economic life we will have inequality. In politices we will be recognizing the principle of one man one vote and one vote one value. In our social and economic life, we shall, by reason of our social and economic structure, continue to deny the principle of one man one value. How long shall we continue to live this life of contradictions ? How long shall we continue to deny equality in our social and economic life ? If we continue to deny it for long, we will do so only by putting our political democracy in peril. We must remove this contradiction at the earliest possible moment or else those who suffer from inequality will blow up the structure of political democracy which this Assembly has so labouriously built up."

तेव्हा संसदीय लोकशाहीवर त्यांचा संपूर्ण विश्वास असतानासुद्धा त्यांनी याबाबतीत जो धोक्याचा इशारा दिला आहे तो या सरकारने लक्षात घ्यावा अशी या सरकारला विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

शेतकरी समस्यांचे अभ्यासपूर्ण आकलन

(८ ऑगस्ट, १९७४)

शेतकऱ्यांना खते, बी बियाणे, जंतुनाशके वेळेवर व रास्त दराने मिळावीत यासाठी वेळोवेळी विधानपरिषदेच्या दारांवर थाप मारली जाते. स्वतः ग्रामीण भागातूनच आल्याने दादासाहेबांना शेतकऱ्यांच्या समस्यांचीही उत्तम जाण होती. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य आप्पासाहेब जाधव यांनी ८ ऑगस्ट, १९७४ रोजी मांडलेल्या प्रस्तावावर भाषण करताना तिचा प्रत्यय आला. शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी त्यांचा किती सखोल अभ्यास आहे हे त्यांनी त्या दिवशी केलेल्या भाषणावरून स्पष्ट झाले.

अध्यक्ष महाराज, श्री. आप्पासाहेब जाधव यांनी या राज्यातील शेतीसंबंधाने एक महत्त्वपूर्ण प्रस्ताव आणला आहे व तो योग्य वेळी आणि योग्य वातावरणात मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. अध्यक्ष महाराज, शेतीच्या प्रश्नाकडे मूलभूत दृष्टीने पाहण्याची प्रक्रिया आपल्या राज्यात सुरू झालेली आहे व त्या अनुषंगाने सन्माननीय सभासदांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. आपल्याला जुन्या प्रकारची जी शेती अभिप्रेत आहे ती आज आपण पाहिली तर जवळजवळ पार बदलून गेली आहे. आपण पूर्वी ढोबळ मानाने शेतीच्या प्रकारांचे दोन विभाग करीत होतो. एक म्हणजे इन्टेन्सिव्ह शेती म्हणजे सखोल शेती आणि दुसरा प्रकार म्हणजे अक्सटेंसिव्ह शेती म्हणजे विस्ताराची शेती. ज्या शेतीला पाणी देऊन एकापेक्षा जास्त पिके काढण्याची सोय करीत असू तिला आपण इन्टेन्सिव्ह शेती, सखोल शेती असे म्हणत असू व पाण्याच्या पुरवठ्याशिवाय जी पिके काढण्यात येत असत तिला आपण विस्ताराची शेती असे म्हणत असू. इन्टेन्सिव्ह शेतीमध्ये पाण्याच्या पुरवठ्याचा घटक हा मुख्य आहे. विस्ताराची शेती ही कोरडवाहू शेती होत असे. आता आपण सर्व शेतीचे कन्व्हर्जन इन्टेन्सिव्ह शेतीमध्ये करण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि हे केल्याशिवाय आपल्या राज्याची संपूर्ण अन्नधान्याची गरज भागणार नाही. आपल्याला आजच्या अन्नधान्याचा प्रश्न किंवा आपले राज्य अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण करण्याचा प्रश्न या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय सोडविता येणार नाही. परवा आपल्या देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी महाराष्ट्र राज्याच्या शेती उत्पन्नाच्या प्रयत्नांबद्दल किंवा प्रगतीबद्दल असमाधान व्यक्त केलेले आहे. आपण या राज्याच्या शेतीचा सन १९६० ते १९७३ या सालांचा विचार केला तर त्यातील १९६४ साल वगळले तर राज्याच्या शेती उत्पादनात एक तर घट झालेली आहे किंवा ते जेमतेम तेवढेच राहिले आहे असे दिसून येईल. या संबंधीचे निरनिराळ्या सभासदांचे अभिप्राय या सदनात दिले होतेच. त्याचप्रमाणे या सदनाच्या अंदाज समितीनेही आपल्या अहवालात यासंबंधी गंभीर विचार व्यक्त केलेले आहेत ते असे :—

"The Committee has earlier stated that the agricultural production in the State instead of going down has already gone down considerably

एचबी ११८०—२१अ

during the last ten-twelve years. This will be clear from the statements printed as Annexures A and B. The Committee is alarmed at this state of affairs, particularly in view of the fact that large sums have been spent on the various schemes started by the Agriculture Department for increasing food production. Ever since 1960-61 when the agricultural production in the State was 77.4 lakh tonnes the department has spent nearly 700 crores on various schemes meant for agricultural development. These expenditure figures to Committee's mind are simply staggering in relation to the achievements. A perusal of the statement referred to above will show that except for the year 1964-65 the agricultural production in the State has either remained static or it has fallen down, particularly during the last years"....

(E. C. 1973-74 11th Report, Agricultural and Co-operation Department, page 9).

या प्रकारे आपल्या राज्याच्या शेतीच्या उत्पन्नाच्या वाढीसंबंधी घोर चिंता व्यक्त केली होती. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की श्री. आ. रा. जाधव यांनी या ठिकाणी जी चर्चा उपस्थित केली आहे ती केवळ बी-बियाणे किंवा फवारण्याकरिता शेतकऱ्यांना औषधे मिळविण्याकरिताच नाही. इतका मर्यादित हेतू तिचा नाही तर आपल्या राज्यातील शेतीचे उत्पन्न ढासळत आहे त्याचा विचार करण्याची त्यांची इच्छा होती. अर्थात खते हा उत्पादन वाढीतील महत्त्वाचा घटक आहे म्हणून खताच्या पुरवठ्याच्या दृष्टीने मी या ठिकाणी काही आकडे सांगणार आहे. मी या ठिकाणी जे आकडे सांगणार आहे त्यातील इरिगेशन खालची जमीन सोडून देणार आहे. आपल्या राज्याला १९७३ साली किती गरज होती व निरनिराळ्या एजन्सीजकडून त्यांचा किती पुरवठा झाले याचे आकडे मी सभागृहाला देणार आहे.

खर्चाचे नाव	एकंदर गरज	शासनाकडून पुरवठा	ट्रॉंबे फॅक्टरीकडून पुरवठा	महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाचा पुरवठा
	मे. टन	मे. टन	मे. टन	मे. टन
नत्र	१,००,८२५	३१,२३९	७,०६७	२,९४८
फॉस्फरस	४०,५९३	३,३९४	३,७२६	२,९४८
पोटॅश	३०,९७७	२,६९०	३,७२६	२,९४८
	१,७२,३९५	३७,३९३	१४,५१९	८,८४४

याचा अर्थ असा की आपल्या राज्याला या खतांची एकूण गरज १,७२,३९५ मे. टन होती आणि आपण पुरवठा मात्र या सर्व एजन्सीज कडून ६०,६८६ मे. ट. करू शकलो. याचा अर्थ शासनाकडून शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतीकरिता संपूर्ण खत पुरवठा होऊ शकला नाही असा आहे. अध्यक्ष महाराज, माझ्याजवळ १९७३ सालच्या आधीचेही आकडे आहेत. परंतु, वेळेअभावी सर्व आकडे न देता १९७३ हे पायाभूत वर्ष धरून मी त्याच वर्षाचे आकडे सभागृहासमोर ठेवले आहेत. त्यानंतर राज्यातील शेती ही प्रामुख्याने कोरडवाहू असल्यामुळे या जमिनीतील उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने इन्टेसिव्ह कल्टिव्हेशनचा मार्ग आपण स्वीकारला असून ज्वारी, गहू, बाजरी, तांदूळ वगैरे साऱ्या अन्नधान्याच्या पिकांच्या हाययिल्डिंग व्हरायटीज संशोधन करून आपण शोधून काढल्या आहेत आणि त्यांचा उपयोग करून शेतकऱ्यांनी थोड्या जमिनीत जास्त उत्पादन घ्यावे अशी आपली अपेक्षा आहे. परंतु, याच वर्षी शासनाने काढलेल्या एका जी. आर. मध्ये जी माहिती दिली आहे तीवरून दिसून येईल की, या राज्यातील विविध जिल्ह्यांच्या उत्तम प्रतीच्या बियाण्यांच्या ज्या रिक्वायरमेंटस होत्या त्या अनेक जिल्ह्यांच्या बाबतीत पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत. काही जिल्ह्यांच्या बाबतीत मी येथे आकडे वाचून दाखवितो.

अनुक्रमांक	जिल्ह्याचे नाव	हायब्रीड ज्वारीच्या बियाण्याची आवश्यकता (क्विंटल)	मिळालेले हायब्रीड ज्वारीचे बियाणे (क्विंटल)
१	नाशिक	६००	६४२
२	धुळे	१,२००	७८७
३	जळगाव	४,५००	१०७
४	नगर	६७५	४७०
५	पुणे	१,२००	२९५
६	सोलापूर	५००	४४८
७	सातारा	३,७५०	६,८७७
८	सांगली	३,७५०	९३४

अध्यक्ष महाराज, हीच व्यवस्था बाजरीच्या हायब्रीड बियाण्याची आहे. त्याचेही आकडे मी वाचून दाखवितो.

अनुक्रमांक	जिल्ह्याचे नाव	हायब्रीड ज्वारीच्या बियाण्याची गरज (क्विंटल)	मिळालेले हायब्रीड बियाणे बियाणे (क्विंटल)
१	नाशिक	३,८७५	२५६
२	धुळे	२,५००	५९५
३	जळगाव	२,३७५	१,२१३
४	नगर	३,७५०	२४
५	पुणे	१,१२५	...
६	सोलापूर	७५०	...
७	सातारा	३२५	३२
८	सांगली	३००	...

यावरून दिसून येईल की, जास्त उत्पन्न देणाऱ्या ज्या व्हरायटीज आहेत त्यांचाही पुरवठा आपण आवश्यकतेनुसार विविध जिल्ह्यांना करू शकलेलो नाही. सांगण्याचा हेतू हा की या राज्याची खताची आणि सुधारित बी-बियाण्यांची गरज राज्यातील उत्पादन भागवू शकत नसल्यामुळे या शासनाने बाहेरच्या राज्यातून त्यांची आयात करून येथील शेतकऱ्यांची गरज भागविण्याचा आणि उत्पादनवाढीशी त्याची सांगड घालण्याचा कितपत प्रयत्न केला आहे हे आपण पाहू गेल्यास फारसे आशादायक चित्र समोर उभे राहत नाही. महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांमध्ये हायब्रीड बियाणे आणि खते वापरण्याची अभिरूची स्वयंस्फूर्तीने निर्माण झाली असली तरी या अभिरूचीला पोषक असे वातावरण राज्यात निर्माण झालेले नाही. त्याला सुधारित बियाणे आणि खते पुरेशा प्रमाणात मिळवून देण्यात हे शासन फारसे क्रियाशील राहिलेले नाही असा जर कोणी आरोप केला तर ती अनुचित ठरेल असे मला वाटत नाही.

अध्यक्ष महाराज, मला या सभागृहाच्या निदर्शनाला आणखी एक गोष्ट आणावयाची आहे. गेल्या तीन अधिवेशनातील विधानसभेत आणि विधानपरिषदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांचा मी तौलनिक अभ्यास केला आणि त्यावरून मला हे दिसून आले की, एकूण विचारण्यात आलेल्या प्रश्नांपैकी दहा टक्के प्रश्न राज्यातील खत वाटप व्यवस्थेतील गोंधळ व भ्रष्टाचार आणि राज्यातील खतांचा काळाबाजार व परराज्यात निर्यात यासंबंधीचे होते. राज्यातील खत वाटपात असलेल्या या गोंधळासंबंधी याच काळात वेगवेगळ्या वर्तमानपत्रात लेख लिहिण्यात आले असून त्यांची कात्रणेही आज माझ्याजवळ आहेत. ती कात्रणे वाचून दाखवून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही परंतु, त्यांची केवळ शीर्षकेच नमुन्यादाखल पाहिल्यास दिसून येईल की, "जिल्ह्यातील खत वाटपात गैरप्रकार चौकशी करण्यासाठी ३ सदस्यांची समिती नेमली", वैचारिक घालमेलीमुळे महाराष्ट्रातील खत वाटपाचा बट्ट्याबोळ", "सहकारी संस्थेला डावलून, व्यापाऱ्यांना खत वाटप दिले", "१३ जिल्ह्यांत खतांचा काळा बाजार : कडक कारवाई करा", "खताचे शॉर्टेज आणि करप्शन" अशा प्रकारची ही शीर्षके आहेत आणि त्यावरून राज्यात खतवाटपपद्धती किती सदोष असली पाहिजे आणि त्याबाबत किती गैरप्रकार होत असले पाहिजेत याची कल्पना येईल. अध्यक्ष महाराज, या एकूण आरोपात सत्य निश्चितपणे किती आहे हे मी सांगू शकणार नाही परंतु राज्यात खतटंचाई असूनही मिळालेले खत जास्त किमतीने विकण्यासाठी शेजारच्या आंध्र राज्यात पाठविले जात असताना पकडण्यात आल्याचे उत्तर या ठिकाणी मिळाल्याचे या सभागृहाला माहीतच आहेत. वास्तविक पाहता या राज्यातील जमीन कोरडवाहू असल्यामुळे शेतीला पाण्याची जशी आवश्यकता आहे तशीच खतांचीही गरज आहे हे निर्विवाद असून त्याकरिता पंचांग पाहण्याची आवश्यकता नाही. तसेच राज्याला लागणारे सुधारित बियाणे आणि खते जर आपण शेतकऱ्यांना पुरवीत नसू तर मग राज्यातील अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होणे आणि सखोल शेतीचा आपला महत्त्वाकांक्षी कार्यक्रम यशस्वी होणे शक्य नाही हे सांगण्याकरिताही पंडितांची गरज नाही. या राज्याची खताची गरज पूर्ण होत नसतांना शेतकऱ्यांना वाटपासाठी मिळालेले खत भ्रष्टाचाराने जन-प्रतिनिधींतर्फे शेजारच्या राज्यात पाठविले जाते याचा अर्थ आपण लक्षात घेतला पाहिजे. खताच्या सदोष वाटपाबद्दल काळ्याबाजारात खते विकण्याबद्दल ही गोष्ट झाली परंतु जी काही खते आणि जे काही सुधारित बियाणे आपण शेतकऱ्यांना पुरवितो ते तरी शुद्ध असते काय याबद्दल शंका निर्माण होऊ लागली आहे. परवाच मी एका वर्तमानपत्रात वाचले की, मुंबईच्या एका फर्मने पंजाबच्या शेतकऱ्याला पुरविलेले ग्रॅन्युअल खत हे निव्वळ मातीच्या स्वरूपात होते. चिक्कण मातीचे ग्रॅन्युअल्स करून त्यावर पांढरे कोटिंग देण्यात आले होते आणि ते खत म्हणून पंजाबला पाठविण्यात आले होते. माझ्याजवळ आता ते कटिंग नाही व म्हणून मी फर्म कोणती ते नक्की सांगू शकत नाही परंतु, अशी बातमी वाचल्याचे मात्र मला

स्मरत आहे. तसाच प्रकार सुधारित बियाण्यासंबंधीही होत आहे. आज आपल्याकडे जी सीड कॉर्पोरेशन्स स्थापन झाली आहेत ती शुद्ध बियाणे शेतकऱ्यांना पुरवितातच असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. बियाण्यासंबंधी रिसर्च न करता केवळ बियाण्यांचा व्यापार करण्याचे काम हे करतात. सांगण्याचा हेतू हा की, जास्त पैसा मिळविण्याच्या हेतूने चांगल्या प्रतीच्या बियाण्यात कनिष्ठ प्रतीच्या बियाण्यांची जर भेसळ करून शेतकऱ्यांना देण्यात आली तर स्वाभाविकपणे त्यापासून होणारे उत्पादन कमी होणार. तेव्हा शेतकऱ्यांना पुरविण्यात येणारी खते, पुरविण्यात येणारे बियाणे हे जसे त्यांच्या गरजेइतके पुरविले जाणे जरूर आहे त्याचप्रमाणे त्याच्या शुद्धतेविषयीही खात्री करून घेतली जाणे आवश्यक आहे. दुर्दैवाने मला या ठिकाणी सांगावे लागत आहे की, खतांचा आणि बियाण्यांचा पुरेसा पुरवठा करण्यास तर हे शासन अपुरे ठरलेच आहे. परंतु, शुद्धतेच्या बाबतीतही हमी देणे या सरकारच्या वाटप यंत्रणेला शक्य होईल असे मला वाटत नाही आणि म्हणूनच शेती उत्पादन वाढीच्या क्षेत्रात आपण समाधानकारक प्रगती करू शकलो नाही.

अध्यक्ष महाराज, मला विशेषत: असे विचारावयाचे आहे की, पिकांच्या पॅटर्नसंबंधी शासनाने काही विचार केला आहे काय? हाययिल्डिंग व्हरायटीची निरनिराळी पिके आपल्याकडे इन्ट्रोड्युस केली आहेत. तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहू ही पिके प्रामुख्याने कोरडवाहू जमिनीत तयार होतात. विद्यमान नैसर्गिक परिस्थितीचा विचार करून, कमी पाऊस, अपुरी खते यांचा विचार करून, नवीन प्लॅन्ट सिस्टिम अंमलात आणली पाहिजे. ज्या जमिनीत गहू पिकत असेल त्या जमिनीत कायमचा गहू घ्यावयाचा, ज्या जमिनीत ज्वारी पिकत असेल त्या जमिनीत कायमची ज्वारी घ्यावयाची, ज्या जमिनीत कापूस होत असेल त्या जमिनीत कायमचा कापूस घ्यावयाचा ही जुनी पुराणमतवादी पद्धती बदलून नवीन पीक पद्धती स्वीकारण्याची नितान्त आवश्यकता आहे. मध्यंतरी असा प्रयोग झाला पण तो फसला. त्याची कारणे निराळी असतील. परंतु, जोपर्यंत नवीन पीक पद्धतीचा प्रयोग आपल्या राज्यात होत नाही तोपर्यंत आपल्या राज्याचे धान्योत्पादन वाढणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे विदर्भ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने या संदर्भात मर्यादित प्रयोग केला आहे. उदाहरणार्थ, मेडिसिन प्लॅन्ट, परंपरागत चालत आलेल्या पिकांचे उत्पादन न करता जमिनीचा पोत पाहून योग्य त्या पिकाचे मग ते पीक अन्नधान्यांचे असो वा कॅशक्रापचे असो उत्पादन केले पाहिजे. आज राज्यातील लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र लक्षात घेतल तर पैशाची पिके घेण्याकडे शेतकऱ्यांची प्रवृत्ती वाढत आहे असे दिसून येईल. आपल्या राज्याची गरज लक्षात घेऊन अन्नधान्याचे पीक किती प्रमाणात काढले पाहिजे आणि पैशाचे पीक किती प्रमाणात काढले पाहिजे याचा संतुलित विचार करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. आपल्या राज्याची अन्नधान्याची गरज पुरी करण्याच्या दृष्टीने अन्नधान्याच्या पिकाखाली किती क्षेत्र आपण आणले पाहिजे याचा विचार करण्याची आज वेळ आली आहे.

अध्यक्ष महाराज, दुसऱ्या एका गोष्टीकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. कृषी उत्पादनात वाढ करावयाची म्हणजे केवळ कृषी उत्पादनात वाढ करावयाची असे नव्हे. ॲनिमल हस्बन्ड्रीचाही आपल्याला या संदर्भात विचार केला पाहीजे. नॅट्रोजन, फॉस्फेट, पोटॅश यांचे उत्पादन कमी कमी होत चालले आहे. तेव्हा शेणखत आणि ग्रीन मॅन्युअर यांचाही वापर करण्याच्या दृष्टीने आपल्याला आता विचार केला पाहिजे. भुईमुगाच्या पिकाला मूलत:च नॅट्रोज ग्लॅन्ड असतात. एकदा भुईमुगाची पिके घेतली की, दुसऱ्या वर्षी ते पीक नॅट्रोजनची पूर्ती करू शकते. रासायनिक खताची पूर्ती होत नसेल तर ग्रीन मॅन्युअरचा विचार करण्याची वेळ आली आहे. कंपोस्ट खत आणि शेणखत याचा वापर आपल्या राज्यातील पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर कसा होईल या दृष्टीने विचार करण्याची वेळ आज आली आहे. त्या दृष्टीने ॲनिमल हसबन्ड्रीला महत्त्व आहे. धुळ्यासारख्या

जिल्ह्याचा अपवाद सोडला तर ज्यातून खत मिळेल अशा शेतीशी संलग्न अशा पद्धतीचा प्रसार आपल्या शासनाकडून झाला नाही. केवळ शेतकऱ्यांनी शासनाच्या घोषणेला प्रतिसाद द्यावा एवढे म्हणून चालणार नाही तर काही गोष्टी ह्या लोकांच्या गळी उतरविण्याची आज वेळ आली आहे. यात आपले हित आहे असे लक्षात आले की ते शासनाला जरूर साथ देतील. आपल्याला माहीत आहे की, नगर जिल्ह्यात हायब्रीड ज्वारी पेरण्यास शेतकऱ्यांनी प्रथम प्रतिसाद दिला नव्हता परंतु उत्पादन वाढवावयाचे असेल तर हायब्रीड ज्वारीच घेतली पाहिजे हे लक्षात आल्यानंतर त्यांनी याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. काही गोष्टी या लोकांवर लादाव्या लागतात म्हणजे लोक आपोआप पुढे येतील.

अध्यक्ष महाराज, दुसरी गोष्ट म्हणजे वैयक्तिकरीत्या जंतूनाशकांची फवारणी यावर विसंबून न राहता सामुहिकरीत्या जंतूनाशकांच्या फवारणीवर भर दिला पाहिजे. मिजमाशीचा रोग आटोक्यात यावयाचा असेल तर सामूहिक फवारणीची नितांत आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी वैयक्तिक जबाबदारी संपते त्या ठिकाणी शासनाची जबाबदारी सुरू होते. ज्वारीला कणसे आली परंतु मीजमाशीच्या रोगामुळे सतत दोन वर्षे ज्वारीच्या कणसाच्या पिशव्या झाल्या. सातत्याने तीन वर्षे मराठवाड्यात मीजमाशीच्या रोग पडत आहे. तेव्हा हा रोग नष्ट होण्यासाठी सामुदायिक प्रयत्न पहावयास पाहिजेत. मीजमाशीच्या रोगाची भीती कायमची संपलेली आहे असे नाही. सर्व प्रकारची पिके रोगजंतूपासून संरक्षित करण्याची आज वेळ आली आहे.

अध्यक्ष महाराज, थोडा वेळ जास्त बोलण्याची संधी आपण मला दिली याबद्दल मी आपला आभारी आहे. या प्रश्नासंबंधी शासनाने अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. डिफेन्स फॉर सेल्फ डिफेन्स ओन्ली, असे करून चालणार नाही. आपल्या राज्याचे अर्थशास्त्र हे मुख्यतः शेतीवर अवलंबून आहे. या दृष्टीने शासनाने अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. आतापर्यंत जे काही चुकले असेल ते चुकले म्हणून सोडून देऊन पुन्हा चूक होणार यासाठी अंतर्मुख होण्याची आवश्यकता आहे. आपण आत्मनिरीक्षण करण्याची आवश्यकता आहे.

❑❑❑

रोजगार हमी योजनेचा अर्थसंकल्पीय पाठपुरावा

(२५ मार्च, १९७५)

महाराष्ट्राची रोजगार हमी योजना एवढी प्रभावी आहे की, 'मनरेगा' च्या निमित्ताने केंद्र सरकारलाही तिचा स्वीकार करावा लागला. दादासाहेबांना मात्र या योजनेचा पाठपुरावा संधी मिळेल तेव्हा करावा लागला. त्यासाठी अर्थसंकल्पीय भाषणाचाही त्यांनी अपवाद होऊ दिला नाही. १९७५-७६ च्या राज्याच्या अर्थसंकल्पावर भाष्य करतांना ते म्हणाले...

अध्यक्ष महाराज, कोणत्याही अर्थसंकल्पाकडे आपण पक्षातीत भूमिकेतून पाहण्याची गरज आहे असे मला वाटते आणि म्हणून या अर्थसंकल्पातील तरतुदींपैकी काही बाबींसंबंधी बोलत असताना मी पक्षातीत दृष्टिकोन स्वीकारणार आहे. नेहमीच परंपरेप्रमाणे जसा अर्थसंकल्प असतो तसाच हा आहे असे या अर्थसंकल्पाचे वर्णन केले

तर या अर्थसंकल्पावर आणि माननीय अर्थमंत्र्यांवर अन्याय केल्यासारखे होईल असे माझे मत आहे. नियोजनाच्या परिभाषेत बोलावयाचे झाले तर गरिबांसाठी नियोजन केले पाहिजे असे जे म्हणतात ते या अर्थसंकल्पात दिसत आहे. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, डॉ. वि. म. दांडेकर यांनी या बाबतीत "प्लॅनिंग फॉर दी पुअर" या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे व त्यातील थोडासा भाग मी येथे वाचून दाखवू इच्छितो. डॉ. दांडेकरांनी आपल्या पुस्तकात असे म्हटले आहे की :—

> "Planning for the poor differs from planning for Economic Development even in respect of its aims and objects. As we have seen, planning for economic development in the established sense aims at, I think raising an average *per capita* consumption. This of course, helps the poor to some extent. How much, we shall presently see. But whatever that is, it happens in the course of things. The poor do not receive any specific attention. What is the parallel in the case of planning for the poor ? It defines a level of a desired minimum living and aims at lifiting everybody above that level to the desired minimum."

गरिबांकरिता जे नियोजन केले जाते त्यात गरिबांकडे जास्त लक्ष दिले जाते व सर्वसामान्य नियोजनाच्या वेळी सर्वसामान्य लोकांचा विचार केला जातो. या दृष्टिकोनातून विचार केला तर आपल्याला असे दिसून येईल की, या वर्षीच्या अर्थसंकल्पात ज्या रोजगार हमी योजनेचा आपण सातत्याने पुरस्कार करीत आलो आहोत त्या योजनेवर ५० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे आणि म्हणून आपल्या राज्यातील जनतेच्या दृष्टीनेच नव्हे तर संबंध देशातील गरीब जनतेच्या दृष्टीने अत्यंत क्रांतिकारी असे हे पाऊल आपण टाकलेले आहे. म्हणून या योजनेसाठी माननीय अर्थमंत्र्यांनी ५० कोटी रुपयांची जी तरतूद केली आहे तिच्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु, या योजनेचे दूरगामी परिणाम काय होतील हे दुर्दैवाने माझ्या काही मित्र पक्षांनी आणि अन्य लोकांनी लक्षात घेतलेले नाहीत असे दिसते. आपण संविधानाचा स्वीकार केल्यानंतर त्या संविधानात असलेल्या डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्सचा योग्य तो आदर केलाच पाहिजे. या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणेच कामाबद्दल हमी देण्याच्या तत्त्वाचा आपण स्वीकार केला आहे व हे तत्त्व स्वीकारूनच या योजनेसाठी आपण या अर्थसंकल्पात ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामुळे केवळ आपल्या राज्यातीलच गरीब लोकांना काम मिळेल असे नव्हे तर संपूर्ण देशात यासंबंधीचे नियोजन करण्यास यामुळे सुरुवात होईल. म्हणून ही योजना कोणत्याही राजकीय उद्दिष्टाकरिता राबविण्यात येणार नाही ही दक्षता आपण घेणार आहोत. कोणत्याही रीतीने या योजनेचे नाव बदनाम होणार नाही अशी दक्षता आपण घेतली पाहिजे. या योजनेवर आक्षेप घेणे म्हणजे गरीब जनतेच्या हितावर आक्षेप घेण्यासारखे होईल. या भावनेतून या योजनेकडे आपण बघितले पाहिजे. या योजनेसंबंधीच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आलेल्या आहेत त्या मी वाचल्या आहेत. आता या योजनेचा अंमल योग्य रीतीने होईल की नाही अशी एक शंका व्यक्त करण्यात येत आहे. परंतु, हा एक तऱ्हेचा गैरविश्वास आहे असे माझे म्हणणे आहे. वस्तुतः ही रोजगार हमी योजना आपण सर्वांनी एकमताने स्वीकारलेली

आहे. तेव्हा सर्व पक्षांनी या बाबतीत सहकार्य देऊन या योजनेची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न जर आपण केला तर केवळ आपल्या महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात या योजनेचा प्रचार आणि प्रसार केला जाईल. तेव्हा कोणत्या तरी गैरसमजावर आधारीत या योजनेचा अंमल योग्य रीतीने होणार नाही अशी शंका प्रदर्शित करणे हे कमकुवतपणाचे लक्षण ठरेल. त्यानंतर या योजनेसाठी लागणारा खर्च करण्यासाठी जो २५ कोटी रुपयांचा व्यवसाय कर बसविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे त्याबद्दल माझ्या काही सन्माननीय मित्रांचा रोष दिसत आहे. परंतु या बाबतीत ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यांचे विश्लेषण जर या सन्माननीय सभासदांनी केले असते तर बरे झाले असते. हा कर आकारण्यासाठी ४०० ते ५९९ रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्यांचा एक गट पाडण्यात आलेला आहे. तर ६०० ते ७९९ रुपये मासिक उत्पन्नवाल्यांचा दुसरा गट, ८०० ते १,००० रुपये, १००० ते १,२०० रुपये व १,२०० रुपयांच्या वर मासिक उत्पन्न असलेल्या लोकांचा गट असे निरनिराळे गट पाडण्यात आलेले आहेत. अध्यक्ष महाराज, व्यवसाय कर लावीत असताना एक काळजी घेण्यात आलेली आहे ती अशी की ज्याचे उत्पन्न मासिक ३९९ रुपयांपेक्षा कमी आहे अशांना व्यवसाय कर लावण्यातच आलेला नाही. त्यानंतर ३०० ते ३९९ या स्लॅबमध्ये जे लोक येतात ते मार्जिनल स्लॅबमधील लोक जर धरले तर १ ते ३९९ रुपयांपर्यंत व्यवसाय कर लावण्यात आलेला नाही. त्यानंतर ४०० ते ५९९ मासिक उत्पन्न आहे अशांच्यावर दरमहा ४ रुपये म्हणजे जवळ-जवळ ५० रुपये कर धरला तर या स्लॅबमध्ये साधारणत: २ लाख ८० हजार लोक येतात त्यांच्याकडून मिळणारा व्यवसाय कर जवळ-जवळ दीड कोटी रुपयांच्या आसपास येतो. त्यानंतर ६०० ते ७९९ दरमहा ६ रुपये, ८०० ते ९९९ दरमहा ८ रुपये, १,००० ते १,१९९ ११ रुपये, १,२०० ते १,४९९ १५ रुपये, १,५०० रुपये व त्याहून जास्त २० रुपये असा हा कर आकारण्यात आला आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, ३९९ च्या खालचा नोकरदार वर्ग सोडून बाकीच्यावर हा कर बसविण्यात आलेला आहे. या ठिकाणी ४०० ते ५९९ या स्लॅबमध्ये २ लाख ८० हजार लोक येतात त्यांची बाजू घेऊन येथे बरेच बोलले गेले. परंतु ज्यांच्याजवळ कोणतेही काम नाही, ज्यांना निवारा नाही, कामाची हमी नाही अशा समाजातील अत्यंत दुर्बल घटकांसाठी ही रोजगार हमी दिली जात असताना त्यासाठी आपण २५ कोटी रुपये उभारणार आहोत व त्यातील दीड कोटी रुपये या ४०० ते ५९९ रुपये मिळविणाऱ्या लोकांकडून घेतले जाणार तेव्हा या लोकांची बाजू घेऊन असे सांगण्याचा प्रयत्न केला जात आहे की यांच्याकडून अशाप्रकारे कर घेणे योग्य नाही. खरोखरच आपण कोणत्या लोकांचे समर्थन करू इच्छिता हे स्पष्ट झाले पाहिजे. आपण ह्या लोकांचे येथे जे समर्थन करीत आहेत ते अत्यंत लंगडे समर्थन आहे. एकाच वेळी आपल्याला दोन भूमिका घेता येणार नाहीत. केवळ सवंग लोकप्रियतेसाठी आमचे काही मित्र येथे दुटप्पी भूमिका घेत आहेत. एकाच वेळी ते शेतमजूर व निश्चित उत्पन्न दरमहा कमविणारे पगारदार लोक यांची बाजू घेत आहेत. ही त्यांची भूमिका सुसंगत आहे असे म्हणता येणार नाही. ज्यांचे उत्पन्न ३०० रुपयांपेक्षा कमी आहे असे १६ लाख लोक व ज्यांचे उत्पन्न ३०० ते ३९९ रुपयांपर्यंत आहे असे ९ लाख लोक असे एकूण २५ लाख लोक तर या करातून पूर्णपणे सुटलेले आहेत. या ठिकाणी असा युक्तिवाद करण्यात आला की, ज्याचे मासिक उत्पन्न ४०० रुपये आहे त्यांनी दादर किंवा कोळीवाड्यासारख्या भागात कसे काय जगावे? मला या मंडळीना असा प्रतिप्रश्न विचारावासा वाटतो की, या मंडळींना ३० ही दिवस काम मिळून महिन्याला ४०० रुपये तरी मिळतात. परंतु ज्यांना महिन्यातून फक्त २५ दिवसच काम मिळते व रोज फक्त ३ रुपये मिळतो अशा ७५ रुपये महिन्याला मिळविणाऱ्या माणसाने कसे काय जगावे? ते कसे जगत असतील याचा

आपण काही विचार केला आहे काय? तेव्हा एका बाजूला महिना ७५ रुपये मिळविणाऱ्याची बाजू घ्यावयाची व त्याचवेळी दुसरीकडे ४०० रुपये महिना मिळविण्याची बाजू घ्यावयाची अशा दोन्ही भूमिका एकाच वेळी घेऊन चालणार नाही. निदान मला तरी असे करता येणार नाही. सवंग लोकप्रियतेसाठी अशी भूमिका घेणे केव्हाही योग्य होणार नाही हे मला स्पष्टपणे आमच्या मित्रांना सांगावयाचे आहे. आपल्या राज्यातील ६० लाख लोक असे आहेत की ज्यांना काही भविष्यच नाही. त्यांचे भविष्य अंधकारमय आहे. त्यांना दोन वेळा जेवायलादेखील मिळत नाही. आपण ज्या कर्मचाऱ्यांची येथे बाजू मांडीत आहोत त्या स्त्री कर्मचाऱ्यांना बाळंतपणाची रजा मिळते. परंतु, शेतावर काम करणाऱ्या ज्या बायका आहेत त्यांना बाळंतपणाची रजा नाही. इतकेच नव्हे तर माझ्या लहानपणी तर मी असे देखील पाहिले आहे की, या गोरगरीब बाया शेतातच बाळंत देखील झालेल्या आहेत. ओल्या बाळंतिणीला देखील शेतावर मजुरी करण्यासाठी जावे लागते. त्यांची परिस्थिती अशी आहे की, काम बंद तर चूल बंद. त्यांनी जर काम केले नाही तर जेवायला मिळत नाही. आणि समजा काम मिळालेच नाही तर उपाशी राहण्याची पाळी त्यांच्यावर येते. तेव्हा माझा सवाल असा आहे की, आपण कोणाची बाजू घेणार? एका बाजूला ४०० ते ५०० रुपये मासिक उत्पन्न मिळविणारा गट आणि दुसऱ्या बाजूला ज्यांना काहीच रोजगाराची हमी नाही असा समाजातील फार मोठा दुर्बल घटक. आपण या ठिकाणी जी भाषणे केलीत ती ऐकून माझा असा समज झालेला आहे की, आपण या ठिकाणी ग्रामीण जीवन आणि शहरी जीवन असा एक संघर्ष निर्माण करीत आहोत. वास्तविक पाहता असा संघर्ष निर्माण होण्याची आवश्यकता नाही. या ठिकाणी मला एक गोष्ट स्पष्ट करावयाची आहे की, व्यवसाय कर हा आपल्याला २५० रुपयांपेक्षा जास्त लावता येत नाही. तसे घटनात्मक बंधन आहे. त्यामुळे १,५०० रुपये किंवा त्यापेक्षा ज्यांचे उत्पन्न जास्त आहे अशांच्यावर आपल्याला अधिकाधिक २० रुपये महिना म्हणजे २४० रुपयांपर्यंत व्यवसाय कर लावता येत असल्याने त्या लिमिटमध्ये आपण तो ठेवला आहे. ६०० ते ७९९ रुपये मासिक, या स्लॅबमध्ये १ लाख १० हजार लोक येतात. ८०० ते ९९९ यामध्ये साधारणपणे १ लाख लोक येतात. व १,२०० ते १,५०० या स्लॅबमध्ये १ लक्ष ५० हजार लोक येतात. कर कसे ठेवण्यात यावेत यासंबंधी महाभारतात एक सूत्र सांगितलेले आहे. त्यांचे म्हणणे असे की, गाईचे दूध तर मिळाले पाहिजे, वासरासाठी पुरेसे दूध राहिले पाहिजे व गाईच्या स्तनाला जखमही होता कामा नये. अशा प्रकारे दूध काढले पाहिजे. कर आकारणी करतानाही हीच गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. आज आपल्यासमोर ६० लक्ष लोक आहेत जे समाजातील विकर सेक्शनमधील असून ज्यांना दोन वेळा जेवायला देखील मिळत नाही. जे बिलो सबसिस्टन्स लेव्हल आहेत. त्यांच्या विकासाचा प्रश्न आपल्यासमोर आहे. केवळ संघटित कामगार वर्गाच्या महागाई भत्यात वाढ करून आपले प्रश्न सुटतात, असे जर कोणी मानत असेल व तेवढ्यावर त्यांचे समाधान होत असेल, तर तसे समाधान मानणाऱ्यांपैकी मी नाही. संघटित कामगारांच्या उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या आर्थिक मागण्या व त्यांचेसमोर शासनाची शरणागती म्हणजे साम्यवाद या भ्रामक कल्पना आहेत.

अध्यक्ष महाराज, आता एक नवाच भांडवलदार वर्ग निर्माण होऊ पाहत आहे व यामध्ये संघटित कामगार सहभागी आहे. असा एक नवीन विचार सन १९६५ मध्ये चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीची रणभेरी फुंकणारा एक नेता श्री. यावो वेनउमान याने पिपल्स डेली व रेड फ्लॅग या दोन कम्युनिस्ट मुखपत्रांतून एका लेखात व्यक्त केला आहे. तो आपल्या लेखात लिहितो. "चीनमध्ये नवा भांडवलदार होऊ पाहणारा संघटित कामगारच अधिक पैसा मिळवून तो संचय करण्याची नवीन प्रवृत्ती दाखवीत आहे. याला प्रोत्साहन मिळाले तर तो सट्टेबाज, लाचलुचपत, भ्रष्टाचार

इत्यादी प्रवृत्तींचा उदय होऊन आणि त्याची परिणती ह्या वर्गाचा राज्य यंत्रणेवर कब्जा मिळविण्यात होईल आणि असा कब्जा मिळाला तर देशातील इतर गरिबांना तो तापदायक ठरेल." हाच लेखक पुढे म्हणतो, "ही केवळ कल्पना नाही तर रशियात हे घडले आहे आणि घडत आहे. कम्युनिझमच्या नावाखाली नवी भांडवलशाही व नोकरशाही यांना जनतेवर पकड बसवायची आहे." ते आपल्या देशात घडता कामा नये अशी त्यांची तळमळ आहे.

अध्यक्ष महाराज, ज्याची काम करायची तयारी आहे त्याला आपल्याला काम देता आले पाहिजे. घटनेमध्ये आपण ही गोष्ट मान्य केली आहे. परंतु आज खेड्यापाड्यात शेतमजुराला काम मिळत नाही. कोठे काम मिळालेच तर त्याला त्या कामाचा पुरेसा मोबदला मिळत नाही. अशी परिस्थिती राहता कामा नये. म्हणूनच आपण या राज्यात रोजगार हमी योजना सुरू करण्याचे ठरविले आहे व त्यासाठी आपण हा व्यवसाय कर बसविला आहे. हा कर सर्वांनी दिला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. एकाच वेळी दोघांची बाजू घेऊन चालणार नाही. जर कोणा एकाची बाजू घेण्याचा प्रश्न आलाच तर समाजातील जो दुर्बल घटक आहे, रंजलेला व गांजलेला माणूस आहे त्याचीच बाजू घेऊन आपल्याला उभे राहिले पाहिजे.

आपल्या देशातील शेती हा उद्योग सर्वात महत्त्वाचा असून आपल्या सर्व नियोजनाचा तो पाया आहे असे मी मानतो. आज ॲग्रिकल्चरल लेबरची संख्या ५३ लाख ९० हजार आहे. स्मॉल होल्डर्स ८ लाख ७४ हजार व मार्जिनल होल्डर्स १२ लाख ४५ हजार असे एकूण ७५ लाख १३ हजार होतात. या लोकांसाठी आपण निरनिराळे कायदे केले, लँड सीलिंग ॲक्ट पास केला, कुळकायदा पास केला व त्यांच्या उत्पन्नावर आपण मर्यादा घातली. ह्या दोन्ही गोष्टी त्यांनी कोणत्याही प्रकारचा रिसेंटमेंट न दाखविता मान्य केल्या. परंतु, आता वेळ आलेली आहे की अर्बन पॉप्युलेशनच्या उत्पन्नावर व त्याच्या प्रॉपर्टीवर आपण कशी काय मर्यादा आणता? आज ग्रामीण भागातील माणूस या गोष्टीकडे उत्सुकतेने पाहत आहे. या ठिकाणी मला अर्बन पॉप्युलेशन विरुद्ध रूरल पॉप्युलेशन असा वाद निर्माण करावयाचा नाही. आपण अर्बन प्रॉपर्टीवर कशा प्रकारे सीलिंग आणता, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मला वाद निर्माण करावयाचा नाही. परंतु विचार करताना जणू काही शेतकऱ्यांनी आपला वाटा स्वीकारावा. आपल्याला या गोष्टीशी कर्तव्य नाही या प्रकारचा विचार करून आपल्याला या गोष्टींची अवहेलना करता येणार नाही. आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला आणि या राज्याच्या उद्योगधंद्याचा विचार केला तर आपल्याला शेती हा बेसिक उद्योग आहे ही गोष्ट मान्य करावी लागेल. शेतकरी धान्य निर्माण करतो आणि या धान्याच्या वाटपात काय होते याचा कधी विचार केला आहे काय? मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद या ठिकाणी आठ किलो माणसी धान्य मिळाले पाहिजे याचा आपण आग्रह धरता आणि खेड्यात किती धान्य मिळते तर माणसी दीड किलो. याचा अर्थ काय आहे? शेतकऱ्यांना आतापर्यंत आपल्या योजनेचा कोणता फायदा मिळाला आहे? याचा विचार केला आहे काय? त्याने मात्र आपल्या परीने सर्व प्रकारचा त्याग करण्याचा प्रयत्न केला आहे, नव्हे त्याने त्याग केला आहे. त्याने अगोदर कराचा भार तर सहन केलाच आहे परंतु या २५ कोटींपैकी ५.३४ कोटींचा बोजा शेतकऱ्याने स्वीकारला आहे. म्हणजे या योजनेचा भार निदान २० टक्के तरी शेतकऱ्यावरच जाणार आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, आपली योजना ५० कोटींची असूनही भागणार नाही इतका मोठा हा प्रश्न आहे. आपण निदान नॅशनल सँपल सर्व्हेप्रमाणे जरी हिशेब केला तरी १५ कोटी मॅनडेजचा विचार आपल्याला करावा लागणार आहे आणि एका दिवसाला तीन रुपये धरले तरी त्याचा खर्च जवळ जवळ ४५ कोटींच्या घरात

जाईल. शिवाय अवजारांच्याकरिता आपल्याला २० कोटी लागणार आहेत म्हणजे योजनेचा नेट खर्च ६० कोटींवर जाणार आहे. आपण सर्व गोष्टींचा विचार केला तर हा खर्च ७० कोटींच्या घरात जाईल. या ठिकाणी जो व्यवसाय कर बसविण्यात आला त्यावर टीका करण्यात आली. ४०० ते ६०० रुपये उत्पन्नाचा जो गट आहे त्याच्यावर कर बसविण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली. याचा विचार राज्याने करावा, परंतु या निमित्ताने मला सरकारला एक विनंती करावयाची आहे ती अशी की, घटनेमध्ये जी २५० रुपयांची मर्यादा हा कर लावण्यावर आली आहे ती २,५०० रुपयांपर्यंत वाढविण्याची मुभा मिळावी या दृष्टीने घटनेमध्ये दुरुस्ती करण्यात यावी अशी शिफारस आपल्या सरकारने मध्यवर्ती सरकारला करावी. आपल्या सरकारने मुले व गरोदर स्त्रियांना न्युट्रिशस फूड देण्याकरिता फंड उभारण्याचा कायदा केला. परंतु त्या प्रमाणे या फंडाची गत होऊ नये असा इशारा देण्यात आला. मला या संबंधी सांगावयाचे आहे की, एम्प्लॉयमेंट गॅरंटी योजनेसाठी निदान ७० कोटी रुपयांची तरतूद करण्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे. मागच्या सेशनमध्ये रोजगार हमी योजनेसंबंधी जे निवेदन मुख्य मंत्र्यांनी केले ते गरिबांना रोजगार देण्यासाठी केले. परंतु या प्रकाराचे निवेदन करून भागणार नाही, तर महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारला घटनेच्या डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलमध्ये दुरुस्ती करावयाची विनंती करावी आणि रोजगाराची हमी देणे ही गोष्ट ऑब्लिगेटरी करावी. अध्यक्ष महाराज, आपण ह्या योजनेचे जनक आहात. परंतु, यात तुमचा हिस्सा किती आणि माझा हिस्सा किती व यात सन्माननीय मंत्री श्री. व. बं. पाटील यांचा हिस्सा किती याचा हिशेब करण्यात अर्थ नाही. या ठिकाणी ४०० ते ६०० च्या उत्पन्नाच्या मर्यादेच्या लोकांना सूट देण्याच्या गोष्टी करणाऱ्या मंडळींना मला सांगावयाचे आहे की, आपण असा आग्रह धरला पाहिजे की, सर्व आमदार, सर्व प्रिसायडिंग ऑफिसर्स आणि कॅबिनेट मंत्र्यांनी आपल्याला स्वतः २५० रुपये कर देण्याची तरतूद लागू करून घ्यावी.

सभापती : आपल्या माहितीसाठी मला सांगावयाचे आहे की, विरोधी पक्षाच्या एका आणि काँग्रेस पक्षाच्या एका सन्माननीय सभासदाकडून माझ्याकडे पत्र आलेले आहे की हा कर त्यांना लागू करण्यात यावा. विरोधी पक्षाचे सन्माननीय सभासद श्री. प्रधान असून काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सभासद श्री. मेघे हे आहेत.

श्री. रा. सू. गवई : जेव्हा आपण निर्धार प्रकट केला तेव्हा लोकांना संभ्रमात पाडील अशी परिस्थिती आपण तरी निर्माण करू नये. माझ्या सारख्यानेही घटनेच्या तरतुदींचा विचार न करता जास्त पैसे देण्याची तयारी दाखविली पाहिजे. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे नगरचे भाषण वाचले. मुख्यमंत्र्यांच्या नगरला झालेल्या भाषणाचा वृत्तांत पाहिला. त्यात त्यांनी म्हटले आहे की, मंत्र्यांचे पद आणि आमदाराचे पद हे व्यवसायात येत नाही. त्याचप्रमाणे प्रिसायडिंग अधिकाऱ्याचे पदही व्यवसायात येत नाही. ही एक प्रकरची सेवा आहे. तेव्हा आपल्याला सेवेवर कर बसविता येईल काय? याचा विचार करण्यात आला पाहिजे.

आपण ही गोष्ट कोणाच्याही स्वेच्छेवर सोडता कामा नये. तर याकरिता आपण मेंबर्स सॅलरीज अँड अकन्सेस बिलात तरतूद करावी. समजा, आपण वर्गणी दिली तर ती राज्याच्या कंसॉलिडेटेड फंडात जमा होणार नाही आणि एक महिन्याला वर्गणी दिली आणि दुसऱ्या महिन्याला दिली नाही तर आपण दिलीच पाहिजे अशी सक्ती करण्याची कोणत्याही प्रकारची सोय नाही. म्हणून आपल्या संबंधित विधेयकातच या प्रकारची तरतूद केली पाहिजे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, सर्व मिनिस्टर्स, सर्व प्रिसायडींग ऑफिसर्स आणि दोन्ही सभागृहाचे सर्व मेंबर्स यांनी हा कर दिल्याशिवाय आपल्या सांगण्याला कोणत्याही प्रकारचे नैतिक मूल्य येणार नाही.

अध्यक्ष महाराज, मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, या योजनेचे दूरगामी परिणाम होणार आहेत. म्हणून मला सांगावयाचे आहे आणि विनंतीही करावयाची आहे की, या योजनेला कोणी गालबोट लावण्याचा प्रयत्न करू नये. यात थोडीशीही गफलत झाली तरी या योजनेची बदनामी होण्याचा संभव आहे. देशाच्या दृष्टीने आणि या राज्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची योजना आहे. देशातील इतर राज्यांनाही या योजनेचाच विचार करावा लागणार आहे. या योजनेमुळे महाराष्ट्रातील दलित जनतेच्या जीवनात क्रांती घडून आली तर आपल्याला दलितांचा आणि गरिबांचा आशीर्वाद मिळेल आणि ही योजना देशाच्या इतर राज्यातही अवलंबिली जाईल. मी सांगितल्याप्रमाणे या योजनेमध्ये जवळ-जवळ ७५ लक्ष १३ हजार लोकांना काम देण्याची गरज आहे. नॅशनल सँपल सर्व्हेच्या फिगर्सप्रमाणे मी काही माहिती तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे काही ॲव्हरेजेस मी काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे आपल्या योजनेचा मॅनडेजवरचा खर्च ६० कोटींच्या घरात जाईल आणि अवजारांकरिता एकंदर येणाऱ्या खर्चाच्या २० टक्के खर्च येईल. परंतु त्याने भागणार नाही. आपण जर यात २५ कोटी मॅनडेज वाढविले तर मॅनडेजवरचाच खर्च ७५ कोटींच्या घरात जाईल व त्यानंतर अवजाराकरिता ५० कोटींचा खर्च आपल्याला धरावा लागेल. म्हणजे ही योजना जवळ जवळ १२५ कोटींच्या घरात जाईल. म्हणजे आपण जो ५० कोटींचा आकडा धरला तो शेवटचा आकडा नाही.

या ठिकाणी बागायतदार शेतकऱ्यांविषयी बोलण्यात आले. मला सांगावयाचे आहे की तो प्रश्न केव्हाही सुटणार नाही. ४०० ते ६०० रुपये उत्पन्नाच्या गटाचा हा प्रश्न नाही तर, हा प्रश्न प्रत्येकांच्या दानतीचा आहे. आपण ही योजना स्वीकारली आहे ती कोणत्याही राजकीय दृष्टीने स्वीकारली नाही, तेव्हा ती राजकीय हेतूने बदनाम होता कामा नये. या योजनेसंबंधी मी प्रतिक्रिया वाचली आहे त्यात म्हटले होते की, आता दोर कापला आहे. मला विरोधी पक्षांनाही सांगावयाचे आहे की, त्यांनी या योजनेला संमती दिली आहे. आपण ही योजना नागपूर सेशनमध्येच स्वीकारली आहे. तेव्हा आपल्या दृष्टीनेही दोर कापला आहे. आपण या योजनेचे कुंकू लावले आणि नावही घेतले आहे त्याच प्रमाणे, काँग्रेसच्या आणि सर्व पक्षांच्या लोकांनी या योजनेचे कुंकू लावले व नाव घेतले आहे, तेव्हा आपल्याला ती टाळता येणार नाही. आता खेड्यातील शेतमजूर आणि शहरातील कमी उत्पन्नवाला असा वाद काढून आपल्याला आपली नाव घेण्याची जबाबदारी टाळता येणार नाही. या प्रकारे कोणी बोलले तर आपण आपली जबाबदारी टाळतो असा त्याचा अर्थ होईल. म्हणून मला शेवटी हेच सांगावयाचे आहे की, सरकारचे दोर रोजगार हमी योजनेच्या संदर्भात जसे कापण्यात आलेले आहेत त्याचप्रमाणे आम्हा विरोधी पक्षातील सदस्यांचेही दोर या योजनेला आम्ही एकदा संमती दिल्यानंतर कापण्यात आलेले आहेत आणि या योजनेचा पाठपुरावा केल्याशिवाय आणि ती यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करण्याशिवाय आम्हा विरोधी पक्षातील सदस्यांनाही आता गत्यंतर उरलेले नाही तेव्हा ही रोजगार हमी योजना यशस्वी करणे हे महाराष्ट्राच्याच केवळ हिताचे आहे असे नसून साऱ्या देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे पाऊल ठरणार असल्यामुळे ही योजना यशस्वी करण्यासाठी पक्षीय दृष्टिकोन विसरून सर्वांनी हातभार लावावा एवढीच विनंती मला शेवटी करावयाची आहे. अध्यक्ष महाराज, मला यापेक्षा जास्त काही सांगावयाचे नाही.

❑❑❑

कुटुंब नियोजनाचे अभ्यासपूर्ण समर्थन

(२९ मार्च, १९७६)

राष्ट्र विकासासाठी आवश्यक असलेला कोणताही विषय दादासाहेबांसाठी वर्ज्य नव्हता. प्रारंभीच्या काळात तर कुटुंब नियोजन हा टिंगल टवाळीचाच विषय ठरला होता. पण राष्ट्रविकासासाठी ते परम आवश्यक आहे हे दादासाहेबांनी एका अभ्यासपूर्ण भाषणातून अधोरेखित केले होते. २९ मार्च, १९७६ रोजी त्यांनी केलेले हे भाषण ऐतिहासिकच म्हणावे लागेल.

अध्यक्ष महाराज, या ठरावाचे समर्थन करण्यासाठी आणि तीन अथवा त्यापेक्षा जास्त मुले हयात असणाऱ्या व्यक्तींची सक्तीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करण्याबाबत शासनाने आवश्यक तो कायदा त्वरित करावा असा शासनाला आग्रह करण्यासाठी मी उभा आहे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे राष्ट्राच्या दृष्टीने किती निकडीचे आहे हे एकदा मान्य केल्यानंतर हा आळा घालण्याच्या उपाययोजनेचा तपशील नंतर ठरविता येईल. म्हणून मी तपशिलात न शिरता सर्वसाधारण चर्चा करणार आहे. यासंबंधात तात्त्विक चर्चा माझ्या दृष्टीने गौण आहे. या गतिमान युगात अंडे आधी की कोंबडी आधी ही चर्चा फलदायी ठरणार नाही. मात्र देशाच्या दृष्टीने या प्रश्नांचे गांभीर्य किती मोठे आहे हे जाणून घेण्यासाठी येथे काही आकडे देणे मला आवश्यक वाटते. जगाच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत भारताचे क्षेत्रफळ २.४ असून जगाच्या लोकसंख्येच्या मानाने भारताची लोकसंख्या १४ टक्के आहे. जगाची लोकसंख्या १९७३ साली ३७५ कोटी होती आणि जनगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या १९७१ साली ५५ कोटी होती व आजमितीला ती ६२ कोटी आहे. याचा अर्थ जगातील प्रत्येक सात माणसांत भारताचा एक नागरिक आहे. १९०१ साली भारताची लोकसंख्या २४ कोटी होती, १९५१ साली ती ४४ कोटी झाली, १९७१ साली ती ५५ कोटी झाली आणि १९७६ साली ती ६२ कोटी आहे. म्हणजे १९०१ ते १९७० या ७० वर्षांच्या कालावधीत ती ३१ कोटींनी वाढली आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर १९०१ ते १९७१ या कालखंडात एक नवीन भारत देश या भूमीवर निर्माण झाला. १९६८ साली लोकसंख्येच्या वाढीचा वेग वर्षाला १ कोटी ३० लक्ष होता व आता तो २ कोटी झाला आहे हे लक्षात घेता १९८१ सालात भारताची लोकसंख्या ७२ कोटी होईल आणि तिसरा भारत या भूमीवर निर्माण होईल. महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा विचार केला तर १९६१ साली ३ कोटी ९५ लक्ष लोकसंख्या असलेल्या या राज्यात १० वर्षांत १ कोटी ५ लक्ष लोकसंख्येची भर पडून ती १९७१ साली ५ कोटी झाली. म्हणजेच या दहा वर्षांत विदर्भाच्या ८ जिल्ह्यांच्या लोकसंख्येइतके ज्यादा ओझे या राज्याच्या बोकांडी बसले. आकडेशास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार या देशात प्रत्येक दीड सेकंदाला एक मूल जन्माला येत असते.

सभापती : आपले भाषण संपेपर्यंत किती मुले जन्माला येतील?

माझे भाषण संपेपर्यंत निदान १,००० मुले जन्माला आलेली असतील. म्हणजे दर दिवसात 'ब' वर्ग नगरपालिकेचे

एक शहर तयार होते. ५७ हजार लोकसंख्येचे 'ब' वर्ग नगरपालिकेचे शहर तयार होते. १९६८ साली लोकसंख्या वाढीची गती प्रतिवर्षी १ लाख ३० हजार एवढी होती, आता हा वेग प्रतिवर्षी २ कोटी १० लक्ष एवढा झाला आहे. १९११ ते १९२१ या कालखंडात भारताची लोकसंख्या ही स्थिर होती. त्या वेळी देशात पडलेला दुष्काळ व रोगराई यामुळे लोकसंख्या स्थिर राहिली. त्या कालखंडात जन्मांचे प्रमाण दरहजारी ४९ होते आणि मृत्यूचे प्रमाण दरहजारी ४८ होते. जन्म-मृत्यूचे प्रमाण हे जवळजवळ समान होते आणि त्या कालखंडात पडलेला दुष्काळ व रोगराई यामुळे भारताची लोकसंख्या स्थिर राहिली. आज मृत्यूचे प्रमाण हे १६ टक्क्यांवर आलेले आहे आणि जन्माचे प्रमाण हे ३४ टक्क्यांवर गेलेले आहे.

(**श्री. कृ. म. पाटील** :मृत्यूचे प्रमाण ११ टक्के आहे.)

माननीय मंत्र्यांच्या माहितीप्रमाणे ते ११ टक्क्यांवर आलेले आहे.

१९४८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विचारण्यात आले होते की, कुटुंबनियोजनाच्या दृष्टीने अल्पसंख्याकाची संख्या घटविणार काय? त्यावेळी त्यांनी सांगितलेले होते की, बर्थ कंट्रोलबरोबरच मृत्यूचे प्रमाणही कमी करता आले पाहिजे. आपण कुटुंबनियोजनाचा मार्ग स्वीकारला असला तरी बर्थ रेट आपल्याला पाहिजे त्या प्रमाणात कंट्रोल करता आलेला नाही. पण मृत्यूचे प्रमाण मात्र घटलेले आहे. आज आपल्या देशात बर्थ रेट हा गंभीर स्वरूपाचा आहे. भारतात दरवर्षी २ कोटी १० लाख मुले जन्माला येतात. दरवर्षी ८० लाख माणसे मृत्यू पावत असली तरी दरवर्षी १ कोटी ३० लाख एवढी लोकसंख्येत भर पडत असते. मी आता जे आकडे सांगत आहे ते १९६८ सालाचे आकडे स्टॅन्डर्ड धरून सांगत आहे. ही जी १ कोटी ३० लाखांची वाढ दरवर्षी होत आहे त्याचे आर्थिक परिणाम काय होतील हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

१९५१ साली अन्नधान्याची निर्मिती ५५ मिलियन टन एवढी होती तर १९६६ साली ती ७२ मिलियन टन एवढी झाली. म्हणजे अन्नधान्याचे उत्पादन १७ मिलियन टन एवढे वाढले. १९५१ साली प्रत्येक माणसाला १२.८ औंस एवढे धान्य वितरित करता येऊ शकत होते तर १९६६ साली १२.४ औंस एवढे धान्य वितरित करता आले. १५ वर्षांत १७ लाख टन एवढे अन्नधान्य वाढले असूनही वितरित होणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाण ४ औंसाने घटले. एका बाजूला याच कालावधीत अन्नधान्याचे उत्पादन वाढले पण दुसऱ्या बाजूला १५ वर्षांत जी लोकसंख्या वाढली त्यामुळे अन्नधान्य वितरणाचे प्रमाण दरमाणसी ४ औंसाने घटले.

अध्यक्ष महाराज, १९५१ साली आपल्या देशात तीन दशलक्ष बेकार होते. १९६६ साली ही संख्या ११ दशलक्ष एवढी झाली. १९५१ ते १९६६ या कालखंडात आपण ३० दशलक्ष लोकांना काम पुरविले तरीही १९६६ साली १०-११ दशलक्ष लोक बेकार राहिले. सध्या दरवर्षी १ कोटी ३० लक्ष या गतीने आपल्या देशाची लोकसंख्या वाढत आहे. लोकसंख्या वाढीचे हे प्रमाण असेच कायम राहिले आणि लोकांच्या प्राथमिक गरजा पुरवावयाच्या म्हटले तरी दरवर्षी काय करावे लागेल हे पाहिले आणि त्याचे आर्थिक परिणाम किती भयानक होतील हे लक्षात घेतले तर कुटुंबनियोजनाची किती आवश्यकता आहे हे आपल्या सहज लक्षात येईल. या लोकसंख्येसाठी आपल्याला दरवर्षी १२,२४,०५,३०० क्विंटल धान्य १८,८७,७४,००० मीटर कापड २५,०९,००० घरे, ४० लक्ष नवीन धंदे, १,२६,५०० शाळा व ३,७२,५०० शिक्षक एवढ्या गोष्टी लागतील. ही संपूर्ण भयानक स्थिती लक्षात घेतली तर आपल्या ज्या प्राथमिक गरजा आहेत त्या पुऱ्या करण्यासाठी देशाला फार मोठे आर्थिक दडपण सहन करावे लागणार आहे. त्यामुळेच आपल्या देशाला सक्तीच्या कुटुंब नियोजनाशिवाय दुसरा कोणताही मार्गच आपल्याला शिल्लक राहिलेला नाही या निर्णयाप्रत आपल्याला यावे लागेल.

अध्यक्ष महाराज, सध्याच्याच गतीने आपल्या देशाची लोकसंख्या वाढत राहिली तर १९९४ साली भारताची लोकसंख्या १०० कोटी होईल. त्यावेळी आपल्या देशातील सारे सर्पण संपलेले असेल. सर्पण मिळविण्यासाठी देशात जंगलेच शिल्लक राहणार नाहीत. खनिजाचा विचार केला तर सारा दगडी कोळसा संपुष्टात आणला असेल. जंगल नष्ट झाल्यामुळे पाऊस नाहीसा होईल. आणि या देशात रोगराई, दुष्काळ निर्माण होऊन भीकेची झोळी पदरी येईल. सध्याच्या लोकसंख्या वाढीकडे आपण दूरदृष्टीने पाहिले नाही तर काय परिस्थती निर्माण होईल हे सभागृहाच्या निदर्शनास आणण्यासाठी ही आकडेवारी मी या ठिकाणी मांडली आहे. शेवटी हा देश नंगा भुका रहावा की या देशात नंदनवन निर्माण व्हावे अशी आपली इच्छा आहे. याचाच आपल्याला विचार करावा लागणार आहे. जनावरांप्रमाणे घरात मुले वावरतील अशी परिस्थिती देशात निर्माण करावयाची की लोकसंख्या मर्यादित ठेवून या देशातील माणसांना जिवंत ठेवून त्यांना स्वाभिमानाने जीवन जगू द्यावयाचे हा खरा प्रश्न आहे.

अध्यक्ष महाराज, आपल्याला जन्माचे प्रमाण हे ४१ टक्क्यांवरून २५ टक्क्यांवर आणावयाचे आहे. सध्या हे प्रमाण ३४ टक्के आहे. हे प्रमाण २० टक्क्यांवर आणणे हे आपले लक्ष्य असले पाहिजे. विवाहित जोडप्यांना एका मुलापलीकडे मुले होऊ द्यावयाची नाहीत असे आपण ठरविले तर जन्माचे प्रमाण ९ टक्क्यांवर येईल. विवाहित जोडप्याला ३ मुले होऊ देण्याची परवानगी दिली तर जन्माचे प्रमाण १५ टक्क्यांवर येईल. त्यांना राजीखुशीने तीन मुले होऊ द्यावयाची ठरविले तर हे प्रमाण २२ टक्क्यांवर येईल. सध्या आपल्या देशाची लोकसंख्या प्रतिवर्षी जी १ कोटी ३० लक्ष या गतीने वाढत आहे ती वाढ रोखावयाची असेल. १९८० सालापर्यंत एक नवीन भारत निर्माण होऊ द्यावयाचा नसेल, ऑस्ट्रेलिया खंड निर्माण होऊ द्यावयाचा नसेल तर जन्मांचे सध्याचे प्रमाण नियंत्रित केल्याशिवाय गत्यंतर नाही. जन्मांचे प्रमाण २० टक्क्यांवर आणावयाचे असेल तर तीन मुलांनंतर सक्तीचे कुटुंबनियोजन याशिवाय आपल्याजवळ दुसरा पर्याय नाही. आपली लोकसंख्या ही ४०-४५ कोटी राहिली पाहिजे. विद्यमान खनिज संपत्ती, जमिनीची उत्पादनक्षमता आहे तिची कुवत ही ४०-४५ कोटी लोकांना पोसण्याइतकीच आहे. तेव्हा देशाची लोकसंख्या ४५ कोटीच्या जवळपास राहील या दृष्टीने ती रेग्युलेट करून उपाययोजना करणे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. काही मंडळी असा युक्तिवाद करतात की, हा प्रश्न शिक्षणाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करावा. अध्यक्ष महाराज, संपूर्ण देशामध्ये ५ लक्ष ६० हजार खेडी आहेत. शहरामध्ये साक्षरतेचे प्रमाण २५ टक्के आहे तर खेड्यापाड्यामध्ये इल्लिटरसी अधिक आहे. या देशात १४ भाषा बोलल्या जातात. या शिवाय २०० डायलेक्टस् आहेत. या सर्व गोष्टी विचारात घेतल्यानंतर लोकशिक्षणाने लोकसंख्या वाढीचा प्रश्न सोडविणे हे म्हणणे फार धाडसाचे होईल. रिफॉर्मिस्ट भूमिकेच्या पलीकडे जाऊन क्रांतिकारक भूमिका स्वीकारण्याची गरज आहे. रिफॉर्मिस्ट जे आहेत ते जुने घर दुरुस्त पण क्रांतीकारी हे नवीन गोष्ट घडवून आणतात. या देशात समृद्धी आणावयाची असेल तर आपल्याला क्रांतीचेच पाऊल टाकावयाला पाहिजे. अध्यक्ष महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे द्रष्टे होते, असा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. मी सन्माननीय सभासद मंगुडकर यांचे अभिनंदन करतो. अध्यक्ष महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ सालच्या जाहीरनाम्यात कुटुंब नियोजन झाले पाहिजे असा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे देशाला वाचवावयाचे असेल तर तुम्हाला कुटुंब नियोजनाचा विचार केला पाहिजे असे १९३८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर केले. आपल्याला क्रांतिकारी अशी झेप घेतली पाहिजे. हिंदुची गीता आहे. मुसलमानाचे कुराण आहे, आणि बौद्धांचा धम्म ग्रंथ आहे. प्रगतीच्या आड संविधान किंवा ग्रंथ येत असेल तर तेही बदलण्याची गरज आहे अशी तरतूद घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. स्टॅटिक अशी आपली घटना नाही. समजा भिक्कु आला आणि सांगावयाला लागला की,

एचबी ११८०—२२

संततीनियोजन करणे बरोबर नाही. हे आपल्या धर्माच्या विरुद्ध आहे तर ते ऐकले जाणार नाही. तेव्हा राष्ट्राच्या कल्याणाच्या दृष्टीने धम्म बदलण्याची गरज असेल तर धम्म सुद्धा बदलण्यात येईल. मला असे सांगावयाचे आहे की, राष्ट्रापुढे जी समस्या असेल तिचा पक्षातीत भूमिकेतून विचार करण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी, श्री. शंकररावजी चव्हाण यांनी एक नवीन क्रांतिकारक असा कार्यक्रम पुढे आणलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करू इच्छितो. यासंबंधी जो कायदा करावयाचा तो कसा करावयाचा हा तपशिलाचा भाग आहे. पहिली आवश्यक गोष्ट अशी की, या राज्याने सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा कायदा केला पाहिजे. महाराष्ट्र शासनाने त्वरित तीन मुलांनंतर सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा कायदा मंजूर करावा. देशाच्या दृष्टीने ही अत्यंत अनुकरणीय बाब ठरेल. अध्यक्ष महाराज, या पूर्वी अनेक प्रश्न पक्षातीत भूमिका घेऊन सोडविण्याचा आपण प्रयत्न केला आहे. रोजगार हमी योजनेच्या वेळी देखील पक्षातीत अशी भूमिका घेण्यात आली. या प्रश्नाकडे पक्षातीत भूमिकेतून पाहिले पाहिजे आणि तसा विचार केला पाहिजे. कोठल्याही प्रगतीच्या आड धर्म येता कामा नये आणि तो आडवा येत असेल तर कठोर वृत्तीने तो दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि सक्तीचा कुटुंब नियोजनाचा कायदा केला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

नवबौद्धांच्या सवलतींचा आग्रह

(८ जुलै, १९७६)

अनुसूचित जाती-जमातींशी संबंधित कोणताही विषय सभागृहासमोर आला तेव्हा त्यावर भाष्य करण्यास दादासाहेब कधीही चुकले नाहीत. तसेच अनुसूचित जाती-जमातींना मिळणाऱ्या सवलतीपासून नवबौद्धांना वंचित ठेवू नये हा तर त्यांचा आग्रह हटकून असायचा. ८ जुलै, १९७६ रोजी महानगरपालिका (सुधारणा) विधेयक परिषदेत चर्चेला आले असतांना दादासाहेबांनी आपले सडेतोड विचार या शब्दात मांडले.

अध्यक्ष महाराज, येथे जे विधेयक आणण्यात आले आहे त्याला मी मन:पूर्वक पाठिंबा देऊन त्याचे स्वागत करीत आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, देश स्वतंत्र झाल्यानंतर या देशाला स्वतंत्र असे संविधान प्राप्त झाले. संविधानात ज्या निरनिराळ्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यात राजकीय स्वरूपाच्या प्रतिनिधित्वासंबंधी विशेष तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये या देशातील मागासवर्गीयांना विशेष सवलती देण्याचा दृष्टिकोन स्वीकारण्यात आलेला होता. या भारतीय घटनेचा मसुदा तयार करण्यसाठी जी समिती निर्माण करण्यात आलेली होती त्याचे अध्यक्ष, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे सांगितले होते की, या देशातील जो मागासलेला समाज आहे. सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने जो दुर्बल आहे त्याला विविध राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अधिकार मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्यांना ह्या गोष्टी देणे म्हणजे आपण त्यांच्यावर काही दया दाखवीत आहोत अशातला भाग नाही. भारतीय संविधानात त्यादृष्टीने व्यवस्था करण्यात आलेली आहे.

मूळ कल्पना अशी होती की, या दुर्बल घटकांना इतर समाजाच्या बरोबर येण्यास काही कालावधी लागेल त्यामुळे काही वर्षांपर्यंत त्यांना हे हक्क आणि सवलती मिळत राहिल्या पाहिजेत, व त्या योगे त्यांच्यातील राजकीय दुबळेपणा, सामाजिक आणि आर्थिक दुबळेपणा नाहीसा झाला पाहिजे. आणि म्हणून भारतीय घटनेमध्ये या नुकसानीबाबत नुकसानभरपाई देण्याचा सिद्धांत स्वीकारण्यात आला. त्यांतील अन्य गोष्टींचा उल्लेख करण्याचा हा प्रसंग नव्हे, परंतु हे राजकीय प्रतिनिधित्व या लोकांना नाकारण्यात आले होते ते देण्यात आले पाहिजे ही गोष्ट मान्य करण्यात आली. आतापर्यंत फक्त राजकीय प्रतिनिधित्वाचाच विचार होत होता जसे पार्लमेंटमध्ये प्रतिनिधित्व, विधानसभांत प्रतिनिधित्व, जिल्हा परिषदा आणि म्युनिसिपालिट्या यांमध्ये प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. आपल्या राज्यात या सर्व प्रकारच्या संस्थात या लोकांना राजकीय प्रतिनिधित्व देण्यात आले होते. परंतु याला एक अपवाद होता आणि तो अपवाद म्हणजे मुंबई कार्पोरेशन होय. ही त्रुटी आपल्या निदर्शनात आज आली असे नाही तर बरेच दिवसांपूर्वी आली आणि या विषयावर खालच्या आणि वरच्या अशा दोन्हा सभागृहात निरनिराळ्या स्वरूपात चर्चाही झाली. मला आठवते की अशाच प्रकारची चर्चा थोड्या दिवसांपूर्वी खालच्या सभागृहात झाली होती व त्या चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की ही विसंगती आहे व ती दूर केली पाहिजे. या विषयाला धरून लवकरच या विधेयकाला दुरुस्ती या ठिकाणी सुचविण्यात आली आणि हे विधेयक सभागृहात आज चर्चेसाठी आहे त्याबद्दल मी या विधेयकाच मन:पूर्वक स्वागत करतो आणि सरकारला धन्यवाद होतो. यामध्ये दुर्बल घटकाची जी व्याख्या करण्यात आली, त्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बौद्ध, भटक्या जमाती आणि विमुक्त जाती यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या दृष्टीने विचार केला तर या विधेयकात एक तांत्रिक दोष राहून गेला आहे असे वाटते. खंड दोन सबसेक्शन (ए) च्या पाचव्या सबक्लॉजमध्ये फक्त शेड्युल्ड कास्टचाच उल्लेख करण्यात आलेला आहे. माझ्या मते त्यात शेड्युल्ड कास्ट, शेड्युल्ड ट्राईब्ज, विमुक्त जाती, भटक्या जमाती व बौद्ध या सर्वांचा उल्लेख करण्यात आला पाहिजे. या ठिकाणी जे राजकीय प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे ते ॲडहॉक बेसिसवर देण्यात आलेले नसून जनगणनेमध्ये या निरनिराळ्या जाती-जमातीचे जे प्रमाण आहे ते प्रमाण पाहून नंतर हे प्रतिनिधित्व ठरविण्यात आलेले आहे. आपल्या राज्यात १३ टक्के अनुसूचित जातीचे प्रमाण आहे. १७ टक्के भटक्या जमाती आहेत आणि ४ टक्के विमुक्त जाती आहेत. असे हे २४ टक्के प्रमाण आहे. पहिल्यांदा हे प्रमाण राजकारणाकरिता मान्य करण्यात आले म्हणजे पॉलिटिकल लेव्हलवर मान्य झालेले आहे आणि आता तर ते शाळा कॉलेजात प्रवेश देण्याकरिता आणि नोकऱ्या देण्याकरिता याचा उपयोग करण्यात येत आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की १३ टक्के शेड्युल्ड ट्राइब्जची लोकसंख्या कशावरून ठरविली हे आपण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की १९७१ सालची आपल्या राज्याची जी शिरगणती आहे तो बेस धरून हे प्रमाण काढण्यात आलेले आहे. या दृष्टीने मुंबई शहरामध्ये या निरनिराळ्या कॅटेगरीच्या लोकांचे एकंदर लोकसंख्येशी काय प्रमाण पडते हे श्री. राजभोज यांनी वर्क आऊट करून सभागृहाला सांगितले आहे. या शहरात शेड्युल्ड कास्ट किती, शेड्युल्ड ट्राईब्ज किती भटक्या जमातीचे किती या सर्वांचा गुणाकार भागाकार करून काढली आहे तेव्हा या दृष्टीने या लोकांना प्रतिनिधित्व देण्याचा विचार करावा अशी मला विनंती करावयाची आहे.

दुसरा मुद्दा या ठिकाणी सन्माननीय मित्र श्री. राजभोज आणि श्री. पाटील यांनी उपस्थित केला आहे त्याबद्दल मी काही मत व्यक्त करणार नाही. कारण मला त्यावर बोलावयाचे नाही. On par for socio-economic purpose, not for political purpose. असे ठरविले आहे परंतु असे का ठरविले याचा आग्रह माझ्यासारख्याला धरणे अशक्य आहे. याबाबत सन्माननीय

एचबी ११८०—२२अ

सभासद श्री. राजभोज यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे ते त्यांनी या ठिकाणी वाचून दाखविले आहे. More than 50 per cent Scheduled Caste people have been converted to Buddhism and it is heartening to note that the Chief Minister has taken up the matter with the Prime Minister relating to the extension of facilities now being enjoyed by Scheduled Castes to Nav Buddhas. महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर १३ टक्क्यांमध्ये ७ टक्के नवबौद्ध आहेत आणि ६ टक्के शेड्युल्ड कास्ट आहेत. याचा अर्थ असा की ६० टक्क्यांच्या वर आहे. तरीही पोस्टात, रेल्वे, टेलिग्राफ वगैरे कार्यालयात त्यांना प्रतिनिधित्व मिळत नाही. ही अनॉमली आहे ती दूर करण्यात आली पाहिजे. सरकारी नोकरीत यांना म्हणजे नवबौद्धांना रिझर्वेशन ७ टक्के आहे आणि या निरनिराळ्या संस्था, पोस्ट आणि टेलिग्राफ, रेल्वे, यामध्ये या प्रकारची सोय नसावी ही गोष्ट बरोबर नाही. या ठिकाणीही अशी व्यवस्था करण्यात आली पाहिजे. या सभागृहाच्या भावना या खात्याचे राज्यमंत्री श्री. जगेश देसाई माननीय मुख्यमंत्र्यांना कळवतील व ही ॲनॉमली लवकरच दूर होईल अशी मी अपेक्षा करतो आणि आपले भाषण संपवितो. हे विधेयक आणल्याबद्दल सरकारचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

❑❑❑

४४ व्या घटनादुरुस्ती विधेयकावरील अभ्यासपूर्ण भाषण

(२ डिसेंबर, १९७६)

आणीबाणीच्या काळामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द जोडण्यात आले. त्यासंबंधीचे संविधान दुरुस्ती विधेयक अनुमोदनासाठी महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर दिनांक २ डिसेंबर १९७६ रोजी आले असता दादासाहेबांनी या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण केले. भाषणाच्या ओघात त्यांनी "न्यायपालिकेने संविधानाला नख लावण्याचा" प्रयत्न कसा केला हेही सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले त्या भाषणाचा हा वृत्तांत.

अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री श्री. खताळ यांनी घटनादुरुस्तीसंबंधी जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, हा प्रस्ताव मांडताना त्याचे अत्यंत जोरदार आणि विद्वतापूर्ण समर्थन माननीय मंत्र्यांनी केले. त्याचप्रमाणे एक भरीव वैचारिक भूमिका घेऊन माझे मित्र सन्माननीय सभासद श्री. एन. डी. पाटील यांनी केवळ विरोधाकरिता विरोध नव्हे तर एक कन्स्ट्रक्टिव्ह ॲप्रोच घेऊन यातील जे स्वीकारण्यासारखे आहे ते अत्यंत खुल्या अंत:करणाने स्वीकारले आणि एका गतिमान दिशेने जे व्हावयास पाहिजे त्या संबंधीची कळकळ व्यक्त केली. माझे वैयक्तिक मत असे आहे की, या दृष्टीने त्यांचे भाषण विचारयुक्त झाले आणि त्यांचा सूर विरोधासाठी विरोध असा नव्हता. आणि म्हणून सर्वप्रथम श्री. खताळ साहेब

आणि प्राध्यापक एन. डी. पाटील या दोघांचेही मी अभिनंदन करतो. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मी तपशिलात न जाता घटना समितीमध्ये सुरुवातीला आपल्या देशाचे दिवंगत पंतप्रधान श्री. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी एक ऑबजेक्टिव्ह रेझोल्यूशन प्रस्तुत केला होता आणि त्या प्रस्तावावर बोलताना तिची म्हणजे घटनेची दिशा समाजवादी असेल, समाजवादी राज्याची असेल अशी कल्पना मांडली होती. अध्यक्ष महाराज, १९४७ ते १९५० चा कालखंड आणि त्या वेळची घटना समिती यांची जर आपण कल्पना केली तर हिमालयासारखे नेतृत्व असणारे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या या ठरावाची काय गत झाली याचा आपल्याला विचार करावा लागेल. या ठरावातील "आर्थिक आणि सामाजिक न्यायावर" या शब्दप्रयोगालाच घटना समितीच्या सदस्यांनी आक्षेप घेतला. माझे मित्र सन्माननीय सभासद श्री. खानोलकर यांनी म्हटल्याप्रमाणे जर समाजवादी तरतुदी भारतीय घटनेत करावयाच्या असतील तर त्या बाबतच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार लक्षात घेतले पाहिजेत. नेहरूंच्या ऑब्जेक्टिव्ह प्रस्तावावर भाष्य करताना बाबासाहेब आंबेडकर असे बोलले होते, आणि मग शेवटी हा समाजवादी प्रयोग, आर्थिक आणि सामाजिक न्यायाचा हा प्रयोग हा सध्याच्या, विद्यमान भारतीय स्ट्रक्चरला, स्थितीला पेलणार नाही त्यामुळे Status quo डिस्टर्ब होईल. असा युक्तिवाद घटना समितीच्या त्यावेळच्या सभासदांनी केला होता आणि त्यामुळे स्थितीप्रियता आणि गतिमानता हा संघर्ष आला. आणि या संघर्षामुळे शेवटी पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघेही अल्पमतात पडले आणि म्हणून तो शब्दप्रयोग न बदलता, सामाजिक आणि आर्थिक न्याय यांचा उल्लेख न करता तसाच प्रस्ताव पास करावा लागला. आणि मग त्यांनी अशी चिंता व्यक्त केली होती की, आमच्या मनामध्ये तळमळ असतानाही या कालखंडामध्ये स्थितिप्रियतावाद्यांचे वजन त्यावेळच्या घटना समितीमध्ये जास्त असल्यामुळे तडजोड करून हा ठराव स्वीकारावा लागत आहे.

अध्यक्ष महाराज, मी आता दुसऱ्या मुद्याकडे वळतो की, समझोता म्हणजे काय? ती तडजोड का करावी लागली? संपूर्ण घटना समितीमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अनेक जे गतिमान नेतृत्वाच्या दिशेने होते त्यांची संपूर्ण भाषणे वाचली तर मग स्थितिप्रियता आणि गतिमानता या संघर्षातला सुवर्ण मध्यबिंदू म्हणजे राज्याची मार्गदर्शक तत्त्वे आणि ती स्वीकारली. आणि या मार्गदर्शक तत्त्वांचा स्थितिप्रियतेविरुद्ध राज्याच्या धोरणाच्या नीतीने स्वीकार करावा लागला. आणि आज ज्याला आपण लँड मार्क म्हणतो तो या संविधानाच्या दुरुस्तीमधला भाग असा आहे की, राज्याच्या धोरणाची जी मार्गदर्शक तत्त्वे आहेत त्यांना झुकते माप दिले आणि Status quo सांभाळला. पंडित नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांची जी कल्पना होती तिचे अवास्तव स्तोम कमी करून मूलभूत तत्त्वे आणि मार्गदर्शक तत्त्वे यांना झुकते माप दिले आणि हा घटनादुरुस्तीचा लँड मार्क आहे. आणि म्हणून या घटनादुरुस्ती विधेयकाचे मी स्वागत करतो.

अध्यक्ष महाराज, मी जरी प्राध्यापक श्री. एन. डी. पाटील यांच्या विचारांचे समर्थन केले असले तरी त्यांनी जे काही विचार या सभागृहापुढे व्यक्त केले ते राजकीय धोरणाच्या दृष्टीने तोट्याचे आहेत आणि म्हणून दूरदृष्टीने त्यांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. फ्रीडम ऑफ दी स्पीच हा शब्दप्रयोग करताना संपूर्ण अडथळे जे न्यायालयाच्या रूपाने आणले आणि न्यायालयाने या देशामध्ये स्वीकारलेली भूमिका ही गतिमान दिशेच्या दृष्टीने अडथळ्याची होती, तोट्याची होती ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. आणि म्हणून संपूर्ण उद्दिष्ट, संपूर्ण ओझे न्यायालयावर फेकले. त्यांनी हे अडथळे आणण्यात मुख्य हिस्सा लॉयन्स शेअर घेतला आणि ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. याबाबतचे जर बोलके उदाहरण द्यावयाचे झाले तर भारतीय घटना जेव्हा बालकाच्या

स्वरूपात होती–इनफन्ट होती, १९५१ साली तिचा जन्म होऊन तिला १ वर्ष झाले नाही, ती एक वर्षाची झाली नाही तोच तिच्या घशाला सुप्रीम कोर्टाने नख लावले. १९५१ साली भारतीय घटनेचा जन्म झाला आणि तो ९-१० महिन्यांच्या वयाची झाली नाही तोच तिच्या नरडीचा घोट घेण्याचा प्रयत्न मद्रासच्या निकालाविरुद्ध निर्णयाच्या निमित्ताने सुप्रीम कोर्टाने केला. ज्या घटनेची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीचे अध्यक्ष म्हणून केली, त्यात सोशल बॅकवर्डनेस ॲण्ड इकॉनॉमिक बॅकवर्डनेस म्हणून ज्या सवलती प्रदान केल्या त्यांचा विपर्यास करून त्याचा विपर्यस्त अर्थ सुप्रीम कोर्टाने लावून शब्दाच्या आधारे, ज्या सवलती प्रदान केल्या होत्या त्यांचा आधार घेऊन तसे डिस्क्रीशन आम्ही वापरू देऊ शकत नाही. असा अर्थ सुप्रीम कोर्टाने लावला. म्हणून १९५१ सालीच घटनेच्या कलम १५ ला दुरुस्ती करून कलम १५(४) हे नवीन कलम घालावे लागले आणि या कलमान्वये केवळ ज्ञान असेल आणि प्रज्ञा आणि करुणा नसेल तर त्याचा काही उपयोग नाही ही गोष्ट आपण सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. ज्या वैचारिक पद्धतीने आम्ही समाजाच्या दुर्बल घटकांना आणि गरीबांना इतरांबरोबर आणण्याचा विचार व प्रयत्न करतो आहोत ह्यात कोणी अडथळे आणण्याचा प्रयत्न केला असेल तर तो सुप्रीम कोर्टाने, हे अडथळे आणण्याचा लॉयन्स शेअर सुप्रीम कोर्टाने स्वीकारला. आणि मग १९५१-५२ ते आज १९७६ पर्यंत कोर्टाचा झालेला प्रवास आणि त्यांनी दिलेले निर्णय, त्यांनी दिलेले निकाल आणि त्यांनी लावलेले अन्वयार्थ यांचा उल्लेख श्री. खताळ साहेबांनी केला. मी जो प्रश्न मग विचारला तो असा की, व्यक्तिसापेक्ष निर्णय देण्याची पद्धत कोर्टाने स्वीकारल्यामुळे न्यायदेवतेसंबंधी जनतेच्या मनात जो आदर होता तो आदर नष्ट होऊन गेला ना? आणि म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंनी न्यायालयासंबंधी संविधानात काय तरतूद असावी ते सांगितले. ते म्हणाले की, ठीक आहे, हियर ॲण्ड देअर टेक्निकल चुका असतील तर त्या दुरुस्त करू, पण राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या विरुद्ध निर्णय झाला असेल तर ते चुकले. अध्यक्ष महाराज, न्याय संस्थांनी निर्माण केलेले अडथळे फ्रीडम ऑफ दी स्पीच हा शब्द अप्रस्तुत असला तरी-त्याचा दुरुपयोग करून घटनेच्या गतिमानतेमध्ये अडथळे आणण्याचा लॉयन्स शेअर हा न्याय संस्थांनी घेतला आणि म्हणून मग मार्गदर्शक तत्त्वांना झुकते माप देऊन समाजवादाचे परिवर्तन आणि समाजवादी समाज यांच्या विरोधी आपण जाऊ शकत नाही असा विचार, अशी कल्पना घटनेचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती आणि या निमित्ताने मार्गदर्शक तत्त्वांना झुकते माप देऊन टाकले. आणि म्हणूनच मी म्हटले की, आमच्या भारतीय घटनेच्या दुरुस्तीमधला हा एक लँड मार्क आहे.

अध्यक्ष महाराज, पूर्वी प्रिॲम्बलमध्ये जे शब्द होते त्यात आता बदल करण्यात आलेला आहे आणि हा बदल फार महत्त्वाचा आहे. आताच्या प्रिॲम्बलमध्ये दोन अतिशय महत्त्वाचे शब्द वापरण्यात आले आहे ते म्हणजे "समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष" त्या ठिकाणी सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक असा उल्लेख आहे. आपण जेव्हा कोणताही कायदा करतो तेव्हा त्या कायद्याचे जे प्रिॲम्बल असते ते त्या संपूर्ण कायद्याचे होकायंत्र म्हणजे मार्गदर्शक असते. आपल्या देशाने धर्मनिरपेक्षता मान्य केलेली आहे आणि सामाजिक व आर्थिक न्याय आम्हाला प्रस्थापित करावयाचा आहे हे आम्ही मान्य केलेले तत्त्व आहे. या देशात आम्हाला सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणावयाचे आहे व त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत हेच आम्ही या प्रिॲम्बलने दाखवून देत आहोत. गेल्या अनेक वर्षापासून आमच्या मनात ही बोच होती की आम्हाला ज्या मार्गाने जावयाचे होते त्या मार्गाने आम्ही जाऊ शकत नव्हतो. आम्हाला धर्मनिरपेक्ष आणि शोषणमुक्त समाज निर्माण करावयाचा होता. आता आम्ही

ही गोष्ट घटनेच्या प्रिॲम्बलमध्ये अगदी स्पष्टपणे नमूद केलेली आहे. यापुढे आम्हाला ज्या दिशेने प्रवास करावयाचा आहे त्याची आम्ही स्पष्ट कल्पना या देशातील जनतेला आज दिलेली आहे.

आतापर्यंत आम्ही फक्त आपल्या हक्काचीच जाणीव ठेवत आलो परंतु हक्काबरोबर आपली काही कर्तव्येही आहेत याचा आम्हाला विसर पडलेला होता. परंतु आता आम्ही कर्तव्यांचाही एक चॅप्टर आपल्या नवीन घटनेत टाकलेला आहे. हक्काबरोबरच काही कर्तव्येही येतात हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. स्वातंत्र्याबरोबरच काही बंधनेही येत असतात. आम्हाला जर रात्री सायकलवरून जायचे असेल तर सायकलला दिवा लावला पाहिजे असा नियम आहे. आता हे जर बंधन असेल तर त्याचे पालन आम्ही केले पाहिजे की नाही. ही गोष्ट सर्वांच्या हिताची आहे. सायकलला दिवा लावला तर त्यामुळे ॲक्सिडेंटस् होणार नाहीत. हक्काबरोबरच काही कर्तव्येही येतात ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे. आम्हाला फक्त हक्क होते आणि कर्तव्याचा आपल्याला विसरच पडत चालला होता. स्वातंत्र्याबरोबरच काही बंधनेही आपल्याला मान्य करायलाच हवी. कर्तव्याचे परिशिष्ट यात नव्याने चालण्यात आले आहे. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. या घटना दुरुस्ती विधेयकांसंबंधी बोलत असतांना असे सांगण्यात आले होते की आणीबाणीवर बोलता येणार नाही. या गोष्टीचा श्री. पाटील यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला. परंतु, त्या संबंधात पासिंग रेफरन्स देता येणार नाही असा त्याचा अर्थ होत नाही. या देशात जी इमर्जन्सी जाहीर करण्यात आली ही एकंदर परिस्थिती पाहूनच करण्यात आलेली आहे. घटनाकारांनी जेव्हा घटना तयार केली तेव्हा या गोष्टीची तरतूद त्या ठिकाणी करून ठेवली होती. इमर्जन्सी जाहीर करणे ही काही आनंदाची बाब असू शकत नाही. आमच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी सुद्धा इमर्जन्सी जाहीर करताना पेनफुल नेसेसिटी असे त्याचे वर्णन केले आहे. एखादे कुलूप जर उघडावयाचे झाले तर त्या कुलूपाला योग्यप्रकारे लागू शकेल अशी किल्ली असावी लागते. एखादे वेळी जर ॲबनॉर्मल सिच्युएशन निर्माण झाली असेल तर त्याला तोंड देण्यासाठी ॲबनॉर्मल मार्गाचाच अवलंब करावा लागतो. इमर्जन्सी जाहीर करणे हे जर ॲबनॉर्मल आहे तर त्यासाठी निर्माण झालेली परिस्थितीही ॲबनॉर्मलच होती असे म्हणावे लागेल. जर एखादे वेळी परचक्राचा धोका निर्माण झाला किंवा अंतर्गत परिस्थिती बिकट होऊन जर एखादा धोका निर्माण झाला तर त्याला परिणामकारक रीतीने तोंड देता यावे यासाठी घटनाकारांनी घटनेतच त्यासाठी तरतूद करून ठेवलेली होती. केंद्र हे नेहमी मजबूत राहिले पाहिजे ही गोष्ट घटनाकारी मान्य केली असून त्यासाठीही घटनेत तरतुदी करून ठेवल्या आहेत. सकृद्दर्शनी केंद्राला ज्यादा अधिकार देणे बरोबर वाटत नसले तरी असे अधिकार असणे आवश्यक असते हे आपणही मान्य केले पाहिजे. त्या सर्व अधिकारांचा केंद्र सर्रास वापर करीत असे मानणे बरोबर होणार नाही. सध्याच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही राज्यात जरूर वाटली तर केंद्राला आपले पोलीस दल किंवा सैन्य पाठविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. राज्य सरकारच्या मागणीची वाट पाहण्याचे त्यांना कारण नाही. त्याचप्रमाणे दल केंद्र सरकारच्याच अधिपत्याखाली काम करणार आहे ही गोष्टही योग्य अशीच आहे. ही तरतूद सकृतद्दर्शनी योग्य वाटत नसली तरी याच्या पाठीमागील भावना काय आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. ही तरतूद कोणत्याही राजकीय हेतूने करण्यात आलेली आहे असे समजणे योग्य होणार नाही. अशा प्रकारची तरतूद असलीच पाहिजे असे कोणीही विचारवंत मान्य करील. केंद्र कसे असावे यासंबंधात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते पाहण्यासारखेच आहेत. त्यात ते म्हणतात——

"The Concept of federalism means that the State is a Federation in

normaly but unitary in emergency. To him the "Indian Union" indicates two things, *viz* (i) that the Indian Federation not the result of an agreement by the units and (ii) that the competent units have no freedom to secode from it. His view is federal, indeed, but without contract and freedom to secode, which means one strong nation to hold the people together irrrespective of State Loyalities".

आपला एकंदर देश जर पाहिला तर त्याचा विस्तार फार मोठा असून या देशात अनेक विविधता आपल्याला आढळून येतील आणि आपल्याला विविधतेतून एकात्मता साध्य करावयाची आहे हे विसरून चालणार नाही. जातीजातीतील मतभेद कसे दूर होतील, सर्व लोक गुण्यागोविंदाने कसे राहतील, दुर्बल घटक आर्थिकदृष्टीने सबल कसा होईल हे सर्व आपल्याला पहावयाचे आहे व त्यासाठी केंद्र मजबूत असणे फार आवश्यक आहे. बंगाल किंवा तामिळनाडूमध्ये काय घडले याचा इतिहास अगदी ताजा आहे. घटनेत पूर्वीच्या ज्या तरतुदी होत्या. त्या पाहता केंद्र सरकारला अनेक वेळा तातडीने त्यांच्या कारभारात हस्तक्षेप करणे कठीण होऊन बसले. आणि अशी जर परिस्थिती चालू दिली तर आपल्याला जो आर्थिक आणि सामाजिक न्याय जनतेला मिळवून द्यावयाचा आहे त्यात अडथळे निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत म्हणूनच आपण केंद्र हे नेहमीच मजबूत राहिले पाहिजे असे म्हणतो. देशात किंवा एखाद्या राज्यात जेव्हा ॲबनॉर्मल सिच्युएशन निर्माण होते तेव्हा तिला तोंड देण्यासाठी म्हणून राष्ट्रपतींना काही विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. इन दी ग्रेटर इंटरेस्ट ऑफ दी नेशन, राष्ट्रपती त्या अधिकाराचा उपयोग करतील. अशाप्रकारचे अधिकार कोणत्याही देशाच्या घटनेत दिलेले असतात असे आपल्याला दिसून येईल.

श्री. एन. डी. पाटील यांनी असा उल्लेख केला की घटनेत ज्या गोष्टी पूर्वी सांगण्यात आलेल्या होत्या त्याची अंमलबजावणी करण्यात उशीर का केला? माझ्या मते हा प्रश्न अप्रस्तुत आहे. पूर्वी एखादी गोष्ट केली नसेल किंवा काही कारणाने किंवा अडचणीमुळे करता आली नसेल तर ती आता करू नये असे कोणी म्हणणार नाही. त्याच्या मार्गात जे अडथळे येत होते ते आता या घटना दुरुस्तीने दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठीच घटनेत या दुरुस्त्या करण्यात येत आहेत असा आपणा सर्वांचा विश्वास असायला हवा.

यानंतर मला आणखी एक-दोनच मुद्यांचा उल्लेख करावयाचा आहे. आम्हाला आमच्या देशात आर्थिक आणि सामाजिक बदल घडवून आणावयाचे आहेत. त्यासाठी आम्ही कटिबद्ध झाले पाहिजे. श्री. पाटील यांनी असा प्रश्न उपस्थित केला की हे बदल घडवून आणण्यास आतापर्यंत कोणी अटकाव केला? आतापर्यंत हे बदल का घडून आले नाहीत. हे बदल घडवून आणण्यासाठी आपली राज्य घटना ही गतिमान असायला हवी होती. त्यात रिजिडिटी आलेली होती व आपल्याकडील न्यायालयांनीही यात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही. आता या सामाजिक आणि आर्थिक बदलाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. आपल्याला जे सामाजिक बदल घडवून आणावयाचे होते त्यात गती येऊ शकली नाही. याच वर्षी आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जन्मदिनी आपण अतिशय महत्त्वाचा असा सिव्हिल राईट प्रोटेक्शन ॲक्ट पास केला आहे. यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीत मी स्वतः होतो व आम्ही ज्या काही रेकमेंडेशन केल्या होत्या त्यांचा समावेश तंतोतंत या ॲक्टमध्ये करण्यात आलेला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. आपल्या

पंतप्रधानांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने ही जी भेट या देशातील दलित बंधूना दिली यात ह्या सर्व गोष्टी आलेल्या आहेत. अध्यक्ष महाराज, मला आपल्याला सांगावयास आनंद वाटतो की मी आणि माझ्या पक्षाचे जनरल सेक्रेटरी श्री. कुंभारे यांनी मिळून जे ड्राफ्ट बिल तयार केले ते त्यांनी जसेच्या तसेच मान्य केले आहे. त्यात अस्पृश्यता पाळण्यासाठी काय काय डिस्क्वालिफिकेशन सांगितल्या आहेत याचा विचार केला तर ते फार पुरोगामी बिल आहे असे मला वाटते. आता अस्पृश्यता हा दखलपात्र गुन्हा आहे, त्याचप्रमाणे तो नॉनकंपाऊंडेबल ऑफेन्स करण्यात आलेला आहे. Now the burden of proof is shifted to the offender. त्याचप्रमाणे आता धर्माच्या नावावरही अस्पृश्यतेचा प्रचार करता येणार नाही. सन्माननीय सभासद श्री. राजभोज यांनी सांगितले की मनुस्मृती जाळून टाका, आपण धर्माचा प्रचार करत होतो असा आधार घेऊन शंकराचार्यांनी आपली सुटका करून घेतली परंतु या पुढे आता त्या प्रकारची सुटका कोणालाही करून घेता येणार नाही. Now nobody can preach untouchability in support of any religion or by taking support of any book. जी भीती एन. डी. पाटलांना वाटत होती ती त्यांनी बाळगण्याचे कारण नाही. Not only that but now if anybody is convicted under the Civil Protection Rights Act, he will not be eligible to contest elections from Grampanchayats to parliament. म्हणजे ज्याला अस्पृश्यतेच्या गुन्ह्याबाबत शिक्षा होईल त्याला यापुढे या देशात ग्रामपंचायतीपासून ते पार्लमेंटपर्यंतच्या निवडणुकीला अपात्र ठरविण्यात आले आहे. श्रीमती इंदिरा गांधी आपल्या देशाच्या पंतप्रधान यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त या देशातील दलित समाजाला ही जी भेट दिली आहे त्यामुळे या देशाच्या वाटचालीची दिशा दलित समाजाच्या दृष्टीने एकप्रकारे निश्चित झालेली आहे. त्यांनी १९ नोव्हेंबर रोजी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी फार मोठी भेट दिली आहे हे विसरून चालणार नाही मात्र यांत निवडणूक लढविण्यासंबंधी जी डिस्क्वालिफिकेशन सांगण्यात आली आहे व हा गुन्हा करणाऱ्याला निवडणूक लढविण्यापासून अपात्र ठरविले आहे ती गोष्ट मला स्वतःला जास्त पसंत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे——

> "In the greater interest of democracy for one man there should be one vote and one value".

रिस्ट्रिक्टेड फ्रॉचाइसच्या मी स्वतः विरोधात आहे. कारण असे केल्यास बऱ्याच बांधवांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करण्यासारखे आहे. असे करणे म्हणजे दुधारी तलवार आहे. आपल्याला टोटल रिव्होल्यूशन करावयाचे आहे तेव्हा या प्रकारे त्यावर बंधन आणून मतदानापासून वंचित करणे बरोबर होणार नाही. पैसे देऊन मत विकत घेण्यात येते त्यांना पाच रुपयांची दारू पाजण्यात येते आणि लोकांची मते विकत घेण्यात येतात म्हणून आपल्याला गरिबांना मतदानाचा हक्क नाकारता येणार नाही. तेव्हा आपण जर रिस्ट्रिक्टेड फ्रान्चाइसचा प्रकार केला तर ती गोष्ट गरिबांच्या अंगाशी येईल ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. अध्यक्ष महाराज, शेवटी मला इतकेच सांगावयाचे आहे की याबाबत माझी राजकीय मते व्यक्त केलेली आहेत. त्यावर मी डिटेलमध्ये बोललो नाही आणि ते यावेळी शक्यही नव्हते. फक्त धावते समालोचन करावे लागले. शेवटी या विधेयकाचे समर्थन करून मी आपले भाषण संपवितो.

❑❑❑

'संविधान' हा श्रद्धेचा विषय

(३ एप्रिल, १९७८)

ब्रिटनधील हाऊस ऑफ कॉमन्सच्या 'स्पीकर'बद्दल असे म्हटले जाते की, स्पीकर इज ए पर्सन हु हॅव टू स्पीक लेस. भारतातील कायदेमंडळामधील सभापती वा अध्यक्षांनाही ते लागू पडते. पण सभागृहांचे उपाध्यक्ष वा उपसभापती यांना मात्र चर्चेत भाग घेता येतो. दादासाहेबांनी विधानपरिषदेचे उपसभापती या नात्याने या संधीचा वेळोवेळी फायदा घेऊन विविध विषयावरील आपले विचार प्रकट केले. संविधान हा तर दादासाहेबांच्या केवळ आस्थेचाच नव्हे तर श्रद्धेचा विषय. त्याच्याच ४४ व्या दुरुस्तीचे विधेयक जेव्हा महाराष्ट्र विधानपरिषदेकडे अनुमोदनासाठी आले त्यावेळी ३ एप्रिल, १९७८ रोजी दादासाहेबांनी संविधानाबद्दलची आपली भूमिका स्पष्ट केली. त्यावेळी केंद्रात जनता पार्टीचे सरकार होते. ही पार्श्वभूमी त्यांच्या या भाषणाला लाभली त्यावेळी ते म्हणाले...

अध्यक्ष महाराज, ४४व्या घटनादुरुस्तीला मी या ठिकाणी पाठिंबा देण्याकरिता उभा आहे. या दुरुस्तीला पाठिंबा देताना ज्या तरतुदी ४२ व्या घटनादुरुस्तीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या होत्या आणि ४४ व्या घटनादुरुस्तीने ज्या खंड २ मधल्या सुधारणा वगळल्या तेवढ्या मर्यादेपुरता माझा जरूर पाठिंबा आहे. परंतु त्याचबरोबर या घटनादुरुस्तीच्या विधेयकाला पाठिंबा घटनेसंबंधी आमूलाग्र बदलाच्या कल्पना ज्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी दिल्या नाहीत. मग ते केंद्र सरकारचे पूर्वीचे सरकार असो किंवा नव्याने जनता पक्षाची राजवट केंद्रात आल्यानंतर आलेले सरकार असो. भारतीय संविधानात आमूलाग्र बदल व्हावा, एका विशिष्ट दृष्टिकोनातून बदल व्हावा म्हणून त्या बदलांच्या दृष्टीने जे घटनादुरुस्ती विधेयक आहे हे भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे आणि हे विधेयक आणल्याबद्दल मा. सदस्यांचा मी आभारी आहे. परंतु जेवढा महत्त्वाचा बदल या ठिकाणी आहे तेवढ्या महत्त्वाच्या बदलाला पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे. या ठिकाणी माझे मित्र सन्माननीय सभासद श्री. चौधरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हवाला देऊन सांगितले ते सत्य आहे. परंतु संविधानासंबंधी बोलत असताना त्यांनी सांगितले आहे की, संविधान चांगले किती वा वाईट किती ही महत्त्वाची बाब नाही. संविधानाची जी अंमलबजावणी आहे ती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचू शकते का हे महत्त्वाचे आहे. समाजातील जो दुर्बल घटक आहे त्याला न्याय देण्याच्या दृष्टीने, समाजातील शेवटच्या थरातील जो घटक आहे त्याला न्याय देण्याच्या दृष्टीने संविधान दुरुस्ती वा तिची अंमलबजावणी कितपत यशस्वी झाली याला महत्त्व आहे. दुर्दैवाने जनता पार्टीच्या या दुरुस्तीने आजही या बाबीला स्पर्श केलेला नाही. ३१-डी अन्वये राष्ट्र विघातक संघटना वा कार्यवाहीलाबंदी असावी याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

भारतीय संविधानामध्ये अशा तऱ्हेची तरतूद पूर्वी असल्यानंतर आणि त्या तरतुदीद्वारे संपूर्ण बाबीची दखल घेण्यासारखी असल्यानंतर या विशेष तरतुदीची आवश्यकता नाही याबाबत मी सहमत आहे. अध्यक्ष महाराज, सत्तास्थानी असलेले राजकीय पक्षाचे सरकार नेहमीच बदलत असते. आज केंद्रामध्ये जनता पक्षाचे सरकार आहे. काल काँग्रेसचे सरकार होते. उद्याचे सरकार कोणते असेल हे सांगता येत नाही. असे असले तरी स्वातंत्र्याच्या कल्पना बदलत्या परिस्थितीनुसार बदलल्या नाही तर मग वेळोवेळी आपल्या हिताच्या दृष्टीने हवे ते बदल करणे ही बाबदेखील करता कामा नये. अध्यक्ष महाराज, मर्यादित स्वातंत्र्य व मर्यादित प्रॉपर्टी हे दोन महत्त्वाचे निकष लोकशाहीमध्ये आहेत. दुर्दैवाने मागच्या सरकारने यात बदल केले नाहीत आणि घटनादुरुस्ती करताना जनता पार्टीनेही तसा दृष्टिक्षेप टाकला नाही. कारण दोघांनाही ते अडचणीचे आहे. जरी निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये जनता पार्टीने सांगितले असेल की, ४२वी घटनादुरुस्ती आम्ही आमूलाग्र बदलू. तसे अभिवचन दिले असले तरी ती बदलणे त्यांना गैरसोयीचे आहे. या संपूर्ण घटनादुरुस्तीचे मूळ स्ट्रक्चर शेवटच्या माणसाला न्याय देण्याचे असल्यामुळे उद्या मॅनेजमेंटमध्ये मजुराचे पार्टिसिपेशन असावे हा जरी ४२व्या घटनादुरुस्तीचा भाग असला तरी जनता सरकार तशी दुरुस्ती संपूर्णपणे करू इच्छित नाही. या आमूलाग्र घटना बदलण्याच्या नावाखाली ते तसा बदल करू शकत नाहीत. अध्यक्ष महाराज, त्याचप्रमाणे भारतीय संविधानाच्या प्रिॲम्बलमध्ये ज्या सोशॅलिझमचा उल्लेख आहे जो पूर्णपणे आम्हाला नको अशी दुरुस्ती जनता पार्टी करणार नाही. या घटनादुरुस्तीचा गाभा जोपर्यंत गरिबांच्या दिशेने बदलत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने घटनादुरुस्तीचे मूल्यमापन आपल्याला करता येणार नाही. म्हणून त्या संदर्भात मी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे एक कोटेशन सभागृहाला वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले आहे की,—

> "However bad a Constitution may be, it may turn out to be good, if those who are called to work it happen to be a good lot. The working of a Constitution does not depend wholly upon the nature of the Constitution."

अध्यक्ष महाराज, या सीमित अर्थाने जी तरतूद आहे त्या तरतुदीमुळे नागरी स्वातंत्र्यावर, व्यक्ती स्वातंत्र्यावर बाधा येता कामा नये. त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. अध्यक्ष महाराज, असे करीत असताना एका गोष्टीचा विचार आपण केला पाहिजे की, लिमिटेड लिबर्टीचा प्रश्न आल्यानंतर तो कोणत्या स्तरापर्यंत असावा हाही प्रश्न आहे. जनता पार्टीचा तो अंतर्गत विषय होतो. कारण शेवटी पार्टीमधील लोकशाही येथे आड येते. जनता पार्टीचे पंतप्रधान या संदर्भात एक बोलतात, त्यांच्या पार्टीचे नेते दुसरे वेगळे बोलतात. अध्यक्ष महाराज, अमर्याद स्वातंत्र्य कोणालाही वापरता आले नाही पाहिजे. परंतु त्याचबरोबर एक गोष्ट महत्त्वाची आहे की, वापरल्या जाणाऱ्या स्वातंत्र्याने वा अधिकाराने जर कोणाच्या स्वातंत्र्यावर गदा येणार असेल तर त्याचेही समर्थन करणे ठीक होणार नाही. विशेषत: न्यायालयाच्या मर्यादेसंबंधी मी बोलणार आहे. सुप्रीम कोर्ट व हायकोर्ट, स्टेट लॉ आणि सेंट्रल यासंबंधीची जी बंधने आली होती ती उठविण्यात आली. सुप्रीम कोर्टाला अधिकार काय? पार्लमेंटला अधिकार काय? या सर्वांबाबत या ठिकाणी चर्चा करण्यात आली. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेले कोटेशन सन्माननीय सभासद श्री. चौधरी यांनी या ठिकाणी वाचून दाखविले. त्याच्याशी

मी सहमत आहे. ६५ कोटींच्या या देशामध्ये माझ्या फंडामेंटल राईटवर गदा आणली वा ते दुखविले गेले म्हणून हायकोर्टामध्ये वा सुप्रीम कोर्टामध्ये जाणाऱ्यांची संख्या किती आहे? माझ्या मते एक सहस्त्रांश. हायकोर्ट वा सुप्रीम कोर्ट यांच्याकडे दाद मागण्यासाठी किती लोक येतात? फार तर १५-२० हजार लोक अध्यक्ष महाराज, मूलभूत हक्क हे एक लेणं भारतीय संविधानामध्ये असले तरी घटनादुरुस्ती अन्वये मूलभूत बदल जो करण्यात येतो तो किती लोकांच्या हिताचा आहे याचाही विचार आपण केला पाहिजे. या दुरुस्तीमुळे फार तर १०-२० हजार लोकांना न्याय मिळेल. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, मूलभूत प्रश्नाला हात घालण्याचा प्रयत्न या नव्या घटना-दुरुस्तीमधून कोणीच केलेला नाही. ४२ व्या घटना-दुरुस्तीमध्ये काही आमूलाग्र बदल करून प्रेस्टिज इश्यू बनविण्यात आला आहे. त्याऐवजी मूळ घटनेमध्ये राईट टू वर्कची तरतूद नाही. तो राईट टू वर्कचा अधिकार आम्ही तुम्हाला देऊ, मजूर लोकांना पोट भरण्याइतके वेज मिळत नाही, ते आम्ही देऊ. त्या दृष्टीने घटनेमध्ये बदल करू असा प्रयत्न मात्र येथे कोणत्या सरकारकडून झालेला नाही. नथ मोठी की नाक मोठे? नथ महत्त्वाची की, नाक महत्त्वाचे हा वाद दोन्ही सरकारने घातलेला आहे. गरीबांचे मूलभूत प्रश्न मागे राहिले आहेत. नाक मोठे की नथ मोठी याविषयी द्वंद्वयुद्ध करण्याऐवजी या देशातील ६५ कोटी लोकांना न्याय कसा मिळेल याचा विचार करण्याचे काम व त्यानुसार घटनादुरुस्ती करण्याचे काम जनता सरकारनेही केलेले नाही ही घटना अक्षम्य आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी काही मर्यादित स्वरूपात मी पाठिंबा देत असलो तरी एक गोष्ट या ठिकाणी स्पष्टरीत्या सांगू इच्छितो की, घटनादुरुस्ती करताना आपण केवळ राजकीय दृष्टिकोनातून पाहू नये. घटनेचा सुवर्णमध्य गरीब माणूस आहे. त्या घटनादुरुस्ती अन्वये आपण त्या केंद्रबिंदू मानलेल्या माणसाकडे सारे लक्ष देतो की नाही हे महत्त्वाचे आहे. अध्यक्ष महाराज, घटनादुरुस्तीसंबंधी जी काही चर्चा झाली ती कोंबडी आधी की अंडे आधी या स्वरूपाची आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटने काही कायदे केले तरी ते सर्व गरिबांच्या हिताचेच आहेत असेही मानता कामा नये. अध्यक्ष महाराज, ब्रिटनमध्ये त्यांनी असा कायदे केला की, तेथील सर्व मुलामुलींना नदीत बुडवून ठार मारावे. कदाचित तो कायदा पास झाला फक्त असा कायदा पास केल्यानंतर ते सरकार टिकेल की नाही याचा विचार करावा आणि तसा कायदा करावा. म्हणजे पार्लमेंटचे सार्वभौमत्व लक्षात घेऊनही त्यांनी असा कायदा केला पाहिजे की ज्यामुळे लोक ते सरकार बदलणार नाहीत. हायकोर्टाने हे पार्लमेंटचे सार्वभौमत्व मंजूर केले पाहिजे. सुप्रीम कोर्टाने कॉंस्टिट्युशन व्हॅलिडिटीच्या बाबतीत आपले निर्णय बऱ्याच वेळा बदललेले आहेत. राईट ऑफ प्रॉपर्टीच्या बाबतीत हेच झाले आहे. मी या बाबतीत सर्व केसेसचे वर्णन करीत बसत नाही. ज्युडिशिअरी इंडिपेंडंट आहे, त्यांचा मान राखला पाहिजे ही गोष्ट जरी खरी असली तरी रिस्पेक्ट ईज कमाडेन्ड, नॉट डिमान्डेड याचाही विचार केला पाहिजे. सामान्य माणसाच्या मनामध्ये ज्युडिशिअरिविषयी आदर असला पाहिजे. पण जो बदल आपण घडवू पाहतो तो सामान्य माणसाच्या, गरिबाच्या हिताचा असला पाहिजे. मूलभूत हक्काच्या नावाखाली बेसिक स्ट्रक्चरच्या नावाखाली जर आपण असे बदल करू लागलो तर जनतेच्या मनात आदर रहाणार नाही. राईट ऑफ प्रॉपर्टीचा अधिकार देण्यात आलेला आहे. या बाबतीत जर कोर्टाने मार्केट व्हॅल्यूप्रमाणे कॉम्पेसेशन देण्याचा निर्णय दिला तर तो निर्णय गरिबांच्या हिताचा आहे असे म्हणता येईल. गरिबांना कोर्टानी आणि जजेसनी न्यायाची आणि प्रेमाची वागणूक दिली पाहिजे. जो आवश्यक बदल आहे तो जरूर केला पाहिजे, पण त्यात देशातील गरीब माणसाचा विचार असला पाहिजे, सार्वजनिक हिताचा विचार

असला पाहिजे, समाजवादाचा विचार असला पाहिजे. म्हणून या ठरावाला मर्यादित पाठिंबा देत असताना मी ही गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याची संधी मुद्दाम घेत आहे. या प्रसंगी पंडित नेहरू यांचे एक भाषण मला आठवते. ते म्हणाले होते की :—

"The first task of this Assembly is to free India through a new Constitution to feed the starving people, to cloth the naked masses and to give every Indian the fullest opportunity to develop himself according to his capacity."

म्हणजे अर्धनग्न माणसाला कपडा दिला पाहिजे, भूमिहीन माणसाला जमीन दिली पाहिजे. यासाठी आपण जो बदल करू तो गरीब माणसाच्या दिशेने झाला पाहिजे. म्हणून या ठिकाणी आपण जरी हा बदल केला असला तरी असा बदल करून आपण जिंकलो अशा विचारात जनता पार्टीने राहू नये. कारण हा बदल टेक्निकल आहे. तेव्हा गरीब जनतेला न्याय मिळेल अशी दुरुस्ती करण्याची सद्‌बुद्धी जनता पार्टीला मिळो असे सांगून मी भाषण संपवितो.

❑❑❑

मराठवाडा कृषि विद्यापीठ अहवालावर चर्चा

(१९ जुलै, १९८९)

महाराष्ट्र कृषि विद्यापीठाच्या १४ व्या अहवालावर चर्चा करताना रा. सू. गवई यांनी घणाघाती टीका केली. या विद्यापीठाची संभावना पांढरा हत्ती असा करून हा अहवाल खेदजनक, क्लेषदायक व फेरविचार करावा असा आहे असे सांगत त्यांनी आपली नापसंती व्यक्त केली होती.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र कृषि विद्यापीठाचा १४वा अहवाल आज सभागृहासमोर चर्चेकरिता येत आहे. या संदर्भात दुर्दैवाने आपल्या पारंपरिक म्हणी ज्या आहेत त्या पुन्हा वापरणे क्रमप्राप्त आहे हा एक पांढरा हत्ती आहे. वास्तविक या हत्तीला उज्ज्वल भविष्य आहे. पंजाबराव कृषि विद्यापीठ, कोकण कृषि विद्यापीठ यापेक्षा या कृषि विद्यापीठाला वेगळे महत्त्व आहे. त्यामुळे त्याचा वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची गरज आहे. केवळ राज्यातीलच नव्हे तर देशातील मोठा असा जायकवाडी प्रकल्प मराठवाड्यामध्ये आहे. ती मराठवाड्याला एक देणगीच आहे. नाईल नदीला जसे एक आगळे स्थान आहे, तसे या प्रकल्पाला एक आगळे स्थान आहे. येत्या पाच वर्षांत परभणी जिल्ह्यामध्ये ७८-८० टक्के जमीन इरिगेशनखाली यावयाची आहे एवढा उज्ज्वल भविष्यकाळ असलेले हे मराठवाडा कृषि विद्यापीठ आहे. पण त्या बाबतीत जी बेफिकिरी दाखविण्यात आली त्याचा उल्लेख आमचे विरोधी पक्षनेते श्री. हांडे, श्री. व्ही. एन. पाटील यांनी या पूर्वी केलेलाच आहे. अध्यक्ष महाराज, हेच जर एखादे विधेयक असते तर प्रिअॅम्बल, एम्स अॅन्ड ऑब्जेक्ट्स आणि बिलाचे कंटेन्ट्स वेगळे आहेत, म्हणून हे बिल आम्ही येऊन दिले असते, पण हा अहवाल असल्यामुळे असा कायदेशीर अडथळा आम्हाला आणता येत नाही. अध्यक्ष महाराज,

माझी पहिली हरकत ही आहे की, श्री. गंगाप्रसादराव यांनी या अहवालास जी प्रस्तावना लिहिली आहे ती एवढी गोंडस आहे की प्रस्तावना वाचल्यानंतर आणि अहवालातील कन्टेट्स पाहिल्यानंतर या अहवालाचे स्वरूप अगदी विपर्यस्त वाटते. अध्यक्ष महाराज, त्यांनी तंत्रज्ञान विस्तारामध्ये सांगितले की संशोधन प्रकल्पाअंतर्गत १९८२ पासून जायकवाडी लाभक्षेत्रात पिकाची टक्केवारी दर हेक्टरी शंभर ते दोनशे टक्क्यांपर्यत वाढलेली आहे. त्यानंतर ते पुढे म्हणतात की, आर्थिक विश्लेषणांती असे दिसून येते की, निवडक शेतकऱ्यांना ८,००० ते १९,७२३ रुपये दर हेक्टरी फायदा होऊ शकतो, याचा उल्लेख माझे मित्र श्री. व्ही. एन. पाटील यांनी केला आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी पुढे म्हटले आहे की ज्वार-गहू पद्धतीत रुपये १२,००० दर हेक्टरी आणि ज्वार, करडई व सूर्यफूल आणि रब्बी ज्वार पद्धतीत दर हेक्टरी ८,००० रुपये फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. मी हे वाचल्यानंतर त्यांनी या ठिकाणी काम बरे केले आहे. शेतकऱ्यांचे कल्याण केले आहे असे मला वाटले. पण दुर्देवाने अहवालाकडे पाहिल्यानंतर माझी निराशा झाली. मूलभूत बियाण्यांच्या संशोधनाकडे आणि त्याच्या उत्पादन क्षमतेकडे पाहिल्यानंतर ते कृषि विद्यापीठ ॲन्टीक्लॉकवॉईज चालले आहे काय असे वाटले. ज्याचा उल्लेख मा. विरोधी पक्षनेते श्री. हांडे आणि श्री. व्ही. एन. पाटील यांनी आपल्या भाषणात केला आहे. अध्यक्ष महाराज, मूलभूत बियाणे उत्पादन कार्यक्रमाअंतर्गत ज्वार पिकाचे बियाणे सी. के. ६०-ए याचे एक हेक्टरमध्ये २.२० क्विंटलचे उत्पादन झाले. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना शेतकरी आपल्या शेतावर बियाणे घेत होते तेव्हा हेक्टरी ३० क्विंटल उत्पादन घेत होते पण कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या बियाण्यापासून उत्पादन काय निघते ते पहा. सी. के. ६०-ए जातीच्या वाणाचे हेक्टरी २.२० क्विटल, सी. की. ६०-ब, ०.८४ क्विटल, २०७७-अ, वाणाचे एका हेक्टरमध्ये ३.५२ क्विटल, २०७७ ब वाणाचे उत्पादन १.५४ क्विंटल, २९६-अ वाणाचे हेक्टरी उत्पन्न ४.४८ क्विंटल, तसेच २९६-ब वाणाचे हेक्टरी ३.६८ क्विंटल उत्पन्न होते. तीच गोष्ट बाजरी पिकाची असून त्याबाबत देखील डी-७३ वाणाचे बियाणे ०.१० हेक्टरमध्ये पेरले असता १.१४ क्विंटल उत्पन्न निघाले.

मला ते मान्य आहे. परंतु, संकरित ज्वारीचे सी. एच. एच-९ व कापसाचे संकरित एन.एच.एच-४४ हे जे बियाणे आहे ते फक्त निवडक १,००० हजार शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकासाठी म्हणून दिलेत परंतु मूलभूत बियाणे अद्याप पर्यंत म्हणजे गेल्या दहा वर्षांत हे विद्यापीठ देऊ शकले नाही. तेव्हा अध्यक्ष महाराज, या राज्यातील चारही कृषि विद्यापीठाला गेल्या चार वर्षांत मूलभूत बियाण्याचे संशोधन करण्यात अद्याप यश आले नाही. अजूनही आपल्या राज्याला बियाणे बाहेरून आणण्याची पाळी येते. एक काळ असा होता की, महाराष्ट्रातून बियाणे बाहेर पाठविले जात होते परंतु, आज महाराष्ट्रात बाहेरील राज्यातून बियाणे येत आहे. म्हणजे आज अवस्था अशी झाली आहे की, गव्हाणीतील कुत्रा जसा चारा जनावराला खाऊ देत नाही व स्वत: खात नाही तशी अवस्था बियाण्याच्या बाबतीत महाराष्ट्राची झाली आहे. म्हणजे हे बीज निर्मिती गुणवत्तेने करत नाही आणि इतरांना करू देत नाही अशी अवस्था आहे. आमच्या कृषि मंत्री आणि कृषि राज्यमंत्री यांना माहिती असेल की, १९६४ ते १९७४ या १० वर्षांच्या कालखंडामध्ये बियाण्यांचा कार्यक्रम घेणारा मी एक शेतकरी होतो. १९७४ सालापासून हा कार्यक्रम बंद केलेला आहे. याचा अर्थ आपण एक्सटेंन्शन सर्व्हिस बंद केलेली आहे आणि बियाणे निर्माण करण्याची प्रक्रियाही बंद केलेली आहे. व्हेस्टेड इंटरेस्ट म्हणून आपण बाहेरच्या राज्यांमधून कुचके, बिलोक्वालिटीचे बियाणे आपण घेऊ लागलो आहोत. म्हणजे आपल्याकडे बियाण्यांची जास्त निर्मिती करावयाची सोडून आपण ॲन्टीक्लॉक्वाईज म्हणजे उलटा कार्यक्रम सुरू केलेला आहे. बियाण्यांच्या निर्मितीच्या बाबतीत काय

प्रगती आहे हे जर मी सांगितले तर आपण हसाल. मूलभूत ज्वारीची, हायब्रीड, वटाणा, मूग, उडीद यांच्या बियाण्यांच्या बाबत आपण पाहिले तर अक्षरशः डोंगर पोखरून उंदीर काढला आहे. किती निर्मिती केली? अध्यक्ष महाराज, टोटल ४०० क्विंटल आहे. एका कृषि विद्यापीठाने या अहवाल वर्षामध्ये ३०० क्विंटल फंडामेंटल म्हणजे ज्याला आपण पेरेंट सीड म्हणतो ते निर्माण केले. ज्याच्यावर आम्ही पीक घेतो असे बियाणे निर्माण केले हा मला वाटते दैवदुर्विलास आहे कारण एवढ्याने काय होणार? अध्यक्ष महाराज, गहू, कापूस, ज्वारी यांच्याबाबतीतसुद्धा किती काढले? प्रमाणित बियाणे टोटल १२ क्विंटल १७ किलो काढले आहे. कशाकरिता करता? याला अर्थ काय आहे? एखादा साधा शेतकरी सुद्धा इतके बियाणे करू शकेल. त्यांना आपण बियाण्याचा कार्यक्रम द्या. एका कृषि विद्यापीठाने ज्वारी ६ क्विंटल, बाजरी ७८ किलो, कापूस ५ क्विंटल ३ किलो अशा प्रकारे टोटल १२ क्विंटल १७ किलो इतकेच बियाणे काढले आहे. अध्यक्ष महाराज या सगळ्या प्रकारावरून हा कार्यक्रम बंद केलेला बरा असे वाटू लागले. अध्यक्ष महाराज ज्यावेळी आपण ही कृषि विद्यापीठे केली त्यावेळी अशी अपेक्षा केली होती की, त्यांनी संशोधन करून प्रमाणित म्हणजे ज्याला आपण पेरेंट सीड-नर-मादी बियाणे अशा प्रकारच्या बियाण्याचे संशोधन करून भरपूर प्रमाणित बियाणे द्यावे. मी माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारतो की. १९६४-७४ या कालखंडामध्ये शेतकऱ्यांनी जे बियाणे निर्माण केले त्याच्या अगेन्स्ट कृषि विद्यापीठे निर्माण झाल्यानंतर प्रगती झाली की अवनती झाली याचा आपण जबाब द्यावा. प्रगती झाली असेल तर ती किती आणि अवनती झाली असेल तर ती का झाली हे सुद्धा सांगावे. अध्यक्ष महाराज, याबाबत मी एक आकडेवारी जमा केली आहे. अध्यक्ष महाराज, हे सांगत असताना एक गोष्ट सांगितली पाहिजे की, सीएच-५ ज्वारीच्या बाबतचे जे संशोधन झालेले आहे ते पॉप्युलर झाले आहे. त्याबद्दल कॉम्प्लिमेंट्स दिले पाहिजेत. परंतु, सीएच-९ ज्वारीचे ९०० क्विंटल बियाणे निर्माण केल्यानंतर त्याचे जर्मिनेशन काय? तर ४० टक्के आमच्या शेतकऱ्यांनी बियाणे तयार केले, मी बियाणे तयार केले तर त्याची उगवण शक्ती ८० टक्के असली पाहिजे त्याशिवाय ते बियाणे घेत नाहीत. परंतु, कृषि विद्यापीठाने तयार केलेले हे बियाणे आहे. त्याची जर्मिनेशन पॉवर ४० टक्के म्हणजे एक क्विंटलची थैली जर शेतामध्ये टाकली तर ४० रोपे येतील. मग हे बियाणे पैसा देऊन कोण घेणार? माझ्या शेतातील परादी ज्वारीचे जर्मिनेशन ५० टक्के झाले. मी स्वतः टाकल्यामुळे १० टक्के जर्मिनेशन जास्त आले. तुमचे जर्मिनेशन ४० टक्केच आहे. परंतु, श्री. प्रमोद शेडे यांनी शेत लावले आहे त्या ठिकाणी एकदम दणादण, दणादण पाऊस पडला आणि त्याचे बियाणे पाच-पाच फूट खोलवर गेले म्हणून ते उगवले नाही. काय तुमच्या शेतावरच पाऊस पडला काय? दणादण पाऊस झाला म्हणून जर्मिनेशन कमी झाले हे आपण आमच्यासारख्याला सांगता हे कसे शक्य आहे? साध्या ज्वारीकरिता इन्शुरन्स स्कीम आहे परंतु याला ती स्कीम नाही. तेव्हा यासाठी आपण काही माईंड अप्लाय केलेला काय? सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, शेतकऱ्यांकडून जे बी घेतले जाते त्यामधील जवळजवळ २५ हजार क्विंटल बी दिल्यावर त्यामधील फक्त ३ हजार क्विंटल ॲक्सेप्ट केले आणि २२ हजार क्विंटल रिजेक्ट केले या बियाण्याला औषध लावले जाते ते सर्वच बियाण्याला लावण्याऐवजी प्रथम ५ क्विंटल औषध लावून त्याचे रिझल्ट काय येतात ते पाहिले पाहिजे आणि नंतर सर्व बियाण्याला औषध लावले पाहिजे. परंतु, तसे केले जात नाही आणि मग बियाणे रिजेक्ट केले जाते हे बियाणे शासन शेतकऱ्यांकडून २५ रुपये क्विन्टलने घेते आणि दवाई लावलेले बियाणे ७० रुपये क्विंटलने विकते. हे कुणाच्या जीवावर आपण करता? हे सर्व शेतकऱ्यांचा जीवावर करता ना? At the cost of the life of the cultivator, at

the cost of Maharashtra State and at the cost of Nation. जर्मिनेशन कमी झाले आणि प्रॉडक्शन येऊन उत्पादकाला भाव मिळाला नाही तर हा तोटा जमा शेतकऱ्यांचा आहे तसा तो महाराष्ट्राचा आहे आणि तो देशाचा तोटा आहे.

यानंतर जो विस्तार कार्यक्रम आहे. ज्याला आपण एक्सटेन्शन प्रोग्रॅम म्हणतो त्यामध्ये आपण काय सर्व्हिस दिली आहे? त्यासंबंधी प्रकाशन काढले आहे. एक घडीपत्रिका आणि एक पुस्तिका काढली आहे. १९८५ सालामध्ये विस्तार कार्यक्रमामध्ये दोन कार्यक्रम घेतले आहेत. त्यापैकी भूमिहीन कारागिरांसाठी एक कार्यक्रम आहे त्यात पुरवणीमध्ये ६० कुटुंबे सिलेक्ट केली. त्यापैकी तीन कुटुंबांना एक्सटेन्शन सर्व्हिस देण्यात आली. ६० कुटुंबांपैकी जर तीनच कुटुबांना आपण एक्सटेन्शन सर्व्हिस देता तर मग हे कशाला सुरू केले आहे. असा विस्तार कार्यक्रम करूच नका त्यानंतर इन्फ्रास्ट्रक्चर देण्यासाठी ८७ गावे निवडली गेल्याची माहिती दिलेली आहे. संपूर्ण मराठवाड्यामध्ये जायकवाडी प्रकल्पावर पाणलोट क्षेत्रामध्ये येणाऱ्या गावांना इन्फ्रास्ट्रक्चर दिले. दुबार पिके कशी घेता येतील, त्यापासून शेतकऱ्यांना कसा फायदा होईल यासंबंधी विस्तार कार्यक्रम काहीही नाही. टिश्यूकल्चर, मायक्रो-बायॉलॉजी, बॉटनी या विभागांनी रोगाने येणारी कीड, बाजरीवर आलेले अर्गट हे किती शेतामधील नाहीसे केले तर जवळजवळ ८ शेतांवरील नाहीसे केले असे सांगितले आहे. अध्यक्ष महाराज, संपूर्ण मराठवाड्यामध्ये अर्गटच्या रोगाने संपूर्ण बाजरी नाहीशी झाली. मराठवाड्यामध्ये ३-४ मेजर पिके आहेत. ज्वारी, बाजरी, कापूस आणि भुईमूग. माझी माहिती अशी आहे की, मराठवाड्यातील भुईमूगाचा पेरा कृषि विद्यापीठाच्या प्रोत्साहनाने झालेला नाही. शेतकऱ्यांनी स्वत: रिसर्च केला. आणि त्यांचे उसने संशोधन या ठिकाणी प्रिंट करण्यात आलेले आहे. भूमिहीन, मागासवर्गीय यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे असे या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे. मा. सदस्य श्री. हांडे यांनी सांगितल्याप्रमाणे शेड्यूल कास्ट आणि शेड्यूल ट्राईब्ज यांची विद्यापीठातील आकडेवारी भयानक स्वरूपाची आहे. अत्यल्प आहे. क्लास वनमध्ये एकूण १६३ अधिकारी आहेत. त्यामध्ये शेड्यूल कास्टचे २ आणि ट्राईब्जचा एकही माणूस नाही. व्ही.जे.एन.टी.चा एकही माणून नाही. क्लास टू चे अधिकारी एकूण ३६३ आहेत त्यामध्ये शेडयूल कास्टचे १७, शेड्यूल ट्राईब्जचे ५ आहेत, नोमॅडीक ट्राईब्जचे ३ अधिकारी आहेत. क्लास थ्रीअरीमध्ये एकूण ११७५ लोक आहेत. त्यामध्ये शेड्यूल कास्टचे ५३ लोक आहेत, ट्राईब्जचे ३ लोक आहेत आणि व्ही.जे.एन.टी. चे मोठ्या मुश्किलीने २ लोक आहेत. राजीव गांधींनी गव्हर्नमेंट ऑफ इंडियातर्फे एस.सी.एस.टी. आणि व्ही.जे.एन.टी. यांच्यासाठी मोठ्या प्रमाणावर ड्राईव्ह हाती घेतलेला आहे. महाराष्ट्रामध्ये देखील तसे जाहीर करण्यात आले मग हा बॅकलॉग आपण दूर करणार की नाही? मला जी माहिती मिळाली आहे त्यानुसार विद्यापीठातील मंजूर पदे ६५ आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातींसाठी ९, जमातीसाठी ५ आणि भटक्या आणि विमुक्त जमातीसाठी एकही पद नाही. प्राध्यापकांची पदे शेड्यूल कास्ट-९, शेड्यूल ट्राईब्ज ६ आणि व्ही.जे.एन.टी. साठी २ आहेत. सहाय्यक प्राध्यापकांची पदे शेडयूल कास्टसाठी ४०, शेड्यूल ट्राईब्ज २२ आणि व्ही.जे.एन.टी. साठी १० आहेत. वर्ग एकमध्ये शेड्यूल कास्टसाठी २, शेड्यूल ट्राईब्ज १ आणि व्ही.जे.एस.टी. साठी काही नाही. वर्ग दोन मध्ये शेड्यूल कास्टसाठी २, शेड्यूल ट्राईब्जसाठी २ आणि व्ही.जे.एन.टी. साठी १ पद आहे. ही माहिती मी यांच्याच अहवालातून जमा केली आहे. या कृषि विद्यापीठाने संशोधनात्मक कार्य केले नाही, विस्ताराची विडंबना केली, शेड्यूल कास्ट आणि शेडयूल ट्राईब्जच्या बाबतीत मनामध्ये आकस बाळगला याचा अर्थच हा आहे की, हा संपूर्ण कृषि विद्यापीठाचा अहवाल अत्यंत खेदजनक, द्वेषकारक आणि ज्याच्यावर फेरविचार करावा असा आहे.

❑❑❑

कापूस एकाधिकार खरेदी योजनेची कार्यवाही

(३ जुलै, १९८६)

एकाधिकार कापूस खरेदी योजनेवर विधानपरिषदेत दिनांक ३ जुलै, १९८६ रोजी नियम ९७ खालील ठरावाच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा झाली. ही योजना बंद होता कामा नये या श्री. मोतीराम लहाने यांच्या आग्रही भूमिकेचे रा. सू. गवई यांनी आपल्या भाषणात समर्थन केले. या योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी आणि त्रुटी यांचे विवेचन करून कापसाची निर्यात, कापूस खरेदी केंद्रावरील सुविधा, कापूस प्रतवारी पद्धतीमुळे होणारा भ्रष्टाचार यावरही त्यांनी आपली मते मांडली. रोजगार हमी योजना राज्यात सुरू झाल्यानंतर ती टाकाऊ आहे असे चित्र निर्माण होऊ नये अशी काळजी आपण घेतली होती. त्याचप्रमाणे या योजनेच्या बाबतीत दक्षता घेणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. हितसंबंधी व्यापारी वर्ग या योजनेचा शत्रू आहे. इतर राज्यांची भूमिका सहकार्याची नाही आणि केंद्र सरकारचा दृष्टिकोन आकसाचा आहे याकडेही गवई यांनी लक्ष वेधले.

अध्यक्ष महाराज, या योजनेसंबंधी मी काही फार मोठ्या विस्ताराने बोलणार नाही. परंतु या योजनेची जे जे संबंधित आहेत त्यांना ही योजना टिकेल कशी या संदर्भात या सभागृहामार्फत काही सूचना देणार आहे. प्रथमतः ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कापूस एकाधिकार खरेदी योजना बंद होता कामा नये अशा प्रकारचा आग्रह सन्माननीय सदस्य श्री. लहाने यांनी व्यक्त केला याचे मी पूर्णपणे समर्थन करतो. मला खात्री आहे की, यापेक्षा वेगळी भूमिका हे शासन घेणार नाही. शासनदेखील ही योजना बंद करू इच्छित नाही आणि बंद करू शकत नाही. त्याला अन्य कारणेही आहेत. ही योजना आपण मुद्दाम स्वीकारलेली आहे. या राज्यातील रोजगार हमी योजना आणि एकाधिकार कापूस खरेदी योजना या दोन योजना या देशातील इतर राज्यांच्या मानाने नावीन्यपूर्ण अशा योजना आहेत. त्यामुळे या योजना टिकल्या पाहिजेत, या मर्यादेत या कापूस एकाधिकार खरेदी योजनेवर बोलणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार शोधण्याचे काम करताना मी अशी काळजी घेतली होती की, राज्यामध्ये अशाप्रकारची योजना सुरू झाल्यानंतर ती योजना टाकाऊ आहे असे चित्र निर्माण होऊ नये. त्याचप्रमाणे याही योजनेच्या बाबतीत दक्षता घेणे आवश्यक आहे. कापूस एकाधिकार योजनेचे शत्रू कोण आहेत ते मी या ठिकाणी सांगणार आहे. या योजनेचे शत्रू म्हणजे महाराष्ट्रात जे ॲफेक्टेड व्यापारी वर्ग आहे, ज्याची पूर्वी मोनोपोली होती, ते दुखावले गेले आहेत.

एचबी ११८०—२३

ही योजना केवळ महाराष्ट्र राज्यामध्येच असल्यामुळे या योजनेसंबंधी सहकार्याची भूमिका इतर राज्याची नाही. ही योजना महाराष्ट्र राज्यानेच सुरू केलेली आहे आणि इतर राज्ये सुरू करीत नाहीत, म्हणून यासंबंधी केंद्र सरकारचा आकसाचा दृष्टिकोन आहे. एकाधिकार कापूस योजनेचे हे तीन शत्रू आहेत. त्यामुळे आमच्या कृतीने आणि वक्तव्याने या तीन शत्रूंना उत्तेजन मिळेल अशी गोष्ट करणे शहाण्या माणसाला शक्य नाही. म्हणून या मर्यादेमध्ये मी काही सूचना करणार आहे. त्या सूचना करीत असताना या योजनेशी परस्पर सहकार्य कोणाचे आवश्यक आहे तेही मला सांगितले पाहिजे. दोन-चार वर्षांपासून, १९८४ सालापासून ही योजना महामंडळाकडे गेली आहे. त्यामुळे महामंडळ, राज्य सरकार, शेतकरी आणि केंद्र सरकार या चार घटकांचे म्युच्युअल को-ऑपरेशन या योजनेला लाभले तर या योजनेचा भविष्य काळ धोक्यात आहे असे मला वाटत नाही.

१९७२ सालापासून ही योजना चालू झाली, आणि त्या योजनेमधून काही वेळा तोटा झाला तर काही वेळा फायदा झाला. कधी नफा तर कधी तोटा अशा रोटेशनने ही योजना चालू आहे. या योजनेत होणारा नफा आणि तोटा हा भाग बाजूला ठेवला तर केंद्र सरकारची सपोर्ट प्राईस आणि राज्य सरकारने दिलेली गॅरंटी प्राईस यामध्ये जो फरक आहे तो ७० कोटी रुपये इतका आहे आणि हा फरक आम्ही भरतो त्याचे कारण असे आहे की, कापूस उत्पादक शेतकरी जो आहे त्याला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. कापूस उत्पादक शेतकरी हे विदर्भ आणि मराठवाड्यातील आहेत. पश्चिम महाराष्ट्रात जे शेतकरी आहेत ते उसाच्या पिकामुळे पुष्कळ समाधानी आहेत. ९० किलोच्यावर कापसाचे उत्पादन होत नाही त्यामुळे कापूस उत्पादन करणाऱ्या डंगऱ्या माणसाला प्रोत्साहन कशाला द्यावयाचे असे शुगर लॉबीतील लोकांचे म्हणणे आहे. याच्यापासून ही कापूस एकाधिकार खरेदीची योजना वाचली पाहिजे इतकेच नव्हे तर ती योजना पुढे चालू राहिली पाहिजे. यासंबंधीचा विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे. म्हणून कापसासंबंधी बोलत असतांना त्यातील पहिला घटक हा कापूस उत्पादक संघ आहे आणि त्या संघाने १९८२ ते १९८४ पर्यंत दोन वर्षे काम केलेले आहे. पूर्वी हे काम खरेदी-विक्री संघामार्फत केले जात होते. मल्टीफेरीअल ॲक्टिव्हीटीज असल्यामुळे हे काम त्या मंडळाकडे देण्यात आले. फॅक्ट रिमेन्स द फॅक्ट हिशोबाच्या डिटेल्समध्ये मी जाऊ इच्छित नाही परंतु सन्माननीय मंत्रिमहोदयांनी ओपन माईंडने हिशोब करावेत एवढेच मला त्यांना या निमित्ताने सांगावयाचे आहे. या संघाचे विश्लेषण करीत असतांना दोन-तीन गोष्टींचा मला या ठिकाणी उल्लेख करावयाचा आहे. संघाकडून आम्हाला एक बुकलेट देण्यात आलेले आहे ते बुकलेट आम्ही वाचले त्यामध्ये आम्हाला असे आढळून आले आहे की, १९८२-८६ या कालखंडात आगीचे प्रमाण कमी-जास्त झालेले आहे. म्हणजे १९८३ साली ३१० आगीच्या घटना घडल्या आहेत. १९८४ साली १५० घटना घडल्या आहेत. १९८५ साली २७१ घटना घडल्या आहेत आणि १९८६ साली १६१ घटना घडल्या आहेत. १९८६ साली आगीचे प्रमाण कमी झालेले आहे असे आपल्याला यावरून दिसून येईल. परंतु त्या वर्षात रूईचा कॉन्टम जास्त जळाला गेला आहे. त्याचे कारण काय आहे याबद्दल मी आपल्याला नंतर सांगणार आहे. १९८३ साली टक्केवारीचे प्रमाण वाढले असल्याचे आपल्याला दिसून येते. अगोदर ही टक्केवारी १.१६ इतकी होती. १९८३ मध्ये ती टक्केवारी ०.९० पर्यंत आली आहे. म्हणजे दोन वर्षांत त्यांनी आगीचे प्रमाण कन्ट्रोल केलेले आहे. त्यामध्ये काही विक पॉईन्ट आहेत ते मी आपल्याला या ठिकाणी सांगणार आहे. या विक पॉईन्टच्या संदर्भातील रिस्पॉन्सिबिलीटी ही फेडरेशनची होती. कापसाची क्षमता लक्षात घेऊन कापूस झाकण्यासाठी

त्यांनी ताडपत्र्याची व्यवस्था करावयास पाहिजे होती. रूई जमा करण्यासाठी जेवढ्या बोन्द्र्या लागतील तेवढ्या बोन्द्र्या फेडरेशनकडे असावयाला पाहिजे होत्या. त्यांनी जो अहवाल दिलेला आहे तो अहवाल वाचल्यानंतर मला असे वाटते की, या संबंधी कापसाचा संपूर्ण आवाका लक्षात घेऊन प्रिकॉशनरी मेझरमेंटस फेडरेशनने घ्यावयास पाहिजे होत्या. विशेषत: त्यांनी ताडपत्रीची खरेदी आणि बोन्द्र्याची खरेदी करावयास पाहिजे होती. आठ लाख गाठी उघड्यावर आहेत आणि त्या गाठी झाकण्याचा आता प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठी ५२ हजार ताडपत्र्या विकत घेण्यात आल्या आहेत. इव्हेन्युॲलिटी येणार नाही अशा अंदाजाखाली न राहता आपल्याकडे सरप्लस ताडपत्र्या आणि बोन्द्र्या असावयाला पाहिजे होत्या. या ताडपत्र्या व बोन्द्र्या ठेवण्याची जबाबदारी फेडरेशनची आहे. गेल्या वर्षी सिव्हीअर कन्डिशन होती. त्या हंगामापर्यंत ५ लाख गाठी विकल्या गेल्या. परंतु या ठिकाणी मी जरूर सांगू इच्छितो की, त्या अगोदर आपण १६ लाख गाठी विकल्या ही एक जमेची बाजू आहे. गेल्या वर्षीच्या हंगामाच्या मानाने जास्त गाठी कापूस विकून जो काही चार-पाच वर्षांचा विक्रम होता तो ओलांडून १६ लाख गाठी कापसाच्या विकण्यात आल्या. त्यामुळे या मंडळाने समाधानकारक कार्य केलेले आहे. पण त्याचबरोबर कापूस सुरक्षित राखणे, कापसाला आगी न लागू देणे, तो भिजू न देण्यासाठी जे काही संरक्षित उपाय योजण्याची जरूरी होती ते मंडळाने करायला पाहिजे होते. त्यात काही जबाबदारी ही राज्य सरकारचीही आहे. म्हणजे सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही. राज्य सरकारची पहिली जबाबदारी ही आहे की, या राज्यातील प्रक्रिया क्षमता किती आहे हे लक्षात घेणे. आपल्याकडे होणाऱ्या कापसाचे जिनिंग आणि प्रेसिंग होणे आवश्यक आहे तेवढी क्षमता महाराष्ट्र राज्यामध्ये नाही. हे पाहण्याची जबाबदारी फेडरेशनची नाही, तर शासनाची आहे. त्यामुळे असे होते की आपण या प्रक्रियेकरिता आंध्र प्रदेश, मध्य प्रदेशमध्ये जातो. अध्यक्ष महाराज, या प्रक्रिया मागण्याची परवानगी फेडरेशनने जानेवारीमध्ये राज्य सरकारकडे मागितले आणि राज्य सरकारने ती मार्चमध्ये दिली. इतका यासाठी विलंब का लागला? दुसरी गोष्ट या कापसाच्या निर्यातीच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने काय केले? केंद्र सरकारकडे त्यासाठी सरकारने गुड ऑफिसेस आणि प्रेशर वगैरे काही आणले आहे काय? काही केले नाही. १९८४-८५ मध्ये तीन लाख गाठी निर्यात करण्याचे सुचविले. परंतु दुर्देवाने ऐन हंगामाच्या वेळी त्यास परवानगी नाकारली गेली. मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. कराळे यांनी सांगितले त्याप्रमाणे जेव्हा आपल्याकडे सुगी असेल आणि आपण एक्सपोर्ट करू शकतो अशी परिस्थिती असेल त्यावेळी तुम्हाला निर्यात करता येणार नाही म्हणून सांगितले जाते आणि जेव्हा मंदीचा काळ येतो त्यावेळी परवानगी मिळते. तेव्हा अध्यक्ष महाराज, आंतरराष्ट्रीय बाजार पेठेमध्ये या राज्याची पत कशी राहील याची काळजी घेतली पाहिजे. आपल्या शासनाने ही काळजी घेतली पाहिजे. १९८२-८३ मध्ये या संघाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये चांगली पत मिळवली होती. मात्र पुढे केंद्र सरकारने निर्यातीसाठी परवानगी नाकारली आणि त्यामुळे आपल्या संबंधी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये मत वाईट झाले. पण त्याबद्दल या राज्य सरकारने केंद्र सरकारकडे काही प्रोटेस्ट व्यक्त केले नाही. ते करायला पाहिजे. तेव्हा मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आजच्या तोट्यामध्ये तो तोटा जवळ जवळ गृहीत धरला पाहिजे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कापसाची किंमत आता वाढली असे म्हणणे चुकीचे आहे. तुम्ही असे गृहीत धरूनच योजना चालवा की आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कापसाला मागणी नाही. आकसाने पाकिस्तानचा कापूस घेतला जातो. पण आपण तसे करीत नाही. मी असे म्हणतो की, अशाप्रकारे निर्यात करून आपण विदेशी चलन मिळविण्यासाठी केंद्र सरकारने जी किंमत सांगितली असेल त्या किंमतीने विकण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे पैसा किमान खेळता राहील. परंतु

एचबी ११८०—२३अ

एक गोष्ट मात्र नक्की की यामध्ये केंद्र सरकारचे अडथळे खूप येतात.

मी नव्या वस्त्रोद्योग धोरणाच्या मेरिट डिमेरिटमध्ये जात नाही. आपल्या पंतप्रधानांनी हे धोरण स्वीकारलेले आहे तर मग ते धोरण १०० टक्के तरी अंमलात आणा. त्याचा परिणाम या योजनेवर काय होईल हे ओळखून किंवा लक्षात घेऊन केंद्राकडे त्यादृष्टीने नुकसानभरपाई म्हणून काही मदत आपण मागितली आहे काय ? आपल्याकडे २९ लक्ष इतके विक्रमी उत्पन्न झालेले नाही, अगदी शेवटचे असे विक्रमी उत्पन्न आपल्याकडे १८ लक्ष इतके झालेले आहे. तेव्हा आता जास्तीत जास्त असे २० लक्ष गाठी उत्पन्न झालेले असेल आणि ९ लक्ष गाठी या बाहेरच्या राज्यातून आल्या असतील. तर त्यापैकी जास्त करून आंध्र प्रदेशातून आल्या असतील तर त्याची जबाबदारी राज्य सरकारवरच आहे. नॉन फॅसिलिटी सेंटर्स ही तुम्ही जास्त प्रमाणात नांदेड, यवतमाळ येथे दिली. आज त्या ठिकाणी कोणत्याही सुविधा नाहीत. पाणी नाही, वीज नाही किंवा आग विझविण्यासाठी बंब देखील नाहीत. मा. सदस्य श्री. लहाने यांनी म्हटल्याप्रमाणे आपले पोलीस अधिकारी आणि सहकार अधिकारी काय झोपले होते काय ? अध्यक्ष महाराज, जवळ जवळ २३ कोटी रुपये आपण आंध्रला दिले आहेत. एक तृतीयांश पैसा आपण आंध्रच्या व्यापाऱ्यांना दिला आहे. अध्यक्ष महाराज, जो ट्रकमधून कापूस येत असतो तो शेतकऱ्यांचा कापूस नसून व्यापाऱ्यांचा कापूस असतो हे माननीय मंत्र्यांनी लक्षात घेतले पाहिजे. म्हणून जी आंध्र राज्याची बॉर्डर आहे त्या बॉर्डरवर विशेष लक्ष ठेवण्याची आवश्यकता होती. अध्यक्ष महाराज, जिनिंग प्रेसिंगला लागणाऱ्या सर्व गोष्टी या सरकारने पुरविण्याची आवश्यकता होती.

अध्यक्ष महाराज, यामध्ये फार मोठ्या प्रमाणात जो भ्रष्टाचार होत आहे तो ग्रेडेशनच्या पद्धतीमुळे होत आहे. म्हणून माझी या ठिकाणी अशी मागणी आहे की, ही ग्रेडेशन पद्धत आपण काढून टाका. या ठिकाणी ॲव्हरेज कापसाची जी किंमत येईल ती आपण धरा. तसेच महामंडळाला इंटरनल ग्रेडींग करण्याचे अधिकार आपण द्या. यामुळे एखाद्या माणसाला ग्रेड द्या. त्यांची ग्रेड वाढवा तसेच पगार वाढवा हे वाचून जाईल. या ठिकाणी कापसाची सरासरीने किंमत काढण्यात यावी. आपण आता डी-सेंट्रलायझेशन केले आहे. त्याप्रमाणे आपण आता काही केंद्र उघडीत आहात आणि अशा पद्धतीने लोकांची जी लहानशी लोकप्रियता संपादन करीत आहात ती पद्धत आपण बंद केली पाहिजे. मला या ठिकाणी या योजनेबाबत असे सांगावयाचे आहे की, या योजनेमध्ये अजून बरेचशे दोष आहेत. म्हणून याबाबत कापूस संघ, महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकार आणि शेतकरी यांच्या सर्वांच्या समन्वयाने विचार करून ही योजना मरता कामा नये, ही योजना जिवंत राहिली पाहिजे हे आपण पाहिले पाहिजे. म्हणून माझा याबाबत असा आग्रह राहील की, ही योजना दोन-दोन वर्षांकरिता न वाढविता २० ते २५ वर्षांपर्यंत सुरू राहिली पाहिजे असे वातावरण निर्माण करून या योजनेला हिरवा कंदील प्राप्त करून घेतला पाहिजे. म्हणून या योजनेमध्ये जो सहभागी घटक आहे त्यांना एकत्रित करणे हा महत्त्वाचा भाग आहे, असे घडले तरच नजिकच्या काळात या राज्यात ही योजना चांगल्याप्रकारे राबविली जाऊ शकेल. एवढेच मला सांगावयाचे आहे.

❑❑❑

जीवनावश्यक वस्तूंचे भाव

(२८ नोव्हेंबर, १९८३)

जीवनावश्यक वस्तूंचे वाढते भाव ही नेहमी चिंतेची बाब राहिली आहे. या भाववाढीचा प्रश्न ८१-८२ मधला असो की आजचा असो. सत्ताधारी नेहमी आंतरराष्ट्रीय परिस्थितीला दोष देतात. पण हे प्रतिपादन गवई साहेबांना मान्य नव्हते. मात्र भाववाढ हा विषय पूर्णपणाने राज्याच्या कक्षेत येत नाही तर केंद्राच्या कक्षेत येतो असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. २८ नोव्हेंबर, १९८३ मधील त्यांचे भाषण या अंगाने बघूया.

अध्यक्ष महाराज, वास्तविक जीवनावश्यक व तद्वत सर्वच वस्तूंच्या महागाईचा विषय शेकडा ७५ टक्के केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे हे मान्य केले पाहिजे. पण २५ टक्के राज्य सरकारच्या अखात्यारीतील आहे. आपण त्यावर जी चर्चा करतो ती विधिमंडळात करतो, पार्लमेंटमध्ये नाही. त्यामुळे चर्चेवर बंधन आहे. असे जरी असले तरी एक मुद्दा मला सर्वप्रथम खोडून टाकावयाचा आहे; ज्याचे समर्थन मा. सदस्य श्री. लहाने यांनी आपल्या भाषणात केले. तो मुद्दा म्हणजे केवळ इंटरनॅशनल फेनॉमिना महागाईचा आहे. महागाई आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे आहे. म्हणून महागाई आहे हे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सांगणे किंवा त्यांच्याच भाषणाचा आधार घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या मंत्री श्रीमती प्रतिभाताई यांनी सांगणे म्हणजे जवळ जवळ लोकांची दिशाभूल करणे आहे. श्री. लहाने यांनी तत्त्व सांगितले, ते मी एवढ्याकरिता स्पष्ट केले. परंतु, मी त्याच्या तपशिलात शिरणार आहे. मा. विरोधी पक्षनेते श्री. दत्ता मेघे यांनी म्हटल्याप्रमाणे रुपयांचे अवमूल्यन झाले, रुपयांची किंमत घसरली आणि वस्तूंची किंमत वाढली. अमेरिकेत डॉलरचे मूल्य कमी झाले व वस्तूंचे मूल्य वाढले अशी स्थिती झाली आहे का ? किंवा इंग्लंडच्या पौंडाचे मूल्य कमी झाले आणि वस्तूंची किंमत वाढली, किंवा रशियातील रुबल्सचे मूल्य कमी झाले व वस्तूंची किंमत वाढली, जपानच्या येनचे मूल्य कमी झाले व वस्तूंचे मूल्य वाढले असे झाले आहे का? परिस्थितीनुरूप ही अवस्था त्या त्या देशात आलेली आहे का ? ४-५ डेव्हलप्ड कन्ट्रीज ज्या आहेत त्यानंतर येणारा भारत हा विकसनशील देश, डेव्हलपिंग कंट्री आहे. त्या देशात अशी अवस्था येऊ शकते काय ? आणि म्हणूनच आम्ही म्हणतो की, आंतरराष्ट्रीय महागाई आहे आणि म्हणून त्याचा परिणाम म्हणून आपल्या देशातही महागाई झाली आहे असे म्हणणे चूक आहे.

अरेबियन कंट्रीमध्ये भाव वाढले म्हणून भारतामध्ये भाव वाढले असे म्हणणे चूक आहे. आफ्रिकन कंट्रीमध्ये भाव वाढले म्हणून हिंदुस्थानात भाव वाढले हे म्हणणे चूक आहे. मी सुरुवातीलाच म्हटले की, भाववाढीचा प्रश्न हा राज्य शासनाच्या कक्षेतील नाही, तो केंद्राच्या कक्षेतील आहे. त्याबाबतची चर्चा येथे करणे तितकेसे सयुक्तिक होणार नाही. जीवनमान निर्देशांक हा त्या त्या

देशाचा महत्त्वाचा भाग आहे. तो आपण विचारात घेतला पाहिजे. अमेरिकेत एक डॉलरला दुधाचा डबा घेतला तर तो सात दिवस पुरतो. आजही तेथे तीच स्थिती आहे. तेथे एक लस्सी ७ रुपयांची आहे. ती सात दिवस घेता येते. अमेरिकेत हमालाला १ डॉलर दिला तर आपण त्यास ७ रुपये देणे हे बरोबर आहे का ? तेव्हा जगात भाव वाढले म्हणून आपल्या देशात भाव वाढले हे म्हणणे बरोबर नाही. तशा प्रकारचे विधान करून भारतीय जनतेच्या जखमेवर मीठ चोळून भारतीय जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेणे बरोबर नाही असे मला वाटते. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने संपूर्ण देशाचे व राज्य सरकारचे नियोजनच मुळी चुकीचे आहे. केंद्रीय अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी तुटीचा अर्थसंकल्प सभागृहापुढे ठेवून स्वत:ची पाठ थोपटून घेतली. आपल्या राज्याचे अर्थमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे आताच सभागृहातून बाहेर गेले आहेत. त्यांनीही मागील वर्षी ६५ कोटींची तूट अर्थसंकल्पात दाखवून आपली पाठ थोपटून घेतली आहे. डेफिसिट बजेट राज्याचा ओव्हरड्राफ्ट, करप्शन, काळ्या पैशाचा भरमसाट साठा यामुळे चलन फुगवटा दिवसेंदिवस वाढत जात आहे. करांची योग्य प्रकारे आकारणी केली गेली असती तर, राज्यांनी ओव्हरड्राफ्ट वापरू नये म्हणून योग्य ती काळजी घेतली असती तर हे झाले नसते. परंतु तसे न केल्यामुळे जीवनमान निर्देशांकात जवळजवळ १०-१५ टक्क्यांनी सर्व बाबींमध्ये वाढ झालेली आहे. ह्या संदर्भात राज्य सरकारला जेवढी उपाययोजना करणे आवश्यक होते तेवढ्या बाबींना स्पर्श करून मी माझे भाषण संपविणार आहे. अध्यक्ष महाराज, केंद्र सरकारचे लेटेस्ट पब्लिकेशन माझ्या हाती आहे. माननीय सदस्य श्री. राजारामबापूंनी म्हटले ते खरे आहे. त्यांचा पक्षाभिनिवेश नव्हे तर ती वस्तुस्थिती आहे. वस्तुस्थिती आपणाला नाकारता येणार नाही. त्यांनी म्हटल्याप्रमाणे या देशांमध्ये किंमती कधीही स्थिर राहिलेल्या नाहीत. १९७२ साली इंडेक्स १०५.६ होता. तो वाढत जाऊन १९७६-७७ मध्ये १७६.६ झाला. १९७७-७८ मध्ये ती १८५.८ झाला. १९७८-७९ मध्ये तो १८५.८ राहिला. यांचा अर्थ १९७७-७८ व १९७८-७९ मध्ये किंमती स्थिर राहिल्या. त्यानंतर १९७९-८० मध्ये इंडेक्स २१७.६ झाला, नोव्हेंबर, १९७९ मध्ये तो २२२.० झाला आणि नोव्हेंबर, १९८० मध्ये तो २५२.२ झाला. आज घाऊक किंमतीचा निर्देशांक २७४ वरून ५०२ वर गेला आणि जीवनमानाचा निर्देशांक ४५७ वरून ५०२ वर गेला. अशाप्रकारे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या आहेत. मी मघाशी श्रीमती प्रतिभाताई सभागृहात आल्या तेव्हा गंमतीने म्हटले की, "महागाई" आली. माननीय श्रीमती प्रतिभाताईंबद्दल मला आदर आहे. मी ते गंमतीने म्हटले. कारण त्या अन्न व नागरी पुरवठा मंत्री आहेत. तेव्हा त्या म्हणाल्या की, मी जर मुखर्जीच्या जागी असते तर किंमती वाढल्या नाहीत असे म्हटले असते. अध्यक्ष महाराज, यातील विनोदाचा वा गंमतीचा भाग आपण सोडून देऊया. परंतु माननीय प्रतिभाताईनी दिनांक १९ जुलै १९८३ ला जे स्टेटमेंट केलेले आहे ते मी आपणास सांगतो. माननीय सदस्य श्री. राम कापसेंच्या प्रश्नाला त्यांनी दिलेले हे उत्तर आहे.

" the Statement was given by the State Civil Supplies Minister, Mrs. Pratibha Patil in the State Legislative Assembly in a reply to R. G. Kapse and other." (जुलै महिन्यांमध्ये त्यांनी हे उत्तर दिलेले आहे.) आता परिस्थिती बदलली आहे. Here is the detailed table of prices given by the Minister, तांदळांची किंमत मार्च, १९८३ मध्ये ३.६३ वरून मे, १९८३

मध्ये ३.८४ झाली होती. गव्हाचा इंडेक्स २.८४ वरून ३.७४ वर गेला. तूरडाळ ६.०१ वरून ६.६८ वर गेली. मूगडाळ ५.३१ वरून ५.७२ वर गेली. मटण १९.३९ वरून १९.५४ वर गेले. हे स्टेटमेंट माननीय मंत्र्यांनी जुलै महिन्यांमध्ये केलेले आहे. तेव्हा आता भाव वाढलेले नाहीत असे मंत्री महोदयांना म्हणता येणार नाही.

दुसरी गोष्ट, मी म्हटल्याप्रमाणे ७५ टक्के जबाबदारी केंद्र सरकारची आहे हे कबूल पण २५ टक्के जबाबदारी तरी राज्य सरकारची आहे की नाही ? त्यामध्ये वितरणाची जी सिस्टीम आहे ती तरी आपल्याला सुधारता येईल की नाही ? श्री. कमळे गुरुजी मंत्री असताना एकदा म्हणाले होते की आम्ही किंमती रोखू शकत नाही. असे कसे म्हणता येईल? सरकार जर हे करू शकत नसेल तर कोण करणार? यासाठी आपल्याला आवश्यक वस्तूंविषयक कायद्याचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. ते राज्य सरकार व केंद्र सरकार अशा दोघांनी केले पाहिजे. काळ्या पैशाचा उपयोग करून ज्यांनी कृत्रिम स्टोअरेज आणि कृत्रिम महागाई निर्माण केली अशा लोकांच्याविरुद्ध राज्य सरकारने कोणती कारवाई केली ? याबाबतीत कायद्याच्या प्रोव्हिजन्स आहेत. पण शेवटी केंद्र सरकारनेच याबाबतीत शरणागती पत्करील आहे म्हणून तर काळा बाजारवाले आणि साठेबाज धान्याचा साठा करीत असतात. काळाबाजारवाले, साठेबाज यांच्यापुढे केंद्र सरकारने शरणागती पत्करली आहे. म्हणून या कायद्याची अंमलबजावणी अधिक कडक रीतीने झाली पाहिजे. मी हे विधान जे करीत आहे ते नॉन ऑब्जेक्शनेबल आहे याची मला कल्पना आहे. त्याचसाठी या कायद्याची कडक अंमलबजावणी आपण केली पाहिजे. काळ्यापैशाचा जोरावर हे व्यापारी ९० रुपये भावाची ज्वारी आज खरेदी करणार आणि सहा महिने ती दाबून ठेवून सहा महिन्यानंतर दुप्पट भावाने विकणार. म्हणजे जो माल कल्टिव्हेट करतो, त्याला जेवढा नफा होत नाही, तेवढा नफा मालाचा साठा करणाऱ्याला होतो. हा प्रश्न तुमच्या अखत्यारित नाही हे मला मान्य आहे. काळाबाजारवाले आणि इन्कम टॅक्स चुकविणारे, साठेबाज आपण हुडकून काढा असे मी कसे काय म्हणू ? त्यांना आपण शिक्षा करा असे मी कसे म्हणू ? म्हणून मी एवढेच सांगू इच्छितो की या संदर्भात या राज्यामध्ये असलेल्या केंद्र सरकारच्या कायद्याची कडक अंमलबजावणी आपण केली पाहिजे. ती तरी आपण करता की नाही ? तो तरी आपण केली तरी याबाबत जनतेला बराच दिलासा मिळू शकेल.

दुसरी गोष्ट अशी की, राज्याचा कारभार चालणे ही एक कन्टिन्यूअेस प्रोसेस आहे. माननीय श्री. अंतुले ज्यावेळी या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी एक स्कीम इन्ट्रोड्युस केली होती ती म्हणजे जीवनावश्यक वस्तूंना सबसिडी देणे. त्यामध्ये असेही घोषित केले होते की ही सबसिडी देण्याकरिता काही पैसा अंदाजपत्रकामध्ये ठेवण्यात येईल. पण दुर्दैवाने तो ठेवण्यात आला नाही. दारिद्र्य-रेषेखाली जाणारा जो माणूस आहे, त्याला सबसिडीने जीवनावश्यक वस्तू आपल्याला पुरविता आल्या पाहिजेत. अशा प्रकारे त्याला वस्तू पुरवितांना आपल्याला जरी ५०-१०० कोटी रुपये तोटा सहन करावा लावला तरी आपण तो सहन केला पाहिजे. पण सबसिडी देऊन त्याला जीवनावश्यक वस्तू मिळाल्या पाहिजेत.

तिसरी गोष्ट म्हणजे आज वितरणाची आजची पद्धती एवढी चुकीची आहे की, आपण ज्या गोष्टी ग्रामीण विभागामध्ये वितरणासाठी देतो त्या त्यांच्यापर्यंत पोहोचतात की नाही हे पाहण्याची वेळ आली आहे. अशी शेकडो उदाहरणे आहेत की, सहकारी दुकाने असोत की खाजगी

दुकाने असोत, जिल्ह्याच्या ठिकाणाहून ते माल घेतात आणि तेथेच विकून टाकतात. खेड्यात तो माल पोहोचतच नाही. अशा घटनांतून हाच अर्थ घेतला पाहिजे की, वितरण व्यवस्थेची आमची जी यंत्रणा आहे ती जर कुठे राबविणार असू तर कमीत कमी ती गरीब माणसाला दिलासा देण्यासाठी राबविली पाहिजे; सरकारी यंत्रणेने गरीब माणसाला दिलासा देण्यासाठी जी रेशन दुकानाची यंत्रणा उभारली आहे ती मग खाजगी माणसाकडे असो अगर सहकारी संस्थेकडे असो त्या यंत्रणेची अकौंटबिलिटी आपणास घेता आली पाहिजे. मी तर असे म्हणेन की, सरकारी यंत्रणेकडे ही व्यवस्था आपण जर सोपविली तर सरकारलाच या वस्तू पुरवण्याच्या दृष्टीने जबाबदार धरता येऊ शकेल. त्याच्या बाबतीत राजकारण आड येणार नाही, त्याच्याबाबत कोणाला शिफारस करता येणार नाही. तेव्हा आपण या गोष्टीचा विचार करू शकतो. आणखी एक गोष्ट, कमीत कमी, लेव्हीचे तत्त्व जे शुगरच्या बाबतीत आपण ठरविले तसे तत्त्व मुंबईला ज्या ४९ टक्के इंडस्ट्रीज आहेत त्या इंडस्ट्रीजमधून उत्पादन होणाऱ्या जीवनावश्यक वस्तू ज्या आहेत त्याबाबत लागू करावे. त्यामध्ये मेडिसिन आहे, टूथपेस्ट आहे, फर्टिलायझर आहे, साबण आहेत, या सगळ्या वस्तू लेव्हीने त्या त्या उत्पादकाकडून घेऊन जे लोक बिलो पॉव्हर्टीलाईनखाली आहेत त्यांना देता आल्या पाहिजेत. एखादी टूथपेस्ट उत्पादन करणारी कंपनी असेल त्या कंपनीने अमुक इतक्या टूथपेस्टस शासनाला लेव्ही म्हणून दिल्या पाहिजेत, मेडिसीनची लेव्ही अमुक इतकी दिली पाहिजे, तेल अमुक इतके दिले पाहिजे, अशा प्रकारे ज्या काही जीवनावश्यक वस्तू आहेत त्या लेव्हीच्या रूपाने प्रोक्युअर करून शासनाने त्या बिलो पॉव्हर्टी लाईनखालील माणसासाठी व मध्यमवर्गीय माणसासाठी लेव्हीच्याच किंमतीत उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ही बाब राज्य सरकारच्या अखत्यारित येणारी आहे. पण भारताची तुलना करीत असताना आफ्रिकन कंट्रीशी जी तुलना करण्यात येते ती बरोबर नाही. नैरोबीतील वितरण व्यवस्था आणि भारतातील वितरण व्यवस्था याची तुलना करता येणार नाही. म्हणून मा. सदस्य श्री. लहाने यांनी म्हटल्याप्रमाणे उत्पादकांना इन्सेंटिव्ह देत असताना रशिया, अमेरिका येथील जो फेनॉमिना आहे त्याच्याशी आपण तुलना केली पाहिजे. आपण आपल्या देशाची तुलना बड्या राष्ट्रांशी केली पाहिजे. त्यांनी आखलेली जीवनावश्यक वस्तूंबाबतची पद्धत यशस्वी झालेली आहे. चायनामध्ये सॅलरी कमी आहे. परंतु तेथे घर व इतर जीवनाश्यक वस्तू कॉइंडमध्ये दिल्या जातात. त्यांनी स्वीकारलेली वेजेसची पॉलिसी जी आहे त्यामध्ये जीवनाश्यक वस्तू वेजेसच्या रूपाने वितरित केल्या जातात. तेव्हा कमीत कमी राज्य सरकारच्या अखत्यारित ज्या गोष्टी आहेत त्या तरी राज्य सरकारने कराव्यात. नाही तर आता आलेले शासन तसेच पुढे चालले आहे असे म्हणावे लागेल. तसे राज्य सिव्हिल सेक्रेटरीज देखील चालवू शकतील. परंतु मध्ये प्रतिभाताई या लोकशाहीच्या माध्यमातून मंत्री म्हणून आलेल्या असल्यामुळे व मुख्यमंत्रीही आता तसेच आलेले असल्यामुळे त्यांनी मग जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजातील जो शेवटचा माणूस आहे त्याच्यासाठी काही तरी पॉलिसी चॉक आऊट करणे ही त्यांची जबाबदारी आहे. राज्य सरकारची ती जबाबदारी असल्यामुळे राज्य सरकार ती जबाबदारी टाळू शकत नाही. म्हणूनच लेव्ही सिस्टिम ही इसेंसियल कमोडिटीज करिता उपयोगात आणून ती राबविली पाहिजे. ही गोष्ट तुमच्या अखत्यारितील आहे. तेव्हा एवढे तरी करा.

❑❑❑

राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

(३० नोव्हेंबर, १९८३)

महाराष्ट्र राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीबाबत बोलताना श्री. गवई म्हणाले, राज्यातील पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होऊ नये, त्यांची गुणवत्ता कायम राहिली पाहिजे. या भाषणात श्री. गवई यांनी तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. बाबासाहेब भोसले यांच्या कारकिर्दीला दुषणे दिलीत. पोलिसांची यंत्रणा बनावट, बदनाम करून आपण ज्या फांदीवर बसलो आहोत ती फांदीच त्यांनी तोडून टाकली, एक पाप केले, पोलीस यंत्रणा कायम कलंकित केली असे सांगितले. श्री. गवई साहेबांनी अतिशय अभ्यासपूर्ण हे भाषण केले असून त्यात अनेक मौलिक सूचना दिल्या आहेत.

अध्यक्ष महाराज, या राज्यातील बिघडत असलेली कायदा आणि सुव्यवस्था या विषयावरील या सभागृहात मांडलेल्या प्रस्तावावर मी बोलणार आहे. अध्यक्ष महाराज, प्रथमतः मला हे कबूल केले पाहिजे की, या देशाच्या तुलनेने आणि देशामध्ये जी राज्ये आहेत त्यांच्या तुलनेने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हा या महाराष्ट्रात तितकासा वाईट नाही. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांचे चांगले मॉरल घसरले जाता कामा नये. परंतु त्याचबरोबर या पोलीस यंत्रणेसंबंधी सर्व देशामध्ये विशेषतः महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या देखील जी आज प्रशंसा होत आहे, जी गुणवत्ता आहे ती टिकली पाहिजे आणि त्या निमित्तानेच काही उपाययोजना करता येईल की काय एवढ्या विषयापुरताच मी या ठिकाणी भाषण करणार आहे. केवळ व्यक्तिगत रागापोटी नव्हे पण मी सांगू इच्छितो की, बाबासाहेब भोसले यांच्या बेजबाबदार कारकिर्दीचा कालखंड पाहिला तर दिसेल की, पोलीस यंत्रणाच बनावट, बदनाम करून ज्या फांदीवर आपण बसलो होतो तीच फांदी तोडून टाकण्याचे पाप त्यांनी केले आणि त्यांनी पोलिस यंत्रणा कायमचीच कलंकित केली. अध्यक्ष महाराज, आपण यामध्येही फरक केला पाहिजे की, स्वातंत्र्यापूर्वीचा कालखंड आणि स्वातंत्र्यानंतरचा कालखंड. आज कायदा आणि सुव्यवस्था कशी आहे याचे काही प्रकार माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि आमचे मित्र श्री. लहाने यांनी या ठिकाणी सांगितलेले आहेच. परंतु काल परवा विधानसभेमध्ये या संदर्भात जे उत्तर देण्यात आले आहे ते मी उदाहरणादाखल या ठिकाणी सांगणार आहे. विधानसभेमध्ये तेथील सन्माननीय सदस्य श्री. प्रेमकुमार शर्मा यांनी प्रश्न विचारला की, महाराष्ट्रात १ जानेवारी १९८२ ते ३१ डिसेंबर १९८२ व १ जानेवारी १९८३ ते ३१ मे १९८३ या काळात किती जातीय दंगली झाल्या आणि त्यामध्ये कितीजण मृत्यू पावले व किती मालमत्तेची हानी झाली ? याला उत्तर देताना म्हटले आहे की, १ जानेवारी १९८२ ते ३१ डिसेंबर १९८२ या कालावधीत २२ व १ जानेवारी १९८३ ते १ मे १९८३ या कालावधीत ९ जातीय दंगली झाल्याची नोंद असून त्या दंगलीमध्ये १९८२ मध्ये कोणीही मृत्यूमुखी पडलेले नाही पण १९८३ मध्ये ३ जण मृत्यूमुखी पडले आहेत. सन १९८२ मध्ये एकंदर ५४,५४,५३७ रुपयांच्या आणि १९८३ मध्ये ५,३४,९०५ रुपयांच्या मालमत्तेची हानी झाली आहे. म्हणजे एका प्रश्नाच्या

उत्तराने कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाची जी ग्रॅव्हीटी आहे ती नाकारता येत नाही. अध्यक्ष महाराज, या दृष्टिने पोलीस प्रमुख श्री. मेढेकर यांनी काही दिवसांपूर्वी जी एक मुलाखत दिली आहे ती अत्यंत उदबोधक अशी आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न प्रांजलपणे नाकारता येत नाही याची त्यांनी कबुली दिली आहे आणि त्याचबरोबर त्यांनी आपल्या मुलाखतीमध्ये काही सूचना केल्या आहेत. राज्यमंत्री ना. विलासराव देशमुख, या तरुण मंत्र्यांनी नागपूरला मुलाखत दिली होती आणि मला ती मुलाखत आवडली. कायदा आणि सुव्यवस्था बिघडत चालली आहे असे त्यांनी अंतर्मुख होऊन सांगितले आणि त्यासंबंधी काय कारवाई करावी हेही त्यांनी सांगितले. या दोन्ही मुलाखती बोलक्या आहेत. मी सुरुवातीलाच असे सांगितले की देशाच्या तुलनेने या राज्यातील परिस्थिती बरी आहे. तरी पण ती राज्याच्या दृष्टीने बरी नाही आणि म्हणून याची दखल घेणे जरूरीचे आहे. मी उल्लेख केला की, स्वातंत्र्यापूर्वीचा पोलीस आणि स्वातंत्र्यानंतरचा पोलीस, तसेच स्वातंत्र्यापूर्वीचा नागरिक आणि स्वातंत्र्यनंतरचा नागरिक हे दोन्ही सारखे बदललेले आहेत. नागरिकत्वामध्ये अमुक एक मोठा, अमुक लहान, असे तत्त्व स्वीकारले नाही. नागरिकत्वामध्ये मग तो डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस असो, आय.जी.पी. असो, मुख्यमंत्री असो, आपण असा किंवा मी असो, सर्व नागरिक समान आहेत. आणि म्हणून भारतीय संविधानाच्या प्रिॲम्बल्स पूर्ण करण्याची जबाबदारी जेवढी डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांची आहे तेवढीच जबाबदारी माझीही आहे. आणि म्हणून अशा तऱ्हेचे नाते पोलीस व नागरिक यांच्यामध्ये उत्पन्न होण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवाने ही गॅप बुजून गेली नाही. इंडियन पीनल कोड प्रमाणेही आपण स्वत: पोलीस आहात. मी पोलीस आहे, इव्हन मी सुद्धा माणसाला ॲरेस्ट करू शकतो. ॲरेस्ट म्हणजे दुसऱ्या अर्थाने मला देखील पोलिसांसारखे वागता येते. आणि या दोन्ही अर्थाने असे घडले असते तर निश्चितपणे मी सुद्धा पोलिसांसारखा वागू शकलो असतो. जर पोलीस आणि नागरिक यांच्यात तसे नाते जर एस्टॅब्लिश झाले असते तर. आणि मग अर्थात पोलीस हा प्रश्नच संपुष्टात आला असता. स्वातंत्र्यापूर्वीचा पोलीस अधिकारी हा इंग्रजांचा नोकर होता. स्वातंत्र्यानंतरचा पोलीस हा कोणाचा नोकर नाही. तोही जनतेमधला एक नागरिक आहे आणि असलाच तर तो या सार्वभौम प्रजासत्ताकाचा नोकर आहे. म्हणून ही दोन नाती एकत्र न आल्यामुळे रजिस्टर केलेल्या गुन्ह्यांची संख्या जेवढी आहे त्यापेक्षा जास्त संख्या रजिस्टर न केलेल्या गुन्ह्यांची आहे. राज्यातल्या लोकांना गुन्हा रजिस्टर करण्याचे आज स्वातंत्र्य नाही आणि म्हणून नॉन-रजिस्टर्ड गुन्ह्यांची संख्या किती होईल? कारण पोलीस स्टेशनला जाण्याचे धाडस कोण करतो? ज्याला हिंमत आहे, ज्याचा टेलिफोन आहे, ज्याचा गॉडफादर आहे तो माणूस पोलीस स्टेशनला जाईल. पण अनेक नागरिक असे आहेत की, त्यांना आपल्या तक्रारीची (गुन्ह्यांची) दखल घेतली जाईल असे मुळी वाटतच नाही आणि म्हणून नॉन-रजिस्टर्ड ऑफेन्सेस अनेक असू शकतात. मी एकच सांगेन की, पोलीस आणि जनता यामध्ये मित्रत्वाचे नाते निर्माण झाले पाहिजे. नाही तर आज पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर करण्यासाठी गेले तर आम्ही काय तुझ्या बापाचे नोकर आहोत, एवढ्याचसाठी आम्हाला पगार दिला जातो काय, याशिवाय आम्हाला काही काम नाही का, अशा नागरिकांना पोलिसांकडून उत्तरे मिळतात. पण आपण स्वातंत्र्यामध्ये राहतो आणि स्वतंत्र राज्यामध्ये ज्या आपल्यावर जबाबदाऱ्या आहेत त्या आपण पार पाडीत नाही असेच दुर्दैवाने म्हणावे लागते. मघाशी म्हटल्याप्रमाणे राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचा मी जो उल्लेख केला त्याचा विचार करता आपल्या राज्यात लोकसंख्येशी पोलिसांचा टोटल रेशो काय आहे ? महाराष्ट्राची लोकसंख्या ५ कोटी ६४ लाख आहे आणि जवळजवळ ८८,००० पोलीस फोर्स आहे. श्री. मेढेकर यांनी तो ६५,००० आहे असे सांगितले. स्टॅटिस्टिक काढण्यासाठी लोकसंख्येशी पोलिसांचा भागाकार केला तर ८३० माणसांना एक पोलीस असे हे प्रमाण पडते. म्हणजेच ८३० माणसांच्या प्रश्नांची दखल घेणारा एक पोलीस आहे. मी हे प्रमाण इतर राज्यांचे सांगत नाही तर मी इतर देशांचे सांगतो. कारण इतर राज्यांचा प्रश्नच

येत नाही. तर हे प्रमाण इंग्लंडमध्ये ४५१, अमेरिकेत ३६२, फ्रान्समध्ये २१७ असे आहे. पहिली गोष्ट अशी की, गुन्ह्यांच्या व्याप्तीच्या स्वरूपात आमच्या राज्यात पोलीस फोर्स अपुरा आहे. वेल्फेअर स्टेटचा अर्थ महात्मा गांधींच्या कल्पनेप्रमाणे सांगावयाचे झाले तर ज्या दिवशी देशात रामराज्य निर्माण होईल त्या दिवशी महाराष्ट्रात एकही पोलीस दिसता कामा नये. वेल्फेअर स्टेट झाले तर मग पोलिसांचे काय काम ? वेल्फेअर स्टेट म्हटल्यानंतर देखील पोलीस यंत्रणेवर, शासनावर आणि नागरिकांवरसुद्धा काही जबाबदाऱ्या येतात. वेल्फेअर स्टेट म्हटल्यानंतर नागरिकांनीसुद्धा आपल्या जबाबदाऱ्या पार पाडावयास हव्यात. जे सामाजिक कर्तव्य आहे ते केले पाहिजे. हा ब्रॉड इश्शू आहे. आपल्या देशात विशेषतः महाराष्ट्रातील पोलीस खात्याची प्रतिमा उजळेल या दृष्टीने आपण याचा विचार केला पाहिजे. आणि म्हणून या संबंधी आपल्याला काही विचार जरूर करावा लागेल. गुन्ह्यांमध्ये दोन प्रकार आहेत. एक बेलेबल आणि दुसरा नॉनबेलेबल, कॉगनिझेबल आणि नॉन-कॉगनिझेबल. कॉगनिझेबल ऑफेन्स म्हणजे दखलपात्र गुन्हा. जो गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्याची दखल घेतली पाहिजे. आणि नॉनकॉगनिझेबल ऑफेन्स व मिसलिनियस ऑफेन्सेस म्हणजे अदखलपात्र गुन्हा. हे नॉन-कॉगनिझेबल ऑफेन्सेस डील करण्याकरिता, पोलिसांची एफिशियन्सी वाढविण्याकरिता दुसरी यंत्रणा निर्माण केली पाहिजे. त्याचे पोटॅन्शियल काय आहे ? याचा विचार जरूर केला पाहिजे. जसे मी मघाशी जे रागाने बोललो ते वैयक्तिक रागाने नव्हे. चंद्रपूरला जर मूर्ख तहसीलदार नसता तर तेथे पोलिसांना लाठीमार, छडीमार व अश्रुधूर सोडावा लागला नसता. तेथे तो त्याचे जजमेंट चुकला. त्याने जे केले ती त्याची चूक आहे. तेव्हा पहिला विचार आपण असा केला पाहिजे की, जे दखलपात्र गुन्हे नाहीत ते एकत्र करून त्यासाठी लेसर यंत्रणा निर्माण केली पाहिजे. त्यासाठी सबंध यंत्रणा उपयोगात आणता कामा नये. आणि म्हणून यासाठी निराळा पोलीस फोर्स निर्माण करण्याची गरज आहे. मी, मा. सदस्य श्री. नवलकर यांची भ्रमंती वाचली. त्यामधील विचारांचा विचार आपण करणार आहोत की नाही ? त्यात म्हटल्याप्रमाणे आपल्या देशातल्या क्रिमिनल प्रोसिजर कोड आणि इंडियन पीनल कोडमध्ये आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. त्याबाबत दुःख असे आहे की, एक माणूस आरोप करून त्याला बेल दिला गेला, तो परत जात असताना तो पुन्हा खून करतो असेही उदाहरण त्यात दिले आहे. म्हणजे याचा अर्थ ऑफेन्डर्स आणि रेग्युलर ऑफेन्डर्स यात असा फरक केला पाहिजे. आणि तो आम्ही आय.पी.सी. आणि सी.आर.पी.सी. मध्ये केला पाहिजे. एवढेच नव्हे तर एकदा मुंबईचे पोलीस कमिशनर म्हणाले की, गुन्हेगार पकडल्यानंतर ताबडतोब त्याला बेल देणे आता योग्य नाही. कारण बेल मिळाल्याबरोबर तो बेलच्या कालखंडात ४-५ गुन्हे पुन्हा करतो. आणि म्हणून याचा विचार करण्याची गरज आहे की, बेल द्यावा की नाही. रेग्युलर ऑफेन्डर्सला देण्याचा विचार केला पाहिजे. आणि आपले जे इंडियन पीनल कोड आणि क्रिमिनल प्रोसिजर कोड हे केव्हा तरी बाबा आदमच्या जमान्यात तयार केले आहेत ते बदलले पाहिजेत. रेग्युलर ऑफेन्डर्सना आपल्याला बेल शिल्लक ठेवता येणार नाही आणि याची दखल आपण घेऊन याही बाबीचा विचार केला पाहिजे. कोर्टामध्ये जे रेग्युलर प्रोसीडिंग्ज आहेत त्याप्रमाणे रेग्युलर ऑफेन्डर्सना पकडल्यानंतर त्याचे जजमेंट ५ वर्षांनंतर होते. मध्यंतरीच्या काळात त्यांच्याकडून सारखे ऑफेन्सेस होत असतात. मुंबई शहरामध्ये जमानत घेणारा, कोर्टामध्ये प्रकरण नेऊन साक्षीपुरावे तयार करणारे, कोर्ट फी घेऊन साक्षीपुरावे नष्ट करणारे लोक आहेत. मुंबई शहरामध्ये अशा २० यंत्रणा शिल्लक आहेत आणि म्हणून या सगळ्या गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे, या अशा गोष्टी घडता कामा नये. या साऱ्या गोष्टी ते करतात. अध्यक्ष महाराज, दुसरी एक गोष्ट अशी की, आपल्या ज्या आई-बहिणी आहेत. त्या स्त्रियांसंबंधीचे जे गुन्हे आहेत ते समरी ट्रायल प्रोव्हिजनने विचारात घेऊन त्याबाबत ताबडतोबीने निर्णय दिला पाहिजे. मग ते गुन्हे स्त्रियांच्या विनयभंगाच्या संदर्भातील असो, धक्काबुक्कीच्या

संदर्भातील असोत, बलत्कारासंबंधीचे असोत वा अन्य बाबीसंबंधीचे असोत. आपल्याला ह्या प्रकरणातील पुरावे नष्ट होणार नाहीत याच्या दृष्टीने ताबडतोबीने न्याय देणारी स्वतंत्र यंत्रणा उभी केली पाहिजे. याचे कारण असे की, म्हातारी मेल्याचे दुःख नाही परंतु काळ सोकावतो आहे. तो सोकावता कामा नये म्हणून स्त्रियांच्या संदर्भातील जे गुन्हे आहेत त्या संदर्भात लवकरात लवकर ताबडतोबीने निकाल लागण्याच्या दृष्टीने आपल्याला काय करता येईल, जेणे करून अशा प्रकरणातील पुरावे नष्ट होणार नाहीत या दृष्टीने या प्रश्नाचा विचार करण्याची गरज आहे. तसेच दखलपात्र आणि अदखलपात्र असे जे गुन्हे आहेत त्या संदर्भात लक्ष घालण्यासाठीसुध्दा एक स्वतंत्र अशी वेगवेगळी डिव्हिजन्स आपण स्थापन केली पाहिजेत. त्याचप्रमाणे जे सराईत गुन्हेगार आहेत, नेहमी गुन्हे करणारे गुन्हेगार आहेत त्यांना बेल मिळणार नाही यादृष्टीने आय.पी.सी. आणि सी.आर.पी.सी. मध्ये आपण तरतूद केली पाहिजे. अशा बदमाष लोकांसाठी आजच्या कायद्यात समरी ट्रायलची प्रोव्हिजन केली पाहिजे. मला हे कळत नाही की, एकच पोलीस यंत्रणा लॉ अँड ऑर्डरचे काम आणि गुन्ह्यांच्या तपासाचे काम कसे काय करू शकते ? आज अनेक देशांमध्ये अशी परिस्थिती आहे की, गुन्ह्याची चौकशी करणारी यंत्रणा वेगळी आहे आणि लॉ अँड ऑर्डर मेन्टेन करणारी यंत्रणा वेगळी आहे. मी या ठिकाणी आपणास एक उदाहरण देतो. कलकत्त्यामध्ये दोन मुलांचे खून केले गेले आणि त्यांची प्रेते रूळावर टाकण्यात आली. हे प्रकरण आनंद बझार पत्रिकेने उजेडात आणले. ते उचलून धरले. तेथील सरकारने ते दडपण्याचा प्रयत्न केला. ही मुले अपघातात मरण पावली असा पंचनामा केला गेला. परंतु आनंद बझार पत्रिकेने ह्याचा पाठपुरावा केला आणि रिटायर्ड पोलीस अधिकारी श्री. डे यांना ह्या प्रकरणाचा तपास स्वतंत्ररीत्या करण्यास सांगितले. ही कामगिरी त्यांच्याकडे सोपविली. ही मुले अपघाताने मेलेली नाहीत. त्यांना ठार मारण्यात आलेले आहे हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. श्री. डे यांना ह्या गुन्ह्याचा तपास करताना तेथे पोलिसांचा मारही खावा लागला हा भाग वेगळा, तर सांगण्याचा मथितार्थ असा की, अशाप्रकारचे जे महत्त्वाचे गुन्हे आहेत त्यांचा तपास करणारी वेगळी यंत्रणा असावी. त्यासाठी वेगळे डिव्हिजन असावे आणि लॉ अँड ऑर्डर मेन्टेन करण्यासाठी स्वतंत्र पोलीस यंत्रणा असावी. या राज्यात ती निर्माण करता येईल की नाही या दृष्टीने विचार करून ती निर्माण करण्यात यावी हा मुख्य प्रश्न आहे. अध्यक्ष महाराज, आपल्या राज्यात अनेक गोष्टी चिंताजनक आहेत. एखादे प्रेमी युगल, जोडपे दोघांच्या संगनमताने हॉटेलमध्ये गेले तर मला त्याबाबत आक्षेप घ्यावयाचा नाही. प्रेम करणे हा ज्याचा त्याचा स्वतंत्र व्यक्तिगत प्रश्न आहे. ऋषिमुनिनीही ते बंद केले नाही. ह्या संदर्भात वयाचाही प्रश्न नाही. संगनमताने प्रेमी जोडप्याने हॉटेलमध्ये जाणे हे मी समजू शकतो. परंतु मुंबईत आज अशी परिस्थिती आहे की, संगनमत नसतांना आज अनेक जोडपी हॉटेलमध्ये जाऊन राहत आहेत. ह्या संदर्भातील परिस्थिती अतिशय भयावह झालेली आहे. मुंबईतील मुल्ला काझी आज ह्यामुळे करोडोपती झालेले आहेत. त्यांचे काम एकच झालेले आहे की, मुंबईत येणारे जे अरब आहेत यांच्याशी कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर येथील गरीब मुलींचे विवाह लावून देणे. आपल्याकडे येणारे अरब हे सेकण्ड ग्रेडचे आहेत. इंग्लंडमधील अरब हे फर्स्ट ग्रेडचे आहेत. This is a grave concern to our race माझा कोणावर राग नाही. परंतु इंग्लंडमध्ये येणारा अरब हा प्रॉस्टीट्युशनकरता दररोज १० हजार पौण्ड खर्च करतो आणि आपल्या येथे येणारा अरब हा एक हजारापासून ५ हजार रुपयांपर्यंत बाई विकत घेत असतो. प्रत्येकाचा रेट हा वेगवेगळा असतो. हा धंदा मुंबई आणि मिरज येथे फार बोकाळला आहे. पाच दिवसांकरिता, सात दिवसांकरिता हे काझी लोक मुंबईतील या मीरजमधील मुलींशी ह्या अरबांचे कॉन्स्ट्रॅक्ट बेसवर लग्न लावत असतात. त्याचा परिणाम असा झाला आहे की, एकेकाळी अत्यंत डबघाईला गेलेला हॉटेल धंदा आज अतिशय तेजीत चालला आहे. ओबेरॉयने ह्या कामासाठी अंदाजे १०० खोल्या नव्याने वाढविल्या आहेत. अरबांनी ह्या कामाकरिता मुंबईतील जवळजवळ

३० टक्के हॉटेल्स ऑकुपाय केलेली आहेत. मध्यम कुटुंबातील मुलीला, जिला इज्जत प्रिय आहे ती अशा प्रकारे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर लग्न करण्यास कधीही तयार होणार नाही. परंतु १ हजारपासून ५ हजारापर्यंतच्या आमिषाने ती कोवळी मुलगी आज अरबांकडून विकत घेतली जात आहे. हा प्रकार म्हणजे मुंबईपासून मीरजेपर्यंतच्या मराठी लोकांच्या संस्कृतीवरचा आघात आहे. अध्यक्ष महाराज, ज्या स्त्रिया रेड लाईटमध्ये व्यवसाय करणाऱ्या आहेत त्यांचा प्रश्न वेगळा आहे. परंतु आज महाराष्ट्राच्या संस्कृतीवर अरबांकडून हा जो आघात होत आहे तो परतविण्याची, तो टाळण्याची वेळ आलेली आहे. हे शासन त्याचा गंभीरपणे विचार करणार आहे की नाही? ह्यासाठी कायद्यातील काही टेक्निकल बाबी जर आड येत असतील तर आपली संस्कृती वाचविण्यासाठी आपणाला त्या दुरुस्त केल्या पाहिजेत. कायद्यातील त्या संदर्भातील उणिवा दूर केल्या पाहिजेत. आज मुंबईतील सांस्कृतिक, सामाजिक जीवन उद्ध्वस्त होण्याच्या मार्गी आहे. अत्यंत चांगल्या घराण्यातील, कुटुंबातील मुली ज्यांच्या मनात कधी पाप येणार नाही परंतु केवळ आर्थिक परिस्थितीमुळे पैशाच्या लोभाने आज ह्या मार्गाकडे वळत आहेत. दिवसेंदिवस हे प्रकार मुंबईत हजारोंच्या संख्येने वाढत आहेत. आपण त्याला वेळीच कायदेशीर आळा घातला पाहिजे. अध्यक्ष महाराज, शीला बारसे नावाची एक पत्रकार आहे. तिने ह्या गुन्ह्यांच्या संदर्भातील तपशीलवार माहिती फ्री प्रेस किंवा इंडियन एक्सप्रेसमध्ये दिलेली आहे. ती माहिती लक्ष वेधणारी आहे. शीला बारसे यांनी ही माहिती देताना कोणा आय. पी. एस. अधिकाऱ्यांचे नाव दिलेले नाही. परंतु त्या माहितीत तिने त्या अधिकाऱ्यांच्या वेदना दिलेल्या आहेत. त्या अधिकाऱ्याने म्हटले आहे की, लॉ अँड ऑर्डर मेन्टेन करण्याची बाब केवळ पोलिसांच्या अखत्यारितील असती तर आम्ही त्याबाबत संपूर्ण कंट्रोल केला असता. परंतु यात राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे आमचा नाईलाज आहे. राजकीय पुढारी म्हणजे विरोधी पक्षाचे नव्हे तर सत्ताधारी पक्षाच्या पुढाऱ्यांचा यात फार मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप आहे. अध्यक्ष महाराज, हे ऑब्झर्व्हेशन माझे नव्हे तर ते शीला बारसे यांचे आहे. या ठिकाणी आमच्या ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये राजकीय हस्तक्षेप होतो हे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे. इतकेच नव्हे तर मेढेकर साहेबांनी स्वतः सांगितलेले आहे. जी गोष्ट कलकत्त्याच्या रुळावर सापडलेल्या बालकांच्या हत्येसंबंधी घडलेली आहे ती येथे घडलेली नाही असे म्हणता येणार नाही. Possibility cannot be ruled out because of political interference in the State of Maharashtra also.

अध्यक्ष महाराज, तेव्हा पोलिसांच्या दैनंदिन कारभारामध्ये राजकीय हस्तक्षेप होतो असा जर आक्षेप घेतला गेला तर त्याबाबत सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी रागावू नये. सत्ताधारी पक्षातील सर्वच सदस्य दोषी आहेत वा ते अशाप्रकारचा हस्तक्षेप करतात असे मी म्हणणार नाही. तिडके साहेब असा हस्तक्षेप करीत नाहीत तेव्हा त्यांना ह्याबाबत वाईट वाटणार नाही. पूर्वी ते मध्यस्थी करीत असत, आता त्यांनी मध्यस्थी करणेही बंद केलेले आहे. तेव्हा त्यांना हा आरोप लागू पडत नाही. मी ह्या संदर्भात कोणाचे व्यक्तिगत नाव घेतलेले नाही. ज्यांचा ह्याच्याशी संबंध असेल त्यांना त्याबाबत वाईट वाटण्याची शक्यता आहे. जर अशा प्रकारच्या पोलिसांच्या दैनंदिन कामामध्ये सत्ताधारी पक्षाच्या पुढाऱ्यांकडून राजकीय हस्तक्षेप होणार असेल तर मग पोलिसांचे मॉरल टिकणार तरी कसे? अध्यक्ष महाराज, मी प्रतिभाताईच्या जळगाव जिल्ह्यातील प्रकार सांगतो. जळगाव जिल्ह्यातील पोलीस अधिकारी श्री. आंबेडकर, पी. एस. आय. यांच्या संदर्भात पराचा कावळा करून त्याला ताबडतोबीने सस्पेंड करवून घेण्यात आले. ज्या इसमाने आपल्या मुलींवर ह्या पोलीस अधिकाऱ्याने बलात्कार केल्याची तक्रार केली. त्या इसमाचा दारूचा धंदा होता. ह्या आंबेडकर नावाच्या पोलीस इन्स्पेक्टरने धाडी घालून त्याचा तो दारूचा धंदा बंद केला होता. त्या इसमाने

अशाप्रकारचा गलिच्छ आरोप करून श्री. आंबेडकर यांना सस्पेंड करून त्याचा बदला घेतला. हे प्रकरण सभागृहात चर्चिले गेले आणि राज्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी त्या पी. एस. आय. ला सस्पेंड करण्यात येईल असे आश्वासन ह्या सभागृहाला दिले. तेव्हा अशा प्रकारे पी. एस. आय. किंवा आय. पी. एस. अधिकाऱ्यांच्या संदर्भात निवेदन करतांना थोडा अधिक विचार केला गेला पाहिजे. पण फॅक्ट काय दिसून आली त्याची नीट चौकशी न झाल्यामुळे हे सर्व झाले. म्हणजे मग पोलिसांचे मॉरल ते काय राहणार? जर कोणी आपले मॉरल खर्च करून कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप होता कामा नये. तो होत असेल तर ती चुकीची पद्धत आहे. अशा प्रकारचे राजकीय हस्तक्षेप आणि फेव्हरिटिझम असता कामा नये. आज आपण या राज्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांच्या पोस्टस् तपासून पहा. मंडल आयोगाला अभिप्रेत असलेले वीकर सेक्शन ऑफ द सोसायटीतील जे पोलीस अधिकारी आहेत, त्यांच्यापाशी एफिशियन्सी असुनही त्यांना साईड ट्रॅक करण्यात आलेले आहे. त्यांना एक्झिक्युटिव्ह पोस्टस् देण्यात आलेल्या नाहीत. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या बंदोबस्तासाठी असलेले, त्यांचा प्राण वाचविणारे म्हणून बक्षीस मिळविणारे अधिकारी एस. सी. चे आहेत म्हणून त्यांना साईड ट्रॅक करण्यात आलेले आहे. पण जो जवळचा आहे, आपल्या मताप्रमाणे वागणारा आहे त्यांना मात्र की पोस्टस् दिल्या आहेत. ही यामधील एक गोष्ट झाली. दुसरी गोष्ट अशी की मुळातच असा इंटरफि्रन्स राहणार नाही या दृष्टीने आपण नवीन तंत्रच बिल्ट अप केले पाहिजे. तसे केले तरच आज पोलीस अधिकाऱ्यांना पोलिसांना मुक्तपणे आपले काम करता येऊ शकेल. आणखी एक प्रकार सांगता येईल की काहीतरी पोलिटिकल रायव्हलरी असल्यामुळे त्यांच्यावर काही आरोप लादण्याचे काही प्रकारही होतात. मी माझ्या रिपब्लिकन पक्षातील एका माणसाचे मुद्दाम उदाहरण देऊ इच्छितो. श्री. गरुड नावाचे एक जिल्हा अध्यक्ष आहेत. ते काँग्रेसच्या विरुद्ध असल्यामुळे खोटे आरोप ठेवून त्यांना तडीपारीची नोटीस देण्यात आली. पुढे मी हा विषय उचलून धरला. त्यानंतर संबंधित पोलीस अधिकाऱ्याला या प्रकरणी माफीही मागावी लागली. हे सर्व सांगण्याचा माझा उद्देश एवढाच की कोणाचे काहीही राजकीय मतभेद असतील पण पोलिटिकल रिव्हेंज घेण्यासाठी राजकीय सत्तेचा वापर करावयाचा ही गोष्ट बरोबर नाही. मी माझे भाषण संपविताना फक्त काही सूचना करणार आहे. पोलीस कमिशनरची नेमणूक नॅशनल लेवलवर होते. आता आपल्याकडे ज्याप्रमाणे पी. एस. सी. सारखी स्वतंत्र यंत्रणा आहे. त्यामुळे काय होऊ लागले आहे? एक्झिक्युटिव्हमार्फत होणाऱ्या पी. एस. आय. च्या नेमणुका आणि आता पब्लिक सर्व्हिसेस कमिशनमार्फत होणाऱ्या नेमणुका यात आपल्याला काय तफावत दिसू लागली आहे? त्यातील करप्शन आता बंद झाले आहे. नाही तर अनेक ठिकाणी रेग्युलर हप्ते बांधून दिलेले आपल्याला दिसतात. पैशाचे रेग्युलर वाटप होत असते. हे करप्शन केव्हा बंद होते? ज्यावेळी सर्वात वरचा माणूस जेव्हा म्हणतो की मी करप्शन करणार नाही आणि ते कोणाला करूही देणार नाही. आज या गोष्टी कॉन्स्टेबल, सब-इन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर, एस. पी. या सर्व थरांवर चालू आहेत. पण मुळात ॲडमिनिस्ट्रेटरने जर असे ठरविले की मी करप्शन करणार नाही आणि कोणालाही ते करू देणार नाही तरच या करप्शनच्या प्रकारांना आपल्याला आवर घालता येईल. म्हणून मग आपल्याला यासाठी काही पोलीस डिव्हिजन्स तयार केल्या पाहिजेत. पब्लिक मीटिंग, मोर्चा, लेबर प्रॉब्लेम, कम्युनल प्रॉब्लेम, वूमेन प्रॉब्लेम, अनटचेबिलिटी आणि इलेक्शन्स यासाठी आपण अशा वेगवगळ्या डिव्हिजन्स तयार केल्या पाहिजेत. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला सांगतो की महाराष्ट्रामध्ये जी गोष्ट कधीही घडली नाही ती गोष्ट मला परवा पाटणच्या निवडणुकीमध्ये पहावयाला मिळाली. श्री. पाटणकर यांचे काही बूथ त्या ठिकाणी नष्ट केले आहेत, त्याचे फोटो माझ्याकडे आहेत.

आतापर्यंत आपण बिहार, यु. पी. सारख्या ठिकाणच्या बातम्या वाचत होतो. पण या गोष्टी आता महाराष्ट्रामध्ये घडू लागल्या आहेत.

मी ज्या पाच-सहा गोष्टी मघाशी सांगितल्या त्यामध्ये इलेक्शन डिव्हिजनचाही उल्लेख केला आहे. तेव्हा अध्यक्ष महाराज, मी आता म्हटल्याप्रमाणे इलेक्शन हा डेमोक्रसीचा फिनॉमिना आहे. तो लोकशाहीचा एक भाग आहे. परंतु मी माझ्या भाषणात सुरुवात करीत जी वस्तुस्थिती सांगितली आणि मी आता ज्या सूचना केल्या आहेत त्या प्रामुख्याने लॉ अँड ऑर्डरबाबत केलेल्या आहेत, त्याचा शासनाने अवश्य विचार करावा.

❑❑❑

मंडल आयोगाच्या शिफारशींवर चर्चा

(९ डिसेंबर, १९८३)

दिनांक ९ डिसेंबर, १९८३ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेत मंडल आयोगाच्या शिफारशींवर चर्चा झाली. त्यावेळी दादासाहेबांनी प्रस्तावाला सुधारणा सुचविली. ती मान्य होणार नाही याची त्यांना स्पष्ट कल्पना होती. पण त्यानिमित्ताने त्यांची भूमिका त्यांना सभागृहाच्या कामकाजात नोंदविता येणार होती. त्यावेळी ते म्हणाले ...

अध्यक्ष महाराज, मला कल्पना आहे की, नियमाप्रमाणे मला राईट-ऑफ रिप्लायचा अधिकार नाही. परंतु माझी सुधारणा मागे घेत असतांना तीन मिनिटांत काही विचार मी मांडणार आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे की, कोणतेही राजकारण करण्यासाठी मी ही सुधारणा दिलेली नाही. एस.सी., एस.टी. आणि नवबौद्ध यांच्या संबंधीचा हा प्रश्न नाही. तर हा प्रश्न इतर मागास जातींचा आहे. तेली, माळी, कोष्टी, गोंड गोवारी, कुणबी या जातींचा हा प्रश्न आहे. तेव्हा रिझर्व्हेशनच्या तत्त्वाने या आमच्याच बंधूंना आमच्याप्रमाणे काही सवलती देण्यासाठी काही घटना होत असेल तर त्या सवलती त्यांना दिल्या पाहिजेत असे मी मानतो, याचा अर्थ काही विशिष्ट हेतूने मी ही सुधारणा दिली होती, असे नाही. त्याचे समर्थन या ठिकाणी सर्वांनी केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. दि. कि. देशमुख म्हणाले की, आम्ही प्रायश्चित भोगत आहोत. ब्राह्मण असूनही त्यांनी असे विचार मांडले. तसेच सन्माननीय सदस्य श्री. मनोहर जोशी, श्री. ग. प्र. प्रधान, श्री. राजारामबापू पाटील, श्री. शामराव पेजे इत्यादी सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार मांडले आहेत. सर्वांचीच नावे घेणे शक्य नाही. आणि शेवटी समारोपाचे भाषण श्री. तिडके साहेबांनी केले. तिडके साहेब काय बोलतात हे पूर्वी कधी आम्हाला कळतच नव्हते. परंतु कालचे त्यांचे भाषण अत्यंत स्पष्ट आणि समजण्यासारखे झाले. त्यामधून त्यांच्यामधील महात्मा फुलेंचे विचार, शाहू महाराजांचे विचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तंतोतंत बाहेर पडले आणि तेच म्हणणे माननीय मंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी या ठिकाणी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात जर वेगळा विचार आला असता तर ... परंतु

डॉ. बाबासाहेबांनी ती चूक केली नाही. अधिक स्पष्ट बोलावयाचे म्हणजे जी चूक जीनांनी केली ती चूक बाबासाहेबांनी केली नाही. म्हणूनच आमच्यासारख्या माणसाचे नाक आज वर आहे. तुम्ही आम्हाला उपेक्षित समजा, अस्पृश्य समजा, परंतु आम्ही प्रथम भारतीय आहोत आणि शेवटीही भारतीयच आहोत. भांडण माझे, दादांचे आणि रामराव आदिकांचे असू शकते परंतु देशाशी माझे भांडण नाही. म्हणून समाजा-समाजातील अशांतता ही आम्हाला मुळीच अभिप्रेत नाही. डॉक्टर बाबासाहेबांच्या अनुयायांना हे मुळीच अभिप्रेत नाही. हे आम्ही केवळ बोलतोच नाही तर कृतीने देखील व्यक्त करून दाखविलेले आहे. अध्यक्ष महाराज, माझा उद्देश अजिबात वाईट नाही. या ठिकाणी मा. वसंतदादा, उपमुख्यमंत्री आणि बहुतेक सर्व कॅबिनेट मिनिस्टर हजर आहेत. या सर्वच गोष्टींचा विचार आपण करू. मी असा कोणता विघ्नसंतोषी माणूस आहे की, या बाबतचे विचारच बंद करू? विचार करण्यास आपण सर्वजण तयार असताना माझी मोशन व्होटिंगला टाकून आपले विचार बंद करण्याचे पाप मी कशासाठी करू? मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री आणि मा. मंत्रिमहोदया श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी अत्यंत चांगला दृष्टिकोन या ठिकाणी व्यक्त केलेला आहे. ही चर्चा जरी तात्त्विक पातळीवरून झालेली असली तरी त्यामध्ये कधीही बिटरनेस आलेला नाही. दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून अत्यंत पोक्तपणाने, उच्च दर्जाची अशी ही चर्चा झाली. या बाबतीत महात्मा फुल्यांचे शिष्य मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मांडून मी या ठिकाणी माझी सूचना मागे घेतो. ज्या पुस्तकामधून मी त्यांचे विचार मांडणार आहे ते पुस्तक मीच लिहिलेले आहे. आणि बाबासाहेबांचे विचार त्यामध्ये कोट केलेले आहेत. बाबासाहेबांनी असे म्हटलेले आहे की, 'ज्या राखीवतेच्या सिद्धांताला आज सत्ताधिष्ठित वर्ग जातीय म्हणून संबोधित आहे व विरोध करीत आहे त्याच राखीवतेच्या सिद्धांताच्या आधारे या वर्गाने सत्ता हस्तगत केलेली आहे. दलितांतर्फे राखीव जागांची मागणी ही काही नवीन अथवा अतिरेकी स्वरूपाची नाही. ही मागणी सत्ताधिकारी वर्गाच्या जातीय आक्रमणाविरुद्ध सुरक्षात्मक असे कवच आहे. कारण सत्ताधारी जातीयवर्ग हा जीवनाच्या सर्व क्षेत्रात पददलित समाजाला दडपण्याचाच प्रयत्न करीत असतो. ह्या सत्ताधिकारी वर्गाने ज्या तऱ्हेच्या अपमानास्पद अटी दलित वर्गावर लादलेल्या होत्या तसल्या कोणत्याही अटींची मागणी न करता पददलित समाज राखीव जागांची मागणी करीत आहे.' अध्यक्ष महाराज, स्टेट ॲण्ड मायनॉरीटी या पुस्तकात ते म्हणतात की,

> "Unfortunately, for the minorities in India, Indian, nationalism has developed a new doctrine which may be called the living right of the majority to rule the minorities according to the wishes of the majoritiy. Any claim for the sharing of power by the minority is called communalism while the mono-polising of the whole power by the majority is called the nationalism."

हे त्यांचे दोनच उतारे मी या ठिकाणी उद्धृत केलेले आहेत. माझी अशी खात्री आहे की, या सूत्राचा जरूर वापर होईल. अत्यंत प्रेमाने, आनंदाने, कोणतेही रिझर्व्हेशन मनात न ठेवता मी माझी ही सुधारणा मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

(सुधारणा सभागृहाच्या अनुमतीने परत घेण्यात आली.)

❑❑❑

कापूस एकाधिकार योजनेवर प्रेम

(१३ डिसेंबर, १९८३)

विदर्भातून आल्यामुळे कापूस हा दादासाहेबांच्या जिव्हाळयाचा विषय असणे स्वाभाविकच होते. एकाधिकार कापूस योजनेवरील कोणतीही चर्चा ते चुकवीत नसत पण त्यांचा कल नेहमी तात्कालिकतेपेक्षा मूलभूत मुद्यांकडे असे. दिनांक १३ डिसेंबर, १९८३ रोजीही त्यांनी तोच प्रघात पाळला. ते म्हणाले...

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी या विषयावर आतापर्यंत सविस्तर अशी चर्चा झालेली आहे. तेव्हा त्याची पुनरावृत्ती न करता मी बोलणार आहे. अध्यक्ष महाराज, देशाच्या तुलनेत कापसाचे पीक हे या महाराष्ट्रात जास्त आहे. नव्हे महाराष्ट्र या देशात कापूस उत्पादनामध्ये अग्रेसर आहे. त्यातही महाराष्ट्रातील विदर्भाचा भाग हा कापूस उत्पादक भाग आहे. तेव्हा या राज्याच्या एकंदर अर्थव्यवस्थेवर या कापसाच्या उत्पादनाचा काय परिणाम होतो आणि होईल याचे विवेचन सन्माननीय सदस्य श्री. रा. अ. पाटील यांनी या ठिकाणी केलेलेच आहे. अध्यक्ष महाराज, गेल्या एक वर्षाच्या अनुभवामध्ये मला ही योजना तीन स्वरूपात विभागली आहे असे दिसते. पैकी एक म्हणजे मुक्त व्यापार, दोन एकाधिकार आणि तीन मिश्र व्यापार. या तिन्ही प्रकारामध्ये जो अनुभव आलेला आहे त्यावरून ही योजना तोट्यात चालते अशा निर्णयाप्रत अगदी हताश होऊन हे सरकार आले आहे. त्या संबंधीची काही आकडेवारी माझ्याकडे आहे. अध्यक्ष महाराज, १९७६-७७ मध्ये या योजनेमध्ये १० कोटींचा नफा झाला, १९७८-७९ मध्ये १ कोटीचा नफा झाला. १९७९-८० मध्ये साडेचार कोटींचा नफा झाला, १९८०-८१ मध्ये २० कोटींचा नफा झाला आणि १९८१-८२ मध्ये ३२ कोटींचा तोटा झाला, तोही सरकारच्याच धोरणामुळे, वरलक्ष्मी कापसाचा भाव न दिल्यामुळे आणि विचार न करता त्याला एन्करेज केले म्हणून. तेव्हा हे आकडे पाहिल्यानंतर तोटा आणि नफा हा जवळजवळ आहे. या योजनेतून नफा येईल या अपेक्षेने ही योजना सुरू झालेली आहे असे या योजनेचे जनक कै. वसंतरावजी नाईक यांनी तर त्यावेळेस स्पष्ट केले होते. या योजनेमध्ये जर तोटा आला तर तो आम्ही शेतकऱ्यांवर बसविणार नाही असे ते म्हणाले होते. याचा अर्थ परस्पेक्टिव्ह प्लॅनिंगमध्ये तोटा येणारच नाही अशीच योजना त्यावेळी कै. वसंतरावजी नाईक यांनी केली होती. अध्यक्ष महाराज, दुसरा मुद्दा असा की, केवळ कापूस एकाधिकारच नव्हे तर कच्च्या मालापासून पक्क्या मालापर्यंत जी संपूर्ण प्रक्रिया या ठिकाणी आताच सन्माननीय सदस्य श्री. राजारामबापू पाटील यांनी सांगितली त्याप्रमाणे करून म्हणजे कापसाच्या कच्च्या मालापासून गिरण्यांतून पक्का माल येईपर्यंतची योजना येथे या महाराष्ट्रातच जर आपण राबविली तर त्यातून शेतकऱ्यांना फायदा मिळेल, हा या योजनेचा प्रमुख उद्देश होता. त्याचा फॉलोअप काय झाला? अध्यक्ष महाराज, या संदर्भात आपण त्यावेळचे मंत्री श्री. यशवंतराव मोहिते यांचे भाषण वाचले तर आपल्याला कल्पना येईल की, या योजनेला यशस्वी करण्याच्या दृष्टीने जी फॉलोअप ॲक्शन व्हायला पाहिजे होती ती सरकारने केली नाही आणि त्यामुळे ऑप्टिमम नफा मिळविण्याची जी तरतूद या योजनेमध्ये होती ती पूर्ण होऊ शकली नाही.

एचबी ११८०—२४

अध्यक्ष महाराज, यातील दुसरी गोष्ट म्हणजे या योजनेतील अत्यंत सदोष अशी यंत्रणा. त्यामुळे या योजनेतील ग्रेडर हे लखोपती झालेले आहेत. एवढेच नव्हे तर वांधा समितीची माणसे देखील यामधून गबर झाली आहेत. आताच जसा सन्माननीय सदस्य श्री. लहाने यांनी अनुभव सांगितला त्याप्रमाणे माझा देखील अनुभव आहे. माझा चांगल्या ग्रेडचा कापूस गेला, त्यानंतर दुसरा लोअर ग्रेडचा २० क्विंटल कापूस गेला त्यावेळेस तेथे ग्रेडरने माझ्या माणसाला विचारले की, याला किती ग्रेड द्यावयाची? म्हणजे हे सारे ठरवून केले जाते. तेव्हा हा जो सदोष यंत्रणेचा प्रश्न आहे तो काही आपले महामंडळ स्थापन करून सुटणार नाही. नाही तर असेच होईल की, लग्नाआधी बाईचे नाव होते गंगूबाई लग्नानंतर ते झाले सखूबाई तरी चेहरा तोच राहिला. ज्याप्रमाणे आजच्या राष्ट्रीयीकृत बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी जे स्वरूप होते ते राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरही तेच राहिले. त्याप्रमाणे हेही होईल तेव्हा या यंत्रणेतील जे दोष आहेत ते काही आता मी येथे रिपिट करीत नाही. परंतु ग्रेडरने वजन वाढवून देणे, ग्रेड वाढवून देणे, वांधा कमिटीतील वांधा, आदी जे दोष आहेत ते आपण कसे काढून टाकता येतील हे पाहिले पाहिजे आणि मग एक संपूर्ण दोषविरहित, सुटसुटीत, कमी बंधनकारक अशी योजना, नियंत्रण आपण केले पाहिजे, प्रसंगी त्यासाठी जर आपल्याला आपला कायदा दुरुस्त करावा लागला तरी त्याची तयारी ठेवली पाहिजे. म्हणजे केवळ नवीन महामंडळाच्या निर्मितीने प्रश्न मिटेल असे नाही. आपण पाहतोच आहोत की, गुजरातमधील शेतकऱ्याला जास्तीत जास्त न्याय आजही मिळत आहे. कॉटन पूल करून होल्डिंग कॅपॅसिटी आज येथील शेतकऱ्यांची नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांचे फावते. परंतु कापसाची एकाधिकार योजना नसतानाही गुजरात आपल्याकडील शेतकऱ्यांना न्याय देऊ शकते. म्हणून या संबंधीची चर्चा करून सदोष यंत्रणा कशी टाळता येईल याचा विचार करूनच नव्या यंत्रणेचा विचार करावा लागेल. तोही यंत्रणा आणि नियंत्रण या दोन्ही बाबींच्या दृष्टीने विचार करूनच करावा लागेल.

अध्यक्ष महाराज, या वर्षीचा एक प्रश्न आणखी राहिला आहे. अर्थात तो केंद्र सरकारच्या अखत्यारीतील भाग आहे. आपण या योजनेसाठी त्यांच्याकडे १९८०-८१ पासून परवानगी मागतो ; परंतु ते परवानगी देत नाहीत. म्हणजे ज्याला एकदा डिप्राइव्ह केले त्याला पुढेही तसेच डिप्राइव्ह केले जात आहे. आणि आताच मा. सदस्य श्री. दाजिबा पाटील यांनी सांगतल्याप्रमाणे आज महाराष्ट्रात कापसाचे शॉर्टेज असले तरी केंद्र सरकार कापूस एक्सपोर्ट करते. म्हणजे केंद्र सरकारचे धोरण शेतकऱ्यांना अनुकूल आहे की प्रतिकूल आहे? तर ९० टक्के विरोधी आहे. आज महाराष्ट्रामध्ये कापूस धंद्यांचे दुष्परिणाम केवळ शेतकऱ्यांनाच नाही तर शेतमजूर, जिनिंग-प्रेसिंग कामगार या सर्वांना कसे भोगावे लागतात याचे वर्णन या ठिकाणी काल करण्यात आले आहे. शासनाला मी पहिला प्रश्न विचारतो की, ज्या १३ राष्ट्रीयीकृत कापड गिरण्या आहेत त्या गिरण्यांना लागणाऱ्या कापसाचा विचार आपण करणार की नाही? तसेच महाराष्ट्रात ज्या जिनिंग-प्रेसिंग गिरण्या आहेत त्यांना कापूस देणार की नाही? कारण त्यांचे जे कर्मचारी आहेत त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. त्याचा विचार शासन करणार की नाही? या प्रश्नांची उत्तरे काय? म्हणून माननीय सहकार मंत्र्यांनी या वर्षीच्या टंचाईच्या वर्षात सूतगिरण्या, जिनिंग-प्रेसिंग कामगार आणि कमीत कमी राष्ट्रीयीकृत गिरण्या चालतील यासंबंधीच्या करावयाच्या तरतुदीचे वर्णन आपल्या भाषणात केले तर बरे होईल.

अध्यक्ष महाराज, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे या योजनेत अनेक अडचणी आहेत. या योजनेमध्ये जो असा भाग आहे तो महाराष्ट्र शासनाने असर्ट करणे. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत कापूस एकाधिकार योजना शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही. जर कोणाचा असा समज असेल की, व्यापाऱ्यांपेक्षा ५-१० टक्के जास्त नफा मिळावा या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे तर ते चूक आहे. जर कोणाचा असा समज असेल की, कापूस खरेदी करून, त्याच्या गासड्या बांधणे आणि टेक्सटाईल कमिश्नर सांगेल

त्या भावाने त्या विकणे असे ह्या योजनेचे स्वरूप आहे तर ती योजना चालेल कशी? किंवा या योजनेत ॲग्रिकल्चर प्राईस कमिशन जी किंमत ठरवील ती आपण मान्य केली तर ही योजना चालेल कशा? आणि मघाशी येथे जसे वर्णन करण्यात आले त्याप्रमाणे जर रूई विकावयाची असेल तर त्यासाठी केंद्र सरकारची आणि टेक्सटाईल कमिशनरची परवानगी घ्यावी लागते, देशातल्या कापड गिरण्यांना परवडेल या भावाने हा कापूस विकावयाची काळजी घ्यावयाची. अशाने ही योजना चालेल कशी? ह्या ४-५ मुद्यांवर ही योजना चालविली तर ती चालेल कशी? आणि म्हणून ही बंधने शिथिल केली पाहिजेत. कन्डोन केली पाहिजेत.

मा. सदस्य श्री. राजारामबापू पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे ही योजना देशाला लागू करण्याची केंद्र शासनाची तयारी दिसत नाही. परंतु ही योजना महाराष्ट्रात जी चालू आहे ती बंद पाडण्यासाठी कृत्रिम बंधने तीत कशी निर्माण होतील हेच केंद्र सरकार पाहते. या बंधनांसहीत ही योजना यशस्वी होऊ शकेल असे मला वाटत नाही.

अध्यक्ष महाराज, या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. व्ही. पी. नाईक यांनी केंद्र सरकारच्या या योजनेसंबंधीच्या परिसंवादात जे भाषण केले त्यातली दोनच वाक्ये मी वाचून दाखवितो, ती अशी :

> "The Chief Minister of Maharashtra, Shri V. P. Naik correctly expressed that the cotton control attitude is an extension of the civil-supplies policy and not of the policy for more production of cotton."

म्हणजे केवळ व्यापार करणे आणि कापूस विकणे एवढाच मर्यादित असा या योजनेचा अर्थ घेऊ नये. कै. व्ही. पी. नाईक यांनी जी भीती व्यक्त केली होती ती माझ्या मते साधार आहे, तिला आधार आहे. आणि म्हणून यासंबंधीचे अधिक विवेचन न करता आज ही योजना कशी आहे हे एका वाक्यात सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. आणि त्यातले शेवटचे पालुपद कसे दुरुस्त करता येईल एवढे उत्तर मिळाले तर ही योजना जरूर यशस्वी होईल. याचे वर्णन मी असे करतो.

> "कापूस शेतकऱ्यांचा, नफा-तोटा शेतकऱ्यांचा, सरकारचे काहीच नाही. चढ-उतार निधी शेतकऱ्यांचा, भांडवल रिझर्व्ह बँकेचे, साहेबगिरी सहकारी संस्थांची, कारकूनशाही कमिशन घेऊन योजना चालविणाऱ्या फेडरेशनची, राजकीय लाभ व कोरडा आशीर्वाद महाराष्ट्र शासनाचा."

आता लाभ घेतलाना तसा! या चौकटीत ही योजना चालत असेल तर मग परस्पेक्टीव्ह प्लॅनिंग नाही. प्लॅनिंग नीट करावयाचे असेल तर मग असे होऊ देता कामा नये. हे सर्व संक्षेपाने मी सांगितले. तेव्हा ही सर्व बंधने मोडावयाची तयारी महाराष्ट्र शासनाची आज नाही. आज निवेदन केले की, या योजनेला मुदतवाढ मिळाल्यावर त्याचा विचार करू. म्हणजे शासनाच्या मनामध्येच याला मुदतवाढ मिळेल याची खात्री नाही आणि म्हणून स्टेटमेंट केले की, या योजनेला मुदतवाढ मिळाल्यानंतर मंडळ नेमू. म्हणजे आपली व्यथा त्यांनी बोलून दाखविली? पण ही मुदत किती दिवस वाढविणार? They are not damned sure. And why do you keep the hanging sword over their shoulders तिचा लाभ शेतकऱ्यांना केव्हा देणार? आणि म्हणून ही योजना पुढे परमनंट करण्याचा आग्रह शासनाने धरावा, शास्त्रशुद्ध पद्धतीने योजनेचा विचार करावा, केंद्र सरकारची बंधने झुगारून देणे, शेतकऱ्यांना इन्सेन्टिव्ह देऊन ती राबविणे या गोष्टी केल्या पाहिजेत. ए.पी.सी. कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन कशी काढते? केंद्र शासनाने कसे संशोधन केले, कसा शोध लावला? या योजनेची कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन म्हणे या वर्षी ३० टक्के आहे, तर गेल्या वर्षी ४० टक्के होती!

एचबी ११८०—२४अ

म्हणजे कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन वाढल्यामुळे आम्ही शेतकरी तंग झालो, रडकुंडीला आलो, ती जवळजवळ दुप्पट झाली, कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन काढणारी तुमची जी समन्वय समिती आहे ती कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन कशी काढते? आज जमीन पावसाअभावी लोखंडासारखी बनली आहे, सर्वच मालाचे भाव वाढले, शेतीचे भाव वाढले. असे असताना कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन कमी झाल्याचा जावई-शोध कसा लावला याचे उत्तर येथे दिले पाहिजे. सरकारने शास्त्रोक्त पद्धतीने किंमत काढली पाहिजे. एक गंमत सांगतो. कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशनचे हे ऑब्झर्वेशन आहे. १० हेक्टर शेती करावयाला एक बैलजोडी लागते तर ५ एकर शेती करावयाला म्हणजे एक बैल लागतो तसे गणित करून हे कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन काढतात. यांच्या बापाने शेती कशी ती पाहिली होती का? एका बैलाने कधी शेती होते? पण शेतीची काही माहिती नाही आणि हे कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशनचा शोध लावणार? हा मराठी शब्द आहे, ती शिवी नाही. ही कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन काढणे हा जसा दोष आहे त्याचप्रमाणे कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशन कमी झाली हा शोध कसा लावला? म्हणून या योजनेचा निश्चितपणे फेरविचार करताना कायदा, नियंत्रणे आणि यंत्रणा हे सर्व दुरुस्त करण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. कॉस्ट ऑफ कल्टिव्हेशनच्या आधारावर शेती ही इंडस्ट्री समजून काढावी, शेतकऱ्यांना नफा होईल, गंगाजळी निर्माण होईल व योजनेतील सर्व संबंधितांना तिचा लाभ मिळेल. अशा रीतीने ही योजना केली तरच ही चालेल, यशस्वी होईल, अन्यथा ती यशस्वी होईल असे मला वाटत नाही.

❑❑❑

कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत सुधारणा विधेयक

(१९ एप्रिल, १९८४)

कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेत अशासकीय विधेयक मांडले होते. सामाजिक परिवर्तनाचे विधेयक असे त्यांनी याचे वर्णन केले. पश्चिम महाराष्ट्रात व मराठवाड्यात महार वतने म्हणतात तर विदर्भात त्यांना कोतवाल वतने म्हणतात. या वतनांद्वारे त्यांना बलुत्यांची कामे करावी लागतात. शेवटी हे विधेयक त्यांनी मागे घेतले.

अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने वि.प.वि. क्रमांक ३१ (मुंबई गावाची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक) विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

योगायोगाने आजच्या अशासकीय विधेयकांच्या चर्चेच्या दिवशी एक अत्यंत सामाजिक परिवर्तनाचे विधेयक सन्माननीय सदस्य श्री. वर्दे यांनी या ठिकाणी मांडले आणि त्यासंबंधी अत्यंत चांगली अशी चर्चा झाली. देशाचे सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक परिवर्तनावर आर्थिक परिवर्तन अवलंबून आहे अशा आशयाचे हे विधेयक या ठिकाणी मी मांडू इच्छितो. या विधेयकाला शीर्षक देताना सांगितले आहे की, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी

करण्याबाबत (सुधारणा) विधेयक. अध्यक्ष महाराज, आपल्याला कल्पना आहे की, महाराष्ट्रामध्ये अशी वतने प्राचीन काळापासून आहेत. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये या वतनांना महार वतने म्हणतात. विदर्भातील या वतनांना कोतवाल वतने म्हणतात. या वतनांच्याद्वारे त्यांना बलुत्यांची कामे करावी लागत. दुर्दैवाने मनुस्मृतीमध्ये अशी कामे या लोकांना करण्यास सांगितले आहे. अशी कनिष्ठ कामे केल्यानंतर त्यांना वतने बहाल केली होती. ही अत्यंत दुर्दैवाची प्रथा बंद करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३७ मध्ये एक विधेयक आणले होते आणि म्हटले होते की, ही गुलामगिरीची प्रथा बंद करावी. परंतु त्याचबरोबर त्यांना जी वतने दिली होती, विशेषतः जमिनीच्या स्वरूपातील वतने पश्चिम महाराष्ट्रामध्ये पूर्वाश्रमीचे महार आणि विदर्भामध्ये पूर्वीचे कोतवाल यांना अर्पित करावीत. १९३७ चा कालखंड लक्षात घेतल्यानंतर त्या कालखंडामध्ये हे विधेयक मंजूर झाले नाही. सुदैवाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि या देशातील आदरणीय नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी १९५८ मध्ये हे विधेयक आणले. माननीय यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व लक्षात घेता आणि त्यांची विचारधारा लक्षात घेता या विधेयकाच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील महारांची गुलामगिरी नष्ट व्हावी व त्याचबरोबर त्यांना जमिनीची मालकी मिळावी असे त्यांचे उद्दिष्ट असावे. परंतु अध्यक्ष महाराज, आमचे हेच मोठे दुर्दैव आहे की, फिलॉसॉफी कितीही आदर्श असली तरी हितसंबंधियांची लॉबी प्रखर असेल तर त्यातून कोणतीही फलनिष्पत्ती होत नाही. म्हणून १९५८ साली श्री. चव्हाण यांनी केलेल्या या कायद्यामध्ये प्रशासकीय यंत्रणेकडून म्हणा किंवा विशिष्ट हितसंबंधियांच्या दबावाने म्हणा यामध्ये काही त्रुटी ठेवण्यात आल्या आणि पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा येथील कनिष्ठ महारांच्या जमिनी शोषण आणि अन्य प्रकाराने गिळंकृत करण्यात आल्या. जमीन सुधारणा कायद्यासंबंधी अत्यंत प्रखर पाऊल उचलून पुन्हा जमीन सुधारणेच्या नावाखाली सिलिंग होल्डिंगचा कायदा आणला आणि आपल्या देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी या कायद्याचा कडक अंमल व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केलेली होती. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांना मी कॉम्प्लिमेंटस देईन कारण की, त्यांनी या कायद्याचा अंमल करण्याचा अत्यंत कसोशीने, इमानदारीने आणि प्रामाणिकपणाने प्रयत्न केला. महाराष्ट्रातील लाखो एकर जमीन जी त्या गावाजवळ आहे, ज्याला गाव वतन म्हणतात, ज्याला आमच्याकडे आखर म्हणतात आणि महाराष्ट्रामध्ये वाडी म्हणतात अशा प्रकारची गावाला लागून असलेली जमीन कायद्यातील तरतुदीने जुन्या शर्थी, नव्या शर्थी लावून तीन पट, चार पट, १० पट रक्कम भरून या महार लोकांना आणि भूमिस्वामी बनविले. आणि मग याच जमिनी गावातील बलाढ्य लोकांनी गिळंकृत केल्या. अध्यक्ष महाराज, मला माफ करा. परंतु मी कोणत्याही जातीचा विरोधक नाही. परंतु आपल्या महाराष्ट्रामध्ये लोकसंख्येच्या मानाने स्वाभाविकच मराठा जातीचा राज्य शासनावर आतापर्यंत पगडा राहिलेला आहे. श्री. यशवंतराव चव्हाणांपासून आताच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत हा पगडा कायम आहे. मग दुर्दैवाने गावागावातील अशा प्रकारच्या जमिनी मराठा समाजाने गिळंकृत केल्या. त्यांनी गिळंकृत केलेल्या जमिनी जमीन सुधारणेच्या कायद्याने त्याच लोकांना परत करण्याच्या कामामध्ये वेग आला नाही. कारण मराठा समाजाने गिळंकृत केलेल्या या जमिनी पुन्हा परत जर त्या गरीब लोकांना दिल्या तर त्यामुळे मराठा समाजामध्ये फार मोठी नाराजी निर्माण होईल. त्यामुळे आपल्याला मराठा मंडळींचा सपोर्ट गमवावा लागेल अशी भीती अनेक वेळा अनेकजणांकडून व्यक्त करण्यात आली. अध्यक्ष महाराज, स्व. वसंतरावजी नाईक यांच्याशी माझी अनेक वेळा चर्चा झाली होती. ते एकदा या निर्णयाप्रत आले होते. मी आपल्याला सांगू इच्छितो की, गावाजवळची महारांची जमीन मराठा समाजाने गिळंकृत केली आहे. या लोकांच्या अज्ञानाचा व गरिबीचा फायदा त्यांनी घेतला आहे असे असले तरी एकतर्फी या मराठा मंडळीना मी दोष देत नाही कारण पैशाच्या लालसेनेही काही लोकांनी आपल्या जमिनी विकल्या

असतील. पण आता या लोकांचे अज्ञान काही अंशी दूर झाले आहे. कायद्यामध्ये जे परिवर्तन सुचविण्यात आले आहे त्या संदर्भात मनाचा मोठेपणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तरी महारांच्या गिळंकृत केलेल्या जमिनी त्यांना पूर्ववत देता येतील अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने हे विधेयक मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. प्रथमतः १० मार्च १९८३ रोजी मी एक लक्षवेधी सूचना दिली होती. त्या लक्षवेधी सूचनेसंबंधी आमचे सहकारी मित्र, महसूल मंत्री श्री. शांताराम घोलप यांनी निवेदन केले होते. त्यावेळी जी प्रश्नोत्तरे झाली त्यामध्ये त्यांनी असे सांगितले की, महाराष्ट्रातील महार वतनदार मंडळींना त्यांच्या गेलेल्या जमिनी परत करण्यासाठी आवश्यक त्या तरतुदींचा कायदा करणार आहोत. अर्थात त्यांनी हेही सांगितले की, हा कायदा शास्त्रशुद्ध असावा म्हणून त्यासाठी आम्ही समिती नियुक्त करू. माझ्या माहितीप्रमाणे तशी समिती त्यांनी नियुक्त केली आहे. आता प्रश्न असा आहे की, कायद्याच्या पळवाटा ज्या काही असतील त्या सर्व पळवाटा बुजवून महार वतनदारांना त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात यासाठी माझ्या विधेयकातील ज्या काही तरतुदी आहेत त्या अगदी स्पष्ट असून त्यामध्ये पळवाटा नाहीत. त्यामुळे आता वेळकाढूपणा करणे बरोबर नाही. समितीच्या नावाखाली हा प्रश्न मंत्रिमहोदयांनी लांबवू नये.

अध्यक्ष महाराज, हा कायदा करण्याच्या संदर्भात दुसरी जी निकड निर्माण झालेली आहे त्यासंदर्भात मी या ठिकाणी खुलासा करू इच्छितो. मध्यंतरी १९७६ साली श्री. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री असताना त्यांनी एक प्रशासकीय आदेश काढला होता त्या प्रशासकीय आदेशान्वये राज्य शासनाचा प्रतिनिधी, कलेक्टर किंवा एस. डी. ओ. याच्या पूर्व अनुमतीशिवाय जर काही व्यवहार झाले असतील तर त्या जमिनी महार वतनदारांना परत कराव्यात. त्या प्रशासकीय आदेशान्वये ५-१० एकर जमिनी महाराष्ट्रातील महार लोकांना परत मिळाल्या. परंतु पुढे असे झाले की, वतनदारांनी ज्या व्यक्तीस पूर्वी आपल्या जमिनी विकल्या होत्या व ज्या प्रकरणी त्या जमिनीबाबत कायदेशीर पूर्व परवानगी घेण्यात आली नव्हती अशा काही खातेदारांनी उच्च न्यायालयाकडे अर्ज केला. १९७९ साली उच्च न्यायालयाने निर्णय दिला. मूळ वतनदारांनी जमिनीच्या शेतसाऱ्याच्या दहापट रक्कम भरलेली आहे पण जेथे जिल्हाधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेतली नाही तेथे जमिनीच्या हस्तांतरणास परवानगी देण्यात यावी. तसेच जमिनीच्या हस्तांतरणास पूर्व परवानगी घेतली नसेल किंवा नजराण्याची रक्कमही भरली नसेल तर असे प्रकरण अनियमित असले तरी शासनाने १९६८ साली काढलेल्या आदेशानुसार असे हस्तांतर नियमित करण्यात यावे याकरिता आवश्यक असलेल्या दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर शासनाने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. सर्वोच्च न्यायालयाने हे अपील १९८१ सालामध्ये फेटाळून लावले आणि सुप्रीम कोर्टाने देखील उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य केला आहे. आता मग या बिलाच्या तरतुदीनुसार थोडा बहुत दिलासा श्री. शंकरराव चव्हाण यांच्या कारकिर्दीमध्ये त्या लोकांना मिळाला होता तो देखील या निर्णयामुळे नाहीसा झाला.

अध्यक्ष महाराज, दुसरी गोष्ट ही आहे की, शेड्युल ट्राईब्ज म्हणजे अनुसूचित जमातीच्या लोकांच्या जमिनी, शोषणाच्या अन्य प्रकारामुळे जर गेल्या असतील तर त्या जमिनी त्यांना परत कराव्यात अशा प्रकारचा एक कायदा आम्ही १९७४ सालात केला होता. या संदर्भात नवीन आशेचा किरण हा आहे की, महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जमाती करता जो कायदा केलेला आहे त्या कायद्याच्या धर्तीवर मी माझे विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे आणि म्हणून या प्रास्ताविकानंतर मी विधेयक मांडत असतांना मी ज्या तरतुदी अपेक्षित केलेल्या आहेत त्या अत्यंत साध्या आहेत. ही कल्पना मला वाटते माननीय महसूल मंत्र्यांना माहीत आहे. या विधेयकाच्या उद्देशामध्ये मी असे म्हटलेले आहे, "खंड २-भोगाधिकार मूल्य न दिल्यामुळे ज्या संबंधित व्यक्तींना जिल्हाधिकाऱ्याकडून जमिनीतून अन्यथा निष्कासित करण्यात आले असते, अशा व्यक्तींना,

संरक्षण देण्यासाठी अधिनियमाच्या कलम ५ मधील पोट-कलम २ वगळणे हा या खंडाचा हेतू आहे" म्हणजे हे कलम वगळण्यात यावे असे मी म्हटलेले आहे. त्यानंतर या उद्देशामध्ये मी असे म्हटलेले आहे की, "जमीन परत करण्यापूर्वी विशिष्ट रक्कम देणे, त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याची पूर्वमंजुरी मिळविणे या शर्ती काढून टाकण्यासाठी पोट-कलम ३ वगळण्याचे प्रस्तावित केले आहे." त्यानंतर तिसरी गोष्ट मी अशी म्हटलेली आहे की, "आदिवासीकरिता जो कायदा केलेला आहे त्याप्रमाणे हस्तांतरित केलेली जमीन वतनदारांना प्रत्यर्पित करण्याची तरतूद करण्याकरिता, नवीन कलम समाविष्ट करण्यात यावे" त्यानंतर चौथा उद्देश असा आहे की, "वतन जमिनींना कुळवहिवाट कायदा लागू करण्यासंबंधातील कलम ८ वगळण्यात यावे. तसेच कलम ९ संपूर्ण वगळण्यात यावे." अध्यक्ष महाराज, केवळ कलम वगळण्यात यावे एवढेच मी सांगू इच्छित नाही तर त्याचे इप्लीकेशन्स काय आहेत यासंबंधी मी आपल्याला सांगू इच्छितो की, मूळ कायदा, १९५९ जो आहे त्याच्या कलम पाच (दोन) मध्ये असे म्हटलेले आहे की, "जर विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या रीतीने पोट-कलम (१) अन्वये भोगाधिकार मूल्य देण्यात कसूर झाली तर वतनदार हा, उक्त जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत आहे असे समजले पाहिजे व तो जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधानुसार कलेक्टरकडून संक्षिप्त रीतीने चौकशी करून तीतून काढून लावले जाण्यास पात्र असेल. कलम पाच (तीन) मध्ये असे म्हटलेले आहे की, "पोट-कलम (१) अन्वये परत दिलेल्या जमिनीचा भोगवटा, कलेक्टरच्या पूर्वमंजुरी वाचून व राज्य सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील अशी फी दिल्यावाचून हस्तांतरित करता येणार नाही किंवा त्याचे मोजून मापून भाग पाडता येणार नाही." ही दोन्हीही कलमे ॲबनॉर्मल आहेत. या मूळ कायद्यातील पोट-कलम ८ ला तर कूळ कायद्याचा संबंध दिलेला आहे. सामूहिक रीत्या याबाबत माझे उत्तर असे आहे की, अशा प्रकारची बंधने आज जे विद्यमान कायदे आहेत. त्या कायद्यामध्ये कोणत्याही ठिकाणी केलेले नाहीत. महसूल मंत्र्यांच्या माहितीसाठी मी हे सांगू इच्छितो की, Bombay Khoti Abolition Act : Bombay Zamindari Act, Bombay Personal Inam's Abolition Act, Hyderabad Abolition of Jagiri Act, Hyderabad Jagir Act and Central Provinces and Beras Land Revenue Abolition Act पझेशन, कूळ कायदा अज्ञान किंवा भोगवटा किंवा वेतन न देणे यापासून सारे कायदे एक्झमटेड आहेत तर मग १९५८ च्या कायद्याच्या तरतुदीमध्ये ज्या तरतुदी चुकीने झालेल्या आहेत आणि त्यामुळे सर्व महार वतनाच्या जमिनी लोकांना हस्तांतरित झालेल्या आहेत तेव्हा याच कायद्याने जबरदस्ती का? विशेषत: मी मघाशी म्हटल्याप्रमाणे खोती लोकांना जमीन जशीच्या तशी देण्यासंबंधी सरकारची काही अडचण नाही. जशीच्या तशी जमीन जमीनदाराला देण्यामध्ये अडचण नाही आणि मग घटनात्मकदृष्ट्या, भारतीय घटनेने जे जाती-जमातींचे संरक्षण दिलेले आहे त्यात आपण अनुसूचित जमातीसाठी म्हणून कायदा केला आणि मग अनुसूचित जातींसाठी कायदा करण्यात आपल्याला अडचण यावी असे काही मला वाटत नाही. अध्यक्ष महाराज, यानंतर मी मघाशी सांगितल्याप्रमाणे जे कलम ९ आहे, अर्थात जेव्हा मी म्हटले की, कलम ५ चे पोट-कलम २ आणि पोट-कलम ३ वगळावे याचाच अर्थ जवळ जवळ कलम ९ हा डेड सांगाडा आहे. म्हणजे त्या क्लिष्ट तरतुदीने पुन्हा ती जमीन परत करता येणार नाही. याचा अर्थ माझ्या मते कलम ५ मध्ये सेक्शन २ आणि ३ हे वगळले तर त्याचा इफेक्ट नलीफाईड होतो. शेवटी या विधेयकामध्ये कलम ५ नंतर जे कलम ५ अ सुचविले आहे, त्यात नंतर १, २, ३, ४, ५, ६ व ७ सुद्धा आहे. अर्थात ती सर्व वाचून मी या सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु या तरतुदी संदर्भात जे मी सुचविले आहे त्यातील पहिली तरतूद कलम ५क अन्वये "वतनदाराला परत देण्यायोग्य असलेली कोणतीही जमीन, जमिनीची विक्री झाल्यामुळे किंवा उच्च न्यायालयाच्या

किंवा दिवाणी न्यायालयाच्या किंवा त्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या कोणत्याही अन्य न्यायालयाच्या आदेशामुळे किंवा जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या चौकशीच्या वेळी वतनदाराने भोगाधिकार मूल्य देण्यास आपली अनिच्छा व्यक्त केल्यामुळे किंवा कोणत्याही अन्य कारणांमुळे, एखाद्या वतनदार नसलेल्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात आली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास, याबाबतीत कोणतेही नियम केलेले असल्यास त्यास अधीन राहून लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, उक्त जमीन, आदेशाच्या दिनांकापासून संपादन करण्यात आली असल्याचे आणि सर्व भारांपासून मुक्त राज्य शासनाकडे निहित असल्याचे मानण्यात येईल". अध्यक्ष महाराज, माझ्या या नवीन बिलाच्या प्रोव्हिजोमुळे सुप्रीम कोर्ट किंवा हायकोर्ट यांचा निर्णय रद्दबातल होईल असा आपल्याला कायदा करता येईल. कारण हा कायदा काही मूलभूत हक्कांशी आज कॉम्पिट करणार नाही, जसा सोशल आस्पेक्टने डिस्क्रिमिनिशन बिटवीन रिलिजन असा एक तांत्रिक मुद्दा जर माननीय समाजकल्याण मंत्री यांना मंजूर होता तर त्या कारणामुळे आणि आता प्रॉपर्टी राईट इज नॉट अ फंडामेंटल राईट. त्यामुळे आता नव्याने या मूलभूत हक्कांमधून प्रॉपर्टी राईट हा एक्स्लूड केला म्हणून या कायद्यात आपणास तशी अडचण यावयाची नाही. सुप्रीम कोर्टाचे जजमेंट झाले, हायकोर्टाचे जजमेंट झाले म्हणून आपल्याला असा कायदा करता येणार नाही अशी अडचण या कायद्यात यामुळे येणार नाही. अध्यक्ष महाराज, म्हणून मी म्हटल्याप्रमाणे कलम २, ३, पोट-कलम ३ या सर्व गोष्टी जवळ जवळ शोषणाच्या अन्य प्रकाराने कोठल्याही तरतुदीत न राहता ती जमीन महार वतनदारांना परत मिळावी या उद्देशानेच मी हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे.

अध्यक्ष महाराज, समारोपाचे भाषण करताना मी एवढेच म्हणेन की, हा प्रश्न सरकारच्या ट्रायलचा आहे. कारण सरकारने तत्त्वतः आदिवासींसाठी असे बिल केलेले आहे म्हणजेच हे तत्त्व मान्य केलेले आहे. आता आदिवासींसाठी बिल केले आहे म्हणजे काय? अध्यक्ष महाराज, खरे बोलले तर येथे कोणाला राग येऊ नये. परंतु आदिवासींच्या जमिनी या बिगर मराठी भाषिक लोकांनी म्हणजेच हिंदी भाषिक लोकांनी गिळंकृत केलेल्या आहेत, असे ठिकठिकाणी घडलेले आहे. तेव्हा येत्या जमिनी रिग्रट करताना हे हिंदी भाषिक दुखावले गेले तरी चालतील अशी भूमिका होती असे मी समजावयाचे काय? अध्यक्ष महाराज, मी समजतो की, आपली प्राथमिक भूमिका अशी होती की, आदिवासींना जमीन द्यायची, परंतु ज्यांनी ही गिळंकृत केली ते सुद्धा आपले मित्र होते. त्यावेळी अशी भूमिका नसली तरी असा कायदा करतांना अशी जमीन मराठा सधन शेतकरी जे आहेत ते दुखावले जातील त्यामुळे आपल्या राजकारणावर दुष्परिणाम होईल ही समजूत आपण काढून टाकली पाहिजे आणि ज्याप्रमाणे कायदा करून आपण आदिवासींना न्याय दिला त्याप्रमाणे हे विधेयक तंतोतंत मान्य करून सामाजिक न्याय द्यावा. कारण आतापर्यंत या जमिनींवर तुम्ही सधन झाला आहात, तुम्ही चांगल्याप्रकारे कमाई केली आहे, ऊस घेतला आहे. तरी आता त्या उपभोगानंतर ही जमीन ज्यांची होती त्यांना परत करा म्हणून सांगण्यास काहीच हरकत नाही. अध्यक्ष महाराज, हा तत्त्वाचा प्रश्न आहे. कोणाच्याही मालकीची जमीन हिसकावून घ्यावी असे माझे म्हणणे नाही. सिलिंगचा कायदा करून त्यानुसार काही जमिनीवर मर्यादा घालून ज्याची ६० एकर जमीन असेल त्याच्याकडून त्यातील काही हिस्सा काढून इतरांना वाटून दिला, त्याप्रमाणे यामध्येही करा असा माझा उद्देश नाही. तर जी जमीन पूर्वी महारांचीच होती, त्यांच्या इनामाची होती, ती त्यांनी वाहिली आहे, परंतु पुढे कुळकायद्यातील लूपहोल्समुळे सधनांकडून गिळंकृत केली, ज्यांची जमीन आपण गेली ३५ वर्षे वापरली आहे तेव्हा आता मनाचा मोठेपणा दाखवून परत द्या अन्यथा हिसकावून परत घ्यावी लागेल असे करण्यास माझ्या मते काहीच हरकत नाही. त्याबद्दल कोणाला वाईट वाटण्याचेही कारण नाही. मला वाटते माननीय मंत्रिमहोदयांनी १९८३ सालामध्ये दिलेले अभिवचन मर्यादित अर्थानी स्वीकारले, परंतु एवढेच नव्हे तर यासाठीच जी समिती होती तिलाही हे फिलींग झालेले

आहे. अध्यक्ष महाराज, महसूल मंत्र्यांना या विधेयकाद्वारे मी विचारांची दिशा दाखविलेली आहे आणि या कायद्याचा तंतोतंत अंमल झाला तर तुमच्या, माझ्या मनामध्ये जो उद्देश आहे, जे उद्दिष्ट आहे ते गाठता येईल एवढे बोलून क्षणाचाही विलंब न करता आपण हे विधेयक स्वीकारावे अशी विनंती करतो.

माननीय अध्यक्ष महोदय, मा. मंत्र्यांनी मला विनंती केली आहे की, मी हे बिल मागे घ्यावे. ज्याअर्थी त्यांनी ही विनंती केली आहे त्याअर्थी तूर्त तरी त्यांच्या उत्तराने माझे समाधान झाले आहे. तसेच ना. महसूल मंत्र्यांनी उलट मला मी हे विधेयक आणल्याबद्दल कॉम्प्लीमेंटस् दिले आहेत, हे विधेयक म्हणजे शासनाला व यासाठी शासनाने नेमलेल्या समितीला एक रेडीमेड मटेरियल म्हणून उपयोग होणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे आणि हे बिल शासनाकडून त्या समितीकडे या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी पाठविले जाणार आहे. त्यामुळे तूर्त तरी माझे अंशतः समाधान झाले आहे, पूर्ण समाधान झाले नाही. प्रत्यक्षात समितीचा अहवाल येऊन पुढच्या अधिवेशनापर्यंत तरी हे बिल शासनाकडून येईल व तेव्हाच माझे पूर्ण समाधान होईल. मी तूर्त हे विधेयक मागे घ्यावे अशी मा. मंत्र्यांनी विनंती अनेक वेळा केल्यामुळे मी तूर्त तरीही विधेयक आपल्या अनुमतीने मागे घेतो व ते मागे घेण्यास सभागृहाने मला अनुमती द्यावी, अशी विनंती करतो.

❑❑❑

जातीय दंगली : राष्ट्रीय एकात्मतेतील अडसर

(९ जुलै, १९८४)

जातीय दंगलींवर जेव्हा जेव्हा चर्चा व्हायची तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित करण्यास दादासाहेब विसरत नसत. ठाणे, भिवंडी, कल्याण दंगलही त्याला अपवाद नव्हती. दंगलीचे दोन पर्वात केलेले विभाजन व विश्लेषण हे दादासाहेबांच्या त्या दंगलीवरील भाषणाचे वैशिष्ट्य होते.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रामध्ये गेल्या २-३ महिन्यांपासून समाजा-समाजामध्ये कटुता होऊन दंगलीचे जे वातावरण निर्माण झालेले आहे. ही गोष्ट परस्पर टीका करण्यापेक्षा राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अंतर्मुख होऊन आमच्यासमोर फक्त एकच दृष्टिकोन आहे आणि तो म्हणजे या देशाची राष्ट्रीय एकात्मता असा विचार करण्याची वेळ मला वाटते आता आली आहे. दुर्दैवाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही या देशात विविधतेतून एकता निर्माण करण्याचा जो सिद्धांत स्वीकारलेला त्यानंतर अन्य रूपाने विविधता निर्माण व्हाव्यात ही गोष्ट मानवी जीवनाला कलंकित करणारी अशीच आहे. नव्हे या दंगलीचे विश्लेषण करताना मी जरी जास्त तपशिलामध्ये जात नसलो तरीसुद्धा या दंगलीला कारणीभूत असणाऱ्या सर्व गोष्टी मला येथे स्पष्टपणे बोलल्या पाहिजेत आणि त्या गोष्टी व्यक्ती म्हणून नव्हे तर सिद्धांत रूपाने मांडण्याची आज निकड आलेली आहे. अध्यक्ष महाराज, मी मघाशी जेव्हा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. देवरा यांच्या एका वाक्याला हरकत घेतली ती एका तात्त्विक दृष्टीनेच. कारण एखाद्या पक्षाचा झेंडा हा काही

राष्ट्रीय झेंडा होऊ शकत नाही. कारण राष्ट्राचा झेंडा हे राष्ट्राचे एक मानचिन्ह असते. अध्यक्ष महाराज, आपल्या या देशामध्ये विविधतेतून एकता निर्माण करणारा ग्रंथही आम्ही निर्माण केलेला आहे आणि तो म्हणजे भारतीय घटना. म्हणजे आमचे प्रत्येक धर्माचे वेगवेगळे असे धर्मग्रंथ असतील, उदा. गीता, रामायण, ग्रंथसाहिबा वगैरे, हे सारे ग्रंथ आम्हाला प्रिय आहेतच. पण त्याचबरोबर स्वातंत्र्यामध्ये, प्रजासत्ताकामध्ये या साऱ्या विविधतेतून एक समानता आणण्यासाठी, एकवाक्यता आणण्यासाठी आम्ही सर्वांचा एक समान ग्रंथ तयार केला आणि तो म्हणजे आपली भारतीय राज्यघटना. म्हणून याच एका विशिष्ट दृष्टीने मी या दंगलीकडे पाहू इच्छितो. मी माझ्या मते या दंगलीची दोन पर्वे केलेली आहेत. दिनांक १८ मे १९८४ रोजी भिवंडी, ठाणे येथे झालेली दंगल हे एक पर्व आणि नंतर खेरवाडी, वांद्रे व इतर उपनगरांमध्ये झालेली दंगल हे या दंगलीचे दुसरे पर्व आहे. ही २ पर्व या दंगलीसंबंधीचे स्पष्ट स्पष्टीकरण व्हावे या उद्देशाने मी या दंगलीचे केले आहेत. या पर्वासंबंधी तपशील सांगताना आपल्याला कल्पना येईल की, हे दंगलीचे २ पर्व मी मुद्दाम का केले आहेत व ते तितकेच संयुक्तिक आहेत. पहिली गोष्ट अशी की, अजून माझा विश्वास आहे की, या देशातील सर्वसामान्य माणसे ही मानवतावादी आहेत, या देशातील सर्वसामान्य जनता राष्ट्रीय एकात्मतेच्या बाजूने आहे. सर्वसामान्य माणूस मानवतावादी आहे. फुटीरता, विविधता कोणा एकाकडून नव्हे, संबंधित असतील, त्या जातीसंबंधित असतील, त्या संघटना संबंधित असतील, त्या व्यक्ती आणि विविधता नष्ट करणारे घटक, फुटीरतेची बीजे पेरण्याचे काम समाजातले सारे धुरीण करतात, सगळे म्हणजे जे धुरीण आहेत ते, जे नाहीत ते नाहीत. त्या धुरीणांचे नाव माझ्याजवळ नाही. कोणाही जातीचा, धर्माचा, पंथाचा, असो, पक्षाचा असो आणि मग याला आव्हान आधी समंजस जनता देते. मी आपल्यासमोर या दंगलीची दोन उदाहरणे सांगतो. भिवंडीला अन्सारी बागेत २७ लोक एकाच वेळी मारले गेले. जाळले गेले. ही गोष्ट नंतर स्पष्ट झाली की, या २७ पैकी ७ लोक हिंदू होते आणि मग अन्सारी बागेचा मालक मुसलमान समाजाचा होता. परंतु मुसलमान समाजातल्या मालकाने २० मुसलमान कुटुंबांना आणि ७ हिंदू कुटुंबांना संरक्षण दिले ही गोष्ट मानवतावादी आहे. तेथे अन्सारी मुसलमान म्हणून हिंदूचे संरक्षण नाही हा दृष्टिकोन त्याने स्वीकारला नाही. ठाण्याच्या मध्य वस्तीमध्ये हिंदूंच्या हजारो सुखवस्तू घरांमध्ये ७ मुसलमान घरे होती. ७ मुसलमान घरांचे संपूर्ण कडेकोट करून सगळ्या हिंदूंनी रक्षण केले. म्हणूनच मी सांगितले आहे की, मानवता ही सर्वसामान्य माणसात उपजत आहे. मी असे म्हणेन की, मानवतेचे प्रत्यक्ष स्वरूप प्रत्येक माणसामध्ये आहे. परंतु या ना त्या कारणाने, निमित्ताने वैचारिक चर्चेच्या बांधिलकीसंबंधी बोलत असताना राष्ट्रीय एकात्मतेचे प्रमाण किती आहे याचा विचार न करता कृती घडतात. त्यातूनच विविध दंगली या घडतात असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे यापूर्वी भाषणे झाली. माननीय सदस्य श्री. मनोहर जोशी यांचे भाषण या ठिकाणी झाले. मी कधी जातीचा आणि धर्माचा उल्लेख करीत नाही, तो करण्याचे टाळतो. पण दुर्दैवाने मला आज करावा लागेल. या दंगलीत, अपप्रवृत्तीत हिंदूंनी जसा भाग घेतला तसा मुसलमानांनीही भाग घेतला. कारण कधी ना कधी हे स्पष्ट बोलले पाहिजे. आणि मग हिंदूंनी भाग घेतला म्हणजे सर्व हिंदूंनी घेतला असे नव्हे. मुसलमानांनी भाग घेतला म्हणजे पूर्ण मुसलमानांनी भाग घेतला असे नाही. परंतु ज्याअर्थी आपल्या वैचारिक भावना आहेत त्याचा आदर वैयक्तिक घरादारात ठेवणे वेगळे. पण त्यांचा प्रसार आणि प्रचार समाजात करणे हे नेहमी धोक्याचे असते आणि मग या दंगलीमध्ये मी जे २ पर्व केले आहेत ते विशेषतः या कारणाने केले आहेत. मला याचा खुलासा माननीय राज्यमंत्र्यांकडून हवा आहे. ह्या दंगलीत सापडलेली शस्त्रे, तलवारी, गुप्त्या, बॉम्ब, पिस्तुले, चाकू, सुरे, सोडा वॉटरच्या बाटल्या, ट्युब लाईटस् हे आपण जप्त केले असतील तर हे पूर्वनियोजित कटाचे लक्षण आहे. मग ते कोणी केले हे तपासले पाहिजे. हा कट करण्यामध्ये कोणाचे किती प्रमाण आहे हे तपासले पाहिजे. दिनांक २५ मे १९८४ ला बाहेरून म्हणजे

राजस्थानातून जोधपूरहून नंग्या तलावारीचा एक ट्रक मुंबईकडे आला, तो जप्त केला. तो कोणी आणला? कसा आणला? ही सर्व शस्त्रे दंगलीच्या ठिकाणी जमा करणारे कोण याच्याशी माझा मतलब नाही. परंतु ज्यांच्याकडे हे साठे जमा झाले असतील त्यांनी ह्या दंगलीचे पूर्वनियोजन केले असे समजावे. मग ते हिंदू असोत अगर मुसलमान असो. मी सांगू इच्छितो शेवटी या देशामध्ये अभिप्रेत काय आहे? जर आम्ही संकुचित विचार केला, धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारले आणि सर्व हिंदूंनी ठरविले येथे हिंदूच राहतील, मुसलमानांनी ठरविले आम्ही हिंदुस्थानात राहात असलो तरी आमचे लक्ष पाकिस्तानामध्ये राहणार आहे, या दंगलीशी आम्ही संबंधित नाही. परंतु जर कोणी म्हटले की, आमच्या देशामध्ये खलिस्तान व्हावे तर मग ह्या विविधतेने हा देश नष्ट होईल. सेल्फ इंटरेस्टमधील विविधता टाळण्यासारखी आहे. या देशामध्ये कोणताही एक धर्म पूर्ण राज्याचे व देशाचे सुराज्य करील तर मग धर्म निरपेक्षतेची कल्पना भंग पावेल, हे स्वप्नवत नाही. सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे. या देशामध्ये बंधूभावाने देश चालविला पाहिजे. राज्य चालविले पाहिजे. नॅरो पॉईंट संकुचित कल्पना, खुळी कल्पना आपण जोपर्यंत विसरून जाणार नाही तोपर्यंत धर्मनिरपेक्षता ही केवळ दागिन्यासारखी वस्तू राहील. अध्यक्ष महाराज, भारत सर्व जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. आपल्या भारत देशाची लोकशाही ही सर्वांत मोठी लोकशाही आहे असे एक तत्ववेत्ता म्हणाला. तो असे म्हणाला की, "There can be discipline without democracy" मी त्या देशाचे नाव घेत नाही. म्हणजे लोकशाही नसली तरी शिस्त नांदू शकेल. "There can be democracy without discipline". जर तुम्ही भारतीय लोकसंख्येचा विचार केला, लोकशाही प्रधान देशाचा विचार केला, तर लोकशाहीमध्ये जोपर्यंत शिस्त येत नाही तोपर्यंत लोकशाही येथे कधीही टिकणार नाही. दुर्दैवाने हे घडले आहे की, आम्हाला मिळालेल्या स्वातंत्र्याचा येथे स्वैराचारासारखा उपयोग केला जात आहे. मग ते स्वातंत्र्य भाषण स्वातंत्र्य असो, लेखन स्वातंत्र्य असो, आचाराचे स्वातंत्र्य असो, विचाराचे स्वातंत्र्य असो त्या सर्व गोष्टींमध्ये तुमची धर्मनिरपेक्षता दिसली पाहिजे. तसेच काही गोष्टी धर्मनिरपेक्षतेसाठी सहन केल्या पाहिजे. अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्र्यांच्या माहितीसाठी सांगतो की, १९७६ मध्ये पोलिसांच्या आचारसंहितेचा रिपोर्ट बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली तयार केला गेला आहे. ती आचारसंहिता पाळतो किंवा नाही हे महत्त्वाचे आहे. ही आचारसंहिता केवळ पोलिसांकरिता नव्हे तर राज्यकर्त्यांकरिता, सामाजिक कार्यकर्त्यांकरिता, समाजधुरिणांसाठी सर्वांसाठी आचारसंहिता निर्माण करण्याची गरज आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मला एक आनंद वाटला. विद्यार्थी परिषदेने एका प्रकाशनामध्ये असे म्हटले आहे की :

> "हे सारे करीत असताना समाजपरिवर्तनाची एक विशिष्ट संकल्पना परिषदेने डोळ्यासमोर ठेवली आहे. या देशातील भिन्नभिन्न जाती, पंथ, उपासनामार्ग, भाषा, प्रदेश या साऱ्यांमधून व्यक्त होणाऱ्या संकुचित निष्ठांच्या पलीकडे समाजाला नेण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक समाजधुरिणांनी, सुधारकांनी करूनसुद्धा कोणत्याही यंत्रणेद्वारे या व्यक्तीकडून हा प्रश्न संपूर्ण यशस्वितेने उलगडलेला नाही."

विद्यार्थी परिषदेने हे लिहिले आहे ही चांगली गोष्ट आहे. केवळ कॉन्शस क्लिअर करण्याकरिता नव्हे तर राष्ट्रीय एकात्मता व्यवहारात आली पाहिजे. पंडित जवाहरलाल नेहरू "One Country One People" या पुस्तकात म्हणतात :

> "Whatever internal divisions, dissensions and conflicts we may have had in India in the past few thousand years, the concept of India

as one country has remained. The concept of Bharat, Hindustan or India has remained as golden thread binding us all together. The whole of India from the North to the South is the common heritage of every Indian and all India's history, from thousands of years till today, is our common heritage."

माझा संपूर्ण दृष्टिकोन राष्ट्रीय एकात्मतेचा असला पाहिजे. जोपर्यंत माझा राष्ट्रीय इंटरेस्ट राष्ट्रीय एकात्मतेच्या बाजूने नाही, तोपर्यंत मी राष्ट्रीय नाही, शहाणा नाही, सज्जन नाही. तेव्हा आचारविचारांवर आपण जोपर्यंत हे दडपण आणीत नाही तोपर्यंत काही उपयोग होणार नाही. या देशाच्या पंतप्रधान १९७६ साली म्हणतात की चिता कँप येथून हलवा. पण नंतर, काहीतरी पोलिटिकल प्रेशर आले आणि चिता कँप तेथेच राहिला. आज तेथील ॲटॉमिक इन्स्टिट्युशन्स धोक्यात आहेत. ते त्याचवेळी तेथून हलविले असते तर ही परिस्थिती आली नसती. म्हणजे काही वेळा पोलिटिकल इंटरेस्टही नॅशनल इंटरेस्टस्च्या आड येतात. "National integrity is paramount" हे पाळण्यात आले नाही.

यानंतर मी मुंबईतील दुसऱ्या दंगलीच्या पर्वाचा उल्लेख करतो. या दुसऱ्या पर्वामध्ये मात्र पोलीस जास्त कार्यक्षम झाले. पहिल्या पर्वामध्ये पोलीस तेवढे कार्यक्षम नव्हते. पोलीस हा आपल्या नागरिकांचा सेफगार्ड असला पाहिजे, आधारस्तंभ असला पाहिजे. कोठे काहीतरी ओमिशन्स व कमिशन्स घडल्या असतील. ज्यांनी शांततेकरिता आपला जीव दिला त्यामध्ये मुस्लिम कॉन्स्टेबल आहे त्याप्रमाणे नार्वेकर व नंदकुमार गोखले यांसारखे हिंदूही आहेत. मी काही कारणापुरते "अकार्यक्षम" म्हटले असले तरी यांनी केलेला त्याग, बजावलेले कर्तव्य, दाखविलेले शौर्य मान्य केलेच पाहिजे. दुसऱ्या पर्वामध्ये त्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता जे संशयित असतील, मग ते कोणत्याही जाती-धर्माचे-पंथाचे असोत, त्यांना गजाआड केले, त्याबद्दल मी शासनाचे आणि शासनाचे प्रतिनिधी म्हणून श्री. रिबेरो यांचे सभागृहात जाहीर अभिनंदन करतो. मी या दंगलीपुरतेच सांगतो असे नव्हे तर एकंदर समाज जीवनच आज धोक्यात आले आहे. बाईला रस्त्याने जातांना मंगळसूत्र घालून सुरक्षितपणे जाता येत नाही. आई-वडिलांना नवरा-बायकोना, वडील-मुलाला आज रस्त्याने जाणे-येणे धोक्याचे होऊ लागले आहे. तेव्हा आयर्न हॅण्डचा पुरेपूर उपयोग करून लोखंडी मुठीने या प्रवृत्तीविरुद्ध काम केले पाहिजे. पहिल्या दंगलीच्या पर्वात पोलीस जेवढे कार्यक्षम राहावयास पाहिजे होते तेवढे ते कार्यक्षम दिसले नसले तरी दुसऱ्या पर्वात पोलिसांनी अतिशय कार्यक्षमता दाखवून दंगल आटोक्यात आणली याबद्दल श्री. रिबेरो यांचे मी खास अभिनंदन करतो. त्यानंतर अध्यक्ष महाराज, राज्याचे राज्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे तरुण, उमदे आणि प्रागतिक विचाराचे असून त्यांना उज्ज्वल भविष्य आहे. त्यांना गाईड लाईन म्हणून "Police Policy and People in India" वाचून दाखवितो :

"The elected representatives of the Indian people have somehow failed to measure up to "the will of the Founding Fathers of the Indian Constitution" and the conflicts and deficiencies of the Civil Law remain to be made good effectively in letter as well as in spirit. Unless this is done, the Civil Law of the land has very meagre chances of being respected by all these who have been exposed."

जनप्रतिनिधींनी राईट ऑर रॉंग काय आहे, काय क्रायटेरिया वापरूनच कार्य केले पाहिजे. बीडच्या बाई खासदार असतील

पण त्यांच्या मुलाने कोणाचा जीव घ्यावा किंवा कोणाला जीवे मारावे असे होऊ शकत नाही. गुन्हेगार हा कोणत्या पक्षाचा आहे याचा विचार न करता ॲक्शन घेतली पाहिजे. दुसरे इंटरेस्टिंग काय आहे ते सांगतो. पोलीसमनने गुन्हेगारांना ठोकताना पाहिले का असा एक प्रश्न त्यामध्ये विचारला असताना १७ टक्के गुन्हेगारांना मारतात. परंतु ८३ टक्के गुन्हेगारांना they do not beat. Have you or any of your friends been ill-treated by the police? 46% Yes and 53% No. Have you ever given bribe or illegal gratification to any policeman? 10% yes and 90% no. Do you personally know policemen who flatter the politicians? 28% yes 72% no. Do you know some police officers who are really very honest? 61% yes and 39% no. Do you think that the young generation of police officer is better than the senior generation? 92% yes and 8% no.

This is the reflection of the survey taken by the author.

Now I will read out the criterion for effectiveness. It read thus :

"To be more precise, effectiveness of police as a law enforcement agency in a civilised society in the fields of conventional crime and maintenance of law and order can be gauged on three counts :

(*a*) How much police action, police behaviour and police achievements have contributed to the furtherance of ultimate policy goals enshrined in the Constitution?

(*b*) Whether the tools, methods and equipments chosen and employed by the police in the discharge of its assigned functions are in congruence with the norms of a civilized society?

(*c*) Do people, in general, realise, feel and accept that police is the protector of their rights and police protection has enhanced the safety of their person and security of their belongings?"

लोकांना पोलीस सर्व दृष्टीने आपले संरक्षक आहेत, मित्र आहेत असे वाटते का? अध्यक्ष महाराज, यावेळी मी रस्त्यांमधून फिरलो असताना मला काय अनुभव आला हे मी थोडक्यात सांगतो. यावेळी मला असे दिसून आले की दलितांची यात बरीच कोंडी झाली. हिंदू-मुसलमान हल्ल्यांमध्ये प्रत्येक वेळी दलित मध्ये आले. गोवंडी आणि भिवंडी येथील दंगलीमध्ये दलितवस्त्यांचे बरेच नुकसान झाले. त्यांनी या दंगलीबाबत न्युट्रल स्टँड घेतल्यामुळे त्यांचे बरेच नुकसान झाले.

परंतु देशात दुसरा काही पर्याय नाही. हा देश आपल्या वैयक्तिक विचाराने आणि स्वैराचाराने आपलाच राहील असे कोणी समजता कामा नये. हा देश सर्व धर्मांचा, सर्व पंथांचा, संघटनांचा, संस्थांचा आणि लोकांचा आहे. तेव्हा सर्वधर्मसमभाव ठेवून सर्वांनीच राष्ट्रीय प्रभावात सामील होऊन विविधतेतून एकता निर्माण करणे हाच एकमेव पर्याय आहे नाही तर या दंगली होतच रहाणार एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

❑❑❑

'वंदे मातरम्'ने शाळांचा प्रारंभ करणे

(१३ जुलै, १९८४)

अध्यक्ष महाराज, एका अर्थाने सांकेतिक स्वरूपाचा आणि ज्यामधून राष्ट्रीय एकात्मता साधली जावी या दृष्टीने एक प्रकारचे साधन म्हणता येईल असा हा ठराव आहे. माननीय सदस्यांनी आपल्या ठरावात वंदे मातरम् या एका राष्ट्रगीताचा उल्लेख केला आहे. आपल्या घटनेने दोन राष्ट्रगीते मानली आहेत. एक म्हणजे वंदे मातरम् आणि दुसरे म्हणजे जन गण मन. मला असे वाटते की, ठरावाच्या परिभाषेमध्ये त्यांनी जरी फक्त वंदे मातरम् या एकाच गीताचा उल्लेख केला असला तरी जन गण मन हा दुसरा पर्यायही त्यांना अभिप्रेत असावा. शेवटी या दोहोचा अर्थ एकच आहे. ते म्हणजे राष्ट्रीय एकात्मता आपल्याला त्या योगे सांभाळावयाची आहे. देशात आज जे वातावरण निर्माण झाले आहे की, जो दिवस उगवतो आहे तो आपल्याला विघटनाच्या मार्गावर घेऊन चालला आहे. अशीच स्थिती देशात सध्या होऊ पाहत आहे. म्हणून मी या ठरावाला एक "मीडिया" समजतो. या गीताला जी भावना आहे त्याप्रमाणे आपण वागतो का? यामध्ये सर्वांत मोठा दोष आम्हा राजकर्त्यांचा आहे. आम्ही सर्व ढोंगी आहोत. हेपोक्रॅट्स् आहोत. तोंडामध्ये भाषा राष्ट्रीय एकात्मतेची आणि कृती मात्र एकात्मतेच्या विरुद्ध. म्हणून मला सांगितले पाहिजे की, राष्ट्रीय एकात्मतेच्या कक्षेमध्ये या देशामध्ये ढोंगीपणा असता कामा नये. केवळ कॉन्शस क्लिअर करण्याकरिता आपण याचा वापर करता कामा नये. या संबंधीचे एक गंमतीदार उदाहरण मी आपल्याला सांगतो. एक विमान प्रवासाला निघाले होते. पण अनाऊन्समेंट-मध्ये काहीतरी चूक झाल्यामुळे त्या विमानात फक्त एक स्त्री प्रवासीच बसली होती. विमान आकाशात उडाले. त्या स्त्रीला पाहिल्यानंतर त्या विमानाच्या पायलटाच्या मनात चलबिचल झाली. तो तिच्या जवळ गेला. तिने त्याला सांगितले की, असे करणे बरोबर नाही. त्यावर तो चिडून म्हणाला की, 'आपण जमिनीपासून १०,००० फूट उंचीवर आहोत. तुझे ओरडणे कोणाला ऐकू येणार आहे व कोण येथे धावून येणार आहे? त्यावर ती म्हणाली की, "मी फक्त कॉन्शस क्लिअर करण्याकरिता हे म्हणाले. आता तुला काही करावयाचे असेल तर करावयाला तू मोकळा आहेस." तेव्हा सांगावयाचा मुद्दा हा की, राष्ट्रीय एकात्मतेच्या गोष्टी या केवळ कॉन्शस क्लीअर करण्याकरिता नसाव्यात तर अंतःकरणात त्या उमटल्या पाहिजेत, त्याप्रमाणे आपल्या हातून कृती झाली पाहिजे. हे राष्ट्र एक आहे, हा देश एक आहे ही भावना अंगी बाणली पाहिजे. एक प्रोफेसर टांग्यातून एके ठिकाणी "करुणे" वर व्याख्यान देण्यासाठी गेला. टांग्यातून उतरल्यावर टांगेवाल्याने त्याच्याकडे एक रुपया मागितला तो म्हणाला. "एक रुपया कसला? हे चार आणे घे" आणि त्याला चार आणे देऊन तो प्राध्यापक निघून गेला. म्हणजे व्याख्यानासाठी गेलेला हा प्राध्यापक बारा आण्यासाठी त्या टांगेवाल्याशी घासाघीस करीत होता. म्हणून मला सांगावयाचे आहे की, आपली उक्ती आणि आपली कृती यामध्ये तफावत असता कामा नये. त्यासाठी ढोंगीपणा आपण सोडून दिला पाहिजे आणि कुवतीप्रमाणे कृती ठेवून राष्ट्रीय एकात्मता साधली पाहिजे ती दुसऱ्यांच्या मनावर बिंबविली पाहिजे. या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा ठराव आहे. त्याला मी पाठिंबा देतो. माझे भाषण संपवितो.

❑❑❑

नॉट ॲट दी कॉस्ट ऑफ नॅशनल इंटिग्रेशन

(२६ जुलै, १९८४)

राज्याच्या समतोल विकासाबाबत आग्रह धरतांनाच दादासाहेबांनी जसा विदर्भाचा विकास नजरेआड होऊ दिला नाही तसेच "ॲट दी कॉस्ट ऑफ नॅशनल इंटिग्रेशन कोणत्याही प्रश्नाचा विचार होऊच शकत नाही" या मुद्यावर ते ठाम होते. या पार्श्वभूमीवरच त्यांनी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या मुद्यावर आपले विचार मांडले. स्वतः विदर्भाचे रहिवासी असून सुध्दा त्यांनी तो अभिनिवेश टाळला. या वृत्तीचेच दुसरे नाव दादासाहेब...

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावावरील भाषणात सुरुवात करताना मला सांगितले पाहिजे की, राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी चर्चेमध्ये कटुता येणार नाही अशा पद्धतीने आणि पूर्ण महाराष्ट्राची एकात्मता आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासली पाहिजे अशी जी सुरुवात केली त्याचे मी स्वागत करतो. ॲट दी कॉस्ट ऑफ नॅशनल इंटिग्रिटी कोणत्याही गोष्टींचा विचार हा होऊच शकत नाही. वैयक्तिक विचारांचा त्याग करण्याची पाळी आली तरी चालेल पण राष्ट्रीय अस्मितेला प्रथम स्थान मिळाले पाहिजे. या दृष्टिकोनातून मी माझ्या भाषणामध्ये या प्रस्तावाच्या निमित्ताने जे विचार व्यक्त करणार आहे ते कटुता टाळून करणार आहे. एक जरूर म्हणावे लागेल की, हा प्रस्ताव नव्याने दोन्ही पक्षांतर्फे मोशनच्या स्वरूपात येथे आलेला आहे. परंतु प्रस्तावाची परिभाषा, अंतिम उद्देश आणि व्यवस्था ही नवीन नाही. हे सर्व जुने आहे. यामध्ये नवीन असे काही नाही. जुने या अर्थाने की, मुंबई राज्यामध्ये ज्यावेळेस विदर्भ आणि मराठवाडा वेगळा होता. तेव्हा १९६० सालामध्ये एका कमिटींची स्थापना करण्यात आली. म्हणजे महाराष्ट्रातील जो बॅकलॉग आहे त्या संदर्भात फॅक्ट फायंडिंग कमिटी-१९६० चा रिपोर्ट आहे. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर हे असंतुलन दूर करण्याच्या दृष्टीने सुकथनकर आणि परदासानी समिती नेमली होती तिचाही अहवाल आपल्याकडे आहे. त्यानंतर नागपूर करार आला. पहिली गोष्टी अशी की, भारतीय घटनेच्या कलम ३७१(२) नुसार ज्या भागामध्ये असंतुलन आहे त्यामध्ये बोलकी मागणी विदर्भाची आहे, त्यावरची प्रतिक्रिया मराठवाड्याची. आज राज्याचा प्रादेशिक समतोल राखणे आणि महाराष्ट्र राज्य एकच आहे असे समजून आपण या ठिकाणी प्रस्ताव मांडलेला आहे. ३ विकास मंडळे याचा विचार केला तर सर्वप्रथम असे की, वेस्टर्न महाराष्ट्राचा विद्यमान बॅकलॉग त्यामध्ये येतो. हे अपत्य मुंबई राज्याचे आहे. १९६० सालामध्ये त्यासंबंधीची दखल घेतल्यानंतर तो बॅकलॉग राहिला, दांडेकर समितीने ओव्हरऑल बॅकलॉग सांगितलेला आहे. परंतु वेस्टर्न महाराष्ट्राचा बॅकलॉग, कोकणाचा बॅकलॉग, हिली एरियाचा बॅकलॉग, आदिवासी प्रदेशाचा बॅकलॉग हा मुद्दा विचारात घेतला पाहिजे. याच सदनाचे पूर्वीचे एक सदस्य व काँग्रेस पार्टीचे व्हीप श्री. जाधव यांनी खटाव आणि माण तालुक्याबाबतीत बोलता बोलता त्यांच्या दोन टर्मस् पूर्ण केल्या परंतु अजूनही त्या भागातील दुष्काळ संपलेला नाही. म्हणून दांडेकर समितीने आज महाराष्ट्रामध्ये व्यक्त केलेला

जो बॅकलॉग आहे हे अपत्य मुंबई राज्याचे आहे. मुंबई राज्य संपून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमधून नव्या महाराष्ट्राची निर्मिती झाली. अध्यक्ष महाराज, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये आपण एक खंदे शिपाई होता आणि मीही त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील विदर्भाचा सेक्रेटरी होतो. तेव्हा प्रादेशिक भावना आम्हाला कोठे शिवली नाही. म्हणून मागे केंद्रीय मंत्री श्री. वसंतराव साठे यांनी जी मागणी केली होती त्या मागणीला मी स्वतः कडाडून विरोध केला. म्हणून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय अस्मिता आणि प्रादेशिक समतोल याचा दोष आमच्यावर कोणी ठेवू शकणार नाही. परंतु प्रादेशिक समतोल आणि राष्ट्रीय एकात्मता एकतर्फी नको. तो वन-वे ट्रॅफिक नको, टू-वे ट्रॅफिक असला पाहिजे. दोन्हीकडून ती जाण असावी. नागपूरला नागपूर करार झाला. विदर्भातील सर्व जनता ८०-९० टक्के जनता महाराष्ट्राच्या बाजूने त्यावेळेस होती असे नाही. पण तोही भाग महाराष्ट्रामध्ये आला आणि १९६० सालापासून आमचा एकच महाराष्ट्र आणि महाराष्ट्र शासन नांदू लागले. सन्माननीय सदस्य श्री. जैन यांनी नागपूर कराराचा उल्लेख केला. अध्यक्ष महाराज, नागपूर कराराच्याबाबत तरुण भारतचे संपादक कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी एक अग्रलेख लिहिला. १९६० साली नवीन महाराष्ट्राची धुरा देशाचे नेते या नात्याने, मुख्यमंत्री या नात्याने यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या खांद्यावर घेतली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, नागपूर कराराचे पालन करणे ही आमची नैतिक जबाबदारी आहे. विदर्भातील लोकांना सापत्न भावाने वागविले जाईल अशी भावना तीळमात्र ही त्यांच्या मनामध्ये येता उपयोगी नाही. येथील बॅकलॉग दूर करण्यासाठी दरवर्षी विधिमंडळासमोर अहवाल सादर करण्यात येईल. त्यामुळे विदर्भ मराठवाड्याचे असंतुलन दूर होईल. पुढे ते असे म्हणतात की, हा बॅकलॉग जोपर्यंत भरून निघत नाही तोपर्यंत विदर्भाला आणि मराठवाड्याला झुकते माप दिले जाईल. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, असे जर घडले असते तर? महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी 'ॲक्युम्युलेटेड बॅकलॉग' दूर झाला नाही. संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर ॲक्युम्युलेटेड बॅकलॉगमध्ये वेस्टर्न महाराष्ट्राची भर पडली. तो बॅकलॉग वेगळा आणि विदर्भ व मराठवाड्याचा बॅकलॉग वेगळा. आजच्या मुख्यमंत्र्यांवर देखील आमचा विश्वास आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या जडण-घडणीमध्ये श्री. यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता. १९६० ते १९८४ या काळामध्ये दर वर्षी विधिमंडळाला हा बॅकलॉग दूर करण्याच्या दृष्टीने रिपोर्ट सादर केला असता तर आज ही पाळी आपल्यावर आली नसती. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने १९६५ साली पांडे कमिटी नेमली. त्या कमिटीच्या रिपोर्टमधील काही भाग जर मी या ठिकाणी वाचून दाखविला तर माझ्यावर पुन्हा प्रादेशिकतेचा आरोप करण्यात येईल. त्यांनी आपल्या रिपोर्टमध्ये प्रकर्षाने जोर मराठवाडा आणि विदर्भावर दिलेला आहे. परंतु १९६५ सालामध्ये ते घडले नाही. १९८३ सालामध्ये घोषणा झाली नागपूरच्या अधिवेशनामध्ये ३७ कलमी कार्यक्रम विदर्भासाठी, २५ कलमी मराठवाड्यासाठी, १७ कलमी कार्यक्रम कोकणासाठी असे जाहीर करण्यात आले. ही जी संपूर्ण प्रक्रिया आहे त्याचाच परिपाक म्हणून हा प्रस्ताव येथे आज आणण्यात आलेला आहे. नवीन असा नाही. आम्ही आजपर्यंत ते केले नाही या पश्चातापापोटी हा प्रस्ताव या सभागृहात आणलेला आहे.

दांडेकर समितीच्या रिपोर्टमध्ये जो उल्लेख करण्यात आलेला आहे त्याचा मी तीव्र निषेध करतो. १९७२ सालामध्ये वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून नियोजन पर्व आणले. त्यांचा उद्देश तोच होता. Thus far no further आजपर्यंत जे शोषण केले ते आता संपू द्या. डिस्ट्रिक्ट प्लॅनिंगमध्ये नॉर्म्स ठरवून सर्व जिल्ह्यांचे संतुलन होईल. दांडेकर समितीने लावलेला जावईशोध आहे की, कै. श्री. वसंतराव नाईक यांनी नागपूर करार रद्द केला.

१९७२ ते १९८४ या १३ वर्षांच्या कालखंडामध्ये डिस्ट्रिक्ट नियोजनाचे नॉर्म्स शास्त्रशुद्ध आखले असते तर विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र अशी वेगवेगळी मंडळे करण्याची वेळ आपल्यावर आलीच नसती. अध्यक्ष महाराज, १९७२ पूर्वी म्हणजे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी नियोजनाची कल्पना आणण्यापूर्वी १९६० ते १९७२ या १२ वर्षांच्या कालखंडामध्ये बजेटरी प्रोव्हिजनमध्ये आऊटले इतके कोटी रस्त्याकरिता ते सगळे रस्ते सांगली-सातारा येथे बांधले तरी हरकत नाही इतके कोटी रुपये इरिगेशनला. मग हे सगळे मोठे, मध्यम आणि लहान प्रकल्प सांगली-सातारा जिल्ह्यामध्ये झाले तरी हरकत नाही. त्यामुळे याला कोठे तरी बांध घालावा म्हणूनच नियोजनाचे पर्व आले. त्या नियोजनाच्या कल्पनेमध्ये नॉर्मस ठरले. म्हणून माझा असा आग्रह राहील की, कमीत कमी हे नियोजन दुरुस्त केले, नियोजनाचे नॉर्मस बदलले. आतापर्यंत ज्या भागांवर अन्याय झाला आहे त्यांना झुकते माप दिले तर अशी पाळी येणार नाही.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय मुख्यमंत्री नामदार वसंतदादा पाटील या ठिकाणी असे म्हणाले की, "अशी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळे स्थापन केल्यास प्रादेशिक किंवा वेगवेगळेपणाच्या प्रवृतीना जोर चढेल असा विचार करून राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून अशी मंडळे स्थापन करू नयेत असा निर्णय पूर्वी घेण्यात आला होता." परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, राष्ट्रीय एकात्मता ही १९६० सालापासून १९७२ पर्यंत माणसांच्या अंगामध्ये वाढत चालली आहे काय? ही एकात्मता कमी कमी होत चालली आहे. अध्यक्ष महाराज, या प्रस्तावाच्या रूपाने आम्ही कटूता टाळतो. परंतु १९६० सालापासून १९८४ सालापर्यंत २४ वर्षांच्या कालावधीमध्ये लोकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे उद्योग झाले. तरीसुद्धा दुर्दैवाने या ठरावाचे वर्णन करताना काही सन्माननीय सदस्य ऐतिहासिक, सुवर्णमध्य असे म्हणाले परंतु मी काही इतरांप्रमाणे म्हणणार नाही. This is nothing but old wine in new bottle. म्हणजे जुनी दारू जमा करून एकाच बाटलीमध्ये आणली आहे. हा प्रस्ताव आल्यानंतर ही मंडळे कधी स्थापन होतील हे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले नाही. ही मंडळे स्थापन झाल्यानंतर एका विशिष्ट कालमर्यादेत हा बॅकलॉग दूर करू अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली आहे काय? जी मंडळे निर्माण होतील त्यांच्याकडे टर्म्स ऑफ रेफरन्स दिले आहेत काय? लोकशाही राज्यामध्ये आपल्याकडून काही घडले नाही तर गव्हर्नरने इंटरफियरन्स करावा अशी पाळी येऊ नये. अध्यक्ष महाराज, मी या ठरावाला विरोध करीत नाही. कारण विरोध करण्याचे पाप मी करणार नाही. परंतु एवढेच सांगेन जे जुने होते ते जमा केले. यापूर्वी वेळोवेळी तोंडाला पाने पुसली होती. परंतु याबाबतीत आता तरी इमानदारीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

"पुत्र मांगने गया और भूल गया वरदान!!"

पुत्र मागावयाला गेला आणि शपथ विसरला असे होता कामा नये. कारण या ठरावाची अंमलबजावणी झाली तर लोकशाही धोक्यात येईल. तरी ही गोष्ट आपल्याला टाळावयाची असेल तर Thus far and no further. जो जो अविकसित भाग आहे त्याचा इमानदारीने विकास करण्याच्या दृष्टीने ही मंडळे आपण निर्माण करणार आहात असे मी समजतो. तरी या मंडळाची निर्मिती कधी होईल? टर्म्स आणि रेफरन्सेस काय? अकौन्टेब्लीटी कोणाची रहाणार आहे. या संदर्भात मंत्री महोदयांनी या सभागृहाला माहिती द्यावी. तरी या प्रश्नांची उत्तरे मंत्रिमहोदयांनी दिली तर मला असे वाटते की, महाराष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने आपल्याला राष्ट्रीय एकात्मता व बंधुप्रेम निर्माण करता येईल.

❑❑❑

एचबी ११८०—२५

पीक विम्याचा सूत्रपात

(१३ नोव्हेंबर, १९८४)

आज शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांना व्यापक पीक संरक्षण लाभलेले असले तरी दादासाहेबांनी त्याची मागणी दिनांक १३ नोव्हेंबर, १९८४ रोजी विधानपरिषदेत राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर झालेल्या चर्चेतून केली होती. यातून शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी त्यांची जाण अधोरेखित होती.

सभापती महोदय, दुष्काळांच्या चर्चेसंबंधी माझ्या पूर्वीचे सदस्य मा. केवलचंद जैन यांनी म्हटल्याप्रमाणे दरवर्षी पावसाळा येतो तद्वत दरवर्षी एका सत्रात दुष्काळावर चर्चा सभागृहात करावी लागते. ही चर्चा होऊ नये व राज्यात जो दुष्काळ पडतो तो कसा निभावून नेता येईल याचे उत्तर अजून काही सापडत नाही. तेंव्हा या दुष्काळाच्या संदर्भात चर्चा करीत असताना दुष्काळ नाहीसा करण्याच्या दृष्टीने वा या दुष्काळाला तोंड देण्यासाठी काही तरी परस्पेक्टिव्ह प्लॅनिंग करावे लागेल आणि तसे काही प्लॉनिंग आपण केले नाही तर दरवर्षी या दुष्काळाबाबत चर्चा होत राहील. तेव्हा दुष्काळ नाहीसा करण्याच्या दृष्टीने काही योजना आपण करणारच नाही का? आणि किती वर्षे योजना करणार नाही हा खरा प्रश्न आहे. कारण या राज्यामध्ये १९७२ पासून १९८४ पर्यंत जवळ जवळ सहा-सात दुष्काळ येऊन गेले आणि त्याला या राज्याला तोंड द्यावे लागले आहे हा एक भाग आणि दुसरा भाग असा की, लाँगटर्म योजना दुष्काळ निवारण करण्यासाठी काय करावी यासंबंधी मी बोलणार आहे. प्रथम बोलत असतांना विद्यमान दुष्काळासंबंधी जे कांही गैरसमज आहेत त्यावर मी पाच मिनिटे बोलणार असून त्याच्या पुढील पाच मिनिटे दुष्काळ निवारण्यासाठी परस्पेक्टिव्ह प्लॉनिंग कसे करण्यात यावे यासंबंधी बोलणार आहे. अध्यक्ष महाराज, दिनांक १५ सप्टेंबर १९८४ रोजी महसूल मंत्री श्री. शांताराम घोलप यांनी एक मुलाखत दिली असून त्या मुलाखतीमध्ये त्यांचे म्हणणे असे आहे की, १६ जिल्ह्यांत दुष्काळ आहे आणि विशेषत: संपूर्ण मराठवाड्यात दुष्काळ असून विशेषत: बीड आणि उस्मानाबाद येथे संपूर्ण दुष्काळ असून संपूर्ण मराठवाडा हा दुष्काळाच्या छायेखाली आहे. परंतु माझा पहिला प्रश्न असा आहे की, त्यांचे हे जे स्टेटमेंट आहे ते सप्टेंबर महिन्यातील आहे. त्यांच्या या स्टेटमेंटने कसे गैरसमज होतात हे मी सांगतो, त्याबाबत माझ्या अगोदरचे वक्ते श्री. दत्ता मेघे, श्री. लहाने आणि श्री. जैन यांनी देखील त्याबाबत उल्लेख केला आहे. अध्यक्ष महाराज, आपल्या राज्यात एकूण जो मागून पाऊस आला त्या पावसाचे पाणी आणि जमिनीमधील पाणी याचा विचार केला तर त्या पावसाने जमिनीमधील पाण्याची लेव्हल वाढली का किंवा जे रबीचे बी पेरले होते त्याची उगवण झाली का याचे एस्टिमेंट सरकारने नव्याने करण्याची गरज आहे. अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे फ्रेश एस्टिमेट घेतले तर १६ जिल्ह्यांऐवजी जवळ जवळ २५-२६ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती किंवा निमदुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे असे दिसेल तेव्हा अध्यक्ष महाराज, मी अशासाठी म्हटले की, दुष्काळ निवारण करण्यासाठी कांही तरी परस्पेक्टिव्ह प्लॉनिंग करण्याची आवश्यकता आहे. तसेच अध्यक्ष महाराज, बाबा आदमच्या काळापासून जी आणेवारी

पद्धती आपल्या राज्यात चालू आहे तिच्यामध्ये पण बदल केला पाहिजे असे मला वाटते. १८९४ चा जो लेप्रसीसंबंधीचा कायदा होता त्यात सुद्धा आपण बदल केलेला आहे. तसेच स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये आपण दुष्काळ आणि फॅमीन या दोन शब्दांचे अर्थ टेक्निकली बदलले आहेत. दुष्काळाच्या ऐवजी आपण टंचाई हा शब्द वापरू लागलो आणि फॅमीनच्या ऐवजी आपण स्केअरसीटी असे म्हटले. परंतु आपण आणेवारीची जी पद्धत वापरतो ती ब्रिटिशांच्या काळापासूनचीच आहे. नजर आणेवारीने १६-१७ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला परंतु ८० किलोचा ४० किलो कापूस झाला हे नजर आणेवारीत येत नाही आणि त्यामुळे दुष्काळ असूनही जाहीर होत नाही अशी परिस्थिती आहे. पाणी अडवा पाणी जिरवा अशी घोषणा राज्यमंत्र्यांनी दिली. सन्माननीय सदस्य श्री. जैन यांनी पाणी अडविण्याच्या दृष्टीने काय योजना आहे याचा मुद्दा उपस्थित केला आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये नद्यांना आणि नाल्यांना पाणी असते ते डिझेल पंप लावून आपण उपयोगात आणू शकतो. त्यावर आपण चार्ज आकारला. आपण जे पाणी आहे ते उपयोगात आणू शकतो. तेव्हां हा प्रश्न घोषणेने मिटणार नाही. जवळ जवळ सर्व राज्यातील खरीप पिके गेली आहेत आणि रब्बी पिकेही जाण्याच्या मार्गावर आहेत. यापुढच्या काळात अन्नधान्याचा दुष्काळ, पिके गेल्यामुळे चाऱ्याचा दुष्काळ आणि भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई असे तीन प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. अध्यक्ष महाराज, यंदा देखील भर पावसाळ्यामध्ये १८७ गावांना टँकरने पाणी दिले गेले अशी अवस्था या महाराष्ट्रामध्ये ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांमध्ये होती. तेव्हा आणखी किती वर्षे आपण लोकांना पिण्याचे पाणी अशा तऱ्हेने उपाय योजना न करता देणार नाही याचा विचार आपण करणार आहोत की नाही हा खरा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैन म्हणाले की वसंतराव नाईकांच्या कालखंडामध्ये पाणी अडविण्याच्या दृष्टीने डिझेल पंप फ्री ऑफ कॉस्ट देऊन एक प्रयोग झाला होता. विद्यमान परिस्थितमध्ये नदी आणि नाल्यांना जे डिसेंबर-जानेवारीपर्यंत पाणी असते ते आपण जर शेतकऱ्यांना डिझेल पंप लावून अडवून दिले तर त्याचा उपयोग होऊ शकेल. पाहिजे तर आपण चार्ज आकारावा त्यामुळे आपण शेतकऱ्यांना रिलिफ देऊ शकतो. अध्यक्ष महाराज, पाण्याच्या पातळीसंबंधाने बोलावयाचे तर १९८२ पासून या राज्याच्या भूगर्भातील पाण्याची पातळी आपण तपासली तर ती कमी कमी होत आज जवळ जवळ २८.७ पर्यंत आली आहे म्हणजे ८४ सालामध्ये १९८२ च्या तुलनेने पाण्याची पातळी घसरलेली आहे. १९८२-८३ च्या दुष्काळामध्ये आपण अध्यक्ष महाराज, या सदनाचे सदस्य होता. त्यावेळेस दुष्काळासंबंधी जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये आपण भाग घेतला होता. सुरुवातीस चौदाशे गावे जाहीर करणाऱ्या शासनाने जूनच्या शेवटी तेवीसशे गावे पिण्याच्या पाण्याच्या टंचाई संदर्भात घोषित केली. ८२ च्या तुलनेने ८४ मध्ये १/४ वॉटर लेव्हल कमी झाली असेल तर त्याचा आपणास गंभीर विचार करावयास पाहिजे. आज दैवदुर्विलास असा आहे की, माननीय राज्यमंत्री श्री. भाई सावंत ज्या भागातून आले आहेत त्या भागात पावसाला तोटा नाही. पाऊस आला की पूर येतो परंतु मे आणि एप्रिल महिन्यामध्ये रत्नागिरी आणि कोकणात पाण्याचा थेंब नाही. तेंव्हा या दृष्टीने लाँगटर्म योजना कांही करणार की नाही? या आधुनिक युगात केवळ कातळामध्ये पाणी झिरपून जाते असेच उत्तर देत राहणार काय की काही संशोधन करणार हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्रात बारमाही दुष्काळ असलेल्या विभागाची माहिती माझ्याकडे आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांच्या सीमेलगतचा पठारी भाग, सांगली जिल्ह्यामध्ये आटपाडी, खानापूर, जतचा भाग, सातारा जिल्ह्यामध्ये माण, खटाव, कवठेमहांकाळ आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोल्याचा भाग, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम, परांड्याचा भाग हा बारमाही दुष्काळी भाग आहे. अवर्षणासंबंधी या ३-४ कमिट्यांनी असे निर्विवादपणे सांगितले आहे की, महाराष्ट्रात

एचबी ११८०—२५अ

या जिल्ह्यामध्ये जन्मभर दुष्काळ राहणार आहे. या जिल्ह्यामध्ये पहिला पाऊस आला काय, आला नाही काय त्याचा काही संबंध नाही. दुष्काळ हा राहणारच. शेवटी या लोकांनी अशी मागणी केली की, आम्हाला दुष्काळी जिल्हे अलग करून द्या मग त्यासाठी वेगळी यंत्रणा करता येईल. तेव्हा आपण या दुष्काळाच्या संदर्भात काय उपाययोजना करणार आहांत? १९८२ मध्ये ११,४८७ गावांमध्ये नोव्हेंबरमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष होते. मार्चमध्ये १९,००० गावे झाली आणि जूनमध्ये २३,००० गावे झाली. कदाचित या दुष्काळाचा इम्पॅक्ट कमी असेल. परंतु मे आणि जून महिन्यांमध्ये महाराष्ट्र शासनाला २० हजार गावांना पाणी पुरवावे लागणार आहे याची शासनाने दक्षता घ्यावी. मी नोव्हेंबर महिन्यांमध्ये हे बोलत आहे. मार्चमध्ये पुन्हा हेच रिपीट करण्याची माझ्यावर पाळी येणार नाही याची दक्षता घ्यावी. मार्च १९८३ मध्ये आपल्याकडे १८३ रिग्ज होत्या. एप्रिलमध्ये त्या २५७ झाल्या आणि मे मध्ये ३०० झाल्या. आज आपल्याकडे रिग्ज मशिन्स, ब्लास्टींग मशिन्स आणि बोअरींग मशिन्स व विपनींग मशिन्स किती आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, एक रिग्ज मशिन एका महिन्यामध्ये किती बोअर्स पाडते तर १५ बोअर्स पाडते असे सांगितले होते. त्या दृष्टीने विचार केला तर आपल्याला बरेच बोअर्स घ्यावे लागणार आहेत. तेव्हा विहिरी खोल करणे, बोअर वेल्स घेणे. विपनींग करणे यासाठी लागणाऱ्या यंत्रणेची सज्ज तयारी आपल्याला डिसेंबरपर्यंत करावी लागेल. १९८३ सालात बाबासाहेब भोसलेच्या कारकिर्दीत जो प्रकार घडला त्याचे रिपीटेशन पुन्हा पुढे होऊ नये एवढीच सूचना मी करतो. सन्माननीय सदस्य श्री. केवलचंद जैन यांनी या ठिकाणी काही माहिती दिली. अध्यक्ष महाराज, आपल्याकडे इ.जी.एस. ची आकडेवारी येते. राज्यामध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती असताना मॅनेडेज कमी का होतात याचा अर्थ आपली जी यंत्रणा आहे ती इ. जी. एस. पासून अलग होत चाललेली आहे. प्रत्यक्षात मॅनडेजप्रमाणे मजुरांना काम मिळत नाही. यासाठी आतापासून गुरांच्या चाऱ्यांची व्यवस्था काय केली, लोकांना अन्नधान्य पोहोचविण्याची व्यवस्था काय केली? आपल्याला जर लाँगटर्म पॉलिसी करावयाची असेल तर मा. मंत्री महोदय श्री. भाई सावंत यांना मी वॉटर-रिसोर्सेस डेव्हलपिंग इंडिया हे पुस्तक वाचायला देतो. अध्यक्ष महाराज, मी माझ्या पूर्वीच्या भाषणामध्ये नद्या कशा लिकअप करता येतील हे मी सांगितले होते ते मी पुन्हा या ठिकाणी रिपीट करीत नाही. मा. वसंतराव नाईक यांची वसंत बंधाऱ्यांची कल्पना आणि मा. वसंतदादा पाटील यांची पाणी अडवा पाणी जिरवा ही कल्पना कशी उपयोगामध्ये आणता येईल हे आपण पहा. वाहत्या नद्यांचे पाणी अडवून शेतकऱ्यांना निकटची व्यवस्था करून द्या. मा. मंत्रिमहोदयांनी एका संमेलनामध्ये सांगितले आहे की, पाण्याचे जेथे स्टोअरेज असेल तेथून पाणी उचलण्यासाठी सरकार मदत करील. नदी-नाले वाहतात परंतु तेथून पाणी लिफ्ट करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा आपल्याजवळ नसते अशा प्रकारच्या अनेक तक्रारी माझ्याकडे देखील आलेल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या पिकाच्या कन्सेप्टची कल्पना आपण स्वीकारणार आहात की नाही? आयुर्विमा मी समजू शकतो. माणूस मेल्यानंतर त्याच्या बायका-मुलांना ते पैसे मिळतात. आता आपण मोटारीचा, सायकलचा, गोदामांचा, घरांचा, स्कूटरचा विमा काढण्याची कल्पना देखील स्वीकारलेली आहे. असे असताना शेतकऱ्याच्या बाबतीत काय करण्यात येणार आहे? हिंदुस्थानचे बेसिक ॲग्रीकल्चर जे आहे त्याच्या विम्याची कल्पना आपण स्वीकारा. किती ठिकाणी आज क्रॉप इन्शुरन्स आहे? महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कल्याण करणारे, शेतकऱ्यांच्या बाजूचे असे जर आपण राज्यकर्ते असाल तर या वर्षी नव्हेतर आजच्या या चर्चेला उत्तर देताना मा. मंत्रिमहोदयांनी असे जाहीर करावे की, कमीत कमी महाराष्ट्र राज्यामध्ये पायलट बेसीसवर नव्हेतर सर्व राज्यभर क्रॉप इन्युरन्सची स्कीम स्वीकारू. यामध्ये धोक्याचा भाग नाही. आकस्मिक मालमत्ता नष्ट होण्यामुळे इन्शुरन्स

कंपनी फायद्यामध्ये जाते, तोट्यामध्ये जाते. परंतु पर्सेंटेजने क्रॉप कमी झाले तर इन्शुरन्स कोट करण्यामध्ये काही हरकत नाही. आपण जर पुरोगामी असाल तर महाराष्ट्रामध्ये क्रॉप इन्शुरन्स आपण घोषित केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. लहाने यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये आपण इरीगेशन पोटेन्शिअल किती एक्स्प्लॉईट करणार आहात? आज आपल्याकडे उपलब्ध पाण्यापैकी स्टोअरेज टँकची लेव्हल कमी पडलेली आहे. चाऱ्या बुजलेल्या आहेत. असे असताना उपलब्ध पाण्यापैकी ५० टक्के पाणी जर आपण गलथानपणाने गमावत असू तर लोक आपणाला हसल्याशिवाय राहणार नाहीत. आपल्याला ही नेहमीची चर्चा जर थांबवावयाची असेल तर त्यासाठी लाँगटर्म पॉलिसी अवलंबिली पाहिजे. मान्सूनच्या पावसाचे पाणी स्टोअर करून शेतकऱ्यांच्या पिण्याच्या, चाऱ्याच्या सर्व पाण्याची सोय आपल्याला करता येऊ शकेल. आणि असे प्लॉनिंग सरकारला करता येईल. परस्पेक्टिव्ह प्लॅनिंगने येणारा दुष्काळ आपण कसा रोखून धरू शकू याचा विचार करा.

❑❑❑

सुशीलकुमार टच नसलेला अर्थसंकल्प

(२८ मार्च, १९८५)

१९८५ साली महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पावर बोलताना त्यांनी या अर्थसंकल्पाचे वर्णन सुशीलकुमार टच नसलेला रूक्ष अर्थसंकल्प अशा शब्दात केले. या अर्थसंकल्पाला त्यांनी गुलाबी अर्थसंकल्प म्हटले यात सौंदर्य तर नाही, मोराच्या पिसांचा संभार तर सोडा परंतु हरीणाक्षीच्या टपोऱ्या डोळ्यांचेही सौंदर्य नाही. अर्थसंकल्पासोबत मिळणारी पुस्तके मिळणे बंद झाल्याबद्दलही रा. सू. गवई यांनी खंत व्यक्त केली होती.

अध्यक्ष महाराज, मघाशी मी मुद्दा मांडला होता की, आज सरळ चर्चा न करता ॲप्रोप्रिएशन बिल नुसते पास करून घ्यावे आणि चर्चा पुढच्या अधिवेशनात करावी म्हणजे सविस्तर चर्चा होऊ शकली असती. त्यात काही बिघडले नसते परंतु आपण ती गोष्ट मान्य केली नाही त्यामुळे आज या ठिकाणी बोलणे भाग आहे. अध्यक्ष महाराज, एकंदरीत हा अर्थसंकल्प मुळी सहाव्या योजनेच्या शेवटच्या टप्प्यात आहे. सीमेवर आहे आणि सातव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा अजून पूर्ण न झाल्यामुळे, त्याचे स्वरूप पूर्ण झाले नाही त्यामुळे या १९८५-८६ च्या योजनेचे स्वरूपही पूर्ण झाले नाही अशी परिस्थिती आहे. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात राज्याची विद्यमान आर्थिक परिस्थिती, सहाव्या पंचवार्षिक योजनेमधील अंदाजित परफॉर्मन्स् सातव्या योजनेची उद्दिष्टे आणि आठव्या वित्त आयोगाने त्यांना घेतलेले चिमटे आणि त्याच्यावर व्यक्त केलेली प्रतिक्रिया यामुळे हे लहानसे बजेट या ठिकाणी आले. आहे त्याला आमचे काही म्हणणे नाही कारण या पलीकडे त्याना काही घेणे शक्य नव्हते. विशेषतः आठव्या वित्त आयोगाने घेतलेले चिमटे आणि त्याला प्रेमाने दिलेले उत्तर याच्यासंबंधी मी माझ्या भाषणाच्या शेवटच्या टप्यामध्ये त्याचा समारोप करीन. परफॉर्मन्स बजेट हे पुढच्या अधिवेशनामध्ये येईल तेव्हा पुढच्या बजेटमध्ये प्री-रिक्वीझीटस काय असावेत हे मी अर्थमंत्र्यांना यानिमित्ताने

सांगतो म्हणजे त्यावेळी आक्षेप घेण्याची संधी राहणार नाही. परफॉर्मन्सला स्पर्श केला असल्यामुळे संपूर्ण सहावी पंचवार्षिक योजना आपण तपासली तर कृषी क्षेत्रामध्ये अन्नधान्याचे उत्पादन हे स्टॅगनेट राहिले, कमी जास्त झाले. परंतु, सरासरी तेवढीच राहिली. तेव्हा या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये आपल्या राज्याच्या शेतीच्या उत्पादनात आमूलाग्र बदल झाला असे काही परफॉर्मन्स दाखवत नाही. तेव्हा सातव्या योजनेत राज्याचे उत्पादन वाढेल अशी दक्षता घेण्याची गरज आहे असे मी या निमित्ताने स्पष्ट करू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला आपण पीक विम्याची योजना ही पायलट बेसिसवर घेतली होती आणि आता यामध्ये जवळजवळ १३९ तालुके कव्हर झालेले आहेत. परंतु ज्यावेळी आपण अतिरिक्त अंदाजपत्रक पावसाळी अधिवेशनामध्ये सभागृहासमोर ठेवाल त्यावेळी सर्व राज्यात ही योजना लागू झाली आहे अशी घोषणा असली पाहिजे. आपले अर्थमंत्री तरुण आणि तडफदार आहेत तेव्हा मी पुन्हा त्यांना असे सांगतो की, पुढच्या अर्थसंकल्पामध्ये केवळ १३९ तालुक्यांच्या बाबतीत ही पीक विमा योजना मर्यादित न राहता सर्व राज्याला लागू झाली असली पाहिजे. आपल्या अर्थमंत्र्यांच्या बाबतीत बोलत असताना आपल्या देशाचे पंतप्रधान हे सुद्धा नव्या जोमाने आणि नव्याने जबाबदारी स्वीकारलेले असे आहेत त्यांनी आपल्या अर्थसंकल्पामध्ये सुद्धा या पीक विम्याची सुरुवात केली आहे. त्यांच्याकडील सुरुवात ही पार्शल असू शकते परंतु आपल्या राज्यामध्ये आपण या पीक विमा योजनेला सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट केले आहे आणि पायलट बेसिसवर आपण ही योजना सुरू केली आहे तेव्हा आता ती १३९ तालुक्यापुरती मर्यादित राहू नये अशी अपेक्षा स्वाभाविक आहे. तेव्हा अतिरिक्त अंदाजपत्रकामध्ये पीक विमा योजना राज्यातील सर्व भागांना लागू केली आहे, अशी घोषणा असावी. तसेच इतर काही पिकांच्या उत्पादनाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. या ठिकाणी पुस्तकात असे दिले आहे की, या राज्यामध्ये उसाचे उत्पादन घटत आहे. अध्यक्ष महाराज, उसाचे उत्पादन घटत चालले असेल तर दुसरीकडे शासनाने ४७.४५ कोटी रुपयांचे भाग भांडवल साखर कारखान्यात गुंतविले आहे. सात कारखाने प्रत्यक्ष सुरू झाले आहेत. २३ इरादा पत्रे या राज्याला मिळाली आहेत. तेव्हा ही सगळी डेड इन्व्हेस्टमेंट आहे. हे कारखाने फायद्यात जातील की नाही हे सुद्धा पाहिले पाहिजे. एकीकडे आपण म्हणता की उसाचे उत्पादन घटले आहे आणि तरीही आपण ४७.४५ कोटी इतके भाग भांडवल गुंतविता तेव्हा इन्व्हेस्टमेंट को रिलेटेड टू द प्रॉडक्शन असावे, असे मला वाटते आणि यादृष्टीने उसाच्या पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी फेरविचार करण्याची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. संपूर्ण सहाव्या पंचवार्षिक योजनेचे आकडे तपासून पाहणे आवश्यक आहे. कापसाच्या गासड्या ह्या १६ ते १७ लाखांच्या वर गेलेल्या नाहीत. राज्यातील बागायती जमिनीच्या एकूण भागांपैकी जास्त भागावर जसे उसाचे पीक घेतात आणि ते जसे मनी क्रॉप आहे. त्याचप्रमाणे राज्यातील इतर ५० टक्के शेतकऱ्यांचे कापूस हे सुद्धा मनीक्रॉप आहे. ह्या पिकांचे उत्पादन सुद्धा स्टग्नेट राहिले आहे. आपण हे पीक वाढविण्याचा प्रयत्न केला नाही असा माझा आरोप आहे आणि म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्नांनी सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये कापसाच्या पिकाचे उत्पादन वाढेल अशा तऱ्हेचा उल्लेख पुढच्या बजेटमध्ये असेल अशी अपेक्षा मी माननीय अर्थमंत्र्यांकडून करू इच्छितो. कुटुंबकल्याण कार्यक्रमाच्या संदर्भात महाराष्ट्राला बक्षीस मिळालेले आहे. विरोधी पक्ष-नेते यांच्या गावात ते मिळाले आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. कुटुंबकल्याण ही कॉरिलेटेड टर्म आहे. कुटुंबकल्याणावर आपण कोट्यवधी रुपये खर्च करतो, परंतु पाच वर्षांमध्ये ग्रोथ ऑफ पॉप्युलेशन हा कमी झाला आहे का असा प्रश्न आहे. जर कमी झाला असेल तर हे जे

कुटुंबनियोजनाचे आकडे दिलेले आहेत ते बनावट आहेत असे म्हणावे लागेल. आपण याबाबत जे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. ते म्हणजे जी जननक्षम जोडपी आहेत. त्यांचे परसेंटेज कमी करून पॉप्युलेशन ग्रोथ आपल्याला कमी करावयाची आहे आणि त्यानुसार ८०-८५ या कालावधीमध्ये लोकसंस्थेचा ग्रोथ कमी झाला का आणि नसेल झाला तर आपला यावर खर्च केलेला पैसा हा वाया गेला आहे असे म्हणावे लागेल. तेव्हा पुढच्या अतिरिक्त अंदाजपत्रकामध्ये या कार्यक्रमावर झालेला खर्च आणि पाच वर्षांमध्ये पॉप्युलेशन ग्रोथ रेट हा किती प्रमाणात आपण कंट्रोल केला आहे याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. या सजेशन्स मी मुद्दाम अर्थमंत्र्यांना देत आहे.

ग्रामीण भागांमध्ये पाणीपुरवठा करण्याकरिता सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये आपण ३६२.५९ कोटी रुपये खर्च केला. अध्यक्ष महाराज, या विषयाच्या संदर्भात लास्ट डे मोशन दिलेली आहे. तसेच मी या विषयावर दोन-चार भाषणे दिली आहेत. या विषयात मी डीपली इंटरेस्टेड आहे. यामध्ये सुद्धा आपण ब्रेकअप केलेला आहे. कठीण गावे आणि अकठीण गावे. आपण आपल्या भाषणामध्ये एकंदर या योजनेचा लाभ २५,८४२ गावांना झाला असे म्हटले आहे. यात १३,५०० गावांना आपण पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला आहे. बाबासाहेब भोसले यांच्या काळात आपण १०० आकड्यापासून २००० पर्यंत गेलो, परंतु पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आजही सपंलेले नाही.

(श्री. सुशीलकुमार शिंदे : विहिरीतील पाणी आटते आणि त्यामुळे पाण्याची पातळी खाली जाते आणि म्हणून पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते.)

श्री. रा. सू. गवई : महाराज, १९९१ साली या राज्यामध्ये एकही गाव पिण्याच्या पाण्याच्या दुर्भिक्षाखाली राहणार नाही अशा प्रकारचे आपले उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने पुढच्या बजेटमध्ये आपण किती गावांना पाणीपुरवठा केला ह्याची माहिती असणे आवश्यक आहे. हे पाणी मग तुम्ही विहिरीतून द्या, नाहीतर समुद्राचे पाणी गोड करून द्या, परंतु, आम्हाला याबाबतची संपूर्ण यादी हवी आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे परफॉर्मन्स दाखवितांना आपण शाळांच्या बाबतीत सुद्धा माहिती देणे आवश्यक आहे. शाळा देताना आपण गावांना दिल्या पण वाड्या सोडल्या आहेत. तेव्हा पुढच्या बजेटच्या वेळी किती गावांना अजून शाळा नाहीत अशा गावांची यादी देणे आवश्यक आहे. किती गावांना शाळा दिल्या आणि त्यातील किती एक-शिक्षकी शाळा आहेत याची सुद्धा यादी असणे आवश्यक आहे. कारण एक-शिक्षकी शाळा असून नसून सारख्याच आहेत. तेव्हा किती गावांना आपण शाळा दिल्यात आणि किती गावांना दिल्या नाहीत. तसेच एक-शिक्षकी शाळा किती याचा सुद्धा तपशील देणे आवश्यक आहे म्हणजे मग आपल्या राज्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील जे चित्र आहे ते अधिक स्पष्ट होईल. अध्यक्ष महाराज, तंत्र शिक्षणासंबंधीचे जे धाडसी पाऊल टाकले आहे, तो योग्य निर्णय आहे. त्याचे मी स्वागत करतो. परंतु, त्याचबरोबर माननीय अर्थमंत्र्यांना माहिती म्हणून सांगतो. खाजगीमध्ये त्यांना सांगितले आहे. सभागृहातही अनेक वेळा चर्चा झालेली आहे. राज्य शासनाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना ज्या सवलती मिळतात तशाच प्रकारच्या ऑन-पार सवलती इतर शिक्षण संस्थांमध्ये सुद्धा मिळाल्या पाहिजेत. त्या सवलतीपासून अनुसूचित जाती-जमाती विद्यार्थी परावृत्त होता कामा नये. हे त्या संस्थांच्या मॅनेजमेंटला आपण सांगावे. तेव्हा याबाबतीत त्यांनी गंभीरपणे विचार करावयास पाहिजे. मी याबाबतीत त्यांना मागे दोन-तीन वेळा सांगितले आहे.

अध्यक्ष महाराज, ग्रामीण रोजगारामध्ये आपले राज्य प्रगत असतांना त्याचे श्रेय विनाकारण केंद्राला का दिले जाते हे मला समजत नाही. केंद्राची राष्ट्रीय भूमिहीन रोजगार हमी ही दात कोरून काढलेली योजना आहे. आपल्या महाराष्ट्राची जी रोजगार हमी योजना आहे तिला कोठेही तोड नाही. आपण या योजनेवर ७३२ कोटी रुपये खर्च

करतो आणि केंद्र सरकार त्याच्या अगेन्स्ट जवळजवळ १८० कोटी रुपये खर्च करते, असे असतांना, ग्रामीण रोजगारासंबंधीचे श्रेय केंद्राला कशासाठी देता ? आपल्या राज्याने याबाबतीत जी कामगिरी केली आहे त्याला केंद्रामध्ये मिक्सअप करू नका. आपण रोजगार हमी योजनेवर जो खर्च केलेला आहे. तो स्तुत्य आहे. केंद्राचा यामध्ये पार्शल देखील खर्च नाही, याची केंद्राला जाणीव करून दिली पाहिजे. कारण तुझे आहे तुजपाशी, पण दिसत नाही, म्हणून ही जाणीव झाली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, १९८४-८५ च्या वित्तीय वर्षात पिण्याच्या पाण्याच्या निवारणाकरिता ९० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. पाण्याचे दुर्भिक्ष केव्हा संपणार ? मार्च, एप्रिल, मे आणि जून पर्यंत तुम्ही चार महिन्यांकरिता पैशाची तरतूद केली. म्हणून या अर्थसंकल्पाला आम्ही चालू बजेट म्हटले. म्हणजे काम चालू आणि रस्ता बंद अशी स्थिती आहे.

(श्री. सुशीलकुमार शिंदे : पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात आपण कलेक्टरांना आणि कमिशनरांना पॉवर्स दिलेल्या आहेत. म्हणजे तुम्ही म्हणता त्यामध्ये बजेट चालू नाही तर खऱ्या अर्थानेच काम चालू आहे.)

श्री. रा. सू. गवई : म्हणजे ही तरतूद जून महिन्यापासून केली असणार याचा स्पष्ट अर्थ हा आहे की, प्रत्यक्षात पैशांची तरतूद नसली तरी ९० कोटींचा हा खर्च अव्हाईड केला नाही तो तुम्ही करणार आहात काय ? मी फक्त याबाबतीत स्पष्टीकरण विचारले आहे. ९० कोटींचा खर्च अपेक्षित आहे, जूनपर्यंत ६२ कोटी खर्च होईल अशी अपेक्षा आहे आणि भारत सरकार ३६.६२ कोटी सहाय्य करील अशी अपेक्षा आहे परंतु अंतरिम अर्थसंकल्पात यासंबंधी तरतूद नाही. असे असतांना हे पाण्याचे दुर्भिक्ष कसे संपविणार ? तेव्हा पाण्याचे दुर्भिक्ष मिटविण्याकरिता ८० कोटी रुपयांची व्यवस्था केली आहे असे अर्थमंत्र्यांनी येथे स्पष्ट सांगावे. मी त्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कै. यशवंतरावजी चव्हाण होते. हिमालयासारखा तो पुरुष, परंतु केंद्र सरकारचा महाराष्ट्राकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत आकसाचा असल्यामुळे यशवंतरावजी तरी काय करणार ? त्यामध्ये त्यांचा काय दोष ? आठव्या वित्त आयोगासमोर या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आणि अर्थमंत्र्यांनी जे मेमोरेंडम दिले ते इतके अप्रतिम होते की, स्वत: यशवंतराव चव्हाणांना ते आवडले होते. दिल्लीच्या सेंट्रल हॉलमध्ये सुद्धा त्याची स्तुती मी स्वत: ऐकली होती. एवढे चांगले डाक्युमेंट दिल्यानंतर उलट केंद्राने तुम्हाला प्रेमपत्र दिले ते तुम्ही कसे काय सहन करता ? इतर राज्यांचे मुख्यमंत्री ज्याप्रमाणे केंद्रांशी भांडून आपली कामे करून घेतात त्याप्रमाणे आपल्या राज्याच्या अर्थमंत्र्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनी केंद्राशी भांडले पाहिजे.

(श्री. सदानंद वर्दे : रामकृष्ण हेगडे यांचा आदर्श ठेवा.)

(श्री. सुशीलकुमार शिंदे : ३४१ कोटी रुपयांचे डेफिसिट आहे.)

Shri R. S. Gavai : Deficit Budget has no meaning. It has become a very popular phenomenon. Therefore, I do not want to touch it. म्हणून डेफिसिट बजेटवर मी टीकाच करत नाही. कारण हे सगळे दात कोरून काढलेले बजेट आहे. अध्यक्ष महाराज, आयकरांच्या बाबतीत महाराष्ट्राचा वाटा १०.९५३ टक्क्यावरून ८.३९३ टक्क्यांपर्यंत खाली आणलेला आहे. म्हणजे २ टक्के कमी झाले. तसेच केंद्रीय उत्पादन शुल्कातील राज्यांचा हिस्सा ४० टक्क्यांवरून ४५ टक्केपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ही ५ टक्के जादा रक्कम महसुली तूट असलेल्या राज्यांनाच द्यावयाची असल्यामुळे या वाढीव रकमेतून महाराष्ट्राला एक नवा पैसा मिळणार नाही. ठरलेल्या ४० टक्क्यांपैकी मिळावयाचा हिस्सा हा ६.६३२ वरून ६.९१६ पर्यंत कमी करण्यात आला आहे. अतिरिक्त उत्पादन शुल्काच्या संबंधी

महाराष्ट्राचा १९८४-८५ चा हिस्सा १४.२३२ इतके टक्के होता तो ११.४०० टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. अतिरिक्त उत्पादन शुल्काच्या संबंधी महाराष्ट्राचा १९८४-८५ चा हिस्सा १४.२३२ इतके टक्के होता तो ११.४०० टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. आठव्या वित्त आयोगाने कर शुल्कांच्या पोटी राज्यांना देण्यासाठी निश्चित केलेली रक्कम ७व्या वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे केलेली असती तर राज्याला संपूर्ण कालावधीसाठी ५.६३ कोटी जादा रक्कम मिळाली असती. तसेच राज्यांनी केंद्राला भरावयाच्या अल्पबचत कर्जाच्या परतफेडीसाठी विलंबाची पद्धत चालू ठेवली असती तर राज्याला १.५० कोटी रुपये प्रमाणे परत करावे लागले नसते. याचा अर्थ ८व्या वित्त आयोगाने एकूण राज्याची ८.१२ कोटींची कपात केली. एवढी मोठी रक्कम राज्याने आपल्या लाचारी धोरणामुळे केंद्र सरकारकडून गमावली. केवळ केंद्र सरकारशी भांडावयाची आपली हिंमत नाही त्यामुळे केंद्र सरकारने राज्य शासनाचे ७२१ कोटी रुपये लुटले आहेत आणि हे पैसे वापरले कोठे तर उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये वापरले. सासूच्या जिवावर जावई उदार अशी ही आमची अवस्था झाली. इस्टेट महाराष्ट्राची आणि जावई उदार झाला उत्तरप्रदेश आणि बिहारचा. तेव्हा हा जो या राज्याचा पैसा बिहार आणि उत्तरप्रदेशासाठी वापरला आहे ही आपल्या राज्याच्या दृष्टीने अत्यंत केविलवाणी परिस्थिती आहे.

अध्यक्ष महाराज, संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अन्वये मुंबई शहराच्या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याकरिता १ हजार कोटींचे सहाय्यक अनुदान देण्यासंबंधी राज्याने आयोगाला विनंती केली आहे. हात जोडून, दातात गवत घेऊन आम्ही जे बोलतो ते राज्याच्या हिताकरिता बोलतो. मी या अर्थसंकल्पाच्या तुटीच्या प्रांतात शिरत नाही. आपण सादर केलेल्या अर्थसंकल्पात नवीन घोषणा अशी काहीच नाही. यामध्ये नाविन्यपूर्ण असे काहीच नाही. वीजेच्या बाबतीत शेतकऱ्यांना १०० टक्के सवलत दिली, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील लोकवर्गणीची अट काढून टाकली यामध्ये आपण नवीन असे काही केले नाही. जे तुमचे कर्तव्य होते ते उशिरा केले एवढेच. जे लवकर करावयास पाहिजे होते ते उशिरा केले. दूरदर्शनवरचा कर काढून टाकला त्याचे श्रेय नवलकरांना नाही तर त्याचे श्रेय राजीव गांधीना आहे. केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये रेडिओ आणि टी.व्ही. याच्या वरील लायसन्स फी माफ करण्यात आली. तेथे जर लायसन्स फी माफ करण्यात आली तर तुम्ही तरी कर असा काय आकारणार ? म्हणजे यातही काही नवीन नाही. यात पॉलिटीकल लम्बेज आहे. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ; a budget having political sex-appeal is therein so it is not a real budget.

Shri Susheelkumar Shinde : I am not listening to this part of the sentence.

Shri R. S. Gavai : This is related to politics and budget ; I have not spoken on sex ; but here the relation is with politics only. अध्यक्ष महाराज, मी मागच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये बजेट कसे असावे आणि कसे असू नये यासंबंधी काही कसोट्या सांगितलेल्या होत्या. अर्थसंकल्प कसा असावा तर जनता आणि सरकार यांची भागीदारी असली पाहिजे. राज्याचे उत्पादन क्षेत्र, क्षमता वाढवून उत्पादनाचे फेर डिस्ट्रीब्यूशन झाले पाहिजे. राज्याच्या संदर्भात नवीन रोजगार निर्माण करणारा अर्थसंकल्प असावा. अर्थसंकल्पात न्याय वितरण असावे आणि अर्थसंकल्प हा पब्लिक मोरॅलिटीला धरून असावा. बजेटला पोलिटिकल सेन्स असू नये. अध्यक्ष महाराज, त्याचबरोबर या सभागृहाला

काही डाक्युमेंटस् देखील सादर करण्यात यावेत, नॉन प्लॅन आणि भांडवली खर्चाचा तपशील सभागृहाला सादर झाला पाहिजे. हा तपशील देण्याची प्रथा लोकसभेमध्ये देखील रूढ आहे. म्हणून मला पुढच्या परफॉर्मन्स बजेटमध्ये नॉन प्लॅन आणि भांडवली खर्च यांचा तपशील मिळावा.

तसेच भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा अहवाल देखील अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केला पाहिजे. कारण मागच्या अहवालात त्यांनी महाराष्ट्र सरकारवर ताशेरे ओढलेले आहेत. व्यापारी बँकांच्या पतपुरवठ्यापैकी ४ हजार ७२५ कोटी रुपये अजून येणे आहे. हा राज्याचा पैसा आपण वर्षानुवर्षे उपयोगात आणू शकत नाही. त्याची वसुली करू शकत नाही. यामुळे राज्याचा तोटा होत आहे. म्हणून या महालेखापरीक्षकांचा या वर्षीचा अहवाल, त्यांनी तुमच्याकडे काय प्रेमपत्र लिहिले त्याचा तपशील देखील या ठिकाणी आला पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी आहे की, जी प्रकाशने परंपरेने चालू होती ती आता बंद करण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र ८५-८६ हे पुस्तक आम्हाला मिळणे आवश्यक आहे. आऊट लाईन ऑफ ॲक्टिव्हिटीज ऑफ महाराष्ट्र हे पुस्तक आम्हाला मिळणे आवश्यक आहे. Performance Budget of all departments हे पुस्तक देखील आम्हा सन्माननीय सदस्यांना मिळणे आवश्यक आहे. तसेच Schemes which relate to the weaker-sections. कन्सॉलिडेटेड फॉर्ममध्ये ज्या स्कीम असतील त्या पुढच्या बजेटमध्ये येणे आवश्यक आहेत. अध्यक्ष महाराज, हा अर्थसंकल्प गुलाबी आहे असे त्यांनी म्हटल्याचे मी वर्तमानपत्रामध्ये वाचले. गुलाबाच्या फुलांचा अर्थ मा. सुशीलकुमार शिंदे यांना माहिती आहे. वास्तविक पाहता हा अर्थसंकल्प चालू आहे आणि याचे वर्णन करायचे झाले तर वृत्तपत्राने गुलाबाच्या फुलांचे विडंबन, अवमूल्यन केले आहे. यामध्ये सौंदर्य तर नाहीच. मोराच्या पिसाऱ्याचा संभार तर सोडाच परंतु, हरीणाक्षीच्या टपोऱ्या डोळ्यांचे सौंदर्य देखील यामधून दिसत नाही. यामध्ये सौंदर्य नाहीच व विशेष म्हणजे खास सुशीलकुमार टच नसलेला असा हा रूक्ष अर्थसंकल्प आहे एवढेच मला या संदर्भात सांगावयाचे आहे.

❑❑❑

राज्यपालांचे अभिभाषण

(२ एप्रिल, १९८५)

१९८५ च्या राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना श्री. रा. सू. गवई यांनी वैधानिक विकासमंडळ प्रस्ताव व दांडेकर समितीचा अहवाल याची चिरफाड सभागृहात केली होती. २ एप्रिल, १९८५ ला झालेले हे भाषण स्वच्छ प्रशासनाची गरजही अधोरेखित करणारे होते.

अध्यक्ष महाराज, मी वेळेच्या मर्यादेत अत्यंत कमी बोलणार आहे आणि विशेषत: प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने वैधानिक मंडळ निर्माण करण्याचा जो प्रस्ताव या राज्य सरकारने पास केला आणि त्यांची अंमलबजावणी मात्र केली नाही तसेच त्यासंबंधी मिश्र अर्थव्यवस्था व भांडवलदारी रिपोर्ट देणाऱ्या दांडेकर समितीच्या अहवालावर मी माझ्या भाषणामध्ये शस्त्रक्रिया करणार आहे. तत्पूर्वी अध्यक्ष महाराज, माननीय राज्यपाल

महोदयांनी आपल्या भाषणात ज्या बाबींचा परामर्ष घेतलेला आहे. त्यापैकी एका बाबीबद्दल मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. ती बाब म्हणजे "स्वच्छ प्रशासनाचे त्यांनी या राज्याला दिलेले अभिवचन, राज्यपाल बिचारा सज्जन माणूस आहे. त्यामुळेच त्यांच्यावर एक नवीन जबाबदारी आहे आणि सज्जन माणून नेहमी खरे बोलतो. त्यामुळे या राज्यामध्ये यापूर्वी फार भ्रष्टाचार होता ही गोष्ट त्यांनी अप्रत्यक्षरीत्या कबूल केली आहे. एखादी गोष्ट चांगली नाही असे म्हणणे म्हणजेच ती वाईट आहे हे सांगणे. तेव्हा देशाचे नवे पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी एक नवी आर्त हाक देशाला दिली आहे त्या लाईनीमध्ये येऊन आपल्या राज्यात आता स्वच्छ प्रशासन आणले जाणार आहे. असे सांगताना या राज्याची यापूर्वी कधी झाली नव्हती एवढी बदनामी त्यांनी केलेली आहे. परंतु यामुळे आता तरी उघडपणे मंत्रालयामध्ये भ्रष्टाचाराचे जे दुकान वसले आहे ते माननीय वसंतदादांच्या सबळ नेतृत्वाखाली पुढील काळात बंद होईल अशी आशा मी व्यक्त करतो. माननीय नामदार मुख्यमंत्र्यांनी आपल्या मंत्रिमंडळात चांगली मुरब्बी मंडळी घेतली आहेत. ज्याप्रमाणे लोणचे जेवढे जास्त मुरले असेल तेवढे चांगले त्याप्रमाणे त्यांनी मुरब्बी मंडळी घेतली आहेत. या अगोदर त्यांचे भाव ठरले होते म्हणजे पाटबंधारे म्हणजे अमुक रेट ठरला होता. कंट्री लिकर लायसेन्ससाठी १० हजार, फॉरिन लिकर लायसेन्ससाठी २५ हजार अशा प्रकारे दर ठरले होते, ज्याप्रमाणे बाजारात साबण आदी वस्तूंचे भाव ठरलेले असतात त्याप्रमाणे मंत्रालयात भाव ठरलेले होते. ती प्रथा या नव्या जुन्यांच्या मंत्रिमंडळामुळे बंद होईल असे वाटते. कारण या नव्या चेहऱ्यामोहऱ्यांमध्ये तसा काही वास येत नाही. त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणात स्वच्छ प्रशासनाचे जे अभिवचन दिले आहे ते पूर्ण होईल असे म्हणायला हरकत नाही. अध्यक्ष महाराज, मागील वेळेस मी काही प्रमाणात वैयक्तिक असे बोललो होतो पण त्यावेळी उप मुख्यमंत्री श्री. रामरावजी आदिक हे होते. त्यांनी त्यावेळेला सांगितले होते की, मला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची शान वाढवावयाची आहे. त्यांचा बंगला मोठा असावा, त्यांची इज्जत मोठी असावी. परंतु काही गोष्टी बोलल्या जातात त्याबद्दल नामोल्लेख न करता मी नामदार वसंतरावदादांचे अभिनंदन करतो. त्यांनी कोठलीही भीडमुर्वत न ठेवता " बी-४ " हा बंगला खाली करून घेतला आहे. त्याबद्दल त्यांचे खरोखरी अभिनंदन करावयास हवे.

दुर्बल घटकांचे संरक्षण हे सरकार करील असे त्यांनी म्हटले आहे. नामदार मुख्यमंत्री आता सभागृहामध्ये आहेत. या दुर्बल घटकांसाठी असलेली विशेष घटक योजना आहे तिचा १९८० ते १९८५ पर्यंतचा जो खर्च देण्यात आला आहे त्यामध्ये एकंदर निर्धारित १६१ कोटी २५ लाख आहेत आणि त्यापैकी रु. १३७.४६ इतका खर्च झाला आहे. याचा अर्थ या विशेष घटक योजनेखाली निर्धारित केलेला पैसा खर्च न होणे म्हणजेच या विकर सेक्शनबद्दल आपल्या मनात असलेल्या आकसाचे प्रतिबिंब आहे. याचा उतारा माननीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्येही आलेला आहे. तेव्हा या विशेष घटक योजनेमध्ये या दुर्बल घटकांसाठी जे पैसे निर्धारित केलेले आहेत ते पुढील पंचवार्षिक योजनेत खर्च होतील याची दक्षता माननीय मुख्यमंत्री आपल्या पुढील कारभारात घेतील अशी मी या निमित्ताने अपेक्षा करतो. अध्यक्ष महाराज, यानंतर मी मघाशी म्हटल्याप्रमाणे काही महत्त्वाच्या प्रश्नांना मी फक्त टच करतो. मुंबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न हा पार्टली सुटला असला तरी तो अद्याप अपूर्ण आहे, तो पूर्ण सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने पाऊल टाकले पाहिजे. त्याचप्रमाणे श्री. बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असताना नकली पिस्तुलाने गोळी मारण्याचा प्रयत्न केल्यावरून ज्या पोलिसांना अकारण सफर व्हावे लागले आहे. त्यांच्याबाबतीतही सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा अशी

माझी या निमित्ताने मागणी आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मंडल आयोगाबाबत आमचे मित्र श्री. भाई बंदरकर यांनी उल्लेख केलेला आहे. या संबंधात सुप्रीम कोर्टाने जजमेंट दिलेले आहे आणि त्याबाबत महाराष्ट्र शासन तपासणी करून घेत आहे. मंडल आयोगाच्या सर्वच शिफारशी तंतोतंत पाळल्या पाहिजेत असे जरी नसेल तरी मंडल आयोगास जे अभिप्रेत आहे. ते सर्व त्यांनी कव्हर केले आहे आणि जवळ जवळ ते मान्य केले आहे. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी या संबंधीचा विचार करून दुर्बल घटकांना व इतरांना ज्यांचे निकष सुप्रीम कोर्टाने आपल्या जजमेंटमध्ये ठरवून दिले आहेत त्याचे पालन करून जर हा प्रश्न सोडविता आला तर अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. त्यानंतर अध्यक्ष महाराज, आपल्या मध्यस्थीने माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी पुनश्च घोषणा केली आहे की, खालच्या सभागृहात जरी काही घडले असले तरी वरच्या सभागृहाने एकमताने पाठिंबा दिला आहे. कारण शेवटी गव्हर्नमेंट हॅज टू रुल सरकारला राज्य केलेच पाहिजे. उद्या या ठिकाणी गवईचे राज्य चालणार नाही तर वसंतदादाच राज्य करणार आहेत. तेव्हा अपोझिशन हॅज टु से ॲण्ड गव्हर्नमेंट हॅज टू रुल राज्य करण्याचा आपला अधिकार आहे. आम्ही कितीही विरोध केला तरी या ठिकाणी राज्य करण्याचा नैतिक अधिकार सत्तारूढ पक्षाचा आहे आणि तो त्याने बजाविला पाहिजे. ठोस पाऊल टाकण्याची गरज आहे. वेळप्रसंगी आमचीही पर्वा न करता पुढे जाऊन हा प्रश्न अधिक नेटाने पुढे रेटावा असे माझे मत आहे. याचे कारण असे आहे की, आता सीमा तंटा जो आहे तो आता सुटण्याच्या मार्गावर आला आहे आणि महाराष्ट्र व कर्नाटक हे जणू काही दोन भिन्न भिन्न देश आहेत असे चित्र या सीमा वादामुळे निर्माण होत आहे ते होता कामा नये. तेव्हा या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी कोणाचीही पर्वा न करता प्रश्न तडजोडीने सोडवित असताना देवाणघेवाणीच्या तपशिलात चर्चा करून जर काही मार्ग काढता आला तर काढावा. केवळ तत्त्वाला चिटकून राहून नाक कापले तरी नथीसाठी अजून शिल्लक आहे म्हणून भांडावयाचे तेव्हा आता हे भांडण मिटवून हा प्रश्न सामंजस्याने सुटेल अशा प्रकारची भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेऊन प्रश्न सोडवावा. आम्ही त्यांच्या पाठीशी राहू. मी मागच्या वर्षीच्या राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी चर्चा करताना सांगितले होते की, जनप्रतिनिधींचा जो पत्रव्यवहार आहे त्याला मुख्यमंत्री उत्तर देतात अशी तारीफ मी त्यांच्या गैरहजेरीत त्यावेळी केली होती. कारण जनप्रतिनिधी हा लाखो लोकांचा प्रतिनिधी असतो. खासदाराने, आमदाराने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले तर त्यांचे उत्तर तीन दिवसांत येते. परंतु या राज्य सरकारामध्ये ही अडचण आहे की, जनप्रतिनिधीने मंत्र्यांना किंवा अधिकाऱ्यांना पत्रे लिहिली तरी त्याचे उत्तर मंत्र्यांचे पी.ए. पाठवितात. अध्यक्ष महाराज, आपण चेअरमन पण आपल्याला उत्तर पी.ए. पाठविणार, तेव्हा या जनप्रतिनिधीकडून येणाऱ्या पत्राबाबत आपण आपल्या मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना खास सूचना द्याव्यात की, जनप्रतिनिधींचे पत्र आले की, त्याची ॲकनॉलेजमेंट त्यांच्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी द्यावी परंतु त्याच्यावर काय कारवाई केली याचे उत्तर मंत्र्यांकडे मागण्याचा आमचा हक्क आहे. परंतु खासदारांच्या वा आमदारांच्या पत्राबाबत दे नेव्हर बॉदर. डझनवारी मंत्री आहेत पण उत्तर देण्याची दखल घेत नाहीत. याचा अर्थ जनप्रतिनिधींची ही बेइज्जत आहे. म्हणून अध्यक्ष महाराज, आता मुख्यमंत्री सदनात आहेत तेव्हा त्यांच्याकडून या बाबतच्या प्रश्नाच्या उत्तराची मला अपेक्षा आहे. अध्यक्ष महाराज, विशेषत: प्रिसायडींग ऑफिसरबाबत दे आर नॉट बॉदर ऑफ दि ॲडमिनिस्ट्रेशन; परंतु त्याच्या पत्राची किमतदेखील आमदाराच्या पत्रासारखीच केली जाते. तेव्हा या प्रश्नाची जाणीव मुख्यमंत्र्यांनी ठेवावी एवढाच उल्लेख करतो आणि मग राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख केलेली जी कामे आहेत व जी अपुरी राहिलेली आहेत त्याची यादी सांगतो.

(१) संगमेश्वर येथील चिपळूण पर्यायी मार्ग, (२) नैसर्गिक वायूचे वितरण, (३) इलेक्ट्रिक स्वीचींगचा औरंगाबाद येथे व्हावयाचा कारखाना, (४) विदर्भात व्हावयाचा रेल्वेच्या डब्याचा कारखाना, (५) नागपूर-यवतमाळ, चंद्रपूर येथे व्हावयाच्या कोळशाच्या खाणी आणि घोटीव तांब्याच्या तारांचा विदर्भात होणारा प्रकल्प यासंबंधी काय प्रगती झाली याची माहिती मुख्यमंत्री आपल्या भाषणात देतील. यानंतर अध्यक्ष महाराज, माझ्या भाषणातील शेवटचा मुद्दा जो राज्यातील प्रादेशिक असमतोल हा आहे तो आणि त्यासंबंधीचा डोंगर पोखरून जो उंदीर काढला त्या दांडेकर नावाच्या माणसाने संमिश्र अर्थव्यवस्थेच्या नावाखाली भांडवलशाहीचा कल देऊन जो रिपोर्ट सादर केला आहे तो स्वीकारला गेला तर या राज्यातील असमतोल कधीच दूर होणार नाही. आणि मग एक दिवस असा येईल की, ब्लॉस्ट होईल. जसा आता प्रदुषणाने मुंबईचा झाला आहे. राज्यकर्त्यांची झोप केव्हा उडेल तर मुंबईचा जेव्हा भोपाळ होईल तेव्हा म्हणजे भोपाळ होईपर्यंत वाट पाहणार ! काल घडले आणि आजही घडले. तीच गोष्ट राज्याच्या असंतुलनाची आहे. राज्याचे असंतुलन वाढत गेले तर एक प्रकारचा ब्लॉस्ट होईल. त्याची पार्श्वभूमी सांगतो. अध्यक्ष महाराज, या समितीने रस्ते आणि पाटबंधारे ही दोन खाती सोडून ३,१८७ कोटी रुपयांचा अनुशेष घोषित केला आहे. पण इथेच तर सारी ग्यानबाची मेख आहे. माझे म्हणणे असे आहे की, प्रि-प्लॅनिंग म्हणजे नियोजन ज्यावेळी आपल्या राज्यात नव्हते तोपर्यंत स्टेट सेक्टरमधून आपल्या लहरीप्रमाणे पैसे वापरले गेले आहेत. मग ते जर बंद करावयाचे असेल तर रस्ते आणि पाटबंधारे यांमधील रिजनल इम्बॅलन्स किंवा बॅकलॉग जो आहे तो दूर करण्यासाठी आपण डीपीडीसीमधून पैसे खर्च न करता स्टेट फंडातून ते पैसे खर्च करावेत आणि तसा विचार केला तरच त्याच्यामध्ये काही अर्थ आहे. अदरवाईज मग काय होईल तर पाटबंधारे आणि रस्ते याचा बॅकलॉग सोडून होणारे लहान प्रकल्प जर डीपीडीसीच्या बोकांडी बसवून करावयाचे ठरविले तर डीपीडीसीला ते जमणार नाही. हा बॅकलॉग कसा भरून काढावा याबाबत दांडेकर अहवालात काही मार्गदर्शन नाही. दांडेकर समितीने या प्रश्नाबाबत बगल दिलेली आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला याबाबत असे सांगेन की, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी आपण जे नेतृत्व केले होते ते आंदोलन कसे चालविले याची आपल्याला कल्पना आहे. परंतु त्यावेळी द्विभाषिकात एकूण २६० नवीन आमदार होते. त्यापैकी २०२ आमदार मोरारजीभाई देसाई यांच्याबरोबर होते व ८८ आमदार भाऊसाहेब हिरे यांच्या बाजूचे होते. नंतर द्विभाषिक राबविले आणि मग जे जे प्रकार केले त्यातून महाराष्ट्राचे आंदोलन झाले आणि १९६० सालात संयुक्त महाराष्ट्र झाला परंतु मोरारजीभाई देसाईचे राजकीय उद्दिष्ट हे होते की, उत्तर प्रदेशाच्या तोडीचे द्विभाषिक राज्य मोठे करावयाचे आणि मग उत्तर प्रदेशानंतर प्राइम मिनिस्टर पदाचा हक्क द्विभाषिकाचा राहील अशा प्रकारची खेळी मोरारजीभाई खेळले. परंतु त्यावेळी द्विभाषिकामध्ये पर कॅपिटा जो खर्च व्हावयाचा त्याचा हिशेब काढला तर महाराष्ट्राच्या पॉप्युलेशनवर १.८ आणि गुजराथच्या पॉप्युलेशनवर ३.२ टक्के खर्च व्हावयाचा म्हणजे महाराष्ट्राची पॉप्युलेशन तिप्पट आणि गुजराथची कमी. म्हणजे बॅकलॉगचे तत्त्व असे की, ज्याच्या हाती शिकार ज्याच्या हाती ससा तो पारधी मोरारजी देसाई यांच्या हाती शिकार होती तेव्हा त्यांनी संपूर्ण पैसा तिकडे वापरला.

उपसभापती : ज्याच्या हाती शिकार तो पारधी जे काही असेल ते आणि आज. अध्यक्ष महाराज, पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेल्या काही पंचवार्षिक योजनामध्ये सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून साखर कारखाने झाले आहेत. एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात जेवढा खर्च पाच वर्षांत झाला त्याच्या अर्धे पैसे ही संपूर्ण मराठवाड्यात खर्च झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रात २३ पटीने

खर्च वाढलेला आहे. अध्यक्ष महाराज, १९६२ मध्ये आपल्या राज्याचा ॲन्युअल प्लॅन १०९.२० कोटी रुपयाचा होता पण आज आपला ॲन्युअल प्लॅन २,५१९ कोटी रुपयांचा आहे. तेव्हा अध्यक्ष महाराज, एवढा खर्च वाढत असताना इम्बॅलन्स पण त्याच प्रमाणात ॲक्युमुलेट होत चालला आहे. आणि हा इम्बॅलन्स दूर करीत असताना ३७१(ए) कलमाचा अर्थ योग्य प्रकारे लावून व बॅकवर्ड एरिया लक्षात घेऊन अहवाल लिहिला असला तरी बॅकवर्ड एरियातील माणूस त्यांनी लक्षात घेतला नाही. दांडेकरला तेथील माणूस दिसत नाही. ॲग्रोइकॉनॉमी दिसत नाही. लॅण्डलेस लेबर दिसत नाही. स्मॉल लॅण्ड होल्डर दिसत नाही. त्यांना फक्त बॅकवर्ड एरिया दिसला. आणि म्हणून दांडेकर यांनी भांडवलशाहीच्या कलाने आपला अहवाल लिहिला आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला सांगतो की, एकंदर ५७.६ लाख लॅण्ड होल्डर आहेत त्यापैकी २६ टक्के लॅण्ड होल्डर दोन ते अडीच एकरवाले आहेत, दोन ते पाच एकरवाले २० टक्के आहेत आणि जवळजवळ २५ एकराच्यावर जमीन आहे असे केवळ सात टक्के आहेत. परंतु अध्यक्ष महाराज, या राज्यात फक्त सात टक्के लोकांचे लाड पोसले जातात. स्मॉलहोल्डरचे नाही. साधे कर्ज सात टक्के लोकांना मिळते. हा इम्बॅलन्स दांडेकर यांना कसा दिसणार ? दुसरी गोष्ट अध्यक्ष महाराज, १९६१ साली आपल्या राज्यात ४७ लाख शेतमजूर शेतकरी होते आज त्याची संख्या ६५ लाख झालेली आहे. दांडेकरांनी फक्त इम्बॅलन्स लक्षात घेतला पण माणूस लक्षात घेतला नाही. त्यानंतर अध्यक्ष महाराज, १९६४ साली एक मजूर वर्षातून २९२ दिवस काम करीत होता पण आता तो २७६ दिवसच मजुरीवर आला आहे. त्याचे ॲव्हरेज सोळा वर्किंग डेज कमी झाले आहेत. अध्यक्ष महाराज, दांडेकरांनी प्रायव्हेट सेक्टर आणि व्यापारी यांचा अजिबात विचार केला नाही. एमआयडीसी, सिकॉम, एमएसएफसी या सर्व एजन्सीमार्फत मुंबई, ठाणे आणि पुणे या ठिकाणी उद्योगाचे एकत्रीकरण झाले आहे. येथे सर्व उद्योगधंदे ॲक्युमलेट झाले आहेत. जवळजवळ ७५ टक्के खर्च हा अर्बन पॉप्युलेशनवर होत असून संपूर्ण महाराष्ट्रावर केवळ २५ टक्के खर्च या औद्योगिक संस्थांकडून केला जात आहे. तेव्हा दांडेकरांना केवळ बॅकवर्ड एरिया दिसला परंतु बॅकवर्ड माणसे दिसली नाहीत. मोठे शेतकरी दिसले नाहीत, इंडस्ट्रियल झोन दिसले नाहीत, तर मग या राज्यातील बॅकलॉग दूर होणार कसा ? संपूर्ण महाराष्ट्रात ३७.९९ टक्के इतकी सिंचनाची क्षमता आहे. परंतु एकट्या सांगली जिल्ह्यात वसंतदादा, मुख्यमंत्री येथे बसलेत तर त्यांच्या जिल्ह्यात ७०.३६ टक्के सिंचनक्षमता आहे. विदर्भात ही सिंचनक्षमता ९.७६ टक्के आहे. मग इरिगेशनमधील हा बॅकलॉग दूर करावयाचा असेल तर स्टेट सेक्टरमधून फंड आल्याशिवाय तो कसा दूर होणार त्यानंतर एकंदर पीकाच्या कर्जापोटी जवळ जवळ ५४.२४ टक्के कर्ज दिले असता विदर्भात ते किती मिळाले तर केवळ २० टक्के आणि मराठवाड्यात १८ टक्के मिळाले आहे. ॲग्रो इंडस्ट्रीजचा विचार करता जवळ जवळ ६७ ऊस कारखाने महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी २० पश्चिम महाराष्ट्रात, १५ मराठवाड्यात आणि दोन फक्त विदर्भात आहेत. स्पिनींग मिलबाबत देखील सांगावयाचे झाले तर एकूण स्पिनींग मिल्स २२ आहेत त्याच्यापैकी १३ पश्चिम महाराष्ट्रात, तीन मराठवाड्यात व पाच विदर्भात आहेत. त्यानंतर अध्यक्ष महाराज, १९८० व ८१ मध्ये राज्यामध्ये कापसाचे उत्पादन किती झाले ते सांगतो. अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रामध्ये एकूण ८९,८३६ क्विंटल कापसाचे उत्पादन झाले. मराठवाड्यात १९,७६,९२४ आणि विदर्भात ४९, ०८,६१६ क्विंटल कापसाचे उत्पादन झाले. अध्यक्ष महाराज, ज्या विभागात कापसाचे पीक जास्त येते त्याच विभागात प्रत्यक्षात या स्पिनींग मिल्स कमी आहेत आणि ज्या ठिकाणी अगदीच कमी कापूस पिकता त्या विभागात मात्र या स्पिनींग मिल्स जास्त आहेत. अध्यक्ष

महाराज दांडेकर यांनी बॅकलॉगचा विचार करीत असताना माणसाचा, पैशांचा, कॉमर्स इंडस्ट्रीजचा विचार केला नाही. त्यांनी निराळाच विचार केला आहे. यावरून दांडेकर यांना भांडवलदारांनी गुंडाळले आहे असे दिसून येते. त्यांच्या रिपोर्टप्रमाणे जर आपण कृती करावयाला लागलो तर महाराष्ट्रातील हा बॅकलॉग कदापि दूर होणार नाही. अध्यक्ष महाराज ३१ मार्च १९८३ पर्यंत आपली इन्व्हेस्टमेंट १,८०० कोटी रुपयांची आहे. यामध्ये ८२.८५ टक्के मुंबईची आहे. अध्यक्ष महाराज मुंबईतील मराठी भाषिकांची संख्या ही ५६ वरून आता २६ टक्क्यांवर आली आहे. अध्यक्ष महाराज आपला महाराष्ट्र काही दगड धोंड्यांनी भरलेला नाही. या महाराष्ट्रात आज गरीब माणसे राहत आहेत. आणि असा हा गरीब माणूस, स्मॉल होल्डर दांडेकरांना दिसलेला नाही. म्हणून या समितीचा मी या ठिकाणी निषेध करीत आहे. अशाप्रकारे आपण कृती केली तर आपला इम्बॅलन्स कदापि दूर होणार नाही. यासाठी शास्त्रशुद्ध रीतीने याबाबतीत उपाययोजना करावी लागणार आहे. यासाठी वेगळी पद्धत अवलंबवावी लागणार आहे. तरी त्या दृष्टीने विचार करावा एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

❑❑❑

पाठपुरावा करावा तो दादासाहेबांनीच!

(अर्थसंकल्पावर चर्चा, ३ जुलै, १९८५)

एखादा विषय सभागृहात मांडायचा आणि तेथेच तो सोडून द्यायचा हे दादासाहेबांच्या स्वभावातच नव्हते. उलट आपण कोणता विषय केव्हा आणि कोणत्या निमित्ताने मांडला व त्यांच्या अंमलबजावणीबाबत सद्यःस्थिती काय आहे हे जाणून घेऊनच तो विषय पुढे नेत असत. ही त्यांची अपेक्षा जेव्हा पूर्ण होत नसे तेव्हा ते उद्‌विग्नही होत असत आणि आपली ती भावना लपविणे त्यांना शक्य होत नसे. १९८५-८६ या वर्षांच्या अर्थसंकल्पावर भाष्य करतांना तसेच घडले.

अध्यक्ष महोदय, चालू वर्षांच्या अर्थसंकल्पावर भाषण करण्यास मी तर उत्सुक नव्हतो. त्याचे कारण स्पष्ट आहे की, गेल्या दोन-तीन अर्थसंकल्पांवर भाषण करीत असतांना मी सातत्याने सूचना करीत होतो परंतु दुर्देवाने त्या सूचनांची अंमलबजावणी झालेली नाही. मग अंदाजपत्रकावर बोलत असतांना किंवा त्यासंबंधी प्रतिक्रिया व्यक्त करीत असतांना नेहमीच येतो पावसाळा याप्रमाणे नेहमीच येणारे हे रुटिन बजेट आहे अशाप्रकारे प्रतिक्रिया व्यक्त करावीसी वाटते. खरे म्हणजे सन्माननीय अर्थमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे हे सुंदर आहेत. स्वरूपवान आहेत. सुशील आहेत. नेहमी मांडल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पापेक्षा वेगळा अर्थसंकल्प एक मिनिंगफूल अर्थसंकल्प त्यांनी या ठिकाणी मांडण्याची आवश्यकता होती. मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यावेळी उत्तर देत असतांना संपूर्ण डॉक्युमेन्ट सभागृहासमोर ठेवण्यात येईल असे अभिवचन त्यांनी दिले होते परंतु आउट लाईन ऑफ ॲक्टिव्हीटी ऑफ महाराष्ट्र हे प्रकाशन मला मिळालेले नाही. शेड्युल कास्ट आणि शेड्युल ट्राईब्ज यांच्याकरिता

कॉप्रिहेन्सिव स्कीम्स् काय आहेत आणि त्यांच्याकरता अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद करण्यात आलेली आहे याबद्दल देखील मला माहिती मिळालेली नाही. त्याबाबतचे प्रकाशन मला आजपर्यंत उपलब्ध करून दिलेले नाही. भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यांनी शासनाच्या व्यवहाराबाबत वेळोवेळी आरोप केले आहेत. शासनाला गंभीर दखल घेण्याबाबत त्यांनी वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत त्यासंबंधीचा रिपोर्ट आमच्यापुढे ठेवण्याचे सौजन्य दाखविण्यात आलेले नाही. अशी प्रथा पार्लमेन्टमध्ये आहे. तशी प्रथा त्या ठिकाणी असल्याने पार्लमेन्टमध्ये हा रिपोर्ट ठेवण्यात येतो. ती प्रथा या ठिकाणी आणावयाची असेल तर ते अधिक चांगले होईल. त्याबाबतची माहिती देऊन अर्थसंकल्प मिनिंगफूल करता येईल दुर्दैवाने या गोष्टीचा उल्लेख बजेटमध्ये काही करण्यात आलेला नाही.

अध्यक्ष महाराज, याबाबत मी मागे बोललो होतो आणि आता पुन्हा एकदा त्याचा उल्लेख करू इच्छितो की, बजेटसंबंधी प्रतिक्रिया व्यक्त करावयाची झाली तर नुसता ॲन्युअल प्लॅन जो १,७०० कोटी रुपयांचा होता तो १,५०० कोटींपर्यंत कापून खाली आणला आहे.

It is nothing but a presentation of the annual accounts of the Annual Plan यापेक्षा या अर्थसंकल्पाचा अर्थ राहिलेला आहे असे नाही. अलीकडे डेफिसिट बजेट यासंबंधीची फॅशन झाली आहे. अर्थात या जमेच्या बाजूमधील भांडवली जमा आहे आणि नॉन प्लॅन जो आहे त्याची बेरीज केल्यानंतर असे दिसून येईल की अशा प्रवृत्तीने भांडवली खर्चाचा लाभ राज्यातील श्रीमंत लोकांना मिळाला आहे. नॉन प्लॅन खर्च आणि भांडवली इनव्हेस्टमेन्ट यांचे डॉक्युमेन्ट १,७०० कोटी रुपयांचे आहे. ॲन्युअल प्लॅनवर चर्चा करण्याऐवजी संपूर्ण अर्थसंकल्पामध्ये हजारो कोटी रुपये इनव्हाल्व्ह झालेले आहेत त्याचा उल्लेख अर्थसंकल्पात नसेल तर आम्ही नुसते ॲन्युअल प्लॅनवर डिसकस करतो एवढ्या पुरताच त्याचा अर्थ सीमित होईल. मी अनेक वेळा हे सांगितले आहे आणि आता देखील पुन्हा एकदा सांगू इच्छितो की बजेट संबंधीच्या काही क्रायटेरिया आहेत. त्या क्रायटेरिया पुढीलप्रमाणे आहेत.

The budget should create new jobs and enlarge productivity. The Budget should regulate reasonable distribution of the income.

अध्यक्ष महाराज, मी आता बजेटच्या पुस्तकातील सगळी पाने तपासली. या बजेटमुळे नवीन जॉब किती निर्माण होणार आहेत याबाबतचा उल्लेख मला कोठेही आढळून आलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या २३ लाखांपर्यंत गेलेली आहे. ही संख्या कमी करण्याच्या दृष्टीने कोणते जॉब क्रिएट केलेले आहेत. याबाबतची माहिती देण्यात आलेली नाही. व्यवहारी वितरण तळागाळातील लोकांकडे जाण्याच्या दृष्टीने आणि त्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न केले आहेत. त्याची आकडेवारी देण्यात आली आहे. त्याबाबत मी नंतर बोलणार आहे. तळागाळातील लोकांचे उत्पन वाढविण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करण्यात आले, याबाबत माहिती देण्यात आली नाही. वर्गीकृत व्यापारी बँकेच्या पुरवठ्यापैकी येथे रक्कम किती आहे आणि राज्यातील कंपन्यांची हमी घेतलेल्या रकमेपैकी परतफेड न झालेली रक्कम माझ्या माहितीप्रमाणे कोट्यवधी रुपयांची आहे. त्याबाबत जर उद्दिष्टपूर्ती झाली असती तर शासनाला या ठिकाणी डेफिसिट बजेट आणण्याची गरज वाटली नसती. या दोन्ही बाबींची जर बेरीज केली तर ती ३० ते ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल. आपले बजेट हे फक्त २०० कोटी रुपये डेफिसिटचे आहे. परंतु असे तुटीचे बजेट आणण्याचीसुद्धा गरज राहणार नाही. यासंबंधी काय प्रयत्न करण्यात आले त्याची माहिती देण्यात आली नाही. कंपनी ॲक्टप्रमाणे कंपनी ॲक्टखाली रजिस्टर्ड झालेल्या ज्या

संस्था आहेत त्या संस्था नसून केवळ संस्थान आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून कोट्यवधी रुपयांच्या तोट्यात या संस्था चालू आहेत. त्यांची नावे मी या ठिकाणी वाचून दाखवतो. महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ, मराठवाडा विकास महामंडळ, गोदावरी गारमेन्टस्, विदर्भ विकास महामंडळ, मत्स्योद्योग विकास महामंडळ, किनवट शफिग टाईल्स, परभणी कृषी गो संवर्धन मंडळ, मराठवाडा वस्त्रोद्योग मंडळ, अजिंठा फॉर्म्युसिटीकल, विदर्भ क्वालिटी सीडस्, कोकण क्रिस्टल सॉल्ट अँड मरीन मंडळ, महाराष्ट्र पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण दुग्धविकास महामंडळ, मराठवाडा चर्मोद्योग मंडळ, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, कोकण दुग्ध विकास महामंडळ या ज्या संस्था आहेत त्या कंपन्याचा संचित तोटा कित्येक हजार कोटी रुपयांचा आहे. जर या पूर्वीच्या प्लॅनच्या उद्दिष्टाप्रमाणे हजारो कोटी रुपये भरावयाचे असतील तर ते उद्दिष्ट काही पूर्ण झालेले नाही. हे बजेट डेफिसिट नाही याचे कारण सांगतांना माननीय मंत्रिमहोदय आता मी केलेले आरोप बरोबर नाहीत हे सांगतील काय ? या संस्था तोट्यात चालत नसून आता त्या संस्था नफ्यात चालत आहेत असे माननीय मंत्रिमहोदय आम्हाला सांगतील काय ? या संस्था वर्षानुवर्षे तोट्यात चालत आहेत आणि त्या संस्थांना पोसले जात आहे. अशाप्रकारे या संस्था जर तोट्यात चालत असतील तर या ठिकाणी जबरीने डेफिसिट बजेट आणण्याची गरज काय आहे ? वर्गीकृत व्यापारी बँकेच्या ठेवींची विभागणी ग्रामीण भागात फक्त चार टक्के करण्यात आलेली आहे आणि शहरी विभागांमध्ये मात्र ७१ टक्के पतपुरवठा करण्यात आलेला आहे.

पतपुरवठा करीत असतांनासुद्धा डिस्पॉरिटी आहे. इन्कम डिस्ट्रिब्युट करीत असतांना ते इन्कम मुंबईमध्ये कॉन्सेन्ट्रेट करून चालणार नाही. अर्थसंकल्पामध्ये मात्र याबाबतचा काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे मागून आले आणि पुढे चालले असे अर्थसंकल्पाबाबत म्हणावे लागते. बजेटचे पुस्तक तयार आहे. टेबल तयार आहे फक्त शब्द आणि आकडेवारी फिरवावयाची त्यापेक्षा नवीन दृष्टी या बजेटमध्ये नाही. नवीन दृष्टीने हे बजेट केलेले आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे या संपूर्ण कंपन्या हजारो कोटी रुपयांच्या तोट्यात चालल्या आहेत. त्याच्याबद्दल एक अर्थशास्त्रज्ञ असे म्हणतो की,

"There can be no investment without profit". so, if at all you want to invest the money, the profits are supposed to be there. म्हणजे कोट्यवधी रुपये या ठिकाणी इन्व्हेस्टमेंट करून त्यामधून काही फलनिष्पत्ती होणार नसेल, त्यातून काही नफा होणार नसेल तर वर्षानुवर्षे तोट्यामध्ये या संस्था चालविण्यासाठी तुम्हाला कोणी सांगितले आहे ? तोट्यामध्ये धंदा करावयाचा आणि आमच्यासमोर डेफिसिंट बजेट घेऊन येण्यास तुम्हाला कोणी सांगितले आहे ? याबाबतचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देणार आहेत किंवा नाही ? या अर्थसंकल्पात जे उत्पन्न दाखवलेले आहे ते फसवे आहे. अर्थमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी जी आकडेवारी दिली आहे ती फसवी आहे. ते आमचे मित्र आहेत, दिसायला सुंदर आहेत ही गोष्ट खरी आहे. तुम्ही राज्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने एकंदर उत्पादनक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने काही विचार केला आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला अद्याप तरी मिळाले आहे काय ? यामध्ये मराठवाडा, विदर्भ असा काही प्रश्न नाही. पण आपले पेट्रोल, रासायनिक उद्योग, मुंबई शहरातील गॅस आदींचे जे प्रश्न आहेत, म्हणजे मुंबईतील गॅस आजूबाजूच्या क्षेत्रात नेणे आणि त्या त्या क्षेत्राची उत्पादन क्षमता वाढविणे, त्या त्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या माणसाचे इन्कम वाढविणे यासाठी आपण काही केले आहे काय ? का केले नाही ? अध्यक्ष महाराज, काल-परवा या ठिकाणी चर्चेमध्ये भाग घेताना आपल्या राज्याचे भूतपूर्व उपमुख्यमंत्री श्री. रामरावजी आदिक यांनी म्हटले की हा प्रश्न ॲसर्शन करण्याचा आहे.

एचबी ११८०—२६

अध्यक्ष महाराज, यामध्ये प्रश्न असा आहे की, मुंबईचा गॅस जर आपण गुजरातला देता एवढेच नव्हे तर व्हाया गुजरात मध्य प्रदेशाला देता हे कशासाठी ? अर्थात यामध्ये कोठे काही देण्याचा वा खर्चाचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो नियतचा. जर दांडेकर समितीने या राज्यामध्ये बॅकलॉग घोषित केला आहे तर आपल्या राज्य सरकारने हा बॅकलॉग भरून काढण्यासाठी ज्या योजना तयार केल्या त्याकरिता २०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पण बॅकलॉग हा केवळ पैशांचा असतो असे नाही तर तो कमर्शिअल, इंडस्ट्रियल आणि इन्व्हेस्टमेंट या बाबतीतीलसुद्धा असतो. या बाकीच्या बॅकलॉगचे आपण काय केले ? आपल्या बॅकलॉगमध्ये इरिगेशन नाही. बी. ॲण्ड सी. नाही. हे सारे सोडले तरी इकॉनॉमिकल स्ट्रक्चर्स घडवून, आणणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्या बॅकलॉगचा सुद्धा आपण विचार केलेला नाही. अध्यक्ष महाराज, ज्या रितीने आपण मुंबईचा गॅस गुजरातला देता, मध्य प्रदेशला देता तर कमीत कमी महाराष्ट्रातील कोकण भागात, मराठवाडा आणि विदर्भासाठी त्यातून काही भाग, जास्तीत जास्त भाग मिळविण्यासाठी केंद्र, सरकारशी भांडून, हा गॅस आणून त्या भागांची उत्पादन क्षमता वाढविण्याची, या राज्यातील माणसांची उत्पन्न रेषा वाढावी यासाठी प्रयत्न करण्याची तरी आपल्या शासनाची हिंमत आहे काय ? या साठी आपल्याला केंद्र सरकारशी भांडण केले पाहिजे, त्याशिवाय या गोष्टी आपल्याला मिळणार नाहीत. अध्यक्ष महाराज, आपले राज्य हे एवढे बेनिफिशियल स्टेट आहे, की एका वर्षामध्ये एकट्या मुंबई शहरातील रेव्हेन्यू म्हणून केंद्र सरकारला आपण ४२ हजार कोटी रुपये देतो. म्हणजे ४२ हजार कोटी रुपयांचे केंद्र सरकारला उत्पन्न देणारे असे हे मुंबई शहर असताना केंद्र सरकारने या शहरासाठी दिलेले केवळ ५० कोटी रुपये पाहून आपण खूश झालो म्हणजे चोराच्या लंगोटीवर खूश होण्याचाच हा प्रकार आहे. वर म्हणतात कसे की, ३५ वर्षात जे झाले नाही, आजवर कधी कोणी केले नाही, कधी शक्य नाही ते आम्ही केले, मोठा पराक्रम केला आणि मुंबईसाठी केंद्र सरकारकडून आम्ही ५० कोटी घेऊन आलो. अध्यक्ष महाराज, हा कसला पराक्रम ? जर दिल्ली कॅपिटलवर १,३०० कोटी रुपये खर्च होतो, हा प्रश्न काही कॉन्स्टिट्यूशनल आस्पेक्टचा नाही. शहरा-शहरामध्ये आणि माणसां-माणसांमध्ये फरक करणारा नाही. पण मुंबई शहराचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेता आणि या मुंबई शहरातून केंद्र सरकारला जाणारा रेव्हेन्यू लक्षात घेता दिल्लीसाठी खर्च होणारे १,३०० कोटी रुपये कोठे आणि मुंबईसाठी देण्यात आलेले ५० कोटी रुपये कोठे ? याचा आपण विचार करावयास पाहिजे. तरीही आपण म्हणता की, ३५ वर्षात कधी झाले नाही असा पराक्रम आम्ही केला व मुंबईसाठी पैसे मिळविले. अध्यक्ष महाराज मी आपल्याला याबाबतीत सांगितले होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कै. यशवंतरावजी चव्हाण यांनी एवढा अभिप्राय दिलेला आहे पण शेवटी महाराष्ट्राच्या त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी, अर्थमंत्र्यांनी केवळ आमच्या शोभेकरिता, आमच्या समोर सांगितले की, आठव्या वित्त आयोगासमोर आम्ही सविस्तर निवेदन यासाठी केले आहे. पण मी विचारतो की, आठव्या वित्त आयोगाने जे मागणे केले होते त्याचा पाठपुरावा आपण काय केला ? त्यातील महाराष्ट्राच्या पदरात आपण किती आणले ? यासंबंधीचा कोठेही उल्लेख नाही. म्हणून मी म्हणतो की, केवळ आकडेवारी, अकौंटस देण्यापलीकडेही माझ्यासारख्या या सदनातील सदस्याला काही तरी नवीन अर्थसंकल्प आपल्याकडून अभिप्रेत आहे. तेही नामदार सुशीलकुमार शिंदे यांच्याकडून आणि माननीय राज्यमंत्र्यांकडूनही, ही इच्छा जर पुरी होत नसेल तर कशासाठी हा सारा अट्टहास ? म्हणजे रोज मरे त्यासाठी कोण रडे. दररोज मरणारा असेल तर त्यासाठी रडणारा कोणी सापडणार नाही, त्याप्रमाणे दरवर्षी हेच बजेट येईल. म्हणून मी पहिल्यांदाच अध्यक्ष महाराज, आपल्याला सांगितले होते की, हे सगळे रिलक्टंट आहे. माझी काही यावर

बोलण्याची इच्छा नाही, पण ते म्हणाले की आहे तेच बोला. शेवटी आम्ही तेच तेच बोलायचे आणि आमचे शासन तर एवढ्या घट्ट कातडीचे आहे की, त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही. असे चालणार नाही. तेव्हा अध्यक्ष महाराज, मी आपल्याला सांगत होतो की, या ठिकाणी महाराष्ट्राचे जे चित्र आम्हाला दिलेले आहे त्यामध्ये या शासनाने सारे फसवे फिगर्स दिलेले आहेत. ॲव्हरेज उत्पन्नाचे आकडे चुकीचे दिलेले आहेत. फक्त मुंबई, ठाणे व पुणे या तीन जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न हे १,६५१ आहे आणि मग त्यापेक्षा आत म्हणजे जळगांव, खानदेश आदी जिल्हास्तरावर पाहिले तर तेथे आपल्याला दरडोई उत्पन्न हे ४७५ आहे असे दिसून येईल. आणि त्यापेक्षाही आणखी खाली म्हणजे धडगांव, अंमळनेर आदी ग्रामीण भागामध्ये गेलो तर तेथील दरडोई उत्पन्न हे केवळ ८२ रुपये असल्याचे आपल्याला दिसून येते आणि मग कोणत्या तोंडाने आपण म्हणणार की, हे महाराष्ट्र राज्य पुरोगामी आहे बिहार, उत्तर प्रदेश ही ८२ च्या पुढे आहेत म्हणजे त्या दृष्टीनेही आम्ही मागासलेलो आहोत. असे असताना पुरोगामी राज्य आमचे आहे असे म्हणण्याचा अधिकार आपल्याला कोठल्याही प्रकारे नाही. अध्यक्ष महाराज, या पुस्तकात जी ॲव्हरेज इन्कमची आकडेवारी दिलेली आहे. ती तपासून पाहिली तर ती सारी चुकीची आहे असेच आपल्याला दिसून येईल. अध्यक्ष महाराज, मी हे आकडे येथे उद्धृत केले आहेत ते आपल्याच पुस्तकातील आहेत.

अध्यक्ष महाराज, आपली सातवी पंचवार्षिक योजना आता सुरू झाली आहे आणि ज्याला आपण व्हिलेज विझडम म्हणतो, येथे काही बी.ए., एम.ए., एलएलबी. अशा डिग्र्यांची गरज नाही. साधी गोष्ट आहे की, आपली सातवी योजना सुरू आहे तर आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते आतापर्यंत म्हणजे सहाव्या योजनेच्या अखेरपर्यंत काय काय दिवे आपण लावले आहेत, गॅसबत्या लावल्या की मशाली लावल्या, किती उजेड पडला, किती उद्दिष्ट पूर्ण केले ? याचे इव्हॅल्यूएशन आपण करायला पाहिजे होते. या पुस्तकात आपणच दिलेली जी आकडेवारी आहे ती मी आपल्यासमोर ठेवतो. यामध्ये तिसऱ्या योजनेसंबंधात जे आकडे दिलेले आहेत त्यात म्हटले आहे की, राष्ट्रीय पातळीवर आपले टार्गेट हे ५.६ होते आणि महाराष्ट्रात ते १.३१ इतके झाले म्हणजे आपण काय दिवे लावले ते पहा. या योजनेचे राष्ट्रीय उद्दिष्ट ५.६ असताना आपण मात्र प्रत्यक्षात टार्गेट १.३१ चे करतो. त्यानंतर चौथी योजना आहे त्यातील राष्ट्रीय पातळीवर टार्गेट हे ५.७ होते आणि आपले अचिव्हमेंट हे २.९५ चे आहे. त्यानंतर पाचवी योजना झाली, सहावी योजना आता संपली आहे त्या सहाव्या योजनेमध्ये आपले राष्ट्रीय उद्दिष्ट हे ५.२ होते आणि आपल्या राज्याने यावेळेस मात्र मोठ्या मुष्किलीने हे उद्दिष्ट ४ टक्क्यांवर आणले. म्हणजे राष्ट्रीय उद्दिष्टांची टक्केवारी देखील महाराष्ट्र सरकारने पूर्ण केली नाही. मग आपल्याला हे राज्य पुरोगामी आहे असे म्हणण्यास कोठे वाव आहे ? कोणत्या तोंडाने आपण हे राज्य पुरोगामी आहे असे म्हणावे ? तर मग हे राज्य मागासलेले आहे असे म्हणा, उगाच पुरोगामी म्हणून कशाला डिग्री लावून घेता ? अध्यक्ष महाराज, आता आपली जी सातवी पंचवार्षिक योजना सुरू झाली आहे ती करताना आपण काही कपोलकल्पित स्वप्ने रंगवली. आमचा वार्षिक प्लॅन २,१२७ कोटीचा असला पाहिजे असे आपण म्हटले. पण मग प्लॅनिंग कमिशनची आपल्याला थप्पड बसली आणि आपण हळूहळू खाली आलो आणि १,७०० कोटीवर थांबलो. या १,७०० कोटीमध्ये काय काय कमी झाले ते मी पुढे सांगणारच आहे. म्हणजे आम्हाला सांगितले की, या योजनेमध्ये आमचे उद्दिष्ट हे २,१२७ कोटीचे होते आणि ते करण्याचा प्रयत्न केला पण ते आम्हाला काही ॲसर्ट करता आले नाही. आम्ही बिचारे लाचार लोक, वरून जसे सांगितले जाईल तसे आम्ही ऐकतो. आम्ही जास्त रेव्हेन्यू देऊनही आमची भांडण्याची तयारी नाही.

एचबी ११८०—२६अ

श्रीमती सेलिन डिसिल्वा : आम्ही लाचार नाही.

श्री. रा. सू. गवई : लाचार नाही, पण आपल्या लाचारीचे हे लक्षणच आहे. हे अगदी कारणासह, पुराव्यासह सिद्ध झालेले आहे. ही पहिली २१२७ कोटींची योजना जर आपण तशीच ठेवली असती तर आपण हिंमतवान, मर्द ठरला असता, पराक्रमी ठरला असता. पण तो प्लॅन कमी झाला आहे, तर मग आपल्याला आम्ही आणखी काय म्हणणार ? अध्यक्ष महाराज, ज्याला पर्स्पेक्टिव्ह आणि लाँग टर्म प्लॅनिंग म्हणतात तसे आपले प्लॅनिंग आजवर झालेलेच नाही. ही आपल्या शासनाला अत्यंत लाजिरवाणी आणि शरमेची गोष्ट आहे. म्हणजे आतापर्यंत आपण केवळ ढिगळ लावण्यापुरते शिवायचे असेच करीत आलो आहोत असे करता करता पाच वर्षे आपण पाण्याच्या प्रश्नावर केवळ वाया घालविली आहेत. मध्यंतरी काही २० हजार गावे कव्हर झाली पण तीही पुन्हा ओसाड होतील. तेव्हा आपण असे काही तरी पर्स्पेक्टिव्ह आणि लाँग टर्म प्लॅनिंग करा की, जेणेकरून ३५ हजार खेड्यांपैकी एकही खेडे या गावामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष राहू नये. परंतु तसे होत नाही. म्हणूनच काल आमच्या महसूल मंत्र्यांना, श्री. सुधाकर नाईक यांना घोषणा करावी लागली की, आता आम्ही या पाण्याच्या प्रश्नासाठी स्वतंत्र यंत्रणा काढू. अध्यक्ष महाराज, या बाबतीत मी तीन वर्षापूर्वीच सांगितले होते की, आपण वॉटर डिपार्टमेंट काढा आणि त्यात राज्यातील संपूर्ण पाण्याचे प्रश्नाबाबतीत ज्याला लाँग टर्म प्लॅनिंग म्हणता येईल असे नियोजन करा. पण ते केले नाही. त्यामुळे आतापर्यंत आपण यासाठी खर्च केलेले ३००-४०० कोटी रुपये वाया गेले, पाण्यात गेले आहेत. पाणी काही मिळालेच नाही. पण पाणी भरता भरता डोळ्यात पाणी आले. निदान यापुढे तरी आम्हाला पाणी मिळणार आहे की नाही ? सांगण्याचा मतलब असा की, पर्स्पेक्टिव्ह प्लॅनिंग नसेल तर केवळ ठिगळ लावण्याच्या कामाने काही उपयोग होणार नाही. याला पंचिग बिझनेस म्हणतात, आणि या पंचिग बिझनेसने काही होणार नाही तर त्यासाठी दूरदृष्टी ठेवून काम करायला पाहिजे होते. अध्यक्ष महाराज या बाबतीत मला प्रिव्हीलेज मोशन आणावयाची होती. परंतु मा. श्री. सुशीलकुमार शिंदे आणि श्रीमती सेलिन डिसिल्व्हा या खात्याचे मंत्री असल्यामुळे ही प्रिव्हिलेज मोशन मी मांडली नाही.

अध्यक्ष महाराज, अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणाच्या पाचव्या पानावर असे म्हटले आहे की, अनुसूचित जाती व नवबौद्ध यांच्या विशेष घटक योजनेच्या अंमलबजावणीसाठी २२५.०६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या शिवाय १९८५-८६ मध्ये याकरिता ३८.८५ कोटी रुपयांचे विशेष केंद्रीय अर्थसहाय्य मिळण्याची शक्यता आहे आणि त्यांच्याच भाषणाच्या पान नं. ३५ वर असे म्हटले आहे की, ज्या काही योजनेतर बाबीसाठी आकस्मिकता निधीतून खर्च केला जात आहे. त्याबाबींवरील संपूर्ण वर्षाच्या खर्चासाठी पुरवणी मागण्या सादर करण्यात येतील. या बाबीवरील एकूण खर्च ६.९७ कोटी इतका अपेक्षित आहे. म्हणजे या ठिकाणी आपण पुरवणी मागण्या सादर करणार आहोत त्या स्पेशल कॉम्पोनन्ट प्लॅनसाठी, यामध्ये जी दोन स्टेटमेंटस् करण्यात आली आहेत त्यापैकी कोणते स्टेटमेंट खरे आहे ? पहिले की दुसरे ? पुरवणी मागण्या आपण स्पेशल कॉम्पोनंट प्लॅनसाठी करतो काय ? Sir, I am taking of the plan which deals with the weaker sections of the Society and for that you are coming forward with a supplementary demand and that creates the impression that आपल्याला यामध्ये कोणती कल्पना अभिप्रेत आहे.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी गाडगीळ सूत्राचा उल्लेख करण्यात आला आहे. मा. मंत्रिमहोदय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी ॲन्युअल प्लॅन करताना गाडगीळ सूत्राचा आधार घेतला आहे. आपण या ठिकाणी गाडगीळ सूत्राच्या आधारे सातव्या पंचवार्षिक योजनेसाठी पैसा आणला आहे काय ? अध्यक्ष महाराज सुदैवाने गाडगीळ हे महाराष्ट्राचे आहेत. परंतु तसे असतानाही त्यांच्या सूत्राचा उपयोग

आपले राज्य कोठे घेत आहे. शेजारच्या गुजरात राज्याकडे पहा. त्या राज्यात हायर एस.एस.सी. पर्यंत मुलीचे सारे शिक्षण शुल्क माफ करण्यात आले आहे. तेथे धर्मभेद नाही, जातीभेद नाही किंवा लिंगभेद नाही. त्या ठिकाणी जवळपास या कामासाठी १०५ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. आपण या ठिकाणी फक्त आपले पुरोगामी राज्य आहे असे म्हणत आहोत. परंतु प्रत्यक्षात काहीच करत नाही. आपण नुसती एक एक वर्षाने यामध्ये वाढ करीत आहोत. आपण जर महाराष्ट्राला पुरोगामी म्हणणार असाल तर धर्मभेद न करता, जातिभेद न करता तसेच लिंगभेद न करता सर्वांना मोफत शिक्षण दिले पाहिजे. गुजरातमध्ये १२वीपर्यंत मोफत शिक्षणाची सोय आहे. तशीच सोय आपल्याकडे १२वीपर्यंत मुलामुलीचे मोफत शिक्षणासाठी केली पाहिजे. अध्यक्ष महाराज, आपल्या महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांचा काय निर्धार होता. की शेंडी तुटो वा पारंबी तुटो, शेतकऱ्यांना कर्जे देताना ६ टक्के व्याजाच्या नंतरचा डिफरन्स हा महाराष्ट्र सरकार भरणार आहे. हा निर्धार आपण सर्वांनी ऐकला आहे. despite the caste, class and religion; आणि आता शेतकऱ्यांना मूर्ख बनविण्यासाठी आपण ही तरतूद करीत आहांत काय? शेतकऱ्यांना कर्ज देऊ अशी नुसती घोषणा केली आहे. निर्धार केला आहे परंतु त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली नाही. यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरी तरतूद करू असे देखील म्हटलेले नाही. आपण लहान मुलाला रडायला लागल्यावर जशी गोळी देतो तशी गोळी या ठिकाणी दिलेली आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी फक्त निर्धार व्यक्त केला आहे. परंतु कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महाराज, रस्त्यांच्या कामासाठी ६.६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अध्यक्ष महाराज हा फिल्ड वर्करचा प्रश्न आहे.

Please show me where you have mentioned and what you have provided.

आज महाराष्ट्रात जे लक्षावधी किलोमीटरचे रस्ते पूर्ण झाले आहेत ते सेफ स्टेजला आणण्याची आवश्यकता आहे. आजचे रस्ते हे सेफ स्टेजला नसल्यामुळे पावसाळ्यात हे रस्ते वाहून जातात आणि केलेले काम, तसेच खर्च केलेला पैसा फुकट जातो. अध्यक्ष महाराज, ही नॅशनल प्रॉपर्टी आहे. रोजगार हमी योजनेतून आपण बरेचसे रस्ते पूर्ण केले आहेत. हे रस्ते सेफ स्टेजला आणण्यासाठी रोजगार हमी योजनेचा ६०-४० चा रेशो बदलला तरी चालेल. अध्यक्ष महाराज आज परिस्थिती अशी आहे की, कित्येक गावांना जोडणारे रस्ते नाहीत. आमची या बाबतीत अशी मागणी आहे की, मेन रस्ता आणि गांव यांना जोडणारे रस्ते आपण तयार केले पाहिजेत. आणि हे रस्ते सेफ स्टेजला आणले पाहिजेत. अध्यक्ष महाराज, रोजगार हमी योजनेसाठी या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये फक्त ८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागच्या वर्षी रोजगार हमी योजनेवर १५० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. आणि आता त्याच्यापेक्षा कमी रक्कम खर्च करणार आहोत. अध्यक्ष महाराज, या योजनेसाठी लोकांकडून जवळपास ७५ कोटी रुपये टॅक्सच्या माध्यमातून गोळा करण्यात येतो. आणि तोच पैसा आपण येथे देत आहात. तसेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी आपण ५४.५५ कोटी रुपये खर्च करणार आहोत. हा पैसा तर मध्यवर्ती सरकारकडून आपल्याकडे आला आहे. अशी सगळी रक्कम मिळून आपण या कामासाठी ८० कोटी रुपये खर्च करणार आहोत. परंतु यामधून आपण किती मॅनडेज तयार करणार आहोत ? हे मॅनडेज तयार करण्यामध्ये आपले श्रेय किती राहणार आहे ? Why under the garb ? Let us be frank, so as to say that these are the monies from the Government of India's assistance. And I do not know why do you take the credit ?

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी एक चांगले भाषण मा. मंत्रिमहोदय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी केले आहे. प्रशासनात लाचलुचपत चालू आहे. भ्रष्टाचार झाला आहे हे मा. मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. परंतु हा भ्रष्टाचार फक्त पाटबंधारे खात्यातच आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पाटबंधारे खात्यातील हा भ्रष्टाचार दूर करण्याकरिता त्यांनी या अर्थसंकल्पात ४ लाख ७४ हजार रुपयांची तरतूद केली आहे. मला त्यांना असे विचारावयाचे आहे की, पाटबंधारे या एकाच खात्यात भ्रष्टाचार आहे काय? इतरत्र तो नाही काय? पूर्वी हे डिपार्टमेंट आताच्या मा. मुख्यमंत्र्यांचे होते. याचा विचार आपण केला आहे काय? या ठिकाणी मा. मंत्रिमहोदय श्री. सुरूपसिंग नाईक बसले आहेत. ते आपल्याला या बाबतची माहिती देतील. सार्वजनिक बांधकाम खात्यात काही भ्रष्टाचार आहे काय? प्रोहिबिशन एक्साईजमध्ये भ्रष्टाचार आहे काय? अध्यक्ष महाराज, मंत्रालयासमोर बी-४ मध्ये दुकानच मांडण्यात आले होते. एवढा मोठा भ्रष्टाचार सगळीकडे चालू असताना श्री. सुशीलकुमार शिंदेसारख्या सज्जन माणसाने एकाच खात्यात भ्रष्टाचार आहे असे सांगणे बरोबर नाही.

Smt. CELINE D'SILVA : The Hon. Member has no other information.

Shri R. S. GAVAI : There is no dearth of information. I should take precaution. I should not encroach upon the right of other Hon. members. Please do not misunderstand me. If the Chair permits I can speak for two hours.

अध्यक्ष महाराज, गंमतीची गोष्ट अशी की, १७०० कोटींची तरतूद या ठिकाणी करण्यात आलेली आहे. पुन्हा जी तरतूद करण्यात आलेली आहे ती १४००.८ कोटीची आहे. म्हणजे तरीसुद्धा ८ कोटींचा बॅकलॉग आहे. यात नॉन प्लॅन भांडवली खर्चसुद्धा दिलेला नाही. मग प्रत्यक्ष ॲन्युअल बॅलन्स किती कमी झाला ते तुम्हीच पहा. अध्यक्ष महाराज, दुसरी गोष्ट अशी की, या अर्थसंकल्पाद्वारे दारूवर कर लावला आहे. दारूवर कर लावला ही गोष्ट मी समजू शकतो. परंतु ह्या चांगल्या दारूवर कर लादला की, त्याचा परिणाम हातभट्टीच्या दारुवर होईल. हातभट्टीची दारू स्वस्त होईल. ज्याला झेपेल त्याच्याकडून कर वसूल करा हे ठीक आहे. परंतु हातभट्टीची दारू पिणाऱ्यांचे प्रमाण वाढेल. तेव्हा त्याचा लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होईल? दुसरी गोष्ट यांनी एके ठिकाणी जादूची कांडी फिरविली आहे. हॉटेल-हॉटेलमध्ये फरक केला आहे. त्या ठिकाणी स्लॅबस् पाडण्यात आलेल्या आहेत. हे स्लॅबस् पाडत पाडत शासन पंचतारांकित हॉटेलपर्यन्त आलेले आहे. पंचतारांकित हॉटेल पाच लाखांपर्यन्त असेल तर इतका कर दिला पाहिजे. त्याच्या पलीकडचे असेल तर इतका कर दिला पाहिजे. ह्या शासनाला ह्या पंचतारांकित हॉटेलबद्दल इतके प्रेम का? ह्या लोकांना अशाप्रकारे स्लॅबस पाडून करातून वगळण्याची काय गरज होती? मी ह्या संदर्भातील डिटेल उतारे वेळेअभावी वाचून दाखवित नाही. परंतु शासनाची ही संपूर्ण नीती विवेचन अनरिझनेबल वाटते. अध्यक्ष महाराज, मी रिजनल बॅलन्ससंबंधी थोडक्यात एकच गोष्ट सांगणार आहे. त्यासंबंधी सविस्तर माझे इतर मित्र बोलतील. ह्या संदर्भात दांडेकर रिपोर्टची जी शस्त्रक्रिया चालली आहे त्यासंबंधीच मी बोलणार आहे. त्यांनी ह्या संदर्भात फायनान्शियल स्ट्रक्चर असलेल्यांचा विचारच केलेला नाही. यात नाव फक्त मराठवाडा-विदर्भाचे होते. बॅकलॉग मात्र सर्वाचा निघालेला आहे. नुसते त्यात दोनशे कोटी वाटून सर्वांची शेरणी करणे बरोबर नाही. ह्या ठिकाणी ज्या पद्धतीने हा पैसा वापरला जात आहे ते बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, मायनर, मीडियम व मेजर हे सर्व प्रोजेक्टस् स्टेट फंडातून होणार असतील तर मग बॅकलॉग भरून काढण्यासाठी दांडेकर समितीच्या अहवालाची गरज नाही. अध्यक्ष महाराज, दिवस असा येणार आहे की, तीस वर्षांनंतर बॅकलॉग राहणारच नाही. आतापर्यन्त माकडाचा माणूस

झाला. परंतु यानंतर माणसाचे माकड होईल अशाप्रकारचे यांचे नियोजन आहे. अध्यक्ष महाराज, एक दिवस या देशातील शेतीचा धंदाच बसणार आहे. कारण आता शेतकरी हार्टिकल्चरकडे वळला आहे. तो साग, निलगिरीकडे वळला आहे. अन्नधान्याचे उत्पादन १३ टक्क्यावर आलेले आहे. शेतकरी आज स्वत:च्या मनाने शेती पिकवीत आहे. आपल्या प्रयत्नाने शेती करत आहे. सरकारला त्याचे कवडीचे श्रेय नाही. जर ह्या शेतकऱ्याला सरकारचे प्रोत्साहनच मिळाले नाही तर मग तो अन्नधान्याची शेतीच करणार नाही. पाणी जिरवा, आडवा हे बोलणे सोपे आहे. प्रत्यक्षात काय काय जिरवले आहे ते लोकांना चांगले माहीत आहे. पाणी कोठेच जिरवले नाही. अडविले नाही. शेतकऱ्यासंबंधी इन्सेन्टीव्ह देण्याच्या सूचना आहेत. त्याला साथ द्या. आजच शेती धंदा डबघाईला आलेला नाही. आणि अशाप्रकारे काही दिवस हा शेती धंदा डबघाईला आला तर मग सर्वच धंदे डबघाईला येतील एवढाच इशारा मी या निमित्ताने देतो. अध्यक्ष महाराजांनी मला दिलेल्या वेळेत भाषण संपवायचे आहे. माननीय मंत्रिमहोदयांना माझे भाषण ऐकण्याची इच्छा होती. मी अधिक तपशीलवार या ठिकाणी बोललो असतो. परंतु मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, जर त्यांची खाजगीत माझ्याशी डिस्कशन करण्याची तयारी असेल तर जरूर करू. अध्यक्ष महाराज, आपण दिलेल्या वेळेबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

❑❑❑

नवीन वस्त्रोद्योग धोरण

(२३ जानेवारी, १९८६)

महाराष्ट्र राज्यातील नवीन वस्त्रोद्योग धोरणाबाबत बोलताना रा. सू. गवई म्हणाले, मी आधुनिकीकरणाच्या विरोधात नाही पण कुठल्या मर्यादेपावेतो आधुनिकीकरण व्हावे हा प्रश्न आहे. आधुनिकीकरणाने बेकारी वाढू नये, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले.

अध्यक्ष महाराज, या वस्त्रोद्योग धोरणासंबंधात साऱ्या देशामध्ये जी चर्चा सुरू आहे आणि विशेषत : महाराष्ट्रामध्ये, त्या संबंधी मी माझे विचार येथे मांडणार आहे. या बाजूने बोलावयाचे म्हणजे आधुनिकीकरणाला विरोधच आहे असे समजण्याचे काही कारण नाही. परंतु आधुनिकीकरण किती हद्दीपर्यंत करावयाचे हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. जगामध्ये आधुनिकीकरण सुरू असताना आम्ही मागे रहावे असे काही आमचे म्हणणे नाही. आग्रह असणार नाही. म्हणूनच आधुनिकीकरणाच्या कल्पनेत सर्वात मोठी आदर्श अशी कल्पना ही महात्मा गांधी यांची आपल्या समोर आहे. महात्मा गांधी यांनी त्यावेळी नव्या यांत्रिकीकरणाला यासाठी विरोध केला होता की, त्यामुळे आपल्या देशातील बेकारांची संख्या वाढेल. आपल्याला ते परवडणार नाही. या ठिकाणी हा जो मुद्दा उपस्थित झालेला आहे तो या देशाच्या पार्श्वभूमीवर आणि विशेषत: महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर विचारात घेतला पाहिजे. यासाठी मी एक उदाहरण देतो. आधुनिकीकरणाच्या नावाखाली लाकडे जाळणारी चूल बंद झाल्यानंतर गॅस आला तर तो गॅस नको असे म्हणणारा मी नाही. आजचे,

आधुनिकीकरण आहे त्या आधुनिकीकरणात भारताच्या परंपरेने बेकार लोकांना सामावून घेण्याच्या धोरणाच्या प्रतिकारात दिसते. म्हणजे मी समजू शकतो की, आधुनिकीकरणाचा पॉझिटिव्ह बाजूने विचार करणे वेगळे आणि निगेटिव्ह बाजूने विचार करणे वेगळे, हे दोन भाग यामध्ये आहेत.

अध्यक्ष महाराज, आपल्याला कल्पना आहेच की, आपल्या देशामध्ये जे कापूस उत्पादनाचे क्षेत्र आहेत त्यात महाराष्ट्रात ३३ टक्के आहे आणि भारताच्या कापसामध्ये आताच सन्माननीय सदस्य श्री. लहाने यांनी सांगितल्याप्रमाणे एक पंचमांश आहे. महाराष्ट्रामध्ये दर हेक्टरी ९० ते ९५ किलोग्रॅम एवढे उत्पादन कापसाचे ॲव्हरेज आहे. महाराष्ट्र वगळून इतर भारतामध्ये जे याचे ॲव्हरेज आहे ते १६० ते १७० कि.ग्रॅ. चे आहे. याच्या उलट जगामध्ये कापसाची जी स्पर्धा आहे त्यामध्ये हे ॲव्हरेज ५०० ते ६०० किलो आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. जैन यांनी सांगितल्याप्रमाणे चीनमध्ये हे रिटर्न केलेले आहे आणि जवळ जवळ अमेरिका आणि आफ्रिकन देशांनी या कापूस उत्पादनात स्पर्धा सुरू केलेली आहे. परंतु कोठपर्यंत? अध्यक्ष महाराज, मी स्वतः चीनमध्ये गेलो आहे. चीनमध्ये माओला, चीनचे लोक महात्मा गांधी समजतात. अशा चीनची आज या उद्योगातील नीती काय आहे? तर सर्व सामान्य माणसासाठी लागणारा कापूस आणि सर्वसामान्य लोकसंख्येच्या लोकांनी वापरावयाचे कपडे, त्यांचे ड्रेस, मग ते खाकी, निळे, काळे आणि बायकाचे जे ड्रेस आहेत ते म्हणजे आधुनिकीकरण करावयाचे पण त्यामुळे आपल्या लोकांना त्याची झळ बसू नये, धक्का लागू नये. म्हणून त्यात फार थोडा बदल झालेला आहे. म्हणून त्यांनी आधुनिकीकरणाच्या नावाखाली स्पर्धा करण्यासाठी वेगळी नीती स्वीकारली आहे. म्हणजे आपल्या देशाला टिकविण्यासाठी धोरणामध्ये वेगळी नीती असा हा आपल्या महात्मा गांधीचा वारसा माओने घेतलेला आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. जैन यांनी या संदर्भात जे पुस्तक येथे आणले आणि त्यातून जी माहिती दिली ते पुस्तक काही सरकारचे प्रकाशन नाही तर कॉटन मिल्स फेडरेशनचे पब्लिकेशन आहे. आणि ही फेडरेशन तर या उद्योगाची दुष्मन आहे. अध्यक्ष महाराज, मी फक्त या संदर्भात एवढाच युक्तिवाद करतो की, त्यामध्ये निर्यातीची मुभा दिली असली तरी आपल्याला आंतरराष्ट्रीय जगामध्ये निर्यात करण्यास वाव राहणार नाही. कारण तुमचे उत्पादन हे त्या मानाने कमी आहे. आपल्याकडे त्याचा भाव जास्त आहे पण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये तो कमी आहे. म्हणून मग यामध्ये काही समन्वय साधला पाहिजे की आधुनिकीकरणाच्या नावाखाली परंपरेचे लोकप्रिय धंदे बुडणार नाहीत याची हमी घेतली पाहिजे आणि मग एका बाजूने आपण पॉझिटिव्ह वागला असता तरी चालले असते. परंतु आपण निगेटिव्ह वागला आहात. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. जैन यांनी उल्लेख केला घटनेचा १९३५ सालामध्ये अर्थसंकल्प मांडला त्यावेळी कॉटन मिल्स फेडरेशनने कृत्रिम धागा आणि आखूड धाग्याच्या आयातीला प्रोत्साहन द्यावे आणि त्याचा पाठपुरावा करावा असे केंद्र सरकारला सांगितले आणि १९८५ चे जे बजेट आले त्यामध्ये हे धोरण प्रतिबिंबित झालेले आहे. अध्यक्ष महाराज, मला असा आरोप करावयाचा नाही. सरकारने शेतकऱ्यांचे ऐकायचे की कॉटन मिल्स फेडरेशनने ऐकायचे? सन्माननीय सदस्य श्री. जैन यांनी सांगितल्याप्रमाणे अशोक मेहता समितीने यंत्रमाग आणि हातमागाला १८ ते २० टक्के सूट दिली होती. ही सूट आता बंद का केली ? माझे म्हणणे आहे की सध्या असलेल्या कापूस उत्पादकांचे हितसंबंध सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने आतापर्यंत केंद्र सरकारने कृत्रिम धाग्यावर जबरदस्त आयातकर बसवून आंतरराष्ट्रीय बाजाराच्या मानाने आपल्याकडे कृत्रिम धागा हा महाग केला होता. मात्र आता तुम्ही त्यांना सवलत दिली म्हणजे तो धागा आता आंतरराष्ट्रीय बाजाराच्या मानाने स्वस्त होईल. म्हणजेच तुम्ही दोन प्रकारची नीती अवलंबिली. यंत्रमागाच्या धाग्याला सवलत रद्द केली आणि संबंधित मीलमधून निघणाऱ्या कापसाला प्रोत्साहन दिले म्हणजेच एके ठिकाणी आपण पॉझिटिव्ह वागला आहात आणि दुसऱ्या ठिकाणी निगेटिव्ह वागला.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. लहाने आणि जैन यांनी सांगितले त्यानुसार हा केवळ कापूस उत्पादकांचा प्रश्न नाही तर या उद्योगामध्ये या कापसावर अवलंबून असणारे यंत्रमाग आणि हातमाग यांच्यावर अवलंबित असे १०-१२ लाख सदस्य आहेत आणि सुमारे १५ लाख कुटुंबे आहेत, त्याच्यावर याचा मोठा परिणाम होणार आहे याची मला रास्त भीती वाटते.

अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी श्री. केवलचंद जैन यांच्यावर अन्याय करू इच्छित नाही. त्यांनी या ठिकाणी मील मालकांचे पुस्तक वापरले आहे. इंडस्ट्री कॉटन मील फेडरेशनचे ते पुस्तक आहे. त्या फेडरेशनने या अर्थसंकल्पावर आपला प्रभाव पाडला आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी हातमाग किंवा यंत्रमागाला जे कन्सेशन दिले आहे ते विथड्रा केले आहे. हे निगेटिव्ह आहे. शेतकऱ्यांच्या विरुद्ध आणि यंत्रमागाच्या विरुद्ध निगेटिव्ह ॲप्रोच घेतला आहे आणि मील मालकांच्या बाजूने पॉझिटिव्ह ॲप्रोच घेतला आहे. या ठिकाणी अशोक मेहता कमिटीने जे केले आहे ते रिटन केले असते तर मग सवलतीचा प्रश्न नाही. यंत्रमागाचा कापूस ट्रीट केला असता तर या ठिकाणी महाराष्ट्रातील जनतेला संशय आला नसता. माननीय सदस्य श्री. लहाने यांनी जे विचार मांडले आहेत त्याला मी पाठिंबा देत आहे. अध्यक्ष महाराज, उद्या कापसाची किंमत कमी झाली की, मध्यवर्ती सरकार महाराष्ट्र सरकारला कापूस एकाधिकार खरेदी योजना चालू ठेवावी असे सांगणार नाही. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी जो रेम्यूनरेटीव्ह प्राईज हा शब्दप्रयोग केलेला आहे तो चुकीचा आहे. आपण दिलेली गॅरंटी प्राईज आहे आणि दुसरी सपोर्ट प्राईज आहे. They can withdraw it at any moment. There is no remunerative price. But, not only that they can stop the sheme. अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्र्यांचे निवेदन मी वर्तमानपत्रातून वाचले आहे. ते सज्जन आहेत ते आता सर्व गोष्टीला होय म्हणतील. परंतु केंद्र सरकार आज सज्जन नाही. कापूस एकाधिकार योजना चालू ठेवील काय हा प्रश्न आहे ? या ठिकाणी सर्कमटन्सेस असे क्रिएट केले पाहिजेत की, The Government should give remunerative price to cotton. आपण या ठिकाणी आम्हाला असे म्हणाल की आपण कापसासंबंधी एवढा आग्रह का धरीत आहात? अध्यक्ष महाराज, आपण शेतकरी आहात? मी सुद्धा शेतकरी आहे, आपण कापसाला पांढरे सोने म्हणतो. आज भरभक्कम कापूस आला आहे. अध्यक्ष महाराज, शेतातील एकंदर जो लेबर लागतो त्यापेक्षा जास्त लेबर हा कापसाला लागतो. Sir, in the State of Maharashtra the agricultural labour goes from Sangli to Yeotmal. ४७ टक्क्यापासून ५९ टक्क्यापर्यंत आहे. माझ्यासारखा माणूस असे म्हणेल की आम्हाला ट्रॅक्टर परवडत नाही. अध्यक्ष महाराज, या सर्व गोष्टींमुळे आज या ठिकाणी काम करणाऱ्या शेतमजुरांचा त्यांच्या कुटुंबियाचा धंदा धोक्यात आला आहे. अध्यक्ष महाराज, महाराष्ट्राचा तसेच संपूर्ण देशाचा विचार करता हे धोरण म्हणून आपण चार पावले मागे जात आहोत असे मला वाटते. हे धोरण सर्वांना तोट्याचे होणार आहे. कोणालाही हे धोरण फायदेशीर नाही. माननीय तिडके साहेब तसेच माननीय मुख्यमंत्री यांच्याबरोबर आम्ही सत्र सुरू होण्यापूर्वी खाजगीत बोललो होतो. त्यावेळी आम्हाला असे वाटले होते की, या प्रश्नाबाबत ते गांभीर्याने पाहतील. ते याची गांभीर्याने दखल घेतील. आमची माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, आपण शासनकर्ते आहात. म्हणून या मोशनच्या निमित्ताने आपण या योजनेचा तसेच धोरणाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. तो विचार महाराष्ट्र शासनाने करावा अशी विनंती करून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

❑❑❑

विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा नियोजनाच्या निकषांत बदल व्हावा

(२४ जानेवारी, १९८६)

विदर्भाच्या विकासासाठी जिल्हा नियोजनाच्या निकषात बदल व्हावा यासाठी एक समिती गठित व्हावी हा विषय घेऊन एक ठराव रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेत मांडला होता. त्यावर झालेल्या चर्चेत त्यांनी पहिली १४ वर्षे पुढील दाराने चोरी करीत विदर्भाला लुटले तर नंतर १२ वर्षे मागील दाराने चोरी करून लुटले असा आरोप प्रगत पश्चिम महाराष्ट्रावर केला. सांगली-सातारा जिल्ह्यातील विकास स्पर्धेचाही त्यांनी असाच उल्लेख केला होता.

अध्यक्ष महाराज, या सत्राच्या सुरुवातीला भारतीय घटनेच्या सेक्शन ३७१ (२) अन्वये प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करण्यात यावीत अशी चर्चा झाली. मी या चर्चेची आता अजिबात पुनरावृत्ती करणार नाही. विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरिता जिल्हा नियोजनाचे नॉर्म्स व त्या अनुषंगाने संपूर्ण राज्य नियोजनाचे नॉर्म्स कसे बदलण्यात यावेत यासंबंधी मी विवेचन करणार आहे. पूर्वी ३७१(२) कलमाचे जे मी समर्थन केलेले आहे त्याला पर्याय म्हणून हा प्रस्ताव मी आणलेला नाही. याचा मी पुनरुच्चार करू इच्छितो. अन्यथा काही गैरसमज होण्याची शक्यता आहे. जिल्हा नियोजनाचे जे नॉर्म्स आहेत ते विदर्भाचा अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीने कामी येतील म्हणून मी ही चर्चा उपस्थित केली आहे. माननीय सदस्य श्री. गंगाधर फडणवीस व श्री. मधु देवळेकर यांनी आपल्या ठरावाचा वेळ मला दिला, तसेच आपणही मला जास्त वेळ बोलण्याची संधी दिलीत याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर म्हणजे १९६० सालापासून १९७४ सालापर्यंत असा एक कालखंड काढावा लागेल, ज्याला मी म्हणतो नियोजनपूर्व आणि १९७४ ते १९८६ पर्यंत हा नियोजनानंतरचा कालखंड, असे ढोबळ मानाने १९६० ते १९८६ ह्या २६ वर्षांच्या खंडात एक कालखंड १४ वर्षांचा तर दुसरा १२ वर्षांचा असा मी संकल्पित केला आहे. अध्यक्ष महाराज, आधीच्या कालखंडास नियोजनपूर्व कालखंड असे मी का म्हटले तर १९६० ते १९७४ च्या कालावधीत फक्त टू टायर प्लॅनिंग होते. एक केंद्र सरकारचे प्लॅनिंग व दुसरे राज्य सरकारचे प्लॅनिग. १९७४ मध्ये प्रकर्षाने जिल्हा नियोजनाची कल्पना आली व मग देशाचे नियोजन थ्री टायर झाले. केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे आणि नंतर जिल्ह्याचे नियोजन, मग त्या नियोजनात काही प्रमाणात सुसूत्रता निर्माण झाली. याचा अर्थ हा की, १९६० पासून १९७४ पर्यंत तब्ब्ल १४ वर्षापर्यंत तरी महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर नागपूर करारान्वये विदर्भाला झुकते माप देण्यात येईल असे जे वचन शासनाच्या प्रमुखांनी दिले त्यानंतर १४ वर्ष राज्याचा खर्च बिगर नियोजनाने झाला. चालला. कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वाचा अवलंब त्यासाठी केला नाही. त्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे अवलंबिण्यात

न आल्यामुळे, राज्याच्या निधीचे वितरण हे कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वाने न झाल्यामुळे एका जिल्ह्यामध्ये धरणेच धरणे झाली. एका जिल्ह्यामध्ये रस्तेच रस्ते झाले तर दुसऱ्या जिल्ह्यामध्ये पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प झाले तर इतर दुसऱ्या जिल्ह्यामध्ये धरणे नाहीत, पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प नाहीत, रस्त्यांचे प्रकल्प नाहीत असे घडले. अध्यक्ष महाराज, अंदाजपत्रकातील तरतुदी वापरल्या तरी काही भागामध्ये अंदाजपत्रकीय तरतुदी झाल्यानंतर परफॉर्मन्स बजेटमध्ये त्याची फलश्रुती दिसत नाही. म्हणजे अंदाजपत्रकात तरतूद केली आणि इयर एंडिग जवळ आल्यानंतर ॲप्रोप्रिअेशन करून तो पैसा दुसरीकडे डायव्हर्ट केला. याला आपण अट्रॅ्यडम प्लॅनिंग म्हणतो. म्हणजे १४ वर्षे नियोजनाशिवाय आणि मार्गदर्शक तत्त्वांशिवाय पैशाचे वितरण झाले. त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की, १९६० ते १९७४ या १४ वर्षांच्या काळात उपेक्षित विभागांवर अन्याय झाला आणि त्या ठिकाणी ॲक्युम्युलेटेड बॅकलॉग निर्माण झाला. या ठरावाची मर्यादा फक्त विदर्भापुरतीच असली तरी मराठवाडा आणि कोकण विभागालाही हे तत्त्व लागू आहे. पण माझा विषय विदर्भापुरता मर्यादित असल्यामुळे मी तेवढ्यावरच बोलणार आहे. अध्यक्ष महाराज, आपल्याला कल्पना आहे की, १९६४ पूर्वी या राज्याचे मुख्यमंत्रीपद मा. स्वर्गीय श्री. कन्नमवार यांच्याकडे आले. ते अतिशय सज्जन होते आणि आल्याबरोबर त्यांनी शपथ घेतली की मी फक्त पादुकांचे रक्षण करणार आहे. त्यांच्याबद्दल मला खूप आदर आहे. पण जरी विदर्भाकडे मुख्यमंत्रीपद आले तरी पूर्वीच्या अट्रॅ्यडम नियोजनाला स्ट्रीम लाईन केले नाही. नियोजनाला दिशा मिळाली नाही. दुर्दैवाने श्री. कन्नमवार यांचे निधन झाले आणि श्री. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री झाले. त्यांनी १९६९ मध्ये सभागृहात एक निवेदन केले आणि सांगितले की यापुढे जिल्हा हा नियोजनाचा भाग समजण्यात यावा. अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदय श्री. शिंदे हे मला वाटते दांडेकर समितीचा अहवाल चाळत आहेत. त्या दांडेकर महाराजांनी असा जावई शोध लावला की, ज्याअर्थी १९६९ सालामध्ये राज्याचे मुख्यमंत्री असे म्हणतात की, ज्याअर्थी जिल्हा हा नियोजनाचा भाग समजण्यात यावा त्याअर्थी मराठवाडा, नागपूर असा विभागाचा काही संबंध येणार नाही. अध्यक्ष महाराज, श्री. वसंतराव नाईक यांनाही भांडण करणे शक्य नव्हते, पण त्यांच्या पद्धतीने, इंटलेक्युअली त्यांनी १९६९ मध्ये भांडण सुरू केले आणि २० जानेवारी १९७२ रोजी जिल्हा नियोजनासंबंधीचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला. १९७४ मध्ये पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये, योजनेच्या आरंभी या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आली. त्यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, १४ वर्षे कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे नसताना वाटेल तितका पैसा खर्च करीत आहोत, रस्त्यासाठी काही रक्कम ठेवली आणि एका विभागातील एका रस्त्यावर जरी ती रक्कम खर्च झाली तरी ती रक्कम संपली, बजेट संपले. असा अन्याय विशेषत: विदर्भ आणि मराठवाड्यावर होऊ नये यासाठी त्यांनी १९७४ मध्ये एक सुवर्णमध्य काढला. राज्यामध्ये येणारा नियोजनाचा पैसा हा विशिष्ट तत्त्वाने वितरित करावा असे त्यांनी सांगितले आणि तेव्हापासून जिल्हा नियोजनाला सुरुवात झाली. ते असेही म्हणाले की, जिल्हा नियोजनामार्फत जिल्ह्याचा नैसर्गिक विकास होईल आणि औद्योगिक सामग्रीला उत्तेजन मिळेल आणि इतर सामग्रीचाही संपूर्ण विकास करता येईल. या नियोजनाची १९७४ मध्ये मार्गदर्शक तत्वे काय होती, राज्य शासनाचे योजनेतील वाटप (अ) जिल्हा पातळीवर ६० टक्के आणि राज्य पातळीवर ४० टक्के. हा रेशो त्यावेळी ठरविण्यात आला. म्हणजे जिल्हा नियोजनावर जो खर्च व्हावयाचा तो १०० असेल तर ६० रुपये जिल्ह्यात खर्च करावयाचे आणि ४० रुपये राज्याने खर्च करावयाचे. पण त्यानंतर १९७४ ते १९८१ मध्ये त्यामध्ये बदल करण्यात आला. जिल्हा नियोजनामध्ये असलेल्या काही योजना राज्य स्तरावर आणण्यात आल्या आणि त्यामुळे पूर्वी जो ६०:४० चा रेशो होता. दोन वर्षांत ४०:६० असा झाला. या बाबतीत

मी आपल्याला काही आकडेवारी देऊ इच्छितो. १९८३-८४ मध्ये जिल्हा नियोजनाकरिता ६४६.६२ कोटी रुपये ठेवले होते त्यापैकी राज्याच्या संचित निधीमध्ये १९०.७५ कोटी रुपये काढून घेण्यात आले. मग त्यांचा परिणाम असा झाला की, जिल्हा नियोजन ३० टक्क्यांवर आले आणि राज्य नियोजन ७० टक्क्यांवर आले. आजही ही परिस्थिती आपण पाहिली तर आपल्याला असे दिसेल की आताही जिल्हा नियोजन ३० टक्के आहे आणि राज्य नियोजन ७० टक्के आहे. या ठिकाणी श्री. वसंतराव नाईक यांनी सभ्यतेने भांडण सुरू केले. पण त्या भांडणालाही काटशह देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यानंतर, अध्यक्ष महाराज, नियोजनानंतरच्या काळामध्ये म्हणजे १९७४ ते १९८२-८३ मध्ये काय परिस्थिती होती त्यासंबंधी मी आकडेवारी देऊ इच्छितो. या काळामध्ये जिल्हास्तरीय योजनांचा खर्च पश्चिम महाराष्ट्रात १२२.६८ कोटी रुपये होता तर विदर्भात ७७.१ कोटी रुपये होता. तसेच जिल्हानिहाय योजनांचा खर्च पश्चिम महाराष्ट्रात १०१३ कोटी रुपये होता तर विदर्भात ६८५ कोटी रुपये होता.

मी जरूर मराठवाड्याच्या बाजूचा आहे. मी फक्त एक विषय घेऊन बोलत असलो तरी हे तत्त्व साऱ्या रिजनला लागू होईल. कारण ठरावाची भाषा विदर्भाबाबत असल्यामुळे मी विदर्भाच्याबाबत बोलणार आहे हे मी अगोदरच सांगितले आहे. धीस इज दि प्रिन्सिपल अप्लाइड टू ऑल रिजन्स. अध्यक्ष महाराज, विद्युत विकासावर १९७४ ते १९८२-८३ पर्यंत पश्चिम महाराष्ट्रावर झालेला खर्च ३९९.४३ कोटी रुपयाचा झाला आहे तर विदर्भावर १४४.९३ कोटी रुपये झाला आहे. उद्योगाच्या सामूहिक विकासासाठी पश्चिम महाराष्ट्रासाठी १९७४ ते १९८३ पर्यंत २८.४७ कोटी रुपये तर विदर्भासाठी १०.५८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. अध्यक्ष महाराज, म्हणजे नियोजनपूर्व कालखंडात १४ वर्षे आमचे शोषण केले आणि नियोजन आल्यानंतर इन्टेल्युक्चल कारण वसंतरावांनी घेतल्यावर हळूहळू अर्थात १९७५-७६ ला ते मुख्यमंत्री नव्हते. तो काळ वेगळा. पण दरम्यानच्या कालखंडात नियोजनाने ठरविलेले जे उद्दिष्ट होते त्याप्रमाणे पैशाचे वितरण करणे म्हणजे जवळ जवळ १९६० ते १९७४ समोरच्या दरवाज्याने पैसे लुटले आणि १९७४ ते १९८२-८३ पर्यंत मागच्या दरवाजाने पैसे लुटले. या चोरीचा अर्थ एकच की समोर चोरी करण्याचे धारिष्ट्य १४ वर्षे केले आणि मागून जाऊन चोरी करण्याचे धारिष्ट्य १२ वर्षे केले एवढाच फरक आहे. तेव्हा अध्यक्ष महाराज मी मघाशी म्हटल्याप्रमाणे जिल्हा नियोजनाची काही सूत्रे आहेत.

श्री. सुशीलकुमार शिंदे : आपणास कोठे जायचे आहे तेवढे सांगा म्हणजे झाले.

रा. सू. गवई : अध्यक्ष महाराज, नियोजनाचे जे निकष सांगितले आहेत ते मी एक मिनिटात आपल्याला वाचून दाखवितो. लोकसंख्या ६०, मागासवर्गीयाची लोकसंख्या ५ टक्के, नागरी लोकसंख्या ५ टक्के, शेतकीसंबंधी मागासलेपणा ५ टक्के, दळणवळणसंबंधी मागासलेपणा ५ टक्के, जलसिंचनासंबंधी मागासलेपणा ५ टक्के, औद्योगिक मागासलेपणा ५ टक्के, किनारपट्टीवरील जिल्हे १.५ टक्के, अवर्षणप्रवण क्षेत्र २ टक्के, वनक्षेत्र १.५ टक्के, विशेष समस्यासाठी राज्य पातळीवर राखीव ५ टक्के याप्रमाणे टोटल १००:१०० म्हणजे शंभर रुपयाचे वितरण कसे करावे यासंबंधी सूत्रे ओरिजनल या नियोजनाच्या गमकात दिली आहे. मी मघाशी आपल्याला म्हटल्याप्रमाणे अध्यक्ष महाराज, अर्थात मी जे सांगत आहे ते पूर्वी राज्य पातळीवर ७० टक्के खर्च जो आता मी जे अकरा घटक वाचून दाखविले यातील प्रमुख लोकसंख्या ६० टक्के, दळणवळण मागसलेपणा ५ टक्के, जलसिंचन ५ टक्के. यातही ओरिजनल सूत्रात दिवंगत आदरणीय नेते वसंतरावजी नाईक यांनी जो सुवर्ण बिंदू काढला तो ओरिजनल नियोजनाशी डिसअॅग्री होणारा

आहे. त्यांनी सुवर्णबिंदू काढला परंतु लोकसंख्येच्या प्रमाणावर ६० टक्के निधी दिला. जलसिचंनाला पाच टक्के, दळणवळणाला पाच टक्के या पद्धतीने जन्मभर अनुशेष भरून निघेल. परंतु एक निश्चित की ६० टक्के निधीमध्ये मॅक्झिमम पूल यावयाचा होता असे मी समजतो. पण ६० टक्के वसंतरावाचा पार उलथवून टाकला. साठचा तीस केला आणि राज्याला ७० टक्के केला ही निर्विवाद स्पष्ट गोष्ट आहे. ही गोष्ट खोटी असेल तर अर्थमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात तसे सांगावे. त्यानंतर अध्यक्ष महाराज, दांडेकर समितीने हा जो अनुशेष काढला आहे तो अर्थमंत्र्यांनाही अपरिचित आहे. अध्यक्ष महाराज, मी अर्थसंकल्पावर बोलताना म्हणालो होतो की, टोटल बजेटच्या एक चतुर्थांश भागावर आपण चर्चा करीत आहोत. मी ते अशा अर्थाने म्हणतो की, देअर आर सर्टेन नॉन प्लॅन प्रोजेक्ट ते अर्थसंकल्पात ॲपिअरच होत नाहीत त्याची आपण येथे चर्चा करीत नाही. मी अनेकदा आमच्या कर्तबगार अर्थमंत्र्यांना म्हटले आहे की, संपूर्ण बजेट चर्चेला आणा. लोकसभेत आणि राज्यसभेत तसे घडतेय. त्यांनी आता ऐकले असल्यामुळे कदाचित पुढच्या अंदाजपत्रकापर्यंत तसे ते आणतील. तशी ते सोय करतील अशी अपेक्षा आहे. मग १९६० पासूनचे आकडे उपलब्ध नाहीत. असे दांडेकर समितीने सांगून टाकले आणि म्हणून मला काही योजना गाळाव्या लागल्या. पुढे दांडेकर असे म्हणतात की, नॉन प्लॅन योजनामधील जो खर्च आहे तो देखील मला पुरा मिळालेला नाही. म्हणजे याचा अर्थ जवळ जवळ १,२०० कोटी रुपयांचा बॅकलॉग विदर्भाचा दांडेकर समितीने काढला. तो बॅकलॉग तंतोतंत आहे असे नाही. त्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ असा आहे की कदाचित सर्व आकडे उपलब्ध झाले असते तर हा बॅकलॉग अधिक वाढला असता. दुसरे मी मघाशी म्हटल्याप्रमाणे समजा विदर्भाच्या जिल्ह्याकरिता किंवा मराठवाड्याच्या जिल्ह्याकरिता कामाकरिता बजेटरी तरतूद केली आहे पण ती बजेटरी तरतूद पूर्ण झाली का हे कोण दाखवते तर परफार्मन्स बजेट आणि शासनाने जेवढे आकडे उपलब्ध करून दिलेत ते ओरिजनल बजेटचे आहेत परफॉर्मन्स बजेटचे नाहीत. म्हणजे एका जिल्ह्याकरिता १०० कोटी रुपये ॲलॉट केलेत आणि त्यातील ५० कोटी रुपयेच खर्च झालेत आणि ५० कोटी रुपये खर्च केले नाहीत तर ते ५० कोटी रुपये स्टेटपूलमध्ये आणले आहेत. या अशा प्रकारच्या एक नव्हे तर अनेक केसेस नियोजनपूर्व काळात आपणास वाचावयास मिळतील. याचा अर्थ हा की दांडेकर समितीने दिलेला बॅकलॉग हा देखील तंतोतंत खरा बॅकलॉग नाहीच आहे. अध्यक्ष महाराज, मी म्हटल्याप्रमाणे आज जवळ जवळ १,२४६.५४ कोटी रुपयाचा बॅकलॉग हा विदर्भाचा आणि मराठवाड्याचा आहे. कधीचा आहे? तर आणि रुपयाच्या मूल्याची वृद्धी किती झाली आहे? १९६० सालची रुपयाची किंमत धरू नका. समजा १९८६ मध्ये सव्वीस वर्षाच्या कालखंडात म्हणजे या २६ वर्षांला दोनाने भागले तर १३ वर्षे येतात, तेव्हा आपण तेरा वर्षे न धरता लिबरल होऊन १४ वर्षे धरू या. म्हणजे या १४ वर्षांच्या वनवासात म्हणजे जवळजवळ १९७४ सालापर्यंतचा हा बॅकलॉग कमी अधिक प्रमाणात ६०० ते ७०० कोटी रुपयाचा असावा. आणि १९७४ ते १९८६ पर्यंतचा काळातील सहाशे ते सातशे कोटी रुपये असावा म्हणजे दोन्ही मिळून १,३०० कोटी रुपये असावा. परत अजून यांच्याकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले गेले नाही. शास्त्रीय ॲप्लिकेशन झालेले नाही. पण दांडेकरांनी वर्कआऊट केलेला जो बॅकलॉग आहे तो करीत असतांना त्यांनी १९६६ साल पण धरले नाही आणि १९६० साल पण धरले नाही. त्यांनी पण लिबरल दृष्टिकोन ठेवून सुवर्णमध्य काढला. १९६० आणि १९८६ याचा मध्यबिंदू पकडला तर कमीत कमी या दरम्यानच्या काळात रुपयाचे मूल्य अडीच रुपयाने वाढले आहे. म्हणजे दांडेकर समितीने दाखविलेला १,२३६ कोटी रुपयाचा बॅकलॉग आज तीन हजार कोटी रुपयाचा झालेला नाही. अध्यक्ष महाराज, सांगलीच्या किंवा अन्य ठिकाणी बांधलेल्या धरणांवर

किंवा इरतत्र बांधल्या गेलेल्या धरणावर १९६६ पासून १९७४ पर्यंत झालेला खर्च जो आहे त्याचे मूल्य काय आणि आता त्याचा बॅकलॉग भरून काढावयाचा म्हटले तर आमच्याकरिता किती खर्च करणार आहात? आमच्याकडे त्या खर्चाच्या तुलनेत खर्च करावयाचे म्हटले तर आज रुपयांचे मूल्य अडीच ते तीन पट झालेले आहे. मी फक्त अडीच पट मूल्य वाढले असे म्हटले आहे म्हणजे जवळ जवळ विदर्भाचा बॅकलॉग हा काढावयाचा म्हटला तर किती तरी पैसे द्यावे लागतील. मी तर मुद्दाम म्हणेन की रिजनल बॅकलॉग काढावयाचा म्हटले तर मी जरूर वेळ पडली तर पुढच्या अधिवेशनामध्ये मराठवाड्यासंबंधी बोलेन. परंतु तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयाचा बॅकलॉग चौदा वर्षांच्या काळातील पूर्ण करावयाचा आहे. म्हणजे १९६० ते १९७४ आणि १९७४ ते १९८६ असे दोन वनवास असून चौदा वर्षांचा पूर्ण वनवास आणि बारा वर्षांचा अपूर्ण वनवास. रामाला बिचाऱ्याला एक वनवास भोगावा लागला. परंतु विदर्भाला आणि इतर मागासभागाला चौदा वर्षांचा एक पूर्ण वनवास आणि बारा वर्षांचा राहिलेला अपूर्ण वनवास भोगावा लागला असून अजून हा अपूर्ण वनवास १९८८ सालापर्यंत भोगावयाचा आहे. दोन वर्षांत तो पूर्ण वनवास होईल. अध्यक्ष महाराज, मुख्यमंत्र्यांनी विदर्भाकरिता ३३ कलमाचा कार्यक्रम जाहीर केला असून मराठवाड्याकरिता पण काही कलमाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. अर्थात मी त्या कलमाची टिंगल उडवत नाही पण मी असे विचारु इच्छितो की, नियोजन कालखंडामध्ये विदर्भातील वर्धा, अप्पर वर्धा, लोअर वर्धा, तापी आणि ज्या धरणांच्या कामांचा उल्लेख केला आहे तो उल्लेख १९७४ ते १९८६ च्या कालखंडामधला आहे. तेवढ्या काळात जलसिंचनाचे उद्दिष्ट होते पण ते जलसिंचनाचे उद्दिष्ट पूर्ण तर झाले नाहीत पण रिपीट झाले काय? रिपीट झाले तर तेच रिपीट झाले. त्याच जल सिंचनाच्या योजना पूर्ण करण्याचे रिपीट झाले. वास्तविक पाहता १९७४ ते १९८६ या कालखंडात या योजनांचे काम पूर्ण व्हावयास पाहिजे होते त्याचीच घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आणि आम्ही बॅकलॉग भरून काढू परंतु अध्यक्ष महाराज, नुकसानभरपाईच्या तत्त्वाने म्हणजे लॉ ऑफ कॉम्पेन्सेशनच्या थियरीप्रमाणे कमीत कमी नियोजनानंतरच्या कालखंडात म्हणजे बारा वर्षांच्या कालखंडात तरी हा बॅकलॉग भरून काढावयास पाहिजे होता.

नुकसानभरपाईच्या तत्त्वाने कमीत कमी नंतरच्या १२ वर्षांमध्ये तरी हा बॅकलॉग भरून काढावयास पाहिजे होता. ही नुकसानभरपाईची थिअरी पलटवून आणि आता प्रॉस्पेक्टिव्ह इफेक्ट देऊन आम्ही तुमचा बॅकलॉग ... रस्त्याचा बॅकलॉग ९० मध्ये, कोणत्या तरी धरणाचा बॅकलॉग ९० मध्ये, कोणत्या तरी दुसऱ्या धरणाचा बॅकलॉग ९५ मध्ये अशा प्रकारे जर हा बॅकलॉग आपण भरून काढणार असलो तर मग ही विदर्भाची आणि इतर अविकसित विभागाची क्रूर चेष्टा आहे असे म्हणावे लागेल. एवढेच नाही तर १४ वर्षांच्या वनवासाचे दुःख आणि अपूर्ण अशा १२ वर्षांच्या वनवासाचे जे त्यांचे दुःख आहे त्यांच्या जखमेवर आपण मीठ चोळणे अशी ही परिस्थिती आहे. अध्यक्ष महाराज, माझे भाषण समाप्त करताना मी सांगेन की, यासंबंधी काही पर्याय आहे का? तर पर्याय मी अगोदरच स्पष्ट केलेला आहे की, दुर्देवाने तब्बल २४ वर्षे वाट पाहूनही जर हे घडले नसेल तर मग असंतुलनाची प्रादेशिक भावना मराठवाड्यामध्ये निर्माण झाली, विदर्भामध्ये निर्माण झाली असे म्हणणे ही त्या जनतेला शिवी आहे. त्यांच्या सहनशीलतेची कमाल आहे. २६ वर्षे तुमचा सासुरवास होऊन गेला आहे. सासूने सुनेला राबविण्याचे जे माणुसकीचे धोरण आहे ते तुम्ही पार बदलले आहे आणि यातून जर असंतुलित भागाला संतुलित करण्याच्या भावना पुढे येत असतील तर मग प्रादेशिक भावना वाढवितात असे म्हणावयाचे किंवा महाराष्ट्राच्या इंटिग्रिटीला तडा देतात असे म्हणणे चुकीचे आहे. याच्यावर अतिशाबासकीने सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर बोलले जाते की ठीक आहे, पाहिजे

असेल तर तुमचा विदर्भ अलग करून टाका. अध्यक्ष महाराज, २६ वर्षांच्या शोषणानंतर आता तुमच्या संपूर्ण कारभारावर बसून शोषणमुक्त करून घेण्याच्या दृष्टीने, कॉम्पेन्सेट करून संपूर्ण महाराष्ट्र एक राहील या भावनेने वागू. तुम्ही अन्याय केला तरी त्याचा प्रतिकार करू. आमच्यामध्ये विघटनेची भावना, विभाजनाची भावना मुळीच नाही. १९८६ सालामध्ये जिल्हा नियोजनाचे प्रमाण ७० टक्के आणि ३० टक्के आले असले तरी त्यातूनही मी मार्ग सांगतो. अर्थमंत्र्यांना मंजूर असेल तर मग नियोजन कसे बदलावे हे मी सांगतो. नियोजन कशात-हेने बदलता येईल? आपण हळूहळू सरकत सरकत वसंतराव नाईकांचा जो ६०:४० रेशो होता तो बदलून ३०:७० असा केला आहे. म्हणजे ६० जिल्हा आणि ४० राज्य असा होता तो बदलून आपण ३० जिल्हा आणि ७० राज्य असे केले आहे. तेव्हा स्टेट पुलामधील जो ७० टक्के निधी आहे त्याचे जिल्हावार वितरण काय आहे याचे उत्तर अर्थमंत्री मला देतील काय? मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या काही मोठ्या योजना जिल्ह्यांमध्ये होतात त्या म्हणून आम्हाला करता येत नाही या गोंडस नांवाखाली पैसा डायव्हर्ट केला जातो. या ७० टक्के रेशोमधील जो काही पैसा खर्च होतो तो मॅक्झिमम प्रमाणात विकसित जिल्ह्यांमध्ये खर्च केला. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खर्च केला, कोकणात केला नाही, मराठवाड्यात केला नाही. विदर्भामध्ये सुद्धा केला नाही. तेव्हा मला असे सांगावे की, हा जो संचित निधी आहे त्याचे आपण कधी मूल्यमापन घेतले आहे काय? असंतुलन दूर करण्याकरिता आपण ७० टक्के पैसा वापरतो त्याचे आपण इव्हॅल्यूएशन केले आहे काय? त्याचा परफार्मन्स तुम्ही दिला आहे काय? त्यासंबंधीच्या इव्हॅल्यूएशनचा रिपोर्ट तुम्ही दिला आहे काय, मला पूर्ण खात्री आहे की, या साऱ्या प्रश्नांची उत्तरे अर्थमंत्र्यांना "नाही" अशीच द्यावी लागतील. अध्यक्ष महाराज, ठीक आहे. आपण नियोजन बदलवून ते ३०-७० पर्यंत आणले आहे. म्हणजे जिल्ह्याकरिता ३० आणि राज्याचे ७० आता वसंतराव नाईक यांनी जो फार्म्युला सुचविला होता त्याच्या एक पाऊल पुढे जाऊन मी असे सुचवितो की, जर तुम्हाला नियोजन बदलावयाचे असेल तर ७० टक्के जिल्हा करा आणि ३० टक्के राज्य करा. हे जर मंजूर नसेल तर मला हे मंजूर आहे की, ३० टक्क्यांचा जो परावर्तित झालेला फार्म्युला आहे तो कायम ठेवा. ७० टक्के स्टेट पुलामध्ये घ्या. राज्याच्या संचित निधीत घ्या. परंतु ७० टक्के म्हणजे १०० रुपये समजून १०० पैकी ८० टक्के पैसा हा अनुशेष भरून काढण्याकरिता ठेवा. म्हणजे आपल्याला एका पंचवार्षिक योजनेमध्ये हा अनुशेष भरून काढता येईल. परिवर्तित केलेले प्लॅनिंग जरी बदलले तरी, तुम्ही चूक केली तरी सुद्धा मी निक्षून सांगतो की, ठीक आहे. ॲज इट इज, जिल्ह्याला जरी ३० टक्के दिले आणि संचित निधीमध्ये जरी ७० टक्के असले तरी मी मघाशी सांगितल्याप्रमाणे तो फिगर जर १०० रुपये धरली तर त्यातून ८० रुपये हे रिजनल बॅकलॉग दूर करण्याकरिता उपयोगी होतील. मग मराठवाडा असो, विदर्भ असो, पश्चिम महाराष्ट्र असो. तेव्हा आपण आपले सूत्र बदलण्यास तयार आहोत काय? अध्यक्ष महाराज, यामध्ये एक ग्यानबाची मेख आहे. जिल्हा नियोजनामध्ये स्पष्ट शब्दात असे सांगितले आहे की, चालू असलेली विकासाची कामे आहेत त्यात खंड पडता कामा नये. म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील जी अपुरी धरणे आहेत ती आम्ही म्हातारे होईपर्यंत पूर्ण होतील काय? असे काही झाले म्हणजे मग हा संपूर्ण राज्याचा विकास आहे असे म्हटले जाते. उजनी धरण कशाला बंद ठेवता. धोम कशाला बंद ठेवता. धोम धरणाचे पाणी साता-यामधून जाते परंतु सांगलीच्या वस्ताद लोकांनी खालून कालवे काढून पाणी नेले आहे. म्हणजे यात सांगली-सातारा अशी इंटरनल

स्पर्धा सुद्धा आहे. धोम धरण साताऱ्याला आणि पाणी जमिनीच्या खालून सांगलीला. म्हणजे इंटरनल कॉम्पिटीशनमध्ये त्यांनी इंम्बॅलन्स निर्माण केला. पण आम्ही ज्यावेळी ओव्हरऑल विकास करतो त्यावेळी धोम धरणाचे पाणी कुठे जाते, उजनीचे कुठे जाते, भीमाचे कुठे जाते. त्याला म्हणतात रिजनल, कोणत्याही धरणाचे पाणी वाटून देऊन ते एका जिल्ह्याला म्हणून देत नाही. यात जायकवाडी प्रकल्प हा प्रतिष्ठेचा आहे. सुरुवातीस तो पैठणला झाला असला तरी तो प्रकल्प आता फक्त औरंगाबादचा राहिलेला नाही. तर तो पार परभणीपर्यंत गेला आहे. जवळ जवळ अर्धा मराठवाडा घेतला आहे. मी त्याचे समर्थन करतो. मग आपल्याला प्रादेशिक असमतोल दूर करावयाचा असेल तर आणि अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करावयाची असतील तर पैसा दिला पाहिजे. ज्या भागामध्ये असमतोलपणा आहे आणि त्यांच्या विकासाकरिता जर आपण पैसा देणार नसलो तर त्याचे नांव आहे व्हीशियस सर्कल म्हणजे दुष्टचक्र. हे दुष्टचक्र कधीही संपावयाचे नाही. ज्यावेळी आमच्या विकासाचा प्रश्न येईल त्या त्या वेळी शासन म्हणेल की, राज्याच्या विकासाला महत्त्व द्या. आम्ही जर राज्याच्या विकासाला आडवे येतो असे म्हटले तर मग शासन म्हणेल की, गवई, फडणवीस, लहाने, कराळे हे विदर्भातील लोक नतद्रष्ट आहेत. राज्याचा विकास करून देत नाहीत. ॲट द कॉस्ट ऑफ विदर्भ, ॲट द कॉस्ट ऑफ मराठवाडा, ॲट द कॉस्ट ऑफ कोकण ... दळणवळणाचा १९७४ सालचा आयटेम आहे. रस्त्यांसाठी १,५०० रुपये आहेत. यात काही उदाहरण अशी आहेत की ५०० रुपये हे तीन जिल्ह्यांनी वाटून घेतलेले आहे. डिस्ट्रीब्यूशनच नाही. तुमचे मोठे प्रकल्प असतील तर आम्ही तरी कुठपर्यंत वाट पहावयाची? यासाठी अध्यक्ष महाराज, मराठीत एक म्हण आहे. आई जेवू देत नाही आणि वडील भीक मागू देत नाहीत. अध्यक्ष महाराज, जिल्हा प्लॅन ३० टक्के केला आहे. वेळोवेळी विधानपरिषदेमध्ये प्रश्न विचारले जातात. आमच्या जिल्ह्यामध्ये पूल बांधावयाचा आहे? आणखी काही करावयाचे. पण या प्रश्नाला उत्तर मिळते की, जिल्हा नियोजनाचे सेक्शन आणा. म्हणजे १२-१३ कोटी जर जिल्हा नियोजनात असतील आणि या कामासाठी जर दोन-तीन कोटी रुपये खर्च करावयाचा झाला तर त्या नियोजनाची कंबरच मोडेल. तेव्हा काम करण्याकरिता जिल्हा नियोजनाकडे बोट दाखवावयाचे म्हणजे आई जेवू देत नाही अशातील प्रकार आहे आणि राज्यातील पैसा आपण सर्व तिकडे खर्च करता म्हणजे वडील भीक मागू देत नाहीत अशी विदर्भाची अवस्था झालेली आहे. आणि असंतुलित जो रिजनल भाग आहे त्याची सर्वात जास्त वाईट अवस्था आज झालेली आहे.

अध्यक्ष महाराज, जिल्हा नियोजनाचा प्रमुख घटक ज्याच्यासंबंधी आज सार्वजनिक चर्चा सुरू आहे. तो असा आहे की, आता तुम्ही लोकसंख्येला प्राधान्य द्यावे. कोणत्या लोकसंख्येला आपण प्राधान्य देणार? सोलापूरच्या सुशीलकुमार शिंदेना देणार की, अमरावतीच्या रा. सू. गवईना देणार? कशी काय तुलना होईल त्यांची? ज्या भागाचा काही भाग विकसित झाला त्याचा पूर्ण कॉम्प्लेक्स विकसित झालेला आहे. एखाद्या भागातील तालुका विकसित झाला म्हणजे मग जिल्हे देखील विकसित होतात. लोकसंख्येच्या गमका-बरोबर त्या त्या जिल्ह्याचे दर माणसी, दरडोई ॲन्युअल उत्पन्न लक्षात घ्या. सरासरी वार्षिक उत्पन्न लोकसंख्येला ट्रॅग करा. आणि मग त्या त्या जिल्ह्याचा जो जो वाटा येईल तो तो त्या त्या जिल्ह्याला द्या. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आज आपण लोकसंख्येचे गमक विसरलो. रेशो विसरलो. घडले काय ते पहा. आपण दांडेकरांचे पुस्तक पहा. एस्टीमेट कमिटीचा अहवाल पहा. त्यांनी सरळ सांगितलेले आहे की, वसंतराव नाईकांचे नॉर्म्स जर कायम राहिले असते तर ठीक होते. पण आता आपण ते बदलल्यामुळे ७० टक्के पैसा स्टेटला गेला. त्यामुळे त्या त्या जिल्ह्याला जेवढा पैसा मिळणे न्याय्य होते त्या त्या जिल्ह्याला त्यापेक्षा तो जास्त मिळाला. वेस्टर्न महाराष्ट्राला जेवढा पैसा मिळणे क्रमप्राप्त

होते त्यापेक्षा जास्त पैसा मिळाला आणि ज्या जिल्ह्यांना जास्त पैसा मिळणे आवश्यक होते. त्यांना तो कमी मिळाला. याला म्हणतात जादुगार. या बोटाची थुंकी त्या बोटावर करणारे, वेस्टर्न महाराष्ट्राच्या लोकांना आम्ही नेते मंडळी मानतो. मोठी जोरदार नेते मंडळी आहेत ती. त्यांच्याबद्दल आमच्या मनामध्ये आदर आहे. असे दाखविले गेले की, जणूकाही हे नियोजन म्हणजे सर्वांच्या करिता नियोजन. जिल्हा नियोजन करून आम्ही असंतुलन दूर करतो ही भावना निर्माण करण्यात आली. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. एखादा माणूस एकदा खोटे बोलेल, दोनदा खोटे बोलेल, तीनदा खोटे बोलेल परंतु सदैव खोटे बोलता येणार नाही काही वर्षे आपण लोकांना फसवू शकाल परंतु एक दिवस असा येईल की लोक आपल्या सांगण्याला फसणार नाहीत. या असंतोषातून जर उद्रेक निर्माण झाला तर त्याला जबाबदार तुम्ही मंडळी आहात की, ज्यांचे आम्ही नेतृत्व स्वीकारलेले आहे.

अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी शेवटचा मुद्दा मांडतो. आपल्याकडे जिल्हा नियोजन मंडळे आली. दरम्यानच्या ५ वर्षांच्या कालखंडामध्ये जिल्हा नियोजन मंडळाने ॲप्रूव्ह केलेल्या स्किम स्क्रुटीनाईझ केलेल्या आहेत का? आता त्या कामाला आपण सुरुवात केलेली आहे. परंतु गेली ५ वर्षे त्या स्क्रुटीनाईझ केल्या नव्हत्या. मा. अर्थमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, अर्थमंत्रिपद हे नियमीत असते. मंत्री महोदय, श्री. सुशीलकुमार शिंदे हे चांगलेच आहेत, समजदार आहेत. मी या ठिकाणी अर्थमंत्री म्हणून मा. सुशीलकुमार शिंदे यांना बोलत नाही. गेली ५ वर्ष डिस्ट्रीक्ट प्लॅनची स्क्रुटीनी झाली नाही. आपली तत्त्वे काय आहेत? पैसे खर्च करण्यामध्ये वेस्टर्न महाराष्ट्राची मंडळी हुशार आहेत. आपल्याला त्याची एक ट्रीक सांगतो. आपल्याला दाखवताना ते लाडू दाखवतात आणि देताना गारगोटी देतात. तुम्ही संपूर्ण अंदाजपत्रक वाचून पहा. परफॉर्मन्स बजेट वाचून पहा. अंदाजपत्रकामध्ये जळगावला ६० कोटी रुपये ३१ मार्च १९८६ पर्यंत देण्यात आले. एवढ्या रुपयांची तेथे प्रोव्हिजन करण्यात आली परंतु आपल्याला तेथे काही घडवावयाचे नाही ना ? मग तेथे प्लॅन एस्टीमेट काही करायचे नाही आणि मग जानेवारी, फेब्रुवारी महिना आला की, सांगायचे की, तुम्ही काम करीत नाही. मग रिॲप्रोप्रिएट करा. Reappropriation is the fashion of Western Maharashtra leader. They are exploited with this fashion. या फॅशनने आम्हाला एवढे एक्सप्लॉईट केलेले आहे. एखादा व्यापारी सुद्धा एवढे करील किंवा नाही यात शंका येते. आम्ही सज्जन माणसे आहोत. आम्ही दुर्जन नाही. आम्ही आरडाओरड करीत नाही. पण आमच्या सज्जनतेचा हा उपयोग आहे. अध्यक्ष महाराज, शिरणीसारखे किंवा प्रसादासारखे पैसे वाटून गरीबी दूर होत नाही. Poverty cannot be removed by mere distribution. You have to see the evaluation. तुम्हाला मूल्यमापन केले पाहिजे. ६०० ते ७०० कोटींचे आमच्या विदर्भाचे शोषण झालेले आहे. जो १४ वर्षांचा वनवास आहे. तो मी तुम्हाला माफ करून टाकतो. परंतु १९७४ ते १९८६ या १२ वर्षांचे तरी मूल्यमापन तुमच्याकडे आहे काय? या मूल्यमापनामध्येही पश्चिम महाराष्ट्रामध्ये एक्सप्लॉयटेशन झालेले आहे. जिल्हा नियोजनांचे जे नॉर्मस सांगितले आहेत, इम्प्लीमेंट झाले पाहिजे आणि त्यासंबंधी सभागृहाला रिपोर्ट झाला पाहिजे. कमीत कमी तुमच्या मनात तरी भीती नको. पतिव्रतेला कशाची भीती आहे. तुम्ही खऱ्या खुऱ्या पतिव्रता असाल तर सांगा.

मी हे या अर्थाने म्हटले की, आम्ही पतिव्रता आहोत. आम्ही ज्याच्या नावाचे कुंकू लावतो त्याचेच नाव घेतो. नाही तर कुंकू लावाल विदर्भाचे आणि संसार कराल पश्चिम महाराष्ट्राचा असे होऊ नये. १४ वर्षांचा रामाचा पूर्ण वनवास आणि त्यानंतर १२ वर्षे अपूर्ण वनवास. तरी आता कमीत कमी शहाणे व्हा. समजदार व्हा आणि नुकसानभरपाई द्या. मी सांगितले त्या तत्त्वाने अविकासित भागाला, विदर्भाला

एचबी ११८०—२७

न्याय द्या. त्याचबरोबर मराठवाड्याला आणि कोकणालाही न्याय द्या. हे स्पष्ट करीत असतांना या सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर माझ्यासंबंधी गैरसमज होऊ नयेत. हा ठराव मी मांडला आहे तो घटनेच्या ३७१(२) कलमान्वये निर्माण करावयाच्या स्वायत्त मंडळाला पर्यायी किंवा नलिफाय करण्याकरिता मांडलेला नाही. परंतु दरम्यान तुम्हाला काही सुचवावे. तुम्ही वाट पाहत आहात की कधी एकदा मराठवाड्याचा आणि विदर्भाचा बॅकलॉग दूर करू. यासाठी तुमची सारखी धडपड चालली आहे. अध्यक्ष महाराज, स्वप्नामध्ये सुद्धा विदर्भाचा बॅकलॉग त्यांना दिसतो. हा बॅकलॉग दूर करण्याच्या दृष्टीने मी काही ॲडिशनल सूचना हा ठराव मांडून केलेल्या आहेत. मी सांगितल्याप्रमाणे जिल्हा नियोजनांचे नॉर्म्स बदलून विदर्भाचा बॅकलॉग शासनाने दूर केला पाहिजे. Thereby the Hon. Minister should help us in achieving the overall development of Vidarbha. अध्यक्ष महाराज, मला खात्री आहे की नियोजनाचे नॉर्म्स बदलून विदर्भाचा विकास आपल्याला करता येईल आणि गुड नेचर दाखवता येईल. सन्माननीय अर्थमंत्री हे लोकप्रिय मंत्री आहेत आणि माझे वैयक्तिक मित्र सुद्धा आहेत. हा ठराव मांडत असताना मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचना अंमलात आणण्याच्या दृष्टीने माननीय मंत्री महोदय होय असे उत्तर देतील याबद्दल मला खात्री आहे. विदर्भातील बॅकलॉग दूर करण्यासंबंधी मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचना स्वीकारल्या आणि जिल्हा नियोजनाचे नॉर्म्स बदलले तर सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुशीलकुमार शिंदे यांची देशभर प्रसिद्धी होईल. अध्यक्ष महाराज, श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्याबद्दल आदर ठेवून मी या ठिकाणी ज्या काही मित्रत्वाच्या, प्रेमाच्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा त्यांनी स्वीकार करावा. अध्यक्ष महाराज, या ठरावावर बोलण्यासाठी मला वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो

❑❑❑

आणखी किती वर्षे अर्थसंकल्पात दुष्काळचा उल्लेख?

(१९ मार्च, १९८६)

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा म्हणजे विधिमंडळ सदस्यांसाठी राज्याच्या परिस्थितीवर आपली अभ्यासपूर्ण मते व्यक्त करण्याची आणि आर्थिक विकासाला गती कशी देता येईल याबद्दल सरकारला सूचना करण्याची अपूर्व संधी असते. राज्याच्या १९८६-८७ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर विधानपरिषदेत झालेल्या चर्चेत १९ मार्च, १९८६ रोजी रा. सू. गवई यांनी अवर्षणप्रवण भाग, दुष्काळ याबाबतचा उल्लेख आणखी किती वर्षे ऐकावयाचा असा सवाल अर्थमंत्र्यांना केला. मुंबई शहरासाठी अर्थसंकल्पातील शंभर कोटी रुपयांची तरतूद अपुरी आहे. दिल्लीसाठी ६० ते ७० हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले असतील तर मुंबईसाठी शंभर कोटी रुपये अत्यंत कमी आहेत, असेही खडे बोल त्यांनी सुनावले.

अर्थसंकल्पामध्ये अवर्षणप्रवण भाग दुष्काळ याबाबतचा तोच तोच उल्लेख किती वर्षे ऐकावयाचा. किती वर्षापर्यंत हे रडगाणे चालू राहणार आहे? दुष्काळाच्या बाबतीत परदासानी कमिटी, सुकथनकर कमिटी दांडेकर कमिटी

आणि शासकीय कमिटी शासनाने नेमली असून त्या कमिट्यांनी आपले अहवाल शासनाला दिलेले आहेत. असे असताना पुन्हा पुन्हा तेच रडगाणे चालू असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय अन्नधान्याचे उत्पादनातील लक्ष्य साध्य होत नाही कारण ड्राट प्रोन एरिया आहेत. ड्राट प्रोन एरियाच्या बाबतीत किती दिवस राहणार आहात? १०० वर्षे की ३०० वर्षे? ड्राट प्रोन एरियाशी मुकाबला करण्याच्या दृष्टीने आणि त्या भागातील लोकांना का अंदाजपत्रकातूनच काही दिलासा देण्यात येणार आहे किंवा नाही? आता दिलासा देण्यात येणार नसेल तर जेव्हा बजेट मांडण्यात येणार आहे तेव्हा तरी दिलासा देण्यात येणार आहे काय? नैसर्गिक आपत्ती आणि दुष्काळ एखाद्यावेळी येतो तो भाग वेगळा परंतु याबाबतचे रिपीटेशन किती वेळा करण्यात येणार आहे? वारंवार त्यासोबतचा उल्लेख करणे हे काही बरोबर वाटत नाही. तेव्हा याबाबत अंतर्मुख होऊन विचार करावयास पाहिजे आणि संपूर्ण बजेट ज्यावेळी मांडण्यात येईल त्यावेळी अवर्षणप्रवण क्षेत्राला, दुष्काळी भागातील तालुक्यांना आणि जिल्ह्यांना काही तरी भरीव असा कार्यक्रम देण्यात येईल याबाबतचा विचार व्हावा अशी माझी या निमित्ताने सूचना आहे. अर्थसंकल्पामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, १९८४-८५ मध्ये ९७.३६ टन असलेले अन्नधान्याचे एकूण उत्पादन आता ९१ लाखांवर येईल अशी अपेक्षा आहे. ज्या ठिकाणी दुष्काळ आहे त्या ठिकाणी पोटेन्शिअल असूनसुद्धा टारगेट साध्य होणार नाही. तेव्हा अन्नधान्याची तूट भरून काढण्याच्या दृष्टीने काय सूचना देण्यात आल्या आहेत? त्यानंतर अर्थमंत्र्यांच्या भाषणात पुढे असेही म्हटलेले आहे की, १९८५-८६ मध्ये भुईमुगाच्या उत्पादनामध्ये २२ टक्क्यांनी घट होण्याची शक्यता आहे. आणि तेलबियांचे एकूण अंदाजित उत्पादन १३.२९ लाख टन इतके होईल अशी अपेक्षा आहे. तेल-बियांच्या बाबतीत ३० टक्के इतकी कपात होईल असे मला वाटते. तेलाचे भाव वाढलेले आहेत. त्याबाबतीत काय उपाययोजना करण्यात येणार आहे? की केवळ त्याचा स्ट्राईकिंग रेफरन्स द्यावयाचा आणि त्यावर उपाययोजना सुचवावयाची नाही हे काही बरोबर होणार नाही. माझे मित्र सन्माननीय सभासद श्री. लहाने यांनी मघाशी जो मुद्दा उपस्थित केलला आहे तो मुद्दा मी अधिक स्पष्ट करू इच्छितो. मार्जिन मनी देण्यात यावा हा भाग वेगळा भाग आहे परंतु त्याकरिता ३०० कोटी रुपयांची मर्यादा आहे. मार्जिन मनी देत असताना इनकमबन्ट ६० कोटी रुपये द्यावयास पाहिजे होते परंतु ते दिलेले नाही. त्यापैकी ४० कोटी रुपये दिलेले आहेत आणि अजून २० कोटी रुपये राहिलेले आहे. कर्जाची मर्यादा ५०० कोटी झाली आहे. एकंदर बॅकलॉगचा विचार केला तर तो ६० कोटी रुपयांचा आहे. शेतकऱ्यांकडे असलेला कापूस खरेदी केला आणि त्याची किंमत १०० कोटी रुपये आली तर त्याचा बॅकलॉग ९० कोटी रुपयांचा बॅकलॉग या योजनेमध्ये आहे असे आकडेवारीवरून स्पष्ट होते. ४० कोटी रुपये जरी दिलेले असले तरी किती द्यावयास पाहिजे होते याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला नाही. गारपिटीबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. परंतु गारपीटग्रस्त लोकांना मदत म्हणून एक पैसाही दिलेला नाही. त्या लोकांना मदत करावयाची असेल तर त्याकरिता काय उपाययोजना सुचविण्यात येणार आहे त्याबाबत काहीही उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला नाही. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत शासनाने जो अंदाज केलेला आहे. या बाबतीत मी पुन्हा एकदा या मार्च महिन्यात सांगू इच्छितो की अनेक अधिवेशनांमध्ये मी हे सांगितलेले आहे आणि त्याचप्रमाणे माझा अंदाज खरा ठरलेला आहे. शासनाने असे सांगितले आहे की एकूण १४,२५० गावांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने कामे हाती घेण्यात येतील. नागरी विभागातील ११० ठिकाणी एकूण १५.४३ कोटी रुपये खर्चाच्या योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील आणि नागरी भागातील केवळ एवढीच

एचबी ११८०—२७अ

गावे टंचाईग्रस्त आहेत असे शासनाने समजू नये. शासनाने या ठिकाणी जो ब्रेकअप दिलेला आहे आणि जे मार्ग काढलेले आहेत तो भाग वेगळा आहे. अर्थसंकल्पामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, राज्यातील एकूण ४०,७६० गावे आणि ४०,०९२ वस्त्या यापैकी १७,१२१ गावे आणि १३,१७६ वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे १७,६९० गावे व १७,०२१ वस्त्यांना अंशतः पाणीपुरवठ्याची सोय झालेली आहे. मी पुन्हा एकदा हे सांगू इच्छितो की या ठिकाणी जे अंदाज सांगण्यात आलेले आहेत—पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत जे परस्पेक्टिव्ह प्लॅनिंग करण्यात आलेले आहे ते चुकीचे आहे. एवढे भयानक संकट पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत येणार आहे की त्यामुळे जे अंदाज आता करण्यात आलेले आहेत ते चुकीचे आहेत. मानखूर्द-बेलापूर रेल्वे लाईन बांधण्यात येणार आहे परंतु तेथील लोकांचे पुनर्वसन शासनाला करावे लागणार आहे. त्याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये कोठेही करण्यात आलेला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी चहा-पानाच्या औपचारिक बैठकीमध्ये सांगितले की मुंबईचा आम्हांला गर्व आहे. महाराष्ट्राची ती राजधानी आहे. तिचे मोठेपण वाढविणे हे आमच्या हातामध्ये आहे. आणि असे असताना आपण १०० कोटी या मुंबईसाठी दिले पण तेसुद्धा कसे तर हप्त्याने. मी समजलो होतो की आम्हाला या मुंबईसाठी म्हणून १०० कोटी मिळालेसुद्धा. अर्थात हे १०० कोटीसुद्धा अपुरेच आहेत. इतर शहरांच्या तुलनेने पाहता, उदा. दिल्ली, दिल्ली शहर आपण राजधानी म्हणून विकसित केले त्यासाठी जो खर्च केला तेवढा खर्च या मुंबईसाठी आपण दिला पाहिजे. कारण आज दिल्ली सोडली तर देशात जास्त महत्त्वाचे अगदी दुसऱ्या क्रमांकाचे असे केवळ मुंबई हेच एकमेव शहर आहे, महत्त्वाचे शहर आहे. तेव्हा दिल्लीसाठी जर आपण ६०-७० हजार कोटी खर्च केले असतील, तर मुंबईसाठी हे १०० कोटी रुपये अत्यंत कमी आहेत यात काही शंका नाही. तेव्हा अध्यक्ष महाराज, मी याकडे सुद्धा आपल्या वित्त संस्थांचे लक्ष वेधू इच्छितो. त्यानंतर मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या ज्या इतर योजना आहेत त्यावरसुद्धा आपण किती खर्च करणार आहात आणि त्यातील किती खर्च हा योग्य प्रमाणात होणार आहे? वीस कलमी कार्यक्रमासाठी आपण १३२७ कोटी रुपये खर्च करणार आहात. स्पेशल कंपोनंट प्लॅनसाठी ५३.९४ कोटी खर्च करणार आहात. अशाच प्रकारे आदिवासी उपयोजनेवर १०७ कोटी खर्च करणार आहात. त्यानंतर आयआरडीपीआरएलपी आदी योजना आहेत. अशा प्रकारे या योजनांवर जवळ जवळ १५०० कोटींचा खर्च आहे. अध्यक्ष महाराज, परवा मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानाच्या बैठकीत तसेच खाजगीमध्येही त्यांना सांगितले आहे आणि आजही सांगू इच्छितो की, या आयआरडीपी एमआरइपी, आरएलइपी वगैरे योजना आहेत या योजना म्हणजे जवळ जवळ भ्रष्टाचाराची कुरणे आहेत. ज्या उद्दिष्टाने हा संपूर्ण पैसा आपण या योजनेमध्ये देतो, शेवटच्या तळागाळातील माणसापर्यंतच तो पोहोचावयास पाहिजे असे आपले उद्दिष्ट असते, तेथपर्यंत तो पोहोचत नाही. जास्त स्पष्ट करून सांगायचे तर हे १५०० कोटींचे पाणी ज्यातून वाहून चालले आहे त्याला मोठमोठी भोके पडलेली आहेत. त्यामुळे ते पाणी गरिबांपर्यंत पोहोचत नाही. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, त्यातील जवळ जवळ ६०० ते ८०० कोटी म्हणजे सुमारे ६० टक्के भाग हा भ्रष्टाचारातून खाल्ला जातो. खर्च होतो तेव्हा अशा प्रकारे गरिबांसाठी खर्च करणार असाल आणि यातील हजारो कोटी रुपये खाणार असाल तर दारिद्र्य रेषेखालील माणसाला दारिद्र्यरेषेवर आणण्याचे उद्दिष्ट हे नकली आहे असेच म्हणावे लागेल, आणि दारिद्र्यरेषेखालील जे कोणी लोक आपण वर काढले आहेत असे आपल्या कागदावर दाखविले आहे तेही नकली आहे. अध्यक्ष महाराज, हे मी सिद्ध करण्यास तयार आहे. या सदनाचे एक सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. भापसे यांचे जे आंदोलन आहे

त्यासाठी त्यांना मी नवीन माहिती देऊ इच्छितो. या १५०० कोटी रुपयांतील दरवर्षी सात-आठशे कोटी रुपयाचा भ्रष्टाचार अगदी संगनमताने करतात, त्यामध्ये कोणाचे नाव घेण्याची गरज नाही. सगळ्यांनाच त्याची माहिती आहे. म्हणजे जेथे केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे कार्यक्रम आहेत त्यासाठी १,५०० कोटी आपण खर्च करणार आहोत आणि त्यातून दारिद्र्यरेषेखालील लोकांना वर आणावयाचे आहे. प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याच्या प्रवृत्तीचे हे लोक त्या योजनेतील पैसे खात असतात. हे जर आपल्याला थांबवावयाचे असेल तर आपण या योजनाचा नियमित फॉलोअप घ्यावा. तसे करीत असाल तर त्याची आम्हाला माहिती द्या. या योजनेचे मूल्यमापन झालेले आहे ते द्या. म्हणजे आम्ही यातून आपल्याकडे काहीही नवीन पैसे मागत नाही, तर जे पैसे आहेत त्याचाच योग्य तो फॉलोअप द्या. असे जर आपण केले नाही तर हे असेच चालू राहणार आहे आणि अध्यक्ष महाराज अशाच प्रकारे ही अशी लूट गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. मी हे एवढ्याचसाठी बोललो की, आता या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून नामदार शंकररावजी चव्हाण आले आहेत आणि त्यांची ख्याती आहे. भ्रष्टाचारी माणूस, कार्यकर्ता, पुढारी त्यांच्यासमोर टिकू शकत नाही. म्हणून या सभागृहाच्या माध्यमातून मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा प्रकारे जे कोणी भ्रष्टाचार करणारे असतील, प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याच्या प्रवृत्तीचे जे कोणी असतील त्यांना आपण शिक्षा द्या आणि हे पैसे गरिबांपर्यंत पोहोचतील असे करा एवढीच कळकळीची विनम्र विनंती करुन मी भाषण संपवितो.

❑❑❑.

आंबेडकरांचे निष्ठावान अनुयायी

सभापती महोदय, माननीय श्री. रा. सू. गवई साहेबांचा आणि माझा अनेक वर्षांचा संबंध आहे. सभागृहात येण्यापूर्वीपासून आमचे संबंध आहेत. त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू आपणा सर्वांना ज्ञात आहेत. एक प्रसन्न, बहुरंगी आणि रसिक व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. अन्यायाच्या विरुद्ध ते नेहमी झगडत असतात. त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध प्रचंड चीड आहे. आपल्या आग्रही मताने प्रत्येक प्रश्नाचा तडा लावण्याचा ते सतत प्रयत्न करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ते निष्ठावंत अनुयायी आहेत. डॉ. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान, विचारसरणीचा पाठपुरावा त्यांनी आयुष्यभर केला आहे. नागपूरला दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेबांचे जे प्रचंड स्मारक उभे होत आहे त्याचे श्रेय गवई साहेबांना आहे. ही वास्तू बघून केवळ दलितांनाच नव्हे तर सर्व वर्गाला आनंद होईल असे कार्य तिथे झाले आहे.

मागासवर्गीयांना आरक्षण देण्यासाठी त्याचप्रमाणे मंडल कमिशननुसार इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्यासाठी या कमिशनचा जो अहवाल आला आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी गवई साहेब आग्रही आहेत. त्यासाठी जे शिष्टमंडळ या प्रश्नावरून जो अन्याय झाला त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी मी आणि गवई साहेब स्वतः गेलो होतो. यासंदर्भात गवई साहेबांचे योगदान मोठे आहे.

-दि. बा. पाटील
माजी आमदार.

महाजन अहवाल पक्षपाती

(१७ जून, १९८६)

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न विशिष्ट तत्त्वांच्या आधारे सुटावा आणि सीमा भागात कन्नड भाषेची सक्ती नसावी असा आग्रह घरणाऱ्या ठरावावर विधानपरिषदेत दिनांक १७ जून, १९८६ रोजी विस्तृत चर्चा झाली. विरोधी पक्षनेते श्री. देविदास कराळे यांनी मांडलेल्या या ठरावावरील चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी भाषावर राज्यांची निर्मिती, सीमा भागातील सत्याग्रहात त्यांचा सहभाग, कर्नाटकचे तत्कालीन मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांची ताठर भूमिका यांचा ऊहापोह केला. सीमा भागात कन्नड भाषेची सक्ती करणे अनुचित आणि अनैतिक असल्याचे प्रतिपादन करून सीमा प्रश्नी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या महाजन आयोगाच्या अहवालाचे वाभाडेही त्यांनी काढले. महाजन अहवाल अशास्त्रशुद्ध आणि पक्षपाती असल्याचे मत व्यक्त करून सीमा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारने ताबडतोब मध्यस्थी करावी अशी विनंती भाषणाचा समारोप करताना केली.

अध्यक्ष महाराज माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यामध्ये या विधिमंडळाने यापूर्वी स्वीकारलेली भूमिका, विशिष्ट तत्त्वांच्या आधारे हा प्रश्न सुटावा यासाठी आग्रही भूमिका आणि काही उपांग प्रश्न निर्माण झाले आहेत त्याचा उल्लेख आहे. कर्नाटक राज्य सरकारने केलेले अत्याचार आणि कन्नड भाषेचे बंधन अशाप्रकारचे काही उपांग प्रश्न या प्रस्तावात आले आहेत. या उपांग प्रश्नाची सोडवणूक करण्याबरोबरच मूळ प्रश्नाच्या बाबतीतसुद्धा आग्रह धरला पाहिजे. सुदैवाने हा प्रस्ताव या सभागृहात एकमताने आला आहे. अध्यक्ष महाराज, सर्वप्रथम मी हे स्पष्ट करू इच्छितो की, यासंबंधी स्पष्ट वाच्यता सन्माननीय सभासद श्री. मो. उ. लहाने यांनी केली आहे की, राष्ट्रीय एकात्मतेला किंचितही तडा जाता कामा नये. राष्ट्रीय एकात्मता जी आहे त्या राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करण्याचे बाळकडू महाराष्ट्राच्या या मातीत आहे. या मातीमधून लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचा जन्म झाला तेव्हा या मातीमधून दुसरे काही उगवणार नाही. मूळ प्रश्नामधून उपांग प्रश्न निर्माण झाले आहेत आणि या उपांग प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी कोणी पुढे आला म्हणजे जणू काही राष्ट्रीय एकात्मतेला आमच्या चर्चेने बिघाड निर्माण होतो अशी जी भोंगळ समजूत आहे ती दूर करावी. राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे व्रत महाराष्ट्राच्या भूमीने परंपरेने स्वीकारलेले आहे. अध्यक्ष महाराज, मी सत्याग्रह करीत असताना मला निरोप देण्यासाठी हजार दीड हजार लोक आले होते त्यांच्यासमोर मी पाच मिनिटे भाषण केले. त्या भाषणामधून मी सांगितले की, प्रश्न देशाचे असतात, प्रश्न देशातील जनतेचे असतात. हे प्रश्न काही विशिष्ट जातीचे,

विशिष्ट भाषेचे, राज्याचे नसतात. म्हणून हे प्रश्न देशाला सोडविले पाहिजे, हा प्रश्न देशाचा कसा असतो असा माझ्या भाषणाचा सीक्वेन्स होता व त्यावर मी माझ्या भाषणात जोर देत आहे. त्यानंतर मी उपांग प्रश्नाचा उल्लेख करणार आहे. एकदा आम्ही हे तत्त्व स्वीकारले की भाषावार प्रांतरचना करण्यात यावी. हे तत्त्व स्वीकारल्यानंतर आणि भाषावार प्रांतरचना निर्माण झाल्यानंतर काही प्रांत निर्माण झाल्यानंतर त्यासंबंधी चर्चा झाली आहे. आंध्रची निर्मिती झाली असेल, कर्नाटक राज्यांची निर्मिती झाली आहे. तामिळनाडू राज्यांची निर्मिती झाली असेल. अशाप्रकारे अनेक राज्यांची निर्मिती झालेली आहे. ही राज्याची निर्मिती होत असताना आपण जे काही निकष लावले असतील ते निकष एका प्रांतासाठी एक निकष आणि दुसऱ्या प्रांतासाठी दुसरा निकष असे लावले जाऊ नये. एका प्रांतासाठी एक तराजू आणि दुसऱ्या प्रांतासाठी दुसरा तराजू याचा अर्थ असा की, सर्व राज्यांकरिता होमीजीनीअस ट्रीटमेन्ट म्हणजे एकजिनसी वागणूक लावली तर त्यामधून काही प्रश्न निर्माण होणार नाहीत.

म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे हा प्रश्न कन्नडी विरुद्ध मराठी भाषिक लोकांचा नाही. हा प्रश्न कर्नाटक विरुद्ध महाराष्ट्र असाही नाही. त्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता आहे, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील लोक भाऊ भाऊ आहेत. हा प्रश्न देश पातळीवर अशा रीतीने सोडविण्यात आला की, त्यासंबंधी ज्या स्केलपट्ट्या वापरण्यात आल्या आहेत. त्या इतर प्रांताकरिता वेगळ्या वापरल्या आणि महाराष्ट्राकरिता वेगळ्या वापरल्या. राष्ट्रीय एकात्मतेकरिता एकजिनसीपणाने, युनिफार्मासीटीने एकच स्केलपट्टी लावण्यात यावी यासाठी आमचा आग्रह आहे. अध्यक्ष महाराज, कालच सभागृहामध्ये एक प्रश्न आला होता त्यासंबंधी उत्तर देताना असे सांगण्यात आले होते की, अंदाजे ३५ कोटी रुपये धारावीच्या झोपडपट्टीवर खर्च होणार आहेत. एवढे महाराष्ट्राचे दातृत्व आहे. धारावीच्या झोपडीमध्ये कोण राहतो हा प्रश्न नाही. जो माणूस येथे येतो तो महाराष्ट्रीयन माणूस आहे असे आम्ही समजतो. इंडियन फर्स्ट आणि इंडियन लास्ट ह्या ठिकाणी कोणताही दुजाभाव आमच्याकडे नाही. असे असतानादेखील प्रश्न निर्माण होतात कारण रोगाचे डायग्नोसीस न केल्यामुळे व योग्य ट्रीटमेन्ट न दिल्यामुळे उपांग रोग निर्माण होतात आणि मग उपांग रोग निर्माण झाल्यामुळे त्यावर औषध देण्याची जबाबदारी देशाची आहे. केंद्र सरकारची आहे. पार्लमेन्टची आहे. अध्यक्ष महाराज या प्रश्नास सांविधानिक बाजू आहे. संविधानाच्या आर्टिकल तीनमध्ये असे म्हटलेले आहे की, "Formation of new State and alteration of areas, boundaries or name of existing States.

3. Parliament may by law :—

(a) Form a new State by separation of territory from any State or by uniting two of more States or parts of States or by uniting any territory to a part of any State.

(b) Increase the area of the State.

(c) diminish the area of any State

(d) alter the boundaries of any State

(e) alter the name of any State."

म्हणजे भारतीय संविधानाच्या कलम ३ अन्वये भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार राज्या-राज्याच्या सीमा ठरविणे, राज्यामध्ये एखादा भाग घालणे, कमी करणे ही पार्लमेन्टची जबाबदारी आहे. केंद्र सरकारची जबाबदारी आहे ही जबाबदारी पार्लमेन्टने आणि केंद्र सरकारने सातत्याने गेले तीस वर्षांपर्यंत न पार पाडल्यामुळे उपांग रोग निर्माण झालेले आहेत. त्याचा परिपाक या पातळीवर गेला की, सीमा भागात कन्नड भाषेची मराठी भाषिकांवर सक्ती होऊ लागली. त्याचा परिपाक असा झाला की, त्यातून राष्ट्रीय प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रश्न आले. त्याकरिता सत्याग्रह करण्यात आला. ज्यांनी सत्याग्रह केला त्यांना अत्यंत वाईट वागणूक देण्यात आली. सन्माननीय सभासद श्री. धारवाडे यांनी त्याबाबत आपल्या भाषणात सांगितले

आहे. ती काही नवीन गोष्ट नाही. मी उपसभापती असताना त्या भागात गेलो असताना छत्रपती शिवाजी महाराजांचे फोटो फोडण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो फोडण्यात आले. सर्च घेत असताना बायांची लुगडी सोडण्याचा प्रयत्न केला गेला. अर्थात ही गोष्ट पंधरा वर्षापूर्वीची आहे तो भाग वेगळा. आता निपाणी येथे सत्याग्रह करीत असताना मला ११-३० वाजता पकडण्यात आले आणि ५-३० वाजता सोडून देण्यात आले. कोठल्यातरी जुनाट एस. टी. मध्ये बसविले आणि अक्षरशः सकाळी साडेअकरा ते सायंकाळी साडेपाचपर्यंत आम्हा सत्याग्रहींना जेवणच काय पण साधा चहाही दिला नाही. मग आम्हाला सोडल्यानंतर मी स्वतः एका हॉटेलमधून आम्हा साऱ्या सत्याग्रहींसाठी आणि बरोबर असलेल्या पोलिसांसाठी तीनचारशे रुपये खर्च करून चहापाण्याची व्यवस्था केली. आम्ही सत्याग्रह केला तेव्हा त्यांनी आम्हाला काही जेवण द्यावे, चहा द्यावा अशी आमची अपेक्षा नव्हती परंतु एक माणुसकी आणि नियम म्हणून तरी त्याच्याकडून या गोष्टी व्हायला हव्या होत्या एवढेच आमचे म्हणणे होते. अशाप्रकारे सारी माणुसकीशून्य अशी वागणूक दिली गेली आहे. यामधील जो उप प्रश्न आहे, कानडी भाषेची सक्ती, याबाबतीत श्री. हेगडे काय म्हणतात आणि आम्ही काय म्हणतो, त्यांचे आणि आमचे काही भांडण नाही. परंतु याबाबतीत देशाने ज्या काही गाईडलाईन्स दिलेल्या आहेत त्यानुसार हा प्रश्न सुटला पाहिजे. त्यामध्ये हेगडे यांचे वागणे कोठे बसते हे पाहिले पाहिजे. अध्यक्ष महाराज, आपल्या भारतीय घटनेच्या ३५० कलमामध्ये सांगितले आहे. आपले म्हणणे अधिक चांगल्या रीतीने मांडण्यासाठी मातृभाषेची गॅरंटी ही घटनेने दिलेली आहे. समजा मला आपण बोलावयास लावले तर इंग्रजीमध्ये मी माझे म्हणणे नीट मांडू शकणार नाही तर मातृभाषेतून माझे विचार मांडण्याची मुभा नव्हे हमी ही आपल्या घटनेच्या ३५० च्या कलमान्वये दिलेली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण हे त्या राज्यातील भाषिक अल्पसंख्याक गट असेल तर त्याला मातृभाषेतून मिळाले पाहिजे आणि त्यासाठी वा कलमात राष्ट्रपतीचा निर्देश दिलेला आहे. घटनेतील ३५० ब मध्ये असे म्हटले आहे की, जर अशी सुविधा वा सवलत प्राप्त केली नसेल तर राष्ट्रपतीनी विशेष अधिकारी नेमून त्यासंबंधीचा विशेष अहवाल प्राप्त करून घ्यावा आणि त्याद्वारे त्यांच्याकडून न्याय दिला जाईल. तेव्हा हा प्रश्न केवळ श्री. हेगडे यांचा किंवा आमचे मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांच्यापुरता मर्यादित नसून भारतीय घटनेने जे अधिकार दिलेले आहेत त्यांचे उल्लंघन श्री. हेगडे करीत आहेत किंवा काय यासंबंधीचा आहे. अध्यक्ष महाराज १९६१ साली जेव्हा साऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाली त्या बैठकीमध्ये भाषेच्या धोरणासंबंधी गाईडलाईन्स सुचविण्यात आल्या. श्री. हेगडे हे त्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये एक पार्टी असल्याने (He has no business to deviate from the formula to which he was a party in the meeting of the Chief Ministers). तेव्हा जर सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये एखादा फॉर्म्युला ठरला गेला असेल. निश्चित झाला असेल तर त्याच्या विरुद्ध जाण्याची हिंमत श्री. हेगड्यांनी करणे हे धाडसाचे आहे. शेवटी या झाल्या सर्वसामान्य तरतुदी आणि भावना परंतु यातील दुसरा भाग हा नैतिक अधःपतनाचा आहे. जो प्रश्न सुटलेला नाही. जो प्रश्न आजही वादग्रस्त आहे अशा सीमा भागामध्ये भाषेची जबरदस्ती करणे हे अनुचित आहे, अनैतिक आहे हेही मला येथे सांगावयाचे आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न केवळ हेगडे या कर्नाटक सरकारचा राहिलेला नाही तर हा प्रश्न केंद्र सरकारचा, देशाचा प्रश्न झालेला आहे. या संदर्भातील देशातील इतर प्रश्न जसे सोडविले जातात त्याप्रमाणे हाही सोडविला गेला पाहिजे.

१९४८ सालामध्ये आंध्र, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्र या भाषावार प्रांत रचनेचा अहवाल सादर करण्यासंबंधी "दर कमिशन" आले. परंतु लॉजिकली महाराष्ट्रासंबंधी राष्ट्रीय एकात्मतेवर वेळोवळी कसा अन्याय झाला याचे थोडक्यात चित्र मी आपल्यापुढे ठेवणार आहे. त्यातील सर्व बाबी आपल्यालाही अध्यक्ष महाराज, माहिती आहेत.

दर कमिशनने बहुसंख्याकांच्या भाषेसाठी ७० टक्के म्हटले आहे. जिल्हा युनिट म्हटले आहे. आणखीही काही म्हटले आहे. हे सगळे असेल तरी दर कमिशननेदेखील मोठ्या प्रमाणात बेळगावमध्ये आणि उत्तर कर्नाटकामध्ये मराठी भाषिक हे बहुसंख्येने आहेत हे कबूल केले आहे. याची कबुली दिली आहे. अर्थात दर कमिशनच्या काही विसंगती समोर आल्या. त्यानंतर जेव्हीपी समिती नेमली गेली आणि या समितीने स्पष्ट सांगितले की आम्ही दर कमिशनशी सहमत नाही. परंतु प्रांतरचना ही लोकांच्या इच्छेवर अवलंबून आहे. एवढेच नव्हे तर १९५१ च्या काँग्रेस पक्षाच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात लोकांच्या इच्छेवरून प्रांतरचना होईल असे एक कलम घालण्यात आले होते. अध्यक्ष महाराज, १९५३ मध्ये श्रीरामलू यांच्या निधनानंतर आंध्रची निर्मिती झाली. ह्या निर्मितीत जेव्हीपी समितीचा दंडक जो होता तो मोडला. जेव्हीपी समितीने सांगितले होते की, नव्याने निर्माण होणाऱ्या प्रांतात वादग्रस्त प्रदेश निर्माण होऊ नयेत झाल्यास अशा वादग्रस्त प्रदेशाचाही निश्चित विचार होईल. परंतु तसे झाले नाही आणि शेवटी १९५३ च्या अखेरीस राज्य पुनर्रचना मंडळाची स्थापना करण्यात आली आणि त्या मंडळाचा अहवाल सादर करण्यात आला. त्याच्या खोलात मी काही आता जात नाही. परंतु एक म्हणजे पुनर्रचनेच्या प्रश्नामध्ये जे गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले ते सलोख्याने सुटावेत म्हणून मग पाटसकर यांना विनंती करण्यात आली. त्यांनीही ही जबाबदारी स्वीकारली व ज्याला आज आपण पाटसकर फार्म्यूला म्हणतो तो आला. पाटसकरांनी सांगितले की, प्रांताप्रांतातील झगडे मिटावेत. भौगोलिक सलोखा, खेडेगाव घटक, साधे बहुमत आणि लोकेच्छा या सूत्रांचा आधार घ्यावा. अशाप्रकारे हे पाटसकर सूत्र पुढे आले. केंद्र सरकारची संसदेची मंजुरी त्याला मिळाली.

परंतु अध्यक्ष महाराज, पाटसकरांनी हे संपूर्ण सूत्र दिल्यानंतरही केंद्र सरकारने जो न्याय कर्नाटकाला दिला, आंध्रला दिला तोच न्याय महाराष्ट्राला मात्र दिला नाही. त्यांच्या मनातच याबाबतीत काही दुजाभाव होता असे स्पष्ट होते. राज्य पुनर्रचना मंडळाने महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र विदर्भ महाराष्ट्रापासून वेगळा रहावा. महाराष्ट्र व गुजरात यांचे द्विभाषिक राज्य निर्माण करावे, मुंबई शहर महाराष्ट्राचा भाग नसावा अशी शिफारस केली होती. ह्याचा अर्थ महाराष्ट्राविषयी यांच्या मनात पूर्णपणे विष भरलेले होते. त्यामुळेच रोगाचे निदान होऊनही रोग नाहीसा होत नाही हीच आमची खरी खंत आहे. देवाणघेवाणीच्या तत्त्वामध्ये बेल्लारी कर्नाटकातून आंध्रामध्ये जातो म्हणून आमचा बेळगाव कर्नाटकाला देऊन टाकला नंतर बेल्लारी ही कर्नाटकामध्ये ठेवली आणि बेळगावही कर्नाटकाला देऊन टाकला. अध्यक्ष महाराज श्री. पाटसकर यांनी नंतर असे सांगितले की, राज्य पुनर्रचना मंडळाने जो अहवाल दिला होता तो काही अंशी तर्कशुद्ध नव्हता. तो अहवाल जर त्यावेळी फेटाळला गेला असता तर आज जी महाराष्ट्र राज्याची दुर्दशा झाली असती ती झाली नसती. अध्यक्ष महाराज १९५६ चा प्रांत पुनर्रचनेचा कायदा होण्यापूर्वी बेळगाव, विजापूर, धारवार व कारवार हे चारही जिल्हे पूर्वीच्या मुंबई प्रांतात होते आणि मंडळाने हे चारही जिल्हे कर्नाटक राज्यात घातले. त्यावेळी मुंबई राज्याने हा भाग जे. व्ही. पी. समितीच्या दंडकाप्रमाणे मुळच्या मुंबई राज्यातच ठेवावा अशी मागणीही केली होती. परंतु त्यावेळी या बाबतीत जर जोरदारपणे प्रयत्न झाले असते तर त्यावेळी महाराष्ट्राला न्याय मिळाला असता. अध्यक्ष महाराज यासंबंधी कर्नाटकच्या फॅक्ट आणि फाईंडिंग कमिटीनेसुद्धा या बाबतचा उल्लेख केला होता. त्या वेळेचे म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा यांनी असे सांगितले की, बेळगाव हा कर्नाटकाला मिळाला पाहिजे.

राज्य पुनर्रचनेचा कायदा १९५६ साली पास करण्यात आला होता. त्यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना त्या वेळेचे माननीय पंतप्रधान कै. पंडितजी नेहरू यांनी असे सांगितले होते की, तूर्त आम्ही प्रांता-प्रांताची पुनर्रचना करीत आहोत, याचा अर्थ सीमा प्रश्न संपला असा नव्हे,

म्हणून आपल्याला सीमा प्रश्न हा लोकशाही पद्धतीनेच सोडविला पाहिजे. त्यावेळी श्री. गोविंद वल्लभ पंत यांनी असे सांगितले की, राज्याच्या सामायिक हद्दीवर असलेल्या प्रदेशाची फेररचना करण्यासाठी झोनल कॉन्सील निर्मिती करण्यात येऊन तसे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत. हे प्रश्न बाजूला सारले जावेत असे माझे मुळीच म्हणणे नाही. तद्नंतर हा प्रश्न सोडविण्यासाठी श्री. पाटसकर आणि भट या माणसांची कमिटी नेमण्यात आली. ह्या कमिटीने आपला अहवाल दिल्यानंतर त्या वेळचे गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, कर्नाटकाचे मुख्यमंत्री तसेच श्री. पाटसकर आणि श्री. भट यांना भेटले. त्यानंतर एक दिवस वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आली की, या प्रश्नांचा विचार करण्यासाठी महाजन आयोग नेमण्यात आला आहे. अध्यक्ष महाराज आमचे या बाबतीत असे मत आहे की, त्यावेळी महाजन आयोग नेमण्याची आवश्यकता नव्हती. अध्यक्ष महाराज, महाजन आयोग हा निरर्थक आहे. खोटा आहे. अध्यक्ष महाराज त्यावेळच्या म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा यांनी गुंडशाहीने महाजन आयोग नेमला होता. अध्यक्ष महाराज, श्री. महाजन हे निजलिंगप्पाचे चमचे होते. श्री. महाजन हा भ्रष्ट माणूस होता. अध्यक्ष महाराज, श्री. मेहरचंद महाजन हा नावाने महाराष्ट्रीय वाटत होता, परंतु तो तसा नव्हता. त्या माणसाने अप्रामाणिकपणे वक्रदृष्टीने असा अहवाल दिला आहे. महाजन अहवालाच्या काही गमतीजमती मी या ठिकाणी सांगणार आहे. महाजन अहवालाने परिस्थितीला दोन वेगवेगळ्या फुटपट्टीने मोजले आहे. त्याने बेल्लारीला न्याय दिला, परंतु बेळगावला न्याय दिला नाही. बेल्लारी हा आंध्र प्रदेशात जातो म्हणून त्या बदल्यात कर्नाटक राज्याला बेळगाव देण्यात आला. त्यामुळे मराठी भाषिकांनी बेळगाव महाराष्ट्राला मिळाला पाहिजे म्हणून जे आंदोलन केले त्याला त्यांनी अनडेमॉक्रॅटिक म्हटले आहे. आणि कन्नडीगांनी कासरगोडसाठी जे आंदोलन केले त्याला त्यांनी डेमोक्रॅटिक म्हटले आहे. कन्नडीगांनी जे आंदोलन केले त्याला त्यांनी लोकशाही पद्धतीने केलेले आंदोलन म्हटले आहे. एकाच प्रकारची जी आंदोलने करण्यात आली आहेत त्यांना निरनिराळ्या प्रकारचे निकष लावले आहेत. अध्यक्ष महाराज महाराष्ट्राच्या विरुद्धचा राज्य पुनर्रचना मंडळाचा निर्णय असला तरी तो मी मान्य करतो. या बाबतचा निर्णय कर्नाटक राज्याच्या बाजूने झाला असला तरी मी त्या अहवालाचे समर्थन करतो. परंतु हा निर्णय जो महाराष्ट्र राज्याच्या विरुद्ध गेला आहे त्याबद्दल मला पन्नीकरांच्या इंटिग्रेटीसंबंधी शंका येते असा अभिप्राय देतो. बेळगावात मराठी माणसाने निवडणुकीत घवघवीत यश मिळविले आहे. परंतु निवडणुका जिंकल्या म्हणजे सर्व काही झाले असे हा माणूस मानावयाला तयार नाही. परंतु कासरगोड घेण्यासंबंधी निवडणुकीचा निकाल त्यांनी मान्य केला. म्हणजे एकच माणूस कसे कसे निकष वापरतो हे आपल्याला दिसून येईल. मराठी माणसासंबंधी १९५१ ची लोकसंख्या हा निकष योग्य नाही. तर कासरगोडसंबंधी १९५१ ची लोकसंख्या हा सर्वसामान्य स्वरूपाचा निकष आहे. अध्यक्ष महाराज बेळगांव शहराची १९६१ सालातील मराठी माणसाची शिरगणती ४७ टक्के आहे. परंतु हे लोक इतरांना बरोबर घेऊन जाणार नाहीत. ते त्यास अपात्र आहेत असा निकष त्यांनी काढला आहे. परंतु कासरगोडमधील १२.३ टक्के लोक हे इतर सर्व ८७ टक्के लोकांना बरोबर घेऊन जाऊ शकतात असे त्यांना वाटले. हा माणूस मॅड तरी असला पाहिजे याबद्दल मला विश्वास आहे. म्हणून महाजन अहवाल हा अशास्त्रशुद्ध, पक्षपाती आणि इल्लॉजीकल असा आहे. म्हणून महाजन अहवालाचा सर्व देशाने निषेध केला पाहिजे. यामध्ये आनंदाची गोष्ट अशी आहे की, हा अहवाल दिल्यानंतरसुद्धा हा प्रश्न चर्चेसाठी खुला आहे असे इंदिरा गांधी ह्यांनी म्हटले आहे. मोरारजीभाई पंतप्रधान असताना सुद्धा त्यांनी हा प्रश्न खुला आहे, सोडविला पाहिजे, हा प्रश्न शिल्लक आहे असे म्हटले आहे. अध्यक्ष महाराज, हा प्रश्न सोडविण्यासाठी एकजिनसी धोरण कसे स्वीकारता येईल ते दोन्हीही राज्यांचे मा. मुख्यमंत्री आणि भारताचे मा. पंतप्रधान श्री. राजीवजी गांधी यांनी पाहिले पाहिजे आणि हा प्रश्न कायमचा सोडविला पाहिजे. आज जे उपांग झालेले प्रश्न आहेत, जसे कन्नड भाषेची सक्ती केल्यामुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत आणि सीमा भागातील मराठी

भाषिकांवर जे अमानुष अत्याचार सुरू आहेत त्यासंबंधी हे प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारने ताबडतोब मध्यस्थी केली पाहिजे आणि शेवटी मूलभूत सीमावादाचा प्रश्न केंद्र सरकारने एका विशिष्ट कालमर्यादेत सोडविला पाहिजे अशी आग्रहाची विनंती मी केंद्र सरकारला करू इच्छितो आणि तात्त्विक भूमीकेचा स्वीकार करून दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आणि विशेषत: मा. शंकररावजी चव्हाण ह्यानी पुढाकार घ्यावा अशीही आग्रहाची विनंती करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

❑❑❑.

विरोधी पक्षाचे सामंजस्य

(११ जुलै, १९८६)

१९८६ मध्ये विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवड एका आगळ्या पद्धतीने झाली. सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांच्या संयुक्त प्रस्तावाच्या माध्यमातून पीठासीन अधिकाऱ्यांची निवड होण्याच्या या घटनेला विरोधी पक्षाने दाखविलेले सामंजस्य साह्यभूत ठरले. आधीची चार वर्षे सभापती असलेले जयंतराव टिळक यांचे नाव सत्तारूढ पक्षाने या पदासाठी पुन्हा निश्चित केले.

जयंतराव टिळक यांची ८ जुलै, १९८६ रोजी विधानपरिषदेच्या सभापतीपदी अविरोध निवड झाली. १९७८ ते १९८२ पर्यंत सभापती असलेल्या दादासाहेबांचे व जयंतराव टिळक यांचे जवळचे स्नेहसंबंध होते. दोघेही गोवा मुक्ती संग्रामातील सेनानी होते. दादासाहेबांनी यावेळी केलेले अभिनंदनपर भाषण...

अध्यक्ष महाराज, आज एका आगळ्या वेगळ्या पद्धतीने या सभागृहाच्या सभापतींची निवड झाली आहे त्याबद्दल मी आनंद व्यक्त करतो. मला स्मरते त्या अनुरूप या सभागृहाच्या सभापतींची निवड निवडणुकीच्या माध्यमातून होत असते. परंतु आज विधिमंडळाचे नेते आणि विरोधी पक्षनेते या दोघांच्या संयुक्त प्रस्तावाने सभापतीपदी आपली निवड झाली आहे. समजून आणि उमजून सभापतीपदी आपली एकमताने निवड करण्यात आली आहे. हा माझ्या आठवणीप्रमाणे पहिलाच प्रसंग असावा. माननीय सदस्य श्री. मो. उ. लहाने यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या आठवड्याच्या संपूर्ण निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली एकमताने निवड होणे ही राज्याला तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना आणि विरोधी पक्षाला भूषणावह अशीच गोष्ट आहे. विरोधी पक्ष राज्य सुस्थिर चालत असेल तर फोडाफोडीचे धंदे करते असे

बोलले जाते. अध्यक्ष महाराज, कोणाला घालवावयाचे असेल तर ते सुद्धा करते. परंतु तसे नाही. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी विरोधी पक्षाने सामंजस्य दाखविले आहे. म्हणून आता या ठिकाणी मी जास्त काही बोलणार नाही. तरीदेखील मी दोन ते तीन मिनिटांतच माझे भाषण संपविणार आहे. अध्यक्ष महाराज, इंग्लंडची संसदीय पद्धत जन्मभर टिकवावयाची या मताचा मी नाही. अध्यक्ष महाराज, आपल्यादेखील काही संसदीय पद्धती आहेत. त्याचा विचार केला पाहिजे. अध्यक्ष महाराज, या सभागृहाच्या सभापतीमध्ये आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांमध्ये फार मोठा फरक आहे असे मी मानतो. या ठिकाणी आपण ज्या पार्श्वभूमीवरून आला आहात तसेच आपण गोवा मुक्तीसाठी जे काही काम केले आहे त्याचा विचार आपल्याला करावा लागेल. अध्यक्ष महाराज, माननीय भास्करराव शिंदे हे काही आमच्या पक्षाचे नाहीत. परंतु या सभागृहाच्या प्रतिष्ठेचा काही अपमान होत नसेल तर त्याबाबत आपण योग्य तो विचार केला पाहिजे. म्हणून आम्ही त्यांच्या बाजूचे त्या दिवशी बोललो. तसेच आपण या ठिकाणी बसला आहात ते आमचे कस्टोडियन म्हणून बसला आहात. म्हणून आपण योग्य ती भूमिका या ठिकाणी घ्याल अशी आम्हाला खात्री आहे. इंग्लंडच्या संसदीय आधारभूत पद्धतीने जो न्याय सांगितला आहे तो भाग वेगळा आहे. अध्यक्ष महाराज, जीवनाच्या विभिन्न अंगापासून दूर राहणे ही न्यायाधीशांची भूमिका असू शकते. आपली असू शकत नाही. म्हणूनच मी तर असे म्हणेन की, या बाबी दुय्यम आहेत. सभापती स्थानी आरूढ झाल्यानंतर नियमात, वातावरणात आणि शेवटी या विधिमंडळाची पुजारी महाराष्ट्रातील पाच कोटी जनता यांच्या भल्याच्या निर्णयाकरता भूमिका अदा करताना, भूमिका वठविताना ती न्याय्य आहे की नाही हे पाहणे हाच खराखुरा निकष सभापतीपदाचा आहे आणि म्हणून मला त्याची खात्री आहे. गेल्या चार वर्षात आपण तसा न्याय या सभागृहाला दिलेला आहे आणि या पार्श्वभूमीवर यापुढेही सातत्याने हा न्याय आपणाकडून आम्हाला मिळत राहील याची पुरेपूर मला खात्री आहे. अध्यक्ष महाराज, एकच गोष्ट मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी उपस्थित होणारी चर्चा सभागृहाच्या प्रतिष्ठेची जरी असली तरी ती आपल्याला अडचणीत आणावे या दृष्टीने नव्हे, सत्तारूढ पक्षाला अडचणीत आणावे या दृष्टीने नव्हे तर सर्वांनुमते हे सभागृह, याचे पावित्र्य, याचे स्थान भक्कम आहे हे सर्व सभासदांच्या कृतीतून दिसणे आवश्यक आहे. आम्ही येथे जेव्हा संसदीय आयुधे वापरतो तेव्हा त्यात एखाद्या मंत्र्याला नामोहरम करण्याचा प्रश्न नाही, त्यासंबंधी आपल्याला गळ घालून त्या संदर्भात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तुम्हला अडचणीत आणण्याचा प्रश्न असतो असे नव्हे तर एखाद्या मंत्र्याला अडचणीत आणण्याची पाळी आली तरी त्या मंत्र्यासंबंधी आमच्या मनामध्ये आकस असतो असे नव्हे तर लोकशाहीच्या मंदिरामध्ये असणारा हा देव-पाच कोटी जनता, तिची आराधना, सेवा करण्याची संसदीय आयुधे, पुजारी आणि हे मंदिर आणि त्या मंदिरातील सेफगार्ड करणारे आपण. तेव्हा या अर्थाने हे सभागृह चालले तर मला वाटते येथे तणाव येणार नाही. अध्यक्ष महाराज, मला अपेक्षा आहे ती ही की, चर्चा उपस्थित केल्यानंतर मला एखाद्या मंत्र्याने नामोहरम केले तर मला आतून आनंद वाटतो. पण आम्ही चर्चा उपस्थित करून प्रश्नाचे उत्तरच मिळाले नाही तर मग ज्या परपज करता आपण येथे बसलो आहोत तोच सफल होत नाही. म्हणून त्या सर्व अर्थाने आपल्या सभागृहामध्ये फार चांगल्या पंरपरा पडल्या आहेत. येथे अत्यंत तोलामोलाची चर्चा झालेली आहे. त्या यापुढेही घडत राहतील. मी त्या गोष्टीचा उल्लेख करत नाही. भाऊसाहेबांनी म्हटल्याप्रमाणे एक सांगेन की, या सभागृहातील तणाव नेहमी करता कमी करण्याकरिता तिडकेसाहेब आता या सभागृहात नाहीत. त्यांची तर बरीच धावपळ असावयाची. येथे जवळ जवळ सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्ष सारखेच आहेत. तेव्हा या सभागृहाची जी

जडणघडण आहे ती भरून काढावी. नवीन मुख्यमंत्री आपल्या राज्याला आलेले आहेत. त्यांचा हा दोष नव्हे. परंतु गेल्या ५-१० वर्षांपासून ह्या सभागृहातील अनेक जागा रिकाम्या आहेत. एखादे सभागृह अपूर्ण असल्यानंतर ते पूर्ण भरण्याची आवश्यकता आहे. अध्यक्ष महाराज, मी अधिक बोलू इच्छित नाही. या सर्व कामकाजाकरिता मी आम्हा सर्वांतर्फे आपल्याला सुयश चिंततो. आणि या सभागृहाच्या प्रतिष्ठेतून, कामकाजातून महाराष्ट्रातील जनतेची सेवा घडो अशी अपेक्षा व्यक्त करून पुन:श्च एकदा आपले अभिनंदन करतो.

❑❑❑.

अर्थसंकल्प : मध्यम वर्गाविषयी कळकळ

(२७ मार्च, १९८७)

दादासाहेबांनी अर्थसंकल्प वा पुरवणी मागण्या यावर भरपूर भाषणे सभागृहात दिली. पण प्रत्येक वेळी विषय वेगळा असे. ते सर्व विषय त्यांनी हातातून कधीच निसटू दिले नाहीत. १९८७-८८ च्या अर्थसंकल्पातील मध्यम वर्गावर लादण्यात आलेला ८६ कोटींचा कर प्रस्ताव तसाच होता. अभ्यासपूर्वक मिळविलेली आकडेवारी सादर करत दादासाहेब म्हणाले...

सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेला आजचा पहिला आणि शेवटचा दिवस असल्यामुळे मी सर्वस्पर्शी भाषण करणार नाही. कारण अन्य सदस्यांनाही चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे. म्हणून केवळ सूत्ररूपाने आणि मुद्याच्या रूपाने मी माझे भाषण करणार आहे. राज्याची वार्षिक योजना २३२० कोटी रुपयाची आहे आणि अपेक्षित तूट ही १५४.४६ कोटी रुपयांची धरलेली आहे. अर्थात ही तूट भरून काढण्यासंबंधी जी काही कारवाई करण्यात आली आहे त्यात झिरो बेस बजेटमधून बचत ५० कोटीची आहे त्यानंतर दुचाकी आणि तीनचाकी वाहनावर आपण एकरकमी कर बसविलेला आहे. त्यापासून ५९ कोटी रुपये आणि विक्री करापासून २७ कोटी रुपये मिळणार आहेत. त्यामुळे ही तूट काही अंशी भरून निघेल आणि जी तूट शिल्लक राहील ती १८.४६ कोटी शिल्लक राहील. हा अर्थसंकल्पाचा सांगाडा मी सांगितलेला आहे. झिरो बेस बजेट स्वीकारणारे आपले पहिलेच राज्य आहे आणि नवीन कल्पना म्हणून हे झिरो बेस बजेट सादर झाले आहे ही बाबच चांगली आहे. पण झिरो बेस बजेटची कल्पना ही अगदीच काही नवीन कल्पना नाही. झिरो बेस बजेट आपण आपल्या घरामध्येसुद्धा करतो. त्याला आपण नीड बेस्ड् बजेट म्हणतो. म्हणजे गरजेप्रमाणे अंदाज करावयाचा दुर्देवाने गरजेप्रमाणे अंदाज करण्याची प्रथा गेल्या कित्येक वर्षात घडलेली नाही. याचा अर्थ असा सरळ आहे की, प्रशासकीय अकार्यक्षमता आहे. या झिरो बेस बजेटमध्ये आउट डेटेड, रॉटन, काही कायमच्या अनावश्यक अशा बाबीच्या काटकसरीचा उल्लेख आहे. अर्थात मा. राज्य अर्थमंत्र्याना मी सूचवू इच्छितो की, जी ५० कोटींची बचत आपण या अर्थसंकल्पाद्वारे केली आहे त्याचे विवरण दिले असते तर फार चांगले झाले असते. कारण मग या विवरणात आपण जी बचत केली ती कितपत योग्य आहे अशा

संबंधीचा आमचा अभिप्राय किंवा मत नोंदविता आले असते. मी यासंबंधीच्या प्रशासकीय अकार्यक्षमते संबंधीची एक खेडवळ कथा सांगतो. माकडांची पंगत भरली होती आणि भोकूर नावाचा चिकट पदार्थ आहे त्याची भाजी होती. ती भाजी खाताना माकडाने भोकूर खाल्ले तर गुठळी वर उडाली. माकडाला वाटले या भाजीतील गुठळी उडते तर मी काही उडणार नाही? तोही उडाला. त्याच्यामुळे सारी माकडे उडाली. पंगत खराब झाली. ३० ते ४० वर्षे अनावश्यक खर्च करण्याची पद्धत तुम्ही अशा रीतीने नष्ट केलेली आहे. आणि मग याही दोषाचे धनी आपणच आहात. मी आपल्याला सांगू इच्छितो की, जसे अर्थसंकल्पामध्ये सेव्हिंग केलेले आहे तेव्हा याची गुणवत्ता कशी ठरवावयाची? विदर्भ मराठवाड्यासारखे मागास भाग आहेत. त्यांना कॉस्ट बेसड् बेनिफिट रेशिओ, किंवा पब्लिक युटिलिटी हे जर पाहत नसाल तर मग सर्वसामान्याना न्याय देण्याच्या शून्य आधारित कल्पनेशी ते विसंगत होईल. म्हणूनच मी आग्रह धरला होता की, याचे विवरण मला पाहिजे. वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, समाजकल्याण विभागाच्या अंतर्गत असणारे वसतिगृह, जे शेड्युल्ड कास्टचे वसतिगृह आहे ते जे गव्हर्नमेंटचे आहेत ते व्हॉलंटरी एजन्सीजला जोडले जातील. म्हणजे मुळात व्हॉलंटरी एजन्सीजच त्यांना जेवू घालत नाहीत त्यांच्याबद्दल तक्रारी आहेत आणि त्यांना गव्हर्नमेंट हॉस्टेलमध्ये कन्व्हर्ट करा असे आपण म्हणतो. तेव्हा जर श्रीमती शशी मिश्राच्या नावाने वर्तमानपत्रामध्ये लिहून आलेले याबाबतीत जे आहे ही बचत आहे. परंतु ही बचत नाही. तर शून्य आधारित अर्थसंकल्पाच्या संकल्पनेशी विसंगत आहे. आज शेड्युल्ड कास्टचे म्हटले, उद्या जर होमिजिनस पॉलिसी जर करावयाची असेल तर शेड्युल्ड ट्राईब्जवर नंबर येईल आणि मग असे करत असाल तर शून्य आधारित अर्थसंकल्पाच्या संकल्पनेशी ही विसंगत कल्पना आहे. जसे तुम्ही शून्य आधारित अर्थसंकल्पामध्ये बचतीच्या संबंधीचा उल्लेख केला त्याप्रमाणे शून्य आधारित अर्थसंकल्पाचा गाभा आहे की तुमची जमा तुम्हाला वाढविली पाहिजे. परंतु दुर्दैवाने टू मोबिलाईज दि रिसोर्सेस या संकल्पनेखाली आपण आपली जमा वाढविलेली नाही आणि मग महसुली जमा वाढविण्यासंबंधी कुचराई केली. त्यासंबंधी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अभिप्राय मी आपल्यासमोर वाचून दाखवितो. शून्य बेस अर्थसंकल्पाची संकल्पना स्वीकारल्यानंतर तुम्हाला हे कर बसविण्याची आवश्यकता पडली नसती. चैनीच्या वस्तूंवरील कर अजून आकडे आलेले नाहीत. महसूल विभाग, पाटबंधारे, वीज विभाग अजून आकडे उपलब्ध झालेले नाहीत. गृह विभागात आकडे उपलब्ध नाहीत. उद्योग, ऊर्जा यासंबंधी ५४ लक्ष, ४८ लक्ष नंतर इमारत दुरुस्ती भाडे २.६० कोटी, निबंधक सहकारी संस्था ४६ लक्ष, नगर रचना मूल्यांक ५ लक्ष, संचालक वैद्यकीय शिक्षण ४ लक्ष, २२ लक्ष नंतर विक्रीकर रकमांच्या बाबतीत थकबाकी खालीलप्रमाणे आहे. ३१ मार्च १९८४ रोजी रुपये लक्षात १,७३४ लाख, ४,४५७ लाख, ४७३ लाख, ८४० लाख, ५६ लाख, एकंदर ९,७६३ लाख एवढी थकबाकी आहे. उसावरील खरेदी कर आणि उपकर थकबाकी २०४ लाख, १७९ लाख, २९१ लाख, ३२४ लाख, १,०५८ लाख, १,३३४ लाख, एकंदर ३,३३२ लाख थकबाकी ही सारी वसुली न करताना शून्य आधारित संकल्पाच्या पाठी ८६ कोटीचा बडगा मध्यमवर्गाच्या माथ्यावर मारला आहे. म्हणून अर्थसंकल्पाचे तत्त्व असे आहे की, झेपेल त्या माणसाने कर दिला पाहिजे. रिसोर्सेस मोबिलाईज्ड करण्यासाठी हजारो कोटी रुपये उभे करण्यास इतर ठिकाणी स्कोप असताना-देखील ८६ कोटींचा कर मध्यम आणि गरीब वर्गावर का लावण्यात आला? गव्हर्नमेंट ऑफ इंडियाशी संघर्ष करण्याची आपली हिंमत नाही ज्योती बसू, एन. टी. रामाराव, रामकृष्ण हेगडे यांच्यासारखी हिंमत तुमच्यामध्ये नाही. भविष्यनिर्वाह निधीबाबतचे नियम गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने बदलविले आणि त्याचा आर्थिक बोजा तुमच्यावर येऊन पडला. त्याबाबत त्यांच्याशी आपण काय भांडण करणार? त्यासाठी आपण ही ८६ कोटी रुपयांची कर वसुली करणार आहात आणि त्याचा सर्वात मोठा तडाखा दुचाकी, तिचाकी वाहनांना बसलेला आहे.

राज्यातील वाहनांची संख्या १७ लाख आहे आणि पुणे, मुंबईमध्ये १० लाख स्कूटर्स आहेत. या लोकांना आता आपल्याला एक रकमी कर द्यावा लागणार आहे. आपल्याला त्यांना ५९ कोटी रुपये करापोटी द्यावे लागणार आहेत. मोटार, ॲम्बेसॅडर, मर्सिडीज गाड्यांवर आपण कर वाढविला असता तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु ज्यांचे उत्पन्न जेमतेम आहे त्यांच्यावरच आपण कर लावलेला आहे. स्कूटर कोण वापरतो? ज्याचे उत्पन्न जेमतेम आहे तो स्कूटर वापरतो.

अध्यक्ष महाराज, तयार कपडे कोण वापरतात? श्रीमंत लोक, शौकीन लोक कापड विकत घेतात. त्यांना मापाप्रमाणे कपडे शिवून देणारा टेलर हवा असतो. परंतु गरीब लोक, मध्यमवर्गीय लोक तयार कपडे घेतात. शाळेचे ड्रेस रेडिमेड असतात. त्याचा भुर्दंड मध्यमवर्गावर पडणार आहे. हा कर आपण मध्यमवर्गांवर लावलेला आहे. हे बजेट सर्वच बाजूंनी मध्यम वर्गाच्या विरुद्ध आहे. अध्यक्ष महाराज, साबण, डिटर्जंट पावडर कोण वापरतो? गरीब लोक साबण वापरीत नाहीत का? मध्यमवर्ग साबण वापरत नाही का? त्याच्यावर आपण का कर लावला हेच मला समजत नाही. आता कपबशी, काचेचे ग्लास हे गरिबांच्या घरापर्यंत आलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुशीलकुमार शिंदे यांचा कपावर, काचेच्या ग्लासावर का राग आहे हेच समजायला मार्ग नाही. क्रोकरी, काचेचे ग्लास वगैरे वस्तू मध्यमवर्गीय वापरतात. त्याच्यावरच आपण हा कराचा भुर्दंड लावलेला आहे.

अध्यक्ष महाराज, आपल्या या राज्यामध्ये आज दुष्काळ आहे. परंतु आयोगांचा मात्र सुकाळ आहे. या राज्याने कधी कमिट्या पाहिलेल्या नाहीत का? बर्वे आयोग झाला, मग सुकथनकर समिती झाली, दांडेकर समिती झाली. ५-२५ कमिट्यांचे अहवाल धूळ खात पडलेले आहेत आपल्याकडे, भूजल सर्वेक्षणासाठी एक समिती, महसुली कामांसाठी वेगळी समिती अशा अनेक समित्या नेमून वर्षानुवर्षे त्यांचे अहवाल कोठेतरी फेकून द्यायचे आणि रिसोर्सेस मोबिलायझेशनसाठी आपल्या अंगावरील जबाबदारी टाळायची ही गोष्टच चुकीची आहे. रोजगार हमी योजनेमधून गरिबांना काम मिळावे हा आपला हेतू आहे. ना. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना आपण सर्वांनी मिळून व्यवसाय कर स्वीकारलेला होता. व्यवसाय करामध्ये केलेली वाढ ही कारकुनाला, गिरणी मालकांना, माथाडी कामगाराला सर्वांनाच भरावी लागणार आहे. मला आपल्याला असे सुचवावयाचे आहे की, इन्कम टॅक्सची स्लॅब ज्या सिस्टीमने वाढते तीच सिस्टीम या ठिकाणी स्वीकारावी. वाढत्या उत्पन्नावर व्यवसाय कर आकारावा. कारण व्यवसाय-कराबाबत अगोदरच सर्वांच्या मनामध्ये नाराजी आहे. या मध्यमवर्गीयांवर बिचाऱ्यांवर हा बोजा आणखी कशासाठी लादता? या नवीन बोजामुळे त्यांचे कंबरडे मोडणार आहे. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, हा जो शून्याधारित अर्थसंकल्प आपण आणलेला आहे तो परमनंट राहणार आहे का? तुम्हाला याची खात्री आहे का? १९७४-७५-७६ साली माननीय श्री. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री असताना बजेट स्क्रुटीनी एस्टिमेट कमिटीद्वारा होत होती. त्यानंतर माननीय श्री. अंतुले हे मुख्यमंत्री म्हणून या ठिकाणी आले आणि त्यानी ती पद्धत कॅन्सल केली. आता त्यानंतर पुन्हा शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री झाल्यानंतर ही पद्धत सुरू केलेली आहे. मधल्या काळामध्ये ही प्रीस्क्रुटीनीची पद्धतच बंद होती. आपण काहीतरी असे करा की, निदान ही सिस्टीम कायम तरी राहील, अर्थातच आपण जर ही सिस्टीम स्वीकारली तर आपल्याला या विधानमंडळाच्या ऑफीसचा स्टाफ वाढवावा लागेल. माझ्या कानावर हे सुद्धा आलेले आहे की, या झीरो बेस अर्थसंकल्पामध्ये काम करण्यास विधानमंडळातील कर्मचारी अपुरे आहेत. लेजिस्लेचरमधील कर्मचाऱ्यांची संख्या आपल्याला वाढविणे आवश्यक आहे. माझ्या भाषणाचा समारोप करीत असताना मी असे सांगेन की, या शून्याधारीत अर्थसंकल्पामध्ये तुम्ही जी ५० कोटी रुपयांची बचत केली असे म्हणता त्याचे विवरण देखील सभागृहाला मिळाले पाहिजे. या अर्थसंकल्पाने तुम्ही गरिबांवर, मध्यमवर्गीयांवर आघात केलेला आहे.

हा आघात अविकसित, असंतुलित भागावर होता कामा नये ही गोष्ट लक्षात ठेवा. आज आपल्या राज्यामध्ये दुष्काळ आहे. परंतु प्रलंबित प्रश्नांसंबंधीचा सुकाळ आपण कमिट्यांच्या रूपाने ठेवलेला आहे. ८६ कोटी रुपयांचे ओझे, दंडुका आपण महाराष्ट्र राज्यातील मध्यमवर्गीयांवर आणि गरिबांवर ठेवलेला आहे. त्यांच्या डोक्यावर हे ओझे लादलेले आहे. "मुह में राम, और बगल में छुरी" असे या अर्थसंकल्पाचे वर्णन आपल्याला करता येईल. याचे नाव आहे "शून्य आधारित अर्थसंकल्प" नाव मोठे गोंडस आहे. यामध्ये आपण रिसोर्सेस मोबिलाईज्ड केलेले नाहीत ते करा. मध्यम आणि गरीब जनतेवर हा ८६ कोटी रुपयांचा कर लादून आपण फसगत केली आहे. त्यांची एका तोंडाने गरिबांच्या बाजूची भाषा बोलायची आणि दुसऱ्या बाजूने दुसऱ्या हातामध्ये सुरा घ्यायचा अशा प्रथेचा हा अर्थसंकल्प आहे. म्हणून या अर्थसंकल्पान्वये ८६ कोटी रुपयांच्या केलेल्या कर वाढीला मी या सभागृहामध्ये तीव्र विरोध करीत आहे. सिसोर्सेस मोबिलाईज्ड करण्याच्या संबंधी जी अकार्यक्षमता दाखविण्यात आलेली आहे ती गोष्ट चुकीची आहे. शून्य आधारित अर्थसंकल्पाची संकल्पना चांगली आहे. परंतु त्याची परिपूर्ती वन वे ने होत नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. सेव्हिंग्ज देखील अशा रीतीने करण्यात आले पाहिजे की, त्यामुळे पब्लिक बेनीफिशरीज स्किम सफर होता कामा नये. झेपेल त्यालाच कर लावण्यात आला पाहिजे. लहान कामगाराला, तयार कपड्यांना, दुचाकी, तिचाकी वाहनांना, कपबशीला कर लावता कामा नये. आपल्याला पाहिजे असेल तर आपण पानावर कर लावू शकता. फार तर पान खाणे सोडून देऊ. आपण पाहिजे तर सुगंधीयुक्त तंबाखू, सुपारीवर कर लावा ना? परंतु ते सोडून गरिबांना आणि मध्यमवर्गीयांना लागणाऱ्या वस्तूंवर कर लावण्यात आलेला आहे. ८६ कोटी रुपयांचा कराचा डोंगर त्यांच्या माथ्यावर देण्यात आलेला आहे. हे बरोबर नाही असे सांगून व याबाबत तीव्र असमाधान व्यक्त करून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

संसदीय आयुधांचा समतोल वापर

(३१ मार्च, १९८७)

कुणाला अतिशयोक्ती वाटेल पण विधिमंडळातील विविध संसदीय आयुधांचा दादासाहेबांनी जितक्या काटेकोरपणे व कौशल्याने वापर केला तेवढा तो कुणीच केला नसेल. दिनांक ३१ मार्च, १९८७ रोजी त्यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर भाष्य करताना कशी पथ्ये पाळली हे त्यांच्या भाषणावरून दिसेल.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना एक गोष्ट प्रामुख्याने मला ह्या सदनाच्या नजरेस आणून द्यावयाची आहे की, गेल्या कित्येक वर्षांचा पायंडा मोडून हा प्रस्ताव आज येथे चर्चेला घेण्यात आलेला आहे. आपण अर्थसंकल्पावरील भाषणावर नंतर चर्चा करतो. गेल्या ८-१० वर्षांचा इतिहास पाहिला तर, पायंडे पाहिले तर आपणास दिसून येईल की, येथे पहिल्यांदा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करतो. नंतर अर्थसंकल्पावर चर्चा होते. केवळ हे अधिवेशन लहान आहे असे नव्हे तर त्या अधिवेशनाच्या नियोजनात कमीत

कमी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा पहिल्यांदा येईल आणि नंतर अर्थसंकल्पावरील चर्चा घेण्याची व्यवस्था शासनाला करता आली असती. परंतु दुर्दैवाने ते घडले नाही. परंतु त्याआधी अर्थसंकल्पावरील चर्चा झाली. आज राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरू आहे. पुढच्या आठवड्यामध्ये दुष्काळावर चर्चा होणार आहे. तेव्हा अर्थसंकल्पविषयक मुद्दे मी कटाक्षाने माझ्या आजच्या भाषणात येणार नाहीत याची दक्षता मी घेणार आहे. त्याचप्रमाणे पुढच्या आठवड्यात जी दुष्काळावर चर्चा होणार आहे तिचा देखील उल्लेख मी आज करणार नाही.

सभापती महोदय, तसे म्हटले तर माननीय अर्थमंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण, अर्थमंत्र्यांनी लिहिले ते भाषण आणि वाचलेले ते भाषण. तसेच माननीय राज्यपालांचे लिहिलेले भाषण व वाचलेले भाषण जर आपण बारकाईने पाहिले तर ते एकमेकास ओव्हरलॅप झालेले आहे. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे अर्थमंत्र्यांचे भाषण आणि अर्थमंत्र्यांचे भाषण म्हणजे राज्यपालांचे भाषण अशी गुंतागुंत यामध्ये झालेली दिसते. असे असले तरी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणापर्यंतचे मुद्दे या ठिकाणी मी मांडणार आहे.

पहिली गोष्ट ही की, मी या निमित्ताने एक नवीन मुद्दा उपस्थित करू इच्छितो. हे विधिमंडळ महाराष्ट्रामध्ये सार्वभौम विधिमंडळ आहे. याचे पावित्र्य राखणे हे सर्व जनप्रतिनिधींचे, शासनाचे तसेच इतर सर्वांचे कर्तव्य आहे. परंतु दुर्देवाने या विधिमंडळाचे पावित्र्य हा लोकांच्या दृष्टीने हास्याचा विषय झालेला आहे. मी मुद्दाम हा शब्दप्रयोग केला आहे. त्याचे कारण असे की, विधिमंडळाने ठराव पारित करावयाचे व वर्षानुवर्षे त्या ठरावाची अंमलबजावणी करावयाची नाही. मग ज्या विधिमंडळाला आम्ही सार्वभौम म्हटले आहे ते लोकांच्या नजरेमध्ये कमी विश्वासाचे व हास्याचा विषय बनवायचे अशी दुर्दवी परिस्थिती सार्वभौम विधिमंडळाच्या राज्यामध्ये आलेली आहे. आजच सकाळी आम्ही सर्व विरोधी पक्षांनी एका प्रश्नावर सभात्याग केला. हा प्रश्न १-२-३-४ नव्हे तर अनेकदा या सभागृहात आला. या विधिमंडळाने त्यासंबंधी निर्णय घेतला व प्रस्ताव पारित केले. त्या संबंधीचा जुना जो इतिहास आहे तो आपण बाजूला ठेवा, पण ज्या नवीन घडलेल्या घटना आहेत त्या पाहिल्या तर आपल्याला काय दिसते? याच देशामध्ये पंजाब-हरयाणा आणि आसाम-नागालँड यांचे सीमाप्रश्न सोडविण्यासाठी जे तत्त्व लावण्यात आले तेच तत्त्व महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्यासाठी का लावण्यात येत नाही? गेली तीस वर्षे हा प्रश्न लोंबकळत पडला आहे. मग तेच तत्त्व लावून सीमा भागात राहणाऱ्या १८ लक्ष लोकांच्यासाठी का स्वीकारण्यात येऊ नये? विशेष म्हणजे या विधिमंडळामध्ये पारित केलेल्या ठरावांची अंमलबजावणीही आपण करू शकत नाही याची मला अधिक खंत आहे. अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या संदर्भात मघाशी सभात्याग करताना माझ्या सहकाऱ्यांनी भाषणे केलेली आहेत. श्री. हेगडे असे म्हणत होते की, महाजन अहवाल हा ॲवॉर्ड आहे. पण नुकतेच पंतप्रधानांनी सांगितले की, हा प्रश्न ओपन आहे. श्री. हेगडे यांची भूमिका केंद्राने स्वीकारलेली नाही. पण पंजाब-हरयाणा आणि आसाम-नागालँड यांचे प्रश्न सोडविताना काही पंतप्रधानांनी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना बोलाविले नव्हते. जे न्याय्य होते, योग्य होते, तत्त्वावर आधारलेले होते ते स्वीकारलेले आहे. मग या सीमाप्रश्नाच्या बाबतीतही तेच तत्त्व का लागू करण्यात येत नाही? या सभागृहाचे सार्वभौमत्व लक्षात घेता. सभागृहात पास झालेल्या ठरावाची अंमलबजावणी होत नाही ही खरोखरच दुर्देवाची गोष्ट आहे. म्हणूनच आज सर्वपक्षीय मोर्चा मंत्रालयावर विराजमान झाला आहे. म्हणून आपल्याकडे असलेल्या शक्तीचा वापर करून मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाची ताबडतोब तड लावावी एवढाच मी उल्लेख करू इच्छितो. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये फक्त दोन्ही मुख्यमंत्र्यांच्या झालेल्या दोन बैठकांचा उल्लेख झाला आहे. त्याचप्रमाणे अध्यक्ष महाराज, भाषिक सक्तीच्या बाबतीत महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारच्या मुख्यमंत्र्यांच्यामध्ये तडजोड झाली होती. महाराष्ट्र सरकारने ही सक्ती ताबडतोब मागे घेतली. पण कर्नाटक सरकारने या बाबतीत काय केले हेही या अभिभाषणामध्ये स्पष्टपणे सांगितलेले नाही.

एचबी ११८०—२८

त्यानंतर, अध्यक्ष महाराज, राज्याच्या हिताच्या दृष्टीने या विधिमंडळात आपण एक दुसरा महत्त्वाचा ठराव पास केला होता. कोकण, विदर्भ आणि मराठवाडा या विभागामध्ये राज्याच्या निर्मितीनंतरही कोट्यवधी रुपयांचा अनुशेष आहे. हा भरून काढण्याकरिता शासनाने कोणतीही कारवाई केली नाही. म्हणून या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहानी एक ठराव पास केला तो म्हणजे स्वायत्त मंडळे स्थापन करण्यासंबंधी. त्यासंबंधी दांडेकर समितीचा रिपोर्टही उपलब्ध आहे. काही विभागातील इरिगेशन आणि रस्त्यासंबंधीचा बॅकलॉग वगळता विदर्भाचा १,२०० कोटी रुपयांचा बॅकलॉग आहे. त्याचप्रमाणे कोकण आणि मराठवाड्यातील काही कोटी रुपयांचा बॅकलॉग आहे. राज्याच्या निर्मितीनंतर २६ वर्षांत आपण हा अनुशेष दूर करू शकलो नाही. म्हणून त्यासाठी राज्याच्या एका घटनेमध्ये प्रोव्हिजो आहे. त्याप्रमाणे घटनेतील विशिष्ट तरतुदीनुसार स्वायत्त मंडळ निर्माण करता येते. ही गोष्ट श्री. वसंतदादा पाटील यांनी स्वीकारली. श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनीही स्वीकारली. श्री. शंकरराव चव्हाण त्यावेळी देशाचे गृहमंत्री होते. त्या वेळी या सभागृहाने जो ठराव पास केला त्यात काही चूक असेल, काही त्रुटी असतील तर त्या कोणत्या हे श्री. शंकरराव चव्हाण यांनी सांगावे. कारण ज्यावेळी ठराव पास झाला त्यावेळी ते देशाचे गृहमंत्री होते. आता ज्यावेळी योजना सादर करावयाची आहे त्यावेळी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. घटनेतील तरतुदीप्रमाणे ही स्वायत्त मंडळे स्थापन करण्याचा ठराव पास केला. तेव्हा ही बाब कोणत्याही प्रकारे अँटी डेमॉक्रॅटिक असू शकत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींवर अंकुश येईल असे नाही. हे आपल्याला अधिक डेमॉक्रॅटिक कसे करता येईल त्या दृष्टीने त्यांनी आम्हाला सांगावे. आम्ही चर्चा करण्याकरिता तयार आहोत. पण हा प्रश्नच बासनात बांधून ठेवावयाचा, किंवा त्याची उकल करावयाची नाही ही गोष्ट बरोबर नाही. अभिभाषणात या बाबतीत काही उल्लेख आला आहे, त्यासाठी आपण काही तरतूद केली आहे पण त्यालाही काही अटी घातल्या आहेत. आज ज्या पद्धतीने आपण हा अनुशेष दूर करू इच्छितो त्याचा विचार केला तर आज विदर्भाचा १,२०० कोटी रुपये असलेला अनुशेष आणखी १० वर्षानंतर ५,००० कोटी रुपये होईल. म्हणून, अध्यक्ष महाराज, मी मुद्दाम हा सभागृहाच्या सार्वभौमत्त्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. अध्यक्ष महाराज, या सभागृहात मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे करावे असा ठराव आपण पास केला होता. अशा ठरावाचे पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने आणि सभागृहाच्या सार्वभौमत्वाचा ठसा उमटविण्याच्या दृष्टीने अशा ठरावांची अंमलबजावणी केली गेली पाहिजे. पण दुर्दैवाने आपण ते करीत नाही. हीच आज सार्वभौम विधिमंडळाची शोकांतिका आहे.

त्यानंतर, अध्यक्ष महाराज, राज्यपालांच्या अभिभाषणांमध्ये तळागाळातील लोकांचा उल्लेख आला आहे. पण मला असे विचारावयाचे आहे की, शासनाने कामगारांसंबंधीच्या प्रश्नाला आणि शेतमजुरांसंबंधीच्या प्रश्नाला काय न्याय दिला आहे? त्याचा कोठे उल्लेख केला आहे? एवढ्याच मुद्यावर मी माझे भाषण करणार आहे. १८ जानेवारी १९८२ रोजी जो सार्वजनिक संप झाला त्यात जवळजवळ ६० कापड गिरण्यांमधील २,३२,००० कामगार काम करीत होते. या गिरण्यांचे ॲक्युम्युलेटेड प्रश्न आहेत, ते महाराष्ट्राला माहीत आहेत. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी जांबुरी मैदानावर कामगारांच्या बरोबर एक सभा घेतली. मी ही चांगली गोष्ट समजतो. कारण मुख्य मंत्री कामगारांच्या समोर गेले. त्यांनी तेथे भाषण केले. त्यांच्या या कृतीचे मी अभिनंदन करतो. पण नंतर याबाबतीत मुख्यमंत्र्यांनी जी कोतवाल समिती नेमली त्या बाबतीत पुढे काय झाले? कोतवाल समितीच्या अहवालात असे म्हटले आहे की, १,०६,३५६ कामगार आजही बेकार आहेत. त्यांचे संसार देशोधडीला लागले आहेत. त्या बाबतीत सरकार काय करणार आहे? त्याचप्रमाणे मजुरांची जी कायदेशीर देणीघेणी आहेत, ती २५ कोटी ४६ लाख रुपयांची आहेत. प्रॉव्हिडंड फंड ४ कोटी ७६ लाख रुपयांचा आहे. सेवामुक्तीसंबंधीची जी नुकसान भरपाई त्यांना द्यावयाची आहे, ती १५-१६ कोटी रुपयांची आहे. अशा प्रकारे या मालकांनी कामगारांचे ४० कोटी रुपये पचविले आहेत. पण त्या बाबतीत एक शब्दही यात आलेला नाही. परवाच

या सभागृहात मॉडर्न मील आणि न्यू ग्रेट मिल यासंबंधी प्रश्न उपस्थित झाला होता. या बाबतीत मालकांची भूमिका काय आहे? आमचे अर्थमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी मालकांना धमकी दिली की तुम्ही ताबडतोब गिरण्या सुरू करा. पण विजेची बिले भरण्याकरिता या कामगारांचा पैसा वापरला जाणार आहे. या गिरण्या जरी सुरू झाल्या तरी मजुरांचे पगार बुडतात म्हणून मधाचे बोट लावून गिरणी मालक आज जरी गिरण्या सुरू करणार असले तरी एक महिन्याने त्या पुन्हा बंद होतील. गिरणी मालक कसेही करून राज्य सरकारवर दडपण आणण्याचा प्रयत्न करतील. मग नूतनीकरणाच्या नावाखाली काही मजुरांना सामावून घेऊ असे सांगतील व प्रसंगी वीज बिलाची रक्कम थकवतील, किंवा रिटायर्ड लोकांचे पैसे द्यावयाचे आहेत असे सांगतील आणि गिरण्यांगिरण्यांमधून जी खाली जागा आहे ती विकू द्या म्हणून परवानगी मागतील. मालकाच्या या सापळ्यात महाराष्ट्र शासनाने बिलकूल सापडू नये. गिरणी मालकांच्या खुली जागा विकण्याच्या मागणीकडे केंद्र शासन सहानुभूतीने विचार जरी करणार असले तरी राज्याचे हितसंबंध राखण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने खुली जागा विकण्यास परवानगी देऊ आणि समजा तशी दिली तर महाराष्ट्र शासन गिरणी मालकांच्या सापळ्यात सापडले असे होईल आणि हे शासन जे आहे त्याचे धोरण मजूरधार्जिणे नसून मालकधार्जिणे आहे असे होईल. तेव्हा माझी अशी सूचना आहे या गिरण्यांतून जी सारी खुली जमीन आहे ती विकावयाची असेल किंवा तिची काही विल्हेवाट लावावयाची असेल तर त्याचा विचार करण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक समिती नेमण्यात यावी. ही समिती मग, गिरण्यांगिरण्यांतून करावयाच्या मॉडर्ननायझेशनचा विचार करील, कामगारांचे काही प्रश्न असतील तर ते सोडविण्याच्या दृष्टीने विचार करील. पण कदापि, या जमिनी विकण्याची परवानगी गिरणी मालकांना देता कामा नये.

त्यानंतर, अध्यक्ष महाराज, ठाणे-बेलापूर भागातील १९ कारखान्यांतून संप सुरू असून आज हजारो कामगार बेकार आहेत. मराठवाड्यात चार हजार उद्योगधंदे असून तेथील एक कारखाना आजारी पडला आहे. त्या कारखान्याचे मालक श्री. मोरेश्वर राणे आणि दुसरे एक मालक यांनी शासनाकडे कैफियत मांडली आहे की, आम्हाला खुले भांडवल शासनाने उपलब्ध करून द्यावे ते न दिले तर हजारो कामगार बेकार होतील.

अध्यक्ष महाराज, राज्यपालांनी आपल्या भाषणात श्रीनिवास व खानदेश मिल ताब्यात घेण्याच्या दृष्टीने तत्त्वतः मान्यता दिली आहे. मग घोडे कोठे पेंड खाते हेच समजत नाही. एम्प्रेस मिल ताब्यात घेतली आहे. पण मॉडेल मिलबाबतचे घोडे कुठे अडले हे समजत नाही. अध्यक्ष महाराज, मजुरांच्या प्रश्नांचा विचार करीत असताना आज जवळजवळ २० लाख यंत्रमजूर बेकार होणार आहेत. कारण आज सुताच्या बाजारात मंदी आली असून मजूर बेकार होण्याची पाळी आली आहे, अशाच प्रकारची मंदी १९८० साली आली असताना त्यावेळी पुलोद सरकारने स्वयंस्फूर्तीने विणकराचे सूत विकत घेतले होते. परंतु आज सुताला मंदी आली असल्यामुळे विणकराचे साचे बंद पडले आहेत आणि त्यामुळे सर्व राज्यभर पंधरा ते वीस लाख कामगार बेकार होतील. माथाडी कामगारांचे देखील काही प्रश्न आहेत. त्यांच्यासाठी असणाऱ्या ग्रॅच्युएटी कायद्यात अद्याप दुरुस्ती झालेली नव्हती. त्यासाठी मोर्चे निघत होते. त्याबाबत आपण आज विचार केला असला तरी त्यांच्यासाठी निवासस्थाने होण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या अनेक मागण्या आहेत. त्याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे.

त्यानंतर, अध्यक्ष महाराज, जे विडी कामगार आहेत त्या बिडी मजुंराच्या मालकांनी दहा वर्षे कोर्टबाजी केली असली तरी शेवटी सहा महिन्यांपूर्वी सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला असला तरी बिडी मालकांनी या कामगारांचे शंभर ते दोनशे कोटी रुपये बुडविले आहेत हे मी येथे जबाबदारीने सांगतो. तेव्हा त्यांचे ते पैसे परत मिळवून देण्यासाठी शासन काय करणार आहे हा खरा सवाल आहे. अध्यक्ष महाराज, मजुरांच्या आणि कामगारांच्या हितार्थ आणि आपण त्यांचे हितकर्ते, आहोत म्हणून सांगता आहात म्हणून मुद्दाम मी या प्रश्नांचा परामर्श घेतला आहे. कामगारांचे जसे हे

एचबी ११८०—२८अ

प्रश्न आहेत तसेच शेतकऱ्यासंबंधीचे काही प्रश्न आहेत. शासनाने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी काय केले आहे? शेतकऱ्यांच्या १ लाख २० हजार कापसाच्या गासड्या आज निर्यात करण्यास परवानगी दिली आहे. कापसाच्या गासड्या विकण्यासाठी आज परिस्थिती अनुकूल आहे. अमेरिका, चायना यांच्याजवळ कापूस नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाला मंदी आलेली आहे. तेव्हा शेतकऱ्याचा हा कापूस त्या देशात निर्यात करण्यास परवानगी मिळाली आणि आपण तो कापूस निर्यात करू शकलो तर आज श्री. शरद जोशी जो कापसाला भाव मागत आहेत त्यापेक्षा जास्त भाव शेतकऱ्यांना देता येतील. अगदी निर्धारित किमतीवर भाव देण्याच्या तत्त्वाचा विचार सोडून जरी दिला तरी आज राज्यात उपलब्ध असलेल्या एकूण कापसाच्या ज्या सहा लाख गासड्या आहेत त्या सहा साडेसहा लाख गासड्या निर्यात करण्यास केंद्र शासनाने आपल्या राज्याला परवानगी दिली तर श्री. शरद जोशी जो कापसाला भाव मागत आहेत त्याच्या दीडपट, दुप्पट भाव आपण शेतकऱ्यांना देऊ शकू. परंतु त्यासाठी केंद्र शासनावर दडपण आणण्याची आवश्यकता आहे.

त्यानंतर अध्यक्ष महाराज, शेतकऱ्याच्या प्रश्नांसंबंधी विचार करीत असताना शेतकऱ्याला कर्ज देताना ते सहा टक्के व्याजाच्या दराने देऊ असे मागचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील म्हणाले होते. आणि अशा प्रकारे कर्ज पुरवावयाचे ठरविल्यानंतर मग शेंडी तुटो वा पारंबी तुटो सहा टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज देऊ असे म्हणाले होते. मग आज कुठे शेंडी आहे आणि पारंबी आहे. माझे सरकार या सहा टक्के व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज देईल असे ते त्यावेळी म्हणाले होते. परंतु या नवीन सरकारने या सहा टक्के व्याजाचा उल्लेख केला नाही. मध्यवर्ती सहकारी बँकेचे स्टेटमेंट आले आहे की, ती बँक सहा टक्क्याने कर्ज द्यावयास तयार आहे मग राज्य सरकार का तयार नाही? बँकेचे धोरण आहे की, जो शेतकरी अधिक कर्ज घेईल त्याच्यावर व्याजाचा दर अधिक राहील परंतु जो कमी कर्ज घेईल त्याच्यावर कमी व्याजाचा दर राहील. अर्थात हे समाजवादाचे जे तत्त्व आहे त्याच्या तपशिलात मी आता शिरत नाही परंतु शेवटी मागच्या मुख्यमंत्र्यांनी जी एक कमिटमेंट केली होती त्याचे काय झाले? नाही तरी मग प्रत्येक वेळी नवीन मुख्यमंत्री येतील तर सोमवारी एक, मंगळवारी एक, बुधवारी एक, गुरुवारी एक असे धोरण राहणार आहे काय? शेवटी प्रशासन ही एक संस्था आहे आणि ती कोणाच्याही लहरीवर चालणारी संस्था आहे का? अशा पद्धतीने राज्य चालू शकत नाही. तेव्हा शेतकऱ्याला सहा टक्के दराने जे कर्ज देण्याचे कबूल केले होते ते देण्याची तुमची शासनाची नैतिक जबाबदारी आहे. शेतमजुराच्या किमान वेतनात गेल्या पाच वर्षात काही बदल झालेला नाही. दरवर्षी किमान वेतन निर्धारित करावयास पाहिजे पण आपण ते निर्धारित करीत नाही. कारण काय तर, जर आपण किमान वेतन निर्धारित केले तर मग इजीएसचे दर वाढवावे लागतील. परंतु असे दात कोरून पोट भरता येत नाही. हे शासन जर, गरिबांकरिता, मजुरांकरिता आणि शेतमजुरांकरिता व शेतकऱ्यांकरिता आहे तर त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक या शासनाने केली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, राज्यपालांच्या भाषणावरील चर्चेत मी फक्त दोन मुद्यांचा परामर्श घेतला आहे. एक तर आपण या गृहाचे सार्वभौमत्व व पावित्र्य मान्य केले आहे, तेव्हा ते राखण्याची जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे आणि दुसरा मुद्दा असा की, जर हे सरकार कामगारांच्या मजुरांच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणारे आहे तर शासनाने या सर्वांची बाजू राखली पाहिजे. आम्ही त्यांच्या बाजूने राहणारे आहे असे म्हणून नुसते चालत नाही तर तशी कृती असावी लागते. म्हणून अध्यक्ष महोदय, मी माझ्या भाषणात जे जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्या त्या सर्व मुद्याना मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑.

टंचाई परिस्थितीवर चर्चा

(४ एप्रिल, १९८७)

हरकतीचे मुद्दे, औचित्याचे मुद्दे, वेळेचा अभाव यासारख्या अडथळ्यांना यशस्वीपणे पार करून आपले भाषण पूर्ण करावे ते दादासाहेबांनीच. दिनांक ४ एप्रिल, १९८७ रोजी त्याचा विशेषत्वाने प्रत्यय आला. विषय होता राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थितीचा, आपणच उच्चारलेल्या आधीच्या शब्दांचे स्मरण ठेवून दादासाहेबांनी भाषण सुरू केले, ते म्हणाले.....

सभापती महोदय, दुष्काळासंबंधी तात्त्विक आणि विशेष धोरण विषयक चर्चा या सदनामध्ये पूर्वी झालेल्या आहेत. मी आज असे ठरविले आहे की, यासंबंधीची तात्त्विक भूमिका ही माझ्या भाषणांच्या उत्तरार्धात मांडणार आहे. सुरुवातीला राज्यामध्ये दुष्काळाचे भयानक, सम्यक दर्शन कसे आहे हे चित्र उभे करणार आहे. या प्रश्नांची सोडवणूक, धोरणात्मक बदल या सर्व बाबींचा विचार मी माझ्या भाषणाच्या उत्तरार्धात करीन. दुष्काळाचे सम्यक दर्शन या सभागृहाला घडविताना या दुष्काळाला काय शीर्षक द्यावयाचे ते मी माझ्या मनात ठरविले आहे. अध्यक्ष महोदय, १९८२ पासून १९८७ पर्यंत सतत ५ वर्षे आम्ही या दुष्काळाला तोंड देत आहोत. १९८२ पासून आतापर्यंत दुष्काळाचा प्रश्न हा तात्पुरत्या उपायाने सोडविला. या प्रश्नासंबंधी केवळ तात्पुरता विचार झाला पण यासंबंधीचा दूरगामी विचार किंवा परस्पेक्टिव्ह प्लॅनिंग झाले नाही. आताच्या दुष्काळी परिस्थितीला काय शीर्षक मी देऊ इच्छितो ते मी सभागृहाला सांगतो. आताचा असलेला हा दुष्काळ वैचारिक दुष्काळ, आताचा असलेला दुष्काळ हा अनास्थेचा दुष्काळ, आताचा असलेला दुष्काळ हा एकजुटीच्या प्रयत्नांच्या अभावांचा दुष्काळ अशा प्रकारची दोन-तीन शीर्षके या दुष्काळाला मी दिली आहेत. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये १९८२ पासून सतत दुष्काळाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. प्रत्येक भाषणामध्ये दुष्काळाची झळ ज्या गावांना पोहोचली आहे त्या गावांची संख्या, ज्या गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे त्या गावांची संख्या पाहिली आणि त्या आकड्यांची बेरीज केली तर आपल्याला महाराष्ट्राचा भूगोल बदलावा लागेल. राज्यपालांच्या अभिभाषणातील दुष्काळग्रस्त गावांच्या आकड्यांची बेरीज केली तर ती ५० ते ५५ हजार होते. अध्यक्ष महाराज, आपल्या राज्यामध्ये एकंदर ३५ हजार गावे आहेत त्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये ३५ हजार गावे आहेत की ५५ हजार गावे आहेत असा संभ्रम निर्माण होतो म्हणूनच महाराष्ट्राचा भूगोल बदलावा की काय असा विचार येतो.

माननीय राज्यपालांची १९८२ पासून १९८७ पर्यंतची भाषणे आपण वाचली तर असे दिसून येईल की, दुष्काळाच्या संदर्भात जो परिच्छेद भाषणामध्ये आहे तो टेप केला असता तर त्या ठिकाणी लिहिण्याची आवश्यकता पडली नसती. राज्यपालांना बिचाऱ्यांना कशाला त्रास? त्यांच्या अभिभाषणामध्ये २६ जिल्ह्यातील २१९ तालुक्यातील १८,२६७ गावांना अवर्षणाचा तडाखा बसला. अध्यक्ष महोदय, हीच जुनी माहिती राज्यपालांनी नवीन अभिभाषणात दिली आहे. १९८२ पासून दुष्काळाचा तडाखा बसून राहिला

आहे. इंग्रजीमध्ये अशी एक म्हण आहे की, " old wine in new bottle" तीच दारू नव्या बाटल्यांत भरली. मराठीमध्ये त्या म्हणीचे भाषांतर करावयाचे म्हटले तर " तीच दारू बाटली बदलली " असे करावे लागेल. दारूचे प्रकार अनेक आहेत. अध्यक्ष महोदय, राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात असे म्हटले आहे की, "२६ जिल्ह्यांतील २१९ तालुक्यातील १८,२६३ गावांना या अवर्षणाचा तडाखा बसलेला आहे. अत्यंत कमी पाऊस पडल्यामुळे या वर्षीच्या उन्हाळ्यात सुमारे १६,००० गावांना व १०५ नागरी क्षेत्रांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासण्याची शक्यता आहे ". त्यानंतर दरवर्षी त्यांनी आपल्या भाषणात असे म्हटले आहे की, जनतेला पिण्याचे पाणी पुरविण्यास माझे शासन वचनबद्ध आहे. असे दरवर्षी केले जाणारे विधान याही अभिभाषणात मी करीत आहे. अध्यक्ष महाराज, जनतेला पिण्याचे पाणी पुरविण्यास वचनबद्ध आहे पण किती वर्षांपासून? रामाचा वनवास बारा वर्षांत संपला. स्वराज्य मिळून ४० वर्षे झाली पण लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. शासन लोकांना जवस, भुईमूग व तिळाचे तेल देऊ शकत नाही. हेही मी समजू शकतो. रॉकेल देऊ शकत नाही, हेही मी समजू शकतो पण पिण्याचे पाणी देऊ शकत नाही. हा दैवदुर्विलास आहे. अध्यक्ष महाराज, मी महाराष्ट्रामध्ये राहत असलेला सामाजिक कार्यकर्ता आहे म्हणून माझी नामुष्की आहे. ४० वर्षानंतरही पिण्याच्या पाण्यासाठी स्त्रिया मागणी करतात. परंतु त्यांना पाणी मिळत नाही म्हणून रिकाम्या घागरी घेऊन परत जातात ही शोकांतिका आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात असे म्हटले आहे की, ५४ टक्के ग्रामीण जनतेला पाणी देण्यात आले आहे. याचा दुसरा अर्थ असा होतो की, दुर्दैवाने आम्ही ४६ टक्के ग्रामीण जनतेला तीस वर्षांनी पाणी देऊ शकलो नाही.

राज्यपालांनी आपल्या भाषणात ५४ टक्क्यांचा उल्लेख केलेला आहे. याचाच दुसरा अर्थ असा की ग्रामीण भागातील ४६ टक्के जनतेला आम्ही पिण्याचे पाणी देऊ शकत नाही. याची स्वच्छ कबुली राज्यपालांनी आपल्या भाषणात दिली आहे. हे संपूर्ण पिण्याचे पाणी देण्यासंबंधीचे अभिवचन पूर्ण करण्यासंबंधी जो कालबद्ध कार्यक्रम असावयास पाहिजे व तो यापूर्वी सांगितलेला आहे त्यापासून डेव्हीएशन झालेले आहे. त्यापासून हे भाषण परावृत्त झालेले आहे. त्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले आहे की सहाव्या योजनेतील हे तिसरे वर्ष सुरू आहे. गेल्या दोन वर्षांत ५४ टक्क्यावरून हा आकडा किती वाढलेला आहे हे राज्यपालांनी काही सांगितलेले नाही. ८२२४ गावांना हा कार्यक्रम राबविण्यासाठी २५० कोटी रुपये खर्च येईल एवढाच भाषणात उल्लेख केला आहे. १६ हजार खेड्यांचा उल्लेख वेगळा आणि ८२०० गावांना हा कार्यक्रम राबविण्यासाठी २५० कोटी रुपयांची जी तरतूद केली आहे त्याचा संबंध जुळत नाही. मग मघाशी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्राचा भूगोल बदलावा लागेल. दरवर्षी टंचाईग्रस्त गावे निर्माण होतात, जेथे पाण्याचे सोर्स निर्माण होतात, तेथील बोअर, विंधण विहिरी या ड्राय होतात व पिण्याचे प्रश्न निर्माण होण्याचे ओव्हरलॅपिंग सर्व राज्यात सुरू आहे व त्यामुळे निश्चित आकडा कळून येत नाही. ३५ हजार, ४० हजार गावांपैकी अमुक इतक्या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आम्ही सोडवला आहे याचे ब्रेकअप आपल्याकडे आहे काय? या गावामध्ये तात्पुरत्या स्वरूपाच्या पाण्याच्या योजना आहेत आणि आता फक्त अमुक इतक्या गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न शिल्लक आहे व त्या ठिकाणी बैलगाडीद्वारे, टँकरद्वारे पाणी देण्यात येत आहे. अशा प्रकारची माहिती शासनाने द्यावयास पाहिजे. गेल्या सात वर्षामध्ये हे सगळे आकडे एकमेकांना ओव्हरलॅप होत आहेत असे दिसून येते आणि महाराष्ट्रातील खेडी ही पिण्याच्या पाण्यापासून काही प्रमाणात वंचित आहेत. ४६.५० टक्के हा जो आकडा सांगण्यात येतो तो आकडा वाढत जातो. मूळ रोगावर जर आपण औषध शोधले नाही तर रोगाचा प्रादुर्भाव होत राहणारच.

म्हणजे या ठिकाणी नियोजनाचा दुष्काळ आहे. जे जे राज्यकर्ते आले आहेत त्यांना यासंबंधीची काही आस्था नव्हती. दुर्दैवाने कोणताही मुख्यमंत्री या ठिकाणी जास्त दिवस टिकत नाही. तो तरी बिचारा कशाला प्रयत्न करील वर्षे दोन वर्षे आपण आहोत तेवढेच आपण काम करा असे त्याला वाटते. काल दुष्काळी परिषदेच्या निमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली व त्यांना मी असे सांगितले की इतरांप्रमाणे तुमच्याकडे माझ्या अपेक्षा नाहीत तर परस्पेक्टीव्ह प्लॅनिंग आपण यासंबंधी काय करणार आहात अशा प्रकारच्या अपेक्षा माझ्या आपल्याकडून आहेत. मलमपट्टीच्या रूपाने दरवर्षी तेच तेच आकडे आम्ही ऐकत असतो. जनप्रतिनिधी मग तो आम्ही असो अथवा तुम्ही असा कोणताही जनप्रतिनिधी खेड्यामध्ये गेला तर त्याला लोक असे विचारतात की, स्वराज्य मिळून ३० वर्षे झाली तरी तुम्ही अजून आम्हाला पाणी देऊ शकत नाही. यासाठी आम्ही तुम्ही असे सर्वच वाटे करीत आहोत. यासंबंधी आम्ही काही नियोजनच केलेले नाही. कोट्यवधी रुपयांचा खर्च १९८२ ते १९८७ असा पाच वर्षे करून आम्ही त्याबाबत काही करू शकलो नाही. कोणत्या काँक्रिट उपायाने व्यवस्थित रिसौसॅस टॅप करून आम्ही गावांना पाणी देऊ शकू याबाबत काही प्रयत्न झाला नाही. या गावांना पाणी देऊन पाणी पुरवठा करणाऱ्या गावांची संख्या आम्ही मायनस करू शकलो नाही. त्यामुळे हे सगळे आकडे ओव्हरलॅपिंग होत असल्याचे दिसून येते.

अध्यक्ष महाराज, अनेक वेळा दुष्काळासंबंधी मदतीची केंद्र सरकारकडे आम्ही मागणी केलेली आहे. मला माननीय महसूल राज्यमंत्र्यांकडून जाणून घ्यावयाचे आहे की, अलीकडे केंद्र सरकारने दरवर्षीचा ॲन्युअल प्लॅन करत असताना काही निर्बंध टाकलेले आहेत. मार्जिनल मनी इव्हॅच्युईलिटीकरता राज्यामध्ये ठेवण्यात आले पाहिजेत अशा प्रकारचे निर्बंध केंद्र सरकारने टाकलेले आहेत. हा मार्जिनल मनी आपण किती ठेवला आहे यासंबंधी १९८२ पासूनची माहिती जर मंत्रिमहोदयांनी दिली तर अधिक चांगले होईल. मग कधी काळी केंद्र सरकारने आपल्याला असे म्हटले आहे काय की आपण मार्जिनल मनी ठेवला नाही त्यामुळे आम्ही आपल्याला मदत देत नाही. आजच्या वर्षाची तशी स्थिती नसेल परंतु ॲक्युम्युलेटेड स्थिती काय आहे? आपण केंद्र सरकारकडे ५१६ कोटी रुपये मागितले असताना केंद्र सरकारने आपल्यापर्यंत फक्त ५६ कोटी रुपये दिलेले आहेत. ५१६ कोटी रुपयांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने शास्त्रीय मागणी केली असतांना केंद्र सरकारने ५६ कोटी रुपये दिले तर त्यामध्ये नॅशनल थिंकींग काय आहे? सायंटिफिक थिंकींग काय आहे आणि केंद्र सरकार आपल्याला हे पैसे का देत नाही? भयानक दुष्काळ राज्यामध्ये आहे आणि ५१६ कोटी रुपयांची मागणी आपल्या राज्याने दुष्काळासाठी केली तर ५६ कोटी रुपये तोंडावर फेकून पानं पुसणे अशा प्रकारची वर्तणूक केंद्र सरकार का करीत आहे याबाबत काहीतरी विवेचन करण्यात आले पाहिजे. धोरणात्मक उपायांपर्यंत मी अजूनही पोहोचलेलो नाही.

सभापती महोदय, मी मघाशी म्हटले होते की धोरणात्मक बाबीसंबंधी तसेच दुष्काळ कसा हटवावा या बाबींना मी अजूनही स्पर्श केलेला नाही. परंतु दुष्काळाचे सम्यक दर्शन घडवू इच्छितो. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील दुष्काळ मी स्वतः प्रत्यक्ष जाऊन पाहून आलो आहे. मी त्या ठिकाणचा दुष्काळ पाहिला आहे तसेच रोजगार हमी योजनांची कामे पाहिली आहेत. पिण्याच्या पाण्याची अडचण कोठे कोठे आहे त्या ठिकाणी जाऊन आलो. मजुरांना शेल्टर कोठे दिले आहे ते पाहून आलो. गुरांना कोणत्या भावाने विकले जाते ते पाहून आलो, कडबा व उसाच्या पेंढ्या यांचा बाजारातील काय भाव आहे हे पाहून आलो. महाराष्ट्रातील दुष्काळाचे एक सम्यक दर्शन पाच सात उदाहरणे देऊन मी आपल्यासमोर

उभे करू इच्छितो. सातारा जिल्ह्यात आजच्या तारखेला ७२ गावांना आणि २४ वाड्यांना अजूनही टँकरद्वारे पाणी दिले जाते. माझा दौरा संपून सात आठ दिवस झाले असतील. तेव्हा ७२ गावांना व २४ वाड्यांना आजही टँकरने पाणी दिले जाते. या जिल्ह्यात ३ हजार ४५० हातपंपापैकी १५२ कायम स्वरूपी नादुरुस्त आहेत. तर पाणी आटल्यामुळे ४९४ हातपंप कायमचे बेकाम झालेले आहेत आणि ३०० वीजपंपापैकी जवळ जवळ २०० पंप हे नादुरुस्त आहेत. ही झाली एका जिल्ह्याची हकीकत. हे सारे टिप्पण माझ्याजवळ आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला हिंगोली तालुक्यातील भगवती येथील तात्पुरत्या नळ योजनेचे जे टिप्पण माझ्याजवळ आहे ते नंतर देईन. तर या योजनेतील पिण्याच्या पाण्याची टाकी होती. ती फुटली त्यामुळे साऱ्या बाया रिकाम्या घागरीने परत आल्या. अध्यक्ष महाराज, सावरखेडा हे गाव आहे तेथील नळ योजना २७.३ ला झाली आणि ५०० लोकांना नळाचे कनेक्शन दिले. पण फक्त ३५ नळांना दोन घागरी भरतील इतकेच पाणी आले. हे एक सम्यक दर्शन दुष्काळातील आपण केलेल्या व्यवस्थेचे मी आपल्याला घडवितो आहे. अध्यक्ष महाराज, कोकणात काय परिस्थिती आहे? साऱ्या कोकणपट्टीमध्ये प्रतिवर्षी ८२ ते १०२ दिवस पावसाळा असतो. परंतु या वर्षी सरासरी अडीच मिलीमीटर पाऊस झालेला आहे. रत्नागिरीमध्ये तर ६३ मि.मि. झाला, सिंधुदुर्गमध्ये ५७ मि.मि. झाला आणि रत्नागिरीमध्ये गेल्यावर्षी सरासरी ३,९४९ मि. मि. पाऊस झाला तर यंदा तो केवळ २,४८१ मि.मि. झालेला आहे. सिंधुदुर्गमध्ये ४,४०० पैकी यंदा २,०३२ मि.मि. पाऊस झालेला आहे.

अध्यक्ष महाराज, आता मी मजुरांच्या स्थलांतराविषयी माहिती देतो. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोटमधील ४० हजार मजुरांनी आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबई, पुणे, सातारा तसेच कर्नाटकातील गुलबर्गा, धारवाड आदी ठिकाणी स्थलांतर केले आहे, तर सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील कत्तलखान्याकडे जाणाऱ्या जनावरांची संख्या जवळ जवळ १० हजार आहे. चाऱ्याच्या अभावी, ही जनावरे कत्तलखान्याकडे जाऊ लागली आहेत. उसाचे वाडे ज्याला म्हणतात त्याचा भाव आज ७५ रुपये शेकडा आहे आणि कडबा ४०० रुपये शेकडा आहे. म्हणजे नेहमी कडबा स्वस्त असतो आणि उसाचे वाडे महाग असतात परंतु सध्या ते नेमके उलट झालेले आहे. अध्यक्ष महाराज, उदगीर, देवरीच्या बाजारामध्ये आज गाईची किंमत बकरीच्या किमतीपेक्षा कमी झालेली आहे. आपण कॅम्प काढले आहेत पण कोणी पोटाचे लेकराप्रमाणे जनावरे नेत नाहीत म्हणून कत्तलखान्यामध्ये बैल, गाई, म्हशी यांचा ओघ लागला आहे. देवरी, उदगीर, निलंगा येथील बाजारामध्ये मटणाचे भाव भाजीपाल्यापेक्षाही कमी झालेले आहेत. भाजीपाल्याचा भाव ५ रुपये तर मटणाचा भाव २ रुपये झालेला आहे. म्हणजे ही सारी जनावरे कत्तलखान्याकडे चालली आहेत म्हणून मटणाचे भाव कमी झालेले आहेत.

अध्यक्ष महाराज, माझ्या दौऱ्यामध्ये जे दुष्काळाचे चित्र मला दिसले त्याचे मी टिप्पण करून ठेवले आणि त्याचे एक सम्यकदर्शन आपल्याला घडावे म्हणून मी हे येथे सांगतो आहे. एकट्या अहमदपूर तालुक्यातील ६१ गावांमध्ये दुष्काळाचे एकही काम सुरू नाही. देवरी नावाचे गाव आहे तेथे पाण्याचा तलाव उपलब्ध आहे. पण वीज नाही. ४ खांब गेले आहेत तरीही महिलांना पाण्यासाठी ३-३ मैल जावे लागते. म्हणजे आजही तेथे हीच स्थिती कायम आहे. आमच्या आया-बहिर्णींना पिण्याच्या पाण्यासाठी ३-४ मैलाची आजही पायपीट करावी लागते आहे. चारा, कडबा खायला न मिळाल्याने लुकडी, पोट खपाटीला गेलेली आमची जनावरे कत्तलखान्याकडे चालली आहेत. अध्यक्ष महाराज, मी देवरीच्या बाजारात गेलो होतो तेथे ५० धानाच्या पेंडीची किंमत ५ रुपये होती. मी तेथील एकाला विचारले की,

तुझ्या बैलाला किती पेंड्या लागतील तर तो म्हणाला की, इमानदारीने द्यायचे झाले तर बैलाला ५० पेंड्या लागतात. तेव्हा आता हे झाले एक चित्र. अध्यक्ष महाराज, दुसरे म्हणजे जो उपलब्ध निधी आहे त्यानुसार राज्यात मॅनडेज आहे. त्यात ८ लाख लोक इजीएस वर कामाला आहेत. तेही या एप्रिल महिन्याच्या ४ तारखेला. अध्यक्ष महाराज, १९७२ पासूनची आकडेवारी काढली तर आजपर्यंत ८ लाखाचा आजचा आकडा हा फारच तोकडा पडतो. १९७९ सालात जवळ जवळ १३ ते १४ लाख लोक इजीएसच्या कामावर होते. अध्यक्ष महाराज, सर्वत्र इजीएसची कामे सुरू आहेत, पण मला हे समजत नाही म्हणून त्याचे कारण मी समजून घेऊ इच्छितो आहे की, आपण त्या संदर्भात काही गो स्लोचा इशारा दिला आहे काय किंवा या इजीएसची जास्त कामे मजुरांना उपलब्ध होणार नाहीत अशी काही प्रशासकीय जी. आर. अडचण निर्माण करा म्हणून सांगितले आहे काय? अध्यक्ष महाराज, काल माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर जी दुष्काळाबाबत चर्चा झाली त्यावेळी माननीय राज्यमंत्री महसूल, हेही होते. मी मुख्यमंत्र्यांना सांगितले की, इजीएसवर मजुरांना काम द्यावे या मताचा मी आहे आणि ते काम देताना उत्पादन कामच द्यावे, अनुत्पादन काम करायचे नाही हेही बरोबर आहे. मग त्यातून प्लॅन, नॉन प्लॅनमधील जी काही असतील ती कामे द्यावीत. आपण काही रस्त्यांच्या कामाला परवानगी दिलीत. मी आपल्याला विचारू इच्छितो की, याचा परिणाम काय झाला तर ज्या पर्टिक्यूलर पॅचमध्ये मजुरांची पोटेन्शियल ५०० आहे तेथे १०० लोकांनाच काम मिळाले आहे. तर १०० क्षमता असताना ५०० लोक कामावर जात आहेत आणि त्यामुळे मजुरीही ५-५ रुपये पडते आहे. इतक्या कमी मजुरीत कोणी काम करीत नसेल तर तो मग शहराकडे धाव घेतो.

आज या मुंबई शहरातील कुर्ला, गोवंडी, चेंबूर आपण जाऊन पहाल तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून आलेले अनेक लोक, या दुष्काळामुळे विस्थापित आलेले अनेक लोक आपल्याला दिसतील की, ज्यांनी या मुंबईचा आसरा घेतला आहे. अध्यक्ष महाराज, मी या अर्थाने हे सांगत आहे की, आपल्या डोळ्यासमोर या दुष्काळी परिस्थितीचे एक सम्यक चित्र उभे रहावे. अध्यक्ष महाराज मी आपल्याला सांगू इच्छितो की, इजीएस ही मजुरांना काम देणारी कामधेनू आहे. या योजनेचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. समर्थ हातांना यातून काम मिळेल. शेतावर ज्यांना काम मिळणार नाही अशांना काम देण्याची योजना महाराष्ट्र शासनाने कै. वसंतरावजी नाईक यांच्या कारकिर्दीत सुरू केली आणि आजपर्यंत म्हणजे नामदार शंकररावजी चव्हाण यांच्या कारकिर्दीमध्येही ती कायम आपण ठेवली आहे. त्याचबरोबर मला हेही सांगितले पाहिजे की, या योजनेसंबंधी बोलतांना शासनाचे ३०० कोटी या रोजगार हमी योजनेवर, मजुरांवर खर्च होतात असे आपण कृपा करून बोलू नका. एखाद्या माणसाने सांगावयाचे आहे की, माझा हा पोरगा आहे, त्याला २० वर्षे पोसले आहे. त्या पोराला दूध दिले आहे, संत्री दिली आहे. मोसंबी दिली आहेत. त्याला कपडे दिले आहेत आणि आता १७ वर्षांचा झाल्यानंतर त्याला सूट देखील दिलेला आहे. आणि आता या मुलासाठी १७ वर्षानंतर ३ लाख रुपये खर्च आला आहे. असा एकादा बाप म्हणावयाला लागला तर त्या बापाला लोक हसतील. आपण रोजगार हमी योजनेचा कायदा एकादा तपासून पहा. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. सुब्रमण्यम यांना माहिती आहे की, माझा या कायद्याशी किती जवळचा संबंध आहे तो १९७५ साली हा कायदा करण्यात आला आहे. यातील पहिले कलम असे आहे की It will be a first charge on the development works. म्हणजे जी जी काही विकासाची कामे असतील ती आपल्याला रोजगार हमी

योजनेतून घेता येतील. रोजगार हमी योजनेसाठी जेवढा पैसा लागेल तेवढा पैसा देण्याची जबाबदारी राज्य शासनाने स्वीकारलेली आहे. तसेच यामधील तिसरी गोष्ट अशी आहे की, मजुरांना कोठे काम द्यावयाचे. कामे कोठे काढावीत याबाबतीत कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली ब्ल्यू प्रिंट करावीत आणि कामे काढावीत. अध्यक्ष महाराज मी योजनेकडे गेली १० वर्षे पाहत आहे. अध्यक्ष महाराज त्या मजुरांचे ताटात जेवले काय किंवा वाटीत जेवले काय? त्यामध्ये काहीच फरक नाही. परंतु त्याला जेव्हा पुरणाची पोळी खाऊ द्यावयाची, परंतु हे देत असताना उपकाराच्या भावनेने पाहावयाचे हे बरोबर नाही.

अध्यक्ष महाराज रोजगार हमी योजना ही कलेक्टरकडून कशी झाली? पूर्वी सॉईल कॉन्झरवेशनचे काम रोजगार हमी योजनेत नव्हते ते काम ॲग्रिकल्चर डिपार्टमेंट करीत होते. परंतु आता सॉईल कॉन्झरवेशनची कामे आपण आता रोजगार हमी योजनेतून करीत आहोत. पूर्वी रोजगार हमी योजनेमध्ये सोशल फॉरिस्ट्रीचे काम नव्हते. ते काम फॉरेस्ट डिपार्टमेंटकडे होते. परंतु हे काम रोजगार हमी योजनेमध्ये असल्यामुळे फॉरेस्ट डिपार्टमेंटचा पैसा आपण वाचविला आहे. पूर्वी कॅनॉलची कामे ही इरिगेशन डिपार्टमेंटमार्फत करण्यात येत होती. आता ही कॅनॉलची कामे आपण रोजगार हमी योजनेमध्ये करीत आहोत. या रोजगार हमी योजनेला आपण द्रौपदी बनविले आहे, या रोजगार हमी योजनेला इरिगेशन डिपार्टमेंट आपली बायको म्हणत आहे. ॲग्रिकल्चर डिपार्टमेंट या योजनेला आपली बायको म्हणत आहे. तसेच फॉरेस्ट डिपार्टमेंटसुद्धा म्हणत आहे. अध्यक्ष महाराज रोजगार हमी योजनेमध्ये आपण ३०० कोटी रुपये खर्च करीत आहोत, त्यापैकी जवळजवळ १५० कोटी रुपये हे जे डिपार्टमेंटमधून कामे होणार होती, त्यासाठी खर्च होणार आहेत. ती कामे रोजगार हमी योजनेमध्ये आल्यामुळे १५० कोटी रुपये आपण वाचविले आहेत. म्हणजे या योजनेवर आपण ३०० कोटी रुपये खर्च करीत असतांना बरेच कोटी रुपये वाचवीत आहोत. Thereby you have relieved the burden on plan-works. असे आपण या ठिकाणी कबूल केले पाहिजे.

अध्यक्ष महाराज एखाद्या ठिकाणी फ्लड प्रोटेक्शन काम करण्यासाठी ज्यावेळी आम्ही मागणी करीत असतो त्यावेळी आम्हाला असे सांगितले जाते की, पुरामुळे किती माणसे वाहून गेली आहेत, पुरामुळे किती जनावरे मेली आहेत. अशा प्रकारे अधिकाऱ्यांकडून विचारले जात असेल तर ती गोष्ट बरोबर आहे काय? आपण आता २४ सप्टेंबरचा जी. आर. मागे घेतला आहे. अध्यक्ष महाराज रोजगार हमी योजनेमध्ये आपल्याला जी काही कामे पाहिजे असतील त्याची परवानगी कलेक्टरकडून घ्यावी. The whole powers should be decentralised and given to the Collectors. त्यामुळे अनेक कामे निघू शकतील. अध्यक्ष महाराज आपल्याला कोणत्याही परिस्थितीत रोजगार हमी योजना बंद करणे शक्य नाही. ज्या दिवशी रोजगार हमी योजना बंद होईल त्या दिवशी हे सरकार बंद होईल. ५८-५९ टक्के शेतीवर काम करणारे शेतमजूर नव्हे तर लहान-लहान कास्तकार, १०-१० एकर जमिनीचे मालकही आज आपल्या ह्या रोजगार हमी योजनेच्या कामावर अवलंबून आहेत. तेव्हा त्यांनाही काम उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार उत्पादक कामे ह्या इ.जी.एस. च्या माध्यमातून मंजूर करणे ही या शासनाची नैतिक जबाबदारी आहे. माझे प्रांजळ मत आहे की, आपल्या येथे १५ लाख मॅनडेज असावयास पाहिजे होते. परंतु प्रत्यक्षात ते फक्त ८ लाख दाखविण्यात आले आहे. ही एकप्रकारे कुचराई झालेली आहे. ती मी या सदनासमोर आणून देऊ इच्छितो. सुदैवाने आज अर्थसंकल्पामध्ये आपण काही आयोग नेमण्याचा प्रयत्न केला आहे. त्यास टेंपररी मंजुरी दिली. मी या ठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छितो.

समजा माझे एखाद्या बँकेत खाते आहे त्या बँकेत मी पैसे साठविले आहेत. स्वीस बँक सोडून... अध्यक्ष महाराज, जर मी सातत्याने त्यातील पैसे वरचेवर काढू लागलो तर माझा तेथील बँक अकाऊंट केव्हा ना केव्हा कट होईल. त्याचप्रमाणे भूगर्भातील पाण्याचे आहे. आज आपण निरनिराळ्या मार्गाने भूगर्भातील पाणी उपसण्याच्या, संपविण्याचा सपाटा लावला आहे. तो एक दुष्टपणा आहे.

अध्यक्ष महाराज, आम्ही ज्यावेळी शाळा-कॉलेजात होतो त्यावेळी कोठे तरी १०-१५ मैलावर एखादी मोट चालताना दिसत असे. त्यामधून पाणी उपसताना दिसत असे. आज १०-१० पावलावर विहिरी दिसतात. त्यावर पंप बसविलेले दिसतात. आज भूगर्भातील पाण्याचे सारखे विड्रॉवल चालू आहे. डिपॉझिट काहीच नाही. त्यामुळे एक दिवस असा उजाडेल की, या महाराष्ट्राचे राजस्थान होईल. हीच जर प्रथा आपण चालू ठेवली तर महाराष्ट्राचे वाळवंट होईल. अध्यक्ष महाराज, ही दुष्ट पद्धती बंद केली पाहिजे. विंधन विहिरीबाबतचा आपला अनुभव काय आहे? पूर्वी ५०-६० फुटावर बोअर लागत होती. आज विदर्भामध्ये ती ३०० फुटावर लागत आहे. मराठवाड्यामध्ये तर ती ४०० फुटावर लागत आहे. नगर जिल्ह्यात पाथर्डी येथे १,५०० फुटावर खोल जावे लागते. अध्यक्ष महाराज, अशाप्रकारे तात्पुरत्या उपाय योजनांनी हे शासन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवू लागले तर मला वाटते लवकरच ह्या महाराष्ट्राचे वाळवंट होईल. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सूचना केली होती की, आपण आयडियल वॉटर ग्राऊंड सर्व्हेचा विचार करा. पाण्याचा गुणधर्म आहे की, वरून खाली पाणी पडते ते पाणी अथवा नदी नाल्याचे पाणी ज्यावेळी भूगर्भातील पाण्याच्या लेव्हलवर येऊन मिळते तेव्हाच त्याचे पर्कोलेशन सुरू होते. माणसे म्हणतात विहिरीला पाणी लागले. वरचे पाणी भूगर्भातील पाण्याला येऊन मिळाल्याशिवाय पाणी रीचार्ज होत नाही. त्याचे पर्कोलेशन होऊन ते तलावात, विहिरीत येत नाही. तेव्हा वरचे पाणी वा नदी नाल्यातील पाणी रिचार्ज करण्याच्या दृष्टीने काय उपाय योजना केली? माझी खात्री आहे, की, काऊडेप, कॉम्प्रेहेन्सिव्ह लॅण्ड डेव्हलपमेंटची जी कामे आहेत त्याद्वारे हे काम करता येईल. त्याने हे पाणी भूगर्भाच्या पाण्याला मिळेल व पाणी रिचार्ज होईल. नंतर ते विहिरी, तलावात येईल. अध्यक्ष महाराज, शासन काऊडेप व कॉम्प्रेहेन्सिव्ह लॅण्ड डेव्हलपमेंटची कामे रोजगार हमी योजनेमध्ये का घेतली जात नाहीत? तशी ती घ्यावीत अशी माझी सूचना आहे. आज काऊडेपच्या कामासाठी ३५ हजार माणसांची गरज आहे. मात्र शास्त्रोक्त पद्धतीने हे काम करणारी अवधी १,८०० माणसेच तुमच्याकडे उपलब्ध आहेत. मग ही काऊडेपची कामे कशी होणार? म्हणून मी फक्त रोजगार हमी योजनेच्या कल्पनेपुरता परस्पेक्टिव्ह प्लॅनिंगचा मार्ग सांगितला.

अध्यक्ष महाराज, मी विभागीय दृष्टिकोनातून बोलत नाही. पण पश्चिम महाराष्ट्र नैसर्गिकताच साईट्सच्या दृष्टीने सुदैवी आहे. त्या ठिकाणी परकोलेशन टँक, नाला बंडिग याच्या साईट्स मिळतात पण विदर्भाची परिस्थिती पाहू गेल्यास आपल्याला असे दिसते की, सुपारी फोडावयाला गोटा शोधायचे म्हटले तर १०-१० फुटांवर गोटा मिळत नाही. अशा परिस्थितीत विदर्भ आणि मराठवाडा या विभागातील साईट्सचा विचार करता त्या ठिकाणी केटी विअर्स, परकोलेशन टॅक्स आँणि मायनर टॅक्स यांचे नॉर्म्स कन्डोन केले पाहिजेत. अध्यक्ष महाराज, काल झालेल्या बैठकीला माननीय मंत्रिमहोदय श्री. सुब्रम्हण्यम् होते. माझ्या जिल्ह्यातील केटी विअर्सच्या ३२ योजना नॉर्म्स कन्डोन करण्याकरिता पडून आहेत. अकोला जिल्ह्यातील आणि यवतमाळ जिल्ह्यातील ही ३०-३० योजना पडून आहेत. आज जिवंत पाणी वाहून चालले आहे. ते अडविणे महत्त्वाचे आहे. पण ते कॉस्ट बेनिफिट रेशोमध्ये बसत नाही. असे

सांगतो. खरे म्हणजे वाया जाणारे पाणी, अडविणे ही काळाची गरज आहे. म्हणून हे नॉर्म्स आपण कन्डोन करा, पाणी जमिनीत जिरवा ते भूगर्भाच्या लेव्हलपर्यंत आणा आणि तेथून ते रीचार्ज करा. अध्यक्ष महाराज, खालच्या सभागृहात माननीय सदस्य कटकवार म्हणून आहेत. त्यांचे वडील सी.ई.ओ. होते. त्यावेळी मी उप सभापती होतो. त्यांना मी सांगितले त्याप्रमाणे सातपुड्याच्या पायथ्याशी १०-१२ फुटांचे चर खोदले. डोंगरावरून पाणी चरामध्ये आले आणि मग ते भूगर्भाच्या लेव्हलपर्यंत आले. पाण्याची लेव्हल वाढली. अशा प्रकारे सातपुडा पर्वताचा पायथा, मराठवाड्यातील टेकड्या आणि पश्चिम महाराष्ट्रातील डोंगर यांच्या पायथ्याशी आपण हे काम करू शकणार नाही काय? महाराष्ट्राचे राजस्थान होण्यापासून जर आपल्याला वाचावयाचे असेल तर वाया जाणारे पाणी प्रथम आडवा, ते जमिनीत जिरवा आणि पाण्याची पातळी वाढवा, आणि तेथून पाणी रीचार्ज करा असा नवीन नारा आपल्याला द्यावा लागेल. तो दिला नाही तर पाण्याची समस्या कठीण होईल. म्हणून मी म्हटले की, आपल्याकडे नियोजनाचा दुष्काळ आहे. एकजुटीचा आणि सामूहिक प्रयत्नांचा दुष्काळ आहे. म्हणून या प्रश्नावर चर्चा करण्याकरिता आपण वेळोवेळी बसले पाहिजे. मागे नोव्हेंबर महिन्यातच मीटिंग झाली त्यानंतर काल मीटिंग बोलाविण्यात आली. म्हणून माझी अशी सूचना आहे की, कमीत कमी महिन्यातून एक मीटिंग आपण बोलावली पाहिजे. येणारा एप्रिल आणि मे महिना भयंकर जाणार आहे. मी अंदाज सांगतो. त्याची माननीय राज्यमंत्र्यांनी नोंद घ्यावी. मे च्या शेवटच्या आठवड्यामध्ये जर पाऊस आला तर ठीक आहे. पण नाहीतर ३१ मे ला २६,००० गावांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागेल. ३१ मे ला ४५,००,००० लोकांना काम द्यावे लागेल. दोन महिन्यांपूर्वी मी हे आपल्याला सांगत आहे त्याची आपण नोंद करा. त्यासाठी आतापासून नियोजन करा. काम देण्यासाठी ब्ल्यू प्रिंट तयार ठेवा. पुढे येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आतापासून आपण नियोजन केले पाहिजे.

मी या चर्चेच्या निमित्ताने परस्पेक्टिव्ह प्लॅनिंगची कल्पना सभागृहाला दिली आहे. ३१ मे १९८७ रोजी ४५ लाख लोकांना काम द्यावे लागेल. या दृष्टीने तयार करावी लागेल. आणि जवळ जवळ २५ हजार गावांना पिण्याच्या पाण्याची सोय करावी लागेल. कदाचित काही गावे ओव्हरलॅप होण्याचीसुद्धा शक्यता आहे. परंतु अध्यक्ष महाराज, या पाण्याच्याबाबत असा अनुभव मला अमरावती जिल्ह्यात आला आहे. की, कसबेगव्हाण या गावात पिण्याच्या पाण्याखाली विहीर होती परंतु घेतलेल्या बोअरला पाणी लागल्यामुळे त्या गावातील विहिरी आटल्या. भूगर्भातील पाण्याचा साठा अशाप्रकारे बोअरवेलकडे वळल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार आहे. तेव्हा पिण्याच्या पाण्याची देखील व्यवस्था करावी लागणार आहे. त्याच बरोबर ४०/५० लाख लोकांना ३१ मे २०८७ रोजी काम द्यावे लागेल. त्याचबरोबर जी ॲडजॉयनिंग स्टेटस आहेत ती आंध्र, कर्नाटक आणि गुजरात या ठिकाणी चारा उपलब्ध असून तेथून चारा खरेदी करावा लागेल. माझ्याकडे माहिती आहे की, ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी या ठिकाणाहून चारा महाराष्ट्राच्या बाहेर जातो. वास्तविक चारा निर्यातीला बंदी असताना अशा प्रकारे चारा जातोच कसा? महाराष्ट्राच्या बाहेर बॉर्डरवर देवनी, उदगीर या ठिकाणी कडबा उपलब्ध आहे परंतु कलेक्टरांना ऑर्डर नसल्यामुळे ते कडबा खरेदी करू शकत नाहीत. मराठवाडा हा आंध्रप्रदेशच्या बॉर्डरवर आहे. सोलापूर, कर्नाटकच्या बॉर्डरवर आहे, ठाणे जिल्हा गुजरात राज्याच्या बॉर्डवर आहे. तेव्हा त्या राज्यात जो सरप्लस चारा असेल तो खरेदी करून आपल्या राज्यातील जनावरे जगवावी लागतील. आपण चाऱ्याची तगाई रोख स्वरूपात न देता ती ईन कॉईण्डमध्ये द्यावी. अर्थातच हा

सर्व चारा सहकारी संस्थांमार्फत वाटण्यात यावा. आज जनावरांना लेकरासारखे सांभाळण्याची गरज आहे. तेव्हा चारा प्रत्यक्षात पुरविण्याची व्यवस्था करण्यात यावी आणि ती सहकारी संस्थामार्फत देण्याची व्यवस्था करावी अशी माझी सूचना आहे.

तेव्हा मी पिण्याच्या पाण्यासंबंधी, रोजगारांसंबंधी आणि गुरांच्या सूचना दिलेल्या आहेत. चाऱ्यासाठी रोखीने पैसे द्यावयाचे नाहीत. आपण चाऱ्यामध्ये किंवा गवतामध्ये तगाई द्यावी. कारण माणसाची ती प्रवृत्ती आहे. मी निर्भेळ विचार याबाबत करतो आहे. पैसा दिला तर तो शेतकरी चारा घेईल असे नाही. तेव्हा चाऱ्यासाठी तकावी दिल्यानंतर देखील सायमलटेनियसली त्या त्या गावामध्ये आपण चाऱ्यासाठी स्टॉल उपलब्ध केले पाहिजेत. अध्यक्ष महाराज, सुदैवाने सिरिल्ससंबंधी दुष्काळ नाही. तांदूळ, गहू, ज्वारी असा दुष्काळ नाही. तरीही या सिरिल्ससंबंधाने शासनाने बेफिकीर राहता कामा नये. ज्वारीचा भाव सव्वादोन रुपये किलो पर्यंत गेलेला आहे. गव्हाचे भाव वाढलेले आहेत. तांदळाचे भाव वाढलेले आहेत. याचा अर्थ सिरिल्स उपलब्ध असल्यानंतरही ज्वारीचा एकाधिकार खरेदीने भाज्यांचा साठा संचित न केल्यामुळे व्यापाऱ्यांनी बफर स्टॉक केला या दृष्टीने स्वस्त धान्य दुकानांवर धान्य ठेवण्याची यंत्रणा सज्ज झाली पाहिजे. गावागावामध्ये दुकाने केली पाहिजेत. तेल, मीठ, मिरची या बाकीच्या गोष्टी सोडा, पण जी पॉप्युलर सिरिल्स आहेत म्हणजे तांदूळ असेल त्या ठिकाणी तांदूळ, गहू होत असेल त्या ठिकाणी गहू, ज्वारी होत असेल त्या ठिकाणी ज्वारी यांचा साठा करणे आवश्यक आहे. आता अमरावती जिल्ह्यामध्ये दर्यापूरला जो कोटा झाला तो तेथेच विकून टाकला असे जर केले तर पुढच्या दोन महिन्यांमध्ये जी काय स्थिती देईल तिचा विचार आज आपण केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, रोजगार हमी योजना यासंबंधी मी सांगितले आहे. भू-गर्भातील पाण्यासंबंधीच्या गोष्टी मी सांगितलेल्या आहेत. अध्यक्ष महाराज, जर सारासार विचार करावयाचे ठरविले तर कायमचे दुष्काळी जिल्हे म्हणून आज १०० पेक्षा जास्त तालुके आहेत. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी आप्पासाहेब जाधव हे या गोष्टी बोलून बोलून शेवटी निवृत्तही झाले. या कायम दुष्काळी जिल्ह्याच्या बाबत आपण काय केले? अध्यक्ष महाराज, परदासानी कमिटी होती, सुकथनकर समिती होती, बर्वे कमिटी होती, आणि सुब्रमण्यम कमिटीही आता आहे. या सगळ्या समित्यांचा रिपोर्ट आपल्याकडे असतानासुद्धा आपण कायम दुष्काळी भागाकरिता काय केले? काहीच केले नाही. नवीन आपत्तीपुढे येणारा दुष्काळ हा वेगळा आहे. पण जो कायम दुष्काळी भाग आहे त्या ठिकाणी काहीच केले नाही. पाण्याचे वाटप, रेशनिंग किंवा नियमन नाही. वाई धरणाचे पाणी खालून वर नेण्याच्या बाबतीत काही भाग का वगळले हे कळत नाही. राज्यकर्ते कशा धोरणाने हे सर्व करतात हे कळत नाही. पण पिण्याचे सोशल डिस्ट्रिब्यूशन केलेले नाही ते केले पाहिजे. या सर्व भागांमध्ये क्रॉप पॅटर्नचाही आपण विचार केलेला नाही. येणारा संभाव्य दुष्काळ हा इव्हेंनच्युॲलिटीचा भाग आहे. कायम जे दुष्काळी जिल्हे आहेत त्याबाबत शासन उदासीन राहिलेले आहे. बेफिकीर राहिलेले आहे. आज अनास्थेचा सुकाळ आहे आणि बेफिकिरीचा आणि आस्थेचा दुष्काळ आहे आणि या सर्व गोष्टीमुळे हा ॲक्युम्युलेटेड दुष्काळ झालेला आहे. अध्यक्ष महाराज, मी एक अधिकृत माहिती आपल्याला देतो.

महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या २६०० टी.एस.सी. पाण्यापैकी आजमितीला ४ एप्रिल १९८७ रोजी आपण १,४२३ टी.एम.सी. पाणी वापरतो. १२०० टी.एम.सी. पाणी आपण वापरत नाही. पाण्याचा वापर करणे म्हणजे समुद्रामध्ये जाणारे पाणी अडविणे. ते पर्क्युलेट करणे, त्याचा साठा

करणे हे आपण का करत नाही? तेव्हा आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर आपण का करीत नाही? आज उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी फक्त ५० टक्के पाणी आपण वापरले आहे. तलावात असलेल्या पाण्याचा वापर आपण करतो काय? पाथर्डीजवळचा जो तलाव आहे त्याची पाच फूट उंची वाढविली तरी ४ मैलांवर ते पाणी जाईल. परंतु ते आपण करत नाही. तेव्हा या संदर्भात परस्पेस्टीव प्लॅनिंग होण्याची गरज आहे. अध्यक्ष महाराज, माननीय श्री. सुब्रमण्यम साहेब व श्री. रोहिदास पाटील यांच्या माहितीकरिता मी सांगतो की, महाराष्ट्राच्या दृष्टीने वाटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट ऑफ इंडिया यांनी एक चॅप्टर लिहिलेला आहे. या संदर्भात केंद्राच्या स्तरावर एक कल्पना पुढे आणलेली आहे. ती कार्यान्वित झाली तर अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. मी रशियाला तीनचार वेळा गेलो होतो. तेथे मी सैबेरियाला भेट दिली होती. मी तेथील वाळवंटही पाहिले आणि नंदनवनही पाहिले. त्या ठिकाणी १२०० किलोमीटरची कृत्रिम नदी निर्माण करून पाणी वाहून नेलेले आहे. आज ग्रीड सिस्टीमने उत्तेरकडील नद्या दक्षिणेकडे आणणे वेगळे. परंतु महाराष्ट्रातील नद्या एकमेकींना मिळवून आपण पाणी पसरवू शकत नाही काय? कर्नाटक राज्यामध्ये समुद्राला मिळणाऱ्या नद्या त्यांनी आत कशा वळविल्या आहेत याचा नकाशा माझ्याजवळ आहे. तसा विचार आपल्या महाराष्ट्रामध्ये का झाला नाही. आज आपल्या राज्यावर दुष्काळाचे संकट आहे ही दुर्दैवी आपत्ती आहे, परंतु त्याचबरोबर आपण आपल्याकडे असलेल्या पाण्याचे नियंत्रण करू शकलो नाही ही सुद्धा दुर्दैवाची बाब आहे. यामध्ये नियोजनाचा अभाव आहे. अनास्था आहे. आपण दुष्काळावर केवळ तुटपुंजी उपाययोजना करतो. जखम झाली तर नुसत्या मलमपट्ट्या लावून उपयोगाचे नाही. त्यासाठी धनुर्वाताचे इंजेक्शन घ्यावयास पाहिजे. परंतु तसा उपाय होत नाही. म्हणून महाराष्ट्रावर जे ॲक्युम्युलेटेड संकट आलेले आहे. त्यावर तात्पुरती उपाययोजना करण्याचा विचार न करता परस्पेक्टिव्ह प्लॅनिंग करण्याच्या दृष्टीने विचार व्हावयास पाहिजे. नाही तर ये रे माझ्या मागल्या अशी अवस्था होते. रोज मरणाऱ्याला कोण रडेल? त्याप्रमाणे दरवर्षी येणाऱ्या दुष्काळाचे गांभीर्य कोणाच्या लक्षात येणार? म्हणून त्यासाठी सबंध महाराष्ट्रामध्ये एक वातावरण निर्माण केले पाहिजे. मुंबई ते भंडारा, मुंबई ते चांदा, मुंबई ते रत्नागिरी या सर्व भागात असे वातावरण निर्माण झाले पाहिजे की, महाराष्ट्र दुष्काळाने पेटलेला आहे, महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट आलेले आहे, सारे लोक जागे झाले पाहिजेत, सारे लोक उठले पाहिजेत. असे एकजुटीचे चित्र निर्माण करता आले पाहिजे. म्हणून या ठिकाणी परस्परांवर टीका करण्याचा प्रश्न नाही. संकटे सर्वांनी शेअर केली पाहिजेत. जेवढी जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. तेवढीच जबाबदारी विरोधी पक्षाचीही आहे. आलेल्या दुष्काळाला इमानदारीने तोंड देणे आणि पुढे दुष्काळ येणार नाही, अशा प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे असा विचार झाल्याशिवाय तीच ती चर्चा करण्यामध्ये काही अर्थ नाही. ज्याप्रमाणे गुरे रवंथ करून चोथा टाकून देतात तशाप्रकारे तीच तीच चर्चा करून तेच भाषण करावयाचे आणि तेच तेच उत्तर तुम्ही द्यावयाचे हे बंद झाले पाहिजे. दुर्दैवाने आज हा प्रसंग कशामुळे आला? तुमचे उत्तर तेच तेच असणार. त्या उत्तरामध्ये नवीन काय असणार? आणि जी जुनी ३/४ उत्तरे दिली तीच तीच उत्तरे पुन्हा देण्याचा दुर्दैवी प्रसंग टाळावा आणि आपण सर्वांनी मिळून इमाने इतबारे व प्रामाणिकपणे या दुष्काळाला तोंड द्यावे अशीच आमची इच्छा आहे आणि त्या दृष्टीने आवश्यक तो दुष्काळाचा प्रतिबंध या शासनाने करावा अशी विनंती करून व माननीय सभापती महोदयांनी मला बोलण्यासाठी थोडा अधिक वेळ वाढवून दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑.

पाण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय हवे

(१८ जुलै, १९८९)

महाराष्ट्रातील पाणी प्रश्नाला चालना देण्यासाठी स्वतंत्र पाणी मंत्रालय स्थापन करण्यात यावे अशी मूलगामी सूचना १९८९ सालीच श्री. रा. सू. गवई यांनी केली होती. पुढचा काळ बघणाऱ्या एका भविष्यवेत्त्या नेत्याची ती सूचना होती. २०१६ मध्ये असे स्वतंत्र मंत्रालय स्थापन होऊन त्याला कॅबिनेट मंत्री मिळालेला आहे.

गेल्या वर्षाचा पावसाळा सोडला तर गेल्या दहा वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये सातत्याने पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ पडत आहे. दुष्काळी गावांची संख्याही ओव्हरलॅपिंग झालेली आहे. वीस हजार गावे याखाली येतात. पिण्याच्या प्रश्नाला राज्य प्रशासनात अग्रपसंती असते त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आपल्याला कमी करता येईल. अशी गावे ओव्हरलॅपिंग झाली आहेत त्याचप्रमाणे मंडळातर्फे पाण्याच्या वितरणाचेही ओव्हरलॅपिंग सुरू आहे. उदाहरणार्थ अर्बन वॉटर, व्हिलेज वॉटर आणि इंडस्ट्रियल वॉटर या सर्वांचे ओव्हरलॅपिंग सायंन्टिफिक नाही. पाण्याच्या संदर्भात आपण ज्या योजना राबवितो त्यामध्ये कायम स्वरूपाच्या योजना रिजनल वॉटर स्कीम, टेम्पररी वॉटर स्कीम अशा योजना राबवितो या योजनाच्या खोलामध्ये शिरलो तर टेम्पररी वॉटर स्कीम दरवर्षी रिपिट होते. गेल्या १० वर्षांमध्ये एक हजार कोटी रुपये खर्च होऊनही पाणी उपलब्ध होऊ शकले नाही. सन्माननीय सदस्या, श्रीमती वसुधा देशमुख यांनी या ठिकाणी अमरावतीचे प्रश्न मांडलेले आहेत. या मंडळाच्या त्यापूर्वी अध्यक्षा होत्या. त्यांनी अध्यक्षा असताना चांगले काम केलेले आहे. त्याबद्दल त्यांना माझे प्रशस्तीपत्रक आहे तेव्हा मी या ठिकाणी सूचना करू इच्छितो की, या सर्व योजना कायम स्वरूपाच्या योजना करण्यात याव्यात. दुसरी सूचना अशी की, या योजना आखताना रिजनल टेम्पररी आणि परमनन्ट असे डिस्क्रीएशन करता कामा नये. तिसरी सूचना अशी की, आपल्या राज्यामध्ये एक पायंडा पडला आहे. जसे पाण्याला महत्त्व आहे तसे विजेला महत्त्व आहे. शेती व्यवसायाला आणि माणसाच्या समृद्धीला जशी वीज आवश्यक आहे तसे पाणी आवश्यक आहे म्हणून पाण्याचे वितरण ज्या स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत करण्यात येते त्या संस्था पाण्याच्या कराची वसुली करतात परंतु दुर्दैवाने महाराष्ट्रातील सर्व जिल्हापरिषदा, महानगरपालिका, नगरपालिका पाण्याची वसुली करू शकत नाहीत. महाराष्ट्र राज्यातील विजेच्यासंबंधी असे धोरण आहे की, त्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे स्वयंपूर्ण मंडळ स्थापन केलेले आहे. या मंडळाने लोकांना वीज द्यावयाची आणि त्यानेच लोकांकडून विजेच्या बिलांची वसुली करावयाची. माझे सहकारी मित्र सन्माननीय सदस्य श्री. अण्णा डांगे यांनी म्हटल्याप्रमाणे पाण्याच्या संदर्भातही एक स्वतंत्र यंत्रणा असावयास पाहिजे. ती यंत्रणा तकलादू नसावी अशी माझी मागणी आहे. म्हणून त्यासाठी वॉटर मिनिस्ट्री म्हणजे पाण्याचे मंत्रालय निर्माण करण्यात यावे आणि त्या पोटफोलिओसाठी स्वतंत्र मंत्री असावा.

अध्यक्ष महाराज, या देशाला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ३४ वर्षांनी महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळू नये. यासारखे दुर्दैव व दैवदुर्विलास इतर कोणताही नाही. १९८३ ते १९८९ या काळात पाण्याचे दुर्भिक्ष आपल्या राज्यामध्ये प्रबळपणे जाणवले. त्यातून हे महाराष्ट्र शासन धडा शिकेल आणि कमीत कमी शुद्ध पाणी प्रत्येक गावाला पिण्यासाठी देऊ

शकेल अशी अपेक्षा होती. १९८८-८९ आणि १९८९-९० या दोन वर्षात राज्यात सर्वत्र पाऊस बरा झाल्यामुळे परिस्थिती थोडी सावरली. परंतु मी आता असे भाकित करतो की, येत्या उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याची कठीण परिस्थिती येईल. याचे गांभीर्य आताच लक्षात घेतले पाहिजे. कारण अजून संपूर्ण राज्यभर पाऊस चांगला झालेला नाही.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रामध्ये गावांची एकूण संख्या ३५,७७८ आहे. या गावांतील एकूण ३५,००० विहिरी मे-जून महिन्यामध्ये आटलेल्या आहेत. वॉटर लेव्हल जनरली ऑगस्ट महिन्यामध्ये येते, ती या वर्षी येणार नाही. या पावसाळ्यामध्ये विहिरीतील पाण्याची पातळी उंचावणार नाही. याची आपण आताच काळजी घेतली पाहिजे. एकूण ३५,७७८ गावांतील ३५,००० विहिरी उन्हाळ्यामध्ये आटल्या होत्या. ५ हजार गावांना जून महिन्यामध्ये टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यात आला. तसेच राज्यात पाणी देण्यासाठी १,००० बैलवंड्या लावल्या होत्या. बाबा आदमच्या काळातील बैलवंड्या आजही महाराष्ट्र राज्यामध्ये पिण्याचे पाणी देण्यासाठी वापरल्या जात आहेत ही बाब या राज्याच्या दृष्टीने आणि या राज्याच्या अस्मितेच्या दृष्टीने स्वयंकलंकित आहे.

अध्यक्ष महाराज दुसरी गोष्ट अशी आहे की, आज देखील अनेक गावांना पिण्याचे दूषित पाणी दिले जाते. ३५ हजार गावांपैकी जवळजवळ १२ हजार गावांना पिण्याचे दूषित पाणी पुरविण्यात येते अशी परिस्थिती आहे. अध्यक्ष महाराज या सभागृहामध्ये गेल्या आठवड्यामध्ये लक्षवेधी सूचना आली होती. ही लक्षवेधी सूचना ग्रामविकास विभाग आणि आरोग्य विभाग अशा दोन विभागाशी संबंधित होती. त्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटले होते की, एकूण ३३४ व्यक्ती या साथीमुळे दगावल्या आहेत. ज्याची नोंद झालेली आहे त्यांच्या संबंधीच फक्त आकडा देण्यात आलेला आहे. ज्यांची नोंद झालेली नाही, अशांची संख्या लक्षात घेता हा आकडा १,५०० च्या वर असण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ३४ वर्षांनतर गढूळ व जंतू असलेले दूषित पाणी प्यायल्यामुळे गॅस्ट्रो, पटकी, कावीळ इत्यादी साथीमुळे अनेक माणसे मृत्युमुखी पडतात. अनेक गावांना आपण पिण्याचे स्वच्छ पाणी आज देखील देऊ शकत नाही.

अध्यक्ष महाराज, आजसुद्धा महाराष्ट्रातील एकूण १४ हजार २१२ गावांना पिण्याचे पाणी मिळत नाही अशी परिस्थिती आहे. अध्यक्ष महाराज, या चर्चेच्या निमित्ताने या ठिकाणी मी काही नमुनेदार उदाहरणे देणार आहे. राज्यामध्ये एकूण ६५१ गावांसाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने २८१ कोटी रुपये खर्च करून एक योजना राबविण्यात यावयाची होती. ही योजना अजूनही दप्तरामध्ये पडून राहिलेली आहे. त्या योजनेची पुढे काय प्रगती झाली आहे हे माहीत नाही. त्याबरोबर देवगड तालुक्यातील जामसांडे येथील एका योजनेवर काही कोटी रुपये खर्च करण्यात आले असून त्या संदर्भात ३० किलोमीटर परिसरात पाणी देण्याची ती योजना होती. परंतु काहीही प्रगती झालेली नाही. अध्यक्ष महाराज, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एकूण १,२०० गावे आहेत. आणि या १,२०० गावांपैकी पाणी साठविण्यासाठी म्हणून जी प्रक्रिया सुरू आहे ती केवळ १२ गावांमध्येच आहे. सिधुदुर्ग जिल्ह्यात ६४० गावे आहेत पण त्यांपैकी केवळ ४० गावांमध्ये पाणी साठविण्याची व्यवस्था आहे. टँकरने पाणी देण्याची प्रक्रिया १९० गावांमध्ये सुरू आहे. कोकणातील मालवण तालुक्यातील वसाड नावाचे गाव आहे. त्याच्या २० कि. मी. परिसरामध्ये पाण्याची योजना राबविण्याचा प्रयत्न केला पण तीही आज दप्तरामध्ये पडली आहे. अध्यक्ष महाराज, खुद्द माजी मुख्यमंत्र्याच्या पुणे जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रात पाहणी केली तर या पाण्याच्या बाबतीत परिस्थिती अत्यंत भयानक आहे असे दिसून येते. तेथे शेकडो गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कोठेही नाही. ज्ञानेश्वरांची आळंदी हे गाव सुमारे २० हजार लोकवस्तीचे आहे पण पिण्याच्या पाण्याचा तेथे ठणठणाट आहे. या आळंदीजवळच, अगदी सीमेवर असलेले बरोली बु. म्हणून गाव आहे तेथे अजिबात पाणी नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुका पिण्याच्या बाबतीत अगदी ओसाड आहे.

नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात तीच स्थिती आहे. नाशिकमध्ये जी भीमटाकी आपण बसविली ती कोरडी आहे त्यातून पाणी मिळत नाही. निफाड तालुक्यामध्ये २ नद्या आहेत पण "दोन नद्यांच्या काठी, पाणी नाही ओठी" अशी त्याची स्थिती आहे. अध्यक्ष महाराज, माण तालुक्यातील दहिवडी हे गाव तर अक्षरशः पाण्याच्या बाबतीत ओसाड आहे. अजिबात पाणी तेथे नाही. बुलढाणा जिल्ह्यातील अनेक गावांना पिण्याचे पाणी नाही. महाबळेश्वर, पांचगणी येथेही पाण्याचा थेंब नाही. अध्यक्ष महाराज, अशी जवळ जवळ प्रत्येक जिल्ह्यातील किती तालुक्यांची, गावांची माहिती मी द्यायची ठरविली तर माझा सारा वेळच त्यात संपून जाईल. उस्मानाबाद जिल्ह्यात आजही जवळ जवळ अर्ध्या तालुक्यात पाणी नाही आणि दुर्दैव हे आहे की, तेथे १९८५ साली पाणी उपसताना एक भाऊ मेला आणि नंतर त्याची लहान बहीण कु. नसीम इस्माईल ही पाणी उपसतानाच मेली. हे सारे शासनाचेच पाप आहे. चंद्रपूर जिल्ह्यात १२१ गावांना पाणी नाही. परभणी जिल्ह्यात ५१ गावांना पाणी नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ गावात तर लोकांनी पाण्यासाठी मोर्चा काढला होता. वसई तालुक्याची ३२ कोटींची योजना १० वर्षांपासून तशीच पडली आहे, आज ती १५० कोटीची योजना झाली आहे पण ती काही पूर्ण होत नाही. हतनूर धरणाचे कामही पूर्ण झालेले नाही. नंतर उजनी प्रकल्प अद्याप अपुरा आहे. जायकवाडीसुद्धा अपुरा आहे. अप्पर वर्धा प्रकल्प अजून अपुरा आहे. राज्यातील जवळ जवळ ३० ते ३२ प्रकल्प तसेच आहेत. नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात जे पाझर तलाव आहेत, इरिगेशन टँक आहेत, त्यांची उंची वाढविली पाहिजे. इतकेच नव्हे तर पाईप लाईनने पाणी दिले तर ५० कि. मी. पर्यंत आपणाला पाणी देता येईल.

राज्यात निर्माण झालेल्या भीषण पाणी टंचाईच्या महत्त्वाच्या प्रश्नावर या सभागृहात आता चर्चा होत आहे. पाणी टंचाईवरील ही चर्चा सभागृहाला नवीन नाही. राज्याला नवीन नाही. १९८२, १९८३, १९८४ या सालात पाणी टंचाईबाबत आपण या सभागृहात चर्चा केली आहे आणि १९८५ सालातसुद्धा या पाणी टंचाईच्या बाबत आपण आज चर्चा करीत आहोत. अध्यक्ष महाराज पाणी टंचाईचा प्रश्न हा राज्यातील एक ज्वलंत प्रश्न आहे. या प्रश्नावर टेंपररी उपाययोजना करून आता भागण्यासारखे नाही. आता या बाबतीत टप्याटप्याने कार्यक्रम घेऊन हा प्रश्न आपण कायमचा मिटवून टाकण्याची आवश्यकता आहे. नुकत्याच उपलब्ध झालेल्या माहितीनुसार १९८२ ची पाण्याची पातळी १९८३ मध्ये कमी झाली. १९८३ ची पाण्याची पातळी १९८४ मध्ये कमी झाली आणि १९८४ ची पाण्याची पातळी १९८५ मध्ये कमी झाली. १९८२ सालच्या तुलनेने ही पाण्याची पातळी आज निम्म्याने खाली गेली आहे. आज पाण्याची पातळी इतकी खाली गेली आहे की, डीपनींग ऑफ वेल हा कार्यक्रम आता कालबाह्य झाला आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मी जास्त बोलणार नाही. फक्त हा प्रश्न सोडविण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत हे सांगणार आहे. या बाबतीत मी फक्त काही सूचनाच करणार आहे.

सातव्या पंचवार्षिक योजनेत १५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजे या वर्षांच्या बजेटमध्ये जवळपास ३०० कोटी रुपयांची तरतूद होईल असे मला वाटते. यासाठी जवळपास २०० कोटी रुपये तरी लागतील असे मला वाटते आणि या शिवाय टेंपररी स्कीम घेतल्या तर यासाठी जवळपास ३०० कोटी रुपये लागतील असे मला वाटते. म्हणजे जवळपास यावर्षी ५०० कोटी रुपये लागतील असा माझा अंदाज आहे.

अध्यक्ष महाराज, १९८२ मध्ये केंद्रीय पथकाने आपण योग्य प्रकारे प्लॅन न केल्याबद्दल एक चपराक दिली आहे. अध्यक्ष महाराज, त्यावेळी श्री. बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री होते. म्हणजे सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात याबाबतचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले

एचबी ११८०—२९

होते की, आपण खातेनिहाय काही तरी कपात केल्याशिवाय आपणाला याबाबतीत काहीच करता येणार नाही. अध्यक्ष महाराज, आता तो प्रश्न नाही. अध्यक्ष महाराज आता याबाबत योग्य प्रकारे प्लॅन करून केंद्र शासनाची मदत घेण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी त्या मदतीचा आकडा हा ठरला पाहिजे. १९८२-८३ सालामध्ये आकडा सारखा बदलत गेला आणि केंद्र सरकारला सुद्धा तो विश्वसनीय असा वाटला नाही. यासंबंधी नियोजन करून केंद्र सरकारकडे मदत मागावयाची ही गोष्ट आपण ठरविली पाहिजे. आज बोअर वेल्समधील पाणी काढण्याची जी पद्धत आहे ती अशास्त्रीय आहे. त्यामुळे मॅक्झिमम पाण्याचा वापर होत नाही. म्हणून हॅण्डपंप बसविण्याऐवजी त्या ठिकाणी ५ एच.पी.ची मोटार बसविली तर जास्तीत जास्त पाण्याचा वापर करता येईल. म्हणून ज्या ठिकाणी अशा बोअर्स केलेल्या आहेत व जेथे पाण्याचे मॅक्झिमम पोटेन्शियल आहे त्या ठिकाणी इलेक्ट्रिक पंप बसवा. तसेच इनवेल बोअर आणि सरफेस बोअर यांच्याबाबतीत सुद्धा रिन्यूव्हेशनच्या बाबतीत काही करता आले तर त्याची देखील उजळणी करण्याची आवश्यकता आहे. मी मागच्या दौऱ्यामध्ये पाथर्डीला गेलो होतो. पिण्याच्या पाण्याचे जे स्टोअरेज आहेत. जी धरणे आहेत. त्यांची उंची आपल्याला वाढविली पाहिजे. ते केले तर स्टोअरेज वाढेल आणि डिस्ट्रिब्यूशन ३ मैलापर्यंत असेल तर ते चार मैलावर जाईल. आपल्याकडे पाण्याचे स्टोअरेजेस् उत्तम आहेत फक्त उंची वाढविली पाहिजे. त्याचा पुढील काळासाठी निश्चित फायदा होईल. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी "पाणी अडवा आणि पाणी जिरवा" अशी घोषणा केलेली आहे. ती अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पण पाणी जिरविणार कसे? या ठिकाणी माननीय मंत्री भाई सावंत नाहीत. त्यांच्या कोकणामध्ये भरपूर पाऊस पडतो परंतु उन्हाळ्यामध्ये पाण्याचा थेंब नसतो. आधुनिक शास्त्रीय जगामध्ये तांबड्या दगडातून पाणी झिरपून जाते असे सांगितले जाते ते तुम्ही बदलणार आहात की नाही? शास्त्रीय विश्लेषण करून पाणी जिरविणे याचा अर्थ असा की, यासंबंधीचे तत्त्व म्हणून दोन पुस्तके आहेत त्याचा मी रेफरन्स देतो :–

(1) Water Resources Developments in India.

(2) Central Research Water Development in India, and

(3) K. L. Rao and Shri Dastur— "Grid System".

यांनी सुचविलेली जी सूचना आहे त्याचे तत्त्व काय आहे तर तुम्ही पाणी जिरविले पाहिजे. अनेक पहाडांच्या पायथ्यावरून पाणी वाहून जाते ते जिरविता येईल. ते रिचार्ज करावयास पाहिजे. कटकवार नावाचे एक अधिकारी होते, ते वारले. त्यांनी पहाडाच्या पायथ्याशी चर खणून पाणी अडविले होते आणि जिरविले होते. म्हणून हे वाहून जाणारे पाणी अडविले पाहिजे आणि जिरविले पाहिजे असे माझे मत आहे. त्याच्यामुळे पर्क्युलेशन होईल आणि विहिरीचे पाणी वाढेल. के. एल. राव, दस्तुर आणि विश्वेश्वरय्या यांनी गंगा-कावेरी योजना सुचविलेली आहे. त्यामध्ये त्यांनी ग्रीड सिस्टीम सुचविलेली आहे. नद्याचे पाणी महाराष्ट्रामध्ये ग्रीड सिस्टीमने खेळवा असे त्यांनी सुचविले आहे. केवळ धरणांच्याच बाबतीत नव्हे तर कोल्हापूर टाईप बंधारे निर्माण करून पाण्याचे स्टोअरेज सप्टेंबरपर्यंत निर्माण केले तर पाण्याचा साठा होईल. परकोलेशनने पाणी येईल आणि आपल्याला उन्हाळ्यामध्ये देखील पाणी पुरेल. आपण मध्यम प्रकल्पाच्या योजना हाती घेऊ शकता. म्हणून पाण्याचे स्टोअरेज, पाणी जिरवणे, पाणी रिचार्ज करणे याबाबत शासनाने विचार करावा.

❑❑❑.

वादळ व महापुराचा तडाखा

(२७ जुलै, १९८९)

महाराष्ट्र राज्यात १९८९ च्या पावसाळ्यात भीषण वादळ आले व महापुराचा जबर तडाखा महाराष्ट्राला बसला. यामुळे झालेल्या तीव्र नुकसानीचे वस्तुनिष्ठ चित्र केंद्रासमोर मांडून राज्य सरकारने दिलेली मदत व तेवढीच केंद्राची मदत घेऊन पूरग्रस्तांना उभं करा असे आवाहन करताना रा. सू. गवई म्हणाले, या महापुरात व वादळात किती नुकसान झाले. किती माणसं मरण पावलीत, वित्तहानी किती झाली, जनावरांची व पिकांची किती हानी झाली. जमीन रिस्टोअर करण्याबाबत काय झाले याचा सविस्तर अहवाल पुढील अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सर्वांना उपलब्ध करून द्या.

महाराष्ट्रात पानशेत झाल्यावर आपण थातूरमातूर उपाययोजना केली होती तसे आता करू नका असे कळकळीचे आवाहन करून श्री. गवई पुढे म्हणाले, पानशेतनंतर आपण जी घरे बांधलीत ती पुनर्वसितांच्या गरजा पूर्ण करणारी नव्हती, तशी घरे आता बांधू नका. गरजवंतांना तातडीने कपडालत्ता व औषधोपचार द्या.

अध्यक्ष महाराज, ओढवलेल्या अत्यंत दुर्दैवी प्रसंगाबाबत दु:खद अंत:करणाने आपण आज या ठिकाणी चर्चा करीत आहोत. महाराष्ट्रासमोर यापूर्वीही अनेकदा अशा प्रकारचे दुर्दैवी आणि गंभीर प्रसंग आले आहेत. कोयना भूकंप, पानशेत, पुलोद सरकार असताना विदर्भात झालेली तीव्र अतिवृष्टी तसेच ३-४ वर्षांपूर्वी कोकण भागात झालेली अतिवृष्टी असे एका मागून एक अशी अनेक संकटे या महाराष्ट्रावर आलेली आहेत. या संकटापेक्षाही आजचे संकट अत्यंत भयानक आहे असे मला वाटते. पूर परिस्थितीमध्ये उत्तर भारतामध्ये जे जे नुकसान उदा. मनुष्य हानी, पीकहानी, इत्यादीबाबतच्या ज्या बातम्या आपण वाचतो, ऐकतो त्या तुलनेने, एकूण देशाच्या तुलनेने या वर्षी महाराष्ट्रात फार मोठी हानी झालेली आहे हे आपल्याला कबूल केले पाहिजे, नव्हे करावे लागेल. म्हणून आजचे पहिले या राज्य सरकारचे कर्तव्य आहे की, त्यांनी महाराष्ट्रात घडलेल्या या अभूतपूर्व दु:खद संकटाचा मुकाबला हा राज्य सरकार, सारे राजकीय पक्ष आणि राज्यातील सारी जनता, सारा समाज एकत्रित येऊन केला पाहिजे, या संकटाला तोंड दिले पाहिजे. त्याचबरोबर या संकटाचे, या संकटातून झालेल्या नुकसानीचे, हानीचे वस्तुनिष्ठ चित्र लक्षात घेऊन केंद्र सरकारने मदत केली पाहिजे, केंद्राकडून ती आपण घेतली पाहिजे. या केंद्राकडील मदतीचे पूर्वपरंपरेचे जे चित्र आहे, सूत्र आहे त्याअन्वये राज्य सरकारने दिलेली मदत आणि तेवढीच मॅचिंग ग्रॅन्ट केंद्र सरकारची असावी असा आग्रह आपण केंद्राकडे धरू शकलो तर या संकटाला आपल्याला नक्कीच यशस्वीरीत्या तोंड देता येईल. अध्यक्ष महाराज, आज या संकटाचे भीषण वर्णन येथे साऱ्याच वक्त्यांनी केले आहे. माननीय विरोधी पक्षनेते, प्रत्यक्ष माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत जाऊन परिस्थितीची वस्तुनिष्ठ पाहणी करून आले आहेत आणि त्यांनी तेथील करुण कहाण्या येथे सांगितल्या. आपण वर्तमानपत्रे वाचतो आणि मध्येच सोडून देतो. अशा

एचबी ११८०—२९अ

परिस्थितीमध्ये माझी तब्येत ठीक नसतानाही मी औरंगाबाद येथे जाण्यासाठी विमानाची तिकिटे काढली पण त्यावेळी मला सांगण्यात आले की, बीड येथे तुम्हाला जाता येणार नाही. म्हणून मग मी तो विचार सोडून दिला. पण तरीही गेले दोन दिवस मी कोठे तरी परिस्थितीची पाहणी करण्याच्या दृष्टीने जाण्याचा विचार करत होतो पण दुर्दैवाने दळणवळणाची अडचण होती. तरीही मी या ठिकाणी असे म्हणेन की, कोठलाही अभिनिवेश व्यक्त न करता हे संकट आपण सर्वांनी मिळून सारखे सांभाळले पाहिजे. त्या दृष्टीने अध्यक्ष महाराज, येथे मी दोन सूचना करू इच्छितो एक म्हणजे या संकटातून बाहेर कसे पडता येईल यासाठी रेमिडिअल मेजर्स आणि दुसरी सूचना सन्माननीय सदस्य श्री. डांगे यांनी सांगितल्याप्रमाणे अर्थात त्यांनी जरा वेगळ्या पद्धतीने सांगितले—मी माझ्या पद्धतीने त्याबाबत सांगतो. प्रिकॉशनरी मेझर्स कोणत्या ते मी सांगणार आहे. तर या दोन गोष्टींचा आपल्याला विचार केला पाहिजे. रेमिडिअल मेझर्स कोणत्या ते मी सांगणार आहे. तर या दोन गोष्टींचा आपल्याला विचार केला पाहिजे. रेमिडिअल मेझर्स म्हणजे आता यातून हा जो १०० ते २५० कोटीच्या नुकसानीचा बोजा आहे याला—इंग्रजीमध्ये नेमका शब्द सांगावयाचा तर हे ॲक्ट ऑफ गॉड आहे. की ज्याला वुई कान्ट फोर्स, वुई कान्ट ॲप्रिहॅण्ड या पलीकडे जेव्हा घडते त्यालाच आपण ॲक्ट ऑफ गॉड असे म्हणतो. परंतु हे आव्हान मात्र आपण जरूर स्वीकारले पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. हांडे यांनी सूचित केल्याप्रमाणे जवळजवळ १० ते १५ हजार घरांचे नुकसान झालेले आहे. म्हणजे ती सर्व संपूर्णतया पडलेली आहेत. तेव्हा या नुकसानीबाबत मी असे सांगेन की, या संबंधीची एक की नोट सरकारला देणे काही अशक्य नव्हते. नाही म्हणजे सभासदाच्या माहितीसाठी पुढील अधिवेशनाच्या म्हणजे येत्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या संकटात संपूर्ण राज्यातील नुकसानीचे चित्र—त्यात मग मनुष्यहानी, जनावराची हानी, पिकांची हानी, जमिनीचे रिस्टोअर करण्याचे चित्र असेल तसेच त्याबाबतीत आतापर्यंत सरकारने काय काय केले याची माहितीवजा एक नोट सर्क्युलेट केली तर कमीत कमी जनप्रतिनिधींना या संबंधात नेमके काय काय घडले आहे हे समजेल आणि आता आपला वाटा काय आहे हे पाहून काम करता येऊ शकेल यासाठी जो काही पैसा लागेल तो राज्य शासनाने कसा खर्च करावयाचा ते ठरवावे. रोजगार हमी योजनेमधून ही कामे करावीत. आपण आर. एल. ई. जी. पी. मध्ये घरे बांधलेली आहेत. या ठिकाणी जर काही पैसा शिल्लक असेल तर तो पैसा घरबांधणीच्या कामाला वापरावा. अध्यक्ष महाराज, पानशेत धरण फुटल्यानंतर आपण थातूरमातूर उपाय योजिले होते. त्यावेळी जशी घरे बांधली होती. तशी घरे आता बांधू नका. या ठिकाणी चांगली घरे बांधून देण्यात आली पाहिजेत. अध्यक्ष महाराज, अतिवृष्टिमुळे आलेल्या पुरामध्ये घरे वाहून गेली आहेत. माणसे वाहून गेली आहेत. जनावरे वाहून गेली आहेत. भांडीकुंडी वाहून गेली आहेत. म्हणून हा प्रश्न घरांपुरताच मर्यादित नाही. ज्यांचे जीवन संपूर्णपणे उध्वस्त झाले आहे त्या लोकांना भांडीकुंडी, कपडेलत्ते दिले पाहिजेत आणि ताबडतोबीने औषधोपचाराची सोय केली पाहिजे. अध्यक्ष महाराज, अतिवृष्टीमुळे हजारो एकर जमीन नादुरुस्त झाली आहे ही जमीन दुरुस्त करण्यासाठी आपणाला रोजगार हमी योजनेचा पैसा वापरता येईल आणि रब्बी हंगामापूर्वी ही जमीन पीकयोग्य केली पाहिजे. त्या दृष्टीने आपल्याला विचार करावा लागेल. अध्यक्ष महाराज, या पुरामुळे रायगड जिल्ह्यातील दुकाने वाहून गेली आहेत. अत्यंत नुकसान झाले आहे. म्हणून या लोकांना सर्व प्रकारची मदत केली पाहिजे. त्यांना कर्ज देण्याचा देखील आपल्याला विचार केला पाहिजे. माफक दराचे दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीनेही शासनाने विचार करावा, अशी माझी शासनाला विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, जी माहिती उपलब्ध झाली आहे, त्याप्रमाणे ३४८ लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत. माझा असा अंदाज आहे की, मृत्युमुखी पडलेल्या लोकांचा आकडा एक हजाराच्याही वर जाईल. म्हणून मृत्युमुखी पडलेल्या माणसांमध्ये कोणत्याही प्रकारचा फरक न करता त्या सर्वांना

मदत दिली पाहिजे. तो कोणत्या जातीचा होता. कोणत्या धर्मांचा होता. याचा विचार न करता मृत्युमुखी पडलेल्यांना माणसी १० हजार रुपयांची मदत केली पाहिजे. अध्यक्ष महाराज एकाद्या कुटुंबातील कर्ता माणूस, कमावता माणूस पुरात वाहून गेला असेल तर त्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्याचा विचार केला पाहिजे. तसे केले तरच त्या कुटुंबाला आपण उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देऊ शकू. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी ज्या मेजर्स मी सूचविल्या आहेत. त्याचा विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, बीड जिल्ह्यातील बिंदूसरा नदीच्या आजुबाजुच्या झोपड्या वाहून गेल्या आहेत. म्हणून त्या नदीच्या बाजूला झोपड्या असतील त्या उठविण्याबाबत योग्य त्या सूचना देणे आवश्यक आहे. मी असे म्हणतो की, या पलीकडे जाऊन ज्या ज्या नदीच्या काठावर किंवा संभाव्य धोक्याच्या क्षेत्रामध्ये वस्त्या असतील त्या आतापासून हलविण्यात येऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले पाहिजे. हे करीत असताना राज्य सरकारने रेड झोन आणि ब्लू झोन असा नियंत्रणाचा फरक केलेला आहे. माननीय महसूल राज्यमंत्री, श्री. मदन बाफना यांना मी विनंती करतो की, यासंबंधी मी अनेकदा बोललो आहे. सूचना केल्या आहेत की, तांत्रिकदृष्ट्या हे रेड झोन, ब्लू झोन ओव्हरलॅप होत असल्यामुळे ते काढून टाकावेत कारण तांत्रिकदृष्ट्या या लोकांना दुसरी जागा मिळत नाही. त्यादृष्टीने हे झोन कायमचे बंद करून टाकावेत आणि केवळ एकच झोन ठेवावे.

या निमित्ताने मी असे सूचवू इच्छितो, आणि त्याचप्रमाणे अनेक माननीय सदस्यांचीही इच्छा आहे की, या संकटसमयी परिस्थितीची पाहणी, निरीक्षण आपण करावे. आनंदाची एक गोष्ट घडली म्हणजे माननीय मुख्यमंत्री हे तत्परतेने विरोधी पक्षनेत्या माननीय श्रीमती मृणालताई गोरे, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विठ्ठलराव हांडे यांच्यासमवेत प्रत्यक्ष पाहणी करून आले. अशा प्रकारे या राज्याचे प्रातिनिधिक चित्र संकटकालीन परिस्थितीत पक्षविरहित भावनेने पुढे जाते. त्याकरिता माझी एक सूचना आहे की, या दोन्ही सदनाची एक समिती म्हणून नव्हे तर या संपूर्ण दुर्दैवी भागांना भेट देऊन त्या ठिकाणी काय-काय उपाययोजना करता येतील यासंबंधी विचार करण्यासाठी स्टँडिंग कमिटी निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामध्ये जे कुणी इंटरेस्टेड लोक आहेत. ज्यांना राज्यामध्ये फिरावयाचे आहे त्यांना घेण्यात यावे, त्यामध्ये सरकारी अधिकारी असावेत. पुनर्वसन करणारे अधिकारी असावेत, विधानमंडळाचे सदस्य असावेत. अशा प्रकारची एक स्टँडिंग कमिटी हे पुनर्वसनाचे कार्य होईपर्यंत सचिवालयाच्या स्तरावर करण्यात आली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, या परिस्थितीमध्ये आपले हवामान खाते अत्यंत निष्क्रिय राहिले आहे असे म्हणावे लागेल. हवामान खाते आणि राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय किती आहे, हे ठरविण्याची वेळ आली आहे. हवामान खात्यांकडून चार-पाच दिवसांपूर्वी अंदाज कळला असता तर ३०० बोटी समुद्रात गेल्या नसत्या. कुणीही आपला जीव धोक्यात घालून मच्छिमारीसाठी गेले नसते. मच्छिमार कृती समितीचे नेते श्री. भाई बंदरकर यांचे स्टेटमेंट दोन दिवसांपासून मी टी. व्ही.वर ऐकत आहे. २ ते ३ हजार लोकांचा जीव धोक्यात आहे. त्यापैकी ४५ जण मृत पावले आहेत. काहींची प्रेते दूध डेअरीसमोर आयडेंटिफिकेशनकरिता ठेवण्यात आली आहेत ती मी स्वत: जाऊन पाहिली तेव्हा ऑब्जर्व्हेटरीचे राज्य शासनाबरोबर को-रिलेशन्स काय आहेत? त्यांनी पूर्वसूचना दिली काय? माझ्या माहितीप्रमाणे पूर्वसूचना दिली नाही. वर्तमानपत्रांनी त्यांच्यावर पुसटसे रिमार्क लिहिले परंतु हवामान खात्याने पूर्वदक्षता बाळगून त्यासंबंधी लोकेट झोन कोणकोणते आहेत ते कळवावयास हवे होते. भाजे गावामध्ये २८ इंच पाऊस पडला. त्या ठिकाणचा अंदाज वर्तविणे हे त्यांच्या क्षमतेच्या बाहेर होते हे आम्ही समजू शकतो. परंतु ओव्हरऑल पावसाचे संकट संपूर्ण महाराष्ट्राभर होते. केवळ पाऊस आला नाही तर त्याचबरोबर ८५ ते ८८ कि. मी. वेगाने चक्रीवादळ आले, वारे वेगाने वाहू लागले. अशाप्रकारे

मुसळधार पाऊस आणि वेगाने वारे वाहू लागणे हे सर्व अनप्रिसेडेंटेड, अन्युजुव्हल अशा प्रकारचे संकट होते. याचा विचार केला तर ऑब्जव्हेटरी किती जागृत असावी? आणि नसेल तर ऑब्जव्हेटरी जागृत राहण्यासाठी राज्य शासन आणि ऑब्जव्हेंटरी यांचे को-रिलेशन्स काय आहेत, हे एकदा फायनल करून त्यांना सतर्क ठेवले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, तिसरी गोष्ट अशी की, ही अभूतपूर्व परिस्थिती सुरू असताना मी सर्वत्र फोन करीत होतो. मंत्रालयामध्ये फोन करीत होतो. १०० नंबरवर फोन करीत होतो, ऑब्जव्हेटरीमध्ये फोन करून काय-काय संकट निर्माण झाले आहे हे विचारत होतो. परंतु कोठेही को-रिलेशन्सचा पत्ता नव्हता. कायम सेल पाहिजे. संकट असो किंवा नसो. संकटाची जाणीव द्यायला याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये वादळ होणार अशी सूचना टी. व्ही. वरून देण्यात आली होती. वादळ आले नाही हे चांगले झाले. परंतु असा सेल आवश्यक आहे. अशाप्रकारे नुकतेच जे वादळ झाले त्याबाबत सूचना मिळाली असती तर आपण पुरात वाहून गेलेल्या लोकांचा बचाव करू शकलो असतो. तेव्हा हवामान खाते आणि राज्य सरकार यांचा संबंध प्रस्थापित होण्याची गरज आहे. आता ज्याप्रमाणे मंत्रालयात संपर्क साधण्यासाठी दोन क्रमांक दिलेले आहेत, तशी कायम स्वरूपाच्या व्यवस्थेची आवश्यकता आहे. मी माझे भाषण संपविताना असे सांगेन की, पुढच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यामध्ये पूर परिस्थितीबाबत काय काय कारवाई करण्यात आली? तसेच यासंबंधी दोन्ही सभागृहाची एक प्रातिनिधिक स्वरूपाची स्थायी समिती नेमण्याची गरज आहे. कारण एकट्याचे हे काम नाही, तेव्हा त्याबाबतही माहिती दिली पाहिजे. तसेच दुर्दैवाने सभागृहांमध्ये कधी नव्हता असा दुःखद प्रसंग चर्चेसाठी आलेला आहे. त्यावर चर्चा करण्याची सभागृहावर पाळी आली आहे. या प्रसंगी सर्वांनी सामाजिक कर्तव्य पार पाडण्यासाठी आणि संकटाशी सर्वतोपरी मुकाबला करण्यासाठी आणि आपद्ग्रस्तांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी दिलासा देण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करूया.

❑❑❑.

शिक्षणातील गुणवत्तेचा आग्रह

(७ ऑगस्ट, १९८९)

शिक्षक वा प्राध्यापकांनी खाजगी शिकवण्या घेण्याचा किंवा ट्युशन क्लासेस चालविण्याचा प्रश्न आज अतिशय गंभीर बनला असला तरी दादासाहेबांनी या संकटाची जाणीव पंचवीस वर्षापूर्वीच १९८९ मध्ये करून दिली होती. त्या संदर्भात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापना विधेयकावरील चर्चेत भाग घेताना त्यांनी आपले परखड विचार मांडले होते. शिवाय त्यानिमित्ताने त्यांनी अमरावती विद्यापीठाचा विकास अधिक गतीने व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

अध्यक्ष महाराज, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि माझा अप्रत्यक्षपणे फार जुना संबंध आहे. म्हणून मी मुद्दाम भाषण करण्यास उभा आहे. १९६४ साली मी या सभागृहात निवडून आल्यानंतर एक अशासकीय प्रस्ताव सभागृहात

मांडला होता. तो माझा पहिलाच अशासकीय प्रस्ताव होता. त्या प्रस्तावान्वये विद्यापीठ कशी स्थापन करावीत यासंबंधीचे निकष मी त्यावेळी सभागृहाला सांगितले होते. एक म्हणजे त्या विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली आणि परिक्षेत्राखाली येणाऱ्या महाविद्यालयांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या याचा विचार आपण केला पाहिजे. असे जर आपण करू शकलो नाही तर त्या विद्यापीठांना विस्तृत स्वरूप आले आहे ती विद्यापीठे अशा सांस्कृतिक कार्यात यशस्वीरीत्या काम करू शकणार नाहीत असा दावा मी त्यावेळी केला होता. माननीय सदस्य श्री. पवार यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, १९६२ साली उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्हावे असा एक अशासकीय प्रस्ताव त्यावेळचे विधानपरिषदेचे सदस्य, श्री. राजा मंत्री यांनी मांडला होता. आणि १९६४ साली श्री. राजा मंत्री यांच्या ठरावाचा उल्लेख करून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्हावे आणि त्याचबरोबर अमरावती विद्यापीठ व्हावे असे मी निवेदन केले होते. सुदैवाने श्री. मधुकरराव चौधरी हे जळगावचे शिक्षण मंत्री त्यावेळी होते. त्यावेळच्या डिबेटमधले उतारे माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी अमरावती विद्यापीठाच्या निमित्ताने काढलेल्या पुस्तिकेमध्ये दिलेले आहेत. माझा हे सर्व सांगण्यामागचा हेतू हा की, अमरावती विद्यापीठाची आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची मागणी आज नाही तर, ती १९६० सालापासूनची आहे. मला या विषयाला राजकीय रंग द्यावयाचा नाही. तो देणे बरोबरही नाही. मी असे म्हणेन की, मी त्यावेळी सांगितलेल्या निकषाचा विचार करून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे आणि त्या विभागाला न्याय दिला आहे. ज्या ठिकाणी आतापर्यंत अन्याय झाला होता. आता प्रश्न राहिला तो फक्त स्थळांचा. प्रश्न जागेचा आहे तर धुळे, जळगाव, नाशिक किंवा अहमदनगर या चार जिल्ह्यांपैकी एका ठिकाणी कुठेतरी हे विद्यापीठ होणार, तेव्हा जळगावला झाले म्हणून वाईट झाले किंवा त्यात काही राजकीय कारण आहे असे मी म्हणू शकत नाही. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन होणे हा जे निर्णय झाला. तो त्या विभागातील लोकांवर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी म्हणून घेतला आहे. शेवटी प्रशासनामध्ये तडजोड करावी लागतेच. जळगाव विद्यापीठ घ्या, नाशिकचे मुक्त विद्यापीठ घ्या, धुळ्याचे मेडिकल कॉलेज घ्या. तडजोडीने विकासाचे विकेंद्रीकरण होत असेल तर त्याला हरकत नाही. कृषि विद्यापीठ महाराष्ट्रामध्ये झालेच पाहिजे यासाठी पूर्वी आंदोलन झाले. कै. वसंतराव नाईक त्यावेळी मुख्यमंत्री होते. त्यांनी सांगितले एकच कृषि विद्यापीठ का? चार कृषि विद्यापीठ घ्या. एका कृषि विद्यापीठाने सर्व महाराष्ट्राचा कारभार सांभाळण्यापेक्षा चार विद्यापीठे घ्या. आता आम्ही म्हणतो की, पांढरा हत्ती पोसत आहोत. या चार कृषि विद्यापीठाच्या रूपाने पण कधी तरी हत्ती आपले काम करू लागेलच, किंवा कधीतरी त्याचा रंग बदलेल; आणि मी असे म्हणतो की, तो दिवस दूर नाही. तेव्हा माझे या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बाबतीत असेच म्हणणे आहे की, नाशिक आणि अहमदनगर हे जिल्हेसुद्धा पुनश्च विचार करून जळगावच्याच विद्यापीठात आम्ही येतो असे म्हणतील. एकदोन वर्षांनी तो निर्णय त्यांना घ्यावा लागेल, असे माझे भाकित आहे, अध्यक्ष महाराज, हे सांगण्याचे कारण असे की, नागपूर विद्यापीठाचे परिक्षेत्र घ्या. त्या ठिकाणी दिलेली कॉलेजेस आणि विद्यार्थ्यांची संख्या, मराठवाडा विद्यापीठातील कॉलेजची संख्या आणि विद्यापीठाची संख्या, पुणे विद्यापीठातील कॉलेजची संख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या, मुंबई विद्यापीठातील कॉलेजसची संख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या ही लक्षात घ्या तेव्हा या सगळ्या कारणामध्ये मला जावयाचे नाही. परंतु आता जरी नाशिक आणि नगर जिल्ह्यांनी आम्ही पुणे विद्यापीठाच्या कक्षेत राहतो असा निर्णय घेतला असला तरी मला मात्र तो शास्त्रीय आहे असे वाटत नाही. याचे कारण असे की, पुणे जिल्ह्यामधील वाढलेला वर्कलोड कमी करण्याच्या दृष्टीने या चार जिल्ह्यांसाठी वेगळे विद्यापीठ होणे हे संयुक्तिक होते. आता विद्यापीठाची कार्यकक्षा दोन जिल्ह्यांमध्ये सीमित

केल्यामुळे ते लहान विद्यापीठ झाले आहे. तेव्हा त्या त्या जिल्ह्याच्या राजकीय सोयी झाल्यानंतर पुन्हा हे चारही भाऊ म्हणून एकत्र येतील आणि जळगाव विद्यापीठाचा भाग होतील अशी आशा आपण या निमित्ताने करूया. अध्यक्ष महाराज, १९६४ साली या ठिकाणी प्रवेश केल्यानंतरच्या अवघ्या दहा दिवसामध्ये मी केलेले भाषण वाचले तर त्यात सर्व मीमांसा आहे हे आपल्याला दिसून येईल आणि मला अत्यंत आनंद आहे की, हे माझे भाषण झाल्यानंतर मला त्यावेळचे दिल्लीचे कृषि मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे एक पत्र आले होते. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, "गवई आपले मनापासून, मन:पूर्वक अभिनंदन. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि त्याबरोबर अमरावती विद्यापीठाची मागणी आपण केलीत आणि त्यावर सरकारने विचार करण्याचे मान्य केले आहे, हे स्वागतार्हतच आहे." विरोधी पक्षसुद्धा कंस्ट्रक्टिव्ह विचार देत असतात. अध्यक्ष महाराज, माझ्या मध्यस्थीचा उपयोग होत असेल तर मी नाशिक आणि नगर यांना सांगेन की, यात सहभागी व्हा. परंतु विद्यापीठ चालवायचे असेल तर हे क्षेत्र अपुरे आहे. ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने पुढेमागे असा विचार करण्याची गरज भासेल.

अध्यक्ष महाराज, तिसरा जो मुद्दा आहे त्याचा परामर्श श्री. हांडे साहेब यांनी व्यवस्थितपणे व त्यांच्या पद्धतीने घेतला आहे. मी त्यांच्या सूचनेला जवळजवळ पाठिंबा देऊ इच्छितो. प्रश्न असा की, हायअॅट म्हणजे (If I am not wrong, this Act is by and large an uniform Act for all the Universities.) जवळजवळ सर्व युनिव्हर्सिटीकरिता लागू असणारा हा कायदा आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ करताना फक्त नाव बदलले आणि सेंडर तेच आले तर त्यामध्ये माननीय, शिक्षणमंत्री श्री. कमलकिशोर कदम यांचा दोष आहे असे ती मानत नाही. परंतु विरोधी पक्षनेते, श्री. हांडे साहेबांचे या निमित्ताने असे म्हणणे राहिले की, अनायासे उत्तर विद्यापीठाची स्थापना केल्यानंतर हा कायदा सुव्यवस्थेचा कायदा कसा होईल याचा विचार करण्याची गरज आहे. आजच्या विद्यमान परिस्थितीमध्ये एका विद्यापीठाकरिता गुणवत्तेचा कायदा आणि दुसऱ्या विद्यापीठाकरिता गुणवत्तेचा कायदा नाही असे करणे शक्य नव्हते. परंतु तसे झाले. महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या कायद्यांमध्ये युनिफॉर्मिटी येण्याच्या दृष्टीने एक कॉम्प्रिहेन्सिव्ह अॅक्ट असण्याची सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केलेली आहे ती योग्य आहे. सिनेट ही तर अर्नामेंटल बॉडी आहे. सिनेट अॅकेडमिक कौन्सिल आणि एक्झिक्युटिव्ह कमिटी या ज्या तीन संस्था विश्वविद्यापीठामध्ये आहेत त्यात प्रतिनिधित्व कसे असावे, काय असावे तो भाग वेगळा परन्तु यामध्ये अॅकेडमिक लोक राहतील असा विचार करण्याची गरज आलेली आहे. या ठिकाणी अमरावतीचे सन्माननीय सदस्य, श्री. बी. टी. देशमुख हजर आहेत. अमरावती जिल्हा परिषदेतील समाज कल्याण सभापती, श्री. वाकपांझर हे जिल्हा परिषदेच्या निर्मितीपासून तेथे सभापती आहेत ते आमच्या रिपब्लिकन पक्षाचे आहेत. ते पद ते सोडत नाहीत. ते हळूच माझ्याकडे आले आणि म्हणाले की, अमरावती युनिव्हर्सिटीच्या एक्झिक्युटिव्हकरिता उभा राहतो आणि त्या ठिकाणी निवडून येऊन दाखवितो. मी सांगितले तू चौथा वर्ग शिकलेला आहेस तेथे जाऊन तू काय करणार? त्या ठिकाणी इंग्रजी भाषेमध्ये चर्चा चालते ती तुला कळणार नाही. तू कशाला तेथे जातोस? काही फॉर्म भरू नकोस. जिल्हा परिषदेचे तुला ठीक आहे. परंतु तो मला म्हणाला की, मी त्या ठिकाणी नक्कीच निवडून येईन. हे एक उदाहरण आपल्याला दिले. शेवटी त्या गृहस्थाने फॉर्म भरला नाही. तेव्हा डायरेक्ट इलेक्शनने किंवा राज्यपालांच्या नॉमिनेशनने जे त्या ठिकाणी येतात त्या व्यक्तीची अॅकेडेमिक साईड ही विद्यापीठाला आणि विद्यापीठाच्या कारभाराला पूरक करण्याच्या दृष्टीने योग्य असेल अशी करणे आवश्यक आहे.

निवडणुकीच्या पद्धतीमध्ये देखील काही दोष आहेत. राजकीय निवडणुका ज्या पद्धतीने लढल्या जातात त्या पद्धतीने या सांस्कृतिक संस्थाच्या निवडणुका लढविल्या जाऊ नयेत असा विचार करून याबाबतची तरतूद आपल्याला पुढेमागे जरूर करावी लागेल. या संपूर्ण कायद्याचा केंद्रबिंदू हा उत्तर विद्यापीठाची स्थापना करणे आणि शिक्षणाला न्याय देणे हा आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या भाषणाचा पुनर्उल्लेख मी या ठिकाणी करू इच्छित नाही. त्यांनी या ठिकाणी कुटुंबाचा त्रिकोण दाखविलेला आहे. हा लॉर्ड मेकॉलने देखील दाखविला होता. आता तुम्ही या त्रिकोणाचा पाया प्राथमिक शिक्षणापासून ते विश्वविद्यालयापर्यंत करणार आहात की नाही? की, प्राथमिक शिक्षण आणि दुय्यम शिक्षण यामध्ये ग्रेडेशन ठेवणार आहात? शिक्षणातील इक्वल अपॉर्च्युनिटी आम्ही शैक्षणिक फरकाने नेमलेली आहे. इंग्रजी मीडियमचे शिक्षण पब्लिक स्कूलमधील शिक्षण, प्रायमरी शाळातील शिक्षण, प्रायमरी शाळातील कोंडवाड्यातील शिक्षण...अध्यक्ष महाराज, लोकप्रिय आमदार, मा. श्री. सुदाम देशमुख यांनी काही शाळा अशा दाखविलेल्या आहेत की, शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्रबदल होऊन (Despite all the Caste, Creed, religion and financial position.) याचे डिस्क्रीमिनेशन न करता सर्व गुणवान पोरे यामध्ये येऊ शकतील असे करा. अध्यक्ष महाराज, एका वेळी मी ८ दिवस रशियातील मास्को येथे बसून विचार केला. त्या ठिकाणी काही ठरविण्याची गरज नसते. कोणत्या मुलाने कोणत्या फॅकल्टीजला जावे यासंबंधी त्या मुलाचा ॲटिट्यूड, त्याची इंटिलिजन्स टेस्ट, त्याचे मार्कस पाहून बोर्ड ठरविते. फॅकल्टीला प्रवेश हवा ना, मग तो, दिलाच जातो. अमुकाला प्रवेश मिळाला नाही. तमुकला प्रवेश मिळाला असे तेथे नाही. डोनेशन फी घ्या, कॅपिटेशन फी घ्या या भानगडी त्या ठिकाणी नाहीत. कॅपिटेशन फीचा कायदा करा आणि मागच्या दरवाजाने फी घ्या या भानगडी त्या ठिकाणी नाहीत. चोराला सांगितले आहे की, समोरचा दरवाजा बंद केलेला आहे, परंतु तुला चोरी करण्यासाठी मागचा दरवाजा उघडा ठेवलेला आहे असे त्या ठिकाणी काही नाही. अध्यक्ष महाराज, मी मा. मंत्री महोदयांच्या लक्षात काही बाबी आणून देऊ इच्छितो. या देशाचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी आरक्षणासंबंधी कडक धोरण घेतलेले आहे. आपल्या राज्याचे मा. मुख्यमंत्री, श्री. शरद पवार यांनीसुद्धा तसेच धोरण घेतलेले आहे. अध्यक्ष महाराज, नॉन ग्रेडेड इंजिनीअरिंग, मेडिकल कॉलेजमधील रिझर्व्हेशन हे ऑर्नमेंटल आहे. शेड्यूल कास्ट, शेड्यूल ट्राइब्ज, व्ही. जे. एन. टी. हे लोक डोनेशन देऊ शकतील काय? ३० हजार रुपये फी देऊ शकतील काय? या ठिकाणी असा ब्रेकअप करण्यात आला आहे की, ६० टक्के मेरिट, २० टक्के मॅनेजमेंट आणि २० टक्के गव्हर्नमेंटच्या जागा आहेत. एस्. सी., एस. टी. चे नुकतेच रिझर्व्हेशन नव्हे विद्यार्थी मेरिटमध्ये आला असेल तर मॅनेजमेंटवर बंधन घातले पाहिजे. नाही तर त्याला फीसाठी जे काही ३०,००० रुपये भरावे लागतील त्याचे कॉम्पेनसेशन दिले पाहिजे. कॉम्पेनसेशन देत नसाल तर आपण त्याला कर्ज द्या आणि तो नोकरीला लागल्यानंतर ते वसूल करा. ओव्हर ऑल या पद्धतीचा विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य, श्री. मुरलीधर पवार यांनी हे नवीन विद्यापीठ १५ ऑगस्टपासून सुरू करण्याबाबतची मागणी या ठिकाणी केली आहे. हे नवीन बाळ जन्माला येणार आहे. आपणा सर्वांना माहिती आहे की, बाळाचे संगोपन करणे कठीण आहे. विद्यापीठाचे नवीन बाळ आमच्या अमरावती येथेही जन्माला आले. त्याचे अजूनही बारसेसुद्धा झाले नाही. ते अजून रांगू लागले नाही. त्याचा पांगुळगाडा अजूनही निघून गेला नाही. तरी अशी परिस्थिती या विद्यापीठाची होऊ नये म्हणून आतापासूनच दक्षता घेतली नाही तर नव्याने जन्माला येणारे हे विद्यापीठ डबघाईला येईल त्यासंबंधी गैरसमज निर्माण होतील.

अध्यक्ष महाराज, त्यानंतर मी आपणास सांगू इच्छितो की, तेथील शिक्षणाच्या गुणवत्तेचाही विचार केला गेला पाहिजे. मी अनेक वेळा या सभागृहामध्ये बोललो आहे की, प्राध्यापकांनी ट्यूशन घेण्यास कायद्याने बंद करा. प्राध्यापकाप्रमाणेच शिक्षकांनाही ट्यूशन घेण्यास कायद्याने बंद करा. मग कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांची ट्यूशन असो किंवा माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांची ट्यूशन घेणे असो (Thereby we are deviating equal opportunities for those who can not afford.)

अध्यक्ष महाराज, आम्हाला अमरावती विद्यापीठ दिले त्यावेळी नागपूर विद्यापीठामध्ये अमरावती विद्यापीठासाठी पुरेसा स्टाफ पाठविला काय? अमरावतीला पुरेसा स्टाफ देण्यात आला नाही. त्या ठिकाणचे कुलगुरू चांगले आहेत. त्यांची पुन्हा कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हेही चांगले झाले. ते नसते तर अमरावती विद्यापीठ डबघाईला आले असते. त्या ठिकाणचा नॉन टिचिंग स्टाफ रात्रंदिवस काम करीत आहे. तरी पुणे विद्यापीठातील नॉन टिचिंग स्टाफलाही आपण जळगाव विद्यापीठासाठी ताबडतोब डायव्हर्ट केले पाहिजे. मी आपणास सांगू इच्छितो की, मुंबई, नागपूर, पुणे या विद्यापीठांमध्ये २५-३० फॅकल्टीज आहेत. अमरावती विद्यापीठामध्ये केवळ ५ फॅकल्टीज आहेत. त्यामुळे या नवीन जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला आपण एखादी फॅकल्टी द्याल. तरी असे घडता कामा नये.

अध्यक्ष महाराज, आम्ही शासनाला सांगितले की आमच्याजवळ विद्यमान असलेले पोस्ट ग्रॅज्युएशनचे क्लासेस युनिव्हर्सिटीला द्या. जळगाव येथे शासकीय कॉलेज नसल्यामुळे त्या ठिकाणी कदाचित हा प्रश्न येणार नाही. परंतु आमच्या येथील कृषि विद्यापीठाच्या बाबतीत आम्हाला शासनाला सांगावे लागले होते की, अकोला येथे जे कृषि महाविद्यालय आहे ते कृषि महाविद्यालय डॉ. भाऊसाहेब पंजाबराव कृषि विद्यापीठाशी संलग्न करा. त्याकरता आम्हाला लढा द्यावा लागला. लढा दिल्यानंतर अकोला येथील कृषि महाविद्यालय पंजाबराव कृषि विद्यापीठाशी संलग्न झाले आणि जी काही परिस्थिती निर्माण झाली होती ती दूर झाली. विदर्भ महाविद्यालय हे सुद्धा शासनाचे अपत्य आहे त्याचबरोबर अमरावती येथील विद्यापीठ देखील शासनाचेच अपत्य आहे तेव्हा विदर्भ महाविद्यालयातील पोस्ट ग्रॅज्युएशनचे क्लासेस अमरावती येथील युनिव्हर्सिटीला दिले तर त्या संबंधी अधिक काळजी घेतली जाईल आणि त्याचा दर्जा वाढेल असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. तेव्हा या बाबतीत विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, या विधेयकावर बोलत असताना या ठिकाणी मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्या दोन अर्थाने केलेल्या आहेत. आज या ठिकाणी हे जे विधेयक ज्या अवस्थेत आलेले आहे त्या अवस्थेमध्ये या विधेयकाला विरोध करणे हे अप्रस्तुत होईल. परंतु प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयापर्यंतच्या शिक्षण पद्धतीमध्ये तसेच प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयापर्यंतच्या शिक्षण कायद्यांमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. अध्यक्ष महाराज, यु.जी.सी.ने अमरावती येथील विद्यापीठाला प्राथमिक मान्यता दिली आहे. यु.जी.सी.कडून इतर विद्यापीठांस ज्या प्रकारे ग्रँट दिली जाते त्या प्रकारे अमरावती येथील विद्यापीठास ग्रँट मिळत नाही. जळगाव येथील विद्यापीठाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, यु.जी.सी.कडून ग्रँट मिळण्याच्या बाबतीत जर आतापासून घाई केली नाही तर जळगाव येथील विद्यापीठालासुद्धा ग्रँट मिळणार नाही. यु.जी.सी.ने असे सांगितले की मॉडेल ॲक्टमध्ये आमच्या प्रोफॉर्म्याप्रमाणे अमेन्डमेन्ट करा. अशा प्रकारे मॉडेल ॲक्टमध्ये जर अमेन्डमेंन्ट करण्यात आली तर यु.सी.जी.च्या ज्या काही सवलती असतील त्या सवलती आम्ही अमरावती येथील विद्यापीठास प्रदान करू तेव्हा यु.जी.सी.च्या प्रोफॉर्म्याप्रमाणे अमेंडमेन्ट का करण्यात येत नाही? त्या

ठिकाणी फायनान्शिअल इम्पिलीकेशनचा काही प्रश्न येत नाही तेव्हा अशा प्रकारे अमेन्डमेन्ट केली तर जळगाव येथील विद्यापीठाला यु.जी.सी.ची ग्रँट लवकर मिळेल. फायनान्शियल इम्पिलीकेशनचा काही संबंध नसताना सुद्धा हे सरकार दोन वर्षे का अडून बसले आणि यु.जी.सी. ने सुचविलेल्या प्रोफार्म्याप्रमाणे दुरुस्ती का करण्यात येत नाही हे माझ्यासारख्या माणसाला काही कळत नाही. अध्यक्ष महाराज, शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होऊन अमरावती आणि जळगाव येथील विद्यापीठ ही जुळी भावंडे आहेत तेव्हा त्याचे पूर्ण संरक्षण शासनाकडून होईल याकरिता शासन पूर्ण दक्षता घेईल अशी अपेक्षा व्यक्त करून माझे भाषण संपवितो.

❑❑❑.

राजकीय आरक्षणाला मुदतवाढ

(२३ जानेवारी, १९९०)

भारतीय संविधानाने अनुसूचित जाती व जमाती यांच्यासाठी राजकीय आरक्षण तीस वर्षांसाठी ठेवले होते. ही मुदत दिनांक २६ जानेवारी, १९९० ला संपत होती. ती मुदत आणखी दहा वर्षांकरिता वाढविण्यासाठी भारतीय संविधानात ६२ वी सुधारणा करण्यात आली. या सुधारणेला विधिमंडळाची मान्यता ही आवश्यक होती म्हणून तसे विधेयक सभागृहात सादर झाले. त्यावर रा. सू. गवई यांचे झालेले भाषण.

मा. सभापती महोदय, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संविधानाच्या ३६८ कलमानुसार जे ६२ वे घटनादुरुस्ती विधेयक मंजूर केले आहे त्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांनी आज आपल्या सदनासमोर आणला आहे त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन आणि स्वागत करतो. अध्यक्ष महाराज, घटनेमध्ये आर्टिकल ३३४ मध्ये असे म्हटलेले आहे की,

"The reservation of seats for the Scheduled Castes and Scheduled Tribes in the House of the People in the Legislative Assemblies of the States; and the representation of the Anglo-Indian community in the House of the People and in the Legislative Assemblies of the States by nomination shall cease to have effect on the expiration of a period of thirty years from the commencement of this Constitution".

ही ३० वर्षांची मुदत येत्या २६ जानेवारीला संपणार आहे. त्यापूर्वी जर ही मुदत वाढविली नाही तर कॉन्स्टिट्यूशन डेडलॉक होईल म्हणून ती मुदत १० वर्षांनी अधिक वाढविण्याबाबतचा हा प्रस्ताव आपल्या सदनासमोर आलेला आहे. याबाबतचे हे विधेयक पोलिटिकल रिझर्व्हेशनसाठी आहे. तसे जरी असले तरी तेथील पॉलिटिकल रिझर्व्हेशन कसे सेफगार्ड करावे यासंबंधी लोकसभा आणि राज्यसभा या ठिकाणी जे विचार मांडलेले आहेत त्यानुसार राजकीय राखीव जागांचे समर्थन करताना जे एज्युकेशनल आणि सर्व्हिसेस मॅटर यांमधील रिझर्व्हेशन आहे त्याचे समर्थन

लोकसभेमध्ये, राज्यसभेमध्ये करण्यात आले. संविधानाच्या आर्टिकल १५(४) आणि आर्टिकल १६(४) अन्वये पोलिटिकल रिझर्व्हेशन व्यतिरिक्त जे कॉन्स्टिट्यूशन सेफगार्ड झालेले आहेत त्याबाबत १५(४) मध्ये असे म्हटलेले आहे की,

"Nothing in this article or in the Clause II of article 29 shall prevent the State from making any special provision for the advancement of any socially and educationally backward classes of citizens or for the Scheduled Castes and Scheduled Tribes".

आर्टिकल १६(४) मध्ये असे म्हटलेले आहे की,

"Nothing in this article shall prevent the State from making any provision for the reservation of appointments of posts in favour of any adequately represented in the services under the State".

संविधानाच्या डायरेक्टिव्ह प्रिंन्सिपल्समध्ये आर्टिकल ५६ मध्ये असे म्हटलेले आहे की,

"The State shall promote with special care the educational interests of the weaker sections of the people and in particular, of the Scheduled Castes and the Scheduled Tribes, and shall protect them from social injustice and all forms of exploitation".

२६ जानेवारी १९५० ला संविधान प्रविष्ट करताना संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पोलिटिकल रिझर्व्हेशनची मुदत २६ जानेवारी १९५० ते २६ जानेवारी १९६० अशी ठेवली होती. त्यानंतर दर १० वर्षांनी विधेयकान्वये ही मुदत वाढविण्यात येते. हा सवलतींचा निकष सोशल, एज्युकेशनल आणि इकॉनॉमिकल बॅकवर्डनेस असा धरला गेला आहे. शेड्यूल कास्ट कमिटीचा जो रिपोर्ट आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की,

"The reservation for Scheduled Castes people is 15 per cent. and in respect of the Scheduled Tribes it is 7.5 per cent. Here I would like to place before you the actual persons employed so far in the Central Government Services. In respect of Scheduled Castes people, under 'A' category it is 8.23 per cent. under 'B' category it is 1.40 per cent.; under 'C' category it is 14.46 per cent. In respect of Scheduled Tribes under 'A' category it is 2.05; under 'B' category it is 1.92; and under 'C' category it is 4.23 per cent."

तेव्हा चाळीस वर्षांनंतर जर अशा प्रकारची अत्यंत भीषण अवस्था असेल तर मग या संदर्भात आपण बरोबर अंमलबजावणी करू शकलो नाही असा त्याचा अर्थ आहे. त्यानंतर दुसरा एक क्रायटेरिया आहे. त्या संदर्भात राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देण्यात आले तेव्हा असे सांगण्यात आले की,

"Percentage of literacy in SC and ST in India in 1961, 1971 and 1981 was 10.11, 8.06 and 14.54 and 10.89 and 21.38 and 16.35 respectively while the same for the general was 23.93, 29.48 and 36.23 ."

म्हणजे दोन्ही कॅटॅगरीमध्ये ४० वर्षानंतरही फरक पडलेला नाही. याचा अर्थ असा आहे की, कॉन्स्टिट्यूशनल पोलिटिकल सेफगार्डच्या अनुषंगाने अजूनही शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सवलती ज्या देण्यात येत आहेत त्या अजूनही अत्यंत अपुऱ्या आहेत. या विधेयकाचे मी पहिल्यांदा स्वागत केले. पण स्वागत करताना देखील दैवदुर्विलास आहे. चाळीस वर्षानंतरही अशी परिस्थिती आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री. वि. ग. हांडे यांनी सांगितल्याप्रमाणे कॉन्स्टिट्यूशनल सेफगार्डस या शोभेच्या राहिल्या. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नाही. तरी यासाठी टाइम बाऊंड प्रोग्राम आखणे अत्यंत आवश्यक आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संविधान (बासष्टवी सुधारणा) विधेयक संमत केले आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य, श्री. वसंतराव चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे शल्य आहे.

त्याची अंमलबजावणी करण्याकरिता स्टेट लेजिस्लेशन किंवा सेंट्रल लेजिस्लेशन आम्ही केलेला नाही. हे सर्व करावयाचे असेल आणि या सर्व सोयीसवलतींचा अंमल व्हावा असे वाटत असेल तर या संबंधीची अकौन्टेब्लिटी फिक्स करण्याची गरज आहे. आपण जोपर्यंत अकौन्टेब्लिटी फिक्स करणार नाही तोपर्यंत या सोयीसवलती शोभेच्या राहतील आणि अकारण समाजामध्ये त्याच्यासंबंधी गैरसमज निर्माण होतील. आज राखीव जागांसंबंधी कळत नकळत गैरसमजाने दुराग्रह निर्माण झालेला आहे. माननीय सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये एस्. सी., एस. टी., आणि व्ही. जे. एन. टी. यांच्या राखीव जागांचे प्रमाण २४ टक्के आहे. याचा अर्थ महाराष्ट्रामध्ये जनरल जागा किती आहेत? महाराष्ट्र राज्यामध्ये जनरल जागा ७६ टक्के आहेत. या ठिकाणी मी १० टक्के ओ.बी.सी. वगळले आहेत. त्यामुळे १० टक्के ओ. बी. सी. आपण बाजूला ठेवू. ७६ टक्क्यांमध्ये ओपन जागा किती आहेत? त्यामध्ये ओ. बी. सी.चे परसेंटेज किती आहे? फक्त १।। टक्के ओ. बी. सी.चे परसेंटेज आहे. आता आपण कल्पना करूया की, महाराष्ट्राच्या मर्यादेपर्यंत १० टक्के रिझर्वेशन ओ.बी.सी.ला दिल्यानंतर देखील १।। टक्के परसेंटेज आहे आणि या संपूर्ण ओपन कॅटेगरी केल्या आणि ७६ टक्के खुल्या जागा केल्या तर त्या लोकांना संविधानिक तरतुदींने रिझर्वेशनच्या सोयी आहेत त्या २४ टक्के आहेत व ओ. बी. सी. धरून ३४ टक्के आहेत. पण ज्या जागा खुल्या आहेत त्या जागांमध्ये कॉम्पिटेशन कोणाचे आहे?

अध्यक्ष महाराज, या जागा ज्या भरण्यात आल्या त्या कोणत्या वर्गातून भरल्या आहेत? ॲडव्हान्स क्लासमधून या जागा भरण्यात आलेल्या आहेत त्या क्लासचे परसेन्टेज चारसुद्धा नाही, असे असताना त्यांनी राज्यातील ७० टक्के जागा गिळकृंत केल्या आहेत. रिझर्वेशन काढण्यात यावे असे सांगितले जाते याचा अर्थ असा आहे की, ६६ वजा केल्यानंतर ३४ टक्के काढून टाका म्हणजे १०० टक्के जागा खुल्या करा यामागे त्यांचे हित दडलेले आहे. उरलेल्या लोकांसाठी ९५ टक्के जागांची सोय करा असे त्यांचे म्हणणे आहे असे यावरून दिसते. प्रिव्हिलेज क्लासकरता सोय करावयाची असेल तर रिझर्व्हेशन काढून टाका. तेली, माळी, कुणबी, देशमुख, मराठा यासारख्या ओ. बी. सी. मधील ज्या जाती आहेत त्यांना जागा मिळत नाही. असा प्रचार आहे. दुर्दैवाने तो प्रचार पेनीट्रेट झाला आहे. राखीव जागा असल्यामुळे बहुजन समाजाला किंवा ओ. बी. सी. समाजाला सोयीसवलतींपासून वंचित व्हावे लागते असा प्रचार रूढ झाला आहे. सर्व जागा खुल्या केल्या तर सर्व जागा तेच गिळकृंत करतील. या ठिकाणच्या पॉलिसीला मी Dog in monger's policy असे म्हणतो. धोरण आखणारे हे स्वतः मस्त झालेले आहेत. परंतु ज्यांना मिळते त्यांना ते खाऊ देत नाहीत. त्यांचे हे धोरण गव्हाणीतील कुत्र्याचे धोरण आहे असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. गव्हाणीमध्ये आपण गुरांना खाण्यासाठी कडबा, चारा टाकतो. त्या ठिकाणी कुत्रा जातो आणि बैलावर भुंकत राहतो. त्या बैलाला कडबा, चारा खाऊ देत नाही आणि स्वतःदेखील काही खात नाही.

अध्यक्ष महाराज, दुर्दैवाने या संदर्भात अजून ज्या पद्धतीने प्रबोधन व्हावयास पाहिजे होते त्या पद्धतीने प्रबोधन झालेले नाही. अध्यक्ष महाराज, रिझर्व्हेशनची जी पॉलिसी आहे त्या पॉलिसीचे आम्ही समर्थन करतो. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये ३४ टक्के असेल आणि कॉन्स्टिट्युशनल सेफगार्ड म्हणून २४ टक्के असेल तर जवळजवळ २६ टक्के मंडल आयोगाप्रमाणे महाराष्ट्रामध्ये जागा ॲड करता येतात. परंतु शेवटी हे ऑर्नामेन्टल राहिले तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. असे मी म्हणतो की, उरलेल्यांसाठी इकॉनॉमिकल बॅकवर्ड, सोशल बॅकवर्ड यासारख्या क्रायटेरिया लावून त्यांना जर काही सवलती दिल्या तर अनुसूचित जाती-जमातीला त्या बाबतीत विरोध करण्याची काहीही आवश्यकता नाही. अध्यक्ष महाराज, मंडल आयोगाने आपल्या अहवालामध्ये स्पष्ट केलेले आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या रिझर्व्हेशन कॅटीगरीसाठी ज्या राखीव जागा आहेत त्यांचे रिझर्व्हेशन

रिटेन करून उरलेल्यांना सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे ५० टक्क्यापर्यंत इतर मागासवर्गीयांना सवलती देण्यात याव्यात. त्याचे आम्ही समर्थन करू, परंतु हे सर्व ऑर्नामेंटलप्रमाणे राहता कामा नये असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. शुगर कोटेड गोळीच्या प्रचाराप्रमाणे राखीव जागांचा फायदा इतरांना न मिळता केवळ आपल्याच पात्रात तो फायदा कसा पडेल असा दुटप्पी प्रचार करण्यात येतो त्यामुळे आपण लोकांना फसवितो. या संदर्भात आपण आपली मते मांडत असताना प्रामाणिक नाही.

अध्यक्ष महाराज, भाषण संपवत असतांना मला असे सांगावयाचे आहे की, सुरुवातीला घटनाकारांनी या संदर्भात चिंता व्यक्त केली की, हे सर्व करावयाचे असेल तर त्यासाठी टाइम बाऊन्ड प्रोग्रॅम करण्यात यावा. दर दहा वर्षांनी सवलतंची मुदत वाढवीत राहणे याचा अर्थ ज्यांना कॉन्स्टिट्यूशन सेफगार्ड केलेले आहे त्यांना लाचार ठेवावयाचे आणि त्यांच्याविरुद्ध वागणाऱ्या लोकांना टुल्स द्यावयाचे. हे बंद करावयाचे असेल तर कॉन्स्टिट्युशनल बिलाच्या पाठीमागे जे डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलचे तत्त्व आहे ते तत्त्व असे आहे की, All weaker sections of the society are to be brought on par with others. समाजातील साऱ्या दुर्बल अंगांना सबल अंगाबरोबर आणले पाहिजे आणि मग केवळ ऑर्नामेंटल स्वरूपात आणलेला हा माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव किंवा संसदेच्या दोन्ही सभागृहांनी पास केलेल्या विधेयकाचे अभिनंदन करताना तेवढेच दुःख होते की, हे करतानाच आतापर्यंतचा जो काळ वाया गेलेला आहे त्यामुळे अकारण इतर समाजामध्ये असंतोष वाढला आहे आणि तो वाढलेला इतर समाजातील असंतोष दूर करावयाचा असेल तर विशिष्ट कालबद्ध असा कार्यक्रम अंमलात आणून ही विषमता दूर केली पाहिजे असे माझे मत मी व्यक्त करतो आणि संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाचे अभिनंदन करण्यासाठी म्हणून आणलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो.

❑❑❑

दुष्ट प्रवृत्तीविरुद्ध एल्गार

(२१ एप्रिल, १९९०)

एकेकाळी महाराष्ट्रात रिंकू पाटील प्रकरण खूप गाजले होते. स्वाभाविकपणे विधानपरिषदेच्या पटलावर ते आले. अशा चर्चेच्या वेळी दादासाहेबांमधील सामाजिक विचारवंत जागा होत असे. अशा प्रकरणांचा ते अतिशय गांभीर्याने विचार करीत असत. त्यानिमित्ताने राज्यातील कायदा व सुव्यवस्था स्थितीची झाडाझडतीही घेत असत. रिंकू पाटील प्रकरणावर संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता या नात्याने बोलतांना ते म्हणाले...

राक्षशी व दुष्ट प्रवृत्तीनी संगीता हिला जाळले नाही तर संपूर्ण महाराष्ट्राची माणुसकी या घटनेमुळे जाळली गेली आहे. हे वृत्त मी नागपूरला वाचले. संगीताचे आईवडील जेवढे रडले असतील तेवढ्याच महाराष्ट्रातील सर्व स्त्रिया रडल्या आहेत. आपलीच मुलगी जाळली गेली आहे. या भावनेने त्या रडल्या आहेत. महाराष्ट्राच्या साधुसंतांची

परंपरा आणि सात्विकता या दुष्ट राक्षसांनी जाळली आहे. माननीय सभापतींनी अत्यंत व्यथित अंत:करणाने या ठिकाणी भावना व्यक्त केल्या आहेत. म्हणून या व्यथित महाराष्ट्राचे मन पूर्ववत कसे होईल हे पाहिले पाहिजे. अनेक मातापित्यांना आपल्या मुलांचा जीव सुरक्षित आहे की नाही याबद्दल शंका येते.

माननीय गृहराज्यमंत्री हे घटनास्थळी जाऊन आले. परंतु या घटनेच्या पाठीमागची कारणमीमांसा अजून पुढे आली नाही. कारणमीमांसा सांगता येणे शक्य असेल तर ती या अर्थाने in the greater interest of the public आणि भावना दुखविण्याचा प्रश्न असेल तर ही कारणमीमांसा आपण गुप्त ठेवतो असे आपण सांगावे. परंतु हे करीत असताना आज ठाणे, बेलापूर, कल्याण, उल्हासनगर या बेल्टमध्ये गेल्या पाच-सहा वर्षांपासून कायदा व सुव्यवस्थेची पूर्णपणे गैरहजेरी आहे असे वातावरण निर्माण झाले आहे. त्या ठिकाणी संसर्गजन्य रोग पसरला आहे. मुंबईमध्ये सुपारी घ्या आणि अमुक माणसाला मारा, अमुक मुलीला जाळा, अमुक भगिनीवर बलात्कार करा, अशा प्रकारच्या सुपाऱ्या घेणाऱ्या काही टोळ्या असून त्यांचे मालक आहेत. यांचा प्रादुर्भाव ठाणे, कल्याण, उल्हासनगरपर्यंत गेला आहे. इतकेच नव्हे तर जवळजवळ आता जिल्ह्यांची ठिकाणे या गुंड लोकांच्या टोळ्यांनी काबीज केली आहेत. या सभागृहात आलेल्या तीन-चार दिवसांपूर्वीच्या लक्षवेधी सूचना मी वाचल्या आहेत आणि त्यापूर्वीच्याही वाचल्या तरी त्यावरून कायदा व सुव्यवस्थेचे डिटोरिएशन सुरू झालेले आहे हे कटू सत्य आहे. तेव्हा त्यासंबंधी संशोधन होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे परीक्षा केंद्रावर उपस्थित असणारे पोलीस सशस्त्र होते की, साध्या पोषाखात होते, हातात काठी घेऊन होते यासंबंधीचे वृत्त आले नाही. परंतु ते सशस्त्र असू शकतात किंवा हातात काठी घेऊन असू शकतात. शेवटी पोलीस हा जनतेचा रक्षणकर्ता आहे असे एकदा व्रत त्याने स्वीकारल्यानंतर त्यांनी ताबडतोब सर्व शक्तिनिशी या गुंड राक्षसांचा प्रतिकार करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ते केले नाही, ते पळून गेले. गडचिरोलीला घडलेल्या प्रकारानंतर या राज्याचे पोलीस महासंचालक ते आज अधिकारावर नाहीत. परंतु मला एक गुप्त माहिती कळली आहे की, हे पोलीसवाले दारू पितात आणि बायकांची छेडछाड करतात, असे पत्र त्यांनी राज्य सरकारला लिहिले आहे. I feel shame to be Head of the Police Department in Maharashtra असे घडत असेल. ते कुलकर्णी बिचारे सर्वार्थी थोर पुरूष होते. मला असे म्हणावयाचे आहे की, हे दोन्ही पोलीस पळाले असतील तर ती बाब मॉरलच्या दृष्टीने निषेधार्ह आहे. ते आपल्या कर्तव्यापासून च्युत झाले. परंतु जर या दोन्ही पोलिसांनी त्या बदमाश गुंडांशी प्रतिकार केला असता व तो करीत असताना त्यांचे खून झाले असते तर महाराष्ट्राचे मर्द पोलीस अशी प्रतिमा उभी राहिली असती आणि म्हणून सशस्त्र असताना त्यांनी काही प्रतिकार केला नसेल तर ती अत्यंत चीड आणणारी बाब आहे.

अध्यक्ष महाराज, या प्रसंगी मा. विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे अशा घटनेचा नॉर्मल विचार होता कामा नये. कारण These are the incidents which relate to abnormality गाडीवर पिस्तूल मारण्याचे प्रकार, माणसाला पकडून तलवारीने कापणे हे प्रकार नॉर्मल नाहीत. ॲबनॉर्मल आहेत आणि त्यामुळे यांचे उपाय देखील नॉर्मल

चालणार नाही. कारण या सर्व राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांची यादी, अशांत विभागामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. ते दिवसाढवळ्या पोलिसांशी संगनमत करून फिरत आहेत. मा. विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे मी कुणाचे नाव घेत नाही परंतु अशा लोकांना काही राजकीय पक्षांच्या आश्रय आहे आणि या रीतीने ते गुंड वापरले जातात. हे लोक टेरर आहेत. मी अशा प्रकारच्या दोन-तीन लक्षवेधी सूचना दिल्यानंतर मला आमदार निवासाच्या पत्त्यावर निनावी पत्रे आली की, आपण हा विषय सभागृहात मांडणार असाल तर सांभाळून रहा. म्हणजे जनप्रतिनिधींना देखील आपले कर्तव्य पार पाडण्यामध्ये त्यांच्यात हिंमत राहणार नाही. अशा प्रकारची निनावी पत्रे आली आहेत. अमरावतीला जी दंगल झाली त्याबाबतची माहिती या ठिकाणी देतो. श्री. शर्मा हे आता पंतप्रधानांचे मुख्य सुरक्षा अधिकारी आहेत ते त्यावेळी अमरावतीचे एस. पी. होते. त्यांनी आपल्या एस. पी.च्या अधिकारामध्ये ती दंगल नॉर्मलला आणण्याकरिता कायदा केला. त्या कायद्याला आपण टेररिस्ट ॲक्ट म्हणतो. त्या कायद्याप्रमाणे अंमलबजावणी करून त्या भागातील गुंड लोकांना पकडले. या ठिकाणी तर माणुसकी जाळली आहे. तेव्हा अशा खुन्यांचा तपास हा "नॉर्मल प्रोसिजर कोड आणि नॉर्मल इंडियन पिनल कोड" याच्या व्यतिरिक्त करावा लागेल. मध्यंतरी केंद्र सरकारने एस. सी. आणि एस. टी. वर होणाऱ्या ॲट्रॉसिटीसाठी स्पेशल कायदा केला. त्याच न्यायाने प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम असे काही करता येईल काय ? मी आपल्याला अनेक वेळा म्हटले आहे की, ज्या आया-भगिनींची इज्जत लुटली जाते, त्यासंबंधी नॉर्मल केसमध्ये आपल्याला काही करता येईल काय? जी अर्भके, बालके जाळली जातात. त्यासंबंधीच्या कायद्याचा वेगळा विचार आपल्याला करता येईल काय? दुर्देवाने हा प्रकार म्हणजे लोखंडी हृदयाच्या माणसाच्या मनालाही पाझर फुटणारा आहे. यामध्ये मी जनरल लॉ ॲण्ड ऑर्डरसंबंधी म्हणतो की, हा इंसिडन्स समोर ठेवून आपण एक मोहीम महाराष्ट्रात उभारली पाहिजे Whosoever antisocial element, to what political party they belong, whosoever gets political patronage याचे संबंध सोडून अशा दुष्ट राक्षसी प्रवृत्तीच्या माणसांकडून चार-पाच हजार लोकांच्या वस्तीमध्ये दरारा निर्माण केला जातो. What is the very intention of punishment? लोकांमध्ये दहशत निर्माण झाली पाहिजे. अशा लोकांशी गुंड प्रवृत्तीने वागून चालत नाही. या गुंड प्रवृत्तीला आळा घालावयाचा असेल तर अधिवेशन संपल्यानंतर एक कायदा करता आला किंवा शक्य नसेल तर तात्काळ मा. राज्यपालाद्वारे अध्यादेश काढून त्याची अंमलबजावणी केली तर ही गुंड, राक्षसी प्रवृत्तीची माणसे या महाराष्ट्राला कलंकित करू इच्छितात, त्यांचा आपल्याला बंदोबस्त करता येईल काय? व त्या दिशेने आपल्या यंत्रणेची वाटचाल करता येईल काय? आणि म्हणून पुन:श्च अत्यंत भावनिक अंत:करणाने या चर्चेत भाग घेऊन या दुष्ट लोकांनी जी माणुसकी जाळली ती माणुसकी आता जिवंत करण्याची प्रक्रिया हे उदाहरण समोर ठेवून करावी अशी अपेक्षा करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

❑❑❑

नामांतराचे तत्त्वज्ञान

(२० जुलै, १९९०)

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराबाबत महाराष्ट्रात दीर्घ काळापर्यंत वैचारिक घुसळण झाली. हिंसाचाराचे वातावरण निवळल्यानंतर जुलै, १९९० मध्ये प्रा. ना. स. फरांदे यांनी विधानपरिषदेत एक बिनसरकारी प्रस्ताव मांडला. त्यात दादासाहेबांनी अतिशय शांतचित्ताने नामांतराची भूमिका मांडून वस्तुस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. फरांदे यांनी जो महत्त्वपूर्ण ठराव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. त्यांनी जी टिप्पणी काढली आहे, त्याशिवाय मी असे सांगतो की, २७ जुलै १९७८ रोजी हा ठराव वरच्या सभागृहात त्यावेळचे राज्याचे महसूल मंत्री, श्री. उत्तमराव पाटील यांनी मांडला होता आणि त्यावेळी मी सभापतींच्या खुर्चीवर होतो. हा ठराव निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी दोन दिवस त्यावर चर्चा झाली आणि त्यामध्ये मी सुद्धा सहभागी झालो होतो. या ठरावाची गुणवत्ता या ठिकाणी काही सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु काही गोष्ट सभागृहास समजणे आवश्यक आहे. त्यामुळे आठवणी ताज्या होतील. मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासंबंधीची मागणी ही सर्व प्रथम समाजातील सर्वमान्य पुढाऱ्यांनी केली. दलित पुढाऱ्यांनी केलेली नाही. पहिला प्रस्ताव मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेटने केला की, मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे आणि या प्रस्तावानंतर सर्वसामान्य जनतेच्या नेत्यांनी त्याला पाठिंबा दिला. त्याच्या प्रीअंबलमध्ये काय होते? की, मराठवाड्यामध्ये शिक्षणाची ज्ञानगंगा डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी आणली आहे. अध्यक्ष महाराज, आज मराठवाडा पुन्हा शैक्षणिक क्षेत्रामध्ये पुढे येत आहे हे आपण पाहतच आहोत. अध्यक्ष महाराज, ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालय काढले त्यावेळी कॉलेजमध्ये एकंदर ३०० विद्यार्थी होते त्यापैकी २९७ विद्यार्थी जनरल होते तर फक्त तीन विद्यार्थी शेड्यूलकास्ट होते. हा भाग लक्षात घेतला तर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेटने जो एकमताने ठराव पास केलेला त्यावेळी मराठवाड्यातील सर्व जनतेने आणि त्यावेळच्या दलितांच्या नेत्यांनी पक्षीय भूमिकेतून याचा मागोवा घेतला आणि त्याला प्रीअंबल जोडले की, शिक्षणाची ज्ञानगंगा मराठवाड्यामध्ये आणण्याचे पहिले कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. मराठवाडा हा भागच मागास होता तेव्हा डॉ. आंबेडकरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मराठवाड्यामध्ये विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे आणि अशा प्रकारे प्रीअंबल सुधारित करण्यात आले. मराठवाड्याची अस्मिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अस्मिता या दोन्ही एकत्र करून मराठवाड्याच्या विद्यापीठाची उंची वाढेल म्हणून निर्णय असा झाला की, विद्यापीठाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे राहील. सन्माननीय सदस्य फरांदे यांनी सांगितल्याप्रमाणे २७ जुलै रोजी दोन्ही सभागृहामधून हा ठराव पास झाला त्याची परिभाषा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अशी राहिली आणि मराठवाड्यांची अस्मिता जोपसली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऋण

एचबी ११८०—३०

मराठवाड्याने मान्य केले आणि अशा प्रकारे एकमताने ठराव पास झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होत नाही म्हणून दलितांच्या चळवळी झाल्या आहेत. परंतु सुरुवातीस नाव देण्यासंबंधाने मराठवाड्यातील सर्वसामान्य जनता पुढे आली. अध्यक्ष महाराज, हा प्रश्न भावनेचा आहे हे मी मानतो. परंतु आता हे काही माझे काम राहिलेले नाही, माननीय रामदास आठवले यांचे सुद्धा काम राहिलेले नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची अस्मिता जोपासण्याचे काम महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेने केले आहे. मराठवाड्यातील जनतेने केले आहे. अध्यक्ष महाराज, १४ एप्रिल रोजी राज्य शासनातर्फे शिवाजी मैदानावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी झाली त्यावेळी त्या ठिकाणी कम्युनिस्ट पक्षाचे श्री. बर्धन, श्रीमती अहिल्या रांगणेकर, श्रीमती गोरे आदी नेत्यांची वक्तव्ये झाली आणि त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, आता आम्ही ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. त्यादृष्टीने वातावरण निर्माण केले पाहिजे. केवळ नामांतराच्या अस्मितेसाठी दलितांनीच चळवळ करणे योग्य नाही तर आम्ही सुद्धा त्यादृष्टीने वातावरण निर्माण केले पाहिजे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या वातावरण निर्मितीस प्रतिसाद द्यावा असे भाषण केले आणि मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, आता ती आपली नैतिक जबाबदारी आहे आपण ती पूर्ण करू. १४ एप्रिल ते १४ मे व १४ जून असे तीन महिने झाले. या तीन महिन्यांमध्ये वातावरण निर्मितीच्या बाबतीत काय काय घडले ते आम्हाला समजले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्षांमध्ये १४ एप्रिल १९९१ पूर्वी डॉ. बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिले पाहिजे यासाठी दोन मिनिटात मी माझ्या भावना सांगतो. याबाबतीत खरा आदर मराठवाड्यातील आम जनतेने केला आणि हा विषय देश पातळीवर गेला. पंतप्रधान, श्री. व्ही. पी. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली जन्मशताब्दी कमिटी नेमलेली आहे. त्या कमिटीचा मीही सदस्य आहे. त्या ठिकाणी विविध राज्यांमधून जन्मशताब्दी साजरी करण्याच्या सूचना आल्या. त्या प्रत्येक राज्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्हावे अशी सूचना केलेली आहे. तेव्हा या सर्व गोष्टीचा विचार करून मने दुभंगून या संबंधीच्या मनामनामध्ये भीती निर्माण करून व वातावरण दूषित करून हे नामांतर नको. तर यासंबंधी सामंजस्याचे वातावरण निर्माण केले गेले पाहिजे आणि याच्या यशाच्या श्रेयाचा मंगल कलश मराठवाड्याला अर्पित केला पाहिजे. तुम्ही मनाचा मोठेपण दाखविला. याचे धनी तुम्ही आहात तेव्हा हा अस्मितेचा मंगल कलश तुम्ही घ्या. तेव्हा या दृष्टिकोनातून तुम्ही वातावरण काय निर्माण केले हे मी जाणून घेऊ इच्छितो. १४ एप्रिल १९९१ जवळ येत आहे. या जन्मशताब्दी वर्षामध्ये हे नामांतर घडले नाही तर केव्हाही घडणार नाही. मला एका गोष्टीचा आनंद वाटला की, मी त्यावेळी ठराव मांडला याला महत्त्व नाही. परंतु सन्माननीय सदस्य, श्री. फरांदे यांनी ठराव मांडून त्याला पाठिंबा देण्यात जे महत्त्व मला वाटले ते महत्त्व माझा ठराव मांडतांना मला वाटले नाही. म्हणून या भावनांची कदर करून वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने काय काम केले हे सांगावे आणि असे वातावरण निर्माण करून या जन्मशताब्दी वर्षामध्ये १४ एप्रिल १९९१ पूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर व्हावे अशी आशा, अपेक्षा मनापासून व्यक्त करून व माझे सहकारी श्री. फरांदे यांच्या ठरावला पाठिंबा देऊन मी माझे विचार पुरे करतो.

❑❑❑

सामाजिक

महार वतनाच्या जमिनी प्रकरणी सात्त्विक संताप

(१९ मार्च, १९९१)

दादासाहेबांना आपण सर्वांनी नेहमी हसतमुखच पाहिले आहे. पण एखाद्या अन्यायाने परीसीमा गाठली तर त्यांचा सात्त्विक संताप अक्षरशः शेवटच्या पट्टीत जात असे. प्रसंग फारच कमी असतील पण ते आहेत. तेही दलितांवरील अन्यायाच्या वेळी. दिनांक १९ मार्च, १९९१ रोजी त्यांनी स्वतःच महार वतनाच्या जमिनींचा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी ते सरकारला उद्देशून म्हणाले की, "तुमच्यात काही जनाची नाही पण मनाची तरी आहे की नाही ? या गरीब लोकांना त्या जमिनी परत करावयाच्या नाहीत. आम्ही त्या लंपास केल्या आहेत, पचवल्या आहेत, त्या लोकांना सरकार दुखवू इच्छित नाही असे उत्तर देऊन टाका. द्यावयाचे असेल तर सांगा देतो आणि किती दिवसांच्या आत ?"

यासंदर्भात त्यांनी स्वतः अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती, ते म्हणाले...

या प्रश्नाचे गांभीर्य नवीन माननीय महसूल राज्यमंत्र्यांना असेल असे मला वाटते. शोषणाचे प्रकरण पश्चिम महाराष्ट्रातून आले आहे. तेथील काही भागातील लाखो एकर जमीन पूर्वाश्रमीच्या महारांना महार वतन म्हणून मिळाली होती. ती जमीन गिळंकृत करण्यात आली आहे त्यासंबंधी वेळोवेळी मी विविध संसदीय आयुधे या सभागृहामध्ये वापरली. ज्याप्रमाणे आदिवासीच्या जमिनी गिळंकृत करण्यात आल्या व त्या त्यांना परत देण्यासंबंधीचा कायदा करण्यात आला, तशा तऱ्हेचा कायदा करण्यात यावा यासंबंधीचे अशासकीय विधेयक मी सभागृहात मांडले होते आणि म्हणून या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी संसदीय आयुधे वापरून सुद्धा शासनाचा या विषयाकडे कानाडोळा व्हावा ही गोष्ट संसदीय लोकशाहीच्या प्रथेला सोडून आहे आणि संसदीय आयुधे वापरणाऱ्या आमच्या सारख्यांना मान खाली घालावयास लावणारी आहे. तशी परिस्थिती या प्रश्नामधून निर्माण झाली आहे. सभापती महोदय, हा प्रश्न पहिल्यांदा दिनांक १५ मार्च १९८४ रोजी विचारण्यात आला होता. सर्वश्री वामनराव महाडिक, प्रमोद नवलकर, मनोहर जोशी यांनी तो विचारला होता. त्याला उत्तर देताना शासनाने असे म्हटले की, "भूतपूर्व वतनदारांच्या जमिनी हस्तांतरित झाल्याने होणाऱ्या समस्यांची व्याप्ती तपासणे आणि प्रचलित कायद्याच्या तरतुदी लक्षात घेऊन अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या हितसंबंधाच्या दृष्टीने जमिनी परत करणे व त्याबाबत उपाययोजना सुचविणे आणि हा अहवाल एप्रिल अखेरपर्यंत अपेक्षित आहे."

एचबी ११८०—३०अ

सभापती महोदय, दिनांक १९ एप्रिल १९८४ ला मी त्याच विषयावर एक अशासकीय विधेयक सभागृहामध्ये मांडले होते. त्या विधेयकावरील चर्चेला उत्तर देतांना त्यावेळेचे महसूलमंत्री, माननीय श्री. घोलप यांनी असे सांगितले होते की, "माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रकरणी मी स्वतः लक्ष घालीन आणि या प्रकरणी स्क्वॅड किंवा स्पेशल अधिकारी नेमण्यासंबंधी शासन जरूर विचार करील." त्यावेळी मंत्रिमहोदय, म्हणाले की, "श्री. रा. सू. गवई यांनी मांडलेले हे विधेयक आहे. हे समितीच्या गाईड लाईन ठरणार आहे. या विधेयकामुळे समितीचे काम सोपे होईल. या समितीचा अहवाल लवकर सादर करण्यात येईल." हे वचन मंत्रिमहोदयांनी दिनांक १९ एप्रिल १९८४ रोजी दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, यानंतर दिनांक १६ नोव्हेंबर १९८४ ला ह्या सभागृहात माननीय सदस्य, सर्वश्री अण्णा डांगे, मो. उ. लहाने, मधू देवळेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यास उत्तर देताना त्यावेळचे महसूलमंत्री, श्री. भाई सावंत यांनी सांगितले की, "महार वतन जमिनीच्या झालेल्या हस्तांतरणाचा अभ्यास करण्याचा समितीचा अहवाल अजून झालेला नाही. अहवाल मिळविण्याचा शासन प्रयत्न करील."

अध्यक्ष महोदय, यानंतर १९८५ साली पुन्हा हाच प्रश्न माननीय सदस्य, सर्वश्री रा. सू. गवई, दे. मा. कराळे व दत्ता मेघे यांनी विचारला होता. त्याला उत्तर देण्यात आले की, "अजून अभ्यास समितीचा अहवाल आलेला नाही. तो लवकरच येईल."

अध्यक्ष महोदय, यानंतर १९८६ मध्ये पुन्हा प्रश्न विचारला होता. माननीय सदस्य, सर्वश्री अण्णा डांगे, आणि सूर्यभान वहाडणे यांना उत्तर देण्यात आले की, "अजून शासनास अभ्यास समितीचा अहवाल मिळालेला नाही" त्यामुळे उपप्रश्न क्रमांक २ व ३ प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर देण्यात आले.

अध्यक्ष महोदय, सन १९८७ मध्ये माननीय सदस्य, सर्वश्री रा. सू. गवई, दे. मा. कराळे, वि. ग. हांडे यांनी पुन्हा प्रश्न विचारला की, अभ्यास समितीने अभ्यास करून आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय? पण त्यावेळी उत्तर देण्यात आले की, "समितीला अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट १९८७ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. समितीचा अहवाल लवकर प्राप्त होईल."

अध्यक्ष महोदय, सन १९८८ ला पुन्हा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी माननीय सदस्य, सर्वश्री दे. मा. कराळे, विजय सावंत, वि. ग. हांडे, रा. सू. गवई, रा. ह. शिंदे, मधू देवळेकर व सू. र. वहाडणे यांच्या या प्रश्नाला उत्तर देण्यात आले की, "हा अहवाल अजून उपलब्ध झाला नाही." आणि उपप्रश्न क्रमांक २ व ३ प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर देण्यात आले.

अध्यक्ष महोदय, यानंतर सन १९८९ ला पुन्हा हाच प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी माननीय सदस्य, सर्वश्री विजय सावंत, रा. सू. गवई, सुधीर जोशी, मनोहर जोशी व प्रमोद नवलकर यांच्या या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले की, "सदर अहवाल हा अभ्यासपूर्ण व सखोल असा ३५० पानांचा विस्तृत आहे. त्यामध्ये समितीकडे सोपविलेल्या प्रश्नांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, माजी वतनदारांचे हितसंबंध रक्षण करण्याकरिता केलेले अधिनियम त्याचे परिणाम याबाबत विवेचन आहे. तसेच ते अधिनियम करण्यामागे शासनाचा उद्देश काय होता व काय साध्य झाले. साध्य न झालेले उद्देश साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले उपाय समितीने सुचविले आहेत. सदर अहवालाचा अभ्यास करून शासनाला योग्य त्या शिफारशी सादर करण्यासाठी एक एम्पॉवर्ड कमिटी नेमण्यात येत आहे." असे प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, "महार वतन जमिनीच्या हस्तांतरणाच्या संदर्भात अभ्यास समितीच्या अहवालाच्या संदर्भात एम्पॉवर्ड

कमिटी स्थापन करण्यात आली आहे आणि या समितीचा अहवाल प्रलंबित आहे. तुमच्यात जनाची नाही तर मनाची आहे की नाही ही लाखो एकर जमीन आहे. ह्या गरीब लोकांना या जमिनी परत करावयाच्या नाहीत. आम्ही त्या लंपास केल्या आहेत. आम्ही त्या पचवल्या आहेत आणि ज्यांनी पचवल्या त्या लोकांना सरकार दुखवू शकत नाही. असे उत्तर देऊन टाका आणि सदैव आम्हाला संसदीय आयुध वापरण्याकरिता कशाला त्रास देता? द्यावयाचे असेल तर सांगा देतो, आणि किती दिवसांच्या आत? या समितीच्या अहवालावर विचार करण्याकरिता दुसरी समिती नेमली. त्या समितीचा अहवाल कधी प्राप्त होईल, त्या समितीच्या अहवालाप्रमाणे लाखो एकर महार वतनाच्या जमिनी पचवल्या त्या कधी परत करणार याचे उत्तर द्यावे."

❑❑❑

महाराष्ट्रातील शिक्षणाची गुणवत्ता घसरणे

(१६ जुलै, १९९१)

महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वत्र दर्जा घसरणे, गुणवत्ता घसरणे, शिक्षणाचा अपेक्षित प्रचार न होणे या विषयावर नियम २६३ खाली सर्वश्री रा. सू. गवई, श्रीकांत जिचकार, विठ्ठलराव हांडे, विजय मोरे, अण्णा डांगे, इसाक जामखानवाला व डॉ. बळीराम हिरे यांनी प्रस्ताव दिला होता. त्यावरील चर्चेला १६ जुलै, १९९१ रोजी श्री. गवई यांनीच प्रारंभ केला. त्या भाषणातून शिक्षणावरील त्यांचा व्यासंग समोर येतो.

आपल्यापुढे चर्चेसाठी जो प्रस्ताव आहे तो शिक्षणासंबंधीचा आहे. राज्यातील शिक्षणाचा दर्जा आणि त्यासंबंधीची राज्यातील दिवसेंदिवस खालावत चाललेली स्थिती एवढेच नव्हे तर प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत सर्वस्पर्शी असा हा विषय असल्यामुळे या विषयावर आपल्या अनुभवाने विभिन्न मते मांडणारे सहकारी आहेत. तसेच विशेष म्हणजे शिक्षण क्षेत्रातील अनुभवी मंडळी आहे व शिक्षण क्षेत्राशी संबंधित असे मंत्री या चर्चेला उत्तर देणार आहेत. मी त्या क्षेत्रातील नसल्यामुळे त्यातील बारकावे सांगणार नाही. परंतु शिक्षणासंबंधीच्या गुणवत्तेच्या ज्या सर्वसामान्य कल्पना आहेत त्यासंबंधी मी बोलणार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून शिक्षणाचा मूलभूत विचार करण्यासाठी वेळोवेळी कमिशन नेमण्यात आले. पहिले कमिशन सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली नेमले गेले. त्यानंतर कोठारी कमिशन, मुदलीयार कमिशन नेमले. या सर्व कमिशननी देशातील सर्वव्यापी शिक्षणाचा आढावा घेऊन आपआपला अहवाल सादर केला व त्याद्वारे शिक्षणामधील गुणवत्ता कशी वाढविता येईल हे सुचविले. आपल्या राज्यामध्ये श्री. राम मेघे यांच्या अध्यक्षतेखाली याच संदर्भात एक कमिशन नेमलेले आहे. त्यांचा रिपोर्ट अपेक्षित आहे. मी म्हटल्याप्रमाणे ज्या कमिशनने आपले विचार आपल्या अहवालात प्रसिद्ध केले त्यांचा गोषवारा म्हटला तर त्यांनी ३-४ गोष्टींचा निकष त्यामध्ये ठेवलेला आहे. शिक्षण हे युनिफार्म असावे. म्हणजे शिक्षणामध्ये गुणवत्तेच्या संबंधी फरक असता कामा नये. अप्रगत शाळा, प्रगत शाळा,

इंग्रजी माध्यमाच्या शाळा, मराठी माध्यमाच्या शाळा, एक शिक्षकी शाळा, चार वर्गांना एकच शिक्षक शिकवितो ती शाळा, जिथे शिक्षकही नाही आणि शाळाही नाही ती शाळा असे डिस्क्रीमिनिशन प्राथमिक शिक्षणामध्ये होता कामा नये असे त्यांनी त्या गोषवाऱ्यात सांगितलेले आहे. दुसरे असे सांगितले आहे की, मूलभूत प्राथमिक शिक्षणामध्ये राष्ट्रीयत्व हे मुलाच्या अंगात आईच्या बाळकडूसारखे शिक्षकामार्फत देऊ शकलो नाही तर मग राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता याचे शिक्षण मुळी विद्यार्थ्यांना मिळणार नाही. म्हणून याची दक्षता देखील प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत घेण्यात आली पाहिजे. मला असे वाटते की, आज हे दोन्ही निकष स्वराज्यापासून ते देशपातळीवर आणि राज्यपातळीवर देखील सोयीस्कररीत्या विसरण्यात आले आहेत. नुकताच संत विद्यापीठाचा अहवाल विधानसभेचे माजी अध्यक्ष ख्यातनाम विद्वान मा. बाळासाहेब भारदे यांनी दाखल केलेला आहे. त्यांनी देखील याच कन्सेप्टचा जोरदार पाठपुरावा केला आहे की, आजच्या शिक्षणामधून राष्ट्रीय शिक्षणाची फारकत झालेली आहे. अशा प्रकारच्या शिक्षणाचे बाळकडू न मिळाल्यामुळेच आज के. सी. कॉलेजमध्ये असे अपप्रकार चालू आहेत. त्या ठिकाणी मुले, मुली शिकतात की, आणखी काय करतात अशा बातम्या दररोज वृत्तपत्रातून आपल्या पाहण्यात येत आहेत. मा. कोठारी, मुदलीयार आणि डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षणाला इनव्हेस्टमेंट म्हटलेले आहे. आपल्याला या शिक्षणातून पक्का माल तयार करावयाचा आहे. चांगली मुले निर्माण करावयाची आहेत. कसदार, ज्याचे अवमूल्यन झालेले नाही असा बंदा रुपया आज शिक्षणामधून निर्माण करावयाचा आहे अशी अपेक्षा त्या थोर लोकांची होती. त्याच्या उलट स्थिती झालेली आहे. आज आमदार निवासाच्या मागे असलेल्या के. सी. कॉलेजमध्ये जाऊन पहा. काय करतात ही मुले-मुली ? याबाबत त्यांना दोष देण्यात काही अर्थ नाही. ते जे काही करतात त्यामध्ये त्यांचा दोष नाही. दोष आहे तो मूळ शिक्षण पद्धतीचा. त्यांना चांगले बाळकडू आपण देऊ शकलो नाही, हाच आपल्या शिक्षण पद्धतीचा दोष आहे या शिक्षण पद्धतीतील दोषांचे बारकावे बाहेर यावेत याच दृष्टिकोनातून मी या ठिकाणी या विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे.

आज आपले शिक्षण हे कारकून निर्माण करणारे शिक्षण आहे. हेच उद्‌गार महात्मा गांधी यांनी, लोकमान्य टिळक यांनी देखील काढले होते. शिक्षणाचा उद्देश कारकून निर्माण करणे असा असेल तर मग सर्व संपलेच. जॉब ओरियंटेड शिक्षण देण्याची आज आवश्यकता आहे. असे शिक्षण देणे आवश्यक आहे की, ज्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना मुलांमध्ये निर्माण होईल, त्यांचे उदरनिर्वाहाचे ते एक साधन बनेल आणि ते स्वावलंबी बनू शकतील, असे जॉब ओरियंटेड शिक्षण देणे ही आजची खरी गरज आहे. मध्ये वसंतदादा पाटील यांच्या कारकिर्दीमध्ये तसा थोडा प्रयत्न झालेला होता. भारतीय घटनेच्या डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलमध्ये कंपल्सरी शिक्षण हे तत्त्व आम्ही स्वीकारल्यानंतर स्वराज्य प्राप्तीनंतर ४२-४३ वर्षांनंतर अजूनही आमच्या देशामध्ये सक्तीचे शिक्षण असू नये, ज्या महाराष्ट्र राज्याला पुरोगामित्वाचा वारसा लाभला आहे त्या ठिकाणी शिक्षण ही बाब सक्तीची असू नये हा खरोखरच दैवदुर्विलास आहे. तकलादू प्रौढ शिक्षण ही वाया जाणारी बाब आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी आपल्या प्रास्तविक भाषणांमधून असे सांगितले आहे की, ज्या योजना टाकाऊ आहेत त्या आम्ही बंद करणार आहोत. त्यांना देखील मी सुचविणार आहे की, प्रथम प्रौढ शिक्षण बंद करा. त्याचा काहीही उपयोग नाही, ते कोणत्याही कामाचे नाही. त्यामुळे केवळ आपला पैसा वाया जातो. आपण मूलभूत शिक्षण असे म्हणत असताना ते कंपल्सरी का करीत नाही? कंपल्सरी शिक्षण हे डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल वापरा. आज कॉन्व्हेंटमध्ये कसे शिक्षण दिले जाते? अर्थातच मला त्यांच्याबाबत दुजाभाव वाटत नाही. उलट आदरच वाटतो. कॉन्व्हेंटमध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी प्रथम मिनी केजीमध्ये जातो. त्यानंतर ज्युनिअर के. जी. सिनिअर के. जी. उत्तीर्ण झाल्यानंतर त्याला पहिल्या वर्गात प्रवेश दिला जातो. अशा प्रकारे चांगल्या शाळांमधून शिक्षण घेणारे

विद्यार्थी आय. ए. एस.मध्ये पुढे जातात आणि बाकीच्या शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी मात्र मागेच राहतात. आमच्या विदर्भामध्ये शाळांना कोंडवाडा म्हटले जाते. तेव्हा अशा प्रकारच्या शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी पुढे कसे जाणार? ते विद्यार्थी आय. ए. एस. कसे होणार? शिक्षण पद्धतीमध्ये एकवाक्यता नसल्यामुळे प्रशासनामध्ये डिसक्रिमिनेशन केले गेले आहे. ज्यांच्यामध्ये महाग शिक्षण घेण्याची कुवत आहे. तेच विद्यार्थी आय. ए. एस. होऊन पुढे जातात आणि बाकीचे विद्यार्थी मात्र मागे राहतात.

अध्यक्ष महाराज, प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेच्या संदर्भात मी मागे बोललो होतो. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. वि. ग. हांडे हे सुद्धा अत्यंत कडक शब्दामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या गुणवतेबाबत बोलले होते. आपल्या भारतामध्ये एक शिक्षकी शाळांची संख्या लाखाच्या वर असून महाराष्ट्रामध्ये जवळजवळ १७ ते १८ हजार एक शिक्षकी शाळा आहेत. एक शिक्षकी शाळा चालवणे पाप असून विद्यार्थ्यांची प्रतारणा आहे. माननीय शिक्षण राज्यमंत्री हे शिक्षण क्षेत्रातील अनुभवी आहेत. एक शिक्षक चार वर्गांना कसा काय शिकवणार? अध्यक्ष महाराज, खालच्या सभागृहामध्ये श्री. सुदाम देशमुख हे सदस्य होते, त्यानंतर ते खासदार झाले होते. पुन्हा खासदारकीच्या निवडणुकीमध्ये ते उभे राहिले होते, परंतु दुर्दैवाने ते पडले. त्यांनी एकदा सांगितले होते की, ग्रामीण भागातील शिक्षणाची अवस्था अत्यंत वाईट आहे. तेथे शाळा नाही, वर्ग नाही आणि वर्गामध्ये शिक्षक नाही. त्या गावातील मारुतीच शिक्षणाची व्यवस्था करतो. तोच शाळा भरवतो, विद्यार्थ्यांना शिक्षण देखील मारुतीच देतो आणि शाळा देखील मारुतीच बंद करतो. ग्रामीण भागातील अनेक शाळा मारुतीच्या मंदिरामध्ये भरत असतात. १७-१८ हजार शाळा मारुतींच्या मंदिरामध्ये भरतात. त्यांचे रूपांतर शाळेमध्ये कधी करणार आहात? अनेक प्राथमिक शाळा एक शिक्षकी शाळा आहेत तेव्हा एखादा टाइम बाऊन्ड कार्यक्रम आखून या एक शिक्षकी शाळा संपविण्यासंबंधीच्या निर्धार हे शासन कधी करणार आहे? माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांकडून आमच्या जास्त अपेक्षा आहेत कारण त्यांना या क्षेत्रातील अनुभव जास्त आहे. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांचे ऐकू नये. माननीय शिक्षण मंत्र्यांचे ऐकू नये. त्यांनी स्वतःच निर्णय घ्यावा असे मला त्यांना सांगावयाचे आहे. एक शिक्षकी शाळा या राज्यामध्ये चालू देणार नाही अशा प्रकारचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल.

अध्यक्ष महाराज, यानंतर मला दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. आज उच्च शिक्षणावर ७० टक्के खर्च केला जातो आणि प्राथमिक शिक्षणावर फक्त ३० टक्केच खर्च केला जातो. वास्तविक प्राथमिक शिक्षणावर ७० टक्के खर्च व्हावयास पाहिजे आणि ३० टक्के खर्च उच्च शिक्षणावर व्हावयास पाहिजे. तेव्हा हा रेषो कधी बदलण्यात येणार आहे? प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये फरक करता यावा या दृष्टीनेही रेषो कधी बदलण्यात येणार आहे? प्रा. राम मेघे यांच्या अध्यक्षतेखाली कमिशन नेमण्यात आलेले आहे. त्यांनी आमच्याकडे प्रश्नावली पाठवली होती आणि त्या प्रश्नांची उत्तरे देखील आम्ही त्यांच्याकडे दिली होती. अध्यक्ष महाराज, आतापर्यंत देशाच्या पातळीवर राधाकृष्णन कमिशन, मुदलियार कमिशन, कोठारी कमिशन नेमण्यात आले होते आणि राज्याच्या पातळीवर मेघे कमिशन नेमण्यात आले आहे. तेव्हा त्या कमिशनच्या बाबतीत काय प्रगती झाली, हे आम्हाला समजले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, भ्रष्टाचाराच्या संदर्भात मी मागे बोललो होतो की, नांदेड जिल्हा परिषदेमध्ये सगळा भ्रष्टाचार हा शाळेमध्ये झालेला आहे. जवळजवळ १७२ शाळांमध्ये नांदेड जिल्ह्यात भ्रष्टाचार झालेला आहे. १७२ पैकी १०० शाळांतील भ्रष्टाचाराच्या केसेस मागे घेण्यात आल्या. भ्रष्टाचार झालेल्या सर्व शाळांच्या विरुद्ध कारवाई करू असे मागे सांगण्यात आले होते. परंतु १०० शाळांच्या केसेस मागे घेण्यात आल्या आणि ७२ शाळांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली. ज्या शाळाचालकांचे राजकारणामध्ये चालते त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात

आलेली नाही आणि ज्या शाळाचालकांचे चालत नाही अशा मागासवर्गीय ७२ शाळांविरुद्ध भ्रष्टाचाराच्या केसेस दाखल केल्या आहेत. तेव्हा माझी मागणी आहे की, आपण त्यांचाही भ्रष्टाचार उघडकीस आणा आणि इतरांनी केलेला भ्रष्टाचारही उघडकीस आला पाहिजे. अध्यक्ष महाराज, आपण माझ्या एका मुद्याला सहमती द्याल असा मला विश्वास आहे आणि तो म्हणजे या राज्यात ज्या विद्यार्थ्याला कमीत कमी ६० टक्के गुण मिळतात वा मिळाले आहेत त्या विद्यार्थ्याला तो मागेल ती फॅकल्टी, विद्याशाखा दिली गेली पाहिजे. असे झाले नाही तर जीवनभर त्या विद्यार्थ्यामध्ये फ्रस्ट्रेशन होईल. प्रथम दर्जाचे मार्क्स मिळवूनही त्याला पाहिजे ती विद्याशाखा मिळाली नाही, त्याला त्याच्या आवडीचे शिक्षण घेता आले नाही तर त्याचा काहीही उपयोग नाही. अध्यक्ष महाराज, मी रशियाला गेलो असता तेथील विद्यापीठाला भेट दिली होती. त्या ठिकाणी मुलांचे गुण, त्यांचे ऑप्शन्स पाहून त्या मुलाने कोणत्या विद्याशाखेला जावे हे सांगितले जाते. त्याचा एकूण ॲटिट्यूड पाहून त्याने कोणती विद्या शाखा घ्यावी हे त्याला ठरवावयास मोकळीक होती. तेव्हा कोठल्याही विद्याशाखेला कोठल्याही मुलाला घेण्याचे धोरण समाजवादी देशाने ठरविले आहे तर मग आपल्या सारख्या पुरोगामी राज्याने तसे धोरण का स्वीकारू नये? म्हणून माझी या निमित्ताने मागणी राहील की, ६० टक्के गुण ज्याला मिळतील त्याला त्याच्या आवडीची विद्याशाखा मिळाली पाहिजे. ती देता येत नसेल तर आपणाकडे तेवढी क्षमता नाही हे आपण मान्य करा. कारण गुणवत्तेच्या मुलांचा समावेश करून घेण्याइतकी आपली पोटॅन्शिअल नसेल तर तो संपूर्ण दोष सरकारच्याच माथ्यावर येतो. आज कोणत्याही विद्याशाखेमध्ये प्रवेश मिळण्याबाबत दाणादाणच आहे. तर मग आपण तेवढे पोटॅन्शिअल का निर्माण करीत नाही? मुंबईच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात आज पाठ्यपुस्तकांची काय स्थिती आहे? त्याबाबतची चर्चा सकाळीच संपली. तेव्हा त्या विषयाला मी आता स्पर्श करीत नाही. पण या संबंधीचे जे काही मूलभूत प्रश्न निर्माण झालेले आहेत, त्यासंबंधी आपणास विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजे गुणवत्ता हा शिक्षणाचा केंद्रबिंदू समजून आणि मुलगा केंद्रबिंदू समजून जर आपण मी म्हटल्याप्रमाणे, तत्त्वाप्रमाणे जाऊ शकलो तर शिक्षणामध्ये काही बदल आपल्याला करता येईल. माननीय वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांनी जे काही निर्णय घेतले, त्याच्याशी मी व्यक्तिशः सहमत आहे. बाहेरच्या राज्यात इंजिनीयरिंग आणि मेडिकल कॉलेजच्या बाबतीत जी काही व्यवस्था आहे, ती महाराष्ट्रात का नको? ज्या संस्था इंजिनीयरिंग आणि मेडिकल कॉलेजेस चालवीत आहेत. त्यांना काही जागा दिलेल्या आहेत. आज कायद्याने कॅपिटेशन फी बंद करण्यात आलेली आहे, तरी देखील काही संस्था डोनेशनच्या माध्यमातून पैसे घेत आहेत. माननीय वसंतदादा पाटील यांच्या कल्पनेप्रमाणे संस्था सबळ करण्यासाठी जर पैसे लागत असतील तर ते मला मान्य आहे. या ठिकाणी मॅनेजमेंटला ज्या काही जागा दिलेल्या आहेत. त्यामधील ९९ टक्के जागांवर बाहेरच्या प्रांतांतीलच विद्यार्थी असतात. एकच टक्का महाराष्ट्रीयन विद्यार्थी असतात. त्यामुळे त्याचे काय परिणाम झाले आहेत, ते आपल्याला माहितीच आहे. आपण जरा नागपूरकडे पहा, पूसदकडे पहा, त्या ठिकाणी जाळपोळ, लूटमार आणि गोळीबार देखील झालेला आहे. सरकार शिक्षण संस्था काढू शकत नसल्यामुळे खाजगी संस्थांना शिक्षण संस्था काढण्यास परवानगी देते. माननीय श्री. पतंगराव कदम हे आता राज्यमंत्री झाल्यामुळे बोलत नाही. त्यांनी काढलेल्या शिक्षण संस्था अतिशय चांगल्या आहेत. त्यांनी चांगल्या प्रकारची गुणवत्ता मेन्टेन केलेली आहे. परंतु अध्यक्ष महाराज, या व्यतिरिक्त ज्या काही खाजगी शिक्षण संस्था आज चालत आहेत त्यातील ८० टक्के शिक्षण संस्था चांगल्या प्रकारे चालत नाहीत. त्यामध्ये गुणवत्ता मेन्टेन केलेली नाही. बिहार, पंजाब येथील विद्यार्थी या शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेत आहेत. मी या ठिकाणी परप्रांतियांच्या विरोधी नाही. परंतु आपण या राज्यातील इंजिनीयरिंग तसेच मेडिकल कॉलेजेस तपासून पहा. आपणाला असे दिसून येईल की, या राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता क्षणाक्षणाला ढासळत चालली आहे.

अध्यक्ष महाराज, या शिक्षण संस्थांमधून आपण एस. सी., एस. टी. आणि वि. जे. एन. टी. साठी रिझर्व्हेशन ठेवले आहे. परंतु या ठिकाणी शासकीय कॉलेजमध्ये जी फी आकारली जाते ती आकारली जात नाही. ती संस्था जी फी आकारील ती फी जर विद्यार्थी देत असेल तरच रिझर्व्हेशन, याचा अर्थ आपण दिलेले रिझर्व्हेशन त्यांनी मागच्या दरवाज्याने बंद केले आहे. खाजगी शिक्षण संस्थांमधून ५० हजार रुपये फी आकारली जाते. ही फी एस. सी., एस. टी., व वी. जे. एन. टी. ने कोठून द्यावयाची. म्हणून या ठिकाणी रिझर्व्हेशन नाही, असे आपण आम्हाला सांगा. दोन्ही प्रकारे म्हणतो. मागे एकदा मा. श्री. सुशीलकुमार शिंदे अर्थमंत्री असताना त्यांनी सांगितले होते की, रिझर्व्हेशन राहणार नाही. अशा प्रकारे जर विद्यार्थी गुणवत्तेत आले तर त्या संस्थेला त्यांचे पैसे गव्हर्नमेंट रिईम्बर्समेंट करील. माननीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या संस्थेमध्ये जर एखादा अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा, किंवा भटक्या वा विभुक्त जातीचा विद्यार्थी गुणवत्तेत आला तर त्या संस्थेला पैसे रिईम्बर्समेंट करण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतली पाहिजे. आणि म्हणून बी. ए., बी. एड., कॉलेज ॲडमिशनच्या संदर्भातही तौलनिकदृष्ट्या गुणवत्ता बाजूला ठेवून शिक्षण संस्था व्यापारी, बाजारू होणार नाहीत आणि विद्यार्थी हा केंद्रबिंदू राहील व त्याला लक्ष्मी अर्पण करण्याची दानत संस्थेची राहील अशा उद्देशाने प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत घसरलेली, ढासळलेली गुणवत्ता सुधारावी या अपेक्षेने ही चर्चा उपस्थित केली. अपेक्षा आहे की, शासन या प्रश्नावर गंभीरतेने विचार करील, एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

चर्चेचा समारोप १७ जुलै, १९९१

श्री. रा. सू. गवई : अध्यक्ष महाराज, मला प्रथम सभागृहाच्या निदर्शनास हे आणून दिले पाहिजे की, महाराष्ट्रातील समाज सुधारकांना जे शिक्षण व जी शिक्षण पद्धती अभिप्रेत होती त्याकडे आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाही. माननीय सदस्य श्री. फरांदे यांनी महात्मा फुले यांचा उल्लेख केला. त्यांनी एका चार ओळींच्या काव्यामध्ये शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. "विद्येविना मती गेली, मती-विना गती गेली. गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र फसले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले." याचा अर्थ आपण लक्षात घेतला पाहिजे की, ही विद्या सर्वांच्या घरामध्ये सारख्या प्रमाणात गेली पाहिजे. या बाबतीत कोणाचेच दुमत होणार नाही. पण स्त्रियांना शिक्षण देणे हे पाप आहे. त्यामुळे धर्म बुडेल असे सांगणाऱ्या त्या वेळच्या सुशिक्षित लोकांनी मातोश्री सावित्रीबाई यांच्या अंगावर चिखलफेक करण्यास कमी केले नाही. वास्तविक पाहता शिक्षणाचा विस्तार ही संपूर्ण देशाची गरज आहे. या संदर्भात माननीय सदस्य श्री. फरांदे यांनी ज्या दोन बाबी सांगितल्या त्यात मी आणखी एक बाब ॲड केली. ती म्हणजे डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स ऑफ द स्टेट पॉलिसीनुसार सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आणि त्याही पूर्वी महात्मा फुले यांनी हंटर कमिशनला साक्ष देतांना सांगितले की, थिअरी ऑफ परकोलेशन आपल्याला मान्य नाही. शिखरावर पाऊस पडेल आणि परकोलेशनने शूद्र, अति-शूद्र, तेली, माळी, धनगर समाज शिकेल ही कल्पना महात्मा फुले यांना मंजूर नव्हती. गुणवत्ता म्हणून नारळीकर शिखर म्हणून बनले तरी चालतील. त्याबद्दल दुमत नाही. परंतु शिक्षणाचा पाया हा फसता कामा नये. पूर्वी ज्यांना शिकू दिले जात नव्हते, मंत्र म्हटले तर जीभ कापत होते असे लोक आज संस्था चालवित असतील तर त्यांचा वैयक्तिक मला आनंद नाही. पण शिक्षण ही काही कोणा एकट्याची मोनोपॉली नाही. या क्षेत्राला शुद्ध कोणी केले असेल तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी. आता डॉ. पतंगराव कदम दिसावयास लागले आहेत, परंतु खरे आव्हान स्वीकारले ते कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि त्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी जी भूमी निवडली ती मराठवाड्यासारखी भूमी निवडली.

त्या ठिकाणी केवळ अस्पृश्य समाज शिकला नाही तर इतर समाजातील लोक देखील शिकले होते. आज या बाबत फार कमी लोकांना माहीत आहे की, पहिल्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे मिलिंद महाविद्यालय सुरू केले होते त्यावेळी ३०० विद्यार्थी त्या महाविद्यालयात आले होते आणि त्यामध्ये फक्त तीन महार विद्यार्थी होते. २९७ विद्यार्थी हे बहुजन समाजाचे होते. ही गोष्ट फार कमी लोकांना माहिती आहे. तीन शेड्युल्ड कास्टचे विद्यार्थी होते असे मी म्हणत नाही, तर महार विद्यार्थी होते असे म्हणतो. आणि उरलेल्या २९७ विद्यार्थ्यांत तेली, तांबोळी, कोष्टी, धनगर, माळी आणि ब्राह्मण विद्यार्थी होते. शिक्षक वर्गही ब्राह्मणच ठेवला होता. तेव्हा मी ही गोष्ट अशासाठी सांगत आहे की, शिक्षण संस्था उभ्या करून त्याचा विस्तार करणे ही काळाची गरज आहे. पण त्याच बरोबर याचा दुरुपयोग होता कामा नये, या विस्ताराचे लायसन्स दुरुपयोग करण्यासाठी देता कामा नये. त्या दृष्टीने या गोष्टीचे एकदा इव्हॅल्यूशन होणे आवश्यक आहे. काही लोक या विस्ताराचा दुरुपयोग करतात. पण हा विस्तार करीत असताना त्या संस्था गुणवत्ता राखू शकल्या नाही तर मग ते बदनाम होतात. तेव्हा या बाबत मी अशा मताचा आहे की, या शैक्षणिक संस्थांचे एकदा इव्हल्यूएशन झाले पाहिजे. मा. शिक्षण राज्यमंत्र्यांच्या संस्थेबद्दल मी जरूर बोललो. कारण मी तुमची संस्था पाहिली आहे. आपल्या संस्थेबद्दलचे अभिप्रायही पाहिले आहेत. मी अजून देखील बोलू इच्छितो. अध्यक्ष महाराज, इतर संस्थांचे नावच घेऊन सांगावयाचे झाले तर श्री. जयंतराव भोसले यांनी जे मेडिकल कॉलेज काढले आहे ते चांगले आहे. श्री. यशवंतराव मोहिते यांचे ते बंधू आहेत. त्यानंतर प्रवरानगर येथे विखे पाटलांनी जे मेडिकल कॉलेज काढले ते चांगले आहे, आयडियल आहे. त्यानंतर मा. श्री. दत्ता मेघे यांच्या ज्या संस्था आहेत त्या चांगल्या आहेत. मी या सर्व संस्थांचा मुद्दाम उल्लेख अशासाठी करतो की, या सर्व संस्था चांगल्या आहेत. परंतु त्याच बरोबर विस्ताराच्या शिक्षणात काही सुधारणा करण्याची आवश्यकता असून तशा सुधारणा करण्याची संधी त्या संस्थांना दिली पाहिजे परंतु लायसन्स म्हणून नव्हे. तेव्हा हे करण्याची गरज आहे आणि या संस्थांचे एकदा इव्हल्यूएशन करावे अशी अपेक्षा आहे. आपल्याकडून त्याबाबत काही घोषणा होईल अशी अपेक्षा होती पण ती फोल ठरली. प्राथमिक शिक्षणाबाबत महात्मा फुले यांनी आणि कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांनी जी भूमिका स्वीकारली होती ती आपण स्वीकारीत नाही. महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण सक्तीचे होईल असे आपण का करीत नाही? इतर राज्यात काय परिस्थिती आहे याची मला कल्पना नाही, परंतु पुरोगामी राज्याची कल्पना आपण मांडीत असताना सक्तीचे शिक्षण करण्याचे धोरण का स्वीकारीत नाही? महात्मा फुलेनी ज्या चार ओळी सांगितल्या होत्या त्या लक्षात घेऊन त्यांना खरी श्रद्धांजली वहावयाची असेल तर प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचे धोरण आपण स्वीकारले पाहिजे. अध्यक्ष महाराज, नॅशनल इन्कमचे जे ८ पर्सेंट आपण या शिक्षणावर खर्च करावयास पाहिजे होते पण तेवढे देखील खर्च करीत नाही. तेव्हा अध्यक्ष महाराज, या प्राथमिक शिक्षणाबाबतचे धोरण आज जरी आपण सांगू शकत नसलात तरी कमीत कमी नागपूर अधिवेशनात या विषयावर चर्चा करून काही निर्णय घ्या. किमान पक्षी एक शिक्षकी शाळा तुमच्या हिशोबाने १४-१५ हजार असतील तर दर वर्षी ५ हजार शाळा या बहुशिक्षकी होतील असे धोरण असले तरी तीन वर्षांत आपण हा कार्यक्रम पूरा करू शकतो. तेव्हा तीन वर्षे किंवा पाच वर्षे जे काही ठरवावयाचे असेल ते ठरवा आणि त्याची घोषणा करा. आम्ही त्याचे स्वागत करू. त्यानंतर स्वर्गीय वसंतदादा पाटील यांच्या जुन्या निर्णयाचे मी स्वागत करतो. मी त्या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत यासाठी करतो की, तो माणूस धोरणी होता. त्यांनी शिक्षणाचे एक्स्टेन्शन केले. त्याचप्रमाणे डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी पण शिक्षणाचे एक्स्टेंशन केले. त्यांच्या काही संस्था चुकत असतील तर तो दोष

भाऊसाहेबांचा नाही. मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख हे त्या संस्थेमध्ये प्राध्यापक म्हणून राहिलेले आहेत. ते स्वत: कसे शिकले हे मला माहीत आहे. मी देखील एल. एल. बी. त्याच कॉलेजातून झालो तेव्हा गुणवत्तेच्या निकषावर आपण एखाद्या संस्थेच्या शिक्षणाच्या एक्स्टेंशनबाबत निर्णय का घेत नाही? आज वीस अधिक दहा असे तीस विद्यार्थी संस्थाचालकांना भरण्यास परवानगी आपण देत आहात. त्यामध्ये काही चूक नाही. परंतु माझे म्हणणे असे की, मॅनेजमेंट स्टेबल करीत असताना व या तीस विद्यार्थ्यांना प्रवेश देत असताना हा वाटा महाराष्ट्राच्याच वाट्याला आला पाहिजे. तेव्हा जे काही रिझनेबल व रॅशनल असेल त्याबाबत हे तरुण शिक्षणमंत्री निर्णय घेऊ शकतील या उद्देशाने मी हे विचार मांडलेत, माझे उत्तराचे भाषण संपवितो.

❑❑❑

रोजगाराभिमुख नियोजनाची आवश्यकता

(२५ जुलै, १९९१)

सुशिक्षित आणि अशिक्षित बेरोजगारांचा तांडा ही या देशासाठी व राज्यासाठी चिंतेची बाब आहे. सेवायोजन कार्यालयाची क्षमता वाढली पाहिजे पण त्याबरोबरच त्यातील भ्रष्टाचार संपला पाहिजे. तेथील गलथानपणाही संपला पाहिजे. राज्यातील प्रादेशिक निवड मंडळे बरखास्त झाली पाहिजेत. असे या चर्चेत सहभागी होताना श्री. रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेत २५ जुलै, १९९१ रोजी सांगितले. ते चोर, लुटारू, डाकू निर्माण करण्याचे झालेले अड्डे आहेत असा आरोप करून श्री. गवई पुढे म्हणाले की, राज्याने जॉब ओरिएंटेड प्लॅनिंग केले पाहिजे. नियोजन व अर्थसंकल्पाची दृष्टी अशीच आपण ठेवली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेते श्री. नवलकर यांनी मांडलेल्या प्रस्तावाला दुजोरा देण्यासाठी मी उभा आहे. वेळेच्या अभावी सविस्तर विवेचन करणे शक्य नाही, पण नियोजन मंडळाने देशाच्या पातळीवर जो नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यामध्ये असे सांगितले आहे की, गेल्या वर्षी बेकारीचे प्रमाण जे ५.४ टक्के होते ते आता ७.३ टक्के झाले आहे. महाराष्ट्रातही कमी-अधिक प्रमाणात हेच चित्र आपल्याला दिसते. या अहवालामध्ये नियोजन मंडळाने सुशिक्षित आणि अशिक्षित बेकारासंबंधी जी चिंता व्यक्त केली आहे ती भयानक आहे. त्याचे ताशेरे माझ्याकडे आहेत. पण वेळेच्या अभावी मी एवढेच सांगू इच्छितो की, सुशिक्षित आणि अशिक्षित बेकारांचा तांडा ही बाब या देशाला आणि राज्याला चिंतेची बाब आहे असे समजून आपण वागले पाहिजे. सभापती महोदय, उपलब्ध झालेल्या शासकीय आकडेवारीवरूनच मी काही माहिती या ठिकाणी देणार आहे म्हणजे मग उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदय ती कॉन्ट्रॅडीक्ट करणार नाहीत. वर्षारंभी नोंदणी पटावर असलेल्या आणि ९१ मध्ये एस्टीमेटेड केलेल्या माहितीनुसार ३० लक्ष ४१ हजार ८०२ इतकी महाराष्ट्रामधील बेकारांची संख्या आहे. राज्यामध्ये ज्या जागा रिक्त आहेत ज्या १९९१ मध्ये भरल्या जावयाच्या होत्या पण भरल्या गेल्या नाहीत. त्याचा आकडा

१४ हजार ६०० इतका आहे. तिसरे विश्लेषण मी असे करू इच्छितो की, कॉन्स्टिट्यूशनल सेफगार्डमध्ये काही जाती-जमातींना ज्या सवलती उपलब्ध आहेत आणि १९९१ मध्ये एस्टीमेटेड नोंदणी राज्यामध्ये बॅलन्स आहे त्यानुसार ४ लाख ६५ हजार ८३६ इतके शेड्यूल कास्टचे उमेदवार आहेत तर शेड्यूल ट्राईब्जचे ९३ हजार ५८३ इतकी संख्या आहे. सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये प्रायव्हेट सेक्टर, को-ऑपरेटिव्ह सेक्टर, पब्लिक अंडरटेकिंग्ज, स्थानिक स्वराज्य संस्था या सगळ्यांची बेरीज केल्यानंतर सर्व कॅटॅगिरीमध्ये ज्या जागा भरल्या गेल्या नाहीत अशांची संख्या दोन ते तीन लाख इतकी आहे. ही सर्व माहिती आणि हे विदारक चित्र मी राज्य शासनाच्या प्रसिद्ध झालेल्या प्रकाशनामधून आपल्या समोर मांडले आहे, तेव्हा त्यावर शासन काय उत्तर देणार आहे हे मला साधारणपणे अपेक्षित आहे. शासन सांगेल की, संजय गांधी योजना, रोजगार हमी योजना, आय. आर. डी. पी. यातून तयार झालेल्या संख्या आणि देत असलेला तुटपुंजा भत्ता यावर आधारित उत्तर येईल पण यापेक्षा वेगळे उत्तर आले तर ते चांगलेच होईल. सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आय. आर. डी. पी., एन. आर. इ. पी., रोजगार हमी योजना, स्वयंरोजगार योजना यामधून आपण किती तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला याचे मूल्यमापन जर त्यांचेकडे असेल तर ते कृपा करून त्यांनी द्यावे. तसेच राज्यामध्ये जे सुशिक्षित बेकार आहेत. ज्यांना आपण बेरोजगार भत्ता देत आहोत त्यामधून स्वयंरोजगार निर्मिती करेपर्यंत किती तरुण बेकारीमुक्त झाले याचे मूल्यमापन जर शासनाकडे असेल तर तेही देण्याची त्यांनी कृपा करावी. सेवायोजन कार्यालयासंबंधी विरोधी पक्षनेते श्री. नवलकर यांनी जे सांगितले आहे त्याच्याशी मी असहमत आहे. त्याला काही इलाज नाही. कारण सेवायोजन कार्यालय बंद करून चालणार नाही. परंतु ती आहे तशीच राहू द्यावयाची नाहीत. कारण मूळ मुद्दा यामध्ये असा आहे की, भ्रष्ट सेवायोजन चालू ठेवणे बरोबर नाही. आज सेवायोजन कार्यालयाची अशी स्थिती आहे की, त्या ठिकाणी उमेदवाराने नाव नोंदविल्यानंतर त्याला नोकरी मिळते काय? उत्तर नाही. शासनाच्या धोरणाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांचा बॅकलॉग भरून काढण्याचे काम सेवायोजन कार्यालयाकडून होते काय? उत्तर नाही. तेव्हा सेवायोजन कार्यालयाचा गलथान आणि अप्रत्यक्ष भ्रष्ट कारभार हा दुरुस्त करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक सेक्टर, लोकल सेल्फ अॅथॉरिटीज किंवा शैक्षणिक संस्था की ज्यामध्ये नोकर भरतीसंबंधी काही पोटेन्शीयल आहे. परंतु ते तरी नॉर्मस पाळतात काय? राज्यातील को-ऑपरेटिव्ह सेक्टर तपासून पाहिले तर असे दिसून येईल की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना तेथे १ ते २ टक्केही स्थान नाही. सहकार क्षेत्र म्हणजे जवळजवळ संस्थाने झालेली आहेत. आपल्या लहरीप्रमाणे नोकरी लावण्याचा धंदा तेथे चालतो.

अध्यक्ष महाराज, दुसरी बाब अशी की, स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशन हे घटनेप्रमाणे निर्माण झालेले आहे. परंतु राज्य निवड मंडळाला या घटनेशी काही संबंध नाही. पूर्वी एक मंडळ होते आणि आता चार मंडळे झालेली आहेत. या राज्य निवड मंडळांच्या बाबतीत कडक शब्दात सांगावयाचे तर ही सर्व भ्रष्ट मंडळे आहेत. कठीण शब्दात सांगावयाचे तर ही प्रादेशिक निवड मंडळे म्हणजे चोर, खिसेकापू, डाकू आहेत. प्रादेशिक निवड मंडळे निर्माण करून तुम्ही सरळ सरळ उमेदवारांचा कत्तलखाना चालविलेला आहे. त्या मंडळावर कोण आहे? ही निवड मंडळे तुम्ही केवळ राजकीय सोयीकरिता निर्माण केलेली आहेत. राजकीय सोयीकरिता नेमलेली त्यावरील माणसे आहेत. माझी पहिली मागणी अशी आहे की, यापेक्षा प्रशासकीय यंत्रणेतील अपॉईंटींग अॅथॉरिटी असलेली माणसे परवडतील. कारण त्यांना आपण काही तरी जाब विचारू शकतो. तेव्हा माझी पहिली मागणी अशी आहे की, ही प्रादेशिक निवड मंडळे ताबडतोब बरखास्त केली पाहिजेत. चोर, लुटारू, डाकूंचे हे निर्माण झालेले अड्डे ताबडतोब बंद करावेत. मी अत्यंत जबाबदारीने बोलू इच्छितो की, राज्यातील ही प्रादेशिक निवड मंडळे ताबडतोब बरखास्त करण्यात यावीत. तेवढी टीका मी सेवायोजन कार्यालयावर करत नाही. कारण त्यांना जरा लाजशरम आहे. अकाऊन्टीब्लिटी आहे. प्रादेशिक निवड मंडळाचे जे अध्यक्ष आहेत ते कोण आहेत तर कुणा तरी मंत्र्यांचे नातलग आहेत. तेव्हा एका पेनाच्या

फटकाऱ्याने ही प्रादेशिक निवड मंडळे बरखास्त केली पाहिजेत. अपॉईंटींग ॲथॉरिटी ही म्युनिसिपल कमिशनर, कलेक्टर, आयुक्त हे प्रशासकीय यंत्रणेतीलच अधिकारी असले पाहिजे. कारण ते जनप्रतिनिधींना अकाऊन्टेबल असतात. परंतु प्रादेशिक निवड मंडळाच्या अध्यक्षांना काहीच म्हणण्याची सोय नाही. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, चोरांचा अड्डा असलेली ही प्रादेशिक निवड मंडळे ताबडतोब बंद करा. अध्यक्ष महाराज, माझ्यासारख्या माणसाला हे बोलणे बरे वाटत नाही...

एक मा. सदस्य : मग आतापर्यंत बोललात कसे?

श्री. रा. सू. गवई : हा काही फक्त तुमचा, माझा प्रश्न नाही. हा पब्लिक इंटरेस्टचा प्रश्न आहे. २० हजार, २५ हजार रुपये दिल्याशिवाय या ठिकाणी कोणाची निवड होत नाही. मग यासाठी त्रागा करणार नाही तर काय करणार? अकाऊंटींग ॲथॉरिटीला मी म्हणू शकतो की, याला तुम्ही का नोकरीवर घेतला नाही? परंतु राज्य निवड मंडळाला नाही हे विचारू शकत. मग यांना आपण चोर म्हणायचे नाही तर मग काय म्हणायचे? म्हणूनच मला आपल्याला सांगावयाचे आहे की हे चोरीचे अड्डे आपण ताबडतोब बंद करा. याबाबत आपण कृपा करून कॅबिनेटमध्ये चर्चा करा. अशा मंडळांवर इंटिग्रिटीचे, प्रामाणिक असणारे लोक ठेवा आणि फक्त राजकीय सोय न पाहता लोकांची निवड करा.

मला शासनाला विचारावयाचे आहे की, तुम्ही कधी जॉब ओरिएंटेड प्लॅनिंग केले आहे का? ग्रामीण आणि शहरी भागामध्ये जॉब ओरिएंटेड प्लॅनिंग करण्याची गरज आहे. नियोजनाची आणि अर्थसंकल्पाची दृष्टी आपण अशाच तऱ्हेने ठेवली पाहिजे. अशा प्रकारे आपण सल्ला मसलत केलेली आहे का हाच माझा प्रश्न आहे.

❑❑❑

मोवाड पूरग्रस्तांच्या वेदनांना फोडली वाचा

(२ ऑगस्ट, १९९१)

मोवाड या नागपूर जिल्ह्यातील गावाला वर्धा नदीच्या पुराचा मोठा तडाखा बसला. या पुराने असंख्य लोकांचा जीव गेला. या पुरानंतर मिळालेल्या मदतीवरून शासन अकार्यक्षम असल्याचा आरोप करीत श्री. रा. सू. गवई यांनी मोवाडवर कोसळलेली ही विपदा मॅनमेड आहे याकडे २ ऑगस्ट, १९९१ रोजी लक्ष वेधले. या गावाला आतापावेतो १९६१ पासून किती वेळा पुराचा तडाखा बसला याचा हिशेब देत त्यांनी जोगळेकर समितीचा अहवाल विचारात घ्यावा, अशी सूचना केली.

सभापती महोदय, केवळ विदर्भावर नव्हे तर महाराष्ट्रावर एक दु:खाची छाया पसरली आहे. सर्व महाराष्ट्र आणि देश आज दु:खाच्या छायेत वावरत आहे. काल दिवसभर म्हणजे जवळ जवळ सात तास मी त्या भागात पाहणी करीत फिरत असताना एका ठिकाणी पडलो. मिलिटरीच्या लोकांकडून एक टिटॅनसचे इंजेक्शन देखील मी त्या ठिकाणी घेतले. तेथील दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते. तेव्हा तेथील परिस्थितीचे गांभीर्य मी या सदनापुढे मांडत असताना अतिशय गांभीर्याने आणि अगदी द्रवित अंत:करणाने मांडणार आहे. मी पाहिलेली परिस्थिती अगदी पक्षाभिनिवेशरहित, अगदी प्रामाणिकपणे सभागृहापुढे मांडू इच्छितो. याचे पहिले उदाहरण मी सांगू इच्छितो. रोजगार हमी योजनेमध्ये १९७५

पासून १९९१ पर्यंत म्हणजे जवळ जवळ १६ वर्षांपासून अशी तरतूद आहे की, जी गावे पुराच्या वेस्ट झोनमध्ये येतील किंवा जी गावे ज्याला आपण फ्लड ॲफेक्टेड म्हणतो म्हणजे पूरग्रस्त म्हणून जाहीर केली जातात अशा गावांचे अगोदर पुनर्वसन व्हावे किंवा त्या गावासाठी फ्लड प्रोटेक्टेड वॉल असली पाहिजे. अध्यक्ष महाराज, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, अशा प्रकारे १०० ठिकाणी तरी फ्लड प्रोटेक्टेड वॉल बांधून घेतलेल्या आहेत आणि ती सर्व गावे सुरक्षित आहेत. माझ्या गावात अशा प्रकारे २५ ते ३० फ्लड प्रोटेक्टेड वॉल बांधून ती गावे सुरक्षित केलेली आहेत. आणि हे मोवाड गाव अशा प्रकारे १६ वर्षांपासून या फ्लड प्रोटेक्टेड झोनमध्ये आहे. तीस वर्षापूर्वीच हे गाव जाहीर झालेले आहे. ही योजना सुरू होऊन १६ वर्षे झाली तसेच त्या ठिकाणचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी श्री. देशमुख आणि एक्झिक्युटीव्ह इंजिनीयर श्री. जोगळेकर यांनी याबाबतचा आपला अहवाल १९६१ सालीच जाहीर केलेला आहे आणि त्यात असे म्हटले आहे की, हे मोवाड गाव हलविले नाही तर एक दिवस हे गाव संपूर्ण उजाड होईल. अध्यक्ष महाराज, जोगळेकरांचा अहवाल उपलब्ध होऊन ३० वर्षे झाल्यानंतरसुद्धा याबाबत शासनाने काय केले? अध्यक्ष महाराज, पक्षाभिनिवेश विरहित विचार केला तरी हा भाग शासनाच्या अकार्यक्षमतेचाच आहे असे दिसून येईल. अध्यक्ष महाराज, आणखी एक गोष्ट अशी की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी श्रमदानातून तीन किलोमीटर लांबीचा बंधारा या ठिकाणी बांधून घेतला होता. वर्धा नदी ही या ठिकाणी 'एल' या आकाराची आहे. तेव्हा १९५९ साली तुकडोजी महाराजांनी अशा प्रकारे श्रमदानाने मातीचा बंधारा बांधून घेतला. पण त्यापूर्वी ६०-७० वर्षे जेव्हा ब्रिटिशांचे सरकार होते त्यावेळी त्यांनी चुना, रेती, विटा आणि दगड यांच्या सहाय्याने जो या नदीच्या 'एल' आकारावर बंधारा बांधला होता, त्याच्या काठावर राम मंदिर आहे त्या बंधाऱ्याचा एक तुकडासुद्धा पडलेला नाही. राममंदिर सुरक्षित आहे. तीस वर्षांपर्यंत टुमदार सुंदर १०० गावांची बाजारपेठ असलेले असे हे मोवाड गाव आहे. यापूर्वी तीन वेळा मी या गावात जाऊन आलो होतो. अतिशय रमणीय असे गाव आहे. हे रमणीय गाव ॲक्युम्युलेटेड ३० वर्षांच्या शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे उद्ध्वस्त झाले. अध्यक्ष महाराज दोन प्रकार असतात. एक गॉड मेड आणि दुसरा मॅन मेड. आम्ही नि:पक्षपातीपणाने या निर्णयाला आलो आहोत की, हा प्रकार मॅन मेड आहे, गॉड मेड नाही. का तर गेली ३० वर्षे या बंधाऱ्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. मी नाव न घेता या ठिकाणी सांगेल की, हा बंधारा बांधण्याच्या दृष्टीने त्या भागातील जनप्रतिनिधी, काटोल भागात झालेले मंत्री, जे कोणी असतील त्यांनी काय केले? ज्यांच्याकडे काही नसताना खाजगी माणूस शेकडो बंधारे बांधू शकतो आणि यांनी काय केले? काही केले नाही. त्यामुळे लोकांचा प्रक्षोभ आहे. तो जनप्रक्षोभ शमला नाही तो ॲक्युम्युलेटेड आहे. अध्यक्ष महाराज, किती पूर यावेत? १९६१, १९६८, १९७१, १९७५, १९८१, १९८५, १९८९, १९९१ या सालात त्या ठिकाणी पूर आलेले आहेत. १९६१ सालामध्ये जोगळेकर समितीने अहवाल दिला होता की, पुरामुळे हे गाव उद्ध्वस्त होईल. हिरोशिमा शहर बॉंबने म्हणजे दुष्ट प्रवृत्तीने उद्ध्वस्त झाले परंतु हे मोवाड गाव गलथानपणामुळे उद्ध्वस्त झालेले आहे. शासनाच्या अकार्यक्षम ॲक्युम्युलेटेड धोरणामुळे उद्ध्वस्त झालेले आहे. मॅन मेडचे दुसरे कारण असे की, हा बंधारा मातीचा बांधलेला आहे. तुकडोजी महाराजांसारख्या पुण्यवान माणसाने बांधलेला हा बंधारा आहे. हा असाच राहू दिला असता तर या बंधाऱ्यावर गवत, हराळ, झुडपे, झाडे वाढली असती, त्यामुळे त्या बंधाऱ्याच्या मातीची रिटेनिंग कॅपॅसिटी वाढली असती. मातीचे धरण बांधण्याचे धोरण विश्वेश्वरय्या यांनी सुरू केले आणि ते तुकडोजी महाराजांनी अप्रीहेन्ट केले. हा मातीचा बंधारा सुरक्षित होता. त्याची उंची १५ फूट होती व रुंदी १२ फूट होती. बंधारा शक्यतो २० फूट उंचीचा आणि १५ ते १६ फूट रुंदीचा असावा लागतो. यापूर्वी या गावामध्ये अनेक वेळा पूर आले परंतु तुकडोजी महाराजांनी बांधलेल्या बंधाऱ्याने ते अडविले. काही प्रसंगी बंधाऱ्यावरून पूर गेले आणि बंधारा कायम राहिला. फक्त वॉटर फ्लो झाला. यावर्षी

काय घडले? दोन वर्षांपूर्वी हे काम इ. जी. एस.मध्ये देण्यात आले. माझी अशी माहिती आहे की, इ. जी. एस.च्या एजन्सीने हे काम केले नाही तर हे काम कोठल्यातरी लाग्याबांध्यावाल्यांना देण्यात आले आणि इ. जी. एस.चे तत्त्व पायदळी तुडविण्यात आले. इ. जी. एस.चे तत्त्व पायदळी तुडवून हे काम ठेकेदाराला देण्यात आले हा गुन्हा आहे. जेथे इ. जी. एस.मध्ये ८०/९० टक्के अर्थवर्क माणसे करतात तेथे ठेकेदाराला कशाला? तेव्हा त्या ठेकेदाराचे नाव काय? ठेकेदाराची तरतूद इ. जी. एस.मध्ये आहे काय? नसेल तर त्या तरतुदीविरुद्ध हा ठेकेदार येथे घुसविला कोणी? आणि त्यांनी काय केले? दोन वर्षांत नवीन बंधारा तर सोडाच परंतु त्याने पहिल्या बंधाऱ्यावरची झुडपे काढली. खालचे गवत काढले, त्यामुळे रिटेनींग माती संपली आणि या वर्षी या शहाण्याने बंधाऱ्याला पायऱ्या घातल्या. पिचिंग करून गोटे काढले. कोण शहाणा ठेकेदार होता हा? याला कोणी हे काम दिले? काल ना. बाबूजींशी माझी चर्चा झाली. मी त्यांना सांगितले की, संत तुकडोजी महाराजांचा बंधारा कायम राहिला असता तर वॉटर फार तर ओव्हर फ्लो झाले असते परंतु या मूर्ख माणसाने हे काम केल्यामुळे तो बंधारा तुटला. बंधारा दुरुस्तीच्या नावाखाली भ्रष्टाचार करणाऱ्या ठेकेदाराने हे काम कोणाच्या मध्यस्थीने केले? या सर्वांमुळे तो बंधारा तुटला. वर्धेने आपला प्रवाह बदलला आणि प्रवाह मोवाडवरून गेला. अध्यक्ष महाराज, दुर्दशेचे वर्णन मा. विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी केलेच आहे. ते पुन्हा न सांगितलेले बरे. प्रेताचे ढिगारेच्या ढिगारे आजही जमिनीखाली आहेत. ९० वर्षांची एक म्हातारी आई आमच्या सर्वांच्या समक्ष ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आली. तिचे हातपाय हलत होते. तिला ताबडतोब सलाईन दिले. ती आता जिवंत आहे. अध्यक्ष महाराज, हे ढिगारे उपसण्याचे काम जर द्रुतगतीने झाले असते तर कदाचित आणखी ५-५० माणसे जिवंत सापडली असती आपल्याला. ती ९० वर्षांची आई जशी जिवंत सापडली तशी आणखी देखील काही माणसे सापडली असती. मी आजही फोन केला. ती जिवंत आहे. अध्यक्ष महाराज, तेथे दोन-दोन पुरुष गाळ आलेला आहे, आणि संपूर्ण गाव पार उखडून निघालेले आहे. मी गुप्ता नावाच्या माणसाची कथा आपल्याला सांगतो. ३ मजली इमारत होती त्याची. काल मला तो भेटला. रडत होता बिचारा. माणसे आश्रयाला त्या इमारतीमध्ये आली. जसेजसे पाणी वर चढत होते तसतशी माणसे वरच्या मजल्यावर जात होती. जवळ जवळ सव्वादोनशे माणसे वरच्या मजल्यावर उभी होती. काही लोक झाडावर, घरांवर आपला जीव वाचविण्यासाठी उभे होते. अध्यक्ष महाराज, ही ३ मजली इमारत पत्यासारखी कोसळली आणि त्यातील सर्व लोक वाहून गेले, बुडाले. आजही त्या लोकांच्या डोळ्यासमोर ते चित्र दिसते आहे. मोवाड, जलालखेडा, कैरगाव व वर्ध्याच्या पलीकडे अमरावती, गणेशपूर, वरुड या भागांमध्ये २ हजार लोक मेले असतील. अध्यक्ष महाराज, दिब्रूगडला देखील असे कधी घडले नाही. परंतु हिंदुस्थानमध्ये दुर्दैवाने एका मॅनमेड ॲक्शनमुळे २ हजार माणसे मरावी ही अतिशय चिंताजनक बाब आहे. अध्यक्ष महाराज, हे वृत्त आपल्याला कधी समजले? मी त्या खोलामध्ये आता जात नाही. सोमवारी, २९ तारखेला २ वाजता पूर वाढू लागला. ३० तारखेला ४-०० च्या सुमारास पूर गावामध्ये शिरला. अध्यक्ष महाराज, त्या ठिकाणी श्री. इंगळे नावाचे जमादार आहेत. त्यांनी तहसीलदाराला कळविले की, गावात पाणी पसरले आहे पण तहसीलदाराने गांभीर्याने दखल घेतली नाही.

श्री. इंगळे यांच्या घरात सात माणसे होती. त्यांच्या घरातील सर्व माणसे वाहून गेली पण तहसीलदार मात्र त्या ठिकाणी पोहोचले नाहीत. या दुःखद घटनेची बातमी आपण ३० तारखेला रात्री बी. बी. सी.वर ऐकली. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले. जलालखेडा येथील सब इन्स्पेक्टर श्री. जिरापुरे यांनी नागपूर कंट्रोल रुमला ३० तारखेला सकाळी कळविले होते. पण या ठिकाणी सभापतींना आणि अध्यक्षांना बी. बी. सी.च्या बातमीवरून कळले. म्हणजे नागपूर ते मंत्रालय, स्पीकर, चेअरमन, मुख्यमंत्री यांच्यामध्ये कम्युनिकेशन नाही. याला "प्रशासकीय

अकार्यक्षमता" या शिवाय दुसरे काहीही नाव देता येणार नाही. अध्यक्ष महाराज, त्या ठिकाणचे जिल्हाधिकारी श्री. बेगडे हे अस्वस्थ होते. ते आणि त्यांचे दोन-तीन अधिकारी आणि नरखेडचे नगरपालिका अध्यक्ष श्री. गुप्ता ही त्या ठिकाणी पोहोचलेली पहिली माणसे. दिनांक ३१ जुलै रोजी माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले. मीही त्या ठिकाणी गेलो. मी माझ्या तिकिटाने त्या ठिकाणी जाऊन आलो. दिनांक १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्या ठिकाणी ९ तास फिरल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, एक मोबाईल डिस्पेन्सरी व्हॅन सोडली तर त्या ठिकाणच्या लोकांना अन्न नाही, पाणी नाही, निवारा नाही, चादरी नाहीत, सतरंज्या नाहीत, त्या ठिकाणच्या लोकांसाठी काही देण्यात आले नाही. या देशाचे संरक्षण मंत्री त्या ठिकाणी आल्यानंतर काय घडते हे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी सांगितले. त्या ठिकाणी कमीत-कमी २५ गुरे मेलेली दिसली. तसेच २५ कुत्रीही मेलेली दिसली. दुर्गंधी सुटलेली होती. मेलेली गुरढोरे उचलणारे कोणीही त्या ठिकाणी नव्हते. ढिगाऱ्याखाली अडकलेली प्रेते उपसण्याचे काम सुरू नव्हते. हिरोशिमासारख्या प्रवृत्तीने या ठिकाणी दोन हजार माणसांचा जीव घेण्याचा अधिकार कोणालाही दिला नाही. या प्रकाराची रिमोट रिस्पॉन्सिबिलिटी कोणावर जाते? कोणी काय केले हे त्या ठिकाणचे लोक सांगत आहेत. पण मी या सभागृहांमध्ये सांगत नाही, नाव घेत नाही. चौकशीमध्ये जे काही पुढे यावयाचे असेल ते येईलच. अध्यक्ष महाराज १९६१ सालामध्ये या गावाचे पुनर्वसन करावे असा निर्णय घेण्यात आला होता. पुनर्वसन करण्यासाठी ३६ एकर जमीन गावालगत ५ ते १० किलोमीटर अंतरावर ठेवली आहे. त्या ठिकाणच्या वस्तीला मी भेट दिली. त्या ठिकाणी रस्त्याची सोय नाही. १९६१ साली या गावचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मग त्या ठिकाणी तीन मजली, दुमजली दोन शाळा कशा बांधल्या? का बांधल्या? मार्केट कॉम्प्लेक्स केंद्र सरकारच्या मदतीने का बांधले गेले? त्याच ठिकाणी सांस्कृतिक केंद्रसुद्धा का उभारण्यात आले? याला सरकार म्हणतात का? आज या साऱ्या इमारती तेथे जमीनदोस्त झालेल्या आहेत. अध्यक्ष महाराज, आमचे माननीय मुख्यमंत्री तेथे गेले होते. पण दुर्दैवाने सांगावे लागते की, त्यांच्या तेथे जाण्यामुळे लोकांना काहीही सहानुभूती मिळाली नाही. त्यानंतर संरक्षणमंत्री तेथे गेले होते. त्यामुळे काय घडले त्याची आम्हाला माहिती नाही. कारण आम्ही तोपर्यंत तेथून निघून गेलो होतो, आम्हाला दुसऱ्याही गावांना भेट देऊन पाहणी करायची होती. सभापती महोदय, दुसरी चिंतेची बाब अशी की, आणि जिचा उल्लेख माननीय विरोधी पक्षनेते श्री. नवलकर यांनी आताच केला आहे. नागठाणा या तलावातील पाणी सोडण्याचे आदेश पूर्वसूचनेशिवाय स्वतःच्या अधिकारांमध्ये कोणी दिले? याबाबतही चौकशी झाली पाहिजे. आज त्या ठिकाणी दुर्दैवाने तो बंधाराच खचल्यामुळे ते सारे गावच वाहून गेले आहे. कारण नदीचे पात्रच मुळी बदलले गेले. ब्रिटिशांच्या काळात तो बंधारा बांधला होता त्यामुळे नदीचे पात्र बदलले आणि नवीन वर्धेचा पाट झाला. त्यात काल जलालखेड्याचा अर्धा भाग गेला आहे. त्या ठिकाणी जे पोलीस ठाणे आहे तेथे संपूर्ण पाणी झाले होते. सभापती महोदय, त्या ठिकाणी श्री. जिरापुरे म्हणून पोलीस अधिकारी होते, त्यांच्याकडून माहिती घेण्याच्या उद्देशाने आम्ही त्यांना क्रॉस केले. त्यावेळेस त्यांनी आम्हाला अर्धी माहिती दिली की, त्या ठिकाणी हा जो प्रलय झाला त्याची बातमी त्यांनी ६ वाजताच कंट्रोलरूम, नागपूरला दिली होती आणि त्यांनी त्याची नोंदसुद्धा केली होती. त्यांनी त्याचा रेकॉर्ड तयार केला म्हणून त्यांची तेथून ताबडतोब बदली झाली. कोणी केली त्यांची बदली? कशासाठी केली? सभापती महोदय, तेथे सारा गाव म्हणत होता की, या श्री. जिरापुरे यांनी गाव वाचविला पण त्यांनी त्या प्रसंगाचे रेकॉर्ड तयार करून ठेवले ही त्यांची चूक झाली आणि म्हणूनच केवळ त्यांची तेथून तातडीने बदली करण्यात आली. त्यांची ही बदली का करण्यात आली, याचा खुलासा येथे होणे आवश्यक आहे. माननीय सभापती महोदय, मला वाटते माझ्या या म्हणण्याशी माननीय मंत्री श्री. दर्डा हे सहमत असतील की, काल संध्याकाळपर्यंत

त्या ठिकाणी आपण भाकरी पाहिलेली आहे काय? घोंगडी पाहिलेली आहे काय? केवळ तेथे एक मोबाईल डिस्पेन्सरी व्हॅन, एक डॉक्टर आणि एक दोन परिचारक असे लोक तेथे आम्हाला दिसले. बाकी जे कोणी काम करताना दिसले ते केवळ संरक्षणमंत्री येणार म्हणून त्यांच्यासाठी रस्ता तयार करण्यासाठी ते काम करीत होते तेवढेच. या व्यतिरिक्त तेथे अद्यापि काहीही घडलेले नाही. सभापती महोदय, त्या भागातील शेजारची जी गावे आहेत की, जी स्वयंस्फूर्तीने या दुर्घटनाग्रस्त गावाला, गावकऱ्यांना मदत करण्यासाठी तयार आहेत, तेथील गावकऱ्यांना देण्यासाठी तांदळाच्या, पिठाच्या, अन्नाच्या थैल्या घेऊन ती माणसे रस्त्यावर उभी आहेत पण त्यांना कोणतेही वाहन नव्हते त्यामुळे त्यांची मदत तेथे पोहोचू शकत नाही, नव्हती. मी आणि श्री. ग. आ. देशमुख तेथे गेलो तेव्हा ते लोक चिडले होते. मी त्या लोकांना सहानुभूती दाखविली आणि त्यांची मदत या गावच्या लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने मी आमच्या गाडीतून उतरलो. टेम्पो अडविले, एस. टी. अडविल्या, बसेस अडविल्या आणि त्यामध्ये सगळ्यांना बसविले आणि सामान पाठविले. स्वयंपूर्ण रीतीने लोक मदत करीत असताना आपली शासकीय यंत्रणा योग्य प्रकारे काम करीत नसल्यामुळे त्यांना वाहनांची सोय नसल्यामुळे हे मदतकार्य पोहोचू शकत नाही. ज्यांना मदत देण्याची इच्छा आहे. मदतकार्य करण्याची इच्छा आहे, ते लोक मदतकार्य करू शकत नाही. नंतर मी काटोल येथे गेलो. त्या ठिकाणी तहसिलदारांना बोलाविले. पी. एस. आय.ला बोलाविले आणि सांगितले की, आपणाकडे जी जी वाहने असतील त्यामधून भाताच्या, पिठाच्या, भाकरीच्या चुंगळ्या त्या गावात पोहोचवा आणि त्याप्रमाणे हे सामान त्या गावात पोहोचले. परंतु या कामात अतिशय उदासीनता आहे, ही गंभीर बाब आहे. म्हणून मी या बाबतीत जास्त बोलत नाही. अध्यक्ष महाराज, त्या ठिकाणी हे जे घडले आहे ते अत्यंत वाईट आहे. मी उद्यापासून या सभागृहात राहणार नाही. आजच संध्याकाळी मी निघून जाणार आहे आणि या सर्व आपद्ग्रस्त गावांना भेट देणार आहे. जोपर्यंत या सर्व गावांना माझी भेट होणार नाही. तोपर्यंत मी येथे येणार नाही. कारण या ठिकाणी बसण्यास मला रसच वाटत नाही. सगळ्या गावांना भेटी देण्यामध्ये माझे १५ ते २० दिवस जाणार आहे. आपण जे काही घोषित केले त्याचा विचारच करीत नाही. या लोकांना आपण १५ हजार देऊ असे सांगितले आहे. ज्याप्रकारे आपण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करतो, त्याप्रमाणे या पूरग्रस्तांचे पुनर्वसन या शासनाने करावे, अशी माझी पहिली मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, बाबूजींनी चांगली गोष्ट केली आहे. लोकमतमधून रिलीफ फंड जमा करण्याचे त्यांनी ठरविले. श्री. नवलकर व श्री. मनोहर जोशी यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मुठमुठ तांदूळ जमा करण्यास सांगितले आहे. मी माझ्या कार्यकर्त्यांना सांगितले की, भीक मागून सुद्धा आपण सर्व सामान जमा करा आणि या लोकांना तातडीने मदत करा.

सभापती : "केसरी" ने असाच उपक्रम सुरू केला आहे.

श्री. रा. सू. गवई : हा प्रश्न फक्त विदर्भाचा नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा आहे. मानवतेचा आहे. कोकणात जेव्हा भूकंप झाला होता तेव्हा कै. बाळासाहेब देसाई दोन महिने मुक्काम ठोकून होते. जोपर्यंत या लोकांचे पुनर्वसन होत नाही, तोपर्यंत मंत्रालयात येणार नाही असे त्यांनी सांगितले होते. संपूर्ण दोन महिने त्यांनी आपल्या चेंबरला टाळं लावले होते. मी त्यांना साताऱ्याचा नेता मानीत नसून मी त्यांना महाराष्ट्राचा नेता मानतो.

यासंबंधी माझी पहिली मागणी अशी आहे की, हे जे काम आहे ते नेहमीच्या नित्यनियमाने करण्यापेक्षा प्रोजेक्ट अफेक्टेड लोकांना ज्याप्रमाणे सर्व सुविधा दिल्या जातात आणि पुनर्वसन केले जाते त्याचप्रमाणे या लोकांना सुविधा देऊन नागपूर, वर्धा, अमरावती जिल्ह्यामध्ये त्यांचे पुनर्वसन करावे. मृतांकरिता, नातेवाईकांकरिता, बेपत्ता असलेल्या लोकांकरिता, सेन्ससची यादी पहावी त्यावरून समजून येईल की, किती जिवंत होते आणि किती मेले आहेत.

एचबी ११८०—३१

अध्यक्ष महोदय, बॅ. रजनी पटेल यांनी दुष्काळाकरिता मुंबईत खास फंड केलेला होता. त्याप्रमाणे फंड करा असे मा. अर्थमंत्री श्री. रामराव आदिक यांना सुचवित आहेत. २०० कोटी रुपये मुंबईमध्ये जमा करावेत आणि त्यातूनच त्यांचे प्रोजेक्ट अफेक्टेड समजून पुनर्वसन करावे अशी मी मागणी करतो.

❑❑❑

रोहयोतील भ्रष्टाचारांवर संतप्त ताशेरे

(२ ऑगस्ट, १९९१)

रोजगार हमी योजनेत मजुरांना पुरविण्यात येणाऱ्या तुटपुंज्या कामांबाबत रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेत तीव्र नापसंती व्यक्त केली. १५ ऑगस्ट, १९९० पासून रोहयो मजुरांच्या मजुरीतून दीड रुपया कापून घेतला जातो. त्याऐवजी मिळणाऱ्या कुपनातून त्यांना धान्य देणे अपेक्षित होते. पण मजुरांना ज्वारी दिली जात नाही हा भ्रष्टाचार आहे, ही चोरी आहे. या प्रश्नावरून आपण शासनाला न्यायालयात खेचू असा इशारा देत गवई म्हणाले, रोहयोचा पैसा अन्यत्र वळविता येत नाही. असा पैसा वळविला तर गावोगावी फिरून मी जन आंदोलन सुरू करीन.

अध्यक्ष महोदय, मी ह्या निमित्ताने असे विधान करतो की, या राज्यात रोजगार हमी योजनांमधील भ्रष्टाचार अनेक ठिकाणी उघडकीस आलेला आहे. एका समितीने दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार धुळे जिल्ह्यात उघडकीस आणला आहे त्या समितीवर मी देखील होतो. आता देखील धुळे जिल्ह्यात २५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, म्हणजे सुरू आहे. पण ह्या सगळ्यात ह्या रोजगार हमी योजनेवर शासकीय भ्रष्टाचार झालेला आहे. हा भ्रष्टाचार महाराष्ट्र शासनाने केलेला आहे. तो जवळजवळ १००० कोटी रुपयाचा आहे. म्हणून धुळे जिल्ह्यातील डाकू आणि या योजनांमध्ये भ्रष्टाचार करणारे जेवढे भ्रष्टाचारी आहेत तेवढेच भ्रष्टाचारी हे रोजगार हमी योजनाच्या संदर्भात आहे. मा सदस्य श्री. विठ्ठलराव हांडे यांनी काही माहिती यापूर्वी सांगितली आहे. ती मी रिपीट करीत नाही. ह्या योजनेसाठी सात आयटेमवर कर आकारणी केली जाते आणि ह्या योजनेसाठी पैसा उभा केला जातो. या करापोटी येणारे उत्पन्न २८० कोटी ६ लाख रुपये आहे. पण खरी गोष्ट अशी आहे की, यातील २०० कोटी रुपये कराचे उत्पन्न हे गरीब व्यावसायिकांकडून मिळते. २८० कोटी रुपये कराच्या उत्पन्नापैकी २०० कोटी रुपये हे अत्यंत गरीब माणसांकडील कराच्या पैशातून मिळते. आणि ८० कोटी रुपये इतर सर्व लोकांकडून मिळणारे आहेत. चोर तो चोर व वर शिरजोर. शासनाने सांगितले आहे की, शिल्लक असलेले ५२२ कोटी रुपये आम्ही डायव्हर्ट करणार नाही. पण असे विधान करणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असे आहे. सन १९७९ साली रोजगार हमी योजनेसंबंधीचा कायदा झाला. म्हणजे १९७९ ते १९९१ पर्यंत १२ वर्षांत मिळालेल्या कर मॅचिंग ग्रँटचा जो पैसा उरला आहे. तो किती आहे तो ५२२ कोटी रुपये आहे असे सांगण्यात आले. पण ते चुकीचे आहे. मी हिशोब सांगतो. सन १९८९ ते १९९१ पर्यंत रोजगार हमी योजनेवर केलेला खर्च पाहिला तर ह्याच फंडातून नॉन प्लॅनसाठी

शासनाने १००० कोटी रुपयाचा खर्च केला आहे. अर्थसंकल्पाचा भाग नसलेल्या नॉन प्लॅनवर शासनाने १००० कोटी रुपयाचा खर्च केला आहे. अर्थसंकल्पाचा भाग नसलेल्या नॉन प्लॅनवर हा खर्च करणे म्हणजे हा लुटण्याचा प्रकार आहे. मागील वर्षी दिलेले ७० कोटी रुपये हे ऊस बागाईतदारांना ह्याच फंडातून दिले आहेत. म्हणजे गरिबाच्या निढळाच्या घामाचा तो पैसा आहे. व्यवसाय करापोटी जमा झालेला जो पैसा आहे त्यातून आपण ७० कोटी रुपये वाटून टाकले? ही काय तुमची इस्टेट आहे? म्हणजे सासूच्या इस्टेटीवर जावई उदार? ही काय नीती आहे? अध्यक्ष महाराज, दुसरी गोष्ट अशी की, शासन एक नेहमीचे कारण ठोकून देते की मजूर मिळत नाहीत. शासनाचेच आकडे माझ्याकडे आहेत. १९७२-७३ पासून प्रत्येक वर्षी अंदाजे १० लाख ते १८ लाख मजूर आहेत. अगदी १९८६-८७ पर्यंतचे आकडे माझ्याकडे आहेत. पण पुढे मॅनडेज २० कोटीवरून ६ कोटीवर आले. लाईव्ह रजिस्टरमध्ये ज्या मजुरांनी नावे रजिस्टर केलेली आहेत त्यातील ५० टक्के मजुरांना आपण काम देऊ शकलो नाही. शासनाच्याच आकड्यांनुसार मी हे बोलत आहे. मजूर काम मागावयाला आले तर त्यांना आपण काम नाही म्हणून परत पाठवता? आपली अपूर्ण कामांची अवस्था जर आपण पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, आज ४१,००० कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च आता प्रॉडक्टिवही ठरू शकणार नाहीत. अशी अवस्था असताना आपण कामे नाही म्हणता? याचा अर्थ असा की, रोजगार हमी योजनेसाठी आपल्याकडे जो पैसा जमा झाला त्या पैशातून आपण नॉन प्लॅनच्या कामांसाठी खर्च केला. रोजगार हमी योजनेतील पैशाची आपण चोरी केली. आपण उसासाठी ७० कोटी रुपये दिलेत? यासाठी आपण अर्थसंकल्पामध्ये काय तरतूद केली होती? हा पैसा नॉन प्लॅनसाठी वापरण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला? हा खर्च सभागृहासमोर आला का? शासनाने ही चोरी केली आहे की नाही? तेव्हा, अध्यक्ष महाराज, ही अतिशय भयानक बाब आहे. माननीय श्री. वसंतराव नाईक यांनी तयार केलेली ही योजना गरीब माणसासाठी होती, त्यासाठी ठेवण्यात आलेली रक्कम धनदांडगे शेतकरी आणि लुटारू लुटू इच्छितात? आम्ही त्यांना ती रक्कम लुटू देणार नाही. अध्यक्ष महाराज, आणखी एका बाबींचा उल्लेख मला या ठिकाणी करावयाचा आहे. १५ ऑगस्ट १९९० पासून प्रत्येक मजुराच्या रोजंदारीतील दीड रुपया कुपनावर धान्य देण्यासाठी कापून घेण्यात आला आहे. आज याला जवळजवळ वर्ष होत आले. पण गेल्या वर्षांमध्ये कापून घेतलेल्या पैशावर शासनाने मजुरांना ज्वारी दिलेली नाही. याला चोरी म्हणावयाचे नाही तर काय म्हणावयाचे? लक्षावधी रुपये आपण यातून कापून घेतले आणि आपण त्यांना ज्वारी देत नाही? म्हणून मी म्हणतो की हा सर्व भ्रष्टाचार आहे. शासन काय म्हणते? म्हणे श्रमशक्तीतून ग्रामोद्धार. आपण कसला ग्रामोद्धार केला? त्यासाठी पैसा किती खर्च केला? दोन कोटी रुपये, त्यानंतर आली फलोद्यान योजना. परवाच एक लक्षवेधी सूचना आली होती त्या वेळी महसूल मंत्र्यांनी सांगितले की, दोन हेक्टरला आपण सवलत दिली आहे. १० हेक्टरच्या लोकांची बागाईत आपण उभी केली. ती कोणाच्या पैशातून उभी केली? ही सर्व बागाईत सफाई कामगार, चपराशी, लिफ्टमन यांच्या पैशातून उभी केली. याला चोरी नाही म्हणावयाचे तर काय म्हणावयाचे? ही रिफाईंड चोरी नाही, तर दुष्टपणातून केलेली चोरी आहे. तेव्हा, अध्यक्ष महाराज, शासनाच्या या भ्रष्टाचारामध्ये आणि धुळ्याच्या भ्रष्टाचारामध्ये फरक तो काय राहिला? फळबागांच्या योजनेवर आपण किती खर्च केला? २० कोटी रुपये फळबागांवर आणि २५ कोटी रुपये आस्थापनेवर खर्च करण्यात आले. हा अधिकार आपल्याला कोणी दिला? म्हणून मी म्हणतो की, महाराष्ट्र सरकारने या पैशांचा सर्रास भ्रष्टाचार केला आहे. अध्यक्ष महाराज, मी एकाच वाक्यात सांगतो, मी या शासनाला काही दिवसांची मुदत देणार आहे. नाहीतर एकटा श्री. गवई शासनाला न्यायालयात खेचणार आहे. कारण रोजगार हमी योजनेच्या पैशातून शासनाला अन्यत्र खर्च करता येत नाही. त्यासाठी वेळ प्रसंग पडला तर मी गावोगाव फिरेन, जन आंदोलन उभे करीन आणि शासन भ्रष्टाचारी आहे हे एक्झिबिट करीन.

❑❑❑

एचबी ११८०—३१अ

भाग्यदायी योजनेचे उद्दिष्ट अपूर्णच

(७ एप्रिल, १९९२)

महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना म्हणजे विधानपरिषद सभापती वि. स. पागे यांचे चिंतन. वि. स. पागे व रा. सू. गवई ही नावे महाराष्ट्रात एका श्वासात घेतली जातात. १९७४ साली या योजनेची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी केली होती. पण त्या योजनेचे उद्दिष्ट १८ वर्षानंतरही पूर्ण झाले नाही. याकडे रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेत प्रस्ताव आणून लक्ष वेधले.

सभापती महोदय, सुदैवाने एक दशकानंतर या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होत आहे. प्रश्न, उपप्रश्न या विषयावर अनेक वेळा झाले परंतु अशी प्रदीर्घ चर्चा झाली नव्हती. या राज्याच्या सर्वंकष विकासाच्या दृष्टीने मुख्य सूत्र असणारी ही योजना आहे आणि तिची सुदैवाने आज होत असलेली चर्चा ही राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्हावी या उद्देशाने आम्ही सर्वांनी मिळून हा प्रस्ताव दिलेला आहे. ही योजना सुरू करतांना या योजनेचे जनक महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी दिनांक २० डिसेंबर १९७४ रोजी या योजनेसंबंधीचे निवेदन दोन्ही सभागृहांमध्ये नागपूर अधिवेशनात केले होते. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "जलद गतीने वाढती लोकसंख्या, गरजेच्या मानाने रेंगाळणारे अन्नधान्याचे उत्पादन आणि ग्रामीण बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी ही आपल्या अर्थव्यवस्थेची वैगुण्ये आहेत. ग्रामीण भागातील बेरोजगारीने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत जो गंभीर धोका निर्माण केला आहे तो लक्षात घेता राज्यातील रोजगार हमी योजनेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भूमिहीन शेतमजुरांच्या म्हणजेच समाजाच्या तळच्या स्तरावरील संख्येने मोठ्या असलेल्या जनतेच्या हितरक्षणाची दक्षता ही योजना घेते. म्हणून ही योजना राष्ट्रीय महत्त्वाची मानली पाहिजे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४१ मध्ये काम करण्याच्या हक्कासंबंधी निर्देशित तत्त्वांना महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. या मान्यतेचा महाराष्ट्र शासन पुनरुच्चार करते व शासनाच्या वित्तविषयक आणि आर्थिक धोरणाचे मूलभूत उद्दिष्टे म्हणून काम मागणाऱ्याला ते काम देण्याची जबाबदारी स्वीकारते. राज्याची रोजगार हमी योजना ही या देशातील पहिले पाऊल आहे. काम देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली असल्यामुळे या संबंधात सरकारी अधिकाऱ्यांनीही काही कुचराई केल्यास ती कर्तव्यच्युती मानली पाहिजे." अशा अर्थाचे निवेदन ७४ साली कै. वसंतराव नाईक यांनी केले आहे. १८ वर्षापूर्वीच्या योजनेचे उद्दिष्ट कितीही चांगले असले तरीही ते आजतागायत सफल झालेले नाही.अध्यक्ष महाराज, या सभागृहाचे सदस्य नसलेले माझे मित्र मा. नानासाहेब उत्तमराव पाटील यांची मला अतिशय मदत झाली. त्या वेळी मा. पागे साहेब आपल्या या सदनाचे सभापती होते. त्या वेळी मा. कै. वसंतराव नाईक यांनी सांगितले की, या योजनेबाबत सर्व पक्षांचे राजकीय मतैक्य निर्माण करण्याचे काम गवई यांच्याकडे सोपवा. माझे वडील मित्र श्री. उत्तमराव पाटील यांचे या कामी मला मोलाचे सहकार्य झाले. १९७२ साली आम्ही नागपूरमध्ये हा ऐतिहासिक ठराव केला. कोणत्याही राजकीय पक्षाने त्याला विरोध केला नाही. म्हणूनच या योजनेची जबाबदारी जशी शासनाची

आहे तसेच हे सर्व राजकीय पक्षांनी स्वीकारलेले व्रत आहे. महाराष्ट्राच्या गरीब लोकांना जीवन स्रोताचा उगम देणारी, महाराष्ट्राचे नंदनवन करणारी अशी ही रोजगार हमी योजना आहे. " टू शेअर द पावर्टी " अध्यक्ष महाराज, गरिबी वाटून घेणे याला देखील महत्त्व आहे. जसा व्यवसाय कराच्या रूपाने या योजनेमध्ये निधी जमा होतो तसा क्लास वनचा निधी या योजनेसाठी जमा होतो तसाच तो लिफ्टमनचा, आपल्या शरीररक्षकाचा देखील होतो. महाराष्ट्राने पहिल्यांदा हे तत्त्व स्वीकारले की, आम्ही गरीब लोक आमच्यापेक्षा जे गरीब आहेत त्यांना काम मिळण्याच्या दृष्टीने आमचा पैसा कामी कसा येईल हे पाहू. म्हणूनच या योजनेला गरिबांनी दिलेल्या कराचा देखील आशीर्वाद आहे. ही योजना सुरू करताना या योजनेच्या साधन संपत्तीचा विचार करण्यात आला. कायद्यान्वये या साधन संपत्तीचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला. कोणती साधन संपत्ती? व्यवसाय, व्यापार, रोजगार यावरील कर, वाहनांवरील अतिरिक्त कर, विक्रीवरील अतिरिक्त कर, ओलिताखालील क्षेत्र जमिनीचा विशेष कर, नवीन महसुलावरील सरचार्ज या करांद्वारे प्राप्त झालेल्या उत्पन्नाएवढ्या समान प्रमाणात राज्य शासन देखील या योजनेसाठी दरवर्षी मदत देईल असे ठरविण्यात आले. काल दुष्काळावर चर्चा करताना अंदाजे उत्पन्न हे सर्व धरून ३०० कोटी रुपये असे म्हटले आहे. म्हणजे ३०० कोटी रुपये राज्य शासन या योजनेसाठी देईल आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, या योजनेचे पैसे कन्सॉलिडेटेड फंडामध्ये जात नाहीत. कारण या फंडातील पैशांची चोरी करण्याच्या अनेक वाटा आहेत. म्हणून या योजनेसाठी वेगळाच फंड काढलेला आहे. गरिबांनी केलेल्या त्यागातून, गरिबांसाठी केलेली समृद्ध योजना आहे. हिच्याबाबत पुढे मागे कोणाच्याही मनामध्ये पाप आले तर पैशांची चोरी होऊ नये हाच त्यामागील उद्देश आहे. कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, पब्लिक लिटीगेशनमधील कोणत्याही माणसाने तक्रार केली, अर्ज केली की, अमुक अमुक यांनी या योजनेच्या पैशांची चोरी केली तर प्रॉसिक्युशन होऊ शकते एवढी खबरदारी या योजनेबाबत घेण्यात आली आहे. सभापती महोदय, या योजनेवर १९७२ ते १९९१ या कालावधीमध्ये झालेला खर्च आणि झालेली मनुष्य दिवस निर्मिती या संदर्भात मी या सभागृहाला धावती कल्पना देतो. नियोजन विभागाची जी सांख्यिकी माहिती आहे त्या आधारे मी या ठिकाणी सांगत आहे. १९७२-७३ ते १९९०-९१ या वर्षाच्या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेवर २,६३७ कोटी रुपयांचा खर्च झाला असून २३२ कोटी मनुष्य दिवस निर्मिती झाली आहे. पैशाचे जेवढे मूल्य आहे तेवढेच श्रमाचे मूल्य आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वि. ग. हांडे यांनी या सभागृहामध्ये रोजगार हमी योजना निधीचा उल्लेख केला. त्याचप्रमाणे यासंदर्भात विधानसभेत ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांनी उल्लेख केला. रोजगार हमी योजना निधीमध्ये सन १९८५-८६ ते १९९०-९१ पर्यंत विविध कर, उपकर व राज्य शासनाचा वाटा याद्वारे जमा झालेली जी रक्कम आहे त्याबाबतची आकडेवारी माझ्याकडे आहे. साधन संपत्तीच्या ५ मार्गानी जमा झालेली रक्कम १,०४१.४२ कोटी रुपये असून राज्य शासनाचा वाटा १,०४१.४२ कोटी रुपयांचा आहे. अशा प्रकारे एकूण रोजगार हमी योजना निधी २,०८२.८२ कोटी रुपयांचा असून रोजगार हमी योजनेच्या निधीतून झालेला खर्च १,४९५.९२ कोटी रुपयांचा आहे. त्यामुळे निधी व खर्चातील फरक ५८६.९२ कोटी रुपयांचा आहे. याचा अर्थ हे ५८६.९२ कोटी रुपये शासनाजवळ शिल्लक आहेत. तसेच या वर्षीचे ३०० कोटी रुपये आणि शासनाचा वाटा ३०० कोटी रुपयांचा अशा प्रकारे आजमितीला शासनाकडे शिल्लक असलेली रक्कम १,२०० कोटी रुपये होते. हे पैसे आपणास कोणालाही द्यावयाचे असल्यास त्यासंदर्भात अंदाजपत्रकात तरतूद करून नंतरच द्या. तसे केले तर आम्ही त्याला मान्यता देऊ. पण या पैशांतील रकमेची चोरी करून आपण हे पैसे दुसऱ्यांना देऊ नका. हे १,२०० कोटी रुपये कोठे आहेत हे तुम्ही आम्हाला दाखविले नाहीत, तर हे सभागृह असा निष्कर्ष

काढेल की, तुम्ही या रोजगार हमी योजनेच्या निधीतून चोरी केली आहे. या १,२०० कोटी रुपयांपैकी काही रक्कम दुसऱ्यांना उसनी दिली असेल तर आम्हाला तसे सांगा. ही रक्कम कोणाला दिली, कधी परत मिळणार आहे याबाबतची माहिती आपण द्या. अध्यक्ष महाराज, माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणामध्ये त्यांनी १,२०० कोटी रुपयांच्या निधीबाबत खुलासा केला पाहिजे त्याचबरोबर हे पैसे कोठे आहेत हे त्यांनी सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, रोजगार हमी योजना सुरू झाल्यापासून मार्च १९९१ पर्यंत एकूण मंजूर झालेली कामे, त्यापैकी पूर्ण झालेली कामे आणि अपूर्ण असलेली कामे जर आपण पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, एकूण ३४ हजार कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे ३४ हजार कामावरील कोट्यवधी रुपयांचा उत्पादक खर्च हा अनुत्पादक झाला आहे. ३४ हजार कामे अपूर्ण राहिल्यामुळे त्या कामांवर राबविलेल्या श्रमशक्तीचे कोट्यवधी श्रमदिन वाया गेलेले आहेत. त्यामुळे शेतमजूर, मजूर इत्यादीच्या श्रमाची प्रतिष्ठा न वाढता त्याच्या श्रमाची चेष्टा केलेली आहे. अध्यक्ष महाराज, नियोजन विभागाने जी आकडेवारी दिलेली आहे ती आकडेवारी मी या ठिकाणी देत आहे. त्यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार पाटबंधारे विभागाची एकूण मंजूर कामे ३८,६०५ होती त्यापैकी २५,९३१ कामे पूर्ण झाली आहेत आणि १,३६२ कामे अपूर्ण आहेत. त्यानंतर मृदसंधारण व भूविकास खात्याची एकूण १,५५,१६७ कामे मंजूर करण्यात आली होती त्यापैकी १,२८,८३९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत तर ५,०१० कामे अपूर्ण आहेत. त्यानंतर वनीकरण खात्याची एकूण १९,८६४ कामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी १३,३९९ कामे पूर्ण करण्यात आली तर ३,५१४ कामे अपूर्ण आहेत. त्याचबरोबर रस्त्याची एकूण कामे ३१,१०० मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी २०,७९९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत आणि २,१८५ कामे अपूर्ण आहेत. त्याचबरोबर इतर कामे ९,७०७ मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ६,१५७ कामे पूर्ण करण्यात आली तर ७९३ कामे अपूर्ण आहेत.

अपूर्ण असलेल्या कामांना पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रायारिटी देण्याचे ठरविलेले असतांना सुद्धा ३४ हजार कामे अपूर्ण आहेत. त्या कामावरील कोट्यवधी रुपयांचा खर्च वाया गेला आहे त्याचबरोबर या कामावर ज्यांनी निढळाचा घाम गाळला, त्यांच्या श्रमाचा काही उपयोग झाला नाही. ही कामे पूर्ण करण्यासाठी टाइम बाऊन्ड कार्यक्रम आखून ठराविक कालावधीमध्ये ही कामे पूर्ण कशी होतील यासंबंधी मंत्रिमहोदयांनी विचार केला पाहिजे असे मला त्यांना सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. प्र. ना. धारकर या ठिकाणी आता उपस्थित नाहीत. ते जरी उपस्थित नसले तरी मी हे सांगू इच्छितो की, कोकणामध्ये ठरविलेल्या उद्दिष्टाप्रमाणे काम काही पूर्ण झालेली नाही. रोजगार हमी योजनेचे उद्दिष्ट शासनाने ठरवून दिलेले आहे, ते उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही. यासंदर्भात नियोजन विभागाने दिलेली आकडेवारी मी या ठिकाणी सांगू इच्छितो. फलोत्पादन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा रोजगार हमी योजनेच्या कामाशी निकटचा संबंध आहे. कोकण विभागासाठी प्रशिक्षण व भेट योजनेअंतर्गत एकूण लक्ष्य ८,४२६ हेक्टर इतके ठरविण्यात आले होते. प्रत्यक्षात ४,०९७ हेक्टरवर काम झाले. त्यानंतर मृदसंधारणासाठी ४,५७६ हेक्टर उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यापैकी ४,३५६ हेक्टरवर काम झालेले आहे. फलोत्पादनासाठी १,३२० हेक्टर उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यापैकी १,५८४ हेक्टरवर काम झालेले आहे. अशा प्रकारे एकूण १४,३२२ हेक्टरचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते आणि प्रत्यक्षात मात्र १०,०३७ हेक्टरवर काम झालेले आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मी कोकण विभागाची आकडेवारी सांगितलेली आहे. हा कार्यक्रम १९९०-९१ सालातील असून ३१ मार्च १९९१ अखेर कामाची प्रगती मी या ठिकाणी सांगत आहे.

अध्यक्ष महाराज, आता मी नाशिक विभागाकडे वळतो. नाशिकचा बॅकलॉक किती आहे? नाशिक विभागामध्ये आपले उद्दिष्ट २२,२४२ इतके होते पण प्रत्यक्षात १२,०९३ इतकेच झाले. पुणे विभागातील उद्दिष्ट २०,४१२ होते आणि पूर्ती केवळ १५,१९५ इतकी झाली. औरंगाबाद विभागात २५,६३० चे उद्दिष्ट असताना येथे मात्र त्यापेक्षा जास्त म्हणजे ३१,१६१ झाले आहे. अमरावतीमध्ये १६,९७३ उद्दिष्ट असताना केवळ ९,६९६ इतके झाले आहे तर नागपूर विभागामध्ये १२,२०६ उद्दिष्ट असताना २ हजार पूर्ण झाले आहे. म्हणजे औरंगाबाद विभाग वगळता कोठेही आपले उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही आणि त्यातही कोकणचे दुर्दैव तर फारच मोठे आहे. अध्यक्ष महाराज, या फलोद्यानाबाबत कोकणचे जे चित्र आहे ते १९९१-९२ मध्ये फारच भयानक आहे. कोकण विभागातील फलोद्यानासाठी आपण ठरविलेले उद्दिष्ट या वर्षासाठी ठाणे जिल्ह्याला ३५ हजार होते पण केवळ १४ हजार पूर्ण झाले. रायगडमध्ये ३,७०० उद्दिष्ट असताना पूर्ण केवळ १,५०० झाले आहे. रत्नागिरीमध्ये ४,२०० उद्दिष्ट असताना ३,४४६ झाले. सिंधुदुर्गमध्ये ३ हजार उद्दिष्ट असताना २,४७१ पूर्ण झाले आहे. म्हणजे ज्या ज्या भागासाठी जे जे उद्दिष्ट आपण ठेवले होते ते कोठेही पूर्ण केलेले नाही, पूर्ण करू शकला नाहीत. अध्यक्ष महाराज, अपूर्ण राहिलेली जी कामे आहेत त्यासंबंधी रिजनची जिल्हावार आकडेवारी जी उपलब्ध आहे त्यावरून असे दिसते की, कोठेही आपण आपले उद्दिष्ट पूर्ण केलेले नाही. या ठिकाणी आपण जवाहर योजना हाती घेतली. जवाहर विहीर योजना कार्यक्रम हा आपण १९८८ पासून सुरू केलेला आहे आणि दुर्देवाने कोणत्याही विभागात या योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही. या योजनेतून नाशिक विभागामध्ये १९८९ मध्ये आपण १,९५० विहिरींचे उद्दिष्ट ठेवले होते पण केवळ ४१५ चे काम पूर्ण झाले आहे. अमरावतीमध्ये १,००२ उद्दिष्ट घेतले आणि केवळ ७२५ पूर्ण केले. पुणेमध्ये १,८७० चे उद्दिष्ट ठेवले त्यापैकी ५३४ पूर्ण केले, औरंगाबादमध्ये ५२२ उद्दिष्ट असता तेथे मात्र ९८३ कामे पूर्ण केली आहेत आणि कोकणामध्ये १,५३५ लक्ष्य ठेवले असता केवळ २२ कामे झाली आहेत. तर नागपूर येथे १,५७४ लक्ष्य असता २७८ पूर्ण झाले आहे. अध्यक्ष महाराज, जर आपण ठेवलेले उद्दिष्ट कोठेच पूर्ण करू शकत नसाल तर हे उद्दिष्ट ठेवता तरी कशासाठी? हे उद्दिष्ट मग केवळ ऑर्नेमेंटल स्वरूपातच राहते, त्याचे सुख देखील आपणस मिळत नाही. अध्यक्ष महाराज, इजीएसचा जो प्रश्न मी मा. मंत्र्यांना सांगितला त्याव्यतिरिक्त एक जंमत मला सांगायची आहे. या रोजगार हमी योजनेला महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासनाची भाभी बनविली आहे. द्रौपदी म्हटले तरी चालेल पण त्याला कोणी आक्षेप घेईल म्हणून मी "भाभी" म्हटले आहे. नवीन काळातील ही भाभी आहे. कोणीही यावयाचे आणि भाभी म्हणून घेऊन जावयाचे. या योजनेतील पैसा घेऊन जावयाचे. ही मूळ योजना ६०-४० च्या रेशोची आहे. श्रमशक्तीतून गरिबांना ६० पैसे मिळतील आणि ही माणसे गरीब राहणार नाहीत हा या योजनेचा उद्देश होता. मला या ठिकाणी १,२०० कोटी रुपयांची माहिती द्यावयाची आहे. रोजगार हमी योजनेच्या फंडातून तुम्ही तुमच्या खात्याचे कसे पैसे वाचविले आहेत हे देखील मी सांगणार आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. पद्मसिंह पाटील या ठिकाणी आहेत. इरिगेशन डिपार्टमेंटमध्ये चाऱ्या आणि कालव्याचा खर्च रोजगार हमी योजनेमध्ये घेतला आहे. पूर्वी हे काम पाटबंधारे विभागातून केले जात होते. सॉईल कॉन्झरवेशनचे काम हे पूर्वी ॲग्रिकल्चर डिपार्टमेंटकडे होते, हे काम देखील रोजगार हमी योजनेमध्ये आणले आहे. अफॉरेशस्टेनसाठी लागणारा पैसा हा फॉरेस्ट डिपार्टमेंट पूर्वी देत होते आणि हे रोजगार हमी योजनेमधून केले जात आहे. सोशल फॉरेस्ट्रीचे काम रोजगार हमी योजनेमधून केले जात आहे. श्री. शरद पवारांची महत्त्वाकांक्षी फलोद्यानाची जी योजना आहे, त्यासाठी लागणारा ६० टक्के पैसा रोजगार हमी योजनेमधून खर्च होत आहे. मला या

ठिकाणी विनम्रपणे असे सांगावयाचे आहे की, निरनिराळ्या डिपार्टमेंटमधील आपल्याकडील काही कामे रोजगार हमी योजनेमध्ये घालून आपला १० ते २० टक्क्यांपर्यंतचा पैसा वाचविला आहे. आम्ही या वादात यापूर्वी गेलो नाही. काम होत आहे, मजुरांना काम मिळत आहे म्हणून कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतला नाही. परंतु आज याची दखल या सभागृहाला घ्यावी लागत आहे. अत्यंत महत्त्वाची आणि समृद्ध योजना असताना ही योजना इतर खात्यांना पूरक अशी योजना म्हणून ठेवली आहे. मा. सदस्य श्री. हांडे यांनी सांगितल्याप्रमाणे जवाहर योजना, आणि नंतर आलेली जलधारा योजना याचा उल्लेख करावा लागेल. १९८२ ते १९८९-९० पर्यंत एन. आर. इ. पी. आणि आर. एल. इ. जी. पी. या योजना होत्या, नंतर या दोन योजना क्लब करून राष्ट्रीय रोजगार जवाहर योजना आणली. माझ्याकडे या बाबतचे सगळे आकडे आहेत. पूर्वी या दोन्ही योजनांना मध्यवर्ती सरकारकडून पैसा येत होता. आता या दोन योजना क्लब केल्यानंतर जी एकच योजना केली आहे, तिला मध्यवर्ती सरकारकडून ८३३.५८ कोटी रुपये मिळाले आहेत.

सभापती महोदय, १९८२ पासून १९८८ पर्यंत ज्या केंद्रसरकारच्या योजनेला एन. आर. ई. पी. म्हटले होते. ज्या केंद्र सरकारच्या योजनेला आर. एल. ई. जी. पी. म्हटले होते आणि १९९०-९१ पासून जवाहर रोजगार योजना आली. त्यांच्या नावाने तुम्ही आतापर्यंत ८३३ कोटी ५८ लाख रुपये घेतले ते कोठे ठेवले? कसे खर्च केले? याचे उत्तर देखील मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे की, केंद्र सरकारकडून मिळालेले ८३३ कोटी ५८ लाख रुपये ठेवले कोठे? का ते ईजीएसमध्ये क्लब केले? का त्याचा वेगळा हिशेब ठेवून तो केंद्र सरकारकडे पाठविला? "सासरच्या इस्टेटीवर जावई उदार" सभापती महोदय, विरोधासाठी विरोध म्हणून मी सांगत नाही. या सदनामध्ये मंजूर झालेल्या योजनेवर गेल्या १२ वर्षांमध्ये चर्चा होऊ नये ही दुर्देवाची गोष्ट आहे. त्यादृष्टीने आज या ठिकाणी चांगली चर्चा होत आहे. रोजगार हमी योजना समितीचे अध्यक्ष, श्री. पी. के. सावंत असताना रोजगार हमी योजनेच्या व्याप्तीसंबंधीचा त्यांचा पहिला अहवाल आला. त्यानंतर रोजगार हमी योजनेचा शेवटचा अहवाल १९९१-९२ चा आहे. हे दोन्ही अहवाल मुद्दाम सभागृहात घेऊन आलो आहे. या ठिकाणी महसूलमंत्री नाहीत. परंतु या योजनेच्या व्याप्तीसंबंधी श्री. पी. के. सावंत यांनी सांगितले आहे. श्री. पी. के. सावंत यांनी जे सांगितले तेच यात आहे. मी आव्हान स्वीकारतो की, या पुस्तकात नवीन असे काहीही नाही. न्यू बॉटल, ओल्ड वाईन असे आहे. या योजनेच्या सुरुवातीत श्री. पी. के. सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे कामाची व्याप्ती किती आहे? टेरेसिंग, नाला ट्रेनिंग, अँटी वॉटरलॉगिंग, वॉटर ट्रेनिंग, चाऱ्या व पाट काढणे वृक्षरोपणासाठी खड्डे खणणे, तलावातून गाळ काढणे असा सर्वंकष भूविकासाचा कार्यक्रम आहे. सारे जी. आर. तेव्हापासूनचे आहेत मग तो कोणताही असो, फलोद्यान कार्यक्रमाचा असो, श्रमशक्तीचा असो, किंवा भूविकासाचा असो ही संकल्पना अगोदरपासून असताना मोठे पुस्तक काढून त्याची पुनरावृत्ती केली आहे. म्हणजे ही धुळफेक आहे. हे सर्व मा. मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी ठरविले नाही तर ते अगोदरपासून ठरले आहे म्हणून नवीन असे या पुस्तकात काही नाही. या योजनांची अंमलबजावणी नाही. ही योजना दुरुस्त करावयास पाहिजे.

गवई समिती नेमली गेली. त्या समितीने सूचना दिल्या आहेत आणि जे दोष राहून गेले आहेत ते दूर करण्यासाठी, जो भ्रष्टाचार आहे जो पूर्वीही होता आणि आजही आहे आणि जशाचा तसा आहे. भ्रष्टाचार कसा होतो ते मी सांगतो. बनावट वेतनपत्रके, काम झालेले नाही हे दाखवणे, मजूर अस्तित्वात नाही हे दाखवणे, मजूर अस्तित्वात आहेत पण कामावर नाहीत. मजूर व मजुरांची टोळी एकाच वेतनपत्रकात भिन्न ठिकाणी दाखविणे, मजूर व मजुरांची टोळी एकाच

कालावधीत दोन निरनिराळ्या कामावर दाखवणे, कोरे वेतनपत्रक करणे, वेतनपत्रकात दर्शविलेल्या रकमेपेक्षा मजुरांना कमी मजुरी देणे, काम न केलेल्या मजुरांची नावे दर्शविणे.

१९८२ साली गवई समितीने सांगितले आहे की, गावाजवळच्या विहिरी गायब होणे, पाझर तलाव नाहीसे होणे, रस्ते लांबविले गेले. ते सर्व ह्या पुस्तकात दिले नाही. गवई समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नाही. या योजनेत धोरणात्मक बदल झाला नाही. जे दोष आहेत ते वाढत गेले, मोठ्या योजनांमध्ये भ्रष्टाचार झाला. धुळे येथील रोजगार हमी योजनातील कामात भ्रष्टाचार व जिल्हा परिषदेतील श्री. वाघ यांचा भ्रष्टाचार, नाशिकच्या राज्यमंत्र्यांनी केलेला भ्रष्टाचार, औरंगाबादमधील भ्रष्टाचार, मी जे बोलत आहे ते पोटतिडकीने बोलत आहे. यासाठी मी श्रम घेतले आहे. ही महाराष्ट्राची भाग्यदायी योजना आहे ती नियमबाह्य होता कामा नये, पाझर तलाव कोठे गेले? वेतनपत्रके कोठे गेले? हे सांगण्यात मी वेळ घेत नाही.

अध्यक्ष महोदय, मा. महसूलमंत्री छगन भुजबळ यांनी काल मोठ्या दिमाखाने सांगितले की, मजुरांना पगार आम्ही नियमितपणे करतो. १५ दिवसात करतो. काही ठिकाणी आठ दिवसात करतो. या मजुरांचा पगार कसा केला ते नियोजन खात्याने सांगितले आहे. मजूर वाढत आहेत, नाशिक विभागात पाच आठवडे मजुरांना पगार मिळाला नाही. नाशिक जिल्ह्यात १९२ कामाची मजुरी ५ आठवड्याने दिली. अमरावती १६९ हजेरी पटांची मजुरी ५ आठवड्याने दिली, मराठवाड्यामध्ये २७३ कामास ५ आठवड्याने दिली. कोकण १०५ कामास ५ आठवड्याने दिली. नागपूर ३६३ कामांची मजुरी जवळ जवळ ५ आठवड्याने दिली. ५ आठवड्यापेक्षा अधिक आणि १० आठवड्याने मंजुरीचा पगार नाशिक ८१, अमरावती ९३, पुणे ४८, औरंगाबाद ४१, कोकण ३९४, नागपूर ३९५ अशा प्रकारे २-२ महिने मजुरांना पगार दिला नाही. तेव्हा मजुरांचे कुपोषण होईल नाही तर काय? सभापती महोदय, ही आकडेवारी जी सांगितली आहे ती तुमच्याच पब्लिकेशनमधून घेतलेली आहे. २-२ महिने तुम्ही मजुरी देत नाही. कशासाठी हे पाप करता? सभापती महोदय, मी एक मिनिटामध्ये संपवितो. अध्यक्ष महाराज, गैरव्यवहारामध्ये किती रक्कम गुंतली यापेक्षा मजुरांची किती मजुरी बुडाली याला फार मोठे महत्त्व आहे. कारण श्रमप्रधान काम करणाऱ्या व्यक्तींना शासनाने जी किमान मजुरी ठरवून दिली, त्या मजुरीला मजुरांच्या दृष्टिकोनातून काय किंमत आहे, याला जास्त महत्त्व नाही. ती मजुरी बुडाली. परंतु ज्या उद्देशाने राज्य शासनाने योजना सुरू केली ते उद्दिष्ट नष्ट होणार आहे. त्यामध्ये गैरव्यवहाराची रक्कम आणि गैरव्यवहार करतांना मजुरांना काम न मिळू शकल्याने त्याचे चोरीस गेलेले श्रम दिवस याचा गंभीर विचार करावा लागेल. मजुरांचे श्रम दिवस चोरीस जातात त्याचे काय? सन्माननीय सदस्य श्री. हांडे यांनी सांगितले १९७२ च्या दुष्काळामध्ये मजुरांना १ किलो गहू देत होते. तेव्हा तुम्हाला का देता येऊ नये? आज धान्याचा दुष्काळ आहे. या गोष्टीचा आपल्याला विचार करावा लागेल. याकरिता वेजेस देताना किमान एक किलो धान्य त्या मजुरांना देता आले पाहिजे. अध्यक्ष महाराज, बाळासाहेब सावंत अध्यक्ष असताना, पागे चेअरमन असताना काँग्रेस गवत, गाजर गवत, काढण्याचे काम आम्ही रोजगार हमी योजनेमध्ये घेतले, रोजगार हमी योजनेमधून १५ किलोमीटरचा रस्ता मालवणपासून दत्ता सामंतच्या गावापर्यंत नेला. तेथील लोक म्हणतात, दत्ता सामंत आमच्या गावचा नाही, गवई आमच्या गावचे आहेत. अध्यक्ष महोदय, समुद्राच्या किनाऱ्यावर लाटेने तेथील जमीन वाहून जात असेल तर ते दुरुस्तीचे काम रोजगार हमी योजनेमध्ये का येऊ शकत नाही?

❑❑❑

विदर्भाचा असमतोल व मागासलेपणा

(३० नोव्हेंबर, १९९२)

१९९२ च्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेते अण्णा डांगे यांनी विदर्भाचा असमतोल व मागासलेपणा दूर करण्याबाबतचा प्रस्ताव विधानपरिषदेत मांडला होता. नागपूर अधिवेशनाला साजेसा असा हा विषय होता. आम्ही राज्याच्या हितासाठी समजूतदारपणा दाखविला, ज्या लोकांना आम्ही मोठे भाऊ मानले ते मोठे भाऊ इतके पापी, करंटे निघतील अशी कल्पना नव्हती. अशा घणाघाती टीकेने आपल्या भाषणाला रा. सू. गवई यांनी प्रारंभ केला. ते पुढे म्हणाले, किमान पापक्षालनासाठी तरी आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्या.

केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण म्हणतात, मला कुणी हा प्रश्न नीट समजावून सांगितला नाही. पण यात विदर्भाचा काय दोष आहे. असा सवाल रा. सू. गवई यांनी केला.

अध्यक्ष महाराज, सर्व प्रथम या प्रस्तावाचे प्रवर्तक विरोधी पक्षनेते माननीय श्री. अण्णा डांगे यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. कारण नागपूरच्या या अधिवेशनात पहिल्याच दिवशी अगदी साजेसा, शोभेचा, योग्य आणि युक्त असा प्रस्ताव त्यांनी या ठिकाणी आणलेला आहे. आणि दुसरे अभिनंदन यासाठी करतो की, त्यांनी आपल्या भाषणाच्या उत्तरार्धातील २-३ मुद्दे सोडले तर अत्यंत अभ्यासपूर्ण असे भाषण केलेले आहे आणि त्यामुळेच त्यातील मुद्यांची पुनरावृत्ती करण्याची गरज नाही. अध्यक्ष महाराज, वस्तुस्थिती अशी आहे की, सर्व दृष्टीने संपन्न की ज्याला खऱ्या अर्थाने सुजलाम, सुफलाम म्हणता येईल, ज्याचे वर्णन करता येईल अशी जमीन, डोंगर, पाणी आदीपासून ते मोठ्या प्रकल्पापर्यंत, ज्यात व्याघ्र प्रकल्पासह जलविद्युत प्रकल्प समाविष्ट आहे तसेच औद्योगिक दृष्ट्याही आवश्यक असे रॉ-मटेरिअल ज्या ठिकाणी आज मोठ्या प्रमणाणात उपलब्ध आहे त्या विदर्भाच्या इतक्या चांगल्या सुजलाम सुफलाम संपन्न प्रदेशाची अशी आवदसा का? तर तुम्ही अधिक हितासाठी, राज्याच्या हितासाठी समजूतदारपणा दाखविला आणि ज्या लोकांना मोठा भाऊ म्हणून समजलो, मानले ते मोठे भाऊ एवढे करंटे आणि पापी निघतील व आमच्याशी इतक्या दुष्टपणाने वागतील याची आम्हाला कल्पनाच नव्हती अशी खंत आज आमच्या मनी आहे. अध्यक्ष महाराज, माझे म्हणणे इतकेच आहे की, या पापाचे क्षालन करण्यासाठी आज आमचे हे म्हणणे शासन पक्षाने किमान ऐकून घ्यावे. अर्थात यामध्ये आमचा दोष नाही, सज्जनपणाने महाराष्ट्र राज्याच्या अधिक हितासाठी आम्ही आमचे तात्पुरते हित बाजूस सारून, मग हा विदर्भ असो वा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील मंडळींना मोठा भाऊ समजून तुमच्यावर विश्वास टाकला पण तुम्ही आमचा विश्वासघात केला, ही गोष्ट सत्य आहे. अजूनही आमच्या मनात तुमच्याबद्दल नाराजी

नाही. तुमचे आमचे वैर नाही पण जी गोष्ट केली आहे ती नाकारून चालणार नाही. अर्थात विरोधी पक्षनेत्यांनी येथे यासंबंधात केलेले भाषण एक प्रबंधच आहे. त्यामुळे मी त्या संदर्भात काही बोलत नाही पण मी सुरुवात अशी करतो की, डॉ. दांडेकर यांनी १९८४ सालामध्ये जो दंडक घालून दिला त्याबद्दल जरूर वाद होते की तो अहवाल स्टॅण्डर्ड नाही म्हणून. पण कोठे ना कोठे तरी आपण दंडक म्हणून मान्य केले पाहिजे की नाही? म्हणूनच केवळ डॉ. दांडेकरांचा अहवाल आम्ही त्या संदर्भात दंडक म्हणून मान्य करतो. त्यात त्यांनी १,४०० कोटींचा विदर्भाचा, ९०० कोटी मराठवाड्याचा आणि ४०० कोटी कोकणचा बॅकलॉग असल्याचे सांगून तो भरून काढणे आवश्यक असल्याचे सांगितले. आणि त्यांचा तो अहवाल स्वीकारून आपण ती जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. पण आम्हाला राग याचा आहे की, आम्ही तुमचा दोस्ताना स्वीकारला पण तुमच्या मनात आमच्याबद्दल दुष्टबुद्धी आहे, आमचा विकास पूर्णपणे तुम्ही करून इच्छित नाही. अध्यक्ष महाराज, डॉ. दांडेकरांनी स्वतः सांगितलेले आहे की, मी जो अहवाल दिलेला आहे तो मला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे दिलेला आहे. यामध्ये त्यामुळेच मला बरोबर रस्त्यांचा बॅकलॉग काढता आला नाही, त्यानंतर आम्ही त्यांना एस्टिमेटेड प्रोजेक्टस् दिले पण त्यानंतर त्याचे परफॉर्मन्स काही दिला नाही त्यामुळे त्यांना नीट बॅकलॉग काढता आला नाही. हे सारे वजा केल्यानंतर सज्जन माणसाच्या भूमिकेतून विदर्भातील जनतेने म्हटले की, विदर्भाचा १३ ते १४ हजार कोटी रुपयांचा बॅकलॉग भरून काढा. मराठवाड्यातील जनतेने म्हटले की, एक हजार कोटी रुपयांचा बॅकलॉग भरून काढा. कोकणातील जनतेने म्हटले की, पाचशे कोटी रुपयांचा बॅकलॉग भरून काढा, तर यामध्ये या जनतेचे काय चुकले? दांडेकरांनी सांगितले होते की, हा बॅकलॉग सातव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी संपण्यापूर्वी भरून काढावा लागेल. आज याबाबतची काय स्थिती आहे? पूर्वीचा बॅकलॉग भरून निघालाच नाही तर नवीन बॅकलॉग निर्माण झालेला आहे. दांडेकर समितीने पाटबंधारे, उद्योग, रस्ते, शेती या बाबतीत असे सांगितले की, सर्वसामान्य योजना चालू राहाव्यात. तसेच उपलब्ध रक्कमेच्या १५ टक्के रक्कम ही प्रगत जिल्ह्याकरिता खर्च करावी आणि ज्या जिल्ह्याचा अनुशेष भरला गेलेला नाही, त्या जिल्ह्याकरिता ८५ टक्के रक्कम खर्च करावी. जो तळातील जिल्हा आहे, त्याला आपण अप्रगत, जिल्हा म्हणतो आणि ज्या जिल्ह्यांचा बॅकलॉग भरून निघाला आहे, तो विकसित जिल्हा समजला जातो. परंतु या ठिकाणी आपण इमानदारी दाखविली आहे काय? १९८२ ते १९९० चा कालावधी सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये येतो. १९८२ ते १९९० या कालावधीत विदर्भासाठी तसेच मागासलेल्या भागासाठी किती रकमेची तरतूद करण्यात आली होती. हे आपणाला माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात पहावयास मिळेल. अनुशेष दूर करण्यासाठी जेवढ्या रकमेची तरतूद करावयास पाहिजे होती तेवढ्या रकमेची तरतूद केलेली नाही. विदर्भातील सर्व जिल्ह्यासाठी सिंचनासाठी जी तरतूद केली होती, तेवढी कोल्हापूर, सोलापूर आणि नांदेड जिल्ह्यासाठी खर्ची टाकलेली आहे. आपण जे धोरणात्मक ठरविले होते, तेवढेही केले नाही.

अध्यक्ष महाराज, विदर्भातील जनतेने गरिबीत समाधान मानले आहे. विदर्भाचा विकास करीत असताना आम्ही आमच्या येथे इम्बॅलन्स निर्माण केलेला नाही. नरखेड, वणी, दर्यापूर या ठिकाणी पाहिले तर आपणाला असे दिसून येईल की, सर्वच जिल्हे सारखे आहेत. परंतु पुणे जिल्ह्यातील खेड आणि बारामती तालुक्याकडे पाहा. दोन तालुक्यांमध्ये किती भयानक अंतर आहे? तसेच सांगली जिल्ह्यातील

कवठेमहांकाळ तसेच सांगली तालुका पाहा. त्याही दोन तालुक्यांमध्ये भयानक अंतर आहे. आम्ही यामध्ये समाधानी आहोत की, आमच्या येथील सर्वच तालुके सारखे आहेत, सर्वत्र समतोल आहे,

अध्यक्ष महाराज, विभागीय असमतोल दूर करण्याचे आपण ठरविले होते. माननीय श्री. सुशीलकुमारजी शिंदे येथे नाहीत. ते काँग्रेस कमिटीमध्ये गेले आहेत. ते मंत्री असताना त्यांनी खालच्या सदनामध्ये असे सांगितले होते की, आता नियोजन करीत असताना तालुका हा घटक समजला पाहिजे. दांडेकर समितीने प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे सांगितले होते. परंतु पुणे जिल्ह्याची परिस्थिती पाहा. एका बाजूला प्रगत तालुका आहे तर दुसऱ्या बाजूला अप्रगत तालुका आहे. खेड तालुक्याची परिस्थिती अशी आहे की, तेथे रस्तेही नाहीत. त्या तालुक्यापेक्षा आमच्या वणी, पांढरकवडा, पुसद तालुक्यांची परिस्थिती बरी आहे. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुका अप्रगत राहिला आहे. अविकसित राहिला आहे आणि दुसऱ्या बाजूला सांगली तालुका इतका प्रगत झाला आहे की, त्या ठिकाणी वॉटर लॉगिंग होऊ लागले आहे. १० हजार एकर इतकी जमीन यामुळे खराब झाली आहे. विरोधी पक्षनेत्यांच्या सांगली जिल्ह्याची ही परिस्थिती आहे. या लोकांनी विदर्भालाच लुटले असे नाही तर मराठवाडा, कोकणला लुटले आहे. इतकेच काय पण खेड, कवठेमहांकाळ, माण आणि खानापूर या तालुक्यांनाही लुटले आहे. या तालुक्यापेक्षा आमच्या विदर्भातील तालुक्यांची परिस्थिती बरी आहे. आपणाला जर विकासच करावयाचा नव्हता तर दांडेकरांनी दिलेला रिपोर्ट कशाकरिता स्वीकारला. त्यावेळीच आपण सांगावयाला पाहिजे होते की, दांडेकर अहवाल मान्य नाही. त्यांनी दिलेले निष्कर्ष आम्हाला मंजूर नाहीत. दांडेकरांनी जे ॲलोकेशन दाखविले होते, ते चुकीचे आहेत.

सभापती महोदय, याबद्दल आम्ही आतापर्यंत जेवढे पेशन्स ठेवले होते की, दुर्दैवाने ते आम्हाला आता रोखता येत नाहीत. आज धुळे नगरपालिकेच्या प्रश्नासंबंधी चर्चा करण्यात आली. त्यावेळी धुळ्याच्या नगरपालिकेमध्ये चोरडीया कुठले असा प्रश्न निघाला? ते एका पक्षाचे पुढारी आहेत. ते म्हणाले की, अमरावतीला वेगळा न्याय आणि धुळेला वेगळा न्याय का देता? सकृद्दर्शनी जणूकाही अमरावतीवर राज्यकर्ते, मा. श्री. सुधाकरराव नाईक, श्री. जवाहरलाल दर्डा हे फार मोठी मेहरबानी करतात? श्रीमती वसुधाताई या लहान आहेत, उपमंत्री आहेत त्या अजून राज्यमंत्री झालेल्या नाहीत. सभापती महोदय मला बोलता येत नाही. आता डिवाईस कळल्यानंतर मी माझ्या मित्रांना कसे कॉंट्रॅडिक्ट करू? खरे म्हणजे २७ तारखेला लोकमतने स्पेशल बुलेटिन काढले. त्यामध्ये सरकारने वर्षभरातील किती अभिवचने पुरी केली याचा कॅटलॉग दिला आहे, तो मी आणला आहे परंतु तो वाचून दाखविणे बरोबर नाही. मी तो पाठ केला आहे. या अधिवेशनाच्यापूर्वी २७ तारखेला मा. श्री. सुधाकरराव नाईक यांनी कॅबिनेट मीटिंग घेऊन काय काय अभिवचने पुरी केली याचे वर्णन दिले आहे.

अमरावतीची महानगरपालिका आम्हाला नको हे आमच्या अमरावतीचे मोठे नेते, विदर्भाचे नेते श्री. पी. के. देशमुख यांनी सांगितले. आमची अमरावतीची ''क'' वर्ग नगरपालिका ठेवा. तुम्ही अमरावतीला डिव्हिजनल हेडक्वॉर्टर केले. म्हणून त्या कारणांसाठी अमरावतीची कॉर्पोरेशन केली. साठे कमिशनने आणि रामरावजींच्या कमिटीने सांगितले की, अमरावती महानगरपालिका करता येत नाही. ती करायची असेल, ओझे झेपायचे असेल तर तिला ''अ'' वर्ग नगरापालिकेप्रमाणे अनुदान द्यावे. जेव्हा आम्हाला विनाअनुदानाचे पाणी दिले तेव्हा पाणी देण्याचे काम बोर्डाचे

होते. बोर्डाला पैसे दिले म्हणजे काय? सरकारचे पैसे दिले, ते आम्हाला कुठे माफ केले? बोर्डाला माफ केले. आता वर्धा जिल्ह्याचा प्रश्न घ्या. त्या ठिकाणी रोजगार हमी योजनेवर मजूर येत नाहीत. जवळ जवळ ८० करोड लोकांचा डेव्हलपमेंट प्लॅन पडलेला आहे. गडचिरोली, चंद्रपूर, मेळघाट हा सारा फॉरेस्ट बेल्ट ओरिएंटेड आहे. या आदिवासी जिल्ह्याचा काय विकास केला? काल मी मा. मुख्यमंत्र्यांच्या चर्चेत गंमतीने म्हटले की, रिंग रोड काढला. रिंग नाही आणि रोडही नाही, रिंग गोल असते, ऑटो रिंग नाही. १३६ पोरे या रिंग रोडच्या अभावी मेली. नागपूरच्या पिण्याच्या पाण्याची समस्या जशीच्या तशीच कायम आहे. तेव्हा हा रिंग रोड कधी होणार आहे? आम्ही जर विदर्भातील आयडेंटिकल प्रश्न मांडले तर बुलढाण्याचे प्रश्न सर्वात महत्त्वाचे आहेत. मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्याचा नंबर दोन आहे. बुलढाण्याला न्याय कधी मिळणार आहे? विदर्भाच्या ९ जिल्ह्यांचे आयडेंटिकल प्रॉब्लेम आहेत. हे प्रॉब्लेम डील करताना पश्चिम महाराष्ट्रातील एखाद्या जिल्ह्याचा प्रश्न आला तर माननीय सभासदांना माझी कृपा करून विनंती राहील की, आयडेंटिकल प्रश्नामध्ये असणारा अनुशेष दूर करण्यासाठी अनप्लिझंट चर्चा केली व काहीतरी निष्कर्ष केले. उदा. १० टक्के वर्गणी सर्वांना माफ करा. परंतु दोन्हींचे कंपेरिझन करताना आम्हाला दररोज दुःख होते की, आमचे कुठेतरी दुखत आहे की काय? आम्हाला डागण्या तर दिल्याच आहेत. केंद्रीय गृहमंत्री मा. श्री. शंकरराव चव्हाण इथे आले होते तेव्हा आम्ही त्यांना भेटायला गेलो. ते म्हणाले, अमरावतीचे काय काम आहे? मी पानाचा डबा काढला आणि म्हटले की, शंकरराव तुम्ही प्री ऑक्युपाईड आणि प्री कन्विन्सड असाल तर कशासाठी बसावयाचे? तेव्हा ते बसा म्हणाले. तेव्हा मी त्यांना समजावून सांगितल्यानंतर म्हणाले की, हे मला कुणी समजावून सांगितले नाही. तुम्हाला समजावून न सांगण्यात माझा दोष काय? म्हणून विदर्भाच्या विकासाच्या प्रश्नाच्या बाबतीत ज्यांच्याशी आम्ही दोस्ती केली, मैत्री केली, विश्वास संपादन केला त्यांनीच आमच्याशी विश्वासघात केला हे निर्विवाद आहे. तुम्हाला असे वाटते की, लाटेवर बसावयाचे आणि निघून जायचे, तुम्हाला विदर्भात मिळतील, तुमच्या हाताखाली आम्ही काम करू. परंतु त्यामुळे आयडेंटिकल प्रश्न मिटणार नाहीत. तुम्ही मुंबईसह विदर्भ देता का? विदर्भाची राजधानी मुंबई करतो, तुम्ही तयार आहात काय? त्याकरिता बॅकलॉग आणि संतुलनाची गरज नाही. विदर्भ स्वतंत्र करा, मुंबई राजधानी करा, मुंबईसह विदर्भ घ्यायला तयार आहोत. नाव सोनूबाई हाती कथलांचा वाळा. आमच्याजवळ पोटेंशियल आहे, इन्फ्रास्ट्रक्चर आहे, पैसे कोठे आहेत? ते कोठून देणार? त्या ठिकाणी तुम्ही बेईमानी करू नका. तुम्ही विदर्भ डेव्हलपमेंट बोर्ड करण्याचा निर्णय घेतला, विदर्भ देण्याच्या घेतला नाही. माझ्यासारख्या माणसाला आजची स्थिती अनुकूल वाटत नाही. कुठे सुई टोचल्यानंतर देशात विघटन होईल, म्हणून हा विषय मला बरा वाटत नाही. राजकारणासाठी तो बरा वाटतो पण कमीतकमी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचे कबूल केल्यानंतर त्याची तयारी आहे की नाही? ह्या प्रश्नास विलंब लावला तर काही मंडळी स्वतंत्र विदर्भाची मागणी करण्यासाठी आंदोलन करतील त्यास विरोध करता येणार नाही. आमच्या प्रश्नासाठी आम्ही इकडे भांडायचे, आपापसात भांडण करणे संयुक्तिक होणार नाही.

❑❑❑

राज्यपालांचे अभिभाषण

(१८ मार्च, १९९३)

राज्याचे राज्यपाल दरवर्षी पहिल्या अधिवेशनाला संबोधित करतात. १९९३ मध्ये तसेच झाले. नेहमी प्रमाणे त्यांच्या अभिभाषणाची सुरुवात १९९३ मधील या पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे या वाक्याने झाली. त्यावर परिषदेत बोलताना श्री. रा. सू. गवई यांनी त्यांच्याबद्दल आदर ठेवीत आक्षेप व्यक्त केला. ६ डिसेंबर, ते १६ डिसेंबर, १९९२ व ६ जानेवारी ते १५ जानेवारी, १९९३ या काळात महाराष्ट्रात प्रशासन नव्हते. जंगल राज होते तरी मा. राज्यपालांना आनंद होतो त्याचे मूळ प्रतिपादन हे ब्युरेक्रसी व रेड टेपिझमचे प्रतीक आहे, यात बदल करावा असे सुचविताना श्री. गवई म्हणाले, या वर्षी झालेली दंगल, बॉम्बस्फोट या घटनानंतर तरी दोन ओळीचा प्रारंभिक उल्लेख करीत अशा दुःखद पार्श्वभूमीवर हे अभिभाषण करीत आहे अशी सुरुवात केली असती तर विवेकबुद्धी त्यांनी वापरली हा अनुभव आम्हाला आला असता.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना राज्यपालांसंबंधी आणि त्यांच्या पदासंबंधी आदर ठेवून ब्युरोक्रसी आणि रेड टेपिझम भाषणे कशी तयार करतात. याचा नमुना मा. राज्यपालांच्या अभिभाषणाच्या सुरुवातीस दिसून येतो. त्यांनी म्हटले की, "राज्य विधानमंडळाच्या १९९३ मधील या पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे." अध्यक्ष महाराज, हे रूटीन वाक्य आहे. पण या वर्षी झालेली दंगल, राज्यपालांचे भाषण होण्यापूर्वी झालेला बॉम्बस्फोट यांचे दोन ओळींचे वर्णन केले असते की, अशा दुःखद परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एक संसदीय आवश्यकता म्हणून हे अभिभाषण आपल्या समोर मी करीत आहे. सभापती महोदय, मी हे सांगितले की, केवळ रेड टेपिझम आणि रुटीझम हे कधी ना कधी रॅशनिंग थिंकिंगने राज्यपालांचे अभिभाषणाचे महत्त्व ठेवून यासंबंधाने विवेकबुद्धी वापरावयास पाहिजे होती, ती वापरली नाही. त्यामुळे सर्वप्रथम यासंबंधाने मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी या ठिकाणी राज्यातील कायदा व सुव्यवस्था संबंधाने भाषण करणार नाही. ते एवढ्याच कारणाकरिता की, यासंबंधीची स्वतंत्र चर्चा व्हावयाची आहे. पण मी याचे वर्णन असे करीन की, ६ डिसेंबर ते १३ डिसेंबर आणि ६ जानेवारी ते १५ जानेवारी या कालखंडात महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ प्रशासनच नव्हते असा जाणीवपूर्वक मी उल्लेख करू इच्छितो. नुसते प्रशासनच नव्हे तर It was a law of jungle and barbarism असे म्हटले तर अतिशयोक्ती नव्हे. What we Exbibited ? कोण कोण याला जबाबदार आहे?

ते जेव्हा मी भाषण करीन तेव्हा सांगेन. परंतु एक प्रकारे आपण किती अन्‌सिव्हिलाईज्ड आणि अन्‌कल्चरल्ड आहोत याचे एक्झिबिशन या कालखंडात जगाला पहावयास मिळाले एवढाच यासंबंधाने उल्लेख करून मी दुसऱ्या विषयाकडे वळू इच्छितो.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीचा उल्लेख करून आणि पूर्वी सांगितले होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी निमित्ताने एकही गाव पिण्याच्या पाण्याशिवाय राहणार नाही, प्रत्येक गावात पाणी मिळेल. मुहूर्त चांगला नेमला होता. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा मुहूर्त या निमित्ताने होत असेल तर हरकत नाही. तोही साधा पण जन्मशताब्दीचे हे जवळ जवळ तिसरे वर्ष पूर्ण होत आहे, परंतु दुर्दैवाने म्हणावे लागेल की, स्वतःला पुरोगामी समजले जाणारे महाराष्ट्र राज्य यांनी या जन्मशताब्दी वर्षात काहीही काम केलेले नाही. इतर राज्यांच्या तुलनेने म्हणजे दक्षिणेकडील राज्य किंवा इतर राज्ये त्यांनी ज्या भरीव योजना केल्या येथे एकच काम आहे की, या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाङ्‌मय प्रसिद्ध केले, परंतु त्याचा जन्मशताब्दीशी काही संबंध नाही. हे काम सुरुवातीपासून सुरू आहे. ज्या महापुरुषाचा जन्म या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये झाला त्यांच्यासंबंधी आदर व्यक्त करण्याची कृती या महाराष्ट्र शासनाने अजिबात केलेली नाही याचा उल्लेख मी जाणीवपूर्वक करीत आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काही तीर्थक्षेत्रांचा उल्लेख केलेला आहे. या ठिकाणी आमचे मित्र श्री. शिवाजीराव शेंडगे साहेब बसले आहेत. पंढरपूरचा विठोबा, आळंदी, नाशिक, शिर्डी ही तीर्थक्षेत्रे आहेत. त्या बाबतीत ठीक आहे पण मुंबई येथील चैत्यभूमी आणि नागपूर येथील दीक्षाभूमी आहे त्या ठिकाणी तीर्थक्षेत्रांच्या तुलनेने जास्त लोक जमतात. ज्याप्रमाणे तीर्थक्षेत्रांचा उल्लेख केला त्याप्रमाणे दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीचाही उल्लेख करावयास हवा होता. ज्याप्रमाणे तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी सुविधा निर्माण केल्या आहेत, हजारो कोटी रुपये खर्च केले आहेत त्याप्रमाणे दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीच्या ठिकाणीही सोयी केल्या पाहिजेत. याबाबत अनेक वेळा जाहीर करण्यात आले आहे. पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याचा उल्लेखही केलेला नाही. त्या भाषणामध्ये चैत्यभूमीचा उल्लेख केला आहे पण तो म्हणजे सासऱ्याच्या इस्टेटीवर जावई उदार अशा प्रकारचा आहे. त्या ठिकाणी म्हटले आहे की, मुंबई महानगरपालिका त्याचे सौंदर्यीकरण करील. मग हे अभिभाषणामध्ये द्यावयाची काय गरज आहे? महानगरपालिका आपले काम करते आणि त्याचे श्रेय तुम्ही घेता. या सभागृहामध्ये माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, नागपूर येथील दीक्षाभूमीवर आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे कदाचित जगातील आठवे आश्चर्य ठरावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक प्रगतीपथावर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचा मी अध्यक्ष आहे आणि मी हे काम करीत आहे. आतापर्यंत शासनाने आम्हाला मदत केली आहे. जवळपास ८५ लाख रुपये दिले आहेत. परंतु सर्व इन्फ्रास्ट्रक्चर म्हणजे अंडर वॉटर ड्रेनेज, लाईट, स्वतंत्र पॉवर हाऊस इत्यादींसाठी दोन-तीन कोटी रुपये खर्च केले आहेत. हे आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे क्षेत्र व्हावे या दृष्टीने राज्यपालांनी आपल्या भाषणामध्ये याचा काहीही उल्लेख केलेला नाही. मी काल आमचे मित्र श्री. आठवले यांना सांगितले. जन्मशताब्दी वर्षानिमित्त जी नॅशनल कमिटी नेमली आहे त्याचे आम्ही दोघे सभासद आहोत. मी त्या समितीच्या बैठकीला जाऊन आलो. त्या समितीने एक निर्णय घेतला आहे. उत्तर प्रदेशामध्ये पूर्वी आंबेडकर युनिव्हर्सिटी व्हावयाची होती. त्यावेळी तेथे भारतीय जनता पार्टीचे सरकार होते. त्यांनी त्याकरिता तरतूदही केली होती. बैठकीच्या वेळी सांगण्यात आले की, उत्तर प्रदेशातील लखनौ येथे सेंट्रल युनिव्हर्सिटी केंद्र सरकार स्थापन करणार आहे. महाराष्ट्रामध्ये

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पार्श्वभूमी आहे. उत्तर प्रदेशातील पार्श्वभूमी वेगळी आहे. असे असतानाही तेथे नवीन युनिव्हर्सिटी काढत आहेत आणि महाराष्ट्रामध्ये युनिव्हर्सिटी आहे पण त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी खळखळ करता? काल मा. विरोधी पक्षनेते श्री. आण्णा डांगे यांनी विचार मांडले त्याप्रमाणे कमीत कमी जन्मशताब्दी वर्षामध्ये तरी येथील युनिव्हर्सिटीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे. माननीय श्री. शरद पवार यांनी या युनिव्हर्सिटीच्या नावाला जन्म दिला. मी त्यांना विनंती करीन की, आपल्या सर्वांच्या दृष्टीने या जन्मशताब्दीच्या वर्षात मराठवाडा विद्यापीठाचे नाव "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ" असे घोषित करणे हे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर खालच्या सभागृहाचे एक सदस्य होते. त्यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री म्हणून श्री. यशवंतराव चव्हाणांना असा प्रश्न विचारला होता की, हे राज्य "मराठ्यांचे " राज्य होईल की, "मराठी" राज्य होईल? महात्मा फुलेंच्या कल्पनेत जो अभिप्रेत आहे—अर्थ त्याप्रमाणे होईल का? त्यावर यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले की, हे "मराठी" राज्य होईल. दुर्दैवाने तसे घडले का? परवा श्री. आदिक यांनी भाषण केले. त्यावेळी सांगितले की, आता साखर कारखाने काढण्यात काही मजा नाही. त्यापेक्षा एक इंजिनीयरिंग कॉलेज आणि एक मेडिकल कॉलेज काढले की, दोन साखर कारखान्यांची कमाई होईल. शरद पवार यांनी संरक्षणमंत्री म्हणून भाषण केले त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणात एक कोटी केली की, मी कार्यकर्त्यांना विचारतो की, किती शेती आहे, किती वाडी आहे पण ते सांगतात की, दोन कॉलेज आहेत, दोन शाळा आहेत, बरे चालले आहे आमचे. त्याच्या जोडीला आता बी. एड्. कॉलेज आहेत, डी. एड्. कॉलेज आहेत. अध्यक्ष महाराज, मी यासाठी याचा उल्लेख करतो की, यासंबंधीचा सामाजिक दृष्टिकोन बदलला आहे काय? मनुस्मृतीने शिकू दिले नाही आणि मग जे मागासवर्गीय आहेत, आता आपण त्यांना मंडल आयोगातील लोक म्हणू या... गेल्या दीड-दोन वर्षांत घड्याळाचे काटेच पूर्णपणे उलटे फिरलेले आहेत. जो उठतो तो शाळा काढतो, कॉलेज काढतो, महाविद्यालय काढतो अशी परिस्थिती झाली आहे. अध्यक्ष महाराज, आज सचिवालयाचे नाव "ओपन मार्केट" असे झाले आहे. त्या ठिकाणी गेलात तर इंजिनीयरिंग कॉलेज काढण्यासाठीचा भाव ठरलेला आहे, मेडिकल कॉलेजचा भाव ठरलेला आहे असे दिसून येईल. प्रत्येक वस्तूची किंमत सचिवालयामध्ये ठरलेली आहे. मग त्यात शाळा, कॉलेज, बी. एड्. कॉलेज, डी. एड्. कॉलेज, पोस्टिंग, ट्रान्सफर या सगळ्यांच्या किंमती ठरलेल्या आहेत. तेव्हा अशा प्रकारे या शासनावर जो भ्रष्टाचाराचा आरोप केला जातो आहे तो आपण कधी ना कधी तरी पुसून काढणार की नाही? सचिवालयामध्ये प्रत्येक वस्तूचे भाव ठरलेले आहेत. फक्त ते आपण एक्झिबिट करत नाही. तेव्हा हा जो सगळा भ्रष्टाचार आहे तो खणून काढण्याबाबत राज्यपालांच्या भाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही. १ लाख ८९ हजारांचा बॅकलॉग आहे. प्रातिनिधिक स्वरूपाने सर्व राज्यांनी याची अंमलबजावणी केली आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय यापूर्वी दक्षिणेकडच्या सर्व राज्यांनी या मंडल आयोगाची अंमलबजावणी केली आहे. मी या ठिकाणी सामाजिक दृष्टिकोनातून बोलत आहे. आज महाराष्ट्रातील सामाजिक मन, सामाजिक दृष्टिकोन संपत आलेला आहे. हा जर आपल्याला रिस्टोअर करावयाचा असेल आणि हे राज्य मराठी लोकांचे आहे ही जाणीव सर्वांमध्ये निर्माण करावयाची असेल तर ती बाब आपल्याला कृतीने व्यक्त करावी लागणार आहे. केवळ दोष देऊन चालणार नाही तर आपल्याला आत्मपरीक्षण देखील करावे लागणार आहे. एका तरी राज्यकर्त्यांने उदारतेची भावना घ्यावी. राज्यकर्ते जर बहुसंख्य समाजातील असतील तर त्यांनी मोठ्या भावाची

भूमिका घ्यावी याचा अर्थ त्यांनी आपल्या लहान भावांना दूर लोटू नये. या प्रक्रियेमध्ये शिवसेना वाढली असेल. भाजप वाढली असेल तर याचा अर्थ मराठी राज्य बनविण्याच्या संकल्पनेने मोठ्या भावाच्या भूमिकेने लहान भावाला साथ देण्याची भूमिका सत्ताधाऱ्यांनी नाकारली असाच होतो. आणि तीच भूमिका नेमकी भाजप आणि शिवसेना यांनी स्वीकरली. यामध्येच तुमचा पराभव आहे. मी काही या ठिकाणी भाजप आणि शिवसेना यांचे वकीलपत्र घेतलेले नाही. पुढे कधी ना कधी ते कन्व्हर्ट होतीलच म्हणूनच माझा दृष्टीकोन असा आहे की, या पुढे राज्य चालविताना सर्व क्षेत्रांमध्ये महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्या कल्पनेप्रमाणे मराठी मन, मराठी माणूस दिसला पाहिजे ही अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(२३ मार्च, १९९३)

१९९३ हे वर्ष आगळेवेगळे होते. त्यावर्षीच मुंबईत दंगली झाल्या आणि बॉम्बस्फोट झाले. या गोष्टी अर्थसंकल्पातून बाजूला करता येणार नाहीत हे सांगत श्री. रा. सू. गवई यांनी माणसांच्या मनाच्या पुनर्वसनाचा विषय मांडीत जुना इतिहास सभागृहासमोर मांडला. पाकिस्तान निर्मितीमुळे, एका चुकीमुळे ९९ टक्के मुसलमानांना सेकंड सिटीझनशिप मिळण्याची भीती कशी व्यक्त करण्यात आली होती याचा आढावा घेतला.

सभापती महोदय, या राज्याच्या अर्थसंकल्पाचा पार्ट आणि पार्सल असा भाग, मुंबईची दंगल आणि बॉम्बस्फोट, या दोन्ही गोष्टी अर्थसंकल्पापासून अलग करता येत नाहीत, आणि म्हणून माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. फरांदे यांनी असे म्हटले की, "यावर बोलणार कसे? काय संबंध?" "Bombay is the heart and nerve of India. " परंतु हृदय आणि नर्व्ह सेंटर नष्ट झाले तर महाराष्ट्राचे एकमेव आणि राजकारणातीलच काय तर संपूर्ण देशाचे किंबहुना राजकारण नाहीसे होईल आणि म्हणून अप्रत्यक्षपणे या बाबींचा उल्लेख आजच्या अर्थसंकल्पामध्ये झालेला आहे. तो असा की, मुंबईत दंगल, बॉम्बस्फोट या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पाच्या उत्पन्न आणि साधनात रुपये २,५०० कोटींची घट दाखविली आहे. बॉम्बस्फोटामुळे जवळजवळ रुपये ५०० कोटींचे नुकसान झालेले आहे. पुनर्वसनाकरिता आकस्मिकता निधीमधून जवळजवळ १,००० कोटी रुपये विथड्रॉ केलेले आहेत, याचा अर्थ काय? या सर्वांचा बोजा विकासाच्या कामावर जो होणार तो Development work will suffer, directly or indirectly. आणि म्हणून या संबंधाने प्रिअँबल करतो की, पुनर्वसनाची चर्चा झाली. परंतु माणसाच्या मनाच्या पुनर्वसनाची चर्चा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत हा देश अत्यंत संकटात आहे. मी एक राजकीय इतिहास सांगू इच्छितो. पहिली गोलमेज परिषद, दुसरी गोलमेज परिषद, तिसरी असे करीत करीत माऊंट बॅटनच्या कारकिर्दीमध्ये निर्णय घेतला की, आम्ही तुम्हाला स्वराज्य देतो. तेव्हा एका चर्चेत पंडित नेहरूंशी चर्चिल म्हणाले की, " पंडितजी आम्ही आक्रमक आहोत. अपुरे आहोत, तुमच्यावर राज्य केले आणि राज्य करण्याचा आम्हाला अधिकार नाही, आम्हाला एक दिवस जावे लागेल, आम्ही सोडून जातो." मी तुम्हाला प्रश्न विचारतो की, आम्ही तुमच्यावर १५० वर्षे राज्य केले ते का केले? पंडित नेहरूंना समजले पण त्यांनी इग्नोअर केले! 'I do not know your question, Mr. Charchil. ' चर्चिल म्हणाले " You better ask your Indian man Dr. Ambedkar. " म्हणजे १५० वर्षांपर्यंत जी विद्यमान

एचबी ११८०—३२

परिस्थिती भारतामध्ये होती तिचाच परिपाक करून 'फोडा आणि झोडा' नीतीने इंग्रजांनी राज्य केले. देशामधील ती परिस्थिती आज बदललेली आहे का? याचा सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार करावा. कॉन्स्टिट्यूशन असेम्ब्लीमध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंनी इंडियन डेव्हलपमेंट यासंबंधी पहिल्यांदा ठराव मांडला तेव्हा बॅरिस्टर जयकर यांनी त्याला उप सूचना दिली की, या सभागृहामध्ये मुस्लिम लीग नाही त्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपाची चर्चा होणार नाही. मग साहजिकच बॅरिस्टर जयकर यांच्या वाक्याने सारे सभागृह रागावले, लालबुंद झाले. पण बॅरिस्टर जयकर यांच्या सूचनेला पाठिंबा देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे समर्थन केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "थॉट ऑन द पाकिस्तान" हे पुस्तक लिहिले आहे. अजूनही हा देश कसा वाचवता येईल? यासंबंधी त्यात त्यांनी स्पष्ट विवेचन केले आहे. ते म्हणतात की, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू आणि बॅरिस्टर जिना हे तर राष्ट्रीय कार्यकारणीचे सदस्य आहेत. तुम्ही याचा विचार कधी केला आहे का? माझा तर काँग्रेसशी सुतराम संबंध नाही. मला महाराष्ट्रातून घटना समितीमध्ये येऊ दिले नाही, पश्चिम बंगालमधून मी या समितीमध्ये आलो. आजच मी माझे मित्र बॅरिस्टर जिना यांना सांगितले की, " You are committing a blunder and grave mistake " भांडवलधार्जिण्या मुसलमानांची पाकिस्तानची मागणी होती. पण पाकिस्तानची मागणी ही फंडामेंटलिस्टची, विशिष्ट भू-भागामध्ये एक दिवसाचा सुलतान करा असे म्हणणाऱ्या लोकांची होती. आम मुसलमानांची ही मागणी नव्हती. बॅरिस्टर जिना यांनी सांगितले की, ह्या वावड्या आहेत. मी काही मूर्ख नाही. शेवटी पाकिस्तान झाल्यानंतर एक टक्का लोक पाकिस्तानामध्ये जातील आणि ९९ टक्के लोक हिंदुस्थानामध्ये राहतील. पण एकाच्या चुकीमुळे ९९ टक्के मुसलमानांना भारतात सेकंड ग्रेड सिटिझनशीप मिळेल. मग मला तेथे रहावयाचे नाही. या देशामध्ये स्वतंत्र मतदारसंघाच्या बाबतीत मुस्लीम, शीख, अँग्लोइंडियन, ख्रिश्चन यांचा विचार झाला तरीदेखील हा देश अखंड राहिला. मी माझ्या विचारांचा प्रभाव पाडून माझ्या लोकांबरोबर राष्ट्रीय प्रवाहामध्ये राहीन. या देशामध्ये राहीन, हे सांगितल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्व सभागृहाने डोक्यावर घेतले. He proved by practice.

जेव्हा त्यांना घटना समितीमध्ये महाराष्ट्रातून पाठविण्यात आले नाही तेव्हा पश्चिम बंगालच्या जोगेंद्रनाथ मंडलाच्या मदतीने ते घटना समितीमध्ये आले आणि पुढे जोगेंद्रनाथ मंडल बॅरिस्टर जिना मंडळामध्ये सामील झाले. माझे म्हणणे असे आहे की, आज आपण दंगलग्रस्तांचे पुनर्वसन करीत असलो तरी लोकांच्या मनाचे पुनर्वसन घडलेले नाही. महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की " the two-nation theory is nothing but a creation of the fundamentalism " हा संसर्गजन्य रोग तेथेच पसरला. दोन नेशनची थिअरी करणाऱ्यांनी एका नेशनचे दोन नेशन केले. " Therefore, two-nation theory and fundamentalism are side by side " बांगलादेश आणि पाकिस्तान केले. ते असे म्हणाले की, हा फंडामेंटालिझम तुम्हाला या देशातून गाळावा लागेल आणि जर हे आपण करू शकलो नाही तर आपण आपल्या देशाचे विघटन टाळू आणि त्यानंतर चर्चिलचे उदाहरण सांगितले. तुम्हाला स्वराज्य दिलेले आहे आणि आहे अशीच परिस्थिती या देशामध्ये राहिली तर माझे भाकित आहे की, १०० वर्षांत दोन तुकडे झाले परंतु पुढच्या काळात हेच चित्र राहिले तर देशाचे १२-१३ तुकडे होतील. आणि हे जर टाळावयाचे असेल तर याचा संबंध राजकारणाशी आहे. अर्थव्यवस्थेशी आहे. अध्यक्ष महाराज, या संदर्भात जे वाक्य कोट करण्यात आले आहे ते मी या ठिकाणी सांगणार आहे. हा भाग पर्टिक्युलर एका रिलिजनला लागू नाही तर सर्वांनाच तो लागू आहे. या ठिकाणी असे म्हटले आहे की, " To quote Daniel O'Connel, for no man can be grateful at the cost of his own honour, no women at the cost of her chastity, and no nation at the cost of its liberty. Regarding this matter, Ambedkar said this caution is far more necessary in the case of India than in the case of any other country, for in India, 'Bhakti' or what may be called the path of devotion of hero-worship, plays a part of India's politics unequated in magnitude by the part it plays in the politics

of any other country in politics, ' Bhakti' or hero-worship is a sure road to degradation and eventual dectatorship." सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या संदर्भात बोलत असताना मुंबई शहर हे सगळ्यांचे हृदय आहे पण विषामुळे देश संकटात जाईल या दृष्टीने काळजी आपण घ्यावी. अध्यक्ष महाराज, मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पाने मी थोडा अस्वस्थ झालो होतो. कारण अर्थमंत्र्यांनी सांगितले होते की, प्रीत मागू नका. ज्या माणसाने जन्मभर प्रीत केली तेच म्हणता की, प्रीत मागू नका. लोक पत्र लिहूनही ती देण्यास तयार आहेत. परंतु आज ही गोष्ट बदलली आहे. मुंबई हे वाईट शहर आहे. ते मोठमोठ्या माणसांना बदलवते. या वर्षी अर्थमंत्र्यांनी शहरावर प्रेम केले आहे. गावांवर अप्रीती केली आहे. अर्थसंकल्पाला मथळा द्यावयाचा तर " शहराचा विकास आणि गावाचा भकास केला " असाच द्यावा लागेल. टी.व्ही., टेलिफोन, रेफ्रिजरेटर, कूल स्टोअरेज कोण वापरतो? या गोष्टी काय खेड्यातील माणूस वापरतो? म्हणून मी सांगितले की, अर्थमंत्र्यांनी शहरावरती प्रेम केले आणि गावावरती प्रेम केले नाही. खरे म्हणजे त्यांचा जन्म खेड्यामध्ये झाला. ते खेड्यामध्ये वाढले. परंतु मुंबई हे असे शहर आहे की, येथे आलेली मोठमोठी माणसे बिघडतात. तंबाखूवर कर माफ केला. तो कोणत्या तंबाखूवर केला? हुक्का ओढणारे यांच्या तंबाखूवरील कर माफ केला. म्हणजे न्याय कोणाला दिला तर तो सुधाकरराव नाईकांना दिला. असे पाईप ओढणारे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, ५५५ सिगारेट ओढणारे, ब्ल्यू लेबल, ब्लॅक लेबल पिणारे यांच्यासाठी आपण सवलत दिली. त्यानंतर तुमचे दरडोई उत्पन्न आहे ते फसवे आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्वसामान्य माणूस ज्यांची संख्या ६० टक्के आहे त्याचे उत्पन्न १८४ रुपये आणि मध्यम माणसाचे उत्पन्न ४०० रुपये. खेड्यातील माणसाचे हे १८४ रुपये उत्पन्न वाढविण्याचे कोणते काम या अर्थसंकल्पात केले आहे? अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले नाही. ११ लाख तरुण, ६ लाख महिला या ग्रामीण भागामध्ये असुरक्षित आहेत. त्यांना नोकऱ्या नाहीत. १.५ कोटी शेतमजूर व २ कोटी कोरडवाहू शेतकरी यांच्यासाठी अर्थसंकल्पामध्ये आपण काय केले? काही केले नाही. उदाहरण सांगावयाचे तर पंजाब, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, आंध्र या राज्यांनी ग्रामीण भागाला झुकते माप दिलेले आहे. तुम्ही साडी-धोतर देण्याची घोषणा केली होती ती घोषणा गेली कोठे? साडीही गेली आणि धोतरही गेले. आता काय शिल्लक राहिले? २ रुपये किलोप्रमाणे आदिवासींना धान्य देण्याची घोषणा मागे केली होती त्याचे काय झाले? जवाहर योजनेमध्ये खड्डे पाडले परंतु पाणी लागले नाही. सामाजिक वनीकरणामध्ये एका एका खड्ड्यामध्ये दोन झाडे लावल्याचे सांगितले. नवीन खड्ड्याकरिता नवीन झाड नको काय? ही साधी गोष्ट तुमच्या लक्षात कशी आली नाही? त्यानंतर जलसंवर्धनासाठी ६ हजार खेडी घेतली. त्या खेड्यामध्ये काम सुरू केले काय? तेव्हा ज्या अर्थसंकल्पामध्ये गावे नसतील, गावातील जनता नसेल त्या अर्थसंकल्पाला काय अर्थ ?

त्यानंतर अध्यक्ष महाराज, या राज्य शासनाचे ४५ उद्योग आज २०० कोटी रुपयांच्या घाट्यामध्ये आहेत. हे पांढरे हत्ती पोसणारी मंडळे यांचा तोटा हजारो कोटी रुपयांचा आहे. आपली १० हजार कोटी रुपयांची रिकव्हरी आहे. म्हणजेच आपल्या बजेटच्या ३ पट त्यांची रिकव्हरी आहे. ती आता आपण वसूल केली नाहीतच उलट त्यांच्यावर मेहेरबानीच केली आहे.

अध्यक्ष महाराज, पंढरपूरची यात्रा, आळंदीची यात्रा हे सर्व जगजाहीर आहे. आमच्या दीक्षाभूमीला हजारो लोक येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दीच्या या वर्षामध्ये इतर राज्यांनी किती काम केले आहे या लोकांसाठी ते पहा. आपले राज्य फक्त बाबासाहेबांचे, महात्मा फुल्यांचे नाव घेते, काम मात्र काहीच नाही. अध्यक्ष महाराज, दीक्षाभवन बांधावयाचे आहे. स्मारक समितीने याबाबत अतिशय चांगले काम केले. नेक्स्ट ताजमहाल अशी इमारत ती झाली पाहिजे. जगभराच्या सर्व लोकांनी त्याकडे कौतुकाने पाहिले पाहिजे. आम्ही या कामासाठी ५० लाख रुपये मागितले होते. माननीय अर्थमंत्र्यांनी एका जाहीर प्रसंगी सांगितले होते की, सरकार या कामासाठी २५ लाख रुपयांची तरतूद करील. मी या अर्थसंकल्पाची ओळन्‌ओळ वाचली. मला अशी तरतूद कोठेही आढळली नाही.

अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांचे किमान वेतन दर ३ वर्षांनी रिव्हाईज केले पाहिजे असे मी त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री

एचबी ११८०—३२अ

श्री. नाईक यांना सागितले. परंतु ते कामदेखील झालेले नाही. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, शेतमजुरांना किमान वेतनाचे दर देण्याचे ठरविले त्यातील शेवटचा दर इ. जी. एस. च्या मजुरांच्या मजुरीचा असेल. अध्यक्ष महाराज, या अर्थसंकल्पाचे वर्णन करताना शहरांचा विकास, गावे भकास आणि १०० रुपयातील ५८ रुपये पगारावर खर्च, २० रुपये भ्रष्टाचार आणि २२ रुपये विकासावर खर्च असे करता येईल असेच या अर्थसंकल्पाचे स्वरूप असल्यामुळे दुर्दैवाने मला या अर्थसंकल्पाचे स्वागत करता येणार नाही.

❑❑❑

मुंबईतील साखळी बॉम्बस्फोट

(२२ एप्रिल, १९९३)

मुंबई शहरात १२ मार्च, १९९३ ला झालेले बॉम्बस्फोट हे फक्त मुंबईवर आघात करण्यासाठी झालेले नाहीत तर संपूर्ण भारत नष्ट करण्याच्या उद्देशाने ते करण्यात आलेत. हे विधानपरिषदेत रा. सू. गवई यांनी ठणकावून सांगितले. या स्फोटात धर्मांध मुसलमानांची नावे होती पण त्यासाठी सर्व मुसलमान बांधवांना अराष्ट्रीय मानता येणार नाही, असे ते म्हणाले. त्या धर्मांध मुसलमानांना विचारले जावे की, "जेव्हा पाक निर्माण झाले तेव्हा तेथे जाण्याचा पर्याय तुम्हाला होता. पण तुम्ही पाकमध्ये गेला नाहीत. आता तुम्हाला हिंदुस्थान सारखेच वागले पाहिजे." जे अराष्ट्रीय मुसलमान आहेत त्यांचे लाड पुरविणे बरोबर नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

या धर्मांध मुसलमानांबरोबर जे कस्टम अधिकारी होते त्यांनाही सहआरोपी मानले पाहिजे. तसेच गुप्तहेर यंत्रणाही या स्फोटाला जबाबदार आहेत हे नमूद करून श्री. गवई यांनी पुढे असेही सागितले की, बॅ. जीना यांच्या एका चुकीमुळे आज ९९ टक्के मुसलमानांना दोष लागला आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी सांगितले की, ' There will be no Khalistan, There will be no Pakistan. there will be no Dalistan. Nothing doing. I am Indian first and Indian last.' हे संपूर्ण भाषणच डोळ्यात अंजन घालणारे आहे.

अध्यक्ष महाराज, भारत देशाच्या दृष्टीने एका अत्यंत गंभीर अशा विषयावर आज आपण या सदनामध्ये चर्चा करीत आहोत. ही चर्चा सर्व भारत देशाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अध्यक्ष महाराज, मी माझ्या भाषणामध्ये कोणत्याही व्यक्तीचा नामोल्लेख होणार नाही याची काळजी घेईन. १२ मार्च रोजी मुंबईमध्ये झालेला बॉम्बस्फोट हा केवळ मुंबईपुरताच मर्यादित नव्हता. संपूर्ण भारत देश नष्ट करण्याच्या उद्देशाने तो करण्यात आला

होता. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, Bombay is the nerve centre of India. Bombay is the heart of India. आंतरराष्ट्रीय व्यापार, आंतरराष्ट्रीय कम्युनिकेशन यांचे केंद्रबिंदू ही मुंबई आहे. इंटर्नल सर्व्हिसेस इन द कंट्री यांचे केंद्र मुंबई हे आहे. देशाच्या संपूर्ण रेव्हेन्यूमधून एकट्या मुंबईतून ४९ टक्के रेव्हेन्यू केंद्र सरकारला जातो. एक्साईज ड्युटी, इन्कम टॅक्स या सर्वांचा मोठा सोर्स मुंबई आहे. मुंबई हे पूर्ण भारत देशाचे हृदय आहे. याला लहानसा स्ट्रोक मारून संपूर्ण भारत देश पॅरालाईज्ड करावा आणि त्यामधून भारताला नष्ट करावे असा हा दुष्ट कट होता. त्याबाबतचे विश्लेषण झालेले आहे परंतु एक्झिबिशन होत नाही. अध्यक्ष महाराज, पहिला बॉम्बस्फोट हा स्टॉक एक्सचेंजला झाला, दुसरा एअर इंडियामध्ये, तिसरा झवेरी बाजारमध्ये, चौथा वरळीच्या पासपोर्ट ऑफीसमध्ये आणि पाचवा बॉम्बस्फोट हा दादरला प्लाझा सिनेमाजवळ झाला. What does this sequence indicate? This sequence indicates to have a stroke to Bombay City and thereby to paralyse Bharat. म्हणूनच मी म्हणालो की, हा कट भारताच्या विरुद्धचा कट होता. अध्यक्ष महाराज, आतापर्यंत या चर्चेमध्ये भाग घेतलेले वक्ते मा. सदस्य श्री. चोरडिया, विरोधी पक्षनेते आण्णासाहेब डांगे आणि आता मा. सभापतींच्या खुर्चीमध्ये बसलेले आपण या सर्वांच्या भावनांशी आणि बोलण्याशी मी सहमत आहे. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे की, हा कट पाकिस्तानमध्ये शिजला. काल या देशाचे मा. गृहमंत्री आदरणीय शंकरराव चव्हाण यांनीदेखील तसेच निवेदन केले. जे जे राजकीय अभ्यासू लोक आहेत त्यांचेदेखील हेच मत आहे. हा कट संपूर्णपणे पाकिस्तानमध्ये शिजलेला आहे, याबाबत कोणाच्याही मनामध्ये दुमत नाही. ते सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे आणि या कटात आर्थिक सहाय्य मात्र आखाती राष्ट्रांनी केले. कटाची अंमलबजावणी करण्याकरिता वापरले कोण? सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे सगळेच मुसलमान बंधू अराष्ट्रीय नाहीत, परंतु काही धर्मांध मुसलमानांनी हे कृत्य केले. राष्ट्रीय मुसलमानांवर दोषारोप करून चालणार नाही. परंतु जे अराष्ट्रीय मुसलमान आहेत त्यांचे लाड पुरविणे हेही बरोबर नाही. मी नावे घेत नाही. नावांची यादीच मा. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली आहे. धर्मांध मुसलमानांनी एवढी हिंमत केली आहे. अध्यक्ष महाराज, ज्या वेळी या देशाची फाळणी झाली त्यावेळी त्यांना ऑप्शन होता. तुम्हाला पाकिस्तानात जावयाचे असेल तर पाकिस्तानात जा आणि राहावयाचे असेल तर हिन्दुस्थानात राहा. त्याप्रमाणे त्यांनी ऑप्शन स्वीकारला. ज्यांना पाकिस्तानात जावयाचे होते ते पाकिस्तानात गेले आणि ज्यांना हिन्दुस्थानात राहावयाचे होते ते हिन्दुस्थानात राहिले मग त्यांनी हिन्दुस्थानासारखे वागले पाहिजे. पण भारतातील मुस्लिमांपैकी धर्मांध मुसलमान राष्ट्रद्रोही कारवाई करीत असतील तर त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. धरमचंद चोरडिया यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे मीही माझ्या भाषणात स्पष्टपणे उल्लेख करीन.

अध्यक्ष महोदय, या बॉम्बस्फोटाचे प्रशिक्षणसुद्धा पाकिस्तानात देण्यात आले. आम मुसलमानांपैकी काही अराष्ट्रीय मुसलमानांनी ट्रेनिंग घेतले, त्यांची नावे मी घेत नाही. या लोकांनी केवळ पैशांसाठी हे केले, याच्याशी मी सहमत नाही. यांच्या मनात भारतासंबंधी पाप होते म्हणून केले. हा प्रश्न झाला देशातील अराष्ट्रीय मुसलमानांचा. पण समुद्राचा तट राखणारे कस्टम अधिकारी कोण आहेत? एक टक्कासुद्धा मुस्लिम नसतील. त्यामध्ये ९९ टक्के लोक नॉन-मुसलमान आहेत. त्यांनी कळत नकळत चोरट्या स्फोटक द्रव्यांच्या आयातीला मदत केलेली आहे. या

चोरट्या स्फोटक द्रव्यांमुळे उद्या भारत उद्ध्वस्त होईल ही गोष्ट आय. पी. एस., आय. ए. एस. अधिकाऱ्यांना कळत नाही हे मला मान्य नाही. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे आयात झाली ते अधिकारीही देशद्रोही आहेत. त्यामध्ये १ टक्का मुसलमान आहेत आणि ९९ टक्के इतर आहेत. त्यांचाही या घटनेशी संबंध आहे. सभापती महोदय, या ठरावावर चर्चा करीत असताना आम्ही केंद्र सरकारला सूचवू इच्छितो की, त्यांनी आपल्या परराष्ट्रीय यंत्रणेचा वापर करून पाकिस्तानला टेररिस्ट राष्ट्र म्हणून घोषित करावे. अध्यक्ष महाराज, जगातील प्रमुख राष्ट्रेदेखील पाकिस्तानला टेररिस्ट नेशन म्हणून घोषित करण्याच्या तयारीमध्ये आहेत. अध्यक्ष महाराज, आपल्या सभागृहाला तो अधिकार नाही परंतु या सभागृहाचा सन्माननीय सदस्य म्हणून मी केंद्र सरकारला सूचना करू इच्छितो की निरनिराळ्या देशांशी संपर्क साधून त्यांच्या मदतीने पाकिस्तान हे टेररिस्ट राष्ट्र आहे हे घोषित केले पाहिजे. या प्रकरणी जे दोषी आहेत त्यांच्याविरुद्ध प्रथम कारवाई करा, परंतु येथेदेखील बूच मारले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. पाकिस्तान हे टेररिस्ट राष्ट्र घोषित करण्यात आल्यानंतर ते दुय्यम देशाचे नागरिक आहेत हे जगाला कळले पाहिजे. अध्यक्ष महाराज, संबंधितांविरूद्ध कडक कारवाई करण्याचे अभिवचन या सभागृहामध्ये देण्यात आले आहे. सुदैवाने श्री. शरद पवार हे मुख्यमंत्री झाले आणि दुर्दैवाने मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोट घडले आहेत. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी अभिनिवेश न बाळगता बोलण्याचे मी ठरविलेले आहे. I have decided to speak here without fear or favour.

मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी जी परिस्थिती हाताळली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. अत्यंत मर्दपणाने त्यांनी ही परिस्थिती हाताळलेली आहे असे मला येथे सांगावयाचे आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी बॉम्बस्फोटानंतर ज्या पद्धतीने परिस्थिती हाताळली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांच्याबरोबर मुंबईतील साऱ्या जनतेलादेखील मी धन्यवाद देतो. १२ तारखेला बॉम्बस्फोट झाल्यानंतर १३ तारखेला मुंबई सुस्थिर झाली. त्याबद्दल मी मुंबईच्या जनतेला देखील धन्यवाद देऊ इच्छितो. बॉम्बस्फोट झाल्यानंतर मुंबईतील जनता भ्यायली नाही. मुंबईतील जनतेने हे चांगले काम केले आहे त्याबद्दल त्यांचे ॲप्रिसिएशन केले पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

या ठिकाणी बोलत असताना मी आरोप करू इच्छितो की, या दरम्यान मुंबईची आणि दिल्लीची गुप्तहेर यंत्रणा काय करीत होती? त्यांना ही गोष्ट माहीत नव्हती काय? ते देखील तितकेच को-ॲक्युज्ड आहेत. अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे मुंबईमध्ये शस्त्रांची आवक होत असताना वृत्तपत्रामध्ये वेळोवेळी त्यासंबंधीचे वृत्त येत असताना जर मुंबई आणि दिल्ली येथील गुप्तचर खाते स्तब्ध असेल तर त्यांना स्पेअर करण्याची गरज नाही. They should also be treated as an co-accused and there is no need to spare them.

अध्यक्ष महाराज, आज परिस्थिती अशी आहे की, मुंबईमध्ये आलेल्या शस्त्रास्त्रासंबंधी मोठ्या प्रमाणावर शोध घेण्यात येत आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी शब्द वापरला होता तो शब्द मला आवडला. मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी सांगितले की, कणन्‌कण शोधून काढू, पण कण कण शोधतांना टन टन शिल्लक राहील. म्हणजे आज समुद्र किनाऱ्यावर उपलब्ध असणारा २,०५१ किलो आरडीएक्सचा साठा सापडला आणि मुंबईमध्ये जेव्हा १२ तारखेला बॉम्बस्फोट झाला तेव्हा तो १,१००

किलोचा होता. म्हणजे जो साठा पोलिसांना सापडला तो दुष्मनांच्या हाती राहिला असता तर जो हाहाकार मुंबईमध्ये १२ तारखेला झाला त्याच्या तिप्पट त्यानंतरच्या काळात झाला असता. अध्यक्ष महाराज, हा २०५१ किलो आरडीएक्सचा साठा सापडला असला तरी अजून किती बाकी आहे हे शोधण्याचे काम म्हणून जलद गतीने केले पाहिजे. अध्यक्ष महाराज, माझ्या भाषणाचा समारोप मी थोड्या पोक्त शब्दामध्ये करणार आहे. कारण शेवटी हा प्रश्न राजकारणाच्या पलीकडला आहे. असा कोण माणूस आहे की जो घडल्या घटनेने व्यथित झाला नाही? येथे बसणारे सारेच सदस्य व्यथित आहेत, कारण आमचा देश आज संकटात आहे. अध्यक्ष महाराज, मला माफ करा, मी जरा बाजूला जाऊन बोलू इच्छितो, दुर्दैव आहे. मनू नावाच्या माणसाने मोठे पाप या जगामध्ये करून ठेवले आहे. आणि त्या पापाचे पडसाद आज आम्ही भोगून राहिलो आहोत. मी कोणाचे नाव घेत नाही. पण आपल्या देशाची घटना तयार केली त्यावेळी घटना समितीवर बहिष्कार मुस्लिम लीगने पुकारला आणि त्यात बॅ. जीना हेही सामील होते. पंडित नेहरूंनी धोरणात्मक ठराव मांडला. त्याला बॅ. जयकर यांनी उप सूचना दिली की, जोपर्यंत जीना आणि मुस्लिम लीग घटना समितीमध्ये सहभागी होत नाहीत तोपर्यंत घटना समिती तहकूब करावी. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर उठले आणि म्हणाले की, चर्चा तहकूब करण्याचे काही कारण नाही, घटना कशी करावी यासाठी मुस्लिम लीग आणि जीना यांना या चर्चेत सहभागी होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. पण ते गैरहजर आहेत, त्यांची पर्वा करू नका, अध्यक्ष महाराज, त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी एक टोलाही पंडितजींना मारला. तुम्हीच राष्ट्रीय काँग्रेसचे नेते आहात, कारण महात्मा गांधी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल आणि बॅ. जीना हे सारे राष्ट्रीय काँग्रेसचे होते. पण या राष्ट्रीय काँग्रेसने देशातील मुस्लिम बांधवांना राष्ट्राच्या मध्यप्रवाहामध्ये आणण्यासाठी काय केले? मतांसाठी लाचार बनून, त्यांना आजही अज्ञानामध्ये, गरिबीमध्ये, अविचारीपणामध्ये कायम ठेवले. तेव्हा सोडा ही राष्ट्रीय काँग्रेस. अध्यक्ष महाराज, कधी येथील राष्ट्रीय वृत्तीच्या मुस्लिम नेत्याने आपल्या मुस्लिम बांधवांना सागितले आहे की, प्रथम तुम्ही या देशामध्ये राहता तेव्हा तुम्ही या देशातील माणसासारखे वागा म्हणून. आजही ते तसे करीत नाहीत. आजचे विद्यमान मुस्लिम नेते हे काम करीत नाहीत. त्यावेळी आमच्या डॉ. बाबासाहेबांनी सरळ याबाबत ठणकावले होते. आजच्या मुस्लिम नेत्यांनी आपल्या लोकांना सांगितले पाहिजे की, आपण अशा प्रकारे वागावयास पाहिजे की, ज्यामुळे बॅ. जीना यांच्या एका चुकीमुळे ९९ टक्के मुसलमानांना दोष लागला आहे. त्यांच्याकडे पाहण्याची जी दृष्टी निराळी झाली आहे ती त्यामुळे बदलू शकेल. बाबासाहेबांनी त्यावेळेस सांगितले की There will be no Khalistan. There will be no Pakistan. There will be no Dalistan. Nothing doing. I am anIndian first and Indian last. माझ्यासंबंधी काही लोकांनी चुकीची मागणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितस्तान मागितले असते. परंतु त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, "मी पलायनवादी नाही. मनूच्या व्यवस्थेमुळे माझ्यावर अन्याय झाला आहे. परंतु मी या देशातच राहून, या देशाच्या प्रवाहात राहूनच मी धर्मांध शक्तीशी भांडत राहीन." परंतु हा विचार जीनांनी न स्वीकारल्यामुळे देशाचे दोन तुकडे झाले. अध्यक्ष महाराज, आज आम्ही गरीब असलो तरी आमच्यावर कोणीही आरोप करणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आमची मान ताठ ठेवली आहे. नाक वर ठेवले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला राष्ट्रीय प्रवाहात आणल्यामुळे आम्ही

काही अंतर पूर्ण करण्याच्या प्रक्रियेमध्ये आम्ही पोहोचलो आहोत. जीनांच्या वर्तनाने देशाचे यापूर्वी दोन तुकडे झाले असले तरी यापुढे होता कामा नयेत. देशातील राष्ट्रीय मुसलमानांचे आपण प्रबोधन केले पाहिजे आणि त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणले पाहिजे. तसे झाले नाही तर या देशाचे पुन्हा अनेक तुकडे होण्यास वेळ लागणार नाही.

अध्यक्ष महाराज, मला दुसरी एक भीती दिसून येत आहे. श्री. अटलबिहारी वाजपेयी या देशाचे पंतप्रधान झाले तर सर्वांत पहिला हार मी त्यांना घालीन. एकट्या जीनांच्या चुकीमुळे जे घडले ते पुन्हा होता कामा नये. आज जे वातावरण निर्मित झाले आहे, त्याचे भांडवल करून हा प्रश्न चिघळत ठेवता कामा नये. देशातील सर्व मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे. ते आपणाला करावे लागेल. अध्यक्ष महाराज, क्रिकेट मॅच पाकिस्तानने जिंकली तर ज्याने फटाके वाजविले त्याला आपण पकडा. पाकिस्तान झिंदाबादचे नारे कोणी या देशात देत असेल तर त्याला आपण पकडा. अध्यक्ष महाराज, माझी व राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. शरदराव पवार यांची खाजगीत चर्चा झाली. ती मी येथे सांगतो. शरद पवारांना मी सांगितले त्याचा विचार करू नका. राजकारणात ते घडतेच. नागपूरमध्ये माझ्या पक्षाचा एक नगरसेवक निवडून आला. तो गुंड निघाला. एका बाजूला गुंड आला आणि दुसऱ्या बाजूला सज्जनही आला. हे सर्वच पक्षांमध्ये आहे. त्यामुळे पप्पू कलानी आणि हितेंद्र ठाकूर यांचा काहीच संबंध नाही. मला या ठिकाणी शासनाला असे सांगावयाचे आहे की, रा. सू. गवईने जर कोणते देशविघातक कृत्य केले तर त्यालाही पकडा. श्री. शरद पवारांनी असे सांगितले की, पप्पू कलानी असो, भाई ठाकूर असो, अगर दुसरा कोणीही असो, जो देशविघातक कृत्य करीत असेल, त्याची पर्वा करण्यात येणार नाही. म्हणून आपण साऱ्या गोष्टी संयमाने घेतल्या पाहिजेत. अध्यक्ष महाराज, यापूर्वी झाले ते झाले. यापुढे आपण सर्वांनी मिळून विचार करू, आचार करू, व्यवहार करू. पॉलिटिकली विचार करू. अध्यक्ष महाराज, हा देश मोठा आहे.

सभापती महोदय, हा देश एवढा मोठा आहे. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने माझ्याकडून जगाचे पाच वेळा भ्रमण झाले आहे. आपल्या हिंदुस्थानचे पोर्टेशियल एवढे मोठे आहे. या देशातील इंजिनीअर्स, डॉक्टर्स, सायंटिस्ट हे जगाच्या कानाकोपऱ्यात आहेत. अमेरिकेची शक्ती आता संपत आली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय जगतात हा देश एक झाला तर तो सर्वात मोठा देश बनू शकतो. या देशाइतकी लोकशाही दुसऱ्या कोठल्याच देशात नाही. इथे अमर्याद लोकशाही आहे. एवढा हा मोठा देश आहे. याचे कारण इथे ज्युडिशिअरी कंप्लिट इंडिपेंडंट आहे, इंग्लंडच्या मदर पार्लमेंटमध्ये ज्युडिशिअरी इंडिपेंडंट नाही. हा देश एवढा मोठा आहे की, लोकशाहीमध्ये व्यक्तीची मूल्ये सांभाळताना श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या जिवाला धोका निर्माण होता कामा नये. श्री. लालकृष्ण अडवाणी, श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे राजकीय मतभेद असले तरी ती मोठी माणसे आहेत. ती जिवंत राहिली पाहिजेत. या देशाकरिता जिवंत राहिली पाहिजेत याची दक्षता घेण्याचे आपले काम आहे. हा देश मोठा बनण्यासाठी कमी उंचीचा विचार करण्यापेक्षा माझ्या डोक्यावरील टोपीच्या उंचीचा विचार करून आपण हा देश वाचवावा.

❑❑❑

पाणी, रोजगार निर्मिती व कोरडवाहू शेती

(१९ व २७ एप्रिल, १९९३)

कोरडवाहू शेतीमुळे विकासावर होणारा परिणाम, पाण्याची टंचाई व रोजगार निर्मिती क्षमता हे तीनही विषय रा. सू. गवई यांच्या चिंतनाचे विषय होते. त्याबाबत मूलभूत चिंतन त्यांनी केलेले होते. १९ एप्रिल, १९९३ व २७ एप्रिल, १९९३ या दोन दिवशी केलेल्या दोन भाषणांतून त्यांचा या विषयावरील व्यासंगही लक्षात येतो. पाण्यासाठी १८०० पायऱ्या उतरून खाली जाणे व तेवढ्याच पायऱ्या चढून एक घागर पाणी आणणे हे रोहयो हिशेबाप्रमाणे ती घागर ५० रुपयांना पडते असे साधे गणित मांडून ते विषय सोपा करूनही सांगत.

सभापती महोदय, १९७२ सालापासून १९९३ सालापर्यंत आपण पाण्याच्या प्रश्नाबाबत सतत सदनात चर्चा करीत आहोत. मतदाराचे वय आपण २१ वर्षांवरून १८ वर्षांवर आणले आहे. या ठिकाणी मात्र आपण २१ वर्षे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवू शकलेलो नाही. १९७२ सालापासून ३५ हजार गावे आणि ५ हजार वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. १९७२ सालापासून १९९३ सालापर्यंत बेरीज केली असता असे दिसून आले आहे की, १ कोटी ५२ हजार गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागला, या गावात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष होते. म्हणून ही गावे जर मोजली तर आपल्याला आपला नकाशाच बदलावा लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याचे गांभीर्य कळावे म्हणून मी काही उदाहरणे देणार आहे. कर्जत तालुक्यातील नागरिक पिण्याचे पाणी नसल्यामुळे आपले गाव सोडून गेले आहेत. याचा पुरावा फरांदे सरांनी दिला आहे. खटाव तालुक्यातील पुसेगाव येथील लोकही पिण्याचे पाणी नसल्यामुळे निघून गेले आहेत. ओतूर येथे २ हजार फूट खोल पाण्याचा डोह आहे. जवळपास त्या डोहाला १८०० पायऱ्या आहेत. एक घागर पाणी आणण्यासाठी या १८०० पायऱ्या वर चढाव्या लागतात तशाच त्या खाली उतराव्या लागतात. रोजगार हमी योजनेच्या लिड आणि लिफ्टचा विचार केला तर एका घागरीच्या पाण्यासाठी ५० रुपये द्यावे लागतील. अध्यक्ष महाराज, मा. फरांदे सरानी म्हटल्याप्रमाणे या शासनाने महापुरुषांची नावे घेऊ नयेत, त्यांची बदनामी करू नये. महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षात शासनाने असे सांगितले होते की, येत्या १० वर्षात एकही गाव पाण्यावाचून राहणार नाही. आता महात्मा गेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष आणि महात्मा फुले यांच्या स्मृतिशताब्दी वर्षात शासनाने पुन्हा अशी घोषणा केली की, एकही गाव या वर्षात पाण्यावाचून राहणार नाही. मला या निमित्ताने महाराष्ट्र शासनाला अशी सूचना करावयाची आहे की, आपण दुसरा एखादा महापुरुष आता शोधून ठेवा. कारण त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात पुन्हा आपल्याला घोषणा करता येईल.

अध्यक्ष महाराज, मा. अण्णासाहेब डांगे यांनी म्हटल्याप्रमाणे शासनाचे याबाबतचे धोरण चुकले आहे. या प्रश्नाला टॉप प्रायोरिटी दिली असती आणि मोठ्या आणि मध्यम प्रकल्पाला नंतर प्रायोरिटी दिली असती तर हा प्रश्न निर्माण झाला नसता. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी धोरणच चुकले आहे. आता हे धोरण आपणाला बदलता

येत नाही. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी दुष्टपणा केला आहे. १९७२ सालापासून १९९३ सालापर्यंत भारताच्या या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये छिद्र पाडले आहे आणि एका इंग्रजी वर्तमानपत्राने शब्दप्रयोग केला आहे Maharashtra Government did a foolish activity. They actually raped the land of Maharashtra. म्हणजे भूगर्भातील पाणी उपसणे अशा प्रकारची ढोबळ चूक करणे हे रेक्लेस आहे. ज्या गावात बोअर खोदली त्याच्या जवळपासच्या दहा बारा विहिरींचे पाणी आटले. अशा प्रकारची हजारो उदाहरणे आहेत. कारण त्यामुळे पाण्याची दिशा बदलते. त्या ठिकाणी पाणी नाही पण बोअर सुरू आहे. हा दुसरा दुष्टपणा केला. तिसरा मुद्दा शेतीला पाणी मिळावे यासाठी धरणे बांधली. पैठणच्या धरणाचा उपयोग शेतीसाठी किती झाला? औरंगाबाद आणि नवीन औरंगाबादला पाणीपुरवठा करण्यासाठी किती झाला याचा आपण खुलासा केला तर जवळजवळ हे धरण पाण्यासाठी वापरले गेल्याचे दिसेल. उजनीचे धरण शेतीला पाणी मिळावे यासाठी बांधले त्याचा वापर सोलापूरच्या आजूबाजूच्या गावांना झाला. माननीय सदस्य सर्वश्री महानोर, अण्णा डांगे यांनी बेसिक मुद्दे मांडले की, काँप्रेहेन्सिव्ह लँड डेव्हलपमेंट अँड वॉटर शेड निर्माण केले असते, आधी पाया बांधला असता आणि मग धरणाचा कळस बांधला असता तर ही पाळी आली नसती. त्या कल्पनेला आपण काऊडेप म्हणतो. मृदसंधारण, वॉटरशेड ही आजची कल्पना नाही. १५ वर्षांपूर्वी कै. वि. स. पागे साहेबांनी रोजगार हमी योजना दिली त्यावेळी याकडे लक्ष दिले नाही आणि म्हणून त्याचे दुष्परिणाम आज होत आहेत. तुमच्या माझ्या आकड्यामध्ये कदाचित फरक असेल. मी आकड्यातील गणितज्ज्ञ नाही. अर्धा महाराष्ट्र आलटून-पालटून बिनपाण्याचा आहे असे मानायला हरकत नाही. दुसरे असे की, आजही टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्या गावांची संख्या हजारावर आहे. आपण संवर्धनासाठी नवीन खाते निर्माण केले. पाणी अडावे, पाणी जिरावे ही या योजनेतील संकल्पना चांगली आहे. ही संकल्पना २० ते २५ वर्षांपूर्वी आली असती तर आज अण्णासाहेब हजारे, महानोर साहेब, हर्षवर्धन देशमुख साहेबांचे शेंदूरजना घाट अशा लहान लहान प्रकरणांमध्ये पाण्याची पातळी वाढलेली दिसते ते चित्र दिसले असते. महानोर साहेबांनी जो प्रयोग सांगितला तो माझ्या शेतामध्ये केला. ५० फूट रुंद, ५० फूट लांब आणि ५० फूट खोल तलाव केला आणि ६० एकराच्या पॉकेटमधील पिकाला जे पाणी दिले जाते ते सारे पाणी डायव्हर्ट केले आणि त्या गड्ड्यात आणून टाकले. परकोलेशनच्या थिअरीमुळे माझ्या सहा विहिरींना पाणी आले. माझ्या शेताजवळ एक नाला आहे. त्या ठिकाणी एक निमुळती लोखंडी साखळी बांधली त्यामध्ये दगड भरले आणि दोन्ही बाजूंनी बुजवून टाकले. पहिल्या पावसाने त्यामध्ये कचरा घुसला, त्याला सिमेंटची गरज नसतांनाही ते पॅक झाले आणि त्यामध्ये पाणी अडले. पाण्याच्या नियमाप्रमाणे ते रिचार्जिंग केव्हा होते? भूगर्भातील पाण्याच्या पातळीपर्यंत पाणी आले मग ते रिचार्जिंग होते. त्या रिचार्जिंगच्या प्रक्रियेमध्ये तुम्ही पुन्हा दुष्टपणा केला. अध्यक्ष महोदय, मी एक उदाहरण देतो. समजा, तुमचे बँकेत पैसे आहेत, तुम्ही रोज ते विथड्रॉ करीत आहात, डिपॉझिट करीत नाही तर तुमच्या खात्यात पैसे राहणार नाहीत. त्याचप्रमाणे पाण्याचे आहे. तुम्ही पाणी डिपॉझिट करीत नाही आणि केले नाही. म्हणून मी म्हणतो की भूगर्भ ही एक बँक आहे. बँकेप्रमाणेच हे होत आहे. पाणी डिपॉझिट करीत नाही पण विथड्रॉ करीत असतात. विथड्रॉचीच प्रक्रिया सुरू केली यामुळे महाराष्ट्रावर २० वर्षांचे संकट निर्माण केले आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, अमरावतीला श्री. कटकवार नावाचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यांनी सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी चर खोदले, यामुळे पर्वतावर पडलेले पावसाचे पाणी या चरात आले. त्या ठिकाणी ते मुरले आणि परलोकेशन होऊन आजूबाजूच्या विहिरीत गेले. महाराष्ट्रात किती डोंगर आहेत? त्या डोंगराच्या पायथ्याशी चर करा. यामुळे पावसाचे

पडलेले पाणी या चरात येईल व आपोआप विहिरीत जाईल. मा. सदस्य श्री. ना. धों. महानोर यांची जी संकल्पना आहे त्यात ही संकल्पना नाही. आपला जो पहाडी भाग आहे त्याच्या पायथ्याशी चर करा आणि पाणी अडवा. चरात पाणी आल्यावर त्यातून विहिरींना परलोकेशन होईल. आता नदी-नाले आटले आहेत. पण नदीचा प्रवाह अंडरग्राऊंड असतो. अनेक नद्या मैल-मैल दिसत नाहीत. नंतर पुन्हा काही अंतरावर दिसतात. त्या काही बुडत नाहीत. काही अंतर त्यांचा प्रवाह जमिनीखाली असतो. यासाठी नदीचे डिसिल्टिंग करा, तलावाचे डिसिल्टिंग करा, कंडोन करा, तलावातील गाळ आहे, नदीतील गाळ आहे ते सोन्यासारखे खत आहे. म्हणून तलाव व नद्या यांचे डिझोंटिंग करण्याची व्यवस्था करा. नदीत अजूनही अंडरग्राउंड प्रवाह आहे. माझी सूचना आहे की, दोन विभागात को-ऑर्डिनेशन पाहिजे. जलसंधारण विभाग आणि मृदसंधारण विभागात समन्वय करावा. मृदसंधारण विभाग म्हणजे जमिनीची लेव्हलिंग करण्याचे काम करतो. जुलै-ऑगस्टमध्ये नद्यांना पूर आल्यानंतर पुराचे पाणी चहाच्या पाण्यासारखे न राहता ते हिमालयावरील बर्फ वितळून आलेल्या पाण्यासारखे पांढरे शुभ्र पाणी आले तर समजावे की मृदसंधारण योग्य झाले आहे. मृदसंधारण व जलसंवर्धन या दोन्ही खात्यांचा समन्वय आपण केला पाहिजे. मी मागे सूचना केली होती.

अध्यक्ष महोदय, पाण्याचे प्रकार आहेत. इंडस्ट्रियल वॉटर, रुरल वॉटर, अर्बन वॉटर साऱ्या शहरातील झोपडपट्ट्या त्यांच्यामध्ये पहिल्या बाकावर बसलेल्यांपैकी तुम्ही दोघे, पहिल्या बाकावर कोण बसले? दुसऱ्या बाकावर कोण बसले, तिसऱ्या बाकावर कोण बसले, चौथ्या बाकावर कोण बसले? असे लोक जेथे राहतात तेथे पाणीच नाही. सभापती महोदय, मी याला म्हणतो, It is a conceal form of untouchability. They have been ignored. म्हणजे सुविधांचा प्रश्न नाही, त्यांना पाणी नाही. यांना पाणी मिळते. सभापती महोदय, मी काही सूचना मागे केल्या होत्या. शेगाव गजानन महाराजांचे गाव आहे. मा. श्री. ठाकरे मंत्रिमहोदयांनी पाहिलेले आहे. त्या ठिकाणी तलाव आहे. त्या तलावाचे डिसिल्टिंग केले तर १० गावांना पाणी पुरेल. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी म्हटल्याप्रमाणे सुदैवाने मालगुजारी तलाव आहेत. परंतु त्या तलावांची आज अशी परिस्थिती आहे की, त्या तलावांचे डिसिल्टिंग केले नाही तर भंडारा जिल्हा हा दुष्काळग्रस्त होईल. तेव्हा हे सारे तलाव, नद्या का डिसिल्टिंग करत नाही? पैसे नाहीत तुमच्याजवळ? १,२०० कोटी रुपये एम्प्लॉयमेंट गॅरंटीमध्ये जमा ठेवणे म्हणजे राज्य सरकारने क्रिमिनल गुन्हा केलेला आहे. माझ्या मनात पाप आले तर मी तुमच्यावर कोर्टात केस करू शकतो. कारण एम्प्लॉयमेंट गॅरंटीचा ॲक्ट ड्राफ्ट करताना आम्ही तरतूद केलेली आहे की, हा पैसा कन्सॉलिडेड फंडामध्ये नव्हे, इमर्जन्सी फंडामध्ये नव्हे तर हा पैसा सेपरेट हेडखाली ठेवावा. याचा अर्थ हा पैसा तुम्ही वापरावाच. The Government of Maharashtra did misappropriation. I can lodge a complaint against the Government of Maharashtra for committing a offence of misappropriation. As per the E.G.S. Act's provision, Government misappropriated the funds. मिस-ॲप्रोप्रिएशन आहे. पैसा काढता येत नाही. म्हणजे येथे ठेवले, पण नाव नाही घेत, यातील पैसा उसासाठी नेला. ज्यावेळेस आम्ही ओरड केली, मग त्यावर चर्चा झाली, आता बंद झाले. आता उसासाठी नाही तर बँकेत तुम्हाला वापरण्यासाठी आणि कोणाचे पैसे म्हणजे महात्मा गांधींच्या कल्पनेने जशी ट्रस्टीशिप आहे, तर एम्प्लॉयमेंट गॅरंटीमध्ये जसे सन्माननीय सदस्य श्री. दि. बा. पाटील, आम्ही आहोत, आमचे नेते उत्तमराव पाटील होते. त्यांनी पुढाकार घेतला आणि म्हटले It is a morale and boundent duty to share poverty. आम्ही शेअर टू पॉव्हर्टीसाठी चपराशावरही कर बसविला. तो गरीब आहे. पण He has shared the poverty of

the Agricultural Labour and for the poor. म्हणजे ते सज्जन आहेत. त्यांनी शेअर केले आणि मग अशा योजनेतील अर्धा पैसा चपराशी कामगार यांचा वापरण्याचा तुम्हाला नैतिक काय अधिकार आहे? बँकेत ठेवण्याची गरज? आणि अध्यक्ष महाराज, हे गुन्हा करतात. मला सल्ला द्याल तर सेशननंतर केस भरतो.

असे करावयाचे नाही तर सोडला पिच्छा, आता अध्यक्ष महाराजच म्हणतात तर काही हरकत नाही. तेव्हा सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री. गणपतराव देशमुख यांचा सांगोला तालुका, सोनंद सारे गाव उजाड झाले, सोडून गेले. अध्यक्ष महाराज, मी सन्माननीय सदस्य श्री. फरांदे साहेबांना सांगतो, तुम्ही पाथर्डीला जा, त्या पाझर तलावाची लेव्हल पाहा. आपले प्रकल्प पाहा म्हणजे त्या प्रकल्पांच्या भिंतींची उंची वाढविली तर पाण्याचे पोटेन्शिअल वाढते आणि वॉटर ऑफ फ्लो दोन ते तीन कि. मी. पुढे जातो. मी पत्र लिहिले आहे. पाथर्डी येथे भेट देऊन आलो. येथील प्रकल्पाच्या भिंतीची उंची दोन फूट वाढविली तर पाणी आता तीन कि. मी.पर्यंत जाते ते सहा कि. मी.पर्यंत जाईल. म्हणून रोजगार हमी योजनेसाठी असलेला पैसा, ६०:४० चा रेशो सर्वच ठिकाणी नाही पण काही ठिकाणी कन्टोन करण्याची वेळ आली तर पाण्याचा थेंब आणि थेंब अडविण्यासाठी जास्त विलंब लावू नका. पाण्याचा जो वनवास चालू आहे, रामाचा वनवास एका वर्षामध्ये संपला पण आता दोन वर्षे शिल्लक राहिली आहेत. या काळामध्ये दोन वेळा राम होतील. तेव्हा आपण किती वर्षांमध्ये पाणी देऊ शकाल, हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

अध्यक्ष महाराज, प्रस्तावामध्ये १३ टक्के इरिगेशन म्हटले आहे ते सुद्धा फॉल्टी आहे. यामध्ये मला वाटते वेल इरिगेशनचा सुद्धा समावेश असावा. नाही तर हे प्रमाण १० टक्क्यांवरच आहे. याबाबत माननीय मंत्रिमहोदय योग्य ते उत्तर देतीलच. परंतु आपल्या राज्यात १३ टक्के इतकेच इरिगेशन आहे याचा अर्थ इतर जी जमीन आहे ती कोरडवाहू आहे. आता या १३ टक्के इरिगेशनमध्ये सुद्धा प्रकार आहेत. त्यात पेरीनल इरिगेशन, पार्शल इरिगेशन आणि सिझनल इरिगेशन असे प्रकार आहेत आणि या सगळ्या मिळून १३ टक्के इतकेच इरिगेशनचे प्रमाण आहे. दुर्दैवाने इतर राज्यांच्या तुलनेत आपण मागे आहोत हे मान्य केले पाहिजे. आता प्रश्न असा आहे की, उपलब्ध इरिगेशनचे नियोजन हे नियोजन पद्धतीने व्हावे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी यासंबंधीची सविस्तर टिप्पणी शासनाला सादर केलेली आहे. यानुसार सर्वात वरच्या टोकावर सांगली जिल्हा आहे तर सर्वात खालच्या टोकावर बुलढाणा जिल्हा आहे. वरचे टोक आणि खालचे टोक हे इरिगेशनच्या पद्धतीने बरोबर आणावयाचे असतील तर दांडेकर समितीने शिफारशी केलेल्या आहेत त्यांचा आधार घ्यावा लागेल. दांडेकर समितीच्या शिफारशीसुद्धा दोन प्रकारच्या आहेत. मी मुद्दाम मंत्रिमहोदयांना जाणीव करून देतो की, त्यांचा उस्मानाबाद हा जिल्हासुद्धा इरिगेशनच्या दृष्टीने बॅकलॉगच्या यादीत आहे. अमरावती, बुलढाणा आणि उस्मानाबाद अशी ही यादी आहे. यात दांडेकर समितीने असे सांगितले आहे की, इरिगेशन प्रक्रिया करताना असे करावे की, इरिगेशनची लोकेशन करताना जे डाऊन बिलो जिल्हे आहेत. त्यात अकोला, अमरावती, बुलढाणा, उस्मानाबाद असे जे जिल्हे आहेत त्या जिल्ह्यांना ड्यू वेटेज द्यावे. आज राज्याची इरिगेशनची सरासरी आहे ती चुकीच्या ॲलोकेशनने वाढत चालली आहे असे दिसते. पूर्वीची जी सरासरी आहे ती मेन्टेन झालेली नाही. आणि ती जर मेन्टेन करावयाची असेल तर सांगली जिल्हा जो सर्वात वरचा आहे किंवा असे इतर वरचे जिल्हे आहेत, त्या ठिकाणी नैसर्गिक कामे आहेत ती आपल्याला पूर्ण करावी लागतील, परंतु ॲलोकेशन पद्धती आपण बदललली पाहिजे. खालचे जे जिल्हे आहेत, इरिगेशनच्या दृष्टीने त्यांना आपण झुकते माप दिले पाहिजे. आणि यामध्ये कुठे तरी सुवर्ण बिंदू आपण काढला पाहिजे की, जेणेकरून ५-६-

८-१० वर्षात ॲव्हरेज सरासरीमध्ये हे जिल्हे येतील. कितीही झाले तरी सांगली जिल्ह्याच्या टक्केवारीपर्यंत पोहोचणे हे शक्य आहे. तेव्हा दांडेकर समितीने दिलेल्याप्रमाणे हे पर्याय आहेत.

अध्यक्ष महाराज, माझी दुसरी सूचना अशी आहे की, विदर्भातील जवळजवळ २०० प्रकल्प अत्यंत क्लिष्ट आणि अनावश्यक अशा फॉरेस्ट कायद्यामुळे अडकून पडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी या संदर्भात विवेचन केलेले आहे. मी या ठिकाणी आपल्याला एक माहिती देऊ इच्छितो. नागपूरचे आयुक्त श्री. एम. आर. पाटील यांनी शासनाला एक नोट पाठविलेली आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, वर्धा जिल्ह्यातील इतकी लाख एकर झुडपी जंगल फॉरेस्टकरिता देतो. त्यामुळे विदर्भातील प्रकल्प पूर्ण होतीलच होतील परंतु त्याचबरोबर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पसुद्धा पूर्ण होतील. अशा तऱ्हेचे प्रप्रोजल श्री. एम. आर. पाटील यांनी शासनाला दिलेले आहे. हे जर असेल तर मग माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाशी संपर्क साधून जर आम्ही तुम्हाला इतकी रिक्वायर फॉरेस्ट जमीन देण्यास तयार आहेत तर अडविता का असे विचारले पाहिजे. आपण अप्पर वर्धा प्रकल्पामध्ये लक्ष घातलेले आहे याची मला जाणीव आहे. अप्पर वर्धा धरण भरले आहे. पाणी सोडले तर पुढच्या वर्षी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटू शकतो. परंतु नथिंग डुईंग. केंद्राने सांगितले की, जेवढे साचलेले पाणी आहे ते सोडून रिकामे करा आणि आम्हाला त्याला झाडे मोजू द्या. त्यांना जी पाहिजे होती तेवढी फॉरेस्टची एरिया दिलेली आहे. असे असले तरी साचलेले पाणी सोडून द्या म्हणून सांगतात. आपण थेंब थेंब पाणी अडवितो आणि दिल्लीवाले सांगतात पाणी सोडून द्या. आम्हाला झाडे पाहू द्या.

अध्यक्ष महाराज, दुसरी एक गोष्ट मला अशी समजली आहे की, कोरडवाहू प्रकल्पासंबंधी तुम्हाला नवीन तंत्राचा उपयोग करावा लागेल. या संदर्भात राज्य सरकारचे एक डेप्युटेशन इस्त्रायलला जाणार आहे. इस्त्रायलने वाळवंटाचे नंदनवन कसे केले त्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

परंतु या ठिकाणी मी ऑफर देतो. मी या डेप्युटेशनबरोबर स्वत:च्या खर्चाने जाण्यास तयार आहे. विमानाच्या तिकिटाचा खर्च झाला, तेथील खर्च माझा. सरकारचा पैसा नको. पाहा, मी येण्यास तयार आहे. कोरडवाहू शेतीच्या संदर्भात परिवर्तन करून हिरवीगार जमीन कशी केली ती पाहून त्याचा उपयोग आपल्या राज्याला व्हावा म्हणून एन्टायटल असलेले अधिकारी आणि पदाधिकारी या डेप्युटेशनबरोबर जाणे स्वाभाविक आहे. परंतु काही लोक पुढे आले व स्वत:च खर्च करून जात असतील तर व त्या संदर्भात तुम्ही विचार करीत असाल तर मी त्या डेलिगेशनबरोबर येण्यास तयार आहे. मग आपल्याला कोरडवाहू जमिनीचा प्रश्न कसा सोडविता येईल याचादेखील विचार करता येईल. माननीय सदस्य श्री. विष्णू अण्णा पाटील यांनी या ठिकाणी जो प्रश्न मांडला त्याचे मी समर्थन करतो. कृष्णेच्या खोऱ्याचे पाणी २ हजार सालापर्यंत नव्हे तर तो दोन हजार सालापूर्वी आपण अडविले नाही तर ते वाया जाईल. परंतु ते पाणी अडविल्यामुळे मोठे प्रोजेक्ट अफेक्ट होता नये. आपल्याला जर हे करायचे असेल तर डिबेंचर काढा, लोन घ्या, सत्याग्रह करा. तुम्ही सत्याग्रह करा. आम्हीदेखील करू. आम्ही हे कृष्णेचे पाणी अडवू. कारण हे आपल्या राज्याचे पाणी आहे. स्वराज्याचे पाणी आहे. एकट्या वेस्टर्न महाराष्ट्राचे पाणी नाही. असे जर आपण केले तर राज्याचा हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटू शकेल एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

अविवेकी वन कायद्यामुळे अडलेला विकास

(२८ एप्रिल, १९९३)

१९८० साली भारतीय वन कायदा अधिनियम अस्तित्वात आला. त्यात इतक्या जाचक अटी होत्या की त्यामुळे लहान मोठी धरणे, तलाव, पाझर तलाव, रस्ते आदी विकासाची कामे अडून पडलीत. विदर्भातील अशा प्रकल्पाची यादीच श्री. रा. सू. गवई यांनी विधानपरिषदेत सादर केली. या नियमांचा अडसर दूर करून योग्य सुधारणा करण्यासाठी शिफारस करणारा प्रस्ताव त्यांनी सादर केला होता. त्यावेळी झालेले त्यांचे भाषण.

सभापती महोदय, या कायद्यामुळे कमीतकमी २५० तरी लहान मोठे प्रकल्प अडलेले आहेत. १९८० चा हा कायदा आहे. त्यामधील तरतुदी इतक्या विसंगत आहेत की, जवळजवळ या कायद्यामुळे आपल्या येथील सर्व प्रकल्पाची अडवणूक होणार आहे. आज अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत. काहींची ५० टक्के कामे झालेली आहेत तर काही प्रकल्प सुरू आहेत. अप्पर वर्धा धरणाचे उदाहरण मा. मंत्र्यांना माहीत आहे. आता केंद्र शासनाने नवीन शोध लावला की, तुम्ही धरणातील पाणी सोडून द्या, आम्हाला झाडे मोजावयाची आहेत. अडविलेले पाणी सोडावयाचे याला काही अर्थ आहे काय? दुसरे म्हणजे धरणामध्ये बेट ठेवू नका. कोणत्या धरणात बेट आहे. हा जावईशोध यांनी लावला कोठून? तिसरे असे की, पुनर्वसनाची खात्री अगोदर द्या. त्यानंतर या प्रकल्पामुळे जी जमीन जाते तिचे वनीकरण हा आपण सामाजिक वनीकरणाकडे काम सोपविलेले आहे व त्याची पूर्ती केलेली आहे. दुसरे असे की, राज्य शासनाकडून जे पर्यायी वनीकरण होणार आहे हे पर्यायी वनीकरण करून आमच्याकडे द्या. दुसरे असे की, पाणलोट क्षेत्रामध्ये मेंढ्या व गुरांची संख्या बरीच असेल तर त्यांच्या चराईसाठी स्टॉल फिडींग करून द्या असे सांगितले जाते. कामगारांसाठी जळणाची व्यवस्था करा. म्हणजे जळणाचे काम मा. मंत्रिमहोदय श्री. पद्मसिंह पाटील यांच्याकडे दिले तर केंद्र शासन धरणे बांधणार आहे का? किती जाचक आहे हे? यवतमाळमधील अरुणावती प्रकल्प आता जवळजवळ पूर्ण झालेला आहे. केंद्र सरकार म्हणते की, ५ वर्षांचा कालावधी ३ वर्षांनी कमी करा आणि तो दोन वर्षे करा. म्हणजे धरणे आम्ही बांधणार, पैसा आमचे राज्य सरकार खर्च करणार आणि अटी व बंधने मात्र केंद्र शासन घालणार. अध्यक्ष महाराज, ही सर्व त्रोटक माहिती मी आपल्याला सांगितलेली आहे. आपल्या राज्यातील सर्व प्रकल्प क्लिअर होतील अशी एक पर्यायी योजना नागपूर विभागाच्या आयुक्तांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठविलेली आहे. वास्तविक पाहता वन खात्यातील जमिनी व इतर कामासाठी वापरावर वन कायद्यामध्ये झुडपी जंगले अशी संज्ञाच नाही. परंतु भारत सरकार हा हट्ट धरीत आहे. हा बालहट्ट आहे की राजहट्ट आहे हे आपणच सांगा. वेस्टर्न महाराष्ट्रामध्ये झुडपी जंगले आहेत. काही ठिकाणी त्याला गायरान म्हणतात तर काही ठिकाणी त्याला गावठाण म्हणतात. त्यांना वनरक्षण कायदा लागू होत नाही. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील गायराने, गावठाणे यांना वनरक्षक कायदा लावला नाही. पण ज्या ठिकाणी झुडपी जंगलाचे पोटॅशिअल जास्त आहे त्या विदर्भाला वनरक्षणाचा कायदा लावा असा केंद्राचा आग्रह आहे. अध्यक्ष महाराज, आपण नागपूरच्या आयुक्तांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी महाराष्ट्र शासनाला नोट पाठवून यावरच उपाय सांगितला. वर्धा, भंडारा, गडचिरोली,

चंद्रपूर या सर्व जिल्ह्यांतील सर्वेक्षण कलेक्टरमार्फत करण्यात आले. ६८ हजार ७९९ हेक्टर जमिनीचे रिझर्व्हेशन करून ठेवलेले आहे. ही जमीन फॉरेस्ट कायद्याप्रमाणे आपण केंद्र शासनाला देऊ शकतो. ही जमीन जर त्यांना दिली तर महाराष्ट्रातील सर्व २००-२५० प्रकल्प पूर्ण होतील. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मी आपल्याला कायद्यातील अडचणी सांगितल्या त्याप्रमाणे कायदा दुरुस्त करावा यासाठी नागपूरच्या विभागीय आयुक्तांनी शासनाला प्रस्ताव दिलेला आहे हे देखील सांगितले. हा प्रस्ताव जर आपण पर्स्यु केला तर महाराष्ट्रातील प्रकल्पासंबंधीचा प्रश्न कायमचा मिटेल आणि अडलेले प्रकल्प मार्गी लागतील. अध्यक्ष महाराज, माझा काही संपूर्ण महाराष्ट्राचा अभ्यास झालेला नाही. माझ्याजवळ ८ जिल्ह्यांचा अभ्यास आहे. जवळजवळ ८-९ वर्षांपासून हे प्रकल्प पूर्ण व्हावेत यासाठी आपला केंद्राकडे पत्रव्यवहार सुरू आहे, त्याला गती यावी.

❑❑❑

कायदा सुव्यवस्था स्थिती

(१३ जुलै, १९९३)

शिवसेनेचे आमदार रमेश मोरे, भाजपाचे प्रेमकुमार शर्मा व मुस्लिम लीगचे झियाउद्दीन बुखारी यांची हत्या झाली. त्यांचे मारेकरी बऱ्याच काळपावेतो पोलिसांना मिळाले नाहीत. त्यामुळे विरोधी पक्षांनी मुख्यमंत्र्यांच्या परंपरागत चहापानावर बहिष्कार घातला. राज्यातील कायदा-सुव्यवस्था यांचा प्रश्न विधानपरिषदेत उपस्थित झाला.

श्री. रा. सु. गवई यावेळी म्हणाले, राज्यात ज्या दंगली होतात त्याच्या मुळाशी आपण गेले पाहिजे. नाहीतर जखम पायाला व उपचार डोक्याला असा प्रकार होईल. तसे होऊ नये. मुंबई दंगल ज्या पद्धतीने मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त श्रीकांत बापट यांनी हाताळली. त्याबद्दल मुक्तपणाने त्यांचे कौतुकही श्री. गवई यांनी केले पण बापट यांच्यासारख्या प्रभावी पोलीस आयुक्तांची बदली का केली असाही सवाल त्यांनी सरकारला केला.

मुंबईतील दंगलीनंतर नुकसानभरपाई म्हणून मोठ्या प्रमाणावर पैसे वाटण्यात आले त्याबद्दल चिंता व्यक्त करून दादासाहेब गवई म्हणाले की भायखळ्याजवळ जनावरे कापतात तशा प्रकारे चार पोलिसांना कापण्यात आले. त्या पोलिसांनाही मदत घोषित झाली असती तर योग्य झाले असते.

अध्यक्ष महाराज, मी सुरुवातीलाच आपल्याला अभिवचन देऊ इच्छितो की, कोणतेही राजकारण मनात न आणता या विषयावर एक सांस्कृतिक आणि ॲकेडमिक भाषण मी येथे करणार आहे.

अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांच्या चहापानाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाल्यानंतर या सभागृहातील विरोधी पक्षनेते श्री. अण्णा डांगे आणि खालच्या सभागृहातील

विरोधी पक्षनेते श्री. अण्णा डांगे आणि खालच्या सभागृहातील विरोधी पक्षनेते श्री. मुंडे यांनी भावनेच्या विषयाला स्पर्श केला आणि श्री. रमेश मोरे, श्री. प्रेमकुमार शर्मा यांचा खून झाल्यानंतर त्यांचा खून करणाऱ्या मारेकऱ्यांना अजूनही पकडण्यात आले नाही म्हणून या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घातला. त्यावेळी माझ्या मनामध्ये श्री. झियाउद्दीन बुखारी यांचेदेखील नाव होते. परंतु त्यावेळी मी काही बोललो नाही. माझ्या मनामध्ये मात्र त्यांचे नाव होते.

अध्यक्ष महाराज, श्री. मोरे यांचा खून झाल्याची बातमी मी नागपूरला ऐकली. त्यावेळी मला खूप वाईट वाटले. श्री. मोरे यांची संस्कृती शिवसेनेपेक्षा वेगळी होती. ते अत्यंत सौजन्याने वागणारे होते. अशा एका चांगल्या राजबिंड्या व्यक्तीचा खून झाला आहे हे मला जेव्हा समजले त्यावेळी अक्षरशः माझ्या डोळ्यातून अश्रू आले. या सभागृहामध्ये येऊन त्यांना एक वर्ष सुद्धा झाले नव्हते आणि अशा व्यक्तीचा खून झाला म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांच्या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घालण्यात आम्ही सामील झालो.

अध्यक्ष महाराज, ज्या दंगली होत असतात त्या का होतात, त्या दंगलीचे सोर्स काय आहेत याच्या खोलात जर आपण शिरलो नाही तर मग जखम पायाला आणि पट्टी मात्र डोक्याला असे होऊ शकते तेव्हा असे घडता कामा नये असे मला सांगावयाचे आहे. अध्यक्ष महाराज, हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे अत्यंत कमी वेळामध्ये भाषण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. आताच येथे सन्माननीय सदस्य श्री. मोरे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे अँटॉप हिल भागात झालेले बलात्कार, नगर जिल्ह्यातील श्री. फासे आणि कळंब तालुक्यातील श्री. लोंढे याचे झालेले नरबळी, तर हे सारे प्रकार वेदना देणारे आहेत. पण यासंबंधी विचार केला तर या प्रकारांचा उगम कोठून आणि कसा होतो हे पाहणे अगत्याचे आहे. एखादा घोडेस्वार लढाईमध्ये लढता लढता मारला जातो कारण काय तर घोड्याच्या पायाचा नालेचा खिळा निखळून पडल्याने घोडा लंगडू लागला आणि त्याचे पर्यवसान वरचा स्वार खाली पडला आणि शत्रूने संधी साधून त्याला मारला. म्हणजे निमित्त काय झालेतर घोड्याच्या नालेचा खिळा निखळला. या साध्या गोष्टीचा परिणाम काय होतो, त्याची दुरवस्था काय होते. याचे विवेचन मी करणार आहे. गुंडगिरी अजूनही जेथे संस्कृती आहे तेथे नाही. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले आहे तेथे ही गुंडगिरी आली, ती कशी आली ते सांगता येईल. तर कमीत कमी विभागीय आणि जिल्हा पातळीवर ही गुंडगिरी पोहोचली आहे, मात्र तालुक्यापर्यंत ती पोहोचलेली नाही. अध्यक्ष महाराज, अकारण विदारक चित्र जनतेपर्यंत पोहोचविणे हे जनप्रतिनिधींचे कर्तव्य नाही. ६ डिसेंबरची जी घटना घडली आणि त्यानंतर म्हणजे अयोध्येची मशीद पाडल्यावर स्वाभाविकच त्याची प्रतिक्रिया सर्वच मुसलमानांमध्ये जरी नाही तरी जे धर्मांध, अराष्ट्रीय, गुंड वृत्तीचे मुसलमान होते त्यांच्यावर झाली व ते रस्त्यावर आले. आता कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये भावनांचा प्रश्न आम्ही समजू शकतो आणि त्या भावनांचा निपटारा कसा करावा तो वेगळा भाग. अशा नाजूक प्रश्नावर नाजूकपणे, रेशमी रुमालाने टिपणे आवश्यक असते. परंतु रस्त्यावर कोण येणार आहे, कोण आले आहे याची पर्वा न करता त्यावेळी ती दंगल त्यावेळचे पोलीस आयुक्त श्री. बापट यांनी परिणामकारकरीत्या हाताळली. अशा वेळी पोलिसांचे मनोबल खचता कामा नये याचीही काळजी घेतली गेली पाहिजे आणि सुदैवाने आज महाराष्ट्रातील नव्हे मुंबईतील पोलीस देशाच्याच नव्हे तर स्कॉटलंड यार्ड पोलिसांच्या दर्जाचे समजले जाते... अर्थात उडदामाजी काळे गोरे हे असतातच.

तर सांगण्याचे तात्पर्य हे की, त्यावेळी दंगल शमविण्याचे चांगले काम केल्यानंतरही पोलीस आयुक्त श्री. बापट यांची बदली का झाली? त्यांच्या बदलीचे कारण सांगण्यात आले की ते ब्राह्मण होते, आता त्यांची जात कोणती ते मला माहीत नाही. पण मुंबईच्या पोलिसांचे पहिले डिमॉरलायझेशन हे तेथे झाले. त्यानंतर पुन्हा त्या दंगलीची चौकशी नेमली गेली हे दुसरे डिमॉरलायझेशन. आतापर्यंत या देशात हिंदू-मुस्लीम यांच्यात अनेक दंगली झाल्या. आदिवासी-सवर्ण-दलित यांच्यामध्येही दंगली झाल्या. पण मुंबईत यावेळी झालेल्या दंगलीनंतर ज्या रीतीने पैसे वाटण्यात आले नुकसानभरपाई देण्यासाठी म्हणून, त्यामुळे कळत नकळत तो विषय लोकांच्या चर्चेचा झाला आणि हीसुद्धा यामध्ये मोठी विसंगती होती. यापूर्वीच्या दंगलीमध्ये असे कधीही घडले नव्हते, मग आजच का घडले? दुसरे असे की, हे सारे झाले असताना या दंगलीच्या काळात जे पोलीस मेले त्यांच्या नावाचा उच्चारही कोठे झाला नाही. भायखळ्याजवळ जनावरांना कापतात तसे ४ पोलीसवाले कापले गेलेले आहेत, आणखीही असंख्य आहेत. त्याचबरोबर अशी घोषणा झाली असती की, पोलिसांनाही संरक्षण दिले आहे, पोलिसांचीही व्यवस्था केली आहे, पोलिसांनाही दिलासा दिला आहे, पोलिसांनाही मदत केली आहे, तर ते योग्य झाले असते. हिंदूची घरे मुसलमानांनी वाचविली आहेत.

अध्यक्ष महाराज, संस्कृती मोठी आहे, सौजन्य मोठे आहे. ही दंगल आजच घडली आहे काय? भिवंडी, अकोला, जळगाव, नागपूरलाही दंगली झाल्या आहेत. अनेक उदाहरणे आहेत. मुसलमानांची घरे हिंदूंनी वाचविली आहेत. हिंदूची घरे मुसलमानांनी वाचविली आहेत. तेव्हा ही संस्कृती आहे. परंतु सहा डिसेंबरला विपर्यास झाला आणि हे स्वरूप आले. माझ्या माहितीप्रमाणे दंगल शमली होती. परंतु राजकीय अपोक्तपणाअभावी पुन्हा हे घडले आहे. हिंदुत्व सिद्ध करण्याकरिता अयोध्याला मस्जिद पाडण्यात आली. आणि याबाबत भारतीय जनता पक्षात आणि शिवसेनेत चढाओढ लागली. त्यांच्यामध्ये ही स्पर्धा सुरू होती. त्यावेळी अनेक प्रकारची आकडेवारी देण्यात आली. पोलिसांचा फोर्स इतका तर आमच्याजवळ एवढा फोर्स आहे, असे त्यावेळी म्हटले गेले. असे म्हणणे कोणत्याही राजकीय पक्षाच्या, कोणत्याही मोठ्या जनप्रतिनिधीला सामंजस्याचे नाही. त्यामुळे शांतता निर्माण करू शकलो नाही. भिवंडीत झालेल्या दंगलीनंतर मी आणि आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी त्या ठिकाणी भेट दिली. तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, हिंदूंनी मुसलमानांची घरे वाचविली तर मुसलमानांनीही हिंदूंची घरे वाचविली. ही संस्कृती आहे. ही संस्कृती नष्ट झाली आणि नवीन संस्कृती आली तरी चालेल असे म्हणणे आणि त्याप्रमाणे वागणे कोणत्याही राजकीय पक्षाच्या दृष्टीने बरोबर नाही. हे देशाच्या तसेच राज्याच्या हिताच्या दृष्टीने बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, बापटांची बदली झाली असे वक्तव्य त्यावेळी करण्यात आले. आय. पी. एस. अधिकाऱ्याची बदली करता येत नाही, त्याला राजीनामा द्यावा लागतो. अध्यक्ष महाराज, त्यावेळी अशा प्रकारचे वक्तव्य करून बापटांवर अन्याय केला हा दुसरा भाग झाला. अध्यक्ष महाराज, त्यानंतर मी श्री. बापटांना फोन केला होता. अध्यक्ष महाराज, बापटांनी हिंदूंच्या वस्त्या वाचविल्या तसेच मुसलमानांच्याही वस्त्या वाचविल्या. अशा अधिकाऱ्यांची अशा प्रकारे कदर केली तर पोलिसांचे नीतीधैर्य टिकेल काय? म्हणून अशा वेळी हा विचार सोडण्याची गरज आहे. माननीय विरोधी पक्षनेते अण्णासाहेब डांगे जे बोलले त्याचाच हा भाग आहे. अध्यक्ष महाराज, दंगल झाल्यानंतर मा. शरद पवार मध्यस्थी करण्याकरिता आले त्यानंतर श्री. शंकरराव चव्हाणही मध्यस्थी करण्याकरिता आले. अध्यक्ष महाराज, या

एचबी ११८०—३३

ठिकाणीही राजकारण आणले गेले. अध्यक्ष महाराज, माझा राजकीय विरोध मी समजू शकतो. मी काँग्रेस पक्षाचा राजकीय विरोधक आहे. मा. मुख्यमंत्री श्री. शरद पवारांचा विरोधक आहे. परंतु त्यांचा मी राजकीय शत्रू नाही. आमचे मतभेद झाले तरी आमचे जेवणखाणे तीन-चार वर्षे बंद नव्हते. सध्याही सुरू आहे.

ते समोर बसले आहेत. मी खोटे बोलत आहे असे ते उभे राहून म्हणणार नाहीत. सभापती महोदय, आपण काल या ठिकाणी श्रद्धांजली अर्पण करीत असताना इंग्रजीमध्ये एक कोटेशन दिले ते केवढे सुंदर होते. That is essence of democracy, There are bound to be differences and two sincere opinions bound to differ. परंतु त्यामुळे अकारण आरोप करणे किंवा कुणाचेही ऐकून न घेणे हे बरोबर नाही. या पार्श्वभूमीवर अहमदनगरला निवडणुका लागल्या. अर्जदार श्री. विखे पाटील, गैरअर्जदार श्री. गडाख आणि भाषण देणारे त्यावेळचे मुख्यमंत्री पुढारी म्हणून नोटीशी श्री. शरद पवार. मी जजमेंट वाचले आणि मग श्री. शरद पवार यांनी राजीनामा दिला पाहिजे. माझी त्यांच्याबरोबर खाजगी चर्चा झाली. माझ्या काँग्रेसने न्यायालयाचा हा निर्णय मान्य केला तरी म्हातारी मेल्याचे दु:ख नाही काळ सोकावतो. यापुढे आपल्याला जाहीर सभेमध्ये काही बोलता येणार नाही. कमीतकमी या प्रश्नाच्या बाबतीत प्रामाणिक राहिले पाहिजे. मतभेद राहातील. मतभेद राहून दोष समोर ठेवता येतात. कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीबाबत मी असे म्हणतो की, कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीच्या प्रॉब्लेमचा जन्मसिद्ध हक्क हा रिपब्लिकन पार्टीचा होता. त्यावेळी पाच-पाच लाखांचे मोर्चे निघत, परंतु कोठे काही घडले नाही. रिडल्सचा दहा लाखाचा मोर्चा झाला परंतु काही घडले नाही. ज्यावेळी बी. जे. पी.चा मोर्चा निघायचा त्यावेळी पोलीस कॉग्निजन्स घेत नव्हते ते म्हणायचे, काय करणार आहेत, काही करू शकत नाहीत. प्रश्न असा आहे की, हा हक्क शिवसेना आणि बी. जे. पी. दोघांनी हिरावून घेतला. माझे असे म्हणणे आहे की, राजकारणाचे व्रत तुम्ही एकदा स्वीकारल्यानंतर कुरकुर, तक्रार का करता? आम्ही जेलमध्ये गेलो, आम्हाला काठ्या बसल्या, आम्हाला मार बसला, मा. सदस्य श्री. दि. बा. पाटील यांचेसह तीन महिने नाशिकच्या जेलमध्ये राहिलो. आम्ही कुरकुरलो काय? आमचे म्हणणे असे की, तुम्हाला व्यवस्थित राज्य करायचे असेल तर हरकत नाही. राम आणि कृष्ण पावला तर तुमचेही राज्य येऊ शकेल. परंतु ते राज्य येण्यासाठी ... परंतु कायदा व सुव्यवस्थेच्या कारणासाठी मा. मुख्यमंत्री श्री. शरद पवार हे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पाठिंबा देतात हा आरोप मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांच्यावर नाहीतर या राज्याचा एक मुख्य माणूस आहे. त्याच्यासंबंधी बेदिलीचे वातावरण तयार करून आपण यामध्ये लोकांची फसवणूक करीत आहोत, आणि म्हणून त्याचा विचार राजकारणामध्ये केला. त्याचे परिणाम काय झाले? अयोध्येच्या प्रकरणानंतर बांगला देशामध्ये बुलडोझर चालवून हजारो चर्च, बुद्ध विहार, शिखांचे गुरुद्वार, मंदिरे पाडली. पाकिस्तानात तेच घडले. इंडोनेशियामध्ये सुरू झाले होते परंतु ते थांबले. आपण एक मशिद पाडल्यानंतर दोन हजार मंदिरे पाडली जातात. हिंदूचे प्रेमी आणि हिंदूंचे दुश्मन यांनी आमचा विचार करावा. आमच्या एका कृतीमुळे लंडन, पाकिस्तान, बांगला देश आणि मुस्लीम कंट्रीमध्ये आता या ठिकाणच्या हिंदूंना दुय्यम दर्जा मिळणार आहे. याचाही विचार करावा. सामान्यपणे याचा विचार केला तर आपण मूल्यमापन करावे की गुंडांचा वापर निवडणुकीसाठी करणारे कोणते पक्ष आहेत. अर्थात आम्ही बसत नाही.

❑❑❑

जन्मताना भारतीय, मरतानाही भारतीयच

(२१ जुलै, १९९३)

अयोध्या प्रकरणानंतर उसळलेल्या जातीय दंगलीवर भाष्य

प्रश्न कितीही तीव्र भावनांचा असला तरी दादासाहेबांनी तर्काची साथ कधीही सोडली नाही. त्यासाठी होणारा त्रास त्यांनी सोसला पण आपला मुद्दा सोडला नाही. ६ डिसेंबर, १९९२ रोजी अयोध्येतील बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्यानंतर त्या घटनेची देशभर प्रतिक्रिया उमटणे स्वभाविकच होते. त्यामुळे उफाळलेल्या जातीय दंगलीचे प्रतिध्वनी विधानपरिषदेत उमटणेही तेवढेच स्वाभाविक होते. पण त्या प्रक्षुब्ध वातावरणातही दादासाहेबांनी विवेकाची कास सोडली नाही. २१ जुलै १९९३ रोजी झालेल्या चर्चेतील त्यांचे भाषण उद्‌बोधक होते.

सभापती महोदय, सर्वप्रथम माननीय सदस्य डॉ. इसाक जामखानवाला यांनी केलेल्या भाषणाबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. ते यासाठी, की, ज्याला रॅशनल थिंकिंग म्हणता येईल त्या विचाराने त्यांनी भाषण केले आहे. आलटून-पालटून काही विषय आले, त्यावर चर्चा झाली त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु शेवटी हिंदू-मुसलमानांमध्ये जो तणाव दिसत आहे हा विषयाचा भाग बनणार आहे. त्या दृष्टीने अत्यंत सामंजस्यपूर्ण भाषण मा. श्री. जामखानवाला यांनी केले आहे. प्रश्न हा की, यामध्ये जातीयवादी काय आहे? म्हणजे परस्परांच्या जाती-धर्मासंबंधी, समाजासंबंधी आदर नसणे आणि त्यामुळे त्या जाती धर्मामध्ये वाद होईल त्याला जातीयवाद म्हणतात. मी माझ्या मित्रांना विचारतो की, जर भगवान महावीर आणि भगवान बुद्धाची भारतीय संस्कृती आज अस्तित्वात असती तर ही चर्चा सभागृहात झाली नसती. दुर्दैवाने महावीर आणि भगवान बुद्धाची खरी भारतीय संस्कृती नष्ट झाली आणि म्हणून आजचा हा हिंदू धर्म भगवान बुद्धाचा, महावीराचा, भारतीय संस्कृतीचा हिंदू धर्म आहे. असे मी मानीत नाही. आज आपण पाळतो तो हिंदू धर्म छत्रपती शिवाजी महाराजांचा, शाहू महाराजांचा, महात्मा फुल्यांचा, बॅरिस्टर सावरकरांचा, आगरकरांचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, स्वामी विवेकानंदांचा आहे असे मी मानीत नाही. मी मुद्दाम या महान नेत्यांची नावे घेतली. आजचा हिंदू धर्म हा वेद सिद्धांताचा हिंदू धर्म, किंवा भगवद्‌गीतेतील अध्याय १३ आणि १४ व्याचा जो अन्वयार्थ जो निघतो तो हिंदू धर्म आहे. तो मी मानीत नाही. जगामध्ये सर्व धर्म, सर्वव्यापी उदार अंत:करणाने धर्म, आचार, विचार, श्रद्धा या सर्वांना वाव देणारा एकमेव हिंदू धर्म आहे. पण तो राहिला आहे काय? नाही. मी बौद्ध असलो तरी त्या संस्कृतीचा मला अभिमान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला तो भारतीय संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी. बॅ. जिनांनी बदला घेतला, बॅ. जिनांनी राष्ट्रीय सभेत पं. नेहरू, म. गांधी, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद यांच्या बरोबर स्थान घेतले, पण राष्ट्रीय सभा बॅ. जिनाला कन्व्हर्ट

एचबी ११८०—३३अ

करू शकली नाही. मा. सदस्य श्री. अण्णा डांगे यांनी म्हटल्याप्रमाणे देश तोडायचा काय ? पाकिस्तानी करावयाचा आहे काय ? आता मा. सदस्य श्री. जावडेकरांना मी सांगितले की जेव्हा घटना समितीमध्ये पं. नेहरूंचे पॉलिसी डेव्हलपमेंट फॉर इंडिया प्रस्ताव आला, त्याला विरोध करण्यात आला. सांगितले की जिनांचे ७४ सदस्य गैरहजर आहेत. ही चर्चा थांबवावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की चर्चा थांबविण्याची गरज नाही. प्रश्न असा आहे की, जिनांची मागणी ही सत्तापिपासू मागणी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की सारे मुसलमान हे सत्तापिपासू नाहीत. सारे मुसलमान भांडवलधार्जिणे नाहीत. शाही इमामांच्या फतव्यानंतर देखील २६ जानेवारीला काही मुसलमानांनी बहिष्कार पुकारला नाही. ना काँग्रेस पक्षाने वा ना तत्कालीन बॅ. जिनांच्या पुढाऱ्यांनी त्याचे प्रबोधन केले नाही.

अध्यक्ष महोदय, आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ऋणी आहोत की त्यांनी सांगितले की, माझ्यावर अन्याय केला. माझ्या तोंडी नसताना माझ्या तोंडात ते नाव घातले. ह्या भारताचे तुकडे माझ्या स्वप्नात नव्हते. वर्ण व्यवस्था जाती व्यवस्था विरुद्ध, हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांविरुद्ध, काँग्रेस पक्षा विरुद्ध. म. गांधी विरुद्ध व तत्कालीन बी. जे. पी. चे पुढारी यांच्या विरुद्ध माझे भांडण राहील, पण माझ्या लोकांना राष्ट्रीय मध्यत्वापासून मी दूर जाऊ देणार नाही. येत्या भविष्यात माझ्या लोकांची मान ताठ राहील आणि नाक वर राहील. त्यांनी बुद्ध धर्म स्वीकारला. डॉ. आंबेडकरांनी उपकार केले आहे की, त्यांनी भारतीय संस्कृती दिली. मला म्हणावयाचे आहे की हे प्रबोधन घडले नाही. हे प्रबोधन का घडले नाही? शेवटी वस्तुस्थिती नाकारता येत नाही. १४ कोटी मुसलमानांना ह्या देशामधून हाकालण्याची मागणी ही कोणाच्याही शक्तिपलीकडे आहे. सारे मुसलमान अराष्ट्रीय आहेत असे म्हणणे चूक आहे. कारण शाही इमामांचा फतवा त्यांनी फेकून दिला. दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ती एक दोन टक्के असतील. मा. सदस्य श्री. जामखानवाला म्हणतात त्याप्रमाणे कॉमन सिव्हिल कोड यासंबंधी श्री. गोळवलकर गुरुजी हे श्रद्धा, पूजा आचरणात आणतात. भिन्न धर्मीयांना त्यांच्यामध्ये ॲकोमोडेशन असते. एका देशाकरिता भिन्न कोड असे कसे शक्य आहे? याचे प्रबोधन मुसलमान पुढाऱ्यांनी केले पाहिजे. बी. जे. पी. चे अध्यक्ष श्री. ना. स. फरांदे यांनी केले पाहिजे. रा. सू. गवईंनी केले पाहिजे. दलितस्थानाची मागणी करणारे श्री. आठवले, श्री. जोगेंद्र कवाडे होते. तेव्हा मी जाहीरपणे सांगितले की, हे मूर्ख आहेत, त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कळले नाहीत.

श्री. टी. एम. कांबळे : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रा. सू. गवई साहेबांनी सांगितले की, श्री. आठवले, श्री. जोगेंद्र कवाडे यांनी दलितस्थानाची मागणी केली. पण मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, श्री. आठवले यांनी अशी मागणी केलेली नाही. श्री. जोगेंद्र कवाडे यांनी केली होती.

श्री. रा. सू. गवई : अध्यक्ष महाराज, काही लोकांनी अशी मागणी केली. तेव्हा मी एकटा उभा राहिलो आणि सांगितले की, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी नाहीत, हे दुष्ट आहेत. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कळले नाहीत. त्यावेळी माझ्या घरावर मोर्चा आला होता आणि त्या मोर्चामध्ये श्री. कांबळे साहेब तुमचेही अनुयायी होते. पण तुम्ही प्रबोधन करण्याची भूमिका स्वीकारणार आहात की नाही? मुस्लिमांना राष्ट्रीय प्रवाहामध्ये आणण्याचे काम इतरांप्रमाणे सत्ताधारी पक्षाचेही आहे. पण त्यांनी केले नाही. त्यांनी तुम्हाला मताच्या याचनेसाठी आतापर्यंत गुलाम केले असा स्पष्ट आरोप आहे. पण आता आम्ही प्रबोधनाचे कार्य स्वीकारले पाहिजे. कारण १४ कोटी मुसलमानांना या देशाच्या बाहेर जाणे शक्य नाही, त्यांना

कोणी हाकलून देऊ शकत नाही. मग जे मुसलमान आहेत त्यांना राष्ट्रीय प्रवाहामध्ये आणण्याचे काम केले पाहिजे. मी एकट्याने हे काम सुरू केले आहे. २५ वर्षांच्या आतील ३० मुस्लिम भगिनी, ज्यांना तलाक, तलाक, तलाक असे तीन वेळा म्हणून तलाक दिला आहे. अमरावती शहरामध्ये मिसेसच्या नावाने ट्रस्ट आहे, दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट आहे त्यांनी त्यांना दत्तक घेतले आहे. त्यांना शिलाई मशीन दिले आहे आणि महिन्याला २०० रुपये ट्रस्टतर्फे दिले जातात. मी तेथील मुस्लिम वस्तीमध्ये गेलो, आता मी तीन लाख भगिनींचा मोर्चा काढू शकेन. तुम्ही प्रबोधन करणार आहात का ? Sir, fundamentalists on either side are to be condemned. शेवटी जातीयवादाचा पहिला बळी या देशाचा पडला. या देशाचे दोन तुकडे झाले. जातीयवादाचा दुसरा बळी राष्ट्रपिता महात्मा गांधी पडले आणि मग रॅशनल थिंकिंग पडले, परंतु एकदा कृती झाल्यानंतर त्याची प्रतिकृती होते हे नाकारता येत नाही याची जाणीव ठेवल्यानंतर अयोध्या मशीद पाडल्यानंतर त्या प्रवृत्तीने झालेल्या प्रतिक्रियेत आपण हिंदूंचे मित्र आहोत की दुष्मन आहोत याचा अंतर्मुख होऊन विचार करावा. सत्तास्पर्धा ही स्वाभाविकता आहे. पण सत्तास्पर्धेचे साधन हे इंडियन फर्स्ट आणि इंडियन लास्ट हे आहे. मी विचारू इच्छितो की, जातीयवाद मग साडेतीन टक्के ब्राह्मणांच्या हातून पंचांग वाचून घेणे, काळनागाची पूजा करणे. हे स्वातंत्र्य आहे. आचार-विचार पद्धती आहे. श्रद्धेचे ठिकाण आहे. साडेतीन टक्क्यांनी कलमांनी माना कापल्या असतील पण खेड्यापाड्यामध्ये ब्राह्मणाचे एकही घर नाही. लग्नासाठी ब्राह्मण मिळत नाही. तेथील आदिवासींना, व्ही. जे. एन. टी.च्या लोकांना कोण मारते? त्या त्या राज्यातील जो बहुजन समाज आहे. जसा पंजाबातील जाट, महाराष्ट्रातील मराठा, या मराठ्यांच्या मनात ओ. बी. सी. किंवा मंडल आयोगासंबंधी प्रेम आहे काय? या मराठ्यांच्या मनामध्ये दलितांसंबंधी प्रेम आहे काय? मग पुरोगामित्वाच्या गोष्टी सांगताना आपण अंतर्मनात प्रतिगामी आहात, तुम्हाला कोणत्याही प्रतिगाम्यावर टीका करण्याचा नैतिक अधिकार नाही. प्रतिगामित्व हे पूर्ण सिद्ध करून दाखविले आणि अनेक कारणे आहेत की, एका बाजूला आपण मराठ्यांचा सल्ला घेता, दुसऱ्या बाजूला यांचा दंड घेता, त्यांचे हात मंडल आयोगवाल्यांच्या हातामध्ये आहेत आणि डोस्क, महार, मांग, चांभार, बुद्ध व भंगी यांचे अशी अवस्था आहे. मराठवाड्यामध्ये अजूनही सर्वांसाठी मंदिरे खुली नाहीत ही बाब या राज्याच्या दृष्टीने शरमेची नाही काय? मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर झाले पाहिजे हे आपण ठरावाने सांगतो, बोलतो परंतु ते करून दाखविण्याची हिम्मत आहे काय? याला पुरोगामित्व म्हणावयाचे की, प्रतिगामित्व म्हणावयाचे? धिस इज टू वे ट्रॅफिक, नॉट अ वन वे ट्रॅफिक-पुरोगामित्व हे परस्पर पाहिजे आणि फंडामेंटल रिझन ज्याला म्हणतो, प्रतिक्रियावादी हे सुद्धा टू वे आहे, ते वन वे आणले पाहिजे, अंतर्मनात प्रतिगामी आणि व्याख्यानामध्ये पुरोगामी अशांना टीका करण्याचा अधिकार पोहोचू शकत नाही. अध्यक्ष महाराज, अजून नरबळीसंबंधीची माझी लक्षवेधी सूचना यावयाची आहे. या राज्यामध्ये नरबळी कसे घडविले या सर्व कथा मला माहिती आहेत, कुठे आहे पुरोगामित्व? कोणी नरबळी घेतले? कोणी लोकांना मारले. अशा प्रकारच्या सर्व-व्यापी चर्चेमध्ये केवळ परस्परांवर टीका करून चालणार नाही. माझे राष्ट्र आहे. इंडियन फर्स्ट, इंडियन लास्ट, जन्म घेताना भारतीय आहे आणि मरताना भारतीय आहे असे करावे लागेल. या ठिकाणी जात, धर्म, पंथ, धर्मपूजा याच्या विरहित वेगळे असे काही करावे लागेल आणि मग जी संकल्पना येईल ती राष्ट्रीय संकल्पना ठरेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

❑❑❑

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीस महाराष्ट्रात होणारा विलंब

(२६ जुलै, १९९३)

महाराष्ट्रात मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी त्वरेने करण्यात होत असलेल्या विलंबाबाबत विधानपरिषदेत धरमचंद चोरडिया (भाजपा) यांनी ठराव आणला होता. त्यावर बोलतांना श्री. रा. सू. गवई म्हणाले ...

अध्यक्ष महाराज, सर्वप्रथम या प्रस्तावाचे प्रवर्तक सन्माननीय सदस्य श्री. धरमचंद चोरडिया यांनी या ठिकाणी जे काही विचार व्यक्त केले त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, महात्मा फुले यांनी हंटर कमिशनसमोर जी काही साक्ष दिली होती तेव्हापासूनचा इतिहास सन्माननीय सदस्य श्री. धरमचंद चोरडिया यांनी या ठिकाणी सांगितला. परंतु हा इतिहास त्यापूर्वीचा आहे असे मला चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. एका लेखकाने कास्ट अँड रिझर्व्हेशन्स या नावाचे एक पुस्तक लिहिले होते आणि त्या पुस्तकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक कोटेशन वापरण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोटेशन असे होते की,

' The Governing class has obtained its power by the same system of reservation which it is now opposing on the ground of communalism.'

'.....In asking for reservations, survile classes are not asking for anything new or anything Extraordinary. The demand for reservation is a demand for protection against the aggressive communalism of the governing classes, which wants to dominate in all the fields of life and without imposing on the governing classes any such ignonimous conditions'

अध्यक्ष महाराज, मी आताच वाचून दाखविलेले कोटेशन ज्यांना समजले आहे त्यांना कळून येईल की रिझर्वेशन काही नवीन नाही रिझर्व्हेशन जुनेच आहे. वर्ग व्यवस्था, वर्ण व्यवस्था जी तयार झालेली आहे त्यातही एक प्रकारचे रिझर्व्हेशन आहे आणि त्या रिझर्व्हेशनच्या खाली आतापर्यंत जे फायदे मिळाले तो रिझर्व्हेशनचा सिद्धांत जेव्हा दुर्बल घटक मागतात तेव्हा त्याला विरोध होतो ही दुर्दैवाची गोष्ट आहे असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, मी पुन्हा रिपीट करू इच्छित नाही परंतु मला या ठिकाणी हे सांगावयाचे आहे की घटनेतील आर्टिकल १५(४), १६(४) आणि ३४० जर सन्माननीय सदस्य श्री. धरमचंद चोरडिया यांनी वाचले तर त्यांना दिसून येईल की या आर्टिकलमध्ये कोठेही आर्थिक निकषाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता मी या ठिकाणी संविधानातील

१५ वे कलम वाचून दाखवतो. त्या कलमामध्ये असे म्हटलेले आहे की,

"(4) Nothing in this article or in clause (2) of article 29 shall prevent the State from making any special provision for the advancement of any socially and educationally backward classes of citizens or for the Scheduled Caste and the Scheduled Tribes."

अध्यक्ष महाराज, इकॉनॉमिकल बॅकवर्ड क्लासच्या संदर्भात जेवढी कॉन्स्टिट्युएंट प्रोव्हिजन आहे त्यातील एका अक्षराचा उल्लेखदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय घटनेमध्ये केलेला नाही. याचे कारण असे की मी मघाशी सांगितल्याप्रमाणे काही राज्यांतील मागासवर्गीय आणि उच्चवर्गीय यांच्याकरता आर्थिक निकष लावून सवलती दिल्या गेल्या होत्या. परंतु सुप्रीम कोर्टात जयश्री व्हर्सेस केरळ स्टेट आणि लयला व्हर्सेस केरळ स्टेट आणि श्री. शिवाजीराव गर्गे विरुद्ध महाराष्ट्र राज्य, या सर्व प्रकरणामध्ये सुप्रीम कोर्टाने सर्व राज्यांनी जे आर्थिक निकष होते ते अवैध ठरवले आहेत. अध्यक्ष महाराज, जेव्हा घटना तयार होत होती त्यावेळी हा प्रश्न निघाला होता. सामाजिक मागासलेपणाबरोबरच आर्थिक मागासलेपणा सुद्धा विचारात घेण्यात यावा अशी सूचना घटनासमितीचे एक सदस्य श्री. के. टी. देसाई यांनी मांडली होती. परंतु त्याला प्रखर विरोध केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच केला असे नाही तर पंडित नेहरू यांनीही केला. या प्रखर विरोधाचे सर्व प्रकरण हे इंग्रजीमध्ये आहे आणि ते सारे येथे वाचून दाखविले तर सभागृहाचा वेळ जाईल म्हणून मी ते येथे वाचून दाखवित नाही. तेव्हा सांगावयाचा मुद्दा हा की, समाजातील मागासलेपणाला गरिबी हे कारण नाही, असूच शकत नाही. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मोरे म्हणाले की हे रिझर्व्हेशन काढून घेण्याची घटनेत तरतूदच नाही. पण कदाचित केव्हा तरी राजकीय रिझर्व्हेशन हे मात्र निघून जाईल आणि तसे झाले तर माझे स्वप्न खरे होईल. म्हणजेच विधिमंडळामध्ये आणि पार्लमेंटमध्ये एकही प्रतिनिधी दिसणार नाही. ही चूक कोणाची आहे, तर जाती व्यवस्थेची वर्णव्यवस्थेची म्हणजे श्रीमंत बौद्धाला जी प्रतिष्ठा नाही ती गरीब ब्राह्मणाला आहे. तेव्हा प्रश्न गरिबीचा नाही. परंतु त्याचबरोबर मी त्यांच्या मताशी सहमत यासाठी होईन. अध्यक्ष महाराज, आपल्याला माहिती आहे की, १९५० साली घटना प्रस्थापित झाली आणि त्याला पहिली दुरुस्ती १९५१ साली झाली. कारण काय होते तर कु. चंपकम दोराईरामन् या विद्यार्थिनीला चांगले मार्क्स मिळाले होते आणि तिच्यापेक्षा कमी मार्क्स मिळालेल्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळाला म्हणून ती मुलगी घटनेतील कलम प्रोव्हीजो १(२)– की ज्यामध्ये कोठल्याही बाबीमध्ये डिस्क्रीमिनेशन पाळता येत नाही म्हणून कोर्टात गेली. भारतीय घटनेच्या आर्टिकल पार्ट २ चा आधार घेतला आणि मद्रास हायकोर्टाने त्या मुलीचे म्हणणे ऐकून घेऊन ग्राह्य धरले. त्यामुळे ते प्रकरण मग सुप्रीम कोर्टात केले. सुप्रीम कोर्टानेसुद्धा म्हटले की, मद्रास सरकारचे म्हणणे योग्य आहे, आर्टिकल १५ नुसार डिस्क्रीमिनेशन ठेवता येत नाही वा आर्टिकल १५ मध्ये ३ भाग आहेत. तेव्हा या एका कारणामुळे पहिली घटनादुरुस्ती करावी लागली आणि ती पंडित नेहरू यांनी केली व त्यास घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जे त्यावेळी कायदामंत्री पदाचा राजीनामा देऊन सभागृहात सदस्य म्हणून बसले होते त्यांनी पाठिंबा दिला. पं. नेहरूंच्या या सूचनेचे समर्थन विरोधी बाकावर बसून डॉ. आंबेडकर यांनी केले. त्यांनी सांगितले आपण करीत आहात ते बरोबर आहे. श्री. के. के. शहा यांनी त्यावेळी असे म्हटले की सामाजिक मागासलेपणाबरोबर आर्थिक मागासलेपणाचा विचार करा. परंतु त्यावेळी नेहरूंनी ते साफ नाकारले. आमचे मित्र श्री. धरमचंद चोरडिया निराळाच इतिहास

सांगत आहेत. Reservation is not a maximum guarantee, But, it is a minimum guarantee. म्हणजे लोकसंख्येप्रमाणे आपणाला जागांची गॅरंटी द्यावयाची असेल तर त्याप्रमाणे विचार करावा लागेल. ओ. बी. सी. संख्या ५२ टक्के असताना ते २७ टक्केच रिझर्व्हेशन मागत आहेत. अतिशय कमी मागणी ते करीत आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे ५० टक्क्यांच्या पुढे रिझर्व्हेशनचे प्रमाण ठेवता येणार नाही. परंतु याबाबतीतही काही राज्ये पुढे गेली आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा विचार केला तर खुल्या स्पर्धेकरिता २० टक्के लोकांकरिता ५० टक्के जागा शिल्लक राहणार आहेत. आज ८० टक्के लोक ४९ टक्के जागाच मागत आहेत. अध्यक्ष महाराज, आर्थिक निकषाचा मी समर्थक आहे. माझ्या मुलांच्या बाबतीत मी सरकारची स्कॉलरशिप नाकारली आहे. मला ती नको आहे. अध्यक्ष महाराज, मी काही गोष्टी या ठिकाणी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या सभागृहात मातंग, वाल्मिकी, चांभार, ढोर आहेत की नाहीत? आज यांच्यातील काही माणसे डेप्युटी सेक्रेटरीच्या पदापर्यंत गेलेली आहेत. अध्यक्ष महाराज, घटनेच्या ३३८ कलमाचा विचार केला तर माननीय सदस्य श्री. धरमचंद चोरडिया यांनी जी सूचना केली आहे. ती मला धोक्याची वाटते. ३३८ बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खूपच काळजी घेतली आहे. घटनेच्या ३३८ कलमामध्ये असे म्हटले आहे की,

"the claims of the members of the Scheduled Castes and Scheduled Tribes shall be taken into consideration consistently with the maintenance of efficiency of administration in the making of appointments to services and posts in connection with the affairs of the Union or of a State" (Claims of Scheduled Castes and Scheduled Tribes to Services and Posts.)

रिझर्व्हेशनही ठेवा आणि इफिसियन्सीदेखील ठेवा. नाहीतर कोणीतरी असे म्हणेल की, एस. सी. एस. टी. चा कलेक्टर आला आणि त्यांनी अमुक अमुक केले. म्हणून याबाबत काही उपाय आहेत. एफिसियन्सीबाबत या गरिबांना १० टक्के गुण कमी करा. असे करूनही इफिशियन्ट माणूस मिळाला नाही तरीही आर्थिक निकषांचा आधार घटनेमध्ये नाही. म्हणून याचा विचार करता. एस. सी., एस. टी., वि. जे. एन. टी., ओ. बी. सी. यांना मिनिमम गॅरंटी दिली आहे. And that guarantee should not be deviated. एवढी अपेक्षा करावी लागेल. त्याची आवश्यकताही आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण संपवितो. इतर मागासवर्गीयांसाठी इतर राज्यांमध्ये आरक्षणाच्या बाबतीत काय सद्यःपरिस्थिती आहे? त्यावरून आपण कोठे आहोत, हे लक्षात येईल आणि ज्या राज्याच्या सत्तेमध्ये आपण कोठे आहात, त्याचे निकष आपण बघा. आजच्या परिस्थितीमध्ये तामिळनाडूमध्ये ६८ टक्के, कर्नाटकमध्ये ५० टक्के, केरळमध्ये ४८ टक्के, काश्मीरमध्ये ४० टक्के, आंध्रप्रदेशमध्ये २५ टक्के, बिहारमध्ये २५ टक्के, उतरप्रदेशात १५ टक्के आणि आमच्या करंट्या महाराष्ट्रात १० टक्के आरक्षण आहे. ही चेष्टा आहे. ही आकडेवारी ओ. बी. सी. च्या आरक्षणाची आहे आणि मग याची बेरीज किती होते? ३५ टक्के आणि म्हणून तुमच्या महाराष्ट्रात तुम्ही फार मागे आहात. स्वतःला पुरोगामी समजू नका, इतर राज्यांच्या तुलनेत तुम्ही फार प्रतिगामी आहात. तोंडात पुरोगामी आणि पोटात प्रतिगामी एवढाच अर्थ आहे. म्हणून या आरक्षणामध्ये तुम्ही लवकरात लवकर वाढ करा असे मी प्रस्तावित करतो. व्ही. जे. एन. टी चा आरक्षणाचा प्रश्न नाजूक असल्यामुळे त्या विषयाला मी स्पर्श केलेला नाही. त्यासाठी वेगळी चर्चा घेऊ.

❑❑❑



अजातशत्रू...

□ लोकसभा, राज्यसभा सदस्य व राज्यपाल म्हणून भाषणे

महाराष्ट्र विधिमंडळातील प्रदीर्घ कालखंडानंतर दादासाहेब केंद्रीय राजकारणात सक्रीय झाले. लोकसभा व राज्यसभा सदस्य, बिहार व केरळ राज्याचे राज्यपाल म्हणून त्यांनी १९९८ ते २०११ या कालखंडात कार्य केले. या कालखंडातील त्यांनी व्यक्त केलेले विचार या भागात दिले आहेत.

शपथ ग्रहण समारंभ...

राज्यपाल बिहार

राज्यपाल केरळ

प्रभारी राज्यपाल सिक्कीम

लोकसभा सदस्य

राज्यसभा सदस्य

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या समस्या

(४ ऑगस्ट, १९९८)

या विषयावरील चर्चेत दिनांक ४ ऑगस्ट, १९९८ रोजी रा. सू. गवई सहभागी झाले होते. ही चर्चा त्यांनी पार राजकारणा पल्याड नेऊन ठेवली. आपल्या भाषणाची सुरुवात करताना गवई साहेब म्हणाले हा प्रश्न अनुसूचित जाती व जमातींवर दया दाखविण्याचा वा त्यांना सहानुभूती दाखविण्याचा नाही. हा प्रश्न त्यांच्या घटनात्मक अधिकाराबाबतचा आहे.

संसदीय प्रथा व परंपरा यांचे पालन होण्याबाबत ते किती जागरूक राहत असत याचेही दर्शन या भाषणातून होते.

Mr. Chairman Sir, the present motion relates to the problems of Scheduled Castes and Scheduled Tribes.

I will be strictly limiting to the purview of the Constitution regarding the problems of Scheduled Castes and Scheduled Tribes for their upliftment and welfare in the sphere of services, education, land, industry, commerce and so on.

The very purpose of providing the safeguard in the Indian Constitution is to bring the Scheduled Castes and Scheduled Tribes at par with others. As earlier pointed out by Shri Buta Singh, it is not a matter of pity, it is not a matter of sympathy, it is a matter of their legitimate right. Why is it so? Having no fault of theirs but because of the Caste animus the Scheduled Castes and Scheduled Tribes have to suffer and remain aloof from the mainstream of the nation. Therefore, the forefathers of the Indian Constitution, particularly the Chairman of the Drafting Committee, Dr. Baba Saheb Ambedkar, took care of it. The very purpose of providing this safeguard is to bring them at par with others.

Sir Firstly, I will deal with the problem of Service matters. I am very sorry to mention that the Deparment of Personnel and Training has issued about 5-6 Office Memorandums. Therefore, in keeping with the spirit of the Constitution, they are quite derogatory and violating the spirit of the Constitution.

There was an order of the DOPT dated 30th January 1997, which relates to the case, the Government of India *versus* Virpal Singh. In that case, they mentioned that if a Scheduled Caste candidate is promoted to a higher post or grade earlier than his senior general candidate, thereafter the senior general candidate is promoted to the some higher post, the seniority of the senior general candidate be retained. It is nothing but snatching the seniority and promotion of the Scheduled Caste candidate by the general candidate.

While issuing the OM, the DOPT had forgotten the latest decision in this matter. This is nothing but going away from the safeguards provided in the Constitution. It is not keeping with the spirit of the judgement dated 7th May 1997 in the matter of Jagdish Lal and others *versus* State of Haryana and others.

Here it was observed that on promotion to the higher cadre the reserved candidates steal a march over the general candidates.

The second OM is dated 2nd July 1997 issued by the DOPT regarding the judgement delivered in the case of R.K. Sabharwal *versus* the State of Punjab as well as J.C. Malick *versus* the Ministry of Railways. But conveniently, they have forgotten the judgement that is relevant to the Scheduled Castes and Scheduled Tribes, that is, the case of R. K. Sabharwal and P.S. Gehlot. It observed that the Scheduled Caste and Scheduled Tribes candidates competing with general candidates, with the same seniority-cum-fitness, would be counted against the general posts and not against the reserved posts. The content of the OM is contrary to this judgement. Therefore , I urge upon the Government to withdraw that OM and issue a fresh OM, keeping in mind the content of the judgement.

Then, there is a third OM, dated 22nd July 1997. That OM was issued on the basis of the Supreme Court judgement in the matter of Vinodh Kumar *versus* the Governemnt of India. That OM stated that they had withdrawn the relaxation concessions etc. This point was dealt by Shri Ram Vilas Paswan. In addition to this I want to say that you have to see the standard of evaluation of the performance made in favour of the Scheduled Castes and Scheduled Tribes. Therefore, the OM, dated 22nd July must be withdrawn.

There is another OM, dated 13th August, 1997 of DOPT. It contented that the existing reservation in promotion is up to the lower rung of Class-I and not beyond that. This is contrary to the spirit of Article 16(4A) and this decisison was taken by this august House through the 27th Amendment of the Constitution. What right has the DOPT got? This is derogatory to the decision of Parliament. The entire Parliament ought to have taken cognizance of it. Why should DOPT take such decision which is contrary to the decision of Parliament? I, therefore, urge upon the Governement to withdraw the OM and honour the 27th Constitutional Amendment made by this august House unanimously. Please do not allow the DOPT to ignore this decision of Parliament.

Another OM, dated 29th August, 1997 of DOPT stated that special recruitment drive cannot be continued even to clear the backlog vacancies. They want to stop the reservation policy but at the same time, the DOPT has ignored the judgment in the case of Post-Graduate Institution of Medical Education and Research *versus* K.M. Narsimha. The Judgement says that the filling up of backlog vacancies by special recruitment drive is not by violating the principle of carrying forward backlog vacancies within one year and within the 50 per cent quota. Hence, I would request that this OM ought to be withdrawn.

As I have mentioned, of course, unofficially, the Action Taken Report was published. But it is an insult to this House that it has not been laid on the Table of the House. Anyhow, what is their argument? Their argument is that it relates to the judgement of the Supreme Court saying that was the law of the land, because it is a precedent created by the Supreme Court. At the same time they are going out of the spirit of the court's judgment. A valid point is whethere the decisions taken by the DOPT or even by the court, are within the purview of the Indian Constitution.

If these OM of the DOPT violated the spirit of the basic structure of the Indian Constituion we, the sovereign Parliament, should not allow its encroachment. I, therefore, suggest that we should have a comprehensive enactment by Parliament which should be put in the Ninth Schedule stating therein that it would deal with the

problems of Scheduled Castes, like initial recruitment, reservation, reservation in promotions, carrying forward and clearing of vacancies and other allied matters like training, Transfers posting and deputation etc. Also the concerned officer should be made accountable. They should not take their decision according to their whims or act whimsically with a caste bias towards the Scheduled Castes and Tribes. I urge upon the Government to have a comprehensive legislation in this respect.

This has also to be incorporated in the comprehensive Act on reservation providing therein reservation in the Defence and Judiciary as earlier mentioned by my friend. Generally the Unions or Associations of the Scheduled Castes and Tribes are not accorded recognition. Therefore, they go to their authorities to establish their claim that they are acting with a social purpose and that the attitude of the trade union is indifferent. The various departments should come forward and such an association or organisation of SC/ST employees should be recognised immediately.

As earlier mentioned by Shri Raja, my colleague and supporter of the Motion moved by Shri Ram Vilas Paswan, we have to see the nature of the atrocities. Today in the Press it has been mentioned that one girl has been molested by the BJP MLAs in front of certain MLCs, that too in a temple. Of course, I do not know the correct facts. But whatever it may be, the occurrence of atrocities stated by them has to be investigated.

Let us forget the incident. Recognising the nature of the atrocities what should the Government do? There is an Act, Prevention of Atrocities on Scheduled Castes and Tribes Act.

I am talking of the Prevention of Atrocities on Scheduled Castes and Tribes Act. What is the net result? The net result is that a Sub-Inspector of police has to take cognizance of the atrocities and frame a charge-sheet. I, therefore, say that special courts have to be set up to conduct summary trials and to take decisions very promptly.

Now, I come to the Report of the Scheduled Castes and Scheduled Tribes Commission. If you refer to article 335 of the Constitution, it says that it is incumbent on the part of the Government and the hon. Speaker to lay such reports on the floor of the House. Those Reports should be discussed. It is very sorry state of affairs.

The Reports of the National Commission on the Scheduled Castes and Scheduled Tribes are not being discussed since last ten years. The legitimate right of the Members to lay the Report on the Table of the House and to have a discussion is not being done by the Government.

My hon. friend has told that the photo of Dr. Babasaheb Ambedkar has been being removed from the office of the Foundation. It is probably from the office of the Minister of the Social Justice and Empowerment and not from the foundation.....(Interruptions). This information was recently given by the hon. Member of this House.

As stated by Shri Ram Vilas Paswan, the name of the Ministry has also been changed. Earlier, it was known as Ministry of Welfare and now, it is called the Ministry of Social Justice and Empowerment. Now, it is a very sorry thing that the Department which is supposed to be the caretaker of the Scheduled Castes and the Scheduled Tribes and to render social justice is doing injustice towards the Scheduled Castes and the Scheduled Tribes.

I urge upon the Government, the Prime Minister, and Shrimati Maneka Gandhi, the Minister of State of the ministry of Social Justice and Empowerment to take cognizance of this issue. I also request all the Members of Parliament in general and Members belonging to the Scheduled Castes and the Scheduled Tribes in particular, to be very alert, to take cognizance of the attitude and to take to task whomsoever does anything wrong.

At the outset, I sincerely commit myself that I do not want to make this issue as a political one. This is above politics, and I do feel that this is an issue of national importance.

I do not feel shy in saying that these OMs issued by the DOPT are not the babies of the present Government. I do admit this. Facts remain the facts, how can we deny. These products are not the babies of the present Government. I do admit that these are the babies of the earlier Governments....(Interruptions) ... I have stated it frankly. But it does not mean that the earlier Governments had committed some blunders and the present Government, those who claim to be a combination of the wisdom and political power, should justify it by saying that whatever the irregularities are there, they have been committed by the earlier Government.

I urge upon the Government that this is an issue of the National importance. The Chief Architect of the Constitution, Dr. Baba Saheb Ambedkar once said that the safeguard provided in the Indian Constitution is nothing but a compensation of the law to bring them on par. It is none of their fault that the society was kept aloof from the mainstream of the society.

It is our duty to bring them on par. I am very happy to say that yesterday, the hon. Prime Minister was quite ready to respond to it. I am very happy that today we are here discussing it. Whatever OMs in this regard have been issued by the various Governments, they have been narrated by hon. Shri P. A. Sangma. I do not want to repeat them. But I would state that the spirit of these OM's is derogatory to the Constitutuion, derogatory to the judgements of the various courts, derogatory to the decision of the Parliament.

So, decisions are to be taken on merit if these OM's are derogatory to the spirit of the Constitution, derogatory to the spirit of the decisions of the House and derogatory to the spirit of the decisions given by the Supreme Court. I do not want to take much time of the House. By giving an illustration of just one O.M. which has violated the spirit of the Constitution, spirit of the judgment and spirit of the decision taken by this august House, I will sum up my speech.

Take this O.M. which is dated 1st November 1990. It has rejected the spirit of the judgment of the supreme court dated 10th August 1990 relating to the matter of the Syndicate Bank, SCST Employees' Association Vs. Union of India. The judgment states that the reservation is very much available to SCST officers in promotions upto the highest level of Group (A) or Class (A)

Now another Memorandum dated 13th August stated that the existing promotion policy to Class I violated the two judgments.

The third is the 77th amendment which was unanimously passed by this august House concerning Article 16(4) of the Constitution which is as follows :—

"Nothing in this article shall prevent the State from making any provision for the reservation of appointments or posts in favour of any backward class of citizens

which, in the opinion of the State, is not adequately represented in the services under the State."

This Officer Memorandum is derogatory to the spirit of the judgments, to the spirit of the House and of the Administrative Orders. All these OMs are against the spirit of the Constitution.

Now it is a question of political will which may be lacking. The Prime Minister is there with political will. I urge upon the Prime Minister to see that the interest of the Scheduled Castes and the Scheduled Tribes is safeguarded.

There should be a comprehensive enactment passed by Parliament dealing with recruitment, promotion, reservation, de-reservation, carry forward and retirement and that should be put up in the Ninth Schedule of the Constitution.

❑❑❑

बुद्धावरील रोचक चर्चेत दादासाहेबांचा अचूक सहभाग

संसद सदस्य मा. श्री. आरिफ मोहम्मद खान यांनी अल्पसंख्याक समाजावर अॅट्रॉसिटीचे जे गुन्हे दाखल करण्यात आले याबाबत संसदेत दिनांक १६ डिसेंबर, १९९८ रोजी चर्चा उपस्थित केली. या चर्चेला तत्कालीन गृहमंत्री, मा. श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी उत्तर दिले. त्यांनी आपल्या भाषणात अनेक दाखले दिले त्यात भगवान गौतम बुद्धाचाही दाखला दिला. त्यांच्या भाषणाचा संदर्भ घेत गवई साहेबांनी सभागृहाची परवानगी घेऊन आपले विचार व्यक्त केले.

गृह मंत्री (श्री. लालकृष्ण अडवाणी) : मान्यवर अध्यक्ष जी, श्री. आरिफ मोहम्मद खां ने पिछले सप्ताह जिस बहस का आरंभ किया, उसमे अनेक सदस्यों ने भाग लिया और कुल मिलाकर जो चर्चा हुई है, वह बहुत सार्थक हुई है। मै सभी वक्ताओं के प्रति आभार प्रकट करता हूं कि उन्होने एक महत्त्वपूर्ण समस्या की और सदन का ध्यान दिलाया है। उस समस्या के विषय में हमारी जो कमी है, उसको भी उन्होने सदन के सामने प्रस्तुत करने की कोशिश की। मै सबके प्रति आभार प्रकट करते हुए जिन्होंने उसका प्रतिवाद किया, उसमें एक भी तथ्य का उल्लेख नही था, लेकिन उस प्रतिवाद के बाद गृह मंत्रालय की ओर से जो अधिकृत सूचना मध्य प्रदेश की सरकार ने हमको दी थी, उसको ज्यों की त्यों हमने प्रेस को रिलीज किया। सब नाम दिए हैं कि कोन उसमें ईसाई है, कौन उनमें हिंदू है। इसका विवरण हमने प्रेस को दिया है। आप चाहेंगे, तो मैं सदन को भी उसको दे सकता हूं, मुझे कोई दिक्कत नही है। मै इतना ही मानता हूं, उनको भी शायद धक्का लगा होगा कि हमने इतने दिन इस आधार पर कॅम्पेन किया, उस कॅम्पेन का धरातल निकल गया। मैं किसी को दोष नही देता हूं, लेकिन उन्होंने सहज रूप में

प्रतिवाद कर डाला कि नही गलत है। जब प्रतिवाद कर डाला, तो मैने गृह मंत्रालय से कहा कि आप केवल यह मत कहिए कि उनमें से कुछ क्रिएशन्स थे। आप सबके नाम दे दिजिए और तारीख भी बता दीजिए, जिस दिन मध्य प्रदेश की सरकार और उनके अधिकारी ने पत्र लिखा है, वह आफिशियली दे दीजिए और उन्होंने दे दिया। मै समझता हूं कि इसमे और ज्यादा करने की जरुरत नहीं है। वैसे संगमा जी ने जो विचारधारा की बात उठाई थी, उसका काफी अच्छा उत्तर उमा जी ने दे दिया है। उमा जी ने यह भी बताया कि मैं अगर इस मामले में सैक्युलर हूं, तो मैं इसलिए नही हूं कि मै कोई ईसाई स्कूल में पढ़ा हुआ हूं।

वह किसी ईसाई स्कूल में नही पढ़ी है, वह गाव के किसी स्कूल मे पांचवी कक्षा तक पढी है। उनके पूजा घर मे जहां कृष्ण भगवान की मूर्ति है वही ईसामसीहा की भी मूर्ति है, क्योंकि हमे उसमे कोई दिक्कत नही है। मुझे इसलिए आश्चर्य हुआ क्योंकि जब कल संगमा जी इस बात पर आपत्ति उठा रहे थे कि आडवाणी जी तो बौद्धों को भी हिन्दुओं का हिस्सा मानते है, जो बुद्ध है वह विष्णू के अवतार थे, उन्होंने कल यहां यही बात कही।

महोदय, पिछले महीने सारनाथ में एक बुद्ध सम्मेलन था, जहां विश्व भर से लोग आए थे। वहाँ अनेक बौद्ध भी थे। वहाँ मैने यह बात जरूर कही थी-

Buddha did not announce any new religion. He was only restating with the new emphasis the ancient ideals of the Hindu-Aryan civilization. He cleanses the faith and the customs that were prevent then of the dusts that had accumulated, and focussed on the essential ideals of Dharma. The relationship between India and Buddhism is unbreakable and this inseparableness must be understood by all. India is where Bhddha was born and India is where Buddha's legacy lived."

फिर मैने कहा-

"Buddha is an avatar for most Indians and is held in reverence by all sects and sub-sects of the Hindu society."

मै, कोई ऐसी बात नही कर रहा हूं जो बुद्धिजम को कम करने के लिए हो। हमारे यहां जो दशावतार की कल्पना है उसमे बुद्ध भी एक अवतार है। हम में से बहुत से लोगों ने अनेक बार भरत नाट्यम का दशावतार, कत्थक का दशावतार देखा होगा, उन सब में एक अवतार बुद्ध जरूर है। बुद्ध ट्रेडिशनलसे आस्तिक नहीं थे, वह ईश्वर के विश्वासी नही थें। इसके बावजूद मैने उसी में कोट किया, मैने कहा कि स्वामी विवेकानंद जी ईश्वर के बडे भक्त थे, वह आस्तिक थे। उन्होंने बुद्ध और ईश्वर के लिए क्या कहा-

"The life of Buddha shows that a man who does not believe in God, has no metaphysics, belongs to no sect and does not even go to any church or temple, even he can attain to the highest. I wish I had even one infinitesimal part of Buddha' hear. Buddha may or may not have believed in God. That does not matter to me. He reached the same state of perfection to which others come by Bhakti or love of God or Yoga or Thiyana. Perfection does not come from belief or faith. Talk does not count for anything parrot can do that perfection comes through dissinterested performance of action."

उसमें मैने डिसइंटरस्टेड पर्फोरमेंस ऑफ एक्शन जरूर जोडा है। जिसका अर्थ वही गीता का सार है। उसमे उन्होंने कहा कि निष्काम योग एवं निष्काम कर्म करो, उसी पर मैने कहा। कल हमारे संगमा जी आपत्ति कर रहे थे कि इन्होंने भगवतद् गीता कैसे कहा।

SHRI R. S. GAVAI (AMARAVATI) : Can you yield one minute? Sir, I do respect your sentiment that in your Buddhist Summit

there at Saranath, you said that Lord Buddha is the incarnation. This point appeared in the last World Buddhist Summit in Kathmandu also where I did say it is the own belief of the hon. Minister because I was there in Kathmandu and not in India. But Buddha never claims that he is a God, neither he says that he is a son of God nor he is a messenger.

SHRI L. K. ADVANI : He never said that.

SHRI R. S. GAVAI : He said, "I am a common man" (Interruptions) I am just clarifying. He believes in the relationship between man and man , and on an occasion, when he was preaching lastly his disciple. Anandha, he asked, "Lord, I will expect that you will attain Swarga". Buddha said, Anandha, I do not believe in Swarga, Narka nor incarnation." It may be your own logic but do not impose upon us that we should accept that Buddha is incarnation. That is not convincing.

श्री. लालकृष्ण आडवाणी : मैं आपका आदर करता हूं और मै यह कहता हूं कि आपने जो अभी बात कही उसके कारण बुद्ध हमारी नजर में और ऊंचे उठ जाते है।

He never claimed to be God. He never claimed to be a messanger of God.

मैने कहा कि हिंदू समाज उन्हें दशावतार मानता है।

SHRI R. S. GAVAI (AMARAVATI) : I do not want to challenge, but my plea is that do not impose anything on us.

SHRI L. K. ADVANI : No. not at all. I have read out exactly. I said : Buddha is an Avatar for most Indians and is held in reverence by all sects and sub-sects of Hindu society, not merely the Baudhs.

अध्यक्ष जी, अब मै मैनीफेस्टो पर आऊंगा क्योंकि उन्होंने हमारे मैनीफेस्टो को उद्धृत किया और सांस्कृतिक राष्ट्रवाद की चर्चा करते हुए उस पर आपत्ति की और कहा कि हम वन कल्चर की बात क्यों करते है। उमा जी ने उन्हें कहा कि आप वन नेशन में तो विश्वास करते होंगे, उन्होंने जबाव नही दिया। तब उमा जी ने कहा कि आप वन पीपल में भी विश्वास करते होंगे, लेकिन आपकी आपत्ति शायद वन कल्चर पर होगी। वैसे कुछ सदस्य हमारे यहां बैठे है जिनको वन नेशन पर भी आपत्ती हो सकती है। कम से कम एक-आध पार्टी ऐसी है जो हिंदुस्तान को वन नेशन की कल्पना नही मानती है। वे कहते है कि

India is a multinational State ....(Interruptions)

उनकी यह कल्पना है उसका जिक्र मै बाद मे करूंगा, नहीं तो वह भी जरुरी नहीं है।

❑❑❑

अमेरिकेबरोबरच्या द्विपक्षीय वाटाघाटी

(२२ डिसेंबर, १९९८)

अमेरिकेबरोबरच्या द्विपक्षीय चर्चेसंबंधात पंतप्रधानांनी १५ डिसेंबर, १९९८ रोजी केलेल्या निवेदनावर लोकसभेत २२ डिसेंबरला चर्चा झाली. चर्चेत सुमारे २० सदस्यांनी भाग घेतला. रा. सू. गवई यांनी अमेरिकेशी वाटाघाटी करताना राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता आणि सार्वभौमत्व अबाधित राहील याची खबरदारी घेण्याची सूचना केली. पंतप्रधानांचे निवेदन स्वयंस्पष्ट नसून त्यात काही प्रमाणात संदिग्धता आहे. असे मत गवई यांनी नमूद केले. पोखरण अणुचाचणीनंतर अमेरिकेने भारताच्या संदर्भात जारी केलेल्या निर्बंधांचा तपशील समजला पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली.

Sir, at the outset, I extend my sincere thanks to Hon. Shri Jaswant Singh for having assumed the post of the Foreign Minister. That was the consensus of the whole House earlier. I will be very brief. I will complete within two minutes. The subject matter before the House is the bilateral talks with the United States. The answer is yes. There should be bilateral talks. And decision out of discussion should be the spirit of talks.

I have gone through the statement of the Prime Minister. I will not enlarge my speech. Till today, six rounds of talks have taken place. It is mentioned in the statement that the problems are narrowed down. As a layman, I want to understand what were the problems, how have they been narrowed down or how have they bridged ? Then it was mentioned in the statement that there will be a sevanth round of talk in the middle of January wherein the topic will be CTBI and allied matters. In one sense, I can say that the very principle of the international relations and particularly the relations between a nation and a nation is very clearly spelt out by the foreign policy of India founded by Pandit Jawaharlal Nehru. The glaring example of that is that the Prime Minister of the country Shri Atal Bihari Vajpayee, when he was the External Affairs Minister, had himself advocated the case of the foreign policy. Within that framework, I will sum up in one sentence. We have to think about the problems which are supposed to be

under discussion of the seventh round. I only feel that signing the CTBT should be logical and rational as if we could not project ourselves that we are eager to sign the CTBT. The pre-condition is that we are supposed to safeguard the interests of the national unity, integrity and sovereignty.

I have an apprehension that the statement is not self-explanatory, it is having some ambiguity. I do not want to point that out. I will just request the Hon. Minister to clarify the position to the House as to what is what. It is rather difficult to say whether the Pokhran test is justified or not.

I do not want to enter into that controversy. But what we exhibit is rebounded by Pakistan. That is also a thing of great concern. At least, we may have restraint. Any responsible Minister sitting there must think that we will have a venue, date and time to extend the invitation to Pakistan. Somebody has uttered the same thing regarding China.

I would like to tell that it is a matter of great concern that the sanctions imposed by America are not yet spelt out. The eventuality has come to use to face. Considering the devaluation of the rupee, what will be the financial implication on the country ? We are supposed to examine that aspect. By and large, in a good spirit. I extend my support subject to the condition that the Hon. Minister should make a safe explanatory statement in the reply.

❑❑❑

गवई साहेब ' एक रसिक माणूस '

गवई साहेबांचा उल्लेख एक रसिक माणूस म्हणून मी करेन. काही माणसे अशी असतात की, एखादा ताण निर्माण झाला तर बराच काळ तो तसाच राहावा हे ते सहन करू शकत नाहीत. त्यामध्ये चांगले शोधल्या जावे असा प्रयत्न ही रसिक मंडळी करतात. त्यातील एक व्यक्तिमत्व मा. श्री. गवई यांचे आहे. ते विनोद करतात आणि दुसऱ्याच्या विनोदालाही तितकीच दिलखुलास दाद देतात. काही माणसे अशी असतात की, त्यांना स्वत:चेच विनोद आवडतात. दुसऱ्यांच्या विनोदांना दाद द्यावी असे वाटत नाही. परंतु मा. गवई यांचा मात्र तसा स्वभाव नाही. ते सर्वांचेच मित्र आहेत. त्यांचा फायदा सर्वांनाच झालेला आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी आता उल्लेख केला तो बरोबर आहे. मा. श्री. गवई हे आता या सभागृहामध्ये नाहीत हे आपल्याला बराच काळ खरे वाटणार नाही. आज गवई साहेब निवृत्त होत आहेत.

-सुधीर जोशी

माजी मंत्री.

एचबी ११८०—३४

महाराष्ट्रातील टंचाई निवारणासाठी पाचशे कोटींची मागणी

(२० ऑगस्ट, २००१)

महाराष्ट्रातील टंचाई परिस्थिती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कांदा उत्पादकांच्या समस्या या विषयावर राज्यसभेत रा. सू. गवई यांनी विशेष उल्लेख, लक्ष्यवेधी सूचनेतील चर्चेत सहभाग या संसदीय आयुधांचा वापर करून केंद्र सरकारला या प्रश्नी उपाययोजना करण्यासाठी भाग पाडले. २० ऑगस्ट, २००१ रोजी महाराष्ट्रातील टंचाई परिस्थितीचा उल्लेख करताना राज्य सरकारच्या अर्थसाह्याच्या विनंतीला केंद्राने प्रतिसाद न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त करून पाचशे कोटी रुपयांचे अनुदान महाराष्ट्र शासनाला उपलब्ध करुन द्यावे असे आग्रहाचे प्रतिपादन केले.

The State of Maharashtra has been facing severe drought and scarcity conditions since the last six months. So far, the Maharashtra Government has spent Rs. 1,200 crores on the employment guarantee scheme to provide jobs to the agricultural labourers, to meet the scarcity of drinking water and the scarcity of fodder to the cattle.

In many parts of the State, the monsoon has come late and hence the kharif crop had to be re-sown by the cultivators. Thus, the cultivators had to bear a great loss. Unfortunately, there is a long wait for rains in many parts of the State and this has affected the crops very badly. Kharif crops are not in a survival condition, and because of lack of rains, the cultivation of rabi crops is not possible. The situation in Maharashtra is very precarious. In many parts of the State, people are facing drinking water problem, lack of fodder for the cattle and unemployment of agricultural labourers. As mentioned earlier, the Government of Maharashtra has taken several steps to tackle the situation and it has already spent Rs. 1,200 crores. Earlier, the Government of Maharashtra had approached the Central Government for rendering financial help to enable the Government to effectively deal with the situation, but there has been no response from them. This shows the step-motherly treatment being shown by the Central Government towards Maharashtra. Earlier, in this Session itself, there was a demand that the Centre should release Rs.500 crores to

the Government of Maharashtra to deal with the scarcity condition. I once again earnestly request the Central Government to provide the financial assistance of Rs.500 crores to the Government of Maharashtra.

❑❑❑

शिक्षण

शैक्षणिक धोरण संविधानाशी सुसंगत पाहिजे

(२९ ऑगस्ट, २००१)

शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने जारी केलेली परिपत्रके आणि एनसीईआरटीची पाठ्यपुस्तके यावर राज्यसभेत एका लक्षवेधी सूचनेद्वारे विरोधी सदस्यांनी सरकारला दिनांक २९ ऑगस्ट, २००१ रोजी धारेवर धरले होते. केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री, डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्या निवेदनामुळे या सदस्यांचे समाधान झाले नाही. विशिष्ट विचारसरणीचा प्रसार व्हावा या उद्देशाने पाठ्यपुस्तके आणि अभ्यासक्रम तयार करण्यात येत असल्याचे रा. सू. गवई यांनी मंत्र्यांच्या निवेदनानंतर झालेल्या चर्चेत भाग घेताना सांगितले. उच्च शिक्षण अभ्यासक्रमात ज्योतिष विषयाचा समावेश करण्यास त्यांनी जोरदार विरोध केला यामुळे आपण पुढे जात आहोत की मागे जात आहोत असा प्रश्न करून अनेक विद्यापीठांचाही यास आक्षेप असल्याचे सांगितले. शैक्षणिक धोरण संविधानाच्या गाभ्याशी सुसंगत असले पाहिजे यावरही गवई यांनी भर दिला.

The subject of the Calling Attention is vital, as far as the National Education Policy for the future is concerned. I will be brief and deal with only the positive aspects of the subject. I will deliberately omit the non-positive steps, as far as the National Education Policy is concerned, it is the popular opinion of the educationists and philosophers of this nation that education itself is a path, and by the broad light of the torch the darkness diminishes and we move towards new knowledge and enlightenment. The positive aspect of the education policy is, we should not go anti-clockwise. Our education should not be oriented towards darkness, dark belief and dark faith. With this positive thinking, I would like to raise certain points. I have got ample examples of books. I do not want to come out with the negative aspects of teachings. But I would like to bring to the kind

एचबी ११८०—३४अ

notice of the Hon. Minister a book on Social Studies for Class IX in Gujarat. I do not want to mention as to what the book contains. I would like to say this much that ample precaution should be taken while writing textbooks. We should teach the people about tolerance among different religions. We should not disturb the peace and tranquillity of any religion. This is what Hinduism teaches us. This book is so contradictory that it should be banned under section 195-creating hatred between religions. I have mentioned the name of the book and the publisher. There is another textbook which has done great injustice to Dr. Ambedkar. The title of the book is 'Akhil Bhartiya Sanskrit Gyan Pariksha' which has been prescribed for Class VII in Lucknow, Uttar Pradesh. I do not know whether it was done by omission or commission.

DR. MURLI MANOHAR JOSH! : Are these books published by the NCERT or the State Governments of Uttar Pradesh or Gujarat? Or, are these books published by a private publisher? Please give me this information.

SHRI R. S. GAVAI : These books are for the students in Uttar Pradesh.

DR. MURLI MANOHAR JOSHI: The Calling Attention is regarding

NCERT curriculum and NCERT textbooks and the textbooks written by the State Governments and prescribed by the State Governments. If it is a book published by a private publisher and is being taught in a school which is not under the control of the Central Government or the State Government, it cannot be discussed.

SHRI R. S. GAVAI : I am not sure as to who has prescribed it. But it is a textbook which is being taught to the students of Class IX in Uttar Pradesh. Even if it is not part of the curriculum, is it not the responsibility of the Government to take cognizance of such instances? In this book they have changed the name of Dr. Ambedkar. Instead of Dr. Bhimrao Ambedkar, they have written, Dr. Bhimrao Upadhya. As a matter of fact, a great injustice is being done to Dr. Ambedkar. I have just quoted it. it may not be part of the curriculum. But if the book has been prescribed for Class IX, it is the responsibility of either the State Government or the- Government of India to ban this book. A non-controversial man, Dr. Amartya Sen, has said that there is an organised attempt to rewrite Indian history in a manoeuvred fashion. Some vested interests want to impose their ideology. The Andhra Pradesh High Court has observed that it was highly improper to waste crores of rupees of taxpayers' money on a dubious subject like astrology. And, the subject that is to be discussed is astrology. Of course, as per the Constitution, everybody has the liberty of thoughts and expression of beliefs. But don't you think that the education on astrology would prevent rationalist thinking among the students? By including astrology as a subject, are we going forward or are we going backward? As far as

Maharashtra is concerned, many Universities have written to the UGC that we are not willing to introduce astrology as a subject. Many universities, including the Bombay University and the Kolhapur University, have said that they do not want their students to take up subjects such as astrology and go backward in their thinking.

Now, I would like to mention about the positive aspects of our educational system. Of course, there are text books which deal with the freedom struggle of our country. Sir, I have the highest regard for all those who fought and sacrificed their lives for the independence of our country. But we should see to it that there is no comparison between one national leader and the other national leader, I would like to bring to the notice of the Minister that their text books mentioned that Hedgewar is much ahead of Mahatma Gandhi and Pandit Jawaharlal Nehru in the freedom struggle. It is better to avoid such a comparison in the textbooks. Sir, as far as value education is concerned, I welcome it. In the statement given by the Minister to this Calling Attention Motion, he has stated, and I quote: "Fifteen circulars on general development and other aspects of university education have been issued by UGC during 1999-2001. These include, prevention of ragging in universities and colleges, programme for utilising the Youth Force in the fight against corruption, setting up of Cells to combat sexual harrassment and violence against women in Universities..." Sir, I welcome the steps to be taken to ensure all these things. But, in the context of value education, if you want to deal with religion, I think, that will not be in proper spirit ; as a matter of fact, every religion, be it, Hinduism, Buddhism, Jainism, Sikhism, Christianity, Islam or others, inculcates tolerance towards each other. By comparing the religions, by giving title to education, we are diminishing the value of education. I, personally, feel, whatever values have been enshrined in the Constitution should be taught to the students and our education policy should be directed towards maintaining the spirit of our Constitution.

Dr. B.R. Ambedkar, is nothing but a philosophy based on compensation. This is number one. Secondly, the social backwardness and caste system is much more severe than the economic and educational backwardness. Thirdly, as long as the stigma of casteism is there, there is a necessity for making certain safeguards provisions in the Constitution. Some hon. Members sought a clarification whether it is a matter of right for the Scheduled Castes and Scheduled Tribes or we are doing it as a charity. The philosophy of providing a safeguard is that it is a matter of right, it is not a matter of charity. I feel, this philosophy will clear the minds of the people although we have got some misgivings regarding the special

safeguards provided in the Constitution.

Don't you think it is a national problem? Crores of people, for no fault of theirs, were kept aloof for generations together and were not allowed to join the mainstream? Don't you think that it is a moral bounden duty of the representatives of the people, law-makers and Members of Parliament to bring them back into the national mainstream?

❑❑❑

आरक्षण-पदोन्नतीबाबत सर्वंकष कायदा पाहिजे

(५ डिसेंबर, २००१)

राज्यसभेत ९२ व्या घटनादुरुस्ती विधेयकावर दिनांक ५ डिसेंबर, २००१ रोजी झालेल्या चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी अनुसूचित जाती आणि जमाती यांना पुरविण्यात आलेल्या आरक्षणाचे समर्थन केले. हे आरक्षण मागासवर्गीयांचे आरक्षण आणि पदोन्नती यासंबंधी सर्वंकष स्वरूपाचा कायदा करून संविधानाच्या नवव्या अनुसूचीमध्ये तो अंतर्भूत करण्याच्या प्रस्तावास त्यांनी पाठिंबा दिला.

The Government of India had issued certain OMs through the DoPT on 30th January, 1997, 2nd July, 1997, 22nd July, 1997, 13th August, 1997 and 29th August, 1997 which were detrimental to the cause of the Scheduled Castes and Scheduled Tribes and which were not in keeping with the true spirit of the Constitution. The hon. Minister was kind enough to negate the effect of these detrimental OMs dated 30th January, 1997, 22nd July, 1997 and 29th August 1997. Out of these five OMs, two OMs dated 2nd July, 1997 and 13th August, 1997 had a detrimental effect.

I would request the Hon. Minister, -she has a progressive view and has a progressive family background - to give some concrete assurances on the floor of this House. The O.M. dated 2nd July, 1997, changes the system of maintenance of roster from vacancy-based to post-based, thus affecting the promotion avenues for the Scheduled Castes and Scheduled Tribes. And, a new roster has been silently introduced. I would request the hon. Minister to review the matter and negate this detrimental O.M. Now, the O.M. dated 13!h August, 1997, restricting promotion in relation to Group 'A' is contrary to the spirit of the 77th Constitution Amendment. I request the hon. Minister to review it and negate this O.M.

Now, to sum up, I am in agreement with the learned Member, Shri Kapil Sibal. The statistics given by the hon. Member before this House indicates that reservation is the minimum guarantee; but even this has not been fulfilled yet. These statistics reveal that even after 55 years of independence, we have not achieved the goal which was in the mind of the founding father of our Constitution, the chief architect of our Constitution, Dr. Ambedkar. Cutting across party lines, we should see to it that there is a time-bound programme for the upliftment of the Scheduled Castes and Scheduled Tribes and for bringing them into the mainstream. This kind of a piecemeal legislation will not serve the purpose. So, I request the Hon. Minister to come forward with a comprehensive Central legislation, incorporating therein the suggestions relating to reservation and promotion, put forth by Shri Kapil Sibal; and such a Central legislation should be included in the Ninth Schedule of the Constitution.

I support and welcome this Bill. As you have given me only a few miniutes, I am tempted to deal with the logic and philosophy of reservation instead of dealing with the details of the Bill. their reservations about the Bill.

❑❑❑

गुजरातमधील हिंसाचाराचा निषेध

(११ मार्च, २००१)

सन २००२ मध्ये गुजरात राज्यात झालेल्या दंगलीवर राज्यसभेत ११ मार्च २००२ रोजी अल्पकालीन चर्चा झाली. चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी मानवतेला काळिमा फासणाऱ्या हिंसक कृत्यांचा तीव्र निषेध करून राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यात मुख्यमंत्री अपयशी ठरले असा ठपका ठेवला. गुजरातमधील समाजविरोधी घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावयास हवा होता असेही श्री. गवई म्हणाले. सूडाची विचारधारा राष्ट्रीय एकात्मतेशी विसंगत असल्याने संकुचित राजकारणाला थारा देण्यात येऊ नये, असे कळकळीचे आवाहनही त्यांनी केले.

Mr. Chairman, at the outset, I strongly condemn the massive brutailities committed at Godhra, and thereafter, in many parts of the State of Gujarat. My first submission will be that these brutal incidents no doubt

indicate the magnitude of brutalties and cruelties committed against a large number of human beings.

I have yet to say that indicates that we have killed the humanity totally, Sir, of course, some sections are of the opinion that the incidents at Godhra correlate to the incidents that happened, thereafter, in many parts of Gujarat. But I personally feel that their thinking is irrelevant, illogical and irrational. I am giving the reasons. Number one; the State Government of Gujarat said that whatevar happened in Godhra was preplanned, and not a sudden provocation, and some anti-social elements and some terrorist movements were also behind it. How is it befitting to say that it could be a reaction to the Godhra incident ? If this has happened with the knowledge of the Chief Minister and the Government of Gujarat, why were they silent ? Why were precautionary measures not taken, to prevent such cruel and inhuman incidents at Godhra ? The responsibility lies with the Government of Gujarat, and none else. How long are they going to say' it was action-reaction-and counter-reaction ? This is a vicious circle which will, Ultimately, kill the entire humanity. At least the people having a rational and logical thinking, should not use this kind of terminology of action reaction and counter-reaction- We have to stop them from using it. Sir, it is rather, unimaginable that, in the intial stages, for two or three days, the whole Gujarat State was handed over to the anti-social elements I do not want to name the organization. Everybody knows that allowed the the free looting, the killing, brutal killing and burning of the people in the broad daylight forget about the measures. Is it not a stigma on the nation ? How is it befiting to speak about the unity and integrity of the nation ? It goes against the spirit of humanity that men, women and children were burnt alive in broad daylight ! Certainly it is the killing of the humanity. I am much more aggrieved ; I do not want to make a political speech by demanding the resignation of the Gujarat Chief Minister. If he has a feeling for the humanity he should come forward and take the moral responsibility saying, " Here, I tender my resignation " He had failed to maintain law and order in the State and had, virtually, handed over the whole State to the anti-social elements. Sir, I quote the words of the Prime Minister. On this occasion he said, This is a criminal negligence. I am shameful. It is a stigma on the State Government of Gujarat. " Merely making statements will not serve the purpose.

Is it not the responsibility of the Prime Minister and the Home Minister to fix accountability and that too the accountability of the Chief Minister of Gujarat ? He failed to maintain the law and order situation and protect the lives and properties of the innocent people.

In conclusion of my speech, I come to the over all situation in the nation.

We are going through a very grave crisis, a crisis which is known to the Indian people this way or that way. The theory "eye for eye " and " tooth for tooth " is irrelevant to the cause of national unity and integrity. These are the days when we should get rid of this thinking and logic, and rise above the narrow politics and thinking to maintain the integrity and unity of this great nation.

❑❑❑

मतदारसंघ पुनर्रचना विधेयक

(१५ मे, २००२)

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी आयोग नियुक्त करण्याबाबतच्या विधेयकावर राज्यसभेत १५ मे, २००२ रोजी चर्चा झाली. या चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी महाराष्ट्रातील आरक्षित मतदारसंघाच्या संख्येत कपात न करता जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे आवाहन मंत्री महोदयांना केले. अनुसूचित जातीतून बौद्ध धर्माचा स्वीकार केलेल्यांच्या सवलती कायम ठेवण्यात आल्या पाहिजेत असे आग्रहाचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यासंबंधात १९७० मध्ये संसदेसमोर केलेल्या अन्न सत्याग्रहाची त्यांनी आठवण करून दिली त्यावेळी आपण महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती होतो. परंतु त्या पदाची फिकीर न बाळगता आपण ती कृती केली होती असेही त्यांनी स्पष्ट केले.

I support the Delimitation Bill, 2002 At the same time, I extend my sincere thanks to the Hon. Law Minister for coming forward with this Bill which was due since long. I also experess my sincere thanks to Shri Sangh Priya Gautam who has relived me from making an exhaustive speech, I have heard his speech which was full of rationale logic and sincere sentiments for the cause of the Scheduled Castes, the Scheduled Tribe and the weaker sections of the society.

I will deal with the objectives of the Bill. The Bill provides for readjustment and division of each State into territorial constituences on the basis of the 1991 Census. Whatever suggestions has been made I support those suggestions. The second objective of the Bill is that articles 330 and 332 of the consutitution as amended provide for refixing the number of seats reserved for the Scheduled Castes and the Schedule Tribes in the House of the People and

the Legislative Assemblies of States on the basis of the population ascertained by the 1991 Census, I fully support the first objective. So far as the second objective is concerned, they are trying their best to achieve this goal since 1957. Therefore, I welcome the Second objective. I also support Shri Sangh Priya Gautam and Shri Moolchand Meena who have detail information with the peculiar case of Maharashtra, Dr. Ambedkar, the chief architect of the Indian Constitution, embraced. Buddhism at Nagpur on 14th October 1956. At that time I was a law student, I also accepted Buddhism along with Dr. Ambedkar on the same day. At that historical event, unparallel in the whole world lakhs of people accepted Buddhism. This place is in Maharashtra. This place is known as the Dikshabhoomi, Nagpur which is of international reputation, Fortunately, I am the chairman of this Trust. I had invited my friend. Shri. Ravi Shankar Prasad to visit that place of course, the Prime Minister was there Shri Advaniji, Shri Pramod Mahajan and Shri Sangh Priya Gautam were also there.

Sir, in 1970 I sat on a hunger strike in front of Parliament. At that time, I was the Deputy Presiding Officer. I did not care for my position. I was demanding restoration of facilities to the people who were converted to Buddhism from the Scheduled Castes. I remember the speech of Dr. Ambedkar Many people have missinterpreted his speech. He asked Why select the place, Nagpur ? I don't have any anger towards Hinduism. But I do want social revolution, social transformation. And I do belive that this is the philosophy of Lord Buddha that is the Indian culture of the Lord Buddha. " He said " Why are you scared ? " I am the chief architect of the Indian Constitution " When many felt that after the mass conversion to Buddhism they would be deprived of the facilities social, educational, economic and political, he said, " All these facilities are in the pocket of my coat. Don't worry. Our intention is very good. Our intention is for total integration of the country. Our intention is social transfarmation. " Unfortunately, the great man died on 6th December, just after two months of this event. We were wondering what he would have got in his pocket that he was to offer. I wrote a book on this subject named "Facilities to Buddhists--Case before people ". Religion is not the basis for according facilities to the Scheduled Caste and Scheduled Tribes. The criterion is the social backwardness of the people Anyhow, in 1990, the then Prime Minister, Shri. V. P. Singh accorded these facilities to those Scheduled Caste and Schedule Tribe person also

who converted to Buddhism. Earlier, Since 1956, they were enjoying the social, economic and educational facilities, but they were deprived political facilities. Since 1990, twelve years have elapsed, but this has not been implemented. For this very cause, I sat on a dharna before Parliament and I went on a hunger strike Since it was not a movement for my personal pleasure, I wanted to ensure that whatever injustice was done, it was corrected, and I hoped that suitable provisions would be made for this in the Bill. Sir, I do agree with the views expressed by Shri Sangh Priya Gautam and Shri Moolchand Meena and I extend my personal thanks to them. The position was that six per cent of the people amongst the Schedule Caste accepted Buddhism in 1956. And, they said, " We are no longer the Scheduled Castes. We are Buddhists. We are ready for any eventuality, even at the cost of losing the privileges. We don't want to take any facilites of reservation. Nither me nor my children would ask for it. " But, Sir, their real need is to be addressed. Our Minister is a young, energetic and enthusiastic person. We all know that there was reduction of the seats in the Legislature and Parliament The Member were mentioning some figures saying it was reducted, from 6 to 3 in Parliament and from 36 to 23 in the State Legislature. So, my request to the Hon. Minister is to restore the number to its original level and to maintain the *status quo* as far as the reserved seats for the State Legislature and Parliament in relation to Maharashtra are concerned. Once again, I say that I Welcome the Bill.

❑❑❑

"Sir, in 1970 I sat on a hunger strike in front of Parliament. At that time, I was the Deputy Presiding Officer. I did not care for my position. I was demanding restoration of facilities to the people who were converted to Buddhism from the Scheduled Castes. I remember the speech of Dr. Ambedkar Many people have missinterpreted his speech. He asked Why select the place, Nagpur ? I don't have any anger towards Hinduism. But I do want social revolution, social transformation. And I do belive that this is the philosophy of Lord Buddha that is the Indian culture of the Lord Buddha. " He said " Why are you scared ? " I am the chief architect of the Indian Constitution " When many felt that after the mass conversion to Buddhism they would be deprived of the facilities social, educational, economic and political, he said, " All these facilities are in the pocket of my coat."

-R. S. Gawai

सहकारी बँकातील सिक्युरिटी घोटाळा

(१६ मे, २००२)

महाराष्ट्रातील सात सहकारी बँकांच्या सिक्युरिटी व्यवहार घोटाळ्याकडे श्री. संजय निरूपम यांनी १६ मे, २००२ रोजी केंद्रीय अर्थमंत्र्यांचे एका सूचनेवर लक्ष वेधले होते. केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी या लक्षवेधी सुचनेवर निवेदन केल्यानंतर चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या निवेदनातील मुद्यावर असहमती व्यक्त केली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचे कसोशीने पालन होत नाही असे ते म्हणाले. सहकारी बँकांत शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्या ठेवी असतात. या गरीब गुंतवणूकदारांचे भवितव्य बँकाच्या आर्थिक घोटाळ्यामुळे टांगणीला लागू नये अशी मागणी त्यांनी केली. गरीब गुंतवणूकदारांच्या ठेवी परत करण्यात याव्यात असे आग्रहाचे प्रतिपादन त्यांनी केले.

I would like to point out the tendency on the part of the cooperative movement, the political character of the social workers—may be, political workers—and the manner in which they behave. I know about the structure of all these banks because I belong to Maharashtra. I do not level any allegations against any political party. The composition of these banks—as incorporated in the statement made by the Hon. Finance Minister—show that workers of many political parties participate in them. My pertinent point is this : With due respect, I differ with the statement of the Hon. Finance Minister. Whatever guidelines that have been given by the Reserve Bank of India are not being followed strictly. Whatever has happened in Maharashtra or Mumbai or in any other part of the country is a matter of grave concern. Unfortunately, Harshad Mehta belong to Mumbai. But the tendency does not belong to Mumbai The UTI scandal had spread through out the country. It had no limits. It crossed the borders of Maharashtra.

मेरा कहना यह है कि यह जो स्कॅम है, उसपर हमें राजनिति से ऊपर उठकर सोचना चाहिए ।

महाराष्ट्र में कोआपरेटिव मूवमेंट फली-फुली और मेरे लिए यह दैव दुर्विलास है कि महाराष्ट्र में ही यह स्कॅम हो रहा है । यह जो को-आपरेटिव में स्कॅम हुआ है, पहले जैसा हुआ है । मेरी सबसे ज्यादा चिंता, चेयरमेन साहब, यह है कि इस बँक में जो इन्वेस्टर है वह फारमर है, काश्तकार है, मजदूर है और इन्होंने अपनी सेविंग के पैसे

वहाँ डिपॉजिट किए है । What is the fate of these poor investors who are largely farmers, poor working people ? What are the remedial measures ?

वे तो पैसे खाकर चले गए, हजार करोंड और जिन्होंने यह स्कॅम किया है वे जेल में जाएंगे, छूट जाएंगे लेकिन जिन्होंने अपना पैसा इन्वैस्ट किया था, उनका क्या होगा ? सभापति महोदय, जैसा कि निवेदन प्रस्तुत किया गया है, उसमें है कि उसका जाँच कार्य शुरू है । मैंने पहले बताया कि रिजर्व बैंक ऑफ इंडिया की जो गाइडलाईस है, वह जांच कार्य उसके मुताबिक होना चाहिए ।

सभापति महोदय, मैंने पूरी स्टेटमैंट पढ़ी है । इस बैंक में जो गरीब काश्तकार किसान और मजदूरों के जो डिपॉजिट थे, उनके उनको पैसा कुछ मात्रा में वापिस करने के लिए आप क्या करेंगे ताकि सहकारी मूवमेंट बदनाम न हो ? जिस संस्था के बारे में गरीब लोगों का, काश्तकारों का प्यार था, उसके बारें में अभी दिन-प्रतिदिन उनके मन में नफरत बढ़ रही है ।

ज्यादा तकरीर न करते हुए उसमें किसी पोलिटिकल पार्टी का इन्वाव्लमेंट बताकर उसको पोलिटिकल डिसीजन न बताते हुए मैं यह कहना चाहता हूँ कि इन छोटे-छोटे गरीब काश्तकारो और मजदूर आदि के जो करोडो रूपए इन्वेस्ट हुए थे, मैं आपकी तरफ से यह अपेक्षा करता हूँ कि आप उनको वह वापिस करेंगे ।

❑❑❑

गोवारींच्या हाकेला दादासाहेबांचा प्रतिसाद

(३ डिसेंबर, २००२)

अनुसूचित जमातीत समावेश व्हावा म्हणून गोवारी समाजाचे आंदोलन महाराष्ट्रात प्रदीर्घ काळ चालू आहे. नागपूरमध्ये विधिमंडळ अधिवेशनाच्या वेळी या मागणीसाठी निघालेल्या एका मोर्चाच्या वेळी चेंगराचेंगरी होऊन त्यात शंभराच्यावर गोवारींची प्राणहानीही झाली होती. रा. सू. गवई यांनी राज्यसभेच्या व्यासपीठावर गोवारी समाजाची ही मागणी ३ डिसेंबर, २००२ रोजी विशेष उल्लेखाद्वारे मांडली. या विशेष उल्लेखात आपण सहभागी असल्याचे श्री. दत्ता मेघे यांनी नंतर सांगितले.

The Gowari caste is one of the important Tribes and its population throughout Maharashtra is 20 Lakhs. Major Portion of this Tribe Lives in nine districts of Vidarbha. Similary about ten lakh people belonging to the Gowari caste live in Madhya Pradesh. Various Foreign and Indian

socialogists, anthropologists, reserch scholars and authorities have, after a study, accepted that the Gowari caste is one of the component elements of the tribal population and have given the findings that Gowari caste is a Tribe. Originally, in the British regime, the Gowari caste was listed in the Vidarbha region of Maharashtra State and the districts of Madhya Pradesh as original Tribe and they were also availing of all the tribal facilities.

But due to ignorance most of the people of the Tribe could not avail of any facilities. The Maharashtra Government has made strong recommendation to the Central Government after research and detail study of the backwardness of the peeople belonging to the Gowari caste stating that the Gowari caste is Tribe and it should be included in the Scheduled Tribes list.

I, therefore, request the Government of India to take steps to include the Gowari caste in the revised Scheduled Tribes list of Maharashtra and extend tribal facilities to them.

Shri Datta Meghe (Maharashtra) : Madam, I associate myself with this special Mention.

❑❑❑

महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना केंद्रातर्फे मदत द्या

(३० नोव्हेंबर, २००५)

सन २००५ च्या पावसाळयात महाराष्ट्रासह दक्षिणेकडील काही राज्यात अतिवृष्टी आणि महापूर यामुळे हाहाकार उडविला. जुलै-ऑगस्टमधील या नैसर्गिक आपत्तीचा महाराष्ट्रातील दहा लाख कुटुंबाना फटका बसला आणि अकराशे लोकांना प्राण गमवावे लागले. राज्यसभेत ३० नोव्हेंबर, २००५ रोजी या विषयावर झालेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी त्सूनामीग्रस्तांना ज्या निकषावर मदत देण्यात आली. त्याच निकषांवर महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना मदत देण्यात यावी असे सुचविले. मुंबईत अतिवृष्टीने झालेल्या प्रचंड हानीची माहिती देऊन मुंबईसाठी विशेष सहाय्य देण्यात यावे अशी विनंतीही त्यांनी केली.

I think, this being the natural calamity, this is rather a national problem. I am happy that I attended the discussion and hon. Members who

have participated in the discussion, by and large, have national outlook.

Maharashtra is one of the States, I think, it is not an exaggeration which has suffered invariably. The hon. Home Minister, of course the Home Minister for the nation, has to look after all the States of the nation. But, at the same time, he comes from Maharashtra, and therefore, he has better knowledge than me ; as far as present status and situation of Maharashtra are concerned. Insted of dealing with the general problem, I will deal with the particular problem of the Maharashtra Government in a nutshell. The floods during July-August affected 10 lakh families in Maharashtra. About 1,100 people died and about 1700 families were rendered homeless. More than 5.5 lakh houses are partially damaged. Over ten lakh hectares of crops have destoried. Farmers who take one crop a year most of the farmers take only one crop a year lost everything and are left with no means of subsistence for the rest of the year.

Switching on to the point and putting the case of Maharashtra to the hon. Home Minister to secure assistance. I just humbly put forth the efforts for mobilization done by the Government of Maharashtra. The Government of Maharashtra distributed one lakh to the kin of all deceased, who died during the floods The Government has distributed Rs. 6.54 crores as ex-gratia assistance. The Government has also sent the list of deceased for release of assistance from the Prime Minister's Relief Fund.

This may be my request not only for the State of Maharashtra but also for the States that are suffering due to floods. The Government has distributed gratuitous relief to the flood affected families and on an average, it is Rs. 5,000 to each family. So far, an amount of Rs. 392 crores has been distributed as relief to the flood affected families. The Government has provided food grains and kerosene oil to all the flood affected families free of cost, 20 kg. of food grains and 10 litre of kerosene oil to each family. About 20,000 tonnes of food grains and 8,000 kilolitres of kerosene oil have been distributed so far.

The Government has taken a decision to construct temporary shelter for all those who lost their homes. The Government has sanctioned Rs. 15,000 for temporary shelter. I mentioned earlier the efforts for mobilization did by the Government of Maharashtra, now on behalf of the Maharashtra Government, I am requesting for the Central assistances. We have requested for a Central assistance of Rs. 8,740 crores for construction and rehabilitation in the wake of floods and Rs. 3,900 crores as a special assistance for Mumbai.

The States which have suffered heavily due to floods and unprecedented rains have asked the Government to relax centain norms. It has asked for increased assistances for farmers in view of the complete destruction of the crop. The application of CRF/NCCF norms would not provide enough assistances for meeting their basic needs during the remaining years. Similarly the floods have equally affected all the segments of farmers. It would be unfair to limit the assistance to small and marginal farmers. The Government would take the opportunity of reconstruction programme for providing better housing to the flood affected people. It is, therefore, requested that the norms applied for housing to the tsunami--affected people should be recommended for Maharashtra and rest of the States The special assistance to Mumbai the city of international importance, should be given. Mumbai's vulnerability arises from its huge concentration of people, old infrastructure inadequate housing and poor drainage. The Government would undertake special Projects which address conditions of endemic vulnerability in the city. The State Government has requested the Central Government for a special assitance of Rs. 3,900 crores to address these long-terms issues-restoration of natural drainage represented by the mithi river and replacement of strom water drainage in the the city. It would cost Rs. 1.5 lakh for constructing a house in Mumbai and the construction of about one lakh houses would cost Rs. 1,500 crores. The State Governement has thus requested Rs. 1,500 croresfor shifting these families to safe locations In the last, The State Government has requested a grant of Rs. 1,200 crore for upgrading Mumbai drainage system which is about 100 yreas old and needs urgent upgradation to avoid flooding of Mumbai in future. Now, I have to conclude my speech. At the outset, I said, the mobilisation was, of course started by the Government. We are asking the Central Government to assist us, not to share all hundred per cent burden. The major task has been done. We are requesting the Central Government for assistance for the rest. Thank you very much, Sir.

❑❑❑

विदर्भाची उपेक्षा नको

(१० मार्च, २००६)

विदर्भाच्या जलद विकासासाठी विशेष कार्ययोजना आखण्यात यावी आणि तिच्या अंमलबजावणीसाठी पुरेसे अर्थसहाय देण्यात यावे असा आग्रह धरणाऱ्या अशासकीय ठरावावर राज्यसभेत १० मार्च २००६ रोजी चर्चा झाली. माननीय खासदार श्री. दत्ता मेघे यांनी मांडलेल्या या ठरावावरील चर्चेत भाग घेताना रा. सू. गवई यांनी संविधानातील ३७२ अ या कलमान्वये माननीय राज्यपालांना देण्यात आलेल्या विशेष अधिकारांचा उल्लेख करून डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी केलेल्या शिफारशींना राज्य सरकारने केराची टोपली दाखविल्याचे सांगितले. राज्य सरकारला घटनात्मक तरतुदींचे पालन करण्यास भाग पाडावे अशी विनंती त्यांनी तत्कालीन राज्यपाल एस. एम. कृष्णा यांना केली. पश्चिम महाराष्ट्रावर खैरात आणि विदर्भाची संपूर्ण उपेक्षा अशा तऱ्हेने राज्य सरकारचा कारभार चालला असल्याची स्पष्टोक्ती गवई यांनी केली.

Sir, I must express my thanks to the Hon. Member, shri Datta Meghe, who is now presiding over, He is on the panel of the Vice-Chairman. He moved a Resolution of vital importance not only for Vidharbha, Keeping in view the nature of injustice done to Vidhrbh, but also to the other smaller regions within the States elsewhere, Sir, when you were moving the Resolution, I paid personal attention towards it. You dealt with it elaborately. You know the facts, but the Hon. Minister Shri Rajasekharam, who is going to reply, should also know the facts. Firstly, what was the prior situation of Vidhrbha before merged into Maharashtra and become a Sanyukta Maharashtra ? We were in Madhya Pradesh together having Nagpur as the capital. Two stalwart people of Madhya Pradesh were there ; Pandit Ravishankar Shukla and Shri Dwarak Prasad Mishra. And recently, the man who died, Shri P. K. Deshmukh, was also a stalwart. They were all stalwasts. We are happy. Under the pretext of integration, State integration and language integration, there were demands that Vidhrbha be

एचबी ११८०—३५

merged with Sanyukta Maharashtra. There was a demand. You have mentioned in your speech and Mr. Darda also mentioned the language spirit, integrity of language and a lot of agitation. You know, you are a good friend, of mine that as a student leader. I participated in the agitation in Maharashtra. why ? It was for the integration of the whole State and not to allow disintegration. That was the reason. Ultimately, one fine day, prior to the formation of Maharashtra in 1960, the stalwart Chief Minister of Maharashtra Shri Yashwantrao Chavan, who happened to be the Defence Minister in the Government of India, made a declaration and that declaration is known as the Nagpur Pact. That declaration is still alive today. It is still alive. I don't want to quote the whole declaration because that is a part of the history, written in the histroy also wherein it is mentioned, "the step-motherly treatment will not be given to Vidharbha. Equitable distribution of resources and administration will be given to Vidarbha. There will be a second capital in Vidarbha. because you got the first capital in Madhya Pradesh " Okay Ornamental second capital is there. As mentioned by my friend Shri Vijaybabu Darda that MLA's hostel is there, Assembly Hall is there. I think these are all ornamental things; you justify that we have a holy monument. We do respect it, but that dose not mean that you ignore our legitimate claim. So, Sir, the second era was from 1960-1984. What was that era ? That was era, as far as the State is concerned, without planning. There was only two-tier planning. One was the Central planning and another was the state planning. Whatever allocations were there from the Centre, they ought to be spent by the State. Whatever allocation was there from the Centre to Maharashtra, was being spent by the so-called stalwarts, leaders of the western Maharashtra, not Maharashtra Whatever revenue and resources they got from the Centre, they spent only for western Maharashtra, and totally ignored Vidharbha. They deviated the spirit of the Nagpur Pact. That was the pious understanding among the leaders of the two regions. They totally exploited it. When the planning era started, it entered the Central Planning State planning and district planning and then we awoke Then, this accumulated backlog, which was there prior to the Central, State and district planning was already accumulated at the cost of Vidharbha. Therefore, we demanded a special provision in the Constitution which, Sir, you referred to in your earlier speech, That is articles 372A. There are normal articles in the Constitution. These are normal provisions. But the articles 372 is an abnormal provison in the sense that if any State is ignoring,

not giving adequate proportion/ representation to the field of administration and every other field, then, this articles come For that the power was given to the Governor of the respective State, such as, earlier the power lied with the Hon. Member of this House, Dr. Alexander, when he was the Governor. Now that power lies with the existing Governor of Maharashtra, Shri S. M. Krishna. For that, they formulated Dandekar Committee in 1984. I gave my evidence before the Dandekar Committee when I was Member of the Upper House, then, in Maharashtra Legistative Council.

Sir, a very logical and rational balance was drawn up by the economist, the learned economist, Dandekar. He submitted his report in 1994. What was the calculation ? Sir, earlier in your speech, you have mentioned that it was to the tune of Rs. 6000 crores. All right. We are requesting the leadership of the Maharashtra,—I say deliberately-the leadership of the Western Maharashtra, whom we call our elder brother, to whom we often request that we are your small brother, to treat us as your equal partner. We are requesting them not to give us the step-motherly treatment, treat us as your equal brother, equal sharer of the Administration. But they ignore, totally ignore. They have given it a deaf ear, a blind eye, and whatever backlog was estimated by the Dandekar Committee, has gone up to the tune of Rs. 25,000 cores. That is what you have demanded in your Resolution, a package of Rs. 25,000 crores, I think, you should not demand it, We, including, Mr. Vijay Darda, you and me, should not demand it. As far as the State Administration is concerned, we are not beggars. We are not begging. We are not demanding anything else. We are demanding our rights Our demand is for the cause of the greater integration of the Sanyukta Maharashtra. It is the demand of a man like me who was a student leader and who was arrested for the formation of the Sanyukta Maharashtra. This demand is in the interest of total integration of the State. We are treating them as our elder brother, but they ignore us. So, where is the question of begging and demanding comes ? It is a matter of our right. We are asking for our right, not demanding. We are not requesting, ... (Interruption)

SHRI. VIJAY J. DARDA : Sir, I have never said ..... (Interruption) .....

SHRI. R. S. GAVAI : No ; I am complimenting you. Why do you take it seriously ? It is a compliment to you ..... (Interruption) .....

SHRI. VIJAY J. DARDA : Thank you.

SHRI R. S. GAVAI : I have complimented you and the Chair .....

एचबी ११८०—३५अ

(Interruption) ..... Forget that, like you, I am not an expert in English language. I am grass root man ..... (Interruption) ..... Forget that, I am Complimenting them. It is an addition. We are assserting our right. Am I right ? For that, we are asserting our right. And what happened ? Sir, despite the provisions made in our Constitution, they disobeyed it. Besides that it was obligatory on the part of the State, the Government, the Governor, they disobeyed it. Sir, I am not using harsh words, but if we start asserting in the House that this is improper on the part of the Government that they are not obeying the Constitution and that it is the failure of the Constitution, what would be the consequences ? What would you do ? But we neither went to that level not we want to go to that level. Whatever recommendation was made by a stalwart like Dr. P. C. Alexander, when he was the Governor, was thrown into the dustbin Sir, you can see this is the respect for the provisions of the Constitution. Is this the respect to the mandate given by the Governor, who is the Head of the State ? The provisions of the Constitution are being disobeyed, not followed. Now, the backlog has accumulated because it started accumulating right from 1960. This has been going on right from 1960 onwards. So, it is accumulated backlog of 46 years. Instead of helping us, now they are demanding Rs. 2,000 crore for Krishnapuri. They demonstrated in front of the Legislature demanding the clearance of the backlog. Their so called western and ruling leaders participated in the agitation. You have used harsh language and so has Shri Vijay Darda. Now, I am compelled to say that if, within a certain time limit, justice is not done to Vidharbha. I may also join the agitation for separation of Vidharbha because we believe in integration. But you don't belive in integration, you believe in disintegration and injustice and you are ignoring us.... (Interruptions) ... By 'you' I mean the Maharashtra Government, neither the Presiding Officer, nor my dear friend, Shri Sharad Joshi. 'You' means the Maharashtra Government This may send a proper signal from this House that we have equal rights. Rajya Sabha is the place, which is more empowered to deal with the relations between the States and the Centre, more than the Lok Sabha. So, the mandate from the Rajya Sabha is a vaild one. Let the God bless them with wisdom so that they come forward and see to it that within a certain time limit, they do justice to Vidharbha. That is the first point.

Sir, I would request the Governor, Shri S. M. Krishna, to follow the path of Dr. Alexander and compel the present Government not to disobey the Constitution.

❑❑❑

राज्यपाल केरळ

जागतिकीकरण व दहशतवाद निर्मूलन हे परराष्ट्र धोरणाचे केंद्रबिंदू

(दादासाहेबांनी केरळ इंटरनॅशनल सेंटरच्या वर्धापनदिनी व्यक्त केलेले उद्‌बोधक विचार)

माननीय दादासाहेब गवई हे जसे राजकीय नेते होते, विधिमंडळ व संसदपटू होते. तसेच ते विचारवंतही होते. देशकारण, समाजकारण, अर्थकारण या विषयी त्यांची निश्चित अशी मते होती व प्रसंगानुसार ते ती स्पष्टपणे मांडतही असत. केरळचे माननीय राज्यपाल असताना त्यांनी विविध समारंभात मांडलेली काही मते. त्यावरून त्यांच्यातील समाज चिंतक, विचारवंत प्रामुख्याने डोकावतो, यावेळी त्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण, पेयजल समस्या, आरोग्य समस्या, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातील शिक्षण, लोकतांत्रिक, धर्मनिरपेक्ष शिक्षण आणि भारतातील निवडणूक प्रणाली यासारख्या महत्त्वपूर्ण विषयावर आपले विचार व्यक्त केले.

First Anniversary Conference On Indian Foreign Policy 13th December 2008.

Ladies and Gentlemen,

I have immense pleasure to be here at this August assembly to inaugurate the First Anniversary Conference on Indian Foreign Policy organized by Kerala International Centre. Let me, at the outset, greet the distinguished dignitaries who are here to contribute from their experience and expertise, enlightening the participants on the chosen topic.

I would also like to compliment the organizers on their insight and initiative to avail their first anniversary sessions to deliberate, on our country's foreign policy. It is most relevant and important that we review our standpoint in this regard, particularly in the wake of sporadic incidents that shook the very foundation of international relations. The overall situation is so grave and compelling that we should re-define our parameters and evolve new strategies to cope with the present crisis.

The host organization, as I come to understand, has been designed more or less on the pattern of the India International Centre, New Delhi. As an institution of excellence, focusing on foreign affairs, this Centre is intended to bring Kerala's perspective to the study of international issues.

Another notable feature is that it will be a forum for foreigners and non-resident Indians to interact with the State's intellectuals. Having produced quite a number of celebrated diplomats who have excelled in many a world platform, Kerala has a lot to contribute in evolving and promoting Indian foreign policy.

I am amid a galaxy of eminent diplomats and experts on foreign affairs, who are deep-versed in the intricacies of international policies. However, I would like to recall the post-independent years when India played a cardinal role in promoting cordial relations with foreign countries. Those were the glorious days of Panchsheel and of the Non Aligned Movement.

Thanks to the leadership of Pandit Jawaharlal Nehru our first Prime Minister, we enjoyed a status much beyond our means as well as capacity. Little wonder, our country was looked upon with hope and respect among the Nations of the world. In fact, a close scrutiny of those strategic days would stand us in good stead when we attempt to assess our foreign policy over the years.

History, as well we all know, is witness to an eventful past when there emerged countries, small and large, with power, resources and intellectual impetus. They have not only enlarged the range and scope of the United Nations Organisation (UNO), but also contributed to streamlining the international system in accordance with their meterial interests and values. In the recent past, we witnessed the end of the Cold War, consequent on the disintegration of the USSR and the entire East European Soviet Bloc. And now, as the sole super power, USA is influencing international politics, perhaps as never before, and creating a new world order to promote its vital national interests.

Keeping in view of the present day situation, India needs to evolve a foreign policy which will conform to our national interests and security. The role of Obama's America in international politics, the strong presence of the Eupopean Union, the involvement of the Arab world, the spectacular rise of China as an economic and military power, and the impact of globalization and terrorism are some of the prime factors that deserve serious consideration while formulating our foreign policy.

With sevaral seasoned diplomats to guide the different sessions, I am sure, you will have fruitful discussions. Meanwhile, I greet you all once again and wish you success.

❑❑❑

संशोधनात मागे राहणे परवडणार नाही

(अखिल भारतीय आरोग्य विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या राष्ट्रीय परिषदेतील भाषण)

Ladies and Gentlemen,

Medical education, as we all know, has to face more changes and challenges as never before. This is more so in the wake of the amazing advancements in the field of Science and Technology. In fact, the area of healthcare has undergone a lot of positive changes almost all over the world. However, one has to ask whether the majority of our people have enjoyed the benefit of this progress. We should also ask ourselves whether medical education has improved in tune with the technological advancement.

It is in this context the role of the Health Universities become relevant and responsible. Needless to say, the healthcare of our nation has to be entrusted to competent and well qualified professionals. They have to ensure the well-being of the people which is the foundation of every country in pursuit of excellence. Here lies the prime duty and responsibility of our Health Universities. It is imperative that medical education will have to be up-dated and stream-lined in tune with the demands of the emerging scenario.

I am amid a galaxy of eminent academics whose vast experience will help us solve many problems facing us. However, I would like to point out that our Institutions do not make major contributions in Health Sciences. So also, our scientists lag behind when compared to Indians who work in foreign Institutions and establishments. Therefore, it is high time our Health Science Universities took initiative in improving the research facilities. The Conference, I do hope, would consider the matter seriously.

I am glad to note that this Conference is being held when Kerala's own efforts to establish a Medical University in the State are in full swing. The occation, I am sure, will give a golden opportunity for the oraganizers to interact with veterans in the field and seek their expert guidlines.

❑❑❑

लोकशाहीत निर्वाचन आयोगाची जबाबदारी महत्त्वाची

(राज्य निवडणूक आयुक्तांच्या अखिल भारतीय परिषदेसमोर केलेले भाषण)

Ladies and Gentlemen,

I have immense pleasure to be here at this August assembly to inaugurate the Eleventh All India Conference of State Election Commissioners of various States. Let me, at the outset, extend a healthy welcome to all the distinguished Commissioners, Secretaries and other important offiicials and wish them fruitful discussions. I would also like to congratulate the Election Commission of India on the splendid manner in which the 15th Lok Sabha polls were successfully conducted, adding a new feather to our democracy that is at once the largest in the world and the most dynamic.

It is indeed in the fairness of things that the Election Commission of India holds a meeting with the State Election Commissioners once a year to discuss issues of mutual interest such as preparation of common electoral roll for elections at all levels, sharing of Electronic Voting Machines, etc. Hosted by the State Election Commission, Kerala, this year's conference, I am sure, will deliberate on common problems which include greater administrative and financial autonomy for the Election Commissions, effective implementation of Code of Conduct and the like.

As we all know, the 73rd Amendment to the Constitution of India involves a new chapter in the process of democratic decentralisation in India. The prominent features of the Amendment include such provisions as Constitutional status to Panchayati Raj Institutions, reservation of seats and the office of Chairpersons for women and weaker sections of society, conduct of election to these bodies by State-level Election Commission and setting up of Finance Commission to transfer funds to Panchayati Raj Institutions.

Needless to add, elections to the grass-root level democratic institutions evoke much more involvement at local level and a much higher percentage of participation by the public. However, it is imperative that elections to local bodies are held in a free and fair atmosphere ensuring the very basis of our democratic system.

The major factors related to the conduct of elections are one, creating greater awareness among the public and two, maintenance of law and order during elections. In fact, both are closely connected to each other. Regarding the latter, the State Election Commissioners are entirely dependant on the State Government. What is paramount is that elections

have to be free, fair and impartial, providing a fair playing field for all political parties and candidates. Obviously, provisions of law have to be rigorously enforced to ensure this.

Let us bear in mind that the 73rd Amendment to the Constitution provides only the framework for the process of strengthening Panchayat Raj Institutions. It is suggested that there should largely be a common and uniform structure and procedure for the conduct of elections. So also, a common electoral roll may be availed for elections conducted by both the Election Commission of India and State Election Commissioners. The suggestion to have a common electoral roll as well as to hold simultaneous elections to Municipal bodies and panchayati Raj Institutions as done in Kerala will considerably reduce malpractices to a large extent. In short, a streamlining of the electoral process and the functioning of the Election Commissions should be done with a view to making both vibrant and truly democratic.

Another problem faced by State Election Commissions can be accounted to lack of administrative and financial autonomy. This Conference, I am sure, will discuss such anomalies in depth and come out with practical remedies.

❑❑❑

महिलांच्या सबलीकरणाबरोबरच सुरक्षाही महत्त्वाची

Ladies and Gentlemen,

I have immense pleasure to participate in this August function that has been convened to inagurate a Workshop on *Women and Health* in connection with the International Women's Day. Let me, at the outset, compliment the Centre for Women's Studies, University of Kerala, its intiative to organize the Day in a most befitting manner. Incidentally, the Centre for Women's Studies has been doing commendable service in exposing, combating and containing violence against women at all levels. It is indeed laudable that the Centre conducts Refresher courses for college teachers besides periodic Seminars on related themes. I am happy to note that the two-day workshop is being

held for the benefit of the co-ordinators of Women's Studies Units in the colleges affilliated to the University. Let me avail this opportunity to wish you all active involvement and a fruitful participation.

Adolescence, as we all know, is a crucial period of transition in everyone's life, from childhood to youth. It offers ever so many opportunities for the truly talented to go up in their life. so also, there are equal chances when one falls into the ditches despair and danger. The adults constitute the prospective work force of any country, provided they are brought up properly. They are the makers of the tomorrow and architects of the future. It is therefore imperative to nourish them in the correct direction, without falling prey to provocations and prejudices of every sort.

Another matter to be considered is that according to the census 2001, this age group constituted 22.5% of our population. That is to say, the 10 to 19 age-group deserves to be groomed with utmost attention. This is more so since those in this group are liable to be affected by both physical and psychological problems. Obviously, our pre-youth population has to be handled with tender care and thoughtful caution. Needless to add, mental health problems affect the education, economic and social aspects of the formative period, As sociologists point out society has the responsibility to provide safe and supportive environment for those need.

Equally important is the right to gender equity, providing equal privileges to women as enjoyed by men. Empowerment of women is closely linked with their autonomy and the choice related to health, reliance and development. In the present state of affairs where the average woman is often subjected to acts of violence - domestic or otherwise, you have a major role to play so as to enlighten the majority on how to build a better world devoid of such discriminations.

The workshop, I do hope, will further motivate you in your schemes of action, besides adding a profound sense of dedication in your resolve to carry out the task assigned to you. such get-togethers are sure to serve a long way in equipping you in your chosen pursuit of excellence. I greet you once again and wish you meaningful deliberations.

❑❑❑

अज्ञातशत्रू...

- राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतील भाषण
- गुरुवर्य वि. स. पागे यांच्या निरोपाचे भाषण
- विविध मान्यवर नेत्यांना दादासाहेबांच्या शोकसंवेदना
- महाराष्ट्र विधिमंडळाची दादासाहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली
- लोकसभा, राज्यसभेची श्रद्धांजली
- रा. सू. गवई जीवनपट

राज्यपाल नियुक्ती...

मैं, आ. प. जै. अब्दुल कलाम, भारत का राष्ट्रपति, भारत के संविधान के अनुच्छेद 155 द्वारा मुझ में निहित की गई शक्ति के आधार पर इसके द्वारा श्री आर० एस० गवई को उस तारीख से बिहार का राज्यपाल नियुक्त करता हूँ जिस तारीख को वह अपने पद का कार्यभार ग्रहण करते हैं।

भारत गणराज्य के सत्तावनवें वर्ष में, आज सन् दो हजार छः ईसवी के जून मास के पन्द्रहवें दिन (25 ज्येष्ठ, 1928 शक), राष्ट्रपति भवन, नई दिल्ली, से जारी।

भारत का राष्ट्रपति

लोकशाही अशी विकसित होते

राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेने महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांकरिता आयोजित केलेल्या उजळणी अभ्यासवर्गात मा. श्री. रा. सू. गवई, तत्कालीन उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी केलेले भाषण (सन १९७८)

माननीय श्री. पागे साहेब, माननीय श्री. शिवराज पाटील, श्री. नांदे, श्री. देव आणि विधानमंडळाचे सन्माननीय सदस्य,

राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या विद्यमाने नवीन आमदारांकरिता हा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. याचे तीन गट पाडण्यात आलेले आहेत. या वर्गाचा फायदा बहुसंख्य आमदार मित्र घेतील अशी आमची अपेक्षा आहे. आजच्या या वर्गामध्ये ४२ आमदारांचा समावेश आहे. आजचा पहिला दिवस असल्यामुळे उपस्थिती जरा कमी दिसत असेल पण उद्या सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित राहतील. हा जो प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला आहे त्याविषयी मी जास्त विवेचन करणार नाही. या वर्गाच्या उद्घाटनाच्या वेळी माननीय श्री. पागे साहेब याची सविस्तर माहिती आपणाला देतीलच. मी आपणाला लोकशाहीचे महत्त्व सांगण्याची आवश्यकता आहे असे नाही. सरकारचा हा कारभार निरनिराळ्या पद्धतींनी चालत असतो, त्यापैकी जास्तीत जास्त निर्दोष असलेल्या लोकशाही पद्धतीचा स्वीकार आपण केला आहे. लोकशाही कार्यपद्धतीचा दर्जा हा इतर कोणत्याही राज्य कारभार करण्याच्या पद्धतीपेक्षा उच्च असा आहे. प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीचा उदय असाच झाला. लोकशाही राज्यांचा जसजसा विकास होत चालला तसतसे नगरांचे आकार कमी होऊ लागले. जिल्हा, तालुक्यापर्यंत आपण लोकशाही नेऊन पोहोचविली. सामान्य माणसाला राज्य कारभारामध्ये भाग घेता आला पाहिजे ही यामागची मूळ कल्पना आहे. परंतु विभिन्न राज्यांच्या स्तरावर प्रत्यक्ष लोकशाहीची पद्धती आणि जनसंख्येची व्याप्ती पाहता, प्रत्येक माणसाला राज्य कारभारामध्ये भाग घेता येणे ही गोष्ट अशक्य आहे. म्हणूनच प्रातिनिधिक स्वरूपाच्या लोकशाही पद्धतीचा उगम झाला. जनतेने आपला प्रतिनिधी निवडून द्यावयाचा आणि मग त्याच्या वतीने राज्य कारभारावर देखरेख ठेवावयाची, आपल्या भावना व्यक्त करावयाच्या, शासन पद्धतीतील उणिवा शोधून काढून त्या दुरुस्त करावयाच्या, अशा प्रकारच्या लोकशाहीची निर्मिती झाली. आज आपल्याकडे एक लक्ष मतदार आपला प्रतिनिधी आपले मनोगत व्यक्त करण्याकरिता विधानसभेवर निवडून देतात. कारण त्या सर्वांना काही आपले मनोगत व्यक्त करण्याकरिता विधानसभेमध्ये बसता येत नाही. हा एक लक्ष मतदारांचा प्रतिनिधी लोकशाहीला अभिप्रेत असलेल्या मार्गांचा अवलंब करून, सरकारवर जनमताचा दबाव आणतो. अशा रीतीने हा प्रतिनिधी आणि सरकार यांच्या समन्वयाने हा राज्य कारभार चालतो. आता प्रातिनिधिक संस्थाही ओघानेच आल्या.

आज आपण ज्या ठिकाणी बसलो आहोत ती महाराष्ट्र विधानसभा आहे. महाराष्ट्र विधानसभा आणि विधानपरिषद अशी दोन सभागृहे आपल्या येथे आहेत म्हणून त्यास विधानमंडळ असे म्हणतात. दोन्ही सभागृहांचे प्रतिनिधी येथे आहेत. लोकशाहीसंबंधीची अत्यंत मर्मभेदी व्याख्या विधानसभेचे माजी सभापती श्री. बाळासाहेब भारदे यांनी सांगितलेली आहे. लोकशाहीत विधानमंडळ हे मंदिर आहे. यातील खरी देवता जी आहे ती जनता आहे. येथील उपासक जे आहेत ते जनप्रतिनिधी. या उपासनेच्या संभाषणातून जी पूजा घडते त्याला आपण वादविवाद म्हणतो.

हे वादविवाद होत असताना त्यासाठी विविध आयुधे वापरली जातात. ती आयुधे वापरून या सभागृहामध्ये सर्व सभासदांना चर्चा करता येते. सर्वसामान्य जनतेची जी गाऱ्हाणी असतात ती लोकप्रतिनिधी सांगोपांगरीत्या विधिमंडळामध्ये मांडून अप्रत्यक्षरीत्या जनतेची सेवा करतात. ते काम नवीन आमदारांनी मागच्या सत्रामध्ये केले आहे. निवडणुकीनंतर वेळ अपुरा असल्यामुळे आजच्याप्रमाणे वर्ग घेऊन अधिक स्पष्टरीत्या यासंबंधी आपणाला सांगता आले नाही. आपण सर्व मित्र आहोत. तेव्हा अधिक काही सांगावे असे नाही. परंतु संसदीय कामकाजासंबंधी ज्या काही प्रथा आहेत, त्यासंबंधी जे काही अनुभव आहेत ते विशद करण्याचा प्रयत्न येथे होणार आहे. कोणतेही व्याख्यान असले. चर्चा असली, भाषणे असली, त्यावेळी साधी घंटी जरी कोणी वाजविली तर तेथील गांभीर्याचा भंग करणारी ती ठरते. कीर्तनामध्ये तसे काही लिखित नियम नसतात, नीती नियम नसतात, कोणी त्यासंबंधीचा प्रस्ताव मांडत नाही. कोणी त्यास दुजोरा देत नाही. परंतु काही मूल्यांची जोपासना त्या ठिकाणी स्वतः होऊन केली जाते. तेव्हा या ठिकाणीसुद्धा काही नीतीमूल्यांची जोपासना आपल्याला केली पाहिजे. बिना नियमाने कोणतीही चर्चा होणार कशी? म्हणून या ठिकाणी विधानमंडळामध्ये होणारी चर्चा गंभीरपणे व्हावी, प्रभावी व्हावी. कोणत्याही विषयावर चर्चा करताना प्रत्येक सभासदाला आपले म्हणणे योग्य प्रकारे मांडता आले पाहिजे. त्या प्रतिनिधीचे म्हणणे इतर सभासदांनी ऐकले पाहिजे, वेळ प्रसंगी प्रत्युत्तर दिले पाहिजे. आपली बाजू मांडताना कारभारावर प्रखर टीका स्वच्छंदी वातावरणामध्ये झाली पाहिजे. यासाठी काही नीतिनियम आहेत, त्याला आम्ही विधानसभेचे नियम म्हणतो. या नियमांच्या आधारे भिन्नभिन्न आयुधे वापरता येतात त्याला आम्ही संसदीय आयुधे म्हणतो. याला इंग्रजीमध्ये पार्लमेन्टरी डिव्हाईसेस असे म्हणतात. त्याद्वारे विधिमंडळाचे कामकाज सुरू करतो. त्यासंबंधीची माहिती या ठिकाणी आपणाला दिली जाणार आहे. याविषयीची सर्वसामान्य स्वरूपाची माहिती उद्घाटनाच्या भाषणाच्या निमित्ताने सांगण्यात येणार आहे. यासंबंधीचे आपले वर्ग तीन दिवसांचे आहेत. दिनांक २०, २१ व २२ या तीन दिवसांमध्ये संपूर्ण कामकाजाची माहिती व्याख्यात्यांकडून आपल्याला व्हावी म्हणून तीन भागांमध्ये याची विभागणी केलेली आहे. विधिमंडळाच्या कामकाजाचे तीन भाग पाडलेले आहेत. वैधानिक कामकाज, आर्थिक कामकाज आणि तिसरे टीकात्मक कामकाज. विधिमंडळामध्ये आपणाला वैधानिक कामकाजामध्ये संपूर्ण कायद्यासंबंधीची चर्चा करता येईल. मग ती सरकारी विधेयके असोत, खाजगी विधेयके असोत. या विधेयकासंबंधी चर्चा, उप सूचना देता येतील. त्यावर चर्चा करता येईल. आपले विचार मांडता येतील. वैधानिक कामकाज हे विधिमंडळाच्या कामकाजाचा गाभा समजला जातो. कारण कायदे बनवणारी संस्था म्हणून आपण विधानमंडळाकडे बघतो. वैधानिक कामकाजानंतर आर्थिक कामकाज हा महत्त्वाचा भाग आहे. अंदाजपत्रके मांडले जाते व त्यावर आपणाला चर्चा करता येते. त्याचप्रमाणे, चलनफुगवटा, करपद्धती, प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर, कर आकारण्याचे तत्त्व वगैरे मुद्यांची चर्चा आपण करतो. ती अर्थविषयक बाबीमध्ये येते यानंतर महत्त्वाची बाब म्हणजे टीकात्मक कामकाज. मूलतः विधिमंडळाचा उद्देश हा वैधानिक चर्चेसंबंधी असला तरी आमचा अनुभव असा आहे की, विधानमंडळामध्ये टीकात्मक कार्यक्रमासाठी अधिक वेळ दिला जातो. अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये अंदाजपत्रकावर चर्चा होते. त्याचप्रमाणे एखाद्या बाबीसंबंधी कटमोशनद्वारेही माननीय सदस्याला चर्चा उपस्थित करून आपले मत मांडता येते. त्याकडे सरकारचे लक्ष वेधता येते. विधिमंडळाची कामकाज सल्लागार समिती असते. ती दिवसाचा कार्यक्रम ठरवत असते. त्यानुसार प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, ठराव, अशासकीय ठराव, विधेयके, अशासकीय विधेयके, शेवटच्या दिवसाचे प्रस्ताव असे अनेक विषय सभागृहामध्ये त्याद्वारे येतात. अशाप्रकारची अनेक आयुधे आहेत त्यांची माहिती आपणाला पुढच्या भाषणामध्ये मिळणार आहे. त्यातून आपणाला विधिमंडळातील कामकाजाविषयीची ढोबळमानाने कल्पना येईल. एका शास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की,

" To create the Government, to criticise the Government; to censor the Government and to end the Government. " विधिमंडळावर प्रत्यक्ष अंकुश हा विरोधी पक्षाचा असतो. अधिक सुस्पष्ट बोलावयास हरकत नाही. विधिमंडळाचे खरे महत्त्व आपणाला या सध्याच्या कालखंडामध्ये दिसेल. विधिमंडळामध्ये सत्तारूढ पक्ष व ज्याला आपण शॅडो कॅबिनेट म्हणतो तो विरोधी पक्ष आज जवळजवळ समसमान आहेत. सत्तारूढ पक्षाचे अमाप बहुमत असते त्यावेळी सरकारवर प्रत्यक्ष विधिमंडळाचा अंकुश किती हे आपणाला अधिक सुस्पष्टरीत्या पहावयास मिळत नाही. सरकार बनवितो, सरकारवर टीका करतो, सरकार निष्प्रभ करतो, सरकार संपवितो याची प्रचिती केव्हा येते तर दोन्ही बाजू ज्यावेळी तुल्यबळ असतील तेव्हा. आजच्या विधिमंडळामध्ये तशी परिस्थिती आहे. आज सत्तारूढ पक्षाला जेवढे जपून काम करावयाचे आहे तेवढ्याच दक्षतेने शॅडो कॅबिनेटला म्हणजे विरोधी पक्षालाही करावयाचे आहे. हे काम करताना संपूर्ण कामकाजाची पद्धती आपणाला माहीत असावयास हवी, म्हणूनच वैधानिक कामकाज, आर्थिक कामकाज वा टीकात्मक कामकाज यातून सभागृहामध्ये चर्चा कशाप्रकारे व्हावी त्यासाठी कोणती आयुधे वापरावी याविषयीची माहिती आज आपणाला दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे विधिमंडळाच्या ज्या निरनिराळ्या समित्या आहेत त्यांच्या कामकाजाची पद्धती व माहिती याविषयीही वर्ग घेता येतील. तशी व्याख्याने एका वर्गामध्ये आयोजित केलेली आहेत. तेव्हा अशाप्रकारे संसदीय कामकाजाची सविस्तर माहिती व्हावी या उद्देशाने हे वर्ग आयोजित करण्यात आलेले आहेत. माझ्या प्रस्ताविक भाषणामध्ये मी आपला अधिक वेळ घेणार नाही. यासंबंधीची तात्त्विक भूमिका विधानपरिषदेचे सभापती माननीय, श्री. पागे साहेब आपणाला समजावून सांगतील. तेव्हा अधिक वेळ न घेता त्यांनी या वर्गाचे उद्घाटन करावे अशी विनंती करून मी माझे प्रास्ताविक भाषण संपवितो.

प्रश्न आणि इतर संसदीय आयुधे

आता आपण एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करणार आहोत. विधिमंडळाच्या कामकाजाचे तीन भाग आहेत, याचा उल्लेख मी माझ्या कालच्या भाषणात केला. वैधानिक (लेजिस्लेशन), अर्थविषयक (फायनान्शियल) आणि टीकात्मक (क्रिटिकल) असे हे तीन भाग आहेत. या संसदीय आयुधांचा उपयोग आमदारांनी कसा करावा यासंबंधी या ठिकाणी चर्चा करण्यात येणार आहे. या तीनही भागांसंबंधी लाईन ऑफ डिमार्केशन वेगवेगळी करणे अशक्य आहे. अर्थसंकल्प म्हटला की या संसदीय आयुधांचा उपयोग आपल्याला आर्थिक चर्चेत करता येऊ शकेल. या आयुधांचा वापर करून आपण आपले दु;ख, ग्रीव्हन्सेस व्हेन्टिलेट करू शकतो. बऱ्याच वेळा सभागृहामध्ये अध्यक्षांचा डोळा पकडण्याचा प्रयत्न करण्यात येतो. पण तो डोळा पकडला जात नाही. दोन्हीही बाजूच्या समोर असलेल्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने संसदीय आयुधांचा वापर कौशल्याने केला तर अध्यक्षांचा डोळा पकडण्याची गरजच भासणार नाही. या आयुधांचा वापर आपण योग्यरीतीने करू शकलो तर त्यामार्फत चर्चा घडवून आणण्याचा आपला हक्क आपण प्रस्थापित करू शकतो. ही आयुधे वापरण्याकरिता आपल्याला जास्तीतजास्त व्यवहार्य मार्गांचा अवलंब करावयास पाहिजे. त्याचप्रमाणे या आयुधांचा जास्तीतजास्त फायदा कसा काय करून घेता येईल हे सुद्धा पाहिले पाहिजे. त्या ठिकाणीही भिन्न भिन्न विषयांवर वर्ग चालविण्यात येतात. या सर्व विषयांमध्ये महत्त्वाचा विषय म्हणजे सभासद आणि त्याचा मतदारसंघ हा असतो. सभासदांना निवडून आल्यावर आपल्या मतदारसंघातील, त्याला या ठिकाणी उपलब्ध असलेल्या आयुधांचा उपयोग करून भिन्न भिन्न समस्या कशा काय सोडवाव्यात ह्याचा विचार करावा लागतो. या ठिकाणी जे जास्त लोकल मेंबर्स असतात ते आपल्या मतदारसंघाची गाऱ्हाणी जास्त प्रभावीपणे मांडतात. ती गाऱ्हाणी मांडण्याकरिता या आयुधांचा कसा काय उपयोग करावा हे त्याने प्रथम समजून घेतले पाहिजे. सभासदानी

आपल्या मतदारसंघाची जास्त चांगल्या रीतीने सेवा करावी याकरिता या आयुधांचा उपयोग केला पाहिजे. विविध समस्यांपैकी समजा पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा प्रश्न विचारावयाचा आहे. तर प्रश्नाचा आधार घ्यावा लागेल. आता प्रश्न विचारण्याचे आणि ते ॲडमिट करण्याचे काही नियम असतात आणि त्याकरिता काही निकषही असतात. सर्वसाधारणपणे व्यक्तिगत समस्या असलेला प्रश्न मान्य होत नाही. ती समस्या जनरल असावी लागते. जर दोन-तीन गावातच पिण्याच्या पाण्याची टंचाई असेल तर त्यावर प्रश्न विचारता येत नाही. एखाद्या गावातच पिण्याच्या पाण्याची टंचाई असेल तर तो प्रश्न ॲडमिट होणार नाही. तेव्हा हा प्रश्न वेगळ्या रीतीने विचारता येईल. तेव्हा या प्रकारचा प्रश्न विचारण्याकरिता आपल्याला कौशल्य वापरावे लागेल. हा प्रश्न याप्रकारे विचारता येईल. राज्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे अशी किती गावे आहेत व त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने शासनाचे काय धोरण आहे? आणि हा जनरल प्रश्न आणि धोरण विचारून झाल्यानंतर मग सदस्याला असेही विचारता येईल की जर सरकारचे असे धोरण आहे तर अमुक गावाला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था का करण्यात आली नाही? याप्रकारे जनरल प्रश्न विचारून नंतर व्यक्तिगत बाबीसंबंधी प्रश्न विचारण्याचे कसब सभासदांना दाखविता येईल. त्याचप्रमाणे शासकीय नोकरीत असलेल्या पती-पत्नीला एका गावी ठेवावे याकरिता प्रश्न विचारावयाचा असल्यास तोही विचारता येतो. जसे सरकारी नोकरीत असलेल्या पती-पत्नीच्या बदलीबाबत शासनाचे काय धोरण आहे? त्याला आपल्याला अमुक प्रकारचे धोरण आहे असे उत्तर मिळाल्यावर आपण प्रश्न विचारू शकाल की असे जर सरकारचे धोरण आहे तर या जोडप्याच्या बाबत सरकारने त्याचा अवलंब का केला नाही ? अशा प्रकारच्या युक्त्या योजून आपण व्यक्तिगत प्रश्न विचारू शकता. तेव्हा मला आपल्याला सांगावयाचे आहे की आपल्या हाती जे प्रश्नाचे आयुध आहे ते फार मोठे आहे. सभागृहाच्या कामकाजात प्रश्नांचा तास हा फार महत्त्वाचा असतो. सरकारच्या दृष्टीनेही तो अत्यंत महत्त्वाचा असतो. जर एखाद्या मुख्यमंत्र्याला आपल्या राज्याची नाडी कशी काय चालली आहे हे पाहावयाचे असल्यास त्याने सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला उपस्थित राहावे. त्याला सर्व गोष्टींची कल्पना येईल. विविध खात्याकडून येणाऱ्या उत्तरांचा अभ्यास करून कोणत्या खात्यात काय उणिवा आहेत याची कल्पना येऊ शकते. या दृष्टीने हा प्रश्नोत्तराचा तास महत्त्वाचा आहे त्याचा आमदारांनी उपयोग केला पाहिजे. तो म्हणजे त्या मतदारसंघातला प्रतिनिधी हा क्रियाशील असला पाहिजे. आपल्याला जो प्रश्न विचारावयाचा आहे तो अगोदर आपण समजून घेतल्याशिवाय आपण तो परिणामकारकपणे विचारू शकणार नाही. तो प्रश्न समजून घेऊन विचारणे ही गोष्ट वेगळी आणि केवळ वर्तमानपत्रातील माहितीवरून प्रश्न विचारणे हे वेगळे. या दोहोंमध्ये फार मोठा फरक आहे. त्या प्रश्नासंबंधीची अद्यावत माहिती आपल्याकडे असल्याशिवाय आपल्याला पूरक प्रश्न विचारता येणार नाहीत. जरी विचारावयाचे ठरविले तरी आपल्या मनात त्यासंबंधीचा गिल्टी कॉन्शस राहील. ज्या प्रश्नाची अद्ययावत माहिती आपल्याजवळ असते ते प्रश्न परिणामकारक ठरतात. मंत्र्यांना आपल्याला निरुत्तर करता येते. तेव्हा अशाप्रकारे प्रश्नोत्तराचे आयुध हे फार मोठे प्रभावी आहे. आमचा अनुभव असा आहे की प्रश्नोत्तरांचा तास म्हणजे मंत्र्यांवर असलेले मोठे संकट होय. कारण त्याची संपूर्ण माहिती त्या मंत्र्याला वाचावी लागते. त्याची माहिती असावी लागते. कारण प्रत्येक प्रश्नाला एक प्रकारचा सिक्वेन्स असतो त्यामुळे उत्तराची टाळाटाळ करता येत नाही. मुंदडा प्रकरण अशा प्रश्नोत्तराच्या तासातून उद्‌भवले होते. श्री. फिरोज गांधी यांनी यासंबंधी प्रश्न विचारला होता आणि त्यातून श्री. कृष्णम्माचारींना राजीनामा द्यावा लागला होता. आता या प्रश्नांमध्ये तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, अल्पावधी सूचना प्रश्न असे अनेक प्रकार आहेत. पण मुळामध्ये या प्रश्न विचारण्यामागचा उद्देश जर कोणता असेल तर तो म्हणजे टु इलिसिट द इन्फर्मेशन. पण यासाठी त्या सदस्यांना त्यासंबंधीची पूर्ण माहिती असावी लागते. काही वेळा

मंत्र्यांपेक्षा त्या सभासदांनाच त्या प्रश्नांसंबंधी जास्त माहिती असते. आता उदाहरणार्थ, काल श्री. कुरणे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे एका विशिष्ट पक्षाच्या लोकांना सरकारी नोकरीमध्ये बंदी आहे काय असा जर त्यांनी प्रश्न विचारला आणि सरकारकडून त्याला नाही असे उत्तर आले आणि श्री. कुरणे यांनी आपल्याजळ असलेले डॉक्युमेंट काढून दाखविले तर ते डॉक्युमेंट त्यांच्याकडे कोठून आले, कसे आले हे सभापती त्यांना विचारणार नाहीत. तेव्हा सरकारकडून माहिती घेणे हा जरी प्रश्नोत्तराच्या तासाचा उद्देश असला तरी त्या प्रश्नाविषयीची पूर्ण पार्श्वभूमी प्रश्न विचारणाऱ्या सदस्याला असावी लागते नाहीतर तो प्रश्न प्रभावी ठरत नाही.

प्रश्न विचारीत असताना काही बंधने आपल्याला जरूर पाळावी लागतात. प्रश्न शासनाशी संबंधित असला पाहिजे आणि तो 'विदिन द फ्रेमवर्क' असला पाहिजे. तरच ते प्रश्न स्वीकृत होतात. तसेच आटोनॉमस् बॉडीज् आहेत, त्या जरी सार्वजनिक उपक्रमाखाली मोडत असल्या तरी त्यांच्याबाबतीत सरकारचीही काही जबाबदारी आहे. त्यामुळे आपल्याला त्यांच्या बाबतीत प्रश्न विचारता येतात. उदाहरणार्थ, मागच्या अधिवेशनामध्ये मुंबईतील काविळीच्या साथीसंबंधी प्रश्न विचारण्यात आला होता. यामध्ये जरी मुंबई कॉर्पोरेशनची जबाबदारी असली तरी शासनही आपली जबाबदारी टाळू शकत नाही. या विषयासंबंधी प्रश्न विचारला गेला होता, लक्षवेधी सूचना देण्यात आली होती, अल्पवेळ चर्चाही उपस्थित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे एस्. टी.चे जे अपघात होतात, त्यासंबंधीही आपल्याला सभागृहात प्रश्न विचारता येतात. मागे एका सदस्याने प्रश्न विचारला होता की, ज्याप्रमाणे रेल्वेतील प्रसाधनगृहे स्वच्छ असतात, त्याप्रमाणे एस्. टी. स्टँडवरची प्रसाधनगृहे स्वच्छ का नसतात? तेव्हा असे जे सार्वजनिक महत्त्वाचे प्रश्न आहेत त्या बाबतीत आपल्याला प्रश्न विचारता येतात. फक्त न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या बाबतीत, केंद्र आणि राज्य सरकारांच्या पत्रव्यवहाराच्या बाबतीत आपल्याला प्रश्न विचारता येत नाहीत. या बाबतीतही आपल्याला फेअर कॉमेंट करता येते. आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की इन्व्हेस्टिगेशनमध्ये अडथळा आणणे ही गोष्ट वेगळी आहे आणि लाईन इन्व्हेस्टिगेशनच्या बाबतात डायरेक्शन देणे ही गोष्ट वेगळी आहे. एखाद्या बाबतीत लाईन ऑफ इन्व्हेस्टिगेशन चुकीची असेल तर यू आर फ्री टू सजेस्ट लाईन ऑफ इन्व्हेस्टिगेशन. अशा रीतीने या आयुधाचा वापर कायद्याच्या मर्यादेत राहून कौशल्याने केला तर तो फार उपयोगी होऊ शकतो.

एखाद्या सभासदाने प्रश्न विचारल्यानंतर तो जर अनुपस्थित राहिला तर तो प्रश्न दुसऱ्या सभासदाला ॲथोरिटी देऊन विचारता येतो. पण यात महत्त्वाचा मुद्दा असा की, सभासदाने प्रश्न विचारला, पण दुसऱ्या सभासदाला ॲथोरिटी न देता तो जर अनुपस्थित राहिला तर काय? यासंबंधी अनेक वेळा चर्चा झाली. वाटले तर त्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा अधिकार मंत्र्यांना आहे. अशा अनुपस्थित सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे की नाही हा मंत्र्याचा अधिकार आहे, त्याचे उत्तर दिलेच पाहिजे असे बंधन त्याच्यावर नाही. तेव्हा प्रश्नोत्तरे हे सर्वात महत्त्वाचे आयुध आहे. वर्षाला जवळजवळ १५ ते २० हजार प्रश्न विचारले जातात आणि एका प्रश्नाचे मूल्य निव्वळ खर्च धरला तर कमीतकमी ७५ रुपये व जास्तीतजास्त रुपये २०० सरासरी येते. आमदाराने प्रश्न विचारल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याची त्रेधा उडते. ही फाईल शोधा, ती फाईल शोधा असे त्याचे होते. एका प्रश्नाच्या खर्चाचा तपशील वर्कआऊट केला नाही पण एका प्रश्नाला सरासरी २०० रुपये खर्च येतो. त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात शासन यंत्रणा गुंतलेली असते. केवळ एकाच स्तरावर प्रश्नाचे महत्त्व आहे असे नाही तर प्रश्नोतराचे गांभीर्य सर्व दृष्टीने महत्त्वाचे आहे. सभासदांच्या दृष्टीने, विधिमंडळाच्या दृष्टीने, मंत्र्यांच्या दृष्टीने, प्रशासकीय यंत्रणेच्या दृष्टीने आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्यांचे प्रतिनिधित्व आपण करता त्या जनतेच्या दृष्टीने त्याचे गांभीर्य व महत्व फार आहे. एखादा प्रश्न विधिमंडळाच्या

वेशीवर टांगून त्यातून उत्तर मिळविले की, हा प्रतिनिधी किती जागरूक आहे असे मतदारांना वाटते. प्रश्नातच सभासदाची खरी परीक्षा आहे.

आणखीही जी विभिन्न आयुधे (डिव्हाइसेस) आहेत त्यासंबंधीत मी आपल्याला सांगणार आहे. राज्यपाल अभिभाषण करतात. त्यानंतर सत्तारूढ पक्षाचे सदस्य त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव मांडून त्याला अनुमोदन देतात. अभिभाषणाला सुधारणा देण्याचा अधिकार सत्ताधारी पक्षाला नसतो, पण ते चर्चेत भाग घेऊ शकतात. चर्चेत भाग घ्यावयाला बंधन नाही. राज्यपालांच्या अभिभाषणाला सुधारणा अशी देतात. "परंतु खेद होतो की, राज्यपालांच्या अभिभाषणात शेतकऱ्यांच्या पीक विमा योजनेचा उल्लेख नाही." ज्या ज्या गोष्टी मांडण्याचे आपल्या मनात आहे त्यात त्या गोष्टी—परंतु खेद होतो की, अशी सुरुवात करून ३ वर्षांनी रिव्हाईज करावे असा कायदा पास झाला तरी त्यांच्या वेतनात वाढ करण्याची तरतूद केली नाही वा त्याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही असे म्हणून ती होतो की, अमुक अमुक बाबींचा राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नाही अशी सुधारणा देऊन तो मांडता येतो. कारण शेवटी या चर्चेला जेव्हा मुख्यमंत्री वा संबंधीत मंत्री उत्तर देतात तेव्हा त्यांना याची दखल घ्यावी लागते व शेवटी असे प्रश्न सोडविले जातात. या रूपाने आपल्या मतदारसंघातील प्रश्न कसे सुटले आहेत हे मी माझ्या उत्तरार्धाच्या भाषणात वाचून दाखविणार आहे. तेव्हा यातून अनेकांना न्याय मिळवून देण्यात आला आहे.

तसेच अंदाजपत्रक, पूरक मागण्या व अतिरिक्त मागण्यांवर चर्चा होताना कपात सूचना "कट मोशन" हा डिव्हाईस आपल्याला उपलब्ध आहे. आपल्या माहितीकरिता सांगतो की, पूरक मागण्यांच्या चर्चेच्यावेळी जी. ए. डीच्या मागण्या आल्यावर माजी सदस्य श्री. रामभाऊ म्हाळगी यांनी हा डिव्हाईस वापरून अशी कपात सूचना दिली होती की, विधानपरिषदेत ज्या श्री जवाहलाल दर्डा या सदस्याची नियुक्ती झाली आहे ते या नियुक्तीस अपात्र आहेत. तेव्हा ते पात्र आहेत की अपात्र आहेत ही मॅटर इलेक्शन कमिशनला पाठवून ठरवावे लागले. वास्तविक याचा व पूरक मागण्याचा काय संबंध? पण जी. ए. डी.च्या पूरक मागण्यांवरील चर्चेचा फायदा घेऊन व या कपात सूचनेच्या आयुधाचा वापर करून त्यांनी हा प्रश्न मांडला.

मध्यंतरी मालेगावला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यावर शेणफेक झाली होती. त्यावेळी सभागृहात गृह खात्याच्या मागण्यांवर चर्चा चालू होती त्याचा फायदा घेऊन आम्ही सभागृहात सांगितले की, शासनाचे पोलीस एवढे बेफिकीर आहेत की, मालेगावला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यावर कोणी तरी शेण मारले तरी त्याची दखल पोलिसांनी घेतली नाही. आर्थिक विषय असो की क्रिटिकल विषय असो याबाबत या आयुधांचा वापर आपल्याला करता येतो. अंदाजपत्रक, पूरक मागण्या, अेक्सेस डिमान्डस् याहीबाबत ही संसदीय आयुधे वापरता येतात. यापैकी लोकप्रिय आयुध म्हणजे लक्षवेधी सूचना, ज्याला "कॉलिंग अटेन्शन" असे म्हणतात. आज काल या लक्षवेधी सूचनांची संख्या वाढत चाललेली आहे. प्रश्न, अल्पावधी सूचना प्रश्न, याही रूपाने जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडता येते. मुंबई शहरामध्ये काविळीच्या साथीमुळे हजारो रुग्ण दाखल करण्यात आले, त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया काय अशी लक्षवेधी सूचना असावयाला पाहिजे आणि मग कोणत्या डिव्हाईसच्या रूपाने तो सभागृहात उपस्थित करता येईल हे ठरविण्यात यावे. एकच प्रॉब्लेम मोल्ड करून निरनिराळ्या डिव्हाईसच्या रूपाने उपस्थित करता येतो. यानंतर अशासकीय प्रस्ताव आणि विधेयके या माध्यमातून सार्वजनिक महत्त्वाच्या विषयाला वाचा फोडता येते. मी एक असाच अशासकीय प्रस्ताव मांडला होता. "महात्मा जोतिबा फुले यांना महाराष्ट्रातील राष्ट्रपुरुष म्हणून मानावे आणि त्यांचे छायाचित्र सर्व कचेऱ्यांमध्ये लावण्यात यावे" अशा आशयाचा अशासकीय प्रस्ताव मी मांडला होता. "नॉन-ऑफिशिअल" ठरावाच्या रूपाने अनेक ठराव येतात. शेतमजुरांसाठी किमान वेतनाचा कायदा होऊन तीन वर्षे

झाली तरी वेतन रिव्हाईज केले नाही आणि म्हणून ही विधानसभा अशी शिफारस करते की ही वेतनवृद्धी ताबडतोब करण्यात यावी." अशा प्रकारचा नॉन-ऑफिशिअल रिझोल्युशन मांडण्यात आला. या डिव्हाईसबरोबरच अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवड्यातील प्रस्ताव श्री. उत्तमराव पाटील यांनी शेवटच्या आठवड्यात अशा प्रकारचा ठराव आणला, 'महाराष्ट्रातील आणि विशेषत: दाक्षिणात्य लोकांचे जीवन, त्यांचे वित्त हे असुरक्षित असल्याच्या वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा ठराव कर्नाटक आणि केरळ राज्याने मंजूर केल्यामुळे महाराष्ट्रातील भिन्न भिन्न भाषिक गटात निष्कारण तणाव निर्माण होत आहे ज्याअर्थी या प्रवृतींना तातडीने परिणामकारक आळा घालण्याची आवश्यकता आहे त्याअर्थी या बाबत शासनाने योजावयांच्या उपाययोजनेचा विचार करण्यात यावा." अशाप्रकारचा ठराव आणण्यात आला होता. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे की प्रश्न निवडावयाचा आणि प्रस्तावाच्या रूपाने तो मांडावयाचा. असा प्रस्ताव, किंवा मोशन आले तर सरकार तो स्वीकृत करीलच असे नाही. नियम १८५ अन्वये या सभागृहाची समिती नेमावी असा प्रस्ताव सभासद आणू शकतात. "शेती उत्पादनाच्या आकड्यांची फेरतपासणी करण्यासाठी व शेतीविषयक धोरणात आमूलाग्र बदल करण्याबाबत अहवाल तयार करण्यासाठी खालील सदस्यांची समिती नेमण्यात यावी. या समितीने छोटे मोठे शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय प्रमुख, शेतीतज्ज्ञ वगैरेंच्या साक्षी घेऊन सहा महिन्यात आपला अहवाल सदनाला सादर करावा." समितीवर खालील सदस्य असावेत– श्री. शंकरराव चव्हाण, कृषि मंत्री, सर्वश्री आप्पासाहेब जाधव, राम मेघे, एन. डी. पाटील, ग. प्र. प्रधान, उत्तमराव पाटील, चिं. रा. खानोलकर. तेव्हा एखाद्या प्रश्नाचे इव्हॅल्युअेशन करावे, समिती नेमावी या दृष्टीने या संसदीय आयुधांचा आपल्याला वापर करता येतो. मोशनकरिता कोणताही दिवस मुकर केलेला नसतो. यावरील चर्चा दीर्घकाल करता येते. "राज्याचे धान्य वसुलीचे धोरण विचारात घेण्यात यावे." असा प्रस्ताव काही वर्षापूर्वी आला होता. या प्रस्तावावर अडीच तास चर्चा झाली. तेव्हा प्रॉब्लेम्स् काय आहेत हे प्रथम ठरवायला पाहिजे आणि त्यानंतरच आपल्याला या आयुधांचा वापर करता येतो.

यानंतर स्थगन प्रस्तावासंबंधी मला सांगावयाचे आहे. असा प्रस्ताव आणीत असताना तो विषय सार्वजनिक महत्त्वाचा असला पाहिजे, रीसेंट ऑकरन्स असला पाहिजे, निकडीचा असला पाहिजे. सभासदांना माहीत असते की हा स्थगन प्रस्ताव मान्य होण्याच्या योग्यतेचा नाही. हा प्रस्ताव मंजूर होत नसला तरी सभापती म्हणतात की, प्रश्न स्थगन प्रस्तावाचा विषय होऊ शकत नसला तरी त्या प्रश्नाचे सार्वजनिक स्वरूप नष्ट होत नाही. सभापती स्थगन प्रस्तावाचा विषय वाचून दाखवितात आणि मंत्र्यांना स्टेटमेंट करावयास सांगून त्यावरील आपला निर्णय रोखून धरतात. मला हे सांगावयाचे आहे की, स्थगन प्रस्तावाला लागू असणारे निकष जर पूर्ण होत असतील तर त्या स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्यास अनुमती दिली जाते. आणि अशी अनुमती दिल्याची अनेक उदाहरणे मागील प्रोसिडिंग्ज वाचल्यास आढळून येतील. उदा. श्रीयुत रा. फा. चौधरी यांनी अशा स्थगन प्रस्ताव दिला होता की, दिनांक ७ सप्टेंबर १९७१ रोजी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी नागपूर येथे विणकरांनी काढलेल्या प्रचंड मोर्चावर तो उधळून टाकण्याच्या हेतूने पोलिसांनी बेछूट लाठीमार केला, अश्रुधूर सोडला आणि अमानुष गोळीबार केला, त्याच्या परिणामस्वरूप ८ लोक मेले आणि सात जखमी झाले, व शहरात सरकारला कर्फ्यू लावणे भाग पडले. म्हणून, ही परिस्थिती हाताळण्यात सरकारला अपयश आले असल्यामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची चर्चा होणे आवश्यक आहे. हा स्थगन प्रस्ताव त्यासंबंधी असणारे सर्व निकष पूर्ण करणारा होता. सत्र चालू असताना ही घटना घडली होती म्हणजे नुकतीच घडलेली बाब होती. आणि गोळीबारात माणसे मेली असल्यामुळे सरकारचे परिस्थिती हाताळण्यातील अपयश आहे किंवा कसे याबाबत चर्चा होणे जरूर होते व म्हणून त्या स्थगन प्रस्तावावर चर्चा होण्यास अनुमती देण्यात आली. अशा प्रकारे स्थगन प्रस्तावाचे आयुध कौशल्याने वापरल्यास सभासदांना आपल्या अनेक अडचणींना वाचा फोडणे शक्य होते.

एचबी ११८०—३६

सभासदांचा विशेषधिकार ही एक मोलाची बाब आहे आणि त्या अधिकारांचा कुणी भंग करू नये याबद्दल सभासद दक्ष असणे स्वाभाविक आहे. सभासदांनी एकमेकांचा अनादर करू नये तसेच बाहेरच्या माणसांनी सभागृहाचा अथवा सभासदांचा अनादर करू नये ही अपेक्षा असते. आणि तसा तो कोणी केल्यास हक्कभंग होऊन ती बाब समितीकडे पाठविली जाते. उदा. एखाद्या वर्तमानपत्रात आलेल्या लेखामुळे सभागृहाचा अनादर होत आहे असे दिसून आले तर ती बाब सभागृहात उपस्थित करून विशेष हक्क समितीकडे पाठविता येते. उत्तर प्रदेशात असे घडले की एका आमदाराने दुसऱ्या एका आमदाराबद्दल एक पत्रक प्रसिद्ध करून असा आरोप केला की तो आमदार प्रश्न विचारतो आणि त्या प्रश्नाशी संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्याने त्याचे हात ओले केल्यावर तो प्रश्न मागे घेतो. हा त्या आरोपित आमदाराचा निश्चितपणे हक्कभंग होता आणि म्हणून वस्तुस्थिती काय आहे ही बाब न पाहता हक्कभंग समितीने आरोप करणाऱ्या आमदाराला ताकीद दिली. दुसऱ्याही बाजूने उदाहरणे आहेत. उदा. माननीय श्री. भारदे, विधानसभेचे अध्यक्ष असताना सुमारे तीन-चार वर्षापूर्वी 'तरुण भारत' या वर्तमानपत्रात असा एक लेख प्रसिद्ध झाला की आमदार निवासात दोघा आमदारांनी दारू पिऊन धिंगाणा घातला. सभासदांनी हक्कभंगाचा प्रस्ताव दिला. प्रश्न महत्त्वाचा होता म्हणून उभय सभागृहांच्या सभापतींनी एकत्र येऊन विचारविनियम केला व निर्णय दिला की, आमदारांच्या वागणुकीबद्दल काही लिहिल्यास तो हक्कभंग होणार नाही. आमदार दारू पिणारा असला तर त्याने आपल्या मतदारसंघात दारू पिणे काय, किंवा आमदार निवासात दारू पिणे काय परिस्थितीत फरक पडत नाही. आणि त्याने दारू प्याली अशा तऱ्हेची बातमी देणे हा हक्कभंग होत नाही. सांगण्याचा हेतू हा की सभासदांचे विशेषाधिकार ठरले आहेत. त्याच्या कक्षा ठरलेल्या आहेत. आणि त्या अधिकारांचा भंग झाल्यास ती बाब विशेष हक्कभंग समितीकडे सोपविली जाते. कालच माननीय श्री. पागे यांनी सांगितले की, आमदारांनी कायदे मोडणे बरोबर नाही. परंतु सार्वजनिक हिताच्या कामासाठी जर कोणी आमदाराने १४४ कलमाचा भंग करून सत्याग्रह केला तर ती गोष्ट वेगळी. तेव्हा आमदाराच्या खाजगी वर्तनाबाबत दिलेली बातमी हा विशेषकरून हक्कभंग होत नाही. मात्र अध्यक्षांबाबत ते पक्षपाती आहेत असा उद्‌गार सभागृहात कोणी काढला तर तो अध्यक्षांचा अनादर होतो आणि हक्कभंग होतो. तसेच शासनाकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यास माझा या सभागृहावरच विश्वास नाही असे कोणी म्हणू लागला तर तोही सभागृहाचा अवमान आहे. तेव्हा यासंबंधीचे बारकावे लक्षात घेणे आवश्यक आहे. ढोबळ मानाने ज्या आयुधांचा आपण उपयोग करावयाचा आहे त्याची माहिती मी आपल्याला सांगितली आहे. परंतु मघाशी सांगितल्याप्रमाणे या आयुधांचा उपयोग सभासद कसा काय करून घेतात यावर त्याचे यश अवलंबून आहे. आपण ज्याकरिता प्रश्न विचारला आहे त्याचा आपण कितपत पाठपुरवठा करतो यावर त्याचे यश अवलंबून आहे. आपण जर पाहिले तर एकाच विषयावरील प्रश्नाचा चार-पाच वेळा पाठपुरावा केल्यानंतर तो प्रश्न सुटला आहे. एक प्रश्न मी आपल्याला सांगतो. प्रश्न असा होता की, "राज्यातील सार्वजनिक दवाखान्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत नेमण्यात आलेली कमिटी" ह्या प्रश्नाला सरकारने चार वेळा जवळ-जवळ नकारात्मक उत्तर दिले. परंतु शेवटी त्यांना त्या प्रश्नांच्या बाबत न्याय द्यावा लागला. हा प्रश्न श्री. रिद्वान हॅरीस यांनी विचारला होता. मध्यंतरी दुसऱ्या सभासदांनी त्याचा पाठपुरावा केला व शेवटी या प्रश्नांची तड सरकारला लावावी लागली. त्याचप्रमाणे एका प्रस्तावाची गोष्ट आहे. डोक्यावर मैला वाहून नेण्याची पद्धत बंद करण्यासंबंधी प्रस्ताव होता. त्याला सुरुवात १९६२ सालापासून झाली आणि त्याची तड १९७५ साली लागली. ह्या प्रश्नांची सुरुवात जळगावचे आमदार, श्री. कल्याणी यांनी केली. त्यांचा प्रस्ताव असा होता—

This Assembly recommends the Government to prohibit by Law the practice of carrying of night soil by

Headload, and provide for punishment for its breach. त्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्यात आला व त्याला १९७७ साली यश मिळाले. त्याकरिता एक समिती नेमण्यात आली असे सरकारने सांगितले. त्या समितीचा अहवाल आला त्यावर कारवाई करवून घेण्याकरिता डॉ. व. रा. पंडित यांनी प्रयत्न केले आणि शेवटी हा प्रश्न इतक्या अवधीनंतर निकालात निघाला. त्याचप्रकारे रत्नागिरी जिल्ह्याचे दोन भाग करण्याबाबतचा प्रश्न आहे. त्याची सुरुवात श्री. दत्ता ताम्हणे यांनी अशासकीय विधेयकाच्या रूपाने केली. त्यानंतर दुसरा प्रश्न म्हणजे दोन्ही सभागृहांच्या विरोधी पक्षनेत्यांना मंत्र्यांचा दर्जा देण्यासंबंधी होता. त्याचीही सुरुवात श्री. दत्ता ताम्हणे यांनी केली ती १९६२ साली. आणि आता इतक्या वर्षानंतर यावेळी या प्रश्नाला यश आले आहे. त्यानंतर सायकल, रिक्षा बंद करण्याच्या प्रश्नाचे असेच आहे. त्यावरही सातत्याने प्रश्न विचारण्यात आले. त्याला आता कोठे अंशतः यश मिळाले आहे. त्याचप्रमाणे हवेच्या दुषितीकरणासंबंधीच्या प्रश्नांची सुरुवात श्रीमती कमला रामन यांनी केली ती १९७१ साली आणि याला यश आले १९७६ साली. त्याचप्रमाणे या सभागृहाच्या भिन्न भिन्न समित्या आहेत. त्या निर्माण करण्याचेही प्रयत्न करावे लागले. पंचायत राज समिती निर्माण करण्यासाठी १९६५ साली श्री. ग. प्र. प्रधान यांनी प्रयत्न केल्यावर १९७२ साली श्री. कारखानीस यांच्या प्रयत्नांना यश आले व इतक्या परसुएशननंतर त्याबद्दल निर्णय घेण्यात आला. मी हे संपूर्ण एवढ्याचसाठी आपल्याला सांगितले की, हे डिव्हाईस परसू केले पाहिजेत. हे डिव्हाईस वापरण्याचे सोडून दिले तर तुम्हाला न्याय मिळत नाही. अभ्युदय नगर काळाचौकी येथील प्रश्न सातत्याने ५ वर्षापासून या सभागृहामध्ये आला होता. आणि त्या प्रश्नाला सतत उत्तरदेखील तेच दिले गेले होते. असे झाले तर त्यामध्ये सभासदांनाही बरे वाटत नाही, मंत्र्यांनाही तेच उत्तर द्यावयाला बरे वाटत नाही. तरीही डिव्हाईस परसू करून त्यासंबंधीचा सातत्याने पाठलाग करणे हे महत्त्वाचे आहे.

आपल्याकडे अशी प्रथा आहे की, आपल्या सन्माननीय सदनाचे जे सदस्य होते आणि त्यांचा मृत्यू झाला असेल तर त्यांना या सदनामध्ये आदरांजली अर्पण करणे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, एखादी व्यक्ती ही सभागृहाची सभासद नसेल, परंतु ती सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये असेल अशा व्यक्तींच्या मृत्यूनंतर आपल्याला सदनामध्ये श्रद्धांजली अर्पण करावयाची असेल तर सर्व पक्षांचे जर मतैक्य झाले तर तसा प्रस्ताव सदनामध्ये येऊ शकतो. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या संबंधात १९६४ सालामध्ये अशा प्रकारचा ठराव आणला होता. अशाप्रकारे जर सर्व पक्षांचे मतैक्य झाले तर असा प्रस्ताव आपल्याला सभागृहामध्ये आणता येतो. हे सर्व सांगत असताना संपूर्ण डिव्हाईसचा पाठपुरावा कसा करावयाचा हे मी आपल्याला सांगणार आहे. प्रश्न आणि डिव्हाईस वापरताना सभागृहामध्ये काही गंमती-जमती होतात. त्या गंमती-जमती मी थोडक्यात या ठिकाणी सांगणार आहे. दिनांक २४ सप्टेंबर १९६३ रोजी प्रश्न क्रमांक ७००२६ विचारण्यात आला होता. मंत्र्यांकडून आमदारांच्या पत्रांना पोच देण्यासंबंधीचा हा प्रश्न होता. त्यावर असे उपप्रश्न विचारण्यात आले की, मी स्वतः मंत्री महोदयांना पत्र पाठविले आहे त्या पत्राचे उत्तर किंवा पोच मला मिळाली नाही असे श्री. आठल्ये यांनी विचारले. या प्रश्नाला श्री. कन्नमवार यांनी असे उत्तर दिले की, माझ्याकडे जी पत्रे येतात त्यांना मी उत्तरे देतो. श्री धोंडगे यांनी असे विचारले की, मी स्वतः काही मंत्र्यांना पत्रे पाठविली होती. पण ही काही प्रेमपत्रे नव्हती. या पत्रांची उत्तरेसुद्धा मला मिळाली नाहीत. यावर प्रेमपत्रे पाठविण्याचे सरकार हे ठिकाण नाही असे अध्यक्षांनी सांगितले. श्री. अत्रे म्हणाले, म्हणून आम्ही पत्रच पाठवीत नाही. यावर बोलताना श्री. कन्नमवार म्हणाले की, आपण पत्र पाठविले तरी मी उत्तर देणार नाही. श्री. अत्रे यांनी पुन्हा असा प्रश्न विचारला की, अध्यक्ष महाराज, मी पत्र पाठविले तर माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार नाही असे म्हणाले. तरी त्यांनी काय चालविले आहे? त्यांच्या डोक्यात

एचबी ११८०—३६अ

काही शिरले आहे काय? अध्यक्षांनी असे सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री. अत्रे यांनी "डोक्यात काही शिरले आहे" अशा प्रकारचा शब्दप्रयोग करू नये. अशा प्रकारे गमतीदार प्रश्नोत्तरे ही प्रश्नोत्तराच्या तासामध्ये होत असतात. त्यानंतर प्रश्न क्रमांक १७७० हा औरंगाबाद येथे वेड्यांचे हॉस्पिटल काढण्यासंबंधीचा प्रश्न आहे. त्या प्रश्नाच्या संदर्भातदेखील अशाच प्रकारची गंमतीदार प्रश्नोत्तरे झालेली आहेत. तरी आता मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी आता या ठिकाणी बरेचसे स्पष्टीकरण केलेले आहे. त्यामुळे आपल्याला जर काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्या प्रश्नांची उत्तरे मी माझ्या परीने देण्याचा आनंदाने प्रयत्न करीन.

प्रश्नोत्तरे

श्री. वासू देसाई : सदस्य या ठिकाणी निवडून आल्यावर राज्यपालांच्या अभिभाषणावर त्यांचे विचार मांडण्याची त्यांना संधी असते. परंतु काही वेळा वेळेच्या अभावी सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळाली नाही तर त्यांनी काय करावयाचे ?

श्री. रा. सू. गवई : मला बोलू द्या, असे म्हणण्याची गरज नाही. फक्त एकच वाक्य लिहावयाचे, परंतु खेद होतो की, ...

श्री. वासू देसाई : परंतु असे परवाच्या वेळी झाले नाही.

श्री. रा. सू. गवई : तुम्ही डिव्हाईसचा वापर केल्यानंतर तुम्हाला प्रायॉरिटी मिळते.

श्री. राम कापसे : यासंबंधी एक छापलेले पुस्तक मिळते आणि त्यामध्ये ५-२५ लोकांनी असे सांगितलेले दिसते की, "मला खेद होतो की," यामध्ये परिस्थिती अशी निर्माण होते की, काही सदस्यांना बोलावयाला मिळते आणि काही सदस्यांना बोलावयास मिळत नाही. म्हणून तो डिव्हाईस उपयुक्त होत नाही असे मला वाटते.

श्री. रा. सू. गवई : प्रथा अशी आहे की, ज्यांनी सुधारणा दिल्या आहेत त्यांना पहिल्याने बोलू दिले पाहिजे. परंतु वेळेच्या अभावी मागच्या वेळी सर्व सदस्यांना बोलता आले नसावे. परंतु अशी सुधारणा दिल्यानंतर त्यांना बोलण्याची संधी मिळेल.

श्री. वासू देसाई : स्थगन प्रस्ताव आणल्यानंतर त्यासंबंधीचा निकाल देताना सभापती असे सांगतात की, हा स्थगन प्रस्तावाचा विषय नसल्यामुळे मी याला अनुमती नाकारतो? सभापतीनी असे सांगितल्यावर मग पुढे काय करावयाचे?

श्री. रा. सू. गवई : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सदस्यांना माहिती असते की, त्यांनी मांडलेला विषय हा स्थगन प्रस्तावाचा विषय नाही. त्यामुळे सभापती हा विषय नामंजूर करतील. परंतु काही वेळा विषय गंभीर असतो त्यावेळी मंत्री महोदयांना त्यासंबंधी स्टेटमेंट करावयाला सांगितले जाते. जे स्थगन प्रस्तावाचे विषय असतात त्या विषयांचे परसेंटेज ५ परसेट आहे. यामध्ये स्थगन प्रस्तावाचा विषय नसतानादेखील तो डिव्हाईस वापरण्याचा सभासदाकडून जाणूनबुजून प्रयत्न होत असतो.

श्री. राम कापसे : मी गेल्या अधिवेशनामध्ये कल्याण येथे झालेल्या दंगलीसंबंधाने एक लक्षवेधी सूचना दिली होती व त्यावर माननीय मंत्र्यांचे उत्तरसुद्धा आले. परंतु ते उत्तर हे सर्वस्वी खोटे होते. त्यावर मी उप प्रश्नसुद्धा विचारले, परंतु माझे समाधान झाले नाही. तेव्हा अशा प्रकारचे खोटे निवेदन सभागृहात केल्यानंतर त्याबाबतीत पुढे काय करता येईल हा प्रश्न आणखी कोणत्या रूपाने या ठिकाणी उपस्थित करता येईल.

श्री. रा. सू. गवई : त्यासाठी अनेक डिव्हाईसेस् आहेत त्याप्रमाणे आपल्याला उपस्थित करता येईल. परंतु मला आपल्याला सांगितले पाहिजे की, मंत्र्यांनी दिलेली माहिती ही मुद्दाम खोटी दिली आहे किंवा काय हा प्रश्न येतो. कारण शेवटी ती माहिती संबंधित जे अधिकारी असतात ते पुरवीत असतात. तेव्हा समजून उमजून जर मंत्र्यांनी खोटी माहिती दिली आहे किंवा काय हा प्रश्न आहे. शिवाय ते सीरीयस मॅटर आहे, याचा देखील विचार करावा लागेल. शेवटी जी माहिती दिली आहे ती खोटी आहे याबद्दल आपल्या मनाची खात्री असली पाहिजे. तर तो प्रश्न हक्कभंगाच्या स्वरूपात येऊ शकतो. यासंबंधात मी आपल्याला उदा. देतो. श्री. रामजीवन चौधरी यांच्या

अटकेसंबंधी गृहमंत्र्यांनी खोटी माहिती दिली व रेकॉर्डवरूनसुद्धा असे आढळून आले की, ती माहितीही चुकीची आहे. तेव्हा त्याबाबतीत डी. एस्. पी.ना बोलविण्यात आले. त्याप्रमाणे श्री. रामजीवन चौधरी यांनासुद्धा बोलविण्यात आले. त्यानंतर डीएसपीने ते मान्यही केले. तेव्हा अशा प्रकारची जाणूनबुजून खोटी माहिती दिली गेली असेल तर ती गोष्ट आपण परस्यू केली पाहिजे.

श्री. राम कापसे : डीएसपींना कोणी बोलाविले ?

श्री. रा. सू. गवई : मी बोलाविले.

श्री. बी. एस्. साळुंके : मा. अध्यक्षांविरुद्ध अविश्वास व्यक्त करण्यात येतो. किंवा सभागृहाच्या विरुद्ध अविश्वास दाखविण्यात येतो. सभागृहावर माझा विश्वास नाही असे जे सांगितले जाते त्याबाबतीत काय म्हणावयाचे आहे ?

श्री. रा. सू. गवई : सभासद, आपण सर्वजण सभागृहाचा एक भाग आहोत. सभासदापासून सभागृह वेगळे करता येत नाही. मंत्री चुका करतात, अध्यक्ष चुका करतात, परंतु सभासद चुका करीत नाहीत.

श्री. प्रल्हाद कुरणे : बहुमताच्या जोरावर होत असेल तर.

श्री. रा. सू. गवई : तुम्ही असे गृहित धरून चालला आहात की, याच पार्टीचे बहुमत राहील. मग जे असे म्हणत असतील की, सभागृहावर माझा विश्वास नाही, तर मग आपण निवडणूक लढविली कशाला?

दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. आपण नेहमी म्हणतो की, अध्यक्ष महाराज, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. तुम्ही हा प्रश्न घेतला पाहिजे असे म्हणणे वेगळे व अध्यक्षांना उद्देशून तुमच्यावर विश्वास नाही हे म्हणणे वेगळे. या ठिकाणी सभागृहाच्या डेकोरमचा प्रश्न आहे. या ठिकाणी चेअरमनचा मान आपण राखावयाचा आहे. या खुर्चीवर आमचा विश्वास नाही असे म्हणणे गैर आहे. आपण म्हटल्याप्रमाणे कोंबडी आधी की अंडे आधी याचे उत्तर देता येत नाही. त्याचप्रमाणे सत्ताधारी पक्षाचा अध्यक्ष असेल तर विरोधी पक्ष म्हणेल की, अध्यक्ष पक्षपाती आहेत. तेव्हा विरोधी पक्षातील सभासद म्हणतील की, विरोधी पक्षाचा अध्यक्ष का करू नये. शेवटी ही बाब न संपणारी अशी आहे. काल या ठिकाणी मा. श्री. पागे साहेबांनी सांगितले की, ब्रिटीश पार्लमेंटमध्ये स्पीकर हा कोणत्याही पक्षाचा नसतो. तो निवडणूक लढवीत नाही. परंतु मला येथे नमूद केले पाहिजे की, शेवटी राजकारणापासून कोणी अलग होऊ शकत नाही. एखाद्या पक्षाचा अध्यक्ष झाल्यानंतर जर त्याने पक्षाचा राजीनामा दिला तर ते सदसद्विवेकबुद्धीला फसविणे आहे. त्याने जर पक्षाचा राजीनामा दिला तर त्याला राजकीय पक्षाच्या ॲक्टीव्हिटीमध्ये भाग घेता येत नाही. परंतु हे बरोबरच नाही. आणि ज्या जुन्या प्रथा बाबा आदमच्या जमान्यापासून चालत आल्या आहेत त्या तशाच चालू आहेत. या ठिकाणी राजदंड असेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू राहील अशी प्रथा आहे. तेव्हा अध्यक्षांच्या बाबतीत महत्त्वाचा मुद्दा हा की, अध्यक्ष म्हणून खुर्चीमध्ये बसल्यानंतर ते त्या कालखंडामध्ये नि:पक्षपातीपणे काम करतात किंवा नाही? ते खुर्चीवर बसल्यानंतर कोणत्या राजकीय पक्षाचे उरत नाहीत? त्यांनी नि:पक्षपातीपणे सभागृहाचे काम चालवावे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, स्पीकरने स्पीकर म्हणून काम करीत असताना ते नि:पक्षपातीपणाने करावे. त्याचप्रमाणे एवढी ही खुर्ची असल्यानंतर तिचा अनादर होणार नाही याची दक्षताही प्रत्येक सभासदाने घेतली पाहिजे.

श्री. निळकंठ सामंत : सभागृहावर माझा विश्वास नाही असे म्हणणे योग्य नाही हे ठीक आहे. पण या सभागृहाकडून मला न्याय मिळत नसल्यामुळे यापेक्षा श्रेष्ठ सभागृहाकडे जाणे मला भाग आहे असे विधान केले तर चालेल का?

श्री. रा. सू. गवई : माननीय सदस्यांना ज्या भावना व्यक्त करावयाच्या असतील त्या डीसेन्सी सांभाळून कराव्यात. प्रश्न एवढाच आहे की, या सभागृहावर आमचा विश्वास नाही असे म्हणणे याचा अर्थ आपला आपल्यावरच विश्वास नाही असा होतो. मी तर असे म्हणेन की, हे सभागृह आणि जनतेचा फोरम याचा संगम जर सदस्याला साधता आला तर त्याच्या सारखी दुसरी चांगली गोष्ट नाही.

श्री. राम नाईक : सभागृहामध्ये जो विनंती-अर्ज देण्यात येतो त्याची पद्धती काय आहे.

श्री. रा. सू. गवई : मला माफ करा, मी माझ्या भाषणाच्या ओघामध्ये या महत्त्वाच्या आयुधाचा उल्लेख करावयास विसरलो. विनंती-अर्ज हे अतिशय महत्त्वाचे आणि प्रभावी असे आयुध आहे. गेल्या तीन-चार वर्षापूर्वी हे आयुध बोथट झाले होते. पण आता त्याला चांगली धार आली आहे. आम्ही गेल्या काही वर्षांत २० विनंती-अर्जांचा निकाल दिला आहे. प्रत्येक सत्रामध्ये दोन तीन तरी पिटिशन्स येतात. याची पद्धत अशी आहे की, एखाद्या विभागातील जर काही गाऱ्हाणे असेल तर ते गावकऱ्यांनी त्या विभागातील सदस्यांच्यामार्फत द्यावयाचे, तो सदस्य त्या अर्जाला आपली एक नोट जोडतो आणि तो विनंती-अर्ज सभागृहाला सादर करतो. तो विनंती-अर्ज म्हणून मान्य झाल्यावर तो विनंती-अर्ज समितीकडे सुपूर्द केला जातो. त्या समितीचे स्वरूप सेमी-ज्युडिशिअल असते. संबंधितांच्या साक्षी घेतल्या जातात, पुरावे पाहिले जातात, आवश्यक असेल तर प्रत्यक्ष स्पॉटवर समिती जाते आणि मग आपला निर्णय देते. आतापर्यंत या समितीने अनेक बाबतीत लोकांना न्याय दिला आहे. शिक्षकांचे तर कितीतरी पिटिशन्स या समितीकडे आलेले आहेत. मागे सरकारने शिक्षकांना इंटेरीम रिलीफ देण्याचे ठरविले. यासंबंधीचा एक पिटीशन त्यापूर्वी पिटिशन्स कमिटीपुढे आला होता. तेव्हा मी शिक्षण मंत्र्यांना पत्र लिहिले की, शासनाने असा निर्णय घेण्याचे ठरविले असल्याचे मला समजते. पण यासंबंधीची शिफारस पिटिशन्स कमिटीने केलेली होती. तेव्हा शासनाने तसे आपल्या ठरावात म्हटले पाहिजे आणि या समितीला योग्य ते क्रेडिट दिले पाहिजे. अशा प्रकारे अनेक प्रकरणाच्या बाबतीत या समितीला न्याय दिला आहे आणि सामान्य माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी हे अतिशय महत्त्वाचे आयुध आहे.

❑❑❑

निरोपाच्या भावुकक्षणी शिष्याचे गुरुवर्याना अभिवादन

(४ एप्रिल, १९७८)

उप सभापती या नात्याने दादासाहेबांनी केलेले हे शेवटचे भाषण. यावेळी परिषदेतून निवृत होणाऱ्या सदस्यांना तर त्यांनी निरोप दिलाच पण त्याचे वैशिष्ट्य म्हणजे दादासाहेबांनी ज्या माननीय सभापतींच्या मार्गदर्शनाखाली संसदीय व्यवहाराचे धडे गिरविले त्या मा. वि. स. पागे यांनाही निरोप देण्याचा तो भावपूर्ण क्षण होता. ४ एप्रिल १९७८ रोजी दादासाहेबांनी व्यक्त केलेले हे भावपूर्ण विचार.

माननीय सभापती महोदय, आज या सभागृहाचे जे माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांना सभागृहाच्या मार्फत हा निरोप आपण देत आहोत. सर्व सभागृहाच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपांचे अत्यंत मार्गदर्शनपर असे प्रास्ताविक आपले भाषण झाले, ज्यामुळे निवृत्त होणाऱ्या सभासदांना एक नवीन स्फूर्ती प्राप्त होईल; येथील अनुभवाचा उपयोग जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये साऱ्यांना होईल याबाबत मलाही संपूर्ण खात्री आहे. यावर्षी निवृत्त होणाऱ्या अनेक सदस्यांचा सहवास गेल्या सहा वर्षापासून, १२ वर्षापासून घडला आहे. त्या सभासदांपैकी काही सभासद खालच्या

सभागृहामध्ये निवडून गेले आहेत. आज निवृत्त होणारे अनेक सभासद पुन्हा निवडून येऊन त्यांच्या सहवासाची संधी पुन्हा प्राप्त करून देतील. त्या सर्वांना मी सदिच्छा देतो. अध्यक्ष महाराज, या सभागृहाचे एक वैशिष्ट्य राहिले आहे. या सभागृहाचे अत्यंत महत्त्वपूर्ण विवेचन एका पुस्तकामध्ये करण्यात आले आहे. त्याप्रमाणे जरी वरिष्ठ सभागृहाला शोभण्यासारखी वये काही सन्माननीय सदस्यांची नसतील, पण या सभागृहामध्ये वेळोवेळी ज्या चर्चा घडून आल्या त्यांची उंची, पातळी आणि या सभागृहाची प्रतिष्ठा सर्व सदस्यांनी सतत राखून ठेवलेली आहे. माझे मित्र सर्वश्री प्रधान, मंगुडकर, आठवले, मनोहर जोशी, बापट, लिमये आणि इतरही निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा या सभागृहातील कामकाजामध्ये अत्यंत मोलाचा वाटा राहिलेला आहे. या चर्चेचे प्रतिबिंब बाहेर सामाजिक क्षेत्रातही उमटल्याशिवाय राहणार नाही. म्हणून प्रातिनिधिक स्वरूपाचे आपण जे प्रास्ताविक विचार या ठिकाणी मांडलेत त्यांच्याशी मी पूर्ण सहमत आहे.

दुसरी गोष्ट अशी की, या सभागृहाच्या इतर सदस्याबरोबरच अध्यक्ष महाराज आपणही निवृत्त होत आहात. या सभागृहामध्ये सदस्य म्हणून जवळजवळ चार वर्षे आणि आपल्या मार्गदर्शनाखाली उप सभापती म्हणून ९ वर्षे मी काम केले. केवळ या सभागृहाचे सभापती म्हणूनच नव्हे तर अगदी खऱ्या अर्थाने आम्हा सर्वांना आपण मोलाचे मार्गदर्शन केलेत. सभागृहाचे सभापती या नात्याने आपल्यावर अनेक वेळा प्रेमाने वागण्याचे, थोडे कठोर होण्याचेही प्रसंग आले. आपल्या कार्याचे मूल्यमापन केल्यानंतर त्यातून जी निष्पत्ती झाली ती निष्पत्ती म्हणजे आम्हाला आपल्याकडून भरपूर मार्गदर्शन मिळाले. प्रेम मिळाले. नवनवीन ज्ञान प्राप्त झाले. या सभागृहाप्रमाणेच, सभागृहाच्या बाहेरही आपला मला जो व्यक्तिगत सहवास लाभला त्याची आठवण मी जन्मभर विसरू शकणार नाही. सभागृहात माझे जे प्रशिक्षण झाले, त्याही पलीकडे बाहेर आपल्याबरोबर निरनिराळ्या विषयांवर बोलताना, चर्चा करताना आपले मनोगत समजून घेण्याची संधी मिळत गेली आणि प्रत्येक वेळी त्यातून आम्हाला वेगळी स्फूर्ती मिळत गेली. अनेक वेळा आपल्या गैरहजेरीमध्ये सभागृह सांभाळण्याची मला संधी मिळाली त्याबद्दल मी स्वत: ला भाग्यशाली समजतो. आपल्या नेतृत्वाखाली हे सभागृह चालविण्याची संधी मला ९ वर्षे प्राप्त झाली. सभागृहाच्या कामकाजांविषयी आणि सभागृहाबाहेरही प्रत्येक वेळी अध्यक्ष महाराज, आपल्यात आणि माझ्यात एकमत राहिले. मग ती रोजगार हमी योजना असो किंवा आणखी दुसरा कोणता विषय असो, आपले विचार, आपली मते १०० टक्के जुळत होती. आपण आपल्या मार्गदर्शनाने या सभागृहाला नवीन दृष्टिकोन दिला. संपूर्ण देशात ज्या वेळी विधिमंडळे गडगडली, लोकसभेचेही वातावरण तणावाचे होते, त्या वेळी या राज्याने नागपूर अधिवेशनामध्ये रोजगार हमी योजनेचा प्रस्ताव एकमुखाने पास केला ही गोष्ट आपल्याला निश्चितच भूषणावह आहे. त्यावेळी आपल्याला बरेच कष्ट उपसावे लागले. सर्वश्री उत्तमराव पाटील, ना. ज्ञा. पाटील, प्रधान, दत्ता ताम्हाणे या सर्व नेत्यांनी बसून, विचारविनिमय करून एकमुखी निर्णय घेतला एवढेच नव्हे तर महाराष्ट्रात हे घडले कसे याचा सर्वांना अचंबा वाटला आणि या बाबतीतली माहिती दिल्लीच्या सरकारने मागविली. सर्वांनाच आश्चर्य वाटले की, दिल्लीसारख्या ठिकाणी जिथे गदारोळ चालू आहे, तिथे महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये एकमुखी ठराव कसा पास होऊ शकतो? पण हे घडू शकते हे महाराष्ट्राने दाखवून दिले. कारण काही प्रश्न हे पक्षातीत असतात. त्यात कोणत्या जातीची, पक्षाची, धर्मांची बंधने येत नाहीत. अशा पक्षातीत प्रश्नाविषयी, अध्यक्ष महाराज, आपण जो रस घेतलात, शेवटच्या माणसाला काम मिळावे, लहान शेतकऱ्याला न्याय मिळावा यासाठी आपण जे कष्ट केलेत त्याचेच हे फळ आहे. आपणच ही

शिकवण आम्हाला दिलीत. ती आम्ही किती आत्मसात केली आणि त्याचा आम्ही आमच्या जीवनामध्ये किती उपयोग करून घेऊ शकू हा आमच्या व्यक्तिगत परीक्षेचा भाग आहे. पण आम्ही या गोष्टी आपल्याकडून शिकलो यामध्ये आपले दोघांचे १०० टक्के एकमत राहिले. असा एकही प्रसंग मला आठवत नाही की, आपण आणि मी यात सभापती आणि उप सभापती या नात्याने कोठे मतभेद झालेला आहे. आपले जे मार्गदर्शन आम्हाला लाभले त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. श्री. रवींद्रनाथ टागोर हे काही कोणत्या शाळेत गेलेले नव्हते. पण दांडगा व्यासंग आणि अभ्यासू वृत्तीने ते उच्च पदाला आले. लोकप्रिय झाले. त्याप्रमाणे काही काही गोष्टी प्रत्यक्ष शिकण्याबरोबरच अनुभवानेही आत्मसात करता येतात. जे ज्ञान आणि मार्गदर्शन आपण आम्हाला प्रेमाने देऊ केलेत. त्याबद्दल मला या ठिकाणी सद्‌भावना व्यक्त करावयाच्या आहेत. मी आपल्यापेक्षा वयाने लहान असूनही आपल्याला सदिच्छा देत आहे. आपले कार्यक्षेत्र फार मोठे आहे. आपण कार्य करीत असताना आपल्याला जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा आम्ही या सभागृहाचे सदस्य आपल्या हाताखाली काम करावयाला तयार आहोत. आपण केव्हाही हाक द्या. आम्ही सगळे जण आपल्या हाकेला ओ देऊ एवढे आश्वासन देतो.

अध्यक्ष महोदय, केवळ तांत्रिकदृष्ट्या या सभागृहाचे १४ सभासद आज निवृत्त होत आहेत. यातील काही सन्माननीय सदस्य पुन्हा या ठिकाणी येणार आहेत. सभागृहात बसणार आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. कांबळे साहेबांनी या ठिकाणी सुरुवातीला आपले विचार व्यक्त केले आहेत. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, या सभागृहाने संसदीय परंपरांचे काटेकोररीत्या पालन केले आहे. या सभागृहाचे नाव तांत्रिकदृष्ट्या वरिष्ठ सभागृह असले तरी काही तरुण सदस्यसुध्दा या सभागृहात बसले आहेत. या सभागृहाने संसदीय कामकाज पद्धतीने फार मोलाचा विचार केला आहे. अध्यक्ष महाराज, जगातील द्विगृही सभागृहाकडे पाहिले असता आपल्याला असे दिसून येते की, वरिष्ठ सभागृह हे प्रभावशाली आहे, शासनाच्या एकूण कारभारावर अंकुश ठेवण्याचे काम या सभागृहाने केले आहे.

अध्यक्ष महाराज, वि. स. पागे यांनी अशी सूचना केली होती की, शिक्षकांचे प्रतिनिधी, पदवीधरांचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रतिनिधी या सभागृहात आणून आपल्याला या सभागृहाची संख्या ९० पर्यंत नेता येईल आणि त्यामुळे राज्यातील सर्व प्रश्नांचा विचार होऊ शकतो. त्यासंबंधी आता जास्त बोलत नाही. अध्यक्ष महाराज, काही काही वेळी दोन सभागृहातील फरक व्यक्त केला जातो. एका राजकीय तत्त्ववेत्त्याने असे सांगितले की, " The Lower House is a cup and the Upper House is a saucer." म्हणजे कपातील चहा पिताना वेदना होतात परंतु बशीतून तोच चहा प्यालो तर त्या होत नाहीत. अध्यक्ष महाराज, या सभागृहाच्या परंपरा पाळण्याचे काम सर्व सदस्यांनी केले आहे. आता यातील काही सभासद आज तांत्रिकदृष्ट्या निवृत्त होत आहेत. अध्यक्ष महाराज, आमचे वैयक्तिक मित्र श्री. रामराव आदिक पुनश्च या सभागृहात आले आहेत. विशिष्ट राजकीय परिस्थितीचे आव्हान स्वीकारून त्यांनी आपल्या ॲडव्होकेट जनरल पदाचा राजीनामा देऊन राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी या सदनात प्रवेश केला. मंत्री, उप मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. कायद्यांचे त्यांना सखोल ज्ञान आहे. म्हणून त्यांच्या पुनर्नियुक्तीने सभागृहात ज्येष्ठ सदस्यांची भर पडली आहे.

❑❑❑

दादासाहेबांच्या शोकसंवेदना

मा. रा. सू. गवई हे विधानपरिषद सदस्य, उप सभापती, सभापती, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते असताना अनेक श्रद्धांजली ठरावांवर त्यांची भाषणे होत होती. ज्यावेळी समवेत काम केलेला सदस्य जग सोडून निघून जातो तेव्हा सभागृहाच्या भावना खूप हळव्या होतात. अलवारपणाने त्या सदस्यांचे मोठेपण अधोरेखित करताना वापरलेले शब्द फार महत्त्वाचे असतात. दादासाहेबांच्या श्रद्धांजलीपर भाषणातून सभागृहाने हाच अनुभव घेतला. इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, राजीव गांधी यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्यांच्या वा सभागृहातील सदस्यांच्या दु:खद निधनानंतर त्या त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू उलगडून दाखवताना त्या व्यक्तींची महानता अतिशय समर्पक शब्दात मांडण्याची शैली दादासाहेबांजवळ होती. त्या शैलीचा अनुभव देणारी दादासाहेबांनी केलेली काही श्रद्धांजलीपर भाषणे.

श्रीमती इंदिरा गांधी

अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यानी, भारताच्या दिवंगत लाडक्या पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या दु:खद निधनाबद्दल आपल्या प्रस्तावात ज्या शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत त्यांच्यामध्ये मी तसेच माझा पक्ष सहभागी आहे. जास्त काही बोलण्याचा हा प्रसंग नाही. असा दु:खद प्रस्ताव मुख्यमंत्र्यांना मांडावा लागेल आणि त्यावर विधिमंडळाला आपल्या संवेदना व्यक्त कराव्या लागतील या सर्व गोष्टी अत्यंत अनपेक्षित होत्या, धक्कादायक होत्या आणि या धक्क्यातून अजूनही आपला देश पूर्णपणे सावरलेला नाही. एका वाक्यात सांगावयाचे म्हणजे दिवंगत नेत्या, श्रीमती इंदिरा गांधी या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या आणि अस्मितेच्या प्रतीक होत्या. या दोन वाक्यांमध्ये त्यांना अर्थपूर्ण श्रद्धांजली वाहता येईल. परंतु विवरण करावयाचे झाले तर सर्वात मोठी बाब म्हणजे भारताची अस्मिता त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवली. जगाला जडलेल्या समस्यांतून परस्परांच्या विरोधी उभे असणाऱ्या दोन जगांतून तिसरे जग निर्माण करण्याची पंडित नेहरूंची प्रक्रिया श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांच्याच तोलामोलाने आणि त्याच अस्मितेने सांभाळली. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्रीय विचारसरणीशी समवाक्य असणाऱ्यांमध्ये जसा आदरयुक्त दरारा त्यांच्याबद्दल होता त्याचप्रमाणे अलिप्त राष्ट्र विचारसरणीशी मतभिन्नता असणाऱ्या मोठ्या राष्ट्रांमध्येही त्यांनी आपली तेवढीच ताकद निर्माण केली होती आणि याचे प्रत्यंतर त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी जे प्रतिनिधी आले होते त्यांच्यावरून दिसून आले आहे. पाकिस्तानाचे राज्यकर्ते जन. झिया हे अधिकृत राजकर्त्या पक्षातर्फे दिवंगत पंतप्रधान श्रीमती गांधी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आले होते त्याचप्रमाणे त्यांच्या विरुद्ध असलेल्या गटाचे प्रतिनिधीही श्रद्धांजली वाहण्यासाठी आले होते. हुजूर पक्षाच्या श्रीमती मार्गारेट थॅचर या राज्यकर्त्या पक्षातर्फे श्रद्धांजली वाहण्यासाठी आल्या होत्या. त्याचप्रमाणे लेबरपार्टीचे प्रतिनिधीसुद्धा आले होते.

श्रीलंकेचे राज्यकर्त्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून जसे श्री. जयवर्धने आले होते तसेच त्यांना विरोध करणाऱ्या श्रीमती बंदरनायकेही श्रद्धांजली वाहण्यासाठी आल्या होत्या. म्हणजे आंतरराष्ट्रीय जगात मतभिन्नता व्यक्त करणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत त्यांच्यामध्येही अस्मिता आणि आदरयुक्त दरारा निर्माण करणारे असे श्रीमती गांधी यांचे व्यक्तिमत्त्व होते याचे हे प्रतीक आहे. आपल्याला याची कल्पना आहे की, आपला देश हा काही विकसित देश नाही. परंतु या जगामध्ये जे विकसनशील देश आहेत त्यांच्यामध्ये भारताला अग्रकमाने ठेवण्यामध्ये इंदिरा गांधीचा वाटा आहे हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही आणि आपण विसरणारही नाही. विकसनशील देशांच्या ज्या समस्या आहेत त्यांची चिंता इंदिरा गांधी यांना होती. मूलतः आपल्या देशाची जी समस्या आहे ती राजकीय नाही आणि आर्थिकही नाही. भौगोलिक गोष्टीच्या पलीकडे जाऊन भावनात्मक एकात्मता जोपर्यंत आम्ही या देशांमध्ये निर्माण करणार नाही आणि आपली ही राष्ट्रीय ऐक्याची समस्या सुटणार नाही तोपर्यंत आपल्या देशातील आर्थिक आणि राष्ट्रीय समस्या या दिवसेंदिवस जटील होत जातील आणि म्हणून खरी श्रद्धांजली ती आहे. माननीय मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते श्री. दत्ता मेघे व श्री. लहाने यांनी सांगितल्याप्रमाणे केवळ सोपस्कार म्हणून बोलण्याकरिता नव्हे तर प्रत्येकाने मनापासून "आम्ही प्रथम भारतीय आहोत" हे कृतीत आणून जात, धर्म, पंथ असा सर्व ढोंगीपणा सोडून इमानदारीने वागल्याशिवाय या देशातील कोणतीच समस्या सुटणार नाही. परंतु आज काय दिसते? जो दिवस निघतो तो विघटनाचा निघतो. हिंदूंच्या समस्या, मुस्लिम, दलित समस्या, शिखांच्या हिताच्या समस्या अशा अनेक समस्या रोज उभ्या केल्या जातात. कधी उत्तर हिंदुस्थान तर कधी दक्षिण हिंदुस्थान अशी मागणी पुढे येते. परंतु हे स्वप्न महात्मा गांधीनीं कधी पाहिले नव्हते. कन्याकुमारीपासून श्रीनगरपर्यंत आमचा देश एक हे खरे स्वप्न त्यांनी पाहिले होते आणि इंदिराजींचे सुद्धा तेच स्वप्न होते. हे स्वप्न जर आपण सर्वांनी साकार केले तरच ती त्यांना खरी आदरांजली होणार आहे. निरनिराळ्या राजकीय विचारांचे आणि निरनिराळे मतभेद असलेले पक्ष असतील. परंतु आज स्थिती अशी आहे की, पक्षाचे लॉजिक वेगळे आणि पक्षामध्ये असणाऱ्या व्यक्तींचे लॉजिक वेगळे. पक्षामध्ये असणाऱ्या लोकांची जात, धर्म यासंबंधी निरनिराळे मतभेद असणारी माणसे आज राजकीय आणि सामाजिक जीवनात पहावयास मिळतात. हेच मतभेद जेव्हा या देशातून दूर झालेले दिसतील तेव्हाच ती इंदिराजींना खरीखुरी आदरांजली होणार आहे. मरण हे कोणाला टळत नाही. भगवान गौतम बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे जन्म आणि मरण हे दोन्ही नैसर्गिक आहेत. आज इंदिरा गांधीचे मरण टाळायचे असते तर या देशातील साऱ्या लोकांनी त्यासाठी त्याग केला असता. केवळ भाषणापुरते सोडा, परंतु त्यासाठी रांगा लागल्या असत्या आणि अनेकांनी सांगितले असते की, आम्हाला प्रथम मरू द्या. उत्तुंग उंचीच्या माणसाचे मरण त्याच उंचीचे असते. म्हणून इंदिराजींनासुद्धा शोभेचे मरण आले. त्यांनी हौतात्म्य पत्करले आहे. महात्मा गांधी, मार्टिन ल्युथर किंग, जॉन एफ केनेडी या महान नेत्यांनीसुद्धा असेच हौतात्म्य पत्करलेले आहे. म्हणून मरणानंतर ते फार मोठे झाले आहेत. तीच गोष्ट इंदिराजींच्या बाबतीत घडलेली आहे. खलिस्तान चळवळीच्या बाबतीत त्यांना कोणीतरी विचारले की, तुम्ही हा धाडसी निर्णय घेतला आहे त्याचे दुष्परिणाम घडतील असे वाटत नाही काय? त्यावेळेस त्या म्हणाल्या होत्या की, राष्ट्राच्या हिताकरिता व राष्ट्राच्या एकात्मतेकरिता असा निर्णय घ्यावा लागतो. त्यामध्ये मला मरण आले तर या देशामध्ये पुन्हा खलिस्तान होणार नाही. इंदिराजी गेल्यानंतर या देशामध्ये राष्ट्रीय एकात्मतेस तडे जातील अशी भावना व्यक्त करणारी एकही व्यक्ती, एकही माणूस आणि एकही पक्ष राहणार नाही. खरेखुरे वातावरण निर्माण झाले तरच आपण इंदिराजींना अत्यंत विनम्र मनाने खरी श्रद्धांजली

अर्पण केली असे होईल. मी एवढेच सांगतो की, त्यांच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी आम्हाला कोणताही त्याग करण्याची पाळी आली तरी तो करू, अशी नम्र श्रद्धांजली मी अर्पण करतो.

राजीव गांधी

सभापती महोदय, राज्याचे अर्थमंत्री आदरणीय रामराव आदिक यांनी भारतरत्न, दिवंगत माजी पंतप्रधान, कै. श्री. राजीव गांधी यांना जी श्रद्धांजली अर्पित केली व त्याचबरोबर कै. प्रभाकरराव वैद्य आणि कै. ग. रा. वैद्य या दिवंगत नेत्यांना जी श्रद्धांजली अर्पण केली आहे, त्याबाबत त्यांनी जे विचार व्यक्त केले आहेत त्या विचारांशी मी पूर्ण सहमत आहे. सर्वप्रथम कै. राजीव गांधी यांना भावपूर्ण आदरांजली अर्पित असताना अंत:करणातील हेलकावे अद्यापही थांबले नाहीत. त्याचे कारण सुस्पष्ट आहे. एका त्यागी कुटुंबातील व संपूर्ण त्यागाची परंपरा असलेल्या पंडित मोतीलाल नेहरू, पंडित जवाहरलाल नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी आणि कै. फिरोज गांधी यांच्या त्यागमय जीवनाच्या पार्श्वभूमीवर एक देदिप्यमान आणि राजबिंडे नेतृत्व या देशाला राजीवच्या रूपाने लाभले होते. अध्यक्ष महाराज, १९८४ साली जे नेतृत्व या देशाला लाभले ते लक्षात घेता या देशात पंडित जवाहरलाल नेहरु जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा त्यांनी जेवढे बहुमत प्राप्त केले नव्हते त्यापेक्षा जास्त कै. राजीवजींना लाभले होते, याची इतिहासामध्ये प्रामुख्याने नोंद करावी लागेल. पंतप्रधान झाल्यानंतर राजीव गांधी यांनी राष्ट्रीय नेता म्हणून आपली छाप पाडलीच होती परंतु आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्येसुद्धा त्यांनी आपला प्रभाव पाडला होता. पंतप्रधान झाल्यानंतर आपली पहिली भेट राजीव गांधी रशियाला देतील की अमेरिकेला देतील हा प्रश्न महत्त्वाचा नाही. जगामध्ये या दोन बड्या राष्ट्रांकडे सर्वांचे लक्ष असते. या दृष्टीने राजीव गांधी यांनी आपली पहिली भेट रशियाला दिली आणि त्यानंतरची भेट अमेरिकेला दिली. या दोन बड्या देशांबाबत भारताने पंडित नेहरूंपासून, इंदिरा गांधीपासून ते राजीव गांधीपर्यंत बजावलेली कामगिरी ही अतिशय मोलाची आहे. पंडित नेहरू यांनी नॉन अलाईनमेंट मुव्हमेंटचा केलेला पुरस्कार त्याच जोमाने राजीव गांधी यांनी जोपासला आणि पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर केवळ या देशाचे नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून आपला लौकिक निर्माण केला आणि हे स्वाभाविकही होते. कारण एक त्यागाची परंपराच त्यांना लाभली होती. पण दुर्दैव असे की, मद्रास येथे एका सभेत, की जी दुर्दैवाने पूर्वनियोजित नव्हती अशा सभेत राजीव गांधी धाडसाने गेले आणि त्यामध्येच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. विमानामध्ये त्यांनी यापूर्वी अनेक मुलाखती पत्रकारांना दिल्या होत्या. त्यातील काही देशातील होत्या तर काही देशाबरोबर जाताना घेतलेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी स्पष्ट केले होते की, माझ्या जीवास धोका आहे. याची अनेक कारणे आहेत. ती या सभागृहात सांगणे बरोबर नाही. परंतु हा धोका म्हणजे एक आंतरराष्ट्रीय कट आहे. या कटात समाजवादाप्रत पावले उचलणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत त्या एका बाजूला आहेत तर दुसऱ्या बाजूला प्रतिकारवादी शक्ती. त्यांचा जोर वाढत असतानासुद्धा आपल्या तत्त्वापासून विचलित न होता भारतीय संविधानानुसार धर्मनिरपेक्षता, संघराज्ये, एकात्मता आणि सामाजिक कार्य या सर्वांची बांधिलकी त्यांनी मोठ्या हिमतीने स्वीकारली आणि पुढचा प्रवास केला. अध्यक्ष महाराज, योगायोग आहे की, नामदार रामराव आदिक यांनी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या तशाच प्रतिक्रिया मी सुद्धा राजीव गांधी यांच्या निधनानंतर व्यक्त केल्या होत्या. मी असे म्हटले होते की, राजीव गांधी यांच्या हत्येने निर्माण झालेली ही पोकळी कधीही भरून निघणार नाही, या देशाची मोठी हानी झालेली आहे. ४७ व्या वर्षी म्हणजे ऐन उमेदीमध्ये त्यांचा अंत झाला आहे. वयाची ७५ वर्षे झालेली असताना अनेक लोक राजकीय नेते किंवा राष्ट्रीय नेते म्हणून काम

करीत असतात तेव्हा राजीव गांधी यांची जवळ जवळ ३० वर्षे काळाने त्यांच्याकडून हिसकावून घेतली आहेत. निवडणुकीनंतर ते पंतप्रधान झाले असते किंवा नसते हा भाग वेगळा. परंतु राजीव गांधी हे राष्ट्रीय नेते होते तसेच ते आंतरराष्ट्रीय नेतेसुद्धा होते याबाबत दुमत असू शकत नाही. राजीव गांधी पंतप्रधान नव्हते तेव्हासुद्धा त्यांची कीर्ती सर्वदूर पसरलेली होती. व्यक्तिगत जीवनामध्येसुद्धा श्रीमती सोनिया, राहूल, प्रियांका यांच्यापासूनसुद्धा ही ३० वर्षे काळाने हिरावून घेतली आहेत ही बाब अजूनही अंत:करण हेलावून टाकणारी आहे. पंडित नेहरू यांनी अलिप्ततेचे धोरण स्वीकारले होते आणि त्यासाठी राजीव गांधीनीसुद्धा युनोमध्ये अमेरिकेशी दोन हात केले ही भूषणावह बाब आहे. जे ध्येय स्वीकारलेले होते त्याबाबतची सर्व जबाबदारी त्यांनी आपल्या शिरावर घेतली होती. तेव्हा त्यांचे नेतृत्व हे फक्त काँग्रेस पक्षाचेच नाही तर अखंड भारताचे नेतृत्व होते. धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यांच्याशीही अखंड बांधिलकी ठेवली होती. पुढे होणाऱ्या निवडणुकीनंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले असते की, झाले नसते, हा भाग वेगळा, शेवटी राजकारण हे वळवाचे पाणी आहे. तत्त्वज्ञान हे सत्य आहे. पाण्यासारखे स्वच्छ आहे. वाहणारे आहे. त्यात गंदगी नाही. तेव्हा असा हा सर्वांचा नेता हरपलेला आहे आणि त्यामुळे या देशाचे नुकसान झालेले आहे. भारतासारख्या मोठ्या लोकशाहीप्रधान देशामध्ये अशा प्रकारे हत्या होणे हा लोकशाहीला लागलेला कलंक आहे. लोकशाहीला ते लांच्छन आहे. विघटनाकडे नेणाऱ्या आणि धर्मनिरपेक्षतेच्या आड येणाऱ्या तसेच कन्याकुमारीपासून श्रीनगरपर्यंत अखंड भारताला छेद देणाऱ्या ज्या प्रवृत्ती या देशामध्ये निर्माण होत आहेत त्यांचा विचार करण्याची वेळ आली आहे. सन्माननीय मंत्री, श्री. रामराव आदिक यांनी म्हटल्याप्रमाणे माझ्यासुद्धा दोन वैयक्तिक मुलाखती राजीव गांधी यांच्याबरोबर झाल्या होत्या. मी सभागृहात सांगू इच्छितो की, अॅन्टी पॉव्हर्टीच्या संदर्भात एक २०० पानांची नोट मी राजीव गांधींना दिली होती. त्यासंदर्भात त्यांचे सेक्रेटरी, मी आणि राजीव गांधी यांनी मिळून बैठक घेतली होती. अॅन्टी पॉव्हर्टी प्रोग्राम कसा राबविता येईल याची चर्चा केली होती. गरिबांसाठी तयार केलेल्या योजनांपैकी पाच टक्के सुद्धा कार्यक्रम या लोकांपर्यंत पोहोचत नाही याची राजीव गांधी यांना खंत होती. या योजना खाली परकोलेट होत नाहीत कारण मधलेच लोक त्यांचा फायदा उठवितात. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलन होत नाही याची चिंता त्यांना होती. तेव्हा त्यांच्याबरोबर चर्चा करण्याची संधी मला मिळाली याचा मला अभिमान आहे. तेव्हा राजीव गांधी यांना मी मन:पूर्वक आदरांजली माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे अर्पण करतो.

यशवंतराव चव्हाण

अध्यक्ष महाराज, सभागृहाचे नेते, राज्याचे मुख्यमंत्री, माननीय वसंतदादा पाटील यांनी दिवंगत यशवंतरावजी चव्हाण यांच्यासंबंधी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याच्याशी मी सहमत आहे. यशवंतरावांसंबंधी या सभागृहातील प्रत्येक सदस्य तासनतास बोलू शकतील. पण हा तो प्रसंग नाही. मी यशवंतरावजींचे वेगळ्या तऱ्हेने वर्णन करणार आहे. कारण महाराष्ट्राला यशवंतरावजी म्हणजे पूर्वी कधी मिळाली नाही अशी ही नवीन देणगी होती. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे लोकमान्य टिळकांनी म्हटले होते. त्यावेळी सर्व लोकांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात उड्या घेतल्या, पण महाराष्ट्रामध्ये मात्र शहरी नेतृत्व विरुद्ध ग्रामीण नेतृत्व असा हा वाद होता. मी त्या नेतृत्वाचा नामोल्लेख नव्याने करू इच्छित नाही. परंतु ग्रामीण नेतृत्वाची देणगी महाराष्ट्र राज्याला कुणी दिली असेल तर ती यशवंतराव चव्हाण यांनी दिली आहे. पुस्तकी ज्ञान व ग्रामीण शहाणपणाबद्दल ते भाषणात म्हणावयाचे की, पी. एचडी.चा प्रबंध लिहून वर्गामध्ये एखादा प्राध्यापक मुलांना शिकवितो तो जेवढा

महत्त्वाचा तेवढाच शेतामध्ये नांगर चालविणारा शेतकरी महत्त्वाचा आहे. दोघांचीही मूल्ये त्या त्या ठिकाणी महत्त्वाची आहेत. दोघांची बदली करून प्राध्यापकाला नांगर चालविण्यास सांगितले आणि शेतकऱ्याला शिकविण्यास सांगितले तर ते दोघेही अयशस्वी होतील. म्हणून ग्रामीण शहाणपण आणि पुस्तकी पदव्यांचे शिक्षण यात अमुक एक मोठा आणि अमुक एक लहान माणूस आहे असे म्हणणे ठीक नाही. म्हणून ग्रामीण शहाणपणाच्या व नेतृत्वाच्या रूपाने यशवंतरावजी ही आपल्याला मिळालेली एक मोठी देणगी आहे. आजचे राज्याचे मुख्यमंत्री, श्री. वसंतदादा पाटील यांनासुद्धा यशवंतराव चव्हाणांमुळेच नेतृत्व मिळाले आहे. कै. वसंतराव नाईक, आज ते नाहीत त्यांना सुद्धा त्यांच्यामुळेच नेतृत्व मिळाले होते. आजचे देशाचे गृहमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनासुद्धा त्यांच्यामुळेच नेतृत्व प्राप्त झाले होते. त्यानंतर दुसरी केडर जी आहे ती विकेंद्रीकरणासंबंधीची आहे. पंचायत राजची कल्पना यशवंतराव चव्हाणांची, ती वसंतराव नाईकांकडून त्यांनी वदवून या राज्यामध्ये सुरू केली. तेच सेकंड केडर येथे आजचे मंत्री श्री. भाई सावंत हे पूर्वी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते, त्यांच्यारूपाने दिसते आहे. तसेच, श्री. गड्डमवार हे सुद्धा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. म्हणजे जेथे ग्रामीण नेतृत्व आणि शहरी नेतृत्व असा मोठा वाद या राज्यात सुरू असतांना ग्रामीण शहाणपण आणि ग्रामीण नेतृत्वाची सर्वात मोठी देणगी देण्याचे काम यशवंतरावजींनी केले. त्यामुळे आमच्यासारखी असंख्य पोरे बोलू शकतात, फिरू शकतात, हिंडू शकतात. मा. मुख्यमंत्र्यांनी विषय काढला म्हणून मी सांगेन की, रॅशनल थिंकिंग, परिस्थितीजन्य विषयाप्रमाणे कार्याचे मूल्यमापन केले पाहिजे. आता विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री. लहाने यांनी सांगितले की, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराजींचा सिंहाचा वाटा आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना भाषावर प्रांतरचना जर केली नसती तर राष्ट्रीय एकात्मता जास्त रीतीने जोपासली गेली असती हा भाग वेगळा. हे सर्व खरे असले तरी देखील यशवंतरावजी संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेच्या विरुद्ध होते ही गोष्ट साफ चूक आहे. श्री. जोशी यांनी देखील आपल्या भाषणात सांगितले होते की, त्यांचे सारे अंतःकरण या संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेनेच भारलेले होते. मा. वसंतदादा पाटील हे संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध नव्हते. त्यांच्यावर प्रतापगड येथे पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचे भेटीची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी स्वयंसेवकाच्या भावनेने ती पार पाडली. याचा अर्थ श्री. वसंतदादा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती विरुद्ध होते असा नाही. तेही अंतःकरणाने संयुक्त महाराष्ट्रवादी होते. परिस्थितीनुरूप परंतु योग्य वेळी मग ते, कै. पंडित नेहरू असो अथवा दिवंगत इंदिरा गांधी असो यांच्या मध्यस्थीने त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणला. आज या गोष्टी जवळजवळ कालबाह्य झालेल्या आहेत. या देशातील भाषावार प्रांतरचना राष्ट्रीय एकात्मतेच्या विरुद्ध आहे म्हणून ती समूळ नष्ट झाली पाहिजे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, कोणत्या तरी एका गोष्टीने एखाद्या माणसाचे मूल्य ठरविणे हे चुकीचे आहे. मा. यशवंतरावजींच्या हृदयातील कप्पा नि कप्पा हा संयुक्त महाराष्ट्राच्या विचारानेच भारलेला होता.

कै. यशवंतरावजी मुख्यमंत्री झाल्यानंतर तरुण भारताचे संपादक, श्री. माडखोलकर यांनी अग्रलेख लिहिला. यशवंतराव हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले मग "हे राज्य मराठ्यांचे की मराठी माणसाचे" अशी पृच्छा वृत्तपत्रातून आली. हा वाद वर्तमानपत्रामधून चाललेला होता. यशवंतरावजींनी सभागृहामध्ये अधिकृतरीत्या जाहीर केले की, हे राज्य मराठ्यांचे नाही, हे राज्य मराठी माणसाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. वामनराव महाडिक, प्रमोद

नवलकर यांना अभिप्रेत असलेला जो मराठी माणसाचा अर्थ आहे तो अर्थ मला अभिप्रेत नाही. मला वेगळा अर्थ अभिप्रेत आहे. महाराष्ट्रात राहणारी सर्व माणसे असा अर्थ मला अभिप्रेत आहे. मला वेगळा अर्थ अभिप्रेत नाही. महात्मा जोतिबा फुले यांचा एक सिद्धांत होता. ते असे म्हणत की, राज्य करा. परंतु आरसा चेहऱ्यासमोर धरल्यानंतर ज्याप्रमाणे कानाप्रमाणे कान दिसतो, नाकाप्रमाणे नाक दिसते तसा महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा नकाशा काढायचा असेल तर महाराष्ट्रातील जनतेचा नकाशा विधिमंडळात याप्रमाणे आला पाहिजे. श्री. माडखोलकर, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा देखील तोच आग्रह होता. स्पष्ट शब्दात यशवंतरावजींनी असा उल्लेख केला की, हे राज्य मराठी लोकांचेच राहील. हा मनाचा मोठेपणा, मनाचा दिलदारपणा त्यांनी दाखविलेला आहे. त्यांचे कार्य पुरे झाले की, अपुरे झाले हा प्रश्न वादग्रस्त आहे. त्यांची इच्छा पूर्ण करण्याचे काम अजूनही अपूर्ण आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. राजकारणाच्या बाहेर राहणे म्हणजे पाण्यावाचून मासा जसा तळमळतो तसे तळमळणे असे विचार त्यांचे होते. कवी महानोरांना, मिराशींना भेटून, लहान लहान कार्यकर्त्यांचा संच जमा करून महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्वाचे जनकत्व त्यांनी केले. यासंबंधी अधिक न बोलता, अत्यंत प्रामाणिकपणे अंत:करणपूर्वक माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे त्यांच्या स्मृतीला मी आदरांजली अर्पण करतो.

वि. स. पागे

सभापती महोदय, अत्यंत दु:खद अंत:करणाने आणि व्यक्तिगत ऋणदायित्वाच्या भावनेने मी श्री. पागे यांना श्रद्धांजली अर्पण करतो. पागे आणि माझा संबंध १९६४ सालापासून तो १९९० सालापर्यंत म्हणजे गेली २६ वर्षे होता. मी १९७८ साली सभापती झालो पण त्यानंतर ते सभापती नव्हते. परंतु १९७८ सालापासून सतत बारा वर्षे दर एक-दोन दिवसांनी आम्ही भेटत असू. आमची ही भेट कधी त्यांच्या घरी व्हावयाची तर कधी माझ्या घरी होत असे. त्यावेळी गोरगरीब माणसांबद्दल, शेतमजुरांच्या प्रश्नांबद्दल आमची चर्चा होत असे. प्रवासात आम्ही कुठेही भेटलो तरी आम्ही चर्चा करीत असू. त्यांचा गेली २६ वर्षे मला सहवास लाभला होता. ते एक थोर स्वातंत्र्य सैनिक व गांधीवादी विचारसरणीचे होते. ते साहित्यिक आणि नाटककार होते. नियोजनाची कल्पकता असलेला एक थोर संसदपटू असलेल्या या व्यक्तीचे जीवन अष्टपैलू होते. प्रांताप्रांतामधून रोजगाराची परिस्थिती कशी आहे, शेतीवर काम करणाऱ्या मजुरांची स्थिती कशी आहे हे शोधून व त्यावर विचारविनियम करून ते सतत चर्चा करीत असत. रोजगार हमी योजनेला जन्म देत असताना कै. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री होते. पागे सभापती आणि मी त्यांच्या हाताखाली उप सभापती म्हणून होतो. आमच्या तिघांच्या मिळून कितीतरी डझन बैठका झाल्या असतील. ते सभापती आणि मी उप सभापती असलो तरी उप सभापती म्हणून काम न करता त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून मी काम करीत असे. त्यांनी डिक्टेशन द्यावयाचे व मी त्याचा ड्राफ्ट करून त्यांना द्यावयाचा व मग तो दुरुस्त करून पुन्हा ड्राफ्ट करून द्यायचे. याच्यातून या रोजगार हमी योजनेचा जन्म झाला असून पागे साहेबांनी मोठ्या कल्पकतेने ही योजना तयार केली आणि मग या योजनेचा मसुदा नागपूर अधिवेशनात एकमताने पास झाला. त्यावेळी संसदीय कामकाज बंद पाडण्याच्या दृष्टीने सर्व देशभर गडबड चालू होती पण महाराष्ट्रामध्ये त्या काळात एकमताने ही रोजगार हमी योजना पास झाली. आज सर्व देशाच्या दृष्टीने ही कौतुकाची योजना ठरत आहे. आज ही योजना महाराष्ट्रात जरी चालू असली तरी पुढेमागे देशाला देखील

या योजनेमधील धोरण स्वीकारावे लागेल इतकी ही आदर्शवत योजना झाली आहे. एखादा सबळ माणूस आहे पण केवळ काम नाही म्हणून लाचारीचे जीवन त्याला जगावे लागते. विशेषत: शेती व्यवसायावर काम नसणाऱ्यांना काम देणे हे या रोजगार हमी योजनेचे वैशिष्ट्य आहे.

ही योजना सुरू करून एक नवीन इतिहास श्री. पागे यांनी आपल्या देशासमोर ठेवला आहे. पागे साहेबांच्या या योजनेचे रूपांतर इंदिरा गांधी पंतप्रधान असताना १०० दिवस एका कुटुंबातील एका माणसाला काम देण्याच्या योजनेमध्ये झाले होते आणि त्याला मॅचिंग अशी ग्रँट केंद्र सरकार देत असते. त्यानंतर आता एन. आर. इ. पी. आर. एल. जी. पी. अशा योजना देशामध्ये सुरू झाल्या. त्यांनी सांगितले आणि मी लिहून घेतले आणि टॅग केले. रोजगार हमीची योजना आता महाराष्ट्रापुरती राहिलेली नाही तर संपूर्ण देशात तिचे अनुकरण सुरू झालेले आहे. भारतीय घटनेच्या प्रिअॅबलमध्ये राईट टू वर्क असा जो विचार आहे तो कसा प्राप्त करून देता येईल याचाही विचार सुरू आहे. डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलमध्ये ते आहे आणि या योजनेची संकल्पना १९७२ सालीच पागे साहेबांच्या मनात होती. ते म्हणत की, असा एक दिवस येईल की, आपल्याला हा जो माणूस आहे त्याला, मागेल ते काम द्यावे लागेल. आज गरीब माणसे पागे साहेबांना जरूर दुवा देत असतील. ते एक उत्तम संसदपटू होते. व्यासपीठावरून अनेक सभा त्यांनी गाजविल्या आहेत. तसेच अनेक कमिट्यांना त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. अष्टपैलुत्व त्यांच्या ठिकाणी होते. रोजगार हमी योजना म्हणजे गरिबांकरिता त्यांनी केलेले एक पुण्यकर्म आहे. तेव्हा हा देश त्यांचे ऋण कधीही विसरणार नाही.

माझ्या व्यक्तिगत जडणघडणीमध्ये जो बदल घडून आला आहे त्यामध्ये त्यांच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर फार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. मी १९६४ साली प्रथम या सभागृहामध्ये आमदार म्हणून आलो आणि पहिल्याच दिवशी पंडित जवाहरलाल नेहरू यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचे भाषण केले. त्यावेळी मध्यंतराच्या काळात मला पागे साहेबांनी बोलावले आणि भाषण छान केलेस असे सांगितले आणि काही आवश्यकता असेल तर मला भेटत जावे असे सांगितले. त्यानंतर १९६८ साली मी उप सभापती झालो. १९६२ ते १९७८ पर्यंत आम्ही दोघांनी मिळून काम केले. ते चेअरमन म्हणून आणि मी डेप्युटी चेअरमन म्हणून. त्याचवेळी अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. अनुसूचित जाती, जमातींचे प्रश्न होते. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीसारखेसुद्धा मी काम केलेले आहे आणि म्हणून पागे साहेबांच्या विचारांचा व्यासंग माझ्यामध्ये येणे हे व्यक्तिगत ऋण आहे. त्यांनी सुरू केलेली रोजगार हमी योजना हे गरिबांच्या दृष्टीने आणि माझ्या व्यक्तिगत जडणघडणीत झालेला बदल हे त्यांचेच ऋण आहे. ते मी यानिमित्ताने व्यक्त करतो आणि या ठिकाणी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

राजाराम बापू पाटील

सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी दिवंगत खासदार श्री. जतीरामजी बर्वे आणि कालपर्यंत या सभागृहातील आदरणीय सदस्य श्री. राजाराम बापू पाटील यांच्या दु: खद निधनाबद्दल ज्या दु:खद वेदना या ठिकाणी व्यक्त केल्या त्यांच्याशी मी सहमत आहे.

श्री. जतीरामजी बर्वे हे एका उपेक्षित समाजाचे होते. त्यांनी मोजकेच शिक्षण घेतलेले असले तरी त्यांच्याजवळ अत्यंत दांडगी सदसद्विवेकबुद्धी होती आणि त्यामधून त्यांनी उपेक्षित समाजाचे जीवनभर कार्य केले होते. ते निगर्वी आणि जनतेमध्ये मिसळणारे कुशल संघटक होते.

श्री. जतीराम बर्वे यांच्या दुःखद निधनबद्दल बोलत असताना असे शब्द उचित ठरतील की, "एका सोज्वळ व्यक्तीच्या निधनामुळे त्यांचे नेतृत्व ज्या उपेक्षित समाजाने स्वीकारले आहे त्यांचा कधीही भरून न येणारा तोटा झाला आहे." मी माझ्या पक्षातर्फे अत्यंत विनम्र भावनेने या ठिकाणी श्रद्धांजली अर्पण करतो.

श्री. राजाराम बापू पाटील हे निघून गेलेले आहेत असे वाटत नाही. त्यांची उंच व धिप्पाड मूर्ती, प्रसन्न चेहरा व उत्तम पोशाख तसेच या सभागृहामध्ये त्यांनी वठविलेली भूमिका याचा चित्रपट डोळ्यासमोर आला तर श्री. राजाराम बापू पाटील आमच्यातून निघून गेले आहे असे आम्हाला वाटत नाही. ती कल्पनाच असह्य वाटते. स्वातंत्र्य लढ्यातील एक सेनानी आणि स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांनी आपले शिर हातावर घेऊन इंग्रजांशी टक्कर दिली होती. पूर्वीचा सातारा जिल्हा आणि आजचा सातारा, सांगली जिल्ह्याचा उल्लेख इतिहासापासून पुसून टाकता येणार नाही. क्रांतीसिह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रति सरकार निर्माण करून एक नवीन दरारा इंग्रजांच्या राजवटीत त्यांनी निर्माण केला होता. आताचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. वसंतदादा पाटील, कै. राजाराम बापू पाटील, श्री. बापूसाहेब लाड अशा अनेक मंडळींनी जवळजवळ प्रति सरकार निर्माण केले होते आणि महाराष्ट्रामध्ये ते पत्री सरकार म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी त्यावेळी पॅरलल सरकार निर्माण केले होते. इंग्रज सरकारला नेस्तनाबूत करून स्वातंत्र्य नंतर मिळाले परंतु या मंडळीनी आपले सरकार आधीच प्रस्थापित केले होते. हे करीत असताना या व्यक्तींना ज्या वेदना झाल्या त्या सर्वांच्या नावाचा उल्लेख करण्याचे मी टाळले. पण त्या काळात श्री. राजाराम बापू पाटील यांनी अविस्मरणीय व देशाच्या दृष्टीने फार मोठे काम केले आहे. राजकीय जीवनात चढउतार येत असतात. कोणत्याही व्यक्तीचे स्थिर जीवन असू शकत नाही. जीवनामध्ये चढउतार येत असतात मग ते राजकीय चढउतार असोत किंवा इतर चढउतार असोत. अशा प्रकारचे चढउतार श्री. राजाराम बापू पाटील यांच्या जीवनामध्ये आलेले आहेत. ते अगोदर मंत्री होते आणि दुसऱ्या दिवशी आमदार झाले. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर किंचितही दुःख दिसून आले नाही. मंत्रिपद गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी विधानसभेचे सदस्य असताना संसदीय आयुधांचा अभ्यास करून त्यांचा योग्य वापर ते करीत असत. ते या पवित्र सभागृहाचे सभासद होते. या सभागृहात काही वेळा आक्रमक भूमिका घेऊन सभागृहाची बैठक संपल्यानंतर चेहऱ्यावर हास्य प्रगट होत असे. अशा प्रकारचे विलोभनीय नेतृत्व कै. राजाराम बापू पाटील यांच्या निधनातून आता आमच्यातून संपलेले आहे. इगो आणि सेल्फ-रिस्पेक्ट या दोन्हीमध्ये फरक आहे. वृथा अभिमान नेहमीच वाईट. परंतु सेल्फ-रिस्पेक्ट नेहमीच चांगला आहे. वेळप्रसंगी राजकारणात किंवा स्वाभिमानी वृत्तीला डच्चू दिला तेव्हा कोणालाही न विचारता त्यांनी आपला पक्ष बदलला. ते दिवसभर सभागृहात होते आणि त्यांनी सायंकाळी आपला पक्ष बदलला. त्यांनी पक्ष बदलला हा भाग वेगळा. आऊट ऑफ इगो नव्हे तर आऊट ऑफ सेल्फ-रिस्पेक्टने, स्वाभिमानाने आपली अस्मिता कायम ठेवून ते राजकारणात तेवढ्याच दिमाखाने वावरले. त्यांच्याप्रमाणे वागणे मला वाटते राजकारणी माणसासाठी आदर्श आहे. श्री. राजाराम बापू पाटील आमच्यामध्ये आज नाहीत. त्यांना केवळ जनता पक्षापुरतेच मर्यादित करणे हे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. लोकशाहीमध्ये सत्तारूढ पक्षाची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच आवश्यकता विरोधी पक्षाची आहे. सत्तारूढ पक्षात काम करीत असताना सतत काम करणे आणि काही चुकले तर पुन्हा चुकणार नाही असा दरारा निर्माण करणे हे लोकशाहीतील एका अंगाचे लक्षण आहे. विरोधी पक्षाकरता ते कार्य अत्यंत हिमतीने, इमानदारीने, प्रामाणिकपणे कै. श्री. राजाराम बापू पाटील यांनी जीवनभर

केलेले आहे. त्यांच्या निधनामुळे केवळ जनता पक्षाचेच नव्हे तर राज्यातील सर्व विरोधी पक्षाचे म्हणजे माझ्या पक्षाचे, भारतीय जनता पक्षाचे, शेतकरी कामकरी पक्षाचे नुकसान झालेले आहे. श्री. राजाराम बापू पाटील यांच्या पोक्त नेतृत्वाच्या अभावाने सर्वच पक्षांचा फार मोठा तोटा झालेला आहे. याची मला व्यक्तिगत जाणीव आहे. कधीही भरून न येणारे नुकसान झालेले आहे. अष्टपैलू अशा प्रकारचे नेतृत्व आमच्यातून जाणे ही कल्पनाच असह्य होते. त्यावर एकच उपाय आहे की त्याकाळी त्यांनी प्रस्थापित केलेला जो आदर्श आहे तो आम्ही समोर ठेवू. मी अत्यंत अंत:करणपूर्वक त्यांना आपली श्रद्धांजली अर्पण करतो.

क्रांतीसिंह नाना पाटील

अध्यक्ष महाराज, क्रांतीसिंह नाना पाटील यांना सभागृहाच्या नेत्यांनी जी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आणि येथे ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत असून येथे जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्याला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात समर्पित जीवन जगलेले अनेक लोक असतील परंतु नंतर त्यांच्या जीवनात फरक पडलेला आपल्याला दिसून येईल. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरही पूर्णपणे समर्पित जीवन जगलेली अशी ती एक महान व्यक्ती होऊन गेली. क्रांतीसिंह नाना पाटील हे खऱ्या अर्थाने शेवटपर्यंत समर्पित जीवन जगलेले आहेत असे आपल्याला दिसून येईल. सहा महिन्यांपूर्वीच मी स्वत: मिरजेला दवाखान्यात जाऊन त्यांना भेटून आलो. ते अतिशय थकलेले होते. त्यांना अनेक त्रास होते तरी त्यांचा आवाज त्याही स्थितीत अगदी खणखणीत होता. त्यांची कडक प्रज्ञा आणि खणखणीत आवाज आजच्या तरुणांना सतत प्रेरणा देत राहील याविषयी मला संदेह वाटत नाही. त्यांचे संपूर्ण जीवन अत्यंत स्फूर्तिदायक असे राहिलेले आहे. त्यांचा एकंदर लोकसभेतील सदस्यत्वाचा काळ वगळला तर त्यांचे जीवन आंदोलनाने भरलेले आहे असे दिसेल. क्रांतीसिंह नाना पाटील केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर सर्व भारताला भूषणावह झालेले आहेत. त्यांच्या जीवनापासून हजारो तरुणांना स्फूर्ती मिळालेली आहे. त्यांची भाषा अत्यंत ओघवती, प्रभावी अशी होती. अशा या नेत्याला माझी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करून मी आपले भाषण पूर्ण करतो.

राज्यपाल अलीयावर जंग

संपूर्ण जीवनामध्ये राष्ट्राच्या नेतृत्वाचा वाटा मरहूम श्री. अलीयावर जंग यांनी उचलला होता आणि त्यामुळे एक समर्पित जीवनाचा आदर्श त्यांच्या निधनाने आज नाहीसा झाला आहे. त्यांच्या निधनाने आपल्या महाराष्ट्राचेच नव्हे तर सर्व भारताचे अपरिमित असे नुकसान झालेले आहे. त्यांच्या निधनाबद्दल सर्वांनाच हळहळ वाटणे अगदी स्वाभाविकच आहे. या देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्या अंत्यविधीच्या वेळी, जातीने उपस्थित होत्या इतकेच नव्हे तर त्यांनी त्यानंतरच्या सर्व गोष्टीकडे जातीने लक्ष दिले आहे यावरून श्री. अलीयावर जंग यांच्यासंबंधी त्यांच्या भावना किती आदराच्या होत्या हेच दिसून येते. अत्यंत व्यासंगी आणि ज्याचे व्यक्तिमत्त्व हे हिमालयासारखे महान होते असा एक थोर माणूस आज आपल्यातून गेलेला आहे. एक महान व प्रभावी व्यक्तिमत्व आपल्यातून लोप पावलेले आहे, यासंबंधी कोणालाही अतीव दु:ख होणे अगदी स्वाभाविक आहे. त्यांचे आणि माझे व्यक्तिगत स्वरूपाचेही संबंध आलेले आहेत. त्यांना मी भेटायला गेलो असताना ते नेहमी म्हणत असत, "अरे गवई, तुम सरकार को कितनी तकलीफ दे रहे हो।" इतकेच नव्हे तर मिसेस गवई जर कधी त्यांना भेटल्या तर ते म्हणायचे की, "गवई जर असे काही करू लागला तर तू त्याला वेसण घालून अडवून ठेवले पाहिजे" यावरून ते सर्वांवर

एचबी ११८०—३७

वडीलकीच्या नात्याने किती प्रेम करीत असत हे दिसून येते. ते शेवटपर्यंत अत्यंत समर्पित असे जीवन जगलेले आहेत. मला एक प्रसंग आठवतो. बांगला देशाचे आणि आपले युद्ध चालू असताना त्या ठिकाणाहून आपल्या देशात जे निर्वासित आले होते त्यांच्यासाठी अमरावतीजवळ रायपूर येथे एक कॅम्प सुरू करण्यात आला होता. त्या निर्वासितांना मदत करण्यासाठी म्हणून त्यांना आवश्यक ते कपडे आणि भांडीकुंडी उपलब्ध करून देण्यासाठी निधी किंवा सामान वगैरे जमविण्यासाठी म्हणून ही जबाबदारी मी घ्यावी यासाठी त्यांनी मला बोलाविले होते. आपली आज्ञा असेल तर हे काम करण्यास मी आनंदाने तयार आहे असे मी त्यांना सांगितले. मी जर यासाठी एक लाख रुपये जमा करून दिले तर अमरावतीला स्वतः येण्याचे त्यांनी मान्य केले. त्यानंतर मी तेथे पाच लाख रुपयांचे सामान गोळा केले. परंतु त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांना अमरावतीला जातीने येता आले नाही ही गोष्ट वेगळी. ते आपले काम अतिशय तन्मयतेने करीत असत. समाजाकडे पाहण्याचा त्यांचा अत्यंत उदारमतवादी असा दृष्टिकोन नेहमी राहिलेला आहे. त्यांच्या निधनाने या देशाची कधीही भरून न येणारी अशी हानी झालेली आहे. या ठिकाणी या सभागृहाच्या नेत्यांनी त्यांच्यासंबंधी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे.

भाऊसाहेब बांदोडकर

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री. मनोहर जोशी यांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे अवघ्या सोळा दिवसांपूर्वी मुंबईच्या विमानतळावर श्री. बांदोडकर व आमची गाठ पडली होती. महाराष्ट्राच्या जनतेचे मित्र या नात्याने आम्ही सर्व त्यांच्याकडे पाहत होतो त्या भावनेतून मागे बेळगावच्या मराठी जनतेवर जो अमानुष अत्याचार झाला होता त्याबद्दल काय करावे यासंबंधी सल्ला विचारण्याकरिता आम्ही त्यांना भेटलो होतो. त्यांनी सांगितले होते की, मराठी माणूस मग तो गोव्याचा असो की वेंगुर्ल्याचा असो त्याच्याकरिता आपण काहीतरी केलेच पाहिजे. त्यांनी आपले मत सांगितले की, मलाही उत्कटतेने वाटते की बेळगावच्या लोकांकरिता काहीतरी केले पाहिजे. सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांनी सांगितल्याप्रमाणे बांदोडकरांच्या निधनाने गोव्यातील महाराष्ट्रीयन लोकांची कधीही भरून न येणारी हानी झालेली आहे. गोव्यातील राजकीय व्यवस्था आज जी आहे ती मराठी माणसाच्या दृष्टीने स्थिर आहे असे मानण्याचे कारण नाही परंतु तेथील मराठी माणसाला बांदोडकरांच्या रूपाने फार मोठा दिलासा होता. मराठी बोली आपली आहे. मराठी माणूस आपला आहे व त्याला सर्व दृष्टीने मदत करणे आपले कर्तव्य आहे असे त्यांना सारखे वाटत होते. त्यांनी गोव्याच्या शैक्षणिक, धार्मिक, सार्वजनिक इत्यादी विविध क्षेत्रात मोलाची मदत केली आहे ही गोष्ट कोणीही गोवेकरी नाकारू शकणार नाही. आज त्यांच्या निधनाने गोव्याची जनता पोरकी झालेली आहे व ठिकठिकाणी मराठी जनतेचे प्रश्न उपेक्षिले जात असताना त्यांच्या निधनाने मराठी जनतेची कधीही न भरून येणारी हानी झालेली आहे. ते कर्तबगार होते. कर्तृत्ववान होते. लढाऊ वृत्तीचे होते. कुशल शासक होतेच परंतु ते नेहमी प्रसन्न वृत्तीने राहणारे होते. आपण केव्हाही त्यांच्याकडे गेलात तर मग आपण कोणी इतर क्षेत्रात काम करणारे असा किंवा तो कोणी अधिकारी असो त्याचे स्वागत नेहमी प्रसन्न वृत्तीने आणि प्रसन्न चेहऱ्याने होत असे. त्यांची जेव्हा-जेव्हा भेट होई तेव्हा-तेव्हा ते महाराष्ट्रातील सर्व बाबींची आपुलकीने आणि जिज्ञासेने विचारपूस करीत असत. खऱ्या अर्थाने मराठी माणसाचा मित्र गेला याबद्दल सर्वच मराठी जनता दुःखी आहे मीही माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे दुःख व्यक्त करून माझे भाषण संपवितो.

पं. बच्छराजजी व्यास

अध्यक्ष महाराज, या सन्माननीय सभागृहाचे चार सभासद स्थळेकर, भाऊरावजी शेंडे, वसंतराव देशमुख आणि बच्छराज व्यास यांच्या दु:खद निधनासंबंधी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. त्यांच्या निधनाने जी पोकळी निर्माण झालेली आहे ती या सभागृहालाच जाणवेल असे नाही तर त्यांनी ज्या ज्या क्षेत्रांत कार्य केले त्या-त्या सर्व क्षेत्रात ही पोकळी जाणवल्याशिवाय राहणार नाही. सार्वजनिक जीवनात त्यांची स्मृती सदैव डोळ्यासमोर राहील. या सभासदांच्यासंबंधी माननीय कृषीमंत्र्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी संपूर्णपणे सहमत आहे.

बच्छराजजी व्यास हे तर कालपरवापर्यंत होते. त्यांची आनंदी मूर्ती आताही आपल्या डोळ्यांसमोर येते. जेथे जेथे गंभीर वातावरण निर्माण झाले असेल तेथे जर व्यासजी गेले तर तेथे आनंदी वातावरण निर्माण होत असे. ऐनवेळी सभागृहात येऊन कोणत्याही प्रकारची पूर्वतयारी नसताना थोडा प्रश्न चाळून पाहून ते त्यातून मार्मिक प्रश्न विचारीत असत. समजा, ते वेळेवर सभागृहात येऊ शकले नाही व त्यांचा प्रश्न होऊन गेला असेल तर सभापतींना माझा प्रश्न राहिला आहे तो कृपया घ्यावा. अशी ते विनंती करीत असत. त्यांचे सर्वच घाईत असे. त्यांच्या मनात कोणत्याही प्रश्नाबद्दल लगन आणि तळमळ दिसून येत होती. त्यांच्यावर सोपविलेले कोणतेही कार्य संपूर्ण जबाबदारीने आणि तळमळीने त्यांनी पार पाडलेले आहे.

ते आपला मुद्दा जिद्दीने आणि हिरिरीने मांडत असत. समजा, एखाद्या मुद्यावर त्यांच्याशी कोणाचा खटका जरी उडाला तरी ते पर्वा करीत नसत, परंतु ती वेळ संपली की ते त्यांच्याशी खेळीमेळीने वागत असत. त्यांच्यातील हा गुण वाखाणण्याजोगा होता. ते या सभागृहाच्या कामकाजात इतका भाग घेत असत की, वेळेच्या बाबतीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. एकदा मी त्यांना म्हणालोही होतो की, व्यासजी, आपण आपल्याला रोज किती वेळ पाहिजे हे ठरवून घ्या आणि तेवढा वेळ आपण घेत जा, नंतर मात्र जास्त वेळ मागू नका. या सभागृहात कोणत्याही विषयावर चर्चा असो मग ते पुरवणी प्रश्न असोत किंवा इतर दुसरे विषय असोत, त्यांत व्यासजींचा भाग ठरलेलाच असावयाचा. त्यांनी या सभागृहाच्या कामकाजाशिवाय आपल्या पक्षाचे काम आणि इतर सार्वजनिक जीवनातील काम केलेले आहे. त्या गोष्टीची आपल्या सर्वांना माहिती आहेच. राजकारणात मतमतांतर असतातच परंतु ते ज्या क्षेत्रात गेले त्या क्षेत्रात अतिशय महत्त्वाचे काम केलेले आहे. त्यांच्या निधनामुळे या सभागृहात आणि समाजजीवनात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांची उणीव आपल्याला भासल्याशिवाय राहणार नाही. शेवटी या ठिकाणी कृषीमंत्र्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी संपूर्णपणे सहमत आहे.

श्री. दयाराम पटेल

अध्यक्ष महाराज, दिवंगत श्री. दयाराम नानू पटेल हे योगायोगाने माझे शाळकरी सहकारी होते. विशेषत: कॉलेज जीवनामध्ये त्यांचा व माझा जास्त संबंध आला आणि त्यांच्याबरोबर मी काम केलेले आहे. कॉलेज जीवनाच्या पूर्वीही त्यांनी सामाजिक कार्यामध्ये भाग घेतलेला होता. आदिवासी आणि उपेक्षित जमातींमध्ये जागृती निर्माण करण्याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल. अध्यक्ष महाराज, त्यांच्या प्रत्यक्ष सहवासात मला ज्या गोष्टी बघावयास मिळाल्या त्यावरून मी असे म्हणू शकतो की श्री. पटेल यांनी ह्या उपेक्षित जमातीचे नेतृत्व केले होते. राजकारणात प्रवेश करून १९६२ साली ते जिल्हा परिषदेत निवडून आले आणि त्या

एचबी ११८०—३७अ

क्षेत्रात पंचायत समितीचे सभापती म्हणून श्री. दयाराम पटेल यांनी पाच वर्षे काम केले. ट्रायबल एरियामध्ये प्रशासक म्हणून काम करणारांच्या याद्या होत्या त्यामध्ये उत्तम प्रशासक म्हणून श्री. दयाराम पटेल यांचे नाव नमूद केलेले आहे. धारणी आणि मेळघाट हे अमरावती भागातील विस्ताराचे तालुके असले तरी या संपूर्ण एरियामध्ये आणि लहान लहान गावामध्ये जे अप्रोच रोड्स आहेत, विहिरी आहेत आणि शेत जमिनीसंबंधी गेल्या ३-४ वर्षांत सुधारणा झालेल्या आहेत त्याचे श्रेय श्री. दयाराम पटेल यांनाच आहे. सुदैवाने शासनामध्ये एक मोठा शासनकर्ता म्हणून काम करण्यास त्यांना संधी मिळाली होती आणि अशा वेळी मुळावर घाव घालावा अशी स्थिती श्री. दयाराम पटेल यांच्या बाबतीत झाली. अध्यक्ष महाराज, मी अधिक न बोलता श्री. दयाराम पटेल यांना आदराची श्रद्धांजली वाहतो.

स्वा. से. श्रीमती सुभगाताई काशीकर

सभापती महोदय, कै. काशीकर ताईंच्या दुःखद निधनाबद्दल सभागृहाचे नेते मा. वसंतदादा पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे व ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. श्रीमती काशीकर ह्या एक धडाडीच्या स्वातंत्र्य सैनिक होत्या. त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. राजकीय चळवळीबरोबर सामाजिक क्षेत्रातही त्यांनी फार मोठी भरीव कामगिरी केली आहे. स्त्री मुक्ती आंदोलन, श्रमिकांचे आंदोलन, विशेषतः दारूबंदीचे काम यामध्ये त्यांनी पुढाकार घेतला. माननीय सदस्य श्री. लहाने यांनी म्हटल्याप्रमाणे त्या प्रसिद्धी पराङमुख असल्या तरी त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची जाणीव ही विदर्भाच्या जनतेला कायम राहणार आहे. त्यांच्या दुःखद निधनानिमित्ताने सभागृहाने ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांना दुजोरा देऊन मी माझे भाषण संपवितो.

देवराव पाटील चोंडीकर

अध्यक्ष महाराज, कै. देवराम पाटील चोंडीकर यांना विदर्भात चोंडीकर म्हणून सारे ओळखतात, मी या सभागृहाचा सदस्य असताना आणि उप सभापती असताना त्यांचा माझा अगदी जवळून संबंध आला. एक अत्यंत कष्टाळू, सज्जन, कमी शिकलेले असले तरी अनेक शैक्षणिक संस्था उभारणे, सहकारी चळवळीत अत्यंत सज्जन अशी व्यक्ती म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. अध्यक्ष महाराज, यवतमाळ जिल्ह्यात कै. वसंतराव नाईक यांचे जे अनेक सहकारी असतील त्यापैकी एक सज्जन सहकारी म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्याशी माझे अगदी वैयक्तिक असे संबंध होते. अगदी घरगुती संबंध आणि कौटुंबिक असेही संबंध होते. त्यामुळे असा कौटुंबिक संबंधातील माणूस गेला याचे दुःख आहे. या सभागृहाचे नेते, माननीय मुख्यमंत्री यांनी माननीय विरोधी पक्षनेता यांनी ज्या भावना येथे व्यक्त केल्या त्यांच्याशी मी सहमत आहे. मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

भोलासिंग नायक

अध्यक्ष महाराज, या सदनाचे माजी सदस्य कै. भोलासिंग विश्वनाथ नायक आणि कै. डॉ. रामदास कमल ऊर्फ काका यांना आदरांजली वाहण्यासाठी जो प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे मांडला आहे त्यास सहमती देण्यासाठी मी उभा आहे. केवळ विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात जुन्या पिढीतील कणखर, पोलादी असे स्वातंत्र्य सैनिक म्हणून कै. नायक यांचा उल्लेख करावा लागेल. अत्यंत स्वाभिमानी, ताठर, राष्ट्रीय प्रवृत्तीचे तेवढेच साधे, सचोटीचे जीवन ते शेवटपर्यंत जगले. दीर्घ जीवन जगताना माणूस अनेक कारणांनी वादग्रस्त ठरतात, त्यांच्या संबंधीचे निकष चुकीचे असावेत वा नसावेत. पण कै. नायक यांचे व्यक्तित्व इतके अपवादात्मक आहे की, ज्या पक्षाचे, ज्या नगराचे नेतृत्व त्यांनी केले. नागपूरसारख्या शहरात त्यांनी ज्या

पक्षाचे काम केले आहे वा करीत होते त्या त्यांच्या पक्षाचे त्यात आणखी गट होते, शिवाय इतर राजकीय पक्ष, इतर समाज या सर्वांना अगदी जवळचा असा नेता म्हणून त्यांच्याकडे नागपुरातील नागरिक पाहत होते. सर्व जाती-धर्माच्या आणि सर्व थरातील उच्च, नीच लोकांशी त्यांचा असलेला संपर्क आणि त्यातही जीवनाची साधनशुचिता पाळून जो आदर्श त्यांनी निर्माण केलेला आहे तो त्यांच्या दु:खद निधनाने आपल्यातून आज नाहीसा झाला आहे. राष्ट्रीय प्रवृत्तीचा एक आदर्श नेता आपण गमावून बसलो आहोत. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना आदरांजली वाहतो.

❑❑❑

महाराष्ट्र विधिमंडळाची दादासाहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली..

दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई तीस वर्षे विधानपरिषदेत होते. विधानपरिषदेचे मा. सदस्य, उप सभापती, सभापती, विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी विधानपरिषदेच्या सभागृहावर आपली नाममुद्रा उमटविली. २८ जुलै, २०१५ रोजी महाराष्ट्र विधानसभेने आणि विधानपरिषदेने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

मा. सभापती, विधानपरिषद, मा. अध्यक्ष, विधानसभा, मा. मुख्यमंत्री, मा. विरोधी पक्षनेते, मा. मंत्री व मा. सदस्यांनी या संसदपटूच्या आणि लोकनेत्याच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू आपल्या भावपूर्ण भाषणातून उलगडून दाखवत आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या. दादासाहेबांच्या कार्याबद्दल विधानसभेत आणि विधानपरिषदेत मान्यवरांचे हे गौरवोद्‌गार...

महाराष्ट्र विधानसभेची भावपूर्ण श्रद्धांजली...

(२८ जुलै, २०१५)

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो.

"श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दुख:द निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

अध्यक्ष महोदय, श्री. रा. सू. गवई यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील दारापूर येथे दिनांक ३० ऑक्टोबर, १९२९ रोजी झाला होता. त्यांनी नागपूर विद्यापीठातून बी. ए. पदवी घेतली होती. त्यांची सन १९६४ मध्ये विधानपरिषदेच्या सदस्यपदी प्रथमच निवड झाली होती. त्यानंतर सलग सन १९९४ पर्यंत ते विधानपरिषदेचे सदस्य होते. त्यांनी सन १९६८ ते १९७८ या काळामध्ये विधानपरिषद उप सभापती, सन १९७८ ते १९८२ या कालावधीमध्ये सभापती व १९८६ ते सन १९८८ व सन १९९० ते सन १९९१ या कालावधीमध्ये विरोधी पक्ष नेते, ही पदे भूषविली होती. सन १९९८ मध्ये ते अमरावती मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले होते. सन २००० ते सन २००६ या कालावधीमध्ये त्यांनी राज्यसभेत प्रतिनिधित्व केले होते. त्यानंतर सन २००६ ते सन २००८ मध्ये बिहारच्या राज्यपालपदी तर सन २००८ ते २५ ऑगस्ट २०११ या कालावधीत केरळच्या राज्यपालपदी होते. तसेच, दिनांक १३ जुलै, २००६ ते १३ ऑगस्ट, २००६ या

कालावधीत त्यांनी सिक्कीमचे हंगामी राज्यपाल म्हणून काम पाहिले होते.

अध्यक्ष महोदय, श्री. रा. सू. गवई यांनी वंचित वर्गामध्ये शिक्षणाच्या प्रचारासाठी अमरावती येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. तसेच, त्यांनी दलित, मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी विशेष कार्य केले. पाली भाषा प्रचार समिती, राष्ट्रकुल संसदीय परिषद आदि उपक्रमांच्या माध्यमातून ते समाजामध्ये कार्यरत होते. रिपब्लिकन पक्षाच्या राजकीय कार्यामध्ये ते विद्यार्थी जीवनापासून सक्रिय होते. रिपब्लिकन पक्षामध्ये त्यांनी विदर्भ विभागाचे सचिव, पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीचे सदस्य व राष्ट्रीय अध्यक्ष, अशी पदे भूषविली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून त्यांनी तळागाळातील जनतेच्या विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

नागपूर येथील दीक्षाभूमीच्या उभारणीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. आज दीक्षाभूमी हे त्यांच्या समर्पितवृत्तीमुळे कोट्यवधी नागरिकांसाठी एक प्रेरणास्थान झाले आहे.

अध्यक्ष महोदय, शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा घडविण्याबरोबरच दलित समाजाच्या उद्धाराकरिता त्यांनी विशेष कार्य केले. मेलेली जनावरे माणसांनी वाहून नेण्याची कुप्रथा बंद करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. सन १९६४ मध्ये प्रादेशिक सत्याग्रहामध्ये त्यांनी भाग घेतल्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला होता. सन १९६४ मध्ये प्रादेशिक सत्याग्रहामध्ये त्यांनी भाग घेतल्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला होता. त्यांनी "Five-Years Plan in relation to the Scheduled Castes and Scheduled Tribes", "Scheudled Castes and Scheduled Tribes- Their Service Privileges", " बुद्धांच्या सवलती ", " संपूर्ण कैफियत ", आदि पुस्तकांचे लिखाण केले.

श्री. रा. सू. गवई हे अस्सल क्रीडाप्रेमी होते. वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोशिएशनचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. ते साहित्यप्रेमी होते. अमरावती येथे सन १९८९ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. दलित, शोषित समाजाच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले कार्य अतिशय उल्लेखनीय होते.

अध्यक्ष महोदय, संसदीय प्रथा व परंपरेचे निष्ठेने पालन करण्याबाबत ते नेहमीच आग्रही होते. सक्रिय राजकारणात असताना त्यापलीकडे जाऊन त्यांनी उदारमतवाद जोपासला. त्यामुळे राजकीय वर्तुळात अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जात होते. राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्व पक्षांच्या नेत्यामध्ये त्यांच्याबद्दल खूप आदर होता, तसेच सर्वांशी त्यांचे पारिवारिक संबंध होते. माझ्या वडिलांशी त्यांची फार जवळची मैत्री होती. त्यामुळे मी लहानपणापासून श्री. दादासाहेब गवई यांनी अतिशय जवळून पाहिले आहे. माझ्यावर त्यांचे नि:स्सीम प्रेम होते. त्यांच्या आजारपणाच्या कालावधीत मी दोन वेळा त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो. पहिल्यांदा ज्यावेळी मी त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो त्यावेळी ते बोलू शकत होते. त्यावेळी त्यांनी माझ्या जवळ समाजाबद्दल व महाराष्ट्राला पुढे घेऊन जाण्याबाबत चिंता व्यक्त केली होती. दुसऱ्यांदा ज्यावेळी मी त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो त्यावेळी ते दुर्दैवाने व्हेंटिलेटरवर होते म्हणून ते बोलू शकले नाही. परंतु त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर त्यांनी एक कृतार्थ जीवन जगल्याचे व जीवनामध्ये लोकांच्याकरिता जन्मभर केलेल्या कार्याच्या कर्तव्यपूर्तीचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

अध्यक्ष महोदय, आज दीक्षाभूमी जागतिक दर्जाची झाली. पण दीक्षाभूमी शून्यातून उभारण्याचे काम श्री. दादासाहेब गवई यांनी केले आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सुरू केलेले महाविद्यालय हे नागपूरमधील नावाजलेले महाविद्यालय आहे. नागपूर येथील पहिल्या

दोन-तीन महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी त्याला पसंती देतात, त्यामध्ये या महाविद्यालयाचा क्रमांक लागतो. हे महाविद्यालय दर्जेदार राहण्यासाठी त्यांनी प्रत्येक वेळी गुणवत्तेवर भर दिला.

अध्यक्ष महोदय, श्री. रा. सू. गवई हे त्यांच्या कार्यामुळे सर्व समाजामध्ये अतिशय लोकप्रिय झाले होते. आज राज्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वास सर्व विचारांच्या पलीकडे जाऊन सन्मान होता, त्यांना एक प्रकारचे महत्त्व होते, त्यांच्याकडे आदराने व मार्गदर्शक म्हणून पाहिले जात होते, असे श्री. दादासाहेब गवई आपल्यामधून निघून गेले आहेत. त्यामुळे आंबेडकर चळवळीची नव्हे तर महाराष्ट्राची व देशाची खूप मोठी हानी झाली आहे. या भूमितील एक सुपुत्र आपल्यामधून निघून गेला आहे. आंबेडकरी चळवळीची धुरा सांभाळताना संघर्षासोबत समन्वयवादी भूमिकेतून त्यांनी नेहमीच सामाजिक सलोखा जपला. श्री. रा. सू. गवई यांचे शनिवार, दिनांक २५ जुलै, २०१५ रोजी दुःखद निधन झाले, अशा या ज्येष्ठ नेत्याला मी सभागृहाच्या वतीने व वैयक्तिकदृष्ट्या श्रद्धांजली अर्पित करतो.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा) : अध्यक्ष महोदय, आमचे ज्येष्ठ नेते व माजी सभापती माननीय श्री. रा. सू. गवई ऊर्फ दादासाहेब यांच्या दुःखद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

रा. सू. गवई ऊर्फ दादासाहेब यांचे नागपूर येथे दुःखद निधन झाले. मागील काही काळापासून ते आजारी होते. दादासाहेबांचे व्यक्तिमत्त्व चळवळीतून तयार झाले. १९५५ मध्ये महाविद्यालयीन निवडणुकीतून त्यांनी आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखविली. त्यांनी आपल्या बुद्धिकौशल्याने व्यासंगी अभ्यासातून स्वतःला घडविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी " शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ". असा संदेश दिला. दादासाहेबांनी स्वतःच्या कृतीतून त्या संदेशाचे अनुकरण केले. विचारांशी बांधिलकी, प्रश्नांची जाण आणि सदैव जनसामान्य, वंचित घटकांसाठी काम करण्याचा विचार त्यांनी बाळगल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. दादासाहेब पाच वेळा विधान परिषदेवर तसेच लोकसभा आणि राज्यसभेवर निवडून आले होते. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती, उपसभापती आणि विरोधी पक्षनेता अशी विविध पदे त्यांनी भूषविली होती. विधानपरिषदेचे सभापती असताना त्यांनी लोकाभिमुख निर्णय प्रक्रिया होण्याचा सातत्याने आग्रह ठेवला. बाराव्या लोकसभा आणि राज्यसभेत प्रतिनिधित्त्व करताना त्यांच्या सामाजिक योगदानाचा अनुभव सर्वांना मिळाला.

अध्यक्ष महोदय, राजकीय, सामाजिक, चळवळीतील एक मार्गदर्शक म्हणून त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली. उत्तम वक्ता, लेखक आणि आंबेडकरी चळवळीबरोबरच पुरोगामी महाराष्ट्राच्या वाटचालीला प्रेरणा देणारा लेखक म्हणून स्वर्गीय रा. सू. गवई ऊर्फ दादासाहेब यांच्या माध्यमातून आपल्याला पहायला मिळाला. अस्पृश्यता आणि कुष्ठरोग निवारण कार्यात स्वतःला झोकून देत स्वर्गीय दादासाहेबांनी या संदर्भात केलेले प्रबोधन दिशादर्शक ठरल्यानेच या क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना अनेक प्रकारच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. दीक्षाभूमीचे शिल्पकार ते बिहार आणि केरळ राज्याचे राज्यपाल असा त्यांनी केलेला प्रवास हा सर्वांनाच प्रोत्साहन देणारा आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सध्याच्या वैचारिक गोंधळाच्या परिस्थितीत स्वर्गीय दादासाहेबांच्या विचारांची गरज असताना, त्यांचे जाणे हे पुरोगामी महाराष्ट्राच्या आंबेडकरी चळवळीला मोठा धक्का देणारे आहे. त्यांचे आणि माझे वैयक्तिक संबंध होते. विशेषतः माझ्या वडिलांचा आणि त्यांचा व्यक्तिगत स्नेह होता. लोकसभा किंवा विधानसभेच्या निवडणुकांच्या संदर्भात

अनेक वेळा ते प्रवरानगरला आले होते. मुंबईला देखील अनेकदा त्यांची भेट होण्याचा प्रसंग यायचा. मी अमरावती जिल्ह्याचा पालकमंत्री असताना अनेकदा त्यांच्या घरी जाण्याचा प्रसंग आला होता. मध्यंतरी बराच काळ ते आजारी होते. परंतु त्या काळात देखील जी काही चर्चा व्हायची ती कार्यकर्त्यांच्या आणि समाजाच्या बाबतीत असायची. व्यक्तिगत पातळीवर त्यांनी स्वत:साठी कधीच काही मागितले नव्हते. समाजाबद्दल, जिल्ह्याच्या विकासाबद्दल आणि उपेक्षितांबद्दल सरकारने कोणते धोरणात्मक निर्णय घेतले पाहिजेत, सरकारी योजनांमध्ये कोणकोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत, याबाबत त्यांच्याकडून सातत्याने आम्हाला सूचना मिळत होत्या. त्यांच्या दु:खद निधनामुळे आम्ही एका सामाजिक कार्यकर्त्याला मुकलो आहोत. मी काँग्रेस पक्षाच्या वतीने, विरोधी पक्षाच्या वतीने आणि व्यक्तिश: माझ्या वतीने त्यांच्या आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

श्री. अजित पवार (बारामती) : अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमधील जेष्ठ नेते उत्कृष्ट संसदपटू, बिहार व केरळ राज्याचे माजी राज्यपाल दादासाहेब ऊर्फ रा. सू. गवई यांचे २५ जुलै २०१५ रोजी नागपूर येथे दुखःद निधन झाले. नागपूर विद्यापीठातून त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले. ३० वर्षे प्रदीर्घ कालावधीत विधानपरिषदेत सदस्य म्हणून त्यांनी काम केले. विधानपरिषदेचे उप सभापती म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती पद भूषविले. विधानसभा व विधानपरिषद सभागृहात त्यांच्या पक्षाचा एकही सदस्य नसताना सर्व पक्षनेत्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्यामुळे, वैयक्तिक संबंध असल्यामुळे व मित्रत्वातून मिळालेल्या मतांचा आधार घेऊन ते विधानपरिषदेवर सतत निवडून येत होते. त्यांनी आपल्या कार्याने देशात नावलौकिक मिळवला. त्यांची कर्मभूमी नागपूर होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ते सच्चे अनुयायी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार तळागाळात रुजविण्यासाठी त्यांनी आपले अख्खे आयुष्य वेचले. ते फक्त मागासवर्गीयांचेच नेते नव्हते तर सर्वच जमातीतील लोकांशी त्यांचा अतिशय घनिष्ट परिचय होता. सर्वांनाच सारखीच मदत ते करायचे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर दलित बांधवाना ज्या बौद्ध धर्माची दीक्षा दिली त्या दीक्षाभूमीवर भव्य, दिव्य असे ऐतिहासिक स्मारक उभारण्याचे काम दादासाहेब गवई यांनी केले. राज्यात रोजगार हमी योजना सुरू करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक व विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती वि. स. पागे यांच्या सहकार्याने पायाभूत काम करून ही योजना त्यांनी यशस्वी करून दाखविली. रुग्णांसाठी बहुमूल्य मदत व सहाय्य केल्याबद्दल उत्कृष्ट मित्र अवॉर्ड व कुष्ठरुग्ण मित्र अवॉर्ड असे दोन अवॉर्ड त्यांना देण्यात आले. १९९०-१९९१ मध्ये समाजसेवेचे उल्लेखनीय कार्य तसेच अस्पृश्यता निर्मूलन या क्षेत्रात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल प्रियदर्शनी अवॉर्डही त्यांना देण्यात आला. रा. सू. गवई यांच्या निधनाने मागासवर्गीय तळागाळातील लोकांचा आधारवड निघून गेला आहे. त्यांना व्यक्तिश: माझ्या वतीने व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

श्री. ग. आ. देशमुख (सांगोला) : अध्यक्ष महोदय, माजी राज्यपाल श्री. रा. सू. गवई यांचे दिनांक २५ जुलै २०१५ दु:खद निधन झालेले आहे. विधानसभेमध्ये त्यांच्या पक्षाचा एकही सदस्य नसतांनाही सातत्याने पाच वेळा ते विधानपरिषदेमध्ये विधानसभेच्या सदस्यांनी मते दिल्यामुळे निवडून गेलेले आहेत. त्यांच्या ३० वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांनी विरोधी पक्षनेता, उप सभापती, सभापती, म्हणून प्रभावीपणे कामगिरी केलेली आहे. १९९८ मध्ये स्व. गवई हे खुल्या जागेवर लोकसभेमध्ये निवडून आले होते. सन २००० मध्ये ते राज्यसभेमध्ये निवडून आले होते. सिक्कीम, केरळ व बिहार या राज्यांचे राज्यपालपद त्यांनी भूषविले.

१९७२ मध्ये त्यांची रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. दलित चळवळीमध्ये त्यांनी विद्यार्थिदशेपासूनच भागीदारी केली होती. अमरावतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्थेची स्थापना करून श्री. रा. सू. गवई यांनी त्या जिल्ह्यामध्ये शिक्षण क्षेत्रात फार मोठी व मोलाची कामगिरी बजाविलेली आहे. १९७२ मध्ये नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याच्या कामांतर्गत असलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते. नागपूर येथे त्या समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे स्मारक उभे करण्याचे काम केलेले आहे.

अशा या थोर नेत्याचे निधन झाल्यामुळे देशाची व राज्याची मोठ्या प्रमाणावर हानी झालेली आहे. स्व. रा. सू. गवई यांच्या स्मृतीला अभिवादन करतो.

श्री. एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री) : अध्यक्ष महोदय, माननीय श्री. रा. सू. गवई यांच्या निधनामुळे केवळ दलित चळवळीचीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राची अपरिमित हानी झालेली आहे. महाराष्ट्र एका कुशल संघटक, अभ्यासू व पुरोगामी नेतृत्वास मुकलेला आहे. समाजातील वंचितांच्या उत्कर्षांसाठी त्यांनी केलेले कार्य हे प्रेरणादायी आहे. आंबेडकरी चळवळीत तर त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलीच, पण तब्बल ३० वर्षे त्यांनी विधानपरिषदेच्या माध्यमातून घटनात्मक व्यासपीठाच्या आधारे वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपले आयुष्य झिजविले. उप सभापती, तसेच १९७८ ते १९८२ अशी चार वर्षे सभापती राहिले होते. विरोधी पक्षनेता म्हणूनही त्यांनी सरकारला धारेवर धरण्याचे काम केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ते खरे अनुयायी होते. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला "शिका, संघटित व्हा, लढा" हा मंत्र त्यांनी खऱ्या अर्थाने आचरणात आणला होता. आपल्या मुलांना त्यांनी उच्च शिक्षण दिले. सर्व आंबेडकरी अनुयायांनी मतभेद विसरून एकत्र यावे यासाठी ते नेहमीच आग्रही असायचे. त्यासाठी त्यांनी अनेकदा प्रयत्नही केले.

नागपूरच्या दीक्षाभूमीला आजच देखणं रूप देण्यात त्यांचे फार मोठे योगदान होते. त्याचप्रमाणे संपूर्ण देशासाठी मार्गदर्शक ठरलेल्या महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेला आकार देण्यातही त्यांचा सिंहाचा वाटा होता. राष्ट्रीय एकता पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. माझ्या व माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

श्री. सय्यद इम्तियाज जलिल (औरंगाबाद मध्य) : अध्यक्ष महोदय, देश के लिए यह दुख की घड़ी है। श्री. रा. सू. गवई साहब, आज हमारे बीच नहीं रहे हैं, श्री. रा. सू. गवई साहब का शिक्षा के क्षेत्र में और दलित मुव्हमेंट में बहुत बड़ा काम रहा है। मैं इन्हें भी अपनी पार्टी की ओर से श्रद्धांजलि अर्पित करता हूं।

श्री. विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल हे आंबेडकर चळवळीचे नेते होते. आम्ही विद्यार्थी चळवळीत काम करीत असताना त्यांचा हुरहुन्नरी स्वभाव अनुभविला आहे. सभागृहाचे कामकाज अखंडपणे चालविण्याची त्यांची हातोटी आम्ही अनेक वेळा अनुभवलेली आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

प्रा. वीरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, ऊर्फ दादासाहेब हे आंबेडकर चळवळीचे नेते होते. त्यांचे परवा नागपूर येथे दु:खद निधन झालेले आहे. दादासाहेब हे अतिशय सर्वसामान्य कुटुंबातून आलेले आहेत. त्यांचे सर्व पक्षीय नेत्यांबरोबर अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. दादासाहेब हे समाजातील प्रत्येकांबरोबर प्रेमभावनेने वागत असत.

एचबी ११८०—३८

त्यांनी तळागाळातील माणसांसाठी नेहमीच तळमळीने काम केलेले आहे. तसेच त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी महत्त्वपूर्ण असे योगदान दिलेले आहे. याबद्दल त्यांना कुष्ठमित्र अवॉर्ड मिळालेला आहे. अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामात त्यांनी भरीव योगदान दिलेले आहे.

महाराष्ट्रातील जनता, महाराष्ट्र काँग्रेस कमिटी आणि अमरावती जिल्ह्यातील संपूर्ण जनतेच्या वतीने दादासाहेबांच्या आत्म्यास चिर:शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

श्री. हरिभाऊ बागडे (अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा) : श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शोकप्रस्ताव मांडलेला असून, त्यावर अनेक मान्यवरांनी आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. शोकप्रस्तावास पाठिंबा देण्यासाठी आणि माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

कै. रामकृष्ण सूर्यभान गवई यांचा जन्म दिनांक ३० ऑक्टोबर, १९२९ रोजी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील दारापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. पर्यंत झाले होते.

कै. गवई यांनी विद्यार्थिदशेपासूनच आंबेडकरी चळवळीत स्वत:ला झोकून दिले होते. त्यांनी अमरावती येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, वेस्टर्न इंडिया, फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष, नागपूर येथील पाली भाषा प्रचार समितीचे अध्यक्ष, सेंट्रल जनरल कौन्सिल ऑफ बौद्ध परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे व दीक्षाभूमी विकास समितीचे अध्यक्ष, १९८९ मध्ये अमरावती येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजना समिती, शेतमजूर किमान वेतन समिती, अस्पृश्यता निवारण मार्गदर्शक समिती, भारत सरकार जमीन सुधारणा समितीचे तसेच, महाराष्ट्र राज्य सहकार मंडळाचे सदस्य म्हणूनही उत्तम कार्य केले होते. देशातील अनुसूचित जाती व जमातीतील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांना सांविधानिक लाभ मिळावा यासाठी त्यांनी अतिशय महत्त्वाचे योगदान दिले होते. राज्यातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. गवई यांनी विदर्भ विभाग रिपब्लिकन पक्षाचे सेक्रेटरी, भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीचे सदस्य तसेच रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. उत्तम संघटक, उत्कृष्ट संसदपटू, कुशल व अभ्यासू लोकप्रतिनिधी व जनमानसातील लोकप्रिय नेते अशीच त्यांची प्रतिमा होती. त्यांनी लिहिलेली "फाईव्ह ईयर प्लॅनस इन रिलेशन टू द शेड्यूल कास्ट ॲण्ड शेड्यूल ट्राईब्ज्", "शेड्यूल कास्ट ॲण्ड शेड्यूल ट्राईब्ज् ॲण्ड देअर सर्व्हिस प्रिव्हिलेजेस", "नवबौद्धांच्या सवलती : संपूर्ण कैफियत", "डॉ. बाबासाहेब आंबेडकर डिझर्व्हड् द थँक्स ऑफ द कंट्री", "निमित्त राखीव जागांचे-रणकंदन वर्णवर्चस्वाचे", "कैफियत जनतेच्या न्यायालयात" ही पुस्तके खूपच गाजली होती. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले होते.

अशा आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक २५ जुलै २०१५ रोजी दु:खद निधन झाले. सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोकप्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

शोकप्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

❑❑❑

महाराष्ट्र विधानपरिषदेची भावपूर्ण श्रद्धांजली....

(२८ जुलै, २०१५)

श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेतही श्री. गवई यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनीच हा शोकप्रस्ताव मांडला होता. त्यावर बोलतांना धनंजय मुंडे म्हणाले...

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद) : सभापती महोदय, या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री यांनी कै. रामकृष्ण सूर्यभान गवई यांचा शोकप्रस्ताव मांडला. रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते, बिहार व केरळ राज्याचे माजी राज्यपाल, दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तसेच या सभागृहाचे सभापती, उप सभापती आणि विरोधी पक्षनेते अशा अनेक महत्त्वाच्या पदांची जबाबदारी ज्यांनी अत्यंत प्रभावीपणे, यशस्वीपणे सांभाळली, ते राज्याचे ज्येष्ठ नेते सन्माननीय श्री. रा. सू. म्हणजे रामकृष्ण सूर्यभान गवई यांच्या निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, राज्याच्या गेल्या ५० वर्षांच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत ज्यांचे महत्त्वाचे योगदान होते त्या मोजक्या नेत्यांमध्ये रा. सू. गवई साहेबांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीला नवी दिशा आणि गती देण्याचे काम त्यांनी केले. समाजात आजपर्यंत वंचित, उपेक्षित असलेल्या घटकांना, मागासवर्गीय बांधवांना मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर त्यांना चांगले शिक्षण, रोजगार-व्यवसायाच्या संधी मिळाल्या पाहिजेत, त्यांचा शैक्षणिक, सामाजिक आणि महत्त्वाचे म्हणजे आर्थिक विकास झाला पाहिजे, हा ध्यास घेऊन गवई साहेबांनी सातत्याने प्रयत्न केले.

सभापती महोदय, अगदी विद्यार्थिदशेपासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर त्यांची गाढ श्रद्धा होती. ती त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत जपली. त्यांचे संपूर्ण जीवन, राजकारण, समाजकारण हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारलेले होते. ते खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचे अनुयायी होते. रिपब्लिकन चळवळीतले नेते अशी त्यांची ओळख असली तरी ती ओळख अपूर्ण आहे, राज्याच्या पुरोगामी चळवळीचे अग्रणी नेते हीच त्यांची खरी ओळख आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, या देशाला डॉ. बाबासाहेबांनी दिलेली राज्यघटना आणि संसदीय लोकशाही परंपरा अधिक बळकट आणि समृद्ध करण्याचे काम सन्माननीय गवई साहेबांनी जीवनात केले. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी प्रदीर्घ काम केले. या कालावधीत त्यांनी सभागृहाच्या उच्च नैतिक मूल्यांची जपणूक केली. सभागृहाचा सन्मान एका उंचीवर नेऊन ठेवला.

सभापती महोदय, दिनांक २६ जुलै, १९९४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होईपर्यंत सलग ३० वर्षे त्यांनी विधानपरिषदेचे सदस्य म्हणून महत्त्वाचे योगदान दिले. १९६८ ते १९७८ या काळात विधानपरिषदेचे उपसभापती, १९७८ ते १९८२ या काळात विधानपरिषदेचे सभापती पद म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. दिनांक १२ डिसेंबर, १९८६ ते १९८८ या काळात विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडे आले.

सभापती महोदय, विधानपरिषदेत विविध जबाबदाऱ्या सांभाळत असताना सर्वसामान्य जनतेचे हित आणि राज्याचा सर्वांगीण विकास याला त्यांचे प्राधान्य राहिले. विधानपरिषदेतील त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांनी राज्यासमोरील अनेक समस्यांवर, अडचणींवर मात करण्याचा मार्ग दाखविला.

सभापती महोदय, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी माझ्यावर विधानपरिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी सोपविल्यानंतर मी आवर्जून काही माजी विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणांचे संदर्भ वाचले. त्यात गवई साहेबांच्या सभागृहातील भाषणांचा समावेश होता. ज्या विषयावर बोलायचे त्याबद्दलचे गवई साहेबांचे ज्ञान, त्यांनी केलेला अभ्यास, त्यांची विषय मांडण्याची हातोटी आणि विषय मांडून तो सोडून न देता, त्या विषयाला न्याय देण्याची त्यांची कळकळ असे अनेक गुण मला त्यांच्या भाषणातून शिकायला, अनुभवायला मिळाले, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

सभापती महोदय, खासदार म्हणून राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी सन्माननीय गवई साहेबांना मिळाली. या संधीचेही त्यांनी सोने केले. सन १९९८-१९९९ च्या लोकसभा निवडणुकीत अमरावती मतदारसंघातून ते विजयी झाले. एप्रिल, २००० मध्ये ते राज्यसभेवर निवडून आले. तेथेही त्यांनी आपल्या ज्ञानाचा, दूरदृष्टीचा प्रत्यय घडविला.

सभापती महोदय, बिहार आणि केरळ राज्याचे राज्यपाल म्हणून काम करताना त्यांनी त्या राज्यांच्या विकासाकडे लक्ष दिले. परंतु तिथे त्यांनी महाराष्ट्र राज्याबद्दल आस्था, प्रेम आणि आदराची भावना निर्माण करण्याचेही काम केले. त्यांच्या राज्यपालपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्र राज्याची प्रतिमा उंचाविण्याचाच त्यांचा प्रयत्न राहिला. त्यांच्या कारकिर्दीत तिथे गेलेल्या अनेक महाराष्ट्रीय माणसांनी त्यांचा स्नेह, आपुलकी आणि जवळीक अनुभवली आहे. आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्य, पत्रकार आणि सर्वसामान्य नागरिक याचे साक्षीदार आहेत.

सभापती महोदय, विधिमंडळातील आमदार, संसदेतील खासदार किंवा सामाजिक चळवळीतील अग्रणी नेते म्हणून सन्माननीय गवई साहेबांनी केलेल्या प्रत्येक कृतीत आणि घेतलेल्या प्रत्येक निर्णयात आपल्याला समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित घटकांना न्याय देण्याची, त्यांचा विकास साधण्याची भावना दिसते. गवई साहेबांच्या या कार्याबद्दल समाजानेही वेळोवेळी त्यांच्यावरील प्रेम व्यक्त करून कृतज्ञता दाखवून दिली आहे.

सभापती महोदय, गवई साहेबांमुळे शासनाच्या अनेक विकास योजनांना गती मिळाली. राज्यात रोजगार हमी योजना सुरू व्हावी यासाठी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती वि. स. पागे यांच्या सहकार्याने महत्त्वाचे काम केले. त्यातूनच राज्याच्या विकासाचा पाया मजबूत होण्यास मदत झाली.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात जबाबदारी पार पाडत असताना विधिमंडळाबाहेरही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. आपल्या सहकाऱ्यांच्या साथीने अनेक क्षेत्रात त्यांचे काम सुरू होते. शिक्षण, उद्योग, सहकार, क्रीडा क्षेत्रात त्यांनी फार मोठे काम केले. नागपूर येथील दीक्षाभूमीच्या उभारणीत त्यांचे प्रमुख योगदान होते.

सभापती महोदय, मला या ठिकाणी प्रामुख्याने सांगितले पाहिजे की, मुंबई दंगलीनंतर समाजात शांतता आणि कायदा व सुव्यवस्थेचे वातावरण निर्माण करण्याचे मोठे आव्हान होते. ही जबाबदारी माननीय राज्यपाल महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या राज्य शांतता समितीवर सोपविण्यात आली होती. या समितीचे सदस्य म्हणून गवई साहेबांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

महोदय, रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, नागपूर-दीक्षाभूमीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, अमरावतीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, वेस्टर्न इंडिया फुटबॉल

असोसिएशनचे अध्यक्ष, अशा अनेक संस्था-संघटनांच्या माध्यमातून त्यांनी सर्व क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. मागासवर्गीय, अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या अनेक संस्था, संघटना आणि समित्यांवर त्यांनी काम केले. त्याचा उपयोग त्यांनी समाज परिवर्तनाच्या कार्यासाठी करून घेतला. आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजातील प्रत्येक घटकाला चांगले जीवन जगता यावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेच्या आधारावर समाजातील प्रत्येक उपेक्षित माणूस ताठ मानेने जगला पाहिजे, ताठ मानेने त्याने देशाचा एक नागरिक म्हणून पुढे आले पाहिजे, हीच भावना सन्माननीय गवई साहेबांच्या कामामध्ये आपल्याला दिसून येते. मी विधानपरिषदेचा विरोधी पक्षनेता या नात्याने विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने माझ्या परिवाराच्या वतीने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, या सदनाचे माजी सभापती यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावाला माननीय विरोधी पक्षनेत्यांनी समर्थन दिले आहे. सदरहू शोकप्रस्तावावर मी माझ्या भावना मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. दादासाहेब गवई हे सर्वांच्याच परिचयाचे आहेत. ते विधानपरिषदेचे सभापती होते. आपण शालेय जीवनात होतो. ते सन १९६४ ते सन १९९३ या कालावधीमध्ये या सदनाचे सदस्य होते. तसेच लोकसभा व राज्यसभा येथेही सदस्य होते. ते माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दीक्षा दिनाचे साक्षीदार होते. जीवनात त्यांनी काय उभे केले, पक्ष उभा केला का, संघटना उभी केली का, दलित चळवळ उभी केली का? त्यांनी तेवढेच नव्हे तर दलित जेथे नतमस्तक होतात, करोडो लोकांसाठी पूजनीय असे एक स्थान उभे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना जबाबदारी दिली ती पार पाडून, चिरंतन असे वेगळे कायमचे धम्मचक्र निर्माण केले. दादासाहेबांशी माझा जवळचा संबंध होता. सामाजिक अन्यायाची घटना घडली की मला तिडीक येते. सामाजिक अन्यायाच्या घटनेच्या संदर्भातील तिडीक समर्थपणे व्यक्त झाली पाहिजे असे माझे जडणघडण झाले आहे. माझा व्यक्तिगत चिडखोर स्वभाव नाही. मात्र सामाजिक अन्याय झाला तर मला खूप चीड येते. मला आठवते की, भंडारा येथे एका दलित महिलेची नग्न धिंड काढण्यात आली होती. मला त्याची चीड येते. मी सभागृहात होतो. मी त्या संदर्भात भाषण देखील केले आहे. मला आठवते आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरांना देखील हे माहीत आहे. तेही त्या गावात गेले होते आणि मीही गेलो होतो. खैरलांजी नव्हे जालनामध्येही घडले. मी सगळीकडे जातो. प्रसिद्धी व्हावी असे कधी मी केले नाही. हे नेतागिरीचे काम नाही. सामाजिक काम असते. उद्ध्वस्त जीवनाला सांत्वनाचे सामर्थ्य देणारे काम असते. त्यावेळी भंडाऱ्यामध्ये किळसवाणी घटना घडली होती. मला आठवते की, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरही तेथे गेले होते. मी पश्चिम विदर्भामध्ये त्या तिडीकीतून पक्षाचे काम करीत होतो. मी महिलांच्या अत्याचाराच्या संदर्भात महिलांचा मोर्चा जाहीर केला होता. मी हा मोर्चा का काढत आहे या संदर्भात मोर्चाच्या अगोदर पुस्तिका काढली होती आणि त्यामध्ये रेखाचित्र काढतात तसे रेखांकन होते. आम्ही सहन का करावे? त्यामध्ये महिलेची नग्न धिंड, महिलेचे चित्र काही नाही. मी अकोल्याला असताना मला दादासाहेबांच्या कार्यकर्त्याने फोन केला आणि दम दिला. तुम्ही आमच्या महिलेच्या धिंडीचे फोटो चित्रीकरण केले, अमुक केले, तमुक केले, मोर्चा होऊ देणार नाही असे म्हणाला. मी कशासाठी मोर्चा काढत आहे आणि हे काय करीत आहेत याचे मला वाईट वाटले. मी ते केले नाही. मी रात्री दादासाहेबांना फोन केला आणि सांगितले की, दादासाहेब असे झाले आहे, तुमचा

(शा.म.मु.) एचबी ११८०—३९ (२,०००—४-२०१७)

कार्यकर्ता होता. ते मला म्हणाले की, मी तुला एक गोष्ट सांगतो की, तुझ्या भावना कितीही चांगल्या असल्या आणि ते मला जाणवत असले तरीही पण तू ते करू नको. मी ती पुस्तिका रातोरात मागे घेतली. माझ्या शिवसैनिक कार्यकर्त्यांनी पोस्टर्स काढून टाकली. दुसऱ्या दिवशी एक लाखांच्या वर महिलांचा मोर्चा निघाला होता आणि आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी त्याचे नेतृत्व केले होते. भंडाऱ्यामध्ये एका महिलेवर झालेला अत्याचार होता. अन्यायग्रस्त महिलांच्या संदर्भातील विशाल मोर्चा त्यावेळी अमरावतीमध्ये निघाला, त्यानंतर एवढा मोठा मोर्चा निघाला नाही. ही सामाजिक जाणिवेतील चीड होती. मला संध्याकाळी त्यांचा फोन आला. मोर्चा इतका प्रचंड, भव्य होता की, तो कोणालाही अपेक्षित नव्हता. मोर्चात लाखांच्या वर महिला होत्या. मला ते म्हणाले की, आज दलितांसाठी लढणारा दलित नसलेला तुझ्यासारखा नेता आहे. मी लढत नाही. समाजातील या घटनेच्या तीव्र भावना माझ्या नेतृत्वाने घडविल्या आहेत आणि त्यांच्या तुम्ही परिचयाचे आहात. तुम्ही सर्व समकालीन मंडळी आहात. समाज असा असावा असे म्हणणारे ते दादासाहेब मी पाहिले आहेत.

आमची एक समिती केरळला गेली होती, विधानमंडळ सचिवालयाचे उप सचिव श्री. आठवलेंनी धावत-पळत माननीय राज्यपालांची भेट ठरवली आणि त्या दिवशी माननीय राज्यपालांकडे नेले. मला कळेना, माझ्या लक्षात आले नाही की, तेथे दादासाहेब आहेत. जवळजवळ १ तास आमच्या समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांबरोबर महाराष्ट्रातील विविध भागातील माहिती घेत दादासाहेबांनी आम्हाला चहापान केले. न हसणारे दादासाहेब कोणी पाहिले आहेत का हा प्रश्न विचारला तर असा कोणीही सापडणार नाही. त्यांचा कायम हसरा, प्रसन्न चेहरा होता, त्यांच्याकडे बघितल्यानंतर टेंशन निघून जावे असे ते आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होते. आपल्यातून ते निघून गेले आहेत. मी माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वतीने माझ्या कुटुंबीयांच्या वतीने आणि सभागृहातील माझ्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने या थोर व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व माजी राज्यपाल म्हणजेच दादासाहेब गवई यांच्या निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव मांडला आहे, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुद्धा त्या संदर्भात भावना व्यक्त केल्या आहेत. मी देखील त्या संदर्भात माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता येथे उभा आहे.

माननीय रा. सू. गवई यांना आम्ही लहानपणापासून पाहत आलो आहोत, त्यांची अनेक व्याख्याने आम्ही ऐकली आहेत व त्यांचे सदनातील कामही बघितले आहे. सभापती म्हणून त्यांची काम करण्याची पद्धत आम्ही पाहिली आहे. एखाद्या विषयात सामाजिक बॅलन्स ठेवणारे आणि मार्ग काढणारे नेतृत्व या राज्याला दादासाहेबांच्या रूपाने मिळाले होते.

ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचे नेतृत्व केले, त्या बाबासाहेबांच्या विचारांचा खरा पाईक कोण असेल तर ते रा. सू. गवई होते, हे आपल्याला मान्य करावे लागेल. त्यांनी या विचारांशी सातत्याने बांधिलकी ठेवली. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांवर अगाध श्रद्धा असलेल्या माननीय दादासाहेबांनी त्यांच्या विचारांचा सातत्याने पाठपुरावा केला. या राज्यामध्ये शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार तेवत राहिले पाहिजेत, याकरिता आर. पी. आय.ची मोट बांधण्याचे काम सन १९९८ मध्ये दादासाहेबांनी केल्याचे आपल्या सर्वांनाच आठवत असेल. त्यावेळी काँग्रेस आणि आर. पी. आय. चे सर्व गट एकत्र करण्याचे काम त्यांनी केले. या माध्यमातून प्रा. जोगेंद्र कवाडे साहेब, श्री. प्रकाश आंबेडकर साहेब, रा. सू. गवई साहेब, श्री. रामदास आठवले साहेब हे खासदार झाले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य

प्रा. जोगेंद्र कवाडे उपस्थित आहेत व त्यांनाही त्या गोष्टीचा अभिमान आहे.

राज्य कशाप्रकारे चालले पाहिजे, या विषयी दादासाहेबांचे विचार स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रखर विचारातून हा देश पुढे घेऊन जायचा असेल तर सामाजिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते आणि त्या दृष्टीने राज्याच्या राजकारणात दादासाहेबांना एक वेगळे महत्त्व होते.

दादासाहेबांचा जीवन प्रवास गरिबीतून सुरू झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्यभान असे होते व त्यांना चार मुली होत्या. त्यांना मुलगा नव्हता. त्यांना पाचवा मुलगा झाला, म्हणजे दादासाहेबांचा जन्म झाला तो दिवस लक्ष्मी पूजनाचा होता. सर्व गाव फटाके फोडत असताना त्यांचा जन्म झाला. दादासाहेबांच्या वडिलांचे एक मित्र त्या गावामध्ये होते. त्यांनी दादासाहेबांच्या जन्माच्या निमित्ताने बंदुकीतून फायरिंग करून आनंद व्यक्त केला होता. संपूर्ण गावात आनंदोत्सव होता. ४ मुलींनंतर मुलाचा जन्म झाला होता. त्यांच्या वडिलांकडे ५-७ एकर जमीन होती. त्यांची शिक्षण घेण्यासारखी देखील परिस्थिती नव्हती. त्यांचे कुटुंब फार सधन आहे, अशा प्रकारची परिस्थिती नाही. परंतु, त्या परिस्थितीवर मात करून पुढे येण्याचे काम दादासाहेबांनी केले.

ज्यावेळी आरपीआयच्या सभा असायच्या त्यावेळी आम्ही त्यांच्या सभांना जात होतो. दादासाहेबांच्या सभेला प्रचंड गर्दी होत होती. आम्ही अनेक वेळा त्यांच्या सभांना ५० हजार ते १ लाख एवढ्या संख्येने लोक उपस्थित असल्याचे बघितले आहे. मघाशी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांच्याकडे गेल्यानंतर ते तुझे कसे काय सुरू आहे, तुझे वडील काय करतात, अशी विचारणा करीत असत. कोणताही कार्यकर्ता त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी त्या कार्यकर्त्याच्या कुटुंबाविषयी विचारणा केली नसेल असे कधी होत नव्हते. कोणताही कार्यकर्ता त्यांच्याकडे आल्यानंतर ते त्याला प्रथम कसे काय सुरू आहे, व्यवस्थित सुरू आहे की नाही, तुझ्याबद्दल चांगले ऐकले आहे, तुझ्या वडिलांचे काय सुरू आहे, मुले कशी आहेत, अशा प्रकारची विचारणा करीत असत. सर्वांना बरोबर घेऊन जाणारे असे त्यांचे नेतृत्व होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोणताही अतिरेक नव्हता. कोठे तोडफोड झाली पाहिजे, वादंग निर्माण झाले पाहिजे आणि त्यावर आपण राजकारणाची पोळी भाजून घेतली पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न त्यांनी आयुष्यात कधीही केला नाही. राज्यात सामाजिक एकता अबाधित राहिली पाहिजे, या दृष्टिकोनातून दादासाहेबांनी संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केले.

दादासाहेबांनी अनेक महत्त्वाची पदे भूषविली आहेत. त्यांनी ६ वर्षे राज्यसभेचे सदस्य, त्याचप्रमाणे लोकसभेचे सदस्य आणि ३० वर्षे विधानपरिषदेचे सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ज्यावेळी त्यांची तब्येत बरोबर नव्हती, त्यावेळी आम्ही नागपूर येथे २-३ वेळा त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही त्यांना रुग्णालयात भेटण्यासाठी गेलो त्यावेळी त्यांची तब्येत थोडी बरी होती. त्यावेळी ते आमच्याशी बोलले. त्यांनी आम्हाला सांगितले की, मी आजच रुग्णालयात ॲडमिट झालो आहे. त्यावेळी माननीय श्री. नितीन राऊत साहेब आणि इतरही काही लोक त्यांच्या बरोबर होते. त्यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. एकूणच त्यांची तब्येत बिघडत गेली. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाली नाही. आम्ही त्यांच्या अंत्यविधीसाठी गेलो होतो. त्यांच्या अंत्यविधीला जवळपास ५०-६० हजार लोक उपस्थित होते. सकाळी १०.००—११.०० वाजता त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली आणि सायंकाळी ५.३० ते ६.०० वाजता शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीला प्रचंड जनसमुदाय लोटला होता. आमचे नेतृत्व आमच्यातून निघून गेले आहे. अनेकांच्या डोळ्यातून अश्रू

एचबी ११८०—३९अ

वाहत होते. त्यांनी आयुष्यात सातत्याने शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारानुसार काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी दिशा दाखवून दिली त्याप्रमाणे त्यांनी काम केले, अशा प्रकारचे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

सभापती महोदय, कै. रा. सू. गवई यांनी सामाजिक दृष्टिकोनातून संपूर्ण राज्याला एकत्र आणण्याचे काम केले. मी माझ्या वतीने, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने, सन्माननीय सदस्यांच्या वतीने आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने या महात्म्याला श्रद्धांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी कै. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

श्री. रा. सू. गवई यांच्या आंबेडकरी चळवळीच्या सहभागामुळे त्यांचा व्यक्तिगत स्नेह मी अनुभवला आहे. या सभागृहाचे सभापती, सदनाचे ज्येष्ठ सदस्य, विरोधी पक्षनेते म्हणून त्यांचे काम मी गॅलरीतून अनेक वेळा पाहिले आहे. हा माणूस अत्यंत ग्रेट होता. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी या राज्याला अनेक प्रतिभावंत, कलावंत, लेखक, कवी, विचारवंत व नेते देखील दिले आहेत, डॉ. दादासाहेब त्या सर्वांमध्ये अग्रणी होते. श्री. रा. सू. गवई बिहार राज्याचे राज्यपाल असताना आम्हा सर्वांना त्यांनी आर्वजून बोलविले होते. आम्ही सर्व बिहार येथे गेलो होतो. राजभवनावर आम्हाला कधी राहता येईल काय, याबाबत आम्हाला मुंबईतील राजभवनाचे फार कौतुक वाटत होते. बिहार येथील राजभवनात आम्ही दोन दिवस होतो. त्यांच्या सोबत घालविलेले क्षण कधीही विसरता येणार नाही.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर चळवळीतील रा.सू. गवई यांचे काम अतुलनीय होते. मंडल आयोगाच्या चळवळीच्या वेळी ते दिवसरात्र गावागावांत आमच्यासोबत फिरत होते. मुंबईत मंडल आयोगाच्या समर्थनार्थ पहिली परिषद झाली त्या परिषदेसाठी रा. सू. गवई, एस. एम. जोशी, प्रमोद महाजन, अहिल्याबाई रांगणेकर उपस्थित होत्या, या सर्व मंडळींना त्यांनी एकत्र केले होते. देशात मंडल आयोगाची अंमलबजावणी झाली पाहिजे. असा पहिला आवाज पोद्दार कॉलेजच्या सभागृहात त्यांनी उठविला होता. महात्मा फुले यांची बदनामी करण्याचा प्रयत्न झाला तेव्हा प्रचंड मोर्चा मुंबईत काढण्यात आला होता. त्या मोर्चाचे नेतृत्व रा. सू. गवई यांनी केले होते, त्यांच्याकडे संघटन कौशल्य होते.

दीक्षाभूमीबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे, त्यामुळे त्याबाबत मला बोलण्याची गरज नाही. डॉ. बाबासाहेबांचे उचित विचारांचे स्मारक करण्याची कल्पकता व प्रतिभा त्यांच्याकडेच होती, ती अभावानेच दुसरीकडे आढळते, ते रसिक व कलासक्त होते, कोणत्याही क्षणी ते अगदी सहजतेने बोलत होते, उगाच ओढून घेतलेले गांभीर्य त्यांच्याकडे नसे. एखादा गंभीर विषय ते हलक्या फुलक्या शब्दांनी हाताळीत होते, ती त्यांची विलक्षण हातोटी होती. दादासाहेबांचे चळवळीतील, आंबेडकरी चळवळीतील व महाराष्ट्रातील संसदीय प्रथा परंपरेचे योगदान अभूतपूर्व आहे, मी त्यांना अखेरचा जयभीम करतो.

श्री. सुभाष देसाई (उद्योगमंत्री) : सभापती महोदय, रा. सू. गवई यांच्या बाबतीत मी एक अनुभव सांगतो, विधानपरिषदेमध्ये माननीय श्री. मनोहर जोशी सदस्य म्हणून काम करीत असताना त्यांच्याकडे मी एक प्रश्न दिला होता. माझ्या गोरेगाव मतदारसंघातील सिद्धार्थनगर वसाहतीत टोपलीचे संडास होते. महाराष्ट्राच्या राजधानीत टोपलीचे संडास असलेली म्हाडाची वसाहत होती. हा विषय

श्री. मनोहर जोशी यांनी अत्यंत प्रभावीपणे सभागृहात मांडला होता. त्यावेळी रा. सू. गवई यांनी त्याक्षणी निर्णय घेतला की, उद्या या वसाहतीला भेट द्यावयाची आहे. आता ही बाब सहन करावयाची नाही. त्यानंतर लगेच गृहनिर्माण मंत्री व अधिकारी असे सर्व त्या वसाहतीत गेले होते. शासनाला ताबडतोब निर्णय घ्यावा लागला की, टोपलीचे सर्व संडास पाडून त्या वसाहतीमध्ये पक्की शौचालये बांधावी. अशा प्रकारे जनतेचे दुःख व अडचण काय आहे. यावर विचार करीत न बसता प्रत्यक्ष कृती करणारे असे रा. सू. गवई आम्हाला त्यावेळी दिसले होते. म्हणून हा माणूस इतकी उंची गाठू शकला आणि लोकांच्या मनामध्ये त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. सगळे पक्षभेद किंवा कोणतेही वैचारिक भेद असले तरी ते पार करून रा. सू. गवई यांच्याबद्दल आपल्या सर्वांच्या मनात नितांत आदर आहे आणि तो कायमच राहील. मी या थोर व्यक्तीला आदरांजली वाहतो.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी स्व. रा. सू. गवई यांच्या निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो.

समाज रचनेमध्ये परिवर्तन करणारे महामानव आज आपल्यातून निघून जाणे हे खऱ्रेच मनाला कुठे तरी वेदना देणारे आहे. पण त्यातून खूप शिकायचे असते. पुढे जायचे असते. यासाठीच आपण या सभागृहात त्यांच्या निधनाबद्दल भावना व्यक्त करीत असतो. मला बोलायला दिले धन्यवाद.

श्री. शरद रणपिसे : सन्माननीय सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. सभागृहाचे सन्माननीय नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे, त्यास सन्माननीय विरोधी पक्षनेते व अन्य पक्षाच्या नेत्यांनी जो पाठिंबा व्यक्त केला आहे, त्यावर अगदी थोडक्यात मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

दिवंगत दादासाहेब ऊर्फ रा. सू. गवई यांच्याबद्दल येथे अनेकांनी भावना व्यक्त केल्या आहेत. माझा आणि त्यांचा अनेक वर्षांचा परिचय, संबंध होता. आमचा एकमेकांमध्ये नेहमी संपर्क असायचा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज सत्तेच्या माध्यमातून समाज परिवर्तन करू शकणारी अशी काही मोजकीच माणसे आपल्याला पहायला मिळतात. त्यामध्ये श्री. दादासाहेब गवई यांचा वरचा क्रमांक आहे. श्री. दादासाहेब गवई यांच्यावर भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज इत्यादी महान नेत्यांचा त्यांच्या विचारांचा पगडा होता. ते त्यांच्या दृष्टीने प्रेरणास्थान होते, दलितांना, गरिबांना, उपेक्षितांना मदत करणारा, चांगल्या कामात अडथळा न आणणारा, सर्वांना मदत करणारा, संपर्कात येणाऱ्या व्यक्तींच्या उणिवांकडे दुर्लक्ष करून चांगले गुण आत्मसात करणारा, विचारांची व्यापकता असणारा नेता आज आपल्यातून गेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, श्री. दादासाहेब हे एक मुरब्बी राजकारणी होते. ते व्यवहारी राजकारणी होते. त्यांच्या जाण्याने आपले अतोनात नुकसान झाले आहे.

श्री. दादासाहेबांबद्दली एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो. ते मृदू होते. त्यांचा चेहरा हसरा होता. पण ते धाडसी देखील होते. संसदेवर ज्यावेळी अतिरेकी हल्ला झाला त्यावेळी श्री. दादासाहेब गवई खासदार होते. श्री. कवाडे साहेब आणि श्री. प्रकाश आंबेडकर साहेब देखील खासदार होते. संसदेवर हल्ला झाला त्यावेळी सगळे लोक सैरावैरा पळाले. श्री. दादासाहेब गवई त्यावेळी सेंट्रल हॉलमध्ये बसून होते. सेंट्रल हॉलचे दरवाजे बंद करण्यात आले. लोक इकडे तिकडे पळायला लागले. श्री. दादासाहेब गवई उभे राहिले आणि सगळ्या खासदार आणि मंत्र्यांना म्हणाले की, आपणच जर भ्यायला लागलो तर देश आपल्याला काय म्हणेल? काय व्हायचे ते इथेच होईल.

आपण इथेच बसून राहिले पाहिजे. श्री. दादासाहेबांची ही आठवण कोणीच विसरू शकणार नाही.

श्री. दादासाहेब गवई यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना चळवळी, घटना यांचाच उल्लेख करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी मंडल आयोगाचा उल्लेख केला आहे. मंडल आयोगासंबंधी त्यांचा फार मोठा सहभाग होता. नामांतराच्या चळवळीतही त्यांचा मोठा सहभाग होता. मी त्यांची सर्वांना प्रत्यक्ष घेऊन जाण्याची कार्यपद्धती रिडल्सचा प्रश्न ज्या वेळी आला त्या वेळी अनुभवली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले लेखन राज्य सरकारने प्रसिद्ध केले आणि रिडल्सचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी श्री. शंकरराव चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री होते. नागपूरला अधिवेशन सुरू होते. संपूर्ण महाराष्ट्र पेटला होता. अशावेळी त्या रिडल्समधून बाहेर कसे पडायचे आणि समाजामध्ये समता कशी निर्माण करायची हा प्रश्न होता. या प्रश्नाचा तोडगा ज्यावेळी निघाला त्यावेळी श्री. शंकरराव चव्हाण साहेब होते, श्री. दादासाहेब गवई होते, मी होतो, श्री. प्रकाश आंबेडकर होते, विविध पक्षांचे अनेक नेते होते. त्यांनी जो मार्ग काढला त्यातून रिडल्सचा प्रश्न सुटला हेही मी येथे आपल्याला सांगू इच्छितो.

दीक्षाभूमीसुद्धा एक चळवळ म्हणून श्री. दादासाहेबांनी निर्माण केली. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आताच येथे दीक्षाभूमीचे वर्णन केले आहे. त्यामुळे मी त्याबद्दल अधिक काही सांगू इच्छित नाही. पण मला अतिशय नम्रपणे सांगावेसे वाटते की, श्री. दादासाहेबांना त्यांच्या जीवनांमध्ये एक खंत होती. ती खंत अशी होती की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन निर्माण केले. त्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा नंतर रिपब्लिकन पक्ष झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर एन. शिवराज रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष झाले. त्यानंतर कर्मवीर श्री. दादासाहेब गायकवाड अध्यक्ष झाले. तेव्हा अखंड रिपब्लिकन पक्ष होता. श्री. दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर रिपब्लिकन पक्षाची शकले झाली. ही शकले एकत्र येऊन अखंड रिपब्लिकन पक्ष व्हावा हे त्यांचे स्वप्न त्यांच्या हयातीमध्ये पूर्ण झाले नाही. ते स्वप्न रिपब्लिकन नेत्यांनी पूर्ण करावे अशी मी सर्व रिपब्लिकन नेत्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, मी येथे एक पुण्याचा किस्सा सांगतो. १९७० मध्ये आम्ही पुणे महानगरपालिकेच्या प्रांगणात महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा उभा केला. त्यानंतर महात्मा फुले स्मारक समिती झाली. त्यावेळी आम्ही सगळे स्मारक समितीचे अध्यक्ष श्री. गवई साहेबांना भेटायला गेलो आणि आज महात्मा फुले यांचा दिमाखदार पुतळा विधान भवनाच्या प्रांगणात आहे. त्यांचे संपूर्ण श्रेय श्री. दादासाहेब गवई यांना जाते, एवढेच याप्रसंगी मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मी या महान नेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो शोकप्रस्ताव सादर केला आहे. त्या संदर्भात सहवेदना व्यक्त करण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी सभापती, बिहार आणि केरळचे माजी राज्यपाल श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई ऊर्फ रा. सू. गवई यांचे २५ जुलै २०१५ रोजी दु:खद निधन झाले. अनेक वक्त्यांनी माननीय गवई साहेबांच्या प्रती भावना व्यक्त केल्या आहेत. परंतु मी गवई साहेबांकडे राज्यघटनेचा भाष्यकार म्हणून बघतो. गवई साहेबांचे व्यक्तिमत्त्व हे अत्यंत मुत्सद्दी होते. रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीमध्ये त्यांनी दिलेले योगदान ही केवळ रिपब्लिकन जनताच नव्हे तर महाराष्ट्रातील व देशातील जी जनता उपेक्षित, वंचित, दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्याक

जनता आहे ती त्यांना कधीही विसरू शकणार नाही. माननीय गवई साहेब या सभागृहाचे सभापती असताना सभागृहात जेव्हा तणाव निर्माण व्हायचा तेव्हा तणाव निवळण्याचे काम ते अत्यंत वेगळ्या पद्धतीने करीत असत. तणावाचे रूपांतर हास्यामध्ये करण्यात त्यांचा हातखंडा होता. माननीय गवई साहेब सभापती असताना आम्ही प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलो होतो तेव्हा सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. आम्ही नवीन असल्यामुळे सभागृहात आता मारामारी तर होणार नाही ना, असे वाटले होते. या तणावाचे रूपांतर त्यांनी अचानक हास्यामध्ये बदलून सभागृहात खेळीमेळीचे वातावरण निर्माण केले होते. मी नंतर त्यांच्या दालनात गेलो. त्यांना विचारले की, दादासाहेब, सभागृहात तणावाचे वातावरण होते, तोडफोड होते की काय असे वातावरण होते आणि आपण ते वातावरण एकदम सुरळीत कसे आणले? त्यावर ते मला म्हणाले की, माझा पानाचा डबा शिपायाच्या हाती देऊन त्यांच्याकडे पाठवून दिला. त्यांनी पान खाल्ले आणि सभागृहातील वातावरण शांत झाले. अत्यंत नम्र विनोदी, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे धनी, अनेक प्रकारचे ताणतणाव आपल्या पानाच्या डब्यातून सोडविणारे असे हे व्यक्तिमत्त्व होते.

सभापती महोदय, गवई साहेबांनी रिपब्लिकन पक्षासाठी केलेले काम कोणीही विसरू शकत नाही. कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली भूमिहिनांसाठी देशव्यापी सत्याग्रह झाला. गवई साहेबांनी या देशव्यापी सत्याग्रहांमध्ये अमरावती आणि पश्चिम विदर्भाचे नेतृत्व केले. गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली अमरावतीमध्ये प्रचंड असा ऐतिहासिक सत्याग्रह झाला, हजारो लोक तुरुंगात गेले. तुरुंगात जागा नव्हती म्हणून अमरावती शहरातील अनेक मैदाने, शाळेची पटांगणे तुरुंगामध्ये परावर्तीत करण्यात येऊन त्या ठिकाणी आंदोलकांना ठेवण्यात आले. त्यावेळी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी "राहील त्याचे घर, कसेल त्यांची जमीन" अशी घोषणा दिली होती. पण गवई साहेबांनी सांगितले की, राहिल त्याचे घर, कसेल त्याची जमीन, पण नसेल त्याचे काय? असा त्यांनी उपेक्षितांसाठी प्रश्न विचारला. आम्ही त्यांचे हे काम कधीच विसरू शकणार नाही.

सभापती महोदय, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियांची स्थापना झाली, त्यावेळी श्री. शिवराज हे संस्थापक अध्यक्ष झाले. नंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाड अध्यक्ष झाले. त्यानंतर श्री. रा. सू. गवई साहेब अध्यक्ष झाले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने भूमिहिनांसाठी केलेले आंदोलन पाहून श्री. यशवंतराव चव्हाण यांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचेसोबत आघाडी केली. काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची आघाडी झाली. सन १९६४ मध्ये श्री. गवई साहेब विधानपरिषदेचे सदस्य झाले. त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. १९९४ पर्यंत ते विधानपरिषदेचे सदस्य होते. त्यानंतर सन १९९८ मध्ये लोकसभेची निवडणूक झाली तेव्हा ते अमरावती मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी येथे सांगितले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची शकले झाली, फाटाफूट झाली. पण त्याबाबत गवई साहेबांनी नेहमी सकारात्मक भूमिका घेतली. आम्ही त्यावेळी राजकारणात नव्हतो. आम्ही दलित मुक्ती सेनेच्या माध्यमातून सामाजिक चळवळ चालवित होतो. नामांतर आंदोलन असेल, रिडल्सचे आंदोलन असेल आम्ही दलित मुक्ती सेना या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून त्यांच्या सोबत आंदोलनात सहभागी होतो. त्यावेळी गवई साहेब राजकारणामध्ये होते.

सभापती महोदय, नामांतर होणार असेल तर ते नामांतर श्री. शरद पवार साहेब करू शकतील अन्य दुसरे कोणी करू शकणार नाही असे आम्ही त्यावेळी सांगितले होते.

नामांतर करण्यासाठी श्री. गवई साहेबांनी श्री. शरद पवार साहेबांना कन्व्हीन्स केले. शेवटी दिनांक १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नाव देण्यात आले. हे नामांतर होण्यामध्ये अनेकांचा सहभाग होता पण श्री. गवई साहेबांचे फार मोठे योगदान होते.

सभापती महोदय, मा. श्री. अंतुले साहेब मुख्यमंत्री असतांना नामांतराचे आंदोलन शिखरावर होते. त्या कालखंडामध्ये रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ स्थापन झाले. हे तंत्र विद्यापीठ स्थापन करण्यामध्ये देखील श्री. गवई साहेबांचा फार मोठा हात होता, हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, या देशातील ५२ टक्के ओबीसी समाजाला आरक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे. राज्य घटनेच्या कलम ३४० कलमान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील बहुजन, ओबीसी समाजासाठी आरक्षणाची तरतूद करून ठेवली होती. या देशातील ५२ टक्के ओबीसी समाजाला आरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी आंदोलने झाली, परिषदा झाल्या, संमेलने झाली, रस्त्यावर आंदोलने झाली, गल्लीपासून दिल्लीपर्यंत आंदोलने झाली, त्या आंदोलनामध्ये श्री. गवई साहेबांचा फार मोठा सहभाग होता, हे मला येथे सांगावेसे वाटते. त्यानंतर मंडल आयोग लागू झाला. महाराष्ट्र राज्यातही तो लागू झाला.

सभापती महोदय, गवई साहेबांनी पाली भाषेच्या विकासासाठी पाली भाषा प्रचार समितीची स्थापना केली होती.

सभापती महोदय, गवई साहेब दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचे जागतिक कीर्तीचे चिरंतन स्मारक गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली तयार झाले, हे आम्ही विसरू शकत नाही.

सभापती महोदय, श्री. अरुण शौरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बदनामी करणारे " Worshipping False God " हे पुस्तक लिहिले. त्यावेळी गवई साहेब राज्यसभेवर होते. अत्यंत शांत स्वभावाचे, संसदीय कार्यपद्धतीवर निष्ठा असणारे, संयमी नेते असलेले गवई साहेब यांनी अरुण शौरी यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लिहिलेले पुस्तक वाचून ते बिथरले आणि त्यांनी राज्यसभेमध्ये श्री. अरुण शौरी यांचे ते पुस्तक टराटरा फाडले. डॉ. बाबासाहेबांनी राज्य घटना लिहिली. आम्ही गवई साहेबांना राज्य घटनेचा भाष्यकार म्हणतो. श्री. अरुण शौरी यांचे डॉ. बाबासाहेबांची बदनामी करणारे पुस्तक राज्यसभेमध्ये फाडण्याचे धैर्य गवई साहेबांनी दाखविले.

सभापती महोदय, एकसंघ भारत व शोषणमुक्त समाजाची निर्मिती करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. या स्वप्नांना वास्तवामध्ये उतरविण्यासाठी गवई साहेबांनी आपल्या आयुष्यामध्ये अनेक महत्त्वाची कार्ये केलीत हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते यांनी भंडारा जिल्ह्यांमध्ये एका महिलेला नग्न करुन तिची विटंबना करण्यात आली, तिच्यावर अत्याचार करण्यात आले, असा एक प्रसंग सांगितला, त्यावेळी गवई साहेबांनी केलेल्या कामाचा उल्लेख केला. ज्या अमरावती विभागामध्ये गवई साहेब राहतात तेथे सांगळूर नावाचे गाव आहे. त्या गावातील एक अस्पृश्य, दलित बौद्ध महिला सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेली म्हणून त्या महिलेला विवस्त्र करून प्रचंड मारहाण करण्यात आली, नको त्या ठिकाणी चटके देण्यात आले, गावभर फिरवण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण विदर्भ आणि महाराष्ट्र पेटला.

श्री. गवई साहेबांनी आरोपींना शिक्षा करण्याचे काम केलेच. पण त्या महिलेला साडीचोळी देऊन तिचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न करून सामाजिक शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी गवई साहेब म्हणाले की, अशा पद्धतीने माणुसकीला काळिमा फासणारे प्रकार शिवाजी महाराजांच्या, शाहू-फुले-आंबेडकराच्या राज्यात होत असतील तर ती राज्याला अतिशय लांच्छनास्पद गोष्ट आहे. भविष्यात अशाप्रकारचे कलंक लागता कामा नयेत याची दक्षता समाजाने, बहुजन समाजाने, सवर्ण समाजाने, सरकारने आणि पोलीस विभागाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, गवई साहेबांनी ऐक्यासाठी काय केले ते सांगतो, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची फाटाफूट झाली होती. आम्ही १९९४ मध्ये पुन्हा एकत्र आलो. रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, आमची दलित मुक्ती सेना असे सर्वजण एकत्र आलो. आम्हाला नको असतांना राजकारणामध्ये भाग घ्यायला लावला. आम्ही दलित मुक्ती सेना बरखास्त करून रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यामध्ये सामील झालो. सन्माननीय सदस्य ॲड. जयदेव गायकवाड यांना याबाबतची माहिती आहे. गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले. त्यावेळी रिपब्लिकन पक्षाने लोकसभेच्या ११ जागा स्वबळावर लढविल्या. त्या निवडणुकीमध्ये रिपब्लिकन पक्षाला इतकी मते मिळाली की, निवडणूक आयोगाकडून रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळाली व त्या पक्षाला 'उगवता सूर्य' हे चिन्ह मिळाले. त्यानंतर १९९८ च्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने काँग्रेस पक्षासोबत निवडणूक लढविली. काँग्रेस पक्षाकडून गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाला चार जागा सोडण्यात आल्या. सभापती महोदय, ऐक्यात किती शक्ती आणि ताकद असते हे १९९८ च्या निवडणुकीत दिसले. महोदय, त्या निवडणुकीत आमच्यासारखे चारही अनपढ लोक निवडून आले. कारण आम्ही राजकारणात अनपढच होतो. या मागील चमत्कार हा ऐक्याचा होता.

आम्ही निवडून आल्यानंतर आम्हाला संसदीय कामकाजाची काहीच माहिती नव्हती. परंतु गवई साहेबांनी आमच्यासाठी फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईडचे काम केले. संसदीय काम कसे करावयाचे, संसदीय कामकाजाची पद्धत कशी असते हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो. महोदय, आपण मध्यंतरी म्हटले होते की, लोकप्रतिनिधी हे संसदीय लोकशाहीला जबाबदार असतात. हीच भूमिका गवई साहेबांनी आमच्यासमोर ठेवली. आमच्यासाठी फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड असलेले गवई साहेब आता आमच्यातून निघून गेले आहेत. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. उपेक्षित, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, गरीब, वंचित, अल्पसंख्याक समाजाच्या हक्कासाठी आणि अधिकारासाठी भांडणारा एक महान नेता आमच्यातून निघून गेला ही अत्यंत शोकांतिका आहे. माननीय मुख्यमंत्री आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी या नेत्याच्या दुःखद निधनाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या सभागृहाला गवई साहेबांनी १९६४ ते १९९४ पर्यंत जे योगदान दिले ते योगदान हे सभागृह विसरू शकत नाही, हे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, श्री. रा. सू. गवई साहेबांचे निधन झाल्यानंतर मी अमरावतीला गेलो. त्या ठिकाणी ५०-६० हजार लोक आले होते. ते सर्वजण 'गवई साहब अमर रहें, गवई साहब-नीळा सलाम' अशा घोषणा देत होते. आजच्या प्रसंगी 'गवई साहब अमर रहें', एवढेच सांगतो आणि त्यांना नीळा सलाम करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री. रा. सू. गवई, माजी सभापती यांच्या निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शोकप्रस्ताव मांडला. त्याबद्दल पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

प्रा. जनार्दन चांदूरकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती तसेच बिहार आणि केरळ राज्याचे माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात रा. सू. गवई यांच्या विषयी माहिती दिली. त्यांनी आपल्या भाषणात या महान व्यक्तीच्या गुणांबाबत सांगितले. या शोकप्रस्तावावर बोलताना मी लांबलचक भाषण करणार नाही. परंतु या व्यक्तीला श्रद्धांजली वाहत असताना काही गोष्टींकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, कै. रा. सू. गवई यांनी महाराष्ट्राची सेवा केली. देशाच्या घटनेचे इंटरप्रीटेशन केले. ते एक मुत्सद्दी आणि कुशल संघटक होते. त्यांनी शाहू, फुले, आंबेडकरांच्या चळवळीतून प्रेरणा घेऊन, महाराष्ट्रात सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे काम केले. याबाबतचा उल्लेख माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला.

सभापती महोदय, मी कै. रा. सू. गवई यांच्या दुख:द निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : (सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद) : राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी कै. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडलेला आहे. या शोकप्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे, सन्माननीय गट नेते आणि सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

या सभागृहात आणि विधानसभेत गेल्या २०-२५ वर्षांत बऱ्याचशा शोकप्रस्तावांवरील भाषणे मी ऐकली आहेत, किंबहुना मी त्याचा साक्षीदार आहे. परंतु आजच्या शोकप्रस्तावाच्या अनुषंगाने मला एक फरक जाणवतो की, आज ज्या भावना व्यक्त झालेल्या आहेत ती श्रद्धांजली सन्माननीय सदस्यांच्या आलेल्या अनुभवातून व्यक्त केली गेली. शोकप्रस्तावावरील विचार हे औपचारिकता म्हणून मांडले जातात. आजचे विचार हे हृदयातून मांडण्यात आलेले विचार आहेत, अशी माझी स्वत:ची भावना झालेली आहे.

श्री. रा. सू. गवई गेले. दुर्दैवाने माझा त्यांच्याशी जास्त संपर्क आला नाही. परंतु मी त्यांचे नाव निश्चितपणे ऐकून होतो. दलित समाजातून पुढे आलेले व्यक्तिमत्त्व अशा भावना व्यक्त झाल्या. आम्ही दादासाहेबांचे नाव ऐकून होतो. माझ्या लक्षात एक गोष्ट आहे. मी त्यांच्याबरोबर बसलो होतो, योग आला होता. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी त्यांच्या पानाच्या डब्ब्याचा उल्लेख केला. सन १९९९ ची गोष्ट आहे. आम्ही पुण्याला सर्वजण एकत्र बसलो होतो. दादासाहेबांची आणि माननीय श्री. शरद पवार साहेबांची बोलणी चालू होती. मी बघत होतो की, ते व्यक्तिमत्त्व पवार साहेबांच्या बरोबर आरामात बसून पान खात होते, त्यांचा अडकित्ता व सुपारी बरोबर होती. मी त्यांचा वैदर्भीय गुण बघितलेला होता. वऱ्हाडाचा उल्लेख वेगळा करणे उचित होणार नाही. जे काही होते ते दादासाहेबांचे होते. दादासाहेबांचे गुण विशेषकरून त्यांनी सभागृहाला दिलेले योगदान निश्चितपणे आपल्या सर्वांना मार्गदर्शक ठरेल.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोकप्रस्ताव संमत करावा अशी मी विनंती करतो.

❑❑❑

लोकसभेतील दुखवटा

लोकसभेत ३० जुलै, २०१५ रोजी सभापतींनी गवई यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला ...

श्री. आर. एस. गवई बारहवीं लोक सभा के सदस्य थे. और उन्होंने महाराष्ट्र के अमरावती संसदीय निर्वाचन क्षेत्र का प्रतिनिधित्व किया।

उन्होंने वर्ष २००० से २००६ तक राज्य सभा के सदस्य के रूप में भी कार्य किया।

एक सम्मानित संसदविद्, श्री. गवई बारहावीं लोक सभा के दौरान शहरी और ग्रामीण विकास सम्बन्धी समिती के सदस्य भी रहे।

इससे पूर्व, श्री. गवई वर्ष १९६४ से १९९४ तक पांच बार महाराष्ट्र विधान परिषद के सदस्य रहे। वे वर्ष १९७८ १९८२ तक महाराष्ट्र विधान परिषद के सभापति रहे थे तथा उन्होंने वर्ष १९६८ से १९७८ तक दो कार्यकाल के लिए महाराष्ट्र विधान परिषद के उप सभापति के रूप में भी कार्य किया। वे वर्ष १९८६ से १९८८ तक महाराष्ट्र विधान परिषद में विपक्ष के नेता थे।

श्री. गवई ने वर्ष २००६ से २००८ तक बिहार के राज्यपाल के रुप में कार्य किया और २००८ से २०११ तक वे केरल राज्यपाल रहे। वे वर्ष २००६ में सिक्किम के कार्यवाहक राज्यपाल भी थे।

श्री. आर. एस. गवई का ८६ वर्ष की आयु में २५ जुलाई २०१५ को नागपुर में निधन हो गया।

❑❑❑

पार्टी की जान

श्री. गवईसाहब मेरे लिए एक महान नेता और आदरणीय व्यक्ती है। १९७० सालसे मैं उनको जानता हूँ। उनका बात करने का स्नेहमय तरीका और सबको संभाल लेने के उनके स्वभाव के कारण आज वे सिर्फ बंगलोर में ही नही बल्की पुरे कर्नाटक में लोकप्रिय है।

श्री. गवईसाहब के स्वभाव की खास बात यह है की वे सच क्या है और झूठ क्या है यह बात बराबर जान लेते है और यही कारण है की वे सही न्याय दे सकते है। उनका कोई भेदभाव न करते हुए सबके साथ स्नेहपूर्ण समान व्यवहार, कडी मेहनत, सबको सहकार्य और पार्टी एवं अपने निर्णय के प्रती एकनिष्ठता के कारणही आज वे निजी जीवन में सच्चा इंसान और राजनीती में महान नेता बने है।

हमारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया के वे आधारस्तंभ है। आज पार्टी उन्ही के नाम से और सहयोग से चल रही है। डॉ. बाबासाहब के वे सच्चे अनुयायी है। उन्ही के बताए हुए रास्ते पर चलकर वे समाज की सेवा कर रहे है। हम डॉ. बाबासाहब के बाद सिर्फ श्री. गवईसाहब को ही हमारा नेता मानते है।

दोराई स्वामी

राज्यसभेतील दुखवटा

राज्यसभेत २७ जुलै, २०१५ रोजी सभापतींनी गवई यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करताना सांगितले.

Shri R. S. Gavai passed away on the 25th of July 2015, at the age of 86 years.

Born in October 1929 at Amravati district of Maharashtra, Shri R. S. Gavai was educated at Nagpur University.

An agriculturist, Shri R. S. Gavai took active part in political and social activities since his student days. He was associated with several social welfare organizations providing assistance in the eradication of untouchability and leprosy. He was the Chairman of the Dr. Babasaheb Ambedkar Smarak Samiti and the Deeksha Bhoomi, Nagpur. He was a Member of the Land Reforms Committee of the Government of India. He did pioneering work in introducing the Employment Guarantee Scheme in Maharashtra in 1975. He was the President of the Republican Party of India.

Shri R. S. Gavai was the recipient of several awards, including the National Press Award for outstanding contribution to various fields of public life by the National Press India, New Delhi. A widely travelled person, Shri Gavai was a Member of several delegations.

Shri R. S. Gavai started his legislative career as a Member of the Maharashtra Legislative Council in 1964 and was a Member of that Council for five consecutive terms up to 1994. He was the Deputy Chairman of the Maharashtra Legislative Council from 1968 to 1978 and the Chairman of that Council from 1978 to 1982. He was also a Member of the Twelfth Lok Sabha.

Shri R. S. Gavai represented the State of Maharashtra in this House from April 2000 to April 2006.

He also served as the Governor of Bihar from 2006 to 2008 and that of Kerala from 2008 to 2011.

In the passing away of Shri R. S. Gavai, the country has lost a distinguished parliamentarian, an able administrator and a dedicated social worker.

❑❑❑

रा. सू. गवई जीवनपट

पूर्ण नाव	:	रामकृष्ण सूर्यभानजी गवई
पिताश्री	:	सूर्यभानजी नकराजी गवई
मातोश्री	:	श्रीमती सरूबाई सूर्यभानजी गवई
जन्मतारीख	:	३० ऑक्टोबर, १९२९
जन्मस्थळ	:	दारापूर, जि. अमरावती.
विवाह	:	२९ नोव्हेंबर, १९५९
पत्नी	:	डॉ. श्रीमती कमलताई गवई (प्राचार्या म्हणून सेवानिवृत्त)
अपत्ये	:	न्या. भूषण गवई, डॉ. राजेंद्र गवई, सौ. कीर्ती राजेश अर्जुन
शैक्षणिक अर्हता	:	नागपूर विद्यापीठाची पदवी, शिक्षण-विदर्भ महाविद्यालय, अमरावती
व्यवसाय	:	शेती
कायमचा पत्ता	:	कमलपुष्प, ४४ काँग्रेस नगर, अमरावती. ९०२, वरळी सहकारी गृहनिर्माण संस्था, वरळी, मुंबई.
भूषविलेली पदे	:	१९६४-९४ सदस्य, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य १९६८-७८ उप सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य १९७८-८२ सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य १९८६-८८ विरोधी पक्षनेता, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य १९६८-७८ अध्यक्ष, कॉमनवेल्थ पार्लिमेंटरी असोसिएशन १९९८-९९ लोकसभा सदस्य २०००-२००६ राज्यसभा सदस्य २००६-२००८ बिहारचे राज्यपाल (या काळात सिक्कीमचे राज्यपाल म्हणून प्रभार) २००८-२०११ केरळचे राज्यपाल.
प्रकाशित पुस्तके	:	• फाईव्ह इअर प्लॅन रिलेशन टू दि शेड्युल्ड कास्ट ॲन्ड ट्राईब्स् • शेड्युल्ड कास्ट ॲन्ड शेड्युल्ड ट्राईब्स ॲन्ड देअर सर्व्हिस प्रिव्हीलेजेस • दि कास्ट वॉर ओव्हर रिझर्व्हेशन ए केस बिफोर दि पिपल्स बार • फॅसिलिटीज टू बुद्धिस्ट कनव्हर्टेड फ्रॉम शेड्युल्ड कास्ट • डॉ. बाबासाहेब आंबेडकर डिझर्व्हड दि

थँक्स ऑफ दि नेशन • डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पिटीशन बिफोर दि पिपल्स ऑफ मराठवाडा • एन्रॉन-दाभोल-रिम्ह.

विशेष पारितोषिक व पुरस्कार : • कुष्ठ मित्र पुरस्कार–कुष्ठरोगी लोकांना विशेष मदत आणि सवलतीसाठी प्रयत्नशील • प्रियदर्शन पुरस्कार—सामाजिक सेवा आणि अस्पृश्यता व कुष्ठरोग निर्मूलनाकरिता प्रयत्नांबाबत प्रियदर्शनी समूह मुंबई यांचा १९९०-९१ साली पुरस्कार

• विविध क्षेत्रातील सामाजिक कार्याबद्दल भारत सारथी सन्मान-नॅशनल प्रेस ऑफ इंडिया.

• जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मता कार्याबद्दल अबुल कलाम आझाद पुरस्कार

• समाजसेवा आणि नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दीक्षाभूमीच्या विकासाकरिता कार्य केल्याबद्दल-ईश्वरीदेवी पुरस्कार.

क्रीडा मंडळे, व्यक्तिमत्त्व : • माजी अध्यक्ष, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन, मुंबई

अभ्यासदौरे व विदेश यात्रा : • रशिया, संयुक्त संघराज्य अमेरिका, इटली, फ्रान्स, जर्मनी, जपान, हाँगकाँग, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, कॅनडा, मॉरिशस, सियाचेल्स, स्वित्झर्लंड, चीन, दक्षिण कोरिया, श्रीलंका, मंगोलिया, नेपाळ, तैवान, भूतान या देशांमध्ये राष्ट्रकुल संसदीय परिषद व संसदीय पद्धतीच्या अभ्यासाकरिता महाराष्ट्र राष्ट्रकुल मंडळाचे व भारताचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

इतर माहिती विशेष : • विद्यार्थिदशेपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय • दलित समाजाच्या समस्या सोडविण्याकरिता व भूमिहीन चळवळीत तुरुंगवास • ३० वर्षे सतत विधानपरिषद सदस्य आणि २७ जुलै १९९४ ला निवृत्ती • १९७५ साली रोजगार हमी योजनेद्वारे युवकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक व वि. स. पागे सभापती विधानपरिषद यांच्या नेतृत्वात भरीव कार्य. • कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या निधनानंतर १९७१-७२ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड. • १९९५ ला रिपब्लिकन ऐक्याकरिता प्रयास. • १९९५ ला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (एकीकृत) राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड. • बँकॉक येथील जागतिक बौद्ध फेलोशिपच्या बैठकीत २३ नोव्हेंबर १९८० ला केंद्रीय कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष म्हणून निवड. • जागतिक बौद्ध फेलोशिप संघटनेच्या उपाध्यक्षपदी १९९८ मध्ये पाचव्यांदा निर्वाचित. • १९८९ साली स्वागताध्यक्ष ६२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अमरावती अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर. • अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्था, अमरावती. • उपाध्यक्ष, हनुमान व्यायाम मंडळ, अमरावती (महाराष्ट्र) महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती, धार्मिक व जातीय समरसता मंचचे सदस्य

● मा. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी समारोह समितीचे सदस्य ● सदस्य, भारत सरकारी भूमी अभिसारण समिती. ● कार्यकारी सदस्य, आंतरराष्ट्रीय बुद्ध जीवन संघटना, मुख्यालय तैवान व लॉस एंजेलीस (अमेरिका) ● १५ वी कॉमनवेल्थ सांसदीय परिषदेत सहभाग (१९६९ साली कोलंबो, श्रीलंका) ● २० वी कॉमनवेल्थ प्रथम आशियाई लोकसंख्या व विकास परिषद येथे मानद सदस्य म्हणून सहभाग (बिजींग, चीन-१९८१). ● उमरखेड, जि. यवतमाळ येथे ५१ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटक. ● महामहिम राष्ट्रपती के. आर. नारायणन यांचे समवेत मार्च, २००१ ला मॉरिशसला भेट. ● १४८ खासदार सदस्य असलेल्या अनु. जाती, अनु. जमाती सांसदीय फोरमचे अध्यक्षपदी एकमताने निवड.

महाराष्ट्र शासनाला महत्त्वाच्या विषयांवर अहवाल सादर : (१) महाराष्ट्रातील कुष्ठरोग समस्येबाबत अभ्यासपूर्ण अहवाल सादर.
(२) महाराष्ट्र रोजगार हमी योजनांतर्गत अनियमितता आणि चुकीचे पायंडे/ भ्रष्टाचार याबाबत समितीचा अहवाल.
(३) मुंबई व महाराष्ट्रातील विविध ठिकाणी झालेल्या जातीय दंगलीबाबत अहवाल.
(४) भारत सरकार विविध शासकीय समित्यांवर सदस्य म्हणून कार्यरत व विविध समस्यांबाबत अहवाल.

दु:खद निधन : ● २५ जुलै २०१५ दुपारी १-३० वा. नागपूर येथे श्रीकृष्ण रुग्णालयात निधन.
● २६ जुलै २०१५ रोजी दारापूर या जन्मगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

A close associate of Dr. B.R.Ambedkar, Shri Gavai rendered immense service as Chairman of the Deekshabhoomi Smarak Samiti in Nagpur. His life based on values of simplicity, tolerance, patriotism and selfless service to the nation will always remain an inspiration for the youth of our country.

Pranab Mukherjee
President, Republic Of India

Shri Gavai was a versatile personality and championed the empowerment of poor and downtrodden sections of the society. In his long political innings he held prominent positions in national and regional politics. He was an excellent administrator and political leader and served as the Governor of States of Bihar, Sikkim and Kerala.

M. Hamid Ansari
Vice-President Of India

गवईसाहेब महाराष्ट्र के लोकप्रिय जमीनी नेता थे तथा वे महाराष्ट्र विधान परिषद के अध्यक्ष पद पर रहे। प्रस्तुत पुस्तक में उनके जीवन एवं कार्यशैली के बारे में विस्तार से वर्णन है। एक संसदविद के रूप में उन्होंने काफी संवेदनशीलता से कार्य किया । वे गोवा मुक्ति आंदोलन के कार्यकर्ता थे एवं उनमें राजनीतिक कौशल था । उन्होंने अपना सम्पूर्ण जीवन सामाजिक कल्याण एवं सशक्तिकरण के कार्य के लिए लगा दिया ।

सुमित्रा महाजन
अध्यक्ष, लोक सभा

A warm hearted person, Gavai Ji had friends and admirers cutting across the entire political spectrum. Gavai Ji maintained his contacts with grassroots workers and ordinary people till his end. He knew the pulse of the common man.

CH. Vidyasagar Rao
Governor Of Maharashtra

महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती हे विधानपरिषद विनंती अर्ज समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात. दादासाहेबांनी या समितीच्या माध्यमातून जनसामान्यांचे अनेक प्रश्न सोडविण्याचा, वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांची सभागृहातील आणि सभागृहाबाहेरील एक परिवर्तनवादी लोकप्रतिनिधी म्हणून कामगिरी सर्वांनाच प्रेरणादायी ठरणारी आहे.

श्री. माणिकराव ठाकरे
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

दादासाहेबांना अनेक थोर व्यक्तिमत्त्वांचा सहवास लाभला. कर्मवीर दादासाहेब गायकवाड साहेबांच्या सहवासात त्यांची आंबेडकरी विचारांची बैठक पक्की झाली. राज्यात रोजगार हमी योजना सुरू व्हावी म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय वसंतराव नाईक साहेब, विधान परिषदेचे तत्कालीन सभापती सन्माननीय वि. स. पागे यांच्या सोबत त्यांनी पायाभूत काम केले. अनुसूचित जाती, जमातींच्या सवलती नवबौध्दांना मिळवून देण्यासाठी त्यांनी यशस्वी लढा दिला.

श्री. धनंजय मुंडे
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

दलितांनी आपले हक्क संसदीय मार्गाने संघर्ष करून मिळवावेत, या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदेशाची गवई यांनी प्रत्यक्षात अंमलबजावणी केली. दलितांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अखेरपर्यंत प्रयत्न केले. १९६४-६५ साली झालेल्या भूमिहिनांच्या आंदोलनातही त्यांनी भाग घेतला.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा

A close associate of Dr. B.R.Ambedkar, Shri Gavai rendered immense service as Chairman of the Deekshabhoomi Smarak Samiti in Nagpur. His life based on values of simplicity, tolerance, patriotism and selfless service to the nation will always remain an inspiration for the youth of our country.

Pranab Mukherjee
President, Republic Of India

Shri Gavai was a versatile personality and championed the empowerment of poor and downtrodden sections of the society. In his long political innings he held prominent positions in national and regional politics. He was an excellent administrator and political leader and served as the Governor of States of Bihar, Sikkim and Kerala.

M. Hamid Ansari
Vice-President Of India

गवईसाहेब महाराष्ट्र के लोकप्रिय जमीनी नेता थे तथा वे महाराष्ट्र विधान परिषद के अध्यक्ष पद पर रहे। प्रस्तुत पुस्तक में उनके जीवन एवं कार्यशैली के बारे में विस्तार से वर्णन है। एक संसदविद के रूप में उन्होंने काफी संवेदनशीलता से कार्य किया । वे गोवा मुक्ति आंदोलन के कार्यकर्ता थे एवं उनमें राजनीतिक कौशल था । उन्होंने अपना सम्पूर्ण जीवन सामाजिक कल्याण एवं सशक्तिकरण के कार्य के लिए लगा दिया ।

सुमित्रा महाजन
अध्यक्ष, लोक सभा

A warm hearted person, Gavai Ji had friends and admirers cutting across the entire political spectrum. Gavai Ji maintained his contacts with grassroots workers and ordinary people till his end. He knew the pulse of the common man.

CH. Vidyasagar Rao
Governor Of Maharashtra

अज्ञातशत्रू

रा. सू. गवई (दादासाहेब) स्मृतिग्रंथ

अज्ञातशत्रू

रा. सू. गवई (दादासाहेब) स्मृतिग्रंथ

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
विधान भवन, मुंबई

विधान परिषदेचे उप सभापतीपद, सभापतीपद दादासाहेबांनी भूषविले त्यावेळी रिपब्लिकन पक्षाचे विशेष संख्याबळ सभागृहात नव्हते. सदस्यसंख्येच्या निकषापलीकडे जाऊन ज्येष्ठांच्या सभागृहाने त्यांची सहमतीने या सर्वोच्च पदासाठी निवड करावी, हे त्यांच्यातील असामान्य कार्यकर्तृत्वाचे श्रेय तर आहेच, परंतु महाराष्ट्रातील परिपक्व आणि अनुकरणीय अशा संसदीय परंपरेचेही ते प्रतीक आहे.

श्री. रामराजे नाईक निंबाळकर
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

संसदीय लोकशाहीमध्ये मतभेद असू शकतात परंतु व्यापक समाजकल्याणाचा समग्र विचार करतांना 'मतभेदा' ची जागा 'मनभेदा' ने कधीही घेता कामा नये. संसदीय लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक असलेल्या संवादी परंपरेचे सत्व मा. श्री. दादासाहेब गवईंच्या समग्र कारकिर्दीमध्ये दिसून येते. भारतीय लोकशाहीची गत सात दशकांची वाटचाल दादासाहेबांसारख्या नेतृत्वामुळे योग्य दिशा आणि गती कायम राखून आहे. त्यांचा हा स्मृतिग्रंथ नव्या पिढीतील सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

श्री. हरिभाऊ बागडे
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा

दादासाहेबांनी वंचित-उपेक्षित समूहातील घटकांच्या उध्दारासाठी सुरू केलेल्या संघर्षाला समन्वयाची जोड दिली. मात्र आंबेडकरी विचारांवरील निष्ठेशी त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. सामाजिक समता प्रस्थापित करणे हा जीवनाचा अग्रक्रम मानतांनाच विविध रचनात्मक कार्यातून समाजाच्या उत्थानासाठी त्यांचे प्रामाणिक प्रयत्न होते. नागपूर येथे असलेले दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक हे दादासाहेबांनी चिकाटीने केलेल्या धडपडीचे प्रतीक आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य